# नित्यकीर्तनानंद

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.८१

# नित्यकीर्तनानंदा

- अनिलप्रभू रामराय केळकर

आवृत्ती पहिली सांगली इ.स.२०२०

प्रकाशक
**अनिरुद्ध अनिलप्रभू केळकर**
**अनिकेत अनिलप्रभू केळकर**
घर नं.८२७, 'श्रीराम निकेतन' श्रीबापूरावजी केळकर वाडा
गावभाग, सांगली ४१६४१६
भ्रमणध्वनी : ९८९०२२४१८६

**प्रथम आवृत्ती : २०२०**

**सर्व हक्क प्रकाशकाधीन**

मुद्रक
**अक्षरसंचय, रामानंदनगर**
**देशमाने ऑफसेट, पलूस**

www.dasram.org या संकेतस्थळावर श्रीदासराममहाराजांची सर्व पुस्तके उपलब्ध

प्रसादमूल्य : **रु.३००/-**

# ग्रंथासंबंधी....

चिमड संप्रदायात हरिकीर्तनाची सुरुवात चिमडमहाराजांनी केली. चिमडचे रामचंद्ररावजी यरगट्टीकरमहाराज (चिमडमहाराज) साधुमहाराजांचे रथोत्सवाचे वेळी साधकांना मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या साधनात येणाऱ्या अडचणींचे निवारण व्हावे, या हेतूने हरिकीर्तन करीत. चिमडच्या महाराजांनी देह ठेवण्यापूर्वी चिमड मठात काही उत्सवातील कीर्तने त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांकडूनही करविली. कीर्तनभक्ती म्हणजे देवाशी सुसंवाद, एक आध्यात्मिक चर्चा आहे, म्हणून ती देवाला आवडणारी श्रेष्ठ भक्ती आहे. साधकाना सतत साधनाची प्रेरणा देणारे साधन आहे. अनेकांना आत्मोन्नतीसाठी या अध्यात्माची जिज्ञासा निर्माण करणारे हे कीर्तन आहे, हे जाणून चिमडच्या महाराजांनी हे कीर्तन करण्याची प्रेरणा श्रीतात्यासाहेबमहाराजांना दिली. हे सद्गुरूंचे मनोगत ओळखून इ.स.१८९८ मध्ये त्यांनी नैमित्तिक कीर्तनास सुरुवात केली. इ.स.१९०० मध्ये सांगली येथे नित्यकीर्तनास सुरुवात केली. अखंडीत वाचेने केलेले श्रीरामाचे स्मरण - सद्गुरू स्मरण हे त्यांचे कीर्तन जीवाशीवाचे भेट घडविणारे मन सुखरूप शांत करणारे होते. सांगलीमध्ये अखंड २५ वर्षे हरिगुणनामाची लयलूट त्यांनी केली. *'ब्रह्मपुरी आम्ही जातो रे। कोणी येतो का रे। संगे येईल त्यासी नेतो रे। लाभ होतो रे।।'* असे कीर्तनातून जाहीरपणे सांगून हे महात्मे पौष व.६, २७ जानेवारी १९२४ रोजी स्वरूपाकार झाले.

श्रीमामामहाराज केळकरांचे ठिकाणी असणारी कीर्तननिष्ठा श्रीनारायणमहाराजांचे कृपेने त्यांनी केलेले साधन, हे श्रीतात्यासाहेबमहाराजांना ज्ञात असल्याने, त्यांनी हे कीर्तनसेवेचे व्रत माघ व.३, १९२४ या दिवशी देह ठेवलेला असतानासुद्धा प्रत्यक्ष सगुणरूपात प्रगट होऊन त्यांचे स्वाधीन केले. श्रीमामामहाराजांना हरीकीर्तनानुग्रह प्राप्त झाला. *'असो ऐसे सकळही गेले। परंतु येकचि राहिले। जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी।।'* या समर्थोक्तीचा प्रत्यय आला. संत श्रीनिळोबारायांची तळमळ पाहून सदेह वैकुंठगमन केलेले असतानासुद्धा श्रीतुकाराममहाराजांना परत यावे लागले. तितकीच ही गोष्ट महत्त्वाची आहे. गुर्वाज्ञेप्रमाणे श्रीमामामहाराजांनी ३८ वर्षे एकही दिवस खंड न होता अखंड श्रीतात्यासाहेबमहाराजांची सेवा म्हणून कीर्तनसेवा केली. मी कीर्तन करतो हे त्यांच्या गावीही नव्हते. *'दासाहृदयी हनुमान। सदा करी तो कीर्तन।'* हा त्यांचा अनुभव होता. त्यांनी आयुष्य कीर्तनीभूत केले. सतत अखंडीत वाचेने श्रीरामस्मरण केले व सच्चिदानंद ही पदवी प्राप्त करून घेतली. याची प्रचिती श्रीमामामहाराजांनी देहांती आणून दिली. शेवटच्या दिवशी शरीराच्या नाड्या सुटल्या असतानादेखील संध्याकाळी ५ या त्यांच्या कीर्तनाचे वेळी 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्यांच्या महामंत्राचा मोठ्याने उच्चार केला. नित्यकीर्तन साधले. याहीवेळी अखंडीत वाचेने श्रीरामस्मरण सुरू आहे याची साक्ष दिली व *'हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।'* हे श्रीनाथवचन सत्य करून दाखविले. पुढे श्रीमामामहाराजांच्या आज्ञेने श्रीदासराममहाराजांनी कीर्तनसेवा ही खुणगाठ बांधून ३९ वर्षे एकही दिवस खंड न होता अखंड कीर्तन साधले. आपली स्वत:ची पत्नी निवर्तली असतानासुद्धा त्यांची कीर्तनसेवा अंतरली नाही. केवढी ही स्थितप्रज्ञता. श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे आशीर्वादाप्रमाणे ते वयाच्या पाचव्या वर्षापासून ब्रह्म व माया अशा गूढ विषयावर कीर्तन करीत. स्वानुभवाने नि:शब्द परमात्म्याचे शब्दबद्ध केलेले वर्णन म्हणजे त्यांचे कीर्तन होते. शेवटी २५ जुलै २००१ रोजी आपले स्वत:चे नित्याचे कीर्तन पूर्ण झाल्यावर कीर्तनाची आरती घेऊन अखंड कीर्तनाचे अनुसंधानात ते स्वरूपाकार झाले.

भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, भगवान सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर, भगवान सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर हे तीनही महात्मे कीर्तनासाठी अवतरले, कीर्तनच जगले व कीर्तनरूप होऊन गेले, हेच त्यांचे

खरे चरित्र आहे. आनंदाने नित्य अखंड कीर्तन साधून ते नित्यकीर्तनानंद झाले. आजही तेच कैवल्यकीर्तन श्रीदासराममहाराजांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव श्रीचंद्रशेखरआण्णा गेली १९ वर्षे तितक्याच निष्ठेने श्रीदासराममहाराजच कीर्तन करीत आहेत या अनुभवाने साधत आहेत. या कीर्तनसेवेसाठी त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो. ही महाराजांचे कृपेने आजवर चालत आलेली कीर्तन परंपरा यावच्चंद्रदिवाकरौ अशीच आमचे घराण्यात चालत राहो अशी प्रार्थना.

भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांचे आज्ञेने आमचे वंशी नित्यहरीकीर्तनाची परंपरा श्रीमामामहाराजांनी चालू केली. सुरुवातीच्या काळात दिनविशेषानुसार श्रीमामामहाराज समयोचित संतांचा अभंग निरुपणासाठी घेत व त्यावर विवरण करीत असत. काही काळ कीर्तनाच्या अनुभवानंतर त्यांनी त्या त्या पंधरवड्यात येणाऱ्या दिनविशेषानुसार नित्यपाठाचे अभंग रचले व अभंगातील एक विषय रोज याप्रमाणे पंधरा दिवसांचे विषय सुनिश्चित केले. चैत्र महिन्यात अक्षयतृतियेपर्यंत ते त्यांनीच रचलेल्या श्रीरामपाठाचे अभंग व श्रावण महिन्यात श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हरीपाठाचे अभंग विवरणासाठी घेत. उरलेल्या दहा महिन्यात त्यांनी रचलेल्या नित्यपाठाचे २० अभंग प्रत्येक पंधरवड्यात एक याप्रमाणे विवरणासाठी घेत. चिमड संप्रदायातील या कीर्तनाचे वेगळेपण ओळखावे म्हणून त्यांनी आपल्या कीर्तनाचा वेगळा बाज निर्माण केला. नमनामध्ये श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराजांचे पायी नमन करण्यासाठी 'रघुनाथप्रियगुरुवरा' हे भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांनी रचलेले पद तर श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे पायी नमन होण्यासाठी 'ज्ञानेश्वरमाऊली। ज्ञानराज माऊली तुकाराम।' हे तर कुलदेवता गुरुपरंपरा यांना नमन करण्यासाठी 'नमो रामेश्वरा नमोजी सोमेशा' हे अशी स्वरचित दोन पदे तर हृदयस्थ सीतारामाचे ठिकाणी नमन करण्यासाठी 'शुद्धं ब्रह्म परं। वंदे सीतारामं' हे माझ्या माहितीप्रमाणे संत श्रीविठोबाआण्णा दप्तरदार यांचे पद ते म्हणत. नमन झाल्यावर होणाऱ्या स्वभावे विवरणानंतर रामनामाचा अनुभव घेतल्यावर प्रसादाचे वेळी 'सद्‌गुरूराज पाहा प्राण्या' हे भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांचे पद म्हणत. प्रसन्नता या प्रसादाने अवघ्या संसारचिंता नाहीशा होत. म्हणून समर्पक संतांच्या गोष्टीच्या आधारे समारोप करताना 'चिंत्याक माडती।' हे भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांचे पद म्हणत. आरतीनंतर 'चिमडक्षेत्री सद्‌गुरूमाई' हे चिमड परंपरेचे वर्णन करणारे भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांचे पद म्हणत. असे हे चिन्मय कीर्तन साधकांच्या साधनावर वेगळाच ठसा उमटवत असे.

श्रीमामामहाराजांनी केलेले कीर्तनातील विवरण मी त्यावेळी खूपच लहान असल्याने मला तसे ऐकण्याचे भाग्य लाभले नाही. शिवाय श्रीमामामहाराजांनी पुढीलांची कीर्तन करणेची सोय व्हावी. म्हणून लिहून ठेवलेली कीर्तनाची त्या त्या विषयावरील संक्षिप्त टाचणे मला कधीच पहायलादेखील मिळाली नाहीत. त्यामुळे त्या टाचणांचा वापर 'नित्यकीर्तनानंदा' लिहिण्यासाठी झाला नाही. पण त्यांनी विषयांचे स्पष्टीकरणासाठी लिहिलेल्या अभंगांचा, पदांचा उपयोग - अमृतवाणीचा उपयोग - मात्र नित्यकीर्तनानंदासाठी झाला आहे. श्रीमामामहाराजांची कीर्तने ऐकण्याचे भाग्य मला लाभले नाही पण श्रीदासराममहाराजांची खूप कीर्तने ऐकण्याचे भाग्य मला लाभले. मला स्वत:ला लहानपणापासूनच पखवाज, तबला, हार्मोनियम ही वाद्ये वाजविण्यास येत असल्याने श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात गरजेनुसार मी साथ करीत असे. यातील एकही वाद्य वाजविण्यास मी शिकलेलो नाही, पण कीर्तनात गरज पडली तर साथ करण्यापुरती ही वाद्ये मला वाजवायला येत, हे माझे भाग्य. 'ज्ञानमार्गीची विमान वाहतूक' असे ज्यांना प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर मोठ्या प्रेमाने म्हणत अशा श्रीदासराममहाराजांची कीर्तने ऐकण्यासाठी श्रोतेही तसेच अभ्यासू, तोलामोलाचे हवेत. त्यांनाच ती कीर्तने योग्य प्रकाराने समजणार. नित्य कीर्तने करणारे श्रीदासराममहाराजांचे वडील पुण्यपुरुष थोर साक्षात्कारी संत श्रीमामामहाराज केळकर त्यांना कौतुकाने म्हणत, 'रामजी तुझी कीर्तने ऐकण्यासाठी गुरुदेवांसारखी माणसे हवीत, त्यांनाच तुझी कीर्तने समजणार.' यावरून त्यांच्या कीर्तनातील विवरणाची उंची उमगल्यावाचून राहणार नाही. 'श्रीदासरामगाथा' वाचा. लगेच कळेल त्यांच्या परमार्थाची उंची. अर्थात त्यांचे सारे विवरण माझ्यासारख्यांचे डोक्यावरून जाणारेच होते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हरीपाठावरील, श्रीमामामहाराजांचे रामपाठावरील, नित्यपाठावरील श्रीदासराममहाराजांनी केलेली विवरणे, त्यांचे प्रचितीचे

अंतर्खूण बाणवणारे बोलणे, जाणत्या श्रोत्यांच्या मनावर विलक्षण ठसा उमटवीत. श्रीदासराममहाराजांनी सांगितलेले अर्थ, विवरण दुसऱ्या कुणालाही करता येणार नाही. शिवाय श्रीमामामहाराजांचे नित्यपाठावर बोलताना त्यांचे अभंगातील एकदोन विषयांवर पंधरा दिवसातील दहा बारा दिवस विस्तृत विवरण होई. शेवटच्या दोन दिवसात ते इतर सारे विषय पाहात. श्रीदासराममहाराजांची कीर्तने एका साचातील पाठ केलेली कीर्तने नव्हती. ते दरवर्षी वेगळ्या पद्धतीने विषयाचा विस्तार करीत. त्यांनी एकोणचाळीस वर्षे एकोणचाळीस प्रकारांनी रामपाठ, हरीपाठ, नित्यपाठ सांगितला. हे सारे सागराएवढे ज्ञान माझ्या आकलनाप्रमाणे एका पानाच्या मर्यादेत सादर करणे तसे अवघडच काम होते. श्रीराम निकेतन येथे नित्य होणारी हरीकीर्तने श्रीदासराममहाराजांनी जर लिहिली असती तर ती फारच वेगळी नित्यपाठातील वर्म विषद करणारी झाली असती. त्यांनी 'नित्यपाठामृत' हे श्रीमामामहाराजांचे नित्यपाठावरील विवरण तर 'रामपाठामृत' हे श्रीरामपाठावरील विवरण लिहिले आहे. त्यामुळे नित्यकीर्तनप्रेमींची मोठी सोय झाली आहे. हे पुस्तक लिहिताना 'नित्यपाठामृत', 'रामपाठामृत', 'श्रीदासरामगाथा' या ग्रंथांचा संदर्भ आवश्यक तेथे घेतला आहे. या पुस्तकातील त्यांचे सांगणे माझ्या आकलनाप्रमाणे जसे मला श्रीमहाराजांनी सुचविले तसे ते मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एका पानात सारा विषय आला आहे किंवा मी जो विषय मांडला आहे तसेच श्रीदादांचे सांगणे होते असे मी मुळीच म्हणणार नाही. आणखी बऱ्याच प्रकारानी हा विषय जाणकार ज्ञानी मांडू शकतात. माझ्या ओंजळीत नित्यपाठाचे संदर्भात पानाच्या मर्यादेत जेवढे सामावले, तेवढेच इथे चिंतनासाठी मांडले आहे.

आत्तापर्यंत नित्यपठणासाठी रोज एका विषयाचे चिंतन करणारी अनेक सुंदर पुस्तके लिहिली गेली आहेत. पण ती सारी इंग्रजी तारखेनुसार लिहिली आहेत. आपले सण, पर्वकाळ सारे तिथीनुसार साजरे होतात. अर्थात तारखेनुसार लिहिलेल्या पुस्तकात त्यांचे चिंतनात सण पर्वकाळांचा कोठेही संदर्भ येऊ शकत नाही. आपले 'नित्यकीर्तनानंदा' हे पुस्तक भारतीय पंचागाप्रमाणे तिथीनुसार लिहिले आहे. अर्थात यात तिथीनुसार येणाऱ्या सणांचे, पुण्यतिथींचे वर्णन त्या त्या तिथीला वाचायला मिळणार आहे. सणांचे अध्यात्मिक महत्त्व समजणारे आहे.

चैत्र व श्रावण हे दोन महिने सोडून उरलेल्या दहा महिन्यात नित्यपाठाचे २० अभंग चिंतनासाठी घेतले जातात. अर्थात नित्यपाठातील दोन अभंगांवर प्रत्येक महिन्यात चिंतन केले जाते. म्हणून चैत्र व श्रावण हे दोन महिने सोडून इतर दहा महिन्यात प्रत्येक महिन्याचे सुरुवातीला त्या महिन्यासाठी श्रीमामांनी रचलेले एक शुद्ध पक्षासाठी तर एक वद्य पक्षासाठी असे दोन अभंग तात्पर्यार्थासह दिलेले आहेत, जेणेकरून या अभंगांचे आधारे पुढे महिनाभर आपण कसा विषय मांडणार आहोत याची कल्पना येईल. पंधरवड्यात येणारे सण, पर्वकाळ लक्षात घेऊन प्रत्येक अभंगात १५ विषय आमचे श्रीमामांनी गुंफले आहेत. प्रतिदिनी एका विषयावर कीर्तनरूपात चिंतन केले आहे. जो विचार मांडला आहे तो कशाचे आधारे मांडला आहे ती सारी संतवचने कंसामध्ये स्वतंत्रपणे किंवा विषयाच्या विस्तारात नोंदली आहेत. अर्थात एका पानाच्या मर्यादेमुळे संतवचने, संदर्भ सर्वच सर्व ठिकाणी देता आलेले नाहीत. काही ठिकाणी एक विषय एका पानाच्या मर्यादेत न सामावल्याने त्या एका विषयावर दोन कीर्तने लिहिली आहेत. अशा वेळेला दिनविशेषानुसार खालील विवरण झालेले नाही. म्हणजे दसरा आहे पण वर्णन खाली खंडेनवमीचे. अर्थात दसऱ्याचे वर्णन दुसरे दिवशी एकादशीला पाहिले आहे. आमच्या येथे सर्वच संतांच्या पुण्यतिथ्या, जयंत्या तसेच सर्व धर्मांचे सण साजरे केले जातात. पण येथे पानाच्या मर्यादेमध्ये अभंगातील विषय पाहून परत त्या संतांचे वर्णन यथोचित करणे शक्य होणार नव्हते त्यामुळे मनात असूनदेखील तशी सर्व संतांची वर्णने मला करता आली नाहीत. श्रीमामांच्या अभंगात जेवढे विषय आहेत, त्याला धरून जेवढी संतांची वर्णने करणे शक्य झाले तेवढे माझ्या माहितीप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला आहे.

वर्षभरात एकच विषय निरनिराळ्या प्रकाराने दोनदा, तीनदा आला आहे. हरीपाठात जे विषय आले आहेत तेच विषय काही रामपाठात तर काही नित्यपाठात आले आहेत. विवरण लिहिताना विषयाची द्विरुक्ती टाळली आहे. तरीसुद्धा काही ठिकाणी गरजेचा विषय पुन:पुन: लिहावाच लागला आहे.

नित्यकीर्तनानंदातील सारा विषय अंतरंगातील आहे व तो लिहिला आहे माझ्यासारख्या बहिरंगातील अनुभव नसणाऱ्या माणसाने, त्यामुळे लिहिताना काही त्रुटी राहण्याची शक्यता आहे. जे चांगले आहे, तुमच्या अनुभवाला येणारे आहे, ते श्रीदासराममहाराजांचे आहे, ते सारे श्रीदासराममहाराजांना अपेक्षित विवरण आहे. जे काही तुम्हाला पटणारे नसेल ते माझे आहे. त्याचा स्वीकार न करता जे बरोबर आहे त्याचाच स्वीकार करावा. *'तरी न्यून ते पुरते। अधिक ते सरते। करूनी घेयावे तुमते। विनवितू असे।।'* या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दात मी आपणास प्रार्थना करीत आहे.

हरीपाठसंकीर्तन लिहून झाल्यावर पाठोपाठ ही वर्षभराची कीर्तने लिहावीत असा माझा विचार होता. पण श्रीमहाराजांचे मनात काही वेगळेच होते. तेव्हा ती काही कारणाने लिहून झाली नाहीत. २०२० मध्ये श्रीदासराममहाराज जन्मशताब्दी वर्षात ती प्रसिद्ध व्हावीत अशी श्रीमहाराजांची इच्छा होती. त्यांच्या इच्छेप्रमाणे आत्ता हा 'नित्यकीर्तनानंदा' या पुस्तकाचे प्रकाशनाचा योग आला आहे. काय करायचे, कुणी करायचे, केव्हा करायचे हे सारे श्रीमहाराज ठरवितात. आपण फक्त निमित्तमात्र असतो हेच खरे. हे सर्व माझ्यासाठीच झाले आहे पण यातले मी काहीच केलेले नाही. सारे काही श्रीमहाराजांनी माझे हातून करवून घेतले आहे.

'नित्यकीर्तनानंदा' या पुस्तकाचे श्रीदासराममहाराजांचे जन्मशताब्दी वर्षात प्रकाशन करून चि.अनिरुद्ध व चि.अनिकेत यांचे हातून मोठी बहुमोल समर्थ सेवा घडली आहे असे मला वाटते. 'नातू आणि पणतू परमार्थी व्हावे' ही श्रीदासराममहाराजांची इच्छा श्रीमामामहाराजांनी पूर्ण केली आहे. बहुता सुकृताची जोडी असेल तरच ही परमार्थाची आवड निर्माण होते. चि.दीपक, चि.सुनिल, चि.अनिरुद्ध, चि.अनिकेत हे नातू व चि.सौ.योगिनी, चि.सौ.गीतांजली, चि.सौ.अंजनी, चि.सौ.शारदा या नाती अध्यात्मप्रेमी आहेत. अशीच चढती वाढती सेवा श्रीमहाराजांनी आम्हा सर्वांकडून पिढ्यान्‌पिढ्या करून घ्यावी अशी प्रार्थना श्रीमहाराजांचे पवित्र चरणी करतो.

'नित्यकीर्तनानंदा' या ग्रंथास माझे ज्येष्ठ व श्रेष्ठ बंधू नित्यकीर्तनानंद ती.प.पू.आण्णा यांचे आशीर्वाद प्राप्त झाले आहेत. मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. हा ग्रंथ परिपूर्ण निर्दोष स्वरूपात प्रसिद्ध व्हावा यासाठी अध्यात्मप्रेमी आमचे आप्त श्री.प्रभाकरपंत केळकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.पद्‌मजा केळकर या उभयतांनी आपुलकीने अपार कष्ट घेतले आहेत. त्यांना मन:पूर्वक धन्यवाद. ग्रंथाचे मुद्रण अत्यंत आपुलकीने आपले घरचे काम समजून सुबकपणे करण्याचे काम माझे व्याही 'अक्षरसंचय'चे श्री.विनायकराव साठे व त्यांचे स्नेही देशमाने ऑफसेटचे श्री.संदीप देशमाने यांनी केले तसेच अक्षरजुळणीचे काम सौ.मनीषा सुतार यांनी केले. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

नित्यकीर्तनानंदा या ग्रंथाचे पठणाने मला व आपणा सर्वांना नित्यकीर्तनश्रवणाचा आनंद प्राप्त व्हावा अशी प्रार्थना माझे सद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांना करतो व त्यांचे कृपेने स्फुरलेले, पूर्णत्वाला गेलेले हे 'नित्यकीर्तनानंदा' हे पुस्तक माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदादा व माझी आई ती.प.पू.सौ.सीतावहिनी यांचे पवित्र चरणी जन्मशताब्दीचे निमित्ताने स्मरणपूर्वक अर्पण करतो.

**अनिलप्रभू रामराय केळकर**

सांगली
श्रीहनुमान षष्ठी १५/०१/२०२०

# प्रकाशकांचे मनोगत

नित्य कीर्तनाचे नित्य आनंदासाठी 'नित्यकीर्तनानंदा' या पुस्तकाची निर्मिती झाली आहे. सांगलीकर सारे भाग्यवान आहेत. सांगलीत शतकाहून जुनी नित्यकीर्तनाची परंपरा आहे. साहजिकच नित्यकीर्तनाचे नित्यश्रवणाचा आनंद सांगलीकरांना मिळू शकतो. तो बाहेर राहणाऱ्यांना कसा मिळणार? शिवाय आमचे पणजोबा श्रीमामामहाराज, आमचे आजोबा श्रीदासराममहाराज, आमचे ज्येष्ठ काका श्रीआण्णा यांचे कीर्तनात येणारे विषय इतरत्र ऐकावयासदेखील मिळत नाहीत. ही बाहेरगावात राहणाऱ्या लोकांची अडचण लक्षात घेऊन आमचे वडील श्री.अनिलप्रभू रामराय केळकर यांनी श्रीरामनिकेतन येथे नित्यश: जे विषय मांडले जातात ते ते विषय तिथीनुसार एक पानावर एक कीर्तन याप्रमाणे त्यांचे आकलनाप्रमाणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एका पानात सारा विषय येऊ शकत नाही हे गृहीत आहेच, पण दुधाची तहान ताकावर का होईना निश्चित भागवता येणार आहे. ज्यांनी कीर्तनसेवेची खुणगाठ मनाशी बांधली होती अशा श्रीदासराममहाराजांचे जन्मशताब्दी वर्षात हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचा आम्हाला जास्त आनंद. या पुस्तक प्रकाशनाने नित्यकीर्तनानंद भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज, भगवान सद्‌गुरू श्रीमामामहाराज, भगवान सद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांना निश्चित आनंद होणारा आहे. यानिमित्ताने श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरीपाठ, श्रीमामामहाराजांचा श्रीरामपाठ व श्रीनित्यपाठ यावरील वेगळ्या दृष्टीने विवरण जाणकारांना अभ्यासता येणार आहे. नित्यकीर्तनानंदातील नित्यकीर्तनाचे नित्यपठणाने नित्यकीर्तनानंदांचे सान्निध्य लाभणार आहे. कोणत्या तिथीस कोणते सण येतात व त्याचे अध्यात्मिक महत्त्व काय आहे हे लक्षात येणारे आहे. कोणाची पुण्यतिथी केव्हा आहे हे समजून त्या महात्म्यांचे पुण्यस्मरणाने पुण्यप्राप्ती होणारी आहे. नित्यकीर्तन श्रवणाचा आनंद घेऊ इच्छिणाऱ्या नित्यकीर्तनानंदाना नित्यकीर्तनानंद प्राप्त होणार आहे.

नित्यकीर्तनानंदा या पुस्तकासाठी आमचे काका ती.प.पू.आण्णा यांचे आशीर्वाद प्राप्त झाले आहेत. त्यांचे मनापासून आभार. हे पुस्तक निर्दोष स्वरूपात प्रसिद्ध व्हावे म्हणून आमच्या सौ.सायलीच्या आत्या सौ.पद्मताई केळकर यांनी मोठ्या आपलेपणाने मुद्रिते तपासण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. त्यांना शतश: धन्यवाद. या पुस्तकाचे मुद्रण अत्यंत आपुलकीने व सुबकपणे करण्याचे काम आमच्या कुटुंबातील 'अक्षरसंचय'चे श्री.विनायकराव साठे (आमच्या सायलीचे वडील) व त्यांचे स्नेही देशमाने ऑफसेटचे श्री.संदीप देशमाने व सौ.मनीषा सुतार यांनी केले आहे. त्यांना शतश: धन्यवाद.

नित्यकीर्तनानंदा या ग्रंथाचे नित्य पठणाने नित्य कीर्तनाचा आनंद प्राप्त होऊन नित्यकीर्तनानंद भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज, भगवान सद्‌गुरू श्रीमामामहाराज, भगवान सद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांचे प्रेम आशीर्वाद आम्हाला व आपणा सर्वांना अखंड प्राप्त व्हावेत अशी प्रार्थना करतो व त्यांचे कृपेने पूर्णत्वास गेलेला 'नित्यकीर्तनानंदा' हा ग्रंथ आमचे आजोबा ती.प.पू.रामराय गोविंद केळकर व माझी आजी ती.प.पू.सौ.सीतावहिनी रामराय केळकर यांचे पवित्र चरणी अर्पण करतो.

सांगली
श्रीहनुमान षष्ठी १५/०१/२०२०

**अनिरुद्ध अनिलप्रभू केळकर**
**अनिकेत अनिलप्रभू केळकर**

# ... मनोगत ...

माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांच्या अपत्यामधील अत्यंत लाडके असे शेंडेफळ व माझे गुरुबंधू श्री.अनिलप्रभू रामराय केळकर यांनी आमच्या श्रीदासराममहाराजांच्या नित्यकीर्तनातील ३६० कीर्तने लिहिली आहेत. सदरचा हा ग्रंथ 'नित्यकीर्तनानंदा' या नावाने प्रकाशित होत आहे. अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

प.पू.श्री.दासराममहाराजांच्या कीर्तनातील सगळाच विषय अत्यंत महत्त्वाचा असायचा व अंतरंगाला धरून असायचा. प्रत्येक माणसाच्या शरीरात ७२००० नाड्या आहेत. *'नाडीद्वारा खेळे जीवन। त्या जीवनासरिसा वाहे पवन। त्या पवनासरिसा जाला। आत्माही विवरे।।'* असे भगवान सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. या ७२००० नाड्यांपैकी रोज २ नाड्या मरतात याप्रमाणे प्रत्येक माणसाला १०० वर्षे आयुष्य आहे. नाड्या जास्त मेल्या तर आयुष्य कमी होते. नाड्या कमी मेल्या तर आयुष्य वाढते. यातल्या ३६० नाड्या महत्त्वाच्या आहेत. त्यातल्या ६० नाड्या महत्त्वाच्या आहेत, त्यातल्या २ नाड्या अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्यांनाच इडा आणि पिंगला म्हणतात. ही तर या ६० वरची विशिष्ट कळ आहे जी साधली असता तो जीव परमात्मरूप होतो.

*'साठावरची कळ लाधलो। शिव शिव चिंतने शिवची झालो।*
*गोपालनाथ पायी वितरलो। अवघे तू मी।।*
*या झालो जंगम आम्ही। मंगलधामी।।धृ।।'*

असे प.पू.श्रीगोपालकाका कोटणीस आपल्या पद्यामध्ये म्हणतात. यादृष्टीने या विषयाला व ३६० या आकड्याला परमार्थामध्ये फार मोठे महत्त्व आहे असे मला वाटते. या तीन अंकातील आकड्यांची बेरीज ९ येते. ९ हा आकडा एकत्व दर्शवतो. *'पाढा नवाचा वाचिता। येती नवची गणिता।।'* असे प.पू.हरीबुवा हे सत्पुरुष आपल्या पद्यात म्हणतात. पाढा म्हणून बघायला हरकत नाही. शेवटपर्यंत त्या दोन अंकांची बेरीज ९ च येते हे यातले वैशिष्ट्य आहे.

आमच्या श्रीप्रभूराज यांच्याकडून जवळजवळ १०० अभंगांवर श्रीदादांची कीर्तने लिहून झाली आहेत आणि हे 'नित्यकीर्तनानंदा' हे पुस्तक/ग्रंथ श्रीदादांच्या जन्मशताब्दी पर्वकाळात प्रकाशित होत आहे.

| | |
|---|---|
| श्रीमामांचा रामपाठ | ३२ अभंग |
| श्रीमामांचा नित्यपाठ | २० अभंग |
| श्रीदादांचा आत्मारामपाठ | २० अभंग |
| श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरीपाठ | २८ अभंग |
| ---------------------------------- | |
| एकूण | १०० अभंग |

यात श्रीमहाराजांचा काही संकेत आहे असे वाटल्यावाचून राहिले नाही. हे सगळेच वाङ्मय साधकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या सगळ्या विषयाची प्रचिती मला व सर्व भगवत् भक्तांना यावी, अशी माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी प्रार्थना करतो.

भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर या तीनही नित्य कीर्तनानंदांच्या चरणी अनेक प्रणिपात!

*'सद्गुरूनाथ माझे आई। मला ठाव द्यावा पायी।।'*

श्रीदादांचा कृपाभिलाषी
**चंद्रशेखर**
(चंद्रशेखर रामराय केळकर)

सांगली
१ जानेवारी २०२०

# उपास्यदैवत



**स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ। जानकीदेवी रघुनाथ दैवत।**
**मारुती उपासना मार्ग नेमस्त। वाढविला परमार्थ रामदासी।।**

– श्रीसमर्थ रामदासस्वामी

अखंड नामसंकीर्तनयोगी ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर
यांनी इ.स.१९०४ मध्ये घडलेल्या श्रीज्ञानेश्वरमाऊलींच्या
प्रगट साक्षात्कारानंतर स्वहस्ते काढलेल्या चित्राची प्रतिकृती



काषायांबर पादुकाही चरणी मंदील श्रीमस्तकी। कर्णी कुंडल ती गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी।
हातामाजि कमंडलू नि बरवा शोभे भला दंड तो। गोविंदा पुढती प्रकाशरूप जे त्या ज्ञानिया वंदितो।।

– श्रीदासराममहाराज

# विश्वगुरू श्रीसमर्थ सद्‌गुरू श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज
# श्रीक्षेत्र देवनिंबरगी




**परब्रह्म हे चालते बोलते जे। निंबर्गीमाजी झळके स्वतेजे।**

**कसा हा आला श्रीतुकाराभराजा। नमस्कार नारायणालागी माझा।।**

– श्रीदासराममहाराज


# भगवान सद्‌गुरू श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमड



गुरुंची कृपा ज्यावरी होय ऐसी। खरा देवचि आणिला स्थापनेसी।
प्रभू डोलविला गुरुलिंगराजा। नमस्कार हा साधुराजासी माझा।।

– श्रीदासराममहाराज


# भगवान सद्‌गुरू श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर, चिमड



**महाविष्णु हे भूवरी सत्य आले। हनुमंतजी जाणूनी धन्य केले।**
**कशी ओळखी एकमेकासी झाली। श्रीराम चरणी मम वृत्ती धाली।।**

– श्रीदासराममहाराज

# भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, सांगली



जयामुळे सांगली क्षेत्र झाले। हरीनाम संकीर्तन नित्य चाले।
असा श्रेष्ठ तो श्रीहनुमंतराजा। नमस्कार साष्टांग हा त्यासी माझा।।

– श्रीदासराममहाराज

# अखंड नामसंकीर्तन योगी
# ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर व ती.प.पू.सौ.इंदिरादेवी केळकर



भक्ती प्रेम सुखालागी। स्मरू गोविंद इंदिरा।
आयुष्य वेचिले ज्यानी। श्रीरामस्मरणी सदा।।

– श्री.न.दा.दिवेकर

# पितृदेव ती.प.पू.रामराय गोविंद केळकर व
# मातोश्री ती.प.पू.सौ.सीतावहिनी रामराय केळकर



**रूप देखिल्या नयनी। सुख सुखा ये ज्याचेनी।**
**तो हा श्रीराम सिंहासनी। सीता वामांकी जननी।।**

– श्रीमामामहाराज केळकर

# ..... अनुक्रमणिका .....


| | पान नं. |
|---|---|
| पाडवा पाडवा षड्रिपू पाडवा | १ |
| कोण पुण्ये हरी येईल हातासी | २ |
| अभक्ताचे जिणे होय लाजिरवाणे | ३ |
| रामनामावीण अमंगळ वाणी | ४ |
| करिती खटपट शोधावया देव | ५ |
| एकभावे राम उच्चारणी रत | ६ |
| अन्य आचरणी पातकांच्या राशी | ७ |
| रामनाम मुखी नित्यनेमे गाता | ८ |
| सर्व तीर्थातीर्थ पवित्रापवित्र | ९ |
| संतसंगतीने देव पडे ठायी | १० |
| रामनाम हे तो एकतत्वी कळा | ११ |
| रामनामयोगे सावध जो झाला | १२ |
| तपाचे जे तप रामनाम देख | १३ |
| योगादिक कर्म वासनाची धर्म | १४ |
| भाग्याचे ते भाग्य रामनाम पाही | १५ |
| नामभक्तीपंथ सकला वरिष्ठ | १६ |
| अखंड सुख राम | १७ |
| समाधीचे सुख सांडी ओवाळोनी | १८ |
| माळ धरोनिया रामनाम घेता | १९ |
| जपोनी जपणे जप बोलिलासे | २० |
| नाम उच्चारणी धरावी आवडी | २१ |
| एकांत बाणता लोकांतात हरी | २२ |
| अनेक विधाने करोनी चांगला | २३ |
| रामनामी एकवीध होऊनी राही | २४ |
| सारासार विचार करोनिया पाही | २५ |
| रामनामामाजी साधिलिया पवन (१) | २६ |
| रामनामामाजी साधिलिया पवन (२) | २७ |
| रामनामामाजी साधिलिया पवन (३) | २८ |
| रामनामामाजी साधिलिया पवन (४) | २९ |
| रामनामामाजी साधिलिया पवन (५) | ३० |

| | पान नं. |
|---|---|
| विसावा तो जाण स्मरता राम | ३२ |
| अभंग रामपाठ असती बत्तीस | ३३ |
| अक्षय्य तृतीया | ३४ |
| खरे नाणे | ३५ |
| कसणे | ३६ |
| स्वहित | ३७ |
| मार्ग | ३८ |
| सोस | ३९ |
| सदा देव | ४० |
| संतांचे बोलणे | ४१ |
| अंतरखूण बाणणे | ४२ |
| संसार सुफल होणे | ४३ |
| जाणता | ४४ |
| वेग | ४५ |
| संतशाळा | ४६ |
| नौबद श्रवण | ४७ |
| नौबद श्रवणे | ४८ |
| नौबद श्रवणे | ४९ |
| बिंदू उमगणे | ५० |
| बिंदू उमगणे | ५१ |
| सुत्रधार | ५२ |
| नमो नमो गुरुलिंग जंगमेशा | ५३ |
| श्रुतीस्मृती तुजला गाती | ५४ |
| बत्तीरूप | ५५ |
| संजीवनी मती | ५६ |
| संजीवनी मती जरी होय सती | ५७ |
| विश्रांतीची स्थिती | ५८ |
| निर्गुण | ५९ |
| निर्गुण भोजन | ६० |
| निजत्व लक्षण | ६१ |

| | पान नं. |
|---|---|
| संत निंदा पाप कैसे घालवावे | ६३ |
| हरीहरा भेद। कधी करू नये वाद | ६४ |
| गुर्वाज्ञा साचार देव तेथे | ६५ |
| नाम प्रशंसा म्हणे | ६६ |
| वेदशास्त्र निंदणे | ६७ |
| नाम पाप जाणे मग करा | ६८ |
| व्रतदान नामासमान | ६९ |
| अभाविका उपदेशन | ७० |
| नाम महिमा आयकोन प्रिती नाही | ७१ |
| सत्संग न करणे | ७२ |
| चुका करीत जाणे | ७३ |
| अचूक साधन साधणे | ७४ |
| अचूक साधन साधणे | ७५ |
| अचूक साधन साधणे | ७६ |
| गोविंद म्हणे यम वंदीतसे पाय | ७७ |
| प्रेममंदिर | ७८ |
| प्रेममंदिर | ७९ |
| सत्याचा संकल्प | ८० |
| अखंड | ८१ |
| नेम | ८२ |
| जप | ८३ |
| प्रायश्चित्त | ८४ |
| पक्षी | ८५ |
| कामधेनू | ८६ |
| उलटे देऊळ | ८७ |
| थोर भक्ती | ८८ |
| नमन | ८९ |
| गुरुपद | ९० |
| कसणे | ९१ |
| अनुभव | ९२ |

| | |
|---|---|
| कृतकृत्य | ९४ |
| देहसार्थकता | ९५ |
| ब्रह्मचर्य | ९६ |
| गृहस्थाश्रम | ९७ |
| वानप्रस्थ | ९८ |
| संन्यास | ९९ |
| संन्यास | १०० |
| स्वप्नीचे उचित | १०१ |
| स्वप्नीचे उचित | १०२ |
| नेमनिष्ठा | १०३ |
| व्यापक पंढरी | १०४ |
| वारी | १०५ |
| लज्जाविरहित नामाचा प्रयत्न | १०६ |
| लज्जाविरहित नामाचा प्रयत्न | १०७ |
| परिपूर्ण | १०८ |
| दुराशा | १०९ |
| शकुन | ११० |
| कावड | १११ |
| सोहंहंस | ११२ |
| चिद्रूप | ११३ |
| हंससुख | ११४ |
| दिनरात | ११५ |
| वीट | ११६ |
| लटके | ११७ |
| चूक | ११८ |
| नामधारक | ११९ |
| महद्भूत | १२० |
| श्रीनामदेवमहाराज समाधी सोहळा | १२१ |
| नामाची सवय | १२२ |
| दीप | १२३ |
| देवाचिये द्वारी | १२४ |
| चहू वेदी जाण | १२५ |
| त्रिगुण असार | १२६ |
| भावेवीण भक्ती | १२७ |
| योग याग विधी | १२८ |
| श्रीदासराममहाराज पुण्यतिथी | १२९ |
| साधुबोध झाला | १३० |
| पर्वताप्रमाणे पातक | १३१ |
| संतांचे संगती | १३२ |
| विष्णूवीण जप | १३३ |
| त्रिवेणी संगमी | १३४ |
| हरी उच्चारणी अनंत | १३५ |
| तीर्थव्रतनेम भावेवीण | १३६ |
| समाधी हरीची | १३७ |
| नित्य सत्य मित हरीपाठ | १३८ |
| एक नाम हरी | १३९ |
| हरीबुद्धी जपे | १४० |
| हरिपाठ - कीर्ती मुखे | १४१ |
| हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन | १४२ |
| वेदशास्त्रप्रमाण | १४३ |
| श्रीदासराममहाराज जयंती | १४४ |
| नामसंकीर्तन वैष्णवांची | १४५ |
| काळवेळ नामस्मरणासी | १४६ |
| नित्यनेम नामी | १४७ |
| सात पाच तीन | १४८ |
| जप तप कर्म | १४९ |
| जाणीव नेणीव भगवंती नाही | १५० |
| एक तत्त्व नाम | १५१ |
| सर्वसुखगोडी | १५२ |
| अभंग हरिपाठ | १५३ |
| स्मरणाचा देव | १५५ |
| कोणगाव | १५६ |
| टाळी स्वयमेव मुखीनाम | १५७ |
| श्रीगणेश चतुर्थी | १५८ |
| ऋषीपंचमी | १५९ |
| नवभक्ती | १६० |
| श्रवण | १६१ |
| कीर्तन | १६२ |
| विष्णूस्मरण | १६३ |
| पादसेवन | १६४ |
| अर्चन | १६५ |
| वंदन | १६६ |
| दास्य | १६७ |
| सख्य आत्मनिवेदन | १६८ |
| पूर्णकळा | १६९ |
| विकल्प | १७० |
| दुर्बुद्धी | १७१ |
| निर्गुणीचे सुख | १७२ |
| साधनाचा हरीख | १७३ |
| नाम खरे ज्ञान | १७४ |
| साधक होवोनी राहे | १७५ |
| हरिकथा | १७६ |
| कीर्तन | १७७ |
| निरूपण | १७८ |
| भजन | १७९ |
| अहर्निश | १८० |
| नामाचा व्यापार | १८१ |
| साक्षीचा उपदेश | १८२ |
| प्रसाद | १८३ |
| मोहनाश | १८४ |
| हरीनामी निर्गुणी प्रगटे भवानी | १८६ |
| नवैकविधपणी उपासावी | १८७ |
| चितप्रकाश | १८८ |
| द्वैत भाव नासे | १८९ |
| सत्तारूप कैसे कळो येई | १९० |
| पूर्ण समाधान पंचमी ते | १९१ |
| नामाचा उदय तोचि उदो शब्द | १९२ |
| गोंधळ | १९३ |
| महालक्ष्मी | १९४ |

खंडेनवमी १९५
दसरा १९६
दशमाचे पैल एकादश स्थान १९७
तेथे वैष्णवजन विष्णुध्यानी १९८
निजत्व १९९
खेळात जागता २००
भाव २०१
विश्वास २०२
सत्यस्थान २०३
पापपुण्य नाही जये गावी २०४
तप २०५
तीर्थ २०६
दान २०७
संत २०८
समाधान देही साधनाचे २०९
समाधान देही साधनाचे २१०
अनुपम सुख २११
दहा आणि दोन गुरुपदी जडे २१२
धन त्या सापडे त्रयोदश २१३
चतुर्दश स्थानी दीपत्वे दिवाळी २१४
अलक्ष पूजनी लक्ष्मी पूजा २१५
ज्योती ज्योत मिळता २१७
दिवाळी पाडवा २१८
मौज अभाव भावा भावबीज २१९
तीन २२०
चार २२१
पांडव पंचमी २२२
श्रीक्षेत्र चिमड येथील पांडव पंचमी २२३
विवेक २२४
वैराग्य २२५
जन्मसफलता २२६
पंथे पंढरीच्या २२७
पंथे पंढरीच्या २२८
हरी २२९
तुळस पूजन २३०
वैकुंठ २३१
भला बुरा संग २३२
भला बुरा संग २३३
असंग २३४
धरावा श्रीरंग २३५
अंतररंगी २३६
विकल्प २३७
निंदा २३८
त्याग २३९
आशीर्वाद २४०
आशीर्वाद २४१
गुर्वाज्ञा २४२
मोक्षरेखा भाग्ये ज्ञानेश शोभले २४३
समाधीसी आले स्वये देव २४४
समाधीसी आले स्वये देव २४५
सुखा काय उणे २४६
देव दिवाळी २४८
शीर्षमार्गे जाता २४९
दशेंद्रीय ऐक्यमेळी २५०
अखंडित (दिवाळी) २५१
ब्रह्मगिरी २५२
सहज २५३
समाधी २५४
खंडेराय २५५
वेध २५६
निजयोगी २५७
आत्मस्वरूपाची गीता २५८
आत्मस्वरूपाची गीता उमगता २५९
भेटी कुळ हनुमंता अनायासे २६०
तपाचेनि तपे गुरुदत्त भेटी २६१
श्रीदत्त जयंती २६२
रामनाम २६३
एकांत २६४
एकवीध २६५
प्रपंच २६६
उपाधी २६७
भक्त २६८
स्थिरभाग्य २६९
भला २७०
निर्भयत्व २७१
माला २७२
आधार २७३
बरवा देव २७४
अनुभव खुणे देवाचे दर्शन २७५
अनुभव खुणे देवाचे दर्शन २७६
चित्त समाधान पवित्राचे २७७
जीवा खरे सुख २७९
देवाचे मंदिरी २८०
कर्म २८१
धर्म २८२
हरीनाम २८३
सासर २८४
माहेर २८५
लौकीक २८६
मोक्ष त्याचा एक स्वयमेव २८७
खटपट २८८
जाते २८९
भोळ्या भावे शोधी २९०
सत्य बोला वेधी २९१
वेधी मनोभृंग २९२
मुळ मेळविले २९३
मन २९४
गुरुपदी मन २९५
गुरुकृपांजन २९६

| | |
|---|---|
| गुरुची सेवा | २९७ |
| गुरुच्या सेवेने गुरुसुख | २९८ |
| श्रीहनुमंत षष्ठी | २९९ |
| काया जे गलीत | ३०० |
| अबोलाची मात | ३०१ |
| गुरुछंद व निंदक | ३०२ |
| रिकामा | ३०३ |
| सत्संग | ३०४ |
| साठवोनी नामा | ३०५ |
| अलिप्त | ३०६ |
| मरण साधणे | ३०७ |
| मरण साधणे | ३०८ |
| एकभाव | ३१० |
| मुख्यकाम | ३११ |
| सावधान | ३१२ |
| दया | ३१३ |
| क्षमा | ३१४ |
| शांती | ३१५ |
| टाकी घाये देव | ३१६ |
| मूळ स्वभाव नाम | ३१७ |
| श्रीगोविंद नवमी | ३१८ |
| योगक्षेम | ३१९ |
| मनाचे सामर्थ्य | ३२० |
| मनाचे सामर्थ्य | ३२१ |
| मायातीत | ३२२ |
| मायातीत | ३२३ |
| पंडित | ३२४ |
| मीपणाचा त्याग - गुरुप्रतिपदा | ३२५ |
| मीपणाचे त्यागे - गुरुप्रतिपदा | ३२६ |
| सदाचार - गुरुद्वितीया | ३२७ |
| गुरुतृतीया - मौन | ३२८ |
| एकचित्त | ३२९ |
| निष्ठावंत | ३३० |
| धैर्य धरी | ३३१ |
| काय ते शाश्वत काय अशाश्वत | ३३२ |
| ज्ञानी | ३३३ |
| सारग्रहण | ३३४ |
| काशी उमगता | ३३५ |
| नामगत | ३३६ |
| शिवरात्र | ३३७ |
| नाते | ३३८ |
| हिशोब | ३३९ |
| संसारनगरी | ३४१ |
| संसारनगरी | ३४२ |
| व्यवहारकळा | ३४३ |
| गुरुनाम | ३४४ |
| आगळा | ३४५ |
| आपण देव | ३४६ |
| आपण देव | ३४७ |
| सुखस्थानी जाणे | ३४८ |
| विठोबाची खूण जाणती संत | ३४९ |
| श्रीगोविंद जयंती | ३५० |
| आत तरी बाह्य | ३५१ |
| मनोजय विजय | ३५२ |
| शेवट नरदेह | ३५३ |
| सीमगान | ३५४ |
| तमाशा | ३५५ |
| स्वरूप पाहणे | ३५६ |
| बीज उमगणे | ३५७ |
| अबोलण्याचे बोलणे | ३५८ |
| सदा वाचे | ३५९ |
| रंग उन्मनीचा | ३६० |
| एका भावे त्याचा | ३६१ |
| कलीयुग | ३६२ |
| नामाचा घोष | ३६३ |
| डोळीयाचा डोळा | ३६४ |
| जागा | ३६५ |
| मूर्तीपूजा | ३६६ |
| मानसपूजा | ३६७ |
| ध्यानधारणा | ३६८ |
| सहजपूजा | ३६९ |
| शेवट तो स्वत: देव होय | ३७० |

# पाडवा पाडवा षड्रिपू पाडवा

आज गुढीपाडवा आहे. गुढी उभी करणे, गोडधोड खाणे, सर्व दिवसभर मजा करणे म्हणजे गुढीपाडवा नव्हे. तर कामक्रोधादी षड्रिपूंचा पाडाव करणे हा खरा गुढीपाडवा आहे. ***(‘पाडवा पाडवा षड्रिपू पाडवा। श्रीरंग आठवा बाईयानो’।। श्रीदासराममहाराज)*** कामक्रोधादी षड्रिपूंचा पाडाव केला तरच सूत्राचा मध्य धरून वर जाता येते. जीवन उर्ध्वगामी होऊन जे विश्वाचे मूळ आहे, जे आनंददायी आहे त्या आत्मारामाचा अनुभव येऊन सारे जीवनच आनंदमय होते. हा खरा गुढीपाडवा आहे. एका चैतन्यातून साऱ्या विश्वाची निर्मिती झाली आहे व साऱ्या विश्वात चैतन्य भरून राहिले आहे. या केवळ आनंदाचे असणाऱ्या चैतन्याचा अनुभव जर आला तर दु:ख आहेच कोठे? ‘अवघेची त्रैलोक्य आनंदाचे आता’ असाच अनुभव येणार आहे. ज्याने हे विश्व निर्माण केले तो खरा देव आहे. त्याला आपण ओळखले तर मोक्ष (आनंद) प्राप्त होणार आहे. या विश्वात्मक देवाचे - विष्णूचे - दर्शन कसे होते याचे वर्णन श्रीरामपाठात माझे आजोबा श्रीमामामहाराज केळकर यांनी केले आहे. श्रीरामपाठाचे एकूण ३२ अभंग असून त्या बत्तीस अभंगांच्या अभ्यासाने जीवशिवापलिकडे असणाऱ्या अक्षय स्वरूपाची प्राप्ती होणारी आहे. या रामपाठाचे चिंतन व्हावे या दृष्टीने प्रतिवर्षी चैत्र महिन्यात गुढीपाडव्यापासून अक्षयतृतीयेपर्यंत नित्य कीर्तनात या रामपाठांच्या अभंगावर चिंतन केले जाते. या रामपाठातील प्रथम अभंग असा आहे, ***‘देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य। झालिया दर्शन मुक्ती लाहे।।१।। रामपाठ करी रामपाठ करी। पुण्याची हे थोरी वर्णवेना।।२।। रामनाम गती देहात प्रचिती। धरोनिया चित्ती राम बोले।।३।। गोविंद म्हणे याचा घ्यावा अनुभव। वसे देव देव भक्तापाशी।।४।।’*** देवाचे दर्शन होणेसाठी घबाड पुण्याची गरज आहे. जेथे पापाला प्रवेश नाही अशा शुद्ध पुण्याची गरज आहे. आम्ही ज्याला पुण्य, पाप समजतो त्याला श्रीज्ञानेश्वरमहाराज ‘पुण्यात्मक पाप’ आणि ‘पापात्मक पाप’ असे संबोधतात. देहाच्या जाणीवेत जे बरेवाईट होते, त्याची गणना पापातच होते. ***(‘स्वर्गा पुण्यात्मक पापे येइजे। पापात्मके पापे नरका जाइजे। मग माते जेणे पाविजे। ते शुद्ध पुण्य।।’ श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्या कर्माने जीवाचे जन्ममरण चुकते व घननीळ आत्म्याची- नारायणाची प्राप्ती होते त्या कर्माला ‘पुण्य’ म्हणतात तर याउलट ज्या कर्माने जन्ममरणाचे-संसाराचे - बंधन सुटत नाही त्याला ‘पाप’ म्हणतात. ***(‘चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य।। पापकर्म तेचि जाण। जेणे चुकेना बंधन।।’ - श्रीदासराममहाराज)*** जन्ममरण(संसार) चुकविणारे कर्म जर आपणा हातून घडले तर घबाड शुद्ध पुण्याची प्राप्ती होऊन देवाचे दर्शन होणार आहे. देवदर्शनाने सलोकता, समीपता, सरुपता, सायुज्यता या चार मुक्ती प्राप्त होणाऱ्या आहेत. ज्या कर्माने कामक्रोध नाहीसे होऊन, वासना नाहीशा होऊन जन्ममरण चुकते त्या शुद्ध पुण्यदायी कर्माला श्रीमामामहाराज ‘रामपाठ’ म्हणतात. असा रामपाठ जर आपणाला साधला तर अगणित पुण्य प्राप्त होणार आहे. ***(‘कामक्रोध सर्व कर्म दंडिले बळे’ संत मुक्ताबाई, ‘राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।’ श्रीतुकाराममहाराज)*** श्रीमामामहाराजांना अपेक्षित असणारे रामनाम हे वैखरीने घेतल्या जाणाऱ्या नामापेक्षा वेगळे आहे. ते गतीरूप असून देहात त्याचा अनुभव घ्यायचा आहे. हे गतीरूप नाम अनुभवून परमेश्वराच्या अनंत नामापैकी कोणत्याही नामाने हाक मारली तरी ती त्याच्यापर्यंत पोचणार आहे. रामनामाची गती जाणली तर रामनामाची गत (अवस्था) प्राप्त होऊ शकणारी आहे. या गतीरूप नामाचा अनुभव जर आपण घेतला तर अंत:करणातील वासना नाहीशी होऊन साक्षात्काराने अहंकार नाहीसा होऊन, विभक्त असणारा जीव भक्त होतो व त्याच्या अंत:करणात देवाचा देव वास्तव्य करतो असे या रामपाठाचे महत्त्व आहे.

**

# कोण पुण्ये हरी येईल हातासी।

***कोण पुण्ये हरी येईल हातासी। विचारी मानसी हिताहित।।१।।***
***सर्व पुण्यामाजी थोर नामपुण्य। ज्यात उणेपण काही नाही।।२।।***
***एकवेळ मुखी उच्चारिता राम। तरती अधम हेळामात्रे।।३।।***
***गोविंद म्हणे एकवेळ नरदेह। दुजीवेळ पाहे व्यर्थ असे।।४।।***

ज्या कर्माने जन्ममरण चुकते, वासना नाहीशी होते, कामक्रोधाची तीन चिमटी राख होते, तो पुण्यप्रद रामपाठ या भाग्यवशात प्राप्त झालेल्या नरदेहात जर आपणास साधला तर हा प्राप्त झालेला नरदेह अखेरचा ठरून या नरदेहाचे सार्थक होणार आहे. अर्थप्राप्तीने आपले खरे हित साधणार नाही तर परम अर्थ (श्रेष्ठ अर्थ)प्राप्तीने आपले खरे हित साधणारे आहे. या नरदेहात आत्महित साधले - परमार्थ साधला - तरच या नरदेहाचे सार्थक होणार आहे. रात्रंदिवस ज्या आत्म्यामुळे या नरदेहाला अर्थ प्राप्त झाला आहे त्या परम अर्थाकडे जर आपण लक्ष दिले तर आपण अर्थरूप होणार - समर्थ होणार. ***(‘रात्रंदिवस पाहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ। परलोकीचा निजस्वार्थ। तेथेचि घडे ।।’ समर्थ)*** देहात असताना देहातीत झालो, देहबुद्धी नाहीशी झाली तरच परमार्थाची प्राप्ती होणार. देहबुद्धीने कधीही अनहितच होणार ***(‘हित आहे देहातीत। म्हणोनि निरोपिती संत। देहबुद्धीने अनहित। हेचि लागे।।’- समर्थ)*** देहातीत अवस्थेत आत्मवस्तूची प्रचिती येते. ही प्रचिती शरीरात जेथे येते, त्या ठिकाणाला कोणस्थान, कोणगाव म्हणतात. ***(‘कोणे गावी आहे सांगा हा विठ्ठल। जरी ठावा असेल तुम्हा कोणा।’ श्रीतुकाराममहाराज)*** या आत्मप्रचितीने कोणस्थानी जे पुण्य होते, त्या पुण्याला कोणपुण्य ‘शुद्धपुण्य’ म्हणतात. या कोणपुण्याने (शुद्धपुण्याने) हरीची-निरुपाधीक आत्म्याची-प्राप्ती होणारी आहे. ***(‘कोण पुण्य फळा आले। आजी देखिली पाऊले।।’, ‘जयामध्ये नारायण। शुद्ध पुण्य ते एक।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** देहातीत अवस्था प्राप्त होणेसाठी आपले मन शुद्ध होणे, वासनारहित होणे गरजेचे आहे. ***(‘शुद्ध करा मन व्हारे देहातीत। ओळखा वस्तूते तुका म्हणे।।’ श्रीतुकाराममहाराज)*** मन शुद्ध होण्यासाठी देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे नामस्मरण -साधन - होणे महत्वाचे आहे. यातूनच कोणस्थानी पुण्यसंचय होणारा आहे. नामाने होणारे हे कोणपुण्य इतर कोणत्याही पुण्यापेक्षा श्रेष्ठ आहे. श्रीगौतमऋषी सांगतात, ***‘गोकोटिदानं ग्रहणेषु काशी प्रयागगंगाऽयुतकल्पवासः। यज्ञायुतं मेरुसुवर्णदानं गोविंदनाम्ना न कदापि तुल्यम्।।४।। ’- पांडवगीता .*** ग्रहणपर्वकाळात रत्नालंकाराने मढलेल्या कोटी गायी दान दिल्या, आयुत यज्ञ केले, सोन्याचा मेरू दान दिला, प्रयागला गंगेच्या काठी वास्तव्य केले, या सर्व कर्मांनी जोडलेल्या पुण्याईची बेरीज गोविंदनामाने प्राप्त होणाऱ्या कोणपुण्याशी बरोबरी करू शकत नाही. गो नाम इंद्रियांना जाणणाऱ्या गोविंदाची (चैतन्याची) जाणीव होणे किती पुण्याईची गोष्ट आहे, हे यावरून लक्षात येईल. हे चैतन्य निजधाम नाम, योगियांचे निजधन असे नाम, निर्विकल्प नाम सर्व दोषांचे हरण करणारे, चित्तशुद्धी करणारे, दृढबुद्धी करणारे, आत्माराम प्रगट करणारे असल्याने त्यात उणेपण असे काहीच नाही. एकवेळ जरी अशा नामाचा अनुभव आला तर कसाही तो जीव असो, तो उद्धरून जाणारच. एकवेळ नामाचा उच्चार होणेसाठी हजार जन्माची पुण्याई हवी. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***‘जयाचे वाचा पुढा भोजे। अखंड नाम नाचतसे माझे। की जे जन्मसहस्त्री वोळगिजे। एकवेळ यावया।।’.*** इतके नाम जाणणे दुर्लभ आहे. हे नाम साधण्यासाठी मिळालेले आयुष्य साधनीभूत करा. पुन: नरदेह मिळेल या आशेवर राहू नका.

✲✲

# अभक्ताचे जिणे होय लाजिरवाणे

***अभक्ताचे जिणे होय लाजिरवाणे। रामनामाविणे सर्व व्यर्थ।।१।।***
***रामनाम ज्ञान रामनाम धन। रामनामी जाण सर्व काही।।२।।***
***म्हणोनिया नाम उच्चारावे वेगी। जव देह उगी चालतसे।।३।।***
***गोविंद म्हणे वेग चाललासे पाही। साधनी या राही संसारात।।४।।***

निजत्त्वाच्या विस्मरणाने वस्तुत: आत्मरूप असणारा जीव देहतादात्म्याने 'देह मी' असे मानून अहंकाराने आत्म्याशी परक्याप्रमाणे वागणूक करतो व भक्त असणारा विभक्त-अभक्त-होतो. पुण्यरूप असणारा जीव वज्रलेप अशा पर्वतप्राय पापाचा धनी होतो. परिणामी आनंदरूप-सुखरूप असणारा जीव देहदु:खच सोसतो. इंद्रियामार्फत हे हवे ते हवे अशी भीक मागून संसारदु:खाने सुखाला महाग होतो. अद्वैताची वाट न सापडल्याने अद्वैत निश्चळ सुख प्राप्त होत नाही व भ्रामक सुखाकरता करंटेपणच पदरी येते. द्वैतामुळे जगणे लाजिरवाणे ठरते. आम्ही कितीही पाहिले, कितीही ऐकले, कितीही मिळवले तरी आमची वखवख थांबत नाही, समाधान होत नाही. असे का? ज्या चैतन्यामुळे-निजत्वामुळे - देहाची दृश्याची जाणीव होते. त्या चैतन्याची जाणीव आम्हाला असत नाही म्हणून कितीही मिळवले तरी समाधान नाही. करंटेपण संपत नाही. तेच आम्ही चैतन्य जाणले तर जाणायचे काही उरत नाही. चैतन्य पाहिले तर, पाहावे असे काही उरत नाही. ज्या चैतन्यामुळे आपणात जिवंतपणा सळसळतो आहे, त्या चैतन्यानेच अज्ञान-विस्मरण-जर आमचे ठिकाणी असेल तर त्या जिवंतपणाला काही अर्थ आहे का? ज्याला निजत्त्वाचे स्मरण नाही, ज्याच्या वृत्ती चैतन्याकडे वळलेल्या नाहीत, मनाचे मनत्व नाहीसे होऊन ज्यांना चैतन्याची जाणीव झालेली नाही, ज्यांचे ठिकाणी चैतन्याबद्दल प्रेम भक्ती नाही अशा पतित अभक्ताबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसे माझिये भक्तिवीण। जळो ते जियालेपण। अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई।।'*** *तर नाथमहाराज सांगतात,* ***'भक्तीवीण पशू कशासी वाढला। सटवीने नेला कैसा नाही।।'***. हे निजत्व, चैतन्य म्हणजेच चराचराचे मूळ रामनाम आहे हे निजत्व-रामनाम-जाणणे हेच खरे ज्ञान आहे. हे निजत्व असेल तर बाह्य धनाचा उपयोग, निजत्व नसेल तर बाह्यधनाचा काय उपयोग? म्हणून निजत्व हेच खरे धन आहे. ***('जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।' , 'नामची कारण रे। महाभय नामे निवारण रे।। रामदास सांगे खूण। योगियांचे निजधन।।'- समर्थ)*** हे रामनाम प्राप्त झाले तर सारे काही प्राप्त होणारे आहे. म्हणून हे नाम प्राप्त होण्यासाठी जीवनाचे वेगात मनाचे उन्मन साधण्याची आपण आता त्वरा केली पाहिजे. या देहाचा काही भरवसा नाही. देह स्वस्थ असेतोवर आपणास देहातीत वस्तुरूप व्हावयाचे आहे. ***('पतीतपावना जानकीजीवना। वेगी माझ्या मना पालटावे।।', 'नाही देहाचा भरवसा। केव्हा सरेल वयसा। प्रसंग घडेल कैसा। कोण जाणे।।' - समर्थ, 'तरी झडझडोनी वहिला निघ। हरिभक्तीचिये वाटे लाग। जेणे पावसी अव्यंग। निजधाम माझे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आयुष्याचे साधन असे जे श्वासोच्छ्वास आहेत तिकडे लक्ष दिले तर वेगावर नियंत्रण येईल, मनावर नियंत्रण येईल. कामक्रोधाचे दहन होऊन रामनामध्वनी श्रवण होईल. आज श्रीक्षेत्र चिमड येथील भगवान सद्गुरु श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची पुण्यतिथी आहे. त्यांचे निर्वाण प्रसंगाचे वर्णन श्रीचिमडमहाराज असे करतात, ***'ऐका हो सज्जन अठराशे एकात। झालासे एकांत देव साधू।।१।। साधुमहाराजांनी ठेवियेला देह। चैत्र शुद्ध पाहे तृतिये दिवशी।।२।। दिवसा चौथे प्रहरी केले हो निर्याण। स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले।।३।। ऐक्य झाले तेणे दिवस गोड झाला। जनी या जोडला नारायण।। नारायणरूपी मिळोनिया गेले। कीर्तिरूपे उरले दासापाशी।।४।।'*** त्यांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

**

# रामनामावीण अमंगळ वाणी

***रामनामावीण अमंगळ वाणी। जाणा ती बोलणी अधमाची।।१।।***
***मंगल ते काय शोधोनिया पाही। रामनाम देही मंगल असे।।२।।***
***तेचि उच्चारावे सदा सर्वकाळ। जेणे कळिकाळ भीती पावे।।३।।***
***गोविंद म्हणे मन गळता मंगळ। मनाची खळबळ जेथे नुरे।।४।।***

ज्यांचे मनाचे नमन झालेले नाही, ज्यांचे मन देवाला अर्पण झालेले नाही, ज्यांच्या वृत्ती दृश्यावर उठतात, ज्यांच्या वृत्ती चैतन्याकडे वळलेल्या नाहीत, असा अभक्त हा 'रामनामावीण'च असतो. अभक्त अवस्थेत कितीही नामस्मरण झाले तरी तो 'रामनामावीण'च असतो. अभक्ताचे मन हे शुद्ध असत नाही. अभक्ताचे मन हेच ओवळे असते मग त्याने कितीही सोवळे नेसले तर त्याचा काय उपयोग? *'पृथ्वी सोवळी आकाश सोवळे। मन हे ओवळे अभक्ताचे।'* हे संतवचन येथे लक्षात घ्यावे असे आहे. आपल्या मनात जे असते तेच आपल्या वाणीतून देहबोलीतून व्यक्त होते. आमचे मन ओवळे असताना, मनात भलतेच विचार असताना आम्ही 'मंगळाचे मंगळ' रामनाम घेतले, तर ती वाणी पवित्र कशी होणार? अहो पोटात एक आणि ओठात एक, त्याचा काय उपयोग? 'काहीच न करोनी प्राणी' या अवस्थेत रामजप होणे हे श्रीसमर्थरामदासस्वामींना अपेक्षित आहे. शरीर जागेला बसणे म्हणजे 'काहीच न करोनी प्राणी' नव्हे. मनाचे नमन होणे म्हणजे 'काहीच न करोनी प्राणी' होणे होय. ***('मन कृतं कृतं कर्म न शरीर कृतं कृतं '- योगवसिष्ठ)*** मनाचे नमन झाल्यावर कामक्रोध राहतील का? ही कामक्रोधरहित अभिमानरहित अवस्था म्हणजे रामनामाचा उच्चार आहे. *'राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'* हा संतांचा अनुभव आहे. अहो मन मुरल्यावर जे उरते ते रामनाम आहे. पापाचा विचार नाही अशी अवस्था म्हणजे रामनामाचा सदाचार आहे. श्रीमामामहाराज सांगतात, *'रामनाममुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।।'*. अंत:करणात कोणताही हेतू नसताना, कोणतीही इच्छा नसताना जी सहजकृती उरते ते रामनाम आहे म्हणून रामनाम हे अबोलण्याचे बोलणे आहे. ***('सहजकृती रामनाम। नाही अंतरी दुजे काम।।', 'रामनामाचे बोलणे। दास म्हणे अबोलणे।।' श्रीमामामहाराज केळकर)*** असे हेतुवीण सक्रिया आचरणाऱ्या संतांची वाणी, देह पवित्र होतो. मंगल होतो. ***('पवित्र तो देह वाणी पुण्यवंत। जो वदे अच्युत सर्वकाळ।।' - श्रीतुकाराममहाराज)*** या नामाला सोडून जे बोलणे असते ते कितीही चांगले असो, ते सारे अधमाचेच असते.***('नामावीण माझी वाचा अमंगळ। ऐसा का चांडाळ निर्मियेला।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मन मुरल्यावर जे चैतन्य - रामनाम उरते ते जर शरीरातून बाजूला केले तर या शरीरात मंगल असे काही आहे का? त्या चैतन्याची जाणीव महत्वाची. देहाची जाणीव न राहता त्या मंगल चैतन्याची जाणीव सतत राहणे म्हणजे सतत रामनाम घेणे होय. ही जाणीव जेथे सतत असते, तेथे काळाचा प्रवेश असत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***'नारायण हरी उच्चार नामाचा। तेथे कलीकाळाचा रिघ नाही।।'*** म्हणून मनाची खळबळ जोवर आहे तोवर मंगल नाम हाताला येणार नाही. तोवर वाणी, देह मंगल होणार नाही हे निश्चित.

**

# करिती खटपट शोधावया देव

***करिती खटपट शोधावया देव। परी देवदेव हाता नये।।१।।***
***खटपट काय कळेचिना पाही। व्यर्थदिशा दाही भ्रमताती।।२।।***
***खट पटती तरी खरी खटपट। रामनाम नीट उच्चारावे।।३।।***
***गोविंद म्हणे प्रेमे घेता देवभेटी। योगयाग गोष्टी उपाधी ते।।४।।***

आपल्या मनोकामना पुऱ्या व्हाव्यात यासाठी देव शोधायचा प्रयत्न आपण आपल्या परीने करतो. देवदर्शनासाठी या गावाला जा, त्या गावाला जा, देहबुद्धीने जपजाप्य कर, व्रतवैकल्ये कर, देहाच्या अनुषंगाने योग, याग कर, हे सारे आपल्या समजुतीप्रमाणे आपण करतो. पण देवाचा ठावठिकाणा लागत नाही. अहो खरा देव हा कोठे बाहेर दिसणारा नाही. तो जगदंतरी आहे. तो विश्वात्मक आहे. तो या देहाच्या इंद्रियांना न जाणवणारा, मन, देहबुद्धीला आकलन न होणारा आहे. इंद्रियांना दृश्याची जाणीव होते व मनाला भास होतो. देव हा दृश्यभासाचे पलीकडे असल्याने, इंद्रियामार्फत, मनामार्फत होणारे सारे प्रयत्न परमात्मप्राप्तीचे दृष्टीने निष्फळ ठरणारे आहेत. ब्रह्मज्ञानाची दिशाच आम्हाला माहीत नसेल तर दाही दिशांना फिरून काय उपयोग? एकदशा (एक अवस्था) प्राप्त झाल्याशिवाय ही परमार्थाची दिशा सापडत नाही व परमार्थाची दिशा सापडली की अभिमान राहात नाही अर्थात 'मी कर्ता' म्हणून होणारे कष्टही त्याठिकाणी राहात नाहीत. बाहेरील दिशा भ्रमणाला पूरक आहेत. अन्नासाठी या दाही दिशांना फिरावे लागते. या दशदिशा भ्रमणाने संसारात जे श्रम होतात ते श्रम नाहीसे करणारी ही दिशा आहे. ही परमार्थाची दिशा ज्यांनी देव पाहिला आहे, असे संतच दाखवू शकतात. व्यवहार हा जागा सोडल्याशिवाय होत नाही. परमार्थ हा जागेला आल्याशिवाय होत नाही. आमचे देहाचे, मनाचे फिरणे थांबले पाहिजे. दिननिशी होणारे षडविकारात्मक आयास हा प्रपंचाचा पडदा दूर झाल्याशिवाय हरीभजन साधत नाही. अर्थात देवदर्शन होत नाही. कामक्रोध हे खट परमेश्वरप्राप्तीचे आड आले आहेत. कामक्रोध हेच आमचे खटकर्म आहे. गुरुंनी दाखविलेल्या मार्गाने या कामक्रोधांचे दंडण केल्याशिवाय परमात्मप्राप्तीचे सूत्र आपणास सापडणार नाही. आपल्या या खटपटीने हे षड्विकार हे खट पटले तर खरी खटपट झाली. ***('कामक्रोध आड आलेती पर्वत। राहिला अनंत पैलिकडे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'कामक्रोध सर्वकर्म दंडिले बळे। सूत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले।। निर्गुणाचा संग मला आजी जहाला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।।' - संत मुक्ताबाई)*** हे कामक्रोध नाहीसे होणे, अभिमान जाणे म्हणजे 'राम' म्हणणे होय. आम्ही 'राम' म्हणतो पण 'कामक्रोध' जात नाहीत. याचा अर्थच आम्ही रामनाम नीट उच्चारलेले नाही. ***('राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** संतांना अपेक्षित रामनाम आपणाला साधलेले नाही. ***('राम राम सब कुछ कहे। ठग ठाकूर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम कुछ और।। '- संत कबीर)*** देहाविषयी, दृश्याविषयी वैराग्य निर्माण झाले तरच देवाविषयी, नामाविषयी प्रेम निर्माण होते व प्रेमयुक्त नामाने हृदयात राम प्रगट होतो. या ठिकाणी भक्तीप्रेमाने देव भेटत असल्याने योगयागादी गोष्टी उपाधीच ठरतात. ***('वैराग्यावाचोनी। मिळेचिना प्रेमवाणी।। वैराग्यात प्रगटे प्रेम। प्रेमामाजी उपजे नाम।। प्रेमयुक्त नाम। नामामाजी प्रगटे राम।। म्हणवोनी नाम स्मरा। राम म्हणे भव तरा।।' - श्रीदासराममहाराज, 'अगर है प्रेमदर्शन का। रितसे प्रीत कर प्यारा।। बैठ आसन जमा करके। त्याग मनमो विचारोंका।। देख भ्रुकुटीके अंदरसे। चमकता है अजब तारा।।' संतवचन, 'योग याग विधी येणे नोहे सिद्धी। वायाची खटपट पाही।।' - श्रीमाणीकप्रभूमहाराज)***

**

# एकभावे राम उच्चारणी रत

***एकभावे राम उच्चारणी रत। तयाचा अंकीत देव असे।।१।।***
***भाव म्हणजे काय ज्यावीण सर्व वाव। जयाचा प्रभाव देही दिसे।।२।।***
***भाव कळो येता देव कळो येई। अन्यत्र उपायी शिणतसे।।३।।***
***गोविंद म्हणे भाव अंतरी धरावा। अभाव टाकावा नामयोगे।।४।।***

माणसाचे अंत:करणातील भाव हा दृश्याप्रमाणे बदलणारा असतो. जसे दृश्य तशा वृत्ती, जशा वृत्ती तसा भाव. आपण करुण दृश्य पाहिले की कारुण्यभाव निर्माण होतो. तर तब्येत बरी नसेल तर स्वभाव चिडचिडा होतो. सभोवतालील दृश्याचा व देहाच्या अवस्थेचा परिणाम आपल्या श्वसनगतीवर होतो. श्वसनगती बदलते. या देहाच्या अवस्थेप्रमाणे, भोवतालील दृश्याप्रमाणे बदलणाऱ्या भावाला एकभाव म्हणत नाहीत. या बदलणाऱ्या भावाला देहभाव म्हणतात. देह म्हणजे मी हा जो देहभाव आहे, ही जी मनोवृत्ती आहे ती साधनाभ्यासाने विरली पाहिजे. ती विरल्यावर जो भाव प्रगट होतो त्याला सोहंभाव म्हणतात. सोहंभाव देहाच्या अवस्थेप्रमाणे, दृश्याप्रमाणे बदलणारा नसल्याने सोहंभाव कधीही बदलत नाही व तो सर्वत्र सारखाच पसरलेला असतो. म्हणून त्याला 'एकभाव' असेही म्हणतात. देहभाव आहे तोवर दृश्याचे, देहाचे स्मरण अर्थात चैतन्याचे अखंड विस्मरणच. सोहंभावात देहाचे, दृश्याचे विस्मरण व केवळ चैतन्याचे अखंड स्मरण. देहभावाने वाचेने आम्ही नामस्मरण करतो, तेव्हा अखंड चैतन्याच्या विस्मरणाने स्मरण आहे का हा प्रश्न उद्‌भवतो. ***('नाम वदता हे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।' - श्रीनाथमहाराज)*** आपण जर सोहंभावाने स्मरण केले तर अखंड चैतन्याच्या स्मरणाने विस्मरण उद्‌भवतच नाही. ***('सोहंभावे स्मरला स्मरला नाहीच की विस्मरला।।' संतशिवदिनी)*** सोहंभावाने अखंड स्मरणपूर्वक हरीवाचेने होणाऱ्या राम उच्चारणी जर आपण रममाण झालो तर देव अंकीत होऊन राहतो. सोहंभावाचे अखंड स्मरण शरीरात आहे म्हणून हे देहाचे स्मरण किंवा विस्मरण प्रत्ययाला येते. सोहंभावाचे स्मरण बाहेर पडले की देह कायमचा विस्मरणात गेलाच. हा अखंडस्मरणाने प्रत्ययाला येणारा सोहंभाव जर आपणास समजला तर देवाचे आकलन होणार आहे. किंबहुना हा सोहंभाव - अखंड स्मरण - हेच देवाचे रूप आहे. पण हा सोहंभाव प्रगट होणार कसा? रामकृष्णवाचा (श्वसन) हा जीवाचा भाव जर आपण अंतरी धरला, म्हणजे नि:श्वास खाली यायचे प्रमाण कमी झाले तर विशेष श्वासाने संशयाचा निरास होऊन विश्वास हा देव प्रगट होणार आहे. हा भाव अंतरी कसा धरला जाणार? साधनाभ्यासाने नामयोगे जर श्वसनात असणाऱ्या त्रिगुण व पंचमहाभूते यांचा निरास झाला तर भाव शुद्ध होऊन अविश्वासाचे मन व देह यांचा लय होऊन नि:श्वासाला प्रमाण येते व संशय संपूर्णपणे फिटून विश्वासी अंतरात्मा नादप्रकाशाने अनुभवाला येतो. संदेहरहित साधनाने (पंचमहाभूतांचा निरास होऊन उरलेले आकाशरूपी श्वसन) संदेहरहित (वृत्तीरहित) आत्मज्ञान त्याला होते. चैतन्याचा ज्ञानाचा अभाव नाहीसा होऊन चैतन्याच्या ज्ञानाचा सोहंभाव प्रगट होतो.

**

# अन्य आचरणी पातकांच्या राशी

***अन्य आचरणी पातकांच्या राशी। जाती विलयासी नाममात्रे।।१।।***
***म्हणोनी रामनाम सकळा वरिष्ठ। बोलियेले श्रेष्ठ संत मुनी।।२।।***
***रामनाम मुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।।३।।***
***गोविंद म्हणे यम वंदितसे पाय। इतर ते काय तयापुढे।।४।।***

जे परमेश्वराशी अनन्य नाहीत, जे परमेश्वराला शरण जात नाहीत असे अहंकारी, परमेश्वराशिवाय अन्य विषय सतत डोक्यात असणारे विषयी, असे जे अन्य जन, त्यांच्या हातून देहतादात्म्याने परमेश्वराशी-आत्म्याशी होणारी परवत् वागणूक - अन्य आचरण - हेच पातकांच्या राशीचे मूळ आहे. देहतादात्म्याने जन्ममरणाचे चक्रात सापडणे हेच मोठे पाप असून चत्वार देहाच्या निरासाने जन्ममरण चुकविणे हेच मोठे पुण्यकर्म आहे.***('चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य। पापकर्म तेची जाण। जेणे चुकेना बंधन।। '- श्रीदासराममहाराज)*** या जन्ममरणाच्या चक्रातून सुटण्यासाठी परमेश्वराला संपूर्णपणे शरण गेले पाहिजे, श्रीज्ञानेश्वरमहाराज हे असे सांगतात, ***'जो मज होय अनन्यशरण। त्याचे निवारी मी जन्ममरण। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।'*** परमेश्वरास शरण जाणे म्हणजे देवाच्या पायावर दिवसातून पन्नास वेळा डोके ठेवणे नव्हे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'पै आपुलेनी भेदेवीण। माझे जाणिजे जे एकपण। तयाची नाव शरण। मज येणे गा।।'.*** आपल्याला जाणविणारे सारे भेद नाहीसे होऊन त्याचे एकपण जाणविणे ही शरणागती आहे. उपाधी भेद न जाणविता त्याचे एकपण जाणविणेसाठी जीवन उर्ध्वमुख होणे गरजेचे आहे. मनाचा निर्धार (एकाग्र) होऊन प्राणाचा उलट साधणे गरजेचे आहे. समर्थ सांगतात, ***'सकळ करणे ईश्वराला। म्हणोनि भेद निर्माण केला। उर्ध्वमुख होता भेदाला। ठाव कैसा।।', 'अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो। नि:संगपणे निर्गुणी तो। महायोगी।।'.*** उर्ध्वगामी जीवनात नामाची प्राप्ती होते म्हणून त्याला 'उफराटे नाम' असे समर्थ संबोधतात. उफराटे नाम जर अनुभवले तर पापाचे पर्वत असूदेत, ते नाहीसे होतात. समर्थ सांगतात, ***'उफराटे नाम म्हणता वाचे। पर्वत फुटले पापाचे। ध्वज उभारले पुण्याचे। ब्रह्मांडावरुते।।'*** उर्ध्वगामी जीवनात इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर प्राप्त होणारे रामनाम हे जीवाला पुण्यप्रद, सुखप्रद, आनंदप्रद, आत्मप्राप्ती करून देणारे असल्याने ते सर्वात श्रेष्ठ आहे. हंसराजस्वामी रामनामाचे श्रेष्ठत्व असे सांगतात, *'रेफोस्योर्ध्वा गति: मौनस्वार:'* मनोलयाने (मौनाने) उर्ध्वगतीवर स्वार होणे हेच ते श्रेष्ठ रामनाम आहे. असार द्वैतमूलक पापाचा विचार नाही अशा निर्विचार अवस्थेत नामस्मरण होणे हाच श्रेष्ठ असा सत्स्वरूपाला दाखविणारा आचार-सदाचार आहे. रामनामाच्या योगाने (तद्रूपतेने) ज्यांना सहज मनाचा मारु न करता मन:संयम साधला, सहज इंद्रियाते न दंडिता इंद्रिय संयम साधला त्यांना यम (मन:संयम) दम (इंद्रियसंयम) या साधनांचा काहीही उपयोग राहिला नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'यमदमा अवकळा आणिली। तीर्थे ठायावरूनी उठविली। यमलोकीची खुंटली। राहाटी आघवी।।', 'यमु म्हणे काय यमावे। दमु म्हणे कवणाते दमावे। तीर्थे म्हणती काय खावे। दोष ओखदासी नाही।'*** असा ज्यांना यम (मन:संयम) साधला त्यांना यम दम देत नाही तर वंदन करतो. ज्यांना यम साधत नाही त्यांना मात्र यम दम देतो. श्रीतुकाराम महाराज सांगतात, ***'तुका म्हणजे झाले जे मनाअधीन। तयासी दंडण यम करी।।'***

**

# रामनाम मुखी नित्यनेमे गाता

***रामनाम मुखी नित्य नेमे गाता। त्या नसे मागुता जन्म घेणे।।१।।***
***नित्याचे नेमाचे असे एक नाम। घेता सरे काम अंतरीचा।।२।।***
***कमी जास्त काही अनित्यता नाही। स्फुरतसे देही अखंडीत।।३।।***
***गोविंद म्हणे घ्यावे तेचि वेळोवेळा। अंतरी कळवळा धरोनिया।।४।।***

जन्ममरणाची परंपरा खंडित होण्यासाठी, सहजकृती (हेतुविण सत्क्रिया) हा रामनामाचा नित्यनेम साधला पाहिजे. आपण वासनारहित, कामक्रोधरहित, अभिमानरहित, पापपुण्यातीत होणे म्हणजे रामनाम साधणे होय. आम्ही वासनेने रामनाम घेत असू तर जन्ममरणाची परंपरा कशी खंडित होणार? हा प्रश्नच आहे. दिवसाकाठी काही काळ का होईना वासनारहित होणे हे रामनाम साधता आले पाहिजे. श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगायचे, 'कुत्रे कितीही लाडके झाले तरी पूजेच्या वेळी त्याला बांधून ठेवावे तेव्हा तरी त्याने आपले अंग चाटता कामा नये.' वासना बायको कितीही लाडकी असली तरी जन्ममरणाच्या संसारापासून जर आपणास वेगळे व्हायचे असेल तर रामनामजपाचे वेळी वासनेला बाजूला ठेवावेच लागेल. दिवसाकाठी काही काळ का होईना वासनारहित व्हावेच. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तरी गा ऐसे करी। यया आठा पाहारामाझारी। मोटके निमिषभरी। देतू जाय।।'.*** हा नामस्मरणाचा नित्यनेम प्रात:काळी, माध्यान्हकाळी, सायंकाळी असा त्रिकाळ करता करता सर्वकाळपर्यंत वाढवण्याचा आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***'नित्यनेम प्रात:काळी। माध्यानकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावे।।'.*** असा अहर्निशी परमार्थाचा नित्यनेम करणारा जगात दुर्लभ आहे आणि ज्यांनी हा नेम साधला ते उपासनेने देवच झाले. अशा पापपुण्यातीत, वासनारहित, रामरूप झालेल्या महात्म्यांना पुन्हा जन्म प्राप्त होत नाही. ***('पापपुण्य करूनी जन्मा येतो प्राणी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।' श्रीनाथमहाराज)*** साधनाभ्यासाने नि:श्वासाला प्रमाण येऊन जो चैतन्याचा ध्वनी श्रुत होईल. त्या एकनामाने अंत:करणातील इच्छा नाहीशी होते. ***'नौबद बाजत है हरीनामकी। अती मंद गती भाई सकल कामकी।।'*** हे संतवचन नित्यनामाचे महत्त्व दाखविणारेच आहे. या नादश्रवणाने जर आपण वासनारहित झालो तर जन्ममरणरहित अवस्थेत जे 'मी अमूक आहे' हे हृदयदेशी असणारे मितस्त नित्य अखंडित स्फुरण म्हणजेच नामस्मरणाची स्थिती - आपली सहजस्थिती- आहे. ही नामस्मरणाची स्थिती हे खरे अध्यात्म आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,***'एरवी सर्वांच्या हृदयदेशी। मी अमुक आहे ऐसी। जे बुद्धी स्फुरे अहर्निशी। ते वस्तु गा मी।।', 'ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाव सुभद्रापती। अध्यात्म गा।।'.*** ही सहजस्थिती प्राप्त करून घेण्याबद्दल आपले ठिकाणी जर आस्था असेल, कळवळा असेल तर ती वेळोवेळा प्राप्त करून घेण्यासाठी आपण प्रयत्न करू. वेळोवेळा नामस्मरण करू. सहजकृती हे रामनाम जर आपणास साधले तर देव सहज भेटणार आहे. श्रीमामामहाराज सांगतात, ***'गोविंद म्हणे देव भेटेल सहज। रामनाम गुज उमगता।।***

**

# सर्व तीर्थातीर्थ पवित्रापवित्र

***सर्व तीर्थातीर्थ पवित्रापवित्र। रामनामे वक्त्र धन्य होय।।१।।***
***तया रामनामी नसे ज्या आदरू। पापाचा आगरू होत असे।।२।।***
***रामनाम घेता हलाहल शमवी। इतर ते कायी तयापुढे।।३।।***
***गोविंद म्हणे संसाराची हळहळ। तेचि हलाहल जीवा नुरे।।४।।***

श्रीमामामहाराजांचे रामनाम म्हणजे पापाचा विचार नाही अशा निर्विचार अवस्थेत इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर त्रिवेणीसंगमी श्रुत होणारा चैतन्याचा ध्वनी आहे. इडा, पिंगला, सुषुम्ना म्हणजेच गंगा, यमुना, सरस्वती या पवित्र नद्या असून त्यांचा संगम म्हणजे सर्व तीर्थांचा मुकुटमणी तीर्थराज आहे. या त्रिवेणीसंगमाचे ठिकाणी त्रिकुट शिखरावर सद्‌गुरुंचे, संतांचे वास्तव्य असते. अर्थात अशा पवित्र तीर्थक्षेत्री श्रुत होणारे रामनाम हे पतितांना पावन करणारेच असते. या ठिकाणी रामनाम कथागंगेत स्नान करणाऱ्या स्नाताला इतर तीर्थांचे ते काय महत्त्व. इतर पवित्र गोष्टी अपवित्र गोष्टींच्या संपर्कात आल्या की त्या पवित्र गोष्टी अपवित्र होतात. रामनाम हे असे पवित्र आहे की त्याच्या संपर्कात येणाऱ्या अपवित्र गोष्टीसुद्धा पवित्र होतात. जे पतित महापापी आहेत ते पतितपावनाच्या रामनामाने पवित्र होतात. सर्वकाळ ज्या देहात नाम श्रुत होते आहे तो देह, ती नाम घेणारी वाणी पुण्यवंत होऊन जाते. मन मुरल्यावर - मनोलय साधल्यावर - वाणीतून ओवळे मन व्यक्त होत नाही, तर अव्यक्त चैतन्यच व्यक्त होते. त्यामुळे वाणीस धन्यता प्राप्त होते. मनोलय झालेला असल्याने मी बोललो ही जाणीव असत नाही. (मीपण ही कल्पना आहे.) मनोलयाने ज्यांचे मनात कोणताही हेतू नाही अशा संतांची वचने ऐकून लोक धन्यता पावतात. संतांचे सहज बोलणे अंतर्खूण बाणवणारे हितकारी असते. संतांचे निर्हेतुक सहज बोलणे हेच खरे रामनाम आहे. ***('नाम पावन पावन। याहून पवित्र आहे कोण।।', 'नामे पाषाण तरले। असंख्यात भक्त उद्धरिले। महापापी तेचि जाले। परमपवित्र।।'-समर्थ)*** हे त्रिवेणीसंगमी नाम जाणण्याची ज्यांचे ठिकाणी आस्था नाही, ते जीव पापाचे आगरच होतात. ***('नामासी विन्मुख तो तर पापिया।' -श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तया रामनामी सदा जो विकल्पी। वदे ना कदा जीव तो पापरूपी।।' - श्रीसमर्थ)*** तर हे रामनाम ज्यांना प्राप्त झाले त्यांचे ठिकाणी अपार सामर्थ्य निर्माण होते. भगवान शंकरांनी रामनामजपाने समुद्रमंथनातून निर्माण झालेले हलाहल विष पचविले. या रामनामाचा नेम जे करतात ते प्रभु रामचंद्रांच्या साक्षात्काराने रामरूप होतात. असा देवाभक्तातला भेद नाहीसा होणे ही खरी रामनवमी आहे. श्रीतात्यासाहेबमहाराज या साक्षात्काराचे वर्णन असे करतात, ***'श्रीराम अवतरला। जिकडे तिकडे दृष्टीत भरला।। अवलोकिता दाही दिशा। पडला रामरूपी ठसा।। गती खुंटली श्वासोश्वासा। माजी राम कोंदाटला।।*** रामनामाने श्रीराम - हरी - हाताला आल्यावर त्याचे संसरण शांत होते व संसारामध्ये असणारा अस्वस्थपणा, अस्थिरपणा ही हळहळ नाहीशी होते. संसारभय, चिंता नाहीशी होऊन तो नाचिंता होतो. ***('स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'- श्रीनाथमहाराज, 'तैसा कर्माकर्माचिया मोहरा। उठो नेदी अहंकारा। संसाराचा दरारा। सांडणे येणे।।' - श्रीज्ञानेश्वर महाराज, 'येचि जन्मे येचि काळे। संसारी होइजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।' - समर्थ)***

**

# संतसंगतीने देव पडे ठायी

***संतसंगतीने देव पडे ठायी। तयांचिये पायी लीन व्हावे।।१।।***
***संगती म्हणजे समगती जाणे। दाविताती खुणे संतराय।।२।।***
***समगतीमाजी हरीचा आठव। नुरे देहभाव देहामाजी।।३।।***
***गोविंद म्हणे मन होतसे उन्मन। रामनाम खूण दर्शनाची।।४।।***

भ्रमरूप असंताच्या संगतीने अशाश्वत अर्थप्राप्ती होते. तर निर्भ्रम संताच्या संगतीत शाश्वत परमार्थाची प्राप्ती होते. शाश्वत परमार्थाची प्राप्ती होते म्हणजे काय होते? जन्ममृत्यूची वार्ता उरत नाही. आणि जन्ममृत्यूची वार्ता उरत नाही, हीच परमार्थाची अपूर्वता आहे. परमार्थाने जीवाचे 'जन्म' हे दारिद्र्य नाहीसे होते. जन्म हेच जीवाचे दारिद्र्य आहे. जो जन्माला येतो तो करंटा होय. ज्याचे जन्म हे दारिद्र्य नाहीसे झाले आहे तो परमार्थी राज्यधारी नृपती होय. ज्याचे जन्म हे दारिद्र्य नाहीसे झाले नाही तो राज्यधारी नृपती असला तरी तो भिकारीच. जन्म हे दारिद्र्य केव्हा नाहीसे होते? जेव्हा वासना हरीरूप होते तेव्हा. आपण जोवर देहाच्या गावात आहोत तोवर वासनेने जन्ममृत्यूचे सोहळे होत राहणारच. आपण चैतन्याचे गावात जर गेलो तर तेथे मात्र जन्म नाही अर्थात मृत्यूही नाही. हा देह म्हणजे मी हा देहभाव, देहाहंकार जोवर आहे तोवर जन्ममृत्यूच्या येरझारा चालू राहणार. हा देहभाव, देहाहंकार विरला की साक्षात्काराने जन्ममृत्यू ही येरझार नाहीशी होणार आहे. हे देहभाव विरणारे साधन संतसंगतीत प्राप्त होते. देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे 'अंतरंगी नामस्मरण' कसे साधावे हे संतसंगतीत समजते. साधनाने कायेबद्दल असणारे ममत्व जेव्हा नाहीसे होते म्हणजे 'माझी ऐसी काया जव नोहे' ही अवस्था प्राप्त होते तेव्हा देहाच्या निरासाने जो ठिकाणा प्राप्त होतो त्या ठायाला 'सत'च्या संगाने देव प्राप्त होतो. असत्, अनित्य, असार गोष्टीचा त्याग घडला तर सत्, नित्य सार गोष्टींचा भोग घडतो. असत् अनित्य असार गोष्टी ओळखून त्यांचा त्याग घडण्यासाठी विवेक व वैराग्याची गरज असते. विवेक आणि वैराग्य संतसंगतीत प्राप्त होतात. ज्याच्यामुळे सर्व गोष्टींना अर्थ प्राप्त होतो, जो नसेल तर कशालाच काही अर्थ राहणार नाही असा देव संतसंगतीत प्राप्त होतो. म्हणून देवप्राप्तीची जर आपणास तळमळ असेल, तर ज्यांनी देवाचा अनुभव घेतला आहे, देवाचे सानुरागे भजन करता करता जे देवरूप झालेले आहेत अशा संतांना आपण शरण जावे. ***('हरीप्राप्तीसी उपाय। धरावे संतांचे ते पाय।।', 'ऐसियाचे पाय धरा। जेणे राम येईल घरा।।' संतवचन. 'संताविण प्राप्ती नाही। ऐसी वेद देती ग्वाही।' श्रीनाथमहाराज, 'नकळे तो देव सत्संगावाचुनी। वासना जाळोनी शुद्ध करा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** संतांनी कृपा केली तर देव भेटतो व देवाने कृपा केली तर संत भेटतात. ***('बहु अवघड आहे संतभेटी। परी या जगजेठी करुणा केली।।' - श्रीतुकाराममहाराज)*** संत हे सतत तुर्यावस्थेत असतात. त्यांची गत-अवस्था- सर्वगत चैतन्य जाणणारी असते. त्यांना दृश्याची जाणीव होत नसल्याने त्यांची गती कोणत्याही अवस्थेत बदलत नाही. त्यांची नामस्मरणाची स्थिती कधीही सांडली जात नाही. तिन्ही अवस्थांची एक अवस्था करणारे साधन संत आपणास दाखवितात. या साधनाची संगत जर आपण सतत केली तर सत्संग घडणार आहे. सत्चा संग घडणार आहे व तोच खरा सत्संग आहे. साधनाने संतांची गत जर आपणास प्राप्त झाली तर सतत चैतन्याची जाणीव चैतन्याला होत राहिल्याने देहाची जाणीव नाहीशी होते. या तुर्यावस्थेत असणाऱ्या सर्वसाक्षी मनाचे उन्मन झाले असता तुर्यावस्थेत वेगळेपणाने असणारी चैतन्याची जाणीव नाहीशी होते. तो पांडुरंगरूप होतो. तो स्वये श्रीराम होतो. असा रामनामाचा महिमा आहे.

✼✼

# रामनाम हे तो एकतत्वी कळा

***रामनाम हे तो एकतत्वी कळा। सर्व तत्वे विकळा तयावीण।।१।।***
***एकतत्वी कळा शोधोनी पाहता। तिन्हीची ऐक्यता दिसो येई।।२।।***
***इडा आणि पिंगला सुषुन्मेत सरता। रामनाम हाता येत असे।।३।।***
***गोविंद म्हणे सर्व नामामाजी वसे। सकळा श्रेष्ठ कसे नव्हे सांगा।।४।।***

रामनाम हे एक असे तत्व आहे की जे विश्वात सर्वत्र गुप्तपणाने सारखे पसरलेले आहे. ज्याच्या आधारावर ही ३६ तत्वे एकत्र आली आहेत. रामनाम हे तत्व जर विश्वातून बाजूला झाले तर या ३६ तत्वांना अवकळा-विकळा प्राप्त होते. म्हणून या जगात या नामतत्वाचेच महत्त्व जास्त आहे. श्रीमामामहाराज सांगतात, ***'गोविंद म्हणे नामतत्व। जगी त्याचेच महत्त्व।।'.*** म्हणून तत्वज्ञ संतांनी ही ३६ तत्वांची उपाधी बाजूला ठेवली व या चैतन्याचाच स्वीकार केला. हे विश्वात पसरलेले चैतन्य हेच संतांचे रामनाम आहे. ***('तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम।।'-श्रीतुकाराममहाराज. 'एका जनार्दनी नाम। सुख चैतन्य निजधाम।।' श्रीनाथमहाराज, 'या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्वीकारीती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** पण आम्हाला ही एकतत्वी कळा जाणवतच नाही. आम्हाला ही ३६ तत्वेच जाणवतात मग आम्ही चैतन्याचा स्वीकार कसा करणार? ही रामनाम - एकतत्वीकळा - ही या जड इंद्रियांना, मन, बुद्धीला (देह) जाणविणारी नाही. जाणीवेत देहाचा, मनाचा लय जेव्हा साधेल तेव्हा ही चैतन्याची कळा चैतन्यालाच जाणविते. जोवर मन आहे तोवर चैतन्याची जाणीव नाही. साधनाभ्यासाने जेव्हा रामनामात पवन साधला जातो, तेव्हा त्या पवनाचे ठिकाणी मन एकवटते. अर्थात जेवढा काळ मन एकवटते (एकाग्र होते), जेवढा काळ पवनाशी मनाचे मीलन होते, तेवढे श्वास, तेवढा काळ पवन साधला जातो. जेवढा काळ मनोलय साधला जातो, तेवढा काळ एकतत्वी कळेची जाणीव होते. अर्थात ३६ तत्वांची जाणीव होत नाही. साधनाभ्यासाने पवन साधणेचा (मनोलयाचा) काळ जसा वाढेल तसा मनोलयाने चैतन्याच्या जाणीवेचा अर्थात देहाच्या, दृश्याच्या नेणीवेचा काळ वाढेल. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या देहाच्या व मनाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तिन्ही अवस्थेमध्ये चैतन्याची जाणीव होईल. तिन्ही अवस्थांची एक अवस्था होईल. दोन प्रहर, म्हणजे सहा तास साधन व्यवस्थितपणे साधले की, विष्णूदर्शनाने तिन्ही अवस्थांची एक अवस्था होऊन अष्टौप्रहर साधनाची एक अवस्था प्राप्त होत असल्याचे श्रीमामामहाराज स्वानुभवाने याच रामपाठात पुढे असे सांगतात, ***'जरी दोन प्रहर साधेल पवन। विष्णूचे दर्शन होत असे।। साधिलिया जीवा विष्णूचे दर्शन। अष्टौप्रहर साधन चालतसे।।'*** ही एकतत्वीकळेची - चैतन्याची जाणीव नादरूपाने कधी प्रगट होते? इडा आणि पिंगला जेव्हा सुषुम्नाकार होतात तेव्हा नादरूपाने ही जाणीव प्रगट होते. हे श्रुत होणारे रामनाम सर्व विश्वाचे बीज आहे - मूळ आहे. सर्व विश्वाचे उगमस्थान आहे. ***('रामनाम बीज मंत्र। स्वामी जपे अहोरात्र।।' स्वामीस्वरूपानंद)*** या रामनामध्वनीशी तादात्म्य होणे - नादश्रवणी तदाकारता घडणे - महत्त्वाचे. श्रीबांदकरमहाराज सांगतात ***'रामनामध्वनी उमटे। तेथे लक्ष लावी नेटे। ब्रह्मानंद सहज भेटे। प्रचूर प्रचूर प्रचूर प्रचूर।। जपतू रामनाम किती।।'*** नादश्रवणी तदाकारता साधली की वारे नयनात भरते. नामाचा बिंदूरूपाने अनुभव येतो व मन संपूर्णपणे मुरते. चंचळत्व कमी होऊन निश्चळ ब्रह्माची प्राप्ती होते. म्हणून रामनाम हे सर्वश्रेष्ठ आहे.

**

# रामनामयोगे सावध जो झाला

***रामनामयोगे सावध जो झाला। कळिकाळ त्याला वंदितसे।।१।।***
***सहा जिकोनिया होणे निर्विकार। सावध प्रकार ऐसा असे।।२।।***
***काळवेळ नामस्मरणासी नाही। सदासर्वदाही उच्चारावे।।३।।***
***गोविंद म्हणे वृत्ती उठता बैसता। रामनाम चित्ता धरूनी राही।।४।।***

बाह्य मनोलयाने चैतन्याच्या सहजकृतीतून अंतर्यामी उच्चाराशिवाय उमटणारा नादरहित पण प्रत्ययाला येणारा सहजशब्द हे श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. या रामनामाच्या सहजशब्दासी जो तादात्म्य होतो, नादमयी होतो, नादश्रवणी तदाकारता ज्याला साधते, ज्याचे मन या ध्वनीमध्ये रंगून जाते, ज्याचे मन रामरंगी रंगून जाते त्याचे नयनात चैतन्याचे वारेच भरते. आत्मरूपच सर्वत्र तो पाहतो. सर्वत्र चैतन्याच्या वाऱ्याची मौज तो अनुभवतो. याला म्हणतात 'रामनामयोगे सावध होणे'. जो सर्वत्र आत्मरूप पाहतो, तो सावध झाला. जो आत्मरूप पाहात नाही तो जागा नाही, तो झोपलेलाच आहे. ***('सावध होऊनी पाही पाही। आत्मरूप डोळा गे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सावध झालो सावध झालो। हरीच्या आलो जागरणा। पळोनिया गेली झोप। होते पाप आडते।'। श्रीतुकाराममहाराज)*** रामनामयोगे अखंड जागृती प्राप्त होणे म्हणजे सावध होणे. आकारले ते विकारले या न्यायाने 'जन्मते, जायते अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, विनश्यति' हे सहा विकार देहाला चिकटलेले असतात. देहात असताना देहातीत होणे, आत्मरूपाकार होणे म्हणजे निर्विकार होणे, सावध होणे होय. देहातीत होण्यासाठी आपले मन शुद्ध होणे गरजेचे आहे. ***('शुद्ध करा मन व्हारे देहातीत। ओळखा वस्तुते तुका म्हणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मन शुद्ध होण्यासाठी मनातील काम (वासना) नाहीसा होणे गरजेचे आहे. वासना नाहीशी झाली की आपोआपच क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे पण नाहीसे होतात. मुळावर घाव घातला की फांद्या आपोआप गळून पडतात. त्याप्रमाणे अंत:करणातील काम नाहीसा झाला की क्रोध आपोआपच नाहीसा होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***'मुळाचे तोडणे जैसे। होय का शाखोद्देशे। कामु नाशलेनी नासे। तैसा क्रोधु।।'*** अंत:करणातील इच्छा नाहीशी होण्यासाठी नवद्वारे बंद होऊन हरीनामाची नौबद अंतर्यामी श्रवण व्हावी लागेल. संत सांगतात ***'नौबद बाजत है हरिनामकी। अती मंदगती भाई सकल कामकी।।'*** नाम हे कालातीत आहे म्हणून ते नित्य आहे. सदा असणाऱ्या श्वासामध्ये ध्वनीत होणारे हे नाम सदा श्रवण व्हावे लागते. श्वासामध्ये नाम कोठे आहे? ते कसे कालातीत आहे, हे श्रीदासराममहाराज असे सांगतात ***'श्वासोच्छवासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे। म्हणोनी तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।'.*** कोणतीही कृती करताना श्वसनाची गती बदलणार नाही, आपली सहजस्थिती ढळणार नाही हे आपणाला साधले पाहिजे. तरच सारे काही साधणार आहे. सहजकृती हे रामनाम कसे साधायचे हे संत मुक्ताबाई श्रीचांगदेवमहाराजांना असे सांगतात, ***'बोलता चालता देखता ऐकता। न ढळे सर्वथा तेचि साधी।।'*** आज ज्यांनी अखंड स्मरणाने कळीकाळावर मात केली असे जगज्ञीवन सगुण ब्रह्ममूर्ती तपोनिधान सिद्धानंदस्वरूप साधनमार्गसंस्थापक विश्वगुरु भगवान सद्गुरू श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज हे श्रीतुकाराममहाराजांचा ***'भजन पुजन साधुनि बळे।'*** हा अभंग उच्चारून शिवस्मरणी शिवरूप झाले - स्वरूपाकार झाले. देह ठेवल्यावर पन्नास वर्षांनी श्रीमहाराजांनी श्रीदासराममहाराजांसमोर प्रत्यक्ष प्रगट होऊन त्यांना 'श्रीगुरूलिंगगीता' श्रुत केली. हे केवढे विशेष आहे. या एका गोष्टीवरून श्रीमहाराजांचा अधिकार स्पष्ट होतो. अशा या परमपूज्य श्रीमहाराजांचे पदारविंदी परार्ध प्रणाम ***'नमितो तुज मी सद्गुरूराज। गुरुलिंगजंगम जय महाराज।।'***

**

# तपाचे जे तप रामनाम देख

***तपाचे जे तप रामनाम देख। उच्चारिता हरिख ब्रह्मादिका।।१।।***
***तप म्हणजे काय प्रकाशित होणे। अंधार दवडणे बुद्धीतील।।२।।***
***प्रकाशित होता अंतरीची ज्योती। जडेल आसक्ती रामनामी।।३।।***
***गोविंद म्हणे अज्ञान उरेल कशाला। पेटता मशाला देवाजीची।।४।।***

सर्वात श्रेष्ठ अशी जिज्ञासा - ब्रह्मजिज्ञासा - ज्या तपाने पुरी होते, तेच खरे तप आहे. ब्रह्म हे तपाच्या योगानेच जाणता येते. ***'तपस्तत्वा तद्ब्रह्म विजिज्ञासस्व'*** असे श्रुतीवचन आहे. तर हेच श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त। गुजेवीण हित कोण सांगे।।'*** कोणते तप साधले असता ही जिज्ञासा पुरी होते? कोणत्या तपाने अनंताचा साक्षात्कार होतो? अनंताचा साक्षात्कार हा फक्त एक नामाच्या तपानेच होतो. ***('अनंता जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून नामजपाच्या तपाला महातप किंवा तपाचे तप असे संत संबोधतात. हे जे संताना अपेक्षित एक नाम आहे ते आपण समजतो त्या द्वैत नामापेक्षा वेगळे आहे. हे एक नाम जर आपण अनुभवले तर ब्रह्माला आनंद होतो, विठ्ठलाला डोल येतो. आपण जे नाम उच्चारतो त्या नामाने स्वत: आपणालाही आनंद होत नाही तर ब्रह्माला आनंद होणे लांबच. हे स्वयमेव रामनाम जे कायेत व्यर्थ जात आहे, जे जपून श्रीमारुतीराय रामरूप झाले, ते आपणास साधले पाहिजे. *'काहीच न करूनी प्राणी'* या अवस्थेत हा जप साधत असल्याने हा जप साधताना कोणतेही कायाक्लेश (कष्ट) नाहीत. म्हणून आमचे चिमडचे महाराज सांगतात, ***'नाही तप मी केले। नाही झिजविली हाडे।।'.*** बुध्दीतील कल्पनेचा अंध:कार नाहीसा होऊन सत्याचा प्रकाश अनुभवणे हे खरे तप आहे. कल्पना करणाऱ्या मनाचा लय साधला असता हा अंध:कार नाहीसा होणारा आहे. साधनाभ्यासाने नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येऊन - नामाचे ठिकाणी बिंदूचा, कलेचा, ज्योतीचा साक्षात्कार होऊन सर्व वृत्तीचे मौन साधले जाते. या वृत्तीच्या मौनाने निवृत्ती अवस्थेत निर्विकल्प नामाची प्राप्ती होते. बुद्धीतील कल्पनेचा अंध:कार नाहीसा होऊन सर्वत्र आत्मप्रकाशाचे ज्ञान होते. असा सर्वत्र आत्मप्रकाश अनुभवणे हेच खरे तप आहे. हा प्रकाशाचा अनुभव येण्यासाठी, स्वरूप साक्षात्कार होण्यासाठी, देहाचा, मनाचा, प्राणाचा लय व्हावा लागतो. साधनाभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधणे म्हणजे खरे तप आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसा स्वरूपाचिया प्रसरा। लागी प्राणेंद्रियशरिरा। आटणी करणे जे वीरा। तेचि तप।।'*** या तपाने स्वरूपसाक्षात्कार होऊन 'देह म्हणजे मी' हा अहंकार नाहीसा होतो. म्हणून अहंकार नाहीसा होणे हे खरे तप. ***('योग तप याचि नावे। गलीत व्हावे अभिमान।।'-श्रीतुकाराममहाराज)*** अंतरात आत्मप्रकाशाचे ज्ञान झाल्याने सर्वत्र आत्मप्रकाशाचे ज्ञान त्याला होते. चैतन्याचे वारेच नयनात भरते. चैतन्याच्या वाऱ्याची मौजच तो अनुभवतो. साहजिकच त्या चैतन्याच्या वाऱ्यावरच त्याचे प्रेम जडते. सतत रामनामाचा अनुभव तो घेतो. रामनाम घेण्याची सक्ती त्याला करावी लागत नाही. तपाच्या योगे अहंभाव जाऊन सर्वत्र देवाचीच अनुभूती येत असल्याने देवाचे अज्ञान हे अज्ञान त्या ठिकाणी राहत नाही. ***('वारियाची मौज किती न्यारी रे। वाऱ्यावरी माझी बहु प्रीती रे।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# योगादिक कर्म वाउगाची धर्म

***योगादीक कर्म वाउगाची धर्म। करोनिया श्रम व्यर्थ होय।।१।।***
***सांगातीचा धर्म नाही वोळखिला। रामनामी आला तरी कळे।।२।।***
***जन्मापासुनिया मरणांतावरी। जीवाबरोबरी सदा असे।।३।।***
***गोविंद म्हणे तोची आपुला स्वधर्म। रामनाम वर्म ज्यात वसे।।४।।***

योग हा साधावयास कठीण असून अष्टांगयोगाने परमात्म्याचा योग घडणे कठीण असते. ***('योग तो कठीण साधिता साधेना। तेणे गा चिद्घना न पविजे।।' संतवचन 'अष्टांगयोगे न सिणिजे' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** स्नान, संध्या, यज्ञादीक कर्मकांडानेसुद्धा परमेश्वराची प्राप्ती होत नाही. फार तर या सत्कर्मानी स्वर्गप्राप्ती होते. ***('स्वर्ग व्हावा तरी यज्ञयाग करा। सत्कर्मे आचरा नित्यनेमे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही धर्म समजून, देहाला कर्ता मानून, देहाच्या जाणीवेत जी काही व्रतवैकल्ये, निरनिराळे नियम, दूरच्या तीर्थयात्रा इत्यादी कर्मे करतो, त्यातून ब्रह्म भेटत नाही. पण वेळोवेळी ब्रह्म आठवते मात्र. यातून फक्त कष्टच पदरात पडतात. ***('तुम्ही व्रते नियमू न करावे। शरीराते न पिडावे। दुरी केही न वचावे। तीर्थासी गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ती प्रताप' - समर्थ)*** कर्मानि फारातफार चित्तशुद्धी होऊ शकते. कर्मानि आत्मवस्तुरूप होता येत नाही. ***('कर्ममार्गे जाणा होय चित्तशुद्धी। उपासने बुद्धी दृढ होय।।' - श्रीदासराममहाराज. 'चित्तस्य शुद्धये कर्म न तू वस्तूपलब्धये। वस्तुसिद्धीर्विचारेण न किंचित्कर्मकोटिभिः।।' - जगद्गुरु शंकराचार्य)*** म्हणून देहाच्या अनुषंगाने होणारा योग व कर्मकांड हे धर्माचे बाह्याचरण ही परमेश्वर प्राप्तीसाठी केलेली खटपट व्यर्थच ठरणारी आहे. खरा धर्म हा आपले अंतरी आपले बरोबर आहे. सर्वाचे अंतरी सारखेपणाने असणारे, तुम्हाला शेवटपर्यंत न सोडणारे चैतन्याचे वारे - वायुरूप आत्मा- हाच सांगातीचा धर्म आहे. साधनाचे अभ्यासाने सद्गती प्राप्त होऊन अंतरात उमटणारा रामनामध्वनी जर श्रवण झाला तरच या सांगातीच्या धर्माची - आत्म्याची ओळख होते. ***('सर्वाचे अंतरी धर्म तो सारखा। दुजा भाव देखा नाही तेथे।। जो का दरिद्र्यात तोची श्रीमंतात। म्हणोनी अद्वैत बोलताती।। आत्मा तोची धर्म नाम तो आचार। संत सदाचार बोलताती।। गोविंदतनय सांगे सकळा अंतरी। भरला श्रीहरी सारिखाची।।' श्रीदासराममहाराज)*** आपण धर्माला - आत्म्याला - सोडले पण धर्माने - आत्म्याने आम्हाला सोडले नाही. तो त्याचा धर्म पाळतोच आहे. धर्म आपले रक्षण करतो तर संत धर्माचे रक्षण करतात. हा जो धर्म आहे तो जन्मापासून मरणापर्यंत जीवाबरोबर असतो. म्हणून त्याला सांगातीचा धर्म असे संत संबोधतात. ***('हा सांगातीचा धर्म। हा संप्रदाय बहु सुगम। निःशब्द रूप आणि नाम। हा दासराम त्याचा।।' श्रीदासराममहाराज 'धर्म सांगाती सांगाती। धर्मावाचून नाही गती।।' 'धर्म रक्षावयासाठी। करणे आटी आम्हासी।।' - श्रीतुकाराममहाराज)*** सर्व प्राणीमात्रांचे अस्तित्व ज्या धर्माने सिद्ध होते असा जो अस्तित्व दाखवणारा धर्म आहे, जो नाही असे म्हणताच येणार नाही तोच आपला एकमेव एक असा स्वधर्म आहे. ज्या क्रियेने आपले अस्तित्व सिद्ध होते, जी क्रिया सर्वत्र सारखी पसरलेली आहे असे श्वासोच्छवास त्यांचे सतत अनुसंधान असणे, सदा स्वरूपानुसंधान असणे हा खरा स्वधर्म आहे. ***('सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी राहणे हा स्वधर्म।।' - समर्थ)*** प्रत्येक श्वासात रामजप अनुभवणे हेच श्रेष्ठ धर्माचरण आहे.

**

(श्रीहनुमानजयंती, श्रीगुरुलिंगजंगममहाराज जयंती, छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी)

# भाग्याचे ते भाग्य रामनाम पाही

***भाग्याचे ते भाग्य रामनाम पाही। येर भाग्य होई श्रेष्ठ कसे।।१।।***
***येर भाग्यवंता देव भेटी नाही। एरंड कदा पाही उस नव्हे।।२।।***
***म्हणोनिया जनी साठवावे नाम। अंतरीचे काम निवारोनी।।३।।***
***गोविंद म्हणे तोची भाग्ये विनटला। जगी धन्य झाला हरीभक्त।।४।।***

प्रारब्धवशात प्राप्त झालेले पण आपणास मात्र मनगटाच्या जोरावर, बुद्धीच्या जोरावर, कष्टाने प्राप्त केलेले आहे असे वाटणारे जे भाग्य आहे ते कुणामुळे आपणास प्राप्त झाले आहे? शरीरात चैतन्य आहे म्हणून हे सारे भाग्य भाग्यवशात आपणास प्राप्त झाले आहे. आपल्या देहात चैतन्य आहे, हे खरे आपले भाग्य आहे. त्याने हे सारे आपणास उपलब्ध करून दिले आहे म्हणून चैतन्य हे भाग्याचे भाग्य आहे आणि ते चैतन्य म्हणजेच श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. म्हणून चैतन्य-रामनाम - हे जे भाग्य आहे त्या भाग्याबरोबर ही ऐहिक भाग्ये कशी तुलना करू शकतील? इतर सारी भाग्ये हात जोडून पायाशी उभी आहेत आणि आत चैतन्य नाही आहे, कोण उपभोग घेणार त्या भाग्याचा? म्हणून चैतन्याचे भाग्य महत्त्वाचे. ***('अंग गोरे आणि तरुणे। वरी लेईले आहे लेणे। परी येकलेनी प्राणे। सांडिले जेवी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ऐहिक भाग्याने देव भेटत नाही. पण आत चैतन्य आहे तोवर देवभेटीची - देव होण्याची - संधी आपणास उपलब्ध आहे. म्हणून रामनामाचे - चैतन्याचे भाग्य सर्वात श्रेष्ठ आहे. ***('जरी झाला भाग्यवंत। तरी काय भेटे भगवंत।। तुका म्हणे तोचि थोर। ज्याचे मुखी रघुवीर।।' - श्रीतुकाराममहाराज)*** हे चैतन्याचे भाग्य देवाने देवप्राप्तीसाठी आपणास उपलब्ध करून दिले आहे. इतर भाग्ये दैवाने प्राप्त होतात. पण हे चैतन्याचे भाग्य आपणास सर्वांना सारखे देवाने दिले आहे. म्हणून हे भाग्य सर्वश्रेष्ठ आहे. 'पैशाने देव जर विकत घेता आला असता तर तो निजाम स्टेटने विकत घेतला असता' असे श्रीमामामहाराज कीर्तनात सांगत. म्हणून या इतर भाग्यप्राप्तीची इच्छा अंतरी न धरता रामनाम हे धन अंतरात साठवावे. अंतरातील सर्व इच्छा-वासना नाहीशा झाल्या असता जन्ममरणरहित अवस्थेत या चैतन्याचा - रामनामाचा - अनुभव देहात प्राप्त होतो. प्राणापान मिनले की सर्वांगी चैतन्य कोंदल्याचा अनुभव - नाम सर्वांगी बिंबल्याचा अनुभव - त्या जीवास प्राप्त होतो. अंतरातील काम त्यागणेसाठी विवेक आणि वैराग्य आपणाजवळ असणे आवश्यक आहे म्हणून विवेक आणि वैराग्य जवळ असणे हेच महाद्भाग्य आहे. ***('म्हणोनी विवेक आणि वैराग्य। तेचि जाणिजे महद्भाग्य। रामदास म्हणे योग्य। साधु जाणती।।- श्रीसमर्थ, 'वैराग्याचे भाग्य। संतसंगे हाची लाभ।।'-संतवचन, 'तैसे वैराग्याची शिव न देखती। जे विवेकाची भाष नेणती। ते मूर्ख केवी पावती। मज ईश्वराते।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'विवेकावीण वैराग्य आंधळे। वैराग्यावीण विवेक पांगळे। हे एक एका अवेगळे। झाल्यावीण न कळे परमार्थ।।'- श्रीनाथमहाराज)*** हे भाग्य ज्याचेजवळ आहे असा विरक्त हरिभक्त जगात धन्यता प्राप्त करून घेतो. ज्याने हे ऐहिक भाग्य आपणास उपलब्ध करून दिले तो उपलब्ध झाल्यावर उपलब्ध व्हायचे काय राहिले? दाही दिशांना चित्प्रकाश दिसणे म्हणजे अध्यात्मिक भाग्य उजळणे होय. ***('उजळले भाग्य दाही दिशा चित्प्रकाश गे। कृष्ण नवरा झाला आता कवणाची आस गे।।'-संतवचन)*** असे भाग्य उजळले की चिंता राहात नाही. ***('उजळले भाग्य अवघी चिंता वारली।।' - श्रीतुकाराममहाराज)*** ज्यांनी हे रामनाम अंतरी साठविले असे भगवान शंकर आज श्रीमारुतीरायांच्या रूपाने, भगवान सद्गुरु गुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांचे रूपाने अवतरले. आज भगवान शंकराचे अवतार छत्रपती शिवाजीमहाराज यांची पुण्यतिथी आहे. आसन मांडी घालून रामनामाचा त्रिवार जप करून या महात्म्याने निर्वाण केले. हे तिन्ही महात्मे अवतरले म्हणून आपले भाग्य उजळले. रामनामाचे महत्त्व पटले. या तिन्ही महात्म्यांना त्रिवार वंदन करून येथेच थांबतो. **

# नामभक्तीपंथ सकळा वरिष्ठ

***नामभक्तीपंथ सकळा वरिष्ठ। जेथे जीवा कष्ट न पडती।।१।।***
***दृढ धरी मनी रामनाम कथा। वाया आणिका पंथा जाऊ नको।।२।।***
***चालियेला पंथ असे निजदेही। मनोवेगे जाई आक्रमोनी।।३।।***
***गोविंद म्हणे देव भेटेल सहज। रामनाम गूज उमगता।।४।।***

या जगात अध्यात्मिक पंथ - मार्ग - भरपूर आहेत. पण आत्मविठ्ठलाची - आत्मारामाची - श्रीहरीची - भेट घडविणारा, विभक्तांना भक्त घडविणारा हा नामभक्तीपंथ एकच आहे. ***'नाना पंथ नाना मते। भूमंडळी असंख्याते। सर्वाहोनी नाम थोर। दास म्हणे नेमस्त।।'*** हा श्रीसमर्थांचा अनुभव आहे. हा पंथ प्राप्त होण्याकरिता डोळ्याला दिसणाऱ्या, मनाला भासणाऱ्या गौण निंद्य अशा सर्व दृश्य जगाचा तटका तुटला पाहिजे. तरच भक्तीपंथाने सर्वभावाने वंद्य असे दृश्यापलिकडील दृश्यावेगळे सर्वगत चैतन्य प्राप्त होणारे आहे. श्रीसमर्थ सांगतात ***'मना सज्जना भक्तीपंथेची जावे। तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे। जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे।।'*** हा पंथ जीवाला आपल्या मूळ घराला - विश्रांती प्राप्त करून देणाऱ्या, मायेवीण असणाऱ्या माहेराला घेऊन जाणारा आहे. माहेराकडे जाणारा हा शीतल पंथ जीवाला शांत करणारा, निवांतपणा प्राप्त करून देणारा आहे. वाटेवरती कोणताही ताप नाही, भय नाही, जकातीचा गुंता नाही. निर्विघ्न नि:ष्कंटक असा हा पंथ आहे. या मार्गाने जात असताना विठ्ठलाच्या नामाचे श्रवण होत असते. मुखाने नाम उच्चारायचे कष्ट देखील येथे नाहीत. ***('मुखी नाम उच्चारिता कष्ट नाही।।' समर्थ , 'होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।' - संत कबीर)*** असा हा प्रपंचातील सायास दूर करणारा, संसारावर मात करणारा नामभक्तीपंथ सर्वश्रेष्ठ आहे हे सांगणे नकोच. मन ईश्वराला अर्पण झाल्यावर, संकल्पविकल्परहित मनाने, दृढ मनाने ही रामनामकथा साधता येते. ही रामनामकथाच ब्रह्मांड भेदून पैलाड न्यायची आहे, असे श्रीसमर्थ सांगतात. तर ही उर्ध्ववाहिनी हरीकथा सर्व तीर्थाचा तीर्थराज आहे, असे श्रीतुकाराममहाराज सांगतात. ***(मन ठेवून ईश्वरी। जो कोणी हरीकथा करी। तोचि ये संसारी। धन्य जाला।', 'उदासवृत्तीस मानवे जन। विशेष कथा निरुपण। रामकथा ब्रह्मांड भेदून। पैलाड न्यावी।।' समर्थ, 'उर्ध्ववाहिनी हरिकथा। मुकुटमणी सकळा तीर्था।।'-श्रीतुकाराममहाराज)*** मनाचा लय साधणारा हा पंथ संतांचे संगतीत प्राप्त होणारा आहे. मनाचा लय साधणारा हा पंथ आकाशरूप अशा महाकारणदेहातून - निजदेहातून जाणारा आहे. आता मनोवेगाने हा मनोलय साधला पाहिजे. ***('आकाशमार्गी गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ। इतरास हा गुह्यार्थ। सहसा नकळे।।'- श्रीसमर्थ 'आकाशातून वाट रे। न करावा बोभाट रे' - श्रीचिमडमहाराज)*** या आकाशरूप महाकारणदेहाचे एक वेगळे वैशिष्ट्य श्रीदासराममहाराज असे सांगतात, ***'महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरीकथा।।'*** मनोलयाने सहजावस्था जर आपणास साधली किंवा सहजकृती असे रामनाम जर आपणास साधले तर देव सहज स्वभावे भेटणारा आहे.

**

# अखंड सुख राम

***अखंड सुख राम खंड सुख माया। माझी ऐसी काया जव नव्हे।।१।।***
***तव खरे सुख येईल ना हाती। जीवाची विपत्ती दूर नव्हे।।२।।***
***अखंड चरणगती चाले निजदेही। साधुबोध होई तरीच कळे।।३।।***
***गोविंद म्हणे सर्वसुखाचेही सुख। रामनाम एक आन नसे।।४।।***

परमात्मा अखंड आहे. त्याचे अखंडपण आपणाला अखंडपणे जाणवले पाहिजे. अखंड परमात्म्याची अखंड जाणीव जर आपणाला होईल तर अखंड सुख - अक्षयसुख - सर्वसुख प्राप्त होणार आहे. जोवर सतत देहाची जाणीव आहे व परमात्म्याची नेणीव आहे, जोवर आत्म्याच्या वियोगाचाच योग आहे, तोवर सतत दुःखच भोगावे लागणार. ***(दास म्हणे वियोगाचा योग रे। त्याचे फळ सदा दुःख भोग रे।।', 'देहचि होऊन राहिजे। तेणे देहदुःख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।'-समर्थ)*** 'काय उणे' होऊन - देहभाव विरून - चैतन्याची जाणीव झाली तर सुख आहे. ***('तुका म्हणे तेथे सुखा काय उणे। राहे समाधाने चित्ताचिया।।', 'देवा आता ऐसा करी उपकार। देहाचा विसर पाडी माझ्या। तरीच हा जीव सुख पावे माझा। बरे केशीराजा कळो आले।।' - श्रीतुकाराममहाराज, 'देहभाव सर्व जाय। तेव्हा विदेही सुख होय।।' - संत जनाबाई)*** जोवर काय उणे होत नाही तोवर कायेला कल्पनेने मायाच प्रतीत होते. कल्पनेने प्रतीत होणाऱ्या साकार मायेतून होणारे सुख - विषयातून होणारे सुख - साधनाधीन असणारे सुख - द्वैतातून होणारे सुख हे खंडित सुख आहे. ***'सुख सुख म्हणता हे दुःख ठाकून आले।।', 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे।।'*** ही सारी संसारातील सुखाचा अनुभव व्यक्त करणारी वचने या खंडित सुखाचा निर्देश करतात. विषय जवळ आहे तोवर सुख, विषय बाजूला झाले की दुःख. विषयातून मिळणारे क्षणैक सुख मिळवण्यासाठी दुःखाचे डोंगर सोसावे लागतात. म्हणून विषयातून सुख होते, दुसऱ्यापासून - द्वैतातून - साधनातून सुख होते हे संतमहात्मे मानायला तयार नाहीत. ***('विषयभोगी जे सुख। ते साद्यंतची जाण दुःख।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'यतसुखं साधनाधीनं तद् दुःखमेवच' संस्कृतवचन, 'द्वैत तितुके केवळ दुःख। परमसुख अद्वैती।। - श्रीनाथमहाराज)*** कल्पनेने - विपरीत ज्ञानाने होणारे काल्पनिक विपरीत सुख वेगळे व कल्पनेच्या निरासाने मायेचा निरास होऊन समत्वाचे अखंड, खरे सुख प्राप्त होणे वेगळे. जेथे दुःखाचा प्रवेशच नाही, जेथे चित्ताला अखंडित प्रसन्नता असते, ते खरे सुख. चैतन्याच्या - आत्म्याच्या-अनुभूतीतून, अद्वैतानुभवातून जे होते ते खरे सुख. कल्पनेच्या निरासाने जीवपणचा वियोग होऊन नवल स्वरूपाचा योग होतो व अखंड असणाऱ्या, कल्पांती न नासणाऱ्या स्वरूपापासून अखंड अक्षय सुखाची प्राप्ती होते. ***('किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जे होये। तया नाम सुख।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधूंच्या उपदेशाप्रमाणे प्राणापानामध्ये मनाचे संपूर्ण मीलन झाले असता देहाचा, मनाचा, प्राणाचा लय होऊन 'नुरोनिया ठेला' अवस्थेत, हृदयदेशी 'मी अमुक आहे' हे अहर्निशी राहणारे स्फुरण म्हणजेच महाकारणदेही - निजदेही राहणारे अखंड स्मरण, म्हणजेच निजदेही चालणारी अखंडचरणगती, सर्व सुखाचे सुख, भाग्याचे भाग्य, तपाचे तप असे श्रीमामामहाराजांचे एक रामनाम आहे.

**

# समाधीचे सुख सांडी ओवाळोनी

***समाधीचे सुख सांडी ओवाळोनी। रामनाम वाणी वदे जरी।।१।।***
***समत्वाचे सुखी हरिची समाधी। इतर उपाधी तुरे जेथे।।२।।***
***सदा सर्वकाळ अंतरी अढळे। कदापि न ढळे तेचि साधी।।३।।***
***गोविंद म्हणे ऐसी समाधी साधिता। वैकुंठ ये हाता अनायासे।।४।।***

समाधी हे योगमार्गातील आठवे अंग आहे. योगाचे अभ्यासाने ही समाधी लावली जाते. तटस्थ होणे हे या समाधीचे वैशिष्ट्य आहे. ही समाधी काही काळासाठी लावली जाते. अर्थात यातून जे काही सुख मिळते ते त्या काळापुरते असते हे उघड आहे. अखंड सुख - सर्वसुख - अक्षयसुख - निश्चळसुख - यातून प्राप्त होत नाही. या समाधीने उपाधी कमी होत नाही, तर ती वाढते. कोणती उपाधी वाढते? - 'मी योगी आहे' ही अहंकाराची उपाधी वाढते. अर्थात उपाधी वाढल्याने देहबुद्धी वाढते व खरा परमार्थ साधत नाही. या योगसमाधीने परमार्थाचे ध्येय जे 'स्वरूपसाक्षात्कार होणे' हे आहे ते साधत नाही. अर्थात ही योगाची खटपट शरीरस्वास्थ्यापुरती, मन:स्वास्थ्यापुरती मर्यादित राहते. या समाधीचे असारपण संत मुक्ताबाई श्रीचांगदेवमहाराजांना असे सांगतात, ***'झालासी तटस्थ नव्हे ती समाधी। उपायाची शुद्धी नेणोनिया।। काष्ठाऐसा जड तैसा तू झालासी। स्वरूप नेणसी श्रमोनिया।।'*** तर श्रीनाथमहाराज या समाधीचे गौणत्व असे स्पष्ट करतात, ***'लावूनी आसन बैससी समाधी। तो तो उपाधी सहज लागे। नाममुखी गाता जोडे सायुज्यता। उपाधी तत्वता दुरी पळे।।'.*** म्हणून नामतन्मयता प्राप्त होऊन लागणाऱ्या समाधीतून साधूंना प्राप्त होणारे अखंड सुख व या अष्टांगयोगातून लावल्या जाणाऱ्या समाधीतून प्राप्त होणारे खंडित सुख यांची तुलनाच होऊ शकत नाही. सदा स्वरूपानुसंधानाने कल्पनेचा निरास होऊन कल्पनेच्या पलीकडील अद्वैत स्वरूपाच्या ज्ञानाने द्वैत नाहीसे होते व तो स्वरूपाकार होतो. स्वरूपाचे ठिकाणी बुद्धी निश्चल - स्थिर - दृढ होऊन त्याची द्वैत दाखविणारी - आकार दाखविणारी - उपाधी दाखविणारी - द्वैतबुद्धी नाहीशी होते. त्याला उपाधीची - आकाराची - द्वैताची जाणीव न होताना सतत उपाधीमध्ये गुप्तरूपाने सर्वत्र सारख्या असणाऱ्या चैतन्याची जाणीव होते. एका चैतन्याच्या ज्ञानाने - जाणीवेने 'समत्वाचे सुख' प्राप्त होते. हीच साधूंना प्राप्त होणारी हरीसमाधी - सहजसमाधी आहे. उपाधीची जाणीव साधूंना होत नसल्याने त्यांना उपाधीची उपाधी कधी होत नाही. ***('सांडी कल्पना उपाधी। हीच साधुला समाधी।'-संतवचन, 'समाधी हरिची समसुखेवीण। न साहेल जाण द्वैतबुद्धी।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'टाकिता उपाधी। लागे सहज समाधी।'- श्रीदासराममहाराज, 'सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचे निरसन। अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेचि शुद्ध कल्पना।।', 'जे मनबुद्धी अगोचर। जे कल्पनेहून पर। ते अनुभविता साचार। द्वैत कैचे।।' - श्रीसमर्थ, 'समाधीसुखी केवळ। जै बुद्धी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगस्थिती।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** असा जो सर्वकाळ अंतरी स्वरूपाचे ठिकाणी अढळ असतो तो बाह्यत: कोणतीही परिस्थिती येवो, देहाची अवस्था कोणतीही असो, त्याची सहजस्थिती - नामस्मरणाची स्थिती ढळत नाही, बदलत नाही. ***('स्वरूपी स्वरूपचि जाला। मग तो पडोनिच राहिला। अथवा उठोनी पळाला। तरी चळेना।।' - समर्थ, 'बोलता चालता देखता ऐकता। न ढळे सर्वथा तेचि साधी।।'- संत मुक्ताबाई)*** अशी समाधी ज्याला साधते त्याला जन्ममरणरहित अवस्थेत, वयकुंठित झालेल्या अवस्थेत सारे षड्विकारात्मक आयास दूर होऊन अनायासे वैकुंठाची प्राप्ती होते.

**

# माळ धरोनिया रामनाम घेता

***माळ धरोनिया रामनाम घेता। द्वैताची तो वार्ता नुरे काही।।१।।***
***सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद। रामनाम छंद मनोमाळे।।२।।***
***संकल्पात राम विकल्पात राम। मनोमाळा उत्तम जाणावी ही।।३।।***
***गोविंद म्हणे धरी रामकृष्ण माळा। नामी राहील उमाळा अखंडीत।।४।।***

हे अखिल विश्व एका सूत्रात परमेश्वराने गुंफले आहे. ***'मतः परतरम् न अन्यत् किंचित अस्ति धनंजय इति। मयि सर्वम् इदम् प्रोतम् सूत्रे मणिगणाः इव।।'*** असे गीतावचन याबाबतीत प्रसिद्ध आहे. ज्याने हे सारे गुंफले आहे तो सूत्रधार श्रीराम साऱ्या विश्वाची सूत्रे हालवितो. आपण सारी माणसे कळसूत्री बाहुल्या आहोत. तो नाचवेल तसे आपण नाचले पाहिजे. ***'बाहुली मनुष्ये केली। त्या अनेक रूपे दिधली। परी त्यांची सूत्रे सगळी। नाचविसी हाती धरूनी। हे प्रभोविभो अगाध किती तव करणी। मन चिंतुनी हो रत चरणी।।'*** हे श्री श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे संतवाङ्मयात समाविष्ट करावे असे काव्य किंवा ***'नव्हे नरनारी गैबी सूत्रधारी। हालवी जो जीव जंत।'*** हे संत सोहिरोबानाथांचे पद सारे काही स्पष्ट करणारे आहे. अहो आपण जर करणारे कर्ते असू तर आपल्या मनाप्रमाणे, इच्छेप्रमाणे व्हावयास हवे. पण होते सारे त्याच्या इच्छेप्रमाणेच. मग आपल्या कर्तेपणाला काय अर्थ राहतो? ***('कर्ता आपण ऐसे म्हणावे। तरी आपले इच्छेसारिखे व्हावे। इच्छेसारिखे न होता मानावे। अवघेच वाव।।' - समर्थ)*** हे विश्व ज्या एका माळेत गुंफले आहे, त्यातील मणीच पाहिले तर द्वैत जाणवते व मणी ढिले होऊन जर आतील सूत्राकडे लक्ष गेले तर विश्वात एकसूत्रता जाणवते. हे इंद्रियांचे मणी जर ढिले झाले म्हणजे देहभाव जर हारपला तर ते आतील सूत्र दिसणारे आहे. श्रीसंत मुकुंदराज सांगतात, ***'विघडले संद बंद षटचक्राची माळ। चंद्रावीण चांदणे दिसे मुक्ती कल्लोळ।।'*** हे विश्वातील सूत्र आपल्या हाताला आले तर सूत्रधार जो निर्गुणस्वरूप आहे, तो आपल्या हाताला येणार आहे. निर्हेतुक कर्म होऊन कर्तेपणाचा अहंकार जर नाहीसा झाला तर कर्माला अकर्माची माहोर बसून मध्यवर्ती सूत्र सापडणार व निर्गुणाचा संग घडणार. संत मुक्ताबाई सांगतात, ***'कामक्रोध सर्व कर्म दंडिले बळे। सूत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले। निर्गुणाचा संग मला आजि जाहला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।।'*** सूत्र सापडल्यावर जगदंतरी अनुसंधानाने रामनामाचा छंद लागून द्वैतामध्ये सर्वत्र अद्वैत गोविंद (गो=इंद्रिये, विद-विन्द = जाणणे, गोविन्द - इंद्रियांना जाणणारा) कसा भरून राहिला आहे, हे जाणविल्याशिवाय राहणार नाही. समर्थ सांगतात ***'सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचे निरसन। अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेचि शुद्ध कल्पना।।'.*** या सर्वत्र पसरलेल्या चैतन्याची जाणीव होण्यासाठी मनातील संकल्प विकल्प नाममय होऊन, संकल्पविकल्परहित अवस्था प्राप्त होणे गरजेचे आहे. मन आहे तोवर मणीच दिसणार, दृश्य दिसणार, मनोलयाने चैतन्याचे सूत्र हाताला लागणार आहे. हे संकल्पविकल्प नाममय होणेसाठी संकल्पात व विकल्पात सतत रामाचे स्मरण व्हावयास हवे. मनोलय साधणेसाठी ज्या रामकृष्णगतीवर मनाची गती अवलंबून आहे, त्या रामकृष्णगतीवर लक्ष देणे गरजेचे आहे. रामकृष्णगतीत मनाचे मीलन होऊन नामाचा उमाळा (स्रोत) प्राप्त होऊन अखंडित नामाबद्दल उमाळा (प्रेम) निर्माण होणारा आहे.

**

# जपोनी जपणे जप बोलिलासे

***जपोनी जपणे जप बोलिलासे। वाया जात असे काय देही।।१।।***
***कायेमाजी व्यर्थ जात असे नाम। तेचि घेणे काम नरदेही।।२।।***
***जेणे योगे झाला हनुमान देव। जपे स्वयमेव रामनाम।।३।।***
***गोविंद म्हणे जप अंतरी करणे। तुटेल धरणे संसारीचे।।४।।***

आपल्या शरीरात जे वाया जात आहे, ते ज्यायोगे जपले जाते त्याला जप म्हणतात. आपल्या शरीरात काय व्यर्थ जात आहे? या नरदेहात जे दुर्लभ मौल्यवान आयुष्य आपणास प्राप्त झाले आहे ते व्यर्थ जात आहे. श्रीनाथमहाराज सांगतात, 'तरी या नरदेही दुर्लभ आयुष्य व्यर्थ जाते ते जाते रया' या नरदेहातील आयुष्य वजा केले तर मृत नरदेहाला कोण विचारतो? आयुष्यामुळे नरदेहाला किंमत हो? श्रीनाथमहाराज आयुष्याचे महत्त्व असे अधोरेखित करतात, ***'परिमळ गेलिया वोस फुल दिठी। आयुष्याशेवटी देह तैसा'.*** या नरदेहात असलेले आयुष्य ही रत्नपेटी असून त्यामध्ये अनमोल असे जीवन आहे. ज्याला समर्थ 'भजनरत्ने' असे संबोधतात. प्रत्येक श्वासाला जीवन अनुभवणे, रामभजनरत्न प्राप्त करणे म्हणजे श्वास सार्थकी लावणे होय. समर्थ सांगतात ***'आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी। अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी।।'*** एका श्वासाची किंमत काय आहे हे संत श्रीतुलसीदास असे सांगतात ***'तीन भुवन और चौदा लोक एक श्वास का मोल। तुलसी कहे रामभजनबीन वृथा श्वास मत खोल।।'*** आणि हे एवढे एखाद्याने दिले तरी गेलेला श्वास पुन्हा परत मिळत नाही. आपले श्वासोच्छ्वास फुकटपासरी चाललेले आहेत. त्यांचा नाश थांबवणे, आयुष्याचा नाश थांबवणे म्हणजे 'राम' म्हणणे होय. श्वासोश्वासी असणारा रामजप प्रत्येक श्वासाला अनुभवला तर हा आयुष्याचा नाश थांबणार आहे. आयुष्य जपले जाणार आहे. ***('घटका गेली पळे गेली तास वाजे झणाणा। आयुष्याचा नाश होतो राम का रे म्हणाना।। '- समर्थ, 'श्वासो लेवे नाम बिना सो जीवन धिक्कार। श्वासश्वासमो रामजप वोही धारणाधार।।' - कबीर)*** इतके महत्त्वाचे श्वास, पण तिकडे आमचे लक्ष नाही. आमचे सारे लक्ष देहाकडे आहे. हे देहाकडे असणारे लक्ष श्वासाकडे दिले, आपली श्वसनगती फार वाढत नाही ना हे पाहिले तर मनाच्या गतीवर नियंत्रण येऊन निर्हेतूक श्वसनाने सहजकर्म साधेल. सहजकृती हे रामनाम साधेल. दिननीशी होणारे षड्विकारात्मक आयास थांबून प्रपंचाचे धरणे थांबेल व श्वासोच्छ्वासी हरीजप, हरीभजन साधल्याशिवाय राहणार नाही. ***('सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरिसी न भजसी कवण्या गुणे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन एकाग्र झाले तर नि:श्वास खाली यायचे प्रमाण कमी होऊन जे वचन श्रवण होईल तो खरा जप. श्रीदासमहाराज सांगतात, ***'नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। सार नारायण जप एक।।'*** हे नादश्रवण, नित्यश्रवण सतत व्हायला हवे. ***('जेथे नाही नित्यश्रवण। ते जाणावे विलक्षण। तेथ साधके येक क्षण। क्रमू नये सर्वथा।।' - समर्थ)*** या स्वयमेव जपाने श्रीमारुतीराय, श्रीतात्यासाहेबमहाराज अंगे देवच झाले. ह्या अंतर्यामी सतत श्रवण होणाऱ्या जपाचे ठिकाणी तदाकारता साधून तो जीव संसारातून आपूट बाजूला राहतो. त्याला संसाराची बाधा होत नाही. जन्ममरणरहीत अवस्थेत तो मोक्ष प्राप्त करतो. मोक्ष प्राप्त करून देणारा अनुग्रह आज चैत्र व.५ या दिवशी भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराजांना त्यांचे वयाचे पाचवे दिवशी सोलापूर येथे मातुलगृही श्रीकाडसिद्धमहाराजांचेकडून प्राप्त झाला.

✲✲

# नाम उच्चारणी धरावी आवडी

***नाम उच्चारणी धरावी आवडी। याविण तातडी करू नये।।१।।***
***रामकृष्णहरी उच्चारिता वाचा। वंश त्या नराचा पुण्यवंत।।२।।***
***शिवाचे अंतरी रामनाम आहे। वाचे पैल जाये तरीच कळे।।३।।***
***गोविंद म्हणे पुण्य होईल अगाध। हाची धरी बोध आन नसे।।४।।***

सोहं नामाचा उदय तोच उदो शब्द आहे. हा सोहं शब्द वाचेने उच्चारायचा नाही. साधनाभ्यासाने देहाचा, मनाचा गोंधळ संपल्यावर उच्चारेवीण नादरहित पण प्रत्ययाला येणारा सहजशब्द म्हणजे सोहं आहे. ***( 'सोहं शब्द नाही बोलिला।'- संतवचन, 'मनसंकल्प शुद्ध पै नोहे। येरवी सदोदित आहे चिदानंदी।। मनाते बुडवुनी इंद्रियाते दंडूनी। मी हे सोडूनी सोहं धरी।। चांगा वटेश्वरी सोहं जाला। अवघाची बुडाला ज्ञानडोही।।'-श्रीचांगदेवमहाराज)*** हा नामाचा होणारा उच्चार श्रवण करण्याची आवड आपणाला लागली पाहिजे. नामाचा सहजशब्द कानावर आला तर पापाच्या राशी जळून भस्मसात होणाऱ्या असून जाणीव-नेणीवरहित भगवंताच्या नामाच्या उच्चाराशी तादात्म्य झाले तर मोक्षाची प्राप्ती होणार आहे. इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर म्हणजेच इडा, पिंगला, सुषुम्ना यांचा त्रिवेणी संगम झाल्यावर चैतन्याचा ध्वनी श्रवण होणार आहे. या चैतन्याच्या ध्वनीत जर सर्वसाक्षी मन रंगून गेले तर मोठी मौजच अनुभवाला येणारी आहे. ब्रह्मानंदाचा अनुभव त्याला प्राप्त होणारा आहे. हे नाम जो सतत श्रवण करतो, अखंड नामानुसंधानात जो राहतो त्याचा सारा वंशच पुण्यवंत ठरतो. म्हणून हे नाम श्रवण होणे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. हजार जन्माची पुण्याई असेल तर ते एकवेळ मुखाला येते. मग जे हे नाम सतत उच्चारतात त्यांची पुण्याई काय असेल? ***('जयाचे वाचा पुढा भोजे। अखंड नाम नाचतसे माझे। की जे जन्मसहस्री वोळगिजे। एकवेळ यावया।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मोक्षप्राप्ती हे जर आपले ध्येय असेल तर आयुष्य वाया न घालवता ते आयुष्य साधनीभूत करावे लागेल. तरच सच्चिदानंद ही पदवी प्राप्त होणार आहे. संसार हा क्षणभंगुर आहे. कधी मरण येईल हे सांगता येत नाही. आयुष्य आहे तोवरच हा नामाचा होणारा उच्चार श्रवण करण्याची संधी. ही संधी वाया घालविता कामा नये म्हणून नामाचा उच्चार श्रवण करण्याची आवड आपणाला तातडीने लागली पाहिजे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***'तरी झडझडोनी वहिला निघ। हरीभक्तिचिये वाटे लाग।। जेणे पावसी अव्यंग। निजधाम माझे।।'.*** कंटाळा न करता आवडीने संतसमागम केला तर सर्वत्र दुर्लभ असणारे नाम सुलभतेने जाणले जाते. सहज, निर्विकल्प नामोच्चारणी आवड निर्माण होऊन तातडीने खरा परमार्थ प्राप्त होतो. ***('संतसमागमी धरावी आवडी। करावी तातडी परमार्थाची।।' - श्रीतुकाराममहाराज)*** 'वार्ता नाही जन्ममृत्यूची' ही परमार्थाची अपूर्वता अनुभवाला येते. सोहं हंसांची बोळवण सहज होऊन जन्ममरणरहित अवस्थेत संसार शून्य होतो. मनोलयाने दृश्याचा - शब्दाचा - ग्रास होऊन जाणीवरहित अवस्थेत वाचेच्या पलीकडे मौन साधून निर्हेतुक सहजकृती हे रामनाम जे शिवाचे अंतर्यामी आहे, प्राप्त होते. रामपाठाने अगाध पुण्याची प्राप्ती होते. ***('संसाराच्या नावे घालूनिया शुन्य। वाढता हा पुण्यधर्म केला।' - श्रीतुकाराममहाराज, 'तेथ सोहं हंसाची बोळवण। न करिताची जाहली जाण। येणे पळाले जन्ममरण। शून्य पडले संसारा।।' - श्रीनाथमहाराज)*** पुढे नामाचा बिंदूरूपाने-प्रकाशरूपाने अनुभव येऊन सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते. ज्ञानाचे विज्ञान होते. आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होऊन त्रिपुटी नाहीशी होते. त्याचा वेगळेपणा संपतो. हाच खरा परमार्थातील बोध आहे.

**

# एकांत बाणता लोकांतात हरी

*एकांत बाणता लोकांतात हरी। प्रगट बाहेरी आत दिसे।।१।।*
*कोणा एकामाजी होत असे अंत। पहावे चित्तात विचारोनी।।२।।*
*एक असे आत्मा ज्यात आदी अंत। तो स्वये एकांत ओळखावा।।३।।*
*गोविंद म्हणे तया स्थानामाजी जाता। रामनाम वार्ता दूर नसे।।४।।*

आपल्याशिवाय कोणी नाही असा अनुभव ज्या ठिकाणी येतो त्या ठिकाणाला एकांत म्हणतात. म्हणून आपण गावाबाहेर कोणी नाही अशा ठिकाणी जातो. लोकांपासून दूर जातो पण आपल्याशिवाय कोणी नाही असा अनुभव येतो का? येत नाही. गावात जे दृश्य पाहात होतो, तेच दृश्य आपण गावाबाहेर वनात जाऊन पाहात असू, आपल्याशिवाय जे आहे त्या दृश्याचीच जाणीव जर आपणाला तेथे होत असेल तर मग एकांत कसा प्राप्त होणार? वनात जाऊन चिंतन वनितेचेच होणार असेल तर मग कसला एकांत साधणार? आपलाच अनुभव आपल्याला ज्या ठिकाणी येतो तो खरा एकांत. असे ठिकाण बाहेर आम्ही हुडकतोय पण सापडत नाही. हे ठिकाण कोठे बाहेर नाही, ते आपल्या देहात आहे. गुरुकृपेशिवाय हे एकांताचे ठिकाण प्राप्त होत नाही. साधनाभ्यासाने देहभाव विरल्याशिवाय, मनोलय साधल्याशिवाय हा ठिकाणा प्राप्त होत नाही. समर्थशिष्या संत वेणाबाई आपला एकांताचा अनुभव असा सांगतात, ***'देह माझे मन माझे। अवघे नेले गुरुराजे।। आम्ही गुरुनाथपंथी। सोपान मार्गे गेलो एकांती।।'*** तर स्वामी निरंजन रघुनाथ हा एकांताचा अनुभव असा सांगतात, ***'सद्‌गुरु एकांतासी नेतो। हस्त शिरी ठेवितो।। तनुमन घेवोनिया जातो। जीव मारुनी जिववितो।।'*** गुरुकृपेने प्राप्त झालेला एकांत आपणाला मानवला पाहिजे. मनोलय साधून प्राप्त होणारा एकांत जर अंतर्यामी ठसला तर कल्पनेने दिसणारी सृष्टी परवत न दिसता आत्मवत दिसणार आहे. अखंड एकांताचा अनुभव येणारा आहे. ***('तैसे भुतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सतत चैतन्याला चैतन्याचीच जाणीव होत असल्याने देहाची दृश्याची जाणीवच तेथे रहात नाही. देहाचे अखंड विस्मरण होते व चैतन्याचेच अखंड स्मरण होते. देहाचे अखंड विस्मरण हा देहत्याग नव्हे का? ***'हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।'*** या श्रीनाथमहाराजांचे वचनाचा प्रत्यय येतो. आपण झोपी जाताना ज्या एकामध्ये हे सारे दृश्य लय पावते व आपण जागे झालो की ज्या एकातून हे सारे प्रगट होते ते एक काय आहे असा सारासार विचार करता तेथे दुसरे काही रहातच नाही. ती एक वस्तू हाच खरा एकांत आहे. मन आत्मबोधाच्या विवरी असेल तर एकांत साधतो. श्रीसमर्थ सांगतात ***'अरे नर सार विचार करी। मन बरे विवरी।। सारासार विचार न होता। वाहसी भवपुरी।। सकळ चराचर कोठुनी जाले। कोठे निमाले तरी।। दास म्हणे समजसी अंतरी। मुळीची सोय धरी।।'***. थोडक्यात मन मुरल्यावर जे काही उरते त्या आत्मरूपाचा अनुभव घेणे हा खरा एकांताचा अनुभव आहे. मन आहे तोवर साकार दृश्याचा अनुभव. मन मुरल्यावर एका चैतन्याचा अनुभव-रामनामाचा अनुभव - त्या साधकाला प्राप्त होतो. घरात राहून, या जगात राहून साधनाभ्यासाने मनोलय साधून एकांताचा अनुभव घेणे शक्य आहे. हा एकांत ज्याला अनुभवाला येतो, त्यालाच खरा परमार्थ साधतो. ***(चाळणा करावी सर्वही। एकांती राहता बरे। एकांत मानला ज्याला। त्याला साधे हळूहळू।।', 'अखंड येकांत सेवावा। अभ्यास करीतची जावा।। काळ सार्थकची करावा। जनासहित।।', 'येकांती उगेच बैसावे। तेथे हे समजोन पाहावे। अखंड घ्यावे सांडावे। प्रभंजनासी।।' ,'येकांती मौन धरून बैसे। सावध पाहाता कैसे भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती।।'-श्रीसमर्थ, 'रामनाम एकांती एकवीध साधी।।'-श्रीमामामहाराज केळकर)***

**

# अनेक विधाने करोनी चांगला

***अनेक विधाने करोनी चांगला। परी नाही आला मोक्षवाटे।।१।।***
***मोक्षाची ती वाट जवळीच नीट। रामनाम धीट होऊनी घेई।।२।।***
***धीट होऊनीया पाठ करी त्याचा। तो नर दैवाचा खरोखरी।।३।।***
***गोविंद म्हणे एक विधान नामाचे। तेथे आणिकाचे काम नाही।।४।।***

चांगुलपणा मिळावा यादृष्टीने माणूस अनेक गोष्टी करत असतो. तो समाजोपयोगी कामे करतो, यज्ञयागादी धार्मिक कृत्ये करतो, अनेक तीर्थांना जातो. या सर्व गोष्टी करून त्याला चांगुलपणा मिळतो. 'करावे तसे भरावे' या न्यायाने त्याचे सारे चांगले होते. त्याला पुण्यात्मक पापाने स्वर्गप्राप्ती होते. समाजात तो वंदनीय पुण्यपुरुष ठरतो. पण शुद्ध सत्यस्वरूप ज्ञानप्राप्ती न झाल्याने मोक्षाची प्राप्ती होत नाही. ***('स्वर्ग व्हावा तरी यज्ञयाग करा। सत्कर्मे आचरा नित्य नेमे।', 'मोक्ष नव्हे स्नाने मोक्ष नव्हे दाने। तपतीर्थाटणे मोक्ष नव्हे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'त्रिवेणीसंगमी नाना तीर्थे भ्रमी। चित्त नाही नामी तरी ते ते व्यर्थ।', 'योगयाग विधी येणे नोहे सिद्धी। वायाची उपाधी दंभधर्म।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मग मोक्ष प्राप्त होतो केव्हा? पुन:पुन्हा प्राप्त होणाऱ्या जन्ममरण या संसारातून जर सुटका झाली तर मोक्षाची प्राप्ती होते. ***('जन्मृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला। तत्वे शोधिता पावला। तत्वता वस्तू।', 'येणेचि जन्मे येणेची काळे। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।' समर्थ, 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनं। इह संसारे बहुदुस्तारे कृपयापारे पाही मुरारे।।' - जगद्‌गुरू शंकराचार्य)*** वासनेतून सुटका झाली तरच जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. ***('जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाली अंगे हरीरूप।।' श्रीनाथमहाराज).*** या वासनेतून सुटका होणेसाठी - मोक्ष प्राप्त होणेसाठी - ज्यांचे वासनेचे बीज जळून नष्ट झाले आहे अशा मोक्षश्री आळंकृत ज्ञानी संतांचा अनुग्रह घ्यावा. ***('बीज अग्नीने भाजले। त्याचे वाढणे खुंटले। ज्ञात्यास तैसे जाले। वासनाबीज।।', 'याकारणे ज्ञाता पाहावा। त्याचा अनुग्रह घ्यावा। सारासारविचारे जीवा। मोक्षप्राप्त।।' - समर्थ)*** संत ज्या पावलांनी जीवनाची वाटचाल करतात त्या पावलांना चिकटलेले रज:कण जर आपण सहज मस्तकी धारण केले तर हे वासनेचे बीज नष्ट होऊन रामनामाची आवड निर्माण होणार व मोक्षसुख प्राप्त होणार. ***('संतचरण रज लागता सहज। वासनेचे बीज जळून जाय। मग रामनामी उपजे आवडी। सुख घडोघडी वाढो लागे।। - श्रीनामदेवमहाराज, 'कैवल्यसुखासाठी। परमाणू घे किरिटी। उधळती पायापाठी। चालता जे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संत ज्या मार्गाने वाटचाल करतात त्या मार्गाने आपण गेलो तर हे रज:कण मस्तकी धारण करता येणार व वासनारहित अवस्थेत रामनाम ध्वनीश्रवण होणार. सद्‌गुरुंनी सांगितलेल्या साधनाभ्यासाने दृश्याची रेषा अस्पष्ट झाली तर मोक्षाची रेषा स्पष्ट होते व ही दृश्याची रेषा अस्पष्ट होणेच फार अवघड आहे. अहो, जगाचा तटका तुटला तरच त्याचा चटका लागतो. जोवर आम्ही जगाचे चटके खात आहोत तोवर त्याचा तटका तुटलेलाच आहे. हा जगाचा तटका तुटण्याकरिता धीट होण्याची गरज आहे. परमार्थ म्हणजे प्रवाहाच्या उलट पोहणे आहे. उगमाकडे जाणे आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***'असाच होई धीट रे। उलटा वाहे पाट रे।। रामदास तुज स्पष्ट सांगतो। मोक्षपदाची वाट रे।।'*** अशा तऱ्हेने साधनाभ्यासाने जीवन अंतर्मुख होऊन स्थिर झाले तर ते उर्ध्वमुख होते व उर्ध्वमुख जीवनात हा नामाचा ध्वनी श्रवण होतो. या नामाचे ध्वनीशी जाणीव-नेणीवरहित जर तादात्म्य झाले तर मोक्षाची प्राप्ती होते. ही मोक्षाची वाट आपल्याजवळ असून अगदी नीट नाकासमोर जाणारी आहे. आडमार्गी (कामक्रोधाचे मार्गी) पाय न ठेवता या सरळ वाटेने जाऊन अहर्निशी परमार्थ साधून रामनामध्वनी जो श्रवण करतो त्याला ब्रह्मानंदाची प्राप्ती होते. मोक्षाची प्राप्ती होते व तो मोठा दैववान ठरतो. म्हणून नामाचे विधान हे या इतर विधीविधानांपेक्षा श्रेष्ठ आहे.

**

# रामनामी एकवीध होऊनी राही

***रामनामी एकवीध होऊनी राही। पतिव्रता पाही पतिलागी।।१।।***
***मग देव तुझा करील सांभाळ। जैसी माता बाळकासी जपे।।२।।***
***तरो अथवा बुडो नाम न सोडीन। प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी।।३।।***
***गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी। आणिका प्रकारी काय काज।।४।।***

भगवान सद्गुरु श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी जो मार्ग आपणाला दाखविला आहे त्या मार्गापासून कोणत्याही स्थितीत किंचितही न ढळणे, त्यांच्या कृपेने जी रामनामाची स्थिती आपण अनुभवली आहे, त्या स्थितीत कोणत्याही परिस्थितीत बदल न होणे म्हणजेच एकवीध होणे ***('एकवीध आम्ही न धरू पालट। न संडू ते वाट सापडली।।', 'तुका म्हणे एकवीध झाले मन। विठ्ठलावाचून नेणे दुजे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'एका विठ्ठलावाचून। न करू आणीक भजन।। आम्हा एकवीध भाव। कदा न म्हणू इतरा देव।।' - श्रीनामदेवमहाराज)*** एकवीध कसे व्हावे हे सांगताना श्रीमामामहाराज सांगतात, 'पतिव्रता पाही पतिलागी।' पतिव्रता जशी ध्यानी, मनी सर्वभावे पतीलाच पाहते, कोणत्याही परिस्थितीत ती पतीच्या मताप्रमाणेच वागते. पतिव्रतेला पतीशिवाय वेगळे अस्तित्व असत नाही. असे रामनामाच्या बाबतीत आपले व्हावयास हवे. रामनामावेगळे आपले अस्तित्व उरता कामा नये. ***('पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हा नारायण तैशापरी।।', 'पतिव्रता नेणे अणिकाची स्तुती। सर्वभावे पती ध्यानी मनी।।'-श्रीतुकाराममहाराज, 'पतिचिया मता। अनुसरोनी पतिव्रता। अनायासे आत्महिता। भेटेची ते।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ही अशी एकविधता कधी प्राप्त होईल? जे एक चैतन्य सर्वत्र सामान्यपणे पसरले आहे, त्या चैतन्याशी जेव्हा आपण सोहंबोधाने अनन्य होऊ, सतत एकाचीच प्रचिती येऊन डोक्यातील भेद जेव्हा नाहीसा होईल, तेव्हाच हे शक्य होईल. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसा मी एकवाचूनी काही। मग भिन्नाभिन्न आन नाही। सोहंबोधे तयाच्या ठायी। अनन्यु होय।।' ,'पै आपुलेनि भेदेविण। माझे जाणिजे जे एकपण। तयाचि नाव शरण। मज येणे गा।।'.*** असा जो परमेश्वराशी अनन्य असतो, जो संपूर्णपणे परमेश्वराला शरण जातो, भगवान आईप्रमाणे त्याची सर्वस्वी काळजी वाहतात. आपल्या आईवडिलांचे ठिकाणी असणारे एक चैतन्य जर आम्ही जाणले, हे एक चैतन्य आपले आईवडील आहेत हे जर आम्हास उमगले तर त्रिविध ताप उरतील का? मातेच्या रूपाने भगवंतच आपली काळजी वाहत असतो. तो आपली काळजी वाहतोय म्हटल्यावर आपण काळजी करावी का? अशा अनन्यशरण भक्ताला जन्ममरण या संसाराची चिंता राहात नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'जो मज होय अनन्य शरण। त्याचे निवारी मी जन्ममरण। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।' ,'एऱ्हवी तरी माझिया भक्ता। आणि संसाराची चिंता। काय समर्थाची कांता। कोरान्न मागे।।'. 'तरावे बुडावे तुझिया वचने। निर्धार हा मने केला असे।।'.*** असा काही निर्धार झाला तरच ही एकविधता साधणे शक्य आहे. आमच्या श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी असा काही निर्धार केला, ***'बुडो ही धरा की लया विश्व जावो। पडो काळ हस्ते शिरी वज्र घावो। विसंबू नको सर्वथा नाममाळा। मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा।।'*** हा श्रीतात्यासाहेबमहाराजांनी केलेला सहज उपदेश शेवटच्या श्वासापर्यंत आचरणात आणला.

अशा पद्धतीने रामनाम एकांती एकविधतेने जर साधले तर देह व मन या जीवलगांचा लय साधून शेवटी प्राणाचा (श्वासाचा) ही लय साधला जातो व भीवरेतटीचा पांडुरंग-हरी हा त्यांचा जीवलग सखा बनतो. अशा भक्ताला प्रपंचाची (कल्पनेची) उपाधी रहात नाही. उपाधीवेगळा होऊन तो ब्रह्मरूप होतो. यापेक्षा अधिक काय मिळवायचे असते?

**

# सारासार विचार करोनिया पाही

*सारासार विचार करोनिया पाही। तरीच होय काही आत्महित।।१।।*
*निर्गुण हे सार सकळा पैलिकडे। तया ऐलिकडे तीन गुण।।२।।*
*तया पैल जाता साधतसे काज। जेथे देवराज भेटी होय।।३।।*
*गोविंद म्हणे हित रामनाम कंठी। जेणे जगजेठी तुष्ट होय।।४।।*

या जगात सार काय आहे व असार काय आहे हे उमगले तरच सारग्रहण होऊन आत्महित साधेल. या जगात काय सार आहे व काय असार आहे काही माहीत आहे का? या जगात त्रिगुणात्मक संसार हा असार असून निर्गुण परमात्मा व त्याचे निर्विकल्प नाम तेवढे सार आहे. नेमके सार म्हणजे काय व असार म्हणजे काय ते आम्हाला समजेल असे सांगा. आम्हाला त्रिगुणात्मक संसार व निर्गुण परमात्मा यावरून नेमका बोध होत नाही. जे इंद्रियांना जाणता येते असे उघड, ते सारे असार. व जे इंद्रियांना जाणता येत नाही असे जे गुप्त आहे ते सारे सार. ***('त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरीपाठ।।', 'सार सार सार विठोबा नाम तुझे सार। म्हणोनी शूळपाणी जपताहे वारंवार।।' -श्रीज्ञानेश्वरमहाराज. 'संसार समस्त त्रिगुण। यामाजी मी अवघा निर्गुण। हे तुज कळावया निजखुण। गुणनिरुपण म्या केले।।' श्रीनाथमहाराज, 'फळकट हा संसार। येथ सार भगवंत।।'-श्रीतुकाराममहाराज, 'नामापरते नाही सार। नामे तरलेची अपार।।' श्रीकेशवस्वामी, 'प्रगटे ते जाणावे असार। आणि गुप्त ते जाणावे सार। गुरुमुखे हा विचार। उमजो लागे।।'- समर्थ)*** जे आता प्रगट आहे ते सारे दृश्य असार व जे दृश्यांतरी गुप्त आहे व ज्यामुळे सारे दृश्य प्रगट आहे ते सार आहे. आपल्या मनात विचार आहे म्हणून हे दृश्य प्रगट आहे. ज्या विचारांच्या आधारावर हे सारे असार दृश्य प्रगट होते, तो विचार असार आहे. विचारी मनाच्या अस्तित्वावर प्राप्त होणाऱ्या जागृती व स्वप्न या अवस्थांमध्ये प्राप्त होणारे विपरीत ज्ञान व बाह्यमनाचा लय झाल्यावर मनोलयाने प्राप्त होणाऱ्या निद्रावस्थेत असणारे अज्ञान यामध्ये सार आत्म्याचे ज्ञान होत नाही. मनोलयाने विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या अज्ञानाचे ज्ञान होणे म्हणजे सार आत्म्याचे ज्ञान आहे. हे आत्मज्ञान ज्या विचाराने होते तो सार विचार आहे. या सार विचाराला शुद्ध विचार - शुद्ध कल्पना - बरवा विचार आदी नावानी संतांनी संबोधले आहे. हे अज्ञानाचे ज्ञान होणे, सार विचार प्रगट होणे ही परमार्थाची सुरुवात आहे. संतांचे संगतीत हा विचार - ही कल्पना - प्राप्त होऊन सगुणाचे आधाराने नाद, बिंदू, कला, ज्योती यांचे अनुभवाने तो सार निर्गुणापर्यंत पोचतो. सार विचाराने असार दृश्य लय पावून सार निर्गुण प्रगट होते. ज्या सार विचारातून - शुद्ध कल्पनेतून - हे त्रिगुणात्मक विचार निर्माण होतात व दृश्यांची जाणीव होते तो सार विचार - शुद्ध कल्पना - मध्यवर्ती कल्पना म्हणजे परमार्थ असून त्रिगुणात्मक कल्पनाविस्तार हा संसार आहे. हा सार विचार प्रगट होण्याकरता आळस व झोप बाजूला ठेवून साधनाचे अभ्यासाने वायुमध्ये असणाऱ्या त्रिगुणांचा व पंचमहाभूतांचा निरास झाला असता, राहणाऱ्या बरव्या साधनाने बरवा विचार - श्रेष्ठ जाणीव - जी विश्वामध्ये भरून राहिली आहे प्राप्त होणारी आहे. देहाची जाणीव नाहीशी होऊन - देहातीत होऊन - ही चैतन्याची जाणीव होणे यातच आत्महित साधणारे असून त्यायोगे जगजेठी चक्रपाणी संतुष्ट होणार आहे. श्रीसमर्थ सांगतात ***'हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत। देहबुद्धीने अनहित। होची लागे।।'***

**

# रामनामामाजी साधिलिया पवन (१)

परमार्थ हा बोलायचा विषय नाही. तो आचरणात आणायचा विषय आहे. तो अनुभवायचा विषय आहे. अनुभवावाचून बोलणे तर काहीच उपयोगी नसते. जे आपल्या आचरणात नाही ते जर आपण सांगितले तर त्याचा परिणाम होत नाही. त्या सांगण्यात जोरच नसतो ना! ते बोलणे ऐकणाऱ्याला कंटाळवाणे होते. ***(‘बोलण्यासारिखे चालणे। स्वये करून बोलणे। तयांची वचने प्रमाणे। मानिती जनी।।’, ‘प्रचितीवीण जे बोलणे। ते अवघेची कंटाळवाणे। तोंड पसरून जैसे सुणे। रडोन गेले।।’-समर्थ)*** आपल्या अनुभवावाचूनच्या बडबडीला श्रीज्ञानेश्वरमहाराज ‘बरळ’ असे संबोधतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘अनंत वाचाळ बरळती बरळ। त्या कैसा दयाळ पावे हरी।।’*** परमार्थाची आसनमांडी मौन्यावर आहे. संपूर्ण मनोलय साधणे हे परमार्थाचे ध्येय आहे. ***(‘बोलणे सांडी बोलणे सांडी। मौन्यावरती आसनमांडी।।’-श्रीकेशवस्वामी, ‘प्राणापानामाजी मनाचे मिलन। परमार्थ पूर्ण तया ठाया।।’ श्रीदासराममहाराज)*** मनोलय झाल्यावर जे निर्हेतुक बोलणे होते, ते मौनच असते. मनोलय झाल्यावर जे कर्म होते ते निष्कर्मच असते. ***( ‘देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्तांची लक्षणे। जीवन्मुक्त जाणे।।’ - श्रीसमर्थ, ‘मन कृतं कृतं कर्म। न शरीर कृतं कृतं।।’ - योगवासिष्ठ)*** आमचे श्रीमामामहाराजांचे सोमवारी मौन असे पण ते नित्याचे कीर्तन करीत. पण त्याने मौन मोडले जात नसे. त्यांचे विदेही अवस्थेतील निर्हेतुक सहज बोलणे हे बोलणे ठरत नसे. म्हणून देहावर राहून जर कीर्तन केले तर ते कीर्तन ठरत नाही. कीर्तन हे विदेही अवस्थेतच होत असते. ***(‘सहज बोलणे हितोपदेश। करोनी सायास शिकविती।।’-श्रीतुकाराममहाराज,‘नामसंकीर्तन उरले त्या ठाया। देहभाव लया गेला त्यांचा।।’- श्रीदासराममहाराज)*** कीर्तन करणाऱ्यांच्यावर मोठी जबाबदारी असते. त्यांच्यावर अनेक श्रोत्यांचे लक्ष असते. ***‘कीर्तन करावे। तैसे करून दावावे।।’*** हे श्रीमामामहाराजांचे वचन सतत लक्षात ठेवावे लागते. हे लक्षात घेऊन भगवान सद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराजांनी नियमच केला की नऊ तास साधना करणाऱ्यांनी तीन तास बोलावे. कालमानपरिस्थितीनुसार श्रीदासराममहाराजांनी यात बदल केला. ते सांगत, ‘तीन तास साधन करणाऱ्यांनी नऊ तास बोलावे’ पण आम्हाला तेवढेही करता येत नाही. याला आता काय करणार? श्रीसमर्थ सांगतात, ***‘आधी राखावा आचार। मग पहावा विचार। आचारेविचारे पैलपार पाविजेतो।।’, ‘उदंड जाले सर्वही। जो तो बुद्धीच सांगतो। सांगावे ते आपणाला। आपणू करता बरे।।’.*** परमार्थात अनुभवाला महत्त्व आहे. खरा अनुभव दुसऱ्याला सांगता येत नाही. अनुभव हा ठायीच मुरावा लागतो. अहो, कल्पनेच्या पलीकडचा, कल्पना सरल्यावर प्राप्त झालेला अनुभव शब्दात कसा सांगता येईल? नि:शब्द रूप आणि नाम साधकाला नि:शब्द करणारे, अनिर्वाच्य करणारेच असते. आम्हाला आधी साक्षात्कार होत नाही कारण तेवढे साधनच आमचे हातून होत नाही. काही साधकांना रोजचा नवीन साक्षात्कार होतो. साक्षात्कार एकाचा एकदाच होतो व तो सदोदित असतो. जे रोज नवीन साक्षात्कार होतात ते साक्षात्कार नव्हेत, ते कल्पनेचे खेळ असतात. जी साक्षात एक वस्तू आहे, तद्रूप आपण होणे हा खरा साक्षात्कार. व्यवहाराचा शेवट झाल्यावर, दृश्याचा-शब्दाचा ग्रास झाल्यावर साक्षात्कार होतो. ***(‘खुंटलासे शब्द राहिला व्यवहार। झाला साक्षात्कार सदोदित।।’-संतवचन, ‘ऐसा जरी झाला एक साक्षात्कार। आनंदे निर्भर दासराम।।’-श्रीदासराममहाराज, ‘ऐक अनुभवाचे लक्षण। अनुभव म्हणिजे अनन्य जाण।। ऐक अनन्याचे लक्षण। ऐसे असे।।’-समर्थ, ‘गुप्त ना प्रगट आहे हा साक्षात। लक्षिता प्रचित वेडावली।।’ -संतवचन)***

**

# रामनामामाजी साधिलिया पवन (२)

साधक आपापल्या समजुतीप्रमाणे आपल्याला जमेल तेवढा वेळ साधन करत असतात. पण सर्वसामान्यतः त्यांना अनुभव काही येत नाहीत. याचा अर्थ काय होतो? एकतर आपल्याला साधन कसे करायचे हे नीटसे समजले नाही किंवा हे साधन अनुभव देणारे नाही. पण याच साधनाच्या अभ्यासाने संतमहात्म्यांना अनुभव प्राप्त होतात. याचा अर्थ साधनात दोष नसून आम्हाला ते साधन योग्य पद्धतीने करता येत नाही हाच होतो. भ.स.श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे अधिकारी शिष्य श्रीनरसाप्पा शापेटी ज्यांचेवर श्रीमहाराजांचे पुत्रवत प्रेम होते, जे श्रीमहाराजांचे लाडके शेंडेफळ होते, ते श्रीमहाराजांना म्हणाले, 'महाराज, मी साधन करतो पण मला अनुभव येत नाहीत' तेव्हा महाराज त्यांना म्हणाले, 'नरसाप्पा, चूप! नाक, कान, डोळे, तोंड बंद कर. मग बघ अनुभव येतात की नाही ते.' श्रीमहाराजांच्या उपदेशाप्रमाणे श्रीनरसाप्पांनी केले. मग त्यांना परमार्थातील श्रेष्ठ अनुभव प्राप्त झाले. तसे आम्हाला जर अनुभवाच्या खुणा प्राप्त करून घ्यायच्या असतील तर रामनामात पवन साधावा लागेल असे श्रीमामामहाराज सांगतात. ते सांगतात ***'रामनामामाजी साधिलिया पवन। अनुभव खुण ऐशी असे।।'*** ते पुढे सांगतात की एक श्‍वास जर पवन साधला तर मनाला मोठे समाधान प्राप्त होते. आम्ही तासन्‌तास साधन करतो पण आम्हाला एक श्‍वास पवन साधून मनाला होणारे समाधान अजून प्राप्त झालेले नाही. याचा अर्थ तासन्‌तास साधन करून आम्हाला एक श्‍वास पण पवन साधलेला नाही हाच होतो. आम्ही आमच्या कल्पनेप्रमाणे श्‍वासात नाम साधतो व रामनामात पवन साधल्याची कल्पना करतो. अर्थात ही सारी कल्पना असल्याने, त्यात सत्याची जाणीव नसल्याने साधे समाधानही होत नाही. पहिली गोष्ट श्वास म्हणजे पवन नव्हे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. श्वास हा येथे कालदर्शक आहे. एका मिनिटाला साधारणतः १५ श्‍वास होतात. एक श्‍वासाला ४ सेकंद एवढा काळ लागतो. एवढा काळ पवन साधला तर एक श्‍वास पवन साधला असे होते. पवन हे भगवंताचे रूप आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज विभुतीयोगात सांगतात, ***'तया वहिलिया गतीमंता। आतु पवनू तो मी पंडुसुता। शस्त्रधरा समस्ता। माजी श्रीराम तो मी।।'.*** अर्थात चार सेकंद हे सारे विसरून राहणाऱ्या पवनाची जाणीव जर झाली तर एक श्‍वास पवन साधला असे म्हणता येईल. अहो देहाचा, दृश्याचा विसर होऊन त्याची जाणीव झाली, नामाला नवलस्मरणाची जोड मिळाली तर नामस्मरणाचे समाधान निश्चित होणारे आहे. नुसत्या नामाने समाधान होत नाही हा अनुभव साधारणतः सर्वांना येतो. ***('नवल स्मरणाची ठेव। नामी नाही अनुभव।।' - श्रीनाथमहाराज, 'स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे। नामस्मरणे पावावे। समाधान।। - समर्थ)*** जोवर नाम घेताना देहाची, दृश्याची जाणीव आहे, तोवर पवन साधलेला नाही हे निश्चित. वाऱ्यावर नजर लागून देहभानांचा विसर झाला व भगवंताचा आठव झाला की पवन साधला. ***('वाऱ्यावरी लागली नजर। देहभावाचा पडला विसर।।'-श्रीदासराममहाराज)*** श्वासोच्छ्‌वासाला जो काळ लागतो त्याला आयुष्य म्हणतात. श्‍वास व उच्छ्‌वास यांच्यामधील जो संधीकाळ आहे त्याला जीवन म्हणतात. श्‍वसनाच्या उपाधीत सापडलेल्या या जीवनाला 'उपाधीभूत जीवन' असे श्रीदासरामहाराज संबोधतात. या जीवनात हा पवन खेळतोय. हा पवन साधला तर आत्मा हा स्पष्ट होणार आहे. श्‍वासोच्छ्‌वास - आयुष्य - ही रत्नपेटी असून त्यात असणारे जीवन ही गोमटी भजनरत्ने आहेत. ही ईश्वराला अर्पून प्राप्त होणारा आनंद खरा आहे. ***('आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी। ईश्वरी अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी।।', 'नाडीद्वारा धावे जीवन। जीवनामध्ये खेळे पवन। त्या पवनासरिसा जाण। आत्माही विवरे।।' - समर्थ)***

**

# रामनामामाजी साधिलिया पवन (३)

दिननिशी षड्विकारात्मक आयास केले तर सारे आयुष्य प्रपंचाकरता वेचले जाते. आयुष्यभर प्रामाणिकपणे प्रपंच साधून कोणाच्या आयुष्याचे सार्थक झाल्याचे ऐकिवात नाही. अर्थात आयुष्यभर प्रपंच करून तो सारा वायाच जातो. तेच कामक्रोधरहित अवस्था हे भजन - रामनाम - जर साधले तर जीवनात पवन साधतो. कामक्रोधाने श्वसनाची गती वाढते व जीवन नीरस होते. कामक्रोधरहित अवस्थेत जीवनात रस निर्माण होऊन जीवन रसभरीत होते. मरेपर्यंत आयुष्य सारेच जगतात. श्वासोश्वासातील जीवन काहीच जगतात. अखंड स्मरणाने अखंड जीवनाचा अनुभव जर आला की जन्ममरणरहित अवस्थेत तो मोक्षाला जातो. श्वास आत घेणे हा जन्म असून श्वास बाहेर सोडणे हे मरण आहे. हे पुन:पुन्हा प्राप्त होणारे जन्ममरण हा संसार आहे. श्वासोच्छ्वासात जाणारा वेळ - आयुष्य - काळ खातो. नाम हे श्वासातही नाही अथवा उच्छ्वासातही नाही. ते श्वास व उच्छ्वास यांचे संधीकाळात आहे. श्वास व उच्छ्वास यामधील संधीकाळ म्हणजेच जन्म व मरण यामधील जीवन आहे. या जीवनात नामाची धारणा आहे. किंबहुना जीवन हेच गुरुनाम आहे. या जन्ममरणाचे मधल्या जीवनावर काळाची सत्ता नाही. म्हणून नामाला काळवेळ नाही. हे नाम साधले तर उद्धार निश्चित होणारा आहे. पवन साधला तर नाम साधते व नाम साधले तर पवन साधतो. नाम हे पवनाशी निगडीत असल्याने ते पावन, सर्वात पवित्र आहे. निर्विकल्प नामाने साधणारा जीवनातील पवन हा स्थिर असतो. हा पवन कसा साधावा हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'कैसा पवन साधावा। स्थिर करूनी नामी लावा।। घेऊन सोडणेचे आधी। स्थिर करूनी कुंभक साधी।। जैसा जैसा वाढे काळ। पवन विजयाचे बळ।। वाढे दासाचे अंतरी। पूर्ण होता साक्षात्कारी।।'*** येथे काय स्थिर करायचे हे कळले पाहिजे. नाहीतर अनर्थ ओढवेल हे निश्चित. येथे श्वास स्थिर करायचा असा जर अर्थ केला तर कुंभक केला असा त्याचा अर्थ होईल. येथे कुंभक करायचा नसून तो साधायचा आहे. मन नामाचे ठिकाणी स्थिर केले तर हा कुंभक साधतो. सहजगत्या कुंभक होतो. त्याला केवलकुंभक म्हणतात. मनोवृत्तीचा निरोध हाच येथे केवलकुंभक आहे. मनोवृत्तीचा निरोध करून, निर्विकल्प नामाने स्थिर पवन साधतो म्हणून त्यांनी 'कुंभक साधी' हा शब्द वापरला आहे. 'कुंभक करी' असे म्हटले नाही हे आपण लक्षात घ्यावे. अर्थात येथे मन एकाग्र-स्थिर करायचे आहे हे उघड आहे. मन एकाग्र झाले की साधन धरले जाते. जवळ असणाऱ्या जगज्जीवनाची-चैतन्याची जाणीव होते. मग मनाला निश्चित समाधान होते. असे साधन साधले तर ज्यायोगे आत्मा स्पष्ट होतो, जो सहज गगनात मिसळतो असा पवन साधतो. असे पवन साधणारे नाम प्रत्येक श्वासोच्छ्वासाला साधले तर काळाची पीछेहाट होऊन पवनविजय साधणार आहे. ***('मनोवृत्तीचा विरोध करूनी। नाम सदा आठवी। श्वासोच्छ्वासी नाम साधुनी। काळाला हटवी।।'-श्रीमामामहाराज, 'श्वासोश्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे।। म्हणोनि तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।' - श्रीदासराममहाराज, 'एकाग्र करुनिया मन। बळेची धरावे साधन। यत्नी आळसाचे दर्शन। होऊच नये।।'- श्रीसमर्थ)***

**

# रामनामामाजी साधिलिया पवन (४)

मन आणि मनात असणारी दुर्बुद्धी - देहबुद्धी ही पवनाचे माथ्यावर एकाग्र केली असता देहबुद्धीचा, मनाचा लय साधून संकल्पविकल्परहित, कामक्रोधरहित, वासनारहित, अभिमानरहित आपली मूळस्थिती प्राप्त होते. या अवस्थेत जे स्थिर श्वसन शिल्लक राहते, ज्याला आपण केवलकुंभक मानतो, त्याला 'पवन' म्हणतात. या संकल्पविकल्परहित, कामक्रोधअभिमानरहित अवस्थेत होणारी पवनाची - चैतन्याची जाणीव म्हणजे रामनाम आहे. याला म्हणतात 'रामनामात पवन साधणे' असे मला वाटते. चैतन्याची जाणीव हे रामनाम साधले की श्वसन हे साधन उरत नाही. संसाराच्या गोष्टी संपल्याशिवाय आत्मा कळत नाही. ***('नाम जपे त्यासी उरले साधन। ऐसे हे वचन बोलू नये।'-श्रीतुकाराममहाराज, 'आत्माची कळला नाही जपतपसाधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।' -श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** उगमाचे ठिकाणी जन्ममरण नाही. प्रवाहात जन्ममरण आहे. पोहत उगमाकडे जाणे हा परमार्थ तर प्रवाहपतित होणे हा संसार आहे. प्रवाहाच्या विरुद्ध पोहायला बळ लागते. ते बळ सर्वांच्या जवळ असत नाही म्हणून बहुतांशी लोक प्रवाहपतित संसारी होतात. ***('सहजकृती रामनाम। अंतरी नाही दुजे काम।।', 'मुळस्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।।' -श्रीमामामहाराज केळकर, 'बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनू सहजे गगना। मिळोचि लागे।।', 'हे अजानुबाहो साधो पार्था। मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा। तेणेची या तत्वार्था। फावसी तू।।' -श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'एक बळाचे निवडिले। ते पोहतची उगमा गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।। - समर्थ)*** संसारात नाम साधले तर संसारापासून निराळे होऊन हा पवन साधतो. हा पवनच चंचळ आत्म्याला निश्चल ब्रह्मरूप करणारा आहे. आपली सहजस्थिती - रामनामाची स्थिती - नामस्मरणाची स्थिती - जिला ब्रह्माची नित्यता आहे म्हणजे खरे अध्यात्म आहे. म्हणून रामनाम हे नित्य, सत्य, मित आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ऐसिया आपुलियाची सहजस्थिती। जेया ब्रह्माची नित्यता असती। तया नाव सुभद्रापती। अध्यात्म गा।।'.*** हे रामनाम म्हणजे उच्चारेवीण नादरहित पण प्रत्ययाला येणारे सहजशब्द आहेत. श्रीसमर्थ सांगतात, ***'उच्चारेवीण जे शब्द। ते जाणा सहजशब्द। प्रत्यया येती परंतु नाद। काहीच नाही।।'*** तर संत कबीरसाहेब या रामनामाचे वर्णन असे करतात, ***'होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।'*** म्हणून रामनामाच्या बोलण्याला 'अबोलण्याचे बोलणे' म्हणतात. श्रीमामामहाराज सांगतात, ***'रामनामाचे बोलणे। दास म्हणे अबोलणे।।'*** हे 'बोलणे' आणि 'अबोलण्याचे बोलणे' जेव्हा बंद होते तेव्हा खरे मौन साधते. श्रीसमर्थ सांगतात, ***'ते शब्द सांडूनी बैसला। तो मौनी म्हणावा भला। योगाभ्यासाचा गल्बला। याकारणे।।'*** याठिकाणी विपरीत ज्ञान नाहीसे झाल्यावर उच्चारेवीण नादरहित पण प्रत्ययाला येणारे जे सहजशब्द आहेत ते सांडायचे आहेत. तर संत केशवस्वामी हा अनुभव असा सांगतात, ***'सद्गुरुकृपे केशवी पाही। बोलणे अबोलणे नुरेची काही।।'.*** हे संपूर्ण मौन उन्मनी अवस्थेत साधत असल्याचे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'साच लटिके दोनी। न बोले जाहला मौनी। जे भोगिता उन्मनी। आरायेना।।'.***

**

# रामनामामाजी साधिलिया पवन (५)

जोवर जाणीव आहे तोवर बोलणे संपत नाही. खरे मौन साधत नाही. देहाची दृश्याची वेगळेपणाने होणारी द्वैताची जाणीव म्हणजे बोलणे व या सगळ्या विपरीत ज्ञानात्मक जाणीवा नाहीशा होऊन अद्वैत चैतन्याची वेगळेपणाने होणारी जाणीव म्हणजे अबोलण्याचे बोलणे होय, रामनामाचे बोलणे होय. जाणीव असणे हा आत्म्याचा गुण आहे. ही जाणीव नाहीशी होऊन जाणीवरहित जाणता होणे म्हणजे ब्रह्मस्वरूप होणे. ***('जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहीत जाले। समाधान।।', 'जाणणे एकदेशी पूर्ण। गुण आत्मयाचे।।' - समर्थ)*** ब्रह्माचे ठिकाणी ज्ञान आहे पण ते वृत्तीरहित ज्ञान आहे. ही पवनाची-चैतन्याची - होणारी जाणले ही जाणीव केव्हा नाहीशी होते? जो जाणता विष्णू आहे तो जाणला की अखंड जाणीव निर्माण होऊन जाणीवेचा ग्रास होतो. श्रीसमर्थ सांगतात, ***'जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रुप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।'*** तर श्रीदासराममहाराज त्यांच्या आत्मविज्ञान या लेखात सांगतात, 'आत्म्याचे विज्ञान जाणीवेचा ग्रास करते. त्याठिकाणी आत्म्याची जाणीव उत्पन्न करावी लागत नाही. तर ती सहज अखंड प्रगट होते. जाणीवेचे अखंडत्व म्हणजे अभेदरूप सहज स्मरणस्थिती. म्हणून या स्थितीला जाणीव म्हणता येत नाही.' रामनामात पवन साधनेच्या अभ्यासाने साधकाला किती साधन साधले म्हणजे काय अनुभव येतात; हे स्वानुभवाने श्रीमामामहाराजांनी नोंदले आहेत. एक श्वासापासून दोन प्रहरापर्यंत हा साधनक्रम त्यांनी सांगितला आहे. तो साधनक्रम खालीलप्रमाणे, ***'रामनामामाजी साधिलिया पवन। अनुभव खुण ऐशी असे।।१।। जव एक श्वास साधेल पवन। मना समाधान थोर वाटे।।२।। जव दोन श्वास साधेल पवन। समधातूक मन होत असे।।३।। जव चार श्वास साधेल पवन। विरहीत मन देहबुद्धी।।४।। गोविंद म्हणे झालिया श्वासांचे साधन। पळांचे साधन पुढे ऐका।।५।।', 'जरी एक पळ साधेल पवन। होय एकाग्र मन तीही अवस्थे।।१।। जरी दोन पळ साधेल पवन। मनाचे उन्मन होत असे।।२।। जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।।३।। जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते।।४।। जरी पंधरा पळ साधेल पवन। उर्ध्वपंथी गमन साधे बापा।५।। जरी तीस पळ साधेल पवन। होय आगमन ब्रह्मस्थानी।।६।। गोविंद म्हणे झालिया पळांचे साधन। घटिकांचे साधन ऐका पुढे।।७।।', 'जया एक घटिका साधेल पवन। सहज दृष्टी जाण लाधतसे।।१।। जया दोन घटिका साधेल पवन। करील उल्लंघन ब्रह्मरंध्र।।२।। जया चार घटिका साधेल पवन। तारक बिंदू जाण दिसतसे।।३।। गोविंद म्हणे झालिया घटिकांचे साधन। प्रहरांचे साधन ऐका पुढे।।४।।' ,'ज्यासी एक प्रहर साधेल पवन। आटतील जाण देहधर्म।।१।। ज्यासी दोन प्रहर साधेल पवन। विष्णूचे दर्शन होत असे।।२।। साधिलिया जीवा विष्णूचे दर्शन। अष्टौप्रहर साधन चालतसे।।३।। गोविंद म्हणे गुरुकृपेचे विज्ञान। बोलिलो संपूर्ण हनुमंतकृपे।।४।।'*** रामनामामध्ये पवन साधण्याचा अभ्यास किती झाला आहे हे या अभंगांचे आधारे आपल्याला आलेल्या अनुभवानुसार साधकाला ठरवता येणार आहे. रामनामामध्ये पवन साधण्याचा अभ्यास जसजसा वाढेल त्याप्रमाणे तुर्यावस्था, उन्मनीअवस्था, दशविधनादांचे श्रवण, अंत:करणातील इच्छा पूर्णपणे नाहीशी होणे आदी अनुभव घेत उर्ध्वपंथी गमन साधून सहजदृष्टी प्राप्त होऊन तारकस्वरूपाचे साक्षात्काराने मन वृत्तीसहीत मुरुन देहातीत अवस्थेत सर्वान्तरस्थ विष्णूदर्शनाने अष्टौप्रहर साधन - अखंडस्मरण (जाणीव)- प्राप्त होते व जाणीवेचा ग्रास होऊन गुरुकृपेने ज्ञानाचे विज्ञान होते व तो परब्रह्मस्वरूप होतो.

**

# विसावा तो जाण स्मरता राम

*एक म्हणजे काय जाणावे मीपण। दोन म्हणजे जाण दुजा भाव।।१।।*
*तीन म्हणजे काय जाणावे त्रिगुण। चार म्हणजे जाण चार खाणी।।२।।*
*पाच म्हणजे काय पंच हे विषय। सहा म्हणजे काय सहा रिपू।।३।।*
*सात म्हणजे काय सप्तविध धातू। आठ म्हणजे होतू अष्टधाही।।४।।*
*नऊ म्हणजे काय जाणा नवद्वारे। दहा म्हणजे बारे दशेंद्रिये।।५।।*
*अकरा म्हणजे काय जाणावे ते मन। बारा म्हणजे जाण चित्तकुडे।।६।।*
*तेरा म्हणजे काय कुबुद्धी ते पाही। चौदा म्हणजे काय चौदा विद्या।।७।।*
*गोविंद म्हणे ऐका पुढील प्रकार। विसावा तोवर नाही जीवा।।८।।*

*पंधरा म्हणजे काय जाणावा हंकार। सोळा ते साचार दहा सहा।।१।।*
*सतरा म्हणजे काय वासनेचा ठाय। अठरा म्हणजे काय जीवभाव।।२।।*
*एकोणीस काय शिवाचे विस्मरण। विसावा तो जाण स्मरता राम।।३।।*
*गोविंद म्हणे विसावा विसाविया नामी। सद्‌गुरुंचे धामी कळो येई।।४।।*

मागील चार अभंगात आपण साधनाभ्यासाने कोणकोणते अनुभव साधकाला येतात व तो नराचा नारायण कसा होतो हे पाहिले. जेवढा साधनाचा अभ्यास जास्त तेवढा अनुभव श्रेष्ठतर, श्रेष्ठतम येणार. एक श्वासापासून दोन प्रहरापर्यंत येणारे अनुभव म्हणजे चढती कमान आहे. पुढील दोन अभंगात श्रीमामामहाराजांनी साधनाभ्यासाने कोणकोणत्या गोष्टींचा निरास होतो हे सांगितले आहे. ब्रह्मापासून मायेचा विस्तार ज्या क्रमाने झाला त्याचे उलट क्रमाने हा लय साधनाभ्यासाने होतो. हा लय साधला तर आलेल्या अनुभवाना अर्थ प्राप्त होतो. हा लय साधला तर आलेले अनुभव खरे आहेत असे म्हणता येते. हा सारा लय साधला आहे की नाही हे पाहणे म्हणजे आलेल्या अनुभवांचा ताळा घेणे होय. आलेले अनुभव पडताळून पाहणे होय. म्हणून या अभंगांना श्रीदासराममहाराज 'ताळ्याचे अभंग' म्हणतात. हे ताळ्याचे अभंग साधकांना ताळ्यावर आणणारेच आहेत. निर्विकल्प ब्रह्माचे ठिकाणी अहंचे स्फुरण - मीपणाचे स्फुरण निर्माण होऊन चंचळत्वाने चैतन्य निर्माण झाले. या चंचळत्वाने उपाधीचे लेणे प्राप्त होऊन द्वैत निर्माण झाले. या वायुरूप चैतन्याचे ठिकाणी जी जाणीव आहे त्या जाणीवेतून (गुणातून) त्रिगुणात्मक जाणीवा निर्माण झाल्या. यातील तमोगुणातून चार खाणी निर्माण होऊन पुढे पंचमहाभूते व त्यांचे पाच विषय निर्माण झाले. त्यापुढे षड्‌विकाराने षडरिपु, सप्तविध धातू निर्माण झाले. पुढे पंचमहाभूते व त्रिगुण यापासून अष्टधाप्रकृती-दृश्य निर्माण झाले. त्यानंतर नवद्वारे व दश इंद्रिये यांचा विस्तार झाला. नंतर मन, चित्त, द्वैतबुद्धी यांचे साहाय्याने पोट भरायच्या चौदा विद्या प्राप्त झाल्या. पुढे या विद्यांमुळे अहंकार निर्माण झाला. नंतर सतरा तत्वांचा वासनात्मक देह तयार झाला. वासनेतून जीवभावाची (रामकृष्णवाचा) निर्मिती झाली. पुढे ज्या चैतन्यातून हे सारे निर्माण झाले त्या चैतन्याचे विस्मरण झाले. त्रिगुणांच्या जाणीवेने मूळ जाणीवेची (ज्यातून या त्रिगुणात्मक जाणीवा निर्माण झाल्या) जाणीव नाहीशी होऊन मूळ जाणीवेने सुखरूप असणारा जीव मूळ जाणीवेच्या नेणीवेने सुखाला मुकला व त्रिगुणात्मक जाणीवेने संसारात-जगात-सुखाचा शोध करू लागला. पण संसारात त्याला शोधूनही सुख सापडेना. संसारातील श्रमाने दुःख काही संपेना. सद्‌गुरुकृपेने या संसारात राहून वेदांना शास्त्रांना प्रमाण असणारे नाम आपण वेगात साधले तर या संसारापासून बाजूला होऊन जीवाला याच जन्मात 'मीपणेवीण साधन' साधून मोक्षाची प्राप्ती, आनंदाची प्राप्ती जीवाला होणारी आहे.

**

# अभंग रामपाठ असती बत्तीस

***अभंग रामपाठ असती बत्तीस। वाचिता विश्वास धरोनिया।।१।।***
***तयावरी कृपा करील जगदीश। सांडोनी आळस पाठ करा।।२।।***
***करूनी शुद्ध मन एकचित्ते पाही। धरी सर्वदाही स्मरणजीवी।।३।।***
***तया रक्षी स्वये रामसीतापती। सर्वत्र आकांती अंतकाळी।।४।।***
***ज्ञानेश्वर कृपाप्रसादे रचिले। तयांचिये बोले समाधान।।५।।***
***गोविंद करी रेवणसिद्धपदी नमन। रामपाठ पूर्ण सांग झाला।।६।।***

श्रीरामपाठातील हा शेवटचा फलश्रुतीचा अभंग आहे. श्रीरामपाठाचे एकूण ३२ अभंग आहेत. सूर्याच्या बारा कळा व चंद्राच्या सोळा कळा एकत्र येऊन होणाऱ्या अनुहतध्वनीचे ठिकाणी चित्तचतुष्टय म्हणजे मन, चित्त, बुद्धी, अहंकार लय पावले तर आत्मारामाचा साक्षात्कार होतो हे या ३२ अभंगांतून दर्शविले आहे. हे रामपाठाचे अभंग विश्वासाने वाचले तर 'विश्वास तो देव' प्राप्त होणार आहे. विश्वास याचा अर्थ विशेष श्वास. हा विश्वास - विशेष श्वास संदेहरहीत होऊन भाव धरला तर प्राप्त होतो. ***('विश्वास तो देव। म्हणोनी धरियेला भाव।।' - श्रीतुकाराममहाराज, 'न संडी रे भावो टाकी रे संदेहो।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या भावयुक्त विश्वासाने सत्यस्थानी जाता येते. ***('भावे विश्वासाने सत्यस्थानी जाई।।'-श्रीमामामहाराज केळकर)*** असा विश्वासाने रामपाठाचा पाठ जर घडला तर सर्वांतरस्थ आत्माराम-जगदीश - कृपा करणार आहे. म्हणून या साधनाचा किळस हा आळस सांडून रामाकडे - चैतन्याकडे- पाठ न करताना रामपाठाचा पाठ करावा लागेल. शुद्ध मनाने देहातीत होऊन एक वस्तूला चित्तात साठवून सदासर्वदा रामपाठाचे स्मरण साधावे लागेल. रामपाठाचे योगाने जर प्रभुरामांशी अनन्यता साधली तर सीतापती राम अंत:काळी रक्षण केल्याशिवाय राहणार नाही. हरीभक्तांचा शेवट हा नेहमी रामनामाने गोडच होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कृपेचे फळ म्हणजे श्रीमामामहाराजांना स्फुरलेला रामपाठ आहे. रामपाठाचे बोलविते धनी श्रीज्ञानेश्वरमहाराज आहेत, श्रीतात्यासाहेबमहाराज आहेत. मी फक्त निमित्तमात्र आहे. केवढी ही विनम्रता, निरहंकारिता! श्रीमामामहाराज सांगतात, ***'गोविंद म्हणे गुरुकृपेचे विज्ञान। बोलिलो संपूर्ण हनुमंतकृपे।।', 'ज्ञानेश्वरकृपाप्रसादे रचिले। तयांचिये बोले समाधान।'*** श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात श्रीमामामहाराजांचे वर्णन असे करता येईल, ***'तेणे कारणे मी बोलीन। बोली अरुपाचे रूप दावीन। अतींद्रीय परी भोगवीन। इंद्रियाकरवी।।', 'तया पाडे देही। जया मी आहे हे सेची नाही। निरहंकारता पाही। तया नाव।।'*** श्रीमामामहाराजांची काव्यसंपदा विपुल आहे. त्यातील या रामपाठाची रचना ते वेगळ्या अवस्थेत असताना झाली आहे. शके १८५८ मध्ये श्रीमामामहाराजांनी तेरा दिवसांत साधनमार्गाला धरून भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराजांचे चरित्र लिहिले. ते मकरसंक्रांतीदिवशी पूर्ण झाले. याचे दुसरे दिवशी किंक्रांतीच्या रात्री हा रामपाठ त्यांचे ठिकाणी अंतस्फूर्त झाला. एका बैठकीत हे सारे अभंग लिहून झाले. शेवटच्या अभंगातील ***'ज्ञानेश्वरकृपाप्रसादे रचिले। तयांचिये बोले समाधान।।'*** या चरणापर्यंत सारे लिहून झाले. आणि आश्चर्य म्हणजे त्यांना शेवटचा चरण काही स्फुरेना. एका वेगळ्याच अवस्थेत ते तीन तास होते. शेवटी त्यांना साक्षात रेवणसिद्धांचे स्फुरण झाले. त्यांना साक्षात रेवणसिद्धांचे दर्शन झाले. त्यांनी त्यांचे चरणावर मस्तक ठेवले व शेवटचा चरण लिहिला. ***'गोविंद करी रेवणसिद्धपदी नमन। रामपाठ पूर्ण सांग झाला।।'*** श्रीहनुमद्गुरूचरित्र बोधसार लिहून जीवनाचे संक्रमण झाले व रामपाठ लिहून किंकरत्त्वाचा अंत झाला. खरी किंक्रांत साजरी झाली. श्रीगोपाळकाका कोटणीस-गोपालनाथ-यांचेसारखे सत्पुरुष श्रीरामपाठाचे प्रस्तावनेत म्हणतात, 'रामपाठाचे मोल करणे म्हणजे प्रभुरामरायांचे मोल केलेप्रमाणे होणार आहे.' रामपाठाची कृती जर आपणाला समजली तर रामाची आकृती निश्चित दिसणारी आहे. जीवनात श्रीराम अवतरणार आहे. इतका तो महत्त्वाचा आहे.



**

## वैशाख शुद्ध

***अक्षय तृतीया खरे नाणे कैसे। स्वहित मार्ग सोसे सदा देव।।१।।***
***संतांचे बोलणे अंतरखूण बाणणे। संसार सुफल होणे जाणत्यासी।।२।।***
***दास म्हणे वेगी संतशाळे जाई। कळ कळुनी येई सहजेची।।३।।***

१) निष्काम कसणे हा रामनामाचा देहातीत होण्याचा स्वहिताचा मार्ग सोसासोसाने आक्रमिला असता सदा असणाऱ्या देवाची अक्षय निजदेवाची प्राप्ती होते. निजत्व हेच खरे धन.

२) संतांच्या संगतीत संतांच्या उपदेशाने असोनी संसारी अंतररंगी नाम कसे बोलावे हे समजते. या नाम जाणत्याचा दु:खरूप असणारा संसार सुखाने सुफळ होतो.

३) संतशाळेत जर आपण गेलो तर वेगाचे ठिकाणी सावधान होऊन संसारात साधन साधले तर नामाचे वर्म - भजनाचे वर्म सहज कळणारे आहे.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने वैशाख महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## वैशाख वद्य

***नौबद श्रवणे बिंदू उमगणे। सुत्रधार जाणणे बत्तीरूप।।१।।***
***संजीवनी मती जरी होय सती। विश्रांतीची स्थिती आन नसे।।२।।***
***निर्गुण भोजन देही बाग खूण। निजत्व लक्षण ओळखावे।।३।।***
***दास म्हणे तेथे दिसे देवपण। आणिक कारण कोण कायी।।४।।***

१) नाम (नौबद श्रवणे) रूपाने (बिंदू उमगणे) प्रचितीला येणारा सूत्रधार (निजत्व) सुंदर स्वयमेव प्रकाशित बत्तीरूप आहे.

२) हे नौबद श्रवणे; बिंदू उमगणे हे ज्ञान ज्या सर्वसाक्षी मनातील संजीवनी मतीमुळे होते, ती संजीवनी मती जर 'सत्'शी तद्रूप झाली - सती झाली - तर 'आन नसे' या स्थितीत विश्रांती प्राप्त होते.

३) सर्व इंद्रियांना एका चैतन्याचा अनुभव आल्याने म्हणजे सर्वांना निर्गुण भोजन घडल्याने देहातील कामक्रोध नाहीसे होऊन देह चैतन्यविठ्ठलाने भरून जातो. सर्वत्र निजत्व प्रगट होते.

४) असा महात्मा परब्रह्मरूप होतो. यापेक्षा परमार्थात काय मिळवायचे असते. हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने वैशाख महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# अक्षय्य तृतीया

आज अक्षय्यतृतीया. साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ दिवस. गुढी पाडव्यादिवशी सुरू झालेले रामपाठाचे चिंतन काल पूर्ण सांग झाले. तर गुढीपाडव्यादिवशी सुरू झालेला रामायणाचा पाठ आज पूर्ण झाला. गुढीपाडव्यादिवशी उभारलेली आनंदाची गुढी पुण्यप्रद रामपाठ पूर्ण झाल्यावर, रामायणाचा पाठ पूर्ण झाल्यावर आज तेहत्तीसाव्या दिवशी संध्याकाळी उतरविली. हा पुण्यप्रद अक्षय रामपाठ बत्तीशीतील नसून तो तेहतीशीतील नामी विसावा प्राप्त करून देणारा आहे. आजपासून श्रीमामांचे नित्यपाठाचे अभंगावर चिंतन सुरू होते. आमचे ती.प.पू.श्रीमामांचा नित्यपाठ हा रामपाठापेक्षा वेगळा नाही. नित्यरामपाठाचा नित्य पाठ करणे म्हणजे नित्यपाठ आहे. नित्यपाठाचे वीस अभंग नामी विसावा प्राप्त करून देणारे आहेत. चारीवाचेपैल नित्यवाचेने रामनाम घेणे हेच श्रीमामामहाराजांचे नेमाचे नामसंकीर्तन होते. ***(‘एका जनार्दनी नेम। नित्य वाचे रामनाम।।’ - श्रीनाथमहाराज)*** आमचे श्रीमामांचे कीर्तन व भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कीर्तन काही वेगळे नाही. त्याचे हृदयात सोहंरूपी श्रीतात्यासाहेबमहाराज आहेत व तेच ही कीर्तनसेवा करवून घेत आहेत, असा त्यांचा अनुभव होता. ते सांगतात, ***‘दासा हृदयी हनुमान। सदा करी तो कीर्तन।।’*** म्हणून त्यांचे हातून ‘अखंडीत वाचे श्रीरामस्मरण’ हे श्रीतात्यासाहेबमहाराजांचे कीर्तनच ३८ वर्षे घडले. आमचे श्रीदादांचे हातून हेच श्रीरामस्मरण ही कीर्तनसेवा अखंडत्वाने ३९ वर्षे घडली. आजही तेच श्रीरामस्मरण ही कीर्तनसेवा श्रीआण्णांचे हातून घडत आहे. अशीच ही उर्ध्ववाहिनी रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड जाणारी आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***‘उदास वृत्तीस मानवे जन। विशेष कथा निरुपण। रामकथा ब्रह्मांड भेदून। पैलाड न्यावी।।’*** हे समर्थकार्य श्रीरामनिकेतन येथे श्रीसमर्थरामकृपेने अखंडत्वाने सुरू आहे. ही श्रीमहाराजांची सत्ता आहे. समर्थ सांगतात, ***‘ज्ञानी मुक्त होऊनी गेले। त्यांचे सामर्थ्य उगेचि चाले। कां जे पुण्यमार्गे चालिले। म्हणोनिया।।’*** अक्षय रामकथा अक्षय अनुभवणे यापरती अक्षय्यतृतीया कोणती? बाकी सारे नासणारे आहे. एक अविनाशी रामनाम - चैतन्याची जाणीव - तेवढे अक्षय आहे. श्रीनाथमहाराज या रामनामाचे महत्त्व असे सांगतात, ***‘नाशिवंत सर्व एक नाम साचे। म्हणोनी वदा वाचे श्रीराम।। स्थूल नासे सूक्ष्म नासे। नाम न नासे श्रीरामाचे।। जे न नासे ते नाम वाचे। एका जनार्दनी साचे जप करी।।’*** ज्याला क्षय नाही अशी चैतन्याची अखंड जाणीव - स्मरण - हे रामनाम त्यांनी देहामध्ये साधले. महाकारणदेही अखंड चैतन्य स्मरणाने द्वैत नाहीसे होऊन अद्वैत अक्षयसुख - अखंडसुख त्यांनी अनुभवले. ***(‘क्षय नाही जया पाही। अक्षयी ते नांदे देही।।’, ‘जीवशीवा पलिकडे। अक्षय रूप ते चोखडे।।’ श्रीमामामहाराज केळकर, ‘अखंड देऊनीया स्मरणासी। द्वैत भयाते नासी।। अक्षयप्राप्तीचा सुख दाता। केशव म्हणे आता।।’ - श्रीकेशवस्वामी)*** श्रीरामाचे अखंड अनुसंधान हेच खरे श्रीमामामहाराजांचे चरित्र. श्रीगोविंदचरितमानस सांगते, ***‘अखंड ध्यान श्रीरामाचे। अखंड पूजन श्रीरामाचे।। अखंड कीर्तन श्रीरामाचे। हेचि गोविंदचरित।।’.*** महाकारणदेहातील अखंड स्मरणाने ते अक्षयस्वरूपाकार झाले. ***(‘अखंडस्मरणे अद्वय भजने वाजवी करटाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तात्काळी।।’ - श्रीनाथमहाराज, ‘महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।।’ - श्रीदासराममहाराज)***

**

# खरे नाणे

जे खोटे आहे, जे भ्रामक आहे, जे अशाश्वत आहे, ते प्राप्त होण्यासाठी जे नाणे चालते ते नाणे खरे असेल काय? तेही खोटेच की. खोटे प्राप्त होण्यासाठी खरे कोण देईल? मिथ्या जगातील संपत्ती प्राप्त होणेसाठी खोटी नाणी तर सत्य परब्रह्म प्राप्त होण्यासाठी खरी नाणी. पण आम्हाला मिथ्या जगच सत्य वाटत असल्याने खोटी नाणी हीच खरी वाटतात व तीच गोळा करण्याच्या मागे आपण लागतो. अहो, आत्ता जे नाणे बाजारात चालतंय म्हणून जी नाणी आम्ही साठवतोय, ती एका फतव्याने कधी रद्द होतील सांगता येतंय का? जी रद्द होऊ शकतात त्यांना खरे कसं काय मानणार? शिवाय ही आपल्या देशातील नाणी आपल्या देशाबाहेर, परदेशात चालत नाहीत, मग परलोकात कशी चालणार? प्रत्येकाला परदेशात जाता येईल असे नाही पण प्रत्येक प्राण्याला परलोकात मात्र जावे लागणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. तिथे काय करणार? तिथे हे मिळवलेले धन, ही नाणी बरोबर नेता येत नाहीत. हे कटू सत्य आहे. ***('धन मिळवूनी कोटी। सवे नये रे लंगोटी।।', 'तुका म्हणे ज्याची संपदा एवढी। सांगाते कवडी गेली नाही।।' - श्रीतुकाराममहाराज)*** अहो, परदेशात जातानासुध्दा बरोबर काय न्यायचे व काय न्यायचे नाही याचे नियम आहेत. तसे परलोकात जाताना बरोबर काय नेता येते याचे पण नियम आहेत. परलोकात जाताना जे कोणी आपण आहोत ते व बरोबर आपले कर्म एवढेच नेता येते. ***('मुलाम्याचे नाणे। तुका म्हणे नव्हे सोने।।', 'करा हरीभक्ती परलोकी ये कामा। सोडवील यमापासोनिया।।' - श्रीतुकाराममहाराज) ('कर्मानुगो गच्छती जीव एकः'- संस्कृतवचन)*** मन आहे तोवर कल्पनेने भ्रामक जग सत्य वाटते व ती भ्रामक संपत्तीच खोट्या नाण्यांनी मिळवण्याचे मागे तो लागतो. तर भजन साधनाभ्यासात रंगून ज्याने मनोलय साधला आहे अशा दासाला 'सीतापतीराम' हीच संपत्ती वाटते. 'निर्विकल्प नाम' या खऱ्या नाण्याचे योगे तो ती मिळवायचा प्रयत्न करतो. ***('जो जो भजनी रंगला। तो तो रामदास झाला।।, 'दासाची संपत्ती रामसीतापती' - समर्थ)*** अक्षय स्वरूप प्राप्त होण्यासाठी जे नाणे चालते त्या नाण्याला खरे अक्षय नाणे म्हणतात. चंचळ चैतन्य जे नाद प्रकाशाने अनुभवयाला येते ते सत्य नाम (नाद) रूप (प्रकाश) अनुभवणे हे खरे नाणे आहे. नरदेहात जो स्वयमेव रामनाम ध्वनी उमटतोय, जो स्वयमेव नवल प्रकाश प्रगट होतो आहे, तो अनुभवणे हे खरे नाणे आहे. ***('खरे नाणे नरदेही। रामनाम ध्वनी पाही।।', 'खरे नाणे खरे नाणे। रामनामरूप जिणे।। रामनाम खणखणाट। हाणी काळासी चपेट।।', 'खरे नाणे गुरुनाम। हाता येई परब्रह्म।। - श्रीमामामहाराज, 'निराकारीचे नाणे। शुद्ध ब्रह्मीचे ठेवणे।। प्रयत्ने काढिले बाहेरी। संतसाधू सवदागरी।। व्यास वसिष्ठ नारदमुनी। टांकसाळ घातली त्यांनी।। उद्धव अक्रूर स्वच्छंदी। त्यांनी आटवली चांदी।। केशव नामयाचा शिक्का। हारप चाले तिन्ही लोका।। पारख नामयाची जनी। वरती विठोबाची निशाणी।।'- संत जनाबाई)*** खऱ्या (साक्षात्कार) नाण्याने अहंकार जातो तर खोट्या नाण्याने अहंकार वाढतो. जे अभिमान अहंकाराचे खोटे नाणे आहे ते आपणास खोटे झाले की साक्षात्काराचे खरे नाणे प्राप्त होते. ***('काय खोटे कामा येई। जवळ असता व्यर्थ होई।। गुरुकृपे हे जाणणे। दास म्हणे व्यर्थ होणे।।' - श्रीमामामहाराज, 'खोटे निवडीता खरे नाणे उरे। तैसेचि विस्तारे तत्वज्ञान।।' समर्थ, 'जनकभेटीसी पाठविले तेणे। अभिमान नाणे खोटे केले।। - श्रीतुकाराममहाराज)*** या नाण्याचे वर्णन श्रीचिमडचेमहाराज असे करतात, ***'सद्रूप मूळ ब्रह्म पाही। चिद्रूप गगनी नटला बाई। आनंदरूप लवलाही। गुरुघरचे नाणे।।', 'काढीले एक अंजन। नेत्री घालून। डोळे भरून। अलक्ष्यस्थान। दाविली नाणी। बाई दिसू लागली। नवरत्नांची खाणी।।'***

**

# कसणे

व्यावहारिक नाणी मिळवायची असू देत किंवा पारमार्थिक नाणी मिळवायची असू देत, कष्ट हे आवश्यकच आहेत. योग्य दिशेने प्रयत्न, खटपट हवी तरच दोन्ही नाणी मिळवण्यात यश येते. दोन्ही नाणी मिळवणे गरजेचे आहे. परमार्थ करण्यासाठी देह स्वस्थ हवा व देह स्वस्थ राहण्यासाठी योग्य आहाराची, निवाऱ्याची, वस्त्राची गरज आहे. या गरजा भागविण्यासाठी व्यावहारिक धनही हवे. जोगी, कानफाट्या, बैरागी कोणीही असो, बाराची वेळ कठीण आहे. म्हणून जर याच्याच मागे लागावे तर एके दिवशी हे सारे इथेच ठेवून जावे लागणार आहे. या दोन्हीचा समतोल राखावा लागेल. गरजेपुरते व्यावहारिक धन व समाधानासाठी पारमार्थिक धन मिळवणे गरजेचे आहे. ***(‘जया ऐहिक धड नाही। तयाचे परत्र पुससी काई। म्हणोन सांगो का वाई। पंडुकुमरा।।’ -श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणे तुम्ही कष्टी व्हाल। प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी।।’ - श्रीसमर्थ)*** प्रापंचिक असो वा पारमार्थिक असो, धन मिळवताना आपला व्यवहार उत्तम हवा. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***‘जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।’*** ‘आत्मप्रकाश पाहात व्यवहार करावा म्हणजे त्या व्यवहारात बरकत प्राप्त होते.’ असे भगवान सद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज सांगतात. आमचा व्यवहार खोटा असेल, हरीच्या प्रत्ययाशिवाय जर आमचा व्यवहार होत असेल तर त्यातून मिळणारी नाणी ही न टिकणारी खोटीच प्राप्त होणार. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण।’*** हा व्यवहार कोण करते. व्यवहाराचा कर्ता कोण आहे हे ओळखून व्यवहार झाला तर तो उत्तम व्यवहार. उत्तम व्यवहाराने संसारातच परमार्थ साधणार आहे. अर्थप्राप्ती करायची म्हणजे ती व्यावहारिक असो किंवा पारमार्थिक, रात्रंदिवस त्या अर्थाकडे, ध्येयाकडे लक्ष द्यावे लागते तरच समर्थ होता येते. समर्थ सांगतात, ***‘रात्रंदिवस पाहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ। परलोकीचा निजस्वार्थ। तेथेचि घडे।।’*** लटक्या व्यवहारात म्हणजे हरीच्या प्रत्ययाशिवाय होणाऱ्या वाया येरझारीत जे षड्‌विकारात्मक आयास दिननिशी होतात त्या प्रापंचिक श्रमाने कष्ट होतात व हरीभजन साधत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘सायास करीसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।’*** हे लटक्या व्यवहारातील षडविकारात्मक आयास दूर होणे, कर्म नि:ष्काम होणे म्हणजे उत्तम व्यवहार असून तेच पारमार्थिक कसणे आहे. हा उत्तम व्यवहार होणेसाठी उगेपणात येऊन निवांत बसले पाहिजे तरच दैवत प्रसन्न होणार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘कैसेनी दैवत प्रसन्न त्वरित। उगा राहे निवांत शीणसी वाया।।’*** तर श्रीमामामहाराज हे पारमार्थिक कसणे कसे असते याचे वर्णन असे करतात, ***‘कसे मग राम पाही। कसल्यावीण राम नाही।। राम हंसावरी आहे। कसोनिया देही पाहे।। केल्यावीण नाही काम। कसणे जाणावे नि:ष्काम।। कसणे एक रामनाम। दासा नाही दुजे काम।।’.*** जसे हे कसणे साधेल तसे त्याला अनुभव येणार. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘कसे बोटाने दाखवू तुला। पहा अनुभव गुरूच्या मुला।।’.*** जसे कसणे वाढेल तसे चत्वार देहांचा निरास होऊन ब्रह्मरूप व्हाल. श्रीमामामहाराज सांगतात, ***‘कसे कसे कसे कसे ब्रह्मरूप होसी। जसे जसे जसे जसे मनी नाम घेसी।।’.***

**

# स्वहित

परमार्थात ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, हित म्हणजे आत्महित हे आपण लक्षात घ्यावे. आपण हित पाहतो ते देहाचे व देह म्हणजे 'मी' असे मानून जे माझे देहाला चिकटलेले आहे, त्याचे हित पाहतो. पण देह म्हणजे आपण नसल्याने शरीर, संपत्ती (नाशवंत) गोळा करून आत्महित साधत नाही. जे अविनाशी आहे ते गोळा करण्याने आत्महित साधणार आहे. म्हणून देहाचे किंवा आर्थिक हित येथे अपेक्षित नाही. अहो आत नारायण-आत्मा-असेल तर लक्ष्मीचा उपयोग, देहाचा उपभोग. आत्मा असेल तर शरीरसंपत्ती, व्यायामाने, औषधाने राखता येते. भरपूर अर्थप्राप्ती करता येते. आत आत्माच-नारायणच नसेल तर लक्ष्मी कोणापाशी राहणार? म्हणून आधी हित नारायणाचे - आत्म्याचे मग जमल्यास लक्ष्मीचे, देहाचे. अहो शीर सलामत तो पगडी पचीस हेच खरे. हे आपले आत्महित कशाने साधणार आहे, हे आपले आईवडील, शिक्षक यांना माहीत असत नाही. ज्यांनी हे आत्महित साधले आहे असे संतसाधू याबाबतीत मार्गदर्शन करू शकतात. ***('हित नाही ठावे जननीजनका। येरा लोकाचार शिकविती।।' -श्रीतुकाराममहाराज, 'एका जनार्दनी संत। नित्य साधी आत्महित।।' 'स्वहिताकारणे संगती साधुची। भावे भक्ती हरीची भेटी तेणे।।'-श्रीएकनाथमहाराज 'माझे झाले स्वहित। तुम्हा सांगतो निश्चित।।'-संत सेनामहाराज 'संताचिये पायी हा माझा विश्वास। सर्वभावे दास झालो त्यांचा।। तेचि माझे हित करिती सकळ।'-श्रीतुकाराममहाराज)*** ज्यांनी आत्महित साधले अशा संतांचे आईवडील भाग्यवान असतात. ***('आपुलिया हिता जो असे जागता। धन्य मातापिता तयांचिया।।'-श्रीतुकाराममहाराज)*** अशा संतांचे सहज बोलणे हे आपले हित साधणारेच असते. ***('सहज बोलणे हित उपदेश। करोनी सायास शिकविती।।'-श्रीतुकाराममहाराज)*** आपले स्वहित कशाने साधेल हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'हित ते करावे देवाचे चिंतन। करुनिया मन एकवीध।।' ,'हित ते हे एक राम कंठी राहे। नाठविती देहे देहभाव।' ,'हित व्हावे तरी दंभ दूरी ठेवा। चित्त शुद्ध सेवा देवाची हे।।' ,'तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित। धरा अखंडीत सुखरूप।।'.*** तर श्रीसमर्थ स्वहित कसे साधेल हे असे सांगतात, ***'हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत।। देहबुद्धीने अनहित। हेचि लागे।।' ,'नाशिवंत तितुकेची देसी। तरी पद प्राप्त निश्चयेसी।। त्यामध्ये लालूच करिसी। तरी स्वहित न घडे।।', 'अरे मन। पावन देव धरी। अनहित न करी।। नित्यनित्यविवेक करावा बहुजना उद्धरी।। आत्मा कोण अनात्मा कैसा। परपार उतरी।। दास म्हणे तुझा तु ची सखा रे। हित तुझे तू करी।।'*** तर श्रीमामामहाराज स्वहिताबद्दल असा उपदेश करतात, ***'सारासार विचार करूनिया पाही। तरीच होय काही आत्महित।। गोविंद म्हणे हित रामनाम कंठी। जेणे जगजेठी तुष्ट होय।।',' सवय ती भजनाची। खरी जाण स्वहिताची।।'.*** हे भजन, रामनाम आपण समजतो त्यापेक्षा वेगळे आहे. हे आपण इतरत्र पाहिले आहे. संतांच्या उपदेशाप्रमाणे आपण वागलो तरच आपले स्वहित साधणार, अन्यथा स्वहिताला मुकावे लागणार. ***('कोणी निंदा कोणी वंदा। आम्हा स्वहिताचा धंदा।। तुम्हासारीखे चालावे। तरी स्वहिता मुकावे।।' श्रीतुकाराममहाराज, 'विश्रांती देही अणुमात्र नाही। कुळाभिमाने पडिलो प्रवाही।। स्वहित माझे होता दिसेना। तुजवीण रामा मज कंठवेना।।'-समर्थ.)*** नरदेहात असणारे आयुष्य (श्वास) साधनीभूत करून शुद्ध मनाने देहातीत अवस्थेत आत्मवस्तूची ओळख झाली तरच आत्महित साधणारे आहे. तरच नरदेहातील आपला व्यापार सफल, हितकारी होणार आहे. ***('तुका म्हणे हित होय तो व्यापार। करा काय फार शिकवावे।।', 'साठविला हरी जेणे हृदयमंदिरी।। त्याची सरली येरझार। झाला सुफल व्यापार।।'-श्रीतुकाराममहाराज, 'नरदेहाचे उचित। काही करावे आत्महित। यथानुशक्त्या चित्तवित्त। सर्वोत्तमी लावावे।।'-समर्थ)***

**

# मार्ग

ज्याने आपणास देह दिला, त्यानेच देहातीत व्हायचे साधन पण दिले आहे. पण हे साधन आहे हे आपणास माहीत नसल्याने ते संतांकडून, सद्गुरूंकडून समजून घ्यावे लागते. ***(‘देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे श्रीविठ्ठल रे।।’ श्रीज्ञानेश्वरमहाराज ‘सद्गुरूवाचोनी कळेना साधन। उगीच का शीण करूनी घ्यावा।।’- श्रीदासराममहाराज)*** सद्गुरुंनी सांगितलेल्या साधन मार्गाने मार्गक्रमण केल्यास स्वहित साधता येते. श्वासोच्छ्वास हे एकमेव साधन परमेश्वराप्रत जाणारे आहे. (°So far the breathing is the path to approach the heaven.° - श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या इंग्रजी काव्यातून) श्वासोच्छ्वास हे हरीचे - आत्म्याचे साधन असून इतर कोणतेही साधन वापरून हरीप्राप्ती - आत्मलाभ - होणार नाही. ***(‘करारे बापानो साधन हरीचे। झणी करणीचे करू नका।। जेणे नये जन्म यमाची यातना। ऐसीया साधना करा काही।।’, ‘सापडला हरी तयाला साधनी। एका जनार्दनी हरी बोला।।’ श्रीनाथमहाराज)*** साधनाभ्यासाने मन एकाग्र होऊन विकर्माचे कर्म झाले असता नि:श्वासाचे प्रमाण १८ अंगुळावरून १२ अंगुळे झाले असता चित्तास समता प्राप्त होते. साधनाभ्यासाने कर्माचे अकर्म झाले असता, नि:श्वासाचे प्रमाण १२ अंगुळापासून अत्यल्प झाले असता, ‘सोहं तेही अस्तवले’ या अवस्थेत चित्त शुद्ध होऊन सर्वत्र त्या एकाचा अनुभव येतो. विषयांपासून चित्त परावृत्त होऊन चिदचिदग्रंथी सुटते व चैतन्याबद्दल सूक्ष्म देहात प्रेम-भक्ती निर्माण होते. चैतन्याकडे वृत्ती वळतात. ***(‘चिदचिदग्रंथी विराम पावती। जये ठायी भक्ती उपजो लागे।।’, ‘अष्टधेचे ज्ञान स्थूल देही जाण। सूक्ष्मदेही खूण नवभक्ती।।’श्रीदासराममहाराज, ‘चिदचिदग्रंथी सुटेना। क्षणभर विषयी चित्त विटेना।।’ निजानंदमहाराज, ‘चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।’ संत शिवराम)*** नवभक्तीच्या अभ्यासाने जाणीवेत नवद्वारांचा निरोध साधून कारणदेहातील दशमद्वार ओलांडले असता महाकारणदेहात; तुर्यावस्थेत अज्ञानाचे ज्ञान होऊन सहजस्थिती प्राप्त होते. वेगळेपणाने चैतन्याचे अनुभव त्याला प्राप्त होतात. शुन्यज्ञान त्याला होते. ***(‘कारणशरीरी देखे दसवेद्वार। महाकारणी घोर शून्यज्ञान।।’ ‘दशमद्वार ओलांडीता। सहजस्थिती येई हाता।’ श्रीदासराममहाराज)*** या महाकारणदेहाचा - चौथ्या देहाचा विदेह होणे म्हणजे देहातीत वस्तूरूप होणे होय. सर्व साधू या देहातीत वस्तूशी एकरूप होऊन सुखरूप, स्वरूपाकार-ब्रह्मरूप झालेले असतात. ***(‘मुळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।’ , ‘साधू दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळोनी येकची झाले। देहातीत वस्तू।।’, ‘देहची होऊन राहिजे। तेणे देहदुःख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।’-समर्थ)*** महाकारणदेहात तुर्यावस्थेत सर्वसाक्षी मनाला वेगळेपणाने प्राप्त होणारे द्वैतातील अनुभव जेव्हा सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते, तेव्हा ठायीच मुरून जातात. तुर्येतील ज्ञानाचे विज्ञान होते व आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होऊन तो निश्चळ होतो. ***(‘म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।’ , ‘जेथे ज्ञानची होते विज्ञान। जेथे मनची होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।’ - समर्थ)*** हा निश्चळ निवांतपणा प्राप्त होणे म्हणजे हरीपाठाचा पाठ घडणे होय. हा हरीपाठाचा पाठ घडताना कर्म, ज्ञान, भक्ती, योग हे चारी मार्ग आचरले जातात. ***(‘कर्म उपासना ज्ञानमार्गी आले। हरीपाठी आले सर्वमार्ग।।’ - श्रीनाथमहाराज)*** देहाचा विदेह होऊन जीवपणाच्या वियोगाने नवलस्वरूपाचा योग घडतो. तो जीव स्वरूपाकार होतो.

**

# सोस

माणसाला सोस असतो पण तो प्रपंचाचा असतो. मनुष्य प्रपंच सोसासोसाने करतो. प्रपंचाकरिता एवढी माया गोळा करतो की काही बोलायची सोय नाही. प्रपंचाकरिता कितीही आणले तरी 'आणा' काही संपत नाही. त्याचे हवेपण संपत नाही. पण शेवटी हाताला काय येते? निराशाच ना? का गोळा करून समाधान होते? बायकांना सोस दागिन्यांचा असतो पण ते धन लॉकरचेच ना? अहो उपभोगसुद्धा घेता येत नाही. या प्रापंचिक सोसापायी माणसाचे जीवन निरस होते. जीवनात जर रस निर्माण झाला तरच रसरूप, रसज्ञ आत्मा प्राप्त होणारा आहे. श्रीनिवृत्तीनाथमहाराज सांगतात, ***'रसज्ञ रसाचा रसामाजी वसे। जीवन हे सोसे असोस होय।।'.*** अहो हा प्रपंचाचा सोस कधीही न संपणारा आहे. या सोसामुळेच दिननिशी षड्विकारात्मक आयास-सायास होतात व 'कामक्रोधरहित होणे' हे समाधानकारी भजन साधत नाही. कामक्रोधाने भाव बदलतो मग एकभावे भजन कसे होणार? ***('सायास करिसी प्रपंच दिननिशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज 'वाउगाची सोस न करी सायास। भजे श्रीसंतास एकभावे।।' श्रीनाथमहाराज)*** या सोसामुळे होणाऱ्या सायासाने आपली श्वसनाची गती बदलते. नामस्मरणाची स्थिती सांडते व नको ती परिस्थिती येते. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'वारियाची बदले चाल। तरी होती फार हाल।।'.*** या मायेच्या सोसाने ब्रह्म काही भेटणार नाही. श्रीनामदेवमहाराज आपणास सावध करत आहेत. ते सांगतात, ***'का करिसी सोस मायेचा असोस। नव्हे तुज सौरस नामेवीण।।'*** *तर श्रीतुकाराममहाराज सांगतात,* ***'सोस करिसी का वाया। भज मना पंढरीराया।।'.*** हा प्रापंचिक सोस कमी झाला तर हे कामक्रोधादि गती बदलणारे सायास नाहीसे होतात व रामनामाचा सोस लागतो. साहजिकच जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. ***('फेर चुकाया वळसे। घेई रामनाम सोसे।। सोस जडला नामाचा। तोचि मानव दैवाचा।। सहा ओळखले जरी। सोस बोलिजेल तरी।। दास सोसे नाम घेई। देव त्यासी साह्य होई।।' , 'सोस जडला नामाचा। ओस झाली काया वाचा।।', 'सहा ओस तोची सोस। नामेवीण नाही आस।।' श्रीमामामहाराज केळकर)*** आपल्या शरीरात जी येण्याजाण्याची क्रिया अनस्यूतपणे सुरू आहे, त्या क्रियेचे ठिकाणी जर मन सोसाने जडले तर जन्ममरणरहित अवस्थेत एका विठ्ठलाशिवाय कशाचीही अनुभूती येणार नाही. साहजिकच कामक्रोधादी विकार नाहीसे होतील. ***('बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव।। येणे सोसे मन जाले हावभरी। परत माघारी येत नाही।। तुका म्हणे देह भरिला विठ्ठले। कामक्रोधे केले घर रिते।।'-श्रीतुकाराममहाराज)*** मनाला चैतन्याचे अनुभवसुख प्राप्त झाल्याने आत्मलाभाच्या सोसाने ते संपूर्ण निवृत्त होते. मन रामरूप होते. परमार्थ पूर्ण होतो. ***('लाभाचिया सोसे पुढे चाले मना। धनाचा कृपणा लोभ जैसा।।'-श्रीतुकाराममहाराज 'या मनाचे एक नीके। जे देखिलिया गोडीचे ठायी सोके।। म्हणोनी अनुभवसुख कवतुके। दावीत जाइजे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज 'प्राणापानामाजी मनाचे मिलन। परमार्थ पूर्ण तये ठाया।।'-श्रीदासराममहाराज)***

**

# सदा देव

देव सर्वत्र सदा सर्वांतरी सारखेपणाने गुप्तरूपाने भरून राहिला आहे. तो अंतर्यामी सदा अपरिवर्तनीय आहे म्हणून ही बाहेरची परिवर्तने होऊ शकतात. जो विश्वात भरून राहिला आहे तोच आपल्यात आहे. आपल्यातील देवाची जाणीव आपल्याला झाली की तो विश्वात सर्वत्र सदा जाणवणार आहे. तो अंतरी आहे म्हणून हे विश्व 'आहे' चे 'नाही', 'नाही' चे 'आहे' होऊ शकते. तो 'आहे' म्हणून हे 'आहे', तो 'आहे' म्हणून हे 'नाही', हे असो नसो तो सदा आहेच. श्रीदासराममहाराज देव कसा आहे हे असे सांगत 'आहे आहे म्हणताना जे नाही होते असे जे नाही असे जे आहे तो देव आहे.' ***('म्हणूनी अर्जुना मी नसे। ऐसा कवणू ठाव असे। प्राणियांचे दैव कैसे। जे न देखती माते।।', 'म्हणोनी सर्वत्र सदा सम। ते आपणचि अद्वय ब्रह्म। हे संपूर्ण जाणे वर्म। समदृष्टीचे।।', 'म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज. 'आहे नाही लटिके दोनी। सारिखे जे असोनी नसोनी।।' श्रीदासराममहाराज)*** पण तो आपल्या अंतरी, जगदंतरी सदा असणारा देव आम्हाला कदा पण जाणवत नाही, हे केवढे विशेष आहे. सत्यावर भासाची विकृती झाल्याने - सत्यस्वरूप लोपल्याने - सत्य देवाची मूळ कृती जाणवत नाही. विकृत भासच सत्य वाटू लागतो. ***('सत्यावर जे का भासाची विकृती। तयासी म्हणती जन्म बापा।।', 'विकृती आहे ज्यात। तया आहे आदिअंत।। सत्य नोहे भास। कैंचे जन्ममरण त्यास।। सत्य हे अढळ। तेणे निर्मिले सकळ।।' श्रीदासराममहाराज)*** जोवर मन आहे तोवर सत्य देवाचे ज्ञान न होता कल्पनेने भासमान विकृतीचे ज्ञान होते. जाणीवेत मनोलय साधला तर या भासमान साकार विकृतीचे ज्ञान न होता मनमुळी विराजमान असणाऱ्या वनमाळीचे सत्यज्ञान होते. मनोलयाने कल्पांती कल्पनेचा निरास झाल्यावर साकार दिसणाऱ्या विश्वाची जाणीव होत नाही तर सर्वकाळ असणाऱ्या अविनाशी ज्याला जन्ममरण नाही अशा स्वरूपाची, वस्तूची जाणीव होते. हे आपले स्वरूप म्हणजेच सदा असणारा देव आहे. ***('तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।' , 'हे उपजे आणि नाशे। हे तो मायावशे दिसे। येऱ्हवी तत्वता वस्तू जे असे। ते अविनाशची।।' -श्रीज्ञानेश्वरमहाराज 'जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।', 'दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते।।'-समर्थ 'देव आहे ऐसे वदवावे वाणी। नाही ऐसे मनी अनुभवावे।।' - श्रीतुकाराममहाराज)*** अशा तऱ्हेने जे निर्विकल्पी कल्पनातीत झालेले असतात ते संत सदा नामरूपातीत शाश्वत भगवंतालाच - सदा असणाऱ्या देवालाच अनुभवतात व अद्वैती समरस होऊन जातात. ***('निर्विकल्पी कल्पनातीत। तोचि वोळखावा संत। येर अवघेचि असंत। भ्रमरूप।।', 'जो जाणेल भगवंत। तया नाव बोलिजे संत। जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी।।' समर्थ, 'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।।' -श्रीदासराममहाराज)*** संत हे देहीच विदेही झालेले असतात. देहातीत अवस्थेत ते परब्रह्मरूप झालेले असतात. त्यांचे सारे व्यवहार सदा देवाशीच होतात. त्या संतांना सदा देवाचेच सान्निध्य असल्याने सदा सर्वदा देवाचाच योग असल्याने इंद्रियांना सदा देवाचाच अनुभव प्राप्त होतो. देवकाजीच त्यांचा देह झिजतो. देहाचे परमार्थाने सार्थक होते. श्रीसमर्थ या संतांचे आचरण कसे असते हे असे सांगतात, ***'सदा देवकाजी झिजे देह ज्याचा। सदा रामनामे वदे नित्य वाचा। स्वधर्मेची चाले सदा उत्तमाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।' ,'सदा सर्वदा देव सन्निध आहे। कृपाळूपणे अल्प धारीष्ट पाहे। सुखानंद आनंद कैवल्यदानी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।।'.***

**

# संतांचे बोलणे

आम्ही जे बोलू नये ते बोलतो, संत तसे बोलत नाहीत. ते बोलतात ते अंतर्खूण बाणवणारे निर्हेतुक सहज रामनामच बोलतात. ***(‘अनंत वाचाळ बरळती बरळ। त्या कैचा दयाळ पावे हरी।।’-श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘हरी हरी बोला ना तरी अबोला। व्यर्थ गलबला करू नका।।’- श्रीनाथमहाराज, ‘सहज बोलणे हितोपदेश। करूनी सायास शिकविती।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘नाईकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी। अवाच्य ते टाळी। जीभची गा।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘तेचि संत तेचि संत। ज्यांचा हेत विठ्ठली।। आणीक नेणती टाणे टोणे। नामस्मरणेवाचोनी।। काया वाचा आणि मने। धाले चिंतने डुल्लती।। निळा म्हणे विरक्त देही। आठवची नाही विषयांचा।।’ - श्रीनिळोबारायमहाराज ‘सहजकृती रामनाम। अंतरी नाही दुजे काम।।’, ‘संतांचे बोलणे रामनाम पाही। आन नसे काही दास म्हणे।।’, ‘ संतांचे बोलणे रामनाम वाचा। अधिकार त्यांचा थोर असे।।’ - श्रीमामामहाराज)*** संत बोलतात पण बोलणारा कोण आहे व ऐकणारा कोण आहे हे जाणून बोलतात. त्यामुळे मी बोलतो, मी कीर्तन करतो ही कर्तृत्वाची भावना तेथे असत नाही. ***(‘तेणे कारणे मी बोलीन। बोली अरूपाचे रूप दावीन। अतीन्द्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवी।।’-श्रीज्ञानेश्वरमहाराज ‘आपुलिया बळे नाही मी बोलत। सखा कृपावंत वाचा त्याची।। साळुंखी ती कैसी बोले मंजुळवाणी। बोलविता धनी वेगळाची।। काय म्या पामरे बोलावी उत्तरे। परी त्या विश्वंभरे बोलविले।।’ - श्रीतुकाराममहाराज ‘दासा हृदयी हनुमान। सदा करी तो कीर्तन।।’ - श्रीमामामहाराज, ‘तू चि श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती।।’ संतवचन)*** ज्यांचा देह विठ्ठलाने भरला आहे, कामक्रोधाने नव्हे, त्यांचे बोलणे इतर जनांपेक्षा वेगळे असते. ते जे स्वभावे बोलतील ते ब्रह्मनिरुपणच. ***(‘जया अंतरी भगवंत। अचळ राहिला निवांत।। तो स्वभावे जे बोलत। ते ब्रह्मनिरूपण।।’ समर्थ ‘तयाचे बिसाट शब्द। सुखे म्हणे येती वेद। तरी मग सदेह सच्चिदानंद। का नोहावा तो।।’ श्रीज्ञानेश्वरमहाराज ‘जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू।।’ - समर्थ)*** अर्थात साधूंच्या अंतरात तोच, वाचेवरती तोच व कृतीतही तोच. ***(‘बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव।।’, ‘बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।।’ श्रीतुकाराममहाराज. ‘यथा चित्ते तथा वाचा। यथा वाचा तथा क्रिया। चित्ते वाची क्रियायांच। साधुनाम एकरूपता।।’ - संस्कृत सुभाषित)*** अशा संतांच्या साधूंच्या बोलण्याने विठ्ठलाला डोल येतो. ***(‘बोलू ऐसे बोल। जेणे बोले विठ्ठल डोले।।’-श्रीनामदेवमहाराज, ‘अभंग बोलता कीर्तनी रंग भरला। प्रेमाचेनी छंदे देव नाचू लागला।।’- संत जनाबाई)*** जे संत उन्मनी अवस्थेत असतात, त्यांचे ठिकाणी अखंड चैतन्याची जाणीव असते पण जाणले ही वृत्ती असत नाही. अखंड चैतन्याचे स्मरण असते पण ते निवृत्ती अवस्थेत. संतांचे ठिकाणी दृश्याची जाणीव असत नाही चैतन्याची जाणीव असते. ती ही ‘जाणले’ या वृत्तीरहित असते. अर्थात तेथे दृश्याची जाणीव (बोलणे) किंवा चैतन्याची वृत्तीसहित जाणीव (अबोलण्याचे बोलणे) असत नाही. संतांचे बोलणे कसे असते ते केशवस्वामी स्वानुभवाने असे सांगतात, ***‘बोलणे अबोलणे सारूनी दोनी। बोलसी तरी बोल शब्दाते गिळोनी।। सद्‌गुरूकृपे केशवी पाही। बोलणे अबोलणे नुरेची काही।।’*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘साच लटिके दोनी। न बोले जाला मौनी। जे भोगिता उन्मनी। आरायेना।।’.*** ज्याच्या दृष्टीला सृष्टी येत नाही, मनोलयाने कर्म करून जे नैष्कर्म्य साधतात अशा संतांना बोलून मौन साधते व त्यांचे हे अंतर्बाह्य मौन शिष्याला देहातीत संशयरहित करणारे असते.***(‘गुरुर्मोनस्तु व्याख्यानम्। शिष्यस्तु छिन्न संशयः।’-संस्कृतवचन , ‘जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।।’, ‘वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।’ - समर्थ)*** आम्हा केळकरांचे घरात निष्काम कर्मयोग आचरून ज्या श्रीदादांचे परमार्थास पूरक झाल्या व आत्महित साधून रामरूप झाल्या त्या सौ.वहिनींचा अवतार आज झाला. **

# अंतरखूण बाणणे

परमार्थ हा अंतरंगातील विषय आहे. साहजिकच परमार्थ करणाऱ्याला अंतरंगातील खुणा - अनुभव प्राप्त होतात व त्याचे अंतरंग पालटून जाते. अंतरंगात प्राप्त झालेल्या खुणा बहिरंगात प्रगट होतात व त्याचे बहिरंगही पालटून जाते. तो अंतर्बाह्य पूर्ण पालटून जातो. आत प्राप्त झालेल्या खुणा जर बाहेर प्रगट झाल्या तरच अंतरात काही अनुभव आला आहे याला अर्थ प्राप्त होतो. आपल्या देहात जे आत्मरूप आहे ते आपणास माहीत नसल्याने आपण सृष्टी परवत् पाहतो. साहजिकच आपल्या ठिकाणी कामक्रोधादी विकार निर्माण होतात. आत्मरूप प्राप्त झाल्यावर त्याला सृष्टी आत्मवत दिसते व त्याला मिळवायचे काही उरतच नाही. अर्थात तेथे कोणतेही विकार राहात नाहीत. आपल्या देहात जे आपण अनुभवतो तेच आपण बाहेर पाहतो, तेच बाहेर प्रगट होते. आत्म्याच्या अज्ञानाने आपल्या देहात कामक्रोधादी षड्विकार निर्माण होतात. ते कामक्रोधच आपल्या वागण्याबोलण्यातून प्रगट होतात व तेच प्रतिक्रियात्मक रूपाने आपल्यासमोर प्रगट होतात. संतांनी हृदयस्थ आत्मविठ्ठल अनुभवलेला असल्याने ते सर्व भूतमात्र आत्मवत् पाहतात. आम्ही मात्र कल्पनेने भूतसृष्टी परवत् पाहतो व पापाचे धनी ठरतो. ***('जैसे अध्यात्मशास्त्रीये। अंतरंगची अधिकारिये। परी लोकू वाक्‌चातुर्ये। होईल सुखिया।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आत असे तरी प्रगटे बाहेरी। काय ती कस्तुरी सांगो लागे।'-संतवचन, 'अंदर राम बाहीर राम। जहाँ देखो वहाँ राजा ही राम।।' - श्रीनाथमहाराज , 'तुका म्हणे देह भरिला विठ्ठले। कामक्रोधे केले घर रिते।।' , 'ऐसे वर्म मज दावी नारायणा। अंतरीच्या खुणा प्रगटोनी।।' - श्रीतुकाराममहाराज, 'आत्मवत् सर्व भूतेषु यो पश्यति सः पश्यति' - संस्कृतवचन, 'तैसे भुतजात माझ्याठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मी चि मी आघवे।', 'पर्वताप्रमाणे पातक करणे। वज्रलेप होणे अभक्तासी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अनंतरूपे अनंतवेषे न पाहता त्या आत्मतत्वाला पाहिले मग द्वैत जाणवेल का? आम्ही त्याला न पाहताना अनंतरूपे अनंतवेष पाहतो, आकार पाहतो मग द्वैतच माजणार ना? ***('देखिला देखिला माये देवाचा देवो। फिटला संदेहो निमाले दुजेपण।। अनंतरूपे अनंतवेषे देखिले मी त्यासी। बापरखुमादेवीवरू खुण बाणली कैसी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आकार पाहाणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।। आपणा पहाता आकार उरेना। बोलाया राहेना पहाता कोणी।।'- श्रीदासराममहाराज)*** अंत:करणातील कल्पना हलल्याशिवाय, निर्विकल्प अवस्था प्राप्त झाल्याशिवाय या खुणा प्राप्त होत नाहीत. साधनाभ्यासाने जो अंतरी विवेकाने मन आवरून सहा विकार जिंकून निर्विकार होतो - सावध होतो, त्यालाच ही विठोबाची - आत्म्याची खूण प्राप्त होते. तो मुक्त होतो. ***('तुका म्हणे सांडा जाणीवेचा शीण। विठोबाची खूण जाणती संत।।' - श्रीतुकाराममहाराज, 'ऐके रे चांगया टाकी रे कल्पना। पावेल त्या खुणा मुक्ताई म्हणे।।' - संत मुक्ताबाई, 'अंतरी बहुतची सावध व्हावे। विवेकशस्त्रे मन आवरावे। दिसेंदिस अभ्यासावे। साधन नेमाचे।।', 'ज्यासी तुझी खूण लाधली असेल। तो पुन्हा न येईल गर्भवासा।।' - चिमडमहाराज)*** **संतमहात्मे जगाचे अंतरंग पाहतात, राखतात म्हणून ते भाग्यवान ठरतात.** ***('राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तद्‌नंतरे। ऐसी विवेकाची उत्तरे। ऐकणार नाही।।', 'जगदंतरी अनुसंधान। बरे पाहणे हेची ध्यान। ध्यान आणि ते ज्ञान। येकरूप।।' - समर्थ)*** हा सारा अंतरंगातील विषय असल्याने कोणीही या खुणा प्राप्त झाल्याचे नाटक करू शकतो. हे नाटक आहे का खरेच अनुभव आला आहे हे जाणते ओळखतात. परीक्षेने या गोष्टी समजतात. ***('तुका म्हणे मज कळते चाचणी। बडबडीची वाणी अथवा सत्य।।'- श्रीतुकाराममहाराज, 'बहीर तो खुब बनी है। अंदरकी बात राम जाने।।' - श्रीकबीरसाहेब)***

**

# संसार सुफळ होणे

संसार उपभोगून कधी कुणाचा संसार सफळ झाल्याचे कोणी ऐकले आहे का? संसार दु:खमूळ असल्याने संसार उपभोगून दु:खभोगच भोगावे लागतात. विचार दु:खाचा असल्याने संसार दु:ख बांधवडी ठरतो. मग संसार सुखाचा कसा होणार? ***(‘संसार दु:खमूळ। चहुकडे इंगळ। विश्रांती नाही कोठे। रात्रंदिवस तळमळ।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जन्म दु:खं जरा दु:खं जाया दु:खं पुन:पुन:। संसारसागरे दु:खं। तस्माज्जागृही जागृही।।’ - जगद्‌गुरू शंकराचार्य, ‘दु:ख बांधवडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाही कोठे।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** संसारात कितीही काहीही मिळवा संसार सुखाचा होत नाही. मग संसार सुफळ कसा होणार? श्रीदासराममहाराज हे सत्य असे सांगतात, ***‘जन्माचे सार्थक नोहे श्रीमंतीने। वक्तृत्व भूषणे लेता नोहे।। जन्माचे सार्थक नोहे अभिमाने। नोहे संगतीने विषयांच्या।। जन्माचे सार्थक नोहे प्रतिष्ठेने। कलाकौशल्याने नोहे नोहे।।’.*** थोडक्यात काय आम्ही समजतो त्या कोणत्याच गोष्टीने संसारात आल्याचे सार्थक होत नाही. संसार म्हणजे एक परमेश्वराने योजलेला, रचलेला चक्रव्यूह आहे. जो या संसार चक्रव्यूहात गुंततो, तो नुसता चौफेर फिरतो, श्रमून जातो पण त्याची जन्ममरण या संसारातून - भवचक्रातून सुटका होत नाही. ***(‘संसार भोगोनी जन्मवारी घडे। अभिमान जडे अंतरात।।’, ‘संसार म्हणजे चक्रव्यूह आहे। फिरवितो पाहे गरागरा।। सापडला प्राणी निघेना बाहेरी। फिरतसे चारी वाटे सदा।।’ - श्रीदासराममहाराज)*** आईच्या उदरात अभिमन्यूप्रमाणे या संसार चक्रव्यूहात जायचे जीवाला समजते पण बाहेर कसे पडायचे हे समजत नाही. ज्याच्यावर गुरूकृपा होते तोच या भवचक्रातून - संसार चक्रव्यूहातून सुखरूप बाहेर पडतो. संसारावर विजय प्राप्त करतो. त्याचा संसार सुफळ होतो. ***(‘आत्मस्वरूपा विसरूनी आम्ही भवचक्री फिरलो। काय सुकृत होते नकळे शरण पदी आलो।।’ - चिमडमहाराज)*** या संसारावर विजय प्राप्त करून देणारे शस्त्र अध्यात्मशास्त्र आहे. ***(‘साचची बोलाचे नव्हे हे शास्त्र। परी संसार जिणते हे शस्त्र। आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरीये।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जन्ममरण - श्वासोच्छ्वास - सोऽहं हंस: - हाच तो संसार असून अभ्यासाने चंचळत्व कमी होऊन निश्चळत्व प्राप्त होणे म्हणजेच संसारातून सुटका होऊन स्वरूपाकार होणे होय. ***(‘संसरण हाची पाहता संसार। बारे सोडणार तुझा तुची।। मनी रामजप संसार सुटला। दास म्हणे झाला धन्य तोचि।।’ - श्रीमामामहाराज, ‘येचि जन्मे येचि काळे। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।’ - समर्थ, ‘सोऽहं हंसाची बोळवण। न करिताची जहाली जाण। येणे पळाले जन्ममरण। शून्य पडले संसारा।।’ - श्रीनाथमहाराज)*** प्राणापानाचे ठिकाणी - सोहंहंसाचे ठिकाणी - गुरूचरणाचे ठिकाणी - अभ्यासाने जाणीवेत जर मनोलय साधला, मन जर ईश्वरार्पण झाले तर तत्वांचा तत्वात निरास होऊन पवनसिद्धी प्राप्त होते व पंढरपुरात आत्मविठ्ठलाचे दर्शन होऊन धन्यता प्राप्त होते, संसार सुफळ होतो. ***(‘स्वामी म्हणे माझे कृतार्थ जीवन। सद्‌गुरुचरण उपासिता।।’ - स्वामी स्वरूपानंद, ‘मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।।’ - संत मुकुंदराज, ‘ओळखिला हरी धन्य तो संसारी। मोक्ष त्याचे घरी सिद्धीसहित।।’ - श्रीनाथमहाराज, ‘आजी संसार सुफळ झाला गे माये। देखियले पाय विठोबाचे।।’, ‘अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिही लोक।। जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘प्राणाचा मनाचा एकलय होता। तत्वे तत्व सारिता पवनसिद्धी।। पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम। येतसे निष्कर्म हातालागी।।’ - श्रीदासराममहाराज)***

**

# जाणता

प्रपंच असूदे अथवा परमार्थ असूदे, जाणणाऱ्या जाणत्याचे महत्त्व अबाधित आहे. आपण मार्गदर्शन जाणकार ज्ञानी माणसाकडूनच घेतो. प्रपंचातील पदार्थज्ञान असू दे किंवा परमार्थातील स्वरूपज्ञान असू दे, जाणणारा जाणता कोण आत्माच आहे ना? तो आत्मा आहे म्हणून पदार्थाचे ज्ञान - जाणीव किंवा पदार्थाचे ज्ञान मावळून स्वरूपाचे ज्ञान - जाणीव. ***(‘स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनी असलेपणे। विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आत्मा आहे म्हणून प्रपंच किंवा परमार्थ होऊ शकतो. आत्मा नसेल तर प्रपंचही नाही अथवा परमार्थही नाही. म्हणून ज्याला जाणीव होते असा हृदयस्थ आत्माराम हाच समर्थ. त्याला जे जाणत नाहीत ते नेणते. त्या नेणत्याचे आयुष्य व्यर्थ. ***(‘प्रपंच अथवा परमार्थ। जाणता तोचि समर्थ। नेणता जाणिजे व्यर्थ। निःकारण।।’, ‘जाणता येक अंतरात्मा। त्याचा काय सांगावा महिमा। विद्याकळागुणसीमा। कोणे करावी।।’ - समर्थ)*** ज्याला ज्ञान (जाणीव) होते असा जाणता ज्ञानी अंतरात्मा सर्वांच्या ठिकाणी सारखेपणानं भरून राहिला आहे. त्याच्या प्रकाशाने बुद्धीला ज्ञान होते. त्याचे महत्त्व कळण्यासाठी, आत्म्याला जाणण्यासाठी ही बुद्धी थोकडी आहे. बुद्धीला आत्म्याचे ज्ञान होत नाही. ज्ञानाने आत्मा सिद्ध होत नाही तर आत्म्याने ज्ञान सिद्ध होते. ‘आत्मा हा प्रयोगी असून तो प्रयोगाने सिद्ध होणारा नाही’ हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. ***(‘ज्ञानी येक अंतरात्मा। सर्वांमध्ये सर्वात्मा। त्याचा कळावया महिमा। बुद्धी कैची।।’, ‘मन बुद्धी अगोचर।’ - समर्थ)*** जो या हृदयस्थ रामाला - आत्म्याला - भगात राहणाऱ्या भगवंताला जाणतो व आत्मरूप होतो तोच खरा ज्ञानी जाणता समर्थ संत. ***(‘जो जाणेल भगवंत। तया नाव बोलिजे संत। जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी।।’ - समर्थ)*** आत्म्याला कोण महात्मा जाणतो? ज्याच्या संसाराच्या गोष्टी सुटल्या आहेत, जो संसारापासून निराळा - अलिप्त झाला आहे, जो जन्ममरणाचे पैल गेलेला आहे, तोच आत्मा जाणू शकतो. ***(‘आत्माची कळला नाही जपतप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।’ - श्रीदासराममहाराज)*** संसार म्हणजे आपण समजतो तो बायकोबरोबरचा संसार नव्हे. आत्मा हा वासनेमुळे, जाणीवेमुळे, कल्पनेमुळे संसारी होतो. ***(‘जे क्षेत्र क्षेत्रज्ञयोगे। होईजे येणे जगे। आत्मा गुणसंगे। संसारीया।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जो वासनारहित, जाणीवरहित, कल्पनारहित, वृत्तीरहित जाणता होतो, तो जाणता ज्ञानी संत होय. असा जो जाणता, त्याला सत्य आत्म्याचे ज्ञान होऊन - आत्मा सोडून बाकी सारे खोटे आहे हे कळते. ***(‘जाणता तो भला। खरे खोटे कळे ज्याला।।’ - श्रीमामामहाराज)*** सत्य आत्म्याचे अखंड ज्ञानाने - जाणीवेने - जाणीवेचा ग्रास होतो. तो जाणीवरहित जाणता होतो. परब्रह्मरूप होतो. ***(‘जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।’ - समर्थ, ‘जे ध्यानेवीण ध्याइजे। जे चिंतिणेवीण चिंतिजे। जे जाणणेवीण जाणीजे। ते परब्रह्म गा।।’ - संत मुकुंदराज)*** अशा जाणत्या ज्ञानी माणसाचा अनुग्रह घ्यावा. ***(‘याकारणे ज्ञाता पाहावा। त्याचा अनुग्रह घ्यावा। सारासार विचारे जीवा। मोक्ष प्राप्त।।’,‘जनी जाणता पाय त्याचे धरावे।।’ - समर्थ, ‘जाणत्यासी जो शरण जाईना। सौख्य तोवरी नाही रे मना।।’, ‘जाणत्याचा संग धरा। उतराल पैलतीरा।।’- श्रीमामामहाराज)*** असे जाणून जे पंथाचे आक्रमण करतात ते कृतार्थ संत होतात. ***(‘जाणूनी जे जन धरतील पंथ। ते ते झाले तवपदी संथ।।’ - श्रीचिमडमहाराज, ‘म्हणौनी जाणतेनी गुरू भजिजे। तेणे कृतकार्य होईजे। जैसे मूळसिंचनी सहजे। शाखा पल्लव संतोषती।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# वेग

अंत:करणात काम आहे म्हणून श्वसनाचे काम - श्वसनाची धावाधाव. जेवढा अंतरी काम जास्त, तेवढी श्वसनाची धावाधाव - वेग जास्त. जेवढा श्वसनाचा वेग जास्त तेवढा एका श्वासाला लागणारा वेळ कमी, अर्थात आयुष्य कमी. (श्वास आणि उच्छ्वास यांना लागणाऱ्या वेळेला आयुष्य म्हणतात.) कामातील लक्ष, गतीकडे देऊन श्वसनाच्या वेगावर जर नियंत्रण ठेवता आले तर वेगात मनामध्ये पालट होतो. मनाची चंचळता कमी होते. हेतुवीण (निष्काम) सत्क्रिया हा निजधर्म जर आचरला तर कर्मफळाची आशा न धरल्याने कुकर्माची संगत होत नाही. साहजिकच संसारबंधन नाहीसे होते. ***(‘पतित पावना जानकी जीवना। वेगी माझ्या मना पालटावे।।’ - समर्थ, ‘आपुली आपण करा सोडवण। संसारबंधन तोडा वेगी।।’, ‘परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी। हे सत्क्रियाची आचरावी। हेतूवीण।।’, ‘हा निजधर्म जै सांडे। आणि कुकर्मी रती घडे। तैचि बंधू पडे। संसारीकू।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** कामक्रोधरहीत अवस्था म्हणजेच संताना अपेक्षित भजन किंवा नामस्मरण आहे. दिननिशी होणाऱ्या षड्विकारात्मक आयासाने-सायासाने - प्रपंच साधतो अर्थात भजन, नामस्मरण हा परमार्थ साधत नाही. श्वासोच्छ्वासाचे वेगाचे नियंत्रणाने श्वास व उच्छ्वास यांचे दरम्यान जीवनात अनुभवाला येणारी कामक्रोधरहित अवस्था हे भजन, नामस्मरण जीवाचा उद्धार करणारी आहे. ***(‘म्हणोनिया नाम उच्चारावे वेगी। जव देह उगी चालतसे।।’ - श्रीमामामहाराज, ‘वेगी होई सावधान। करी देवाचे भजन।।’ - समर्थ, ‘एकतत्व हरी असे पै सर्वत्र। ऐसे सर्व शास्त्र बोलियेले। हरीनामे उद्धरे हरीनामे उद्धरे। वेगी हरी त्वरे उच्चारी जो।।’, ‘नामाचेनी बळे तरिजे संसार। आणिक विचार करू नको।। नाम जपा वेगी म्हणा हरी हरी। प्रपंच बोहरी आपोआप।।’ - श्रीनिवृत्तीनाथमहाराज, ‘माधव श्रीहरी कृष्ण नरहरी। वेगी हा उच्चारी लवलाही।।’ - श्रीनामदेवमहाराज)*** वेगावरील नियंत्रणाने मनोवृत्तीचा निरोध साधल्याने केवलकुंभक साधतो व जन्ममरणरहित अवस्थेत गुरुपदाची प्राप्ती होते. खऱ्या परमार्थाची प्राप्ती होते. ***(‘दास म्हणे केल्या मनावरी मात। खरा परमार्थ दूर नसे।।’ - श्रीदासराममहाराज, ‘वेगे व्हावे सावधान गुरुपाय जोडा। सारासार करूनी विचार। मग करा कारभार। प्रपंचाचा लोभ फार। हळूहळू सोडा।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।।’ - श्रीसंत मुकुंदराज)*** वेगामध्ये जर नामाची प्राप्ती झाली तर वेगात देव प्रसन्न होतो. ***(‘वेगी आणावा तो हरी। मज दिनाते उद्धरी।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘म्हणोनि वेगी प्रसन्न होई देवराया। संहरी संहरी आपुली माया। काढी माते महाभया। पासोनिया।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून वेग आवरणेसाठी संसारात - संसरणात साधन साधले पाहिजे. ***(‘गोविंद म्हणे वेग चाललासे नाही। साधनी या राही संसारात।।’ - श्रीमामामहाराज)*** या देहाचा काही भरवसा नाही. कधी मरण येईल हे सांगता येत नाही. म्हणून देहात आयुष्य आहे तोवर आयुष्य साधनीभूत करून सच्चिदानंद व्हावे लागेल. म्हणून आता साधन साधण्याची त्वरा केली पाहिजे. ***(‘तरी झडझडोनी वहिला निघ। इये भक्तीचिये वाटे लाग। जेणे पावसी अव्यंग। निजधाम माझे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘येच क्षणी मरोनी जासी। तरी रघुनाथी अंतरलासी। माझे माझे म्हणतोसी। म्हणोनिया।।’, ‘नाही देहाचा भरवसा। केव्हा सरेल वयसा। प्रसंग घडेल कैसा। कोण जाणे।।’ - समर्थ)***

✻✻

# संतशाळा

व्यावहारिक शाळेत व्यावहारिक त्रिपुटीतील वृत्तीसहित बदलणारे विपरीत पोटभरू भ्रामक पदार्थज्ञान प्राप्त होते. तर संतशाळेत पारमार्थिक, त्रिपुटीवेगळे, वृत्तीरहित, न बदलणारे अर्थात संशयरहित सत्य आत्मज्ञान प्राप्त होते. ***('संतशाळेमाजी जाई। सत्यज्ञान हाती येई।।' - श्रीमामामहाराज केळकर, 'येवं पोट भरावयाची विद्या। तयेसी म्हणो नये सद्विद्या। सर्वव्यापक वस्तु सद्या। पाविजे ते ज्ञान।।' - समर्थ)*** व्यावहारिक ज्ञानाने अहंकार वाढतो अर्थात अपेक्षित विनयशीलता प्राप्त होत नाही. तर आत्मज्ञानाने अहंकार जातो व जीव विनयसंपन्न होतो. व्यावहारिक ज्ञानाने अर्थप्राप्ती होते पण परमार्थप्राप्ती, मोक्षप्राप्ती होत नाही. तर सत्य आत्मज्ञानाने अर्थप्राप्ती होत नाही पण परमार्थप्राप्ती, मोक्षप्राप्ती होते. ***('ग्रंथ वाचिले ज्ञान मिळवले अभिमानाने फुगले रे। सद्‌गुरुवाचूनी गूज कळेना ब्रह्मसुखाला मुकले रे।।'-संतवचन, 'सा विद्या विमुक्तये', 'विद्या विनयेन शोभते', 'ज्ञानात एवतु कैवल्यम्' - संस्कृतवचने, 'आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षची पावणे।।' - समर्थ, 'सत्यज्ञान येता हाती। मग जीवा मोक्ष प्राप्ती।।' श्रीमामामहाराज केळकर)*** व्यावहारिक शाळेत अंकांची बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार, वर्णाक्षरे शिकवली जातात. पारमार्थिक शाळेत हे सारे शिकवले जाते, पण त्याचे स्वरूप वेगळे आहे. भागल्याना विसावा प्राप्त होणे हा भागाकार, गुणावर प्रेम करून गुणाकार होणे हा गुणाकार, जे अविनाशी आहे ते गोळा करणे ही बेरीज तर जे विनाशी आहे त्याची आशा सोडणे ही वजाबाकी. अर्थात सारे बीजगणित. ज्या अक्षरात आत्मा अवतीर्ण होतो अशी अव्यक्त अविनाशी चैतन्याची अक्षरे येथे शिकविली जातात. ***('भागल्याचा तू विसावा।' -श्रीतुकाराम महाराज, 'मनी लोचनी श्रीहरी तोचि पाहे। जनी जाणता भक्त होऊनि राहे। गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।'- श्रीसमर्थ, 'अविनाशाचा गोळा रे। पुढे करोनिया खेळा रे।।' -श्रीचिमडमहाराज, 'म्हणे खेचर विसा झालासे पिसा। या दृश्याची आशा सांडी नाम्या।।' -संत विसोबा खेचर, 'ते अक्षर जी अव्यक्त। निर्देश देशरहित। सोहं भावे उपासीत। ज्ञानीये जे ।।', 'आणि येर ते ही पांडवा। जे आरुढोनी सोहंभावा। झोंबती निरवयवा। अक्षरासी।।' 'साचची बोलाचे नव्हे हे शास्त्र। पै संसारु जिणते हे शस्त्र। आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरीये।।' -श्रीज्ञानेश्वरमहाराज 'जोडिली अक्षरे। नव्हती बुद्धीची उत्तरे।।' श्रीतुकाराम महाराज, 'अक्षरे चैतन्याची गीता गीत अनुवाद। अर्जुनाचे कर्णपुटी तत्व निनादे गोविंद।।'-श्रीदासराममहाराज)*** ही ब्रह्मविद्या संत कीर्तनाचे, प्रवचनाचे माध्यमातून लोकांना शिकवितात. संताचे प्रवचन-कीर्तन म्हणजे संतांची संतशाळाच आहे. श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचेकडे श्रावण किंवा पौषात साधक नेमास येत. संतांच्या सहवासात साधकांच्या वृत्ती सहजी संथ होत. ती श्रीभाऊसाहेबमहाराजांची ब्रह्मविद्या देणारी ब्रह्मशाळाच होती. महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकुळात जन्माला येऊन देखील अखंड नारायणस्मरणाने दैत्यपणा विसरून नारायणच झाला. तो या संतशाळेतील अभ्यासानेच. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'अगा दैत्यांचिया कुळी। प्रल्हादू तो मी न्याहाळी। म्हणोनि दैत्यभावादिमेळी। लिंपेचिना।'*** आमच्या सिटी हायस्कूलमध्ये माझे आजोबा गुरुवर्य श्रीबापूरावजी केळकर व गुरुवर्य तोरो यांसारखे आध्यात्मिक प्रवृत्तीचे शिक्षक असल्याने त्यावेळचे शाळेतील विद्यार्थी शाळेला पारमार्थिक शाळा म्हणत. ही गोष्ट संत न्यायमूर्ती राम केशव रानडे यांनी शाळेच्या त्रितपमहोत्सवाचे स्मरणिकेतील त्यांचे लेखात नमूद केली आहे. संतांचे शाळेत निर्हेतुक जीवन कसे जगायचे याचे वर्म सापडले तर तेथे मुद्दाम काही करायचे राहातच नाही. सारे काही अनायासे सहजच प्राप्त होते. आज श्रीशनैश्वर जयंती आहे. आमचे घरात पिढ्यान् पिढ्या शनीची उपासना सुरू आहे. आमचे देवघरात शनीची मूर्ती आहे. तिची नित्य पूजा भावपूर्वक केली जाते.

**

# नौबद श्रवणे

'आपले जीवन हे ध्वनीप्रकाशयुक्त आहे' असे श्रीदासराममहाराज सांगत. अर्थात आत सारखा चैतन्याचा नाद व प्रकाश आहे तोवरच जीवन आहे. आतला प्रकाश मावळला की सारा अंधारच. बाहेरून कितीही प्रकाश पाडा, अंधारी जाणार नाही. आतला चैतन्याचा ध्वनी बंद झाला की बाहेर कितीही ध्वनी करा काही उपयोग होणार नाही. आतला ध्वनी बंद झाला की पुढिलांनी ध्वनी करायचा इतकेच. आत हा चैतन्याचा ध्वनी, प्रकाश आहे म्हणून मनाचे अस्तित्वावर बाहेरचे नाद ऐकता येतात किंवा प्रकाशाने विश्व भासमान होते. आत चैतन्याचा ध्वनीप्रकाश आहे म्हणून जाणीवेत मनोलयाने कल्पनेचा निरास झाल्यावर विश्वाचा आभास मावळून जड प्रकाशावेगळा नवलप्रकाश प्रत्ययाला येतो. अर्थात विश्वाचा भास होणे किंवा विश्वाचा भास मावळून लोपलेले सत्यस्वरूप प्रगट होणे हे दोन्ही आत चैतन्याचा नादप्रकाश असेल तरच शक्य होते. प्रपंच अथवा परमार्थ देहात चैतन्याचा नादप्रकाश आहे तोवर साधता येतात. ***('स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनि असलेपणे। विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अर्थात महत्त्वाचा नाद किंवा प्रकाश आतलाच ना? पण आमचे लक्ष त्या नादाकडे किंवा प्रकाशाकडे नाही. आमचे लक्ष सारे बाहेर आहे. बाहेरच्या नादप्रकाशाचेच महत्त्व. बाहेरचा जो नाद आहे तो कोणीतरी कोणावर तरी संघात करून निर्माण करावा लागतो. म्हणजे कोणीतरी तो ऐकू शकतो. त्याला 'आहत' म्हणतात. आतला जो नाद आहे तो स्वयमेव आहे. तो चैतन्याचा ध्वनी आहे. तो संघाताशिवाय होणारा अनाहत नाद आहे. शरीरात होणारे इंद्रियांचे ध्वनी म्हणजे चैतन्याचा ध्वनी नव्हे, हे आपण लक्षात ठेवावे. बाहेरच्या नादाने किंवा प्रकाशाने जाणीव दुसऱ्याची-द्वैताची होते. तर आतल्या नादप्रकाशाने जाणीव अद्वैताची होते. आम्ही बाहेरचे नादप्रकाश अनुभवत असल्याने जाणीव सतत दुसऱ्याची - द्वैताची होते व द्वैत माजते. संतमहात्मे सतत आत्मप्रकाश पाहात असल्याने सतत चैतन्याचा नाद अनुभवत असल्याने त्यांना अद्वैत सर्वगत चैतन्यच जाणवते. त्यांना उपाधीची जाणीव होत नाही. त्यामुळे त्यांना उपाधीची उपाधी कधी होत नाही. ***('या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्विकारिती।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मग संत जो आत्मप्रकाश पाहतात किंवा चैतन्याचा ध्वनी ऐकतात तो प्रकाश किंवा नाद बाहेरल्या नाद प्रकाशासारखाच असतो का? नाही, ते जर एकसारखे असते तर आतला नाद, प्रकाश अनुभवण्याची गरज भासली नसती. आतला जो नाद किंवा प्रकाश आहे तो या शरीराच्या कानांना किंवा डोळ्यांना अनुभवता येत नाही. किंबहुना हे देहाचे डोळे, कान झाकले म्हणजेच हा आतला नाद प्रकाश अनुभवता येतो. ***('डोळे झाकोनिया पाहे। गोपाळ पुढे उभा राहे।' संतवचन. 'डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही। बाप सद्गुरू कृपा करील हा लाभ घडे देही।' श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** मग आम्ही डोळे मिटल्यावर किंवा कान झाकल्यावर म्हणजे झोपेत किंवा कानात घट्ट बुचे घातल्यावर जे कल्पनेने पाहतो किंवा ऐकतो तोच का तुमचा आतला नाद किंवा प्रकाश? नाही ते नाद, प्रकाश काल्पनिक आहेत. कल्पना सरल्यावर जो श्रुत होतो तो अनाहत नाद व जो दिसतो तो डोळ्याला दिसणाऱ्या प्रकाशापेक्षा वेगळा नवल प्रकाश होय. आपल्या देहात काही बघण्यासारखे बघणारे आहे, ऐकण्यासारखे ऐकणारे आहे. याची जाणीव आम्हाला नाही. ती जाणीव भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराजांनी आम्हास श्रीगुरुलिंगगीतेत करून दिली आहे. ते म्हणतात, ***'येनु इल्लदानु याक निन्न नीनु। सत्य चिदानंदनु आत्मारामा। बंदिल्ला जीवात्मा नोडगे वळग। नाद बिंदू तोरिसी तम्मा।।', 'समाधान शांतीवू हरिरूप कायन्नू। नादबिंदकलाज्योती चिदमूलतत्वन्नू।'***

**

# नौबद श्रवणे

बाहेरच्या नादप्रकाशाने आपल्यापेक्षा वेगळ्या गोष्टींची जाणीव होते, द्वैताची जाणीव होते व त्या वेगळ्या गोष्टी आपणाला हव्यात अशी इच्छा निर्माण होते. जोवर हे द्वैत जाणवते आहे तोवर इच्छा (काम) संपत नाही. तोवर इंद्रियांची वखवख थांबत नाही. इच्छा यदाकदाचित पुरी झाली नाही की क्रोधही अटळ आहे. आपण बाहेरचे द्वैत दाखविणारे आकार कितीही पहिले तरी या डोळ्याची भूक काही भागत नाही. आपण बाहेरचे कितीही कर्णमधुर संगीत ऐकले तरी कान तृप्त होत नाहीत. याउलट जो आतला नाद अनुभवतो त्याला ऐकायचे काही शिल्लक उरत नाही. जो आतला प्रकाश पाहतो त्याला पाहण्याचे काही शिल्लक उरत नाही. डोळे, कान तृप्त होतात. इंद्रियांची वखवख थांबते. इंद्रिये मन समाधान पावतात. ***('तरी जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'समाधान त्यांची इंद्रिये सकळ। जया तो गोपाळ ध्यानी मनी।।' श्रीतुकाराममहाराज, 'नौबद बाजत है हरीनामकी। अतीमंदगती भाई सकल कामकी।।'-संतवचन)*** हा जो आतला चैतन्याचा नाद आहे किंवा प्रकाश आहे, तो शरीराच्या कान, डोळ्यांना अनुभवता येत नाही. मग हा अनुभव घेतो कोण? हा चैतन्याचा नाद प्रकाश चैतन्यच अनुभवते. म्हणून आत्म्याला 'स्वसंवेद्य' म्हणतात. ***('ओम नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जयजय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।', 'हे शब्देवीण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे। बोलाआदी झोंबिजे। प्रमेयासी।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अस्थीचा देही मासाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा। तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मूर्ख।।' श्रीसमर्थ, 'दृष्टीचा देखणा दृष्टी अगोचर। दृष्टीसी गोचर कैसा होये।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्यांनी हे आतले नादप्रकाश अनुभवले आहेत त्यांना हे बाहेरचे नाद प्रकाश अनुभवाला येतात की नाही? नाही, त्यांना भिन्न विश्वात एका चैतन्याचेच ज्ञान होते. ते सारी भूतसृष्टी आत्मवत पाहतात. चैतन्याचे वारेच त्यांचे नयनात भरते. चैतन्याला फक्त चैतन्याची जाणीव होते. ***('म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान। जैसे अवयव तरी आनआन। परी एकेची देहीचे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाचि नाही।।' श्रीसमर्थ)*** संतांचे सारे व्यवहार एका चैतन्याशी होतात. ते आहार घेतात पण अन्न हे परब्रह्मरूप विठ्ठलाचे रूपात पाहतात. ***'देव खाते देव पिते'*** ही संत जनाबाईची अनुभूती किंवा 'तुका म्हणे आहार झाला हा विठ्ठल आम्हासी।' ही संत तुकाराममहाराजांची अनुभूती काय दर्शविते? ब्रह्म होऊन ब्रह्माशीच सारे व्यवहार. व्यवहारातील बहिरंगातील नाद प्रकाश व परमार्थातील अंतरंगातील नाद प्रकाश यात काय फरक आहे हे श्रीदासराममहाराज असे सांगत, 'व्यवहारात अनुभवाला येताना आधी प्रकाश व नंतर ध्वनी अनुभवाला येतो. जेव्हा वीज होते तेव्हा प्रकाशाचा वेग ध्वनीच्या वेगापेक्षा जास्ती असल्याने आधी प्रकाश दिसतो व नंतर वीजेचा गडगडाट अनुभवाला येतो. याउलट परमार्थात अनुभव घेताना आधी चैतन्याचा ध्वनी ऐकायला येतो व नंतर प्रकाशाचे अनुभव येतात. नामाचा बिंदू अनुभवाला आला की मग तो अंतरबाहेर प्रकाशू लागतो. ***('हृदयात झाली वायूची घासणी कंठात उदेला ओंकार वन्ही। नामाचा बिंदू घडला गे माये अंतर बाहेर प्रकाशे स्वये।।' श्रीदासराममहाराज)***

✲✲

# नौबद श्रवणे

जोवर देहात चैतन्याच्या वाऱ्याचा नादप्रकाश आहे, तोवर या देहाचा विश्वास आहे, तोवर बाहेरचे नाद व प्रकाश यांचा अनुभव इंद्रियामार्फत घेता येतो व जोवर आम्ही बाहेरचे नादप्रकाश अनुभवतो आहोत, तोवर आतले नादप्रकाश अनुभवता येत नाहीत. जोवर देहाच्या दृष्टीने 'प्रत्यक्ष' असणाऱ्या मायेत आमचे लक्ष आहे तोवर अंतरी असणारी अलक्ष आत्मवस्तू अलक्षच राहणार. प्रत्यक्ष माया अलक्ष झाली तर अंतरी असणारी अलक्ष वस्तू लक्ष होणार. ***('ते आघवेचि दिसणे। जयाते कां न देखणे। विश्व भासतसे जेणे। लपालेनी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तु लक्षी अंतरी। आत्मस्थितीची धारणा धरी। या नांव साधक।।' - समर्थ)*** माया ज्या नवद्वारातून लक्ष्य होते ती नवद्वारे बंद झाली तर अलक्ष वस्तू ज्या द्वारातून लक्ष होते ते दहावे द्वार उघडणार. साधनाभ्यासाने स: अहं अहं स: या महान गुरुपादुकांचे ठिकाणी - प्राणापानाचे ठिकाणी - विषयातून मन निघून जर जडले तर नवद्वारांचा निरोध होऊन बाह्य मनाचे उन्मन होते, त्रिगुणांचा निरास होऊन सहस्रदळी त्रिकूटस्थानी, दशमद्वारी हे नादश्रवण होते. हे नादश्रवण दहा प्रकारांनी होते. त्याचे वर्णन हंसउपनिषद असे करते, ***'चिणिती प्रथम: चिंचिणिती द्वितीय: घंटानादस्तृतीय: शंखनादश्चतुर्थ: पंचमस्तन्मीनद: षष्ठस्तालनाद: सप्तमोवेणुनाद: अष्टमोमृदंगनाद: नवमोभेरीनाद: दशमो मेघनाद: नवम् परित्यज्य: दशमेवाभ्यसेत:'*** आमचे श्रीचिमडचे महाराज या विविध नादाचा उल्लेख पंचपदीत असा करतात, ***'घंटा किंकिणीनादं सिंहं शंखं नादं भेर्यादीक महानादं अनुभवमनलुब्धं।', 'अनुहत नगारा हमेशा बजावे। गगन हालमो गैबज्योती लगावे दिया दस्तपंजा किया मेहेरबानी। कहे सिद्धलिंगा गुरुकी निशानी।।'.*** निजानंदमहाराज या विविध नादांचे वर्णन असे करतात, ***'झांजा झेंगट वाजे अवघड। नाद भडाभड होती कडाकड। अनुहत त्यांचे नाव गे। उलटपलटकर त्रिकुटशिखरपर। अमृत झरझर वाहे निरंतर। योगबळाने प्यावे गे। निजानंदे नारायण श्री। रंगी रंगुनी जावे गे।।'*** श्रीब्रह्मचैतन्यमहाराज या अनुहतनादाचे वर्णन असे करतात, ***'ब्रह्मक्षेत्र हे शरीर। त्यात वसे सर्वेश्वर।। तीर्थ प्रयाग काशी। गंगा वाहे नाभीपाशी।। अनुहतात वसे। सीतेसहित राम दिसे।। सहस्रदळी रहिवास। परब्रह्म राहे खास।। दास म्हणे सोडी मीपणा। ओळखून घेई आपुल्या खुणा।।'.*** संत जनाबाई या अनुहत नादाबद्दल असे सांगतात, ***'अनुहात घंटा श्रवणी। ऐकूनी विस्मित झाली जनी।'*** तर श्रीनामदेवमहाराज या अनुहताचे महत्त्व असे सांगतात, ***'सहस्रदळस्थानी अनुहात ध्वनी उठी। श्रवण करिता पातके पळाली कपाटी।।'.*** साधनाभ्यासाने नि:श्वासाला काही प्रमाण आल्यावर हे चैतन्याचे नाद श्रूत होतात. चार पळ योग्य तऱ्हेने साधनाभ्यास झाला असता हे नि:श्वासाला प्रमाण येते व दशवीध नादांचे श्रवण होते. ***('नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप।।', 'एकची अंगूळ वाहता नि:श्वास। होय नादघोष सुस्वरेसी।।' - श्रीदासराममहाराज, 'जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।।' श्रीमामामहाराज)*** इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर - बारा सोळा जणी मिळून आल्यावर-हा अनुहाताचा गलगा, रामनामाचा ध्वनी श्रवण होतो. ***('इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।' श्रीमामामहाराज, 'रामनाम ध्वनी उमटे। तेथे लक्ष लावी नेटे।।' श्रीबांदकरमहाराज, 'बारा सोळा जणी गडे गं बारा सोळा जणी। मिळोन येती गलगा करिती मशी गेल्या घेऊनी।।' संतवचन)*** हा अनुहताचा ध्वनी कोठे व कसा उदित होतो याचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, ***'सकार हकार काढूनी टाकिला। ॐ कार उरला शब्दघोष।।' ,'प्रणव उदेला कोठून। सांगा सांगा ते ठिकाण। परेपैल हरिवाणी। झाला उद्भव तेथोनी।।'.***

**

# बिंदू उमगणे

नाद, बिंदू, कला, ज्योती हे नामाचे - चैतन्याचे प्रकर्ष आहेत. साधना करताना सर्वसाधारणतः प्रथमतः नाद व नंतर बिंदू, कला, ज्योती हे प्रकाशाचे अनुभव येतात. चैतन्याचा नाद हे चैतन्य प्रतीत करणारे एक नाम असून बिंदू, कला, ज्योती हे चैतन्याचे रूप प्रतीत करतात. वस्तुतः निश्चळ चैतन्य हे नामरूपातीत आहे. निश्चळाच्या ठिकाणी चंचळत्व निर्माण झाल्याने, ते नामरूपाने अनुभवाला येऊ लागते. म्हणून त्याला सगुण म्हणतात. ***('चंचळपणे विकारले। सगुण ऐसे बोलिले। येर ते निर्गूण उरले। गुणातीत॥' 'निश्चळी चंचळ चेतले। म्हणोनी चैतन्य बोलिले। गुणसमानत्वे जाले। गुणसाम्य ऐसे॥' समर्थ, 'आला नावारूपा। तुका म्हणे झाला सोपा॥' श्रीतुकाराममहाराज, 'भावाचे मथिले निर्गूण संचले। ते हे उभे ठेले विटेवरी॥' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** नादानुसंधानाने नादमय होऊन नादश्रवणी तदाकारता साधली असता हे चैतन्याचे वारे डोळ्यात भरते. नादाचाच बिंदू होऊन तो प्रगटपणे साधकास अंतर्बाह्य दृष्टीसमोर दिसू लागतो. हा चैतन्याचा प्रकाश हा बाह्यप्रकाशापेक्षा कसा वेगळा आहे हे श्रीसमर्थ सप्तसमासीत असे सांगतात, ***'अंतरी जे जे कळत जाते। त्यास प्रकाश ऐसे म्हणिजेते। उजेडासारिखे वाटते। परी ते नव्हे॥ उजेडास म्हणावे पदार्थप्रकाश। अंतरात्म्याचा ज्ञानप्रकाश। दोहीमध्ये कोण विशेष। मनास आणावे॥ अंधार अज्ञान उजेड ज्ञान। ऐसे आहे परिछिन्न। आत्मप्रकाशे समाधान। बहुतांचे होते॥ नानाप्रकाश दृष्टीस दिसे। आत्मप्रकाश मनास भासे। आत्म्याचा अंश मानस असे। म्हणोनिया॥ अंतरी होत ज्ञानस्फूर्ती। तेथे दिसत नाही ज्योती। परंतु यास जगज्ज्योती। म्हणिजेते॥ अंतरी आहे प्रकाश। तेणेची दिसती पदार्थप्रकाश। नेत्री भरून आत्मअंश। सकळ पाहे॥ बाह्य प्रकाश अंधार नासी। अंतरप्रकाश अज्ञान नासी। विवेके पाहाता दोहोसी। महाअंतर॥ दीपप्रकाश वायोने जातो। आत्मप्रकाश वायोने तगतो। दोहोतील विचार तो। विवेके ओळखावा॥'*** हा जो चराचराचे मूळ जे ज्ञान आहे त्या चैतन्याचा प्रकाश आहे तो अज्ञान दूर करतो म्हणजे काय करतो? तो मनातील खोट्या कल्पनांचा नाश करतो. श्रीसमर्थ सांगतात, ***'जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।', 'तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान॥'*** आपण वेगळेपणाने वेगळे पाहतो हेच अज्ञान आहे. हे अज्ञान कल्पनेच्या निरासाने नाहीसे होते. साहजिकच दुसऱ्याबद्दल असणारा मोह नाहीसा होतो. ***(तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरीटी। येर भिन्नपण ते उठी। अज्ञानास्तव॥' 'ऐसे ज्ञानप्रकाशे पाहेल। तै मोहांधकारु जाईल। जै गुरुकृपा होईल। पार्था गा॥' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या ठिकाणी नाद ही चैतन्याचाच व प्रकाशही चैतन्याचाच असल्याने नामरूपात मेळ असतो. नाम आणि रूप भिन्न असत नाहीत. नादाचा - नामाचा - बिंदू होणे म्हणजे नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येणे होय. मन आहे तोवर चैतन्याचा अनुभव नाही असे आपण म्हणतो आणि इकडे मनाला अनुभवसुख दाखवावे म्हणतो हा काय प्रकार आहे. दृश्याशी तादात्म्य असणाऱ्या मनाला चैतन्याचे अनुभव येत नाहीत. विषयातून मन निघून राहणाऱ्या संकल्पविकल्परहित मनाला म्हणजेच मनातील जडाचे अंश दूर होऊन राहणाऱ्या शुद्ध चैतन्याच्या सर्वसाक्षी मनाला हे महाकारणदेहात तुर्यावस्थेत हे अनुभव प्राप्त होतात. जोवर महाकारणदेहात वेगळेपणाने चैतन्याचे अनुभव प्राप्त होत आहेत तोवर अद्वैत साधलेले नाही.

**

# बिंदू उमगणे

नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती आली. दशमद्वार ओलांडल्यावर आकाशरूप महाकारणदेहात तारक बिंदू स्वरूपाचा अनुभव आला की मन वृत्तीसहीत मुरते. सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते. ('सर्व' म्हणजे ब्रह्म. सर्व ब्रह्म जाणणारे सर्वसाक्षी मन) तुर्येतील वेगळेपणाने होणाऱ्या ज्ञानाचे विज्ञान होते. ज्ञानाचे विज्ञान होते म्हणजे ज्ञानाची 'जाणले' ही जाणीव राहात नाही. वृत्तीरहित ज्ञान होते. चौथ्या महाकारणदेहाचा विदेह होतो. संपूर्ण मनोलयाने कर्म करून नैष्कर्म्य साधते. कर्माचा खरा कर्ता ओळखला जातो. आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो. जोवर नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येत नाही तोवर मन संपूर्ण मुरत नाही, वाचेचा गोंधळ संपत नाही. जोवर नामात वाचेचा गोंधळ आहे तोवर नामरूपाला मेळ बसलेला नाही हे ओळखावे. संपूर्ण मनोलयाने वाचेचा गोंधळ संपला की नामरूपाला मेळ बसतो. मनवाचातीत स्वरूपाचा अनुभव येतो. हा नामरूपाचा मेळ बसणेसाठी गुरूंनी सांगितलेले आयुष्याचे साधन - श्वासाचे साधन - सतत साधले पाहिजे. ***('सतत नाम गाई गुरुचे सतत नाम गाई। रवी शशी दृष्टी सम करोनी नासिकाग्री नेई। अग्रावरी पाहा नीलबिंदू तो तल्लीनची होई। गोपालनाथ भरोनी उरला अणूरेणू ठायी।।' - श्रीगोपालनाथ, 'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।' श्रीतुकाराममहाराज)*** योग्य तऱ्हेने चार पळे साधन साधिले तर चैतन्याचे दशविध नाद श्रुत होतात. तेच हे साधन ४ घटकांपर्यंत साधले तर तारकबिंदूचा अनुभव येतो. साधनात हृदयात वायूची घासणी होऊन नामाचा बिंदू घडणे म्हणजे नाम रूपाला मेळ बसणे, म्हणजे श्रवणात पेरलेले नयनी उगवणे होय. ***('जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद। जरी चार घटका साधेल पवन। तारकबिंदू जाण दिसतसे।।' - श्रीमामामहाराज, 'हृदयात झाली वायूची घासणी। कंठात उदेला ओंकार वन्ही। नामाचा बिंदू घडला गे माये। अंतरबाहेर प्रकाशे स्वये।।' -श्रीदासराममहाराज)*** हा नादश्रवणापासून प्रकाशदर्शनापर्यंतचा प्रवास ४ बोटांचा आहे (कान व डोळे यामध्ये ४ बोटे अंतर आहे.) खरा पण तो चार देहांचा निरास करणारा आहे. या श्रवणापासून नयनापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन संतमहात्म्यांनी केले आहे ते असे ***'श्रवणी पेरिले नयनी उगवले नाना रूपे जसे। जिकडे पाहे तिकडे अवघे ब्रह्मची भरले असे।।', 'श्रवणात पेरणी केली पेरणी केली। ती नयन उजेडा आली। मन पवन चित्त एक करून चित्त एक करून। मशी वेडची गेले भरून।।'*** हा जो तारक बिंदू आहे, त्याचे तेज अपरंपार आहे. हजारो सूर्य जरी एकदम उगवले तरी त्याच्या तेजाची बरोबरी होणार नाही. पण तो प्रकाश चंद्रासारखा शीतल आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज या तेजाचे वर्णन असे करतात, ***'तैसे ते दिव्यसूर्य सहस्रवरी। जरी उदयजती एकेची अवसरी। तरी तया तेजाची थोरी। उपमू नये।।'*** या बिंदूच्या साक्षात्काराचे महत्त्व भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस असे सांगतात, ***'पहा राम हा बिंदुरूपेची येतो। पुढे पाहता रूप विस्तार घेतो। सदा वाटते हा पुढेची असावा। मना राम तो अंतरी साठवावा।।', 'तुझ्या नेत्रपाती लवे नीळबिंदू। कसा दिसतो साधका पूर्ण इंदू। बहु लाघवी चंद्रमा हा बघावा। मना राम तो अंतरी साठवावा।।', 'दिसे तारकू तो चतुर्वक्त्र जाणा। महाविष्णू हा दंडरूपे सुजाणा। सदाशिव तो बिंदुरूपे पहावा। मना राम तो अंतरी साठवावा।।'*** श्रीतुकाराममहाराज या बिंदूचे वर्णन असे करतात, ***'फार काय ते बोलावे। मूळ ह्यातची शोधावे।। मसुरे येवढे बिंदुले। तेणे त्रिभुवन कोंदाटले।। हरीहरांच्या मूर्ती। बिंदुल्यात येती जाती।। तुका म्हणे हेचि मूळ। रूप पहावे निर्मळ।।', 'तिळाएवढे बांधुनी घर। आत राहे विश्वंभर।। तिळाएवढे बिंदुले। तेणे त्रिभुवन कोंदाटले।। हरीहराचिया मूर्ती। बिंदुल्यात येती जाती।। तुका म्हणे हे बिंदुले। तेणे त्रिभुवन कोंदाटले।।'***

**

# सुत्रधार

हे सारे विश्व एका सूत्रामध्ये ओवलेले आहे. सूत्र सर्वांच्या अंतर्यामी एकच आहे. ईश्वर ते सूत्र धरून हा विश्वाचा खेळ खेळतो आहे. ***('मत: परतरम् न अन्यत् किंचित अस्त धनंजय:। मयि सर्वम् इदम् प्रोतम् सूत्रे मणिगणाः इव।।', 'ईश्वरः सर्वभूता नाम् हृद्देशे अर्जुन तिष्ठति। भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारूढाणि मायया।' - श्रीभगवद्‌गीता)*** काय करायचे व काय करायचे नाही, हे सारे तो ठरवितो व त्याप्रमाणे तो सारी सूत्रे हालवितो. आम्ही ठरवितो मस्त पण तसे होईलच असे नाही. आमच्या मनात जे आले तेच त्याच्या मनात आले तर होईलही. पण ते आपले कर्तृत्व नव्हे. आपण जर कर्ता असू तर आपल्या इच्छेसारखे सारे व्हावयास हवे. तसे जर होत नसेल Man proposes and God disposes असाच जर अनुभव असेल तर कर्तृत्व आपलेकडे घेण्यात काय अर्थ आहे? तेच जर देवाच्या मनात आले तर ते कोणत्याही परिस्थितीत होतेच असा अनुभव आहे. म्हणून राम कर्ता आहे; सूत्रधार आहे हे आपण विवेकाने ओळखले पाहिजे. तरच यश, कीर्ती प्राप्त होऊन विवेकानंद प्राप्त होणार आहे. ***('करणे का न करणे। हे आघवे तोचि जाणे। विश्व चळतसे जेणे। परमात्मेनी।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मनात येते हत्ती घोडे पालखीत बैसावे। देवाजीच्या मनात याला पायी चालवावे।।', 'आले देवाजीच्या मना। तेथे कोणाचे चालेना।।' संतवचन, 'कर्ता आपण ऐसे म्हणावे। तरी आपले इच्छेसारिखे व्हावे। इच्छेसारिखे न होता मानावे। अवघेच वाव।।', 'मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तूं कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ती प्रताप।।', 'कर्त्यासी वोळखावे। यास विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदुःखी।।' श्रीसमर्थ)*** अहो तो चालवितो म्हणून हे शरीर चालते, तो चालवितो म्हणून सूर्य चालतो, तो हालवितो म्हणून जगाला हालविणाऱ्या प्राणाची (श्वासाची) हालचाल होते. आपण सारी माणसे कळसूत्री बाहुल्या आहोत. सूत्र जसे हालेल तशी हालचाल करायची. आपली अवस्था पतंगासारखी आहे. पतंगाची दोरी त्याच्या हातात आहे. त्याचे लक्ष पतंगावर आहे. पतंगाने दोरीकडे (सुत्राकडे) लक्ष देऊन कुठेही न अडकता विहार करायला हरकत नाही. पण दोरीकडे (सूत्राकडे) लक्ष न देता कुठे अडकलो की दोरी तुटलीच म्हणून समजा. म्हणून सूत्राकडे लक्ष देऊन कुठे न अडकणे महत्त्वाचे. ***('म्या बोलविल्या वेदू बोले। म्या चालविल्या सूर्यू चाले। म्या हालविल्या प्राणू हाले। जो जगाते चाळिता।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वावडी वरच्यावरी उडतसे अंबरी। हाती असे दोरी परी लक्ष तेथे।' संतवचन, 'बाहुली मनुष्ये केली। त्या अनेकरूपे दिधली। परी त्यांची सूत्रे सगळी। नाचविसी हाती धरोनी। हे प्रभो विभो अगाध तव किती करणी।' श्रीकोल्हटकर)*** विश्व हे नाटकाचे व्यासपीठ आहे. या नाटकामध्ये आपणा सर्वांची एक विशिष्ट भूमिका आहे. ईश्वर या नाटकाचा सूत्रधार आहे. आपण आपणाला दिलेली भूमिका नीट पार पाडली तर नाटक नीट वठणार. समजा आम्ही सर्वांनी आमच्या मनाला आवडते म्हणून राजाची भूमिका करायला चालू केली तर चालेल का? मग नाटक पडेल की! पण सूत्रधार तसे होऊन देईलच का? अर्थात सूत्रधार आमचे असले नाटक चालू देत नाही. तो आमचे प्रयत्न हाणून पाडतो व नाटक यशस्वी करतोच. नाटकामध्ये आपल्या मनाप्रमाणे काम करायचे असत नाही. तर सूत्रधाराने नेमून दिलेले काम करायचे असते. तिथे आपले मन बाजूला ठेवावे लागते. तसेच येथे या आयुष्याच्या नाटकात आपले मन आपण बाजूला ठेवले, काम क्रोध बाजूला ठेवले तर आपली भूमिका वठेल. मध्यवर्ती असणारे सूत्र धरले जाईल व सूत्राचे आधारे सूत्रधार सापडल्यावाचून राहणार नाही. ***(काम क्रोध सर्व कर्म दंडिले बळे। सूत्र धरोनी मध्यभागी वरी चालिले। निर्गुणाचा संग मला आजी जहाला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।। - संत मुक्ताबाई)***

**

# नमो नमो गुरुलिंग जंगमेशा

श्रीदासराममहाराजांचे शंकानिरसनार्थ श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे वचनाप्रमाणे भगवान सद्गुरु श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी देह ठेवल्यावर पन्नास-बावन्न वर्षांनी श्रीदासराममहाराजांसमोर प्रत्यक्ष प्रगट होऊन दृष्टीद्वारा, कर्णद्वारा तेजोनादे बोध केला. श्रीदासराममहाराज नि:संदेह निर्विकल्प झाले. श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज या साधूंचा बोध प्राप्त झाल्याने त्यांना 'नुरोनिया ठेला' ही अवस्था प्राप्त झाली. श्रीदासरामहाराज सांगतात, ***'नव्हताची ऐसा होऊनिया ठेलो। तुझा भक्त झालो एकाएकी।।'*** **साधन हे बोध होईतोपर्यंत साधावयाचे असते. बोध झाल्यावर, साध्य सिद्ध झाल्यावर साधनाची गरज राहात नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,** ***'जववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तवची यया साधना। भजावे लागे।।', 'तैसा आत्मसाक्षात्कारू। होईल देखोनि गोचरु। ऐसा साधन हतियेरु। हळूचि ठेवी।।', 'देखोनि ठाकिता ठावो। धावता थिरावे पावो। तैसा ब्रह्मसामीप्ये थावो। अभ्यासु सांडी।।'*** श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी पूर्ण बोध झाल्याने श्रीदासराममहाराजांचे साधन पूर्ण झाल्याचे श्रीगुरुलिंगगीतेत ७ नंबरचे पदात सांगितले आहे. याच पदात पुढे श्रीदासरामहाराजांनी जगाचा उद्धार करावा असे श्रीमहाराजांनी सुचविले आहे. श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज सांगतात ***'जगदानुद्धरणारौ माडय्या बेकू। साधनसिद्धी होगी पूर्णवु शेषैकू। गुरुलिंगजंगम बंदा संतोषयु नागी। सार्थक जन्मांतरदू ऐक्यवु हरी होगी।।'*** बोध प्राप्त झाल्यावर साधन करण्याची गरज राहात नाही. म्हणजे काय? त्यांचे अष्टौप्रहर साधन चालू होते. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थेत त्यांची नामस्मरणाची स्थिती - साधनाची स्थिती - आपली ब्रह्माची नित्यता असणारी सहजस्थिती - सांडली जात नाही. सिद्ध तो, जो संदेहरहित मीपणेवीण अहर्निशी साधन साधतो. ***('आणीक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोचि धन्य। समाधानी।।', 'संदेहरहित साधन। तेचि सिद्धाचे लक्षण। अंतर्बाह्य समाधान। चळेना ऐसे।।', 'जो सीधांचा ही सीध। ज्ञानवैराग्ये प्रसीध। सामर्थ्येसिंधु अगाध। कैलासराणा।।', 'तो सीध परी करी साधन। सर्वकाळ रामचिंतन। ध्यानधारणा अनुष्ठान। चुकोचि नेदी।।' ऐसे अपार माहांमती। जाले तरी साधन करिती। तेथे मानव ते किती। बापुडे किंकर।।' समर्थ)*** श्रीदासराममहाराज हे निर्विकल्पी कल्पनातीत, नि:संदेह वस्तूरूप, स्वरूपाकार सिद्ध झाले. श्रीमहाराजांनी आपले हृदयाच्या कप्प्यातील बोध श्रीदासरामहाराजांचे हृदयात ओतला व द्वैत न मोडता श्रीदासरामहाराजांना तात्काळ आपल्यासारखे केले. श्रीगुरुलिंगगीता हे श्रीमहाराजांचे सगुण रूप आहे असे मला वाटते. श्रीगुरुलिंगगीता ज्याला समजली, त्याला श्रीमहाराज समजले हे निश्चित. श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज व श्रीदासराममहाराज यांच्या भेटीत महाकारणदेहाच्या गगनी सिद्धानंदरूप प्रगट होत असे. या सिध्दानंदाने आत्मबोध व आत्मबोधाने सिद्धानंद श्रीदासराममहाराजांना प्राप्त होत असे. श्रीदासराममहाराजांना सिध्दानंदातून आत्मबोध प्रकट करणारी कानडी, इंग्रजी, आर्षसंस्कृत, मराठी या भाषांतून एकूण २२८ पदे श्रुत झाली. ही सारी पदे 'श्रीगुरुलिंगगीता' या नावाने प्रकाशित झाली. कानडीचा, इंग्रजीचा, संस्कृतचा गंधही नसताना या अलौकिक २२८ पदांचा सुगंध तेजोनादे श्रुत करणे हे भगवान सद्गुरू श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांचे न कळणारे कोडे आहे. म्हणून ते आमचे दृष्टीने 'कानडा' आहेत. आमचे हे कानडपण-अज्ञान तेच घालवू शकतात. श्रीमहाराजांनी आमचे हे कानडपण दूर करावे अशी अंत:करणापासून त्यांना प्रार्थना करतो. आज श्रीगुरुलिंगगीता जयंती. साधनाभ्यासाने तो बोध आपणाला प्राप्त होणे ही खरी गीताजयंती आहे.

✲✲

# श्रुतीस्मृती तुजला गाती

ध्यानामध्ये नित्यध्वनीश्रवण होणे - अनुहतध्वनी श्रवण होणे हे बहुतांशी सर्व संतांचे चरित्रात आढळते. संतांचे अभंगात या नादांचे निरनिराळे उल्लेख आलेले आहेत. पण निरनिराळ्या अनभिज्ञ भाषांतून असे अर्थपूर्ण बोध करणारे एवढे अभंग श्रुत होण्याची गोष्ट फक्त श्रीदासराममहाराजांचे बाबतीतच घडली हे केवढे विशेष आहे. असे अभंग श्रुत करणरे पुराणपुरुष विश्वगुरू भ.स.श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज हे माझ्या माहितीप्रमाणे एकमेव उदाहरण आहेत. तसेच असे अर्थपूर्ण अभंग ज्याला आमच्या ती.केशवकाकांनी 'बोधामृताची त्रिवेणीसरिता' असे संबोधले आहे, ज्यांना श्रुत झाले ते श्रीदासराममहाराज हे ऋषीमुनींच्यानंतर माझे माहितीप्रमाणे एकमेव उदाहरण आहे. अशा सद्गुरूंचे वर्णन शब्दात करता येईल का? आणि समजा केले तर कितीही वर्णन केले तरी ते अपुरेच ठरेल. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'कां साडेपंधरया रजतवणी। तैशी स्तुतीची बोलणी। उगियाची माथा ठेविजे चरणी। हेचि भले।।' तर श्रीसमर्थ सांगतात, 'म्हणोनि सद्गुरू वर्णवेना। हे गे हेचि माझी वर्णना। अंतरस्थितीचिया खुणा। अंतरर्निष्ठ जाणती।।'.*** श्रुती स्मृतींनी या सद्गुरूंचे वर्णन केले पण ते अजून पुरे झालेले नाही असे श्रीचिमडचे महाराज भ.स.श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांना उद्देशून म्हणतात, ते म्हणतात, ***'श्रुतीस्मृती तुजला गाती। परी ती आजवरी न होय पुरती।।'*** हे पंचपदीतील वचन नित्य म्हणताना श्रीचिमडच्या महाराजांनी पुढे श्रुत होणाऱ्या श्रीगुरुलिंगगीतेचे भाकीत केले आहे की काय असे वाटल्यावाचून राहात नाही. श्रीगुरुलिंगगीतेत हे सद्गुरूवर्णन खूप ठिकाणी आले आहे. श्रीमहाराजांनी मनात आणले तर असे भाग्य इथून पुढे सुद्धा भाग्यवानाला लाभू शकते.

खरे पाहिले तर श्रीगुरुलिंगगीतेतील 'येन इल्लदान्' हे पहिले पद १९३८ किंवा १९३९ च्या पौष महिन्यात शुद्ध नवमीला संध्याकाळी श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी देह ठेवल्यावर प्रत्यक्ष प्रगट होऊन श्रीदासराममहाराजांना श्रूत केले. या अर्थाने पौष शु.९ हा श्रीगुरुलिंगगीता जयंतीचा दिवस ठरतो. मग श्रीगुरुलिंगगीता जयंती वैशाख वद्य ७ ला कशी? त्याचे कारण असे घडले. १९४८ साली श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे ज्येष्ठ अधिकारी चिरंजीव श्रीगुरुसिद्दप्पामहाराज हे सांगलीस आमचे घरी आले असताना श्रीदादांना म्हणाले, 'रामभाऊ, मला 'नमो नमो गुरुलिंगजंगमेशा' हे पद स्फुरले आहे. पण ते पद काही केल्या पूर्ण होत नाही आहे.' श्रीदादानी श्रीमहाराजांची प्रार्थना केली व श्रीमहाराजांच्या प्रेरणेने श्रीदादांचे हातून श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांचे 'नमो नमो गुरुलिंगजंगमेशा' हे अपूर्ण पद पूर्ण झाले. तो दिवस होता वैशाख व.६, १८७० ता.२९-५-४८ हा. दुसरे दिवशी म्हणजे वैशाख व.७ ला हे पद श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांनी कानडी लिपीत आमचे श्रीदादांच्या श्रीगुरुलिंगगीतेच्या वहीत लिहून दिले व या पदाचा श्रीगुरुलिंगगीतेत समावेश करण्यास अनुमती दिली. तेव्हा श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांना श्रीदादा म्हणाले, 'महाराज आम्ही यापुढे आजचा म्हणजे वैशाख व.७ हाच श्रीगुरुलिंगगीता जयंतीचा दिवस मानणार. त्यास आपण संमती द्यावी.' श्रीगुरुसिध्दप्पामहाराजांनी तात्काळ श्रीदादांची विनंती मान्य केली. तेव्हापासून वैशाख व.७ हाच श्रीगुरुलिंगगीता जयंतीचा दिवस मानला जाऊ लागला.

वैशाख व.७ व वैशाख व.८ हे दोन दिवस श्रीगुरुलिंगगीता जयंतीचे संदर्भातील विषय आपण पाहिला. उद्यापासून परत मूळ पदाचे विवरण पाहू.

**

# बत्तीरूप

साधनाच्या अभ्यासाने मन सुखरूप शांत होऊन सर्वसाधारणत: प्रथम नादाचा अनुभव व नंतर अनुक्रमे बिंदू, कला, ज्योती हा प्रकाशाचा अनुभव आला असता - नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती आली असता - श्रवणात पेरलेले नयनात उगवले असता - सर्व मन वृत्तीसहीत मुरते व बाकीचे नाही ते काही नयनात न भरताना जे आहे ते चैतन्याचे वारेच नयनात भरते. जे विश्वाचे मूळ आहे, जो विश्वाचा कर्ता आहे, जो आनंदाचा अविनाशी सुत्रधार आहे तोच त्यांना जाणवतो. खऱ्या कर्त्याची ओळख होते. मग कर्तृत्वाचा अहंकार राहील का? मन मुरलेले असल्याने एखादे कर्म मी करीन असा संकल्प त्यांचे ठिकाणी येत नाही. जे काही कर्म होईल ते श्रीमहाराजांचे इच्छेने. राम कर्माचा कर्ता आहे याची जाणीव त्यांना सतत राहते. त्यामुळे त्यांना कर्मबंध बाधक होत नाही. प्रकाशरूप बत्तीरूप सूत्रधार श्रीसमर्थकृपेने श्रीकल्याणस्वामींनी अनुभवला. तो अनुभव त्यांनी त्यांचे अभंगात व्यक्त केला आहे. तो अभंग असा, ***'लागली बत्ती। आता कशी रे विझवू पाहसी।।धृ।। बत्ती लागली दारूला। दारूसगट बुधला गेला। धूर अस्मानी दाटला। नये तो पुढती।। बत्ती लागली तोफेला। पुढे धणी उभा केला। भीड काय तोफेला। उडवुनी देती।। बत्ती लाविली कापुरा। ज्योतीस्वरूप भरला सारा। आला मुळीचिया घरा। न राहे रती।। ऐसी सद्‌गुरु माऊली। दासा बत्ती लावून दिधली। निजवस्तू ते दाविली। स्वयंज्योती।।'***. असा बत्तीरूप अविनाशी अमृत सूत्रधार ज्या बुद्धीला जाणवतो ती बुद्धी 'संजीवनी मती' होय. ज्या बुद्धीला जड जाणवते, देहाची दृश्याची जाणीव होते, तिला जडबुद्धी - देहबुद्धी म्हणतात. या देहबुद्धीला जडाचेच ज्ञान होत असल्याने व चैतन्याचे ज्ञान होत नसल्याने, ती आपणाला चैतन्यापासून - मूळ स्वरूपापासून दूर नेत असल्याने संत तिला दुर्बुध्दी म्हणतात, ***('दुर्बुध्दी ते मना। कदा नुपजो नारायणा।।' श्रीतुकाराममहाराज, 'स्वरूपापासून दूरबुद्धी। तेचि जाणावी दुर्बुध्दी।।'-श्रीमामामहाराज, 'सद्‌बुद्धी दे मजला। दुर्बुद्धीचा वीट आला।।'- श्रीचिमडमहाराज)*** देहबुद्धीला जडाचे, आकाराचे ज्ञान होत असल्याने जाणीव, ज्ञान द्वैताचेच होते म्हणून देहबुद्धीला द्वैतबुद्धी असेही म्हणतात. ***('आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी। - श्रीदासराममहाराज, 'समाधी हरीची समसुखेवीण। न साहेल जाण द्वैतबुद्धी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण या बुद्धीचा निश्चय करायचा प्रयत्न करतो. पण या बुद्धीला होणारे ज्ञान हे बदलणारे असते. मग निश्चय कसा होणार? या बुद्धीला ज्या वस्तूचे, आकाराचे ज्ञान होते ती वस्तू, तो आकारच बदलणारा असल्याने, त्या वस्तूचे गुणधर्म बदलणारे असल्याने, त्या बुद्धीचा निश्चय कधीही होऊ शकत नाही. न बदलणारे मूळतत्व, जे निश्चळ चैतन्य आहे, त्याचे ज्ञान या बुद्धीला होत नाही. ***('जडाचे मूळ चंचळ। चंचळाचे मूळ निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।।', 'मन बुद्धी अगोचर। बुद्धीवीण अंध:कार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी।।', 'देहबुद्धी नेणो काही। दास अंकीत रामापायी।।' - समर्थ)*** निश्चळ गोष्टीचे निश्चळ ज्ञान झाले तरच निश्चय होणार. जोवर देहाचीच जाणीव आहे, 'देह म्हणजे मी' हा अहंकार आहे तोवर देहबुद्धी जागृत असते. साधनेने देहाचा निरास झाल्यावर 'देह म्हणजे मी' ही जाणीव गेल्यावर हृदयदेशी 'मी अमुक आहे' ऐसी राहणारी जाणीव ज्या स्फुरदरूप बुद्धीला होते, तिला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'नवलबुद्धी' म्हणतात. तर समत्व दाखविणाऱ्या सम जीवनात ही मती - बुद्धी- प्राप्त होत असल्याने या बुद्धीला श्रीमामामहाराज 'संजीवनी मती' असे संबोधतात. आत्म्याची जाणीव या बुद्धीला होत असल्याने समर्थ हिला 'आत्मबुद्धी' असे संबोधतात. ***('जव देह हे असेल। तव वोळगी ऐसी कीजेल। मग देहांती नवल। बुद्धी आहे।।', 'एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशी। मी अमुक आहे ऐसी। जे बुद्धी स्फुरे अहर्निशी। ते वस्तु गा मी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संजीवनी मती। समत्वाची स्थिरगती। समत्व धारणा। जीवनाची खूण जाणा।।'- श्रीमामामहाराज, 'देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी।।' - समर्थ)***

**

# संजीवनी मती

अद्वैताचे ज्ञान, स्वरूपज्ञान संजीवनी मतीला होत असल्याने या बुद्धीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज या बुद्धीचे महत्त्व असे सांगतात, ***'जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजाते प्रगटी। तैसी सद्बुद्धी हे थेकुटी। म्हणो नये।।'*** सर्वत्र सारखेपणाने भरलेल्या चैतन्याचे ज्ञान या बुद्धीला होत असल्याने हिला 'समबुद्धी' असेही श्रीज्ञानेश्वरमहाराज संबोधतात. त्या समबुद्धीचे महत्त्व श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'समबुद्धी घेता समान श्रीहरी। शमदमावरी हरी जाहला।।' , 'ऐसे जे समबुद्धी। मिळावया सोहंसिद्धी। आंगवितती निरवधी। योगदुर्गे।।'*** श्रीजगद्गुरू शंकराचार्य या बुद्धीला 'प्रज्ञा' असे संबोधतात. या प्रज्ञेचे वेगळेपण जगद्गुरू शंकराचार्य विवेकचुडामणी या ग्रंथात असे सांगतात, ***'ब्रह्मात्मनोः शोषितयोरेकभावावगहिनी। निर्विकल्पान्न चिन्मात्रा वृत्तिःप्रज्ञेति कथ्यते। सुस्थितासौ भवेद्यस्य स्थितप्रज्ञः स उच्यते।।'*** ईश्वर आणि जीव यांचे ऐक्य समजणारी विकल्परहित आणि ब्रह्माकार जी वृत्ती, तिला 'प्रज्ञा' म्हणतात. ही 'प्रज्ञा' ज्यांची उत्तम, स्थिर झाली आहे, त्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणतात. अशा स्थितप्रज्ञाचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***'तो कामू सर्वथा जाये। जयाचे आत्मतोषी मन राहे। तोचि स्थितप्रज्ञु होये। पुरुष जाणे।।'*** जे सतत समबुद्धीने समत्वाचे सुख घेतात ते सतत समाधीसुख उपभोगतात. ***('समाधीसुखी केवळ। जै बुद्धी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगस्थिती।।', 'जैसा निर्वातीचा दीपु। सर्वथा नेणे कंपु। तैसा स्थिरबुद्धी स्वस्वरूपु। योगयुक्तु।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज 'समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे।।' श्रीमामामहाराज)*** असा स्थितप्रज्ञ साधक निरंतर आनंद उपभोगतो. श्रीजगद्गुरु शंकराचार्य सांगतात ***'यस्य स्थिता भवेत्प्रज्ञा यस्यानन्दो निरंतरः। प्रपंञ्चो विस्मृतप्रायः स जीवन्मुक्त इष्यते।'*** संजीवनी मतीला होणारी एकपणाची जाणीव - अद्वैतबोध - वेगळेपणाने येणारे अद्वैताचे अनुभव - हे द्वैतद्योतक आहेत. चैतन्याचे वेगळेपणाने अनुभव येतात. याचा अर्थच अजून संपूर्ण अद्वैत साधलेले नाही असाच होतो. ***('दुजेवीण अनुभव। हे बोलणेचि वाव। याकारणे नाही ठाव। अनुभवासी।।' 'अनुभवे त्रिपुटी उपजे। अद्वैती द्वैतचि लाजे। म्हणोनि बोलणे साजे। अनिर्वाच्य।।' समर्थ)*** अद्वैतामध्ये बोलणे, पाहणे, ऐकणे या क्रिया संभवत नाहीत. द्वैत असेल तरच या क्रिया होऊ शकतात. 'परमार्थात अज्ञान चालत नाही तर ज्ञान टिकत नाही' हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घेण्यासारखे आहे. अर्थात हे न टिकणारे ज्ञान हे तुर्येतील चैतन्याचे वेगळेपणाने होणारे ज्ञान आहे. हे कारणदेहातील अज्ञान किंवा तुर्येतील ज्ञान हे दोन्ही वृत्तीसहीत आहे. या ठिकाणी अज्ञान असल्याची किंवा ज्ञान असल्याची जाणीव आहे. ही ज्ञान असल्याची जाणीव - वृत्ती - नाहीशी व्हावयास हवी. ***('ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे हे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।' 'साक्षत्व वृत्तीचे कारण। उन्मनी ते निवृत्ती जाण। जेथे विरे जाणपण। विज्ञान ते।।', 'द्रष्टा म्हणिजे पाहता। साक्षी जाणिजे जाणता। अनंतरूपी अनंता। वोळखावे।।'-समर्थ, 'ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे। जाणोनी नेणणे विज्ञान ते।।'-श्रीतुकारामहाराज, 'जीवु परमात्मा दोनी एक। ऐसे जाणणे ते 'ज्ञान' देख। ऐक्ये भोगणे परमात्मसुख। 'विज्ञान' सम्यक त्या नाव।।'-श्रीनाथमहाराज)***

✻✻

# संजीवनी मती जरी होय सती

निवृत्ती अवस्थेत असणाऱ्या ज्ञानाला - स्मरणाला, वृत्तीरहित ज्ञानाला विज्ञान म्हणतात. या वृत्तीरहित ज्ञानाने पूर्ण समाधान होते. त्याचे संसारातील श्रम नाहीसे होऊन पूर्ण विश्रांतीचा लाभ होतो. श्रीसमर्थ या वृत्तीरहित ज्ञानाचे वर्णन असे करतात, ***'वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।', 'अनिर्वाच्य ते निवृत्ती। तेचि उन्मनीची स्थिती। निरोपाधी विश्रांती। योगियांची।।', 'मीपण ते बुडाले। विवेके वेगळेपण गेले। निवृत्तीपदास प्राप्त जाले। उन्मनीपद।।'*** तर श्रीनाथमहाराज या वृत्तीरहित ज्ञानाचे - विज्ञानाचे - वर्णन असे करतात, ***'स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'.*** या अद्वैतबोधाच्या पलीकडे गेल्याशिवाय हरीरूप भगवान सद्गुरू निंबरगीकरमहाराजांचे निर्गुण स्वरूप अनुभवता येत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***'ते तू गुरुलिंगजी माझे। जे एकलेपणीच विरजे। जेयालागी वोलांडिजे। अद्वैत बोधू।।'*** जागृती स्वप्न या अवस्थेत होणारी विपरीत ज्ञानाची जाणीव नाहीशी होऊन राहणाऱ्या कारणदेहातील अज्ञानाची जाणीव (ज्ञान) क्षीण झाली असता हे विज्ञान - जाणीवरहित जाणतेपण प्रगट होते. ***('तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तु देऊनी गेले। ऐसे जाणणेनेवीण उरले। जाणते जे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'येक ज्ञान येक अज्ञान। येक जाणावे विपरीतज्ञान। हे त्रिपुटी होय क्षीण। तेचि विज्ञान।।' समर्थ)*** दृश्यांशी तादात्म्य असणारे मन लय पावल्यावर राहणारे संकल्प विकल्परहित मन म्हणजेच मनातील जड भाग नाहीसा होऊन राहणारे फक्त चैतन्याचा अंश असणारे सर्वसाक्षी मन होय. या सर्वसाक्षी मनाला महाकारणदेहात तुर्यावस्थेत वेगळेपणाने चैतन्याचे अनुभव येतात. ही वेगळेपणाने होणारी चैतन्याची जाणीव ज्या बुद्धीला होते, तिला सद्बुद्धी, संजीवनी मती, आत्मबुद्धी आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. जेव्हा तारकस्वरूपाचा अनुभव सर्वसाक्षी मनाला येतो, तेव्हा सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते. अखंड चैतन्याचे जाणीवेने जाणीवेचा ग्रास होतो. साहजिकच 'संजीवनी मती' ही सत्स्वरूपाचे ठिकाणी तद्रूप होते. हे संजीवनी मतीचे 'सत्'शी तद्रूप होणे म्हणजे संजीवनी मती सती होणे होय. हे सर्वसाक्षी मन व संजीवनी मती सत्स्वरूपाचे ठिकाणी अर्पण होणे म्हणजे सर्वसाक्षी मनाचे उन्मन व ज्ञानाचे विज्ञान होऊन आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होणे होय. या ठिकाणी तुर्येमध्ये वेगळेपणाने येणारे अनुभव ठायीच मुरून जातात. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान ही त्रिपुटी त्या ठिकाणी उरत नाही. ज्ञान होते पण ते वृत्तीरहित असते. हे स्वरूपाकार होणे म्हणजे अद्वैताचे निश्चळ सुख प्राप्त होणे होय. बुद्धी स्वरूपाचे ठिकाणी तद्रूप झाल्यावर चित्ताचे विषयचिंतन थांबते. संपूर्ण चित्तामध्ये देवाचे वास्तव्य होते व अखंड प्रसन्नता हा प्रसाद चित्ताला प्राप्त होतो. ***('सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।', 'जेथे मनची होते उन्मन। ज्ञानची होते विज्ञान। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ, 'तू मन बुद्धी साचेसी। माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेची गा पावसी। हे माझी भाक।।', 'मग कर्मजात गेलिया। आत्मा उरे आपणया। तेया बुद्धी घापे करूनिया। पतिव्रता।।', 'बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्य त्यागे। मातेची भजे।।', 'मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादु जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संजीवनी मती सती होणे म्हणजेच पापपुण्यरहित निर्गुणी अनन्य होणे होय. ***('तुका म्हणे आम्ही झालो अग्नीरूप। लागो वेदू पापपुण्य अंगा।।' श्रीतुकाराममहाराज, 'निर्गुणास नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपुण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाला।।' समर्थ)***

✻✻

# विश्रांतीची स्थिती

जे थकतात भागतात त्यांना विश्रांतीची गरज भासते, त्यांना विश्रांतीचे महत्त्व वाटते. माणूस दमतो केव्हा? जो काम करतो, कष्ट करतो तो दमतो. संसारामध्ये आपल्या इच्छा आकांक्षा (काम) पुऱ्या करण्यासाठी माणसाला दिवसभर नुसते पळावे लागते. पण इच्छा (काम) पुऱ्या होत नाहीत. एक इच्छा पुरी झाली की दुसरी हजर. वासना कधी संपतच नाही. वासना बायकोबरोबर असणारा संसार कधीही मोडला जात नाही, तो कायम फुलतच, बहरतच जातो. त्याचे कधीही ब्रेकअप होत नाही. विश्रांती मिळावी या हेतूने तो काही सुखकारक गोष्टी संसारात आणतो पण त्याला सुख होत नाही. विश्रांती प्राप्त होत नाही. परमेश्वरकृपेने रात्रीची झोप मिळाली तर देहाला, मनाला विश्रांती मिळतेही, पण देहाला, मनाला विश्रांती मिळण्यासाठी प्राणाची (श्वासाची) धावाधाव वाढते. या देहाचे, मनाचे कारण असणाऱ्या प्राणाला विश्रांतीची गरज आहे हे प्राण जाईतोवर आमच्या लक्षात येत नाही व प्राण जायचे वेळी लक्षात येऊन काही उपयोग पण नाही. वासनेबरोबरचा संसार दु:खमूळ असून यात कोठेही निवांतपणा मिळणार नाही, विश्रांती मिळणार नाही हे ज्याच्या लक्षात येते, तोच सुखाचा शोध घेतो, परमार्थाच्या मागे लागतो. संसारात काही अर्थ नाही हे ज्याला समजते तोच परम अर्थ कोठे आहे हे पाहतो. ***('संसार दु:खमूळ। चहूकडे इंगळ।। विश्रांती नाही कोठे। रात्रंदिवस तळमळ।। काम क्रोध लोभ खुणे। पाठी लागले वोढाळ।। कोणासी मी शरण जावू। दृष्टी देईल निर्मळ।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जो संसारदु:खे दुखावला। जो त्रिविधतापे पोळला। तोचि अधिकारी जाला। परमार्थासी।।' समर्थ)*** काम-वासना-आहे म्हणून प्राणाची धावाधाव आहे. आस आहे म्हणून श्वास आहे. ही वासना नाहीशी झाली की प्राणाला विश्रांती मिळणार. वासनेपासून जो आपणाला मुक्त करतो व प्राणाला विश्रांती देतो तो सद्गुरू. प्राणाला विश्रांती मिळाली की देहाला मनाला खरी विश्रांती प्राप्त होते. अहो मुळाला पाणी घातले की ते शेंड्यापर्यंत पोचतेच. शेंड्याला पाणी मारून ते मुळाला कधीही पोचत नाही. ***('वासना नदी महापुरी। प्राणी बुडता ग्लांती करी। तेथे उडी घालूनी तारी। तो सद्गुरू जाणावा।।' समर्थ)*** म्हणून सद्गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सद्गुरू हे संतकुळातील राजे आहेत. त्यांना विसरून कदापीही चालणार नाही. ***('गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राणविसावा माझा। गुरुवीण देव दुजा। पाहता नाही त्रैलोकी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तो मज आठवितो गुरुराजा। प्राण विसावा माझा।।' - केशवस्वामी)*** आपण वासनारहित होऊन देवाच्या गावाला - माहेराला गेलो तरच विश्रांती प्राप्त होणार. 'घर सुटले की वासना निर्माण होते' हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. अर्थात वासना संपली की आपल्या खऱ्या घराचा अनुभव येतो. ***('जाऊ देवाचिया गावा। देव देईल विसावा।।', 'भागल्याचा तू विसावा। तुज्या नावा निंबलोण।। परमानंदा पुरुषोत्तमा। हरी या श्रमापासोनिया।। अनाथांचा अंगीकार। करिता भार न मानिसी।। तुका म्हणे इच्छा पुरे। ऐसी धुरे हे विठ्ठले।।' - श्रीतुकाराममहाराज, 'मायेवीण माहेर विश्रांती ठाव। शब्दी अर्थी लाभ बोलणे वाव।।'-श्रीसमर्थ)*** भगवान सद्गुरु गुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी जो साधनमार्ग दाखविला आहे त्या साधनाच्या अभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधला असता त्रिपुटीरहित असे आपले सुख आपल्याला प्राप्त होऊन - आत्मसुख प्राप्त होऊन ही निरोपाधिक विश्रांती प्राप्त होणारी आहे. ***('गुरुलिंगजंगम। तेणे दाविला आगम।। आधीव्याधी झाली सम। तेणे पावलो विश्राम रे।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'त्रिपुटी ग्रासुनिया सुख देसी। प्राणविसावा होसी।।' श्रीकेशवस्वामी)*** मूळमाया चौथा देह हा जेव्हा विदेह होतो तेव्हा देहातीत अवस्थेत वृत्तीरहित ज्ञानाने - निवृत्ती अवस्थेतील स्मरणाने नवलस्वरूपाचा योग घडून ही विश्रांती प्राप्त होणारी आहे. ***('देहभाव सर्व जाय। तेव्हा विदेही सुख होय।। तया निद्रे जे पहुडले। भवजागृती नाही आले।। ऐसी विश्रांती लाधली। आनंदकळा संचरली।।' - संत जनाबाई, 'स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती आली माझ्या।।' - श्रीनाथमहाराज)***

**

# निर्गुण

जोवर गुण - जाणीव- आहे तोवर संसार आहे. तोवर संसाराचा शीण आहे. ही जाणीव सूक्ष्म झाली की गुणातीत होऊन निवृत्ती अवस्थेत खरे मौन साधले असता निर्गुणाची भेट होते व सारा शीण नाहीसा होऊन पूर्ण विश्रांती प्राप्त होते. ***('निर्गुणाचे भेटी गेलो गुणासंगे। तव झालो अंगे गुणातीत।। नाम तेही नाही रूप सगुण काही। झाले तया ठायी अबोलणे।। बोलता बोलता जिह्वा ही खुंटली। खेचरी लागली पाहता पाहता।। म्हणे गोरा कुंभार सतरावीचे क्षीर। सेवी निरंतर नामदेव।। - संत गोरा कुंभार, 'क्षेत्र क्षेत्रज्ञ योगे। होइजे येणे जगे। आत्मा गुणसंगे। संसारिया।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जेथे नाही गुण देखे ते निर्गुण। निरालंब खूण मार्ग ज्याचा।।' श्रीदासराममहाराज, 'तुका म्हणे सांडा जाणीवेचा शीण। विठोबाची खूण जाणती संत।।' - श्रीतुकाराममहाराज)*** मनाला भासत नाही असे दृष्टीला दिसत नाही असे दृष्यभासातीत, ज्याला नामरूप नाही असे अवर्णनीय नामरूपातीत भ्रमरहित सत्य, जेथे जाणीव नाही असे गुणातीत जाणीवरहित जाणते, जेथे येणेजाणे नाही असे जन्ममरणरहित, पापपुण्यरहित निर्लेप, अहंकाराचा संग नाही असे नि:संग, वेगळेपणाने अनुभवता न येणारे निरोपाधिक आकाश व त्यामध्ये असणारे निश्चल वायुरूप तत्व, ज्याला मूळ नाही असे सर्वांचे मूळ केवळ ज्ञानस्वरूप असे निर्गुण आहे. कल्पनेने गगनामध्ये असणाऱ्या निश्चळ पवनाची हालचाल झाली, चंचळत्व निर्माण झाले की पवनाची जाणीव होते. त्याला सगुण म्हणतात, त्याला चैतन्य म्हणतात. सहजावस्थेत पवन स्थिर झाला की गगनच राहते, त्याला निर्गुण म्हणतात. ***('जरी पवन हालवूनी पाहिजे। तरी गगनावेगळा देखिजे। एऱ्हवी गगन तो सहजे। असे जैसे।।', 'पै गगन जेवढे जैसे। पवनु गगनी तेवढाची असे। सहजे हालविलिया वेगळा दिसे। एऱ्हवी गगन तेचि तो।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'चंचळपणे विकारले। सगुण ऐसे बोलिले। येर ते निर्गुण उरले। गुणातीत।।' 'वृत्तीस न कळे निवृत्ती। गुणास कैची निर्गुण प्राप्ती। गुणातीत साधक संती। विवेके केले।।' श्रीसमर्थ)*** रामकृष्णवाचा या अस्तित्वभावाच्या मंथनातून निर्गुण साचते ते सगुण चैतन्य नाद, बिंदू, कला, ज्योती या रूपाने नावारूपाला येते. सगुण साक्षात्काराने त्याचा मीपणा नाहीसा होतो. या सगुणाच्या आधाराने जीवन उर्ध्वमुख होऊन देवाभक्तातील भेद नाहीसा होतो व निर्गुणी अनन्य होणे हा निर्गुणाचा संग घडतो. ***('भावाचे मथिले निर्गुण संचले। ते हे उभे ठेले विटेवरी।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सगुणाचेनी आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे। सारासार विचारे। संतसंगे।।', 'अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो। नि:संगपणे निर्गुणी तो। महायोगी।।' समर्थ, 'निर्गुणाचा संग मला आजी जहाला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।।' संत मुक्ताबाई, 'सगुणावाचोनी अकळ निर्गुण। सुलभ ते खूण सगुणाची।।' श्रीदासराममहाराज, 'तैसे माझिये साक्षात्कारी। सरे अहंकाराची वारी। अहंकारलोपी अवधारी। द्वैत जाय।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** निर्गुणाच्या ठिकाणी अनन्य होणे - निर्गुणरूप होणे म्हणजेच सायोज्यता मुक्ती असून ती प्राप्त झाल्यावर तो महात्मा पापपुण्यरहित, जन्ममरणरहित, जाणीवनेणीवरहित, समविषमरहित होतो. ***('निर्गुणी अनन्य असता। तेणे होय सायोज्यता। सायोज्यता म्हणजे स्वरूपता। निर्गुण भक्ती।।', 'निर्गुणासी नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपुण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाहला।।' - श्रीसमर्थ)*** निवृत्ती अवस्थेत निर्गुणाची प्राप्ती झाली असता त्याला परमार्थात मिळवायचे काही राहात नाही. ***('ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण। दिधले संपूर्ण माझे हाती।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# निर्गुण भोजन

जो निर्गुणाशी अनन्य होतो, निर्गुणरूप होतो, त्याचा सारा भ्रम नाहीसा होतो. त्याचे सारे व्यवहार सत्य निर्गुणाबरोबर होतात. त्याचे भोजन पण निर्गुण भोजन होते. म्हणजे प्रत्येक इंद्रियाची भूक निर्गुणाचे अनुभवाने शमते. आपल्या प्रत्येक इंद्रियाची एक भूक असते. ती भूक भागविण्यासाठी जे काही करावे लागते त्याला भोजन म्हणतात. पाहणे हे डोळ्याचे, तर ऐकणे हे कानाचे, अन्न हे रसनेचे भोजन आहे आणि विशेष म्हणजे कितीही खाल्ले, ऐकले, पाहिले तरीही भूक भागत नाही ही इंद्रियांची खासियत आहे. पण निर्गुणाचा अनुभव ('अनुभव म्हणजे अनन्य'- समर्थ) आला की त्या इंद्रियांना पाहायचे, ऐकायचे काही उरत नाही. त्यांची भूक भागते. ती आत्मतृप्त होतात. आत्मा हेच त्यांच्या तृप्तीचे कारण होते. त्यांची वखवख थांबते. ***('तरी जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।', 'जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जयाचा जठरू। तया क्षुधेतृषेचा अडदरू। काहींचि नाही।।', 'ताहाने ताहानचि पियावी। भुकेलिया भूकचि खावी। अहोरात्र वावी। मवावा वारा।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'समाधान त्यांची इंद्रिये सकळ। जया तो गोपाळ ध्यानी मनी।।' श्रीतुकाराममहाराज, 'देव खाते देव पिते। देवावरी मी निजते। देव देते देव घेते। देवासवे मी व्यवहारिते।।' संत जनाबाई)*** संत हे आनंदाचे लाडू - आनंदाचाच रस - अमृतपान करतात. मग कांजी प्यावीशी वाटेल का? वखवख होईल का? ***('हा रस आनंदाचा। घोष करा हरिनामाचा। पार या भाग्याचा कोण पावे येथील।।', 'तुका म्हणे खातो आनंदाचे लाडू। नका चरफडू घ्यारे कोणी।।', 'संतांचे भोजन अमृताचे पान। करिती कीर्तन सर्वकाळ।।' श्रीतुकाराममहाराज, 'नाम अमृताचे पान। हेच संतांचे भोजन।।' श्रीमामामहाराज केळकर)*** हे भोजन जास्ती केल्याने कधीही अपचनाचा त्रास होणार नाही. या भोजनाचे वेगळेपण श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'नाम गोड नाम गोड। पुरे कोड सकळही।। येर रसा रसना वीटे। घेता घोट अधीक हे।। येर रसा मरण गाठी। येणे तुटी संसारा।। तुका म्हणे आहार झाला। हा विठ्ठल आम्हासी।।'*** संत हे जगण्यासाठी आवश्यक तेवढे खातात. ते खाण्याकरता जगत नाहीत. ***('निर्वाहापुरते अन्न आच्छादन। आश्रमासी स्थान कोपी गुहा।।' श्रीतुकाराममहाराज)*** गुरुदेव रानडेसाहेब हे नुसत्या चहाचे घोटावर उदरनिर्वाह करीत तर स्वामी स्वरूपानंद थोडा भात व उकडलेल्या दोन पडवळाच्या फोडी एवढाच आहार घेत. लहान मूल जास्त जेवेल इतका कमी आहार भगवान सद्गुरू श्रीकोटणीसमहाराज घेत. तर श्रीमामामहाराज व श्रीदासराममहाराज मोजकेच घास अन्नग्रहण करीत असत. यावरून निर्गुण भोजन झाले म्हणजे सगुण भोजनात रस वाटत नाही हे स्पष्ट होते. निर्गुण भोजन झाले की इंद्रियांना सतत समाधान होऊन चेहऱ्यावरची प्रसन्नता कधीही ढळत नाही. देह ही एक बाग आहे. ती सुंदर दिसावी म्हणून आपणही प्रयत्न करतो. चेहऱ्यावर प्रसन्नता यावी म्हणून चांगले पाहतो, चांगले ऐकतो, चांगले खातो, चेहरा वारंवार स्वच्छ करतो, पण आम्हाला अपेक्षित प्रसन्नता काही केल्या प्राप्त होत नाही. आमचे मन, चित्त, अंत:करण प्रसन्न (शुद्ध) होत नाही. अर्थात चेहराही सतत काळजीत असतो. हे असे का? कारण आम्ही जी बागेसाठी मेहनत घेतो, ती वरवरची असते. नुसती बागेची साफसफाई, शेंड्याला पाणी मरून बाग टवटवीत होत नाही. त्याकरता मुळाला पाणी द्यावे लागते. देह म्हणजे 'मी', देह म्हणजे सारसर्वस्व. देहाचे सुख म्हणजे माझे सुख, असे आपण मानतो व येथेच आपली फसगत होते. मी देहापेक्षा, मनापेक्षा, चित्तापेक्षा, बुद्धीपेक्षा, प्राणापेक्षा वेगळा आहे. त्या 'मी' ला सुख झाले तर प्रसन्नता येणार हो. देह हा पंचमहाभूतांचा जड आहे. या जड देहाचे मूळ चंचळ चैतन्य-आत्मरूप असून या चंचल चैतन्याचे मूळ निश्चळ चैतन्य आहे. हे निश्चळ चैतन्य - निर्गुण ब्रह्म - हे आपले खरे रूप असून हे मूळ जाणले, मुळाला पाणी घातले तर इंद्रिये समाधानी होणार. देह बाग टवटवीत दिसणार.

**

# निजत्व लक्षण

या देहबागेत काय पेरले आहे, पाण्याची सोय काय आहे, फळ कोणते येते याची माहिती सद्‌गुरू आपणास करून देतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बागेची मशागत केली तर बाग लावल्याचे सार्थक होणार. ***(‘गुरुरायाने नवलाव केला। देही अपूर्व बाग दाविला।। या या बागेचे नवल सांगू काही। साडेतीन चाहूर बागशाही।। आत पेरीली पंचरंगी जाई। धन्य कर्त्याची कारागिरी बाई।। या या बागेमध्ये एक असे विहीर। मोट सत्रावी चाले निरंतर।। मन पवनाचे लावोनिया दोर। सोहं भक्तीचे बळ असे फार।।’- संतवचन, ‘नरदेही असे बाग। जे का अपूर्व आणि चांग।। जियेमाजी नाम फळ। मिळे जे का सुफळ।। गोविंद म्हणे भरली जाई। येणे ज्यात भरूनी राही।।’-श्रीमामामहाराज केळकर)*** ज्याला देहबागेत मशागतीने निर्गुणाचा अनुभव येतो, निर्गुण भोजन घडते, त्याचे ठिकाणी निजत्वाची लक्षणे प्रगट होतात. ज्याला मागे पाहिल्याप्रमाणे निर्गुण भोजन घडते, त्याची इंद्रिये समाधानी होतात. त्याला नवीन नाही ते काही पाहावे असे वाटत नाही. तो जे आहे ते स्वरूपच पाहतो. त्याला नवीन नाही ते काही ऐकावेसे वाटत नाही. तो जो आहे तो स्वयमेव नादच ऐकतो. तो खातो पण अनुभव स्वाद विठ्ठलाचा. थोडक्यात काय त्यांना या भ्रामक जड साकार सृष्टीचा अनुभव न येताना विश्वात सामान्यपणे सर्वत्र पसरलेल्या चैतन्याचाच अनुभव येत असतो. हा चैतन्याचा अनुभव जड देहाच्या इंद्रियांना येत नसून तो चैतन्यालाच येत असतो. अर्थात हे पाहणे नेत्रेवीण, ऐकणे श्रोत्रेवीण, चाखणे रसनेवीण असते. चैतन्याला चैतन्याची जाणीव होत असल्याने तेथे देहाची जाणीवच असत नाही. ते देही असून पूर्ण विदेही असतात. एका चैतन्याचीच जाणीव होत असल्याने संशयाला वावच राहात नाही. ते महात्मे नि:संदेह असतात. हे महात्मे बाहेरचे काही ऐकत नाहीत. अर्थात तेथे निंदास्तुतीचा परिणाम संभवतच नाही. ते आकाशाप्रमाणे निर्लेप असतात. ते दृश्य पाहात नाहीत. ते एक चैतन्यच पाहतात. अर्थात तेथे काम, क्रोध, लोभ आदी षड्‌विकार संभवत नाहीत. म्हणून अशा महात्म्यांचे वागणे, बोलणे, आमच्यापेक्षा वेगळे असते. ***(‘सर्व विश्वामाजी असे जे सामान्य। तेचि असामान्य दासरामी।।’, ‘नेत्रावीण देखे श्रोत्रावीण ऐके। रसनेवीण चाखे ते निजवस्तू।।’ श्रीदासराममहाराज, ‘तया पाडे देही। जया मी आहे हे ‘से’ची नाही। निरहंकारीता पाही। तया नाव।।’ श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘सिद्धस्वरूपी नाही देहो। तेथे कैचा हो संदेहो। या कारणे सिद्ध पाहा हो। नि:संदेही।।’, ‘जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरी। साधुजन वर्तती।।’, ‘जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू।’ समर्थ)*** एकाचीच जाणीव असल्याने तेथे काही हरविल्याचे दु:ख किंवा काही मिळाल्याचे सुख असत नाही. निवृत्ती अवस्थेत ते सदा शोकरहित असतात. सदैव आनंदात असतात. म्हणजे मेल्याचे दु:ख नाही, जन्माला आल्याचे सुख नाही असे असते का? नाही असे असत नाही. त्यातील असारपण त्यांनी ओळखले असते इतकेच. ***(‘तरी गेलियाची से न करी। न पवता चाड न धरी। जो सुनिश्चळु अंतरी। मेरू जैसा।।’ श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘शोके दुखवावी वृत्ती। तरी ते जाले निवृत्ती। म्हणोनि साधू आदीअंती। शोकरहित।।’-श्रीसमर्थ)*** राम कर्ता आहे हे ओळखणे हा विवेक त्यांचेपाशी असल्याने अहंकार त्यागण्यासाठी लागणारे वैराग्य त्यांच्या अंगी बाणते. अहंकारविरहित अवस्थेत कामक्रोधरहित होऊन सतत समाधानी राहणे हे भजन साधून ते देवरूपच होतात. ***(‘कर्त्यासी ओळखावे। तयासी विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदु:खी।।’-समर्थ, ‘अहंकार त्यागी तोचि जाणा त्यागी। येर सर्व ढोंगी ओळखावे।।’-श्रीदासराममहाराज, ‘अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।।’-श्रीमामामहाराज, ‘हेचि देवाचे भजन। सदा राहे समाधान।।’-संत जनाबाई, ‘देवची झाले अंगे। देवा भजता सानुरागे।।’-संत निळोबाराय)***

**

## ज्येष्ठ शुद्ध

*नाममहिमा वाढविता करणे संतनिंदा। हरीहर भेदा गुरु अवज्ञा।।१।।*
*वेदशास्त्र निंदणे नाम प्रशंसा म्हणे। नामे पाप जाणे मग करा।।२।।*
*व्रतदान नामासमान अभाविका उपदेशन। नाममहिमा आयकोन प्रीती नाही।।३।।*
*सत्संग न करणे चुका करीत जाणे। अचूक साधन साधणे अखंडीत।।४।।*
*आशीर्वाद सदाचार काय तप पाही। दास म्हण देई थोरपण।।५।।*

दशहारात दहाचे वायन द्यायचे व गंगास्नान करायचे या दोन गोष्टी प्रामुख्याने महत्त्वाच्या. हा दशहार अंतर्यामी साधायचे म्हणजे काय करायचे? नाम घेताना दहा अपराध आपले मनात कळत नकळत घडतात. (या अपराधांचे वर्णन पहिल्या तीन कडव्यात सांगितल्याप्रमाणे) संताच्या आशीर्वादाने साधनाचे सदाचरण जर घडले तर तपाचे योगे मनोलयाने दशदोषनिवृत्ती होऊन इडा पिंगला नाड्या सुषुम्नाकार होऊन त्रिवेणीसंगमी नाम हाताला येते. त्रिकूटशिखरावर नामगंगेत स्नानही घडते व तो जीव मुक्त होतो. थोरपण त्याला प्राप्त होते. हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने ज्येष्ठ महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## ज्येष्ठ वद्य

*प्रेममंदिरात सत्याचा संकल्प। अखंड नेम जप प्रायश्चित्त।।१।।*
*चित्तशुद्धी होता पक्षी कामधेनू। उलटे देऊळ थोर भक्ती।।२।।*
*दास म्हणे नमने गुरुपदी कसा। अनुभव ऐसा आन नसे।।३।।*

१) प्रेममंदिरात प्रेमरूप सत्याचे ठिकाणी होणारी अहर्निशी 'मी' ची जाणीव हा सत्याचा संकल्प म्हणजेच अखंड नेम, जप आहे.

२) चित्तशुद्धी झाल्यावर तोच हा आहे हा सोहंबोध-पक्षी, इच्छा पूर्ण करणारी कामधेनू अनुभवल्यानंतर जीवन उर्ध्वमुख होते. आत उलटून पाहिल्यावर उलट्या देवळाच्या अनुभवाने आत्मरूप झाल्यावर होणारी भक्ती - थोरभक्ती - प्राप्त होते.

३) गुरुपदाचे ठिकाणी मनाचे नमन झाले तर 'आन नसे' हा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने ज्येष्ठ महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# संत निंदा पाप कैसे घालवावे

आज ज्येष्ठ शु.१, दशहराची सुरुवात. दशहरात दहाचे वायन दान द्यायचे व गंगास्नान करायचे या दोन गोष्टी प्रामुख्याने बाह्यत: केल्या जातात. हा दशहार अंतर्यामी साधला पाहिजे. दशहार अंतर्यामी साधायचा म्हणजे काय करायचे? नाम घेताना दहा अपराध आपले हातून कळत नकळत घडत असतात, त्यामुळे खरे नाम हाताला येत नाही. साहजिकच नाममाहात्म्य पटत नाही, नामाबद्दल प्रेम वाटत नाही. त्यायोगे नाम घेऊनही नामाचा तादृश फायदा होत नाही. मग नाम घेऊन काय उपयोग असेच वाटू लागते. साधनाने हे दश दोष - दहा अपराध नाहीसे होऊन - मनोलय साधून - इडा आणि पिंगला या नाड्या सुषुम्नाकार होऊन त्रिवेणीसंगमी नाम हाताला येते व नामगंगेत स्नानही घडते व तो जीव मुक्त होतो. मनातील दशदोष निवृत्ती हे खरे वायन आहे तर त्रिकुटावर नाम गंगेत स्नान घडणे, हे खरे गंगास्नान आहे. हा खरा दशहर आहे. या त्रिवेणी संगमावर संत राहतात. साहजिकच त्यांना नित्यस्नान घडते. आम्हाला स्नान घडते ते अनित्य स्नान - देहाचे स्नान - घडते. नित्यस्नानाने अंतर शुद्ध होते व तो मुक्त होऊन जातो असे दशहराचे महत्त्व आहे. ***('दश अपराध हरा। हरोनी तोषवावे हरा।।' - संतवचन, 'इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।' - श्रीमामामहाराज केळकर, 'इडा पिंगला सुषुम्ना। गंगा सरस्वती यमुना। यांचे संगमी करिता स्नान। मुक्ती जीवनासी।।' - संत श्रीज्योतीपंत महाभागवत, 'इडा पिंगला सुषुम्ना मार्ग आहे कठीण। त्रिकुट संगम मार्जन महालिंगदर्शन। आरती करा हो सज्जन द्वैत भाव टाकून।।' - श्रीचिमडमहाराज, 'तेथे नित्य स्नान करीताती संत। रज तम द्वैत संहारोनी।।', 'जावोनिया तीर्था तुवा काय केले। चर्म प्रक्षाळीले वरीवरी। अंतरीचे शुद्ध कासयाने केले। भूषण मानिले आपणया।।' - श्रीतुकाराममहाराज, 'त्रिकुट शिखरावरती पाहे वस्ती ज्यांची आहे। इडा पिंगला सुषुम्नेच्या संगमी वसताहे।।' - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** संत श्रीगुरुदेवरानडेसाहेब यांनी अलाहाबाद येथे गंगाकाठी राहूनदेखील गंगेत स्नान करण्यापेक्षा आत्मतीर्थात स्नान करणे पसंत केले. तर श्रीमामामहाराजांनी रामनामकथागंगेत स्नान करणे पसंत केले. या दहा दोषांपैकी पहिल्या दोषाचे वर्णन श्रीमामामहाराज असे करतात ***'नाम महिमा वाढविता करणे संतनिंदा। हरीहर भेदा गुरु अवज्ञा।'.*** खरे नाम हाताला आलेले नसल्याने नामाचा महिमा संतांनी अवास्तव वाढविला असे वाटून संतांची मनोमन निंदा होणे हा दोष निर्माण होतो. खरे पाहिले तर संतांनी वर्णिलेले नाममाहात्म्य ही वस्तुस्थिती आहे. वस्तूची स्थिती आहे. त्यात अवास्तव काहीच नाही. आम्हाला वस्तूची स्थिती माहीत नसल्याने नाममहिमा अवास्तव वाटतो. वस्तू पाहिली तर वास्तव काय आहे हे समजणार. ***('आणियेली वस्तू कोठे ठेवियेली। आहे की जवळी नाही सांगा।।' - श्रीतुकाराममहाराज, 'गोविंद म्हणे नाम वस्तू। येर सर्वही अव्यतु।।' - श्रीमामामहाराज केळकर)*** संतांनी जी वस्तू अनुभवली तेच सांगितले आहे. नामाचे महत्त्व संतांनाच समजले ते देवाला पण कळले नाही. श्रीदासराममहाराज नित्यपाठात नामाचे महत्त्व देवाला का माहीत नाही याचा खुलासा असा करतात, 'सूर्याचा प्रकाश किती आहे याचा थांगपत्ता सूर्याला तरी कुठे आहे? त्याप्रमाणे देवाचे नाममाहात्म्य देवाला माहीत असण्याचे कारण नाही.' सूर्यप्रकाश आपण डोळस अनुभवतो त्याप्रमाणे देवाचे नाममाहात्म्य डोळस संतांनी अनुभवले. ***('तुझ्या नामाचा महिमा। तुज नकळे मेघश्यामा। तुका म्हणे आम्हा। जन्म गोड यासाठी।', 'नामाचा महिमा नेणेची पै ब्रह्मा। म्हणोनिया कर्मा अनुसरला।।' - श्रीतुकाराममहाराज)*** आपल्याला नामाचा अनुभव नाही म्हणजे खरे नाम आपण जाणलेले नाही म्हणून नाममाहात्म्य आपणास अवास्तव वाटते व संतनिंदा हे पाप आपले हातून घडते. संतांना शरण गेलो तरच अंतररंगे नाम बोलता येईल व नाममाहात्म्य अनुभवल्याने संतनिंदेचे पातक नाहीसे होईल. ***('संतनिंदा पाप कैसे घालवावे। संता शरण जावे दास म्हणे।।'-श्रीमामामहाराज केळकर)***

**

# हरीहरा भेद। कधी करू नये वाद

भगवान शंकरांची उपासना करणारे शैव व भगवान विष्णूची उपासना करणारे ते वैष्णव होय. एकेकाळी शैव व वैष्णव यांच्यामध्ये तीव्र स्वरूपाचे मतभेद होते. शैव लोक विष्णूचे नाव घेत नसत तर वैष्णव लोक शंकराचे नाव घेत नसत. 'शंकरपाळे' हा खायचा पदार्थ आहे. त्यात 'शंकर' नाव आहे म्हणून वैष्णव त्या पदार्थाला 'विष्णूपाळे' म्हणत. शैव आडवे गंध लावीत तर वैष्णव उभे गंध. वैष्णव उभे पोतेरे घालीत तर शैव आडवे पोतेरे. इतका कट्टरपणा. अहो शिव आणि विष्णू ही एकाच आत्मरूपाची नावे आहेत. ते दोघे एकरूपच आहेत. शवात जी एनर्जी (ई) आहे तोच शिव आहे व तोच केशव आहे. शवात चार देहावरची मात्रा 'के' प्रविष्ट झाली की तो केशव होतो असे श्रीदासराममहाराज सांगत. जसे पुढारी वरती एकच असतात पण त्यांचे अनुयायी मात्र भांडत असतात तसेच येथे देव एकच आहे पण अनुयायी उगीच भांडत असतात. अद्वैत परमार्थातच द्वैत फार आढळते. खरे सांगायचे झाले तर परमार्थात द्वैत, व्यवहारापेक्षा जास्त अनुभवाला येते. उपासना पद्धत वेगळी असू शकते पण ज्याची प्राप्ती करून घ्यायचे ते ज्ञान, ते आत्मरूप एकच आहे ना? जे एकच आहे त्याबाबत एकमत व्हावयास काय हरकत आहे? अहो तपशिलात फरक चालतो, तत्त्वात फरक चालत नाही एवढे तरी तारतम्य तात्विक, तर्कट, तत्वज्ञानी लोकांनी ठेवायला नको का? जेथे अद्वैत आहे त्या ठिकाणी द्वैत काय कामाचे? व्यवहारातले द्वैत आम्ही परमार्थात आणले, मग तो परमार्थ होईल का? तो परमार्थातला व्यवहारच होतो. आम्ही देव आणि देवी यात भेद करतो. देवात लिंगभेद संभवतो का? पण आम्ही देवाला देहधारी कल्पीत असल्याने हे सारे विकल्प तयार होतात. आम्ही डाव्या सोंडेचा गणपती व उजव्या सोंडेचा गणपती यात फरक करतो. बसलेले ज्ञानेश्वर व उभे राहिलेले ज्ञानेश्वर यात फरक करतो. मग काय परमार्थ कळला? असे खेदाने म्हणावे लागते. ज्याला काही अर्थ नाही त्या आकारालाच अर्थ प्राप्त झाला. मग तो परमार्थ कसा? हरीहरांचे अभेदत्व दाखविणारी संतवचने अशी -***'हरीहरा भेद। कधी करू नये वाद।। गोडी साखरेचे ठायी। एकमेकाची हृदयी।। भेदकासी नाड। एक वेलांटीच आड।। वाम सव्य भाग। तुका म्हणे एकची अंग।।' - श्रीतुकाराममहाराज, 'विष्णूसी भजला शिव दुऱ्हाविला। अध:पात जाला तया नरा।। शिवपूजा करी विष्णूसी अव्हेरी। तयाचिया घरी येम नांदे।। विष्णूकथा ऐके शिवासी जो निंदी। तयासी गोविंदी ठाव नाही।। नामा म्हणे शिवविष्णूमूर्ती एक। वेदाचा विवेक आत्माराम।।' - श्रीनामदेवमहाराज, 'भजन करी महादेव। राम पूजी सदाशिव।। दोघे देव एक पाही। तया ऐक्य दुजे नाही।। शिव रामा नाही भेद। ऐसे देव तेही सिद्ध।। जनी म्हणे आत्मा एक। सर्वा घटी तो व्यापक।।' - संत जनाबाई, 'हरीहर मूर्ती एकची असता भेद जे मानिती। कोण गती त्या होईल नेणो पुराणे बोलती।।' - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस.*** अहो हरी आणि हर म्हणजे एका परमात्म्याचे डावे-उजवे अंग आहे. म्हणून आपण त्यात डावे उजवे मात्र करायचे नाही. शरीरात श्वास घेणारा हा हरी तर शरीरातून श्वास बाहेर टाकणारा हर आहे. म्हणून उपासना हरी आणि हर या दोघांची करावी लागते. ***('आत घेता हरी टाकिता तो हर। भिन्नत्व विचार आहे कोठे।।'- संतवचन, 'एकादशी सोमवार न करिती। कोण त्यांची गती होईल नेणो।। हरीहरा नाही बोटभर वाती। कोण त्यांची गती होईल नेणो।।' - श्रीतुकाराममहाराज, 'आम्ही हरीहरांच्या दासी। अखंड झालो वैकुंठवासी।। आम्हा येणे जाणे नाही। आम्हा येथेची वैकुंठ पाही।।' - निजानंद)*** या हरीहरांचा अनुभव बिंदूरूपाने - बिंदूदर्शनाने साधकाला येतो व तो मुक्त होतो. ***('हरीहरांचिया मूर्ती। बिंदुल्यात येती जाती।। तुका म्हणे हे बिंदुले। तेणे त्रिभुवन कोंदाटले।।' - श्रीतुकाराममहाराज, 'ओळखिता हरीहर। मुक्त होती नारीनर।।' - श्रीमामामहाराज)***

**

# गुर्वाज्ञा साचार देव तेथे

ज्यांचा गुरुंच्यावर, गुरुवचनावर विश्वास आहे, गुरुंची आज्ञा ज्याला शिरसावंद्य आहे तो खरा सच्छिष्य ***(‘मुख्य सच्छिष्याचे लक्षण। सद्गुरुवचनी विश्वास पूर्ण। अनन्यभावे शरण। या नाव सच्छिष्य।।’ - समर्थ, ‘जो गुरुदास्ये कृषु। जो गुरूप्रेमे सपोषु। जो गुरूआज्ञे निवासु। आपणचि।।’, ‘जयाचे वक्त्र। वाहे गुरुनामाचे मंत्र। गुरुवाक्यावाचुनी शास्त्र। हाती न शिवे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जो शिष्याला इंद्रियदमन साधणारे साधन साधायची आज्ञा देतो किंवा जो कामक्रोधरहित, अभिमानरहित अवस्था प्राप्त करून देणारे रामनाम साधायची आज्ञा देतो तो सद्गुरू. ***(‘शिष्यास न लाविती साधन। न करविती इंद्रियदमन। ऐसे गुरू अडक्याचे तीन। मिळाले तरी टाकावे।।’ - समर्थ, ‘इंद्रियासी नेम नाही। मुखी राम म्हणूनी काही।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** या साधन साधण्याच्या आज्ञेने गुरुशिष्य हे नाते निर्माण होते. म्हणून या आज्ञेला गुरुआज्ञा - श्रेष्ठआज्ञा म्हणतात. ज्या आज्ञेने गुरुशिष्य हे नाते निर्माण होते ती गुरुआज्ञा आमरणांत आचरणात आणली पाहिजे. भले ती आज्ञा मौखिक नामस्मरणाची असेल, वारी करण्याची असेल, डोळे मिटून साधन साधणेची असेल. जे त्यांनी करायला सांगितले आहे व जे आपण करण्याचे मान्य केले आहे, ते तसे आणि तसेच आपण अत्यंत श्रद्धेने, नेमाने कडेपर्यंत आचरणे हे खरे आज्ञापालन. शरीराच्या कोणत्याही अवस्थेत तो नेम अंतरता कामा नये. जोवर शरीरात प्राण आहे तोवर आज्ञापालन व्हावयास हवे. ***(‘तुका म्हणे नेम प्राणासवे गाठी। तरीच या गोष्टी विठोबाच्या।।’ ‘सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण। जोवरी हा प्राण जाय त्याचा।’ - श्री तुकाराममहाराज)*** आमच्या श्रीमामामहाराजांनी गुरूआज्ञेचे शेवटच्या श्वासापर्यंत पालन केले. शेवटचा श्वास देखील नामाचे अनुभूतीत घेतला. सद्गुरू श्रीनारायणमहाराजांनी केलेली साधनाची आज्ञा व सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांनी केलेली अखंड कीर्तनाची आज्ञा त्यांनी शेवटपर्यंत पाळली. आज्ञापालनासाठी सर्वस्व वेचून पंचप्राणही समर्पण केले. केवढी ही गुरुनिष्ठा! केवढे हे गुरुआज्ञेवरचे प्रेम. ***(‘हनुमंत सद्गुरूआज्ञे केले अखंड कीर्तन। सर्वस्व वेचियेले समर्पिले पंचप्राण।।’, ‘हनुमंत आदेश प्राणासमान। गोविंद नेमे करी नामकीर्तन। सेवा घडे सेवक बुद्धीनेही। पदांबुजी बालक राम राही।।’ - श्रीदासराममहाराज, ‘गुरुआज्ञा करिती जैसी। आचरणी ठेवी तैसी।।’ - श्रीमामामहाराज)*** एवढी अडतीस वर्षे एकही दिवस खंड न होता अखंड सेवा झाली. पण या सेवेचा बोलबाला नाही, अहंकार नाही, जाणीव देखील नाही. ते कधीही महाराज झाले नाहीत. सेवा सेवक बुद्धीनेच झाली हे केवढे विशेष आहे. गुर्वाज्ञेबद्धल कोणताही विकल्प न ठेवता होणाऱ्या निंदेकडे पाठ करून श्रीमहाराजांचे आशीर्वादाने गुर्वाज्ञेचे पालन केले व ते देवरूप झाले. अहंकाराच्या अभावे ते स्वभावे देव झाले. ***(‘विकल्प निंदा त्यागे आशीर्वाद थोर। गुर्वाज्ञा साचार देव तेथे।’ - श्रीमामामहाराज)*** आम्ही अनुग्रह घेतो, सारे काही मान्य करतो, पण अनुग्रह म्हणजे हेच का ते? असे वाटते. विकल्प आल्याने हातून काही घडत नाही. म्हणून सद्गती काही प्राप्त होत नाही. सद्गती झाली तर साक्षात्काराच्या गोष्टी. साक्षात्कार न झाल्याने अहंकार काही जात नाही व गुरु उपदेशाचा काही परिणाम होत नाही. गुरूंची आज्ञा जर पाळली नाही तर त्याचा परिणाम काय होतो हे श्रीतात्यासाहेबमहाराजांचे श्रेष्ठ चुलते श्रीवामनकाका कोटणीस सांगतात ***‘गुरुची अवज्ञा जो का शिष्य करी। जाय तो अघोरी कुंभपाकी।।’*** श्रीतुकाराममहाराज आपल्या प्रेमापोटी तळमळीने सांगतात, ***‘किती सांगो तरी नाईकती बटकीचे। पुढे शिंदळीचे रडतील।।’*** सद्गुरूंनी जे डोळे झाकून साधन करावयास सांगितले आहे त्या आज्ञेकडे डोळेझाक करून चालणार नाही तर प्रत्यक्षात डोळे झाकावे लागतील व तेही अखेरचे डोळे झाकावयाचे आधी’ असे श्रीदासराममहाराज सांगत. डोळे झाकून स्वरूपाकडे पाहिले तरच गुरूकृपा होणार. साधनेने कृपा व कृपेने साधन साधणार आहे.



✻✻

# नाम प्रशंसा म्हणे

गुरूंच्या आज्ञेप्रमाणे साधनाचा अभ्यास झाला तर येण्याजाण्याची क्रिया बंद होऊन इडा आणि पिंगला या नाड्या बंद होऊन - वय कुंठीत होऊन - जीवन उर्ध्वगामी होते. आत्ता जी श्वसनक्रिया उलट्या ∪ सारखी म्हणजे ∩ सारखी वाहते आहे ती सरळ वाहते. आत घेता हरी व टाकिता तो हर. या हरी हराच्या मधील भेदाला कारणीभूत वेलांटी नाहीशी होते. हरीहराचे ऐक्य अनुभवून हरीहरातील भेद नाहीसा होतो. जीवन उर्ध्वमुख झाल्याने देवभक्तातील भेद कमी होतो. निश्वासाला प्रमाण येऊन वेदांना, शास्त्रांना प्रमाण असणारे नारायण नाम श्रुत होते. तेच जर गुर्वाज्ञेप्रमाणे साधन केले नाही तर गुरू अवज्ञा होते. साधन न केल्याने साधन उरते व नामजप श्रवण होत नाही. नामजप श्रवण होऊ लागला की साधन उरत नाही. ज्यांचे साधन उरले आहे त्यांना संतांनी वर्णन केलेल्या वेदांना, शास्त्रांना प्रमाण असणाऱ्या सत्य नामाचा अनुभव येत नाही. त्यामुळे त्यांना संतांनी जे नामाचे महत्त्व सांगितले आहे तेवढे त्याचे महत्त्व आहे का? असा संशय-विकल्प नाम घेताना येतो. आम्ही आमचे समजुतीप्रमाणे काल्पनिक नाम घेतो व अपेक्षा संतांनी सांगितलेल्या सत्य नामाची महती अनुभवायची करतो. काल्पनिक नामाने सत्य नामाचे महत्त्व कसे अनुभवाला येणार? म्हणून संतांनी सांगितलेले नामाचे महत्त्व हे वस्तुत: वस्तुस्थिती असताना आम्हाला अनुभवाला न आल्याने नामाची प्रशंसा वाटते. रामनामाचा जप केला असता काम-क्रोध-अभिमान नाहीसा होतो असे श्रीतुकाराम महाराज स्वानुभवाने सांगतात. ते म्हणतात, ***'राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'*** आम्ही एवढे रामनाम घेतो पण यातले काहीच घडत नाही, असे का? संतांनी काही खोटे सांगितले आहे का? - नाही. संतांना अपेक्षित रामनाम आपण घेत नाही. मग कसा अनुभव येणार? म्हणून आम्हाला ती प्रशंसा वाटते. संत कबीरसाहेब म्हणतात, ***'राम राम सब कुछ कहे। ठक ठाकूर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम कुछ और।'*** संतांना नाम कसे अपेक्षित आहे हे संत कबीरसाहेब सांगतात, ***'होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।'*** तर श्रीसमर्थ या सत्यनामाबद्दल असे सांगतात, ***'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।'.*** 'प्राण' जेव्हा स्तब्ध होतो तेव्हा रामजप अनुभवाला येतो. अहो ज्या नामाने नामी आत्माराम प्रगट हेतो ते खरे नाम. ***(एका जनार्दनी नाम। नामी प्रगटे आत्माराम। - श्रीनाथमहाराज)*** कल्पना सरल्यावर निर्विकल्प अवस्थेत जे नाम अनुभवाला येते, त्या निर्विकल्प नामाबद्दल आमचे मनात विकल्प, ज्या नामाला विकल्प (पर्याय) नाही, त्या एक नामाबद्दल आमचे मनात विकल्प (संशय), मग आम्हाला काय साधणार? नाम हे घ्यायचे नसून ते जाणायचे आहे, अनुभवायचे आहे. म्हणून नाम हे सद्गुरूंकडून समजून घ्यावे लागते. नाम म्हणजे जाणीवेत येणारे ब्रह्म आहे. ***('नामा म्हणे तरी सद्गुरूपासोनी। नाम घ्या जाणोनी नाना काही।।' - श्रीनामदेवमहाराज, 'नाम जाणे तुकयावाणी। दिले संसाराला पाणी।।' - श्रीतुकाराममहाराज, 'नाम जपयज्ञ तो परम। बाधू न शके स्नानादी कर्म। नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।', 'घेऊनी येथिचे वर्म। जै विचारिसी हे नाम। तै केवळ हेचि ब्रह्म। जाणसी तू।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण जर सत्य नाम जाणले तरच हा दोष नाहीसा होणार आहे.

✲✲

# वेदशास्त्र निंदणे

वेदशास्त्राचा अधिकार ब्राह्मणांना आहे, इतरांना नाही व यामुळेच वेदशास्त्राची निंदा होते. हे वेदशास्त्राचे अधिकारी आपण समजतो ते, जन्माने ब्राह्मण असणारे ब्राह्मण का? भगवंतांच्या निश्वासातून हे प्रगट झालेले वेद भगवंताचीच सर्व लेकरे असताना ठरावीक लोकांना झुकते माप देतील हे संभवत नाही. उच्च-नीच हा भेद भगवंतापाशी असेल का? अद्वैतब्रह्म हा वेदाचा प्रतिपाद्य विषय आहे. वेदात भिन्न विषय आलेले आहेत असे म्हणणे हे आपले अज्ञान आहे आणि अद्वैत ब्रह्मज्ञान हे कोणीही बोलावे इतके सोपे नाही. अद्वैत चैतन्य म्हणजे काय हे ज्यांना माहीत नाही त्या देहबुद्धीच्या - जडबुद्धीच्या लोकांनी जर वेदाचा अर्थ केला तर तो तसाच जड होणार. त्या अर्थात चैतन्य असणार नाही. म्हणून वेदाचा अधिकार, अद्वैती समरस झालेल्या, ब्रह्मज्ञान असणाऱ्या संत ब्राह्मणांना आहे. ***(‘वेदशास्त्री अधिकारी ब्राह्मण। नामासी अधिकारी चारी वर्ण। जग उद्धरावया कारण। नाम जाण पै माझे।।’, ‘जे ज्ञानधने अतिसंपन्न। परमपवित्र विज्ञाने जाण। ऐसे ब्रह्मभूत जे ब्राह्मण। यज्ञद्वारा यजन करिती माझे।।’ - श्रीनाथमहाराज, ‘करिती ब्रह्मनिरूपण। जाणती ब्रह्म संपूर्ण। तेचि जाणावे ब्राह्मण। ब्रह्मविद।।’ - समर्थ, ‘ऐसे पुण्य पुज्य जे ब्राह्मण। आणि माझ्या ठायी अति निपूण। आता माते पावती हे कवण। समर्थणे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘ब्रह्मज्ञान नोहे लेकुराच्या गोष्टी। व्हावा लागे पोटी अनुताप।। - श्रीतुकाराममहाराज)*** देहबुद्धीच्या लोकांनी शब्दार्थ करून वेदातील जड भाग उचलला. आत्मबुद्धीच्या प्रज्ञावंत संतांनी वेदातील ‘चैतन्यनिजधाम नाम’ उचलले व ते सर्व लोकांना सांगून ब्रह्मज्ञान सर्वांसाठी खुले केले. देहबुद्धीच्या अनाधिकारी लोकांनी वेदाचे जड अर्थ करून अनर्थ केला व वेद निंदेला पात्र ठरले. ***(‘वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा। इतरानी वाहावा भार माथा।।’, ‘विश्वी विश्वंभर। हे तो वेदांतीचे सार।।’ , ‘वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाची साधिला। विठोबासी शरण जावे। निजनिष्ठे नाम घ्यावे।।’ - श्रीतुकाराममहाराज, ‘वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन। एक नारायण सार जप।।’, ‘चहुवेदी जाण षष्टशास्त्री कारण। अठराही पुराणे हरीसी गाती।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ब्राह्मण शब्दाचा अर्थ चुकीचा झाल्याने श्रीतुकाराममहाराजांना वेदाचा अर्थ मराठीत प्रगट करण्यास त्यावेळच्या तथाकथित जडबुद्धीच्या जातीच्या ब्राह्मणांनी विरोध केला. पण भगवंतकृपेने खरा अर्थ तरला व खोटा अर्थ बुडाला. श्रीरामेश्वरभट्ट श्रीतुकाराममहाराजांचे शिष्य झाले. श्रीतुकाराममहाराजांचे कृपेने खरे ब्राह्मण झाले. ज्याला वेदाचा खरा अर्थ कळला तो वेदाची निंदा करत नाही. तो समर्थ होतो. ग्रंथांचा अर्थ न पाहता अनर्थ पाहून जो नावे ठेवतो तो ग्रंथ समजण्यास असमर्थ ठरतो, मूर्ख ठरतो. ***(‘रात्रंदिवस पाहे अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ। परलोकीचा निजस्वार्थ। तेथेचि घडे।।’, ‘समूळ ग्रंथ पाहिल्यवीण। उगाच ठेवी जो दूषण। गुण सांगता पाहे अवगुण। तो येक पढतमूर्ख।।’ - समर्थ)*** वेदशास्त्रामध्ये नाम कसे अनुभवायचे याची कृती सांगितली आहे. ती नामाची कृती जर आपण साधली तर रामाची आकृती दिसणार आहे. ज्या नामाच्या कृतीने आम्हाला देव दिसणार ती नामाची कृती ज्यात सांगितली आहे त्या वेदशास्त्राची निंदा करून कधी देव भेटेल का? ***(‘वेदशास्त्र नामकृती। निंदिता कैची देवप्राप्ती।।’ - श्रीमामामहाराज केळकर)*** हे सागराएवढे प्रचंड ज्ञान असणारे वेद हे भगवंताच्या निश्वासातून प्रगट झालेले आहेत.  अर्थात वेद हे भगवंतांनी निर्माण केलेले आहेत. मग त्या वेदांची निंदा करून तो कसा प्राप्त होईल? ***(‘हा वेदार्थ सागरू। जया निद्रिताचा घोरू। तो स्वये सर्वेश्वरू। प्रत्यक्ष अनुवादला।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे देवरूप सच्चिदानंद संत - ब्राह्मण - ऋषी - म्हणजे मूर्तिमंत वेद आहेत. ते जे स्वभावे बोलतात तेच वेद-ब्रह्मनिरूपण-आहेत. म्हणून वेदांची निंदा म्हणजे संतांची निंदा होय. ***(‘ब्राह्मण वेद मूर्तिमंत। ब्राह्मण तोचि भगवंत। पूर्ण होती मनोरथ। विप्रवाक्ये करोनी।’ - समर्थ, ‘तयाचे बिसाट शब्द। सुखे म्हणो येती वेद। सदेह सच्चिदानंद। का नोहावा तो।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** वेदाची निंदा म्हणजे नामस्मरणाची निंदा, संतांची निंदा.

**

# नामे पाप जाणे मग करा

हरीनामाच्या उच्चाराने पापाच्या राशीच्या राशी क्षणार्धात जळून भस्मसात होतात. याचा अर्थ असा नाही कितीही पाप करा व हरीनाम घ्या, झाली पापातून सुटका. जुन्या काळी (हल्ली ही पद्धत राहिली नाही) चुकून जर दुसऱ्याला पाय लागला तर नमस्कार करीत. मग ज्याला पाय लागला असेल तो क्षमा करीत असे. समजा आम्ही एखाद्याला हेतूपूर्वक लाथ घातली व नंतर नमस्कार केला तर चालेल का? तो माफ करेलच असे नाही. लाथेला प्रतिलाथ बसेल. चुकून निर्हेतुक पाप घडले तर ते नामाने जाते. जाणूनबुजून जर पाप घडले तर वज्रलेप होते. श्रीमामामहाराज आपणास सावध करीत आहेत. ते सांगतात, ***'नाम घेता पाप जाते। पाप केल्या काय होते। बुध्द्या आचरिता पाप। होत असे वज्रलेप।।'*** जोवर आपण काळवेळेने मर्यादीत कर्म म्हणून नाम घेत असतो, तोवर हा अपराध होतच राहणार. कारण आपण दिवसातील ठरावीक काळी नामाला सन्मुख व बाकी सर्व काळ नामाला विन्मुख राहणार. याचा अर्थ काही काळ नामाने पुण्य जोडणार व बाकी सर्व काळ पाप करणार. पाप करायचे ते नामाने घालवायचे, परत पाप करायचे. जणू काही नाम घेणाऱ्याला पाप करायचे लायसेन्सच आहे. हा दोष घालवायचा असेल तर अष्टौप्रहर साधन - नामस्मरणाची स्थिती साधली पाहिजे. तरच पापपुण्यातीत शुद्ध पुण्याची प्राप्ती होईल. देहाच्या जाणीवेने, ज्या चैतन्यामुळे - आत्म्यामुळे देहाची जाणीव होते, त्या चैतन्याची जाणीव होत नाही. 'देह म्हणजेच मी' असे वाटू लागते. त्यामुळे चैतन्य आहे का नाही हा संशय निर्माण होतो. हा संशय येणे हेच मोठे पातक आहे. ***('देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।' - समर्थ, 'म्हणऊनि संशयाहोनी थोर। आणिक नाही पाप घोर। हा विनाशाची वागूर। प्राणियासी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देहाची जाणीव संदेहाचे कारण असल्याने देह हा असत्य, असार, पापाचे कारण मानला जातो. ***('पापाचे बनले जाण हे शरीर। असत्य असार सांगितले।।' - श्रीदासराममहाराज, 'अविश्वासियाचे शरीर सुतकी। चांडाळ पातकी महादोषी।।' - श्रीतुकाराममहाराज)*** देह म्हणजे मी या पापाच्या विचाराने, वेगळेपणाने होणारे आचरण पापाचे कारण होते. हा पापाचा विचार अर्थात देहाची जाणीव नाहीशी झाली व चैतन्याची जाणीव झाली तरच रामनामाचा सदाचार घडणार. ***('अन्य आचरणी पातकांच्या राशी। जातील लयासी नाममात्रे।।', 'रामनाममुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।।' - श्रीमामामहाराज केळकर)*** या जन्ममरण चुकविणाऱ्या रामनामाच्या आचरणाला पुण्य म्हणतात. ***('चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य। पापकर्म तेचि जाण। जेणे चुकेना बंधन।। - श्रीदासराममहाराज)*** हा सदाचार-नामाचा आचार - निरंतर घडला तर पाप होतच नाही. म्हणून नामाचे-चैतन्याचे अनुसंधान सतत राहिले पाहिजे. 'जर अनुसंधान सुटले तर ते परत लागावयास दुप्पट काळ लागतो' असे श्रीदासराममहाराज सांगत. चैतन्याच्या जाणीवेने पाप नाहीसे होते, मग काही काळ देहाच्या जाणीवेची गंमत घेऊन पाप केले तर काय होते? हा वृत्तीदोष नाहीसा व्हायला हवा तरच हे पापाचे कारण असणारे पापी शरीर पुण्यशरीर होणार आहे. ***('नाम स्मरे निरंतर। ते जाणावे पुण्यशरीर। महादोषांचे गिरीवर। रामनामे नासती।।' - समर्थ)*** साधनाभ्यासाने तिन्ही अवस्थांची एक अवस्था झाली तरच हे अखंड नामानुसंधान साधणारे आहे. अखंड नामानुसंधानाने वृत्तीरहित होऊन हा वृत्तीदोष नाहीसा होणार आहे व सर्व सुखाची प्राप्ती होणार आहे. ***('तुका म्हणे मग न ये वृत्तीवरी। सुखाचे शेजारी पहुडेन।।' - श्रीतुकाराममहाराज)***

✻✻

# व्रतदान नामासमान

आपण जे व्रत करतो ते इच्छापूर्तीसाठी. हरतालिका व्रत चांगला नवरा मिळावा म्हणून तर सावित्रीचे व्रत जन्मोजन्मी हाच चांगला नवरा मिळावा म्हणून करतो. व्रताने आपल्या इच्छा पूर्ण होतात. सर्वसाधारणत: दान करतानासुद्धा आपला लौकीक व्हावा, पुढे यातून देवाने याहीपेक्षा चांगले आपणास द्यावे हा हेतू असतोच. याउलट नामाने इच्छा, वासना (दृश्यातील) नाहीशा होतात. तर नित्याच्या नेमाच्या एक नामाने अंतरीचा काम नाहीसा होतो. ***('रामनाममुखी नित्यनेमे गाता। त्या नसे मागुता जन्म घेणे।। नित्याचे नेमाचे असे एक नाम। घेता सरे काम अंतरीचा।।' - श्रीमामामहाराज केळकर. 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।।' - श्रीनाथमहाराज)*** व्रत केल्याने व्रतस्थ माणसाला मन:संयम, इंद्रिय संयम साधतो. आमचे श्रीदासराममहाराज कीर्तनात ज्या चांद्रायण व्रताचे वर्णन करीत त्या व्रतात रोज मोजकेच घास आहार घ्यावा लागतो. अर्थात मन:संयम, इंद्रियसंयम साहजिकच होतो. माझे जे आहे ते दान दिल्याने परमार्थात 'मी' त्यागण्याची पार्श्वभूमी तयार होते. म्हणून व्रत, दान हे परमार्थाला पूरक आहेत हे निश्चित. व्रतदानाने नाम अनुभवणे सुकर होते. निरनिराळी व्रते करणे, समाजोपयोगी दान करणे यामुळे समाजात पुण्यवान पुरूष म्हणून चांगुलपणा मिळेल, पापपुण्यातील सापेक्ष पुण्यात्मक पापाने मरणोत्तर स्वर्गप्राप्ती होईल. स्वर्गात अमृत प्राशन करणे, नंदनवनात फिरणे आदी स्वर्गसुख भोगता येईल. पण जीवनमुक्त होता येणार नाही. पुण्यक्षय झाला की पुन्हा मृत्यूलोकी जन्म घ्यावा लागेल. 'क्षीणे पुण्ये मृत्यूलोकं विशन्ति' हे वचन प्रसिद्धच आहे. पुण्य जास्त झाले तर उर्ध्वयोनी, पाप जास्त झाले तर अधोयोनी, पापपुण्य समान झाले तर नरदेहाची प्राप्ती, या संकेताप्रमाणे त्याला उर्ध्वयोनी प्राप्त होईल इतकेच. पण जन्ममरणाचे चक्रातून सुटका होणार नाही. ***('अत्यंत सुकृते स्वर्गा चढे। अत्यंत पापे अधोगती घडे। पापपुण्य नि:शेष झडे। तै आतुडे निजमुक्ती।।', 'जै पापपुण्य समान समी। तै मनुष्यदेह आक्रमी। जन्म पावे कर्मभूमी। आश्रमधर्मी सुमेधा।।' - श्रीनाथमहाराज, 'अनेक विधाने करोनी चांगला। परी नाही आला मोक्षवाटे।।' - श्रीमामामहाराज, 'मोक्ष नव्हे स्नाने मोक्ष नव्हे दाने। तपतीर्थाटणे मोक्ष नव्हे।।' - श्रीतुकाराममहाराज)*** देहावर राहून देहबुद्धी वाढविणारे नियम, व्रते करून होणाऱ्या पुण्यात्मक पापाने मोक्षाची, देवाची प्राप्ती होत नाही. म्हणून असले नियम, व्रते, तीर्थयात्रा काही करू नका. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***'व्रते नियमु न करावे। शरीराते न पीडावे। दुरी केही न वचावे। तीर्थासी गा।।'.*** व्रते, नियम, दान आदी कर्मानी होणाऱ्या पुण्याची-पुण्यात्मक पापाची बरोबरी नामाने होणाऱ्या शुद्ध पुण्याशी - थोर पुण्याशी होऊच शकत नाही. ***('गोकोटीदानं ग्रहणेषु काशीप्रयाग गंगायुत कल्पवास:। यज्ञायुतं मेरू सुवर्णदानं गोविंद नाम्ना न कदापि तुल्यं।।' - पांडवगीता, 'देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य। झालिया दर्शन मुक्ती लहे।।' - श्रीमामामहाराज केळकर, 'स्वर्गा पुण्यात्मके पापे येइजे। पापात्मके पापे नरका जाइजे। मग माते जेणे पाविजे। ते शुद्ध पुण्य।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जयामध्ये नारायण। शुद्ध पुण्य ते एक।।' - श्रीतुकाराममहाराज)*** म्हणून नामाची बरोबरी या व्रत, दान आदी विधानांबरोबर होऊच शकत नाही. नाम हे परमात्मप्राप्तीसाठी सर्वश्रेष्ठ आहे. म्हणून नेम करायचा असेल तर नामाचा करा. लक्ष्मीवल्लभ परमात्मा प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. किंबहुना नामातच सर्व परब्रह्माचे वास्तव्य आहे. ***('नित्यनेम नामी ते प्राणी दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ तयाजवळी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'गोविंद म्हणे सर्व नामामाजी वसे। सकळा श्रेष्ठ कसे नव्हे सांगा।।'-श्रीमामामहाराज, 'नाम श्वासोश्वासी असे। परब्रह्म तेथे वसे।।' - समर्थ)***

**

# अभाविका उपदेशन

ज्यांच्यावर उपदेशाचा काही परिणाम होत नाही, ते सारे अभाविकच. लोकांवर उपदेशाचा परिणाम का होत नाही याचे कारण श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।। तैसे चित्त शुद्ध नाही। तरी बोध करील कायी।।'*** तर याचे निदान श्रीसमर्थ असे सांगतात, ***'निद्रा आळस दुश्चितपण। हेचि मूर्खाचे लक्षण। येणेकरिता निरूपण। उमजेचिना।।'***. अहो आपण गुरुउपदेश घेतो पण निवांत बसून साधन कोण करणार? आळसाने खाल्ले आहे आम्हाला. खायचे आणि झोपायचे याशिवाय काही सुचतंय का? साधन केले तर मन घटणार, मन,चित्त शुद्ध होणार. अहंकार जाणार व आत्मसाक्षात्काराने आत्मबोधाच्या वोवरा पहुडणार. ***('बैसोनि निवांत। शुद्ध करी चित्त। सायासाचे फळ। बैसलिया।।' - श्रीतुकाराममहाराज, 'जो रसनेंद्रियाचा अंकिला। कां निद्रेसी जीवे विकिला। तो नाही एथ म्हणितला। अधिकारिया।।', 'तरी जयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** उपदेशाचा परिणाम साधकाचा अहंकार जाण्यात किंवा 'नुरोनिया ठेला' अशी अवस्था होण्यात झाला पाहिजे. ***('उपदेश घेता सुख वाटे। मुख्य ते गळाली पाहिजे अहंता।।' - श्रीतुकाराममहाराज)*** तसा अहंकार जाणे हा परिणाम होत नसल्याने अभाविकांची संख्या जास्त आहे असेच म्हणावे लागते. पण आमच्या दृष्टीने भाविकांची गर्दी खूप आहे. देवळात पाय ठेवायला जागा नाही अशी अवस्था आहे. दिवस दिवस रांगेत उभे राहून दर्शन घेणारी माणसे खूप आहेत. ही लोकांची भावना आहे, हा भाव नव्हे. खरे पाहिले तर देव आहे पण आमचे ठायी अभाव असल्याने तो जाणवत नाही. आमचे ठायी जर भाव असेल तर देवाची जाणीव होते. ***('नसता देव प्रगट होई। ऐसे भावफळ पाही।। अभावाचे फळ पाही। असता देव नाही होई।।' - श्रीमामामहाराज केळकर)*** देवाची जाणीव म्हणजे कशाची जाणीव होते? आपल्या अस्तित्वाची. अहो अस्तित्व हाच देव आहे. ज्या अस्तित्वाने आम्हाला देहाची, दृश्याची जाणीव होते त्या देहाच्या, दृश्याच्या जाणीवेने अस्तित्वाची जाणीव होत नाही. मन आहे तोवर देहाच्या, दृश्याच्या जाणीवेचा भाव व चैतन्याच्या जाणीवेचा अभाव. साधनाने मन मुरले तर संकल्प विकल्परहित अवस्थेत चैतन्याच्या जाणीवेचा भाव व देहाच्या, दृश्याच्या जाणीवेचा अभाव. या चैतन्याच्या जाणीवेवर - भावावर प्रेम करणे ही भक्ती. ज्यांचे ठिकाणी संकल्पविकल्प नाही, संशय नाही, ज्यांचे ठिकाणी चैतन्यभाव - सोहं भाव जागृत आहे, त्या भाविकाला उपदेश झाला तर त्याला 'अहंकार जाणे' हा बोध होतो. जे अश्रद्ध आहेत, अभाविक आहेत, ज्यांना इंद्रियसंयम साधलेला नाही अशा अभक्त, तपोहीन लोकांना उपदेश करून त्यांना सत्यज्ञानाची प्राप्ती होणार नाही. ***('श्रद्धावान लभते ज्ञानम् तत्परः संयतेंन्द्रियः। ज्ञानम् लब्ध्वा पराम् शांतीम् आचिरेण अधिगच्छती।।', 'इदम ते न अतपस्काय न अभक्ताय कदाचन। नच अशुश्रूषवे वाच्यम् न च माम् यः अभ्यसुरती।।' - श्रीमद्भगवद्गीता. 'तरी तुवा हे जे पार्था। गीताशास्त्र लाधले आस्था। ते तपोहीना सर्वथा। सांगावे ना हो।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून श्रीतुकाराममहाराजांनी भाविकांना बोध केला. ते म्हणतात ***'ऐका ऐका भावीक जन। कोण कोण व्हाल ते।। तार्किकांचा टाका संग। पांडुरंग स्मरा हो।। नका शोधू मतांतरे। नुमगे खरे बुडाल।। कलीमध्ये दास तुका। जातो लोका सांगत।।'*** तर जगद्गुरू शंकराचार्य 'ब्रह्म तर्कातीत आहे' हे ज्याच्या लक्षात आले आहे अशा दिग्मूढ झालेल्या लोकांना बोध करतात. ते म्हणतात, ***'भज गोविन्दं भज गोविन्दं गोविन्दं भज मूढमते।'***

**

# नाम महिमा आयकोन प्रिती नाही

जर अभाविकाला उपदेश केला तर 'नाममहिमा ऐकोन प्रीति नाही' असाच अनुभव येणार. अहो अरसिक माणसासमोर कवीत्व वाचले तर कधी दाद मिळेल का? अहो वाणीला कवित्वाने शोभा येते. कवीत्व हे रसीकत्वाने खुलते आणि रसिकत्वाला परतत्वाचा स्पर्श असेल तर कवित्व अधिकच बहरते. ***('अरसिकेषुकवीत्वं निवेदनं शिरसी मा लिख मा लिख।।' - संस्कृत वचन, 'वाचे बरवे कवित्व। कवित्वी बरवे रसिकत्व। रसिकत्वी परतत्व। स्पर्शु जैसा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जो माणूस देहावर, दृश्यावर, बहिरंगावर प्रेम करतो आहे, तो लगेच चैतन्यावर, अंतरंगावर कसे प्रेम करेल? हा येथे प्रश्न आहे. तो आत वळायला काही टर्निंग पॉईंट यावा लागेल का नाही? जो चांगला त्रिविध तापे होरपळेल, संसारदु:खाने गांजला जाईल तोच परमार्थाकडे वळतो. ***(जो संसारदु:खे दुखावला। जो त्रिविधतापे पोळला। तोचि अधिकारी जाला। परमार्थासी।।' - समर्थ)*** जगाबद्दल, देहाबद्दल असणारी आसक्ती नाहीशी झाली तर नामाबद्दल, चैतन्याबद्दल प्रेम निर्माण होणार. मन जोवर विषयसुखात गुंतले आहे, जोवर दृश्यातील आशा जात नाही, तोवर कीर्तनात झोपच येणार. तोवर अज्ञानाचे ज्ञान कधीही होणार नाही. तोवर ***'नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी।।'*** असाच अनुभव येणार. मग नामाबद्दल प्रेम कुठून येणार? श्रीनामदेवमहाराज आपल्या या अवस्थेचे वर्णन असे करतात, ***'अमृताहूनी गोड नाम तुझे देवा। मन माझे केशवा का बा नेघे।। सांग पंढरीराया काय करू यासी। का रूप ध्यानासी न ये तुझे।। कीर्तनी बैसता निद्रे नागविले। मन माझे गुंतले विषयसुखा।। हरीदास गर्जती हरीनामाच्या कीर्ती। न ये माझ्या चित्ती नामा म्हणे।।'*** विषय आणि इंद्रिये जड आहेत हे ओळखून मूळ चैतन्याचे प्रेम निर्माण झाले तर चैतन्याची प्रेमवाणी श्रुत होणार. श्रीदासराममहाराज या प्रेमवाणीबद्दल असे सांगतात, ***'वैराग्यावाचोनी। मिळेचिना प्रेमवाणी।। वैराग्यात प्रगटे प्रेम। प्रेमामाजी उपजे नाम।। प्रेमयुक्त नाम। नामामाजी प्रगटे राम।। म्हणोनी नाम स्मरा। राम म्हणे भव तरा।।'*** तर संत शिवराम या निरतिशय प्रेमाबद्दल-भक्तीबद्दल असे सांगतात, ***'विषय इंद्रिये जड ओळखणे। या नाव विरक्ती।। चैतन्याकडे वृत्ती वळविणे। या नाव भक्ती।।'*** ज्या आत्म्यामुळे हा देह पावन आहे, त्या आत्म्याचा अनुभव सर्वसाक्षी मनाला आला पाहिजे तरच मनाला गोडी लागून प्रेमयुक्त हरीनाम श्रवण होईल. याकरता 'रामकृष्णी आवडी' सर्वकाळ निर्माण व्हावी लागेल. ***('का जे यया मनाचे एक निके। जे देखिलिया गोडीचे ठायी सोके। म्हणोनी अनुभवसुखची कवतिके। दावीत जाईजे।।', 'ज्ञानदेवा गोडी हरीनामाची जोडी। रामकृष्णी आवडी सर्वकाळ।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'लक्ष ठेवोनिया आत्म्यावरी राही। प्रेमे नाम गाई अखंडीत।।' - श्रीदासराममहाराज, 'प्रकाशित होता अंतरीची ज्योती। जडेल आसक्ती रामनामी।।' - श्रीमामामहाराज)*** मनाला नामाची गोडी लागली की त्याला नाम घेणेची सक्ती करावी लागत नाही. नामाबद्दल आसक्ती-प्रेम निर्माण होते. ज्या गुणातून-जाणीवेतून हे त्रिगुण प्रगट होतात, त्या शुद्ध सत्वगुणावर - शुद्ध जाणीवेवर - नितांत प्रेम करणे हा साधनाचा क्रम जो आचरतो त्यालाच हे नामाचे प्रेम लाभते व तो जगात धन्यता प्राप्त करतो. श्रीसमर्थ सांगतात, ***'मनी लोचनी श्रीहरी तोचि पाहे। जनी जाणता भक्त होऊनी राहे। गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।'*** ज्याचे मन संपूर्णपणे प्राणापानाचे ठिकाणी मुरले आहे, ज्याचे मन साधनी घटले आहे, त्या सर्वोत्तमाच्या दासाला सर्व जग भगवद्रूप दिसते. संत सांगतात, ***'नाम चिंतनी जडली प्रीति। भगवद्भाव सर्वभूर्ती।। हेची परमार्थ साधन। मुखी नाम हृदयी ध्यान।।'.***

**

# सत्संग न करणे

आपले असत् रूप - खोटे रूप - प्रगट आहे म्हणून सत्यस्वरूप लोपलेले आहे. 'देह म्हणजे मी' हे आपले असत् रूप आहे. या देहाचे नाम व रूप कालांतराने वहिवाटीलाही कोणी ठेवणार नाहीत. हे वहिवाटीलाही न राहणारे देहाचे नामरूप जर आपण विसरलो - देहभानाचा विसर झाला तरच हे सत्पण प्रगट होणार - सत्संग होणार. ***('माझे असतपण लोपो। नावरूप हारपो। मज झणे वासिपो। भूतजात।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्या वाऱ्याने देहाची जाणीव होते व देहावर आपली सतत नजर राहते, त्या चैतन्याच्या वाऱ्यावर जर आपली नजर पडली, तर हे देहाचे भान नाहीसे होणार व चैतन्याचे भान येणार. 'देह म्हणजे मी' हे जाणवून देणारे अहंकाराचे वारे नाहीसे झाले तर चैतन्याच्या वाऱ्याची संगत होणार. ***('अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकासी।।' - श्रीनामदेवमहाराज, 'त्याच्या संगतीचा लागो मज वारा। तेणे सखया पावेल पैलतीरा।।' - संतवचन, 'वाऱ्यावरी लागली नजर। देहभानाचा पडला विसर।।' - श्रीदासराममहाराज)*** आत्माराम प्रगट होणे म्हणजेच बरवा संतसमागम आहे. आपले हरविलेले आत्मसुख प्राप्त होणे म्हणजे खरा संतसमागम आहे. संतांना जी गती आहे, ती गती-समगती प्राप्त होणे-समत्व दाखविणारी गती प्राप्त होणे व त्या गतीप्रमाणे रामनामाचा सदाचार घडणे म्हणजे संतसंगती घडणे होय. आपले जे अनादी मूळ रूप आहे ते 'काहीच न करोनी प्राणी' या समर्थ अवस्थेत प्रगट होणे म्हणजे संतसंग आहे. ***('बरवा संतसमागमू। प्रगटला आत्मारामू।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संतसमागम आत्मसुखाचा। सुंदर उगवे मोद।।' - संत श्रीअमृतराय, 'संगती म्हणजे समगती जाणे। दाविताती खुणे संतराय।।' - श्रीमामामहाराज, 'तेचि गत बाई। आचार तिचे ठायी।।' - निजानंद, 'रामनामगती देहात प्रचिती। धरोनिया चित्ती राम बोले।।' - श्रीमामामहाराज, 'नका करू काही संतसंगधरा। पूर्वीचा हा दोरा उगवेल।।' - श्रीतुकाराममहाराज)*** ज्यांचे सत्शी - अद्वैताशी तादात्म्य आहे अशा संतांची संगत घडली तर मनोमार्ग सापडणार, अंतरंगी नाम कसे बोलायचे हे समजणार व दुरित सर्व नाहीसे होऊन जन्माचे सार्थक होणार. ***('संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।।' - श्रीदासराममहाराज, 'संतांचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे पंथे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संतसंगे अंतररंगे नाम बोलावे। कीर्तनरंगी देवासन्नीध सुखेची डोलावे।।' - श्रीनाथमहाराज, 'संगत संतन की करले। जनम का सार्थक कछू करले।।' - श्रीकबीरसाहेब, 'वैराग्याचे भाग्य। संतसंगे हाची लाभ।।' - श्रीतुकाराममहाराज, 'सार्थक होते सार्थक होते दुरीत सर्व जाते। पुण्यपावना ज्ञानमार्ग हा देवदर्शन होते।।' - समर्थ)*** ही संगती ज्याला लाभते तो साधनाने देहातीत, संदेहरहित होतो. भाव धरला जातो व नि:संदेह देवाची प्राप्ती होते. याउलट ज्याला हा सत्संग लाभत नाही त्याच्या अंत:करणातील संशय हालत नाही. त्याला कधीही आत्मबोध होत नाही. ***('सत्संगती ज्या नरास नाही। ते पापरूपी पडती प्रवाही। संदेह चित्ती सहसा ढळेना। सिद्धांत साधुवीण आकळेना।।'- समर्थ, 'सत्संगतीचा महिमा कळेना। सत्संग होता मन हे ढळेना। सत्संगती पावन सौख्यकारी। सत्संगती सर्व दु:खासी वारी।।' - संतवचन, 'सिद्धस्वरूपी नाही देहो। तेथे कैचा हो संदेहो।' - समर्थ, 'न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्यांना भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज एकनाथ म्हणत अशा सिध्दपदास पोचलेल्या योगेश्वर सोऽहं हंसारूढ श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर यांचा अवतार आजच्या दिवशी ज्येष्ठ शु.१० रोजी शके १७५५ मध्ये यरगट्टी येथे झाला. तर ज्यांनी निंबरगी सांप्रदायाची गौरवपताका सातासमुद्रापार फडकवली अशा थोर साक्षात्कारी तत्वज्ञ श्रीगुरुदेवरानडेसाहेब यांची आज पुण्यतिथी आहे. त्यांच्या परमपवित्र चरणास वंदन करून येथेच थांबतो.

**

# चुका करीत जाणे

आपले अवगुण हे गुणच आहेत असे वाटणे हा सर्वात मोठा अवगुण तर आपली चूक ही चूक नाहीच असे वाटणे ही सर्वात मोठी घोडचूक आहे. यामुळे तो अवगुण दूर होणे, चुकीची दुरुस्ती होणे हे शक्य होत नाही. तो माणूस परतपरत त्याच चुका करत राहतो. ***('सकळ अवगुणांमध्ये अवगुण। आपले अवगुण वाटती गुण। मोठे पाप करंटपण। चुकेना की।।' - समर्थ)*** चुका करतो तो माणूस हे बरोबर आहे पण जो परत परत तीच चूक करतो त्याला काय म्हणायचे? ही चूक आहे हे माहीत असून त्याकडे कानाडोळा करणे व पुन्हा पुन्हा तीच चूक करणे हे कितपत बरोबर आहे? आपल्या मनाला आपण कितीही समजावून सांगितले तरी येऊ नये ते विचार मनात येतातच. वारंवार त्याच त्याच चुका मनाकडून होतात. ***('अपराधी जन चुकतची गेले। तुझा तुची सावरी।।'- समर्थ, 'मना तुजला सांगता कोणी नाही। मना साधनी तू मला साह्य होई। मना संग हा कुत्सितांचा त्यजावा। मना राम तो अंतरी साठवावा।।' - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** एवढे समजावून साधनेच्या वेळी मनाची चुळबूळ चालूच राहते ना? साधन करताना मन लागतच नाही. त्यामुळे अपेक्षित अनुभव येत नाहीत. अनुभव न आल्याने मनाला गोडी लागत नाही व नामाबद्दल मनात विकल्प येतात. त्यामुळे नाम घेताना होणारे दहा अपराध आपले हातून वारंवार होतात. नामाबद्दल विकल्प निर्माण करून नेमाचा घात करणे हे तर मनाचे कामच आहे. नित्याचे नेमाचे एक नाम न साधल्याने अंतरीची वासना-काम हालत नाही. त्यामुळे वासना बायकोबरोबर असणारा संसार सामान्यत: कधीही मोडला जात नाही. आणि या वासनेच्या संगे प्राप्त होणाऱ्या जन्ममरण या संसारामुळे जन्ममरणाचे पैल असणाऱ्या रामाची - चैतन्याची आठवणही होत नाही. वासनेबरोबरच्या संसारात माणूस गुंतून पडतो. कितीही आणले तरी वासना - काम संपत नाही. सकाळपासून रात्रीपर्यंत वासनापूर्ती एवढे एकच काम. त्यामुळे राम आठवायला वेळच नाही. ब्रिटीशांच्या काळात 'स्वातंत्र्य' हा शब्द उच्चारायला देखील परवानगी नव्हती. तसे या मायेच्या राज्यात 'राम' आठवायला परवानगी नाही. बाकी सारे स्वातंत्र्य आहे. ***('मनजी पाटील देहगावीचा। विश्वास धरू नका हो त्याचा।। घात करील नेमाचा। पाडील फशी।। वासना बायको शेजारीण। झगडी कुटील मोठी दारूण।। तिचे पायी नागवण। घर बुडविसी।।' - श्रीनाथमहाराज, 'या या संसाराचे पायी। राम आठवीत नाही।। या या संसाराचे कोडे। जे जे आणावे ते थोडे।। पायी प्रपंचाची बेडी। किती करावी लबाडी।। तुका म्हणे आम्ही चुकलो। व्यर्थ संसारी गुंतलो।।' - श्रीतुकाराममहाराज)*** संसार त्रिगुणात्मक वासनेच्या संगतीने होतो.***('संसार समस्त त्रिगुण। यामाजी मी अवघा निर्गुण।। हे तुज कळावया निजखुण। गुणनिरूपण म्या केले।।' - श्रीनाथमहाराज)*** आणि हे त्रिगुण मनात असतात. म्हणून मन ज्याला आवरत नाही तो संसारिक. मन आहे तोवर - असार संसाराचा अनुभव. मन आहे तोवर - 'सत्‌चा संग - सत्संग-नाही'. मन आहे तोवर जगाचा - दृश्याचा संग ***('मन ज्याला आवरेना। तोचि संसारीक जाण।।'- श्रीदासराममहाराज)*** मन मुरल्यावर, कल्पना सरल्यावर निर्विकल्प नामाचा - परब्रह्माचा अनुभव येतो. दशदोष नाहीसे होतात. मन मुरण्याकरता मन मुरणारे अचूक साधन साधले पाहिजे. ***('निर्विकल्प नाम। तेचि जाणा परब्रह्म।।', 'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'-श्रीदासराममहाराज)*** जोवर मन मुरत नाही तोवर आपली आणि रामाची भेट चुकणार, रामाची भेट होणार नाही. जोवर रामाची भेट होत नाही तोवर इंद्रियांना समाधान होणार नाही. ***('रामा चुकली बापुडी। अन्न अन्न करती वेडी।।', 'मूर्ती त्रैलोकी संचली। दृष्टी विश्वाची चुकली।।' - समर्थ)***

**

# अचूक साधन साधणे

नाम घेताना ज्या चुका, दोष आपले हातून घडतात, ते दोष, त्या चुका नाहीशा करणारे हे साधन आहे. म्हणून त्याला 'अचूक साधन' असे म्हटले आहे. नाम घेताना मनात जे वृत्तीदोष निर्माण होतात, इंद्रिये जी अनावर होतात, त्यावर नियंत्रण आणणारे हे साधन आहे. या साधन अभ्यासाने देहाचा, मनाचा लय साधतो व एकांतात मौन साधून आपले जे बहुत दिवसापासून चुकलेले आहे (हरवले आहे), आपण जे सतत शोधतो आहोत, ते हंससुख-आत्मसुख-आपणास प्राप्त होते. ***('चुकलिया माये। बाळ हुरूहुरू पाहे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'बहुत दिवस चुकले सखे ग बहुत दिवस चुकले। राजहंस पाखरू माझे मजला सापडले।। बसुनी एकांती पाहू सखे ग बसुनी एकांती पाहू। उडोनी जाईल म्हणूनी तयासी डोळ्यात साठवून ठेवू।। घडोघडी अनुभव घेऊ सखे ग घडोघडी अनुभव घेऊ। ज्याचे सुख त्याने भोगावे नये दुसऱ्याला देऊ।। कशी गत झाली सांगू सये ग कशी गत झाली सये। स्वरूप वारे अंगी भरले वाचे बोलता नये।।'-संतवचन)*** असे कोणते साधन आहे की जे बलिष्ठ इंद्रियांना व चंचल मनाला आपल्या ताब्यात ठेवते? श्रीज्ञानेश्वरमहाराज या साधनाचा निर्देश असा करतात, ***'बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनू सहजे गगना। मिळोची लागे।।'*** तर श्रीनाथमहाराज या साधनाचे वर्णन असे करतात, ***'विषय ते मनाअधीन। मन पवनासी वश्य जाण। अभ्यासे वश केला पवन। सहजे मन स्थिरावे।।'.*** मन विरण्यासाठी, देहभाव विरण्यासाठी परमेश्वराने आपणास एक साधन दिलेले आहे. ते सिद्ध साधनच आपण वापरले पाहिजे. तरच साध्य सिद्ध होणार आहे. आम्ही भलतीच साधने याकरता वापरतो आणि म्हणतो मन लागत नाही. मन फार चंचळ आहे. अहो रोज झोपताना मन निर्विचार होते ना? देहभाव जातो ना? तेव्हा कोणते साधन वापरतो? तेच साधन मन मुरण्यासाठी वापरायचे. ***('देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे श्रीविठ्ठलू रे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** झोप लागताना मन हे श्वासात मुरते व मगच झोप लागते असे छांदोग्यउपनिषद सांगते. श्वासात मन मुरल्यावर मनात असणारे नामाबद्दलचे संशय नाहीसे होतात व निर्विकल्प नामाची प्राप्ती होते. निर्विकल्प नाम हेच परब्रह्म आहे. हे तत्त्वरूप निर्विकल्प नामाचे साधन मनाला घट्ट पकडते व द्वैताची जाणीव नाहीशी करून अद्वैताची जाणीव प्रगट करते. ***(एक तत्त्व नाम दृढ धरी मना। हरीसी करुणा येईल तुझी।।', 'एक तत्त्वनाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** श्रीतुकाराममहाराज या साधनाला 'बरवे साधन' असे संबोधतात. या बरव्या साधनानेच क्रोध नाहीसा होऊन मन सुखरूप शांत होते. या बरव्या साधनानेच तो अद्वैताशी समरस होऊन त्रैलोक्यात भलेपणा मिळवतो. त्याला मायाजाळ बाधत नाही. ***('बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।', 'ऐसे जे साधन जया चित्ती वसे। मायाजाळ नासे तुका म्हणे।।', 'त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला। योग जो साधिला साधन बरवे।।' - श्रीतुकाराममहाराज)***

**

# अचूक साधन साधणे

श्वास आणि उच्छ्वास यांना लागणारा वेळ म्हणजे आपले आयुष्य आहे. श्वासोच्छ्वासात आयुष्य समाविष्ट आहे. अर्थात श्वासोच्छ्वास हे आयुष्याचे साधन आहे. श्वासोच्छ्वासात असणारे आयुष्य आपण साधनीभूत केले तरच सच्चिदानंद ही पदवी प्राप्त होणारी आहे. ***(‘आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।’-श्रीतुकाराममहाराज)*** श्वास आत घेणे हा जन्म व श्वास बाहेर सोडणे हे मरण आहे. म्हणून श्वासोच्छ्वास या क्रियेला जन्ममरण, येणेजाणे आदी नावांनी संत संबोधतात. ***(‘जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।’ - श्रीदासराममहाराज, ‘आम्हा येणे जाणे नाही। आम्हा येथेची वैकुंठ पाही।।’ - श्रीनिजानंदमहाराज)*** जन्म (श्वास) आणि मरण (उच्छ्वास) किंवा मरण (उच्छ्वास) आणि जन्म (श्वास) यामधील काळाला जीवन म्हणतात. श्वसनाच्या उपाधीत जीवन सापडले आहे म्हणून त्याला ‘उपाधीभूत जीवन’ असे श्रीदासराममहाराज संबोधतात. या उपाधीभूत जीवनाबद्दल श्रीदासराममहाराज असे सांगतात, ‘या जीवनात जड व चैतन्य हे सांधले गेले आहेत. किंवा जड व चैतन्य यांना सांधणारा दुवा म्हणजे उपाधीभूत जीवन. हे उपाधीभूत जीवनच चैतन्याच्या अनुभूतीचे माध्यम आहे.’ या जीवनातच नामाची धारणा, भजन, पवन सारे काही आहे. हा श्वसनाचा मध्यबिंदू हा विश्वाचा मध्यबिंदू आहे. (The centre of breathing is spiriton. The spiriton is the centre of universe) श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या Twinkle twinlke या इंग्रजी काव्यातून) अर्थात येथे श्वास आणि उच्छवास यांना लागणारा काळ समान राहणे अपेक्षित आहे. श्वसनातील या उपाधीभूत आकाशरूप जीवनाला दासराममहाराज ‘अंतराकाश’ असे संबोधतात. तर सोहंमधील उपाधीरहित आकाशाला ‘चिदाकाश’ म्हणतात. साधनाचा अभ्यास हा अंतराकाश हे चिदाकाशात विलीन करणेसाठी म्हणजेच श्वसनाची उपाधी कमी होऊन उपाधीरहीत अखंड जीवन - अखंड स्मरण प्राप्त होणेसाठी आहे. अखंड जीवन, अखंड स्मरण प्राप्त होणे म्हणजे जन्ममरणरहीत आत्मरूप होणे होय. ***(‘अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।’ - श्रीदासराममहाराज, ‘उपाधीवेगळे आकाश। तया नाव चिदाकाश। तैसा निर्मळात्मा परेश। तो उपाधीवेगळा।।’- समर्थ)*** कामक्रोधाने जीवन न साधल्याने, अनमोल आयुष्याचा नाश होतो. तेच काम क्रोध-अभिमानरहीत अवस्था हे भजन-रामनाम साधले तर आयुष्य सत्कारणी लागते. जीवन जगता येते. ***(‘आयुष्य हेची रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी।। ईश्वरी अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी।।’-समर्थ, ‘तीन भुवन और चौदा लोक। एक श्वासका मोल। तुलसी कहे रामभजनबीन। वृथा श्वास मत खोल।।’ - संत तुलसीदास, ‘राम म्हणता काम क्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** कामक्रोधावर जर मात केली तर ह्या श्वसनाच्या सूत्राचा मध्यभाग साधता येतो. हे सूत्र धरून निर्गुणाचा संग घडतो. श्वास आणि उच्छ्वास यांना लागणाऱ्या वेळेवर काळाची सत्ता आहे. श्वास आणि उच्छ्वास यांचेमधील वेळेवर काळाची सत्ता नाही. म्हणून या जीवनात असणाऱ्या नामाला काळवेळ नाही. ते सदासर्वदा श्वसनात साधायचे आहे. ते नाम साधले तर उद्धार ठरलेला आहे. या नामालाच ब्रह्म चिकटलेले आहे. मन जर स: अहं अहं स: या गुरुपदांचे ठिकाणी जडले, म्हणजेच आपण कामक्रोधअभिमानरहीत झालो की जन्ममरण नाही असे जीवन साधते. हे कामक्रोधअभिमानरहित होणे हेच संतांचे रामनामस्मरण आहे. हे रामनामस्मरण साधले तर जीवन साधते, जीवनात खेळणारा पवन साधतो. हाच आमच्या श्रीमामामहाराजांचा पुण्यप्रद रामपाठ आहे. हे जीवन प्राप्त करून देणारे श्वास अनमोल आहेत. देहातून आयुष्य वजा केले तर त्या देहाला कोण विचारतो. एवढे महत्त्वाचे आयुष्य त्याकडे आमचे लक्षच नाही. आमचे सारे लक्ष देहाकडे आहे. आमचे प्रेम देहावर, आयुष्यावर नाही. देहावर प्रेम करणे, कामक्रोधाने आयुष्य घालविणे हा प्रपंच. तर आयुष्यावर, श्वासावर, आत्म्यावर प्रेम करणे हा परमार्थ.

**

# अचूक साधन साधणे

अर्थ जो आहे तो आपल्या श्वासाला आहे. श्वास आहे तोवर बाकी सगळ्या शरीराला, विश्वाला अर्थ. श्वास नसेल तर कशालाच अर्थ नाही. हा श्वास हंसावर आत्माराम बसलेले आहेत तोवर आहे. म्हणून श्वास आणि आत्मा यालाच परम अर्थ आहे. तोच परमार्थ आहे. रात्रंदिवस या अर्थाकडे लक्ष दिले तर आपण अर्थरूप (ध्येयरूप) समर्थ होणार. ***('रात्रंदिवस पाहे अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ।।' - समर्थ)*** श्वास हा जड व चैतन्य यातील दुवा आहे. श्वास हे परमेश्वराचे आहेत. तेच परमेश्वरप्राप्तीचे साधन आहे. ***('करा रे बापानो साधन हरीचे। झणी करणीचे करू नका।।' - श्रीनाथमहाराज)*** इतर कोणतेही साधन परमेश्वरापर्यंत पोचत नाही. या श्वसनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. याकरता श्वसनाचे माथ्यावर मन आणि देहबुद्धी (मनातील दुर्बुद्धी) केंद्रित केली पाहिजे. ***('हे अजानबाहो साधो पार्था। मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा। तेणेचि या तत्वार्था। फावसी तू।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन एकाग्र झाले की श्वसन-साधन घटते, सूक्ष्म होते. ***('येकाग्र करोनिया मन। बळेचि धरावे साधन। यत्नी आळसाचे दर्शन। होवोचि नये।।', 'भजन साधन अभ्यास। येणे पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे।।' - समर्थ)*** मनोवृत्तीचा निरोध साधून चैतन्याची जाणीव होणे हे नामस्मरण. हे प्रत्येक श्वासास साधले पाहिजे. मनोवृत्तीचा निरोध हाच केवलकुंभक असून तो साधणे हा काळावरचा विजय आहे. अशा तऱ्हेने मनोलय साधून मनावर, इंद्रियावर विजय मिळवणे म्हणजेच जितेंद्रिय होणे होय. साधन कसे व का करावे आदी विषय स्पष्ट करणारी श्रीमामांची अमृतवाणी पुढीलप्रमाणे ***'कैसे करावे साधन। जेणे भेटे भगवान।। नित्य आणि नियमाने। करी नामाचे स्मरण।। मेरूदंड सरळ जाण। नासिकाग्री दृष्टी खूण।। अर्जुनासी भगवान। ऐसे सांगती साधन।। ऐसे साधिता साधन। दासा अंकीत भगवान।।', 'कैसा पवन साधावा। स्थिर करूनी नामी लावा।। घेऊनी सोडणेचे आधी। स्थिर करूनी कुंभक साधी।। जैसा जैसा वाढे काळ। पवन विजयाचे बळ।। वाढे दासाचे अंतरी। पूर्ण होता साक्षात्कारी।।', 'साधनी मन घटवी। बारे साधनी मन घटवी।। साधन कोठे कसे करावे। चित्ताला पटवी।। मनोवृत्तीचा निरोध करूनी। नाम सदा आठवी।। श्वासोच्छ्वासी नाम साधूनी। काळाला हटवी।। साधनी घटता ते बळ अद्‌भुत। दासाची पदवी।।'*** साधनाभ्यासाने श्वसनात असणाऱ्या त्रिगुणांचा व पंचभूतांचा निरास होतो व जेव्हा एक अंगुळ नि:श्वास वाहतो तेव्हा नादश्रवण घडते. ***('त्रिगुण आणि पंचभूते। हे वायोमये मिश्रिते। अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।' - समर्थ, 'जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।।'- श्रीमामामहाराज, 'एकची अंगूळ वाहता निश्वास। होय नादघोष सुस्वरेसी।।', 'नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप।।'-श्रीदासराममहाराज)*** जेव्हा नादघोष श्रवण होतो तेव्हा साधन-श्वसन-सूक्ष्म झालेले असते. नि:श्वास आहे तसा वाहतो आहे आणि नादश्रवण होते आहे, असे असू शकत नाही. ***('नाम जपे त्यासी उरले साधन। ऐसे हे वचन बोलो नये।।' - श्रीतुकाराममहाराज)*** नादश्रवणी तदाकारता साधली असता हृदयात वायूची घासणी होऊन या नामाचाच बिंदू घडतो. नयनात वारे भरते. गगनात अगणित तारकांचा अनुभव येतो. नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते व मन संपूर्णपणे मुरते. साधनात देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधणे, मीपणेवीण संदेहरहित साधन होणे म्हणजे 'अचूक निर्दोष बरवे साधन' साधणे होय. ***('आणिक एक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोचि धन्य। समाधानी।।', 'संदेहरहित साधन। तेचि सिद्धाचे लक्षण।।' - समर्थ, 'देह बळी देऊनी। साधिले म्या साधन।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अचूक साधन साधो या गुरुकुळा।।' -श्रीचिमडमहाराज)*** त्रिगुणाच्या निरासाने चौथा शुद्ध सत्वगुण प्राप्त होतो व त्याचे साहाय्याने चौथी तुर्यावस्था प्राप्त होऊन अहर्निशी अष्टौप्रहर साधन (परमार्थ) होते.***('गोविंद म्हणे जे अचूक। तेचि घेई बिनचुक।।' - श्रीमामामहाराज केळकर)***

**

# गोविंद म्हणे यम वंदीतसे पाय

अहर्निशी अष्टौप्रहर साधना होण्यासाठी संतांचा, सज्जनांचा आशीर्वाद प्राप्त व्हावयास हवा. आशीर्वाद प्राप्त झाला तर संतांची जी गती-समगती आहे ती गती आपणास प्राप्त होते. संतसंगती होते. ***('आशीर्वाद सज्जनांचा। नाही फुकट जायाचा।।', 'संगती म्हणजे समगती जाणे। दावितातीी खुणे संतराय।।' - श्रीमामामहाराज केळकर)*** जशी गती तशी गत (अवस्था) व जशी गत तसे आचरण. न बदलणारी रामनामाची गती जर प्राप्त झाली तर रामनामाची स्थिती कोणत्याही परिस्थितीत सांडली जात नाही. ज्यात पापाचा विचार नाही असा रामनामाचा सदाचार घडतो. रामनामाचे महातप-तपाचे तप - कायेमध्ये (कायेने नव्हे) तो आचरतो. ***('संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोचि नये।।' - समर्थ, 'तेचि गत बाई। आचार तिचे ठायी।।' - संतवचन, 'वारियाची बदले चाल। तरी होती फार हाल।।' - श्रीदासराममहाराज, 'गती तेचि मुखी नामाचे स्मरण। आणिक विस्मरण अधोगती।।' - संतवचन, 'कायी तप करी कायी तप करी। भेटेल श्रीहरी येता जाता।।' - श्रीमामामहाराज केळकर)*** राजे अश्वपतींची राजकन्या सावित्रीने मनाने वरलेला राजर्षी द्युमत्सेनाचा सत्शील मुलगा सत्यवान हा अल्पायू असतो. उणेपुरे एक वर्षाचे त्याचे आयुष्य शिल्लक असते. सावित्रीचे अहेवपण वाढावे या सद्‌हेतूने महर्षी नारद सावित्रीला सक्रिय आशीर्वाद देतात व सदाचाराचा उपदेश करतात. तो आशीर्वाद कसा असतो याचे वर्णन संत श्रीसहजानंद असे करतात, ***'मंगळसूत्र काजळ कुंकू पाठविले गुरूने। अहेवपण वाढो म्हणूनी दिली आशिर्वचने।। नवविधभक्ती खडे कोंदण मंगळसूत्रासी। अष्टभाव ते सात्त्विकरंग दिले कुंकुमासी।। काय सांगू मी आजी गडे ग अलंकार शोभा। इडा पिंगला नाकी नथणीचा आत्मबिंबगाभा।। अन्वय व्यतिरेकाचे पैंजण वाजतात पायी। सहजानंद ऐसा सद्‌गुरू त्रिभुवनात नाही।।'*** श्रीनारदांचे आशीर्वादाने सावित्री-सत्यवानाचा विवाह मोठ्या थाटात संपन्न होतो. राजकन्या असलेली सावित्री सत्यवानाचे घरी प्रतिकूल परिस्थितीतही आनंदाने राहते. म्हातारे सासू-सासरे, पती सत्यवान यांचे मनाप्रमाणे वागून त्यांची मर्जी संपादन करते व जगासमोर सून कशी असावी याचा आदर्श निर्माण करते. आपले गुरु महर्षि नारद यांचे उपदेशाप्रमाणे साधना करते. ***('काळ सारावा चिंतने। एकांतवासी गंगास्नाने। करोनी पूजन। प्रदक्षिणा तुळशीच्या।।, 'स्वामीकाज गुरुभक्ती पितृवचन सेवा पती। हेचि विष्णूची महापूजा। आणखी देव नाही दूजा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'पतिचिया मता। अनुसरोनी पतिव्रता। अनायासे आत्महिता। भेटेची ते।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** श्रीमहर्षि नारदांचे उपदेशाप्रमाणे ती पापाचा विचार नाही अशा निर्विचार, निर्हेतुक अवस्थेत रामनामाचा सदाचार करते. तिचे पारमार्थिक आचरण कसे होते याचे वर्णन संत शिवराम असे करतात, ***'तेचि गत बाई आचार तिचे ठायी।। जाणीवेचा बोल अंगी येऊ दिला नाही।। सत्कर्माचा सडा घालुनिया दारी। माजघरची वोज बरवी दावी लोकाचारी।। निष्कामाचे चहुकोनी सारविले घर। सुरंग रंग रंगमाळा घाली निरंतर।। धवधवीत प्रेमकुंकू लावोनिया भाळी। पूर्णानंदी शिवरामी विचरे वेल्हाळी।।'*** जसे विधिलिखित होते त्याप्रमाणे लवकरच सत्यवानाच्या आयुष्यातील अखेरचा दिवस उजाडला. यमराज त्याचा लिंगदेह घेऊन परलोक मार्गाने निघाले. सावित्री ही आकुंठगती होती, त्यामुळे ती यमराजांचे मागोमाग सत्यवानाला परत घेऊन यायचेच या निश्चयाने निघाली. संतांचे उपदेशाप्रमाणे तिचे हातून झालेल्या उपासनेने तिचे ठिकाणी तपःस्तेज निर्माण झाले होते. तपोबलाने सावित्रीने सत्यवानाचे प्राण यमराजांचेकडून परत मिळवून काळावर विजय मिळवला. इतके या साधनेचे महत्त्व आहे. श्रीमामामहाराज या संदर्भात सांगतात, ***'रामनाममुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।। गोविंद म्हणे यम वंदीतसे पाय। इतर ते काय तयापुढे।।'*** पतीचे प्राण परत आणून सावित्री त्रैलोक्यात वंदनीय ठरली. ***'त्रैलोक्यामध्ये होऊनी गेली सावित्री एक पतिव्रता। लक्ष जन्मीचे पातक हरते त्या साध्वीचे गुण गाता।।'***

**

# प्रेममंदिर

प्रेमरूप परमेश्वर आहे. तो जेथे मानवी शरीरात राहतो त्याला प्रेममंदिर म्हणतात. प्रेममंदिर हे नेहमी मानवाच्या अंत:करणात असते. मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार हे चित्तचतुष्ट्य म्हणजे अंत:करण आहे. देवाचे वास्तव्य अंत:करणातील चित्तात असते. पण आमच्या अंत:करणात तर अशुद्ध मन:संकल्प, चित्तात विषय चिंतन, बुद्धीत विपरीत ज्ञान व विपरीत ज्ञानाचा विपरीत अहंकार असतो. ही सारी अंत:करणातील जळमटे दूर झाली, अंत:करण शुद्ध झाले की राहणारी शुद्ध जाणीव म्हणजे प्रेमरूप परमेश्वराचे प्रेम आहे. या शुद्ध जाणीवेची जाणीव होणे म्हणजे प्रेमाचे दर्शन आहे. या विशुद्ध प्रेमाने तो सर्वांचे पालन करतो. प्रेम म्हणजे नेमके काय हे थोर विचारवंत संत जे.कृष्णमूर्ती असे सांगतात, 'Love is that state of consciousness wherein thought process in time ceases.' ज्या काळात विचारप्रक्रिया थांबलेली असते, तो जाणीवेचा काळ किंवा अवस्था म्हणजे प्रेम. या निर्विचार अवस्थेतील जाणीवेवर प्रेम करणे एखाद्या उच्च ध्येयाकडे म्हणजे चैतन्याकडे वृत्ती वळवणे म्हणजे भक्ती होय. चैतन्याच्या वाऱ्यावर प्रेम करणे ही भक्ती. या प्रेमरूप जाणीवेवर परमप्रेम करणे म्हणजे भक्ती. ही जाणीव विश्वात सर्वत्र सारखी पसरलेली आहे याची जाणीव आपल्याला होणे ही भक्ती. कल्पनेने भूत न भेटता निर्विकल्प अवस्थेत ही जाणीवेची जाणीव होणे हा भक्तीयोग.***(Love is God प्रसिद्ध वचन, 'तरी बुद्धी आणि मन। चित्त अहंकारहन। हे चतुर्विध चिन्ह। अंत:करणाचे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज 'वायोमध्ये जाणीव गुण। तेचि ईश्वराचे लक्षण। तयापासून त्रिगुण। पुढे जाले।।', 'जाणीव म्हणिजे अंत:करण। अंत:करण विष्णूचा अंश जाण। विष्णू करितो पाळण। येणे प्रकारे।।', 'अंत:करण म्हणिजे जाणीव। जाणीव जाणता स्वभाव। देहरक्षणाचा उपाव। जाणती कळा।'-समर्थ, 'जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तीयोगु निश्चित। जाण माझा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।।'-संतवचन)*** या गुणावर-जाणीवेवर प्रेम करणे हाच खरा साधनाचा क्रम आहे. हा साधनाचा क्रम जो आचरतो तो जगात धन्यता प्राप्त करतो. ***('मनी लोचनी श्रीहरी तोचि पाहे। मनी जाणता भक्त होऊनी राहे।। गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।'-समर्थ)*** हे जे प्रेममंदिरात चैतन्याचे स्मरण-जाणीव आहे ती आत्म्याच्या गतीची देहात येणारी प्रचिती आहे. ही गतीची प्रचिती चित्तात घ्यायची व राम बोलायचा. प्रचितीवीण बोलणे असेल तर ते कंटाळवाणे ठरते. श्रीज्ञानेश्वरमहाराज या प्रचितीवीण बोलण्याला बरळ म्हणतात. प्रचितीवीण बोलण्याने-बरळीने परमेश्वर प्राप्त होत नाही. ***('रामनामगती देहात प्रचिती। धरोनिया चित्ती राम बोले।।'-श्रीमामामहाराज, 'अनंत वाचाळ बरळती बरळ। त्या कैसा दयाळ पावे हरी।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'प्रचितीवीण जे बोलणे। ते अवघेचि कंटाळवाणे। तोंड पसरून जैसे सुणे। रडोन गेले।।'-समर्थ)*** या प्रेमाबद्दल - प्रेमरूप आत्म्याच्या गतीच्या प्रचितीबद्दल- श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'प्रेम आत्म्याची ती गती। पाहे अंतर प्रचिती।। प्रेम अंतरी हेलावे। रूप त्यामाजी सामावे।। प्रेमकळा ओळखिता। अनायासे देव हाता।। दास म्हणे सांगो किती। नामी पहावी प्रचिती।।'.*** ही गती जाणणे, देवाचे प्रेम जाणणे म्हणजे देवाचे स्मरण असून ही गती न जाणणे हे देवाचे विस्मरण आहे. देवाच्या विस्मरणाने जीवनाची अधोगती होते व जगाची, देहाची जाणीव होते व चैतन्याची जाणीव होत नाही. स्मरणयुक्त नामाने समाधान होते. नुसत्या नामाने समाधान होत नाही. नाम हे स्मरणयुक्त, प्रेमाने घेतले तरच समाधान होते. ***('गति तेचि मुखी नामाचे स्मरण। आणीक विस्मरण अधोगती।।'- संतवचन, 'नवल स्मरणाची ठेव। नामी नाही अनुभव।।'- श्रीनाथमहाराज)***

**

# प्रेममंदिर

ज्या ठिकाणी मनसंकल्प नाहीसे होऊन द्वैतबुद्धी-दुर्बुद्धी-आत्मरूपाचे ठिकाणी अनन्य होऊन चित्तातील विषय चिंतन संपते व चित्तात चैतन्य भरून राहते. चिदचिदग्रंथी विराम पावून सत्याचा संकल्प उठतो. त्या ठिकाणाला प्रेममंदिर म्हणतात. या ठिकाणी आपला प्रवेश झाला तर भगवद्प्रेम निर्माण होते. ***('मन ज्याच्या हाती आले। दासा चित्त स्थिर झाले।।'-श्रीदासराममहाराज, 'चिदचिदग्रंथी सुटेना। क्षणभर विषयी चित्त विटेना।।'-श्रीनिजानंदमहाराज, 'मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया।। तेथ बुद्धी घापे करोनिया। पतिव्रता।।', 'बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्यत्यागे। मातेचि भजे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'चिदचिदग्रंथी विराम पावती। तयेठायी भक्ती उपजो लागे।'-श्रीदासराममहाराज, 'प्रेम मंदीरात। चित्त चैतन्यी मिळत।'-श्रीमामामहाराज, 'भक्ती परमप्रेम स्वरूपाच।'-नारदभक्तीसूत्र, 'मन कृतं कृतं कर्म। न शरीर कृतंकृतं'-योगवसिष्ठ)*** सर्व कल्पनांचा त्याग करून चित्तातील विषय चिंतन संपण्यासाठी, सर्वस्वाचा वीट येऊन ते त्यागण्यासाठी वैराग्याची गरज आहे. वैराग्याशिवाय भगवद्प्रेम निर्माण होत नाही. इकडला संग सुटल्याशिवाय तिकडला देवाचा संग होत नाही. भगवद्प्रेम निर्माण झाल्याशिवाय देवाचा प्रेमाचा शब्द - चैतन्याचा ध्वनी कानावर येत नाही. भगवंताच्या आपल्यावरील प्रेमाची जाणीव निर्माण होत नाही. ***('वैराग्यावाचोनी। मिळेचिना प्रेमवाणी।। वैराग्यात प्रगटे प्रेम। प्रेमामाजी उपजे नाम।। प्रेमयुक्त नाम। नामामाजी प्रगटे राम।। म्हणोनिया नाम स्मरा। राम म्हणे भवतरा।।'-श्रीदासराममहाराज)*** हे वैराग्य निर्माण होणे हे वाटते तितके सोपे नाही. परमपवित्राने संतांची, देवांची वर्णन केलेली सगुण चरित्रे ऐकली. त्यांनी प्रेमाने वर्णन केलेल्या संतांच्या वैराग्याच्या गोष्टी ऐकल्या किंवा परमेश्वरकृपेने सत्संग घडला तरच हे वैराग्याचे भाग्य निर्माण होणार. ***('सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी। सज्जन वृंदे मनोभावे आधी वंदावी।। भक्तीज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।।'-श्रीनाथमहाराज, 'वैराग्याचे भाग्य। संतसंगे हाचि लाभ।।'-श्रीतुकाराममहाराज)*** प्रेमाने गुरुमूळपीठाचे भजन-साधन साधले तरच वैराग्य निर्माण होऊन चैतन्याकडे मनोवृत्ती वळतील. चैतन्याचे प्रेम प्राप्त होईल. ***('प्रेमभरे आजी गाऊया। गुरुमूळपीठा। प्रेमभरे आजी गाऊया।। प्रेमभरे आजी गाऊ, चरणी जडूनी वर घेऊ। वर हा देईल गुरुराया। ब्रह्मस्वरूपी क्रीडे म्हणूनी।।'-संत गोपालनाथ)*** निवांत बसून चित्त शुद्ध झाले, चित्तातील विषयचिंतन संपून चित्तात चैतन्य भरून राहिले तर चित्तातील देवाची संगती लाभते. चित्तातील देवाचे प्रेम प्राप्त होते. विश्व हे सत्यत्वाने देव असल्याची अनुभूती त्याला येते व तो सर्व विश्वावर सारखेपणाने प्रेम करू लागतो. त्याला परका असा कोणी वाटतच नाही. 'जन नोहे अवघाची जनार्दन' असे अनुभवणे हे खरे विश्वबंधुत्व. ***('जो खांडावया घावो घाली। की लावणी जयाने केली। दोघा एकची साऊली। वृक्षू दे जैसा।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरी। साधुजन वर्तती।।'-समर्थ)*** आम्ही जे दुसऱ्यावर प्रेम करतो, त्यात काही अपेक्षा असते. संत एकावर-अद्वैतावर - आपल्या प्राणावर प्रेम करतात. अर्थात ते निरपेक्ष असते. या प्रेमाचे वर्णन करता येईल का? ***('ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रीती।', 'प्रेम नये सांगता, बोलता, दाविता। अनुभव चित्ता चित्त जाणे।।'-श्रीतुकाराममहाराज)*** या अद्वैत प्रेमाचा अनुभव, दर्शन जर आपणास हवे असेल तर प्रेममंदिरात जावे लागेल. संत कबीरसाहेब प्रेमाचा अनुभव कसा घ्यायचा याबद्दल असे सांगतात, ***'अगर है प्रेमदर्शन का। रीतसे प्रीत कर प्यारे।। बैठ आसन जमा करके। त्याग मनसे विचारोंका।। देख भ्रुकुटीके अंदरसे। चमकता है अजब तारा।।'.*** हे खरे प्रेमाचे दर्शन आहे. आम्ही करतो ते प्रेमाचे प्रदर्शन असते.

**

# सत्याचा संकल्प

मनाने केलेला संकल्प व सत्याचा सत्य संकल्प यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. मनाने केलेला संकल्प हा बदलणारा, भरपूर विकल्प (पर्याय) असणारा असतो. मन हे कल्पना करते. त्यात सत्य काही असत नाही. किंबहुना या मन-कल्पना संपल्यावरच सत्य (कल्पक) हाताला येते. या सत्याच्या सत्य संकल्पाला विकल्प (पर्याय) कोणताही असत नाही. किंबहुना ज्याला विकल्प (पर्याय) असत नाही तो सत्याचा सत्य संकल्प. जोवर मनाचे संकल्प उठत आहेत तोवर आकाराचे ज्ञान होते. आकारज्ञानाने द्वैताचे ज्ञान होते. सतत द्वैताचेच-मायेचेच अनुसंधान राहते. जेव्हा मन:संकल्प नाहीसे होतात तेव्हा 'सत्याच्या' सत्यसंकल्पाचे ज्ञान होते. तेव्हा आकारज्ञान होत नाही. साहजिकच द्वैताचे अनुसंधान सुटते व सत्य अद्वय स्वरूपाचे अनुसंधान जडते. या सदा असणाऱ्या स्वरूपाचे सदा अनुसंधानाने द्वैताचे निरसन होऊन तो अद्वैती समरसून साधूच होतो. तो जनात राहून जनावेगळा होतो. चिदानंद आत्माराम तेवढा सत्य आहे. या वायुरूप सत्य आत्म्याचे ठिकाणी अहंपणाची जाणीव निर्माण झाली व संसरण-संसार-श्वासोच्छ्वास-त्याचे मागे लागला. श्वासोच्छ्वास हा सत्य आत्म्याचे ठिकाणी उठलेला संकल्प आहे. तो आत्म्याचे-नारायणाचे देणे आहे. या श्वासोच्छ्वासाला विकल्प (पर्याय) नाही. या सत्य संकल्पामुळे - श्वासोच्छ्वासामुळे मन हे संकल्प विकल्प करू शकते. पण या मनात येणाऱ्या संकल्प विकल्पाने सत्य संकल्पाची जाणीव होत नाही. संकल्पविकल्परहित अवस्थेत या सत्य संकल्पाची जाणीव होणे महत्त्वाचे. महाराजांचे मन व आपले मन जर जुळले तर किंवा आपण भक्त झाल्यावर आपल्या सोवळ्या मनात जो संकल्प येतो तो महाराज, देव पुरा करतात. आपले मनोरथ पूर्ण होते. ***('सत्याचा संकल्प। नुरवी सर्वही विकल्प।।'- श्रीमामामहाराज, 'सत्य चिदानंदनु आत्मारामा'- श्रीगुरुलिंगगीता, 'सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ।।'-श्रीतुकाराममहाराज, 'भक्ते जे मने धरावे। ते देवे आपणची करावे। तेथे वेगळे भावावे। न लगे कदा।।', 'सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचे निरसन। अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेचि शुद्ध कल्पना।।'-समर्थ)*** संकल्प विकल्परहित सदोदित चिदानंदी असणाऱ्या भगवद्रूप शुद्ध मनाचे ठिकाणी उठणारा संकल्प हा सत्य संकल्प आहे. सत्याचा संकल्प आहे. ***('मन:संकल्प शुद्ध पै नोहे। एरवी सदोदित चिदानंदी।।'-श्रीचांगदेवमहाराज)*** मनातील वैषयिक कल्पना नाहीशी होऊन मन निर्विकार होणे व भगवद्रूप होणेचा - सत्यसंकल्प सर्वसाक्षी मनात उठणे हे आमचे भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकर महाराजांचे देणे आहे. तेच आपला हा मनोरथ पूर्ण करणारे आहेत. ***('मना पापसंकल्प सोडूनी द्यावा। मना सत्यसंकल्प जीवी धरावा। मना कल्पना ते नको विषयांची। विकारे घडे हो जनी सर्व ची ची।।' - समर्थ)*** संकल्पविकल्परहित अवस्थेत भगवंताची खूण प्राप्त होते, मोक्ष प्राप्त होतो. म्हणून मन संकल्पविकल्परहीत होणे महत्त्वाचे. ***('संकल्पविकल्प नुपजो यांचे चित्ती। ऐसे कृपामूर्ती करा वेगी।। ज्यासी तुझी खूण लाधली असेल। तो पुन्हा न येईल गर्भवासा।।'-चिमडमहाराज)*** श्रीदासराममहाराज या सत्यसंकल्पाबद्दल असे सांगतात, 'सत्संकल्प हा चैतन्याचा सहज असा एक आविष्कार आहे. पूर्ण चैतन्यातून उठणारा हा संकल्प पूर्णच असल्याने तेथे मनोरथपूर्ती स्वाभाविकच आहे.' या मनोरथपूर्तीसाठी भावाची आवड निर्माण होणे, संतपदाची जोड होणे आवश्यक आहे. ***('संतपदाची जोड, दे रे हरी साधुपदाची जोड।। सुफलित करूनी पूर्ण मनोरथ। पुरवीसी जीवीचे कोड।।'-संत अमृतराय, 'एका जनार्दनी भावाच्या आवडी। मनोरथ कोडी पुरती तेणे।।' - श्रीनाथमहाराज)***

✲✲

# अखंड

देहाचा भरवसा नाही. कोणत्या क्षणी मरण येईल हे काही सांगता येत नाही. मरणाचे वेळी जे आठवते, जी वासना होते, ते प्राप्त करून देणारी योनी मरणानंतर त्याला प्राप्त होते म्हणून जन्ममरणाचे पैल मोक्षप्राप्तीसाठी परमेश्वराचे अखंड स्मरण आवश्यक आहे. ***('नाही देहाचा भरवसा। केव्हा सरेल वयसा। प्रसंग घडेल कैसा। कोण जाणे।', 'येच क्षणी मरोनी जासी। तरी रघुनाथी अंतरलासी। माझे माझे म्हणतोसी। म्हणोनिया।'-श्रीसमर्थ, 'आणि मरणी जया जे आठवे। तो तेचि गतीते पावे। म्हणोनि सदा स्मरावे। मातेचि तुवा।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देहाच्या अनुषंगाने, मनाच्या अस्तित्वाने प्राप्त होणाऱ्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या विपरीतज्ञानात्मक, अज्ञानात्मक अवस्थांमध्ये हे चैतन्याचे अखंड स्मरण होऊ शकत नाही. साधनाभ्यासाने श्वसनातील त्रिगुण व पंचभूते यांचा निरास झाला असता प्राप्त होणाऱ्या चौथ्या शुद्ध सत्वगुणामुळे, तिन्ही अवस्थांची एक अवस्था - नामस्मरणाची स्थिती-तुर्यावस्था महाकारणदेहात प्राप्त होते व अहर्निशी परमार्थ साधतो. ***('जागृती स्वप्न सुषुप्ती नाठवे। पाहता आनंदी आनंद सामावे ना।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरीकथा।।'-श्रीदासराममहाराज, 'पहिला गुण महेशाचा। दुसरा गुण तो ब्रह्माचा। तिसरा गुण तो विष्णूचा। चौथा गुण तो वेगळा। अगम्य त्याची लिळा।।'-समर्थ)*** परमात्मरूप होणे म्हणजे तो जसा आहे तसे अखंड, नि:संदेह, निर्विकल्प, अद्वैत आपण होणे होय. संकल्पविकल्परहित अवस्थेत शुद्ध चैतन्यरूप सर्वसाक्षी मनाला भगवंताच्या खुणा प्राप्त होतात. मन आत्मारामाचे ठिकाणी रंगून जाते. मन रामरूप होते व सर्वत्र सबाह्य अभ्यंतरी सतत रामरूपाचा अनुभव ते घेते. मनाचा नारायण हाच एक विषय होतो. आत्मारामाच्या विसराने रचलेले मायेचे भिंताड रामाच्या आठवाने खचून जाते. अखंड रामरूपाची अनुभूती येऊन अखंड सुखाची प्राप्ती होते. ***('या मनाचे एक निके। जे देखिलिया गोडिचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुख कवतुके। दावित जाइजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मन रामी रंगले अवघे मनची राम झाले। सबाह्य अभ्यंतरी अवघे रामरूप कोंदले।।'- श्रीनाथमहाराज, 'मज अखंड राघव कळला रे। कल्पतरु गुरु फळला रे। रामाच्या विसरे रचिले रे। मायेचे भिंताड खचले रे।।'- केशवस्वामी, 'अखंड सुख राम खंड सुख माया। माझी ऐसी काय जव नव्हे।।'- श्रीमामामहाराज केळकर)*** प्राणाचे ठिकाणी - श्वसनामध्ये मनोलय साधलेला असल्याने जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही भिन्न अवस्थांमध्ये भिन्न विश्वाचे ज्ञान न होताना त्या एकाचेच ज्ञान होते. त्या एकाचेच अखंड स्मरण होते. त्याचेच सतत नाम जपले जाते. त्याचीच अखंडित सेवा होते. खरा कर्ता समजल्याने कर्म बाधक होत नाही. नैष्कर्म्य साधते. ***('प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्वे तत्व स्तरिता पवनसिद्धी।। पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम। येतसे निष्कर्म हातालागी।।'- श्रीदासराममहाराज, 'अखंड स्मरणे अद्वय भजने वाजवी करटाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तत्काळी।।'- श्रीनाथमहाराज, 'तुझी सेवा अखंडीत। घडो रूपी जडो चित्त।।'- श्रीचिमडमहाराज, 'अखंड हे नाम वाचेसी जपता। कर्म हे तत्वता बाधिजेना।।'- श्रीधरस्वामी, 'जयाचे वाचेपुढा भोजे। अखंड नाम नाचतसे माझे। जे जन्मसहस्त्री वोळगिजे। एक वेळ यावया।।' ,'म्हणोनी विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान। जैसे अवयव तरी आन आन। परी एकेची देहीचे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# नेम

माणसाला काहीतरी नेम असावा. ज्याला काही नेम नाही तो कसा वागेल याचा काही नेम नाही. नेम धरून - डोळ्यासमोर काही ध्येय ठेवून - नेम धरावा. ध्येयाला अनुसरून नेम असावा. नेम लहान का मोठा हा प्रश्न नाही, तो कडेपर्यंत-आयुष्यभर-शेवटच्या श्वासापर्यंत चालला पाहिजे. सारे आयुष्य त्या नेमात, नेमासाठी व्यतीत व्हायला पाहिजे. ***(‘काही नित्यनेमावीण, अन्न खाय तोचि शीण। वाया मनुष्यपण, भार वाही तो वृषभ।।’- श्रीतुकाराममहाराज)*** आपल्या मनात मनापासून आनंदाने नेम करणेचा असेल तर नेम कडेपर्यंत होतो. वेठबिगार नेम येथे उपयोगी नाही. नेमाने-नियमाने-मनाचे नियमन होते व मनाचे नियमन झाले तर तो अंतरी निश्चळ होतो. ***(‘तुका म्हणे मनी नाही। नये आकाराते काही।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘मनजी पाटील देहगावीचा। विश्वास धरू नका हो त्याचा। घात करील नेमाचा। पाडील फशी।।’- श्रीनाथमहाराज, ‘मनी नाही ऐसे म्हणा। खूण कळली साधुजना।।’- श्रीमामामहाराज केळकर, ‘तू मानसा नियमु करी। निश्चळु होय अंतरी। मग कर्मेन्द्रिये ही व्यापारी। वर्ततु सुखे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** नेम हा रोज करायचा असतोच की, किंबहुना जो रोज केला जातो त्यालाच नेम म्हणतात. मग नित्यनेम असा शब्द का वापरतात? जे शाश्वत - नित्य - आत्मरूप आहे त्याला धरून नेम म्हणजे नित्यनेम. म्हणून नित्यनेम हा नित्य होऊ शकतो. जो नित्य आत्मा आहे त्याची प्रचिती देणारे एक नाम, एकतत्व नाम, तेवढे नित्य आहे. या नित्य नेमाचा नेम हा नामी असून - ना ‘मी’ करणारा असून ते नाम अंतरीचा काम नाहीसा करून आत्मप्राप्ती (लक्ष्मीवल्लभाची प्राप्ती) करून देणारे आहे. काम पुरविणारी नामे वेगळी व काम नाहीसा करणारे नाम वेगळे. काम पुरविल्याने कधीही कोणीही नि:ष्काम होत नाही. उलटे अंतरीचे काम वाढतेच. जसे अग्नीत तूप ओतल्याने अग्नी भडकतो त्याप्रमाणे (इच्छा) काम वाढल्याने मोक्षाची प्राप्ती होत नाही. काम पुरविणारे नाम घेणारे भरपूर पण निष्काम करणारे नित्य नाम नेमाने साधणारे दुर्लभ. ***(‘नित्याचे नेमाचे असे एक नाम। घेता सरे काम अंतरीचा।।’- श्रीमामामहाराज केळकर, ‘नित्यनेम नामी ते प्राणी दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ तयाजवळी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘नित्यमाजी असे नेम। तोचि जाणा नित्यनेम।।’- श्रीमामामहाराज, ‘देह अनित्य आत्मा नित्य। हाची विवेक नित्यानित्य। अवघे सूक्ष्माचे कृत्य। जाणती ज्ञानी।।’- समर्थ)*** जे शाश्वत नाही त्याची काय शाश्वती? जे अशाश्वत, अविश्वासी आहे अशा देहाच्या, मनाच्या अनुषंगाने होणारा नेम नित्य होऊ शकत नाही. तेरड्याचा रंग तीन दिवस पण टिकत नाही. म्हणून असले अनित्य नेम करू नका. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘तुम्ही व्रते नियमु न करावे। शरीराते न पिडावे। दुरी केही न वचावे। तीर्थासी गा।।’.*** फक्त नित्यनामाचा नेम कायम चालणारा आहे. इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर प्राप्त होणाऱ्या रामनामाचा नेम हा नित्यनेम आहे. ***(‘इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।’- श्रीमामामहाराज, ‘एका जनार्दनी नेम। नित्यवाचे रामनाम।।’- श्रीनाथमहाराज, ‘इडा पिंगलेचा त्रिवेणी संगम। तुका म्हणे नेम गुरुघरचा।।’- श्रीतुकाराममहाराज)*** **गोविंदाचे शेजारी बसणे, प्राणाची गाठ पडणे हा खरा नेम.** ***(‘हाची नेम आता न फिरे माघारी। बैसले शेजारी गोविंदाचे।।’, ‘तुका म्हणे नेम प्राणासवे गाठी। तरीच या गोष्टी विठोबाच्या।।’- श्रीतुकाराममहाराज)*** हा नामाचा नित्यनेम कधीही खंडित होत नाही. देहात नसतानाही-देहांतीही-हा नेम चालूच राहतो. देहात असतानाही व देहात नसतानाही जो नामात, चैतन्यात असतो, तो खरा महात्मा, तो ब्रह्मचैतन्य, चैतन्यब्रह्म.

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या परमार्थास पूरक ठरलेल्या त्यांच्या पत्नी सौ.लक्ष्मीबाई यांनी आपले पती श्रीतात्यासाहेबमहाराजांचे दर्शन घेऊन ईशचिंतन करीत. आज १९१२ साली देह ठेवला. त्यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करून येथेच थांबतो. ✻✻

# जप

या संसारसागरातून-भवसागरातून तरण्यासाठी नामजपासारखे साधन नाही असे संतांनी सांगितले आहे. ***('राम जपो राम जपो राम जपो रे। भवजल भवजल पार करो रे।।'- कबीरसाहेब)*** म्हणून नामजप सुरू करावा या हेतूने आम्ही बाजारातून चांगली माळ आणली व रोजचा पंधरा मिनिटे मोठ्याने जप सुरू केला. पण अपेक्षित परिणाम होईना. मग संत म्हणाले ज्या देवाकरता तुम्ही जप करीत आहात तो देव आपले अंतरी आहे आणि तुम्ही जप करताना स्वत: पण बाहेर व जप पण बाहेर मग कसे साधणार? तेव्हा जप अंतरी व्हावा हे बरे. ***('जप तो अंतरी करावा। जप कोणास कळो न द्यावा। जैसा का कृपणाचा ठेवा। तैशापरी।।'- समर्थ)*** म्हणून आम्ही माळेवरती पण अंतरात कोणाला न कळेल अशा पद्धतीने जप करणे सुरू केले तरीपण काही प्रगती नाही. संत म्हणाले अहो तुम्ही जप अंतरात सुरू केला पण तुम्ही अजूनी कल्पनेने बाहेरच आहात. जपाचे वेळी मन जपाचे ठिकाणी नाही. मग काय होणार? ***('माला तो करमे फिरे। जिव्हा फिरे मुखमोही। मन तो दाहीदीस फिरे। इह तो सुमरन नही।।'-संत कबीर, 'नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।'- श्रीनाथमहाराज)*** जपाचे वेळी मन अंतरात जपाचे ठिकाणी ठेवण्याचा प्रयत्न केला पण मधूनच लक्ष माळेतील मेरुमण्यावर जायचे. मग अपेक्षित परिणाम कसा होणार? संत म्हणाले तुम्ही आतलीच माळ धरून पहा. त्याशिवाय काही साधणार नाही. ***('ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरी जपे सदा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'ऐसी माला अंत:करणी। गुंफून ठेविली श्रीरामचरणी। सोऽहं तंतु अखंडपणी। खंडोची नये।।'- समर्थ)*** आम्ही आतल्या माळेवर जप सुरू केला पण तो मोजणार कसा? परमार्थात शंका सारख्या येतात. समर्थ म्हणाले तुम्ही श्वासावर नाम घ्या. साधारणत: मिनिटाला १५, तासाला ९०० श्वास होतात. जेवढा काळ जप कराल त्याप्रमाणे जपसंख्या ठरवता येईल. आता काही करू नका. ओठ, कंठ, जीभ यांचा वापर करू नका. उगाच एकांतात बसा व श्वासाकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन पहा. ***('नाम श्वासोच्छ्वासी असे। परब्रह्म तेथे वसे।।', 'येकवीस हजार सहाशे जपा। जपोनी गेली ते अजपा। विचार पाहाता सोपा। सकळ काही।।', 'उगाच येकांती बैसावे। तेथे हे समजोन पाहावे। घ्यावे आणि सांडावे। प्रभंजनासी।।', 'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।'- समर्थ, 'होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।'- संत कबीर)*** आम्ही तसे पाच दहा मिनिटे केले पण प्राप्ती काही नाही. समर्थ म्हणाले, 'येवढ्या अभ्यासाने ते होत नाही. ते सर्वकाळ साधावे लागते.' श्वासोच्छ्वास या साधनाचा अभ्यास करा. आपले देहाचा, मनाचा लय श्वासात व्हावयास हवा. मन प्राणापानात लीन झाले की नि:श्वासाला काही प्रमाण येईल. निश्वास फक्त एकच अंगूळ जेव्हा खाली येईल तेव्हा चैतन्याचा स्वयमेव नाद श्रवण होईल. चैतन्याच्या या साक्षात्काराने अहंकार नाहीसा होईल. रामच रामाचा जप करतो आहे हे जाणवेल. जप हरीबुद्धीने - आत्मबुद्धीने - सर्वांतरस्थ विष्णूला धरून होईल. विष्णूच्या सतत होणाऱ्या जाणीवेने जप अखंडत्वाने होईल. ***('नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप।।'- श्रीदासराममहाराज, 'विष्णूवीण जप व्यर्थ त्याचे ज्ञान। रामकृष्णी मन नाही ज्याचे।।', 'हरीबुद्धी जपे तो नर दुर्लभ। वाचेसी सुलभ रामकृष्ण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे। नामस्मरणे पावावे। समाधान।'- समर्थ)***

**

# प्रायश्चित्त

परमार्थात मार्ग कोणताही असो, चित्तशुद्धी होईपर्यंत जे काही परमार्थ म्हणून आम्ही करतो तो सारा कर्ममार्गच आहे. चित्तशुद्धी होईपर्यंत कर्म आचरणे हे अटळ आहे. ***(‘कर्ममार्गे जाणा होय चित्तशुद्धी। उपासने बुद्धी दृढ होय।।’- श्रीदासराममहाराज, ‘चित्तस्य शुद्ध्ये कर्म न वस्तूपलब्धये। वस्तुसिद्धीर्विचारेण न किंचित्कर्मकोटिभिः।।’- जगद्गुरू शंकराचार्य-विवेकचूडामणी)*** जोवर परमार्थासाठी आम्ही काही करत आहोत, तोवर कर्म सुटलेले नाही, हे निश्चित. आम्हाला जर कोणी विचारले, तुम्ही सकाळपासून परमार्थ म्हणजे काय करता हो? तर आम्ही काय काय करतो याची यादीच वाचतो. जोवर कर्तेपण आपण आपल्याकडे घेतो आहोत, तोवर कर्माचा बंध सुटत नाही. नैष्कर्म्य साधत नाही. मी संध्या करतो, मी साधन करतो, मी नामस्मरण करतो ही कर्तृत्वाची भावना जोवर आहे, तोवर कर्म बाधक ठरते. कर्मबंध प्राप्त होतो. कर्म करताना घडलेले दोष आपल्या माथी मारले जातात. दोषाप्रमाणे प्रायश्चित्तही घ्यावे लागते. पूर्वीच्या काळी स्नानसंध्यादी कर्मे करताना दोष घडत व दोषपरिहारार्थ प्रायश्चित्त घ्यावे लागे. पूर्वीच्या काळी का म्हणता? अहो, आता स्नानसंध्यादी कर्म कोणी करतच नाहीत. त्यामुळे दोषही घडत नाहीत. मग प्रायश्चित्ताचा प्रश्नच येत नाही. खरे पाहिले तर कर्म हे मन करत असते. अर्थात दोषही मनाचाच. पण प्रायश्चित्त देहाला मिळते. सक्षौर प्रायश्चित्त घेतले. अहो देहाला प्रायश्चित्त झाले, मनाला काय घासले का? सत्य नामाने मनाचे अमन होते. साधनाने मन घटते. म्हणून नाम घेताना, साधन करताना होणारे दोष हे नामानेच, साधनानेच नाहीसे होतात. म्हणून अचूक साधन साधणे, अचूक नामस्मरण करणे हेच खरे प्रायश्चित्त. साधनाने मनाचे उन्मन होऊन कर्माचे नैष्कर्म्य होते. खरा कर्ता समजतो. द्वैतबुद्धी नाहीशी होते. चित्ताचे विषय चिंतन संपते. अखंड नेम जप या स्थितीतच प्रायः चित्त राहते. चित्तात प्रायः चैतन्य भरून राहते. चित्त शुद्ध होते. हेचखरे सर्व दोषाचे प्रायश्चित्त आहे. ***(‘म्हणती प्रायश्चित्त घ्यावे। म्हणती प्रायश्चित्त द्यावे।। खरी प्रायश्चित्त गोष्टी। कोणी जाणती गा सृष्टी।। एक दोष आचरीत। एका प्रायश्चित्त होत।। दोष राहिले अंतरी। प्रायश्चित्त वरीवरी।। सर्व दोषा प्रायश्चित्त। दास म्हणे नाम सत्य।।’- श्रीमामामहाराज, ‘जैसी वरीवरी पालवी खुडीजे। आणि मुळी उदक घालिजे। तरी कैसेनी नाशू उपजे। तया वृक्षा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** नटनाम परमात्म्याचा अंतर्यामी होणारा नाच या कीर्तनाने प्रायः चित्ताचे व्यवसाय नाहीसे होऊन पापाचे नामोनिशाण शिल्लक राहात नाही. ज्या वैष्णवांनी हे कीर्तन साधले त्यांच्या पायाशी येऊन ही प्रायश्चित्ते पुनीत होतात. इतके महत्त्व या वैष्णवांचे. ***(‘तरी कीर्तनाचेनी नटनाचे। नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे। जे नामची नाही पापाचे। ऐसे केले।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘प्रायश्चित्ते पडती पाया। गाती तया वैष्णवा।। तुका म्हणे नुपजे दोष। करा घोष आनंदे।।’- श्रीतुकाराममहाराज)*** चित्तशुद्धी होते म्हणजे नेमके काय होते हो? चित्तशुद्धी होते म्हणजे दुःखाला कारण असणारे विषयचिंतन संपून चित्त सुखकारक नाम (चैतन्य) चिंतन करते. चित्त हारपून चित्तात चैतन्य भरून राहते. चित्ताला अखंड प्रसन्नता हा भगवत्प्रसाद प्राप्त होतो. ***(‘कांचनाचे ध्यान परस्त्री चिंतन। दुःखासी कारण हेचि दोन्ही।’- श्रीसमर्थ, ‘नामचिंतनी जडली प्रिती। भगवद्भाव सर्वाभूती। हेचि परमार्थसाधन। मुखी नाम हृदयी ध्यान।’- संतवचन, ‘चित्तची हारपले। अवघे चैतन्यची जाहले। पाहता पाहता अवघे विश्वची मावळले।।’- श्रीनाथमहाराज, ‘मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादु जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।’, ‘देखे अखंडीत प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथे रिगणे नाही समस्ता। संसारदुःखा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# पक्षी

चित्त शुद्ध झाले असता विषयांचा बोध न होताना चैतन्याचाच बोध होतो. सर्व विश्व त्याला भगवद्स्वरूप अनुभवाला येते. ***('चित्त अशुद्ध जो होई। बोध प्रवेशेना पाही।।'- श्रीमामामहाराज, 'तैसे चित्त शुद्ध नाही। तरी बोध करील कायी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सर्वत्र भगवंताचा अनुभव आल्याने त्याला सर्वांबद्दल प्रेम वाटू लागते. सर्व विश्व सोयरे धायरे होऊन जाते. चराचरात आपणच भरून राहिलो आहोत हा अनुभव आल्याने सर्व विश्व हेच आपुले घर आहे, असा प्रत्यय त्याला येतो. द्वैतज्ञानाने जी भीती आपणास वाटते, ती या अद्वैतबोधाने नाहीशी होते. तो निर्भय होतो. ***('चित्तशुद्धी हाती येता। प्राप्त होय निर्भयता।।'- श्रीमामामहाराज, 'चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्र ही न खाती सर्प तया।।', 'वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।।'- श्रीतुकाराममहाराज, 'हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जहाला।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'कोणा भीत नाही भीत नाही। भेदची गिळिला पाही।।'- श्रीकेशवस्वामी, 'तयाला कैचे भय उरले। ब्रह्मानंदाब्धीत जयाचे। चित्त लवण विरले।।'- श्रीसंत बाबा गर्दे)*** चित्तशुद्धी होऊन हा बोध होईपर्यंत निवांत बसून साधन साधणे-कर्ममार्ग आचरणे-गरजेचे आहे. ***('बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त। सायासाचे फळ बैसलिया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तवचि यया साधना। भजावे लागे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

त्रिगुणात्मक विचाराने होणाऱ्या हरीवीण वाया येरझारांमुळे-संसरणामुळे -होणाऱ्या संसाराच्या जाणीवेने (जगाच्या जाणीवेने) ज्याने आपणास संसारी घातले, ज्याने ब्रह्मांड निर्माण केले, त्याची जाणीव होत नाही, हेच आपले पतन आहे. त्रिगुणात्मक विचार लोपल्यावर - संसारातून बाजूला झाल्यावर - बरव्या विचाराने होणाऱ्या बरव्या साधनाने मन शांत झाल्यावर आत्मस्वरूपाच्या आवडीने बुद्धी अनन्य होऊन चित्तातील चैत्य (चिंतन) नाहीसे होऊन चित्तशुद्धी प्राप्त होते व सर्वसाक्षी मनाला तोच हा आहे हा बोध आकाशरूप महाकारणदेहात तुर्यावस्थेत शुद्ध सत्वगुणाचेमार्फत होतो. महाकारणदेहात आकाशाची होणारी शुद्ध जाणीव म्हणून त्या जाणीवेला पक्षी म्हटले आहे. ही जाणीव साऱ्या विश्वात भरून राहिली आहे. देहामध्ये असणाऱ्या जीवाचा अहंकार-मीपणा- नाहीसा होऊन त्याला शिवस्वरूपाचे ज्ञान होते. जीवपक्षाला हृदयात शिवपक्षी भेटतो. त्याचा सोहंध्वनी त्याचे कानावर येतो. हा पक्षी अनुभवला असता जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होणारी आहे. सर्व संतांनी या पक्षाचे अनुभवाचे वर्णन केले आहे. श्रीनामदेवमहाराज या पक्षाचे वर्णन असे करतात, ***'राईएवढे पाखरू दादा त्रिभुवनी त्याचा थारा।। नर आणि नारी त्या बा। पाखराचा चारा।। पिंडी आणि ब्रह्मांडी त्याचा अनुभव तुम्ही करा। त्याचा अनुभव घेता। चुकेल चौऱ्यांशीचा फेरा।। एकवीस स्वर्गावरती त्या बा पाखराची उंची। डोळ्यातील बावल्या बा त्या पाखराची नीची। सप्त ई सागरा। पाखरु घेऊनी गेले चुची।।'*** तर श्रीतुकाराममहाराज या पक्षाचे वर्णन असे करतात, ***'तो हा पक्षी शुद्ध सात्वीक। त्याचे निळे दोन पंख।। तो हा पक्षी हृदयी डोले। सोहं सोहं ऐसे बोले।। त्याचा अणुएवढा डोळा। करी ब्रह्मांडाचा गोळा।। ऐसे अनंत गोळे गिळी। तो हा पक्षी तुकयाजवळी।।'*** तर श्रीशिवदीनीकेसरी या पक्षाचा अनुभव असा सांगतात, ***'जुगजुग जुग मैना। जन्ममरण दूर करना।। नयनव पिंजरा खोलो। मुखसे मैना मैना बोलो।। खोलो त्रिकुटकी ताटी। बोलो रामनाम की घाटी।। शिवदीनकेसरी बोले। बोलके अंतर्यामी डोले।।'*** तर श्रीमामामहाराज या पक्षाबद्दल असे सांगतात, ***'देहामाजी जीवपक्षी। पाहे शिवस्वरूपासी।। तरी येईल निजठाया। मीपण जावोनी विलया।। शिवपक्षी हृदयी डोले। सोहं ऐसा शब्द बोले।। नामे जीवशीवा भेटी। दासा भेटी जगजेठी।।', 'देही देखिले नवल। आत्मपक्षी सोहं बोल।। पक्षी पंचरंगी आहे। पाहता रंगोनिया जाये।। पक्षी राजस सुकुमार। चंचू नुरवी अहंकार।। चंद्रसूर्य गती मेळे। दास म्हणे पंख निळे।।'.***

**

# कामधेनू

घरात गाय व तुळशीवृंदावन असेल तर ते घर एखाद्या हिंदूधर्मीयाचे आहे असे जुन्या काळी ओळखले जाई. हिंदू आहे म्हणजे घरी गाय व तुळशीवृंदावन हवेच. त्या काळी घरी जेवढ्या गायी जास्त, तितका तो श्रीमंत समजला जाई. सर्वसामान्य गरीब माणूस पाचपन्नास गायी सहज पाळत असे. ***('हिंदूधर्माचे भूषण। गाय तुलसीवृंदावन।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सामान्य माणसाच्या सामान्य गरजा गोपालनातून मिळणाऱ्या उत्पन्नातून भागत. पण मनात सतत निर्माण होणाऱ्या वासना कशा पुऱ्या होणार? कामधेनू, कल्पतरू, चिंतामणी मनात येतील त्या इच्छा पुऱ्या करतात म्हणे. पण या गोष्टी आम्हाला कशा मिळणार? आणि समजा कामधेनू मिळाली तरी आमच्या मनातील इच्छा पुऱ्या व्हायचे अवघडच आहे. कामधेनू मागे हटेल पण इच्छा पुऱ्या होणार नाहीत. ***('कामधेनू कल्पतरू चिंतामणी। आवडीची धणी पुरविती।।'- श्रीतुकाराममहाराज, 'वासना मनी वसली। कधी निघेनाशी झाली।। कोठवरी तिसी भांडू। मती माझी थकली।।'- श्रीचिमडमहाराज)*** इच्छा पुरी करणारी कामधेनू उपयोगी नाही तर मनातील इच्छा नाहीशी करणारी कामधेनू हवी. तरच इच्छा पुऱ्या होतील. ज्यांच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत, त्यांच्याजवळ कामधेनू आहे असे म्हणता येईल. ज्यांच्या इच्छा पूर्ण झाल्या नाहीत, त्या आमच्यापाशी कामधेनू कशी असणार? ज्यांच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत, जे कृतकृत्य झाले आहेत, अशा संतांच्याजवळ ही कामधेनू असते हे उघड आहे. ***'तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण झाली। काही न राहिली वासना हे।।', 'कृतकृत्य झालो। इच्छा केली ते पावलो।।'*** असे म्हणणाऱ्या श्रीतुकाराममहाराजांनी इच्छा नाहीशी करणारी कामधेनू जवळ पाळली होती हे उघड आहे. नाहीतर वासना नाही असे होणे शक्यच नाही. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'आम्हा घरी एक गाय दुभताहे। पान्हा न समाये त्रिभुवनी।। चहूधारी क्षीर वोळती अमूप। धाले सनकादीक सिद्ध मुनी।। तुका म्हणे माझी भूक तेथे काय। जोगविते माय तिन्ही लोकी।।'*** ही गाय त्यांनी कोठे पाहिली, ती कशी दिसते, ती कुणी पाळली होती आदी वर्णन श्रीतुकाराममहाराज पुढे असे सांगतात, ***'निरंजन वनी देखियेली गाय। तिला तीन पाय चार मुखे।। सहस्र तिला शिरे नऊ तिला कान। सत्रावीचे स्तन श्रृंग एक।। ऐशी कामधेनू व्यासानी पाळली। शुकानी वोळली जनकाघरी।। तुका म्हणे गाय भाग्य नरा भेटे। अभागी करंटे वाया गेले।।'***. नित्याचे, नेमाचे असे एक नाम आहे जे घेतले असता, अनुभवले असता इच्छा नाहीशी होते. म्हणून भगवंताचे नाम ही खरी कामधेनू. हे नाम कसे अनुभवयाचे हे सद्गुरुंकडून, संतांकडून समजून घ्यावे लागते. अर्थात संत, सद्गुरू ही खरी भक्तांची कामधेनू. ***('केशव नाम गाय केशव नाम गाय। केशव नाम गाय कामधेनू।।', 'नामा म्हणे तरी सद्गुरुपासूनी। नाम घ्या जाणोनी नाना काही।।'- श्रीनामदेवमहाराज, 'संत नाम गाय संत नाम गाय। संत नाम गाय कामधेनू।।', 'संतसंगे अंतररंगे नाम बोलावे। कीर्तनरंगी देवासन्नीध सुखेची डोलावे।।'- श्रीनाथमहाराज, 'गुरु हा कामधेनू गाय। भक्ताघरी दुभतसे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वासना नदी महापुरी। प्राणी बुडता ग्लांती करी। तेथे उडी घालूनी तारी। तो सद्गुरु जाणावा।।'- श्रीसमर्थ)*** हे जे नाम आहे, ते गायचे आहे. ते वरती गगनी प्राप्त होणारे आहे. त्या नामगायनाने थोर आनंद प्राप्त होणारा आहे. हा गगनी नामघोष न साधल्याने या आनंदाला आपण मुकलो आहोत, चुकलो आहोत. या नामगायनाबद्दल श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'एक गाय चुकली तानी। वरल्या रानी।। गाय शंभुचे शिखरी। तीन ताल शृंगावरी। नागीण पद्मीण गायीची वेणी। कपाळी चंद्रसूर्य दोन्ही। माळा घातल्या संतांनी। या योग्यानी। गाईचा गोरा मन पवन। चारा चरतसे अस्मान। वरच्यावरी पिई जीवन। तो अस्मानी। तुका म्हणे अहो गावन। येवढी गाय द्यावी सांगून। मग तुम्ही करा गायन। सभारंगणी।।'.***

**

# उलटे देऊळ

व्यवहारात जेव्हा आपण देऊळ बांधतो तेव्हा आधी पाया रचला जातो, मग देवळाची उभारणी होते व शेवटी कळसाचे काम केले जाते. पायातले दगड हे पायातच राहतात. ते कधी दिसतच नाहीत. पण ते पायात असतात म्हणून वर कळस डोलतो. पाया मजबूत असेल तर कळसाच्या गोष्टी. अर्थात कळसाइतकाच पाया महत्त्वाचा. कोणत्याही गोष्टीचा पाया कमकुवत असेल तर इमारत कधी कोसळेल हे सांगता येत नाही. भागवत धर्माचा मजबूत पाया श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी रचला. श्रीनामदेवमहाराजांनी त्या भागवत धर्माचा आसेतुहिमाचल विस्तार केला. शीख धर्माचा धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' यात श्रीनामदेवमहाराजांनी केलेले अभंग समाविष्ट केलेले आहेत. यावरून त्यांनी केलेल्या विस्ताराची कल्पना येईल. श्रीनाथमहाराजांनी त्या धर्माची ध्वजा सर्वत्र फडकवली. तर श्रीतुकाराममहाराज हे या धर्माचे कळस झाले. पायाही मजबूत व कळसही डौलदार असे भव्य देऊळ पंढरपूरच्या वाळवंटात दिमाखाने उभे आहे. ***('ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।। नामा तयाचा किंकर। त्याने केला हा विस्तार।। जनार्दनाचा एकनाथ। ध्वजा लाविली भागवत।। भजन करा सावकाश। तुका झालासे कळस।।'- श्रीतुकाराममहाराज)*** देवळात जाताना आधी दर्शन (अनुभव) कळसाचे, मग ज्याने पाया घातला त्या परमेश्वराचे. देऊळ बांधताना आधी पाया मग कळस. अनुभव घेताना आधी कळस मग पाया. आत्म्याने देह (देवाचे देऊळ) बांधला. आपण जर देहाभोवती, देवळाभोवती घिरट्या घालीत राहिलो तर देवाचे दर्शन कधीच होणार नाही. देऊळ बांधण्याचा हेतू देवदर्शन व्हावे हा असतो. तो हेतूच असफल होईल. आमचा 'मी' देहाभोवतीच फिरतोय. मंदिर प्रवेश होतच नाही. मग देवदर्शन कुठले होणार? देहाभिमानाने देहाभोवतीच्या येरझारा कधीही संपणार नाहीत. ***('देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा।। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।'- समर्थ, 'देवळाभोवती घिरट्या घालूनी। मेळविला कोणी हरी सांगा।।'- श्रीदासराममहाराज)*** देहाभोवती अहंकाराने घिरट्या न घालताना देहाचे आत अंतर्मुख होऊन उलटून पाहिले तर आधी कळसाचे दर्शन व नंतर आत्मप्राप्ती. 'कळस म्हणजे कळेनासहित' अशी कळसातील कळ (वर्म) श्रीदासराममहाराज सांगत. देऊळ जे बांधले जाते ते देवदर्शनाकरता. देवदर्शन झाले की देवळाचे-देहाचे असारपण लक्षात येते. देवाची पूजा घडली की साक्षात्काराने 'देह मी' हा अहंकार नाहीसा होतो. म्हणजेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दात देऊळ बुडते. ***('चिंचेच्या पानावर देऊळ रचिले। आधी कळस मग पाया। देव पूजीता देऊळ बुडाले। परियेसी सद्‌गुरुराया।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'देऊळ बांधियेले सुंदर। कलाकुसरी चित्राकार। आधी पहावा तो कळस। पिका आला ब्रह्मरस।।'- श्रीतुकाराममहाराज)*** श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस 'चिंचेच्या पानावर' याचा अर्थ चित्ताच्या पहाणीवर असा सांगत. या उलट्या देवळाचा अनुभव संतांच्या घरी म्हणजे निर्गुणपुरात येणारा आहे. ***('तमाशा संताघरी निर्गुणपुरी।। गावावरी एक बाभूळ। खाली शेंडा वरती मूळ। आधी कळस मग देऊळ। गत आहे न्यारी।।', 'आम्ही निर्गुणपुरीचे वाणी। आमचा जिन्नस घ्यारे कोणी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाला बसल्यावर कळेनासहित अवस्था - विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या अज्ञानाने ज्ञानाची अवस्था - प्राप्त होणे हा कळस असून अज्ञानाचे ज्ञानाने आत्मवस्तू प्राप्त होणे हा त्याचा पाया आहे. असे अज्ञानाचे ज्ञान झाले-कळस पाहिला- तर आळस, निद्रा, भूक नाहीशी होते. ***('तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तू देऊनी गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तुका म्हणे कई देखेन कळस। पळाली आळस निद्रा भूक।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# थोर भक्ती

चित्तशुद्धी झाल्यावर पक्षी, कामधेनू आदी अनुभव घेऊन देवरूप-आत्मरूप झाल्यावर, मुक्त झाल्यावर होणारी देवाची भक्ती ही थोर भक्ती होय. ***('थोर भक्तीचे महिमान। मुक्त स्थानावरील खूण।।'- श्रीमामामहाराज, 'मुक्तीवरील गुरुभक्ती। उद्धव मागे अती प्रिती। हाची भागवताचा कळस। पिका आला ब्रह्मरस।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सर्वसाधारणत: भक्ती ही परब्रह्मापासून अहंकाराने, देहभावामुळे विभक्त असणाऱ्यांना भक्त होण्यासाठी करावी लागते. पण ही जी थोर-श्रेष्ठ भक्ती आहे ती 'देह मी' हा अहंकार जाऊन अद्वैताशी समरस झालेल्या, निजस्मरणी भक्त झालेल्या, संतपदावर आरूढ झालेल्या संतांनी आचरलेली भक्ती आहे. संत हे देवरूप-भगवद्रूप झाले पण त्यांचे भजन थांबले नाही. संत हे साधनाने सिद्ध झाले पण त्यांनी साधन सोडले नाही. ***('विभक्तपणे नसावे। तरीच भक्त म्हणवावे। नाहीतरी व्यर्थची सिणावे। खटाटोपे।।', 'मी भक्त ऐसे म्हणावे। आणि विभक्तपणेची भजावे। हे अवघेचि जाणावे। विलक्षण।।', 'तो सीध परी करी साधन। सर्वकाल रामचिंतन। ध्यानधारणा अनुष्ठान। चुको नेदी।।'- श्रीसमर्थ, 'आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग। त्याचे भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना।।'- श्रीतुकाराममहाराज,'विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी। निजस्मरणी होय भक्त। जेथे नाही द्वैताद्वैत।।'- श्रीदासराममहाराज, 'थोर भक्ती नाही भेद। होणे देवासी अभेद।।'- श्रीमामामहाराज)*** ही ज्ञानोत्तर भक्ती-मुक्त झाल्यावर होणारी भक्ती - थोर भक्ती - गुरुभक्ती- देवाला आवडते. अशी भक्त होऊन भक्ती करणारे भक्त देवाला आवडतात.***('हेचि थोरभक्ती आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची।।'- श्रीतुकाराममहाराज, 'मग यावरीही पार्था। माझा भजनी आस्था। तरी तयाते मी माथा। मुकूट करी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** खरे पाहिले ना देव होऊनच देवाचे भजन करता येते. संत होऊनच संतांचे भजन करायचे असते. ***('म्हणोनि माझिया भजना। उचितू तोचि अर्जुना। गगन जैसे आलिंगना। गगनाचिया।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज,'संत होऊनिया संतासी भजावे। तरीच तरावे तुका म्हणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** कामक्रोधादी षड्विकार नाहीसे झाल्यावर, देवरूप झाल्यावर होणारे भजन, होणारी सेवा, होणारी भक्ती ही आपण समजतो त्या भजनापेक्षा, आपण समजतो त्या सेवेपेक्षा, आपण समजतो त्या भक्तीपेक्षा वेगळी आहे. ***('ऐसे मीच होऊनी पांडवा। करिती माझी सेवा। परी नवलावो तो सांगावा। असे आईक।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या भक्तीमध्ये देव वेगळा, भक्त वेगळा, उपासना वेगळी असे असत नाही. या भक्तीमध्ये देवही तोच व भक्तही तोच. वाराच (चैतन्याचा) देव, वाराच (चैतन्याचा) भक्त आणि उपासनाही वायूरूपच. याला अद्वैत भक्ती म्हणतात. या भक्तीचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात, ***'एवं आपली आपण भक्ती। करीतसे अनन्यप्रीती। हेचि निरूपण वेदांती। अद्वैतभक्ती या नाव।।'*** आम्ही जो देव वेगळा मानून उपासना करतो त्या उपासनेबद्दल श्रीनाथमहाराज काय म्हणतात पहा, ***'देव भक्त दोनी भिन्न। ऐसे जे का उपासन। ते ज्ञानाचे मुख्य अज्ञानपण। सूक्ष्म भ्रम पूर्ण अतर्क्यत्वे।।'*** नेमकी भक्ती कशी होणे संतांना अपेक्षित आहे हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'देव देऊळ परिवारू। की जे कोरूनी डोंगरू। ऐसा भक्तीचा व्यवहारू। का न व्हावा।।'.***

**

# नमन

मन आहे म्हणून दृश्याची अनुभूती - आकाराची अनुभूती - एक असताना अनेकाची अनुभूती येते. अद्वैत असताना द्वैताचे विपरीत ज्ञान होते. विपरीत ज्ञानाने सत्यज्ञान हाती येत नाही व सारे काही विपरीत घडते. जोवर अज्ञानाचे ज्ञान होत नाही, अज्ञान आहे याची जाणीव निर्माण होत नाही, तोवर अज्ञानातून विपरीत ज्ञान प्रगट होते. अज्ञानाचे ज्ञान झाले, जाणीवेत जर बाह्यमनाचा लय साधला - जाणीवेत जर नमन झाले, तर साकार विश्व भिन्न असूनही ज्ञान मात्र एका चैतन्याचेच होते. ***('म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान। जैसे अवयव तरी आन आन। परी एकेची देहीचे।', 'तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तू देऊनी गेले। ऐसे जाणणेनीवीण उरले। जाणते जे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जव अज्ञान न फिटे। तव संसार नि:शेष न तुटे। विपरीतज्ञानाचा कोंबु फुटे। माघौता म्हणौनि।।', 'आत्मयासि देह द्वये बंधन। तयासि अज्ञान मूळकारण। म्हणौनि अज्ञाननिवृत्तीविण। मोक्षु कैचा।।'- संत मुकुंदराज)*** नमनाने विश्व सत्यत्वाने देवच असल्याची अनुभूती येते. विश्वात्मक देवाचा अनुभव येतो. ***('हा गे माझा अनुभव। विश्व देव सत्यत्वे।।', 'तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** नमन होणे म्हणजेच देवाचा अभाव नाहीसा होऊन शुद्धभाव - मुख्यभाव - सोहंभाव प्रगट होणे होय. ***('नमन हाची अनुभव। नमन हाची मुख्यभाव। नमन हाची पै देव। देवाधीदेव तू पावसी।।'- श्रीनामदेवमहाराज)*** नमनाने जे एक प्रगट होते, ते एक म्हणजेच गुरु, ते एक म्हणजेच देव, ते एक म्हणजेच भक्त आहे. येथे वेगळे असे काहीच नाही. अंत:करणातील सारे भेद नाहीसे होऊन हे एकपण जाणवणे ही खरी शरणागती. ***('पै आपुलेनी भेदेवीण। माझे जे जाणिजे एकपण। तयाचि नाव शरण। मज येणे गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाने मनोलय साधून- नमन हेऊन - जो संपूर्ण देवाला शरण जातो त्यालाच देवाचा दास म्हणतात. ***('साधनी मन घटवी बा रे। साधनी मन घटवी।। साधनी घटता ते बळ अद्‌भुत। दासाची पदवी।।'- श्रीमामामहाराज)*** हा जो एक नमनाने प्रगट होतो. त्या ठिकाणी त्या एकाशी सोहंबोधाने जर एकी झाली, अन्य काही नुरून जर आपण अनन्य झालो, तर आपण खऱ्या अर्थाने विभक्तता संपून भक्त होतो. ***('तैसा मी एकवाचूनि काही। मग भिन्नाभिन्न आन नाही। सोहंबोधे तयाच्या ठायी। अनन्यु होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नव्हताची ऐसा होऊनिया ठेलो। तुझा भक्त झालो एकाएकी।।'- श्रीदासराममहाराज)*** ज्या नमनाने विभक्तता संपून आपण भक्त होतो ते नमन होणे ही खरी भक्ती आहे. ***('भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग। ब्रह्मी ब्रह्मभोग ब्रह्मतनू।।'- श्रीतुकाराममहाराज)*** 'नमन भक्तीने' भक्त झालेल्यांना जन्ममरण या संसाराची चिंता उरत नाही. ***('एऱ्हवी तरी माझिया भक्ता। आणिक संसाराची चिंता। काय समर्थाची कांता। कोरान्न मागे।।', 'जो मज होय अनन्य शरण। तयाचे निवारी मी जन्ममरण।। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून शरण जायचे असेल, वंदन करायचे असेल, नमन करायचे असेल तर ज्यांचे ठिकाणी त्रिगुणांचे पलीकडील, ज्यापासून हे त्रिगुण निर्माण झाले असा अहर्निशी परमार्थ घडविणारा विशेष असा चौथा गुण - शुद्धसत्वगुण आढळेल, दिव्यत्वाची प्रचिती येईल. त्यांना वंदन नमन करावे. ***('जेथे दिसती विशेष गुण। ते सद्‌गुरूचे अधिष्ठान। या कारणे तयासी नमन। अत्यादरे करावे।।'- समर्थ, 'वंदन म्हणजे नमन। मन आपुले देवार्पण।।- श्रीमामामहाराज)*** म्हणून शरण जायचे असेल तर एका जगद्‌गुरू भगवान सद्‌गुरु निंबरगीकरमहाराजांना जायचे. ***('तुजविण कोणा। शरण जाऊ नारायणा।।', 'शरण जावे इतरा। ते काय देणार। व्यर्थ तो जोजार मनी वाटे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'अनंत नमन श्रीगुरूला आणिक सद्‌गुरू भक्ताला। साधनी राहे नित्यनिरंतर। ऐशा साधक पुरुषाला।।'- श्रीचिमडमहाराज, 'नमितो तुज मी सद्‌गुरुराज। गुरुलिंगजंगम जय महाराज।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# गुरुपद

जगात अनेक पदे आहेत, त्या सर्वात गुरुपद हे श्रेष्ठ आहे. इतर पदे नाशिवंत आहेत तर एकमेव गुरुपद हे शाश्वत आहे. म्हणूनच त्या पदाला 'गुरु'(श्रेष्ठ) म्हणतात. इतर पदव्या जशा दिल्या जातात तशा त्या काढूनही घेता येतात. 'गुरू' ही पदवी कोणी देऊन मिळत नाही. ती गुरुपदावर आरुढ होऊन प्राप्त करून घ्यायची असते. ***('येर पदे नाशिवंत। गुरुपद ते शाश्वत।।', 'तुका म्हणे ऐसा पाहता विचार। गुरुपद थोर सर्वाहोनी।।', 'पदी बैसोनी पदवी घेइजे।।', 'जाणती ते खूण स्वात्मअनुभवी। तुका म्हणे पदवी ज्याची त्याला।।', 'ज्याची त्याला पदवी, येराला न साजे। संताला उमजे आत्मसुख।।'- श्रीतुकाराममहाराज)*** या जगात जे शाश्वत आहे ते गुरुपद आहे. या जगात शाश्वत काय आहे हो? आपले अगोचर स्वरूप तेवढे शाश्वत अविनाशी आहे. जे साधनाने देहातीत असणाऱ्या वस्तूशी तादात्म्य पावून स्वरूपाकार होतात ते गुरुपदावर आरूढ होऊन 'गुरु' ही पदवी प्राप्त करतात. आपले अगोचर गुप्त रूप हेच गुरुंचे खरे रूप आहे. हे आपले गुप्तरूप गुरुकृपेने प्रगट होणे हेच खरे गुरुंचे दर्शन आहे. हे आपले गुप्तरूप जो प्रगट करतो तो खरा 'गुरू'. ***('जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'- समर्थ, 'स्वरूप ते अगोचर। गुरु करिती गोचर।।'- श्रीमामामहाराज, 'सत्यस्वरूप लोपले होते। ते म्या पाहिले गुरुचेनी हाते।।'- केशवस्वामी, 'आजवरी गुप्तची होते। आता प्रगटे दिशादाही। याच डोळा याच देही। अनुभव घेणे।।'- श्रीचिमडमहाराज)*** विश्वात सर्वत्र सर्वांतरी गुप्तरूपाने सामान्यपणे जे पसरलेले आहे ते एक गुरुतत्व असामान्य आहे. ते गुरुतत्वच आमचे निजगुरु भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराज आहेत. ***(सोहंभावे मुकुंदरायी। भरला निजगुरू सर्वाठायी।।'- श्रीमुकुंदराजमहाराज, 'अवघाची महाराजा। दासरामी कोण दुजा।।'- श्रीदासराममहाराज)*** हे गुप्तरूप प्रगट करणारे गुरू आपल्या आत आहेत. अर्थात गुरूंची पाऊले ही आतच आहेत. या गुरुपदांचे ठिकाणी नतमस्तक होण्यातच आपले हित आहे. या अंतर्यामी असणाऱ्या गुरुंचे दर्शन होण्यासाठी आळस झटकून डोळे झाकले पाहिजेत तरच नयनात चैतन्याचे वारे भरेल. शाश्वत गुरुपदांचे - आपले गुप्तरूपाचे - स्वरूपाचे दर्शन होईल. ***('का साडेपंधरया रजतवणी। तैशी स्तुतीची बोलणी। उगियाची माथा ठेविजे चरणी। हेचि भले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'उठा उठा साधुजन। साधा आपुले निजधन। सांडा आळस उघडा नयन। घ्या दर्शन श्रीगुरुचे।।'- श्रीचिमडमहाराज)*** त्या अंतर्यामी असणाऱ्या गुरुपदांचा अनुभव आपण घेतला पाहिजे. ***('आता हृदय हे आपुले। चौफाळुनिया भले। वरी बैसऊं पाऊले। सद्गुरुची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपल्याला अंतर्यामी असणाऱ्या गुरुपदांचा अनुभव आला आहे हे कसे ओळखावे? जेव्हा मनाची धावाधाव संपते, मन स्थिर होते, सर्व शीण नाहीसा होऊन अवघ्या आनंदाने समाधान होते, तेव्हा आपणास खरा गुरुपदाचा अनुभव आला आहे, हे ओळखावे. बाहेर मन कोठेही स्थिर होत नाही. म्हणून ते चंचळ आहे. दृश्य हे बदलणारे अस्थिर आहे. तेथे मन कसे स्थिर होणार? आम्ही एवढे फिरतो पण आमचे मन कोठेही लागत नाही याचे कारण हेच आहे. पण एवढे चंचळ, अस्थिर असणारे मन निसर्गाने येणारी झोप लागताना स्थिर होते व मगच झोप लागते. झोप लागताना ज्या ठिकाणी मन लीन होते, तेथेच गुरूंची पाऊले आहेत. झोप लागताना श्वासात-प्राणापानात मन लीन होते व मग झोप लागते. झोपेत अज्ञान असल्याने गुरुपदाची जाणीव होत नाही. साधनात जाणीवेत मन श्वासाचे ठिकाणी लीन झाले, मनोवृत्तीचा निरोध साधला तर केवलकुंभक सहज साधून जन्ममरणरहित अवस्था प्राप्त होते. त्या अवस्थेत हृदयदेशी मी अमुक आहे ऐशी राहणारी सोहंची जाणीव ही गुरुंची पावले आहेत. त्या ठिकाणी मनाची धावाधाव संपून द्वैतानुसंधान नाहीसे होणार आहे. मनाचे गुरुपदाशी जर तादात्म्य झाले तर अध्यात्मातील श्रेष्ठ अनुभव प्राप्त होणार आहेत. ***('मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।। रक्तश्वेत झाली मिळणी। शाम सुनीळ केली आटणी। पितप्रभा लखलखाट। तोचि माझा उन्मनीघाट।।'- श्रीमुकुंदराज, 'आता कोठे धावे मन। तुमचे चरण देखिलिया।।'- श्रीतुकाराममहाराज)*** गुरुपदाशी जीवाचे मनाचे तादात्म्य झाले नाही तर काहीही परमार्थ साध्य होणार नाही. ***('गुरोरंघ्रिपदे मनश्चेत्र लग्नं। ततः कीं ततः कीं ततः कीं'- जगद्गुरू शंकराचार्य)*** **

# कसणे

जो कसून अभ्यास करेल, त्यालाच आत्मारामाचा अनुभव प्राप्त होईल. अभ्यासाची दिशा मात्र जाणकारांच्या मार्गदर्शनाप्रमाणे हवी. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'कसे बोटाने दाखवू तुला। पहा अनुभव गुरुच्या मुला।'*** या ठिकाणी श्रीदासराममहाराजांच्या मते श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी तुला कसे बोटाने दाखवू असा गुरुपुत्र साधकाला प्रश्न केलेला नाही. मूर्तीमंत ज्ञान असणारे श्रीज्ञानेश्वरमहाराज आमच्यासारख्या अज्ञानी लोकांना असा प्रश्न करतील हे संभवत नाही. श्रीदासराममहाराजांचे मते 'कसे' नंतर स्वल्पविराम आहे. ते म्हणतात, 'हे गुरुपुत्र साधका, तू कसून अभ्यास कर. मग तुला अनुभव बोटाने दाखवू.' ***'करतळावरी वाटोळा। डोलतु देखिजे आवळा। तैसे ज्ञान आम्ही डोळा। दाविले तुज।।'*** असे सांगणारे श्रेष्ठ योगी, भक्त, ज्ञानी ज्ञानेश्वरमहाराज असा प्रश्न करतील का? आम्ही दाही दिशांना अन्नासाठी फिरतो, त्याच सवयीने देवाच्या शोधासाठी आम्ही दाही दिशांना फिरतो पण आत्मज्ञानाची दिशा आम्हास प्राप्त होत नाही. दिशाच कळली नाही तर ती अध्यात्माची दशा - एक दशा - आम्हास कशी प्राप्त होणार? एकदशा प्राप्त झाली नाही तर विश्वरूप दर्शन कसे होणार? ***('आता यावरी एकादशी। कथा आहे दोन्ही रसी। जेथ पार्था विश्वरूपेसी। होईल भेटी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** व्यवहारात काही साध्य करायचे असेल-मिळवायचे असेल तर जागा सोडावी लागते. जागा सोडल्याशिवाय कोथिंबिरीची काडीसुद्धा मिळणार नाही. परमार्थात काही साध्य करायचे असेल तर आपण जागेवर यावे लागते. जागेवर आल्याशिवाय परमार्थ सुरू होत नाही. देह जागेला स्थिर बसला म्हणजे परमार्थ होतो का? नाही. मन जागेला बसले पाहिजे. ***('देह तरी वरिलीकडे। आपुलिया परी हिंडे। परी बैसका न मोडे। मानसीची।', 'तू मानसा नियमु करी। निश्चळु होय अंतरी। मग कर्मेंद्रिये ही व्यापारी। वर्ततु सुखे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन स्थिर-एकाग्र-शुद्ध झाल्याशिवाय निवांतपणा प्राप्त होत नाही व निवांतपणा प्राप्त झाल्याशिवाय जगज्जीवन परमात्मा प्रसन्न होत नाही. ***('कैसेनी दैवत प्रसन्न त्वरित। उगा राहे निवांत शिणसी वाया।।', 'जवळी असता जगज्जीवन। का धांडोळीसी वन। एकाग्र करी मन। तेणे होईल समाधान रे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मनात आस-काम-वासना निर्माण झाली की षड्विकारात्मक आयास-सायास वाढतात व श्वसनाची गती वाढते व 'कामक्रोधरहित श्वसन' हे भजन साधत नाही. तर कामक्रोधसहित श्वसन हा प्रपंच साधतो. ***('सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हेतुवीण सत्क्रिया आचरणे-सहजकृती साधणे- हा रामनामाचा थोर सदाचार आचरणे म्हणजे परमार्थातील कसणे आहे. उगाच एकांतामध्ये बसून खाली आणि वरती उड्डाण करणाऱ्या हंसाकडे लक्ष दिले तर मनाची, पवनाची गती सूक्ष्म होऊन मनाच्या मुळाशी असणारा वनमाळी, हंसावर स्वार-आरूढ असणारा राम साक्षात्काराला आल्याशिवाय राहणार नाही. ***('कसे मग राम पाही। कसल्यावीण राम नाही।। राम हंसावरी आहे। कसोनिया देही पाहे।। केल्यावीण नाही काम। कसणे जाणावे निष्काम।। कसणे एक रामनाम। दासा नाही दुजे काम।।'- श्रीमामामहाराज)*** जसा जसा हा रामनामाचा अभ्यास वाढेल तसा तसा चत्वारदेह निरसन होऊन तो अनुभवाने ब्रह्मरूप होणार आहे. ***('कसे कसे कसे कसे ब्रह्मरूप होती। जसे जसे जसे जसे मनी नाम घेती।'- श्रीमामामहाराज)***

**

# अनुभव

आपण ज्याला पारमार्थिक अनुभव समजतो, त्याला संतमाहात्मे पारमार्थिक अनुभव मानीत नाहीत. आपण जे अनुभव म्हणून सांगतो ते बहुतांशी जगाचे अनुभव - द्वैतातील अनुभव असतात. जगाचा अनुभव हा पारमार्थिक अनुभव नाही. जगाचा अनुभव म्हणजे नेमका कोणता? जो अनुभव मनाला, देहाच्या इंद्रियांना येतो तो सारा जगाचा अनुभव. म्हणून इंद्रियांनी मनानी कितीही खटपट केली तरी त्याचा अनुभव येत नाही. ***('अनुभवेवीण साचा। अनुभव जगताचा।।'- श्रीमामामहाराज केळकर, 'सर्व करोनिया संपले करणे। अनुभव खूण हाता नये।। सर्व पाहोनिया संपले पाहणे। अनुभव खूण हाता नये।। सर्व बोलोनिया संपले बोलणे। अनुभव खूण हाता नये।। सर्व फिरोनिया संपले फिरणे। अनुभव खूण हाता नये।।'-श्रीमामामहाराज)*** इंद्रियांना व मनाला अनुभवाला येणाऱ्या गोष्टी या कल्पांती (कल्पनेचा निरास झाला म्हणजे) नाश पावणाऱ्या आहेत. म्हणजेच त्या गोष्टींना जन्ममरण आहे. परमार्थात जो अनुभव येतो तो कल्पनेच्या पलीकडे असणाऱ्या स्वरूपाचा येतो. स्वरूप हे अजन्मा असल्याने तेथे जन्ममरणाचा प्रश्नच येत नाही. हीच परमार्थातील अपूर्वता. ***('अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाही जन्ममृत्यूची।।'- समर्थ)*** मग पारमार्थिक अनुभव कोणते? चंचळ असणारे मन स्थिर होणे हा खरा अनुभव आहे. ***('अनुभवे अनुभव अवघाची साधिला। तरीच स्थिरावला मनू ठायी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** चंचळ असणारे मन स्थिर झाले की जीवनाची गती स्थिर होऊन उर्ध्वगामी होते व प्रकाशरूप सुंदर परमात्म्याचा तारक स्वरूपाने अनुभव येतो व मन संपूर्णपणे मुरते, नमन होते. मन मुरल्यावर काय उरते याचा अनुभव त्याला येतो. ***('दिव्या वाऱ्या घाली खेव। याचा घ्यावा अनुभव।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।', 'मन मुरे मग जे उरे। ते तू कारे सेविसिना।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नमन हाची अनुभव। नमन हाची मुख्य भाव। नमन हाची पै देव। देवाधीदेव तू पावसी।।'- श्रीनामदेवमहाराज)*** मन आहे तोवर द्वैताचा, आकाशाचा अनुभव तर मन मुरल्यावर- कल्पनेचा निरास झाल्यावर होणारी वस्तूची ओळख, वस्तूचा अनुभव हा अद्वैताचा अनुभव आहे. ***('जे मनबुद्धी अगोचर। जे कल्पनेहून पर। ते अनुभविता साचार। द्वैत कैसे।।'- समर्थ)*** आपल्या अंतर्यामी असणाऱ्या आत्मवस्तूची, यच्चयावत विश्वाचा अनुभव घेणाऱ्या अनुभवीची ओळख होते. ***('ज्ञानदेव म्हणे अनुभवी तोचि जाणे। संत ये खुणे संतोषले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपल्या अंतर्यामी असणारे चैतन्यच सर्व विश्वात भरून राहिल्याचे जाणवते. ***('हा गे माझा अनुभव। विश्व देव सत्यत्वे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** दृश्य जाऊन द्रष्टाच द्रष्ट्याला भेटतो. त्यामुळे द्रष्टेपण नाहीसे होते. ***('दृश्य जाऊनिया द्रष्टे। द्रष्ट्यासिची जै भेटे। तै एकलेपणेन घटे। द्रष्टेपणही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** तेथे अनुभव घेणारा म्हणून निराळा अन्य कोणी शिल्लक राहात नाही. तो अनन्य होतो. अनुभवी, अनुभव्य, अनुभव ही त्रिपुटी येथे शिल्लक राहात नाही. हा खरा परमार्थातील अनुभव आहे. ***('ऐक अनुभवाचे लक्षण। अनुभव म्हणिजे अनन्य जाण। ऐक अनन्याचे लक्षण। ऐसे असे।।'- समर्थ)*** हा नि:शब्द ब्रह्माचा अनुभव साधकाला नि:शब्द करणारा असतो. तो शब्दाने व्यक्त करता येत नाही. तो 'शब्देवीण संवादिजे' असाच असतो. हा अनुभव अनुभवूनच घेता येतो. तो ज्याच्या त्याच्यापुरता असतो. आपण कितीही वर्णन केले तरी त्याचा फारसा उपयोग दुसऱ्याला होत नाही. ***('मुक्याने गुळ खादला। गोडी न ये सांगायाला। याचा अभिप्राव मजला। निरोपण किजे।।'- समर्थ)***

**

## आषाढ शुद्ध

***कृतकृत्य होता देह सार्थकता। आश्रमी राहाता चतुर्विध।।१।।***
***स्वप्नीचे उचीत नेमनिष्ठा कळे। वारी त्या आकळे पंढरीची।।२।।***
***लज्ञाविरहित नामाचा प्रयत्न। शील परीपूर्ण दास म्हणे।।३।।***

१) देहाच्या गावाला आल्याने आपण जन्ममरण या कृतीने विकृतकृत्य आहोत. देहात असताना शुद्ध मनाने देहातीत होऊन विकृती नाहीशी होऊन जन्ममरणरहित जे मूळ कृत आहे तेच आपले कृत्य झाले तर कृतकृत्य होऊन देहसार्थकता. विहित चतुर्विध आश्रमांचे चोख पालन केले तर हे साध्य होणारे आहे.

२) जन्ममरणाते वारी अशी पंढरपुरची वारी जर साधली तर स्वरूपाच्या ठिकाणी जागे होऊन पंचमहाभूतांचा विस्तार हे स्वप्न स्वप्नवत होते. पंढरीच्या वारीच्या नेमाबद्दल नेमनिष्ठा निर्माण होते.

३) द्वैतविरहित निर्विकल्प नामाचा प्रयत्न साध्य झाला तर सत्याच्या जाणीवेने परिपूर्ण शील जपले जाते.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने आषाढ महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## आषाढ वद्य

***दुराशा टाकिता शकून कावड। हंस सुखी चाड दिनरात।।१।।***
***वीट होता लटिके चूक थट्टा कळे। नामधारका आकळे महद्भूत।।२।।***
***दास म्हणे जडता नामाची सवयी। दीप कळो येई सहजेची।।३।।***

१) जोवर आशा आपले मनात आहे तोवर सुखाचा सागर देव कसा भेटणार? आशा ही परमेश्वरापासून दूर नेते म्हणून ती दुराशाच. ही दुराशा अंत:करणातून हालली तरच परमात्मप्राप्तीचे शुभशकुन होऊन कावडीच्या समतेने मध्यभागी नामामृत साधते व तो हंससुखाने सुखरूप होतो.

२) सर्वस्वाचा वीट आला तरच लटके आहे ते लटके होऊन आजवर खऱ्याला खोटे मानून खऱ्याची केलेली थट्टा समजते व ज्या खऱ्याला आपण चुकलो होतो ते महद्भूत नामधारकाला प्राप्त होते.

३) देहाचे विस्मरण व चैतन्याचे स्मरण या नामस्मरणाची सवय लागली तर सहजावस्थेत सोहंदीपाचा साक्षात्कार होतो.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने आषाढ महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# कृतकृत्य

जोवर आम्ही नको ती कृत्ये करत आहोत, तोवर जे कृत आहे ते विकृत होणार म्हणजे संसारबंध प्राप्त होणार. नको ती कृत्ये म्हणजे आम्ही ज्याला नको म्हणतो, त्याज्य म्हणतो, ती का? एवढे खाली परमार्थात जायचे असत नाही. येथे नको ती कृत्ये म्हणजे फळाची आशा धरून केलेली कर्मे होय. फलाशेसहित केलेल्या कर्माला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'कुकर्म' म्हणतात. हे कुकर्म घडले की सत्य, जन्ममरणरहित कृत, जन्ममरण या क्रियेने विकृत होते. सत्यावरती जन्ममरण या विकृतीचा भास निर्माण होतो. म्हणजेच संसारबंध प्राप्त होतो. तेच कर्म निष्काम घडले तर 'हेतुवीण सत्क्रिया' आचरली जाते. कृत विकृत होत नाही. म्हणून आपली कृत्ये अशी पाहिजेत की कृत, विकृत होणार नाही. कृत हे विकृत झाले की आपण 'विकृतकृत्य' होतो. तर कृत हे विकृत न होताना तसेच कृत राहिले तर कृतकृत्यता प्राप्त होते. ***('करणे ते हेचि करा नरका अघोरा का जाता।। जयामध्ये नारायण। शुद्ध पुण्य ते एक।।'- श्रीतुकाराममहाराज, 'परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी।। हे सत्क्रियाची आचरावी। हेतूवीण।।', 'हा निजधर्मु जै सांडे। आणि कुकर्मी रती घडे। तैची बंधू पडे। संसारिकु।।', 'आईके सकळ संमते जगी। अर्जूना गा तोचि योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेची फळी।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सत्य कृतीवरती वासनेने जन्ममरण या भासाची विकृती निर्माण होणे याला जन्म म्हणतात. ज्या कृत्याने ही विकृती नाहीशी होऊन आपण कृतकृत्य होतो त्या कृत्याला 'पुण्य' म्हणतात व ज्या कृत्याने सत्यावर विकृतीचा भास निर्माण होतो त्याला 'पाप' म्हणतात. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'सत्यावर जे का भासाची विकृती। तयासी म्हणती जन्म बापा।।', 'चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य। पापकर्म तेची जाण। जेणे चुकेना बंधन।।'.*** परमेश्वरकृपेने सद्गुरूकृपेने अंत:करणातील साऱ्या इच्छा पूर्ण झाल्या तरच जीवनाला परिपूर्णता प्राप्त होते. अखंड जीवन अखंड स्मरणाने कृतकृत्यता प्राप्त होते. जीवन कृतार्थ होते. ***(कृतकृत्य झालो। इच्छा केली ते पावलो।।'- श्रीतुकाराममहाराज, 'स्वामी म्हणे माझे कृतार्थ जीवन। सद्गुरुचरण उपासिता।।'- श्रीस्वामी स्वरूपानंद)*** अंत:करणात कोणतीही इच्छा नसेल तरच आपली इतर कृत्ये थांबून जे 'कृत' आहे तेच आपले कृत्य होईल. हेतुवीण सत्क्रिया आचरणे - सहजकृती आचरणे - कृत आहे तेच आपले कृत्य होणे - हेच श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. या रामनामाचे योगे जीवनाला कृतकृत्यता प्राप्त होते. ***('तुका म्हणे रामनामी। कृतकृत्य झालो आम्ही।।'- श्रीतुकाराममहाराज, 'कृतकृत्य रामनाम। नाही आणिकाचे काम।। स्वयमेव जे केलेले। तेचि करणे जाण भले।। गोविंद म्हणे नाम कृत। येर सर्वही अकृत।।', 'सहजकृती रामनाम। नाही आणिक दुजे काम।।'- श्रीमामामहाराज)*** सकळ मनुष्यमात्रांचे ठिकाणी अंतर्यामी सतत रात्रंदिवस स्वभावत: अजाणतेपणाने सुरू असणारे अव्यक्ताला व्यक्त करणारे भजन जर त्याच्या जाणीवेत झाले तर ही कृतकृत्यता प्राप्त होणारी आहे. ***('देखे मनुष्यजात सकळ। हे स्वभावता भजनशीळ। जाहले असे केवळ। माझ्याची ठायी।।', 'जाणतेन गुरु भजिजे। तेणेची कृतकार्य होईजे।। जैसे मूळसिंचनी सहजे। शाखा पल्लव संतोषती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आयुष्य हे रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी। अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी।।'- श्रीसमर्थ, 'अंतरी भजन चाले रात्रंदिन। तेणे समाधान अनिर्वाच्य।'- श्रीस्वामी स्वरूपानंद)*** या गुरुभजनाचा महिमा श्रीतुकाराममहाराज असा सांगतात, ***'तुका म्हणे गुरुभजनी। देव भेटे जनीवनी।' तर दत्तावतार श्रीटेंबेस्वामी हा महिमा असा सांगतात, 'गुरुभजनाचा महिमा नकळे आगमानिगमासी। अनुभवी जे जाणती जे गुरुपदीचे रहिवासी।।'.***

**

# देहसार्थकता

एका एका योनीत कोटीकोटी फेरे घेत चौऱ्यांशी लक्ष योनी फिरत शेवटी हा नरदेह प्राप्त होतो. वासनेच्या योगाने पाप पुण्य करून पाप पुण्य समान झाले असता हा नरदेहातील वारा प्राप्त होतो. नरदेहात (आत्म) देवाचे वारे भरते. ज्या वाऱ्याने या देहाचा संग होतो, त्या वाऱ्याचा संग-संगती-आपणास देहात असेतोवर लाभली पाहिजे. तरच नरदेहाची सार्थकता आहे. आत्महित जे संतांनी साधले ते आपण साधण्यात काही मातब्बरी आहे. त्याकरता देहाचा वापर प्रामुख्याने अर्थप्राप्तीसाठी न करता परमार्थ प्राप्तीसाठी करावा लागेल. ज्याच्यामुळे या देहाला अर्थ आहे त्या परमार्थाकडे रात्रंदिवस लक्ष द्यावे लागेल तरच अर्थरूप होता येईल. समअर्थ होऊन- समर्थ होऊन- देहाची सार्थकता साधेल. ***('देह परमार्थी लाविले। तरीच याचे सार्थक जाले। नाहीतर हे वेर्थचि गेले। नाना आघाते मृत्युपंथे।।', 'नरदेहाचे उचित। काही करावे आत्महित। यथानुशक्त्या चित्त वित्त। सर्वोत्तमी लावावे।' 'धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो। जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धिते।।' 'रात्रंदिवस पाहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ। परलोकीचा निजस्वार्थ। तेथेची घडे।।', 'हित आहे देहातीत। म्हणोनि निरोपिती संत। देहबुद्धीने अनहित। हेचि लागे।।'- समर्थ, 'एका जनार्दनी संत। नित्य साधी आत्महित।'- श्रीनाथमहाराज)*** मानवेतर देहात असणारे पोटभरू विद्यांचे ज्ञान जर आपण मानव देहात प्राप्त केले तर मानव देह मिळूनही काही उपयोग होणार नाही. सर्वव्यापक परमात्म वस्तू- चराचराचे मूळ शुद्धस्वरूप - प्राप्त करून देणारी अध्यात्मविद्या-अध्यात्मज्ञान जर नरदेहात प्राप्त झाले तर माणूस म्हणून घेण्यात काही अर्थ आहे. ***('सार्थक होते सार्थक होते दुरित सर्व जाते। पुण्य पावन ज्ञानमार्ग हा देवदर्शन होते।। ज्ञानावीण ते पशू जाणावे। वचन भगवंताचे।। अध्यात्मविद्या साधल्यावीण। व्यर्थ माणूस काचे।। दास म्हणे तो आत्मघातकी। स्वहित करेना तो।। मायाजाळी भ्रमोनी गेला। व्यर्थ मरूनिया जातो।।'- समर्थ, 'तो नर नर कसला नर कसला। हरीला विन्मुख जाहला। अविद्येचे वारे। त्यातची निमग्न जाहला बा रे।। संत समागम नाही। अवघा प्रपंच केला काही।। माझे तुझे म्हणता। लाज नाही ज्याच्या चित्ता।। ज्ञानी अनुभव नाही। अवघी बडबड करितो पाही।। संसार जन्मवरी केला। माझे माझे म्हणतची मेला।। येथे फट्टफजिती। परलोकातही खातो जुती।। दासाचे ऐकेना। जो श्रीगुरुला शरण रिघेना।।'- श्रीचिमडमहाराज, 'येवं पोट भरावयाची विद्या। तयेसी म्हणो नये सद्विद्या।। सर्वव्यापक वस्तू सद्या। पाविजे ते ज्ञान।।'- समर्थ)*** नरदेहाचे सार्थक नित्यानित्यविवेकाने महाकारणदेहातील अखंड स्मरण प्राप्त होऊन जन्ममरणाची परंपरा खंडित करण्यात - मुक्त होण्यात - आहे. ***('नरदेहाचे सार्थक सद्गुरुचरणी। महाकारण सरी चौथा देह।। ज्ञानदेव म्हणे सद्गुरुकृपेचे। नित्यानित्य कृपे शोध करा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नरतनू आल्याचे सार्थक। करिसी नित्यानित्यविवेक। तरीच बाबा तुटे तुक। जन्ममरणाचे।।'- श्रीचिमडमहाराज)*** नित्य काय आहे व अनित्य काय आहे याची छाननी सतत व्हावी लागेल. नित्य आत्म्याकडे सतत लक्ष देऊन आत्मरूप व्हावे लागेल तरच दुरित नाहीसे होऊन सार्थक साधणार आहे. देहाच्या अनुषंगाने असणारी जन्ममरण ही विकृती शुद्ध मनाने, देहातीत अवस्थेत नाहीशी होऊन वस्तूरूप होणे यातच खरी देहसार्थकता आहे.

**

# ब्रह्मचर्य

वर्णाश्रमाचे - आश्रमधर्माचे - योग्य तऱ्हेने पालन केले तर कृतकृत्य होऊन देहाची सार्थकता साधणार आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात ***‘वर्णाश्रम करिसी चोख। तरी तू पावसी उत्तम लोक।।*** १) ब्रह्मचर्य २) गृहस्थ ३) वानप्रस्थ ४) संन्यास हे ते चार आश्रम आहेत. ज्याचे लग्न झाले नाही त्याला आपण ‘ब्रह्मचारी’ ढोबळमानाने समजतो. लग्नानंतरचे सारे काही माहीत आहे, फक्त लग्न झालेले नाही, मग त्याला ब्रह्मचारी म्हणणार का? ज्याचे लग्न झाले नाही त्याला अविवाहित म्हणता येईल. तो ब्रह्मचारी नव्हे. लग्न झालेले नाही पण डोक्यात सतत तोच विषय असेल, तीच वासना असेल तर तो कसला ब्रह्मचारी? अहो वासना हीच खरी बायको आहे. ***(‘वासना बायको शेजारीण। झगडी कुटील मोठी दारूण।। हिचे पायी नागवण। घर बुडविसी।।’ - श्रीनाथमहाराज)*** वासनेला जो जवळ करत नाही तो खरा ब्रह्मचारी. ***(‘वासना राहेना अंतरी। दास म्हणे ब्रह्मचारी।।’- श्रीमामामहाराज)*** वासना अंतरी असेल तर त्याचे लक्ष अभ्यासात लागेल का? त्याचे काय शिक्षण होणार? त्याचे अक्षराचे घोकणीत लक्ष लागेल का? शिक्षण घ्यायचे असेल तर दृश्याची आशा सोडावीच लागणार. दृश्य पाहात बसलो तर शिक्षण होणार नाही. **‘शाळेला जाताना मुलांनी वाटेत तमाशा पाहात बसू नये’** ही जुन्या काळातील श्रीदादांचे कीर्तनात येणारी कविता हेच स्पष्ट करत आहे. ब्रह्म जाणलेल्या ज्ञानी वासनारहित संतांचा उपदेश प्राप्त झालेल्या गुरुपुत्राने गुर्वज्ञेप्रमाणे साधना केली तर वासनारहित होऊन इन्द्रियदमन साधून हे ब्रह्मचर्य त्यालाच सांभाळता येते. त्याचा खरा अभ्यास होतो. त्याची विद्या पुरी होते. तो आत्मज्ञानाने मुक्त होतो. ***(‘सा विद्या या विमुक्तये’- संस्कृतवचन, ‘ज्ञानात् एव तु कैवल्यम’- जगद्‌गुरू शंकराचार्य)*** वासनारहित अवस्थेत जो अंतरी ब्रह्मी रममाण झालेला असतो तो ब्रह्मचारी. ब्रह्मचारी शब्दाचा मूळ अर्थ ‘ब्रह्मणि चरति’, ‘ब्रह्मये चरति’, ब्रह्मात राहणारा, ब्रह्माकरता जगणारा, ब्रह्माच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असा आहे. सतत ब्रह्माचा विचार, मग अविचाराचे स्टेशन लागेल का? ***(‘ब्रह्मचारी जो विचारी। ब्रह्मी रममाण अंतरी।।’- श्रीमामामहाराज केळकर)*** सतत रामचिंतन करणारे, रामसेवेत धन्यता मानणारे श्रीमारुतीराय हे खरे ब्रह्मचारी. ***(‘खरा ब्रह्मचारी मनाते विचारी। म्हणोनि तया भेटला रावणारी। दयासागरे भक्तीने गौरविला। नमस्कार माझा तया मारुतीला।।’, ‘नसे अंतरी कामकारी विकारी। उदासीन जो तापसी ब्रह्मचारी। निवाला मनी लेश नाही तमाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।’, ‘स्वामी माझा ब्रह्मचारी। मातेसमान अवघ्या नारी।।’- समर्थ, ‘खेळियामाजी हणम्या बळकट। न सापडे कामव्यसनी। काम नाही तेथे क्रोध कैचा। मग कैसा भांडणार रे।।’- श्रीनामदेवमहाराज)*** समर्थ रामदासस्वामी, चिमडचे रघुनाथप्रिय साधुमहाराज, स्वामी विवेकानंद, गुरुवर्य श्रीमामासाहेब दांडेकर हे खरे ब्रह्मचारी, बाकी सारे खोटे. अक्षराची घोकणी हा खरा ब्रह्मचारी धर्म. ***(‘ब्रह्मचारी धर्म घोकावे अक्षर। आश्रमी विचार षटकर्मी।।’- श्रीतुकाराममहाराज)*** हे अक्षर कोणते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***‘ते अक्षर जी अव्यक्त। निर्देश देशरहित। सोहंभावे उपासित। ज्ञानीये जे।।’, ’आणि येर ते ही पांडवा। जे आरुढोनि सोऽहंभावा। झोंबती निरवयवा। अक्षरासी।।’, ‘म्हणोनि वेदविद नर। म्हणती जयाते अक्षर। जे प्रकृतीसी पर। परमात्मरूप।।’.*** तर श्रीतुकाराममहाराज या अक्षराबद्दल असे सांगतात, ***‘जोडिली अक्षरे। नव्हती बुद्धीची उत्तरे।। तुका म्हणे झरा। आहे मुळीचाची खरा।।’.*** अभ्यास हा तरुण वयातच व्हावा लागतो म्हणजे म्हातारपण सुखात जाते.

**

# गृहस्थाश्रम

गृहस्थाश्रम हा चारी आश्रमांमध्ये श्रेष्ठ मानला जातो. गृहस्थाश्रमीयांचेवर ब्रह्मचाऱ्यांची, वानप्रस्थियांची तसेच संन्याशांची जबाबदारी असते. 'धन्यो गृहस्थाश्रमः' असे जे म्हटले जाते, ते यामुळेच. उत्तम व्यवहाराने धन प्राप्त करायचे व आपणावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी निर्हेतुकपणे, निरपेक्षपणे खर्च करायचे हे गृहस्थाश्रमीयांचे कर्तव्य असते. ***('जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** गृहस्थाश्रम समर्थपणे सांभाळण्यातच काही मातब्बरी आहे. इहपरत्र सुखाची प्राप्ती करून घेण्यातच धन्यता असते. ***('नसे हातराया नसे पांघराया। वृथा शीण संसार करता रडाया।।'- समर्थ, 'जयाचे ऐहिक धड नाही। तयाचे परत्र पुससी काई। म्हणोनि सांगो का वाई। पंडुकुमरा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** पण उठल्यापासून झोपेपर्यंत खायचीच चिंता करणे म्हणजे गृहस्थाश्रम नव्हे. गृह कोणते व गृहस्थ कोण यांची ओळख-ज्ञान हवे, तर गृहस्थाश्रमाला अर्थ. शरीर हे आत्म्याचे घर आहे व शरीररक्षणासाठी ही बाहेरची घरे आहेत. आत्माराम - गृहस्थ कळला तरच हा उलगडा होणार. गृह-शरीर हे गृहस्थाची ओळख होण्यासाठी आहे. गृहस्थ-आत्मा कळला तर आश्रमाचा-देहाचा उपयोग आणि गृहस्थाश्रमाची सफलता. आत्मप्रचिती देहात ज्या स्थानात येते, त्या स्थानाला संत 'कोण' असे संबोधतात. हे स्थान ज्या आकाशरूप महाकारणदेहात आहे तो देह म्हणजे आत्म्याचे घर आहे. महाकारणदेह म्हणजेच 'कोणाचा देह' व 'कोणाचे घर' आहे. ***('पृथ्वीमाजी जितुकी शरीरे। तितुकी भगवंताची घरे। नाना सुखे येणेद्वारे। प्राप्त होती।'- समर्थ, 'नित्य उठोनिया खायाचीच चिंता। राहे त्या अनंता आठवोनी।'- श्रीतुकाराममहाराज, 'कोणाचे हे घर हा देह कोणाचा। आत्माराम ज्याचा तोची जाणे।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संत हे या आत्म्याच्या घरी महाकारणदेहात कोणस्थानी तुर्यावस्थेत राहतात. ***('कोणे ठायी संत राहती आपण। तो तुम्हा ठिकाण आतुडे ना।।'- श्रीतुकाराममहाराज, 'तुर्येमध्ये माझा अखंड रहिवास। निवृत्ती म्हणे अविनाश तुर्या करी।।'- श्रीनिवृत्तीनाथमहाराज)*** संतकृपा झाली तरच हे घर सापडते. संतांच्या या घराचे वर्णन स्वानुभावाने श्रीमामामहाराज असे करतात, ***'संतांचे घर सुंदर। अती रम्य मनोहर। जेथे स्वये परमेश्वर। वास करी आनंदे। हिरेमय रत्नखचित। स्वयंप्रकाशे प्रकाशत। जेथे प्रवेशता चित्त। भगवत्पदी जडतसे।। नामघोष निरंतर। दशविध वाद्यांचा गजर। मुक्तमाळा मनोहर। शोभती आसमंतात।। इंद्रादीक सुरवर। भोगिती स्वर्ग भुवन सुंदर। परी तयांसी येथील विचार। कळो येईना सर्वथा।। गुरुकृपे कळो येईल हे घर। इतरा ते न कळे साचार। सद्गुरुकृपा होईल जर। तरीच वास ते ठायी।।'.***

वासनेमुळे संसाराची जन्ममरण ही भ्रमंती सुरू होते. साहजिकच घर सुटते. किंबहुना घर सुटले की वासना निर्माण होते. आपले ठिकाणी वासना निर्माण होते आहे याचा अर्थच आमचे घर सुटले आहे. वासनारहित अवस्थेत आपले घरी उपासना करून देवाचा अनुभव घेतला तर तो गृहस्थ. वासनेमुळे घरात जो राहात नाही तो गृहस्थ नव्हे. ***('घरामध्ये जो राहे। गृहस्थ जाण तो स्वभावे।।'- श्रीमामामहाराज, 'आपुले घर केले घर केले। घरीच अखंड ठेले। घरीच केली सेवा। घरी आणिले देवदेवा।।'- श्रीदासराममहाराज, 'तरी जयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देहात-गृहात असणारा गृहस्थ समजला की तोच विश्वात कसा भरून राहिला आहे, विश्व हेच आपुले कसे घर आहे हे समजते. गृहासक्ती कमी होते व गृहस्थाश्रमात परमेश्वराची प्राप्ती होते. ***('हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।।', 'तो ब्रह्मांडीचा गृहस्थु। त्रिकुटी वास म्हणोनि कुटस्थू। परमात्मा संततू। याचेचि नाव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मजमाजी रंगली चित्तवृत्ती। या लागी विसरला गृहासक्ती। त्यासी गृहस्थाश्रमीच माझी प्राप्ती। निश्चये जाण उद्धवा।'- श्रीनाथमहाराज)***

**

# वानप्रस्थ

खरे ब्रह्मचर्य, खरा गृहस्थाश्रम ज्याला साधतो, त्यालाच खरा वानप्रस्थाश्रम साधतो. घरदार, संसार, बायकामुले सोडून जंगलात जाऊन खरा वानप्रस्थाश्रम साधेल असे नाही. वनात जाऊन एकांतात परमेश्वराचे ध्यान साधले तर वानप्रस्थाश्रम साधेल. वनात जाऊन चिंतन वनितेचे होत असेल तर तो कसला वानप्रस्थाश्रम? जगाला भिऊन जगापासून लांब गेलो तर जगाचा तटका तुटतो का? अहो, जग आपल्या डोकीत आहे तोवर जगाचा तटका तुटणार नाही. समजा आम्ही पोटाला भिऊन लांब गेलो तर पोटाचा प्रश्न सुटत नाही, तर तो अधिकच गंभीर होतो. कारण पोट हे आपल्याबरोबरच आपल्या पुढे दोन पावले असते. तसे आपण संसारापासून लांब वनात गेलो म्हणून संसार सुटत नाही. जसे विंचवाचे बिऱ्हाड विंचवाच्या पाठीवरच असते. तसे जीवाचा संसार हा जीवाबरोबरच असतो. ज्याच्या मनात वासना आहे तो वनात गेला तर तो वनात संसार थाटतो. याउलट जो साधनाने वासनेवर मात करतो तो संसारातून निराळा होऊन घराचे तपोवन करतो. संस्कृत कवी कालिदास सांगतात, ***'वनेषु दोषाः प्रभन्ति रागिणः। गृहेषु पंचेद्रिय निग्रहः तपः। अकुस्तिते वर्त्मनि यः प्रवर्तते। विनीत रागस्य गृहम् तपोवनम्।'*** म्हणून वानप्रस्थाश्रम साधणेसाठी वनात जाणे म्हणजे वानप्रस्थाचे प्रस्थ वाढवणे होय. वानप्रस्थ साधणेसाठी वनात जाणे गरजेचे नाही. घरात राहूनही तो साधणाऱ्यांना साधता येतो. स्त्री जवळ असताना स्त्रीपासून अलिप्त राहणे, संसारात राहून संसारातून निराळे होणे, जगात राहून जगापासून अलिप्त राहणे हा खरा वानप्रस्थाश्रम, जो संतांनी आचरला. शिवाय या वानप्रस्थाचे प्रस्थ काहीच नाही. आमच्या वानप्रस्थाचे प्रस्थच दांडगे. आम्ही वानप्रस्थ स्वीकारलाय, उगीच नाही महाराज. वानप्रस्थाचासुद्धा अहंकार. वानप्रस्थाश्रम म्हणजे साधनाभ्यासाने त्रिगुणाचा निरास होऊन त्रिगुणांचे पलिकडील चौथा शुद्ध सत्वगुण प्राप्त होणे. मलीन वासना नाहीशी होऊन शुद्ध वासना राहणे, सर्व कल्पना नाहीशा होऊन शुद्ध कल्पना-बरवा विचार प्राप्त होऊन बरवे साधन प्राप्त होणे व या योगे अहर्निशी परमार्थ - अखंड स्मरण प्राप्त होणे होय. वानप्रस्थी या जगात राहतो पण अनुभव जगाचा घेत नाही. अनुभव परमेश्वराचा घेतो. त्याला दृश्य पदार्थाचा स्पर्शच होत नाही. मग बायको जवळ असली तर काय फरक पडणार? अहो आकारलेले जग (द्वैत) दिसतंय याचा अर्थच तो (अद्वैत) दिसत नाही. जगाचा तटका तोडल्याशिवाय त्याचा चटका लागत नाही. एकाचा वियोग झाल्याशिवाय दुसऱ्याचा योग होत नाही. वानप्रस्थाचे लक्षण सांगणारी काही संतवचने अशी - ***'तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाची नाही।'- समर्थ, 'वानप्रस्थ तरी संयोगी वियोग। संन्यास तो त्याग संकल्पाचा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'वानप्रस्थ तोचि जाणा। संयोगात वियोग खुणा।।'- श्रीमामामहाराज, 'जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका।।'- श्रीदासराममहाराज.***

**

# संन्यास

सर्वसामान्य संस्कारित अनुग्रहित माणसांना ब्रह्मचर्याश्रम व गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा अधिकार आहे. जो या दोन आश्रमात अभ्यास करून, त्रिगुणांचे पलीकडे त्रिगुणरहित होऊन, शुद्ध सत्वगुणाचे योगे महाकारणदेहात तुर्यावस्थेत अहर्निशी परमार्थ साधतो. अशा सिद्धांना-संतांना-ब्राह्मणांना-वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम स्वीकारता येतो. अहो मॅट्रीक पास झाल्याशिवाय महाविद्यालयात कसा प्रवेश घेता येईल? समजा आम्ही दडपून प्रवेश घेतला तर पुढे आपलेच हसे होईल. सध्या आधी कुणी या मार्गाला जात नाही. आश्रमसंस्थाच मोडकळीस आली आहे. ब्रह्मचर्याश्रम किंवा गृहस्थाश्रम हे सरळपणे पार पाडायची पंचाईत मग कुठला वानप्रस्थ, कुठला संन्यास? त्यातून एखाद्याने धाडसाने वानप्रस्थ स्वीकारलाच तर तो वनात प्रपंच मांडतो व त्या वानप्रस्थाची फटफजिती होते. एखाद्याने भगवी वस्त्रे परिधान केली तर माणसे हसतात. कारण संन्याशाचे सोंग आणता येते पण वैराग्याचे अंग कुठून आणणार? संन्याशीच जर गाडीतून फिरत असतील, पंचतारांकित हॉटेलमध्ये ऐशोआराम भोगत असतील तर ते संन्यासाश्रमाचे हसे नव्हे काय? परमहंस पदावर आरुढ झालेल्या संन्याशाला, विविक्षित घर असत नाही. 'हे विश्वची माझे घर' अशी त्यांची स्थिर मती असते. परमहंस संन्याशाचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात, ***'संन्याशासी निवासस्थान। वेदी बोलिले नाही जाण। तिही स्वदेहाचे केले दहन। नेमिले स्थान त्या नाही।।', 'संसार मायामय मिथ्याभास। जाणे तोचि वेदज्ञ विद्वांस। त्यासी बोलिजे परमहंस। विश्वनिवासनिवासी।।', 'ऐक परमहंसाचे लक्षण। ज्ञान परिपाके परिपूर्ण। अतएव शांती वोळगे आंगण। देखे तिन्ही गुण मिथ्यात्वे।।'*** तर श्रीमामामहाराज हे परमहंसाचे लक्षण असे सांगतात, ***'परमहंसाचे लक्षण। सोऽहंहंसी ज्याचे मन।'*** तर श्रीदासराममहाराज परमहंसाचे लक्षण असे सांगतात, ***'रामकृष्ण जरी हंसस्थिती आले। परमहंस झाले रामकृष्ण।'*** सर्वसंगपरित्याग केल्याशिवाय संन्यास घेता येत नाही. कशाचा संग झाला आहे आपणाला? अहंकाराचा संग झाला. तो टाकला तरच संन्यासदीक्षा प्राप्त होते. **संगत्याग**-अहंपणा टाकणे, **निवेदन**-परमात्मरूप होणे, **विदेहस्थिती**-देहाला सुटून राहणे, **अलिप्तपणा**-संसारात असून नसल्यासारखे असणे, **सहजस्थिती**-निर्हेतुक सत्क्रिया आचरणे, **उन्मनी**- मनाचे मनत्व न राहणे, **विज्ञान** - ज्ञान असून ज्ञानाची जाणीव नसणे ही अवस्था या सातही अवस्था एकरूप आहेत. समर्थ सांगतात, ***'संगत्याग आणि निवेदन। विदेहस्थिती अलिप्तपण। सहजस्थिती उन्मनी विज्ञान। हे सप्तही येकरूप।।'.*** विश्वनिवासी कधी होता येते हो? ज्याच्या अंत:करणात कोणतीही इच्छा नाही असा अहंकाररहित पुरुष विश्वनिवासी होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तो अहंकाराते दंडूनी। सकळ कामू सांडोनी। विचरे विश्व होऊनी। विश्वाचीमाजी।'*** संन्याशाने झाडाखाली राहायचे व भिक्षेत एकदा हातात पडेल तेवढेच खायचे. करतलभिक्षा व तरुतलनिवास हे संन्यासाश्रमाचे लक्षण आहे. वार्धक्यामुळे ज्याला हे संन्यासाचे नियम आचरता येत नाहीत तो 'कुटीचक' संन्यास स्वीकारतो. त्या 'कुटीचक' संन्यासाबद्दल श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'कर्म त्यागोनी झाला संन्यासी। ज्ञान ध्यान नाही मानसी। अन्नालागी स्वग्रामवासी। 'कुटीचक' तयासी बोलिजे।। वार्धकी कुटीचकाची परी। अग्निहोत्र-स्त्रियेचा त्याग करी।। परी शिखासूत्र न अव्हेरी। गायत्रीमंत्री अधिकारू।। नित्य भिक्षा पुत्राचे घरी। पर्णकुटी बांधे त्याचे द्वारी।। मठिका सांडूनी न वचे दूरी। 'कुटीचक' निर्धारी या नाव।।'***

**

# संन्यास

वासना शुद्ध होणे म्हणजे वानप्रस्थाश्रम, तर वासनारहित होणे म्हणजे संन्यास होय. साधन साधल्याशिवाय अपेक्षित वानप्रस्थाश्रम साधणे किंवा संन्यास साधणे तसे अवघडच. नुसता संन्यासाचा विधी करून घरदार, बायकामुले सोडून दिली व अंगात भगवे कपडे घातले म्हणजे संन्यास होत नाही. संन्यासाचे बहिरंग साधेल पण अंतरंगाचे काय? घरदार टाकता येईल पण देहभाव कोण टाकणार? आईवडिलांचा त्याग केला पण अहंकार अविद्या कोण टाकणार? भाऊबहीण टाकता येतील पण संकल्प विकल्प, आशा कोण त्यागणार? बायको टाकली पण वासना कोण टाकणार? देहभाव, अहंकार, अविद्या, संकल्पविकल्प, आशा, इंद्रियवासना हे अंतर्यामी ठेवून संन्यास होत नाही. ***('काखे घेवोनिया दारा। म्हणे मज संन्यासी करा।। - समर्थ)*** तो नित्यरूप आत्मा सर्वथा जर ओळखला, सर्वथा जर आत्मबोध जाहला तर इंद्रिये उघडी पडतात. इंद्रिये विषय विसरतात. म्हणून कल्पनेचा निरास होऊन आत्मवस्तूची ओळख होणे, आत्मरूप होणे व अंत:करणातील मी व माझे नाहीसे होणे हा खरा संन्यास आहे. ***('म्हणौनि कल्पना जै सांडे। तैचि गा संन्यासू घडे। या कारणे दोनी सांगडे। संन्यास योगू।।', 'आणि मी माझे ऐसी आठवण। विसरले जयाचे अंत:करण। पार्था तो संन्यासी जाण। निरंतर।।', 'तरी जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संन्याशाचे धर्मी जाण। मुख्यत्वे हेचि लक्षण। पवित्र करोनी अंत:करण। सर्वत्र नारायण लक्षावा।।'-श्रीनाथमहाराज, 'मी माझे स्मरण नाही। विश्वी ईश्वर एकची पाही। दास म्हणे ऐसा प्राणी। तोचि जाणा आत्मज्ञानी।।'- श्रीब्रह्मचैतन्यमहाराज)*** कल्पना करणे - संकल्प करणे हे मनाचे काम आहे. अर्थात मनोलयाने संकल्पाचा त्याग - कल्पनांचा त्याग होणार आहे. मीपण ही एक कल्पना आहे. अर्थात 'मी'ला चिकटलेले माझे ही एक कल्पनाच आहे. मनोलयाने मी व माझे अंत:करणातून जाणार आहे. हा मनोलयाने होणारा संकल्पाचा त्याग हा खरा संन्यास आहे. ***('वानप्रस्थ तरी संयोगी वियोग। संन्यास तो त्याग संकल्पाचा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'परमहंसाचे लक्षण। सोहंहंसी ज्याचे मन।।', 'सर्व संकल्पाचा नाश। तोचि बोलिजे संन्यास।।'- श्रीमामामहाराज)*** जेथे संकल्पच नाही तेथे विकल्प संभवत नाही. संन्यासी हे निर्विकल्प अवस्थेत असतात. ***('विकल्प नाही जयापाशी। दास म्हणे तो संन्यासी।।'- श्रीमामामहाराज)*** ज्याचेपाशी संकल्पविकल्प नाही असा आत्मरूप संन्यासी गावात राहिला तरी चालते. ***(ऐसा घेई का संन्यास। करी संकल्पाचा नाश।। मग तू राहे भलते ठायी। जनी वनी खाटे भोई।। तोडी जाणीवेची कळा। होई वृत्तीसी वेगळा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** हा संकल्पाचा त्याग केव्हा साधतो हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'श्वासोश्वासी प्रणवाभ्यास। तोचि आमुचा संन्यास।। तयासीच भगवे साजे। येर मुंडिले विराजे।। मज भिती त्याच्या दंडे। करी कृतांताची खंडे।। तुका म्हणे सद्गुरुसी। ऐसा विरळा संन्यासी।।'***

श्रीदासराममहाराजांनी नवव्या वर्षी लिहिलेल्या 'रामदास बोध' या ग्रंथात खरा संन्यास कशाला म्हणतात हे स्पष्ट केले आहे. हे केवढे विशेष आहे.

भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराजांचे चुलतबंधू व चिमडच्या महाराजांचे अधिकारी जावई, संन्यस्त वृत्तीचे विरक्त, अणुरेणूठायी भरून उरलेले विश्वनिवासी श्रीगोपाळकाका कोटणीस तथा गोपालनाथ यांनी आज ईशचिंतन करीत देह ठेवला. त्यांचे पुण्यस्मृतीस अभिवादन करतो व येथेच थांबतो.

**

# स्वप्नीचे उचित

अज्ञानाचे ज्ञान जर झाले नाही तर चैतन्याच्या विस्मृतीतून - स्वपणाच्या अज्ञानातून - जे विपरीत ज्ञान प्रगट होते त्याला स्वप्न म्हणतात. हे विपरीत ज्ञान दोन प्रकारे प्रगट होते. एका प्रकारात मन हे सूक्ष्म देहात कार्यरत होऊन दृश्याचा अनुभव घेते. ज्याला आपण 'स्वप्न' म्हणतो. हे स्वप्न कमीत कमी तीन सेकंद व जास्तीत जास्त सात सेकंदाचे असते. काही स्वप्ने अर्थपूर्ण असतात तर काही स्वप्ने दुर्लक्ष करण्याजोगी निरर्थक असतात असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत. दुसऱ्या प्रकारात मन हे स्थूल देहात कार्यरत होते व इंद्रियांमार्फत दृश्याचा अनुभव घेते. अर्थात दृश्याचा अनुभव दोन्ही प्रकारात मनातील कल्पनेमुळेच प्राप्त होतो. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'स्वप्नीचा देह केवळ मन। त्याही देहासी असे मनपण। तैसा हाही देहो मनची जाण। अभिमाने कठीण स्थूळ केला।।'.*** चैतन्याच्या विस्मरणाने मनाला प्राप्त होणाऱ्या विपरीत ज्ञानाने जीव दृश्यात, विषयात गुरफटतो आणि विषयांची इच्छा करू लागतो व इच्छापूर्तीसाठी फळाच्या आशेने कर्म करतो आणि संसारबंध प्राप्त होतो. विषयांचे बंधन प्राप्त होते. 'मन विषयासक्त होणे' हा बंध, तर मन निर्विषय होणे हा मोक्ष होय. मन हेच माणसाच्या बंधाला किंवा मोक्षाला कारणीभूत ठरते. ***'मनः एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः। बंधाय विषयासंगि मोक्षे निर्विषयं स्मृतम्।'*** हे संस्कृत वचन हेच स्पष्ट करते. मनात वासना आहे, इच्छा आहे तोवर संसार- संसरण सुटत नाही व जोवर संसरण-संसार सुटत नाही तोवर अज्ञान, विपरीत ज्ञान याचाच अनुभव. सत्यज्ञानाचा अनुभव प्राप्त होत नाही. आत्मानुभव प्राप्त होत नाही. ***('आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्था आपण जे अनुभवतो, ते श्वासोच्छ्वास चालू असतात म्हणूनच. शरीरातील श्वासोच्छ्वास जर संपले तर आपणास या अवस्था प्राप्त होतील हे स्वप्नात तरी संभवते का? अर्थात श्वासोच्छ्वासामुळे अवस्था प्राप्त होतात हे निर्विवाद सत्य आहे. जशी अवस्था असते तसे अवस्थेप्रमाणे ज्ञान जीवाला प्राप्त होते. जागृतीतील ज्ञान वेगळे, स्वप्नातील वेगळे. ज्या त्या अवस्थेत ते ते ज्ञान खरे वाटते. अवस्था बदलली की तेच ज्ञान खोटे वाटते. मग जे अवस्थेप्रमाणे बदलते, ते ज्ञान सत्य कसे मानता येईल? जे दृश्य आम्ही पाहतो व जे आम्हाला 'चक्षुर्वे सत्यम्' या न्यायाने खरे वाटते, ते दृश्यच बदलणारे आहे. मग बदलणाऱ्या दृश्याचे ज्ञान बदलणारच की. मनात येणाऱ्या कल्पनांमुळे प्राप्त होणाऱ्या जागृती व स्वप्न या विपरीतज्ञानाच्या अवस्थांमध्ये किंवा मनोलयाने प्राप्त होणाऱ्या अज्ञानाच्या सुषुप्ती अवस्थेत चैतन्याची जाणीव होत नाही. न बदलणारे सत्यज्ञान होत नाही. मिथ्याभूत स्वप्नातून सत्य स्वपण हाताला येणे हेच स्वप्नीचे उचित आहे. आम्ही स्वप्ने पाहिली व ती सत्यात कधी उतरलीच नाहीत तर स्वप्न हे स्वप्नच राहणार. आम्ही रात्रंदिवस स्वप्नेच पाहतो, मग सत्य हाताला येईल का?

ज्यांना भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराज 'कडे हुट्ट मगा' (शेंडेफळ) असे प्रेमाने म्हणत त्या श्रीनरसाप्पा शापेटी यांनी आज ईशचिंतन करीत देह ठेवला. त्यांचे पुण्यस्मृतीस अभिवादन करतो व येथेच थांबतो.

**

# स्वप्नीचे उचित

आम्ही रात्री झोपेत मनाच्या अस्तित्वावर स्वप्ने पाहतो. मग दिवसा जागेपणी अनुभवतो ती तर जागृती आहे का नाही? जागेपणीही आम्ही अखंड कल्पना करत असतो व या कल्पनेमुळेच दृश्य हे दृश्यमान होत असते. मनाच्या अस्तित्वामुळे दृश्याची जाणीव-आकाराची जाणीव-द्वैताची जाणीव होते. मनोलयानंतर कल्पांती दृश्याची जाणीव होत नाही. ***('तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही।। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीच मी आघवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ)*** शिवाय जे जे डोळ्याला दिसणारे किंवा मनाला भासणारे-जाणवणारे आहे ते सारे कालांतरी नाहीसे होणारे आहे. अर्थात स्वप्नवत् आहे. संतांनी हा पंचमहाभूतांचा साकार विस्तार कल्पांती (कल्पनेचा अंत झाल्यावर) नाहीसा होणारा असल्याने स्वप्नवत् मानला. ***(पंचमहाभूतांचा विस्तार। जयास वाटे स्वप्नाकार। निर्गुणी जयाचा निर्धार। तो एक साधक।'- श्रीसमर्थ)*** म्हणून मनाच्या अस्तित्वावर भासमान होणाऱ्या जागृतीला श्रीदासराममहाराज खरी जागृती मानत नाहीत. त्याला ते स्वप्नजागृती म्हणतात. स्वपणाला विसरल्याने मनाच्या अस्तित्वावर जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्था प्राप्त होतात. अर्थात या तिन्ही अवस्थांत त्याची आठवण, सत्याची जाणीव नाही. सत्यस्वरूपाची जाणीव ज्या अवस्थेत होते, ती खरी जागृती. सत्यस्वरूप हाताला आले, स्वपण हाताला आले तर आनंद प्राप्त होतो. ***('जागृती स्वप्न सुषुप्ती नाठवे। पाहाता आनंदी आनंद सामावेना।।', 'स्वप्नी रे पाहाता मिथ्या नगरी। निद्रा घोर झाला राम। जागृत होता काहीच नाही। जेथील तेथे गेला राम।।'- संतवचने)*** हा मिथ्या संसार संतांनी स्वप्नवत मानला. या संसारातून बाजूला होऊन सत्य स्वपण-स्वरूप -हाताला येणे, स्वरूपाचे ठिकाणी आपण जागे होणे हेच या संसाराचे-स्वप्नाचे उचित आहे. ***('स्वप्न तेचि मिथ्याभूत। स्वपण तयामध्ये सत्य।।', 'स्वपण नाम कळे जरी। तोचि स्वप्न सत्य करी।'- श्रीमामामहाराज, 'संसार स्वप्नसंकाशं। यौवनं कुसुमोपमं। विद्युचलंच जीवित्व। तस्मात जाग्रही जाग्रही।।'- जगद्गुरु शंकराचार्य, 'स्वप्नी स्वप्नाचा विचार। तो तू जाण संसार। येथे तुवा सारासार। विचार केला।।'- समर्थ रामदासस्वामी)*** जोवर आपण जन्ममरण, येणेजाणे ही क्रिया अनुभवतो आहोत तोवर सारख्या बदलणाऱ्या स्वप्नवत जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्थाच अनुभवाला येणार. कल्पनेचा निरास झाला तर जन्ममरणाचे पैल ज्यावर या तीन अवस्था अधिष्ठित आहेत ते आत्मरूप, चैतन्य अनुभवाला येणार. आत्मरूपाचे ठिकाणी अखंड स्मरण आहे. ते अखंड स्मरण आपणाला प्राप्त होणार. आपण आत्मरूप होऊन अखंड स्मरण प्राप्त होणे म्हणजे सदा स्वरूपानुसंधान प्राप्त होणे होय. अखंड स्मरणाने तुर्यावस्था प्राप्त होणे म्हणजेच तीन अवस्थांची एक अवस्था होणे. म्हणजेच संसारस्वप्नातून जागे होणे होय. ***('जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।। जन्ममरण देखे देही। तरीच होशील विदेही।।'- श्रीदासराममहाराज, 'आम्ही हरीहरांच्या दासी। अखंड झालो वैकुंठवासी।। आम्हा येणे जाणे नाही। आम्हा येथेची वैकुंठ पाही।।'- निजानंद)***

**

# नेमनिष्ठा

नेम सातत्याने सतत चालविणे ही फार अवघड गोष्ट आहे. नेम चालवताना वाटेत जे जे आड येईल ते ते बाजूला करण्याची तयारी हवी. तरच नेमाच्या गोष्टी बोलायच्या. समजा देव्हाऱ्यावर विंचू आला तर नेमाची देवपूजा थांबवायची नाही, तर त्या विंचवाची आधी खेटराने पूजा करायची व नंतर भक्तीभावाने देवाची. पण पूजेचा नेम चुकता कामा नये. ***('देव्हाऱ्यावरी विंचू आला। देवपूजा नावडे त्याला। त्यासी पैजाराचे काम। अधमाहोनी तो अधम।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही केलेला एखादा सामान्य नेम तीन दिवसपण नीट चालत नाही. 'तेरड्याचा रंग तीन दिवस' असाच आमचा अनुभव आहे. कारण नेम करणे हे आमचे मनातच असत नाही. म्हणून आमचा नेम पूर्णत्वाला जात नाही, अखंडत्वाने चालत नाही. ***('तुका म्हणे मनी नाही। नये आकाराते काही।।'- श्रीतुकाराममहाराज, 'मनी नाही ऐसे म्हणा। खुण कळली साधुजना।।'- श्रीमामामहाराज)*** आमचे चंचळ मनच आमचा नेम तडीस जाऊ देत नाही. जोवर आमचे मनाचा एका नेमाबद्दल निश्चय होत नाही, निर्धार होत नाही, तोवर नेमाचे काही खरे नाही. ***('मनजी पाटील देहगावीचा। विश्वास धरू नका हो त्याचा। घात करील नेमाचा। पाडील फशी।।', 'एका जनार्दनी निर्धार। तेथे प्रगटे विश्वंभर।।'- श्रीनाथमहाराज, 'तुका म्हणे येथे कराराचे काम। तया आहे राम जवळीच।।'- श्रीतुकाराममहाराज)*** शेंडी तुटो वा पारंबी तुटो, नेम चुकता कामा नये असा निर्धार हवा. ***('बुडो ही धरा की लया विश्व जावो। पडो काळहस्ते शिरी वज्रघावो। विसंबू नको सर्वथा नाममाळा। मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा।।'- संतवचन)*** अशी नेमाबद्दल निष्ठा आहे म्हणून लाखो वारकरी घरातील, संसारातील सगळ्या अडचणी बाजूला ठेवून वेळचेवेळी पंढरीचा मार्ग अनुसरतात. पायात पादत्राण न घालता, ऊन-पावसाची तमा न बाळगता, बाल, तरुण, स्त्रिया, वयोवृद्ध साऱ्यांनी बिनतक्रार लौकिक दृष्टीने गैरसोय असूनसुद्धा भगवंताचे नामस्मरणात दंग होऊन वारीत सहभागी होणे ही काही साधी गोष्ट नाही. मनापासून जर आवड असेल तरच मन पांडुरंगाचे ठिकाणी रंगून जाणीवेत मनोलयाने जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थेत आनंदाच्या चैतन्याची जाणीव होते व अंतरी सोहंब्रह्म वीटेवर साकारते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'माझे जीविची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।। पांडुरंगी मन रंगले। गोविंदाचे गुणी वेधले।। जागृती स्वप्न सुषुप्ती नाठवे। पाहता आनंदी आनंद सामावेना।। बापरखुमादेवीवरू सगुण निर्गुण। रूप विटेवरी दाविली खूण।।'***

आमच्या श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी एकही दिवस खंड न होता अखंड कीर्तनाचा नेम चालविला. कोणत्याही परिस्थितीत त्यांचा नेम अंतरला नाही. त्यांचे आयुष्यात दु:खाचे प्रसंग काही कमी आले का? खूप आले. पण त्यांनी कीर्तनाला सोडले नाही. ***('साता दिवसाचा झाला उपवासी। तरी कीर्तनासी सोडू नये।।', 'आयुष्य करी उणे। परी मज आवडो कीर्तन।।'- श्रीतुकाराममहाराज)*** शेवटी अखंड कीर्तनाच्या अनुसंधानात त्यांनी आपला देह ठेवला व कीर्तनरूप जाहले. केवढी ही नेमनिष्ठा!

**

# व्यापक पंढरी

विठ्ठल ही अनुभूती आहे. अनुभूती शब्दात व्यक्त करता येत नाही. ती अनुभवावीच लागते. आपण साखरेच्या गोडीचे कितीही वर्णन केले तरी ऐकणाऱ्याला काही समजणार नाही. तेच साखरेची एक चिमट त्याच्या जिभेवर ठेवली की लगेच गोडी काय आहे हे समजते. ***(‘साखरेची गोडी नयेची सांगता। अनुभवाची कथा ऐसी गे माये।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘हे शब्देवीण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे। बोलाआदी झोंबिजे। प्रमेयासी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून संपूर्ण ज्ञानेश्वरीत ‘विठ्ठल’ हा शब्द कोठेही आढळत नाही. विठ्ठल हा शब्द विद् व स्थल यांचे संधीने बनला आहे. विद् + स्थल - विठ्ठल. अर्थात विठ्ठल हा शब्द जाणण्याचे ठिकाण दर्शवितो. विठ्ठलालाच विठोबा हे ही नाव आहे. त्याला विठोबा नाव का पडले हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात -*‘विचा केला ठोबा। म्हणोनी नाव त्या विठोबा।।’* - ‘विचा केला ठोबा’ म्हणजे काय हे श्रीदासराममहाराज असे सांगत, ‘अहंकाराचा ठोंबा विज्ञानात्मक झाला की तोच विठोबा होतो, हे सांगताना ते संताच्या ***‘होता अहंकाराचा ठोंबा। उपडीला घुसळखांबा। कैचे दाविले स्वयंभा। बाई तुझिया कृष्णाने। बाई तुझिया रामाने।।’.*** या अभंगाचा संदर्भ घेत. विठ्ठल ज्या ठिकाणी अनुभवाला येतो त्या ठिकाणाला कोणगाव, पंढरपूर म्हणतात. ***(‘कोणे गावी आहे सांगा हा विठ्ठल। जरी ठावा असेल तुम्हा कोणा।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘पंढरीनिवासा सखा पांडुरंगा। करी अंगसंगा भक्ताचिया।।’- श्रीनामदेवमहाराज)*** विठ्ठल हा सर्वव्यापक आहे. अर्थात पंढरीही सर्वव्यापक आहे. ***(‘पंढरी नव्हे एकदेशी। विठ्ठल सर्वत्र निवासी।। आम्ही देखिला विठोबा। आनंदे विटेवरी उभा।। रामदासी दर्शन जाले। आत्मविठ्ठला देखिले।।’- समर्थ, ‘कशास जावे दूर। माझे येथेची पंढरपूर।। अणू रेणू व्यापक विठ्ठल अवघा। काय म्हणावा दूर।।’- श्रीनाथमहाराज)*** विठोबा अनादी अविनाशी आहे, तसे पंढरपूर हे पण अनादी अविनाशी आहे. ***(‘नाही आदी अंत ऐसा जो अनंत। तोचि पंढरीत पांडुरंग।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘जेव्हा नव्हते चराचर। तेव्हा होते पंढरपूर।। नासिलिया भूमंडळ। उरे पंढरीमंडळ।। असे सुदर्शनावरी। म्हणूनी अविनाश पंढरी।। नामा म्हणे बा श्रीहरी। ते म्या देखिली पंढरी।।’- श्रीनामदेवमहाराज)*** संतांनी अनुभवलेली अनादी अविनाश पंढरी ही लोकांच्या पंढरीपेक्षा निश्चित वेगळी आहे. ***(‘लोकांची पंढरी आहे भूमीवरी। आम्हा जाणे दुरी वैकुंठासी।।’- श्रीतुकाराममहाराज)*** संतांच्या पंढरीत जर आपण एकदा गेलो तर जन्मोजन्मीचे दुःख नाहीसे होऊन सर्वसुखाची प्राप्ती होते. ***(‘सुखालागी करीसी तळमळ। तरी तू पंढरीसी जाई एकवेळ।। मग तू अवघाची सुखरूप होसी। जन्मोजन्मीचे दुःख विसरीसी।।’, ‘तुका पंढरीसी गेला। पुन्हा जन्मा नाही आला।।’- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही पंढरीला एवढ्यांदा गेलो, वहाणा झिजल्या, पण सर्वसुखाची प्राप्ती होत नाही असे का? अहो, संतांची पंढरी वेगळी आहे. ज्यांनी देहातील आत्मविठ्ठल अनुभवला, ‘काया ही पंढरी अनुभवली’ त्यांना जनात, वनात पांडुरंग दिसतो व तो खरा वारकरी होतो. ***(‘काया ही पंढरी। आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडुरंग।।’, ‘देखिली पंढरी देही जनी वनी। एका जनार्दनी वारकरी।।’- श्रीनाथमहाराज)*** ज्यांनी देहातील पंढरी अनुभवली त्यांना दूरच्या पंढरपूरला जावे लागत नाही. त्यांना अणुरेणूत परमात्मा दिसतो. पंढरी अनुभवाला येते. संत सावंतामाळी कधीही पंढरपूरला गेले नाहीत. त्यांनी मोट, नाडा, विहीर, दोरी यात पंढरी पाहिली, तर कांदा, मुळा भाजीत परमात्मा पाहिला. ***(‘कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।। मोट नाडा विहीर दोरी। अवघी व्यापिली पंढरी।।’- संत सावंतामाळी)***

**

# वारी

विठूरायाच्या नगरीत, पंढरपुरात जाणे व पांडुरंगाचे दर्शन घेणे याला पंढरीची वारी म्हणतात. ही वारी ज्यांना अंतर्बाह्य नित्यनेमाने बिनचूक साधते, त्यांना वारकरी म्हणतात. ***('देखिली पंढरी देही जनी वनी। एका जनार्दनी वारकरी।'- श्रीनाथमहाराज)*** देहांतरी दशमद्वार या पंढरीत जो विटेवर असणारे सोहंब्रह्म अनुभवतो त्यालाच भूमीवरील लोकांच्या पंढरीत पांडुरंगाचे दर्शन होते. त्यालाच 'जन नोहे अवघाची जनार्दन' या श्रीनाथमहाराजांच्या वचनाची किंवा ***'अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव। प्रतिमा तो देव कैसा नोहे।।'*** या श्रीतुकाराममहाराजांच्या वचनाची अनुभूती येते. ***('पहा आपुले शरीरी। दशमद्वार हे पंढरी।। सोऽहं ब्रह्म विटेवरी। बरवे शोधावे अंतरी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** जोवर अहंकाराची वारी सरत नाही, तोवर देवाची (साक्षात्काराची) वारी साधत नाही हे निश्चित. ***('तैसे माझिये साक्षात्कारी। सरे अहंकाराची वारी।। अहंकारलोपी अवधारी। द्वैत जाय।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जोवर अहंकार आहे तोवर देवदर्शन नाही. ***'दर्शन होय ना होय ना देवाचे। देवळाभोवता मी नाचे'*** या संतवचनाप्रमाणे आमचा 'मी'(अहंकार) देवळाभोवती-देहाभोवतीच फिरतो आहे. (आम्हाला देह म्हणजेच मी असे वाटते आहे.) तोवर मंदिरप्रवेश नाही. अर्थात देवदर्शन नाही. देवाचे दर्शन झाले नाही तर नुसत्या येरझारीला काय अर्थ? देवाचे दर्शन झाले तर आम्ही पंढरीला गेलो याला अर्थ, आमच्या वारीला अर्थ. नाहीतर कशालाच काही अर्थ नाही. देवाच्या दर्शनाशिवाय होणारी वाया येरझार (श्वासोच्छ्वास) म्हणजेच लटका व्यवहार-संसार आहे. ही येरझार परमेश्वराचा प्रत्यय देणारी व्हावयास हवी. म्हणजे श्वासोच्छ्वासी वारी साधणारी आहे. ही श्वासोच्छ्वासी साधणारी वारी साधकाला निजदेवाची-निजत्वाची प्रचिती देणारी आहे. ***('लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'श्वासोश्वासी निमिषोन्मेसी। वारी केली पंढरीसी।। प्रत्यग्वृत्ती येरझारी। तुझ्या दर्शनाची हरी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'वारियात असे वारी। देइ निजत्व ते करी।।'- श्रीमामामहाराज)*** सतत आत्मदेवाची प्रचिती आल्याने इंद्रियांचे ठिकाणी असणाऱ्या विषयांच्या येरझारा नाहीशा होतात. इंद्रियांना सतत आत्मबोधच प्राप्त होतो. इंद्रियांचा हरी हाच विषय होतो. इंद्रिये समाधानी होतात. ***('साठविला हरी जेणे हृदयमंदिरी। त्याची सरली येरझार। झाला सुफळ व्यापार।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'समाधान त्यांची इंद्रिये सकळ। जया तो गोपाळ ध्यानी मनी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** एकदशा प्राप्त होऊन एकाची प्रचिती सतत आली असता - देवाचे सान्निध्य लाभले असता - ही एकादशीची नित्यवारी बिनचूक साधते. परमात्म्याच्या होणाऱ्या अखंड स्मरणाने जन्ममरणरहित अवस्था - संकल्परहित अवस्था - मोक्ष त्याला प्राप्त होतो. ***('होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।।', 'पंढरीचे वारकरी। अधिकारी मोक्षाचे।।', 'पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदी हरी।।', 'पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत।। व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी नाम तुझे।। अहर्निशी नाम गाईन मी वाचे। बीज कल्पांतीचे तुका म्हणे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'वारी वारी जन्ममरणाते वारी। हारी पडलो आता संकट निवारी।।'- संतनरहरी, 'आता यावरी एकादशी। कथा आहे दोनी रसी। जेथ पार्था विश्वरूपेसी। होईल भेटी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'ऐसे वैराग्य हे करी। तरी संकल्पाची सरे वारी। विचारासी होते वारी। देखत देखता।।'- समर्थ)***

आज माझे पणजोबा ती.प.पू.श्रीअंताजीपंत केळकर यांची पुण्यतिथी आहे. तो सारा विषय आपण उद्याच्या कीर्तनात पाहू.

**

# लज्जाविरहित नामाचा प्रयत्न

सर्वसामान्य लोकांसारखे आपण वागलो, बोललो तर कोणी नावे ठेवणार नाहीत. जगावेगळे वागलो, बोललो तर त्याला लोक निश्चित नावे ठेवणार. प्रवाहपतीत होणे सोपे आहे. प्रवाहाविरुद्ध पोहणे फार अवघड आहे. लोकांसारखे वागलो तर स्वहित होणार नाही. लोकांविरुद्ध वागलो तर निंदेला सामोरे जाणे अनिवार्य आहे. निंदेला घाबरून प्रवाहाविरुद्ध पोहणारे फारच थोडे. ***('तुम्हासारिखे चालावे। तरी स्वहिता मुकावे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'येक ते बळाचे निवडले। पोहतची उगमा गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।।'- समर्थ)*** प्रवाहपतीत होणे म्हणजे संसार आहे तर प्रवाहाविरुद्ध पोहणे हा परमार्थ आहे. अर्थात परमार्थ करायचा असेल तर 'जग काय म्हणेल' याचा विचार न करता परमार्थ करावा. परमार्थ नाही केला तर देव किंवा महाराज काय म्हणतील याचा विचार करावा. याकरता लाज-भीड-संकोच बाजूला ठेवावी. त्याशिवाय परमार्थ साधणार नाही. ***('एक लज्ज्जां परित्यज्य सर्वत्र विजयी भवेत।।'- संस्कृतवचन, 'उल्लंघिली लाज। तेणे साधियेले काज।।'- श्रीतुकाराममहाराज, 'उल्लंघिता लाज। मग भेटे केशवराज।।'- श्रीमामामहाराज)*** लोकेच्छांचा आदर न करता देवाच्या इच्छेचा आदर करावा. ***('तुका म्हणे तैसे। आम्ही वर्तु त्याच्या इच्छे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अहो कीर्तनात नाचायचे म्हणजे लाजून चालेल का? आणि लाजलो तर कीर्तनात नाचता येईल का? रंगून जाता येईल का? आणि आम्ही रंगलोच नाही तर परमार्थ काय साधणार? मन रामी रंगले तर अवघे मन राम होणार. अहो कीर्तनात हृदयभुवनी देव नाचतो तर मग भक्तांनी काय करावे? ***(अनुदीन अभिनव कीर्तन चाले। हृदयभुवनी मधु माधव डोले।।'- श्रीनानामहाराज बर्वे, 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।'- श्रीनामदेवमहाराज, 'निर्लज्ज होऊनी नाचेन कीर्तनी। लाभ अथवा हानी देव जाणे।'- श्रीतुकाराममहाराज, 'महाराजांची आम्ही लेकुरे। नाचू कीर्तनी बडीवारे।।'- श्रीदासराममहाराज, 'निर्लज्ज होऊनी नाचे रंगी। भरते अंगी प्रेमाचे।'- संतवचन, 'नामदेव कीर्तन करी। पुढे नाचे पांडुरंग।'- संत जनाबाई)*** अहो कीर्तनात आपण नाचायचे राहू दे, रंगून कीर्तन करणाऱ्या संतांच्या पाया तरी पडता येईल की नाही? तेही अवघड आहे. तेथेही आमचे प्रेष्टीज आड येते. ***('संता लोटांगणी। जाता लाज नको मनी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** श्रीदासराममहाराज सांगायचे, आम्हाला परमार्थातील काही कळो अथवा न कळो भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या चरणावर गडबडा गडबडा लोळता तरी येईल का नाही? तेवढे केले तरी आमचे काम होणार आहे.

काल माझे पणजोबा श्रीअंताजीपंत केळकर यांची पुण्यतिथी झाली. श्रीअंताजीपंत हे अध्यात्मप्रेमी, संतप्रेमी गृहस्थ होते. संतांचे दर्शन घेणे, त्यांची सेवा करणे, त्यांचा आशीर्वाद घेणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांचे संतांवर प्रेम होते व संतांचेही त्यांचेवर प्रेम होते. दत्तावतार श्रीटेंबेस्वामी व त्यांचेच अधिकारी शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांचे दर्शनास ते जात. त्यांनी अत्यंत प्रेमाने त्यांना एकेक रुपया प्रसाद म्हणून दिला होता. या धनाचीच- लक्ष्मीचीच पूजा दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजनाला आजही केळकर घराण्यात केली जाते. सांगलीत राहणाऱ्या श्रीलक्ष्मण दीक्षितमहाराज या शिवभक्त सत्पुरुषांकडून त्यांनी पार्थिव पूजेचे व्रत स्वीकारले होते. ते शंकराचा १२ हजार जप, पार्थिव पूजा, सोमवारचा उपवास अशी उपासना नेमाने करीत. श्रीअंताजीपंतांच्या द्वितीय पत्नी सौ.लक्ष्मीबाई या श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांच्या अनुग्रहित होत्या. त्यामुळे त्यांचेबरोबर ते वारंवार श्रीक्षेत्र गोंदवल्यास जात. श्रीअंताजीपंतांची नित्य उपासना पाहून श्रीमहाराजांचे प्रेम त्यांना प्राप्त झाले. पुढे त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेकडून पारमार्थिक मार्गदर्शन करून घेतले. नित्य साधन उपासना साधून त्यांनी आपला अंत:काळ उत्तमच साधला. सोमवारी दुसऱ्या आषाढी एकादशी दिवशी सकाळी ८ वा. भ्रूमध्यावर दृष्टी ठेवून शिवस्मरणात या शिवभक्ताने देह ठेवला. त्यांचे पवित्र चरणी वंदन करतो व येथेच थांबतो.

**

# लज्जाविरहित नामाचा प्रयत्न

लाज ही दोन प्रकारांची असते. एक जनाची व दुसरी मनाची. आपण नेहमी हा शब्दप्रयोग वापरतो की अहो जनाची नाही मनाची तरी लाज बाळगा ते याकरताच. ही जनाची व मनाची दोन्हीही लाज गेल्याशिवाय लज्जाविरहित होता येत नाही. मनाची लाज जाण्यासाठी मनोलय साधावा लागतो. मनोलय (दृश्याशी तादात्म्य असणाऱ्या मनाचा) साधला आहे की नाही हे कसे ओळखावे? जोवर आपणाला आकाराचे ज्ञान होते आहे, तोवर आपणाला मनोलय साधला नाही हे ओळखावे. मन आहे तोवर दृश्याची जाणीव - द्वैताची जाणीव आहे. द्वैताची जाणीव आहे म्हणून लाज वाटते. ही देहाची, दृश्याची जाणीव नाहीशी होऊन अंत:करणात कोणताही हेतू नाही अशा अवस्थेत चैतन्याची जाणीव होणे म्हणजे खरे नामस्मरण आहे. त्याकरता प्रयत्नांची गरज आहे. याकरता आम्ही करतो ते यत्न (देहाने, मनाने होणारे) करायचे नसून ठायीच बसून देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधण्यासाठी साधनाचा अभ्यास करावा लागेल. ***(‘जो जो प्रयत्न रामावीण। तो तो दु:खासी कारण।।’- श्रीसमर्थ, ‘अंतरी बहुतची सावध रहावे। विवेकशस्त्रे मन आवरावे।। दिसेंदिस अभ्यासावे। साधन नेमाचे।। निशिदिनी तोचि ध्यास धरावा। बहु यत्ने अभ्यास करावा।। साधन करुनिया वळवावा। श्रीआत्माराम।।’- श्रीचिमडमहाराज)*** साधनाच्या अभ्यासाने, देहाचे, मनाचे सारे प्रयत्न संपले, प्रयत्नांचा अंत झाला, ‘काहीच न करोनी प्राणी’ ही समर्थ अवस्था प्राप्त झाली, प्रपंचातील षड्विकारात्मक दिननिशी होणारे आयास संपले की निर्विकल्प नाम (लज्जाविरहित नाम) म्हणजेच परब्रह्म प्राप्त होणारे आहे. ***(‘निर्विकल्प नाम। तेचि जाणा परब्रह्म।।’- श्रीदासराममहाराज)*** बाहेरचे सुख प्राप्त होण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. पण अंतरीचे पितृधनाचे सुख प्राप्त होण्यासाठी कोणत्याही बाहेरच्या यत्नांची गरज नाही. ***(‘वारा हा मायबाप।’- श्रीदासराममहाराज, ‘यत्न करा मग सुख घ्या। ऐसे तुमचेची वचन आयकिले। परी मी म्हणतो हे की। पितृधनालागी यत्न नायकिले।।’- श्रीचिमडमहाराज)*** येथे देहाने प्रयत्न करायचा नसून देहात प्रयत्न करावा लागतो. ***(‘साधावया वैराग्यज्ञान। मनुष्यदेही करावा प्रयत्न। सांगे एका जनार्दन। आणिक यत्न असेना।।’- श्रीनाथमहाराज, ‘मना गूज रे तुज हे प्राप्त जाले। परी अंतरी पाहिजे यत्न केले।। सदा श्रवणे पाविजे निश्चयेसी। धरी सज्जनसंगती धन्य होसी।।’- समर्थ)*** लज्जाविरहीत निर्विकल्प नामाची प्राप्ती होणे तसे अवघड, पण प्रयत्नाने साध्य होणारे आहे. ***(‘तरी गा ऐसे करी। यथा आठा पाहारामाझारी।। मोटके निमिषभरी। देतू जाय।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।’- श्रीतुकाराममहाराज)***

ज्याला हे निर्विकल्प नाम प्रयत्नाने अनुभवाला येते, त्याला निर्विकल्प अवस्थेत या नामाचे कवच प्राप्त होते. त्याचे शरीर सीलबंद होते. साहजिकच त्याचे शील जपले जाते. ते शीलवान-चारित्र्यसंपन्न होतात. शरीर सीलबंद होते म्हणजे काय होते हो? - त्यांच्या सर्व इंद्रियांना विषयांचा अनुभव न येता चैतन्याचाच-नामाचाच अनुभव येतो. त्याचा विषय एक नारायण हाच होतो. ***(‘तरी जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।’, ‘नाईकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी। अवाच्य ते टाळी। जीभची गा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे धनजन मातापिता।।’- श्रीतुकाराममहाराज)*** आमचे श्रीदासराममहाराज कीर्तनात जाहीरपणे सांगायचे, ‘माझ्या अंत:करणात महाराजांशिवाय विषय नाही. असे कोणते मशीन मनातील जाणणारे निघाले असेल तर ते घेऊन या. माझ्या अंत:करणात महाराजांशिवाय वेगळा विषय निघाला तर आपण सांगाल ते ऐकायची माझी तयारी आहे.’ श्रीदासराममहाराजांना सारे विश्व श्रीमहाराजांचे रूपात अनुभवाला यायचे. ते सांगायचे की ही कीर्तनाला आलेली सारी माणसे मला श्रीमहाराजांचे रूपात दिसत आहेत. ***(‘अवघाची महाराजा। दासरामी कोण दुजा।।’-श्रीदासराममहाराज)*** श्रीदासराममहाराज हे निर्विकल्पी कल्पनातीत संत होते. अर्थात सतत सहवास देवाचाच. अशा महात्म्याच्या निर्वाणाचे वेळी गोविंद-परमात्मा हजर असतो हे सांगणे नकोच.

✻✻

# परिपूर्ण

निर्विकल्प अवस्था प्राप्त झालेल्या संत महात्म्यांचे वागणे सौजन्यपूर्ण असते. सर्वत्र अनुभवाला येणारे एक चैतन्य हेच त्यांच्या सौजन्याचे कारण असते. ***(‘हरीवंशपुराण हरीनामसंकीर्तन। हरीवीण सौजन्य नेणे काही।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जीभ दातांनी चाविली। कोणे बत्तीशी पाडिली।।’- संत मुक्ताबाई, ‘तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाची नाही।।’- समर्थ, ‘ज्याच्या दृष्टीस सृष्टी नाही। देही असून पूर्ण विदेही।।’- श्रीकेशवस्वामी)*** दृश्याचा परिणाम त्यांच्यावर होत नाही. त्यांच्या वृत्ती दृश्यावर न उठता चैतन्यावर उठतात. साहजिकच त्यांची नामस्मरणाची स्थिती-मूळस्थिती (पापाचा विचार नाही असा निर्विचार सदाचार) कधीही सांडली जात नाही. त्याचा मूळस्वभाव गुरुनाम हाच होतो. बाह्यत: शरीराने कोणतेही कर्म होत असू दे त्यांचे नामस्मरण सतत सुरू असते. ‘हरी बोला भांडता’ हे अशा निर्विकल्प संतांनाच शक्य होते. ***(‘संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडूची नये।।’, ‘प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा। सदाचार हा थोर सांडू नये तो। जनी तोचि तो मानवी धन्य होतो।।’- समर्थ, ‘रामनाम मुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।।’, ‘मूळ स्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।।’, ‘गोविंद म्हणे पाही। शील नाम आन नाही।।’- श्रीमामामहाराज)*** जो नामाचा सदाचार सदैव आचरतो, जो त्रिगुणाचे पलीकडील चौथ्या विशेष गुणावर प्रेम करणे हा साधनाचा क्रम आचरतो, अशा गुणशील सद्गुणी मानवाचे दुरीत दूर होऊन जीवनाचे सार्थक होते. मनातील इच्छा नाहीशा होऊन सर्व मनोरथ पूर्ण होतात व तो परिपूर्ण होतो. देव जसा वाटोळा-गोल-पूर्ण आहे तसा भक्त पूर्ण होतो - देवरूप होतो. ***‘पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला। क्षणात निमाला पायाजवळी।’*** या तुकाराममहाराजांच्या वचनाप्रमाणे तो परमार्थात अधिकारी होतो. ***(‘देवाची ती खूण करावे वाटोळे। आपणावेगळे राहो नेदी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘ज्याचे मुखी नाम अमृत सरिता। तोची एक पुरता घट्ट जाणा।।’- संतवचन)*** ही परिपूर्णता कधी प्राप्त होते? आपले सद्गुरू आपल्या घरी आले किंवा आपण त्यांचे घरी गेलो व त्यांचा अनुग्रह प्राप्त होऊन साधनाभ्यासाने वासनारहीत होऊन सत्याची प्रचिती आली तर जीव पावन होतो. भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस देह ठेवल्यानंतर चैतन्यरूपाने आमचे श्रीमामांचे घरी प्रगट झाले व त्यांनी श्रीमामांना नित्यकीर्तनाची आज्ञा दिली. ती आज्ञा श्रीमामांनी आमरणांत आचरली. शरीराच्या विकलांग अवस्थेत शरीराच्या नाड्या सकाळीच सुटलेल्या असताना नामाचे - कीर्तनाचे- अनुसंधान राहणे हा त्यांनी साधलेल्या अखंड साधनेचा परिपाक होता. ***‘हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।’*** हे श्रीनाथमहाराजांचे वचन त्यांनी आचरून दाखविले. ‘हा पुढे महासाधू होईल’ असा श्रीमामामहाराजांना बालपणी मिळालेला श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचा आशीर्वाद, ‘भक्तीचा थाट होईल’ हा श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकरांचा मिळालेला आशीर्वाद, ‘अखंड नामसंकीर्तनाने श्रीकेळकरमामा या संप्रदायात अधिकारी पुरुष ठरतील’ हा ज्यांना श्रीदासराममहाराज दहावे नाथ म्हणतात त्या संत श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांचे मुखाने श्रीहालसिद्दाप्पांचा संचारावस्थेत मिळालेला आशीर्वाद फळाला आला. आमचे श्रीमामा अखंड नामसंकीर्तनाने हरीभक्तीचा कळस झाले. त्यांचा परमार्थ पूर्णावस्थेला पोचला. ते अखंडनामसंकीर्तनयोगी झाले. प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांनी विदेही सत्पुरुष श्रीगुंडुबुवांना परमार्थात पूर्ण कोण झाला आहे असे विचारले असता आमचा गोंद्या (श्री.गोविंद अनंत केळकर) परमार्थात पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. श्रीपांडुरंगमहाराजांनी ही गोष्ट त्यांचे एका पदात नोंदली आहे. ते पद असे - ***‘पुरा गोंदा म्हणूनी गुंडा सांगे मजला। सांगे मजला सांगे मजला सांगे मजला।। म्हणूनिया दर्शना आलो। पाहुनी समाधान पावलो।। आनंदात रंगूनी गेलो। दिन चांगला।। गुंडूबुवा विदेही साधू। शक्ती विलक्षण अगाधू। परी हा तो सुखसंवादु कैसा घडला।। गुंडूबुवा आणि हा गोंदा। त्यांनी केले परमानंदा। पांडुरंग रामानंदा। ठायी जडला।।***

**

# दुराशा

अंत:करणात इच्छा - आस - आशा - वासना असते हेच संसाराचे - संसरणाचे कारण आहे. आस आणि श्वास यांचा अन्योन्यसंबंध आहे. 'श्वास आहे तोवर आस आहे' हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. जोवर बाह्य दृश्याची आशा आहे तोवर जीवन हे अधोगामी राहते. संसार सुटत नाही. हा संसार सुटल्याशिवाय देवभेट होणे - आत्मभेट होणे दुरापास्तच. ***('आशा सोडिता सुटेना। देव भेटता भेटेना।।'- श्रीमामामहाराज, 'आशाबद्ध जन। त्यासी कैचा नारायण।।'- श्रीतुकाराममहाराज)*** माणूस-जीव जो जिवंत राहतो तो केवळ आशेवर जिवंत राहतो. म्हणून आशा नाही असा जीव शोधून सापडणार नाही. ***('आशा मनशा सब घट व्यापी। कोई मेहेल नही सुनारे।।'- श्रीकबीरसाहेब)*** आशा हेच संसारातील दु:खाचे कारण आहे. ***('दुराशेचा मधुबिंदू। जीवा लोटी दु:खसिंधू।।'- श्रीमामामहाराज, 'आशया परमंदु:खं। नैराश्यं परमं सुखं।'- अध्यात्मरामायण)*** परस्त्री, कांचन (सोने), दृश्य यांची जोवर आशा आहे तोवर दु:ख नाहीसे होणार नाही व सुखरूप आत्मा भेटणार नाही, हे निश्चित. ***('कांचनाचे ध्यान परस्त्री चिंतन। दु:खासी कारण हेची दोन्ही।।', 'दुराशा नको रे परस्त्रीधनाची। नको तू करू नीच सेवा जनाची। पराधीन कैसा भला दिससी रे। हरेराम हा मंत्र सोपा जपा रे।।'- समर्थ)*** जीवाचा संसार हा स्त्रीबरोबर नसून वासनेबरोबर असतो. म्हणून लग्न केले नाही म्हणजे ब्रह्मचारी नव्हे.***('वासना बायको शेजारीण। झगडी कुटील मोठी दारुण। हिचे पायी नागवण घर बुडविसी।।'- श्रीनाथमहाराज, 'वासना राहेना अंतरी। दास म्हणे ब्रह्मचारी।।'- श्रीमामामहाराज)*** शरीर कितीही थकू दे, गलितगात्र होऊ दे, केस सगळे पांढरेशुभ्र होऊ देत, दातांची बत्तीशी पडू दे, काठीशिवाय उभारता नको येऊ दे, आशा काही थकत नाही. ती अधिकच तरुणी होते. हे त्रिकालाबाधित सत्य जगद्गुरू शंकराचार्य असे सांगतात, ***'अङ्गं गलितं पलितं मुण्डं दशन विहिनं जातं तुण्डम्। वृद्धो याति गृहित्वा दण्डं, तदपि न मुञ्चत्याशा पिंण्डम्।।'*** या आशेमुळे जीव जगाचे दास्यत्व करतो पण जर अंत:करणातील आशा गेली तर परमात्मा पांडुरंग त्याचा दास होतो. ***('आशाबध्द तो जगाचा दास। पूज्य तो उदास सर्व जना।।', 'चित्ती नाही आस। त्याचा पांडुरंग दास।।'- श्रीतुकाराममहाराज)*** दृश्याची आशा ही आपणास परमात्म्यापासून दूर नेते म्हणून आशा हीच दुराशा आहे. ही दुराशा गेल्याशिवाय आपण परमात्म्याजवळ जाणार नाही. ***('दुआशा म्हणजे दूर आशा। देखू नेदी परमेशा।।'- श्रीमामामहाराज, 'ज्याचे मनी आहे आशा। त्याची आहे बा निराशा।। हे तो समजा अंत:करणी। त्यासी नाही चक्रपाणी।। गुरुराज सांगे खूण। करा अखंड स्मरण।।'- श्रीदासराममहाराज, 'म्हणे खेचर विसा झालासे पिसा। या दृश्याची आशा सांडी नाम्या।।'- विसोबा खेचर, 'आशा हे समूळ खणोनी काढावी। तेव्हाची गोसावी व्हावे तेणे।। आशा मारोनिया जयवंत व्हावे। तेव्हाची निघावे सर्वातोनी।। तुका म्हणे जरी योगाची तातडी। आशेची बिबुडी करी आधी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आशया बध्दते लोका। कर्मणा बहुचिंतया। आयु: क्षणं न जानाति। तस्मात् जाग्रही जाग्रही।' जगद्गुरु शंकराचार्य)*** आशा संपूर्ण गेली तरच जीवन उर्ध्वगामी होते व परमात्म्याचा योग घडतो. बरव्या साधनाने तो साधक होतो. विभक्त असणारा भक्त होतो. ***(भक्त ऐसे जाणा जे देही उदास। गेले आशा पाश निवारोनी।।' , 'साधकाची दशा उदास असावी। उपाधी नसावी अंतर्बाह्य।।', 'आम्ही तरी आस। झालो टाकोनी उदास।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# शकुन

व्यवहारात होणाऱ्या शकुनांवरून व्यवहारात आपला लाभ होणार का हानी होणार याचा आडाखा बांधला जातो. लाभ सूचीत होणारा शकून घडला की त्याला आपण 'शुभ शकून' म्हणतो तोच हानी सुचित करणारा शकुन घडला की त्याला 'अपशकुन' म्हणतो. ***(शकुनाने लाभ हानी। येथूनिच कळतसे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** शुभशकुन घडला की माणूस खूश होतो. कार्य निश्चित चांगले होणार अशी त्याची खात्री होते व तो जोमाने कामाला लागतो. याउलट अपशकुन घडला की तो खट्टू होतो व कार्य कसे होणार याची त्याला काळजी लागते. व्यवहारात जे शकुन होतात ते आपली आशा पुरी होणार की नाही हे सुचवितात. परमार्थात जे शकुन होतात ते अंत:करणात कोणतीही आस उरली नाही, कोणताही हेतू उरला नाही असे जे निष्काम कर्म करणारे असतात, त्यांना होतात व ते सारे आत्मलाभ सूचित करणारे शुभशकुनच असतात. साधनाने मन निवले की अमृतपान घडते व मग हे आत्मलाभ दर्शविणारे शुभशकून घडतात. साधनाने मन निवले की अंत:करणातील आस नाहींशी होते व तो उदास होतो. 'उदास म्हणजे उत्कर्षाची आस' असे श्रीदासराममहाराज सांगत. त्याला साधकाची, भक्ताची दशा प्राप्त होते. ***('बरवे साधन सुखशांत मन। क्रोध नाही जाण तीळभरी।।', 'आम्ही तरी आस। झालो टाकोनी उदास।।', 'साधकाची दशा उदास असावी।।', 'भक्त ऐसे जाणा जे देही उदास।।', 'नाम घेता मन निवे। जिव्हे अमृत हे स्त्रवे। होताती बरवे। शुभशकुन लाभाचे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अशा अंत:करणातील दुराशा हाललेल्या साधकाला अध्यात्माचे शकुन होतात. मग त्या साधकाला कोठे अपशकुन होतच नाही. सतत देवाचेच चिंतन असणाऱ्या साधकाला सर्व जग हरीमय झालेले असते. मग अपशकुन कसा होणार? ***('अवघा तो शकुन। हृदयी देवाचे चिंतन।।'- श्रीतुकाराममहराज, 'अवघा मुहूर्त शकुन। हृदयी मारुतीचे ध्यान।।'- श्रीसमर्थ, 'हरीचिया दासा हरी दाही दिशा। भावे जैसा तैसा हरी एक।।'- श्रीनाथमहाराज)*** आठ पळ साधन साधले म्हणजे 'कामा'चे दहन होते व पंधरा पळ साधन साधले म्हणजे उर्ध्वपंथी गमन साधते. साधनाने जसेजसे नि:श्वासाला प्रमाण येते तसेतसे त्याला आत्म्याची काव्यस्फूर्ती होणे, डोळ्यापुढे अक्षर आत्मा चैतन्याक्षरात प्रगट होणे, नादश्रवण होणे, सुवास अनुभवणे, तारक बिंदू दिसणे शब्दाचा ग्रास होणे आदी आत्मलाभसूचक शकुन घडतात. ***('जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते।। जरी पंधरा पळ साधेल पवन। उर्ध्वपंथी गमन साधे बापा।।'- श्रीमामामहाराज, 'पंधरा अंगुळे निश्वास वहाता। तरी ये स्थिरता सहजेची।। द्वादश अंगुळे साधनी निश्वास। समता चित्तास प्राप्त होय।। एकादश अंगुळे जरी होय वहाती। तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची।। दशम अंगुळ निश्वास वहाता। अक्षरे देखता दृष्टीपुढे।। नवांगुळापासूनी साधी अष्टसिद्धी। असे त्याचा अवधी द्वयांगुळी।। एकची अंगूळ वहाता निश्वास। होय नादघोष सुस्वरेसी।। जरी होय बंद ऐसा हा निश्वास। दरवळे सुवास चहू ठायी।। उर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार। दासराम स्थिर अलक्ष्यातू।।'- श्रीदासराममहाराज, 'शुभशकुन सांगा कोणीतरी। कधी भेटेल मजला देव हरी।। अंगणी माझ्या कागची बोले। कोकीळ बोले मधुरस्वरी। लवतो माझा डावा डोळा। तळमळ तळमळ जीव करी। मुखीचा माझ्या ग्रासची गळला। बंधू माझे स्मरण करी।।'- श्रीमध्वमुनीश्वर, 'पैल तो गे काऊ कोकताहे। शकून गे माये सांगताहे।।', 'आजि शुभ लवे लोचनू। हरि सांगताहे शकुनू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# कावड

पूर्वीच्या काळी वाहतुकीची साधने उपलब्ध नव्हती. तेव्हा यात्रा करताना सारा प्रवास पायीच करावा लागे. हा पायी प्रवास करताना बरोबर आवश्यक सामान नेणेसाठी सुखकर व्हावे म्हणून लोक कावडीचा वापर करीत. घरी पाणी भरण्यासाठीसुद्धा कावडीचा वापर होत असे. श्रीएकनाथमहाराजांचे घरी भगवंतांनी कावडीनेच पाणी भरले. श्रीतुकाराममहाराज या प्रसंगाची नोंद अशी करतात, ***'एकनाथाघरी पाणी वाहिले। कावडीने फुका। कशी रे वीट जडली पुंडलिका।'*** पायी काशीयात्रा करायची व येताना गंगेचे पवित्र पाणी कावडीतून घेऊन यायचे व ते रामेश्वराला वाहायचे अशी पद्धत आहे. जशी काशी, रामेश्वर ही तीर्थक्षेत्रे व गंगा, यमुना ही पवित्र तीर्थे बाहेर आहेत तशी ही ठिकाणे, तीर्थे आपल्या देहातदेखील आहेत. ती काशी, तो ईश्वर सद्‌गुरूंनी दाखवावा लागतो. ध्यानाने त्रिवेणीसंगमी स्नान करून प्राप्त होणारे ध्यानामृत-नामामृत गुरुलिंगाला-रामलिंगाला हरीहर कावडीने वाहिले की जन्ममरणाची खेप चुकणारी आहे. संत ज्योतीपंत महाभागवत या महायात्रेचे वर्णन असे करतात, ***'दाविली गुरुने काशी माझी मजपाशी। मजला पूर्वेकडून काढले। पश्चिमपंथे चालविले। एकवीस स्वर्गावरती नेले। मूळ तीर्थासी।। अवघड पश्चिमेची वाट। बिकट त्रिकुटीचा घाट। श्रीहाट गोल्हाट औटपीठ। उल्लंघुनी त्यासी।। इडा पिंगला सुषुम्ना। गंगा सरस्वती यमुना। त्यांचे संगमी करिता स्नाना। मुक्ती जीवनासी।। पाहिले सहस्रदळ कमळ। तेथे मुनिजनांचा मेळ। हंस बाळ खेळे खेळ। केवळ संन्यासी। ऐशी देहीच यात्रा केली। कावड रामलिंगा वाहिली। ज्योती याने खेप चुकविली। लक्ष चौऱ्याऐंशी।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज या रामलिंगाला-गुरुलिंगाला ध्यानामृताचा अभिषेक केल्याचे असे सांगतात, ***'का चैतन्याचिये पोवळी। माजी आनंदाचिया राऊळी। श्रीगुरुलिंगा ढाळी। ध्यानामृत।।'.*** साधनाभ्यासाने संसारातील ममत्व गेले, मीपण गेले की ही रामनामाची समता, चित्ताची समता साधता येते. आपण संसाराचे कावडीत विषयसुखजल भरतो व जन्ममरणाचे चक्रात सापडतो. तेच आपण संसाराचे कावडीत जर नामामृत भरले तर जन्ममरणाचे पैल आत्मस्वरूपाची प्राप्ती होऊन तो मुक्तच होऊन जातो. ***('राम राम जप समत्वे साधावा। अहंकार टाकावा अहंबुद्धी।।'- श्रीनिवृत्तीनाथमहाराज, 'रामनामाची समता। हेचि कावड सर्वथा।।', 'संसार कावडी घेवोनिया खांदी। जीवजात मांदी कष्टी होये।। विषयसुखजल भरलेसे ज्यात। सेवोनि अतीत कोण झाला।। हरीनाम कावडी नामामृत जल। सेविता निर्मल मुक्ती पावे।। दास म्हणे ऐसा कापडी जहाला। आत्मस्वरूप त्याला मिळून जाय।।'- श्रीमामामहाराज, 'द्वादश अंगूळ साधनी निःश्वास। समता चित्तास प्राप्त होय।।'- श्रीदासराममहाराज, 'समता कावडी रे समता कावडी रे। माजी नामामृत भरले आवडी रे।। नलगे येणे रे नलगे जाणे रे। निजसुख कोंदले पाहता चहुकडे रे।। नलगे दंडणे रे नलगे मुंडणे रे। नाम घेता कर्माकर्म खंडणे रे। दुःख फिटले रे दुःख फिटले रे। बापरखुमादेवीवरे विठ्ठलू रे।।', 'ओम नमो शिवाआदी। कावडी घेतली खांदी। मिळाली संतमांदी। त्याचे रजरेणू वंदी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'हरीहर कावड घेता खांदी। तुटे जन्ममरण व्याधी। घेऊनी कावडी नाचे एका। एका जनार्दनी आवडी देखा।।', 'ज्ञानवैराग्य कावड खांदी। शांती जीवन तयामधी। हरीहर कावड घेतली खांदी। भोवती शोभे संतमांदी। एका जनार्दनी कावड बरी। भक्ती फरारा तयावरी।।'- श्रीनाथमहाराज)***

**

# सोहंहंस

आत्म्याने देह बांधला व त्या देहात आत्मा प्रविष्ट झाला व स्वरूपाला विसरून देह तादात्म्याने आत्मा संसारबंधनात बांधला गेला. देहाच्याच जाणीवेने जन्ममृत्यूचे सोहळे - संसरण - संसार त्याचे मागे लागले. ***(‘आत्म्याकरिता देह जाला। देहाकरिता आत्मा तगला। उभययोगे उदंड चालिला। कार्यभाग।।’, ‘देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।’- समर्थ, ‘तैसे आपुलेनी विसरे। चैतन्यचि देहाकारे। आभासोनि अविष्करे। देहपणे जे।।’, ‘जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगे। होइजे येणे जगे। आत्मा गुणसंगे। संसारिया।।’, ‘देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्यूचिया सोहळिया। ना म्हणो नये धनंजया। जियापरी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या जन्ममृत्यू दर्शविणाऱ्या संसरणालाच संसार, सोहंहंस, चिद्‌गुण, आयुष्याचे साधन, येरझार, येण्याजाण्याची क्रिया आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. ही सोहंची क्रिया सर्व साकार विश्वात भरून राहिली आहे. अव्यक्ताचे ठिकाणी दिसणारा आकार निर्माण करण्यासाठी कर्त्याशिवाय जी कृती दिसते तिला ‘सोहं’ म्हणतात. ही मूळ क्रिया हेच चराचराने अव्यक्त निराकार हरीचे केलेले भजन आहे. हे आत्मरूप व त्या ठिकाणी जाणीवेने असणारे श्वसन-संसरण हे सामान्यपणे सर्व विश्वात भरून राहिले आहे. हे सामान्यपणे सर्व विश्वात भरून राहिलेले आत्मरूप व श्वसन हेच श्रीदासराममहाराजांचे दृष्टीने असामान्य आहे. ***(‘धरीता सो सांडिता हं। अखंड चाले सोहं सोहं। याचा विचार पाहता बहु। विस्तारला।।’- समर्थ, ‘सर्व विश्वामाजी असे जे सामान्य। तेचि असामान्य दासरामी।।’- श्रीदासराममहाराज)*** या क्रियेमुळे चंचळ असणाऱ्या मनाचे अस्तित्वामुळे साकार विश्वाची, देहाची उपाधीची जाणीव होते व चैतन्याची जाणीव होत नाही. या जन्ममरण क्रियेमध्ये श्वास व उच्छ्वास यांचेमधील भागात जीवन हे समाविष्ट असल्याने त्या जीवनाला ‘उपाधीभूत जीवन’ असे श्रीदासराममहाराज संबोधत. हे जन्ममरण या विकृतीने विकृत असणारे चिद्रूपात्मक जीवन दुःख व दुःखाचे कारण सुख प्राप्त होण्याला कारण होते. ***(‘सुखदुःखासी कारण। चिद्रुपात्मक विकृत जीवन।। चिद्रुपी या वाढे द्वैत। सुखदुःख हेताहेत।।’, ‘चिद्रुपामाझारी वाढे द्वैताद्वैत। सुखदुःख हेत ब्रह्मी कैचा।।’- श्रीदासराममहाराज)*** हे अपार साकार दृश्य सारे चिद्रुप आहे. जे जे साकार आहे ते सारे नाशिवंत आहे. अर्थात मरण आहे म्हणजेच ते जन्माला आलेले आहे. म्हणून चिद्रूप साकार दृश्यातील जीवन जन्ममरण या क्रियेने विकृत आहे. ***(रामकृष्ण हरी सार। दृश्य अपार चिद्रूप।।’- श्रीदासराममहाराज)***

जन्ममरण-श्वासोच्छ्वास या परिभ्रमणामुळे जाणीव नेणीव, सुखदुःख, पापपुण्य, ज्ञानअज्ञान, स्वर्गनरक आदी द्वंद्वे अनुभवाला येतात. या श्वसनाचे महत्त्व (अध्यात्मिक) श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेले 'Twinkle Twinkle' हे इंग्रजी काव्य असे सांगते The breathing is the only point of life. The breathing is the only graph of life and the breathing is the only way of life. So far the breathing is the path to approach the heaven. The blue light is heaven. The centre of breathing is spiriton. The spiriton is the centre of universe. Breathing in the heaven is life. It is the soul of universe. Breathing is living and living is breathing.

थोडक्यात श्वसन (सोऽहं) ही विश्वाची मध्यवर्ती कल्पना असून विश्व हा कल्पनाविस्तार आहे.

**

# चिद्रूप

श्रीदासराममहाराज दृश्याला 'चिद्रूप' कसे म्हणतात? श्रीदासराममहाराजांना जड काहीच दिसत नव्हते. त्यांना चैतन्यच दृश्य होत होते. ते विश्व म्हणजे चिद्विलास अनुभवीत. म्हणून त्यांनी दृश्याला चिद्रूप म्हटले असावे. शिवाय चैतन्याशिवाय वेगळे जडाला अस्तित्व नाही. म्हणजे आहे ते सारे चैतन्य आहे. या अर्थाने दृश्याला चिद्रूप म्हटले असावे. ते म्हणत, स्पंदाशिवाय पदार्थ नाही, श्वसनाशिवाय स्पंद नाही व जीवाशिवाय श्वसन नाही. म्हणजे आहे ते सारे सजीव आहे, चैतन्यमय आहे. म्हणून दृश्याला चिद्रूप म्हटले असावे. म्हणजे जड दृश्य म्हणजेच चैतन्य का? निश्चळाच्या अंगावर उठलेल्या चंचळाच्या लहरी म्हणजे दृश्य का? नाही. निश्चळाच्या अंगावर चंचळाची लहर उठली ते चैतन्य. या वायुरूप चैतन्यातून जडाची निर्मिती. म्हणून जडात देखील चैतन्य जाणवते. म्हणजे जड व चैतन्य एकमेकात मिसळले आहेत का? नाही. श्रीदासराममहाराज सांगत, जडाचा व चैतन्याचा एकमेकाशी थेट संबंध नाही. जड हे चैतन्याच्या कक्षेत आहे इतकेच. असंग साक्षीभूत चैतन्याची जडावर, देहावर सत्ता आहे तिला चेतना म्हणतात. या सत्तेने सारे विश्व चलनवलन करते. जड वेगळे व चैतन्य वेगळे. याचा अर्थ जडाची कितीही चिरफाड केली तरी चैतन्य सापडणार नाही. मग कितीही कोट्यवधी रुपये खर्च करा. आम्हाला सापडलंय असे वाटेल, आम्ही विश्वाचे मूळ सापडल्याचा आनंद व्यक्त देखील करू, पण तो फार काळ टिकणार नाही. जे आपल्याला सापडतंय, त्याच्या पलीकडे तो आहे. अधिभौतिक शास्त्राने त्याच्या जवळ जाता येईल पण तो सापडणार नाही हे निश्चित. 'आत्मा सिद्ध करणाऱ्यास एक लाखाचे बक्षिस' अशी पेपरला आलेली बातमी श्रीदादांचे वाचनात आली. त्यांनी कीर्तनात जाहीरपणे सांगीतले 'हे बक्षीस कोणालाही मिळणार नाही' आत्मा हा प्रयोगी आहे, तो प्रयोगाने सिद्ध कसा करता येईल? देव हा दृश्यापेक्षा वेगळा आहे हे पटवून देताना श्रीदासराममहाराज सांगत, 'सुताराने टेबल बनवले. सुतार हा टेबलापेक्षा वेगळा आहे ना? तसेच येथे आहे हे यच्चयावत विश्व परमात्म्याने निर्माण केले पण तो या दृश्यापेक्षा वेगळा आहे.' जो दृश्यापेक्षा वेगळा आहे तो या डोळ्याने पाहता येईल का? तो या मनाला जाणवेल का? जे डोळ्याने पाहता येते किंवा मनाला भासते ते सारे नाशिवंत आहे. देव डोळ्याने पाहिला, मनाला भासला याचा अर्थ आमचा देव नाशिवंत आहे असा होईल. जोवर डोळ्यातील दृश्य जात नाही, मन संकल्पविकल्परहीत होत नाही तोवर सत्य अविनाश देवाची प्राप्ती होत नाही. 'दृश्याची रेषा अस्पष्ट झाली तरच मोक्षाची रेषा स्पष्ट होते' असे श्रीदासराममहाराज सांगत. ***('अवघाची महाराजा। दासरामी कोण दुजा।' श्रीदासराममहाराज, 'निश्चळाच्या अंगावरी। उठती चंचळाच्या लहरी।।'- संतवचन, 'निश्चळी चंचळ चेतले। म्हणोनी चैतन्य बोलिले। गुणसमानत्वे जाले। गुणसाम्य ऐसे।।'- समर्थ, 'आता असंगा साक्षिभूता। देही चैतन्याची जे सत्ता। तिये नाव पंडुसुता। चेतना येथे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अवघी सृष्टी जो कर्ता। तो ते सृष्टीहुनी पर्ता। तेथे संशयाची वार्ता। काढूचि नये।', 'एवं जगदीश तो वेगळा। जग निर्माण त्याची कळा। तो सर्वांमध्ये परी निराळा। असोन सर्वी।।', 'दृष्टीस दिसे मनास भासे। तितुके काळांतरी नासे। म्हणोनि दृश्यातीत असे। परब्रह्म ते।।'- समर्थ)***

**

# हंससुख

आत्मस्वरूपाला विसरून देह म्हणजे मी हा देहाभिमान जोवर आहे तोवर या जन्ममरणाच्या येरझारा (संसार) सुटत नाहीत. अधोमुख जीवनाने देहभाव वाढतो व देव व आपण यातील भेद वाढत राहतो व देहदु:ख हे मनाला होतच राहते. ***('देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।', 'देहची होऊन राहिजे। तेणे देहदु:ख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।'- समर्थ, 'आत्मस्वरूपा विसरूनी आम्ही भवचक्री फिरलो। काय सुकृत होते नकळे शरणपदी आलो।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** आपल्या श्वसनामध्ये त्रिगुण आणि पंचमहाभुते सूक्ष्म रूपाने असतात म्हणून आपणाला देहाची व दृश्याची जाणीव होते. 'श्वसन' या साधनाचा योग्य तऱ्हेने जर अभ्यास झाला तर श्वसनातील पंचमहाभूतांचा निरास होऊन चत्वार देहाचा निरास होतो व त्रिगुणांचा निरास होऊन अहर्निशी परमार्थ घडविणारा चौथा शुद्ध सत्वगुण प्राप्त होतो. जन्ममरणाचे पैल संसाराच्या गोष्टी सुटून त्याला आत्मप्राप्ती होते. तो आत्मसुखी होतो. ***('त्रिगुण आणि पंचभूते। हे वायोमध्ये मिश्रिते। अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।'- श्रीसमर्थ)*** श्वसनातील पंचमहाभूते व त्रिगुण यांचा निरास झाला असता डोळ्यातील दृश्य नाहीसे होते. सर्वत्र त्याला आत्मवस्तूच प्रतीत होते. 'पाहणे आपणासी आपण' झाल्याने मीपणा उरत नाही. अर्थात 'तू'पणा पण उरत नाही. ***('दृश्य पदार्थ वोसरे। तत्वे तत्व तेव्हा सरे। मीतूपण कैचे उरे। तत्वता वस्तू।।', 'पंचभूते आणि त्रिगुण। ऐसी अष्टधा प्रकृती जाण। अष्टधा प्रकृतीस नामाभिधान। दृश्य ऐसे।।'- समर्थ)*** 'सोहंहंस' हे साधन कसे व कोठे साधावे हे सद्गुरूंकडून समजून घेणे चांगले. हे साधन साधण्यासाठी आळस झटकावा लागेल. आळस झटकला तरच अज्ञानाचे ज्ञान होईल. झोपेत जागे राहता येईल व झोपेत जागे राहता आले तरच अखंड जागृतीने (अखंड स्मरणाने) अखंड सुख-सर्वसुख प्राप्त होईल. ***(सद्गुरुवाचून कळेना साधन। उगीच का शीण करूनी घ्यावा।।'- श्रीदासराममहाराज, 'यास्तव बरवा विचार करी। सांडूनी आळस निद्रा वैरी। साधन करूनी सुख घे करी। दास विनवी श्रीगुरुचा।।'- श्रीचिमडमहाराज)*** आपले मन व देहबुद्धी व आपली नजर इतर कोठे न ठेवताना पवनाचे माथ्यावर जर आपण ठेवली तर तत्वांचा निरास तत्वांमध्ये होऊन त्रिगुण व पंचमहाभूतांचे चत्वार देहाचे निरासाने दृश्य पदार्थ ओसरून परतत्वाचा स्पर्श होणार. ***('हे अजानबाहो साधो पार्था। मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा। तेणेचि या तत्वार्था। फावसी तू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'उगाच येकांती बैसावे। तेथे हे समजोन पाहावे। घ्यावे आणि सांडावे। प्रभंजनासी।।'- समर्थ)*** साधनाभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधून चैतन्याची जाणीव - स्मरण अखंड राहिले असता प्रथमत: नाद व नंतर प्रकाश या क्रमाने सगुण ब्रह्माची प्रचिती येते. नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते व सर्वसाक्षी मन - पाहता मन- तल्लीन होऊन संपूर्णपणे मुरते. द्वैत संपूर्णपणे नाहीसे होते. तो साधक जन्ममरणरहित, पापपुण्यरहित असा निर्गुणरूप होतो. निर्गुणसुख- हंससुख- निश्चळसुख - अखंडसुख - सर्वसुख त्याला प्राप्त होते. ***(एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही। अद्वैताचे सुख ते निश्चळ। निर्गुण शोधून पाही।।'- श्रीचिमडमहाराज)***

✻✻

# दिनरात

आपण पृथ्वीवर राहतो व पृथ्वीच्या सूर्याभोवतीच्या भ्रमणाने दिवसरात्र अनुभवतो. सूर्य उगवतो व मावळतो ही भ्रांती (भ्रम) आपणास होते. नहून सूर्य कधी उगवत नाही किंवा मावळतही नाही. ***(‘आणि उदोअस्तोचेनि प्रमाणे। जैसे न चालता सूर्याचे चालणे। तैसे नैष्कर्म्यत्व जाणे। कर्मीचि असता।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** समजा आपण सूर्यलोकाला गेलो तर तेथे दिवस-रात्र अनुभवता येईल का? तेथे जर आपण विचारले की रात्र कधी होणार? तर तेथील माणसे आपणाला विचारतील की रात्र कसली असते? ते आधी सांगा. तेथे रात्र आणि दिवस हे शब्द देखील असणार नाहीत. तेथे अखंड प्रकाशाचा अनुभव. तेथे अंधाराचा अनुभवच नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘नातरी अंधकाराची वानी। जैसा सूर्यो न देखे स्वप्नी। अमृत नायके कानी । मृत्युकथा।।’, ‘अगा रात्री आणि दिवो। हा तवचि द्वैतभावो। जव न रिगिजे गावो। गभस्तीचा।।’.*** त्याप्रमाणे देहामध्ये असणाऱ्या जन्ममरण या क्रियेमुळे - परिभ्रमणामुळे रात्रदिवस, पापपुण्य, ज्ञानअज्ञान, सुखदुःख आदी द्वंद्वे देहाच्या इंद्रियांमार्फत मनाला अनुभवाला येतात. साधनाभ्यासाने जन्ममरणाचे पैल आपण देवाच्या गावाला गेलो, आत्म्याच्या गावाला गेलो तर तेथे जन्ममरण (श्वासोच्छ्वास) हे परिभ्रमण नाही. तो ‘नाही आदी अंत ऐसा अनंत’ आहे. तेथे अखंड जाणीव अर्थात जाणीवनेणीव नाही. तेथे अखंड पुण्य अर्थात पापपुण्य नाही. तेथे अखंड प्रकाश म्हणजे रात्रदिवस नाही. आमचे सांप्रदायातील थोर साक्षात्कारी सत्पुरुष श्रीगुरुदेव रानडेसाहेब यांना कोणी विचारले की तुम्ही नेम किती वेळ करता? ते म्हणाले, ***‘न गमे दिवस राती। अखंड लागलीसे ज्योती।।’*** या अवस्थेचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***‘दिनू तैसी रजनी। मज अवस्था लावोनी गेला गे माये। नको नको हा वियोग। कष्ट होताती जीवासी।।’*** आपण जर भजन-साधन साधले नाही तर त्याचा वियोग होऊन दिननीशी सायास (षड्‌विकारात्मक आयास) होणार. रात्रंदिवस जग आणि मन यांचेशी युद्ध करावे लागणार. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या या अवस्थेचे वर्णन असे करतात, ***‘सायास करिसी प्रपंच दिनानिशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।’*** तर श्रीतुकाराममहाराज आपल्या या अवस्थेचे वर्णन असे करतात, ***‘रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।।’.*** ही चैतन्याच्या स्मरणाची अवस्था सतत राहिली, तिन्ही अवस्थांची एक अवस्था त्रिकाल साधनाने झाली तर मात्र हा वियोग होणार नाही. अर्थात सायास ही होणार नाहीत. म्हणून सर्वकाळ साधन-भजन साधले पाहिजे. ***(‘नित्य नेम प्रातःकाळी। माध्यान्हकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावे।।’- समर्थ, ‘निशीदिनी तोचि ध्यास धरावा। बहू यत्ने अभ्यास करावा। साधन करूनी या वळवावा। श्रीआत्माराम।।’- श्रीचिमडमहाराज, ‘दिननिशी नाम जपता श्रीहरीचे। मग या मोहाचे मोहन नाही।।’- संत श्रीनिळोबाराय, ‘कहत कबिरा सुन भाई साधो। राम भजो दिनरात।।’- श्रीकबीरसाहेब)*** काही लोक श्रीतुकाराममहाराजांना म्हणाले की, महाराज हा अहर्निशी परमार्थ करून व्यवहार कधी करायचा? श्रीतुकाराममहाराज म्हणाले की आडमार्गी पाय न ठेवताना उत्तम व्यवहार करा. वेगळा परमार्थ करायची गरज नाही. लोक म्हणाले, ‘महाराज, आडमार्ग म्हणजे नेमका कोणता?’ श्रीतुकाराममहाराज म्हणाले, ‘कामक्रोध हे आत्मसाक्षात्काराच्या आड येतात. कामक्रोध टाळा व व्यवहार करा. व्यवहार करून अहर्निशी परमार्थ साधणार आहे. ***(’अहर्निशी सदा परमार्थ करावा। पाय न ठेवावा आडमार्गी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘कामक्रोध आड आलेती पर्वत। राहिला अनंत पैलीकडे।।’- संतवचन)*** कामक्रोधाचे दहन होणे म्हणजे ‘राम’ म्हणणे आहे.

**

# वीट

जोवर इकडला प्रपंचाचा वीट येत नाही तोवर तिकडची परमार्थाची आवड निर्माण होत नाही. जोवर संसारातील प्रपंचाचीच - षड्विकारात्मक आयासाचीच आवड आहे, तोवर समाधान हे भजन कसे साधणार? जोवर कांचनाचे ध्यान व परस्त्रीचिंतन सुरू आहे तोवर सुख कुठले? तोवर नामचिंतन कसे होणार? जोवर प्रवृत्ती-सासरची आवड आहे तोवर निवृत्ती या माहेरची, आपल्या आईवडिलांची (वारा हा मायबाप) आठवण कशी होणार? जोवर संसारदु:खे आपण दुखावत नाही, त्रिविधतापांनी आपण होरपळत नाही, तोवर परमार्थाचा अधिकार नाही. जोवर आपण रसनेंद्रियांच्या अंकित आहोत, जोवर झोपेच्या - अज्ञानाच्या किंवा विपरीत ज्ञानाच्या अधीन आहोत, तोवर परमार्थाचा अधिकार प्राप्त होत नाही. ***(जो संसारदु:खे दुखावला। जो त्रिविधतापे पोळला। तोचि अधिकारी जाला। परमार्थासी।।'- समर्थ, 'जो रसनेंद्रियाचा अंकिला। जो निद्रेसी जीवे विकला। तो नाही एथ म्हणितला। अधिकारिया।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मग आम्ही इकडे प्रपंचात चपराक बसली की मग परमार्थाकडे वळतोच की. पण तो खरा परमार्थ नव्हे. जरा इकडे अर्थ दिसू दे, परमार्थाची सुट्टी झालीच समजा. अर्थ दिसेतोवर परमार्थ काही कामाचा नाही. असे असेल तर तेलही नाही आणि तूपही नाही हाती धुपाटणेच येणार. आमची अवस्था घड्याळातील लंबकासारखी किंवा फूटबॉलसारखी आहे. परिस्थितीनुसार आमची स्थिती बदलते. आम्ही काय करतो, आमचे पहिले शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पाच विषय आहेतच, त्यातच एक सहावा 'नारायण' हा विषय वाढवतो. त्याचा काही उपयोग नाही. याच जन्मात संसारातून बाजूला होऊन कोणताही विचार न करताना निर्विचार अवस्थेत परमार्थात झोकून दिले तरच परमार्थ साधतो. म्हणून परमार्थ वाटतो एवढा सोपा नाही. ***('परमार्थ नव्हे सोपा। नव्हती गबाळ्याच्या गप्पा।।'- श्रीमामामहाराज)*** अहो सर्वस्वाचा वीट यावा लागतो तेव्हा वीटेवर देव नीट उभा राहतो. अवघ्याचा कंटाळा तर गोपाळाची आवड निर्माण होते. रामकृष्णी आवड निर्माण होते. धन, जन, माता, पिता, सगेसोयरे यांचा आधार तुटला की त्या देवाचा आधार सापडतो. तोच एक आपला विषय होऊन राहतो. ***('सर्वस्वाचा वीट। वरी उभा देव नीट।।'- श्रीमामामहाराज, 'तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा। तू एक गोपाळा आवडसी।।', 'विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे धने जन माता पिता।।' - श्रीतुकाराममहाराज)***

ज्या वीटेवर निर्गुण परब्रह्म सगुण साकार समचरण उभे राहते, त्या वीटेचे भाग्य किती थोर असेल? ती काही बाजारात मिळणारी कुंभारी वीट नव्हे. श्रीज्ञानेश्वरमहाराज या वीटेचे महत्त्व असे सांगतात, ***'वाराणसी यात्रे जाईन। प्रयाग तीर्थ पाहीन। त्रिवेणी या स्नान करीन । परी विठोबापायीची वीट कधी होईन गा।।'.*** तर श्रीनामदेवमहाराज या वीटेचे महत्त्व असे स्पष्ट करतात, ***'नामा म्हणे जीवे करीन लिंबलोण। विटेसहित चरण ओवाळीन।।'.*** ज्या ठिकाणी अस्तित्वभावाच्या रामकृष्णावाचा या जीवाच्या भावाच्या मंथनातून निर्गुण साचते, निर्गुण सगुण होते किंवा ज्या ठिकाणी अविनाश स्वयमेव स्वयंभ नाम बिंदूरूपाने प्रगटते, नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते व अनिर्वाच्य शुद्धबुद्ध ब्रह्म साकार होते ती वीट आपण समजतो ती नव्हे निश्चित. ***('भावाचे मथिले निर्गुण संचले। ते हे उभे ठेले विटेवरी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अविनाश नाम स्वयंभ साचले। ते उभे चांगले वीटेवर। एका जनार्दनी नाम अविनाश। गाता जाती दोष जन्मांतरीचे।।'- श्रीनाथमहाराज, 'अनिर्वाच्य शुद्धबुद्ध। उभे राहिले हो नीट। रामा हो जनार्दनी। पाया जोडीयेली वीट।।'- संतरामाजनार्दन)***

**

# लटके

देहामध्ये आधारस्थानी असणाऱ्या मन पवन जीव शिव या चार शून्यानी मर्यादित असणाऱ्या लंबचौकोनी वीटेवर हे सोहंब्रह्म अनुभवाला येते. ***('सोहंब्रह्म वीटेवरी। बरवे शोधावे अंतरी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गोविंद म्हणे आधार। वीट जाणावी साचार।।'- श्रीमामामहाराज, 'उर्ध्वंशून्य मनोभूतं अधः शून्यं तु मारुतः मध्य शून्य जीवोभूतं चतुर्थं ब्रह्मउत्तमं।।- श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात उधृत होणारे वचन)*** या चार शून्यांचे वर्णन संत जनाबाई अनुभवाने असे सांगतात, ***'शून्यावरी शून्य पाहे। तयावरी शून्य आहे।। प्रथम शून्य रक्तवर्ण। त्याचे नाव अधःशून्य।। उर्ध्वशून्य श्वेतवर्ण। मध्यशून्य शामवर्ण।। महाशून्य वर्णनीळ। त्यात स्वरूप केवळ।। अनुहत घंटाश्रवणी। ऐकूनी विस्मित झाली जनी।।'.*** सर्वस्वाचा वीट येऊन मनातील आशा नाहीशी होऊन कल्पित अहंकार नाहीसा झाला असता - मन हे प्रवृत्ती सोडून निवृत्त झाले असता मनमुळी वनमाळी अनुभवाला येणारा आहे. ***('म्हणे खेचर विसा। झालासे पिसा। या दृश्याची आशा सांडी नाम्या।।'- संत विसोबा खेचर, 'आपण कल्पिले मीपण। मीपण शोधिता नुरे जाण। मीपण गेलिया निर्गुण। आत्माची स्वये।।'- समर्थ, 'दृढ विटे मन मुळी। विराजित वनमाळी।।', 'मन हे राम झाले आता मन हे राम झाले। प्रवृत्ती सोडूनी कैसे निवृत्तीसी आले।।', 'तरी आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो का सकळ विषया। जेयाचे ठायी इंद्रिया। मानू नाही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आत्मप्रत्ययाशिवाय - हरीच्या प्रत्ययाशिवाय होणाऱ्या जन्ममरण क्रियेला लटका व्यवहार किंवा संसार म्हणतात. ***('लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संसारनगरी बाजार भरला बाई। कामक्रोध लोभ याचे गिऱ्हाईक पाही।। एका जनार्दनी बाजार लटका। संतसंगावाचूनी नोहे सुटका।।'- श्रीनाथमहाराज)*** या लटक्या व्यवहाराने ज्ञान लटक्या द्वैताचे, आकाराचे, ज्याला आदी अंत आहे अशा भ्रामक उपाधीचे होते. उपाधीचे ज्ञानाने विभक्तीप्रत्यय येऊन आत्मप्रत्यय येत नाही. या लटक्या व्यवहाराचा शेवट झाला तर हरीची-आत्म्याची जाणीव होते. आत्मप्रत्यय येतो. आत्मप्रत्ययाने जप, तप, साधन, तीर्थ या परमार्थाच्या गोष्टींना अर्थ प्राप्त होतो. ***('व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।'- संतवचन, 'आत्माची कळला नाही। जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ। जन्ममरण देखे देही। तरीच होशील विदेही।।'- श्रीदासराममहाराज, 'सोहंहंसाची बोळवण। न करिताची जाहली जाण। येणे पळाले जन्ममरण। शून्य पडले संसारा।।'- श्रीनाथमहाराज)*** सत्यज्ञानाच्या जाणीवेत होणारी प्रत्येक क्रिया सत्य. विना आत्मज्ञान सारे लटके, खोटे. श्रीतुकाराममहाराज आमच्या आत्म्याच्या अज्ञानात होणाऱ्या साऱ्या क्रियांना लटके म्हणतात. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'लटिके हासे लटिके रडे। लटिके उडे लटिक्याचे।। लटिके माझे लटिके तुझे। लटिके ओझे लटिक्याचे।। लटिके गाय लटिके घ्याय। लटिके जाय लटक्यासवे।। लटिका भोगी लटिका त्यागी। लटिका जोगी जगमाया।। लटिका तुका लटक्याभावे। लटिका बोले लटिक्यासवे।।'.*** 'सः अहं अहं सः' या महान गुरुपादुकांचे ठिकाणी जर मन जडले, गुरुपादुकांची लटक जर लागली तर खोटे जन्ममरण नाहीसे होते. सारी भ्रामक माया स्वप्नवत होते. माया लटकी होते. सत्य नामरूपाची-निजत्वाची प्रचिती येते. ***('स अहं अहं सः। गुरुपादुका या महा।'- श्रीमामामहाराज, 'मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।।'- श्रीमुकुंदराज, 'मोरी लागी लटक गुरुचरनन की।चरण बिना मज कछू नही भावे। झुठी माया सब सपननकी।।'- संत मीराबाई)*** 'मी' म्हणून कोणी नाहीच आहे हे जेव्हा अनुभवाला येते तेव्हा त्याचे खोटे (लटके) बोलणे बंद होते व तो सत्य नामच बोलतो. श्रीनामदेवमहाराज म्हणतात, ***'लटके न बोलु आम्ही लटके न बोलू। अणुमात्र खोटे आम्ही लटके न बोलू।।'***

**

# चूक

सर्वस्वाचा वीट आला की अंतर्यामी असणाऱ्या गुरुचरणाची लटक लागते व जे लटके आहे ते लटके होते व जे लोपलेले सत्य आहे ते प्रगट होते. सत्य हे सत्य वाटू लागते. सर्व 'स्व'चा त्याग झाला, खोटा 'मी' नाहीसा झाला की खरा 'मी' प्रगट होतो. आजवर जे चुकलेले आहे (हरवलेले आहे) ते आपणास सापडते. आपण जोवर व्यर्थ संसारात गुंतलो आहोत तोवर ही चूक दुरुस्त होत नाही. संसाराच्या गोष्टी सुटल्या तरच आत्मा कळणार. जे नाही आहे ते नाही झाले की जे आहे ते आहे होणार. दृश्य पदार्थ जे नाही आहेत (कल्पनेमुळे आहेत) ते नाही आहेत. (कल्पना गेल्यावर निर्विकल्प अवस्थेत) असे झाल्यावर, जी आहे ती आत्मवस्तू होय.

गर्दीमध्ये लहान मूल आपल्या आईपासून चुकते, तेव्हा ते कसे आईला शोधत असते? तसे आपण या विश्वाच्या गर्दीमध्ये आपल्या आईपासून, चैतन्यापासून-चुकलो आहोत. तिला आपण या विश्वात शोधत आहोत. ***('चुकलिया माये। बाळ हुरुहुरू पाहे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सुखाचा सुखनिधी सुखसागर, सर्व सुखाचे आगर असा परमात्मा - आपली आई - हरवली आहे, चुकली आहे. तिला आपण शोधतोय. आपण आपले सुख हरवले आहे. ते आम्ही या दु:खमूळ संसारात-विश्वात शोधतोय. मग ते कसे सापडणार? हे सुख कोठे आहे हे दाखविणारा महात्मा-संत जर आपणाला भेटला व आपण त्याला खऱ्या अर्थाने पाहिले व त्याने आपल्याकडे स्नेहाने पाहिले, खऱ्या अर्थाने संतभेट झाली की आपले हरवलेले सुख प्राप्त होणारे आहे. आपला सुखाचा शोध सुखकर होणारा आहे. ***(तैसे हारपले आपणपे पावे। तै संताते पाहाता गिवसावे। म्हणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा।।', 'तो जयाकडे वास पाहे। तेऊती सुखाची सृष्टी होये। तो म्हणे तेथ राहे। महाबोधु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संतांचे मार्गदर्शनाने साधनाचा अभ्यास सुरू झाला की संसारातून बाजूला होऊन हंससुख-आपले स्वत:चे सुख स्वत:ला प्राप्त होणारे आहे. ***(बहुत दिवस चुकले सखे ग बहुत दिवस चुकले। राजहंस पाखरु माझे मजला सापडले।। बसुनी एकांती पाहू सखे ग बसुनी एकांती पाहू। उडूनी जाईल म्हणूनी तयासी डोळ्यात साठवून ठेवू।। घडोघडी अनुभव घेऊ सखे ग घडोघडी अनुभव घेऊ। ज्याचे सुख त्याने भोगावे। नये दुसऱ्याला देऊ।।'- संतवचन)*** वस्तुत: आपले सुख आपल्या जवळ आहे पण आपण स्वत:ला विसरल्याने-आत्मारामाला विसरल्याने चुकीच्या मार्गाने विषयातून, संसारात सुख शोधतो. पण सुखाची व आपली चुकामूकच होते. ***('मार्ग चुकला विसर पडला। वरपडा झाला विषयचोर।।', 'तुझे आहे तुजपाशी। परी तू जागा चुकलासी।।', 'तुका म्हणे आम्ही चुकलो। व्यर्थ संसारी गुंतलो।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ब्रह्म असताना मायाच भासमान होणे, ब्रह्माचे वर्णन शब्दात कितीही केले तरी बोध मायेचाच होणे, वस्तुत: चैतन्यच चैतन्याला पाहात असून ज्ञान उपाधीचेच - देहाचेच होणे हा सारा आपणाला होणारा भ्रम ही ब्रह्माची आपण केलेली थट्टाच आहे. हा सारा भ्रम दूर होऊन जे चुकलेले आहे - हरवलेले आहे ते प्राप्त होणे म्हणजे झालेली चूक, थट्टा कळणे होय. ***('येक अस्ता येक वाटे। येक सांगता येक निवटे। येक दिसता येक उठे। या नाव भ्रम।।'- श्रीसमर्थ)*** विठ्ठलाचे ध्यान न करता जे काही आम्ही करतो व आपुले आयुष्य वाया घालवितो ती सारी विठ्ठलाची मस्करीच आहे. ***('मस्करीत जन्म गेला। कधी ध्यासी रे विठ्ठला।।'- श्रीमामामहाराज)***

✻✻

# नामधारक

बाळ जन्माला येते, त्याचे जे नाव आपण बारशाच्या दिवशी ठेवतो, ते नाव कोणाचे ठेवतो? देहाचे की चैतन्याचे? आमच्या समजुतीप्रमाणे आम्ही देहाकृतीचे नाव ठेवतो. पण समजा जन्माला आलेल्या देहाकृतीत कृतीच नसेल, चैतन्यविरहित बाळ जर जन्माला आले असेल, तर त्याचे बारसे करता येते का? मग नाव कोणाचे ठेवता? चैतन्याचेच ना? नाव धारण कोण करते? चैतन्यच ना? हे नाव धारण करणाऱ्या चैतन्याला - आत्म्याला - नामधारक म्हणतात. या नामधारकाला- चैतन्याला जाणण्यात खरे सुख आहे. चैतन्य हे आपले खरे रूप आहे. त्या रूपाची ओळख सर्वसामान्यतः आपली आपल्याला होत नाही. ती ओळख सद्‌गुरूंचेकडून करून घ्यावी लागते. ***('सद्रुपी ओळख करीतो सद्‌गुरू। येर ते गुरूगुरू करिताती।।'- श्रीदासराममहाराज, 'स्वरूप ते अगोचर। गुरू करिती गोचर।।'- श्रीमामामहाराज, 'माझे सुख मज दावियेले डोळा। दिधली प्रेमकळा नाममुद्रा।।'- श्रीनामदेवमहाराज)*** म्हणून सद्‌गुरूंचेकडून अनुग्रह घेऊन आपले खरे रूप जो जाणतो तो नामधारक होय. पण ही अनुग्रहाची अवस्था - नाम धारण करणाऱ्या चैतन्याला जाणण्याची सुखाची अवस्था - सतत टिकली पाहिजे. त्याकरता साधनाचा अभ्यास होणे गरजेचे. साधनाभ्यासाने तिन्ही अवस्थांमध्ये सतत जो चैतन्याचीच - नामाचीच अनुभूती घेतो तो नामधारक. ***('नामधारक नाम जाणे। आणिक काही प्रकार नेणे।।', 'अखंडित नाम मनी। नामधारक तो जनी।।', 'नामधारक तो भला। नाम एक देव त्याला।।'- श्रीमामामहाराज, 'नामाचे धारक हरिनाम गाती। समाधान चित्ती पूर्ण जया।।'- श्रीदासराममहाराज, 'आम्ही नामाचे धारक। नेणो प्रकार आणीक। सर्वभावे एक। विठ्ठलची प्रमाण।।'- श्रीतुकाराममहाराज)*** संसाराला पाणी-जीवन दिले तरच पवनासरिसा आत्मा स्पष्ट होतो. आत्मविठ्ठलाचे दर्शन होते व संसार सुफळ होतो. ***('नाडीद्वारा धावे जीवन। जीवनामध्ये खेळे पवन। त्या पवनासरिसा जाण। आत्माही विवरे।।'- समर्थ, 'नाम जाणे तुकया वाणी। दिले संसाराला पाणी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आजी संसार सुफळ झाला गे माये। देखियेले पाय विठोबाचे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** येथे संसाराला पाणी देणे याचा अर्थ जन्ममरण या क्रियेमध्ये - श्वासोच्छ्वासामध्ये - जन्ममरणरहित अविनाश जीवन-नाम अनुभवणे होय. ज्यांना असे आत्मविठ्ठलाचे - देहभाव हरपून पांडुरंगाचे दर्शन झाले ते नामधारक तरणारच. ***('तरले तरती हा भरवसा। नामधारकाचा ठसा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो। सत्य उद्धरिलो गुरूकृपे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या नामधारकांचा अधिकार श्रीनाथमहाराज असा सांगतात, ***'नामाचे धारक विष्णूरूप देख। त्रिभुवनीचे सुख तये ठायी।। ब्रह्मा विष्णू रुद्र येताती सामोरे। नामधारक निधरि तया वंद्य।।', 'नामधारक हो का भलता। त्याचे चरणी ठेवीन माथा।।'.*** सर्वांचे मूळ हे निश्चळ चैतन्य असून कल्पनेने निश्चळी चंचळाच्या लहरी निर्माण झाल्या ते चंचळ चैतन्य. या चंचळ चैतन्यापासून जडाची निर्मिती होते. जडापासून जड निर्माण होत नाही. ***(जडाचे मूळ ते चंचळ। चंचळाचे मूळ ते निश्चळ।। निश्चळासी नाही मूळ। बरे पहा।।- श्रीसमर्थ)*** या चंचळ चैतन्यामुळे जडाची जाणीव होते व जडाच्या होणाऱ्या जाणीवेमुळे चंचळ चैतन्याची जाणीव होत नाही. त्यामुळे जडामागे चंचळ चैतन्य आहे का नाही असा प्रश्न निर्माण होतो. ज्या चैतन्यामुळे जडाचे अस्तित्व आहे, चैतन्यावेगळे जडाला अस्तित्व नाही, त्या चैतन्याचे अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो. ही यातली गंमत आहे. या चंचळ चैतन्याची जाणीव साधनेने ज्यांना होते त्या चैतन्यरूप साधकांना 'नामधारक' म्हणतात.

**

# महद्‌भूत

ज्यांना चंचळ चैतन्याची जाणीव होते अशा नामधारकाना निश्चळत्वाने परब्रह्माची-महद्‌भुताची प्राप्ती होते. ज्यांना चैतन्याच्या चंचळत्वाची जाणीवच नाही अशा जडबुद्धीच्या लोकांना निश्चळत्व कसे प्राप्त होणार? महद्‌भुताची भेट कशी होणार? ज्यांना देहात असणाऱ्या चंचळ चैतन्याची - गतीमान आत्म्याची - जाणीव नाद, बिंदू, कला ज्योती रूपाने होते. त्यांना देही म्हणतात व जे जाणीवरहीत जाणते होतात ज्यांना वृत्तीरहीत ज्ञान होते, ते विदेही परब्रह्म होतात. ***('आम्ही देही तू आत्मा। आम्ही विदेही तू परमात्मा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** जे आत्मरूप जाणणारे देही असतात तेच विदेही होतात. ज्या देहात आत्म्याची जाणीव होते त्या देहाचा विदेह व्हायला हवा. महाकारणदेहात असणारी आत्म्याच्या ज्ञानाची सर्वसाक्षी मनाला असणारी जाणीव नाहीशी व्हावयास हवी. ***('मुळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।', 'म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।'- समर्थ)*** महाकारण देहात आत्म्याचा-आकाशाचा अनुभव जे घेतात ते देहीच विदेही होतात. ***('तुका म्हणे देही। संत जाहले विदेही।।'- श्रीतुकाराममहाराज)*** महाकारणदेहात असणाऱ्या सर्वसाक्षी मनाचे उन्मन झाले की तुर्यावस्थेत होणारी आत्म्याच्या ज्ञानाची जाणीव नाहीशी होते-ज्ञानाचे विज्ञान होते. अशा तऱ्हेने मनाचे उन्मन-ज्ञानाचे विज्ञान झाले की आत्म्याचा चंचळपणा कमी होतो. आत्मा निश्चळ होतो. महद्‌भूताची-परब्रह्माची-प्राप्ती होते. ***('जेथे मनची होते उन्मन। ज्ञानची होते विज्ञान। तेथे कैसे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ)*** साधनेने ज्यांना आपल्या शरीरातील निजत्व - चैतन्य - नाद, बिंदू, कला, ज्योती रूपाने अनुभवाला येते, त्यांना सर्वत्र जडामागे लपलेले चैतन्यच अनुभवाला येते. चैतन्याचे वारेच नयनात भरते. चैतन्यसहित जड अनुभवाला येते. आम्हाला चैतन्यरहित जड अनुभवाला येते व द्वैत माजते. संतांना चैतन्यसहित जड अनुभवाला येत असल्याने त्यांना द्वैतात अद्वैत अनुभवाला येते. संत सर्व भुतसृष्टी साम्यावस्थेत पाहतात. आम्हाला मात्र सर्वत्र वैषम्य आढळते. ***('जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तीयोगु निश्चित। जाण माझा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जे जे दृष्टी दिसे ते ते ब्रह्मरूप। पूजा ध्यान जप त्यासी नाही।।'- श्रीनाथमहाराज, 'अवघी भुते साम्या आली। देखिली म्या कै होती।।', 'तुका म्हणे जे जे भेटे। ते ते वाटे मी ऐसे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** जोवर देहाची जाणीव होते आहे, जोवर देहावरच प्रेम आहे, तोवर चैतन्याची जाणीव होत नाही. चैतन्याविषयी प्रेम निर्माण होत नाही. ***('भूतदया ठेवी तया काय उणे। प्रथम साधन हेचि असे।।', 'भूतांची दया हे तो भांडवल संता। आपुलिया ममता नाही देही।।'- श्रीतुकाराममहाराज)*** म्हणून नामधारकाचे प्रेम सर्वावर सारखे असते. ते निर्वैर असतात. ***('जाणावा तो साधू। जया पूर्ण बोधू। भूतांचा विरोधू। जेथ नाही।।'- समर्थ, 'निर्वैर व्हावे सर्व भुतासवे। साधन बरवे हेची एक।।'- श्रीतुकाराममहाराज)*** महद्‌भुताचे ठिकाणी, भगवंताचे ठिकाणी कल्पनेने भासमान होणारी भुते कल्पनेच्या निरासाबरोबर - कल्पांती नाहीशी होतात. म्हणून निर्विकल्प संतांना या पंचमहाभूतांची बाधा होत नाही. पण सर्वकाळ सदोदित असणारे महद्‌भूत जर लागले तर ते मात्र जाता जात नाही. ***('भूत जबर मोठे ग बाई। झाली झडपण करू गत काई।। सुप चाटूचे देवऋषी। या भुताने धरिली केशी।। लिंबू नारळ कोंबडा उतारा। त्या भुताने दिधला थारा। भूत लागले नारदाला। ते जाइना कुणाच्या बाला।। भूत लागले ध्रुव बाळाला। उभा अरण्यात ठेला।। एका जनार्दनी भूत। सर्वठायी सदोदित।।'- श्रीनाथमहाराज, 'तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथे मीचि मी आधवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** इतर भुतांचे ठिकाणी येण्याजाण्याची क्रिया असते. महद्‌भूताचे ठिकाणी जर आपण गेलो तर वाटेवरच ते झडपतय, तेथून परत येता येत नाही. 'यद गत्वा न निवर्तन्ते' अशी तेथे अवस्था आहे. म्हणून जाताना विचार करून जावा. ***('पंढरीचे भूत मोठे। आल्या गेल्या झडपी वाटे।। तेथे जाऊ नका कोणी। गेले नाही आले परतोनी।। तुका पंढरीसी गेला। पुन्हा जन्मा नाही आला।।'- श्रीतुकाराममहाराज)***

# श्रीनामदेवमहाराज समाधी सोहळा

आज श्रीनामदेवमहाराजांचा संजीवन समाधी सोहळा दिन आहे. श्रीनामदेवमहाराज हे प्रमुख पाच दांडाईत संतांपैकी एक होते. या पाचही संतांनी देह ठेवला नाही हे केवढे विशेष आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी संजीवन समाधी घेतली तर श्रीनामदेवमहाराज पायरीत गुप्त झाले. संत कबीरांच्या देहाच्या सब्जा तुळशी झाल्या तर श्रीनाथमहाराज गोदारूप झाले. श्रीतुकाराममहाराज तर सदेह वैकुंठाला गेले. श्रीनामदेवमहाराज हे जन्मजात भक्त होते. श्रीनामदेवमहाराजांचे भगवंतावर निरतिशय प्रेम होते व भगवंतांचे प्रेम काकणभर जास्तच श्रीनामदेवमहाराजांचेवर होते. ***('नामयाचे प्रेम केशवची जाणे। केशवासी रहाणे नामयापाशी। केशव तोचि नामा नामा तोचि केशव। प्रेमभक्तीभाव मागतसे। विष्णुदास नामा उभा केशवद्वारी। प्रेमाची शिदोरी मागतसे।।'- श्रीनामदेवमहाराज)*** या प्रेमापायीच भगवंतांनी श्रीनामदेवमहाराजांनी लहान असताना दाखविलेला दुधाचा नैवेद्य ग्रहण केला. श्रीनामदेवमहाराजांना भगवंताच्या खऱ्या रूपाची ओळख व्हावी या हेतूने सर्व संतमंडळींनी कच्चे कोण व पक्के कोण हे ठरविण्यासाठी संतसभा बोलविली व त्या सभेत श्रीनामदेवमहाराज हे कच्चे ठरले. ***('अखंड जयाला देवाचा शेजार। कारे अहंकार नाही गेला।।', 'बोलविला गोरा जुनाट पै जुना। हाती थापटणे अनुभवाचे।।'- संत मुक्ताबाई)*** भगवंताच्या सांगण्यावरून त्यांनी संत विसोबा खेचर यांचा अनुग्रह घेतला व त्यांना भगवंतांच्या खऱ्या स्वरूपाची ओळख झाली. ***('म्हणे खेचर विसा झालासे पिसा। या दृश्यांची आशा सांडी नाम्या।।'- संत विसोबा खेचर, 'सर्व सत्ता आली हाता। नामयाचा खेचर दाता।।'- श्रीनामदेवमहाराज)*** त्यांनी कोणते व कसे साधन केले हे सांगावयास श्रीनामदेवमहाराजांचे दोन अभंग पुरेसे आहेत. ते म्हणतात, ***'घालुनी आसन साधिला पवन। घेतले जीवन अंतरिक्षी।।', 'नासीकेचे वारे कोंडोनिया प्राणे। उफराटे जाणे उर्ध्व पंथे।।'*** माझ्या मते श्रीनामदेवमहाराजांनी साधलेले साधन व श्रीनिंबरगीकरमहाराजांनी साधलेले साधन एकच आहे. भक्त प्रल्हादापासून आलेल्या परंपरेचे आपण सर्व पाईक आहोत. ***('कृतयुगी नामा प्रल्हाद पै जाला। स्तंभी अवतरला नारायण।। त्रेतायुगी नामा अंगद कपि असे। रामचंद्रे त्यासि आलिंगिला।। द्वापारी नामा उध्दव गहन। नारायण क्षण न विसंबे।। कलियुगी नामा सत्य पै साकार। न कळे तो पार ब्रह्मादिका।।'- संत श्रीपरसा भागवत, 'मूळ प्रल्हाद तेचि अंगद उद्धव पुढे जगती। नामदेव मग तुकारामची पूर्ण ब्रह्मज्योती।। अवतारी या नाम नारायणराव हे धरियेले। गुरुलिंगजंगम साधू ऐसे प्रगट जन बोले।।'- संतवचन)*** साधनाभ्यासाने देहभावाचा लय झाल्यावर दशमद्वार या पंढरीत नित्यकीर्तन त्यांनी अनुभविले. महाद्वारात नित्य कीर्तन करण्याचा त्यांचा मानच होता. त्यांचे कीर्तनात प्रत्यक्ष पांडुरंग हृदयभुवनी नाचत असे. त्यांचे कीर्तनात श्रीज्ञानेश्वरमहाराज विश्रांतीचे वेळी अभंग म्हणत, एवढे त्यांचे कीर्तनाचे महत्त्व. या कीर्तनाच्या माध्यमातूनच त्यांनी आसेतूहिमाचल भागवत धर्माचा विस्तार केला. सतत नाम परीसल्याने त्यांना एवढा अधिकार प्राप्त झाला की त्यांच्या सहजस्पर्शाने खड्यांचे परीस होत. वाल्मिकीनी शतकोट रामायण लिहिले. त्याप्रमाणे श्रीनामदेवमहाराजांनी शतकोट अभंगांची रचना केली. त्यांना घरातील सर्व मंडळींनी मदत केली हे विशेष. आपले कार्य झाल्यावर त्यांनी समाधी घेण्याचे ठरविले. आषाढी एकादशी हा पवित्र दिवस त्यांनी निवडला होता. पण भगवंतांचे सांगण्यावरून त्यांनी आषाढ व.१३ या दिवशी समाधी घेतली. श्रीनामदेवमहाराज व त्यांचे घरातील सर्व अधिकारी मंडळी भगवद्चिंतनात महाद्वारात पायरीमध्ये गुप्त झाली. ***('आषाढ शुद्ध एकादशी। नामा विनवी विठ्ठलासी।। आज्ञा द्यावी हो मजसी। समाधी विश्रांती लागी।।'- संत परिसा भागवत, 'देव म्हणे नाम्या राहे पक्षभरी। पुरतील कोडी निरंतर।।'- संतवचन, 'नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे। संत पाय हिरे देती वरी।।'- श्रीनामदेवमहाराज)*** ✲✲

# नामाची सवय

नामस्मरण ही एक अवस्था आहे. आपणास देहाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांपेक्षा ही अवस्था वेगळी आहे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांमध्ये त्याचे स्मरणाची व्यवस्था नाही. ***(‘जागृती स्वप्न सुषुप्ती नाठवे। पाहता आनंदी आनंद सामावेना।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या नामस्मरणाच्या अवस्थेची आपणास सवय असत नाही. ही अवस्था प्राप्त होणे तसे अवघड व झाली तर ती सतत कोणत्याही स्थितीत टिकणे त्याहून अवघड. संसाराला पाणी दिले तरच नाम जाणता येते. म्हणून नाम जाणणारे थोडेच. ***(‘ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘नाम जाणे तुकयावाणी। दिले संसाराला पाणी।।’- श्रीतुकाराममहाराज)*** ‘संसाराला पाणी देणे’ म्हणजे नेमके काय हे आपण इतरत्र पाहिले आहे. हे नाम जाणण्याकरता अभ्यास हवा. अभ्यासाने त्या अवस्थेची सवय होऊ शकते. म्हणून त्रिकाळ त्या नामाच्या अवस्थेत जाण्याचा नेम केला तर सवयीने सर्वकाळ ती अवस्था टिकू शकेल. श्रीसमर्थ सांगतात, ***‘नित्य नेम प्रातःकाळी। माध्यानकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावे।।’*** जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था - नामस्मरणाची अवस्था - होणेसाठी जे करावे लागते त्याला चिमडचे श्रीनारायणमहाराज ‘साधन’ म्हणतात. स्मरणामध्ये - जाणीवेमध्ये - कामक्रोधरहित अवस्था होणे, स्मरणामध्ये ‘काहीच न करोनी प्राणी’ ही समर्थ अवस्था होणे, स्मरणामध्ये मनोवृत्तीचा निरोध होणे, स्मरणामध्ये निवृत्ती होणे, स्मरणामध्ये देहाचा, मनाचा, प्राणाचा लय होणे ही नामस्मरणाची स्थिती-अवस्था आहे. ***(‘राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।’- श्रीसमर्थ, ‘मनोवृत्तीचा निरोध करोनी। नाम सदा आठवी।।’- श्रीमामामहाराज, ‘स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।’- श्रीनाथमहाराज)*** ही रामनामाची स्थिती म्हणजे आपली सहजस्थिती-मूळ स्वभाव आहे. ही स्थिती साधणे हे खरे अध्यात्म आहे. ***(‘ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाव सुभद्रापती। अध्यात्म गा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘मुळस्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।। अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।।’, ‘सहजकृती रामनाम। नाही अंतरी दुजे काम।।’- श्रीमामामहाराज केळकर)*** अहंकार, अहंबुद्धी यांचा त्याग झाला तर राहणारी सहज अविनाश जन्ममरणरहित कृती म्हणजे ‘रामनाम’ आहे. या अवस्थेत जे कर्म होते ते निष्कर्माचे ‘करितेनवीण कर्म’ असते. ते ‘करोन काहीच न करणे’ असे विदेही समर्थकर्म असते. या अवस्थेत जे रामनामाचे बोलणे होते ते ‘अबोलण्याचे बोलणे’ असते. ***(‘रामनामाचे बोलणे। दास म्हणे अबोलणे।।’- श्रीमामामहाराज)*** चालताना, बोलताना, पाहताना, ऐकताना कोणत्याही परिस्थितीत ही स्थिती न बदलणे म्हणजे नामाची सवय जडणे होय. ***(‘चालता, बोलता, देखता, ऐकता। न ढळे सर्वथा तेची साधी।।’- संत मुक्ताबाई, ‘संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती।। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोची नये।।’- श्रीसमर्थ, ‘हरी बोला एकांती। हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।’- श्रीनाथमहाराज)*** आपला मूळस्वभाव म्हणजे त्रयोदशाक्षरी मंत्र आहे. या त्रयोदशाक्षरी मंत्राच्या जपाने तेरा कोटी प्राप्त झाली म्हणजे ‘सब तेरा कोई नही मेरा’ याची अनुभूती आली व अंत:करणातील ‘मी आणि माझे’ नाहीसे झाले की रामदर्शन निश्चित होणार आहे. नुसती जपसंख्या होऊन उपयोग नाही तर तेरा कोटी (अवस्था) प्राप्त होणे महत्त्वाचे.

**

# दीप

कामक्रोधरहित अवस्थेत कर्माला अकर्माची मोहोर बसून संसारातील अहंकार नाहीसा होतो. संसारच ब्रह्मरूप होतो. सोहंमधील सकार, हकार गळून जाऊन मध्यभागी जीवनात श्रुत होणाऱ्या ओंकारश्रवणी तदाकारता साधली की पुढे दीपाचा साक्षात्कार होऊन मन वृत्तीसहीत मुरल्याने निवृत्ती अवस्थेत निर्गुणाचा संग त्याला घडतो. ***('कामक्रोध सर्व कर्म दंडीले बळे। सूत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले।। निर्गुणाचा संग मला आजि जहाला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।।'- संत मुक्ताबाई, 'तैसा कर्मकर्माचिया मोहरा। उठू नेदूनि अहंकारा।। संसाराचा दरारा। सांडणे येणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'एकची मीपणे नागविले घर। नातरी संसार ब्रह्मरूप।।'- संतवचन)*** साधनाभ्यासाने दशमद्वार ओलांडल्यावर महाकारणदेही चैतन्याच्या अखंड स्मरणात ही कामक्रोधरहित सहजावस्था प्राप्त होते. ***('महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वयभजन हरिकथा।।', 'दशमद्वार ओलांडिता। सहजस्थिती येई हाता।।'- श्रीदासराममहाराज)*** ही नित्य ब्रह्माची आपल्या ठिकाणी असणारी सहजस्थिती म्हणजेच खरे अध्यात्म आहे. ***(ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हा जो अखंडस्मरणाचा प्रकाशदीप आहे तो अज्ञानाचा अंध:कार दाखविणारा, अज्ञानाचे ज्ञान घडविणारा आहे. ***('स्मरणाचा प्रकाश बरा। दावी अज्ञानाध:कारा।।'- श्रीदासराममहाराज, 'गोविंद म्हणे अज्ञान उरेल कशाला। पेटता मशाला देवाजीची।।'- श्रीमामामहाराज, 'सोहिरा म्हणे ज्ञानज्योती तेथे कैची दिवसराती। तयावीण नेत्रपाती हालवू नकोरे।।'- संत सोहिरोबानाथ)*** अज्ञानाचे ज्ञान झाल्याने निद्रावस्था मावळते म्हणजे निद्रा ज्ञानमयी होते. साहजिकच अज्ञानातून प्रगट होणाऱ्या विपरीतज्ञानाच्या जागृती, स्वप्न या अवस्थादेखील मावळतात व तिन्ही अवस्थांत सत्यज्ञान प्रगट होते. ***('आत्मेयासी देहद्वये बंधन। तयासी अज्ञान हेचि कारण। अज्ञाननिवृत्तीवीण। मोक्षू कैचा।।'- संत मुकुंदराज)*** अज्ञानाचे ज्ञान - जाणीव अखंडत्वाने होत असल्याने जाणीवेचा ग्रास होतो व तो साधक विज्ञानी वस्तूरूप होतो. तो जाणीवरहित जाणता होतो. ***('तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तू देऊनि गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** वृत्तीरूपाने समान असणाऱ्या ज्ञान अज्ञानाचे वर्णन, स्मरण विस्मरणाचे वर्णन शब्दाने करता येते. पण जे ज्ञान - स्मरण वृत्तीरहित आहे, त्याचे वर्णन शब्दात करता येत नाही. जे इंद्रियांना जाणवते, जे मनाला भासते, त्या वृत्तीसहित ज्ञानाचे वर्णन शब्दात करता येते. निवृत्ती अवस्थेतील अखंड स्मरणाचे वर्णन शब्दात करता येत नाही. ***('अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैलज्ञानाज्ञाना होता कळे।।'- श्रीदासराममहाराज)*** या अखंडस्मरणाच्या अखंड प्रकाशाने कल्पनेचा निरास होतो. द्वैताचे अनुसंधान सुटते व आत्मवस्तूची ओळख होते. ***('तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।'- समर्थ)*** या अखंडस्मरण दीपाचे वर्णन संत कबीरसाहेब असे करतात, ***'नजर नही आवे आतमज्योती।। तेल ना बत्ती बुझ नही जाती। नही जागत नही सोती।। झिलमील झिलमील निशीदिनी चमके जैसा निरमल मोती।। कहत कबिरा सुन भाई साधु। घरघर बाचत पोथी।।'***

✻✻

# देवाचिये द्वारी

***देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या।।१।।***
***हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी।।२।।***
***असोनी संसारी जिव्हे वेगु करी। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा।।३।।***
***ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा। द्वारकेचा राणा पांडवाघरी।।४।।***

विश्वात्मक देवाची प्रचिती ज्या अवस्थेत किंवा ज्या ठिकाणी प्राप्त होते ती अवस्था किंवा ते ठिकाण म्हणजे देवाचे द्वार आहे. निसर्गाने प्राप्त होणाऱ्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांमध्ये देवाची जाणीव होत नाही. जाणीव होते ती देहाची किंवा साकार दृश्याची. अर्थात या तिन्ही अवस्थांपेक्षा देवाची प्रचिती येणारी अवस्था वेगळी आहे हे निश्चित. गुरुकृपेने या तीन अवस्थांपेक्षा वेगळी देवदर्शनाची, नामस्मरणाची अवस्था (स्थिती) जर आपणास प्राप्त झाली व त्या अवस्थेत क्षणभंगुर असणारे संपूर्ण आयुष्य जर व्यतीत झाले, तर त्या जीवाला सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता या चार मुक्ती प्राप्त होतात. या चार मुक्तींचे वर्णन श्रीसमर्थ असे करतात, ***'लोकी राहावे ते सलोकता। समीप असावे ते समीपता। स्वरूपची व्हावे ते सरूपता। तिसरी मुक्ती।।', 'निर्गुणी अनन्य असता। तेणे होय सायुज्यता। सायुज्यता म्हणिजे स्वरूपता। निर्गुण भक्ती।।'.*** आपल्या शरीरात असणाऱ्या आत्मदेवाची - निजदेवाची अनुभूती आली असता या विश्वात्मक देवाची प्रचिती येते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा।।'*** आत्मप्रकाशाचे स्वरूपात ही आत्मदेवाची प्रचिती साधकास येते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,***'अथवा आत्मप्रकाशे चोखे। जो आपणपेचि विश्व देखे। तो देहेचि परब्रह्म सुखे। मानू येईल।।'.*** मनातील कल्पनेचा निरास झाला असता निर्विकल्प अवस्थेत मनाच्या मुळाशी तो कल्पक वनमाळी स्मरणप्रकाशरूपाने अनुभवाला येतो व जीवपणाचा वियोग होऊन आकाराचे ज्ञान - द्वैताचे ज्ञान नाहीसे होऊन अद्वैत स्वरूपाचे ज्ञान होते. ज्ञानप्रकाशाने कल्पनेचा निरास होतो किंवा कल्पनेचा निरास होऊन ज्ञानप्रकाशाचे ज्ञान होते. ***'जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतचि असे। सर्वकाळ।।', 'तैसे ज्ञानाचेनि प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।'*** ही श्रीसमर्थवचने व ***'तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।', 'आकारू जेथ सरे। जीवत्व जेथे विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय जे।।'*** ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने, ही संतवचने सारे काही स्पष्ट करतात.

संकल्पविकल्परहित अवस्थेत चारी वाचे पैल उच्चारेवीण हरीवाचेने-हरीमुखाने हे नादरहित सहजशब्द (निर्विकल्प नाम) उदय पावतात. या हरीमुखाला काकीमुख, शीतलमुख, अनावर वाचा, कमलमुख आदी नावांनी संत संबोधतात. संकल्पविकल्परहीत निर्विकल्प नामाने अगणित पुण्य प्राप्त होऊन निर्विकल्प ब्रह्माची प्राप्ती होते. ***('निर्विकल्प नाम। तेचि जाणा परब्रह्म।।'- श्रीदासराममहाराज)*** श्वासोच्छ्वासी-संसरणात-संसारात जर नाम साधले तर संसरण-संसार शांत होऊन मनोलयाने निवृत्ती अवस्थेत परब्रह्मरूप श्रीकृष्ण परमात्म्याची प्राप्ती होते. या श्वासोच्छवासी असणाऱ्या नामाचाच वेदांनी शास्त्रांनी पुरस्कार केलेला आहे. या नामस्मरणानेच पांडवांघरी वास्तव्यास असणाऱ्या श्रीकृष्णपरमात्म्याचा अनुभव व्यासांनी घेतला असून सकल साधुसंतांनी हेच साधन साधले आहे.

**

# चहू वेदी जाण

***चहू वेदी जाण षट्शास्त्री कारण। अठराही पुराणे हरीसी गाती।।१।।***
***मंथोनि नवनीता तैसा घे अनंता। वाया व्यर्थ कथा सांडी मार्गू।।२।।***
***एक हरी आत्मा जीव शिव समा। वाया तू दुर्गमा न घाली मन।।३।।***
***ज्ञानदेवा पाठ हरी हा वैकुंठ। भरला घनदाट हरी दिसे।।४।।***

चार वेदांचे ठिकाणी असणारी जाणीव-ज्ञान ***('चहू वेदी जाण।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'ज्ञान म्हणजे जाणणे।'- समर्थ)*** व जाणीवेचे कारण असणारी वायुरूप कृती ***('शास्त्र म्हणजे कृती।'- श्रीमामामहाराज)*** हे प्रकृती पुरुष ज्याच्यापासून निर्माण झाले असा विश्वाचा पितामह श्रीहरी, त्याचेच वर्णन ही १८ पुराणे करतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'इये प्रकृतिपुरुषे दोन्ही। उपजली जयाचिया मनी। तो पितामह त्रिभुवनी। विश्वाचा मी।।'*** साधनाभ्यासाने आपल्या नि:श्वासाला काही प्रमाण झाल्यावर विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहिलेल्या अज्ञानाचे ज्ञान झाले असता, म्हणजे निद्रा ज्ञानमयी झाली असता, महाकारणदेहाच्या गुहेत परमेश्वराच्या नि:श्वासातून हे ज्ञान प्रगट होते. देवाची वचने श्रुत होतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज वेद कसे श्रुत झाले हे असे सांगतात, ***'हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरू। तो स्वये सर्वेश्वरू। प्रत्यक्ष अनुवादला।।'*** श्रीदासराममहाराजांना श्रीगुरुलिंगजंगममहाराजांनी श्रुत केलेली गुरुलिंगगीता या श्रुतीश्रवणाबद्दल असे सांगते, ***'गुरुवचनन्नू मुद्रित साद। गवियू यन्त्र श्रुतिगे केळिद्दा नाद। गुरुलिंगप्रसादन्न गीता। कर्णादल्युदि पडसादंथा।।२।। गुरुकरूणेयू ऐक्यादा स्वपनू। निन्न कायवू सुपनवीय सुपनू।।३।। हिंग बेकू प्रल्हादा हिंग बेकू। सिद्धानंद बंदा कायो नाक्कू।।४।। (पद क्र.४०) 'महाकारणदेहदोळू बंदित्तवी नाम। गुरुलिंगगीता कोट्टई प्रल्हादन नाम।।३।। (पद क्र.४६)*** तर श्रीदासराममहाराज या श्रवणाबद्दल असे सांगतात, ***'नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। सार नारायण जप एक।'*** तर संत श्रीमुकुंदराज या महाकारणदेहाबद्दल असे सांगतात, ***'जे जे भासे जाणवियें। ते ते जरी निरसुनी जाये। तरी जाणीवची आहे। तेचि पाहे तियेते।।', 'नेणीव जरी जाणितली। तरी ते नेणीव मिथ्या झाली। तेथील जाणीव उरली। आत्मप्रभा।।', 'ते नेणीव फिटे गुरुखुणा। जाणे आपण आपणा। बोलिजे या अनुसंधाना। महाकारण ऐसे।।', 'फिटूनिया नेणणे। आप आपणा जाणणे। तिन्ही देहाचेनि साक्षीपणे। महाकारण देह।।'***

हा नामरूपातीत असणारा, आदिअंत नसणारा अनंत, श्वसनाचे मंथनाने श्वसनातील त्रिगुण व पंचभूते हा असार भाग बाजूला होऊन, सार निर्गुण अनंत (हरी) हाताला येणारा आहे. जीव व शिव हे कल्पनेने हरीरूपाचे ठिकाणी (आत्मरूपाचे ठिकाणी) उठलेले तरंग असून या वायुलहरी वायुसागराचे ठिकाणी शांत झाल्या असता, हरीची प्राप्ती होणारी आहे. ***('जीव शिव ऐसे उठती तरंग। सिंधू तो अथांग दासरामी।', 'हा प्राण आटला वाऱ्यामाजी। संगम किती हा गोड। शांत हरीच्या नामी काया। सर्व मन हे जाय विलया। वायुलहरी वायुसागरी मिनली। जेणे हरीची जोड।'- श्रीदासराममहाराज)***

जेव्हा येण्याजाण्याची (श्वसनाची) क्रिया सूक्ष्म होते तेव्हा वय कुंठीत होऊन वैकुंठ येथेच प्राप्त होते. वैकुंठ हे नाव परमात्म्याचे आहे. विष्णूसहस्रनामात परमात्म्यालाच 'वैकुंठ' म्हटले आहे. वैकुंठ: पुरुष: प्राण: प्राणद: प्रणव: पृथु: हे विष्णूसहस्रनाम हेच स्पष्ट करते आहे. 'सोहं तेही अस्तवले' या अवस्थेत, वैकुंठ अवस्थेत दृश्य नाहीसे होऊन द्रष्टा हाच दृश्य होतो व सर्वत्र हरीच भरून राहिल्याची अनुभूती येते. ***('आम्हा येणे जाणे नाही। आम्हा येथेची वैकुंठ पाही।।'- निजानंद, 'सोहं तेही अस्तवले। जेथ सांगतेचि सांगणे जाले। द्रष्टत्वेसी गेले। दृश्य जेथ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# त्रिगुण असार

***त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ।।१।।***
***सगुण निर्गुण गुणाचे अगुण। हरिवीण मन व्यर्थ जाय।।२।।***
***अव्यक्त निराकार नाही ज्या आकार। जेथोनी चराचर हरीसी भजे।।३।।***
***ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। अनंत जन्मोनी पुण्य होय।।४।।***

त्रिगुण हे असार असून निर्गुण हे सार आहे. हा सत्संगतीत प्राप्त होणारा आत्महित साधणारा जीवनाचे उठाउठीत स्पष्ट होणारा सारासार विचार म्हणजेच हरिपाठ आहे. आपल्या वायुरूप श्वसनात त्रिगुण व पंचमहाभूते असतात. श्रीसमर्थ सांगतात, ***'त्रिगुण आणि पंचभूते। हे वायोमध्ये मिश्रिते। अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।'*** असार त्रिगुण म्हणजेच संसार आहे. त्रिगुणरहित होणे म्हणजे असार संसारापासून बाजूला होणे होय. ***('संसार समस्त त्रिगुण। यामाजी मी अवघा निर्गुण। हे तुज कळवाया निजखुण। गुणनिरूपण म्या केले।।'- श्रीनाथमहाराज, 'फळकट हा संसार। येथ सार भगवंत।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाचे अभ्यासाने श्वसनातील त्रिगुण व पंचमहाभूतांचा निरास होणे म्हणजे (अस्तित्व) भाव शुद्ध होणे - चिद्‌गुण शुद्ध होणे - साधन बरवे होणे व निर्गुणी अनन्य होणे होय. साधन बरवे होणे म्हणजे मन कामक्रोधरहित शांत होणे होय. ***('असारा संसारा त्यजुनी। बरवे साधन करी।।'- श्रीसमर्थ, 'बरवे साधन सुखशांत मन। क्रोध नाही जाण तीळभरी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'दासरामी रामकृष्ण। जे का जाहले चिद्‌गुण।।', 'शुद्ध जो चिद्‌गुण जाणावे निर्गुण। जाले बहुगुण चंचळाने।।'- श्रीदासराममहाराज, 'शुद्ध ज्याचा भाव झाला। देव दुरी नाही त्याला।।'- संतवचन)*** त्रिगुणापासून निर्गुणापर्यंत जाताना त्रिगुण, गुण, अगुण, शून्य, सगुण, निर्गुण हे सहा टप्पे पार करावे लागतात, असे श्रीदासराममहाराज सांगत. साधनाने त्रिगुणात्मक वृत्ती (जाणीवा) नाहीशा होऊन ज्या जाणीवेतून (गुणातून) ह्या त्रिगुणात्मक जाणीवा निर्माण झाल्या ती जाणीव (गुण) निर्माण होणे म्हणजे गुण प्राप्त होणे. त्या शुद्ध जाणीवेवर-गुणावर प्रेम करणे हा साधनाचा क्रम आचरून ही जाणीवही सूक्ष्म होणे म्हणजे अगुण. त्यापलिकडे कोणतीही जाणीव नाही याची जाणीव असणे. (देहाचा, बाह्यमनाचा, प्राणाचा लय झाल्यावर) म्हणजे शून्याची जाणीव असणे, ज्ञान असणे होय. या शून्यावस्थेत साधकाला नाद, बिंदू, कला, ज्योती हे सगुण ब्रह्माचे अनुभव सर्वसाक्षी मनाला प्राप्त होतात. ***('शून्य मेहेलमे दिप बिराजे। बाजे अनुहात ढोल।।'- श्रीकबीरसाहेब, 'शून्याचा हा खेळ विश्वाचा पसारा। अनुभव सारा शून्यामाजी।।'- श्रीदासराममहाराज)*** पुढे तारकस्वरूपाच्या अनुभवाने सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन, ज्ञानाचे विज्ञान होऊन आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो. सगुणाचे आधारे निधिरे निर्गुण पावते. ***('गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहीत।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।', 'जेथे ज्ञानचि होते विज्ञान। जेथे मनचि होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ)*** मन हरीला अर्पण झाल्यावर चराचराचे ठिकाणी राहणारा न बदलणारा मूळस्वभाव हेच अव्यक्त निराकार आत्म्याचे भजन आहे. ध्यानामनाचा रामकृष्ण (जीवनाची गती) हाच विषय झाला तर अमन होऊन अनंताच्या साक्षात्काराने अनंत पुण्य प्राप्त होणार आहे. ज्या सारासार विचाराच्या योगे हा साक्षात्कार होतो, तोच हरिपाठ होय.

**

# भावेवीण भक्ती

***भावेवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती। बळेवीण शक्ती बोलो नये।।१।।***
***कैसेनी दैवत प्रसन्न त्वरीत। उगा राहे निवांत शिणसी वाया।।२।।***
***सायास करिसी प्रपंच दिननिशी। हरिसी न भजसी कवण्या गुणे।।३।।***
***ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे।।४।।***

ज्या भावाने आपले अस्तित्वाची जाणीव होते तो अस्तित्वभाव - श्वसन - रामकृष्णवाचा किंवा इडा पिंगला या गती - चिद्‌गुण - त्यातील त्रिगुणाचा निरास होऊन म्हणजे असार संसाराचा त्याग होऊन व पंचमहाभूतांचा निरास होऊन म्हणजे चत्वार देहाचा निरास होऊन संदेहरहित होण्यासाठी - शुद्ध होण्यासाठी व विशेष श्वास-विश्वास प्राप्त होऊन देव आपलासा होण्यासाठी जे काही करावे लागते, त्याला भक्ती म्हणतात. हा भाव शुद्ध होण्यासाठी काय करावे लागते हो? दृश्याकडे असणारे आमचे लक्ष जे चैतन्य नळकांड्यातून आत बाहेर होते आहे, तिकडे द्यावे लागते. आपले लक्ष बदलले की हे लक्ष (ध्येय) साध्य होणारे आहे. हे लक्ष बदलणे हीच भक्ती. संत शिवराममहाराज सांगतात, ***'विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।।'.*** अर्थात ही भक्ती आपल्या भावाशी (अस्तित्वभावाशी) निगडित आहे. ती 'भावेवीण' असूच शकत नाही. आपल्या अस्तित्वावर, चैतन्याच्या वाऱ्यावर प्रेम करणे म्हणजे भक्ती. ***(वारियाची मौज किती न्यारी रे। वाऱ्यावरी माझी बहु प्रिती रे।।'- श्रीदासराममहाराज)*** या भक्तीने भाव शुद्ध होऊन - चिद्‌गुण शुद्ध होऊन तो साधक निर्गुण परब्रह्मस्वरूप होतो. विभक्त असणारा भक्त होतो. परब्रह्मदर्शनाने परब्रह्म होऊन त्याला सलोकता, समीपता, सरुपता, सायुज्यता या चारी मुक्ती प्राप्त होतात. अर्थात भक्तीशिवाय मुक्ती प्राप्त होत नाहीत. ज्या चैतन्यातून हे सारे उगम पावले, त्या विश्वाच्या आनंदरूप मुळाशी-उगमाशी देहातीत वस्तूशी तादात्म्य होणे हा प्रवाहाच्या उलटा प्रवास आहे. त्याकरिता बळाची आवश्यकता आहे. हे बळ असल्याशिवाय शक्तीचा अनुभव येत नाही. समर्थ सांगतात, ***'येक बळाचे निवडले। पोहतचि उगमा गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।।'*** कोणते बळ आहे हो? ही शक्ती अनुभवण्यासाठी भावबळ हवे. आत्मबळ हवे. साधनाभ्यासाने भाव शुद्ध होऊन - धरला जाऊन जर प्रबळ झाला तर ही शक्ती आकलन होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'भावबळे आकळे येरवी नाकळे। करतळी आवळे तैसा हरी।।'***

ही शक्ती - हे दैवत - प्रसन्न होण्यासाठी निर्वात होऊन निवांत राहण्याचा अभ्यास केला पाहिजे. निवांत बसून उगेपणात येऊन जे जे होईल, ते ते पाहावे या भूमिकेने हा निवांतपणा प्राप्त होणारा आहे. हा निवांतपणा गुरूकृपेने प्राप्त होणारा आहे. ***('येकांती उगेच बैसावे। तेथे हे समजोन पाहावे। अखंड घ्यावे सांडावे। प्रभंजनासी।।' - समर्थ, 'तुका म्हणे उगे रहावे। जे जे होईल ते ते पाहावे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'या कारणे निवृत्तीनाथू। जववरी मस्तकी न ठेवी हातू। तववरी केवी होईल निवांतू। बोले ज्ञानदेवो निवृत्तीचा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हा निवांतपणा प्राप्त होण्यासाठी दिननिशी होणारे षड्‌विकारात्मक आयास थांबले पाहिजेत. विकाराने गतीत होणारा बदल थांबला पाहिजे. तरच परमेश्वराचे समाधान देणारे भजन साधणार आहे. कामक्रोध यांना 'भजनमार्गीचे मांग' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज संबोधतात. *ते सांगतात,* ***'हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गीचे मांग। मारक जे।।'*** 'हेतुवीण सत्क्रिया' आचरणे या हरीजपाने गतीतील बदल हा प्रपंच नाहीसा होणारा आहे.

**

# योग याग विधी

***योग याग विधी येणे नोहे सिद्धी। वायाची उपाधी दंभदर्म।।१।।***
***भावेवीण देव न कळे नि:संदेह। गुरुवीण अनुभव कैसा कळे।।२।।***
***तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त। गुजेवीण हित कोण सांगे।।३।।***
***ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात। साधूचे संगती तरणोपाय।।४।।***

देहाच्या जाणीवेत, देहाला कर्ता मानून जो योग याग आपण करतो त्या योगयागाने, विधीविधानाने आपण वस्तुपाशी सिद्ध होत नाही, आपण वस्तूरूप होत नाही. वियोगाच्या योगाने सदा दु:खभोगच भोगावे लागतात. योगमार्गाने अपेक्षित पवनसिद्धी प्राप्त न होता भलत्याच सिद्धी त्याला प्राप्त होतात व त्यातच तो गुरफटतो. त्यायोगे प्रसिद्धी मात्र त्याचे मागे लागते. उपाधी दूर व्हायची राहिली बाजूला, पण नावाच्या मागे व पुढे उपाधी मात्र लागते. त्यायोगे अहंकार वाढतो, देहबुद्धी वाढते व खऱ्या परमार्थापासून तो दूरच राहतो. आपण वेगळे काहीही नसताना आपण काही असल्याचा आभास निर्माण होतो व दंभाचार वाढतो. देहाच्या जाणीवेने देहातीत वस्तूरूप होणे हे स्वहित त्याला साधत नाही. देवाची प्राप्ती न झाल्याने देव आहे का नाही हा संशय, संभ्रम तसाच राहतो.

खरे पाहिले तर आपले अस्तित्व हाच देव आहे. आपले अस्तित्व हे आपल्याला मान्य असल्याने देव आहे हे नि:संदेहपणे आपण मान्य करायला हवे. आपले अस्तित्वाचा अनुभव - आत्मदेवाचा अनुभव मात्र गुरुकृपेशिवाय प्राप्त होत नाही. आपण जिवंत आहोत हे ज्या श्वासावरून, अस्तित्वभावाने समजते, ते श्वास गुरुकृपेने साधनीभूत करून आत्मदेवाचे दर्शन होणारे आहे. हे देवाचे अस्तित्व जाणवण्यासाठी आपण आपले खोटे अस्तित्व शून्य करावे लागते. खोटे अस्तित्व शून्य करणे म्हणजे 'देह म्हणजे मी' हा अहंकार नाहीसा करणे होय. हा खोटा मी नामशेष झाला की खरा 'मी' प्रगट होतो. हा खरा मी प्रगट होणे म्हणजेच देवाची जाणीव होणे होय. ***('मीपण सांडोनी ओळखी मीपण। तरी देवपण प्राप्त होय।।' - श्रीदासराममहाराज)*** 'मी आहे तर देव नाही, मी नाही तर देव आहे' हा श्रीदासरामहाराजांचा विचार येथे लक्षात घ्यावा. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'माझे असतपण लोपो। नावरूप हारपो। मज झणि वासिपो। भूतजात।।'*** आपला अहंकार जाणे, अभिमान जाणे म्हणजे खरा योग किंवा खरे तप आहे. ***'योगतप याची नावे। गलीत व्हावे अभिमान।।'*** हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन स्पष्ट आहे. अहंकार देवापायी अर्पण होऊन साक्षात्काराची प्राप्ती होणे या तपाने दैवत प्रसन्न होते ही हिताची गोष्ट अंत:करणात प्रेम असल्याशिवाय कोण कोणाला सांगेल? देहाहंकार जाऊन देहातीत होण्यात आपले हित आहे हे संत सद्गुरूच सांगतात. ***('हित आहे देहातीत। म्हणोनि निरोपिती संत। देहबुद्धीने अनहित। होचि लागे।।'- समर्थ)*** देहातीत होऊन डोळ्यातील दृश्य नाहीसे होणे, दृश्याची आशा नाहीशी होणे हा दृष्टांत साधूंचे संगतीत, साधुबोधाने प्राप्त होणे हाच तरणोपाय आहे. नामानेच ही पवनसिद्धी प्राप्त होणारी आहे. अर्थात हे नाम साधनाभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधला तरच प्राप्त होणारे आहे. समर्थ सांगतात, ***'नाम तुझे अमृतसंजीवनी। सकलमंगलनिधी सर्वकार्यसिद्धी तरणोपाय जनी।। आगम निगम संतसमागम। वेधले देव मुनी। दास म्हणे करुणाघन पावन। तारक त्रिभुवनी।।'*** तर श्रीदासराममहाराज सांगतात, ***'प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्वे तत्व सारिता पवनसिद्धी।'***

**

# श्रीदासराममहाराज पुण्यतिथी

श्रीदासराममहाराज हे इच्छामरणी संत होते. इच्छेप्रमाणे मरण म्हणजे इच्छामरणी नव्हे, तर ज्यांची इच्छा मेली आहे ते इच्छामरणी होय. ज्यांचे ठिकाणी इच्छा; वासना नसते त्यांना जन्मही असत नाही. अर्थात मरणही असत नाही. श्रीनामदेवमहाराज हे सत्य असे सांगतात ***'आशा नाही ज्याला। देव का मारी त्याला।।'*** तर श्रीसमर्थ हे सत्य असे सांगतात, ***'जो जन्मला नाही ठाईचा। त्यास मृत्यू येईल कैचा। विवेकबळे जन्ममृत्यूचा। घोट भरिला जेणे।।'*** परमार्थात वासनारहित पुरुषाला ज्ञानी म्हणतात. परमज्ञानी पुरुषाचे वर्णन उपनिषद असे करते, ***'यश्च श्रोत्रियोऽवृजितोऽकाम-हृतः'*** तर श्रीसमर्थ ज्ञानाचे लक्षण असे सांगतात, ***'बीज अग्नीने भाजले। त्याचे वाढणे खुंटले। ज्ञात्यास तैसे जाले। वासनाबीज।।'*** वासनेमुळे जन्माला आलेले सगळेच मरतात पण जे स्वरूपाकार झालेले असतात असे थोर निष्काम आत्मज्ञानी साधुसंत मरणाला मारून अमर होतात. श्रीसमर्थ सांगतात, ***'असो ऐसे सकळही गेले। परंतु येकचि राहिले। जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी।।'.*** संतमहात्मे देहाचा कंटाळा आला की देह ठेवतात व आपण जगज्ञीवनी निरंतर राहतात. देहरूपाने सर्वसाधारणतः ते दिसत नाहीत, पण निरंतर असणाऱ्या जगज्जीवनी ते साधकांना भेटतात. श्रीसमर्थ सांगतात, ***'माझी काया आणिक वाणी। गेली म्हणाल अंतःकरणी।। परी मी आहे जगज्ञीवनी। निरंतर।।'*** श्रीसमर्थांची भेट आपणास कधी होऊ शकते हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'आत्माराम दासबोध। माझे स्वरूप स्वतः सिद्ध।। असता न करावा हो खेद। भक्तजनी।। नका करू खटपट। पाहा माझा ग्रंथ नीट।। जेणे सायोज्यतेची वाट। गवसेल की।।'*** समर्थकृपेची वचने तो हा दासबोध समजला तर समर्थांचे समर्थ स्वतःसिद्धस्वरूप आत्माराम भेटणार अर्थात सायोज्यतेची वाट सापडणार आहे.

ज्या कीर्तनसेवेची खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली होती ती कीर्तनसेवा श्रीदासराममहाराजांनी अखेरपर्यंत साधली. अखेरच्या दिवशी त्यांचे शरीर आत्यंतिक थकले असल्याने त्यांना सरळ उभे राहणे किंवा दोन पावले चालणे प्रयत्नाने शक्य होईना. त्यांना पुन्हा कॉटवर निजवण्यात आले. त्यांचेच कीर्तन त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव ती.आण्णांनी पडवीत बसून वाचून दाखविले. त्यांचेच कीर्तनाची उजळणी ती.आण्णा करीत आहेत, हे त्यांनी पाहिले, ऐकले. कीर्तनावीण आयुष्य त्यांना मान्य नव्हते, म्हणून ही अखंड कीर्तनाची परंपरा ती.आण्णांकडे सोपवून नित्यकीर्तनाचे अनुसंधानात नित्यकीर्तनानंतर ते नित्यकीर्तनानंद कीर्तनरूप झाले. श्वासोच्छ्वासी नामोच्चरणी त्यांनी स्वच्छंद प्रयाण केले होते. ***'कीर्तनासी सोडू नये। प्रपंचासी धरू नये।।'*** हा श्रीमामामहाराजांचा उपदेश त्यांनी कडेपर्यंत आचरणात आणला होता. ज्या कीर्तनसेवेची खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली होती, त्या कीर्तनसेवेतच त्यांनी अखेरचा श्वास घेतला होता. केवढे हे कीर्तनप्रेम! ***'आयुष्य करी उणे। परी मज आवडो कीर्तन।।'*** हे त्यांनीच म्हणावे. कीर्तन साधन आचरून त्यांचे अंग हरीरूप झाले होते. म्हणून देह ठेवल्यावरसुद्धा त्यांचे चेहऱ्यावर विलक्षण तेज विलसत होते. कपाळावर लावलेल्या श्रीहालसिद्धनाथाचे भंडाऱ्याने, कुंकवाच्या टिळ्याने ते तेज जास्तच खुलून दिसत होते. बर्फावर ठेवूनदेखील पुढे कित्येक तास त्यांचे अंग गरम होते. त्यांचे कपाळाला सारखा घाम धरत होता. घाम टिपला तरी पुन्हा घाम येत असे. हे केवढे आश्चर्य. सर्वश्री सुनिल केळकर, मधुकर काटकर, सतेज केळकर, अमित कदम, नंदकुमार कुलकर्णी आदी लोकांनी ही गोष्ट जवळून अनुभवली आहे. देहाशी तादात्म्य असणारी आमच्यासारखी माणसे देहाच्या नाशाबरोबर नाहीशी होतात. पण देहात असतानाच देहातीत वस्तूरूप झालेले आत्मज्ञानी (स्वरूपज्ञानी) महात्मे देहाच्या नाशाबरोबर नाहीसे होत नाहीत. ते अजरामर झालेले असतात. ***'मरण माझे मरून गेले। मग मी झालो अमर।'*** या श्रीतुकाराममहाराजांच्या शब्दात अशा महात्म्यांचे वर्णन करता येते.

**

# साधुबोध झाला

***साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभव।।१।।***
***कापुराची वाती उजळली ज्योती। ठायीच समाप्ती झाली जैसी।।२।।***
***मोक्षरेखे आला भाग्ये विनटला। साधुचा अंकिला हरिभक्त।।३।।***
***ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी। हरी दिसे जनी वनी आत्मतत्वी।।४।।***

ज्याचे अंतर्यामी चराचराचे मूळ निर्मळ शुद्ध स्वरूपाचे जागते ज्ञान आहे अशा ज्ञानमूर्ती, तपोमूर्ती साधूंचा; ज्याचे चित्त शुद्ध आहे अशा साधकाला जर बोध झाला तर त्या साधकाला 'नुरोनिया ठेला' अशी अवस्था प्राप्त होते व त्याचा अनुभव ठायीच मुरून जातो. अनुभव ठायीच मुरून जातो याचा अर्थ अनुभव घ्यायला वेगळा कुणी उरतच नाही. संपूर्ण अद्वैत साधते. ***('जो जनांमाध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू।।', 'जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।', 'जेथे नाही दृश्यभान। जेथे जाणीव हे अज्ञान। विमळ शुद्धस्वरूपज्ञान। यासि बोलिजे।।'- श्रीसमर्थ, 'तैसे चित्त शुद्ध नाही। तरी बोध करील कायी।।'- श्रीतुकाराममहाराज).*** साधू आपणालाही बोध करतात पण आपणाला अशी अवस्था प्राप्त होत नाही. कारण आपले चित्त शुद्ध नसल्याने आपल्यावर बोधाचा परिणाम होत नाही. चार देहाचे ठोकळ्यावर जोवर आपण उभे आहोत तोवर चैतन्याचा बोध होत नाही. आळस, निद्रा बाजूला ठेवून; चित्त शुद्ध होण्यासाठी व तो बोध प्रगट होण्यासाठी निवांत बसून साधूंनी सांगितलेले साधन आपण साधावे लागते. ***('जववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तवची यया साधना। भजावे लागे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त। तया सुखा अंतपार नाही।।'- श्रीतुकाराममहाराज, 'निद्रा आळस दुश्चितपण। हेचि मूर्खाचे लक्षण। येणेकरिता निरोपण। उमजेचिना।।'- समर्थ)*** साधनाने सोहंभाव प्रगट होऊन देहभाव नाहीसा होतो. उपाधीचा निरास होऊन साक्षात वस्तूशी तद्रूप झाल्यावर 'बोधी बोधिले बोधिता' ही त्रिपुटी नाहीशी होते. अनुभव घेणारा कोणी वेगळा रहातच नाही. मग तो अनुभव काय सांगणार? मी कोणी एक आहे याची जाणीवच याठिकाणी असत नाही. देहीच विदेही अवस्था त्यांना प्राप्त झालेली असते. ***('तया पाडे देही। जया मी आहे हे से चि नाही। निरहंकारता पाही। तया नाव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'असो ऐसा कोठे आठवची नाही। देहीच विदेही भोगू दशा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'नव्हताची ऐसा होऊनिया ठेलो। तुझा भक्त झालो एकाएकी।।'- श्रीदासराममहाराज, 'तरी जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाने वायुचा गंधही नाही अशी अवस्था प्राप्त झाली असता चैतन्याचा सुगंध प्रगट होतो. चार देहामध्ये असणारे जीवनाचे वायुरूप सूत्र सूक्ष्मतर सूक्ष्मतम झाले असता हा ज्योतीचा साक्षात्कार होतो व मन संपूर्णपणे मुरते. त्याच्या दृष्टीतील दृश्य दूर होते. दृश्याची रेषा अस्पष्ट होऊन तो हरीभक्त मोक्षाच्या रेषेवर येतो. त्याचा दृश्यभ्रम दूर होऊन तो निरंजन स्वरूप, विमलब्रह्म होतो. याला म्हणतात साधूंच्या अंकित होणे. ***('निश्चळ ते परब्रह्म। जेथे नाही दृश्यभ्रम। विमल ब्रह्म ते निर्भ्रम। जैसे तैसे।।', 'अष्टदेह थानमान। जाणोन जालिया निरसन। पुढे उरे निरंजन। विमळब्रह्म।।'- श्रीसमर्थ, 'जो साधुचा अंकित जीव झाला। त्याचा असे भार निरंजनाला। नारायणाचा भ्रम दूर केला। विसरू कसा मी गुरुपादुकाला।।'- श्रीनारायणमहाराज जालवणकर)*** अशा सज्जनांच्या संगतीची आवड निर्माण झाली तर जनात वनात सर्वत्र हरीच दिसायला लागतो. म्हणजे सत् दाखविणाऱ्या समगतीची आवड जर निर्माण झाली तर 'एक हरी आत्मा' सर्वत्र प्रत्ययाला येतो.



**

# पर्वताप्रमाणे पातक

***पर्वताप्रमाणे पातक करणे। वज्रलेप होणे अभक्तासी।।१।।***
***नाही ज्यासी भक्ती ते पतित अभक्त। हरीसी न भजत दैवहत।।२।।***
***अनंत वाचाळ बरळती बरळ। त्या कैसेनी दयाळ पावे हरी।।३।।***
***ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान। सर्वाघरी पूर्ण एक नादे।।४।।***

सर्व भूतसृष्टी आत्मवत न पाहता परवत पाहणे, आत्म्याशी परक्याप्रमाणे वागणे हेच मोठे पर्वतप्राय पाप आहे. 'आत्मवत् सर्व भूतानी य: पश्यति स: पश्यति' हे संस्कृत वचन येथे लक्षात घ्यावे. आत्म्याच्या पुण्यक्षेत्रात होणारे पाप हे वज्रलेपच ठरते. ***('अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति। पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति।'- संस्कृत वचन)*** सर्व भूतसृष्टी भगवद्रूप न पाहता कल्पनेने पंचमहाभूतांचे रूपात जो पाहतो, त्याला भक्तीयोग कसा साधणार? नमन ही भक्तीच साधली नाही तर तो भक्त कसा होणार? तो अभक्तच राहणार. मग मी भक्त आहे ही कल्पनाच राहणार. त्याला निर्विकल्प अवस्थेत साधणारे भजन, नामस्मरण साधणार नाही. श्रीसमर्थ सांगतात, ***'विभक्तपणे नसावे। तरीच भक्त म्हणवावे। नाहीतरी व्यर्थचि शिणावे। खटाटोपे।।', 'मी भक्त ऐसे म्हणावे। आणि विभक्तपणेचि भजावे। हे आवघेचि जाणावे। विलक्षण।।'*** देव होऊनच देवाचे भजन साधता येते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'म्हणोनि माझिया भजना। उचितु तोचि अर्जुना। गगन जैसे आलिंगना। गगनाचिया।।'*** हा भक्तीचा व्यवहार कसा हवा हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'देव देऊळ परिवारू। की जे कोरूनी डोंगरु। ऐसा भक्तीचा व्यवहारु। का न व्हावा।।'*** भक्ती करायला द्वैत हवे असे आपण गृहीत धरतो. पण ही अद्वैतभक्ती आहे. आपली आपण भक्ती करायची आहे. देव म्हणजे चैतन्याचे वारे - आपला वायुरूप प्राण - आहे. त्यावर अनन्य प्रेम करणे हीच ती अद्वैतभक्ती आहे. ही भक्ती कशी करायची हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'देव म्हणिजे आपुला प्राण। प्राणासी न करावे निर्वाण। परम प्रीतीचे लक्षण। ते हे ऐसे असे।।'*** येथे दोन काहीच नाही आहे. आमच्या डोक्यात जेवढे दोन आहे, द्वैत आहे तेवढेच. श्रीनाथमहाराज या भक्तीचे वर्णन असे करतात, ***'एवं आपली आपण भक्ती। करीतसे अनन्य प्रीती। हेचि निरुपण वेदांती। अद्वैत भक्ती या नाव।।'*** अहो वाराच देव, वाराच भक्त, उपासना वायुरूप, मंत्र वायुरूप, अनुभूती वाऱ्याचीच. ***('वाराची देव आमुचा। वारा हा भक्त तयाचा।।'- श्रीदासराममहाराज, 'पूर्ण कृपेने नाममंत्र तो कर्णी फुंकीयेला।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** आम्ही जी द्वैतातील उपासना-भक्ती करतो, त्याबद्दल श्रीनाथमहाराज काय म्हणतात ते पहा, ***'देव भक्त दोनी भिन्न। ऐसे जे का उपासन। ते ज्ञानाचे मुख्य अज्ञानपण। सूक्ष्म भ्रम पूर्ण अतर्क्यत्वे।।'.*** म्हणून हरीची अशी अद्वैतभक्ती न करणारे सारे अभक्तच. अभक्त अवस्थेत जे आम्ही बोलतो ती सारी बरळच. हे बोलणे सारे द्वैतातील असते. जे सत्य आहे ते या वाचेने बोलता येत नाही. हे जगच जर खोटे आहे, फसवे आहे, तर या जगाचे वर्णन सारे खोटेच की. आज जे खरे वाटते ते उद्या खोटे ठरणारे असते. मग ते बोलणे सत्य कसे? सर्वाघटी सारखा असणारा आत्मा हा एकमेव सत्य आहे. न बदलणारा आहे. त्याचा अनुभव घेणे, अभ्यास करणे हाच खरा धर्म आहे. ***('येनू इल्लदानू याक निन्ननीनू। सत्यचिदानंदनू आत्मारामा।।'- श्रीगुरुलिंगगीता, 'चालता बोलता सत्य अभ्यासावे। धर्म त्या म्हणावे निरंतर।।'- संत तुकडोजीमहाराज)***

**

# संतांचे संगती

***संतांचे संगती मनोमार्गे गति। आकळावा श्रीपती येणे पंथे।।१।।***
***रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप।।२।।***
***एकतत्वी नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे।।३।।***
***नामामृत गोडी वैष्णवा लाधली। योगिया साधली जीवनकळा।।४।।***
***सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला। उद्धवा लाधला कृष्णदाता।।५।।***
***ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे।।६।।***

जो निर्विकल्पी, कल्पनातीत आहे, ज्याने भगवंताला जाणले आहे, जो आत्मज्ञानाने अद्वैत आत्मरूप झाला आहे, जो नित्य आत्महित साधतो, ज्यांचा हेत फक्त विठ्ठल हाच आहे, अशा वासनारहित विवेकी संतांचे संगतीमध्ये मनोमार्गाचे आकलन होऊन श्रीपती परमात्मा जाणला जातो. येथे संतांची संगती होणे म्हणजे संतांची जी समत्व दाखविणारी गती आहे ती आपणास प्राप्त होणे होय. ***('निर्विकल्पी कल्पनातीत। तोचि वोळखावा संत। येर अवघेचि असंत। भ्रमरूप।।', 'जो जाणेल भगवंत। तया नाव बोलिजे संत। जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी।।'- समर्थ, 'आत्मज्ञाने चोखडी। संत जे माझी रूपडी। तेथ दृष्टी पडो आवडी। कामिनी जैसी।।', 'चंद्र तेथे चंद्रिका। शंभू तेथे अंबिका। संत तेथे विवेका। असणे की जी।।'' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'एका जनार्दनी संत। नित्य साधी आत्महित।।'- श्रीनाथमहाराज, 'तेचि संत तेचि संत। ज्याचा हेत विठ्ठली।।'- श्रीतुकाराममहाराज, 'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।।'- श्रीदासराममहाराज, 'संगती म्हणजे समगती जाणे। दाविताती खुणे संतराय।।'- श्रीमामामहाराज केळकर)*** 'झोपताना ज्या मार्गाने मन झुकांडी देऊन जाते व मगच झोप लागते, तोच तो मार्ग आहे परमप्राप्तीचा' असे श्रीदासराममहाराज सांगत. झोपताना मन श्वासात लय पावते व मग झोप लागते असे छांदोग्यउपनिषद सांगते. तो श्वास म्हणजेच रामकृष्णवाचा-जीवाचा अस्तित्वभाव आहे. या श्वासाचे ठिकाणी जाणीवेत देहाचा, मनाचा लय साधला असता राहणारी चैतन्याची जाणीव - आत्मभाव हा शिवाचा रामजप आहे. तो मनोलयाने वाचेपैल गेल्याने प्राप्त होणारा आहे. हेच एकाची प्रचिती आणून देणारे एकतत्वी हरीनाम आहे. हे निर्विकल्प नाम साधले असता द्वैताचे बंधन नाहीसे होऊन अद्वैत साधणारे आहे. या नामामृताची गोडी वैष्णवांनी चाखली असून योगी या नामामृताला 'जीवनकळा' असे संबोधतात. उर्ध्वगामी जीवनात श्रुत होणारा हा नामाचा उच्चार प्रल्हादाचे ठिकाणी सर्वांगी बिंबला होता. हे नाम सर्वांगी बिंबल्याची प्रचिती आमचे श्रीमामामहाराजांना आली होती. ते म्हणतात, ***'नाम सर्वांगी बिंबले। दास म्हणे परिक्षिले।।'*** हे नाम-चैतन्य-सर्वांगी बिंबल्याची प्रचिती कधी येते हे श्रीनानामहाराज बर्वे असे सांगतात, ***'प्राणापान ही जेथे मिनले। सर्वांगी चैतन्य कोंदले।।'*** जीवालगत असणाऱ्या देहाचा, मनाचा व शेवटी प्राणाचा लय साधला असता नामयोगे उध्दवाला कृष्णाचे सख्यत्व लाभले. श्रीसमर्थ सांगतात, ***'देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जीवलगासी तुटी। सर्व अर्पावे शेवटी। प्राण तोही वेचावा।।'.*** कृष्ण सखा झाल्यावर मग मिळवायचे काय असते? श्रीमामामहाराज सांगतात, ***'गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी। आणिका प्रकारी काय काज।।'.*** अशा महात्म्यावर विश्वकृपा करते हे सांगणे नकोच. ***'ज्याचा सखा हरी। त्यावरी विश्व कृपा करी।।'.*** हे संतवचन स्पष्ट आहे. संसाराला पाणी दिल्यावर प्राप्त होणारे हे नाम जाणणारे विरळाच. *श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,* ***'हरीबुद्धी जपे तो नर दुर्लभ। वाचेसे सुलभ रामकृष्ण।।'*** श्रीतुकाराममहाराज या नाम जाणलेल्यांची यादीच देतात. ते म्हणतात, ***'नाम जाणे अजामेळ। नाम जाणे प्रल्हादबाळ। नाम जाणे तुकयावाणी। दिले संसाराला पाणी।।'***

**

# विष्णूवीण जप

***विष्णूवीण जप व्यर्थ त्याचे ज्ञान। रामकृष्णी मन नाही ज्याचे।।१।।***
***उपजोनी करंटा नेणे अद्वयवाटा। रामकृष्णी पैठा कैसेनी होय।।२।।***
***द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान। त्या कैचे कीर्तन घडे नामी।।३।।***
***ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान। नामपाठ मौन प्रपंचाचे।।४।।***

'रामकृष्ण' या जीवनाच्या गतीमध्ये ज्यांचे मन जडले नाही, ज्यांचे मन स: अहं अहं स: या महान गुरुपदांचे ठिकाणी जडले नाही, ज्यांचे मन दृश्याच्या ठिकाणी जडले आहे, अर्थात मनोवृत्तीचा निरोध ज्यांना साधला नाही, त्यांना चैतन्याची जाणीव - विष्णूची जाणीव - होत नाही. ('मन आहे तोवर चैतन्याची जाणीव नाही' हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे.) त्यांचा जप विष्णूवीणच ठरतो. त्यांना नेणीवेची जाणीव (अज्ञानाचे ज्ञान) न होताना व्यर्थ विपरीत ज्ञानच होत राहते. अर्थात संसाराच्या गोष्टी सुटत नाहीत. श्रीमुकुंदराज सांगतात, ***'जव अज्ञान न फिटे। तव संसार नि:शेष न तुटे। विपरीत ज्ञानाचा कोंभू फुटे। माघौता म्हणौनी।।'*** तर ज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'*** आत्म्याला स्थूल व सूक्ष्म अशा दोन विपरीतज्ञान मूलक देहांचे जे बंधन आहे त्याला मूळकारण अज्ञानमूलक कारणदेह हेच आहे. या अज्ञानाचे ज्ञान झाल्याशिवाय, आत्म्याचे बंधन नाहीसे कसे होणार? संत मुकुंदराज सांगतात, ***'आत्मेयासि देह द्वयेबंधन। तयासि अज्ञान मूळकारण। म्हणौनि अज्ञाननिवृत्तीविण। मोक्षू कैचा।।', 'इयापरी लिंगदेह निराशु। जालया चुके गर्भवासु। आत्मा भेटे स्वयंप्रकाशु। म्हणे मुकुंदराजु।।'*** अज्ञानाचे ज्ञान झाले तर विपरीतज्ञान नाहीसे होऊन संसारातून तो वेगळा होतो. त्याला मोक्षप्राप्ती होते. श्रीसमर्थ सांगतात, ***'येचि जन्मे येचि काळे। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।'*** तेच जर अज्ञानाचे ज्ञान न होता विपरीत ज्ञान होत राहिले तर 'जन्ममरण हा संसार' सुटत नाही. त्याचे द्वैतातील हवेपण संपत नाही व अद्वैताची वाट त्याला सापडत नाही. मग तो रामकृष्ण या गतीवर आरूढ कसा होणार? हा इथे प्रश्न आहे. जोवर 'जन्ममरण हा संसार' सुटत नाही, तोवर आत्मज्ञान होत नाही. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।'*** गुरुकृपा झाली तरच द्वैताची झाडणी होऊन - द्वैत नाहीसे होऊन अद्वैताचे ज्ञान होणार. ***'करुनी तत्वझाडा रे। सद्गुरुवचन जोडा रे।। दासाचे हे वाक्य मानुनी। स्वरूपी लीन हो वेढा रे।।'*** हे संतवचन येथे लक्षात घ्यावे. डोळ्यातील दृश्य गेल्याशिवाय तत्वझाडा होत नाही, द्वैत जात नाही, अद्वैताचे ज्ञान होत नाही. 'वस्तू'चे ज्ञान न झाल्याने, मी तू पणा न संपल्याने 'नामी' अवस्थेत साधणारे नामी कीर्तन त्याला साधत नाही. श्रीसमर्थ सांगतात, ***'दृश्य पदार्थची वोसरे। तत्वे तत्व तेव्हा सरे। मी तू पण कैचे उरे। तत्वता वस्तू।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आकारु जेथ सरे। जीवत्व जेथ विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय जे।।'*** निर्विकल्प नामाने षड्विकारात्मक सायास दूर होऊन प्रपंचाचे मौन त्याला साधेल व परब्रह्माचा अनुभव त्याला आल्यावाचून राहणार नाही. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'निर्विकल्प नाम। तेचि जाणा परब्रह्म।।'***

**

# त्रिवेणी संगमी

***त्रिवेणी संगमी नाना तीर्थे भ्रमी। चित्त नाही नामी तरी ते व्यर्थ।।१।।***
***नामासी विन्मुख तो नर पापिया। हरीवीण धावया न पवे कोणी।।२।।***
***पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक। नामे तिही लोक उद्धरती।।३।।***
***ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचे। परंपरा त्याचे कूळ शुद्ध।।४।।***

त्रिवेणी संगमात स्नान केले, अनेक प्रसिद्ध तीर्थक्षेत्री जाऊन तीर्थस्नान केले पण विषयचिंतन थांबून नामचिंतन घडले नाही तर केलेली तीर्थयात्रा फुकट आहे. तेच जर चित्तात चैतन्य (नाम) भरून राहिले तर त्रिवेणी संगमात स्नान केल्याचे, अनेक तीर्थयात्रा केल्याचे पुण्य जागेला बसून प्राप्त होणारे आहे. आम्ही समजतो तसे नाम घेऊन मात्र हे पुण्य प्राप्त होत नाही. आम्ही वैखरीने नाम घेतो. तेव्हा आपले चित्त कोणते चिंतन करत असते? श्रीनाथमहाराज सांगतात, ***'नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।'.*** चित्त शुद्ध होऊन सर्वभूती भगवद्भाव अनुभवल्याने अहर्निशी नामचिंतन घडले तर त्रिवेणीसंगमी स्नान केल्याचे पुण्य प्राप्त होते. नाम घेताना चित्तात नामाशिवाय काहीही असता कामा नये. संतांनी सांगितलेले नाम एकवेळ साधण्यास हजारो जन्माची पुण्याई हवी. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'जयाचे वाचेपुढा भोजे। अखंड नाम नाचतसे माझे। की जे जन्मसहस्री वोळगिजे। एकवेळ यावया।।'*** मग आम्ही जे रोजचे काही हजारात नाम घेतो त्याला गुणिले हजार, इतक्या जन्माची पुण्याई आपली आहे असे आपल्याला तरी वाटते का? संतांनी सांगितलेले नाम हे आपल्या शरीरात त्रिवेणी संगमात प्राप्त होणारे आहे. हे नाम घेण्याचा त्यांचा नेम असतो. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'इडा पिंगलेचा त्रिवेणी संगम। तुका म्हणे नेम गुरुघरचा।।'*** तर श्रीमामामहाराज सांगतात, ***'इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।'*** संतांना अपेक्षित नाम जो घेतो तो पुण्यवान, तर ते नाम ज्यांना साधत नाही ते पापी. अहो आपल्या आत्मारामाचे चरणापाशी १०८ तीर्थे आहेत. जो या आत्मतीर्थात स्नान करतो त्याला इतर तीर्थात स्नान करण्याची गरज नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'निर्जिवा दगडाची काय करिसी सेवा। तो तूज निर्देवा देईल काय।। अष्टोत्तरशत तीर्थे जयाचे चरणी। तो तुज्या हृदयभुवनी आत्मारामू।।'*** तर कबीरसाहेब सांगतात, ***'कहत कबिरा आत्मतीर्थ नहावे। और तीर्थनका क्या काम जी।।'.*** वस्तुत: त्रिवेणी संगमावर राहणारा जीव गरज नसताना नाना तीर्थांचे भ्रमण करतो. भ्रमणाने भ्रांती निर्माण होते व चित्तात चैतन्य न भरताना चित्ताला विषय चिंतनाची गोडी लागते. परत जागेला त्रिवेणी संगमावर येण्यासाठी आपले भ्रमण थांबवून जागेला निवांत बसले पाहिजे. तर त्रिवेणीसंगमी स्नानाने चित्त शुद्ध होऊन चैतन्याचा बोध होणारा आहे. उर्ध्वगामी जीवनात प्राप्त होणाऱ्या या नामाने, प्राणाचा उलट साधून प्राप्त होणाऱ्या या नामाने पुराणप्रसिद्ध पापी वाल्मीक तरले व त्यांनी रामायण लिहिले. या उफराट्या नामाचे महत्त्व श्रीसमर्थ असे सांगतात, ***'उफराट्या नामासाठी। वाल्मीक तरला उठाउठी। भविष्य वदला शतकोटी। चरित्र रघुनाथाचे।।', 'उफराटे नाम म्हणता वाचे। पर्वत फुटले पापाचे। ध्वज उभारले पुण्याचे। ब्रह्माडावरुते।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज या नामाबद्दल असे सांगतात, ***'अजपा जपणे उलट प्राणाचा। तेथेही मनाचा निर्धारु असे।।'*** असे एक हरीचे एक नाम जो जाणतो त्याची परंपरा, कूळ सारे उद्धरून जाते.

**

# हरी उच्चारणी अनंत

***हरी उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे।।१।।***
***तृण अग्निमेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरी।।२।।***
***हरी उच्चारण मंत्र पै अगाध। पळे भूतबाध भेणे याचे।।३।।***
***ज्ञानदेव म्हणे हरी माझा समर्थ। न करवे अर्थ उपनिषदा।।४।।***

ज्याच्या सत्तेने आपले शरीर चालते, बोलते, व्यवहार करते, त्या आत्म्याचा - हरीचा उच्चार (देहाने किंवा मनाने केलेला उच्चार नव्हे) जर देहात असताना देहातीत होऊन श्रवण झाला तर अनंतपापराशी (अनंताच्या साक्षात्काराच्या आड येणारे पापी दोष) जळून भस्मसात होणाऱ्या आहेत. आपले जीवन हे नादप्रकाशयुक्त आहे. आत काही नाद आहे म्हणून बाहेरचा नाद श्रवण होतो. आत प्रकाश आहे तोवर बाहेरचा प्रकाश पाहता येतो. आत काही स्वाद आहे तोवर बाहेरचे सगळे स्वाद कळतात. ***('जो नादे ऐकिजता नादु। स्वादे चाखिजता स्वादु। जो भोगिजतसे आनंदु। आनंदेचि।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आत्म्याचा स्वयमेव नाद म्हणजे स्वयमेव नाम असून आत्म्याचा 'नवलस्वयंप्रकाश' हे त्याचे रूप आहे. ***('जेणे योगे झाला हनुमान देव। जपे स्वयमेव रामनाम।।', 'स्वयंप्रकाश झगझगाट होय अंबरी। पाहुनिया समाधान दास अंतरी।।'- श्रीमामामहाराज, 'नवल प्रकाश प्रकाशावेगळा। झाकिलिया डोळा पुढा दिसे।।'- संतवचन)*** जोवर बाहेरच्या नादप्रकाशाने जगाचा अनुभव येतो आहे तोवर आतील नादप्रकाशाचा अनुभव येत नाही. ***('अनुभवेवीण साचा। अनुभव जगताचा।।'- श्रीमामामहाराज)*** ज्या नामरूपामुळे हे वहिवाटीला पुसिले जाणारे नामरूप आहे, ते नामरूप (निजत्व) आपण जाणले तर सारे काही आहे, नाहीतर 'काही आहे' याला काही अर्थ राहणार नाही. ***('निजत्व म्हणजे नामरूप।।'- श्रीमामामहाराज)*** *'काहीच न करोनी प्राणी'* या अवस्थेत *'ओठ कंठ हाले नही, जिव्हा न करे काम'* या अवस्थेत आम्ही निवांत बसलो तर ('बैसका न मोडे मानसेची' ही अवस्था) चैतन्याचा-श्रीहरीचा-श्रीरामाचा हा उच्चार श्रवण होणारा आहे. या नादानुसंधानाने - नामानुसंधानाने देहावरील आपले असणारे प्रेम कमी होऊन आपले मूळ स्वरूपावर प्रेम जडते व हेच पुण्यकर्म आहे. ***('देही जे का प्रेम तेचि जाणा पापकर्म। मूळस्वरूपी जडता प्रेम तेचि जाणा पुण्यकर्म।।'- श्रीदासराममहाराज)*** चार पळे साधनाभ्यासाने श्रुत होणाऱ्या नादश्रवणी जर तदाकारता साधली तर चार घटिका साधनाभ्यासानंतर तारकबिंदू अनुभवाला येतो. चैतन्याचे वारे नयनात भरते. मन संपूर्णपणे मुरते. देहभाव संपूर्ण नाहीसा होऊन निर्विकल्प अवस्था प्राप्त होते. वारेच नयनात भरत असल्याने तो देहाकार न राहता समरसतेने तदाकार होतो. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।। कल्पक पाहता कल्पना ओसरे। घुमो लागे वारे चैतन्याचे।। भरता वारे होय तदाकार। मग देहाकार नाठवेची। देहाकार जाता नुरे अहंकार।। तोचि साक्षात्कार संतजनी। ऐसा जरी झाला एक साक्षात्कार। आनंदे निर्भर दासराम।।'*** कल्पनेच्या पलीकडे नेणारा हा कल्पनेपलीकडील मंत्र कल्पकाची भेट घडविणारा असल्याने तेथे कल्पनेने असणारी पंचमहाभूतांची जाणीव राहात नाही. असा जो जाणता समर्थ हरी आहे, तो जाणणे महत्त्वाचे आहे. ***('प्रपंच अथवा परमार्थ। जाणता तोचि समर्थ। नेणता जाणिजे व्यर्थ। निःकारण।।'- श्रीसमर्थ)*** उपनिषदानासुद्धा त्याचे नीट वर्णन करता आले नाही. ***(वेदासी कानडा श्रुतीसी कानडा। तो असे उघडा पंढरीये।।'- संतवचन, 'श्रुतीस्मृती तुजला गाती। परी ती आजवरी ना होय पुरती।।'- श्रीचिमडमहाराज, 'सखयेबाई सखयेबाई वेदाला काही कळले नाही।'- संतवचन)*** कारण तो 'शब्देवीण संवादु दुजेवीण अनुवादु' असा आहे. वेद जेव्हा अनुभवाअंती मूक अवस्थेत आले तेव्हा वेदाना परमात्म्याचे ज्ञान झाले. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'वेद जेथ मुके झाले। मन पवन पांगुळले। रातीवीण मावळले। रवि-शशी जेथ।' तर श्रीसमर्थ सांगतात, 'शब्दची निःशब्द होती। श्रुती नेती नेती म्हणती। हे तो आहे आत्मप्रचिती। प्रत्यक्ष आता।।.*** ✻✻

# तीर्थव्रतनेम भावेवीण

***तीर्थव्रत नेम भावेवीण सिद्धी। वायाची उपाधी करिसी जना।।१।।***
***भावबळे आकळे येरवी ना कळे। करतळी आवळे तैसा हरी।।२।।***
***पारियाचा रवा घेता भूमीवरी। यत्न परोपरी साधन तैसे।।३।।***
***ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण। दिधले संपूर्ण माझे हाती।।४।।***

आपण तीर्थयात्रा करतो, व्रतवैकल्ये करतो, काही नेम धरतो या सर्वांचा हेतू देवदर्शन व्हावे हाच असतो ना? तीर्थाबद्दल, व्रताबद्दल, नेमाबद्दल आपला भाव शुद्ध हवा तरच देवदर्शन होईल. भाव नसेल तर ही सारी नुसती कवायतच होईल. आपला हेतू साध्य होणार नाही. अहो देव हा तीर्थात, व्रतात, नेमात नाही. देव हा आपल्या भावात आहे. भाव असेल तर तीर्थाचे ठिकाणी, व्रत केल्याने, नेम साधल्याने देवदर्शन होईल. भाव शुद्ध असेल तर हे विश्व वासुदेवरूप आहे ही प्रचिती आल्यावाचून राहात नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतितीरसाचा वोतला भावो। म्हणोनि भक्तामाजी रावो। आणि ज्ञानिया तोचि।।' तर श्रीनाथमहाराज सांगतात, 'एका जनार्दनी भाव ही निका। जहाँ देखो वहाँ रामसरीखा।।'.*** शुद्ध भाव असेल तर देवाची प्रचिती नाहीतर धोंडा आणि पाणीच दिसणार. मायेतील भक्ताला देव दगडाचाच दिसणार. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'देव दगडाचा भक्त हा मायेचा। संदेह दोघांचा फिटे कैसा।।', 'तिर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी।।'*** मायेतील भक्ताला उपाधीमध्ये गुप्त असणाऱ्या चैतन्याचे ज्ञान न होताना उपाधीचेच ज्ञान होऊन उपाधीची उपाधी होणारच. म्हणून तीर्थ, व्रत, नेम भावेवीण घडले तर ही सारी वाया जाणारी उपाधीच ठरणार. साधनाभ्यासाने भाव शुद्ध झाला तर भावबळ प्राप्त होऊन देवाचे दर्शन होते. उपाधीमध्ये गुप्त असणारे चैतन्यच जाणले जाते. अर्थात उपाधीची उपाधी होत नाही. आपला आस्तित्वभाव-श्वसन हेच परमात्मप्राप्तीचे श्रेष्ठ साधन आहे. ***('भावची कारण भावची कारण। यापरते साधन नाही नाही।।'- श्रीनाथमहाराज)*** श्वसनामध्ये असणाऱ्या पंचमहाभूतांचा निरास झाला असता त्यापासून बनलेल्या चत्वार देहाचा निरास होतो. संदेहाची निवृत्ती होऊन भाव धरला जातो. तर श्वसनामध्ये असणाऱ्या त्रिगुणांचा निरास झाला असता असार संसारापासून तो वेगळा होतो व भाव बरवा, शुद्ध होतो व निर्गुण आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. हा भाव शुद्ध होण्यासाठी साधन बरवे होण्यासाठी, परोपरीने केलेला यत्न म्हणजे साधनाभ्यास होय. या भावाच्या - साधनाच्या - अभ्यासाने निवृत्ती अवस्थेत निर्गुणी अनन्य होणे म्हणजे श्रेष्ठ परमार्थ प्राप्त होणे होय. समर्थ म्हणतात, ***'वृत्तीस न कळे निवृत्ती। गुणास कैची निर्गुणप्राप्ती। गुणातीत साधक संती। विवेके केले।।', 'निर्गुणास नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपुण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाला।।'***

**

# समाधी हरीची

***समाधी हरीची समसुखेवीण। न साहेल जाण द्वैतबुद्धी।।१।।***
***बुद्धीचे वैभव अन्य नाही तुजे। एक्या केशवराजे सकळ सिद्धी।।२।।***
***ऋद्धी सिद्धी निधी अवघीच उपाधी। जव त्या परमानंदी मन नाही।।३।।***
***ज्ञानदेवी रम्य रमले समाधान। हरीच चिंतन सर्वकाळ।।४।।***

समदृष्टीने निर्गुण शोधले असता सर्वत्र सदा सारखे पसरलेल्या अद्वय ब्रह्माच्या सतत येणाऱ्या अनुभवाने सतत होणाऱ्या समसुखाने - समत्वाच्या सुखाने - अद्वैतापासून मिळणाऱ्या निश्चळ सुखाने - ही हरीसमाधी प्राप्त होते. ***('म्हणोनि सर्वत्र सदा सम। ते आपणचि अद्वयब्रह्म। हे संपूर्ण जाणे वर्म। समदृष्टीचे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही।। अद्वैताचे सुख ते निश्चळ। निर्गुण शोधोनि पाही।।'- संतवचन, 'समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे।।'- श्रीमामामहाराज)*** जोवर कल्पना आहे तोवर बुद्धीला द्वैताचीच जाणीव होते. सर्वत्र सारख्या पसरलेल्या चैतन्याची जाणीव होत नाही. उपाधीचीच जाणीव होते. द्वैतबुद्धीला होणाऱ्या द्वैताच्या जाणीवेने कामक्रोध खवळतात व अंगी आधीव्याधी जडतात व चैतन्याच्या नेणीवेने अखंड दु:खाचीच (कमी किंवा जास्ती) प्राप्ती होते. सारख्या पसरलेल्या चैतन्याच्या नेणीवेने समसुखेवीण हरीसमाधी प्राप्त होत नाही. सदा स्वरूपानुसंधानाने कल्पना नाहीशी होऊन सतत उपाधीमध्ये सारख्या गुप्तरूपाने असणाऱ्या चैतन्याची जाणीव होणे - समत्वाच्या जाणीवेने समसुख प्राप्त होणे हीच साधूंना प्राप्त होणारी हरीसमाधी आहे. समाधी शब्दच बोलका आहे. सम+आधी=समाधी. जेव्हा आधी व्याधी सम होतात तेव्हा ही समाधी प्राप्त होते. ***('गुरुलिंगजंगम। तेणे दाविला आगम। आधी व्याधी झाली सम। तेणे पावलो विश्राम रे।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** द्वैत जाणणाऱ्या द्वैतबुद्धीला हे सुख कधीही प्राप्त होत नाही. अद्वैतबुद्धीला - निश्चळ बुद्धीला - अनन्य असणाऱ्या बुद्धीला - दृढ बुद्धीला - एकच जाणणाऱ्या बुद्धीला - ही एकाची जाणीव होऊन हे समाधीसुख प्राप्त होते. येथे द्वैतबुद्धी अजिबात चालत नाही. ***('समाधीसुखी केवळ। जै बुद्धी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगस्थिती।।', 'बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्य त्यागे। मातेचि भजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'रामदासी दृढबुद्धी। होता सहजसमाधी।।'- श्रीसमर्थ)*** जरी विश्व भिन्न असले तरी ज्ञान त्याचे एकाचेच, हे या बुद्धीचे वैशिष्ट्य आहे. एक्या केशवराजापासून हे विश्व सिद्ध झाले असून तोच विश्वात सर्वत्र भरून राहिला आहे. या अद्वैतज्ञानाने होणाऱ्या महासुखात जो लोळतो आहे, त्याला ऋद्धी - सिद्धी - निधी या उपाधीच वाटतात. ***('म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयांचे ज्ञान। जैसे अवयव तरी आन आन। परी एकेची देहीचे।।', 'देखे ऋद्धी सिद्धी तयापरी। आली गेली से न करी। तो विगुंतला असे अंतरी। महासुखी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** दृढबुद्धीने जेव्हा चित्तात तो हरीच भरून राहतो, जेव्हा चित्त एकाग्र होते, जेव्हा सर्वकाळ हरीचे चिंतन घडते, तेव्हा चित्ताला अखंड प्रसन्नता प्राप्त होऊन अखंड समाधान प्राप्त होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाचि भरेल जेव्हा। माझा प्रसादु जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।', 'देखे अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिंगणे नाही समस्ता। संसारदु:खा।।'***

**

# नित्य सत्य मित हरीपाठ

***नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी। कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी।।१।।***
***रामकृष्णवाचा अनंतराशी तप। पापाचे कळप पळती पुढे।।२।।***
***हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष।।३।।***
***ज्ञानदेवा पाठ नारायण नाम। पाविजे उत्तम निजस्थान।।४।।***

नित्य सत्य मित असे जे स्वरूप आहे, त्याच्या सतत अनुसंधानाने-हरीपाठ घडल्याने - जो स्वरूपाकार होतो, त्याचेकडे काळाची पाहण्याची प्राज्ञा असत नाही. स्वरूप कसे आहे हो? ज्यात काही बदल होत नाही असे तिन्ही काळात आढळणारे, कल्पांती न नासणारे, कालातीत अर्थात जन्ममरणरहित, ज्यापासून हे सारे साकार जग कल्पनेने निर्माण झालेले आहे, असे स्वरूप आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***'जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'.*** अशा स्वरूपाचे अनुसंधानाने - हरीपाठाने - जे स्वरूपाकार होतात, ते जात नाहीत, ते अजरामर होतात. आमच्यासारखे जे देहाकार असतात, ते अकस्मात हे जग सोडून जातात. श्रीसमर्थ सांगतात, ***'असो ऐसे सकळही गेले। परंतु येकचि राहिले। जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी।।', 'मना पाहता सत्य हे मृत्युभूमी। जिता बोलती सर्वही जीव मी मी।। चिरंजीव हे सर्वही मानिताती। अकस्मात ते ही सांडोनी जाती।।'.*** रामकृष्णवाचा जो जीवाचा भाव आहे, तो शुद्ध होऊन त्या वाचेने द्वैत नाम दूर जाऊन जर एक नामाची - हरीनामाची - प्रचिती आली, अनंताचे साक्षात्काराने अनंत तपाच्या राशी तयार झाल्या तर पापाचे नाव शिल्लक राहणार नाही. हे नाम साधणे हेच महातप आहे. ***'पांडुरंग नामजप। हेचि माझे महातप।।'*** असे संत जनाबाई सांगतात. तर ***'तपाचे जे तप रामनाम देख। उच्चारिता हरीरव ब्रह्मादिका।।'*** असे श्रीमामामहाराज सांगतात. तर ***'अनंता जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।'*** *असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात.* इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्या असता मनोलयाने मनोवृत्तीचा निरोध साधून वाचे पैल शिवाचा शिवाचे अंतरी असणारा हा राममंत्र - हरीमंत्र - नारायण मंत्र प्राप्त होतो व जन्ममरणरहित अवस्थेत, जाणीवनेणीवरहीत अवस्थेत जीवाला मोक्ष प्राप्त होतो. ***('इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।' - श्रीमामामहाराज, 'जाणीव नेणीव भगवंती नाही। हरीउच्चारणी पाही मोक्ष सदा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जन्ममृत्यापासुन सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला। तत्वे शोधिता पावला। तत्वता वस्तू।।'- श्रीसमर्थ)*** रामकृष्णवाचेला नारायणनामाचे फळ चाखता आले तर आपले निजस्थान - उगमस्थान - विश्वाचे मूळ अनुभवता येणार आहे. श्रीसमर्थ या उगमस्थानाबद्दल असे सांगतात, ***'येक बळाचे निवडले। ते पोहतची उगमा गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।।'*** तर या विश्वाचे मूळ (चैतन्य) याबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ। आनंदाचे केवळ। चैतन्य गा।।'.*** हे जे चराचराचे मूळ आहे त्या शुद्ध निर्मळस्वरूपाला 'केवलज्ञान' म्हणतात. हे केवलज्ञान होणे म्हणजेच मोक्षप्राप्ती होणे होय. ***('जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।', 'आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षची पावणे।।'- समर्थ)***

**

# एक नाम हरी

***एकनाम हरी द्वैतनाम दुरी। अद्वैत कुसरी विरळा जाणे।।१।।***
***समबुद्धी घेता समान श्रीहरी। शमदमावरी हरी झाला।।२।।***
***सर्वाघटी राम देहादेही एक। सूर्यप्रकाशक सहस्त्ररश्मी।।३।।***
***ज्ञानदेवा चित्ती हरिपाठ नेमा। मागिलिया जन्मा मुक्त झालो।।४।।***

ज्या नामाने आकाराचा बोध होतो व द्वैत जाणवते, त्या नामाला द्वैतनाम म्हणतात. तर ज्या नामाने सर्वत्र सामान्यपणे गुप्तरूपाने सारखेपणाने पसरलेल्या एक चैतन्याचा बोध होतो, त्याला एकनाम म्हणतात. एकनामाने एकाची प्रचिती तर द्वैतनामाने द्वैताची प्रचिती. हे अद्वैत अनुभवाला आणून देणारे एकनाम जाणणारे विरळाच. ***('ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आकाराच्या बोधाने आपणास एक आत्म्याचा बोध होत नाही तर आकारज्ञानाने आत्म्याचा विसरच होतो. आकारज्ञानाने आपण आत्मबोधापासून दूर जातो हेच मोठे दुरित - पाप आहे. विश्वाचा आकारात्मक आभास नाहीसा करून विश्व-परमात्मा दाखविणारा स्वधर्मसूर्य उदयाला येवो व जे परमेश्वरापासून दूर गेलेले आहेत असे दुरित, त्यांचे बुद्धीतील कल्पनेचा अंध:कार नाहीसा होवो व त्यांची सर्वसुखप्राप्तीची इच्छा पूर्ण होवो असे पसायदान श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी मागितले आहे. ते म्हणतात, ***'दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो। जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात।।'.*** अहो साकार विश्व पाहणे - द्वैत अनुभवणे - हाच अज्ञानाचा अंध:कार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते कीरिटी। येर भिन्नपणे ते उठी। अज्ञानास्तव।।'.*** हा द्वैतपणा संपणे व एकाची - अद्वैताची प्रचिती येणे हे खरे ज्ञान आहे. हे ज्ञान आपल्या देहबुद्धीला, द्वैतबुद्धीला होत नाही. तो 'मनबुद्धी अगोचर' आहे. हे ज्ञान ज्या बुद्धीला होते, ती बुद्धी वेगळी आहे. तिला समबुद्धी, प्रज्ञा, दृढबुद्धी, आत्मबुद्धी आदी नावांनी संतांनी संबोधले आहे. या समबुद्धीला एकनामाची प्रचिती येते. त्या नादश्रवणी जाणीवनेणीवरहित तदाकारता साधल्याने मोक्षाची प्राप्ती होते. त्याला मन:संयम (यम) इंद्रियसंयम (दम) करण्याची गरज राहात नाही. तो हरीसमान होतो. अज्ञानाचे ज्ञान झाले असता देहादेही आणि सर्वाघटी सहस्त्ररश्मी सूर्यप्रकाशक एक आत्मारामच आहे, याची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तू देऊनि गेले। ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।'.*** दृढबुद्धीने - समबुद्धीने जेव्हा चित्तात हरीच भरून राहतो, तेव्हा भगवंताचा प्रसाद (प्रसन्नता) चित्ताला प्राप्त होतो. सोने आणि माती न जाणवता त्याला तो एकच सर्वत्र जाणवतो. त्याचे एकपण जाणवते. ही खरी शरणागती. ही शरणागती ज्याला साधते, त्याला मोक्षाची प्राप्ती होते. त्याचा हा जन्म अखेरचा ठरतो. ***('मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करूनिया। पतिव्रता।।', 'बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्यत्यागे। मातेचि भजे।।', 'मग अभिन्ना इया चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादु जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।', 'तै आपुलेनि भेदेवीण। माझे जाणिजे जे एकपण। तयाचि नाव शरण। मज येणे गा।।', 'जो मज होय अनन्यशरण। त्याचे निवारी मी जन्ममरण। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सोने आणि माती। आम्हा समान हे चित्ती।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# हरीबुद्धी जपे

***हरीबुद्धी जपे तो नर दुर्लभ। वाचेसी सुलभ रामकृष्ण।।१।।***
***रामकृष्णनामी उन्मनी साधली। तयासी लाधली सकळ सिद्धी।।२।।***
***सिद्धीबुद्धीधर्म हरिपाठी आले। प्रपंची निमाले साधुसंगे।।३।।***
***ज्ञानदेवी नाम रामकृष्णी ठसा। तेणे दशदिशा आत्माराम।।४।।***

देहाच्या जाणीवेत - देह म्हणजे मी या जाणीवेत - देहबुद्धीने - जो जप होतो त्या जपाने काही मर्यादेपर्यंत फायदा होतो. तो जप करणारे खूप आहेत. पण त्या जपाने खरा परमार्थ साधत नाही. ***'म्हणोनि देहबुद्धी हे झडे। तरीच परमार्थ घडे। देहबुद्धीने विघडे। ऐक्यता ब्रह्मीची।।'*** हे समर्थवचन हे स्पष्ट करणारे आहे. जप हा हरीबुद्धीने - आत्मबुद्धीने - दृढबुद्धीने - प्रज्ञेने - समबुद्धीने - नवलबुद्धीने - व्हावा लागतो. असा जप करणारी माणसे दुर्मिळच. देहबुद्धीला आत्म्याची - हरीची जाणीव होत नाही. तो 'मन बुद्धी अगोचर' आहे. देहबुद्धी - द्वैतबुद्धी - दुर्बुद्धी ही मनात उपजते. मनाला जे ज्ञान होते ते द्वैताचेच. ***(देहबुद्धी नेणो काही। दास अंकीत रामापायी।।'- समर्थ, 'दुर्बुद्धी ते मना। कदा नुपजो नारायणा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** या दुर्बुद्धीची - देहबुद्धीची, आत्मबुद्धी - सद्बुद्धी व्हावयास हवी. ***('देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी। सदा संगती सज्जनाची धरावी।।'- श्रीसमर्थ, 'सद्बुद्धी दे मजला। दुर्बुद्धीचा वीट आला। कामादी वैरी वारी। करी निष्काम मजला।।'- श्रीचिमडमहाराज)*** हरीबुद्धीने होणारा जप हा या वाचेने घेणे दुर्लभ आहे तर तो रामकृष्णवाचेला सुलभ आहे. रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव आहे. या भावानेच हा जप सिद्ध होतो. रामकृष्ण या जीवनाच्या गती आहेत. साधनाभ्यासाने या गतीमध्ये मन मुरले असता, मन वासना जाळून शुद्ध झाले असता, देहातीत अवस्थेत जी बुद्धी राहते तिला आत्मवस्तूची ओळख होते. म्हणून या बुद्धीला आत्मबुद्धी, सम दाखविणारी समबुद्धी, नवलबुद्धी, प्रज्ञा, हरीबुद्धी आदी नावांनी संत ओळखतात. या बुद्धीने जप होणे आवश्यक आहे. या हरीबुद्धीला देहाची जाणीव नाहीशी झाल्यावर राहणारी चैतन्याची जाणीव होते - आत्म्याची जाणीव होते. या चैतन्याच्या जाणीवेत जो जप होतो, तो खरा जप. जोवर आत्म्याची जाणीव नाही तोवर होणारा जप फलप्रद होत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'.*** ज्या प्रज्ञेला, नवलबुद्धीला हे आत्म्याचे ज्ञान होते त्या नवलबुद्धीचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***'जव देह हे असेल। तव बोळगी ऐसी किजेल। मग देहांती नवल बुद्धी आहे।।'. 'वाऱ्यावरी लागली नजर। देहभानाचा पडला विसर।।'.*** या श्रीदासराममहाराजांचे वचनाप्रमाणे इतर कोठे नजर न जाताना चैतन्याच्या वाऱ्यावर जर आपली नजर पडली व मनोलयाने उन्मनी अवस्थेत चारी वाचेपैल रामकृष्णवाचेने नाम साधले, रामकृष्ण या जीवनाचे गतीत असणारे नाम जर साधले, निवृत्ती अवस्थेत जर स्मरण घडले, वृत्तीरहित ज्ञानाची अनुभूती आली तर समबुद्धीने सोहंसिद्धी प्राप्त होणार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ऐसे जे समबुद्धी। मिळावया सोहंसिद्धी। आंगवितातीं निरवधी। योगदुर्गे।।'*** नित्य सत्य मित अशा स्वरूपाचे अनुसंधान जर हरिपाठाने साधले तर मनोलयाने प्रपंचाचा निरास होऊन हरीबुद्धीने स्वरूपी राहणे हा समर्थ स्वधर्म साधून सोहंसिद्धी साध्य होणार आहे. रामकृष्ण या जीवनाच्या गतीत जर नाम अनुभवाला आले व ते अंतर्यामी ठसले तर दशदिशा आत्मारामाचा अनुभव येणार आहे. चिमडचे महाराज सांगतात, ***'आजवरी गुप्तची होते बाई। आता दिशा प्रगटे दाही।'.*** आज ज्यांच्या वचनाप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदासराममहाराजांना श्रीगुरुलिंगगीता श्रुत केली. त्या श्रीनागाप्पाण्णामहाराजांची पुण्यतिथी आहे. श्रावण व.२ शके १८७५ या दिवशी भ्रूमध्यावर दृष्टी ठेवून श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी निर्वाण केले. ***(श्रीनागाप्पाण्णा गुरुसाधनराणा। चरणी गुरुसिद्दण्णा निरंजना। - श्रीगुरुलिंगगीता)*** **

# हरिपाठ - कीर्ती मुखे

***'हरिपाठ - कीर्ती' मुखे जरी गाय। पवित्र तो होय देह त्याचा।।१।।***
***तपाचे सामर्थ्य तपिन्नला अमूप। चिरंजीव कल्प कोटी नांदे।।२।।***
***मातृपितृ भ्राता सगोत्र अपार। चतुर्भुज नर होऊनी ठेले।।३।।***
***ज्ञानगूढ गम्य ज्ञानदेवा लाधले। निवृत्तीने दिधले माझे हाती।।४।।***

जे नाम म्हणजे शब्द आहेत, अक्षरे आहेत, ते नाम या देहाच्या वाणीने घेता येईल पण नित्य सत्य मित, निरुपाधिक नि:शब्द असा जो आत्मा - हरी आहे त्याचे चैतन्यरूप नाम या वाणीने कसे घेता येईल? हा येथे प्रश्न आहे. ते चैतन्याचे नाम, चैतन्याचा उच्चार चैतन्यानेच अनुभवता येतो. हा उच्चार देहाने अनुभवता येत नाही पण देहात अनुभवता येतो. आपण देहात असताना देहातीत झालो तर ***'शब्देवीण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे।'*** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाप्रमाणे हे परब्रह्मरूप निर्विकल्प नाम अनुभवता येते. तुम्ही म्हणाल आत आत्मा आहे, हरी आहे, म्हणूनच ही देहाची वाणी बोलू शकते, याचा अर्थ तो शब्द आत्म्याचाच आहे ना? पहिली गोष्ट आत्मा असल्याने देहाच्या वाणीने बोललेला शब्द व चैतन्याचा शब्द यात महदंतर आहे. दुसरी गोष्ट मुका माणूस हे नाम कसे घेणार? का त्याला नामाचा, परमार्थाचा अधिकार नाही? मग 'सकळासी येथे आहे अधिकार' असे म्हणण्यात काय अर्थ? आत्मा असल्यावर जी क्रिया असतेच त्या क्रियेशी संबंधित हे नाम हवे हे निश्चित. आत्मा असल्यावर श्वास असतोच. ज्याचा श्वास चालू आहे तो परमार्थाचा अधिकारी आहे, नामाचा अधिकारी आहे. प्रत्येक श्वासाला हा नामाचा अधिकार प्रत्येकाने बजावलाच पाहिजे. ***(श्वासो लेवे नाम बिना सो जीवन धिक्कार। श्वासश्वासमो रामजप वोही धारणाधार।।'- संतवचन, 'नाम श्वासोच्छ्वासी असे। परब्रह्म तेथे वसे।।'- समर्थ)*** साधनेने नि:श्वासाला काही प्रमाण आले असता इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर जो चैतन्याचा उच्चारेवीण नादरहित शब्द अनुभवाला येतो तो हरीपाठ. हा हरीपाठ जेथून उदय पावतो त्याला काकीमुख, हरीमुख, कीर्तीमुख, कमलमुख आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. त्या नामाबद्दल, काकीमुखाबद्दल, हरीवाणीबद्दल अधिक खुलासा श्रीदासराममहाराज असा करतात, ***'सकार हकार काढूनी टाकिला। ॐकार उरला शब्दघोष।।', 'प्रणव उदेला कोठून। सांगा सांगा ते ठिकाण। परेपैल हरिवाणी। झाला उद्भव तेथोनी।।' 'काकीमुखातोनी निघे जो उच्चार। नाद मंद्र स्वर बोलती ज्या। चंद्रसूर्य जेथे विरोनिया जाती। एकवीस रहाती स्वर्ग मागे।।'*** तर या काकीमुखाचा श्रीज्ञानेश्वरमहाराज असा खुलासा करतात, ***'तरी 'का' म्हणिजे पुरुषवाचू। की ते स्त्री शब्द साचू। दोहीचा संधी तो मुखाभासू। नभ जैसे अवकाशेसी।।'***. या मुखाने होणारा ध्वनी-अनाहत-स्वयमेव नाम-जो सतत श्रवण करतो त्याचा अमंगळ देहसुद्धा पवित्र होतो. त्यांच्या अस्थी पूजनासाठी ठेवल्या जातात. साधनाचे तप साधले असता या नामाचा बिंदू घडतो, नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते व साधक सर्ववृत्तीचे मौन होऊन अर्थरूप होतो, ध्येयरूप होतो, समअर्थ होतो, सामर्थ्यवान समर्थ होतो, स्वरूपाकार होऊन तो चिरंजीव अजरामर होतो. कुळात एखादा असा सात्विक विष्णुभक्त जन्माला आला तर तो आपले सर्व कुळ उद्धरतोच पण तो त्याच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांची कुळे उद्धरतो. ***'आपण तरेल नव्हे ते नवल। कुळे उद्धरील सर्वांची तो।'*** हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन हेच खात्रीपूर्वक सांगते. निवृत्ती अवस्थेत वृत्तीरहित ज्ञान हे गूढज्ञान श्रीज्ञानेश्वरमहाराजांना प्राप्त झाले. गुरुकृपेशिवाय हा परमार्थ साधत नाही हेच खरे.

**

# हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन

***हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन। हरीवीण सौजन्य नेणे काही।।१।।***
***तया नरा लाधले वैकुंठ जोडले। सकळही घडले तीर्थाटण।।२।।***
***मनोमार्गे गेला तो तेथे मुकला। हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य।।३।।***
***ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी। रामकृष्णी आवडी सर्वकाळ।।४।।***

आपण सारे पुरातन अशा हरिवंशातील आहोत. सर्वांचा मुळपुरूष एक हरीच आहे. निश्चळ हरीच्या ठिकाणी कल्पनेने निर्माण झालेल्या चंचळत्वाने वायुरूप चैतन्य निर्माण झाले. या चंचळ चैतन्यापासून मूळमायेच्या माध्यमातून ही जडसृष्टी निर्माण झाली आहे. समर्थ सांगतात, ***'जडाचे मूळ चंचळ। चंचळाचे मूळ निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।।', 'मूळमाया तोचि मूळपुरुष। तोचि सर्वांचा ईश। अनंत नामी जगदीश। तयासीच म्हणावे।।', 'ब्रह्मी मूळमाया जाली। तिच्या पोटी माया आली। मग ते गुणा प्रसवली। म्हणोनि गुणक्षोमिणी।।', 'मूळमायेपासून सेवटवरी। वायोचि सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।'.*** सर्वांचा मूळपुरुष एक हरी आहे, एक नारायण आहे, आमचे भगवान सद्‌गुरू निंबरगीकरमहाराज आहेत. आपण सारे त्यांचे वंशातील आहोत. ही एकात्मता संतांनी साधली. आपण फक्त भेदाभेद वाढविला. संतांनी अनेकात एक पाहिले. आपण एकात अनेक पाहतो. एका चैतन्यातून हे सारे निर्माण झाले आहे व सर्वात चैतन्य भरून राहिले आहे. पण दुर्दैव असे आहे की आम्हाला आमचा मूळपुरुष कोण आहे हे माहीत नाही. कुलदैवत माहीत नाही. आमचे वंशाची परंपरा माहीत नाही. ही केवढी शोकांतिका आहे. ही जाणीव या अभंगात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी करून दिली आहे. ते म्हणतात, ***'हरीवंशपुराण हरीनामसंकीर्तन। हरीवीण सौजन्य नेणे काही।।'*** आपण ज्याच्या वंशातील आहोत त्या पुराणपुरुषाची आठवण करणे, त्याचे नामसंकीर्तन करणे हे आपले कर्तव्य आहे. तोच सर्वत्र भरून राहिला आहे हे जर जाणवले तर सौजन्याने वागा हे सांगावे लागेल का? हे ज्याला समजले त्याला वैकुंठनाम परमात्मा प्राप्त झाला. त्याला विश्वाचा उगम समजून तो तीर्थरूप झाला. ***('एक ते बळाचे निवडले। पोहतचि उगमा गेले। उगमदर्शने पवित्र झाले। तीर्थरूप।।'- समर्थ, 'जयाचे नाव तीर्थरावो। दर्शने प्रशास्तीसी ठावो। जयाचेनी संगे ब्रह्मभावो। भ्रांतासी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन पवनाचे ठिकाणी लय पावून, तत्त्वांचा तत्त्वात निरास होऊन पवनसिद्धी साधली असता हरीपाठाचे योगे हरीची जाणीव होणारी आहे. मूळपुरूषाचे ज्ञान होणारे आहे. हरीची जाणीव झाली - ओळख झाली की संसाराला धन्यता प्राप्त होते. ***('ओळखिला हरी धन्य तो संसारी।'- श्रीनाथमहाराज, 'प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्त्वे तत्त्व सारिता पवनसिद्धी।। पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम। येतसे निष्कर्म हातालागी।।'- श्रीदासराममहाराज)*** ही संतवचने सारे काही स्पष्ट करणारीच आहेत. सर्वकाळ रामकृष्ण या जीवनाचे गतीचे ठिकाणी लक्ष देण्याची आवड निर्माण झाली असता त्याला हरिनामाची जोड मिळते व हरीपाठ घडतो. पवनसिद्धी प्राप्त होऊन - हरीची - नारायणाची - आत्म्याची प्राप्ती होते. तो हरीरूप - आत्मरूप होतो.

**

# वेदशास्त्रप्रमाण

***वेदशास्त्रप्रमाण श्रुतीचे वचन। एक नारायण सार जप।।१।।***
***जपतप कर्म क्रिया नेम धर्म। वाऊगाची श्रम व्यर्थ जाय।।२।।***
***हरिपाठी गेले ते निवांतचि ठेले। भ्रमर गुंतले सुमनकळिके।।३।।***
***ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र। यमे कुळगोत्र वर्जियेले।।४।।***

वेद हे आपौरुषेय आहेत. वेदाला कोणी कर्ता नाही. ऋषीमुनी हे वेदाचे द्रष्टे आहेत कर्ते नव्हेत. भगवंताच्या निद्रावस्थेत नि:श्वासातून - घोरण्यातून सहजवेद प्रगट झालेले आहेत. ***'हा वेदार्थसागरू। जया निद्रिताचा घोरु। तो स्वये सर्वेश्वरू। प्रत्यक्ष अनुवादला।।'*** असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. वस्तुत: वेदमंत्र हे ऋषीमुनी ध्यानाला बसल्यावर त्यांच्या श्वास-नि:श्वासातून प्रगट झालेले आहेत. मग हे श्वासोच्छ्वास भगवंताचे कसे? असे आपणास वाटेल. एकतर ऋषीमुनी हे देवरूप झालेले होते. ***'आत्मज्ञाने चोखडी। संत जे माझी रुपडी।।'*** *असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. तर* ***'देव ते संत देव ते संत। निमित्त त्या प्रतिमा।।'*** असे श्रीतुकाराममहाराज सांगतात व श्वास हे देहातील भगात-विवरात राहणाऱ्या भगवंताचे - आत्मदेवाचे सहजकर्म आहे. अर्थात प्रत्येकाचा श्वास हा भगवंताचाच आहे. प्रपंचातील षड्विकारात्मक आयास जर दूर झाले तर आपल्या नि:श्वासाला काही प्रमाण येते. निर्हेतुक सत्क्रिया आचरली जाते. अप्रमाण असणाऱ्या प्रपंचास प्रमाण येते. प्रपंच नेटका होतो व मग जो काही अनाहत नाद श्रुत होतो, ते हरीभजन, तो नारायण जप होय. ***(नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। सार नारायण जप एक।'- श्रीदासराममहाराज, 'प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।'- समर्थ)*** म्हणून वेदाक्षरे ही हरीनाम आहेत. ***'वेदाक्षराणि हरीनामानी'*** असे वचन आहे. आपल्या निश्वासाला अपेक्षित प्रमाण येऊन जेव्हा हा सार नामाचा उच्चार श्रुत होईल तेव्हा वेद हे ऋषीमुनींना श्रुत झाले याला वेगळे प्रमाण (आधार) देण्याचे कारण राहणार नाही. अर्थात वेदांना शास्त्रांना प्रमाण हे श्रुत होणारे नाम आहे, हे सांगणे नकोच. या प्रमाणभूत नामाचाच पुरस्कार वेद शास्त्रे करतात. ***('असोनी संसारी जिव्हे वेगु करी। वेद शास्त्र उभारी बाह्या सदा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वेद अनंत बोलिला अर्थ इतुकाची साधिला। विठोबासी शरण जावे निजनिष्ठे नाम घ्यावे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** या नादश्रवणाचे ठिकाणी तदाकारता साधून जर वारे नयनात भरले, आत्मा-नारायण कळला तर जप तदनुषंगीक कर्म धर्म नेम यांचा उपयोग नाहीतर ती नुसती कवायत होईल व केलेले श्रम वाया जातील हे निश्चित. कामक्रोधरहित होऊन प्रपंचातील षड्विकारात्मक आयास दूर झाले असता, मन गुरुचरणाचे ठिकाणी जडले असता निर्वात अवस्था प्राप्त होऊन हरिपाठाने निवांतपणा प्राप्त होणारा आहे. जी माणसे मनाअधीन असतात, मन ज्यांना आवरत नाही अशा संसारी माणसांना यम दंडण करतो. ***('तुका म्हणे झाले जे मनाअधीन। तयासी दंडण यम करी।'- श्रीतुकाराममहाराज)*** पण जो हरीनामाच्या शस्त्राने मनाच्या पलीकडे जातो, संसारावर मात करतो, व आत्मसाक्षात्कार करवून घेतो, त्याला यम वंदन करतो. थोडक्यात काय ज्याला यम साधतो त्याला यम वंदन करतो. याउलट ज्याला यम साधत नाही त्याला यम दंडण करतो. ***('साचची बोलाचे नव्हे हे शास्त्र। पै संसार जिणते हे शस्त्र। आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरिये।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मन ज्याला आवरेना। तोचि संसारिक जाणा।।' श्रीदासराममहाराज, 'रामनाममुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।। गोविंद म्हणे यम वंदितसे पाय। इतर ते काय तयापुढे।।' - श्रीमामामहाराज केळकर)***

**

# श्रीदासराममहाराज जयंती

श्रीदासराममहाराजांचे वडील श्रीमामामहाराज हे जन्मजात विरक्त परमार्थी होते. केवळ परमार्थ व्हावा या हेतूने त्यांनी लग्न करायचे नाही असे ठरविले होते. माझे पणजोबा श्रीअंताजीपंत यांच्या अतीव प्रेमाग्रहाने व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे आश्वासक आशीर्वादामुळे त्यांनी लग्न केले. गृहस्थाश्रम स्वीकारला. लग्नापाठोपाठ त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे सांगणेवरून चिमडच्या श्रीनारायणमहाराजांचा अनुग्रह घेतला व कठोर उपासनेला सुरुवात केली. मनातून ते विरक्तच होते. केवळ गुरुआज्ञा म्हणून त्यांनी विवाह केला होता. नाहीतर लग्नानंतर अनुग्रह कोण घेईल का? घेतला तर कठोर उपासना कोण करेल? सद्‌गुरु श्रीनारायणमहाराज यांचे मार्गदर्शनाप्रमाणे त्यांनी कट्टाने साधना करून हृदयस्थ नारायणाचा अनुभव घेतला. समर्थ वचनाप्रमाणे त्यांचे जीवनात लक्ष्मी अवतरली. गोविंदतनुच्या सत्तेने इंदिराकुशी साक्षात लक्ष्मी अवतरली. त्याचा दृकप्रत्यय म्हणजे बाह्यत: विपुल धनही प्राप्त झाले. त्यांना ऐहिक उर्जितकाळ प्राप्त झाला. पण त्यात ते रमले नाहीत. हे केवढे विशेष. त्यांनी ज्याची लक्ष्मी, त्या हृदयस्थ नारायणालाच बळकट धरले. याचा परिणाम ही लक्ष्मी आपला या घरात फारसा प्रभाव पडणार नाही हे ओळखून लवकरच निवर्तली. त्यांची ही नारायणावरील श्रद्धा पाहून साक्षात नारायणानीच त्यांचे पोटी अवतार घेण्याचे ठरविले. पण ते त्यांची पूर्ण साधना झाल्यावरच. पुढे बरीच वर्षे श्रीमामांना अपत्यप्राप्ती झाली नाही. म्हणून प्रेमाने काळजीपोटी आमचे आजीचे मामा औरवाडचे अवलिया सिद्ध पुरुष श्रीवजीरबाबा यांचेकडे गेले. त्यांच्या कृपाप्रसादातून हा प्रत्यक्ष श्रीनारायणाचा अवतार कीर्तनसेवेसाठी साकारला. श्रीदासराममहाराज गर्भावस्थेत असताना आमचे आजीला श्रीतात्यासाहेबमहाराज यांचा अनुग्रह घ्यावा वाटला. ***'गर्भाचे आवडी मातेचा डोहळा'*** असाच तो प्रकार होता. श्रीदादांना श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह हवा होता म्हणून आजीला अनुग्रह घेण्याचा डोहाळा लागला. श्रीदादांचे निमित्ताने आजीला अनुग्रह प्राप्त झाला. ***'सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला'*** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाचा प्रत्यय आला. जन्म घेण्यापूर्वी आईचे उदरात अनुग्रह अशी विलक्षण घटना पुराणातील प्रल्हादानंतर या प्रल्हादाचे बाबतीत घडली. पुढे श्रावण व.६ सन १९२० या शुभ दिवशी कुरुंदवाड येथे श्रीमामामहाराजांचे सत्तेने इंदिराकुशी श्रीदासराममहाराजांचा अवतार झाला. श्रीदादा व श्रीतात्यासाहेबमहाराजांची भेट व्हावी ही परमेश्वरी योजनाच होती. म्हणून त्यांचा जन्म दोन महिने आधी सातव्या महिन्यातच झाला. श्रीतात्यासाहेबमहाराज गणेशोत्सवाचे कीर्तनाचे कार्यक्रमाचे निमित्ताने कुरुंदवाड येथे आले असताना माझे पणजोबा श्रीअंताजीपंत यांचे विनंतीवरून घरी आले. त्यांचे मांडीवर श्रीदादांना देण्यात आले. त्यांनी त्यांचे मस्तकावरून, अंगावरून प्रेमाने हात फिरवला व म्हणाले, 'हा आमचाच आहे. हा बालपणापासून कीर्तन करेल. याचे नाव 'राम'ठेवा.' **सद्‌गुरुंनी हा आमचाच आहे** असे म्हणणे यापेक्षा भाग्य ते कोणते? त्यांच्या सांगण्यावरून भाग्याचे भाग्य 'रामनाम' श्रीदासराममहाराजांच्या वाट्याला आले. हा एवढ्या लहानपणी मस्तकावरून फिरवलेला हात श्रीदादांना सत्तराव्या वर्षीही जाणवत होता ही केवढी विलक्षण अलौकिक गोष्ट आहे. ही गोष्ट ते स्वत: कीर्तनात सांगत व त्या स्पर्शाचे वर्णन 'अस्पर्शाचा स्पर्श' असे करीत. श्रीदादांचा जन्म झाला तेव्हा आमचे घरात नित्यकीर्तन सुरू झाले नव्हते. तेव्हा ते श्रीदादांना म्हणाले 'हा बालपणापासून कीर्तन करेल' म्हणजे श्रीमामा हे कीर्तन पुढे चालवणार हे श्रीमहाराजांना आधीच माहीत होते असे वाटल्यावाचून राहात नाही. पुढे चार वर्षांनी सुरू होणाऱ्या नित्यकीर्तन सेवेत साथ करण्यासाठी भगवान आधीच तयार होते. त्यांनी कीर्तनसेवेची खूणगाठ बांधली. श्रीमामांचे नित्यकीर्तनात हे बालराम छोटीशी वीणा घेऊन त्यांना सुरुवातीपासून साथ करीत होते. उद्याचे कीर्तनात यातील उरलेला विषय पाहू व हरीपाठाचे विवरण करू.

**

# नामसंकीर्तन वैष्णवांची

***नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्याची।।१।।अनंता जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।२।। योगयागक्रिया धर्माधर्म माया। गेले ते विलया हरिपाठी।।३।।ज्ञानदेवी यज्ञयाग क्रिया धर्म। हरिवीण नेम नाही दुजा।।४।।***

देहाची जाणीव होऊन चैतन्याची जाणीव न होणे व साहजिकच देहावरच आपले प्रेम असणे व चैतन्यावर प्रेम नसणे, हेच मोठे पाप आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'देही जे का प्रेम तेचि जाणा पापकर्म। मूळस्वरूपी जडता प्रेम तेचि जाणा पुण्यकर्म।।'*** साधनाच्या अभ्यासाने ज्यांचे ठिकाणी देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण सतत होते आहे. सतत होणाऱ्या चैतन्याचे ज्ञानाने ज्यांचे देहाबद्दलचे प्रेम कमी झालेले आहे व चैतन्याच्या वाऱ्यावर प्रेम (प्रिती) जडले आहे, अर्थात देहावरचे प्रेम हे पाप नाहीसे होऊन मूळ स्वरूपी प्रीती करणे हे पुण्य जो सतत जोडतो आहे, प्रत्येक श्वासाला ज्याला एका अद्वैत चैतन्याची जाणीव होते आहे, जो विष्णुमय जग अनुभवतो आहे, आकारज्ञानाने होणारे भेदाचे ज्ञान-द्वैताचे ज्ञान हा भ्रम जेथे नाही, तो वैष्णव जे काही बोलतो ते सारे नामसंकीर्तन. श्रीदासराममहाराज अशा संतांचे - वैष्णवांचे वर्णन असे करतात, ***'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी। नामसंकीर्तन उरले त्या ठायी। देहभाव लया गेला त्यांचा।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज या वैष्णवांचे वर्णन असे करतात, ***'कैसे माझा गुणी धाले। देश काळाते विसरले। कीर्तन सुखे झाले। आपणपाची।।'*** तर श्रीसमर्थ हे संतवर्णन असे करतात, ***'जया अंतरी भगवंत। अचळ राहिला निवांत। तो स्वभावे जे बोलतो। ते ब्रह्मनिरुपण।।'.*** सर्वत्र पसरलेल्या एका चैतन्याची जाणीव करून देणारे हे एक नाम म्हणजेच हा सुलभ हरीपाठ असून त्या नामाचा बिंदूरूपाने साक्षात्कार होणे व बुद्धीतील कल्पनेचा अंधार नाहीसा होणे हेच ते तप आहे. श्रीमामामहाराज सांगतात, ***'तप म्हणजे काय प्रकाशित होणे। अंधार दवडणे बुद्धीतील।'*** साधनाभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधला असता हे तप साध्य होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात ***'स्वरूपाचिया प्रसरा। लागी प्राणेंद्रियशरीरा। आटणी करणे जे वीरा। तेचि तप।।'.*** या हरीपाठाचे योगे जेव्हा साधक अद्वैती समरस होतो, द्वैताचे बंधन नाहीसे होते, तेव्हा देहाच्या अनुषंगाने होणारे योगयाग धर्मअधर्म हे नाहीसे होऊन ते सारे चैतन्याच्या - हरीच्या अनुषंगाने होऊ लागते. स्वरूपी राहणे हा स्वधर्म हाच नित्ययज्ञ साधून परमात्म्याशी तादात्म्य होणे, अहंकार नाहीसा होणे हा योग साधणे, नित्य असणाऱ्या आत्म्याचा नेम साधणे, हे सारे त्याला साधते. ***('स्वधर्मू जो बापा। तोचि नित्ययज्ञु जाण पा। म्हणोनि वर्तता तेथ पापा। संचारु नाही।।', 'नामजपयज्ञु तो परम। बाधू न शके स्नानादी कर्म। नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी राहणे हा स्वधर्म। हेचि जाणिजे मुख्य वर्म। साधु लक्षणाचे।।'- श्रीसमर्थ, 'योग तप याची नावे। गलीत व्हावे अभिमान।।' संतवचन)*** श्रीदासराममहाराज जयंतीचे संदर्भातील उर्वरीत भाग पुढीलप्रमाणे -

ही कीर्तनाची साथ शेवटपर्यत त्यांनी सोडली नाही. पण या अवतारात श्रीनाथमहाराज सतर्क होते. 'राम' कोण आहेत त्यांना माहीत होते. ते म्हणत एक राम देव्हाऱ्यात आहे तोच हा 'राम' बाहेर आहे. त्यांना ते लहानपणापासूनच 'रामजी' या नावाने संबोधित. त्यांनी श्रीदादांचेकडून कोणत्याही प्रकारची सेवा करून घेतली नाही. श्रीमामा स्वत: सारे काही करीत. ही गोष्ट श्रीदादांनी त्यांचे अभंगात नमूद केली आहे. तो अभंग असा, ***'लाभावीण प्रीती प्रेमाचिये जाती। पितृदेव होती ऐसे मामा।। ऐकोनी कीर्तन सदा समाधानी। सेवाही करोनी दिली नाही।। आतील तो राम बाहेरी हा राम। ऐसा मनोधर्म ज्यांचा असे। ऐसे प्रेम कोठे आतुडेना आता। बालराम माथा ठेवी पायी।।'*** सातवा व आठवा अवतार जीवनात वेळोवेळा होत असतो. म्हणून रामाचा अवतार श्रीदादांचा अवतार कृष्णजन्माचे आधी षष्ठीच्या रात्री उशीरा. श्रीरामाचा अवतार केव्हा कसा होतो याचे वर्णन श्रीतात्यासाहेबमहाराज असे करतात, ***'श्रीराम अवतरला जिकडे तिकडे दृष्टीस भरला।। अवलोकीता दाही दिशा। पडला रामरूपी ठसा।। गती खुंटली श्वासोच्छवासा। माजी राम कोंदाटला। दासाचा हा कैवारी आला।।'***

**

# काळवेळ नामस्मरणासी

***काळवेळ नामस्मरणासी नाही। दोही पक्ष पाही उद्धरती।।१।। रामकृष्ण नाम सर्व दोषा हरण। जड जीवा तारण हरी एक।।२।। हरीनामसार जिव्हा या नामाची। उपमा त्या दैवाची कोण वानी।।३।। ज्ञानदेवी सांग झाला हरीपाठ। पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा।।४।।***

नामाला काळवेळेचे बंधन नाही म्हणजे नाम घेण्याला कोणताही काळ वर्ज्य नाही. नामस्मरण सर्वकाळी करावे. सतत असणाऱ्या श्वासामध्ये असणारे नाम आपण सतत श्वास आहे तोवर घेणे अपेक्षित आहे. श्रीसंत तुलसीदास सांगतात, ***'श्वासो लेवे नाम बिना सो जीवन धिक्कार। श्वास श्वासमो राम-जप वोही धारणाधार।।'*** तर श्रीमामामहाराज सांगतात, ***'काळवेळ नामस्मरणासी नाही। सदासर्वदाही उच्चारावे।।'*** तर संत कबीरसाहेब सांगतात, ***'सीताराम कहोजी मनमो। जबलग श्वास चला तन मो।।'*** तर श्रीनाथहाराज सांगतात, ***'हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।', 'हरी हरी बोला नातरी अबोला। व्यर्थ गलबला करू नका।।'*** तर श्रीसमर्थ सांगतात, ***'संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोचि नये।।',*** संत श्रीवामन पंडित सांगतात, ***'अहो येता जाता उठत बसता कार्य करिता। सदा देता घेता वदनी ग्रास गिळिता।। घरी दारी शय्येवरी रतीसुखाचे अवसरी। समस्ताची लज्जा त्यजुनी भगवच्चिंतन करी।।'*** थोडक्यात काय 'सदा स्वरूपानुसंधान' साधले पाहिजे. 'नाम हे श्वासोच्छ्वासी आहे म्हणजे ते नेमके कुठे आहे? श्वासांत आहे का उच्छ्वासात आहे? नाम हे श्वासातही नाही किंवा उच्छ्वासातही नाही. नाम हे श्वास व उच्छ्वास यांचेमधील संधीकाळात आहे. संधीकाळात असणारे हे नाम साधायची संधी आपण चुकविता कामा नये. जी संधीकाळात साधली जाते ती संध्या, नामस्मरण बिनपाण्याची संध्या आहे' असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत. श्वासोच्छ्वासात जो वेळ जातो त्या आयुष्यावर काळाची सत्ता आहे. पण संधीकाळावर काळाची सत्ता नाही म्हणून ते नाम कालातीत आहे. त्याला काळवेळ नाही. ते नित्य आहे. ***(श्वासोच्छवासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिये पैल नाम आहे। म्हणून तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।। - श्रीदासराममहाराज)*** श्वासोच्छ्वासी असणारे हे नाम गाणारा व ऐकणारा, वक्ता व श्रोता नामाचे रंगात रंगून ऐक्य पावून स्वये श्रीरंगच होऊन जातात. ***'राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।'*** या संत कबीरांचे वचनाप्रमाणे किंवा **'काहीच न करोनी प्राणी'** या श्रीसमर्थ वचनाप्रमाणे आपला अहंकार बसला, कर्तेपणा संपला, मीपणेवीण साधन साधले, की हा जप अनुभवाला येऊन धन्यता प्राप्त होणार आहे. हे नाम अनंताच्या साक्षात्काराचे आड येणारे सारे दोष नष्ट करणारे असून श्रवण करणाऱ्यांचा उद्धार ठरलेला आहे. ***(दोष ते जातील अनंता जन्मीचे। पाय त्या देवाचे न सोडावे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** येथे अनंता जन्मीचे दोष म्हणजे अनंताच्या साक्षात्काराच्या आड येणारे असा अर्थ श्रीदासराममहाराज सांगत. हे जे नाम घेणारे मुख आहे त्या मुखातील जिव्हा नामाचीच (चैतन्याचीच) बनली असून त्यात हरीनाम सार आहे. या हरीमुखाने हरी म्हटला व श्रवण झाला तर पुण्याची गणना कोण करतो. त्याच्या दैवाला पारावार रहात नाही. हे नाम घेणारा स्वत: तर तरतोच पण त्याचे पूर्वजांनाही वैकुंठाचा मार्ग सुकर होतो असा हरीपाठाचा महिमा आहे. ***(मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार। चतुर्भुज नर होऊन ठेले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आपण तरेल नव्हे ते नवल। कुळे उद्धरील सर्वांची तो।।', 'तोचि ज्ञानी खरा। तारी दुजियासी। वेळोवेळा त्यासी शरण जावे।।'-श्रीतुकाराममहाराज)***

आज गोकुळाष्टमी. नामाच्या ठिकाणी गोकुळ विसरणे, अष्टधा प्रकृतीचा विसर होणे ही खरी गोकुळ अष्टमी. अष्टधा प्रकृती म्हणजे मी, ही जाणीव नाहीशी होऊन नवचैतन्य म्हणजे मी आहे हे जाणवणे म्हणजेच कृष्णावतार होणे. ***(अष्ट विसरावे नामी तेची गोकुळअष्टमी।।'-श्रीमामामहाराज, 'गोकुळ चोरून नेले। तेथे कैची दासी जनी।।'- संत जनाबाई)***

**

# नित्यनेम नामी

***नित्यनेम नामी ते प्राणी दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ तया जवळी।।१।।***
***नारायण हरी नारायण हरी। भुक्तीमुक्ती चारी घरी त्याच्या।।२।।***
***हरिवीण जन्म नर्कची पै जाणा। यमाचा पाहुणा प्राणी होय।।३।।***
***ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड। गगनाहोनी वाड नाम आहे।।४।।***

जे नित्य आहे त्याचा नेम धरावा म्हणजे तो कडेपर्यंत चालतो. ज्याचा काही नेम नाही त्याचा नेम धरून तो कडेपर्यंत कसा चालणार? आणि हा अनित्य नेम चालवून हित तरी काय होणार? या जगात नित्य काय आहे हो? श्रीसमर्थ सांगतात, ***'देह अनित्य आत्मा नित्य। हाची विवेक नित्यानित्य।' 'निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य।'.*** आम्ही जो नेम करणार तो निराकार आत्मदेवाला धरून हवा. त्याला सोडून अनित्य देहाच्या अनुषंगाने व्रते, नियम, तीर्थयात्रा काही करू नका. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तुम्ही व्रते नियमू न करावे। शरीराते न पीडावे। दुरी केही न वचावे। तीर्थासी गा।।'*** तेच जो नेम नित्य आत्म्याला धरून आहे त्या नामी नित्यनेमाबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराज काय म्हणतात पहा, ***'नित्यनेम नामी ते प्राणी दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ तयाजवळी।।'*** जो नित्य सत्य मित आत्मा-हरी आहे त्याचे श्वासोश्वासी असणारे नित्य सत्य मित जे नाम आहे, जे अहंकार नाहीसा करणारे-ना'मी'करणारे आहे, जे आत्मप्रत्यय देणारे आहे, त्याचा नेम करणारे दुर्लभ आहेत. ते नाम घेतले असता आतील इच्छा नाहीशी होते. श्रीमामामहाराज सांगतात, ***'नित्याचे नेमाचे असे एकनाम। घेता सरे काम अंतरीचा।'.*** या नित्य आत्म्याचे नाम सतत साधकाला श्रवण व्हावे अशी अपेक्षा श्रीसमर्थ व्यक्त करतात. ते म्हणतात, ***'जेथे नाही नित्यश्रवण। ते जाणावे विलक्षण। तेथे साधके येकक्षण। क्रमु नये सर्वथा।।'*** असे जे नित्य आत्म्याचे चैतन्यरूप नाम ज्या नामाचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज 'नाम परब्रह्म वेदार्थे' असे करतात, तर श्रीदासराममहाराज 'निर्विकल्प नाम' असे करतात, जो सतत अनुभवतो, त्याचेजवळ लक्ष्मीवल्लभ-परमात्मा वास करतो हे सांगावयास नकोच. आत्म्यालाच नारायण, हरी या नावांनी संतानी संबोधिले आहे. ***('चाले हे शरीर कोणाचिया सत्ते कोण बोलविते हरिवीण। देखवी ऐकवी एक नारायण तयाचे भजन चुको नका।।' - श्रीतुकाराममहाराज, 'एक हरी आत्मा जीव शीव समा। वाया तू दुर्गमा न घाली मन।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देह म्हणजे आत्म्याचे घर आहे. आत्म्यामुळे देहरूपी घरात जीवनाची घरघर सुरू आहे त्या घरघरीतच नामाचे योगाने या चारी मुक्ती प्राप्त होतात. श्रीमामामहाराज सांगतात, ***'नाम घेता मुक्ती हे ब्रह्मलिखित। मुक्ती ये शोधत तयेलागी।।'*** तर श्रीदासराममहाराज सांगतात, ***'नारायण हरी नारायण हरी। जीवनी घरघरी चारी मुक्ती।।'.*** हरीच्या प्रत्ययाशिवाय - आत्मप्रत्ययाशिवाय - नामाशिवाय श्वास वाया जाणे हाच नरक आहे. असा प्राणी यमाचा पाहुणचार घेणार हे निश्चित. तर श्वासोच्छ्वासी हे नाम अनुभवले तर नभाला व्यापलेल्या आत्मतत्वाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. ***('आता मज एक सुचला उपाव। घेईन मी नाव श्वासोच्छ्वासी।। आकाशात आत्मा आत्म्यात आकाश। करोनी मनास दाखवीन।।'- श्रीगुलाबराव महाराज, 'मही नव्हे पावक वायू नव्हे उदक। नभासी व्यापक ते काय गे बाई।।'- श्रीरामदासस्वामी, 'आत्मनः आकाशः संभूतः'- उपनिषद', 'जे आकाशाहुनी वाड। जे अव्यक्ताची पैलकड। जे भेटलिया अपाडपाड। पडो नेदी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# सात पाच तीन

***सात पाच तीन दशकांचा मेळा। एकतत्वी कळा दावी हरी।।१।।***
***तैसे नोहे नाम सर्व मार्गा वरिष्ठ। तेथे काही कष्ट न लगती।।२।।***
***अजपा जपणे उलट प्राणाचा। तेथेही मनाचा निर्धारु असे।।३।।***
***ज्ञानदेवा जिणे नामेवीण व्यर्थ। रामकृष्णी पंथ क्रमियेला।।४।।***

सप्तविध धातू, पंचमहाभूते यांचे त्रिगुणात्मक विचाराने दशइंद्रियांचे मार्फत ज्ञान होते. सात पाच तीन दशकांचा मेळ चैतन्याच्या अधिष्ठानावर बसतो. चैतन्यामुळे जडाचे ज्ञान होते. हे जड दृश्य ज्यातून निर्माण झाले ते चंचळ चैतन्य - तत्त्वरूप नाम आहे. म्हणून या नामतत्त्वाचेच जगात महत्त्व आहे. ***('गोविंद म्हणे नामतत्त्व। जगी त्याचेच महत्त्व।।'- श्रीमामामहाराज केळकर)*** हे चंचळ चैतन्य (नाम) आपणाला निश्चळ हरीची भेट घडवून देणारे आहे. किंबहुना नाम हेच सगुण परब्रह्म आहे. ***('घेऊनी येथिचे वर्म। जै विचारिसी हे नाम। तै केवळ हेचि ब्रह्म। जाणसी तू।।', 'नामजपयज्ञु तो परम। बाधू न शके स्नानादी कर्म। नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आला नावरूपा। तुका म्हणे झाला सोपा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जडाचे मूळ चंचळ। चंचळाचे मूळ निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।।'- श्रीसमर्थ, 'चंचळाचे गुणे। झाले उपाधीचे लेणे।।'- श्रीदासराममहाराज)*** या चंचळ चैतन्याने जडाची जाणीव होते. हे चैतन्य जर नसेल तर जडाची जाणीवही होणार नाही. बाकी साऱ्या तत्वांना विकळाचा प्राप्त होईल. श्रीमामामहाराज या एकतत्वी कळेचे महत्त्व श्रीरामपाठात असे सांगतात, ***'रामनाम हे तो एकतत्वी कळा। सर्व तत्वे विकळा तयावीण। एकतत्त्वी कळा शोधोनी पाहाता। तिन्हीची ऐक्यता दिसो येई।। इडा आणि पिंगळा सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।। गोविंद म्हणे सर्व नामामाजी वसे। सकळा श्रेष्ठ कसे नव्हे सांगा।।'.*** इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर प्राप्त होणारी ही एकतत्त्वी कळा (रामनाम) अंतरातील काम नाहीसा करणारी असून प्रपंचातील सायास दूर करून खरा परमार्थ साध्य करून देणारी आहे. सर्वच-ब्रह्मच - या एकतत्त्वी कळेने (नामाने) प्राप्त होते. म्हणून ते सर्व मार्गात श्रेष्ठ आहे हे सांगणे नकोच. मन वासनारहित कामनारहित झाले असता ते एकाग्र होते, स्थिर होते, मनाचा 'एका'बद्दल निर्धार होतो व साधन धरले जाते. प्राणाचा उलट साधून अजपाजप साधला जातो. समर्थ सांगतात, ***'येकाग्र करोनिया मन। बळेची धरावे साधन। यत्नी आळसाचे दर्शन। होऊची नये।।'.*** ज्यामुळे आपण जिवंत आहोत, त्या चैतन्याचे - नामाचे - ज्ञान नसणे, त्या चैतन्याची-नामाची भक्ती नसणे, अशा जगण्याला काय अर्थ आहे? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसे माझिये भक्तीवीण। जळो ते जियालेपण। अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई।।', 'ऐके जया प्राणियाचे ठायी। इया ज्ञानाची आवडी नाही। तयाचे जियाले म्हणो काई। वरी मरण चांग।।'.*** जिवंतपणा व नामाचा संबंध आहे तो संबंध समजला पाहिजे तर जगण्याला अर्थ प्राप्त होणार आहे. जीवनाचा अर्थ समजणार आहे.

**

# जप तप कर्म

***जप तप कर्म क्रिया नेम धर्म। सर्वाघटी राम भाव शुद्ध।।१।।***
***न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।२।।***
***जात वित्त गोत कुळशीळ मात। भजे का त्वरीत भावनायुक्त।।३।।***
***ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। वैकुंठभुवनी घर केले।।४।।***

सर्वांघटी देहादेही हृदयामध्ये सहस्ररश्मी सूर्यप्रकाशक असणारा एक राम हा शुद्ध भावाने प्रचितीला येणारा आहे. या शुद्ध भावाला धरून जपतप कर्मक्रिया नेमधर्म हे सारे व्हावयास हवे. तरच त्याचा उपयोग. संसाराला सुटून ***'होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम।'*** अशा अवस्थेत म्हणजेच *'काहीच न करोनी प्राणी'* अशा समर्थ अवस्थेत हरीबुद्धीने आत्म्याच्या जाणीवेत - विष्णूच्या जाणीवेत हा जप साधणे, या नामजपाच्या अभ्यासाने नामाच्या ठिकाणी प्रकाशाची - बिंदूची प्रचिती येणे व ज्ञानप्रकाशाने मिथ्या कल्पना नाहीशी होणे हे तप, हा जप कोण करतंय, हे तप कोण आचरतंय, त्या कर्त्याला ओळखून कर्म होणे, असे कर्म होण्याकरिता निर्हेतुक सत्क्रिया आचरणे, नित्य नामाचे श्रवण नेमाने होणे, विष्णुमय जग अनुभवणे हा धर्म आचरणे, हे अपेक्षित आहे. अशा प्रकारे जप, तप, कर्म, क्रिया, नेम, धर्म या सर्व क्रिया उपाधीमध्ये सर्वगत असलेल्या चैतन्याला - रामाला - शुद्ध भावाला - धरूनच असल्या पाहिजेत. हा भाव (अस्तित्व) शुद्ध होण्यासाठी, म्हणजे वायुमध्ये असणाऱ्या त्रिगुण व पंचमहाभुतांचा निरास होणेसाठी म्हणजे चत्वार देहांचा निरास होऊन संदेहनिवृत्ती होणेसाठी व त्रिगुणात्मक असार संसार त्यजणेसाठी रामकृष्ण या जीवनाचे गतीमध्ये नित्य नामाचे श्रवण होणे - नित्य नामाचा टाहो फोडणे साधले पाहिजे. जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या भिंती कोसळून पडल्याशिवाय, अंत:करणातील सर्व भेदभाव नाहीसा झाल्याशिवाय त्या एकाची जाणीव होणार नाही. त्या 'एकाची' जाणीव झाली तर जातच्या जात, जमातच्या जमात एकभावाने, भावनायुक्त अंत:करणाने भजन करेल, खऱ्या अर्थाने एकात्मता साधेल. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'पै आपुलेनी भेदेवीण। माझे जाणिजे एकपण। तयाचि नाव शरण। मज येणे गा।।', 'तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया। का शूद्र अंत्यजादी इया। जाती तवचि वेगळालिया। जव न पवती माते।।'.*** आमचे मामा म्हणायचे की जेथे संध्याकाळी रोज आरतीचे वेळी घरातील सगळी माणसे देवापुढे हात जोडून उभी आहेत, अगदी ढोंग म्हणून, असे ज्या घरात घडत असेल ते घर जगाला भारी होईल. मग समजा जातच्या जात, जमातच्या जमात ही भावनायुक्त अंत:करणाने जर भगवंताचे भजन करेल तर काय निर्माण होईल, असा प्रश्न आहे. कामक्रोधरहित झाल्याशिवाय हे भजन साधता येत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज कामक्रोधाना 'भजनमार्गीचे मांग' असे संबोधतात. ते म्हणतात, ***'हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गीचे मांग। मारक जे।।'.*** कामक्रोधरहित अवस्थेत रामकृष्ण गतीत मन मुरल्यावर सूत्राच्या मध्यभागी जन्ममरणरहित अवस्थेत मृत्युलोकातच या वैकुंठाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. ***('कही एकाधेनी वैकुंठा जावे। ते तिही वैकुंठचि केले आघवे। ऐसे नामघोषगौरवे। धवळले विश्व।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तुका म्हणे त्यांनी। केली वैकुंठ मेदिनी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आम्हा येणे जाणे नाही। आम्हा येथेचि वैकुंठ पाही।।'- संत निजानंद)***

✻✻

# जाणीव नेणीव भगवंती नाही

***जाणीव नेणीव भगवंती नाही। हरी उच्चारणी पाही मोक्ष सदा।।१।।***
***नारायण हरी उच्चार नामाचा। जेथे कळीकाळाचा रीघ नाही।।२।।***
***तेथील प्रमाण नेणवे वेदासी। ते जीव जंतुसी केवी कळे।।३।।***
***ज्ञानदेवा फळ नारायणपाठ। सर्वत्र वैकुंठ केले असे।।४।।***

जेथे जाणीव नेणीव उरत नाही, तेथे काहीच उरत नाही. अगदी प्राणाचीही हालचाल सूक्ष्म होते. अशा चारी वाचेपलीकडील अवस्थेत हरिवाचेने हरीचा गजर होतो. अशा नामाचा गजर आपणाला जर श्रवण झाला तर ब्रह्मानंद होतो. मोक्ष प्राप्त होतो. ***'जेथे जाणीव नेणीव नाही। तेथे काहीच उरले नाही।।'- श्रीकेशवस्वामी, 'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी।', 'जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले।।'- श्रीसमर्थ, 'वाचा या सारूनी चार। हरि वाचे हरिचा गजर।।'- श्रीदासराममहाराज, 'रामनाम ध्वनी उमटे। तेथे लक्ष लावी नेटे। ब्रह्मानंद सहज भेटे। प्रचूर प्रचूर। जपतू रामनाम किती।।।'- बांदकरमहाराज.*** ही संतवचने एकत्रितरित्या हेच स्पष्ट करतात. जाणीव नेणीवरहित होणे म्हणजे त्रिगुणरहित होणे, असार संसार त्यागून साधन बरवे होणे होय. ***('शुद्ध जाणीव सत्वगुण। शुद्ध नेणीव तमोगुण। जाणीवनेणीव रजोगुण। मिश्रित चालिला।।'- श्रीसमर्थ, 'संसार समस्त त्रिगुण'- श्रीनाथमहाराज, 'असारा संसारा त्यजुनी बरवे साधनकरी।'- श्रीसमर्थ)*** जाणीव नेणीवरहित होणे म्हणजे ज्ञान अज्ञान यांचे पलीकडील समाधानकारी वृत्तीरहित ज्ञान-विज्ञान प्राप्त होणे होय. ***('ज्ञान म्हणजे जाणणे। अज्ञान म्हणिजे नेणणे। विपरीत ज्ञान म्हणिजे देखणे। येकाचे येक।।', 'ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे हे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।'- समर्थ)*** जाणीव नेणीवरहित होणे म्हणजे ज्ञानाज्ञानापैल अखंडस्मरण प्राप्त होणे होय. ***(अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।।'- श्रीदासराममहाराज)*** हरी उच्चारणी जाणीव नेणीवरहित अवस्थेत मोक्ष प्राप्त होतो म्हणजे काय होते हो? जन्ममरणरहित अखंड स्मरण अखंड जीवन प्राप्त होणे म्हणजे मोक्षप्राप्ती. ***(अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज)*** ज्या ठिकाणी कळीकाळाला प्रवेश असत नाही तोच 'नारायणहरी' नामोच्चार आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'श्वासोच्छ्वासी वेळ। तया ग्रासी काळ। तयाचिये पैल नाम आहे।। म्हणोनि तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।'.*** ह्या वृत्तीरहित ज्ञानाचे, निवृत्ती अवस्थेतील स्मरणाचे वर्णन वेदांनाही करता आले नाही तर मग सामान्य जीवांचे काय होणार? वेद हे महाकारणदेहात तुर्यावस्थेत ऋषीमुनींना श्रुत झाले. तुर्येतील ज्ञान हे द्वैतातील ज्ञान असून ते पदार्थज्ञानच आहे असे श्रीसमर्थ मानतात. या पदार्थज्ञानाचा आत्मा हा विषय नसून आत्म्याचा विषय ज्ञान आहे. ज्ञानाने आत्मा सिद्ध होत नाही. आत्म्याने ज्ञान सिद्ध होते. वेदांना जेव्हा खरे ज्ञान (वृत्तीरहित अद्वैतज्ञान) झाले तेव्हा ते मूक अवस्थेत आले. ते ज्ञान शब्दात प्रगट होऊ शकत नाही, ते अनिर्वाच्य असते. श्रीज्ञानेश्वरमहाराज वेदाच्या या अवस्थेचे वर्णन असे करतात, ***'वेद जेथ मुके जाले। मन पवन पांगुळले। रातीवीण मावळले। रविशशी जेथ।।'.*** या नारायण नामाच्या अनुभवाने जन्ममृत्यूरहित अवस्थेत येण्याजाण्याची क्रिया थांबली असता, वय कुंठीत झाले असता, सर्वत्र वैकुंठ नाम परमात्मा अनुभवाला येतो असा नामाचा महिमा आहे.

**

# एक तत्त्व नाम

***एक तत्त्व नाम दृढ धरी मना। हरीसी करुणा येईल तुझी।।१।।***
***ते नाम सोपा रे रामकृष्ण गोविंद। वाचेसी सद्‌गद जपे आधी।।२।।***
***नामापरते तत्व नाही रे अन्यथा। वाया आणिका पंथा जाऊ नको।।३।।***
***ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरी जपे सदा।।४।।***

जे मनाला घट्ट पकडते ते तत्वरूप नाम होय. मग नाम घेताना मन लागत नाही ही सबब येथे चालेल का? आपले मन जर नाम घेताना लागत नसेल तर आपणाला तत्वरूप नाम समजले नाही असाच याचा अर्थ होतो. तत्वरूप नामाचे अभ्यासाने मनोलय साधला असता चैतन्याचा-हरीचा-अनुभव प्राप्त होतो. हरीकृपा आपणावर होते व हरीकृपेने सारे आयुष्यच बदलून जाते. हे तत्वरूप नाम सोहंचे अभ्यासाने सद्‌गतीने सद्‌गतीत होऊन इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्या असता - रामकृष्ण या गती हरीरूप (गोविंदरूप) झाल्या असता - चारीवाचेपैल प्राप्त होणारे आहे. तत्वरूप नामाच्या अभ्यासाने पवनविजय साधला असता मनोलयाने मनोजय साधणारा आहे. मनोजयाने परमार्थात सर्वत्र विजयच प्राप्त होणारा आहे. मनोलयाने सारा तपशील बाजूला होऊन चैतन्याची - मूळतत्वाची गाठ पडणारी आहे. मनोलय साधल्यावर - कल्पनेच्या निरासाने या दृश्याचा लय होऊन जे अनुभवाला येते ते ‘निर्विकल्प नाम’ म्हणजेच परब्रह्म आहे. जे या विश्वाचे मूळ आहे. हे विश्वाचे उगमस्थान केवळ आनंदाचे आहे. ***‘निर्विकल्प नाम। तेचि जाण परब्रह्म।।’- श्रीदासराममहाराज, ‘जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ। जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।’- श्रीसमर्थ.*** ही सारी संतवचने वरील विधानास पुष्टी देणारीच आहेत. प्रवाहपतित होणे सोपे असते, उगमापर्यंत पोहत जाणे फार अवघड आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***‘येक बळाचे निवडले। ते पोहतचि उगमास गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।।’.*** मूळतत्वापर्यंत - परब्रह्मापर्यंत घेऊन जाणारे हे तत्वरूप नाम सर्वात श्रेष्ठ आहे. या नामासारखे तत्व शोधून सापडणारे नाही. म्हणून या नामतत्वाचेच जगात महत्त्व आढळून येते. श्रीमामामहाराज सांगतात, ***‘गोविंद म्हणे नामतत्व। जगी त्याचेच महत्त्व।।’.*** इतर मार्ग जर आपण अवलंबले तर मूळतत्वाची गाठ पडणार नाही. ते प्रयत्न वाया जाणारेच आहेत. ***‘पंथ आहेती अनेक। दाविती ना विठ्ठल एक।।’*** हे श्रीमामामहाराजांचे वचन हेच स्पष्ट करते आहे. म्हणून अंतरी असणारी अजपाजपाची माळ - हरीनामाची माळ धरून मनोलयाने मौन साधून श्रीहरीचा अनुभव आपण सदा घेतला पाहिजे.

✻✻

# सर्वसुखगोडी

***सर्वसुखगोडी साही शास्त्र निवडी। रिकामा अर्धघडी राहू नको।।१।।***
***लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण।।२।।***
***नाममंत्रजप कोटी जाईल पाप। रामकृष्णी संकल्प धरूनी राहे।।३।।***
***निजवृत्ती काढी सर्व माया तोडी। इंद्रिया सवडी लपू नको।।४।।***
***तीर्थव्रती भाव धरी रे करुणा। शांतिदया पाहुणा हरी करी।।५।।***
***ज्ञानदेवाप्रमाण निवृत्ती देवी ज्ञान। समाधी संजीवन हरिपाठ।।६।।***

विषयभोगातून ***'सुखस्यानन्तरं दुःखं'*** अशा पद्धतीने होणारे खंडित सुख किंवा कोणत्याही साधनातून प्राप्त होणारे, द्वैतातून प्राप्त होणारे सुख याला संतमहात्मे खरे सुख मानत नाहीत. ***'म्हणोनि विषयभोगी जे सुख। ते साद्यंतची जाण दुःख। परी काय करिती मूर्ख। न सेविता न सरे।।'*** हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन व ***'यत् सुखं साधनाधीनं तद्दुःखमेवच। अकृतिममनाद्यंतं तत् सुखं सात्विकं विदुः।'*** हे श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात उध्दृत होणारे वचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. द्वैतातून प्राप्त होते ते सारे दुःखच. आपण दुःख कमी होणे म्हणजे सुख समजतो ते खरे सुख नव्हे. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'प्रपंचामाजी असते सुख। तरी का त्यजिते सनकादीक। द्वैत तितुके केवळ दुःख। परमसुख अद्वैती।'.*** जोवर द्वैत अनुभवाला येते तोवर इच्छा-आशा- निर्माण होते व ही आशाच दुःखाला कारणीभूत होते. आशा गेली की अद्वैत अनुभवाला येते किंवा अद्वैत अनुभवाला आले की आशा जाते व परमसुखाची प्राप्ती होते. अध्यात्मरामायण सांगते, ***'आशया परमंदुःखं नैराश्यं परमं सुखं।'.*** संपूर्ण सुख, अखंड सुख, सर्वसुख, जेथे दुःखाला प्रवेशच नाही असे सुख, जे संतांना अपेक्षित आहे ते फक्त अद्वैत आत्म्यापासून आत्म्याला होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जे होये। तया नाम सुख।'.*** जीवाला आत्मप्राप्ती झाल्यावर जे होते, त्याला सुख म्हणतात. आत्मप्राप्ती न होता जे असते ते सारे दुःखच असते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आणि ऐसी हे अवस्था। न जोडता पार्था। जी जे तेचि सर्वथा। दुःख जाणे।'.*** अर्थात आत्मप्राप्तीनंतर सर्वसुखच त्याला प्राप्त होते. साही शास्त्रांनी या सर्वसुखाचा - आत्मसुखाचा पुरस्कार केला आहे. हे सर्वसुख प्राप्त होण्यासाठी एक क्षणही आत्मप्रचितीशिवाय वाया घालवता कामा नये. तरच तो खऱ्या अर्थाने दुःखमुक्त, रिकामा होणारा आहे. हरिच्या प्रचितीशिवाय होणारी वाया येरझार - लटका व्यवहार - हाच संसार आहे. ही येरझार हरीचा (आत्म्याचा) प्रत्यय देणारी व्हावयास हवी. संकल्पविकल्परहित अवस्थेत रामकृष्णी सत्य संकल्प जर आपण धरला (निश्वासाला प्रमाण आले) तर नादश्रवण-नामश्रवण होऊन पापाचा प्रकारच नाहीसा होणार आहे. या नाममंत्राचे श्रवणाने किंवा नामाचे ठिकाणी रूपाची प्रचिती येऊन होणाऱ्या निजत्वाच्या बोधाने ('निजत्व म्हणजे नामरूप।'-श्रीमामामहाराज) मायेचा निरास होणारा आहे. इंद्रियामागे लपलेला आत्मा दाही दिशांना प्रगट होणारा आहे. सर्वत्र आत्मरूप प्रत्ययाला आल्याने तीर्थव्रताचे ठिकाणी हरीची प्रचिती येऊन त्यांचेबद्दल प्रेम निर्माण होणारे आहे. श्रीनिवृत्तीनाथमहाराजांचे कृपेने निवृत्ती अवस्थेत होणाऱ्या स्मरणाने - वृत्तीरहित ज्ञानाने - संसरण शांत होऊन विश्रांतीची स्थिती (समसुखाने समाधान देणारी संजीवन समाधी) श्रीज्ञानेश्वरमहाराजांना प्राप्त झाली. ***('समजीवन हे असे संजीवन। देहासी सुटून राहीया। संजीवन स्थिती समाधीसी गेले। समाधी राहिले संजीवन।।'-श्रीदासराममहाराज)*** श्रीनिवृत्तीनाथमहाराजांचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे केले आहे, ***'निवृत्ती जयाचे नाव। निवृत्ती जयाची बरव। जया निवृत्तीचे राणीव। निवृत्तीची।।'.*** **

# अभंग हरिपाठ

***अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस। रचिले विश्वासे ज्ञानदेवे।।१।।***
***नित्यपाठ करी इंद्रायणी तीरी। होय अधिकारी सर्वथा तो।।२।।***
***असावे स्वस्थ चित्त एकाग्र मन। उल्हासे करून स्मरण जीवी।।३।***
***अंत:काळी तैसा संकटाचे वेळी। हरी तया सांभाळी अंतर्बाह्य।।४।।***
***संतसज्जनांनी घेतली प्रचिती। आळशी मंदमती केवी तरे।।५।।***
***श्रीगुरुनिवृत्ती वचन प्रेमळ। तोषला तात्काळ ज्ञानदेव।।६।।***

हरीपाठ पठणाची फलश्रुती सांगणारा हा अभंग आहे. हरीपाठाचे २८ अभंग आहेत हे या अभंगात स्वत: श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी नमूद केले आहे. अर्थात हरीपाठाचे २८ अभंग आहेत हे वेगळे सांगणे नकोच. चंद्राच्या सोळा व सूर्याच्या बारा कळा एकत्र झाल्यावर श्वास विज्ञानात्मक - विशेष प्रकारचा श्वास - विश्वास होतो. अशा विश्वासातून विश्वासी 'ज्ञानदेव तु कैवल्यम्' अशा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हे अभंग प्रगट केले आहेत. सोळा व बाराच्या मिळणीतून प्रगट झालेला - श्रुत झालेला - अनुहत ध्वनी (गलगा) म्हणजे हा हरिपाठ आहे. ***'बारा सोळा जणी गडे ग बारा सोळाजणी। मिळोनी येती गलगा करिती मशी गेल्या घेऊनी।।'*** हा श्रीमहीपतीमहाराजांचा अनुभव सारे काही स्पष्ट करणारा आहे. या बारा सोळाचे ऐक्यातून श्रीहरीची अनुभूती आहे, हे अठ्ठावीस एकत्र आले, या अठ्ठावीसांचा योग झाला की वीटेवरती परमात्मा उभा राहतो हे स्पष्ट करणारा हा हरिपाठ असल्याने याचे अभंग अठ्ठावीस आहेत, याबद्दल कोणताही संदेह राहणार नाही. ***('बारा सोळा जणी हरिसी नेणती। म्हणोनि फिरती रात्रंदिवस।।'- श्रीनाथमहाराज, 'युगे अठ्ठावीस वीटेवरी उभा।।'- श्रीनामदेवमहाराज)*** अशा 'नित्य हरिपाठाचा' नित्यपाठ स्वस्थ चित्ताने एकाग्र होऊन आल्हादाने स्मरणपूर्वक केला असता तो परमार्थात अधिकारी होतो. देहभाव लयाला जाऊन तो देवरूप होतो - अनंत होतो. मग तेथे संकटाची काय मातब्बरी आहे. हरी त्याचा अंतर्बाह्य सांभाळ करतो, याची प्रचिती 'नित्य हरीपाठाचे' नित्य पठण करणाऱ्यांनी घेतली आहे. जे साधनाभ्यासाचा आळस करणारे आहेत, ज्यांचा देहभाव गेलेला नाही, ज्यांची द्वैतबुद्धी जागृत आहे असे मंदमती, त्यांना ही प्रचिती कशी प्राप्त होणार? हा हरिपाठ रचल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी तो आपले सद्‌गुरू श्रीनिवृत्तीनाथमहाराज यांना दाखविला. तेव्हा श्रीनिवृत्तीनाथमहाराज यांना फार आनंद जाहला. त्यांनी धन्योद्‌गार काढले. प्रत्यक्ष सद्‌गुरूंनी कौतुक केल्याने श्रीज्ञानेश्वरमहाराजांना संतोष झाला. गुरुकृपेने आत्मज्ञानाने असा संतोष (समाधान) प्राप्त होणे ही खरी हरिपाठ पठणाची फलश्रुती आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'गुरु तेथ ज्ञान। ज्ञानी आत्मदर्शन। दर्शनी समाधान। आथी जैसे।।'.*** असे काही समाधान श्रीमहाराजांनी आपणाला द्यावे अशी प्रार्थना करतो व येथेच थांबतो.

✻✻

## भाद्रपद शुद्ध

***स्मरणाचा देव जाणे कोण गाव। टाळी स्वयमेव मुखी नाम॥१॥***
***गणेश चतुर्थी ऋषीची पंचमी। नवविध भक्ती नामी अनंताची॥२॥***
***दास म्हणे पूर्ण कळा ते जाणावी। मने उमगावी अंतर्यामी॥३॥***

१) कोणस्थानी होणाऱ्या स्वयमेव टाळीचे (नादाचे) - स्वयमेव नामाचे - अखंड अनुसंधानाने अखंडस्मरणाचा देव अखंड जाणला जातो.

२) नादानुसंधानाने आधी मन (मनाची आधीची अवस्था - शुद्धसत्वरूप मन) हा गणराज गणपती साक्षात्काराला आला असता मनोलयाने इंद्रियांचे वर स्वामीत्व हा ऋषींचा प्रसाद प्राप्त होतो. विषय इंद्रिये ही जड आहेत हे ओळखून विरक्तीने होणाऱ्या कामाच्या त्यागाने चैतन्याकडे वृत्ती वळणे या नवभक्तीने नामाचे तप साधून अनंताचा साक्षात्कार होतो.

३) नामाचा बिंदू घडून चित्कळेचा अनुभव सर्वसाक्षी मनाला प्राप्त होतो व संपूर्ण मनोलयाने परमार्थात पूर्णता प्राप्त होते. हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने भाद्रपद महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## भाद्रपद वद्य

***विकल्प दुर्बुध्दीपैल निर्गुणीचे सुख। साधनाचा हरीख साधकासी॥१॥***
***नाम खरे ज्ञान हरीकथा कीर्तन। निरुपण भजन अहर्निश॥२॥***
***नामाचे व्यापारी साक्षीचा उपदेश। प्रसाद मोहनाश दास म्हणे॥३॥***

१) संकल्प विकल्प करणारे मन व संकल्प विकल्पाने होणारी द्वैताची जाणीव - आकाराची जाणीव ज्या बुद्धीला होते ती द्वैतबुद्धी स्वरूपाचे ठिकाणी अर्पण झाल्याशिवाय साधकाला अद्वैताचे निश्चळ निर्गुणसुखाची प्राप्ती साधनात होत नाही.

२) मन मुरल्यावर जे न बदलणारे चैतन्याचे खरे ज्ञान होते तेच नाम आहे. ती चैतन्याची होणारी अखंड जाणीव म्हणजेच हरीकथा कीर्तन निरूपण भजन आहे.

३) ह्या सर्वसाक्षी मनाला सतत होणाऱ्या चैतन्याच्या जाणीवेने जाणीवेचा ग्रास होतो. देवा भक्तातील भेद नाहीसा होणे हा प्रसाद प्राप्त होतो. त्या देवाचे दर्शनाने तो संसारमोहातून मुक्त होतो.
हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने भाद्रपद महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# स्मरणाचा देव

वायुरूप चैतन्य व त्याठिकाणी असणारी जाणीव-स्मरण हाच खरा देव आहे. आपल्या अंतर्यामी असणारी ही जाणीव (स्मरण) विश्वात भरून राहिली आहे. हे स्मरणच विश्वाचे पालन करत असते. या अंतर्यामी असणाऱ्या चैतन्याच्या अखंड स्मरणाने देहाचे, दृश्याचे स्मरण किंवा निद्रावस्थेत विस्मरण होते. या देहाच्या स्मरण विस्मरणाने प्रतीत होणारी देहातील स्मरणशक्ती ही ज्याच्यामुळे प्राप्त होते तो स्मरणाचा देव अखंड स्मरणरूप आहे. पण या देहाच्या होणाऱ्या स्मरणाने किंवा विस्मरणाने चैतन्याचे अखंड स्मरण कधीच प्राप्त होत नाही. देहाच्या जाणीवेत जे आम्ही त्याला स्मरतो ते खरे स्मरण नव्हे. ते स्मरणातले विस्मरणच आहे. श्रीनाथमहाराज आमच्या स्मरणाबद्दल सांगतात, ***'नाम वदता हे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।'*** हे अंतर्यामी असणारे चैतन्याचे अखंड स्मरण जर देहातून बाहेर पडले तर देह कायमचा विस्मरणात जातो. हेच देहाचे मरण. अर्थात देहात असताना जर जाणीवेत आपण देहाला विसरलो तर ह्या चैतन्याच्या अखंड स्मरणाची जाणीव होते. हे अंतर्यामी अखंड स्मरण आहे म्हणून मला झोप लागली होती हे सकाळी उठून सांगता येते. आम्ही एखादी गोष्ट विसरतो हे कुणाला आठवते. आत ते अखंड स्मरण आहे म्हणूनच ना? हे अखंड स्मरण बाहेर पडले तर विसरलेले आठवेल का? हे अंतर्यामी असणारे अखंड स्मरण हाच देव आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***'स्मरण देव स्मरण देव जाणा। स्मरण चिंतने जग चाळवी त्यास तुम्ही का नेणा।। स्मरण जाता विस्मरणाने पाही देह जातो। मागे पुढती कोणी न राहे कोण राहू पाहतो।। स्मरण हरीरूप ओळखण अंशे अंश रिधावा। जेणेवीण काही न चाले तोची बरा ओळखावा।। दास म्हणे रे समजल्यावीण सकळ काही खोटे। जवळीच आहे परी भासेना मायालाघव मोठे।।'.*** साधनाभ्यासाने देहाचे विस्मरण होऊन चैतन्याचे स्मरण होणे, या अखंड स्मरणाचे स्मरण होणे, हेच खरे नामस्मरण आहे. ज्याला सतत चैतन्याचे अखंड स्मरण प्राप्त होते तो देव. ज्याला चैतन्याचे स्मरण होतच नाही तो दानव तर ज्याला काही काळ चैतन्याचे स्मरण व काही काळ चैतन्याचे विस्मरण होते तो मानव. श्रीसमर्थ सांगतात, ***'स्मरण म्हणिजे देव। विस्मरण म्हणिजे दानव। स्मरण विस्मरणे मानव। वर्तती आता।।'.*** आपण कोण आहोत व आपणास काय व्हावयाचे आहे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. साधनाभ्यासाने त्रिगुणाचा निरास झाला असता चौथ्या गुणाच्या साहाय्याने तिन्ही अवस्थांची एक अवस्था होऊन महाकारणदेहात हे अखंड स्मरण प्राप्त होते. या अखंड स्मरणाबद्दल अधिक खुलासा करणारी श्रीदासराममहाराजांची अभंग वचने पुढीलप्रमाणे - ***'स्मरणाचा प्रकाश बरा। दावी अज्ञानांधःकारा।।', 'हरीचे स्मरण नुरवी विस्मरण। रुक्मिणीरमण तृष्ट होय।', 'अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।', 'अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।', 'महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।।', 'नामाचे साधनी अखंड स्मरण। नुरवी जे मौन आणि बोल।।'*** हे अखंड स्मरण, शरीरभाव-देहभाव विरून जेव्हा सोहंभाव प्रगट होतो तेव्हा प्राप्त होते. ***('तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सोहंभावे स्मरला स्मरला नाहीच की विस्मरला।'- संत शिवदिनी)*** हे अखंडस्मरण प्राप्त झाले असता तात्काळ मुक्ती प्राप्त होणारी आहे. ***('अखंडस्मरणे अद्वय भजने वाजवी करटाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तात्काळी।।'- श्रीनाथमहाराज)***

✲✲

# कोणगाव

स्मरणाचा देव ज्या ठिकाणी जाणला जातो त्या शरीरातील ठिकाणाला **कोण**स्थान - **कोण**गाव म्हणतात. या **कोण**गावी आत्मा-विठ्ठल राहतो. हा शरीरातील कानाकोपरा मात्र आपणास ठाऊक हवा. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'कोणेगावी आहे सांगा हा विठ्ठल। जरी ठावा असेल तुम्हा कोणा। लागतसे पाया येत लोटांगणी। मात तरी कोणी सांगा याची।।'***. हा काही प्रश्न केलेला नाही. ***'ऐसे स्थळ आहे कोठे। तुकयाला विठ्ठल भेटे।।'*** असे सांगणारे श्रीतुकाराममहाराज 'देव कुठल्या गावाला आहे?' असा प्रश्न आम्हाला विचारतील हे संभवत नाही. श्रीतुकाराममहाराज सांगतात, 'तुम्हाला जर कोणी देव कोठे आहे असे विचारले तर दडपून सांगा **कोणेगावी** देव आहे म्हणून. फक्त हा **कोण** संतांकडून समजून घ्या म्हणजे झाले. या **कोणस्थानी** जर आपला गुरुकृपेने प्रवेश झाला व विठ्ठलाचा साक्षात्कार झाला तर उठाउठी अभिमान नाहीसा होतो व अहंकाराच्या अभावे तो देवच होतो. ***('उठाउठी अभिमान। जाय ऐसे स्थळ कोण।।'- श्रीतुकाराममहाराज, 'माझिये साक्षात्कारी। सरे अहंकाराची वारी। अहंकारलोपी अवधारी। द्वैत जाय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।।'- श्रीमामामहाराज केळकर)*** साक्षात्काराने देवच झालेले संत हे या **कोण**स्थानीच राहतात. म्हणून संत येथे आम्हाला सापडत नाहीत. ***(कोणे ठायी संत राहती आपण। तो तुम्हा ठिकाण आतुडेना।।'- श्रीतुकाराममहाराज)*** जन्ममरण चुकविणारे हरीनाम जर आपण घेतले तर होणारे पुण्य या **कोण**स्थानी साठते. 'हे **कोण**स्थान हे पुण्यमापक यंत्र आहे' असे श्रीदासराममहाराज सांगत. ***('हरीमुखे म्हणा हरीमुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** **कोण**स्थानी साठणाऱ्या या **कोण**पुण्याने कोणस्थानी हरीची पाऊले साक्षात्काराला येतात. हरी हाताला येतो व त्याला भय-चिंता उरत नाही. ***('कोण पुण्य फळा आले। आजी देखिली पाऊले।।' 'कोण पुण्ये यांचा होईन सेवक। जिही द्वंद्वादीक दुरावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'कोण पुण्ये हरी येईल हातासी। विचारी मानसी हिताहित।।'- श्रीमामामहाराज)*** **कोण**स्थानी स्मरणाचा देव जाणला तर अखंड स्मरण प्राप्त होते. त्यांचा सदा नामजप होत राहतो. नामस्मरणाने समाधान प्राप्त होते. त्याला अखंड स्मरणाने मोक्ष प्राप्त होतो. ***('सदा नामजप करी तरी कोण। सांगा निवडोन मायबाप।।', 'अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज, 'स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे। नामस्मरणे पावावे समाधान।।'- श्रीसमर्थ)*** दृश्याशी तादात्म्य असणारे मन जर गुरुपदी जडले तर **कोण**स्थानी गेलेल्या **कोण**जनांचे **कोण**मनाला (सर्वसाक्षी मनाला, पाहत्या मनाला) हे सारभूत नाम श्रवण होते. ***('कोण जनाला कोण मनाला मानवले सार। रामावीण सर्वही शीण दु:ख अनिवार। संग सोडी राम जोडी भजनी निष्काम। धन्य तुम्ही धन्य आम्ही गाऊ रामनाम।।' - संत वेणाबाई, 'कोणी काही म्हणा मना जडले।। गुरुरंगाने रंगून गेले। न घडावे ते घडले।। पृथ्वीचे जळ आकाशमार्गी। न चढावे ते चढले।। भगवंतात्मज म्हणे गुरुपातक। न घडावे ते घडले।।'- श्रीभगवंतात्मज)*** आपला प्रवेश या **कोण**गावात झाला आहे का नाही हे आपल्या वागण्यावरून समजते. ***(तुम्ही या गावचे की त्या गावचे आडनाव सांगा काय तुमचे।। प्रपंच करता दिनरजनी। किंवा असता हरीभजनी।। कर्मफळे तुम्ही मनी धरता। किंवा आत्मनिवेदन करिता।।'- नगदनारायण)***

**

# टाळी स्वयमेव मुखी नाम

आज भाद्रपद शु.३ हरतालिका व्रत. आज कुमारिका, स्त्रिया नवरा चांगला शिवस्वरूप मिळावा व समाधानाने संसार व्हावा याकरता हरतालिका व्रत करतात. परमार्थदृष्टीने जीवाशिवाचे ऐक्य होणे, जीव शिवाशी समरस होणे याला 'लग्न' म्हणतात. हे ऐक्य व्हावे म्हणून देहबुद्धी व आत्मबुद्धी या दोन प्रातिनिधिक देवतांची पूजा केली जाते. देहबुद्धी आहे तोवर देहाचे स्मरण-विस्मरण, देहाची व दृश्याची संगत होणार. देहबुद्धीची आत्मबुद्धी झाली तर अखंड स्मरणाने सतत आत्म्याचेच ज्ञान - अहर्निशी परमार्थ होणार. दाही दिशांना चित्प्रकाश दिसून भाग्य उजळले जाणार. नवऱ्याच्या रूपाने सतत परमात्म्याचेच सान्निध्य लाभणार. सत्संगती लाभणार म्हणून देहबुद्धीची आत्मबुद्धी होणे महत्त्वाचे आहे. ***('म्हणोनि देहबुद्धी हे झडे। तरीच परमार्थ घडे। देहबुद्धीने विघडे। ऐक्यता ब्रह्मीची।।', 'देहबुद्धी हे आत्मबुद्धी करावी। सदा संगती सज्जनाची धरावी।।', देहबुद्धी नेणो काही। दास अंकीत रामापायी।।' - श्रीसमर्थ, 'तुका म्हणे जीवीशीव। हाची येथीचा अनुभव।।'- श्रीतुकाराममहाराज, 'उजळले भाग्य दाही दिशा चित्प्रकाश गे। कृष्ण नवरा झाला आता कवणाची आस गे।।'- संतवचन)*** देहबुद्धीने देहाच्या जाणीवेत, चैतन्याच्या-आत्म्याच्या नेणीवेत, ***'हाका मारिसी ज्याच्या नावे। त्याचे गावची नाही ठावे।'*** या संतवचनाप्रमाणे नाम रूपाला मेळ नसणारे व अवघा वाचेचा गोंधळ असणारे, नाम मुखाने घेतले व दोन हातानी टाळी वाजविली तर होणारे मर्यादित शारीरिक, व्यावहारिक लाभ वेगळे व कोणस्थानी अखंडस्मरणरूप देवाचे दर्शन झाल्यावर आत्मबुद्धीने देहाच्या विसरात व अखंड चैतन्याच्या आठवात होणारे सहज स्वयमेव नामस्मरण व श्रुत होणारी स्वयमेव टाळी याने होणारा आत्मलाभ, होणारे आत्मसुख वेगळे. जोवर आत्मसुख हा आत्मलाभ प्राप्त होत नाही तोवर होणारे शारीरिक, व्यावहारिक लाभच श्रेष्ठ वाटतात. पण एकदा आत्मसुखाची गोडी लागली, आत्मलाभ झाला की हे सारे लाभ आत्मलाभापुढे तुच्छ वाटतात. ***('आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो का सकळ विषया। जेयाचे ठायी इंद्रिया। मानू नाही।।', 'आत्मलाभासारीखे गोमटे काहीच न देखे। म्हणोनि भोगविषेखे। हरिखे ना जो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अखंड स्मरणे अद्वयभजने वाजवी करटाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तात्काळी।।'- श्रीनाथमहाराज)*** देहबुद्धी जागृत असणाऱ्या आमच्यासारख्या माणसाने सद्गुरुंकडून उपदेश घेतला तर त्याला अनुग्रहाचा - उपदेशाचा बोध होत नाही. त्याचा अहंकार नाहीसा होत नाही. त्याला सद्गुरुंचे महत्त्व उमगत नाही. तेच आत्मबुद्धी जागृत असणाऱ्याने जर अनुग्रह घेतला तर त्याला अनुग्रहाचा बोध होऊन अहंकार नाहीसा होऊन साक्षात्कार होतो. त्याला मोक्षाची प्राप्ती होते. आत्मबुद्धीला सद्गुरुंचे महत्त्व उमगते. आत्मबुद्धी देहबुद्धीला सद्गुरुंचे महत्त्व सांगते. श्रीतुकाराममहाराज हे रूपक अभंगातून असे मांडतात, ***'सखी पुसे सखयेसी। सद्गुरूंची महिमा कैसी। हे गूज सांगे मजपाशी। सखयेबाई सखयेबाई। सद्गुरू हा दयाळ मोठा। तोडी अहंकाराच्या वाटा। नेऊनी बसवी मूळपीठा। सखयेबाई। तुका म्हणे अहो बाई। नवल मी सांगू काई। पुन्हा जन्ममरण नाही। सखयेबाई।।'*** भाद्रपद शु.३, २८ ऑगस्ट १९०० या दिवशी श्री चिमडमहाराजांचे ज्येष्ठ अधिकारी चिरंजीव व श्रीतात्यासाहेबमहाराजांचे जावई श्रीदाजीसाहेबमहाराज यांनी ईशचिंतन करीत देह ठेवला. त्यांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

✻✻

# श्रीगणेश चतुर्थी

आज भाद्रपद शु.४, गणेश चतुर्थी. आज घरोघर मंगलमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते व घरातील वातावरण त्या मंगलमूर्तीच्या आगमनाने मंगलमय होऊन जाते. घरोघरी प्रतिष्ठापित गणपतीची मूर्ती रीतीरिवाजाप्रमाणे १।।, ३, ५, ७, ९, ११ दिवस, क्वचित एक वर्षापर्यंत पुजली जाते. मग त्या मूर्तीचे विसर्जन केले जाते (तत्वाचे नाही) त्या दिवशी ती खोली, तो कोनाडा मोकळा मोकळा वाटतो. तसेच आपल्या देहाच्या मूर्तीत परमेश्वराने विवरस्थानी आत्मरूपाची प्रतिष्ठापना केली आहे. ती देहाची मूर्ती एक दिवशी विसर्जित करावीच लागते. आयुष्य प्रत्येकाचे प्रारब्धाप्रमाणे वेगवेगळे असेल पण मूर्तीचे - देहाचे विसर्जन होणारच. आत्मतत्व - गणेश हा चिरंतन आहे. पण मूर्तीचे विसर्जन हे अटळ आहे. काय विनाशी आहे व काय अविनाशी आहे याकडे माणसाचे लक्ष जावे म्हणून ही प्रतिष्ठापना व विसर्जन, नाहीतर श्रीगणेशाची प्रतिष्ठापना व विसर्जन करणारे आम्ही कोण? तो अनादी अनंत आहे. ***('हे उपजे आणि नाशे। हे तो मायावशे दिसे। येऱ्हवी तत्वता वस्तू जे असे। ते अविनाशची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आम्ही शंकर पार्वतीचा मुलगा म्हणजे श्रीगणेश असे मानतो. अहो शंकर पार्वतीचे लग्नात जे गणपती पूजन झाले ते कोणत्या गणपतीचे? अशी शंका श्रीदासराममहाराज उपस्थित करीत. आम्ही श्रीरामाला दशरथाचा ज्येष्ठ मुलगा असे मानतो. अहो आत्माराम हाच खरा राम आहे. समर्थ रामदास स्वामी भीमरूपी स्तोत्रात ***'रामरूपी अंतरात्मा दर्शने दोष नासती'*** असे म्हणतात. अर्थात रामरूपी अंतरात्म्याचे दर्शन घडविणारा भीमरूपी महारुद्र वज्रहनुमान मारूती वेगळा आहे. आम्ही समजतो तो नव्हे हे निश्चित. हा मारुती म्हणजे सोहंरूपी वायुपुत्र आहे. या हनुमानाची सेवा केली तर रामकृपा होणारी आहे. ***('सोहंरूपी वायुपुत्र हा असे जयापाठी। तया नाही पुनर्जन्म। जोडे जगजेठी।।'- श्रीदासराममहाराज, 'रामकृपा व्हावी जरी । हनुमान सेवा करी।।'- संतवचन)*** श्रीतुकाराममहाराज या आत्मारामाचे श्रेष्ठत्व असे सांगतात, ***'राम हा कालचा सूत दशरथाचा। अनंता युगाचा आत्माराम। श्रीरामासी राम ठावा जरी असता। तरी का शरण जाता वसिष्ठासी।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज या हृदयस्थ आत्मारामाचे महत्त्व असे सांगतात, ***'तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्वसुखाचा आरामु। की भ्रांतासी कामु। विषयावरी।।'*** अहो, राम, गणेश, नारायण, विठ्ठल, हरी ही सारी नावे एका आत्म्याचीच आहेत. अहो वेदाने प्रतिपादन केलेले अनादी आद्य, स्वसंवेद्य, ओंकाराने निर्देश होणारे सकलार्थमतीप्रकाशु आत्मरूप म्हणजे श्रीगणेश आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज या गणेशाचे स्तवन असे करतात, ***'ॐ नमो जी आद्या। वेद प्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।। देवा तूचि गणेशु। सकलार्थप्रकाशु। म्हणे निवृत्तीदासु। अवधारिजो।।'*** तर श्रीसमर्थ या गजाननाचे स्तवन असे करतात, ***'ॐ नमोजि गणनायेका। सर्वसिद्धीफळदायेका। अज्ञानभ्रांतिछेदका। बोधरूपा।।', 'ऐसा सर्वांगे सुंदरू। सकल विद्यांचा आगरु। त्यासी माझा नमस्कारू। साष्टांग भावे।।', 'गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा। मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।'.*** सर्व विश्वामध्ये निनादीत होणारा अनुहत नाद - ओंकार हे खरे गणेशाचे रूप आहे. ***('ओंकारप्रधान रूप गणेशाचे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल। मकार महामंडल। मस्तकाकारे।।', 'हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळले। ते मियां गुरुकृपा नमिले। आदिबीज।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन शुद्ध झाले असता, मनोवृत्तीचा निरोध साधून प्राप्त होणारी मनाची आधीची अवस्था म्हणजे श्रीगजानन ***('आधी मन घेई हाती। तोचि गणराज गणपती।।'- संतवचन)*** विश्वाला आधार असणारा गणपती आपल्या शरीरात आधारचक्रस्थानी राहतो. तो गणपती कसा आहे, त्याची कृपा कशी होते आदी वर्णन करणारी वचने पुढीलप्रमाणे - ***'आधारचक्रस्थानी राहतो गणपती। चतुर्दले असते तयालागी।।'- संतवचन, 'देव गजानन रे मानव देव गजानन रे।। मनशुद्धीने रामकृष्णी या होती दयाघन रे।।'- श्रीदासराममहाराज.*** गणेशचतुर्थी या मंगलदिनी भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा श्रीदासराममहाराजांना कुरुंदवाड ग्रामी वयाचे चौदावे दिवशी स्पर्शद्वारा अनुग्रह प्राप्त झाला.

**

# ऋषीपंचमी

आज भाद्रपद शु.५, ऋषीपंचमी. आज ऋषींचा प्रसाद सेवन करायचा असतो. आज बैलानी कष्ट करून निर्माण झालेले अन्नधान्य सेवन करायचे नाही तर आपल्या परसात स्वकष्टाने वाढविलेले धान्य, भाजीपाला यांचे पदार्थ (प्रसाद) आज खायचे असतात. या प्रसादाची रूची काही औरच असते. पण आजकाल अपार्टमेंटच्या युगामुळे घराला परसच शिल्लक राहिलेले नाही. मग असा ऋषीप्रसाद कसा प्राप्त होणार? असा प्रसाद खायला मिळाला नाही तर हरकत नाही. ऋषींच्या प्रमाणे आचरण करणे हा प्रसाद तरी आपण सेवन करू शकतो. ऋषी कसे आचरण करतात हे या काळात कसे कळणार? अहो जे ऋषीतुल्य जीवन जगतात अशा संतसाधूंप्रमाणे आचरण ठेवा. अहो ऋषी म्हणजे काही दाढी जटा वाढवायलाच हव्यात असा नियम नाही. ज्यांनी कामक्रोध जिंकले, इंद्रिये, मन ज्यांच्या ताब्यात आहेत असे निवृत्ती, निर्विकल्प, स्वात्मानुभवी ज्ञानी संत सद्गुरू ऋषीच असतात. ***('आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासी। बोलिले जे ऋषी। साच भावे वर्ताया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'ऐसा जो कामक्रोध लोभा। झाडी करोनिया ठाके उभा। तो येवढिया लाभा। गोसावी होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'कामक्रोध बंदिखानी। तुका म्हणे दिले दोनी। इंद्रियांचे धनी। झालो आम्ही गोसावी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'मना आकळीतो मुनी। ऋषीकांचा ऋषी धनी।।'- श्रीमामामहाराज, 'स्वात्मानुभवी चोखाळिल्या वाटा। त्याच्या माथा जटा असो नसो।।'- संतवचन, 'प्रार्थना परिसावी। गुरुराया गोसावी। दुर्गुण मारूनिया। देसी सायुज्य पदवी।।'- श्रीचिमडमहाराज)*** अशा संतांच्याकडून - सद्गुरुंच्याकडून देहभाव विरणारे पुरे साधन आपणास प्राप्त होणे व ते साधन आपण पुरे करणे हा खरा साधूंचा प्रसाद आहे. ***('रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी यांचा प्रसाद घ्यावा। आत्माराम सर्वाठायी नेत्रांतरी पाहावा।।' - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, 'असा सद्गुरु तो मला कोणी दावा। जनी दृष्टीला दावी जो देवदेवा। प्रसादेची जो हीनदीनासी तारी। असा तो जगी दाखवा ब्रह्मचारी।।'- श्रीचिमडमहाराज, 'हा प्रसाद साचा रुचीर साधुरायाचा। आनंदे घ्यायाचा।।'- राजकवी साधुदास)*** साधूंच्या उपदेशाप्रमाणे मनबुद्धी पवनाचे माथ्यावर ठेवून मन बुद्धी भगवंताला समर्पण केली तर भगवंताची प्राप्ती होते. चित्तात देवाचीच वस्ती होते. अवघा भेद नाहीसा होऊन प्रसन्नता हा भगवत्प्रसाद चित्ताला अखंडित प्राप्त होतो. ***('हे अजानबाहो साधो पार्था। मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा। तेणेचि या तत्वार्था। फावसी तू।।', 'तू मन बुद्धी साचेसी। माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेची गा पावसी। हे माझी भाक।।', 'मग कर्मजात गेलिया। आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करोनिया। पतिव्रता।।', 'बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्यत्यागे। मातेचि भजे।।', 'मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादू जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।', 'देखे अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। जेथ रिगणे नाही समस्ता। संसारदु:खा।।', 'तैसे हृदय प्रसन्न होये। तरी दु:ख कैचे के आहे। तेथ आपैसी बुद्धी राहे। परमात्मरूपी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'पावलो प्रसाद। अवघा निरसला भेद।।'- संतवचन, 'हेचि ऋषीची पंचमी। मन बुद्धी जडवी नामी।।'- श्रीमामामहाराज)***

**

# नवभक्ती

विभक्तांना भक्त होण्यासाठी करावे लागणारे आचरण म्हणजे भक्ती होय. निजत्वाच्या विस्मरणाने 'देह म्हणजे मी' हा अहंकार निर्माण होतो व जीव परमेश्वरापासून विभक्त होतो. हा अहंकार नाहीसा होऊन निजत्वाचा साक्षात्कार होणे म्हणजे परमेश्वरातील व आपल्यातील भेद नाहीसा होणे, भक्त होणे होय. देह म्हणजे मी हा अहंकार नाहीसा होण्यासाठी इंद्रिये व इंद्रियांचे विषय जड आहेत हे ओळखून दृश्यावर उठणाऱ्या मनोवृत्ती चैतन्याकडे वळवणे म्हणजे भक्ती होय. ***('विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी।। निजस्मरणी होय भक्त। जेथे नाही द्वैताद्वैत।।', 'नव्हतेची ऐसा होवोनिया ठेलो। तुझा भक्त झालो एकाएकी।।' - श्रीदासराममहाराज, 'विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।।'- संत शिवराम)*** मनाची दृश्याकडे असणारी प्रवृत्ती - खेच - चैतन्याकडे वळविणे म्हणजे मनाचा प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे होणारा प्रवास आहे. प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे जाणे म्हणजेच सासरकडून माहेरकडे जाणे. म्हणजेच संसारातून बाजूला होऊन मोक्ष प्राप्त करून घेणे आहे. विषयापासून चित्त परावृत्त झाले तर चिदाचिद ग्रंथी सुटते व ही चैतन्याची भक्ती निर्माण होते. ***('चिदचिदग्रंथी सुटेना। क्षणभर विषयी चित्त विटेना।।'- संत निजानंद, 'चिदचिद ग्रंथी विराम पावती। तये ठायी भक्ती उपजो लागे।।'- श्रीदासराममहाराज)*** साधनात मन निर्विचार होऊन प्राप्त होणाऱ्या तंद्रील अवस्थेत जर आपण सावध राहिलो तर दृश्यापासून परावृत्त झालेल्या मनोवृत्ती चैतन्याकडे वळतात. हे चैतन्याकडे मनोवृत्तींचे वळणे म्हणजेच सूक्ष्मदेहात अनुभवाला येणारी भक्ती होय. ही सूक्ष्मदेहात प्राप्त होणारी भक्ती आपण समजतो त्या भक्तीपेक्षा वेगळी आहे. म्हणून तिला 'नवभक्ती' असे श्रीदासराममहाराजांनी संबोधिले आहे. ***('अष्टघेचे स्थान स्थूलदेही जाण। सूक्ष्मदेही खूण नवभक्ती।।'- श्रीदासराममहाराज)*** साधनाने मनोवृत्ती चैतन्याकडे वळल्या तर चैतन्याचे प्रेम, आकर्षण वाढते. हे चैतन्याबद्दलचे असणारे प्रेम नऊ प्रकाराने व्यक्त होते. प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे हा मनाचा प्रवास नऊ प्रकारे होतो. त्यांना नवविधाभक्ती म्हणतात. या नवविधा भक्तींचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***'श्रवण कीर्तन विष्णूस्मरण पादसेवन भले। अर्चन वंदन दास्य सख्य निवेदन झाले।। मन हे राम झाले आता मन हे राम झाले। प्रवृत्ती सोडोनी कैसे निवृत्तीसी आले।।'*** भक्ती जरी नवविधा असल्या तरी त्यांचा हेतू मन परमेश्वराशी एकवीध करणे हाच आहे. ***'गोविंद म्हणे पेरी अनेक। परी उस बोलिजे एक।।'*** ही श्रीमामांची अमृतवाणी नवविधा भक्तीतील एकविधता दाखविणारी आहे. या नवविधाभक्तीचे महत्त्व श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'तुका म्हणे नवविध। भक्ती जाणे तोचि सिद्ध।।'*** व ही नवविधाभक्ती संतजनांनी मला प्राप्त करून द्यावी ही आपली आंतरिक तळमळ श्रीतुकाराममहाराज अशी व्यक्त करतात, ***'नवविधा काय बोलियेली भक्ती। द्यावी माझे हाती संतजनी।'*** भक्ती कोणतीही असो नमन होणे महत्त्वाचे आहे. नमन हीच खरी भक्ती आहे. ***('भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग। ब्रह्मी ब्रह्मभोग ब्रह्मतनू।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मनाचे मनत्व नाहीसे होणे तसे कठीणच. नमन साधणारा माणूस विरळाच. ***(भक्ती ते कठीण शुळावरील पोळी। विरळा तो बळी धैर्यवंत।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मन आहे तोवर सांत द्वैताचा अनुभव तर नमन झाल्यावर सतत अनंताचा अनुभव प्राप्त होणार आहे. श्रीदादामहाराज कोटणीस हे श्रीतात्यासाहेबमहाराजांचे ज्येष्ठ अधिकारी चिरंजीव होत. श्रीतात्यासाहेबमहाराजांचे निर्वाणानंतर उपासना करणेसाठी 'कैवल्यधाम' ही वास्तू त्यांनी उभी केली व तेथेच श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या साऱ्या स्मृती जतन करून ठेवल्या. त्यांनी १९७३ साली भाद्रपद शु.६ या दिवशी निर्वाण केले. त्यांच्या पवित्र स्मृतीस वंदन.

**

# श्रवण

आपणास जे जे ऐकायला मिळते त्या साऱ्या गोष्टींना आपण श्रवण म्हणतो. दृश्यातील काही नाद व इंद्रियांचे काही नाद या बाह्यकर्णांना ऐकू येतात. मनोनाद, आतील इंद्रियांचे नाद, चैतन्याचे नाद या बाह्यकर्णांना ऐकू येत नाहीत. ते नाद ऐकणारे कर्ण वेगळे आहेत. जसा नाद आहे तसा कर्ण आहे. हे सारे नाद ऐकणे म्हणजे श्रवणभक्ती आहे का? कान उघडे असल्याने जे जे कानावर येईल ते मनात असो वा नसो ऐकावेच लागते. हे सारे ऐकणे म्हणजे श्रवणभक्ती नव्हे. हे सारे ऐकायचे पण त्यातील सार शोधून ते आत घ्यायचे व जे असार आहे, निरुपयोगी आहे ते आत घ्यायचे नाही याला श्रवणभक्ती म्हणतात. ***('ऐसे हे अवघेची ऐकावे। परंतु सार शोधून घ्यावे। असार ते जाणोनी त्यागावे। या नाव श्रवणभक्ती।।'- समर्थ, 'नाईकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी। अवाच्य ते टाळी। जीभची गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** श्रवण असे करावे की ज्या श्रवणाने क्रियेत पालट होईल, असत्क्रियेची निर्हेतुक सत्क्रिया होईल व संशयाचे मूळ जे मन त्या मनाचा लय होईल. ***('आता श्रवण केलियाचे फळ। क्रिया पालटे तत्काळ। तुटे संशयाचे मूळ। येकसरा।।', 'जेणे संशय तुटती। होय आशंका निवृत्ती। अद्वैत ग्रंथ परमार्थी। श्रवण करावे।।', 'असत्क्रिया ते सोडिली। आणि सत्क्रिया ते वाढविली। स्वरूपस्थिती बळावली। या नाव साधक।।' - श्रीसमर्थ)*** एक निर्गुण भगवंत व त्याचे एक नाम सार आहे. त्याचेच फक्त श्रवण झाले तरच हे शक्य आहे. ***('सार सार सार विठोबा नाम तुझे सार। म्हणोनि शुळपाणी जपताहे वारंवार।।'- श्रीतुकाराममहाराज, 'नामापरते नाही सार। नामे तरलेची अपार।।' - श्रीकेशवस्वामी, 'त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'फळकट हा संसार। येथ सार भगवंत।।'- संतवचन)*** सारभूत सर्वगत सगुण चैतन्य हे उपाधीत गुप्त आहे. अर्थात त्या चैतन्याचा नाद बहिर्मुख बाह्यकर्णांना ऐकू येणे शक्य नाही. ***('या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य जे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्विकारिती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'प्रगट ते जाणावे असार। गुप्त ते जाणावे सार। गुरुमुखे हा विचार। उमजो लागे।'- श्रीसमर्थ, 'तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम।।'- श्रीतुकाराममहाराज)*** हा चैतन्याचा नाद ऐकण्यासाठी हे जे इतर दृश्यातील नाद, बाह्यमनाचे काल्पनिक नाद - जे असार आहेत, ते ऐकणे बंद व्हावयास हवे. तरच हे सार नाम ऐकू येण्याची शक्यता. ***('जो निंदेते नेघे। स्तुती ते न श्लाघे। आकाशा न लगे। लेप जैसा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'निंदेचे श्रवण न येवो माझे कानी। बहीर करोनी ठेवी देवा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** हा जो आतला चैतन्याचा नाद आहे, तो नादानेच नाद घ्यावा लागतो. असे श्रीदासराममहाराज सांगायचे. नादाने नाद घ्यायचा नाद आपणास लागला पाहिजे. ***('जो नादे ऐकिजता नादु। स्वादे चाखिजता स्वादु। जो भोगिजतसे आनंदु। आनंदेचि।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'डोळा तो गगन। नाद तोचि कान। शब्दाचे स्फुरण जिव्हारूप।।'- श्रीदासराममहाराज)*** इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर, बारा सोळाजणी एकत्र आल्यावर हा चैतन्याचा ध्वनी - रामनाम - गलगा - श्रुत होतो. ***('इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।'- श्रीमामामहाराज, 'बारा सोळा जणी गडे ग बारा सोळा जणी। मिळोन येती गलगा करिती मशी गेल्या घेऊनी।।'- श्रीसंत महिपती, 'रामनाम ध्वनी उमटे। तेथे लक्ष लावी नेटे। ब्रह्मानंद सहज भेटे।।'- श्रीबांदकरमहाराज)*** हा चैतन्याचा नित्यध्वनी श्रवण होणे हे नित्यश्रवण आहे. हे नित्यश्रवण सतत व्हावयास हवे. ***('जेथे नाही नित्यश्रवण। ते जाणावे विलक्षण। तेथे साधके येक क्षण। क्रमू नये सर्वथा।।'- श्रीसमर्थ)*** हे नित्यश्रवण झाले तर अंतरी स्वात्मसुखाचे डोल येतात, विठ्ठलाला डोल येतो. ***('ऐसे श्रवण करावे बोल। जेणे योगे अंतरी येती स्वात्मसुखाचे डोल।।'- संतवचन, 'बोलू ऐसे बोल। जेणे योगे विठ्ठल डोले।।'- श्रीनामदेवमहाराज)*** या नादश्रवणी तदाकारता साधली तर चैतन्याचे वारे नयनात भरते. नामाचाच बिंदू घडतो व सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन ज्ञानाचे विज्ञान होऊन आत्मा निश्चळ होतो. ***'श्रवणाचा झाला विज्ञानडोह', 'मोक्षु असे आयता श्रवणामाजी।।'*** हा अनुभव येतो.

**

# कीर्तन

भगवंताविषयी वाटणारे उत्कट श्रेष्ठ प्रेम - भक्ती ज्यातून व्यक्त होते त्याला कीर्तन म्हणतात. अहो प्रेम हे बोलता येत नाही, ते निःशब्द आहे, ते अनुभवायचे असते. हे जरी खरे असले तरी ते व्यक्तच केले नाही, शब्दबद्ध कधीच केले नाही तर ते समजणार कसे? निःशब्द प्रेम गुरुकृपेने शब्दात व्यक्त झाले तर त्यात वेगळेच समाधान आहे. ***('भक्ती परम प्रेम स्वरूपा।।' - नारदभक्तीसूत्र, 'प्रेम नये सांगता बोलता दाविता। अनुभव चित्ता चिंतू जाणे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'शब्द निःशब्दाची सांगड कीर्तन। पावे समाधान गुरुकृपा।।'- श्रीदासराममहाराज)*** सगुण परमात्म्याचे परमपवित्र चरित्र, त्याचे विशेष गुणवर्णन अत्यंत प्रेमाने सादर करणे, दृश्य जगाबद्दल, देहाबद्दल वैराग्य व वैराग्यातून भगवंताचे विशुद्ध प्रेम निर्माण होईल असे अत्यंत प्रेमाने भावपूर्वक, भक्तीपूर्वक ज्ञान प्रगट करणे, जेणेकरून अंतर्यामी आत्मरूपाचा - भगवंताचा अनुभव येईल म्हणजे कीर्तन होय. ***('वाचे गुण उच्चारण। हेचि जाणावे कीर्तन।।'- श्रीमामामहाराज, 'सगुण चरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी। सज्ज्नवृंदे मनोभावे आधी वंदावी।। भक्तीज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या। जेणेकरून मूर्ती ठसावी अंतरी श्रीहरीची। ऐसी कीर्तनमर्यादा आहे संतांच्या घरची।।'- श्रीनाथमहाराज)*** हे भगवत्प्रेम - आत्म्याविषयीचे प्रेम (आपुलकी) आमचे ठिकाणी केव्हा निर्माण होईल? देहाविषयी असणारे ममत्व (प्रेम) कमी झाले तर आत्म्याविषयी प्रेम निर्माण होईल. देहभाव लयाला गेला तरच आत्म्याविषयी प्रेमाच्या, आपुलकीच्या गोष्टी बोलण्यात अर्थ. म्हणून नामसंकीर्तन हे देहाचे ममत्व हे पाप ज्यांचे गेलेले आहे, ज्यांचा देहभाव हरपलेला आहे अशा वैष्णवांनी, संतांनीच करावीत. ज्यांचे ठिकाणी देहभाव आहे, द्वैत शिल्लक आहे, त्यांना हे नामी कीर्तन - मी नाहीसे करणारे कीर्तन साधणार नाही. ***('नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्याची।।', 'द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान। त्या कैचे कीर्तन घडे नामी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।। नामसंकीर्तन उरले त्या ठाया। देहभाव लया गेला त्यांचा।।'- श्रीदासराममहाराज)*** जो दैवास्तव देहाचे पालन करतो, जो उदरभरणाची चिंता करीत नाही तो संतच कीर्तन निस्पृहतेने करू शकतो. एरवी हे शक्य आहे का? कीर्तन करणाऱ्याने कसे आचरण ठेवावे याचे वर्णन श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।। बुका लावू नये भाळा। हार घालू नये गळा।। तट्टा वृषभासी दाणा। तृण मागो नये जाणा।। तुका म्हणे देती घेती। तेही दोघे नरका जाती।।'.*** अहो कीर्तन करणे हे देवाकरता 'आपुलिया सुखस्वार्थी' हवे. पैशाकरता कीर्तन करणे हे काही उपयोगाचे नाही. पैसे मिळतील पण देव कधीही भेटणार नाही. ***('देवाचिया चाडे आळवावे देवा। वोस देहभावा पाडोनिया।।'- श्रीतुकाराममहाराज)*** कोणताही प्रसंग येवो, कोणी साथीदार असोत नसोत, श्रोते कमी जास्त असोत, कीर्तन चुकणार नाही असा निर्धार हवा. तरच हे नित्यकीर्तन साधेल. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ***'साता दिवसाचा झाला उपवासी। तरी कीर्तनासी सोडू नये।। फुटो हे मस्तक तुटो हे शरीर। नामाचा गजर सोडू नये।। शरीराचे होत दोन तेही भाग। कीर्तनाचा रंग सोडू नये।। तुका म्हणे ऐसा नामी झाला निर्धार। तेथे निरंतर देव वसे।।', 'आयुष्य करी उणे। परी मज आवडो कीर्तन।।'***

✻✻

# विष्णूस्मरण

आम्ही जे नाम घेतो त्याठिकाणी स्मरण असत नाही. आमचे चित्तात नेहमीचेच विषयचिंतन सुरू असते. स्मरणाचे ठिकाणी विस्मरणात्मक जगाचा आभास होत असतो. अर्थात चैतन्याची जाणीव (स्मरण) असत नाही. आमच्या नामस्मरणाचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात, ***'नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी।। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।। नाम रूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।।'*** तर संत श्रीकबीरसाहेब आपले नामस्मरण कसे असते हे असे सांगतात, ***'माला तो करमे फिरे। जिव्हा फिरे मुखमाही। मन तो दाही दिस फिरे। इह तो सुमरन नही।।'*** ज्या नामाला स्मरणाची जोड नाही, त्या नामाला काहीही अर्थ नाही. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'नवल स्मरणाची ठेव। नामी नाही अनुभव।।'*** स्मरणयुक्त नाम झाले तर नामस्मरणाने समाधान प्राप्त होते. श्रीसमर्थ सांगतात, ***'स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे। नामस्मरणे पावावे। समाधान।।'*** नुसत्या नामाने समाधान होत नाही. समाधान झाले असते तर वखवख कमी झाली असती ना? म्हणजे ज्या नामाने समाधान होते असे संतांनी साधलेले नामस्मरण, आपण करतो त्या नामस्मरणापेक्षा काही वेगळे आहे का नाही? संत कबीरसाहेब सांगतात, ***'रामनाम सब कहत है। ठग ठाकूर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम है कुछ और।।'*** अहो ज्याला आम्ही हाका मारतो तो कुठे आहे हे माहीत हवे का नको? त्याची आणि आमची ओळख हवी का नको? ओळख नसेल तर हाकेला माणूस तरी ओ देतो का? मग तो परमेश्वर कसा उत्तर देईल? ***'हाका मारिसी ज्याच्या नावे। त्याचे गावची नाही ठावे।।'*** अशी आपली अवस्था आहे. मग तो म्हणतो 'सावकाश हाका मारत बस' सर्वांतरस्थ जो विष्णू आहे, त्याची जाणीव-स्मरण हवे. तर त्या जपाला अर्थ, परमार्थाला अर्थ. अहो ज्याचा आरंभ आत्म्याच्या जाणीवेपासून होतो, त्याला 'अध्यात्म' म्हणतात. आम्हाला अध्यात्मातला आत्माच कळला नाही तर काय कळले हा प्रश्नच आहे. जोवर जन्ममरण हा संसार सुटत नाही, तोवर आत्मा कळत नाही व जोवर आत्मा कळत नाही तोवर आमच्या विस्मरणात्मक जपाला काही अर्थ नाही. जोवर रामकृष्ण या गतीत आपले मन मुरत नाही, तोवर जप विष्णूच्या जाणीवेशिवाय आहे व होणारे ज्ञान हे खरे ज्ञान नसून दृश्याचे विपरीत ज्ञानच आहे. ***('आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।', 'विष्णूवीण जप व्यर्थ त्याचे ज्ञान। रामकृष्णी मन नाही ज्याचे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।' - श्रीदासराममहाराज)*** आपले ठिकाणी जी जगाची जाणीव आहे ती विष्णूमुळे आहे. त्या विष्णूची जाणीव आम्हास हवी. ही जाणीव होण्याकरता इतर जाणीवा (विपरीत ज्ञानाच्या जाणीवा) नाहीशा होऊन होणाऱ्या नेणीवेची जाणीव व्हावयास हवी. ***(मन बुद्धी अगोचर। बुद्धीवीण अंधःकार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी।।', 'जाणीव म्हणजे अंतःकरण। अंतःकरण विष्णूचा अंश जाण। विष्णू करितो पाळण। येणे प्रकारे।।'- समर्थ)*** स्मरण कसे असावे हे श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'*** तर श्रीसमर्थ सांगतात, ***'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी।। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।'*** तर श्रीकबीरसाहेब सांगतात, ***'होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।'*** वाचेचा गोंधळ थांबल्यावर हे नामरूपाला मेळ घालणारे, आत्मा प्रगट करणारे नामस्मरण सुरू होते.

✻✻

# पादसेवन

ज्याला आदी अंत नाही अशा अनंताची - पांडुरंगाची - चरणसेवा करायला मिळणे, ज्यांना अनंताचा साक्षात्कार झाला आहे अशा सद्गुरूंची, संतांची चरणसेवा करायला मिळणे ही महद् भाग्याची गोष्ट आहे. ***('माझ्या वडिलांची मिरासी गा देवा। तुझी चरणसेवा पांडुरंगा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आकाशाबाहेरी पळो जाता। पुढे आकाशची तत्वता। तैसा तया अनंता। अंतची नाही।।'- समर्थ, 'नाही आदी अंत ऐसा जो अनंत। तोचि हृदयात तुका म्हणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ज्यांना अनंताचा साक्षात्कार झाला आहे ते संत सद्गुरू अनंतापेक्षा वेगळे असत नाहीत. अर्थात संतांची चरणसेवा हीच अनंताची चरणसेवा. ***'पाहू जाता तुमचा अंत नलगे म्हणोनी तुम्ही अनंत'*** असे श्रीचिमडचे महाराज भगवान सद्गुरू निंबरगीकरमहाराजांना उद्देशून म्हणतात ते याच हेतूने. आपणास जर ते बरवे आत्मज्ञान व्हावयास हवे असेल तर संतांची, सद्गुरूंची सेवा, संतांचे भजन आपल्या हातून घडणे आवश्यक आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ते ज्ञान पै गा बरवे। जरी मनी आथि आणावे। तरी संता या भजावे। सर्वस्वेशी।।', 'जे ज्ञानाचा कुरुठा। तेथ सेवा हा दारवंटा। तो स्वाधीन करी सुभटा। वोळगोनी।।', 'तरी तनुमनुजीवे। चरणासी लागावे। आणि अगर्वता करावे। दास्य सकळ।।', 'मग अपेक्षित जे आपुले। तेही सांगती पुसिले। जेणे अंतःकरण बोधले। संकल्पा नये।।'*** गुरुकृपा झाली तरच आत्मज्ञान होते व विषयमोहातून तो दूर होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ऐसे ज्ञान प्रकाशे पाहेल। तै मोहांधकारू जाईल। जै गुरुकृपा होईल। पार्था गा।'*** ही चरणसेवा - पादसेवन कसे होणे अपेक्षित आहे हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'पादसेवन तेचि जाणावे। कायावाचा मनोभावे। सद्गुरुंचे पाय सेवावे। सद्गतीकारणे।।'*** सद्गती प्राप्त होण्यासाठी कायेने, वाचेने मनापासून भावपूर्वक चरणसेवा करणे याला पादसेवन भक्ती म्हणतात. पादसेवनाने सद्गती प्राप्त झाली तर सहजसाक्षात्कार होतो. ***('सद्गती झालिया सहजसाक्षात्कार। होईल उद्धार पूर्वजांचा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सद्गुरूंचे चरण एवढे पवित्र असतात की त्यांचा पदस्पर्श जर कोणत्याही पाण्याला (जीवनाला) होईल तर त्या जीवनाचे तीर्थ व्हावे. सद्गुरूंच्या पदस्पर्शाने पुनीत झालेले रजःकण जर आपण कपाळी धारण करू तर मोक्षसुख - कैवल्यसुख अनुभवाला यावे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'शिवतले गुरुचरणी। भलते जे पाणी। तया तीर्थयात्रे आणी। तीर्थे त्रैलोक्यीची।।', 'कैवल्यसुखासाठी। परमाणु घे किरीटी। उधळती पायापाठी। चालता जे।।'*** - *श्रीतुकाराममहाराजांचे 'संतचरणरज लागता सहज। वासनेचे बीज जळून जाय।'* हे वचन याबाबत प्रसिद्धच आहे. चंचळ असणारे मन संतचरण पाहिले की सुखरूप शांत होते. सारा शीण नाहीसा होऊन मनाला आनंद होतो. ***('आता कोठे धावे मन। तुमचे चरण देखिलिया।। भाग गेला शीण गेला। अवघा झाला आनंद।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सः अहं अहं सः याच त्या श्रेष्ठ गुरुपादुका हेच ते बरवे साधन की ज्यायोगे मन सुखरूप, शांत होते. या गुरुपादुकांचे ठिकाणी संपूर्ण मनोलय साधला असता प्राणाचा लय - जन्ममरणरहित अवस्था साधते. बरव्या साधनाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधल्यावर जी सोहंची जाणीव हृदयस्थानी राहते त्या हृदयस्थानी अनुभवाला येणाऱ्या गुरुपादुका आहेत. त्या अनुभवाला येणे हे खरे पादसेवन आहे. ***(आता हृदय हे आपुले। चौफाळुनिया भले। वरी बैसवू पाऊले। श्रीगुरूंची।। - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

✲✲

# अर्चन

नित्य देवाची पूजा करणे ही भारतीय संस्कृती आहे. दिवसाची सुरुवातच देवपूजेने होते. जे जे चांगले आपल्याकडे त्याने उपलब्ध करून दिलेले असते ते देवाला भावपूर्वक समर्पण करणे याचे नाव पूजा. सर्वसाधारणत: गंध, फुले, सुगंधी द्रव्ये, नैवेद्य, आरती, समर्पण करून ही पूजा केली जाते. पूजा ही विविध प्रकारांनी करता येते. श्रीसमर्थ हे विविध प्रकार असे सांगतात, ***'काया वाचा आणि मने। चित्ते वित्ते जिवे प्राणे। सद्भावे भगवंता अर्चणे। या नाव अर्चनभक्ती।।'*** शब्दांनी बांधली जाते ती शब्दपूजा. कवी, लेखक, ईश्वराची शब्दपूजा बांधतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सद्भावाच्या ओंजळीत ओव्यांची फुले घेऊन भक्तीने विश्वरूप परमात्म्याच्या दोन्ही चरणावर वाहिली. 'ज्ञानेश्वरी' ही विश्वरूप परमात्म्याची श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी बांधलेली पूजा आहे. ते म्हणतात, ***'भरोनी सद्भावांची अंजुळी। मिया ओविया फुले मोकळी। अर्पिली अंध्रियुगुली। विश्वरूपाच्या।।',*** तर श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'शब्दाची पै रत्ने करूनी अलंकार। तेणे विश्वंभर पुजियेला।।'*** कोणी जर कर्म, फळाची अपेक्षा न ठेवता ईश्वरसेवा म्हणून करत असेल तर तीही देवाची पूजाच आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'स्वामीकाज गुरुभक्ती पितृवचन सेवा पती। हेचि विष्णूची महापूजा आणखी देव नाही दुजा।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमाची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागी।।'.*** मन, बुद्धी ईश्वराला अर्पण करून चित्तात चैतन्य भरून राहणे ही खरी पूजा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तू मन बुद्धी साचेसी। जरी माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेची गा पावसी। हे माझी भाक।।'*** मनोलय साधल्याने दृश्याचा आभास नाहीसा होऊन सत्य प्रतीत होते. जन न दिसताना अवघाच जनार्दन दिसणे ही निजखूण बाणल्याने कोण्याही जीवाचा मत्सर न होणे, ही खरी सर्वेश्वराची पूजा साधते. ***('कोण्या ही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जन नोहे अवघाची जनार्दन। एका जनार्दनी बाणली निजखूण।।'- श्रीनाथमहाराज)*** मनोलय साधल्याने मनाच्या अस्तित्वावर भासमान होणाऱ्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था सर्वसाक्षी मनास अनुभवास येते. तो अवस्थात्रयी सावधान होतो. त्याला तिन्ही अवस्थेत एका चैतन्याची अनुभूती येते. ***'जागत राम सोवत राम। सपनेमें देखो तो राजाहीराम।'*** या श्रीनाथमहाराजांच्या वचनाप्रमाणे त्याची अवस्था होते. हे अवस्थात्रयी सावधान होणे हेच खरे परमात्म्याचे पूजन आहे. ***('अवस्थात्रयी सावधान। हेचि भगवंताचे भजन। हेचि परमात्म्याचे पूजन। हेचि समाधान जीवाशीवाचे।।'- श्रीनाथमहाराज)*** मनोलय साधल्याने त्याचे बोलणे खुंटते व कर्माचे अकर्म होते. ***('मन: कृतं कृतं कर्म।।'- योगवसिष्ठ)*** त्याला बोलून मौन साधते व तो कर्म करून अकर्ता होतो. हे 'काही न करणे' ही खरी पूजा आहे. ***('स्तुती काही न बोलणे। पूजा काही न करणे। सन्निधी काही न होणे। तुझ्याठायी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे भजन पूजन साधले तरच स्वरूपाकार होता येते. कळीकाळावर मात करता येते. ***('भजन पूजन नेणे। काय स्वरूपासी जाणे।।', 'भजन पूजन साधुनी बळे। जिंकियेले कळीकाळ।।' - श्रीतुकाराममहाराज)*** जोवर मन आहे तोवर कल्पनेने काल्पनिक देवांची होणारी पूजा वेगळी व मनोलय साधल्यावर, कल्पना सरल्यावर सत्य हाताला येऊन होणारी सत्याची पूजा वेगळी. ***('कल्पनेच्या देवा कल्पनेची पूजा। तेथे कोणी दुजा आढळेना।। आढळेना देव आढळेना भक्त। कल्पनेरहित काय आहे।। आहे तैसा आहे कल्पना न साहे। दास म्हणे पाहे अनुभवे।।'- श्रीसमर्थ, 'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# वंदन

व्यवहारात ज्याला आम्ही वंदन समजतो, नमस्कार समजतो तो वेगळा व परमार्थात संत ज्याला वंदन समजतात, नमन म्हणतात ते वेगळे आहे. व्यवहारात वडिलांप्रती लहानानी आदर व्यक्त करण्यासाठी केलेल्या कृतीला नमस्कार म्हणतात. व्यवहारात आम्ही जो नमस्कार करतो तो काही अपेक्षेने करतो. आदर का कोणी उगाच व्यक्त करतात? फुकट कोण कुणाला नमस्कार करत नाही. आपणाकडून काही दोष, अपराध घडले असतील किंवा कुणावर अन्याय घडला असेल, काही मतभेद मिटवायचे असतील, आपणाला काही मागायचे असेल तर आपण नमस्कार करतो. नमस्काराने या गोष्टी काही प्रमाणात साध्य होतातही. ***('नमस्कारे दोष जाती। नमस्कारे अन्याय क्षमती। नमस्कारे मोडली जडती। समाधाने।।', 'परम अन्याय करूनी आला। आणि साष्टांग नमस्कार घातला। तरी तो अन्याय क्षमा केला। पाहिजे श्रेष्ठी।।'- श्रीसमर्थ)*** आम्ही जो देवाला, गुरुंना, संतांना नमस्कार करतो तो या पद्धतीचा असतो. काही मागणी घेऊन दोषपरिहारार्थ हा नमस्कार असतो. देव, सद्‌गुरू, संत दयाळू असतात. ते आपली मागणी पुरी करतातही. ***('जनांचा लालुची स्वभावो। आरंभीच म्हणती देव। म्हणिजे मला काही देव। ऐसी वासना।।'- श्रीसमर्थ)*** पण या इच्छा व्यक्त करणाऱ्या नमस्काराला संत वंदन म्हणत नाहीत. वंदन म्हणजे काय हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'वंदन म्हणजे नमन। मन आपुले देवार्पण।।'*** तर नमन म्हणजे काय हे श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'एका जनार्दनी नमन। मन केले त्या अधीन।।'*** मन जे अर्पण करायचे ते बोलण्यासारखे वागणाऱ्या, आपले हित करणाऱ्या, रामाची भेट घडविणाऱ्या संतांना किंवा त्रिगुणापलीकडील चौथा गुण असणाऱ्या सद्‌गुरूंना किंवा जन्ममरणाच्या फेऱ्यातून सोडविणाऱ्या प्रत्यक्ष देवाला करायचे. ***('बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।।'- संतवचन, 'ऐसियाचे पाय धरा। जेणे राम येईल घरा।।'- संतवचन, 'नमन माझे गुरुराया। महाराजा दत्तात्रेया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'अनंत नमन श्रीगुरुला आणिक सद्‌गुरू भक्ताला। साधनी राहे नित्य निरंतर। ऐशा साधक पुरुषाला।।'- संतवचन, 'माझी प्रार्थना ऐका प्रभुजी हे मम प्राणेश्वरा। तुमच्या मनास येईल ते करा।।' - श्रीचिमडमहाराज, 'जेथे दिसती विशेष गुण। ते सद्‌गुरूंचे अधिष्ठान। या कारणे तयासी नमन। अत्यादरे करावे।।'- श्रीसमर्थ, 'तुजवीण कोणा। शरण जाऊ नारायणा।।', 'शरण शरण हनुमंता। तुज आलो रामदूता।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जो मज होय अनन्य शरण। तयाचे निवारी मी जन्ममरण। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन अर्पण होणे हे खरे नमन - शरणागती आहे. मन आहे तोवर द्वैताची जाणीव, भेदाची जाणीव, मन अर्पण झाल्यावर खरे नमन-शरणागती. ***('पै आपुलेनी भेदेवीण। माझे जाणिजे जे एकपण। तयाची नाव शरण। मज येणे गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अहो नमन झाले तर काल्पनिक अहंकार नाहीसा होतो व तो देवच होतो. ***('आपण कल्पिले मीपण। मीपण शोधिता नुरे जाण। मीपण गेलिया निर्गुण। आत्माचि स्वये।।'- श्रीसमर्थ, 'नमिता मानाभिमान गळाले। म्हणोनि अवचिते ते मीचि जहाले। ऐसे निरंतर मिसळले। उपासिती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# दास्य

प्रत्येक माणूस कोणा ना कोणाचा दास-सेवक असतोच. जो आशाबद्ध - आशेने बद्ध आहे, तो जगाची सेवा करतो. तर ज्याच्या चित्तात आस नाही असा उदास जगाची सेवा करत नाही तर जगच त्याची सेवा करते. मग तो सेवा कुणाची करतो? तो देवाची - नारायणाची सेवा करतो. ***('आशाबद्ध जन। त्यासी कैचा नारायण।।', 'आम्हीतरी आस। झालो टाकोनी उदास।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आशाबद्ध तो जगाचा दास। पूज्य तो उदास सर्वजना।।'- संतवचन, 'विष्णुदास नामा उभा केशवद्वारी। प्रेमाची शिदोरी मागतसे।।'- श्रीनामदेवमहाराज, 'तरी तनुमनुजीवे। चरणासी लागावे। आणि अगर्वता करावे दास्य सकळ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्यांचा विश्वास अविश्वासी जगावर आहे, ते जगाची आशा करतात. आशापूर्तीसाठी जगाची सेवा करतात व सेवा पुरी न झाल्याने जगाच्या लाथा खातात. याउलट जे जगावर विश्वास न ठेवता देवावर, संतांवर विश्वास ठेवतात, ते विशेष श्वास संपादून संतदास, रामदास होतात. जोवर अंत:करणात आस आहे तोवर असतो तो श्वास व आस गेली की होतो तो विश्वास - विशेष श्वास. जोवर आस आहे तोवर विश्वास होत नाही, तोवर तो निंदास्तुती यात गुरफटतो. अंतरातील आस नाहीशी झाली की संशय नाहीसा होतो, भाव धरला जातो, निंदास्तुती यांचे अतीत आकाशासारखा निर्लेप होतो, व मग सर्वभावाने (न बदलणारा भाव) सर्वकाळी तो दास होतो. ***('विश्वास तयाचा बैसेना कोठेही। निंदास्तुती पाही जिवी धरी।।'- संतवचन, 'म्हणोनी आम्ही रामदास। श्रीरामचरणी आमुचा विश्वास। कोसळोनी पडो हे आकाश। आणिकाची वास न पाहे।।'- श्रीसमर्थ, 'संतांचिये पायी हा माझा विश्वास। सर्वभावे दास झालो त्यांचा। तेचि माझे हित करिती सकळ। जेणे हा गोपाळ कृपा करी।।', 'विश्वास तो देव। म्हणोनि धरियेला भाव।।'- श्रीतुकाराममहाराज, 'न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जाणीवेत कामक्रोधरहित अवस्थेत श्वसनाच्या उपाधीत - आयुष्याच्या रत्नपेटीत जीवन हे गुरुनाम - गुरुभजन साधते. या भजनात जो रंगून जातो तो रामदास. ***('आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी। ईश्वरी अर्पूनिया लुटी। आनंदाची करावी।।', 'जो जो भजनी रंगला। तो तो रामदास जाला।।', 'रामदास्य करूनी पाहे। सर्वसृष्टी चालताहे।। प्राणीमात्र रामदास। रामदासी हा विश्वास।।'- श्रीसमर्थ)*** श्वासोच्छ्वास या साधनाच्या अभ्यासाने मन घटले की ही कामक्रोधरहित, अभिमानरहित अवस्था सूत्राचे मध्यभागी, श्वासोच्छ्वासाचे मध्यभागी साधते, हे भजन ज्याला साधते त्याला दासाची पदवी मिळते. ***('साधनी मन घटवी बारे साधनी मन घटवी।। साधनी घटता ते बळ अद्‌भूत। दासाची पदवी।।'- श्रीमामामहाराज)*** दास झालेल्या साधकाची काय अवस्था असते हे श्रीचिमडचे महाराज असे सांगतात, ***'तुझा दास मी होऊनी तवपदी केले जेव्हा अर्पण। तनू मन धन आणि ते मीपण।। तेव्हापासून सर्व तुझे हे जाया आणि गृहधन। मजकडे काय तुम्हा अधीन।। आता तुम्हाला कळेल ते करा नाही दुजा आसरा। पतीत मी पावन मजला करा।।'*** वासनारहित अवस्थेत होणाऱ्या देवाज्ञेचे पालन करणे एवढे एकच काम उरावे हे खरे दास्य आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'देवाज्ञा झालिया न ठेवावी वासना। दुश्चित या मना आणू नये।।'*** देवाज्ञा काही शेवटीच होते असे नाही देव काही हातात बडगाच घेऊन बसला आहे का?

✻✻

# सख्य आत्मनिवेदन

परमेश्वराशी जवळीक साधणे, तो आपला सखा आहे, तो सतत आपल्याजवळ आहे याची जाणीव सतत असणे, देवाच्या गावाला जाणे, त्याला सुख, दु:ख, हवे नको सांगणे, तो माझा आहे व मी त्याचा आहे याची जाणीव सतत असणे ही सख्यभक्ती. ***('जाऊ देवाचिया गावा। देव देईल विसावा।। देवा सांगू सुखदु:ख। देव निरसील तहानभूक।। राहू जवळ देवापाशी। हात जोडूनी पायापाशी।। तुका म्हणे आम्ही बाळ। या या देवाचे लडिवाळ।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अहो ही जवळीक होणार कशी? आमची देवाची काही जान पेहचान नाही. मग हे कसे जमणार? देवाला जसे आवडते तसे आपण वागलो की हे सख्य घडते. ***('देवास जयाची अत्यंत प्रीती। आपण वर्तावे तेणे रिती। येणे करिता भगवंती। सख्य घडे नेमस्त।।'- श्रीसमर्थ, 'तुका म्हणे तैसे। आम्ही वर्तू त्याच्या इच्छे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** भगवंताला प्रिय नामसंकीर्तन जे सर्व वैष्णवांनी साधले, त्या वैष्णवांचे घरी, त्यांचे संगतीत देव राहतो. त्या वैष्णवांची संगत, सख्य आपण केले की साहजिकच देवाचे सख्य आपणास लाभणार आहे. ***('कीर्तनाची गोडी। देव निवडी आपण।।'- श्रीतुकाराममहाराज, 'कीर्तनाची गोडी। देवा आतून आवडी।।'- श्रीमामामहाराज, 'वैष्णवा घरी देव सुखावला। न वजे बाहेरी दवडोनी घातला। देव म्हणे माझे पुरतसे कोडे। संगती गोड या वैष्णवांची। कीर्तनाची देवा आवडी मोठी।।'- श्रीनाथमहाराज)*** देवाची संगत करायची म्हणजे इकडली संगत सोडावयास नको का? देवाच्या सख्यत्वासाठी जीवाचे लगत असणारे देह व मन यांचा लय साधावा लागेल व शेवटी प्राणाचाही लय व्हावा लागेल, तेव्हा तो सखा होईल. ***('देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जिवलगासी तुटी। सर्व अर्पावे सेवटी। प्राण तोही वेचावा।।'- श्रीसमर्थ, 'तो सखा आमुचा जिवलग जीवीचा। भिवरेतटीचा पांडुरंग।।'- संतवचन, 'स्तुती काही न बोलणे। पूजा काही न करणे। सन्निधी काही न होणे। तुझ्या ठायी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** एकदा सखा हरी झाल्यावर हरीमुळे असणारे विश्व त्यावर कृपा करील हे सांगणे नकोच. ***('ज्यांचा सखा हरी। त्यावरी विश्व कृपा करी।।'- संतवचन, 'गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी। आणिका प्रकारी काय काज।।'- श्रीमामामहाराज)*** आपण आपणाला पाहणे, जाणत्याला जाणणे हे ज्ञान झाल्यावर होणाऱ्या अखंड जाणीवेने जाणीवेचा ग्रास होणे, वृत्ती तद्रूप होऊन वृत्तीरहित ज्ञान होणे, हे आत्मनिवेदन आहे. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रुप होते।। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।' - श्रीसमर्थ)*** तत्वांचा तत्वात निरास झाल्यावर दृश्याची जाणीव नाहीशी होते व द्रष्टा हाच दृश्य होतो व द्रष्टेपण नाहीसे होते. मग मी तू हा व्यवहार तेथे राहात नाही. फक्त देहातीत अविनाश अनंत वस्तू शिल्लक राहते. हीच खरी अनंत चतुर्दशी आहे. ***('दृश्य पदार्थची वोसरे। तत्वे तत्व तेव्हा सरे। मीतूपण कैचे उरे। तत्वता वस्तु।।', 'तत्वे तत्व जेव्हा सरे। तेव्हा आपण कैचा उरे। आत्मनिवेदन येणे प्रकारे। सहजची जाले।।', 'तत्वांमध्ये मीपण गेले। तरी निर्गुण सहजचि उरले। सोहंभावे प्रत्यया आले। आत्मनिवेदन।।'- श्रीसमर्थ)*** हा तत्वांचा निरास तत्वात केव्हा होतो हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, ***'प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्वे तत्व सारिता पवनसिद्धी।।'*** हे आत्मनिवेदन साधलेल्या भक्तावर खंडेराय कुंचा ढाळतो. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'आत्मनिवेदन भरीत रोडगा जिव्हे हारोहारी। एका जनार्दनी धन्य खंडेराव त्यावर कुंचा वारी।।'*** या आत्मनिवेदनाचे महत्त्व श्रीसमर्थ असे सांगतात, ***'भजनी भजन आत्मनिवेदन श्रवण मनन साधा। दास म्हणे निजगुज साधता होत नसे भवबाधा।।'*** आत्मनिवेदन झालेल्या भक्ताला सर्वत्र तोच दिसत असल्याने परकेपणा जाणवत नाही. तोच जसे घडले आहे तसे काही न दडवता आत्मनिवेदन करू शकतो. राष्ट्रपिता महात्मा गांधीनी खरे आत्मनिवेदन केले आहे, असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत.

**

# पूर्णकळा

बाह्यत: पाहिल्यास सूर्याच्या १२ कळा व चंद्राच्या १५ कळा आहेत. या २७ कळांवर व्यवहार चालतो. परमार्थात चंद्राची सोळावी कळा अनुभवाला येते. १६ कळी पूर्णचंद्र साधकाला अनुभवाला येतो. असा पूर्ण चंद्र अनुभवला की साधक संपूर्ण मनोलयाने परमार्थात पूर्ण होतो. ***('पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला। क्षणात निमाला पायाजवळी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'तुझ्या नेत्रपाती लवे नीलबिंदू। कसा दिसतो साधका पूर्ण इंदू। बहू लाघवी चंद्रमा हा पहावा। मना राम तो अंतरी साठवावा।' - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** ही चंद्राची पूर्ण कळा जर आपण अनुभवली तर सारे विश्व ब्रह्मरूप होऊन तेथे व्यवहारच राहणार नाही. ही चंद्राची सोळावी कळा भगवान शंकरांनी आपले मस्तकी धारण केली आहे. त्या सोळाव्या कलेलाच 'चित्कळा' असे संबोधले जाते. ***('चित्कळा ते देखे शिवाचे मस्तकी। आदीशक्ती सुखी होय तेथे।।', 'शिवाचे मस्तकी सोळावी ते कळा। तयासी चित्कळा बोलताती।।'- श्रीदासराममहाराज)*** ही चित्कळा महाकारणदेहात तुर्यावस्थेत सर्वसाक्षी मनाला अनुभवाला येते व सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते व तुर्यावस्थेत वेगळेपणाने होणारे ज्ञान नाहीसे होते. अनुभव ठायीच मुरून जातो. ***('जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया। ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी।।', 'सर्वसाक्षी मन तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।'- श्रीसमर्थ, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'दास म्हणे पूर्ण कळा ते जाणावी। मने उमगावी अंतर्यामी।।' श्रीमामामहाराज, 'मनोन्मन होण्या चित्कळा कारण। दासराम शरण तेथे झाला।।'- श्रीदासराममहाराज)*** योग्यांना चंद्रसूर्य (रामकृष्ण) या जीवनाच्या गती सूक्ष्म झाल्यावर साधणारी १७ वी जीवनकळा जिला वैष्णव 'नामामृत' म्हणतात ती हीच चित्कळा. ***('तेथे हे चित्कळा सतरावीची कोर। जेथे सूर्यचंद्र मावळती।।' - श्रीदासराममहाराज, 'नामामृत गोडी वैष्णवा लाधली। योगिया साधिली जीवनकळा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ही चित्कळा अनुभवल्यावर देहाचे देहभान नाहीसे होते. ***('चित्कळा देखिल्या नुरे देहभान। आटले गगन नामामाजी।।' - श्रीदासराममहाराज)*** प्रणवापासून - अनुहत नादापासून झालेली चित्कळा चैतन्य सागरातील लाट असून तिच्यामुळे मनाला मनत्व व जीवनाला आधार प्राप्त होतो. ***('चित्कळा ते लाट चैतन्यसागरी। प्रकाशाभीतरी कोर देखे।।', 'प्राणाचे जीवन मनाचे मनत्व। जयायोगे स्वत्व प्राणिया ये।।', 'जीवना आधार देखिजे चित्कळा। समत्वे जिव्हाळा दावितसे।।', 'चित्कळेचे मुळे प्राणिया या स्वत्व। देखिजे हा भाव देहामाजी।।', 'प्रणवापासोनी जहाली चित्कळा। जाणे तो आगळा योगिराव। चित्कळेचेवरी मनाची धारणा। दासरामा खुणा संतसंगे।।'- श्रीदासराममहाराज)*** चित्कळेचे आधिक वर्णन करणारे श्रीदासराममहाराजांचे इतर अभंग असे, ***'देखे सोहंभाव कैचा वायुरूप। सद्गुरूस्वरूप सर्वाधरटी।। अग्निस्थानी मिळे चैतन्य चित्कळा। प्रकाश उजाळा ब्रह्मांडासी।।', 'चित्कळे दाविली कैची आदिशक्ती। जेथे दिनराती उरली नाही।। ओवरीत नाही दिवस ना रात। दासराम स्वस्थ चित्त झाला।।', 'गगन प्रणवावरी महाशून्य ओवरी। निर्गुणाची सरी उपरी त्या। महाशून्य ओवरी दाविते चित्कळा। दासरामा जिव्हाळा चैतन्याचा।।'*** ब्रह्मसाम्राज्य दीपिका - ब्रह्माचे साम्राज्य प्रकाशात आणणारी दीपिका म्हणजे 'भगवद्गीता' - ही काही जुळवलेली अक्षरे नव्हती. ती भगवान श्रीकृष्णाने अर्जुनासाठी उजळलेली अंतरीची चित्कळा (ज्ञानज्योती) होती. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ती अक्षरे नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका। अर्जुनालागी चित्कळिका। उजळलिया कृष्णे।।'***

**

# विकल्प

विकल्प (पर्याय) जोवर आमचेपाशी आहेत तोवर विकल्प (संशय) येणार हे निश्चित. म्हणून विकल्प (पर्याय) उपलब्ध होणे बंद व्हावयास हवे, तरच अंतःकरणातील विकल्प - संशय दूर होईल, अन्यथा नाही. एका संकल्पामागे अनेक विकल्प (पर्याय) उपस्थित होतात. त्यातील कुठला विकल्प (पर्याय) चांगला आहे हे पाहताना विकल्प (संशय) निर्माण होतो. संकल्प व त्यापाठोपाठ उठणारे विकल्प हे मनाचे स्वरूप आहे. ***('संकल्प विकल्पात्मकं मनः।'- जगद्‌गुरू शंकराचार्य)*** मनात उठणाऱ्या संकल्प विकल्पानेच 'पाहणे आपणासी आपण' हे समर्थ आत्मज्ञान न होताना दृश्याचे भ्रामक विपरीत ज्ञान होते व आत्मा आहे की नाही असा संशय निर्माण होतो. आत्म्याशी परक्याप्रमाणे - परवत् वागणूक होते व हेच मोठे पातक घडते. ***('एका विकल्पाने बारे। जग बुडविले सारे।। ऐसा विकल्प पातकी। आपआपणा घातकी।। गोविंद म्हणे नाम घेई। विकल्प मग नुरे काही।।'- श्रीमामामहाराज, 'आमुचा विकल्प आमुचा विकल्प। आमुचा विकल्प आम्हा बाधी।।'- श्रीनामदेवमहाराज, 'म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाही पाप घोर। हा विनाशाची वागुर। प्राणियासी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण कल्पना करतो म्हणून विकल्प (पर्याय) मिळतात व हे की ते हा विकल्प (संशय) निर्माण होतो. ही कल्पना सरली की माणूस विकल्पापैल निर्विकल्प होतो, निःसंदेह होतो व त्याला एका कल्पकाची जाणीव होते. ***('कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'- श्रीदासराममहाराज, 'संदेह अवघा फिटला। जनी म्हणे उदय झाला।।'- संत जनाबाई)*** ज्या नामाने विकल्प नाहीसा होऊन आपण निर्विकल्प होणार, आपणास निर्विकल्प नामाची प्राप्ती होणार त्या नामाबद्दलसुद्धा विकल्प असतो आमचे मनात. ज्या चैतन्याला विकल्प (पर्याय) नाही त्या चैतन्याबद्दलसुद्धा विकल्प असतो, मग आम्हाला काय साधणार? ज्या गुरुंचेकडून आपण नाम घेतो,त्या गुरुंचेबद्दल अंतःकरणात संशय, जो देव निर्विकल्प (निःसंदेह) आहे त्याबद्दलसुद्धा आमचेकडे विकल्प, मग कसा परमार्थ साधेल? हा मोठा प्रश्न आहे. ज्या संकल्पाला विकल्प नाही, ज्या संकल्पाचे दाते नारायण आहेत असा सत्य रामकृष्णी संकल्प जर आपण धरला तर नाममंत्रजप साधून ही विकल्पाची पापाची कोटी (प्रकार) नाहीशी होईल. ***('नाममंत्र जप कोटी जाईल पाप। रामकृष्णी संकल्प धरून राही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ।।'- श्रीतुकाराममहाराज)*** हा संकल्प विकल्प आमचेपाशी राहू नये असे मागणे आमचे चिमडचे महाराज भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांना उद्देशून करत आहेत ते म्हणतात, ***'संकल्प विकल्प नुपजो यांचे चित्ती। ऐसे कृपामूर्ती करा वेगी।'*** हे संकल्प विकल्प नाहीसे होण्यासाठी श्रीमामामहाराजांनी संकल्पात, विकल्पात रामनाम घेण्यास सांगितले आहे. ते म्हणतात, ***'संकल्पात राम विकल्पात राम। मनोमाळा उत्तम जाणावी ही।।', 'संकल्पे विकल्पे रामनाम घेता। मग भेटी तत्वता अनायासे।।'***

**

# दुर्बुद्धी

मनात उठणाऱ्या संकल्प विकल्पाने भासमान होणाऱ्या जगाचे विपरीत ज्ञान ज्या बुद्धीला होते तिला दुर्बुद्धी म्हणतात. या दुर्बुद्धीलाच आकाराचे ज्ञान होते व द्वैत प्रतीत होते म्हणून द्वैतबुद्धी, आत्मज्ञान न होता देहाचे ज्ञान होते म्हणून देहबुद्धी आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. या बुद्धीला द्वैताचे ज्ञान होते अद्वैत स्वरूपाचे ज्ञान या बुद्धीला होत नाही. या बुद्धीला होणाऱ्या विपरीत ज्ञानाने खरे स्वरूपज्ञान दूरच राहते म्हणून हिला दुर्बुद्धी म्हणतात. ***('स्वरूपापासून दूर बुद्धी। तीच जाणावी दुर्बुद्धी।।'- श्रीमामामहाराज)*** ज्या दुर्बुद्धीने, द्वैतबुद्धीने, देहबुद्धीने स्वरूपज्ञानापासून आपण दूर जातो त्या देहबुद्धीने देहाच्या जाणीवेत व त्याच्या नेणीवेत परमार्थ केला तर त्यातून शुद्ध पुण्य प्राप्ती होईल का? यातून परमात्मप्राप्तीसाठी लागणारे शुद्धपुण्य प्राप्त होणार नाही पण स्वर्गप्राप्तीसाठी लागणारे पुण्यात्मक पाप प्राप्त होईल. ***('स्वर्गा पुण्यात्मके पापे येईजे। पापात्मके पापे नरका जाइजे। मग माते जेणे पाविजे। ते शुद्ध पुण्य।।' , 'आणि मजचिमाजी असता। जेणे मी दूरी होय पंडुसुता। ते पुण्य ऐसे म्हणता। जीभ न तुटे काई।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून देहबुद्धी आहे तोवर खरा परमार्थ नाही. देहबुद्धीने - दुर्बुद्धीने होतो तो सारा लटका व्यवहार-संसारच. ***('म्हणोनि देहबुद्धी हे झडे। तरीच परमार्थ घडे। देहबुद्धीने बिघडे। ऐक्यता ब्रह्मीची।।', 'देहबुद्धी नेणो काही। दास अंकीत रामापायी।।'- श्रीसमर्थ)*** संकल्प विकल्प मनात निर्माण होणे, इच्छा निर्माण होणे थांबल्याशिवाय म्हणजे मन शुद्ध होऊन देहातीत अवस्था प्राप्त झाल्याशिवाय ही दुर्बुद्धी नाहीशी होऊन आत्मा जाणणारी आत्मबुद्धी, सद्‌बुद्धी प्राप्त होत नाही. चत्वार देह निरसनाअंती ही सद्‌बुद्धी - नवलबुद्धी - आत्मबुद्धी - दृढबुद्धी - निश्चळबुद्धी प्राप्त होणारी आहे. ***('जव देह हे असेल। तव वोळगी ऐसी किजेल। मग देहांती नवल। बुद्धी आहे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ही दुर्बुद्धी जाऊन सद्‌बुद्धी प्राप्त व्हावी असे मागणे श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'दुर्बुद्धी ते मना। कदा नुपजो नारायणा। आता मज ऐसे करी। तुझे पाय चित्ती धरी।। उपजला भावो। तुझे कृपे सिद्धी जावो।। तुका म्हणे आता। लाभ नाही यापरता।।'*** तर श्रीचिमडचे महाराज भगवान सद्‌गुरू निंबरगीकरमहाराजांकडे आमचेकरिता मागणे मागत आहेत. ते म्हणतात, ***'सद्‌बुद्धी दे मजला दुर्बुद्धीचा वीट आला। कामादी वैरी वारी। करी निष्काम मजला।। प्रार्थना ऐका माझी गुरुराया समर्था। त्रिभुवनी तुचि थोर दिनजन उद्धरिता।।'*** सज्जनांचे संगतीने ही देहबुद्धीची आत्मबुद्धी होते. श्रीसमर्थ सांगतात, ***'देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी। सदा संगती सज्जनाची धरावी।।'*** सत्‌स्वरूपाला दाखविणारी सद्‌बुद्धी किती महत्त्वाची आहे हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजाते प्रगटी। तैसी सद्‌बुद्धी हे थेकुटी। म्हणो नये।।'***

**

# निर्गुणीचे सुख

संकल्प विकल्पाने दुर्बुद्धीस होणाऱ्या दृश्याच्या, देहाच्या विपरीतज्ञानाने -देहाच्या जाणीवेने प्राप्त होणारे विपरीत सुख - अनिश्चित संशयीत सुख - कल्पित सुख हे वेगळे व विकल्प दुर्बुद्धीपैल निर्विकल्प अवस्थेत सद्बुद्धीस प्राप्त होणारे आत्मसुख - माझे सुख - समसुख - निर्गुणीचे सुख - अद्वैताचे निश्चळ सुख - वेगळे. आपणास आत्मसुख कसले असते हे माहीत नसल्याने आपण विषयातून प्राप्त होणारे कल्पित सुखच खरे मानतो व ते कसे जास्तीत जास्त मिळेल हेच पाहतो. विषयातून मिळणारे सुख हे विषय आपलेजवळ आहेत तोवरच असते. अर्थात विषयच नाशिवंत असल्याने हे सुखही अशाश्वत असते, खंडित असते. अर्थात हे सुख शाश्वत असत नाही. ***('अखंड सुख राम खंड सुख माया। माझी ऐसी काया जव नव्हे।।'- श्रीमामामहाराज)*** खरे पाहिले तर विषयातून सुख कधीच होत नाही, होते ते दु:खच. सुख होते ते फक्त आत्म्यापासूनच. श्रीदासराममहाराज हे पटण्यासाठी एक उदाहरण देत. ते सांगत, 'जंगलात एक कुत्रे काहीही शिकार न मिळाल्याने एक पडलेले हाड चघळत असते. हाड चघळताना त्याचे गालफड फाटते व त्याचेच रक्त त्याचे जिभेवर पडू लागते. त्याला वाटते हे रक्त त्या हाडातून येत आहे म्हणून ते हाड आणखी चघळते.' त्या कुत्र्याप्रमाणे विषय चघळताना आपलेच गालफड फाटलेले असते. विषयातून सुख होत नसते. आपलेच सुख आपण भोगत असतो. पण ते अज्ञानात. विषयातून होते ते दु:खच. ***('म्हणोनि विषयभोगी जे सुख। ते साद्यंतचि जाण दु:ख। परी काय करिती मूर्ख। न सेविता न सरे।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** विषयातून होणारे दु:ख कमी झाले की आपण त्याला सुख मानतो. दु:ख कमी कसे होईल हे पाहतो. उदाहरणार्थ उन्हाळ्यात गरम फार होते. साहजिकच दु:ख होते. जरा पंखा लावला की उकाडा कमी होतो व दु:खाची तीव्रता कमी होते, सुखाचा आभास होतो. श्रीदासराममहाराज कीर्तनात एक दृष्टांत देत तो असा, 'जुन्या काळी न्यायाधीश एका गुन्हेगारास त्याच्या गुन्ह्याबद्दल १० मण ओझे उचलण्याची शिक्षा फर्मावितात. तो ती शिक्षा ऐकून दु:खाने मटकन खाली बसतो व न्यायाधीशाची गयावया करतो. न्यायाधीश दयेने ५ मण ओझे उचलण्याची शिक्षा फर्मावितात. तो ती कमी शिक्षा ऐकून आनंदाने नाचायला लागतो. आता ५ मण ओझे उचलण्यात दु:ख आहेच की पण १० मण ओझे उचलण्यापेक्षा दु:ख कमी म्हणून सुखाच्या कल्पनेने तो नाचायला लागतो. व्यवहारात जे आपणास साधनाधीन सुख होते ते खरे सुख नसून साधनाने सोय होऊन दु:ख कमी होते व सुखाचा आभास होतो. हे जे काल्पनिक सुख किंवा दु:ख माणसास होते यात दु:खाचे प्रमाण जास्त व सुखाचे प्रमाण फारच कमी. कारण आत्ता जे सुख वाटते (दु:ख कमी झाले म्हणून) ते कालांतराने आणि दु:ख कमी व्हावे या अपेक्षेने दु:खच वाटते. उदा. सुरुवातीला उन्हाळ्यात पंख्याने बरे वाटते. सुख वाटते. पण कालांतराने पंखा पुरेसा वाटत नाही. एसीची गरज भासते. म्हणजे परत दु:ख. हे सुख किंवा दु:ख प्रारब्धाने होत असते. सुख त्यापाठोपाठ दु:ख, परत सुख. हे रहाटगाडगे सतत फिरत राहते. हे खरे सुख नव्हे. जेथे दु:खाला प्रवेशच नाही ते खरे सुख.

**

# साधनाचा हरीख

देहभावाने देहबुद्धीला होणाऱ्या देहाच्या दृश्याच्या जाणीवेने अर्थात आत्म्याच्या नेणीवेने होणारे दु:ख (कमी किंवा जास्त) देहभाव लयाला गेल्यास नाहीसे होते. ***(‘देहचि होऊन राहिजे। तेणे देहदु:ख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।’ - श्रीसमर्थ)*** हा देहभाव (देह म्हणजे मी हा भाव) विरणारे पुरे साधन परमेश्वराने आपणास दिले आहे. ***(‘देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे। विठ्ठलू रे विठ्ठलू रे।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्याच्यावर आपले आयुष्य अवलंबून आहे ते श्वासोच्छ्वास हेच ते देहभाव विरवणारे साधन आहे. या साधनाच्या अभ्यासाने सच्चिदानंद ही परमार्थातील श्रेष्ठ पदवी प्राप्त होणारी आहे. ***(‘आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** श्वासोच्छ्वासाच्या विषमगतीला देहाची जाणीव व मनाचे चांचल्य अनुभवाला येते तिला देहभाव - शरीरभाव म्हणतात. गुरुकृपेने साधनाच्या अभ्यासाने श्वसनाची गती जाणीवेत, संथ झाली असता - समगती झाली असता देहाची, दृश्याची जाणीव नाहीशी होते, मनोलय साधला जातो व चैतन्याची - हरीची जाणीव होते. ***(समगतीमाजी हरीचा आठव। नुरे देहभाव देहामाजी।।’- श्रीमामामहाराज)*** देहाचा, मनाचा लय साधून शेवटी प्राणाचा लय साधल्यावर उरणाऱ्या चैतन्याची - हरीची जाणीव ज्या श्वसनाच्या गतीने होते तिला सोहंभाव - आत्मभाव म्हणतात. ***(‘तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देहाच्या विसरात व केवळ चैतन्याच्या जाणीवेत जे होते त्याला ‘सुख’ म्हणतात. ***(‘किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जे होये। तया नाम सुख।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाच्या अभ्यासाने देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण ही सुखाची अवस्था प्राप्त होणे म्हणजे खरे साधन साधणे. झोपेत जागे राहणे, अज्ञानाचे ज्ञान होणे, बाकी सर्व जाणीवा नाहीशा होऊन फक्त आत्म्याचीच जाणीव राहणे म्हणजे श्रीदासराममहाराजांचे साधन आहे. निवृत्ती अवस्थेत स्मरण राहणे म्हणजे खरे साधन साधणे होय. वृत्तीरहित ज्ञानाने खरे समाधान, खरे सुख प्राप्त होते.***(‘वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।’- समर्थ, ‘स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।’- श्रीनाथमहाराज, ‘तुका म्हणे मग नये वृत्तीवरी। सुखाचे शेजारी पहुडेन।।’- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाने आत्मलाभ ज्याला होतो, साधनाचा हरीख-आनंद ज्याला प्राप्त होतो त्याला विषयभोगातून मिळणारा आनंद हा खरा आनंद नाही हे समजते. ***(‘तरी आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो का सकळ विषया। जेयाचे ठाई इंद्रिया। मानु नाही।।’, ‘जो आत्मलाभासारिखे। गोमटे काहीचि न देखे। म्हणोनि भोगविशेखे। हरिखे ना जो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून बरवा विचार करून, असार संसार त्यागून त्रिगुणरहित होऊन, बरव्या साधनाने मन शांत होऊन बरवे सुख प्राप्त करून घ्यावे अशी विनंती आमचे चिमडचे महाराज आपणा सर्वांना करत आहेत. ते म्हणतात, ***‘यास्तव बरवा विचार करी। सांडून आळस निद्रा वैरी। साधन करूनी सुख घे करी। दास विनवी सद्गुरूंचा।।’*** बरवे साधन म्हणजे काय हे सांगणारी संतवचने पुढीलप्रमाणे, ***‘बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘असारा संसारा त्यजुनी बरवे साधन करी।’- समर्थ, ‘संसार समस्त त्रिगुण।।’- श्रीनाथमहाराज.***

**

# नाम खरे ज्ञान

आम्ही समजतो ते खरे ज्ञान नसून नाम हेच खरे ज्ञान आहे. अर्थात खरे ज्ञान हेच नाम आहे. ***('रामनाम ज्ञान रामनाम धन। रामनामी जाण सर्व काही।।', 'नामची साधन नामची कीर्तन। नामावीण नच ज्ञान।।'- श्रीमामामहाराज)*** आम्ही समजतो त्या ज्ञानाने (विपरीत ज्ञानाने) देवाची प्राप्ती - जे विश्वाचे मूळ आहे अशा शुद्ध निर्मळ स्वरूपाचे ज्ञान होत नाही. म्हणून ते खोटे ज्ञान आहे असे जाणते मानतात. ज्या ज्ञानाने चैतन्याची अनुभूती येते, देवाची अनुभूती येते ते खरे ज्ञान म्हणजेच नाम आहे. हे खोटे ज्ञान - विपरीत ज्ञान - नाहीसे होऊन राहणाऱ्या अज्ञानाचे ज्ञान होणे - नेणीवेची जाणीव होणे - हे खरे ज्ञान म्हणजेच नाम आहे. ***('म्हणोनि जितुका भोळाभाव। तितुका अज्ञानाचा अभाव। अज्ञाने तरी देवाधिदेव। पाविजे कैचा।।', 'जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।', 'मन बुद्धी अगोचर। बुद्धीवीण अंधकार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी।।'- श्रीसमर्थ, 'नेणीव जरी जाणितली। तरी ते नेणीव मिथ्या झाली। तेथील जाणीव उरली। आत्मप्रभा।।'- श्रीसंत मुकुंदराज)*** निष्काम अवस्थेत, निर्हेतुक अवस्थेत सत्क्रियेचे आचरण होणे, सहजकृती साधणे, जे कृत आहे तेच आपले कृत्य होणे हेच खरे नाम आहे. ***('सहजकृती रामनाम। नाही आणिक दुजे काम।।', 'कृतकृत्य रामनाम। नाही आणिकाचे काम।।', 'स्वयमेव जे केलेले। तेचि करणे जाण भले।।' - श्रीमामामहाराज)*** निष्काम अवस्थेत नि:श्वासाला प्रमाण येते व कानावर जो चैतन्याचा ध्वनी येतो व चैतन्याची जाणीव होते, तेच खरे नाम नाम. ***('नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप।।'- श्रीदासराममहाराज)*** निष्काम अवस्थेत आमची जी सहजस्थिती - मूळस्थिती - नामस्मरणाची स्थिती - सोहंस्थिती राहते त्यात कमीजास्तपणा काही असत नाही. त्यात बदल कधी होत नाही व ज्यात बदल होत नाही ते खरे ज्ञान. आमचे ज्ञान सारखे बदलते. म्हणून ते खोटे ज्ञान आहे. अहो जे ज्ञान अवस्थेप्रमाणे बदलते, जागृतीतले ज्ञान वेगळे, स्वप्नातले ज्ञान वेगळे, झोपेतले ज्ञान वेगळे. मग यातले कोणत्या अवस्थेतले ज्ञान खरे? यातले कोणतेच ज्ञान खरे नाही. तिन्ही अवस्थेत न बदलणाऱ्या एका चैतन्याची जाणीव होणे - ज्ञान होणे - हे खरे नाम आहे. ***('जागत राम सोवत राम सपनेमो देखो तो राजाहीराम।।'- श्रीनाथमहाराज, 'कमी जास्त काही अनित्यता नाही। स्फुरतसे देही अखंडीत। गोविंद म्हणे घ्यावे तेचि वेळोवेळा। अंतरी कळवळा धरोनिया।।'- श्रीमामामहाराज)*** ही सहजस्थिती - नामस्मरणाची स्थिती - दशमद्वार ओलांडल्यावर महाकारण देहात प्राप्त होते तिला तुर्यावस्था म्हणतात. ***('दशमद्वार ओलांडिता। सहजस्थिती येई हाता।।'- श्रीदासराममहाराज)*** ही आमची सहजस्थिती जिला ब्रह्माची नित्यता आहे - प्राप्त होणे हेच खरे अध्यात्म आहे. ***('ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या महाकारणदेही असणारे चैतन्याचे अखंड स्मरण म्हणजेच अद्वैताचे भजन, हरिकथा आहे. ***('महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# साधक होवोनी राहे

विठोबाचा प्राणसखा, मूर्तीमंत ज्ञान, कैवल्याचा पुतळा, चैतन्याचा जिव्हाळा, शांतीसूर्य, सर्वभूती सुखरूप अशा भगवान सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी शके १२१२ मध्ये ज्यात गुह्य ईश्वरीज्ञान प्रगट केले आहे अशी भगवद्गीतेवरील टीका - ज्ञानेश्वरी लिहिली. ईश्वरीज्ञान हा आमच्या (पदार्थ) ज्ञानाचा विषय नसल्याने साहजिकच ती अज्ञानात गेली. पदार्थ ज्ञानाने आत्मा सिद्ध होत नाही तर आत्म्याने ज्ञान सिद्ध होते हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. या अज्ञान या अजानवृक्षाची मुळी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कंठाला लागली होती. श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे आदेशानुसार श्रीनाथमहाराजांनी अज्ञानात गेलेली श्रीज्ञानेश्वरी पुन्हा प्रकाशात आणली. त्यांनी श्रीज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत निर्माण केली व अज्ञानात गेलेली ज्ञानेश्वरी पुन्हा लोकांसमोर उजेडात आणली. अज्ञानाच्या ज्ञानाने अजानवृक्षाचे मूळ नाहीसे झाले तो हा आजचा दिवस भाद्रपद व.६ ***('शके बाराशते बारोत्तरे। तै टीका केली ज्ञानेश्वरे। सच्चिदानंदबाबा आदरे। लेखकु जाहला।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'बहुकाळपर्वणी गोमटी। भाद्रपदमास कपिलाषष्ठी। प्रतिष्ठानी गोदातटी। लेखनकामाठी संपूर्ण जाहली।।' - श्रीनाथमहाराज)*** श्रीज्ञानेश्वरी हा पारायणाचा विषय नसून अनुभवायचा विषय आहे. ***('नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।।'- श्रीनामदेवमहाराज)*** ब्रह्माचे साम्राज्य प्रकाशात आणणारी चित्कळीका - ज्ञानज्योती - म्हणजे श्रीज्ञानेश्वरी आहे. त्यातील अक्षरे अमृतालाही पैज मारून जिंकतील अशी अक्षर चैतन्याची अक्षरे आहेत. ***('ती अक्षरे नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका। अर्जुनालागी चित्कळिका। उजळलिया कृष्णे।।', 'माझा मराठाची बोलू कौतुके। परी अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अक्षरे चैतन्याची। गीता गीत अनुवाद।। अर्जुनाचे कर्णपुटी। तत्व निनादे गोविंद।।'- श्रीदासराममहाराज)*** या अक्षर चैतन्याच्या गीतातील अक्षरांचा अनुवाद देहावर राहून दुजेपणात करता येत नाही. दुजेपणात भ्रांती होते. भाविकांना मात्र बोध होऊन शांती प्राप्त होते. ***('हे शब्देवीण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे। बोलाआदी झोंबिजे। प्रमेयासी।', 'शब्देवीण संवादू दुजेवीण अनुवादू। हे तव कैसेनि गमे। परे ही परते बोलणे खुंटले। वैखरी कैसेनि सांगे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'दुजियाला भ्रांती। भाविकाला शांती। साधुचिया वृत्ती लीन झाल्या।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाभ्यासाने अंत:करणातील विकल्प, दुर्बुद्धी टाकून ज्यांनी भाव धरला आहे, ज्यांनी चैतन्य जाणले आहे अशा भाविक साधकांनी ज्ञानेश्वरी वाचावी व ईश्वरीज्ञान अनुभवावे. ***('भाव धरोनिया वाची ज्ञानेश्वरी। कृपा करी हरी तयावरी।। एका जनार्दनी संशय टाकोनी। दृढ धरी मनी ज्ञानेश्वरी।।'- श्रीनाथमहाराज, 'साधक होवोनी। राहे ज्ञानेश्वरी पारायणी।'- श्रीमामामहाराज)*** साधकाने ज्ञानेश्वरीतील ईश्वरीज्ञान अनुभवावे व सिद्ध व्हावे इतके महत्त्व आहे ज्ञानेश्वरीचे. साधकाची योग्यता श्रीज्ञानेश्वरमहाराज अशी सांगतात, ***'देखे साधकु रिघोनी जाये। मागा पाऊलांची वोळ राहे। तेथ ठायी ठायी होये। हे आणिमादीक।।'*** तर श्रीसमर्थ साधकाची योग्यता अशी सांगतात, ***'प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तू लक्षी अंतरी। आत्मस्थितीची धारणा धरी। या नाव साधक।।', 'द्वैताचा तटका तोडिला। भासाचा भास मोडिला। देही असोन विदेह जाला। या नाव साधक।।', 'पंचमहाभूताचा विस्तार। जयासी वाटे स्वप्नाकार। निर्गुणी जयाचा निर्धार। या नाव साधक।।'***

**

# हरिकथा

साधनाभ्यासाने त्रिगुणाचे पलिकडील चौथा गुण प्राप्त होऊन मनोलय साधून निष्काम अवस्थेत (निर्हेतुक सत्क्रिया आचरताना) तिन्ही अवस्थांची एक अवस्था होऊन - एकदशा प्राप्त होऊन - विश्वरूप परमात्म्याचे दर्शनाने शांत व अद्भुत रस अनुभवत महाकारणदेहात तुर्यावस्थेत अखंडित स्मरण राहणे हीच खरी हरीकथा - अद्वय भजन आहे. ***(‘आता यावरी एकादशी। कथा आहे दोन्ही रसी। जेथ पार्था विश्वरूपेसी। होईल भेटी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।।’- श्रीदासराममहाराज, ‘नको वैकुंठीचा वास। तया सुखा आहे नाश। अद्भूत हा रस। कथाकाळी नामाच्या।।’- श्रीतुकाराममहाराज)*** असा मनोलय साधून जो हरिकथा साधतो, त्यालाच संसारात धन्यता प्राप्त होते. ***(‘मन ठेवून ईश्वरी। जो कोणी हरिकथा करी। तोचि ये संसारी। धन्य जाला।।’- समर्थ)*** अशा रामकथेचा अनुभव (हरिकथेचा अनुभव) जेथे येतो, तेथे कळीकाळाला प्रवेश असत नाही. ***(‘यम सांगे यमदूता। तुम्हा नाही तेथे सत्ता।। जेथे होय हरिकथा। सदा घोष नामाचा।।’- श्रीतुकाराममहाराज, ’रामकथा रस सेविसी जरी तू। काळ करील मग जी जी।।’ - मध्वमुनीश्वर)*** उर्ध्वगामी जीवनात प्राप्त होणारा हा सदा नामघोष (हरिकथा) देवाभक्तांची गाठ घालून देणारा असल्याने देवाभक्तांचा अत्यंत प्रिय आहे. देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणीसंगम म्हणजे ही हरिकथा सकल तीर्थांचा मुकुटमणी तीर्थराज आहे. ***(‘हरीकथेची आवडी देवा। करितो सेवा दासाची।। म्हणोनि हिंडे मागे मागे। घरटी जागे घालीतसे।। निर्लज्ज भोजे नाचे रंगी। भरते अंगी प्रेमाचे।।’, ‘कथा त्रिवेणीसंगम। देव,भक्त आणि नाम।। तेथीचे उत्तम। चरणरज वंदिता।।’, ‘उर्ध्ववाहिनी हरिकथा। मुकुटमणी सकळा तीर्था।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘राघवाची कथा पतितपावन। गाती भक्तजन आवडीने।। रामदास म्हणे धन्य त्याचे जिणे। कथा निरुपणे जन्म गेला।।’, ‘उदासवृत्तीस मानवे जन। विशेष कथानिरुपण। रामकथा ब्रह्मांड भेदून। पैलाड न्यावी।।’- श्रीसमर्थ)*** हरिकथा ही आपले सुख आपल्याला मिळावे यासाठी करायची. हरिकथा करून पैसा मिळवणे व विषयसुख भोगणे हा हरिकथेचा हेतू नाही. अर्थात हरिकथा ही देहीच विदेही अवस्थेत साधायची आहे. बाहेर चव्हाट्यावर ती करायची नाही. ***(‘आपुलिया सुखस्वार्था। केलीच करावी हरिकथा। हरिकथेवीण सर्वथा। राहोचि नये।।’- श्रीसमर्थ, ‘पोटासाठी जरी करी हरिकथा। जन रंजवीता फिरतसे।। तेणे घात केला एकोत्तरशत कुळाचा। पाहुणा यमाचा श्रेष्ठ थोर।। द्रव्याचिया आशे हरिकथा करी। तरी यमपुरी नित्यवास।। नामा म्हणे ऐसे होत जे रे कोणी। ते नर नयनी पाहू नये।।’- श्रीनामदेवमहाराज, ‘उभ्या बाजारात कथा। हे तो नावडे पंढरीनाथा।।’- श्रीतुकाराममहाराज)***

**

# कीर्तन

नवविधा भक्तीपैकी दुसरी भक्ती ही कीर्तनभक्ती आहे. ***(‘श्रवण कीर्तन विष्णुस्मरण पादसेवन भले। अर्चन वंदन दास्य सख्य निवेदन झाले। मन हे राम झाले आता मन हे राम झाले।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ही कीर्तनभक्ती भगवंताना अत्यंत प्रिय आहे. ***(‘कीर्तनाची गोडी। देव निवडी आपण।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘कीर्तनाची गोडी। देवा आतून आवडी।।’- श्रीमामामहाराज)*** या कीर्तनाने तो संसारातून वेगळा होऊन स्वरूपाकार होतो म्हणून या भक्तीला ‘थोर भक्ती’ असे श्रीतुकाराममहाराज संबोधतात. ते म्हणतात, ***‘हेचि थोरभक्ती आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची।।’*** या संसारमोहातून बाजूला होऊन त्या देवाचे दर्शन होण्यासाठी या कलियुगामध्ये मनोहर मनोलय साधणारे - मनुबई निवांत करणारे - हरीकीर्तन साधण्यासारखे दुसरे साधन नाही. ***(‘कलियुगामाजी करावे कीर्तन। तेणे नारायण देईल भेटी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘हरीचे मनोहर कीर्तन। हेचि साधन कलियुगी।।’ - संतवचन, ‘स्थिर स्थिर होई मनुबाई। हरीकीर्तनी सावध होई। जीऊबाई कीर्तना आली। शीवुबाई तिजसी भेटली। मनुबाई निवांतची ठेली। दासाप्राप्त झाली गुरुपायी।।’ - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** स्वत: भगवंतानी हा कीर्तनमहिमा सांगितला आहे. ***(‘कलौ कीर्तन वरिष्ठ। जेथे होय ते सभा श्रेष्ठ। कथाश्रवणे नाना नष्ट। संदेह मावळती।।’, ‘थोर कलीयुगी कीर्तन। स्वये बोले जगज्जीवन।।’- श्रीसमर्थ)*** पापाचे कारण असा देहभाव ज्यांचा गेलेला आहे, जे अद्वैत चैतन्याशी समरस झालेले आहेत, अशा वैष्णवांनी, संतांनी हे देवाला आवडणारे श्रेष्ठ नित्य कीर्तन साधले. ***(‘नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्याची।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।। नामसंकीर्तन उरले त्या ठाया। देहभाव लया गेला त्यांचा।।’- श्रीदासराममहाराज)*** अशा वैष्णवांचे -संतांचे - कीर्तनात बरवा नामाचा घोष सुरू झाला की हृदयस्थ हरी - जनार्दन - आनंदाने डोलू लागतो व याची प्रचिती अंतर्बाह्य आल्यावाचून राहात नाही. ***(‘नामदेव कीर्तन करी। पुढे नाचे पांडुरंग। जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग।।’- श्रीसंतजनाबाई, ‘तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी। प्रेमे घाली उडी नामासाठी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘अनुदिन अभिनव कीर्तन चाले। हृदयभुवनी मधुमाधव डोले।।’- श्रीनानामहाराज बर्वे, ‘आवडी करिता हरिकीर्तन। हृदयी प्रगटे जनार्दन। याहोनी श्रेष्ठ साधन। सर्वथा आन असेना।।’- श्रीनाथमहाराज)*** अलीकडील काळात आमचे श्रीदासराममहाराजांचे काल्याचे कीर्तनात श्रीबर्डे विठ्ठल मंदिर येथे श्रीविठ्ठल नाचल्याचे आम्ही पाहिले आहे. असे नामात देव प्रगट करणारे नामदेव कीर्तन आम्ही अनुभवले आहे. भगवंताना जे सुख क्षीरसागरात प्राप्त होत नव्हते, जे सुख वैकुंठात प्राप्त होत नव्हते ते सुख नामघोषाचे ठायी कीर्तनात त्यांना प्राप्त होत होते. ***(‘परी तयापासी पांडवा। मी हरपला गिवसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती ते माझे।।‘- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जे सुख क्षीरसागरी नसे। पाहता वैकुंठीही न दिसे। ते सुख मज कीर्तनी असे। कीर्तनवशे डुल्लतू।।’ - श्रीनाथमहाराज)*** असे जो नित्य कीर्तन साधतो, तो देहीच विदेहता भोगतो, काळाचे सार्थक करून चराचरी धन्यता मिळवतो व शेवटी हरीरूप होऊन जातो. ***(‘देही असून विदेहता। कीर्तनी होय पै तत्वता।।’ - श्रीनाथमहाराज, ‘जो जो काळ कीर्तनी जाय। तो तो होय सार्थक।।’- श्रीनिळोबाराय महाराज, ‘निवृत्ती म्हणे धन्य जो कीर्तनकरी। सर्वत्र चराचरी बोलियेले।।’- श्रीनिवृत्तीनाथ महाराज, ‘कीर्तन चांग कीर्तन चांग। होय अंग हरीरूप।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘कीर्तने महादोष जाती। कीर्तने होय उत्तमगती। कीर्तने भगवत्प्राप्ती। यदर्थी संदेह नाही।।’- श्रीसमर्थ)***

**

# निरूपण

वारकरी सांप्रदायिक कीर्तनाला 'निरुपण' असे संबोधिले जाते. वारकरी कीर्तनामध्ये सगुण नामाचा घोष व नामाआधारे अभंगाचे अद्वैत निरूपण - विवेचन - प्रामुख्याने केले जाते. ***('सगुणकथा या नाव कीर्तन। अद्वैत म्हणिजे निरूपण। सगुण रक्षून निर्गुण। बोलीत जावे।।'- श्रीसमर्थ)*** टाळमृदुंगाचे संगतीने निरूपणात होणाऱ्या विठ्ठलनामाच्या घोषाने माणूस रंगून जातो व नामाच्या ठिकाणीच रूपाची प्रचिती येते, तो देहभाव हरपून सर्वांगाने विठ्ठलच होऊन जातो. रंगून जाणे, देहभाव हरपणे यासाठी हे सोपे वर्म संतांनी दाखवून दिले आहे. ***('विठ्ठल हा चित्ती। गोड लागे गाता गीती।। आम्हा विठ्ठल जीवन। टाळ चिपुळिया धन।। विठ्ठल विठ्ठल वाणी। अमृत हे संजीवनी।। रंगला या रंगे। तुका विठ्ठल सर्वांगे।।', 'सोपे वर्म आम्हा सांगितले संती। टाळ दिंडी हाती घेऊनी नाचा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ज्या निरूपणात अद्वैत हृदयस्थ जनार्दन अनुभवाला येतो व अंतर्बाह्य त्याची अनुभूती येते, ते खरे निरुपण. ***('तुका म्हणे निरोपणी। भेट झाले ब्रह्मज्ञानी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'निरूपणी रूप प्रगटे। देव हृदयात भेटे।।'- श्रीमामामहाराज)*** असा ज्यांनी बापरखुमादेवीवर हृदयात अनुभवला व जे निवांत झाले, त्यांना ब्राह्मण म्हणतात. अशा ब्रह्मज्ञानी ब्राह्मणांनीच स्वभावे ब्रह्मनिरुपण करावे. ***('जया अंतरी भगवंत। अचळ राहिला निवांत।। तो स्वभावे जे बोलत। ते ब्रह्मनिरूपण।।', 'करिती ब्रह्म निरूपण। जाणती ब्रह्म संपूर्ण।। तेचि जाणावे ब्राह्मण। ब्रह्मविद।।'- श्रीसमर्थ, 'रखुमादेवीवरे अंगीकार केला। निवांत राहिला सेना न्हावी।।'- संत सेनामहाराज, 'बापरखुमादेवीवरू हृदयी प्रगटला। निवांत राहिला ज्ञानदेवो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अशा निरूपण करणाऱ्या संतांच्या जगण्याला अर्थ प्राप्त होतो. अख्खे आयुष्य तो कथा निरूपणासाठी वेचतो व जगात धन्यता प्राप्त करून घेतो. ***('रामदास म्हणे धन्य त्याचे जिणे। कथा निरूपणे जन्म गेला।।'- श्रीसमर्थ, 'धन्य जगी तोचि एक हरिरंगी नाचे। रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे।।'- श्रीनाथमहाराज)*** म्हणून संसारातील भाकडकथा सांगण्यात आयुष्य न घालवता देवाचे निरूपण समजण्यासाठी सारा काळ देवाच्या चिंतनात, हरिकथा निरुपण, श्रवणात, मननात घालविला पाहिजे. ***('हरिकथा सांडू नये। निरुपण तोडू नये।। परमार्थास मोडू नये। प्रपंचबळे।।', 'सांडूनी आपली संसारवेथा। करीत जावी देवाची चिंता। निरुपण कथा वार्ता। देवाच्याची सांगाव्या।।' - श्रीसमर्थ)*** जो आळसाने अज्ञानातच सुख मानतो, त्याला हे निरुपण उमगणार नाही. ***('निद्रा आळस दुश्चितपण। हेचि मूर्खाचे लक्षण। येणे करिता निरूपण। उमजेचिना।।'- श्रीसमर्थ)*** म्हणून आळस झटकून साधन केले पाहिजे तरच निरूपणाचा बोध होऊन समाधान होणारे आहे. ***('यास्तव बरवा विचार करी। सांडून आळस निद्रा वैरी।। साधन करूनी सुख घे करी। दास विनवी सद्गुरूचा।।'- श्रीचिमडमहाराज)*** म्हणून जीवमात्राला ज्ञानाने समाधान प्राप्त होण्यासाठी निरूपणासारखे साधन नाही. श्रीसमर्थ निरूपणाची थोरवी अशी सांगतात, ***'निरूपणाऐसे नाही समाधान। आणिक साधन आढळेना।।', 'निरूपणे भक्ती निरूपणे ज्ञान। अनुताप पूर्ण निरूपणे।।'***

**

# भजन

ज्याला आकार नाही असे निराकार अव्यक्त चराचररूपाने ज्यायोगे व्यक्त होते असे श्वासोच्छ्वास हेच हरीभजनाचे साधन आहे. ***(‘अव्यक्त निराकार नाही ज्या आकार। जेथोनि चराचर हरिसी भजे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या श्वासोच्छ्वासामुळे चराचराना आयुष्य प्राप्त झाले आहे. आपुले आयुष्य - श्वासोच्छ्वासाचा वेळ - ही रत्नपेटी असून त्यामध्ये असणारे जीवन ही भजनरत्ने आहेत. ही रत्ने भगवंताला अर्पण करून स्वानंदाची प्राप्ती होणारी आहे. ***(‘आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी। अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी।।’- श्रीसमर्थ)*** उपाधीभूत जीवन हे उपाधीरहित जीवन होणे म्हणजेच ‘जीवन हे जीवन ते होऊन राहणे’ असे झाले असता पाहता पाहणे घडून काय नोहे होणार आहे. ***(‘जीवन हे जीवन ते होवोनिया ठेले। काय नोहे ऐसे पाहता पाहताची झाले।।’- श्रीदासराममहाराज)*** सर्व मनुष्यमात्रात हे श्वासोच्छ्वास असलेने मनुष्यमात्र हे स्वभावत: भजनशीळ आहेत. ***(‘देखे मनुष्यजात सकळ। हे स्वभावता भजनशीळ। जाहले असे केवळ। माझ्याचि ठायी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** कामक्रोधादी विकाराने आपली मूळस्थिती, सहजस्थिती बदलते. जे कृत आहे ते विकृत होते. त्यामुळे मूळ स्वभाव हे भजन साधत नाही तर षड्विकारात्मक आयासाने - सायासाने प्रपंच साधतो. म्हणून या कामक्रोधादी विकारांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ‘भजनमार्गीचे मांग’ असे संबोधिले आहे. ***(‘सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरिसी न भजसी कवण्या गुणे।।’, ‘हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गीचे मांग। मारक जे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे कामक्रोधादि विकार गेले असता मूळस्वभाव हे भजन साधून माणसाला सदा समाधान प्राप्त होणारे आहे. ***(’हेचि देवाचे भजन। सदा राहे समाधान।।’ संत जनाबाई, ’एका जनार्दनी भजन। भजनी पावे समाधान।।’- श्रीनाथमहाराज, ‘अंतरी भजन चाले रात्रंदिन। तेणे समाधान अनिर्वाच्य।।’- स्वामी स्वरूपानंद)*** म्हणून कामक्रोधाने श्वसनाची गती बदलत नाही ना इकडे आपले लक्ष पाहिजे. श्वासाकडे लक्ष दिले तरच षड्विकाराने होणारा गतीतील बदल हा प्रपंच नाहीसा होऊन गुरू (श्रेष्ठ) भजन साधेल व कृतकृत्यता प्राप्त होईल. ***(‘म्हणौनी जाणतेने गुरु भजिजे। तेणे कृतकार्य होईजे। जैसे मुळसिंचनी सहजे। शाखा पल्लव संतोषती।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाभ्यासाने तेजाचा तारकबिंदूचा अनुभव आला की मन मुरते, देहभाव हारपतो. इंद्रियवृत्ती तेजामध्ये लोप पावून हे भजन साधते. ***(‘भकारी विरावी जनेन्द्रियवृत्ती। भजन बोलती याची लागी।।’- श्रीदासराममहाराज, ‘तया तेजामध्ये देहभाव राहे। निर्विकल्प पाहे समाधी ते।।’- संतवचन)*** अहर्निशी सानुरागे भजनाने मनोलय साधून काही न बोलणे (मौन) ही स्तुती व काही न करणे ही देवाची पूजा त्याला साधते. तो कळीकाळावर मात करून स्वरूपाकार होतो. तो देवच होतो पण त्याचे मूळस्वभाव हे भजन तसेच अहर्निशी चालू राहते. ***(‘भजन पूजन साधुनी बळे। जिंकियेले कळिकाळ।।’, ‘भजन पूजन नेणे। काय स्वरूपासी जाणे।।’, ‘आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग। त्याचे भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘देवची झाले अंगे देव भजता सानुरागे।।’ संत निळोबाराय, ‘स्तुती काही न बोलणे। पूजा काही न करणे। सन्निधी काही न होणे। तुझ्या ठायी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘मन कृतं कृतं कर्म। न शरीर कृतं कृतं’ - योगवसिष्ठ, ‘हरिभजनावीण काळ घालवू नको रे।।’ - संत सोहिरोबानाथ)***

**

# अहर्निश

दृश्याचे विपरीत ज्ञान न होताना जे सत्य आहे, जे खरे आहे त्याचे ज्ञान सतत होणे हाच खरा अहर्निशी परमार्थ आहे. अज्ञान अंध:कार नाहीसा करणारे महाकारणदेहातील अखंड स्मरण हीच सतत होणारी, अद्वैत प्रतीत करणारी हरीकथा, कीर्तन, निरूपण, भजन आहे. ***(‘महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।।’, ‘स्मरणाचा प्रकाश बरा। दावी अज्ञान अंध:कारा।।’- श्रीदासराममहाराज)*** बाह्यत: आपण ज्याला हरिकथा, कीर्तन, भजन, निरूपण समजतो ते आपण अहर्निशी करू शकत नाही. महाकारणदेहातील अखंड स्मरण जर आपणास प्राप्त झाले तरच हा अहर्निशी परमार्थ शक्य आहे. त्रिगुणाचे पलीकडील चौथा गुण - शुद्ध सत्वगुण जर आपणास प्राप्त झाला तरच हा अहर्निशी परमार्थ आपल्याला साधतो. ***(‘तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य। करवी परमार्थ अहर्निशी।।’- श्रीतुकाराममहाराज)*** हे त्रिगुण जे आहेत ते आपल्या श्वसनामध्ये आहेत. ***(‘त्रिगुण आणि पंचभूते। हे वायोमध्ये मिश्रिते। अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।’- श्रीसमर्थ)*** या त्रिगुणांचा निरास होण्यासाठी या श्वसनाचा अभ्यास होणे, साधनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. साधनाचे अभ्यासाने त्रिविध झालेले आयुष्य एकवीध होणे - जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था होणे - त्रिगुणांचा निरास होणे - हे साधल्याशिवाय संतांनी साधलेला अहर्निशी परमार्थ - सदा स्वरूपानुसंधान - प्राप्त होणार नाही. साधनाच्या नेमाचा त्रिकाल अभ्यास साधला असता सर्वकाळी नामस्मरण साधणार आहे. या योगे चित्ताला समाधान प्राप्त होणारे आहे. ***(’नित्य नेम प्रात:काळी। माध्यान्हकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावे।।’- समर्थ, ‘सर्वकाळ नामचिंतन मानसी। समाधान चित्तासी समाधी ते।।’- संतवचन)*** बरव्या विचाराने असार संसार टाकून (त्रिगुणातीत होऊन) बरवे साधन साधले असता मन सुखरूप शांत होते. साक्षात्काराच्या आड येणारे कामक्रोध नाहीसे होतात व परमेश्वराचा साक्षात्कार होतो, खरे ज्ञान होते व अहर्निशी परमार्थ होतो. ***(‘बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।’, ‘अहर्निशी सदा परमार्थ करावा। पाय न ठेवावा आडमार्गी।।’, ‘कामक्रोध आड आलेती पर्वत। राहिला अनंत पैलीकडे।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘असारा संसारा त्याजुनी बरवे साधन करी।।’- श्रीसमर्थ, ‘यास्तव बरवा विचार करी। सांडूनी आळस निद्रा वैरी। साधन करूनी सुख घे करी। दास विनवी सद्‌गुरूचा।’- श्रीचिमडमहाराज, ‘संसार समस्त त्रिगुण।।’- श्रीनाथमहाराज)*** अहर्निशी परमार्थ हा फक्त आपल्या धर्मातच सांगितला आहे. या अहर्निशी शब्दामुळेच संतांचे आमचे पटत नाही. ख्रिस्ती धर्मात एक रविवारी प्रेअर केली की पुढे आठवडाभर व्यवहाराला मोकळीक. इस्लाम धर्मात जे काही नमाज आहेत ते केले की ते व्यवहारासाठी मोकळे असतात. तशी काही फुरसद आम्हाला द्याल की नाही. आमचेकडे परमार्थ करायचा असेल तर मात्र व्यवहाराचा शेवट करावा लागतो. व्यवहाराचा शेवट झाला की मगच परमार्थाची सुरुवात. ***(‘व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘खुंटलासे शब्द राहिला व्यवहार। झाला साक्षात्कार सदोदित।।’- संतवचन)*** व्यवहाराचा शेवट होतो म्हणजे काय होते हो? त्यांचा व्यवहार बंद होत नाही. व्यवहाराचे स्वरूप बदलते. लटका असणाऱ्या व्यवहाराचे रूपांतर उत्तम व्यवहारात होते. आत्मप्रकाश पाहात व्यवहार होतो. व्यवहारात बरकत होते. ***(‘लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे।। परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।’- श्रीसमर्थ)*** भगवंताचे अधिष्ठान पाहायचे व व्यवहाराची चळवळ करायची मग चळवळीत सामर्थ्य येते.

**

# नामाचा व्यापार

आपले हित होईल असा व्यापार केला तर काहीतरी अर्थ आहे. आम्ही व्यापार केला आणि तो आतबट्ट्यातला झाला, आम्ही मुद्दलच गमावले तर त्याला काही अर्थ आहे का? ***('तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावे।।', 'जन्मा येवोनी काय केले। तुवा मुद्दल गमाविले।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आपले खरे हित संतच जाणतात. आईवडिलांनासुद्धा आपले खरे हित कळत नाही. ***('हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत।। देहबुद्धीने अनहित। होचि लागे।।'- श्रीसमर्थ, 'हित नाही ठावे जननीजनका। येरा लोकाचार शिकविती।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आपले आईवडील, शिक्षक जे आपल्याला शिकवतात ते पोट भरायची विद्या शिकवतात. त्यातून आपले आर्थिक हित साधते पण आर्थिक हित म्हणजे आपले खरे हित नव्हे, आत्महित नव्हे. ***('धन मिळवोनी कोटी। सवे न ये रे लंगोटी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जे यातीचा जो व्यापार। शिकविती भरावया उदर। तेही गुरू परी साचार। सद्गुरू नव्हेती।।', 'आपली माता आणि पिता। तेही गुरुचि तत्वता। परी पैलपार पावविता। तो सद्गुरू वेगळा।।', 'येवं पोट भरावयाची विद्या। तयेसी म्हणो नये सद्विद्या। सर्वव्यापक वस्तू सद्या। पाविजे ते ज्ञान।।', 'चौदा विद्या चौसष्ट कळा। जरी का प्राप्त झाल्या सकळा। एक नसता नामकळा। सर्वही विकळा जाणाव्यात।।'- श्रीसमर्थ, 'नाना शास्त्रं पढे ल्लोको। नाना दैवत पूजनम्। आत्मज्ञानं विना पार्थ। सर्वकर्म निरर्थकम्।।'- संस्कृतवचन)*** देहातीत होणे, देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे नामस्मरण घडणे, हा नामाचा व्यापार घडणे यात खरे हित आहे. ***('हित ते हे एक राम कंठी राहे। नाठविती देहे देहभाव।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गोविंद म्हणे हित रामनाम कंठी। जेणे जगजेठी तुष्ट होय।।'- श्रीमामामहाराज)*** नामाचा व्यापार समजणेसाठी देहाचे मनाचे षड्विकारात्मक, अव्यापारेषु व्यापार थांबले पाहिजेत. ***('छळकोट छळीछी आथा। कुडु प्रसादवचनादीकंथा। आडुवल्याडू ई छल्विद बेकू। इंद्रिय व्यापारगे गोविंदनाकू।।'- श्रीगुरुलिंगगीता पद ४१, 'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणि। भक्तालागी सांभाळी।।'- समर्थ)*** व्यापार म्हणजे काही देणे घेणे हे असते. नामाचे व्यापारात नामच द्यायचे व नामच घ्यायचे. आमचे जे आकाराचे द्वैतनाम आहे, जे परमेश्वरापासून दूर नेते ते द्यायचे व अद्वैताची - एकाची - जाणीव करून देणारे एकनाम अनुभवायचे. हे अद्वैत नाम जाणणारे विरळा. हा नामाचा व्यापार जेथे घडतो त्याला पंढरपूर म्हणतात. ***('एक नाम हरी द्वैत नाम दुरी। अद्वैत कुसरी विरळा जाणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामाचा बाजार पंढरी नामाचा बाजार। नामची देणे नामची घेणे कोटीकुळे उद्धार।।'- श्रीतुकाराममहाराज)*** सहजकृती, निर्हेतुक जीवन म्हणजेच निर्हेतुक सत्क्रिया आचरणे म्हणजे श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. या नामाच्या व्यापाराने अंत:करणातील कामक्रोध नाहीसे होतात व त्याला हृदयस्थ हरीची अनुभूती येते. त्याची जन्ममृत्यूची येरझार नाहीशी होते. मोक्षप्राप्ती होते व नामाचा व्यापार सुफळ होतो. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'साठविला हरी। जेणे हृदयमंदिरी।। त्याची सरली येरझार। झाला सुफळ व्यापार।। हरी आला हाता। मग कैसी भयचिंता।। तुका म्हणे हरी। काही उरो नेदी हरी।।'***

**

# साक्षीचा उपदेश

निर्हेतुक जीवनाने सहजकृती होणे म्हणजे श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. मग झोपेत कोणताही हेतू नसतोच की? मग ते रामनाम आहे का? नाही तेथे पूर्ण अज्ञान आहे. ती झोपेची अवस्था जाणीवेत प्राप्त होणे - त्या झोपेच्या अवस्थेचे आपण साक्षी होणे - झोपेत जागे राहणे - नेणीवेची जाणीव होणे - अज्ञानाचे ज्ञान होणे म्हणजे साधनाची अवस्था आहे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या देहाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तिन्ही अवस्थांत ही साधनाची अवस्था - निर्हेतुक जीवनाची जाणीव - नामाच्या व्यापाराची जाणीव - राहणेसाठी करावयाचा प्रयत्न म्हणजे साधनाभ्यास आहे. ही साधनाची अवस्था - नामाच्या व्यापाराच्या जाणीवेची अवस्था दोन प्रहर जर साधली तर ही अवस्था विष्णूदर्शनाने अष्टौप्रहर - तिन्ही अवस्थांमध्ये साधता येते. सद्गुरू श्रीनारायणमहाराजांचे कृपेने, सद्गुरू श्री तात्यासाहेबमहाराजांचे कृपेने ही अवस्था विष्णुदर्शनाने अष्टौप्रहर श्रीमामामहाराजांनी अनुभवली होती. ते रामपाठात स्वानुभावाने सांगतात, ***'जरी दोन प्रहर साधेल पवन। विष्णूचे दर्शन होत असे।। साधिलिया जीवा विष्णूचे दर्शन। अष्टौप्रहर साधन चालतसे।। गोविंद म्हणे गुरूकृपेचे विज्ञान। बोलिलो संपूर्ण हनुमंतकृपे।।'.*** तिन्ही अवस्थांची एक अवस्था होण्याला - एकदशा प्राप्त होण्याला तुर्यावस्था (सर्वसाक्षी अवस्था) म्हणतात. ही अवस्था ज्या देहात प्राप्त होते, त्या देहाला 'महाकारणदेह' म्हणतात. या महाकारणदेहाच्या स्मरणरूप ज्ञानात्मक तुर्यावस्थेत ब्रह्माचाही अनुभव येतो व मायेचाही अनुभव येतो. सर्व जाणते म्हणून हिला 'सर्वसाक्षिणी' असे संबोधतात. साक्षित्वाने वेगळेपणाने जे ब्रह्माचे अनुभव येतात, ते याच अवस्थेमध्ये. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना जाणणारी चौथी महाकारणदेहाची अवस्था 'तुर्या' तिला ज्ञान असेही म्हणतात. पण तेही पदार्थज्ञानच. खरे ज्ञान हे अद्वैत (चराचराचे मूळ शुद्ध स्वरूप) आहे आणि तुर्या ही तर उघड द्वैतातील आहे. म्हणून शुद्ध स्वरूपज्ञान हे नेहमी तुर्येतील ज्ञानाहून वेगळे आहे. संतमहात्मे या अखंड स्मरणाच्या अवस्थेत (तुर्यावस्थेत) सतत असतात. या तुर्यावस्थेतच मनाचे उन्मन होऊन ते अविनाशी ब्रह्मस्वरूप होतात. ***('तुर्येमध्ये माझा अखंड रहिवास। निवृत्ती म्हणे अविनाश तुर्या करी।।'- श्रीनिवृत्तीनाथमहाराज, 'तुरीयेचे अंतरी मनाचे उन्मन। बोलियेले ज्ञानदेव सत्य।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वस्तूवरी अवस्था भासे। भासली अवस्था सवेची नासे। त्या नाशामाजी वस्तू न नासे। उरे अविनाश तुरीय।।'- श्रीनाथमहाराज)*** जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना प्रकाशित करणारी चौथी ज्ञानात्मक अवस्था म्हणून तिला 'तुरीय' म्हणतात. ***('जागृती, स्वप्न सुषुप्ती। तिन्ही अवस्थाते प्रकाशिती।। यालागी ते चौथी। तुरीय म्हणती सज्ञान।।', 'जे जागृतीते जागवित। जे स्वप्नी स्वप्नाते नांदवित।। जे सुषुप्तीते निजवीत। त्याते तुरीय म्हणती उद्धवा।।'- श्रीनाथमहाराज, 'तिन्ही अवस्थांचे जाणपण। तियेशी तुर्यावस्था ऐसी खूण। तिही देहांचे अवलोकन। ते महाकारणदेह।।', 'त्रिविध देहे त्रिविध अवस्था। त्रिविध स्थाने त्रिविध भोग त्रिविध भोक्ता। येया प्रपंचाते तत्साक्षित्वे जाणौनि वेवस्था। ते तुरीय जाणावी।।' श्रीमुकुंदराजस्वामी, 'तुर्या जाणावी स्मरण। सुषुप्ति जाणावी विस्मरण। उभयता शरीरी जाण। वर्तती आता।।', 'जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया। ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी।।', 'सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या। ज्ञान ऐसे म्हणती तया। परी ते जाणिजे वाया। पदार्थज्ञान।।', 'ज्ञान म्हणजे अद्वैत। तुर्या प्रत्यक्ष द्वैत। म्हणौनि शुद्धज्ञान ते सतत। वेगळेचि असे।।'- श्रीसमर्थ.)***

**

# प्रसाद

देवाचा प्रसाद, ऋषींचा प्रसाद, साधूंचा प्रसाद, साधुमहाराजांचा प्रसाद प्राप्त होणे महद्‌भाग्याचे आहे. प्रापंचिक लोभ असण्यापेक्षा ईश्वरतीर्थप्रसाद ग्रहणी अपार लोभ असावा. तो हे भाग्य प्राप्त होणेसाठीच. देवाचा साक्षात्कार होणे, देव चित्तात भरून राहणे हा देवाचा प्रसाद. इंद्रिये ताब्यात येणे हा ऋषींचा प्रसाद, साधुसंतांचा बोध प्राप्त होणे हा साधुसंतांचा प्रसाद आहे. साधुसंतांच्या प्रसादाने, बोधाने, अनुग्रहाने इंद्रिये ताब्यात येणे हा ऋषीप्रसाद, देवाचा साक्षात्कार होणे हा देवाचा प्रसाद, हा सहजच प्राप्त होत असल्याने साधूंचा प्रसाद प्राप्त होणे ही गोष्ट सर्वात श्रेष्ठ मानली जाते. साधुमहाराजांचा प्रसाद प्राप्त झाला असता नेत्रांतरी आत्माराम अनुभवाला येऊन आनंद होत असल्याने तो प्रसाद आपण आनंदाने घ्यावा. ***('रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी यांचा प्रसाद घ्यावा। आत्माराम सर्वाठायी नेत्रांतरी पाहावा।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज, 'हा प्रसाद साचा रुचिर साधुरायाचा। आनंदे घ्यायाचा।।'- राजकवी साधुदास, 'साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधुंच्या उपदेशाप्रमाणे जर साधन साधले व सर्वकाळी अखंड स्मरण प्राप्त झाले - अखंड चैतन्याची जाणीव प्राप्त झाली तर अखंड सुखाने अखंड प्रसन्नता हा प्रसाद प्राप्त होतो. ***('देखे अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणे नाही समस्ता। संसारदु:खा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'येवोनिया कृपावंते। तुकयास्वामी सद्‌गुरूनाथे।। हात ठेविला मस्तकी। देऊनी प्रसाद केले सुखी।।'- श्रीनिळोबारायमहाराज)*** भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकर महाराजांनी - श्रीगुरूलिंगजंगमस्वामीमहाराजांनी आकाशरूप महाकारणदेहाच्या गुहेत सिद्धानंदरूपाने प्रगट होऊन श्रीदासराममहाराजांना तेजोनादे बोध केला. श्रीदासराममहाराजांना बोधामृताच्या त्रिवेणी सरितेत स्नान घडले. जंगमप्रसाद - चैतन्याचा प्रसाद - चित्ताला प्राप्त झाला. अभंगातून अभंगी (न भंगणारा) प्रसाद (प्रसन्नता) प्राप्त झाला. कानड्या परमात्म्याने कानड्याचा बोध केला मग कानडपण (अज्ञान) राहील का? भगवान सद्‌गुरू गुरुलिंगजंगमस्वामीमहाराजांनी त्याचे हृदयातील कप्प्यातील कप्प्यातले ज्ञान श्रीदासराममहाराजांचे हृदयात ओतले व तात्काळ द्वैत न मोडता आपणासारखे केले. चित्ताचा विषय चैतन्य झाला. चित्तात चैतन्य भरून राहिले. सर्वत्र महाराजांचा-चैतन्याचा साक्षात्कार झाला. श्रीमहाराजांचा संपूर्ण प्रसाद प्राप्त झाला. ***('गुहेमाजी नारायणे। दिली अंतरीची वचने।। काय अभंगी प्रसाद। केला कानड्याने बोध।। काय जाणोनी मराठी। अक्षरेची ठेवू ओठी।। अवघाचि महाराजा। दासरामी कोण दुजा।।'- श्रीदासराममहाराज, 'निंबरगीश्वर जंगम गुरुलिंगप्रभूंनी। सिद्धानंदरूपाने गगनी येवोनी। प्रल्हादाचेसाठी हृदयी प्रगटोनी। तेजोनादे केला बोध तया कर्णी।।' -आमचे श्रीकेशवकाका, 'चित्तची हारपले अवघे चैतन्यची जाहले। पाहता पाहता अवघे विश्वची मावळले।।'- श्रीनाथमहाराज, 'मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादु जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'ॐ जय गुरुलिंगन गीता। यंथाद प्रसादनु कोदुत नादवु नागाप्पावचनेंथा। प्रल्हादा निनवयावतारदवा नारायणसत्ता।।'- श्रीगुरुलिंगगीता)*** येथे प्रल्हाद हे नाव श्रीदासराममहाराजांना उद्देशून वापरले आहे. हे आपण लक्षात घ्यावे.

असा प्रसाद प्राप्त झाला की भेद नाहीसा होऊन अभेदत्व प्रगट होते. ***('पावलो प्रसाद। अवघा निरसला भेद।।'- श्रीनाथमहाराज)*** आज श्रीबहिणाबाई कोटणीस व श्रीनिंबरगीकरमहाराजांचे अधिकारी शिष्य व श्रीउमदीकरमहाराजांचे मेहुणे आद्य रघुनाथाचार्य यांची पुण्यतिथी आहे. या दोन्ही महात्म्यांचे ठिकाणी भक्तीभावे नमन करतो व येथेच थांबतो.

**

# मोहनाश

असत्य, असार, पापाचे कारण, अविश्वासाचा देह म्हणजे 'मी' असे मानून त्या 'मी' ला चिकटलेले सारे माझे आहे असे समजणे, त्या साऱ्या माझ्या गोष्टींबद्दल 'मी' ने ममत्व बाळगणे हेच खरे मोहाचे लक्षण आहे. ***('नसते वस्तूच्या ठायी जाण। मी माझे हा अभिमान। तेचि मोहाचे लक्षण। ममता दारूण ते संधी।।'- श्रीनाथमहाराज)*** दृष्टीस दिसणाऱ्या, मनास भासणाऱ्या, शब्दाने वर्णन करता येणाऱ्या मायावी गोष्टींचा मोह होतो. माणूस मायाजालात सापडतो. मायेचा मोह झाला की त्याबद्दल माया (प्रेम) वाटू लागते. ममत्व निर्माण होते. ही मोहमाया ममताच दु:खाला कारणीभूत होते. ***('मोहमाया ममता भारी। गांजिताती परोपरी। यातूनी सोडवी बा। तूचि माझा कैवारी।।'- श्रीचिमडमहाराज)*** ही मोहमाया ममता दूर झाली तरच समत्वाचे सुख मिळणार. नाहीतर नुसता शीणच पदरी येणार. ***('अनुदिनी अनुतापे तापलो रामराया। परम दिनदयाळा नीरसी मोहमाया। अचपळ मन माझे नावरे आवरीता। तुजवीण शीण होतो। धाव रे धाव आता।।'- श्रीसमर्थ)*** 'ममता गेली की समता येते' हा श्रीमामामहाराजांचा सूत्ररूप विचार येथे लक्षात घ्यावा. श्रीहरीचा - चैतन्याचा साक्षात्कार झाला तरच मायेचा निरास होतो, मायाजाल नासून तो मोहातून परावृत्त होतो. देह म्हणजे 'मी' असे मानणाऱ्या देहाभिमानी लोकांना चैतन्याची - श्रीहरीची जाणीव होत नाही. तर जगाची जाणीव होते. साहजिकच जगाबद्दल ममत्व वाटते. जगाचा मोह निर्माण होतो. त्याची जन्ममरणाची येरझार हरीच्या जाणीवेशिवाय होते. हरीच्या जाणीवेशिवाय होणारी येरझार म्हणजेच लटका व्यवहार (संसार) आहे. हा लटका व्यवहार म्हणजे संसार हेच मोहाचे कारण आहे. या संसाराहून निराळे झाल्याशिवाय, संसारमोह नाहीसा झाल्याशिवाय जगाची जाणीव नाहीशी होणे व देवाची जाणीव होणे हे साध्य होत नाही. ***('त्या देवाचे दर्शन तु घे तु घे। संसारमोहातून निघे निघे।।'- श्रीसमर्थ, 'लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देह 'मी' हा अहंभाव गेला की देवाचा साक्षात्कार होतो किंवा देवाचा साक्षात्कार झाला की अहंभाव नाहीसा होतो. ***('तैसे माझिये साक्षात्कारी। सरे अहंकाराची वारी। अहंकारलोपी अवधारी। द्वैत जाय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हा अहंभाव जाऊन साक्षात्कार होणेसाठी गुरुकृपा आवश्यक आहे. ***('माझा अहंभाव असे शरीरी। तथापि तो सद्गुरू अंगिकारी।। नाही मनी अल्पविकार ज्याला। विसरू कसा मी गुरुपादुकाला।।' - श्रीनारायणमहाराज जालवणकर)*** देवाच्या साक्षात्काराने - प्रसादाने अखंड चैतन्याची जाणीव - स्मरण प्राप्त होऊन जगाची जाणीव नाहीशी होते. साहजिकच जगाचा मोह नाहीसा होतो. अर्जुन मोहापासून जो परावृत्त झाला ते काही नुसती भगवद्गीता ऐकून नव्हे. योगेश्वर कृष्णाची आर्जवून असणाऱ्या अर्जुनावर कृपा झाली. त्या कृपाप्रसादाने अर्जुनाचे ठिकाणी चित्कळिका - ज्ञानज्योती उजळून ज्ञानाच्या प्रकाशाने मिथ्या कल्पनेचा निरास होऊन अखंड स्मरणाने मोहाचा अज्ञान अंध:कार दूर झाला. ***('नष्टः मोहः स्मृतिः लब्धा। तत्प्रसादात् मया अच्युत। स्थितः अस्मि गतसंदेहः। करिष्ये वचनम् तव।।'- भगवद्गीता, 'प्रसादाने तव आज अच्युतारे। मोह गेला ये स्मरण परत सारे। फिटे संशय मम लीन पदी तुझ्या मी। वचन आता पाळीन तुझे गा मी।।'- श्रीअनंततनय, 'ऐसे ज्ञानप्रकाशे पाहेल। तै मोहांधकारु जाईल। जै गुरुकृपा होईल। पार्था गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** भगवद्गीता म्हणजे काळ्यावर पांढरे केलेली अक्षरे नव्हेत तर ती ब्रह्माचे साम्राज्य प्रकाशात आणणारी अर्जुनाचे ठिकाणी भगवंतानी प्रगट केलेली चित्कळिका आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ती अक्षरे नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका। अर्जुनालागी चित्कळीका। उजळलिया कृष्णे।।'***

**

## आश्विन शुद्ध

*हरीनामी निर्गुणी प्रगटे भवानी। नवैकविधपणी उपासावी।।१।।*
*ते चित्प्रकाशे द्वैतभाव नासे। सत्तारूप कैसे कळो येई।।२।।*
*पंचविषयात निघोनिया मन। पूर्ण समाधान पंचमी ते।।३।।*
*नामाचा उदय तोचि उदो शब्द। गोंधळ नि:शब्द महास्वरूपी।।४।।*
*खंडेनवमी ते नवखंड होता। अखंडात जाता दशमी ते।।५।।*
*दशमाचे पैल एकादशस्थान। जेथे वैष्णवजन विष्णुध्यानी।।६।।*
*निजत्वी राहोनी खेळात जागता। जागृती ये हाता दास म्हणे।।७।।*

१) निर्गुणी भवानी हरीनामी प्रगट झाली (घटस्थापना झाली) की नवविधभक्ती प्रकारानी तिची उपासना करावी, नवचैतन्याशी एकवीध व्हावे.
२) नादश्रवणी तदाकारता साधली की चित्प्रकाश नयनात भरतो व संपूर्ण मनोलयाने द्वैतभाव नाहीसा होऊन त्या शक्तीची सत्ता काय आहे याचा प्रत्यय येतो.
३) पंचविषयातून मन निघून मनाचे उन्मन होते व वृत्तीरहित ज्ञानाने पूर्ण समाधान होते.
४) उन्मनी अवस्थेत अवघा वाचेचा गोंधळ संपून नामरूपाला मेळ असणारे निर्विकल्प नाम उदीत होते.
५) मनोलयाने 'काही न करणे' ही शस्त्रपूजा साधते. संसारावर विजय प्राप्त होऊन दशमी साधते.
६) दशमद्वार ओलांडल्यावर महाकारणदेहात एकादशस्थानी वैकुंठावस्थेत वैष्णवांना विष्णुज्ञानाने विष्णुध्यान प्राप्त होते.
७) असा जो निजत्वी राहून खेळात (चैतन्याच्या) जागतो त्याला अखंडजागृती प्राप्त होते.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने आश्विन महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## आश्विन वद्य

*भावे विश्वासाने सत्यस्थानी जाई। पापपुण्य नाही जये गावी।।१।।*
*तपतीर्थदान सर्व संतापायी। समाधान देही साधनाचे।।२।।*
*दहा आणि दोन गुरुपदी जडे। धन त्या सापडे त्रयोदश।।३।।*
*चतुर्दशस्थानी दीपत्वे दिवाळी। अलक्ष पूजनी लक्ष्मीपूजा।।४।।*
*दास म्हणे तेथे अनुपम सुख। होता अंतर्मुख मिळे नामी।।५।।*

१) संदेह टाकून जर भाव धरला तर विश्वासाने सत्यस्थानी पापपुण्य, जन्ममरण नाही असे निर्गुण प्राप्त होते.
२) देहाचा, मनाचा, प्राणाचा लय हे तप, या तपाने आत्मतीर्थात स्नान, स्नानाने सायुज्यतां या मुक्तीचे दान हे सारे संतांचे ठिकाणी प्राप्त होते. साधनाभ्यासाने आत्मा जाणणाऱ्या देही माणसास समाधान प्राप्त होते.
३) दहा इंद्रिये व मन बुद्धी यांचे गुरुपदाशी तादात्म्य होणे ही गुरुद्वादशी तर मनोलयाने सर्वकाळ असणाऱ्या अविनाशी धनाची प्राप्ती होणे ही धनत्रयोदशी.
४) चतुर्दशस्थानी विवेकाचा दीप अनुभवाला येणे ही दिवाळी तर अलक्ष वस्तू लक्ष होणे हे लक्ष्मीपूजन.
५) हे अनुपम नामी आत्मसुख जीवन अंतर्मुख झाले असता प्राप्त होते.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने आश्विन महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# हरीनामी निर्गुणी प्रगटे भवानी

आज घटस्थापना. देवीच्या नवरात्रोत्सवाचा आरंभ. घटाघटात असणाऱ्या चित्‌शक्तीची जाणीव करून देणारा, तिकडे लक्ष वेधणारा हा उत्सव आहे. या विश्वात असा एकही घट नाही की ज्यात शक्तीचा कार्याने प्रत्यय येत नाही. तिचे प्रत्ययाचे स्वरूप वेगळे असेल इतकेच. ज्या घटाला अस्तित्व आहे, तेथे वायुरूप चितशक्ती ही आहेच. ***('नाना देही देव एक विराजे। नाना नाटकलीला सुंदर रूप साजे।। नाना तीर्थक्षेत्री अभिनव गती माजे। अगाध महिमा पिंड ब्रह्मांडी गाजे।।' जयदेव जयदेव आत्मयारामा। निगमागम शोधिता नकळे गुणसीमा।।'- श्रीसमर्थ, 'घटघटबीचमे राम रमय्या। झुटा पंचरंग खोल।।'- संत कबीर, 'सर्वाघटी राम देहादेही एक। सूर्यप्रकाशक सहस्ररश्मी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** घट निर्माण होण्यापूर्वीही शक्ती होतीच, घटातही ती आहेच, घटाचे नाशानंतरही ती राहणार आहे. ती शक्ती अनादी निर्गुण आहे. घटाचे निर्मितीस, अस्तित्वास, नाशास तीच कारणीभूत आहे. ही शक्ती कोणी निर्माण केलेली नाही किंवा तिचा नाशही करता येत नाही. मनुष्याची शक्ती अफाट आहे असे आपण म्हणतो खरे, पण शक्ती ही देवाची आहे. तिचा वापर मनुष्यमात्र गरजेप्रमाणे करतो इतकेच. विज्ञान सांगते, 'Energy can not be created nor be destroyed, it can be transformed from one form to another.' ही जी अनादी अविनाशी शक्ती आहे ती ज्याची आहे, तो परमेश्वर आहे. म्हणून शक्ती परमेश्वराची, माणसाची नव्हे. शक्ती व घट किंवा देह एकत्र आल्याने हे विश्वाचे कार्य उभे राहिले आहे. शक्ती आहे म्हणून देहामार्फत कार्य होते हे उघड आहे. अर्थात कार्य हे ही देवाचेच. त्याच्या इच्छेनेच सारे कार्य होते. ***('आत्म्याकरिता देह जाला। देहाकरिता आत्मा तगला। उभययोगे उदंड चालिला। कार्यभाग।।', 'मूळमायेपासून सेवटवरी। वायोचि सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।'- श्रीसमर्थ, 'हे करणे का न करणे। हे आघवे तोचि जाणे। विश्व चळतसे जेणे। परमात्मेनि।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** शक्तीमुळे होणारे दैदीप्यमान कार्य आमचे डोळे दिपवते. पण ज्या शक्तीने कार्य होते ती शक्ती जाणून घ्यावी असे आम्हाला वाटत नाही. श्रीदासराममहाराज सांगतात, 'घटात शक्ती आहे व शक्तीने घटाचे ज्ञान आहे. पण घटाशी तादात्म्य झालेला जीव त्या घटात काही शक्ती आहे, ती स्वतंत्र आहे, त्यामुळे देह अगर घट हा शक्तीमान आहे हेच तत्व त्यास अनाकलनीय झाल्याने ती शक्ती जर आम्ही ओळखलीच नाही तर ती स्थापित असून तरी काय? कर्ता कोण आहे हे आपण ओळखले तर सुख होणारे आहे. नाहीतर संसाराने दुःखच होणार आहे.' ***('कर्त्यासी वोळखावे। यास विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदुःखी।।'- श्रीसमर्थ, 'हे मजचिस्तव जाहले। परी म्या नाही केले। ऐसे जेणे जाणितले। तो सुटला गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आम्ही अदृश्य गुप्तरूपाने असणाऱ्या शक्तीने जे दृश्यमान होते आहे त्याची आशा करतो पण त्या अदृश्य शक्तीकडे दुर्लक्ष करतो त्यामुळे सर्वसुखाला मुकतो व सर्वदुःखाची प्राप्ती होते. ***('आशा मनशा सब घट व्यापी कोई मेईल नही सुना रे।।' - संत कबीर, 'तैसा हृदयामध्ये मी रामू। असता सर्वसुखाचा आरामू। परी भ्रांतासी कामू। विषयावरी।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ती देहामध्ये स्थापित असणारी शक्ती आपण ओळखणे म्हणजे घटस्थापना आहे. ही शक्ती ओळखली तर शक्तीची उपासना. ज्याची उपासना करायची त्याचाच पत्ता नसेल तर उपासना कोणाची करायची?

**

# नवैकविधपणी उपासावी

घटस्थापनेदिवशी घरोघरी प्रत्येकाचे कुळधर्माप्रमाणे घटांची स्थापना होते व आपापल्या कुळाचाराप्रमाणे उपासना सुरू होते. प्रत्येकाची घट स्थापण्याची पद्धत वेगळी, उपासना वेगळी वेगळी. त्यातही एकवाक्यता नाही. हे जे काही कुळधर्म, कुळाचार आम्ही आपापल्या पद्धतीप्रमाणे सांभाळतो त्यात शक्तीची जाणीव होते का? होत नाही. मग हे सारे सांभाळायचे का नाही? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, हे सर्व कुळधर्म, कुळाचार सांभाळा, पण वर्म ओळखून सांभाळा. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'का सांडिसी गृहाश्रम। का सांडिसी क्रियाकर्म। का सांडिसी कुळीचे धर्म। आहे ते वर्म वेगळेची।।'*** आम्ही देवाला देहधारी कल्पितो. साहजिकच देव, देवी असा भेद निर्माण होतो. पण शक्तीमध्ये लिंगभेद आहे का? शक्ती सर्वत्र एकच आहे ना? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'देवोदेवी मीचि पाही। हाही निश्चय त्यासी नाही। भाव ते ते ठायी। वेगळाला धरी।।'*** अहो विठ्ठल तीच विठाबाई, राम तीच रामाबाई, ज्ञानेश्वरमहाराज तीच ज्ञानाबाई आहे. मन आहे तोवर काल्पनिक देवाची काल्पनिक पूजा, उपासना. जोवर मन आहे तोवर जाणीव द्वैताची (दृश्य आकाराची) - घटाचीच होणार. अद्वैत चित्‌शक्तीची जाणीव होणार नाही. मन मुरले तर चैतन्याचा अनुभव प्राप्त होणार. मनाची गती (चंचळत्व) हे श्वसनगतीवर अवलंबून आहे. मन व मनातील देहबुद्धी जर पवनाचे माथ्यावर ठेवली तर पवनाची गती संथ होऊन मनाची गती संथ होते. देहभानाचा विसर होतो. मनोवृत्तीचा निरोध साधून केवलकुंभकाने श्वास व उच्छ्वास यांचे संधीकाळात तत्वरूप हरीनामाचा अनुभव पाहात्या मनाला प्राप्त होतो. हरीनामाचे रूपाने निर्गुणी असणारी शक्ती सगुण होते. या हरीनामाचे ध्वनी श्रवणासाठी मन सोकावते. मन नादश्रवणी लुब्ध होते. मनातील कामवासना नाहीशी होऊन मन शुद्ध होते. ते श्वासोच्छ्वासी नाम साधू लागते. श्वासाश्वासात रामजप हीच त्याची धारणा होते. मन चंदनाप्रमाणे साधनी झिजू लागते व वाऱ्याचा गंधही नाही. (नि:श्वासाचे प्रमाण अत्यल्प झाले असता) अशा अवस्थेत अनामिक सुगंधाचा अनुभव प्राप्त करते. ***('घंटा किणीकिणी नाद सिंहं शंखं नादं भेर्यादिक महानादं अनुभव मन लुब्धं।।'- श्रीचिमडमहाराज, 'नौबद बाजत है हरीनामकी। अतीमंदगती भाई सकल कामकी।।'- संतवचन, 'जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद। जरी आठ पळ साधेल पवन। होतसे दहन कामाचे ते।।'- श्रीमामामहाराज, 'एकची अंगूळ वाहता निश्वास। होय नादघोष सुस्वरेसी। जरी होय बंद ऐसा हा निश्वास। दरवळे सुवास चहू ठायी।।' - श्रीदासराममहाराज, 'देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी। मना सज्जना हेचि क्रिया धरावी। मना चंदनाचेपरी त्वा झिजावे। परी अंतरी सज्जना निववावे।।'- श्रीसमर्थ)*** ज्या नादाने आकाराचा बोध न होता चैतन्याचा बोध होतो. अशा एक हरीनामाकडे वृत्ती वळणे किंवा सतत चैतन्याचे नादानुसंधान - स्वरूपानुसंधान राहणे हीच खरी उपासना - भक्ती आहे. ***('स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरिती अभिधीयते।।'- जगद्‌गुरू शंकराचार्य, 'विषय इंद्रिये जड ओळखणे। या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।।'- संतवचन)*** ही नवचैतन्याची नवभक्ती चिदचिदग्रंथी विराम पावल्यावर सूक्ष्मदेहात अनुभवाला येते. ***('अष्टधेचे ज्ञान स्थूल देही जाण। सूक्ष्मदेही खूण नवभक्ती।।', 'चिदचिदग्रंथी विराम पावती। तये ठायी भक्ती उपजो लागे।।'- श्रीदासराममहाराज)*** या नादश्रवणी मन एकवीध होणेसाठी, मन निवृत्ती होणेसाठी नववीध भक्ती आचरावी लागते. ही भक्ती जरी नवविधा असली तरी तिचा हेतू मात्र एकच नवचैतन्याशी एकवीध होणे हा आहे. ***'गोविंद म्हणे पेरी अनेक। परी उस बोलिजे एक।।'*** ही श्रीमामामहाराजांची अमृतवाणी नवविधा भक्तीतील एकविधता दाखविणारी आहे.

✻✻

# चितप्रकाश

भक्ती ही नऊ प्रकारांनी व्यक्त होते. या नवविधा भक्तीचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***'श्रवण कीर्तन विष्णुस्मरण पादसेवन भले। अर्चन वंदन दास्य सख्य निवेदन झाले।। मन हे राम झाले आता मन हे राम झाले। प्रवृत्ती सोडोनी कैसे निवृत्तीस आले।।'*** या नवविधा भक्तीचे माहात्म्य श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'तुका म्हणे नववीध। भक्ती जाणे तोचि सिद्ध।।'*** व ही नवविधाभक्ती संतजनानी मला प्राप्त करून द्यावी ही आपली अंतरीक तळमळ श्रीतुकाराममहाराज अशी व्यक्त करतात, ***'नवविधा काय बोलियेली भक्ती। द्यावे माझे हाती संतजनी।।'*** मन एकवीध झाल्यावर, मन रामरूप झाल्यावर, मन प्रवृत्ती सोडून निवृत्ती झाल्यावर, मन अद्वैती समरस झाल्यावर होणारी भक्ती ही खरी भक्ती आहे. ***('राम होऊनिया रामभक्ती करा। चुकवोनी फेरा गर्भवास।।'- श्रीदासराममहाराज)*** आपण जर भक्तीरसात रंगून गेलो तर नादश्रवणी तदाकारता साधते व त्याचे नयनात चैतन्याचे वारेच भरते. नामाचाच बिंदू घडतो व तो अंतर्बाह्य प्रकाशू लागतो. नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते. श्रवणात पेरलेले नयनात उगवते. चैतन्याचा प्रकाशरूपाने अनुभव येतो. ***('वारे भरले या नयनात। नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात।।', 'हृदयात झाली वायूची घासणी। कंठात उदेला ओंकार वन्ही।। नामाचा बिंदू घडला गे माये। अंतर बाहेर प्रकाशे स्वये।।'- श्रीदासराममहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'श्रवणात पेरणी केली। ती नयन उजेडा आली।।'- संतवचन)*** हा चैतन्याचा प्रकाश आपण समजतो त्या प्रकाशापेक्षा वेगळा आहे. हा प्रकाश डोळे झाकल्यावर अनुभवाला येणारा आहे. मग डोळे झाकल्यावर कल्पनेने जे जे आकार पाहतो ते ज्या प्रकाशाने दिसते तोच का तुमचा चित्प्रकाश? नाही त्या प्रकाशाने द्वैतभाव नाहीसा होत नाही. कल्पना वाढतात. ज्या प्रकाशाने कल्पना वाढतात व आकाराचे ज्ञान होते, तो हा चित्प्रकाश नव्हे. ज्या प्रकाशाने मिथ्या कल्पना नाहीशी होते व आकाराचे ज्ञानाने होणारे द्वैताचे अनुसंधान नाहीसे होते तो चित्प्रकाश होय. येथे प्रवृत्तीसी अंध होणे, डोळ्यातील दृश्य जाणे म्हणजे हा देहाचा डोळा झाकणे व चित्प्रकाश दाखविणारा डोळा उघडणे होय. नुसते देहाचे डोळे मिटून स्वरूप साक्षात्कार होत नाही. श्रीसंत निळोबाराय या प्रकाशाचे वेगळेपण असे सांगतात, ***'नवलप्रकाश प्रकाशावेगळा। झाकिलिया डोळा पुढा दिसे।। नव्हे हा उजळिला सवेची मावळला। आत्मतेजे केला उदो नित्य।। ढवळा ना काळा पिवळा ना जांभळा। जीवीच्या जीवनकळा प्रकाशितू।। निळा म्हणे आजि आरतीचेनी व्याज। कृपे पंढरीराज कळले मज।।'*** तर श्रीसमर्थ या प्रकाशाचे वेगळेपण असे मांडतात, ***'तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।'.*** हा चित्प्रकाश किती तेज:पुंज असतो हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'तैसे ते दिव्यसूर्य सहस्रवरी। जरी उदयजती का एकेचि अवसरी। तरी तया तेजाची थोरी। उपमू नये।।'*** हा चित्प्रकाश अनुभवाला आला की मन संपूर्णपणे मुरते व द्वैतभाव नाहीसा होतो. ***('गगनी भासले अगणित तारे। तेथ मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** महायोगिनी लक्ष्मीबाईआक्का आज आश्विन शु.३ शके १८९९ या दिवशी स्वरूपानुसंधानात स्वरूपाकार झाल्या. त्यांनी आपला देह ठेवला. त्यांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

**

# द्वैत भाव नासे

हा प्रकाशाचा अनुभव अंतर्यामी आला की त्याचे आकाराचे पाहणे संपते. तो सर्वत्र चित्प्रकाशच अनुभवतो याला संतमहात्मे 'भाग्य उजळणे' म्हणतात. हे उजळलेले भाग्य कधीही मावळत नाही. आपले उजळलेले भाग्य मावळते. असे पारमार्थिक भाग्य उजळले की अवघी चिंता वारते. आमचे ऐहिक भाग्य उजळले की चिंता वाढते. ज्या भाग्य उजळण्याने चिंता कमी होत नाही, चिंतेचे स्वरूप बदलते इतकेच. ते कसले भाग्य उजळणे? ***('उजळले भाग्य दाही दिशा चित्प्रकाश गे। कृष्ण नवरा झाला आता कवणाची आस गे।।'- संतवचन, 'उजळले भाग्य अवघी चिंता वारली। संतदर्शनी हा लाभ पद्मनाभ जोडिला।।'- श्रीतुकाराममहाराज)*** हा चित्प्रकाश अंतर्यामी गुप्तरूपाने आहे तोवर हे विश्व भासमान होते. द्वैतभाव जागृत होतो. हा चित्प्रकाश प्रगट झाला की भासमान विश्व मावळते व सर्वत्र अंतर्बाह्य चित्प्रकाश अनुभवाला येतो. ***('तू जयाप्रति लपसी। तया जग हे दाविसी। प्रकटू तै करिसी। आघवेची तू।।', 'मावळवीत विश्वाभासु। नवल उदैला चंडांशु। अद्वयाब्जिनीविकासु। वंदू आता।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अर्थात विश्वाचा भास होणे किंवा भास लोपणे हे दोन्ही त्याच्या चित्प्रकाशानेच घडते. ***('स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनि असलेपणे। विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जो आत्मप्रकाशाने सर्व विश्वच आत्मस्वरूप पाहतो तो महाकारणदेहाचा विदेह होऊन परब्रह्मस्वरूप होतो. ***('अथवा आत्मप्रकाशे चोखे। जो आपणपेचि विश्व देखे। तो देहेचि परब्रह्म सुखे। मानू येईल।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'स्वयंब्रह्म जो आपणचि झाला। देव मस्तकी वंदिती त्याला।। ज्याच्या दृष्टीस सृष्टी नाही। देही असून पूर्ण विदेही।।'- श्रीकेशवस्वामी)*** या नश्वर देहाचे कधीही ब्रह्म होत नाही. ब्रह्म होते तो, ज्याचा विदेह होतो तो, महाकारणदेह होय. ***('तुका म्हणे कैसे नश्वरदेहब्रह्म। करोनिया श्रम व्यर्थ जाय।।'- श्रीतुकाराममहाराज, 'मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊनी राहे। धन्य तो साधू।।', 'देहचि होऊन राहिजे। तेणे देहदुःख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।' - श्रीसमर्थ)*** चित्शक्तीच्या चित्प्रकाशाचा अनुभव आला की देहभाव नाहीसा होतो व संपूर्ण अद्वैत साधते. समत्वाच्या सुखी निर्विकल्प समाधी त्याला साधते. ***('तया तेजामाजी देहभाव राहे। निर्विकल्प पाहे समाधीते।।'- श्रीतुकाराममहाराज, 'म्हणोनि तू आणि आम्ही। हे दिसताहे देहधर्मी। मग ययाच्या विरामी। मीचि होसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सर्वत्र विश्वात चित्शक्तीचा - ज्ञानप्रकाशाचा - आत्मप्रकाशाचा अनुभव येत असल्याने तो मोहापासून परावृत्त होतो. ***('ऐसे ज्ञानप्रकाशे पाहेल। तै मोहांधकारू जाईल। जै गुरुकृपा होईल। पार्था गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ही शक्ती प्रकाशरूप असल्याने चित्शक्तीच्या प्रकाशानेच - कृपेनेच - चित्शक्तीचे ज्ञान होते. म्हणून चित्शक्तीकडे संत कृपेची याचना अशी करतात, ***'करी कृपा उजळ कुळदीपा। बोध करी सोपा येऊनी लवलाही। माझे मन लागो तुझे पायी करी कृपा। तुझा देव्हारा मांडिला हो करी कृपा। आसनी कळस ठेविला हो करी कृपा।। उदो उदो शब्द आरोळी करी कृपा।।'.*** प्रगट झालेल्या चित्शक्तीसमोर श्रीनाथमहाराज असा जोगवा मागतात, ***'अनादी निर्गुण प्रगटली भवानी। मोह महिषासुर मर्दनालागोनी।। त्रिविधतापाची कराया झाडणी। भक्तालागोनी पावसी निर्वाणी।। आईचा जोगवा जोगवा मागेन। द्वैत सारूनी माळ मी घालीन।। हाती बोधाचा झेंडा मी घेईन। भेदरहित वारीसी जाईन।। नवविध भक्तीच्या करीन नवरात्रा। पोटी मागेन ज्ञानपुत्रा।। धरूनी सद्भावा अंतरीच्या मित्रा। दंभ संसार सांडीन कुपात्रा।।'***

**

# सत्तारूप कैसे कळो येई

चित्शक्ती ही वायुरूप असून विश्वाची उभारणी हे त्या चित्शक्तीचे कार्य आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***'मूळमायेपासून सेवटवरी। वायोचि सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।'*** अर्थात हे वारे पंचमहाभूतातील नसून हे चैतन्याचे वारे आहे. ही चित्शक्ती साऱ्या विश्वात भरून राहिली आहे. पण ती विश्वापेक्षा वेगळी आहे. तिच्या सत्तेने सारे विश्व चलनवलन करते. या सत्तेला 'चेतना' असे म्हटले जाते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आता असंगा साक्षीभूता। देही चैतन्याची जे सत्ता। तिये नाव पंडुसुता। चेतना येथे।।'*** या सत्तेला श्रीसमर्थ 'जगदीश' असे संबोधतात. ते या सत्तेचे वर्णन असे करतात, ***'एवं जगदीश तो वेगळा। जगनिर्माण त्याची कळा। तो सर्वांमध्ये परी निराळा। असोनी सर्वी।।'.*** तो चित्प्रकाश अनुभवणे म्हणजेच चित्शक्तीची सत्ता काय स्वरूपाची आहे हे अनुभवणे होय. चित्शक्ती या सत्तारूपाने सर्वत्र व्यापली आहे. चित्शक्तीच्या सत्तेने विश्वाची निर्मिती, चित्शक्तीच्या सत्तेने विश्वाचे अस्तित्व, चित्शक्तीच्या सत्तेने विश्वाचा नाश, सारी काही चित्शक्तीची सत्ता आहे. तिची सत्ता होती म्हणून दोन ग्रहांची होणारी टक्कर झाली नाही. माणसाच्या भ्रामक सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. तर मग चित्शक्तीच्या सत्य सत्तेपुढे आम्ही शहाणपणा दाखवावा काय? आपण काहीतरी शहाणपणा करतो, तिच्या सत्तेत ढवळाढवळ करतो. मग कधीतरी गणिते चुकतात. त्याचा फटकाही बसतो. म्हणून फटका नको असेल तर निसर्गात ढवळाढवळ करू नका. आपण आपला खड्डा आपणच खणतो व खड्ड्यात पडतो व दोष त्या शक्तीला देतो. श्रीदासराममहाराज या सत्तेचे वर्णन असे करतात, ***'जरी का वायू खवळला। तरी तो उडवील विश्वाला। परी तो वाहतो बेताते। रामप्रभुचिया सत्ते।। जरी उसळले पाणी। सर्व टाकील थरारोनी। परी रामप्रभुचा दंड। म्हणोनिया सर्व थंड।। अग्नी राहतो निवांत। ऐका देवाची हो मात। म्हणे गोविंदतनय। प्रभुची ये सत्ता पाहे।।'*** ही सत्ता आहे म्हणून निसर्ग आपली मर्यादा उल्लंघत नाही. निसर्गाने मर्यादा ओलांडली तर आपले काय होईल. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'पर्वती बैसका न संडावी। समुद्री रेखा नोलांडावी। पृथ्वीया भुते वहावी। हे आज्ञा माझी।।', 'म्या बोलविल्या वेदू बोले। म्या चालविल्या सुर्यु चाले। म्या हालविल्या प्राणू हाले। जो जगाते चाळिता।।'*** तर श्रीनामदेवमहाराज सांगतात, ***'तुझिया सत्तेने वेदासी बोलणे। सुर्यासी चालणे तुझिया बळे।। मेघानी वर्षावे पर्वती बैसावे। वायुने विचरावे सत्ते तुझे।।'.*** म्हणून कर्तृत्व सारे या वायुरूप चैतन्याचे आहे. आपण काही करतो हा आपला भ्रम आहे. तिच्या सत्तेने देह चालतो, तिच्या सत्तेने देहाच्या क्रिया घडतात म्हटल्यावर आमचे कर्तृत्व कुठे उरते? झाडाचे पान हालणे हीसुद्धा तिची सत्ता आहे. आमचे श्रीमामा सांगायचे, 'चिंचेचे पान संयुक्त पान असते. त्यात मधल्या शिरेला दोन्हीकडे मिळून दहावीस पाने असतात. त्यातील १९ पाने हालतात, एक पान हालत नाही किंवा एकच हालते आणि १९ पाने स्तब्ध असतात. ही कुणाची सत्ता आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'चाले हे शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविते हरीवीण।। देखवी ऐकवी एक नारायण। तयाचे भजन चुको नका।। माणसाची देव चालवी अहंता। मीचि एक कर्ता म्हणोनिया।। झाडाचे हे पान हाले ज्याची सत्ता। राहिली अहंता मग कोठे।। तुका म्हणे विठो भरला सबाह्य। तया उणे काय चराचरी।।'.*** आम्हाला वाटते या पक्षाची सत्ता देशावर आहे, त्या पक्षाची सत्ता देशावर आहे, हा सारा भ्रम आहे. सत्ता चित्शक्तीची आहे. ती सत्ता ओळखणे, तिचे कायम स्मरण ठेवणे, यातच आपले हित आहे. भगवंतांचे अधिष्ठान पाहिले तर चळवळीत सामर्थ्य येते. नाहीतर नुसत्या चळवळीने काही होत नाही. ***('ज्याचे गावी रहासी। तयालागी नोळखिसी।। ज्याचे खासी अन्न। त्याची नाही ओळखण।। ज्याचे सत्तेने चालसी। तयालागी विस्मरसी।। गुरुराज म्हणे। हे तो आहे लाजिरवाणे।।'- श्रीदासराममहाराज, 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।'- श्रीसमर्थ)***

**

# पूर्ण समाधान पंचमी ते

वायुरूप चित्शक्तीचा नाद श्रवण होणे, अस्पर्शाचा स्पर्श होणे, प्रकाशरूप दिसणे, स्वाद चाखणे, सुगंध अनुभवणे, हे त्रिपुटीतील वृत्तीसहित पंचविषयांचे आकाशरूप महाकारणदेहात तुर्यावस्थेत सर्वसाक्षी मनाला वेगळेपणाने द्वैतद्योतक अनुभव प्राप्त होतात. तुर्येतील सर्वसाक्षी मनाला येणाऱ्या अनुभवांचे शब्दात वर्णन करता येते. जेव्हा सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते, तेव्हा हे तुर्येतील अनुभवाचे ज्ञान (जाणीव) मावळते. ज्ञानाचे विज्ञान होते. अनुभव ठायीच मुरून जातो. तो जाणीवरहित जाणता होतो. वृत्तीरूपे समान असणाऱ्या ज्ञान अज्ञानाचे पैल निवृत्ती अवस्थेत वृत्तीरहित अखंडस्मरण (ज्ञान) प्राप्त होते. निवृत्ती अवस्थेत असणाऱ्या या अखंड स्मरणाचे वर्णन शब्दात करता येत नाही. (इंद्रियांना जाणवणाऱ्या व मनाला भासणाऱ्या गोष्टींचे वर्णन शब्दांत करता येते) जेव्हा सर्वसाक्षी मनाचे उन्मन व तुर्येतील ज्ञानाचे विज्ञान होते तेव्हा आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होऊन तो निश्चळ परब्रह्मरूप होतो. ***('का जे यया मनाचे एक निके। जे हे देखिले गोडिचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुखचि कवतिके। दावित जाइजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'दुजेवीण अनुभव। हे बोलणेचि वाव। याकारणे नाही ठाव। अनुभवासी।।', 'अनुभवे त्रिपुटी उपजे। अद्वैती द्वैतचि लाजे। म्हणोनि बोलणे साजे। अनिर्वाच्य।।'- समर्थ, 'साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया। ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी।।', 'म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।', 'अनिर्वाच्य ते निवृत्ती। तेचि उन्मनीची स्थिती। निरोपाधी विश्रांती। योगियांची।।', 'जेथे ज्ञानचि होते विज्ञान। जेथे मनचि होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ, 'अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।।'- श्रीदासराममहाराज)*** महाकारणदेहात असणाऱ्या सर्वसाक्षी मनाचे उन्मन होणे, तुर्येतील ज्ञानाचे विज्ञान होणे म्हणजेच महाकारणदेहाचा विदेह होणे होय. ***('मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।'- श्रीसमर्थ)*** निवृत्ती अवस्थेत असणाऱ्या स्मरणाने संसाराची - संसरणाची - शांती होते व शांतीचे ठिकाणी समाधान हरिरूपाने प्रगट होते. ***('स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'- श्रीनाथमहाराज, 'समाधान शांतिवू महाराज। हरिरूप कायन्नू नादबिंदकलाज्योती चिद्मूल तत्वन्नू ।।'- श्रीगुरुलिंगगीता)*** अज्ञानवृत्ती नाहीशी होऊन ज्ञानाची 'मला कळले' ही वृत्ती नाहीशी झाल्यावर (निवृत्त झाल्यावर) आत्म्याचे चंचळपण नाहीसे होते. तो जाणीव नेणीवरहित भगवंत होतो. तो महात्मा देही असून पूर्ण विदेही होतो. नि:शब्द परब्रह्मरूप होऊन तो नि:शब्द होतो. त्याला निर्हेतुक समाधान प्राप्त होते. ***('ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे हे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।' 'अज्ञानशक्ती निरसली। ज्ञानशक्ती मावळली। वृत्तीशून्ये कैसी जाली। स्थिती पाहा।।', 'जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतूरहित जाले। समाधान।।', 'वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।'- श्रीसमर्थ)*** हे मनाचे उन्मन होऊन निर्हेतुक समाधान प्राप्त होणे म्हणजेच 'ललितापंचमी' होय. श्रीमामामहाराज सांगतात, ***'विषयातूनी निघे मन। तेचि जाणावे उन्मन।। उन्मन ध्यानी अखंडता। पंचमीची खूण वार्ता।। गोविंद म्हणे रामनाम। ललित वाङ्मय निष्काम।।'***

**

# नामाचा उदय तोचि उदो शब्द

निवृत्ती - उन्मनी अवस्थेत उदित होणारे हे नाम आहे. आम्ही समजतो ते हे नाम नव्हे. कल्पनेचा निरास झाल्यावर ज्या (आत्म) वस्तूची ओळख होते ती वस्तू म्हणजे हे नाम आहे. हे निर्विकल्प नाम 'वेदार्थे परब्रह्म' आहे. ***('वस्तू ते ओळखा सांडा रे कल्पना। नका आडराना जाऊ झणी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गोविंद म्हणे नाम वस्तु। येर सर्वही अव्यस्तू।।'- श्रीमामामहाराज, 'नामजपयज्ञु तो परम। बाधू न शके स्नानादी कर्म। नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।', 'घेऊनी येथीचे वर्म। जै विचारिसी हे नाम। तै केवळ हेचि ब्रह्म। जाणसी तू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम।।'- श्रीतुकाराममहाराज, 'निर्विकल्प नाम। तेचि जाणा परब्रह्म।।'- श्रीदासराममहाराज)*** नामाला रूप व रूपाला नाम असा व्यवहार असतो. व्यवहारात नाम व रूप भिन्न असतात. कोणतेही नाम उच्चारले की त्याचे रूप आपले डोळ्यासमोर येते किंवा रूप पाहिले की त्याचे नाव आठवते. उदाहरणार्थ हत्ती पाहिला की 'हत्ती' हे नाम आठवते किंवा हत्ती हा शब्द उच्चारला की हत्ती डोळ्यासमोर येतो. परमार्थात मात्र नाम व रूप हे भिन्न असत नाहीत. श्रीनामदेव महाराज सांगतात, ***'नाम तेची रूप रूप तेची नाम। नामरूप भिन्न नाही नाही।।'*** आम्ही जे वाचेने नाम घेतो त्याठिकाणी हा नामरूपाचा मेळ असत नाही. जोवर अवघा वाचेचा गोंधळ आहे. तोवर नामरूपाला मेळ असत नाही. श्रीनाथमहाराज हे सत्य असे सांगतात, ***'नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी।। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।। नाम रूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।।'.*** नाम नेमके कसे आहे हे श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'एका जनार्दनी नाम। नामी प्रगटे आत्माराम।।'.*** जोवर मन आहे तोवर वाचेचा गोंधळ संपत नाही. परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चार देहाच्या चार वाणीतून आपले मन व्यक्त होत असते. तो 'मन बुद्धी अगोचर' असल्याने या चारी वाचेने हे 'निर्विकल्प नाम' घेता येत नाही. श्रीनाथमहाराज या चारी वाचांची मर्यादा अशी स्पष्ट करतात, ***'जेथे परेसी सौरस नसे। पश्यंती मध्यमा कोण पुसे। बापुडी वैखरी ते कायसे। स्वरूपांश वर्णाया।।'.*** अर्थात चारी वाचा कुंठीत झाल्यावर निवृत्ती (उन्मनी) अवस्थेत हे नाम अनुभवता येते. या नामाचा उदय होतो. श्रीमामामहाराज सांगतात, ***'गोविंद म्हणे मन होतसे उन्मन। रामनाम खूण दर्शनाची।।'.*** मन उन्मन झाल्यावर परेपैल जी सारभूत नामाची जिह्वा आहे जी फक्त सतत नामच घेते जिला हरीवाणी, हरीवाचा, अनावर वाचा आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. ***('हरीनाम सार जिव्हा या नामाची। उपमा त्या दैवाची कोण वानी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'माझी मज झाली अनावर वाचा। छंद या नामाचा लागलासे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'प्रणव उदेला कोठून। सांगा सांगा ते ठिकाण। परेपैल हरिवाणी। झाला उद्भव तेथोनी।।', 'वारे हे करी झणकार। श्रीहरीचा जयजयकार। वाचा या सारूनी चार।। हरीवाचे हरीचा गजर। देहभानाचा पडला विसर।।'- श्रीदासराममहाराज)*** या निर्विकल्प सहज नामाबद्दल अधिक खुलासा श्रीमामामहाराज असा करतात, ***'सहज नाम उदो शब्द। उदय अस्त तो निःशब्द।। कळो येई गुरुकृपे। अनुभव घेई तपे।। गोविंद म्हणे चित्शक्ती। अखंड व्यापक सर्वाभूती।।'***

**

# गोंधळ

व्यवहारात नामाला रूप व रूपाला नाम असते. नाम रूपाला मेळ असत नाही म्हणून गोंधळ हा अवघा वाचेचा असतो. जोवर वाचेचा गोंधळ सुरू आहे तोवर व्यवहार संपलेला नाही हे ओळखावे. व्यवहाराचा शेवट झाल्याशिवाय परमार्थाची आठवणदेखील होऊ शकत नाही. ***('नाम रूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।।'- श्रीनाथमहाराज, 'व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही पण गोंधळी आहोत पण संसारातले. संसारात एवढा गोंधळ आहे त्यामुळे आम्ही सदैव गोंधळून गेलेलो असतो. या संसार गोंधळात सुख  नाही हा अनुभव वारंवार येत असतो. हा संसाराचा - संसरणाचा गोंधळ जोवर जोरात सुरू आहे तोवर परमात्मा भेटत नाही हे निश्चित. जोवर संसरण जोरात आहे तोवर मनातला गोंधळ संपत नाही. अवघा वाचेचा गोंधळ संपत नाही. त्यामुळे मनवाचातीत असणारे स्वरूप अनुभवता येत नाही. ***('झाला संसार गोंधळी। केवी भेटे घनसावळी।। दृष्टी उघडोनी पाही। भवगोंधळी सुख नाही।।'- श्रीमामामहाराज)*** जोवर मनात हेतू आहे अर्थात हेत विठ्ठली नाही, हेतुवीण सत्क्रिया आचरली जात नाही, तोवर मनातला गोंधळ संपत नाही. मनाचा शब्दातून नि:शब्दात प्रवेश होत नाही. त्यामुळे नि:शब्द नामाचा गोंधळ अनुभवता येत नाही. ***('नि:शब्दामाझारी प्रवेशता मन। होतसे उन्मन सुखरूप।।'- श्रीदासराममहाराज)*** म्हणून श्रीतुकाराममहाराज म्हणतात की आता तुमचा गोंधळ घालणे पुरे करा. आता आमचा गोंधळ घालून पाहा. आमचा गोंधळ घालायला काय काय सामान हवे ते लिहून घ्या. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'आम्ही गोंधळी गोंधळी। गोविंद गोपाळाचे मेळी।। आमुचा घालावा गोंधळ। वाजवू हरिनाम संबळ।। दहा पाच धाला जेवू। तुमच्या गोंधळाला येवू।। कामक्रोध बकरी मारा। पूजा रखुमाईच्या वरा।। गुण लावू चौंडक्यासी। फेरा चुकवू चौऱ्यांशी।। जेथे विठूचे राऊळ। तेथे तुकयाचा गोंधळ।।'.*** रामकृष्ण या जीवनाच्या गतीचा मेळ साधला तर हरीनामाची संबळ वाजेल, समत्वाचे सुख - समत्वाचे बळ प्राप्त होईल. दहा इंद्रियांचा एक मेळ होऊन - एका चैतन्याच्या प्रसादाने (अनुभवाने) ती तृप्त होतील, पंचप्राण तृप्त होतील. अंतरीचा कामक्रोध नाहीसा होऊन विठ्ठल आत भरून राहील. ***'उर्ध्वशून्यं मनोभूतं अध:शून्यं तु मारुत: मध्यशून्यं जीवभूतं चतुर्थब्रह्म उत्तमं।'*** या आधारी असणाऱ्या चौंडक्याला जीवनाचे सूत्र लागेल. हा आमचा गोंधळ घालायचा असेल तर विठोबाच्या राऊळात या तेथे आम्ही तुम्हाला भेटू. आमचा गोंधळ पण पहायला मिळेल. या पंढरपुरातील विठूच्या राऊळातील गोंधळाचे वर्णन संत असे करतात, ***'घटस्थापना केली पंढरपूर महानगरी हो। आश्रम आणि मंडप दिधला तिही तालावरी हो। आरंभिला गोंधळ चंद्रभागेचिया तीरी हो। आली भक्त कान्हाई विठाबाई योगेश्वरी हो।।'.*** राऊळात गेल्यावर गोंधळ कसा अनुभवाला येतो हे श्रीनिवृत्तीनाथ महाराज असे सांगतात, ***'राऊळामाजी जाता राहे देह अवस्था। मन हे उन्मन झाले नसे बद्धतेची वार्ता। हेतू हा मावळला शब्दा आली नि:शब्दता। तटस्थ होऊनी ठेले निजरूप पाहता। ते सुख काय सांगू वाचे बोलता नये।।'-*** श्रीनाथमहाराज या गोंधळाचे वर्णन असे करतात, ***'तुझे सनकादीक गोंधळी। हो करी कृपा।। नाचती हर्षकल्लोळी करी कृपा। उदो उदो शब्द आरोळी करी कृपा।।'.*** श्रीमहालक्ष्मीचे वर्णन उद्याचे कीर्तनात पाहू.

**

# महालक्ष्मी

आश्विन शु.८. हा महालक्ष्मी पूजनाचा दिवस. या दिवशी महालक्ष्मीचा जागर असतो. गावात ठिकठिकाणी रात्री महालक्ष्मीचे मुखवटे उभे केले जातात. काही स्त्रियांच्या अंगात महालक्ष्मीचा संचार या दिवशी संध्याकाळी होतो. इतर दिवशी हा संचार सामान्यत: होत नाही. या स्त्रिया संचारावस्थेत लोकांच्या प्रापंचिक अडचणींचे निराकरण करतात. साहजिकच महालक्ष्मीचे दर्शनास अलोट गर्दी होते. आमचे येथे प्रतिवर्षी सौ.सुनितावहिनी यांचेकडे व कोल्हापूर येथे माधवीवहिनी यांचेकडे देवीचा जागर होत असतो. प्रामुख्याने कोकणातील लोक तिची उपासना करत असल्याने 'कोकणस्थानां महालक्ष्मी' असाच उल्लेख पंचांगात केला जात असे. श्रीमहालक्ष्मीसमोर स्त्रिया घागरी फुंकतात. घागरीत फुंकर मारणे हीच तिची उपासना पद्धत. देहघटामध्ये असणाऱ्या वायूरूप चित्शक्तीच्या वायुरूप उपासनेचे ते प्रतिक असावे असे मला वाटते. संचार सर्वांचाच खरा असतो असे काही नाही व सर्वांचाच खोटा असतो असे पण नाही. संचारात काही खरे व काही खोटे असेच काही ते असते. एखाद्या स्त्रीचा संचार खरा का खोटा हे अनुभवाने ठरवावे लागते. आपले प्रत्येकाचे शरीरात चित्शक्तीचा संचार आहे हे मात्र खरे. तिचा आत संचार आहे म्हणून आम्ही बाहेर संचार करतो. त्या अंतर्यामी हृदयस्थ असणाऱ्या चित्शक्तीचा संचार अनुभवणे म्हणजे खरे महालक्ष्मीचे दर्शन आहे. हा अंतर्यामी असणारा तिचा संचार जर आपण अनुभवला तर ती शक्ती विश्वात कशी संचरून राहिली आहे याचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. हे अंतर्यामी घुमणारे नाम हीच महालक्ष्मीची खरी उपासना आहे. श्रीदासराममहाराज या महालक्ष्मीबद्दल व तिचे उपासनेबद्दल असे सांगतात, ***'ही महालक्ष्मी म्हणजे या कराळ कलीकाळातील एक दैवी चमत्कारच म्हणावयाचा. चिदवायूतून प्रगट होणारी ती एक चित्शक्ती आहे. तिला आवाहन केले की ती प्रगट होते. डेऱ्यात फुंकर घातला की हा देवीचा साक्षात्कार होतो आणि ती सौभाग्यकुंकुम प्रसाद देते. मात्र डेरा कोणता व फुंकर कोणता हे आपण अंतर्बाह्य जाणले पाहिजे. पिंडात जी प्रक्रिया आहे त्याचेच हे बाहेरील दृश्य द्योतक आहे. भक्तीचा गोंधळ चालू झाला की तेथे महालक्ष्मीचा साक्षात्कार होतो. भक्तीने साक्षात्कार व साक्षात्काराने भक्ती होत राहते.' ('घुम घुम घुम घुम देह घटी होतसे घुमारा। शोधोनिया अंतरी करी रे विचारा।। घुम घुम घुम घुम नाम घुमते अनुभव घेई। अनुभवे अनुभव येईल हृदयी।। महालक्ष्मी उपासना नाम दुजी नाही। दास म्हणे फुंकर समजोनी घेई।।'- श्रीमामामहाराज, 'अंतरात नाद कसा घुमतसे पहा। नादमयी झाल्या शिव कळतसे अहा।।'- श्रीदासराममहाराज, 'अनंत युगाचा देव्हारा। निजबोधाचा घुमारा। बाहो अवचित भरला वारा। या या मल्हारी देवाचा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** नाभीकंदाचा डेरा बनवून नेटाने ताठ बसून सहज होणाऱ्या सोहंध्वनीचे अनुसंधान ठेवले तर महास्वरूपी महालक्ष्मीचा अनुभव येणारा आहे. ***('गुरुने तार सुनायी रे। क्या कहू हाकी बढायी रे।। नाभीकंद का डेरा बनाया उप्पर डंडी चढाई। नेट बोट की खुटी गाढी। सोहं तार जुडायी।। - संतवचन)*** या महालक्ष्मीचे वर्णन श्रीमामामहाराज असे करतात, ***'मीपणाचे लक्ष लावी महास्थानी। लावण्याची खाणी तेजोराशी।। तेचि महालक्ष्मी त्रिपुरसुंदरी। हृदयमंदिरी दिसो येई।।'*** आपण खंडेनवमीचा विषय उद्याचे कीर्तनात पाहू.

✼✼

# खंडेनवमी

आश्विन शु.९. खंडेनवमी हा शस्त्रपूजनाचा दिवस. शत्रूवर विजय मिळवण्यासाठी शस्त्रे परजून तयार हवीत. शत्रू अंगावर आल्यावर आम्ही शस्त्रे हुडकायला लागलो तर कसा विजय प्राप्त होईल? शत्रूवर विजय मिळवण्यासाठी अंगात बळ हवे तर शक्तीच्या गोष्टी बोलायच्या. नुसते तोंडात बोलण्याचे बळ असून चालत नाही, जसा शत्रू आहे त्याप्रमाणे शस्त्रे हवीत, बळ हवे. इथे परमार्थात कामक्रोध हे आपले शत्रू आहेत. ते लढाई करतात पण शस्त्राशिवाय. श्रीज्ञानेश्वरमहाराज या शत्रूचे वर्णन असे करतात, ***'तरी हे कामक्रोधु पाही। जयाते कृपेची साठवण नाही। हे कृतांताचा ठायी। मानिजती।।', 'हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गीचे मांग। मारक जे।।', 'साध्वी शांती नागविली। मग माया मांगी शृंगारिली। तियेकरवी विटाळविली। साधुवृंदे।।', 'हे शस्त्रेवीण साधिती। दोरेवीण बांधिती। ज्ञानियासी तरी वधिती। पैज घेऊनी।।', 'हे चिखलेवीण रोविती। पाशिकेवीण गोविती। हे कवणाजोगे न होती। आंतौटेपणे।।'.*** या शत्रूवर विजय मिळवणे तसे अवघडच. हे कामक्रोध खवळले की अंगी आधीव्याधी (शारीरिक, मानसिक आजार) जडतात व आपला शस्त्रेवीण नाश होतो. ***('खवळलीया कामक्रोधी। अंगी जडती आधीव्याधी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** यांच्यावर विजय मिळवणेसाठी आत्मबळाची गरज आहे. हा विजय प्राप्त झाल्याशिवाय परमात्मप्राप्ती, आत्मप्राप्ती होत नाही. ***('काम क्रोध आड आलेती पर्वत। राहिला अनंत पैलिकडे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ज्या संतांनी, सद्गुरूंनी या कामक्रोधावर विजय मिळविला, तेच याबाबतीत मार्ग दाखवू शकतात. ***('कौन बतावे वाट। गुरुबीन कौन बतावे वाट।। काम क्रोध दो पर्वत ठाडे। लोभ चोर संगात।।'- श्रीसंत कबीर, 'गुरुलिंगजंगम तेणे दाविला आगम। आधीव्याधी झाली सम। तेणे पावलो विश्राम रे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** कामक्रोधावर मात करणेसाठी, संसारमोहावर मात करणेसाठी अध्यात्म हे शस्त्र आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'साचचि बोलाचे नव्हे हे शास्त्र। पै संसार जिणते हे शस्त्र। आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरे इये।।'*** श्रीतुकाराममहाराजांनी या शस्त्राने रात्रंदिवस युद्ध करून शत्रूला नामोहरम केले. ते म्हणतात, ***'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।।'.*** या कामक्रोधादी षडरिपुंवर विजय मिळवला तरच खंडेराय अनुभवाला येतो. श्रीमामामहाराज सांगतात, ***'जन्ममरण खंडावया। अखंड जाणे खंडेराया।। खंडेराय तो हृदयी। अखंडित ध्यानी पाही।।', 'सहा जिरविता कष्टी। खंडेराय पडे दृष्टी।। नाम कष्ट ओळखावे। दास म्हणे सदा गावे।।'.*** संसारावर विजय मिळवायचा असेल तर खंडेरायाची कृपा हवीच. श्रीकेशवस्वामी खंडेरायाकडे मागणे मागतात, ***'अखंड खंडेराया रे। दूर करी भवमाया रे।। प्रपंच मन्मथ मल्हारी। त्रिपुरांतक मम श्रमवारी।। म्हणवोनी पाया लागतसे। केशव निजपद मागतसे।।'*** सासू ही कल्पना, सासरा हा अहंकार, तृष्णा ही नणंद नाहीसे व्हावेत याकरता खंडेरायाला नवस बोलतात. ***'खंडेराया तुज करीते नवस। मरूदे सासूस खंडेराया।। सासू मेल्यावरी मरू दे सासरा। होईल आसरा खंडेराया।। सासरा मेल्यावरी मरू दे नणंद। होईल आनंद खंडेराया।।'*** हे संत जनाबाईंचे मागणे व ***'सासू ही कल्पना। जाच इचा सोसेना।। सासरा अहंकार जळोबाई त्याचे घर। तृष्णा नणदुली। वाईट इची बोली।।'*** हा श्रीकेशवस्वामींचा सासू सासरे कोण सांगणारा खुलासा अर्थबोध करणारा आहे. अध्यात्म या शस्त्राची पूजा कशी करायची हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'स्तुती काही न बोलणे। पूजा काही न करणे। सन्निधी काही न होणे। तुझ्या ठायी।।'*** बरव्या साधनाने मन सुखरूप शांत करून काम क्रोध या सर्व कर्मांचे बळेच दंडण करणे म्हणजे खरी शस्त्रपूजा आहे.

**

# दसरा

कामक्रोधावर विजय मिळवणे म्हणजेच मन मारून मनावर विजय मिळवणे होय. हा मनोजय ज्याला साधतो त्याला सर्वत्र विजय प्राप्त होतो. ***(‘साधिलिया मनोजय। तरी साधका विजय।। जेणे मनासी जिंकिले। तेणे सर्वासी जिंकिले।।’- श्रीमामामहाराज)*** हा मनावर विजय मिळवला तरच तो संसारातून वेगळा होतो. त्यालाच खरा परमार्थ साधतो. त्याला त्रिकुटाची ताटी उघडून रामनामाची धाटणी समजते. ***(‘मन ज्याला आवरेना। तोचि संसारीक जाणा।।’, ’दास म्हणे केल्या मनावरी मात। खरा परमार्थ दूर नसे।।’- श्रीदासराममहाराज, ‘मन मारुनी उन्मन करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।’- संत मुक्ताबाई, ‘खोलो त्रिकुटकी ताटी। बोलो रामनामकी घाटी।।’- संतवचन)*** मनात येणारे कामक्रोध हेच खरे सर्व कर्म आहे. या कामक्रोधाचे भावबळाने दंडण केले तरच श्वसनाचे मध्यवर्ती असणारे जीवनाचे सूत्र सापडून निर्गुणाचा संग घडणारा आहे. मनाचे नियमाने नियमन केले तरच बाहेर दृश्याचे ठिकाणी चंचळ असणारे मन अंतरात निश्चळ होईल. मग कर्मेंद्रियांकडून होणारे निर्हेतुक करितेनवीण कर्म बाधक होत नाही. कर्माला अकर्माची मोहोर बसून अहंकाररहित अवस्थेत संसाराचा दरारा नाहीसा होतो. ***(‘कामक्रोध सर्वकर्म दंडिले बळे। सूत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले।। निर्गुणाचा संग मला आजी जाहला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।।’- श्रीसंत मुक्ताबाई, ‘तू मानसा नियमू करी। निश्चळू होय अंतरी। मग कर्मेंद्रिये व्यापारी। वर्ततू सुखे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘मन कृतं कृतं कर्म। न शरीरं कृतं कृतं।।’- योगवासिष्ठ)*** साधनाभ्यासाने मनातील विषयेच्छा नाहीशी झाली की साहजिकच इंद्रियसंयम होतो. तो करावा लागत नाही. इंद्रियांच्यावर विजय प्राप्त होतो. असा जो इंद्रियांचेवर, मनावर विजय मिळवतो तो महात्मा - आत्मरूप, ज्ञानरूप होतो, त्याच्या जीवनाचे सार्थक होते. ***(‘म्हणोनि आपुली आपणपेया। जरी ये इंद्रिये येती आया। तरी अधिक काही धनंजया। सार्थक असे।।’, ‘तरी जयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।’, ‘जयाची आज्ञा आपण। शिरी बाहे अंतःकरण। मनुष्याकारे जाण। ज्ञानचि तो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मनोलयाने मनाच्या अस्तित्वावर भासमान होणारी मायेची जाणीव नाहीशी होते, खंडित होते व जे अखंड आहे त्याची जाणीव अखंड होते. ही अखंड स्वरूपाची जाणीव अखंड होणे म्हणजे ‘विजयादशमी’ आहे. मनोलयाने त्याला इंद्रियदमन, सर्वभूतीदया, सायुज्य मुक्तीचे दान साधते, तो दमन, दया, दान या ‘द’ कडे सरतो. त्याला ‘दसरा’ साधतो. श्रीमामामहाराज सांगतात, ***‘अखंडात जाता। विजयादशमी ये हाता। जेथ सर्वत्र विजय। कदा नोहे पराजय।। गोविंद म्हणे ‘द’ कडे। सरता दसरा सापडे।।’.*** मनाची दृश्याकडे असणारी प्रवृत्ती नाहीशी होऊन निवृत्ती अवस्थेत स्मरण अनुभवणे हे खरे सीमोल्लंघन आहे. ***(‘प्रवृत्ती बडबड उल्लंघोनी सीमा। निवृत्तीच्या धामा नामी यावे।।’- श्रीमामामहाराज)*** हे निवृत्तीचे धाम हे संतांचे घर असून जे या संतांचे घरी येतात, त्यांना दसरा, दिवाळी स्वात्मसुखाने साधते. ***(‘साधुगृहाप्रती आले। भले सार्थक झाले।। दसरा हा मज हीच दिवाळी। स्वात्मसुखी मन घाले।।’- संत आनंदनंदन, ‘दसरा दिवाळी हाची आम्हा सण। सखे संतजन भेटतील।।’, ‘तुका म्हणे आले घरा। तोचि दिवाळी दसरा।।’- श्रीतुकाराममहाराज)***

✻✻

# दशमाचे पैल एकादश स्थान

आपले शरीराला नऊ द्वारे आहेत. या नऊ द्वारातून जीव हा बहिर्मुख असतो. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, शिश्न, गुद ही ती नऊ द्वारे असून या नऊ द्वारांवाटे जीवाला जड सृष्टीचे (आकाराचे) ज्ञान होते. जोवर या नऊ द्वारांचा निरोध साधत नाही तोवर चैतन्याच्या जाणीवेने सुख देणारे दहावे द्वार उघडत नाही. साधनेने सूर्याच्या बारा व चंद्राच्या सोळा कळांचा जेव्हा मेळ होतो तेव्हा अनुहताचा गलगा श्रवण होऊन- रामनामाचा ध्वनी श्रवण होऊन हे दहावे द्वार उघडते. आपणाला झोप लागताना रोज या नऊ द्वारांचा निरोध होऊन दहावे द्वार सापडते, पण ते अज्ञानात. त्यावेळी दहाव्या द्वाराची जाणीव होत नाही. अर्थात हा दशमद्वाराचा अनुभव जीवाला अज्ञानात्मक कारणदेहात प्राप्त होतो. या दशमद्वारातून जीवाला आत्मविठ्ठलाचे दर्शन होते. म्हणून आपल्या शरीरात दशमद्वाराला पंढरीतील महाद्वार मानले जाते. या महाद्वारात जीवाला आत्मदर्शनाने सर्वसुख, समाधान प्राप्त होते. ***(‘नवद्वाराते रोधोनी। दशमद्वारी दासी जनी।।’- संत जनाबाई, ‘पहा आपुले शरीरी। दशमद्वार हे पंढरी।।’- संतवचन, ‘नवग्रास घालिता मुखी। दहाव्यात झाले मी सुखी। अकराव्या घरा जाऊन।।’ - संतमहिपती, ‘नव दरवाजे दसवी किरकी उप्पर है एक फिरकी। विरळा साधू कोई एक जाने लेकर मनकी गिरकी।।’- संत शिवदीनी, ‘बारा सोळा जणी गडे गं बारा सोळा जणी। मिळोनी येती गलगा करिती मशी गेल्या घेऊनी।। दहाव्या घरा जाऊनी सखे ग दहाव्या घरा जाऊनी। सत्रावीचे अमृत प्याले हर्ष जाहला मनी।।’- संतवचन, ‘कारण शरीरी देखे दसवेद्वार। महाकारणी घोर शून्यज्ञान।।’- श्रीदासराममहाराज)*** या दशमद्वाराचे वर जी फिरकी आहे ती जीवनाला कलाटणी देणारी आहे. दशमद्वार ओलांडल्यावर एकादशस्थानी कोणत्याही परिस्थितीत न बदलणारी सहजस्थिती - नामस्मरणाची स्थिती - प्राप्त होते. या सहजस्थितीला ब्रह्माची नित्यता असते. जेथे हा नामाचा उच्चार होतो तेथे काळाला प्रवेश असत नाही. या नित्यसहजस्थितीला ‘अध्यात्म’ म्हणतात. या एकादशस्थानाला ‘वैकुंठ’ म्हणतात. हे वैकुंठस्थान महाकारणदेहात अनुभवाला येणारे आहे. ***(‘दशमद्वार ओलांडिता। सहजस्थिती ये हाता।।’- श्रीदासराममहाराज, ‘आपुलियाची सहजस्थिती। जेया ब्रह्माची नित्यता असती।। तया नाव सुभद्रापती। अध्यात्म गा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘दशमाचे पैल पाहे। एकादशस्थान आहे।। वैकुंठ बोलिजे तयासी। काळवेळ नाही ज्यासी।। गोविंद म्हणे गुरुकृपा। करुनी दावी मार्ग सोपा।।’- श्रीमामामहाराज, ‘श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे।। म्हणोनी तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।’- श्रीदासराममहाराज)*** श्रीदासराममहाराज या एकादशस्थानाची विशेषता अशी सांगतात, ‘नवद्वाराचा निरोध होऊन दशमद्वारी आलेला साधक एकादश स्थानात येतो. हे मनाचे शुद्धबुद्ध असे मूळ स्वरूप आहे. ही एक नि:संकल्प अशी शुद्ध अवस्था आहे. येथून संकल्प उठतात आणि आकार घेतात. मनाची मूळस्थिती ही त्या जीवनाची सहज धारणा होते.’

**

# तेथे वैष्णवजन विष्णुध्यानी

जो दशमद्वार ओलांडून अकराव्या वैकुंठस्थानी महाकारणदेहात नामस्मरणाची सहजस्थिती प्राप्त करून घेतो तो वैष्णव काळवेळेची मर्यादा ओलांडून अहर्निशी परमार्थ साधतो. महाकारणदेह हेच वैष्णवांचे घर - वैष्णवमंदिर होय. या महाकारणदेहात ज्ञान अज्ञानाचे पैल अखंडस्मरण (अद्वैताचे भजन) अनुभवाला येते. स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन देहात हे अखंडस्मरण कधीही प्राप्त होऊ शकत नाही. ***(‘महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरीकथा।।’- श्रीदासराममहाराज, ‘जागृती, स्वप्न, सुषुप्ती नाठवे। पाहता आनंदी आनंद सामावेना।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या वैष्णवांचे घराचे - वैष्णव मंदिराचे वर्णन श्रीनामदेवमहाराज असे करतात, ***‘वैष्णवाघरी सर्वकाळ। सदा झणझणती टाळ।।’*** तर श्रीभानुदासमहाराज हे वर्णन असे करतात, ***‘धन्य धन्य वैष्णवमंदिर। जेथे नामघोष होय निरंतर।।’.*** पृथ्वीतलावरती एक व्यक्ती अहर्निशी आपण समजतो तसा नामघोष करती आहे असे घर, मंदिर शोधून सापडणार नाही. ***(‘सदा नामघोष करी तरी कोण। सांगा निवडोन मायबाप।।’- श्रीदासराममहाराज)*** अहर्निशी नामघोष करणारे कोणस्थान हे महाकारणदेहातील एकमेव ठिकाण आहे. या कोणस्थानी महाकारणदेहात तुर्यावस्थेत संत राहतात. ते ठिकाण आपणास येथे सापडत नाही. ***(‘कोणे ठायी संत राहती आपण। तो तुम्हा ठिकाण आतुडेना।।’- श्रीतुकाराममहाराज)*** कीर्तनाची गोडी भगवंताना असल्याने भगवान स्वत: जेथे बरवा नामघोष चालतो अशा वैष्णवमंदिरात जातीने सदैव हजर असतात. वैष्णव व विष्णू यांची अहर्निशी गाठ असल्याने वैष्णवांचे विष्णुध्यान साहजिकच होते. श्रीनाथमहाराज सांगतात, ***‘वैष्णवाघरी देव सुखावला। नवजे बाहिरी दवडोनी घातला।। देव म्हणे माझे पुरतसे कोडे। संगती गोड या वैष्णवांची।। जरी देव नेऊनी घातला दुरी। परतोनी पाहे तव घराभितरी।। कीर्तनाची देवा आवड मोठी। एका जनार्दनी पडली मिठी।।’.*** साधनाभ्यासाने ***‘आम्हा येणे जाणे नाही’*** अशा अवस्थेत येथेच वैकुंठ प्राप्त करून घेताना वाटेत नऊ अंगुळापासून दोन अंगुळापर्यंत नि:श्वास खाली आला असता प्रत्येक अंगळाला एक सिद्धी याप्रमाणे आठ अंगुळाला अष्टमहासिद्धींचा लाभ त्या साधकाला होतो. वैष्णव या सिद्धींचेकडे ढुंकूनही पाहात नाहीत. या सिद्धी त्यांचे दारात हात जोडून उभ्या असतात. ***(‘नवांगुळापासूनी साधी अष्टसिद्धी। असे त्याचा अवधी द्वयांगुळी।।’- श्रीदासराममहाराज, ‘या या वैष्णवांचे घरी प्रेमसुख इच्छा करी। रिद्धी सिद्धी द्वारी कर जोडोनी तिष्ठती।।’, ‘रिद्धी सिद्धी सुखे हाणीतल्या लाथा। तेथे या प्राकृता कोण मानी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘देखे रिद्धीसिद्धी तयापरी। आली गेली से न करी। तो विगुंतला असे अंतरी। महासुखी।।’, ‘देखे साधकु निघोनि जाये। मागा पाऊलांची वोळ राहे। तेथे ठायी ठायी होये। हे आणिमादिक।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे एकादशस्थानी एकादशा प्राप्त झालेले विष्णुध्यानी वैष्णव कसे असतात हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***‘वैष्णव तो जया। अवघी देवावरी माया।।’, ‘विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।।’, ‘आम्हा वैष्णवांचा कुळधर्म कुळीचा। विश्वास नामाचा एका भावे।।’*** तर श्रीनाथमहाराज वैष्णववर्णन असे करतात, ***‘वैष्णवी कुपथ्य टाकिले वाळुनी। एका जनार्दनी तेचि भले।।’*** तर श्रीसंत नरसी मेहता वैष्णवांबद्दल असे सांगतात, ***‘वैष्णवजन तो तेणे कहिये जे। पीड पराई जाने रे। परदु:खे उपकार करे तोये। मन अभिमान न आणे रे।।’*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज वैष्णवांचे वैशिष्ट्य असे सांगतात, ***‘नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्यांची।।’***

✲✲

# निजत्व

आपल्या शरीरावर जी रया - जे तेज आहे ते कुणामुळे आहे? निजत्व आहे तोवर हे तेज आहे. तेजावरून निजत्व असल्याची जाणीव होते. काळाकुट्ट माणूस असू दे, शरीरात चैतन्य असेतोवर त्याचे शरीरावरसुद्धा एक रया असते. तेच आतील चैतन्य निघून गेले की कितीही गोरापान माणूस असू दे, तो काळाठिक्कर पडतो. चैतन्य आहे तोवर शरीराला उबदारपणा, हलकेपणा असतो. चैतन्य आहे तोवर शरीराची हालचाल होते. आत चैतन्य असल्याने शरीरावर असणारी रया, शरीराचा आकर्षकपणा, आकर्षणाला कारणीभूत ठरतो. पण आपले प्रेम मात्र शरीरावर असते. आकर्षकपणाला कारणीभूत असणाऱ्या निजत्वावर - चैतन्यावर नसते. ***'निजाचे तेज की तेजाचे निज। येथील ते गूज सांगा मज।।', 'जव या वायूचा प्रकाशू। तव या भांडियाचा विश्वासू। वायो निघोनिया गेला। तव तो झाला उदासू रया।।'*** ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने निजत्वाचे महत्त्व दाखविणारी आहेत. आत चैतन्याचे वारे आहे तोवर या अविश्वासी शरीराचा विश्वास असे असताना आमचे प्रेम मात्र शरीरावर, चैतन्यावर नाही. गंमत आहे का नाही माणसाची. श्रीदासराममहाराज हे सत्य असे सांगतात, ***'घोटूनी मातीचा दिलासे मुलामा। तयावरी प्रेमा करितोसी।। पापाचे बनले जाण हे शरीर। असत्य असार सांगितले।। देहामध्ये आहे मुख्य आत्मा जाण। तेणेची पावन आहे देह।।'.*** आम्ही निजत्वे न राहताना देहत्वे राहतो व साहजिकच निजदृष्टीने निजत्वाची कळा न पाहताना स्थूलदृष्टीने कल्पांती नासणारे साकार विश्व पाहतो. ***('निजत्वे राहणे। निजदृष्टीने पाहणे। धरोनिया कळवळा। पाहे निजत्वाची कळा।।'- श्रीमामामहाराज)*** आपण देहत्वे न राहताना निजत्वे राहण्यासाठी निजत्व काय आहे हे ओळखावे लागेल. ही निजत्वाची खूण कशी प्राप्त होईल हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'निजत्वाची खूण। घ्यावी अंतरी जाणून।। निजत्व ते नामरूप। जे का चालिले अपाप।। गोविंद म्हणे सांगो कायी। थोर त्याची नवलाई।।', 'निजमूळालागी जावे। निजरूप ओळखावे।। मूळालागी सोडू नको। विस्तारासी धरू नको।। उर्ध्वपंथे जाता देही। निजरूप हाता येई।। निजमूळ रामनाम। दास म्हणे त्याचा राम।।'*** तर श्रीदासराममहाराज सांगतात, ***'देखणा हा जेव्हा विसरला देखणे। तेथे आपुलेपणे भेटी झाली।। आपुलिया आपण आपुलिये ठायी। भेटो आले देही निजत्वेसी।।'.*** नादप्रकाशयुक्त चैतन्य हे आपले निजत्व आहे. आपल्याला परमेश्वराने जे अमोलिक वय दिलेले आहे ते ब्रह्मनिज ओळखण्यासाठीच. या अमोलिक आयुष्याचे साधन साधनीभूत करून निजत्वाची ओळख होऊन सच्चिदानंद ब्रह्माची प्राप्ती होणारी आहे. ***('अमोलीक रत्न जोडले रे तूज। कारे ब्रह्मनीज नोळखसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# खेळात जागता

आपण जर देहत्वे मनत्वे राहिलो तर चैतन्याच्या विसराने जगाची जाणीव होऊन संसरणाचा - संसाराचा - जन्ममरणाचा खेळ खेळला जातो. देहाला व मनाला दृश्यभासाने प्रतीत होणारी जागृती - विपरीत ज्ञान - देहाच्या मनाच्या लयाने अज्ञानात परिवर्तित होते. अर्थात ही विपरीत ज्ञानाची जागृती अखंड राहू शकत नाही. परमार्थाला आवश्यक असणारी अखंड जागृती या देहाच्या मनाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तिन्ही अवस्थेत प्राप्त होऊ शकत नाही. साधनाभ्यासाने देहाचा व विषयात लिप्त असणाऱ्या मनाचा जाणीवेत लय साधल्यावर दृश्यभासातीत सत्यस्वरूपाचा सर्वसाक्षी मनाला वेगळेपणाने नादाचा अनुभव -तुर्यावस्थेत महाकारणदेहात प्राप्त होतो. या नवलनादाची गोडी सर्वसाक्षी मनाला लागते. ते अनुभवसुखाला सोकावते. सतत होणाऱ्या नादश्रवणी तदाकारता साधून नामाचा (नादाचा) बिंदू घडतो व तो अंतरबाहेर प्रकाशू लागतो. मन सतत चैतन्याच्या नादप्रकाशाचा अनुभव घेते. विश्वाचा आभासात्मक खेळ नाहीसा होऊन तो साधक अहर्निशी चैतन्याच्या नादप्रकाशाचा खेळ अनुभवतो. जाणत्याला जाणल्याने 'जाणले' ही वृत्ती तद्रूप होते. आत्मनिवेदनभक्ती त्याला साधते. जाणीवनेणीवेच्या पलीकडे, ज्ञान अज्ञानाच्या पलीकडे त्याला अखंडस्मरण साधते. मनाचे उन्मन व ज्ञानाचे विज्ञान होऊन चंचळ आत्मा निश्चळ परब्रह्मरूप होतो. तो ब्रह्म होऊन ब्रह्मीच खेळतो. अखंड स्मरणाचे, प्रकाशाचे ज्ञानाने अज्ञानाचा अंध:कार नाहीसा होतो. अखंड प्रकाशाचे ज्ञानाने दिवस आहे का रात्र याचे भान त्याला राहात नाही. रवी शशी कळा मावळल्यावर मन पवन संथ झाल्यावर रात्र न होताना राजससुकुमार मदनाचा पुतळा सतत तो अनुभवतो. या अखंड जागृती, अखंड स्मरणाचे वर्णन शब्दात करता येत नाही. महाकारण देहातील सदा हरिनामाचा गजर अनुभवणे ही खरी कोजागिरी पौर्णिमा आहे. श्रीमामामहाराज कोजागिरी पौर्णिमेचे वर्णन असे करतात, ***''क' मधील जागरी। बुद्धी जडता कोजागिरी।। जागर सदा हरिनामाचा। जीव वळता वलीत साचा।। गोविंद म्हणे खेळ नामी। कळे निजत्वाचे धामी।।'*** या नामी स्मरणाचे खेळात जो जागतो तो खेळ खेळून देवत्व प्राप्त करतो. श्रीमामामहाराज या खेळाबद्दल असे सांगतात, ***'चौऱ्याऐंशीचा मांडिला खेळ। रामनामा नाही वेळ।। फासे घेऊनी मायेचे। खेळ खेळी विस्मरणाचे।। रामनामी विन्मुख झाला। तो जाणावा झोपी गेला।। खेळामाजी जो जागला। दास म्हणे देव झाला।।'.*** जो जन्ममरणाचा-संसाराचा खेळ खेळतो त्याला रामनामाचा (चैतन्याचा) अनुभव येत नाही. त्याला चैतन्याच्या विसराने जगाचा (मायेचा) अनुभव येतो. ज्याला चैतन्याचा अनुभव येत नाही ते सारे अज्ञानी निद्रिस्तच. जो चैतन्याच्या नादप्रकाशाचा खेळ सतत अनुभवतो तो जागा देवच होतो. महाकारणदेहातील अखंड स्मरणाने (जाणीवेने) जाणीवेचा ग्रास होणे म्हणजे 'क' मधील जागरी बुद्धी जडणे होय. अंतर्यामी जो वळतो त्या वलीताला हा अखंड हरीनामाचा जागर साधतो. त्याला आकाशरूप महाकारण देहात निजत्वाचे धामी भगवंताचा कोजागिरी पौर्णिमेचा प्रसाद प्राप्त होतो. 'क' म्हणजे चार असे श्रीदासराममहाराज सांगत. हे येथे आपण लक्षात घ्यावे. अर्थात 'क' मधील जागरी याचा अर्थ चौथ्या महाकारणदेहातील अखंड स्मरण होय.

**

# भाव

देहाला आपण 'स्व' मानतो त्यामुळे देहाच्या स्थितीनुसार, परिस्थितीनुसार आपला स्वभाव ठरतो. तब्येत ठीक नसेल तर आपला स्वभाव चिडचिडा होतो. देह स्वस्थ असेल तर स्वभाव सुखासीन बनतो. मनाचे मूड तर सारखे बदलतात व त्याप्रमाणे स्वभावही बदलतो. जो सारखा बदलतो तो आपला स्वभाव कसा असेल? जो सारखा बदलतो त्याला बाजारभाव म्हणतात. ***('आधी होती दासी। पट्टराणी केले तिसी।। तिचे हिंडणे राहीना। मूळ स्वभाव जाईना।। आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग।। त्याचे भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अर्थात देहाला 'स्व' मानणे हेही चुकीचेच, व बदलणाऱ्या भावाला स्वभाव मानणे हेही चुकीचेच. ज्या भावाने 'स्व'ची जाणीव न होताना 'स्व' सोडून इतर परक्याची जाणीव होते व आपण स्वाधीन न राहता परस्वाधीन होतो, तो स्वभाव कसा? ज्या भावाने देहाची, दृश्याची जाणीव न होता 'स्व'ची जाणीव होते, तो स्वभाव होय. तिखटपणा हा मिरचीचा स्वभाव आहे. तिखट लागले की जाणीव मिरचीची होते. ज्या भावाने देहाची, दृश्याची जाणीव होते तो देहभाव व ज्या भावाने देहाची जाणीव न होता चैतन्याची ('स्व'ची) जाणीव होते तो स्वभाव म्हणजेच गुरुनाम - एक हरी आत्म्याचे भजन आहे. साधनाभ्यासाने साधनात देहभाव विरल्यावर, मन मुरल्यावर जे सूक्ष्म साधन उरते, रामकृष्ण ही जीवनाची गती अत्यंत सूक्ष्म उरते, ती सदासर्वदा अंतरी आढळणारी कदापी न ढळणारी गती हा जीवाचा स्वभाव हेच नामस्मरण, हरीभजन आहे. ही नामसमाधी ज्याला साधते, त्याला वैकुंठनाम परमात्मा प्राप्त होतो. ***('देखे मनुष्यजात सकळ। जे स्वभावता भजनशीळ। जाहले असे केवळ। माझ्याची ठायी।।', 'रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप।।', 'तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतीति। प्रगट होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मूळ स्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।। अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।। गोविंद म्हणे स्वस्वभाव। जीवा सोडी रे अभाव।।'- श्रीमामामहाराज)*** दिननिशी होणाऱ्या षडविकारात्मक आयासाने - सायासाने प्रपंच साधतो पण मूळ स्वभाव हे भजन साधत नाही. ***('सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाभ्यासाने श्वसनातील - अस्तित्वभावातील त्रिगुण व पंचभूते यांचा निरास होऊन चत्वार देहाचा निरास व असार संसाराचा त्याग झाल्याने बरवे साधन होते. साधन संदेहरहित होते. भाव शुद्ध होतो व विशेष श्वासाने (विश्वासाने) देवाची प्राप्ती झाल्याशिवाय राहात नाही. अशा अंतरी भाव धरणाऱ्या भाविकांना देव प्राप्त होतो. शहाण्यांनी देवाकरता आकाशपाताळ एक केले तरी देव प्राप्त होत नाही. ***('भाव धरा रे। आपुलासा देव करा रे।।'- संत शिवदिनी, 'शुद्ध ज्याचा भाव झाला। देव दूरी नाही त्याला।।'- संतवचन, 'न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'भावचि कारण भावचि कारण। यापरते साधन नाही नाही।।'- श्रीनाथमहाराज, 'तुका म्हणे देव भाविकाचे हाती। शहाणे मरती तरी नाही।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# विश्वास

आम्ही व्यवहारात विश्वास ठेवतो, नव्हे ठेवावाच लागतो. पण कुणावर? जे अविश्वासाचे बनले आहे, तेथे आमचा पूर्ण विश्वास आहे. आम्ही आमचे देहावर, मनावर व फसव्या जगावर (दुसऱ्यावर) विश्वास ठेवतो. ही सारी कुळे अविश्वासाची आहेत. ***(‘अविश्वासियाचे शरीर सुतकी। चांडाळ पातकी महादोषी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘मनजी पाटील देहगावीचा। विश्वास धरू नका हो त्याचा। घात करील नेमाचा। पाडील फशी।।’- श्रीनाथमहाराज, ‘जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला। जो आपणची कष्टत गेला। तोचि भला।।’- श्रीसमर्थ)*** नको तेथे विश्वास ठेवल्यावर काय होणार? विश्वासघातच होणार. मग सर्वांबद्दल संशय येऊ लागतो. कुठेही विश्वास बसत नाही. सर्वांची निंदा तो करू लागतो. आमची अवस्था कशी होते हे संत असे सांगतात, ***‘विश्वास तयाचा बैसेना कोठेही। निंदास्तुती पाही जीवी धरी।’.*** हे संशयाचे घातक भूत एवढे मानगुटीवर बसते की शेवटी आपला आपल्यावर विश्वास रहात नाही. जे फसवे आहे, भ्रामक आहे त्या जगावर अंधविश्वास ठेवू नका हे मान्य. सत्य काय आहे हे पडताळून पहा मगच विश्वास ठेवा. ***(‘तुका म्हणे मज कळते चाचणी। बडबडीची वाणी अथवा सत्य।।’- श्रीतुकाराममहाराज)*** पण हे संशयाचे भूत परमार्थात, जेथे खोटे कुडे काही असत नाही, जो सत्य आत्म्यावर आधारित आहे, तेथेही निर्माण होते. सत्य आत्म्याबद्दल तो आहे का नाही हा संशय येतो. त्याच्याशी परक्याप्रमाणे परवत् वागतो व पर्वतप्राय पातक आमचे हातून घडते. हे घातक; आपणाला खड्ड्यात घालणारे आहे. आत्मा हे अध्यात्मातील मूळतत्व आहे म्हणूनच त्या शास्त्राला अध्यात्म म्हणतात. त्या आत्म्यावर विश्वास ठेवणे म्हणजे स्वत:वर विश्वास ठेवणे होय. त्या आत्म्याचा अनुभव घेऊन आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी आत्मानुभूती प्राप्त केलेल्या संतांवर त्यांनी सांगितलेल्या नामस्मरणावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. रामकृष्णी नित्य टाहो फोडला पाहिजे तरच संशय दूर होऊन भाव धरला जाईल व विशेष श्वास - विश्वास हा नि:संदेह देव प्राप्त होईल. ***(‘संतांचिये पायी हा माझा विश्वास। सर्वभावे दास झालो त्यांचा।।’, ‘अंतरी विश्वास अखंड नामाचा। काया मने वाचा हेचि देई।।’, ‘विश्वास तो देव। म्हणोनि धरियेला भाव।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘भजन साधन अभ्यास। येणे पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे।।’- श्रीसमर्थ)*** हा आत्मविश्वासी माणूस कसा असतो हे श्रीमामामहाराज असे सांगतात,

***‘तोचि जाणावा विश्वासी। जेणे जोडिले विश्वासी।।***<br>
***तोचि जाणावा विश्वासी। जेणे सोडिले विश्वासी।।***<br>
***तोची जाणावा विश्वासी। गुरुवचनी विश्वासी।।***<br>
***तोचि जाणावा विश्वासी। राहे विज्ञानाचे श्वासी।।***<br>
***तोचि जाणावा विश्वासी। नाम घेई श्वासोश्वासी।।***<br>
***हरिभक्त तो विश्वासी। दास वंदितो तयासी।।’***

जो गुरुवचनावर विश्वास ठेवून श्वासोश्वासी नाम साधतो, ‘मी पणे’ वीण साधन साधतो व मनोलयाने दृश्य विश्वाचा त्याग करून विश्व नाम परमात्मा जोडतो असा मोक्षरेखेला आलेला हरीभक्त हा खरा विश्वासी असतो.

**

# सत्यस्थान

मनाने पाहिले तर कल्पनेने भासमान होणारे जग ही मृत्युभूमी आहे हे सत्य वाटते. मन कल्पना करते. त्या कल्पनेने भासमान होणारे साकार जग कल्पनेच्या निरासाबरोबर (कल्पांती) नाश पावते. जगाची जाणीव नाहीशी होते, जगाचा तटका तुटतो, म्हणून या साकार जगाला 'मृत्युभूमी' म्हणतात. श्रीसमर्थ सांगतात, ***'मना पाहता सत्य हे मृत्युभूमी। जिता बोलती सर्वही जीव मी मी। चिरंजीव हे सर्वही मानितातीं। अकस्मात सांडुनिया सर्व जाती।।'.*** या जगात जो जन्माला येतो त्याला कधीतरी हे जग सोडून गमन करावेच लागते. 'जन्माला येणे व गमन करणे ही क्रिया जेथे आहे त्याला जग म्हणतात' असे श्रीदासराममहाराज सांगत. म्हणून या साकार जगाची 'मृत्युभूमी' ही पाटी कधीही कोणाला बदलता येणार नाही. ***('जो का जन्मा आला कधीतरी त्याला। सोडोनी देहाला जाणे असे।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज, 'देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्युचिया सोहळिया। ना म्हणे नये धनंजया। जियापरी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मनोलयाबरोबर जे लय पावत नाही, त्या अविनाशी वस्तूला 'सत्य स्वरूप' म्हणतात. ***('हे उपजे आणि नाशे। ते मायावशे दिसे। येऱ्हवी तत्वता वस्तु जे असे। ते अविनाशची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे।। स्वरूप ते असतचि असे। सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ)*** साधनाभ्यासाने जाणीवेत मनाचा लय साधला असता कल्पनेच्या निरासाने मनमुळी विराजमान असणारा कल्पक वनमाळी (सर्वकाळी असणारे सत्यस्वरूप) अनुभवाला येणारा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।'*** तर श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'वस्तूते ओळखा सांडा रे कल्पना। नका आडराना जाऊ झणी।।'*** *तर श्रीदासराममहाराज सांगतात,* ***'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'.*** जोवर आम्ही कल्पना करत आहोत तोवर सत्य कधीही हाताला येणार नाही. मग आम्ही सत्याची कल्पना करतो, देवाला देहधारी कल्पितो, अशाने कधी सत्य देव हाताला येईल का? श्रीसमर्थ सांगतात, ***'मना कल्पना कल्पिता कल्पकोटी। नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी। मनी कामना राम नाही जयाला। अती आदरे प्रिती नाही तयाला।।'.*** कल्पांती तो आहे तसा - सत्य अविनाशी अनुभवाला येतो. त्या सत्याला जन्महीं नाही अथवा मरणही असत नाही. त्याला जन्ममरण नाही म्हणूनच तो सत्य आहे. ज्याला जन्ममरण असते त्याला श्रीदासराममहाराज सत्यावर झालेला विकृतीचा भास म्हणतात. या सत्याचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, ***'विकृती आहे ज्यात। तया आहे आदीअंत।। सत्य नोहे भास। कैचे जन्ममरण त्यास।। सत्य हे अढळ। तेणे निर्मिले सकळ।। गुरुराज म्हणे। रूपी जडा मने प्राणे।।'.*** हा सत्याचा शोध देहात ज्या स्थानात लागतो, ते सत्यस्थान होय. श्रीमामामहाराज सांगतात, ***'सत्य कळो येता पाही। सत्यस्थानामाजी जाई।।'.*** सत्यस्वरूप जे निर्गुण निराकार आहे, तद्रूप आपण होणे, स्वरूपाकार होणे, म्हणजे स्वरूप पाहणे. ***('आकाश वेगळेपणे पहावे। स्वरूपी स्वरूपची व्हावे। वस्तूचे पाहाणे स्वभावे। ऐसे आहे।।', 'वस्तू आपणची होणे। ऐसे वस्तूचे पाहणे। निश्चयेसी भिन्नपणे। शुन्यत्व लाभे।।'- श्रीसमर्थ)***

**

# पापपुण्य नाही जये गावी

पापपुण्य करून प्राणी जन्माला येतो. तो देह धारण करतो व जन्ममरणाच्या चक्रात सापडतो. त्याचा संसार सुरू होतो. पाप जास्त झाले अधोयोनी, नरक प्राप्त होतो. पुण्य जास्त झाले की उर्ध्वयोनी, स्वर्ग प्राप्त होतो. पापपुण्य समान झाले की नरदेह प्राप्त होतो. पापपुण्य खलास झाले तर मोक्षाची प्राप्ती होते. ***('अत्यंत सुकृते स्वर्गा चढे। अत्यंत पापे अधोगती घडे। पापपुण्य निःशेष झडे। तै आतुडे निजमुक्ती।।', 'जै पापपुण्य समान समी। तै मनुष्यदेह आक्रमी। जन्मपावे कर्मभूमी। आश्रमधर्मी सुमेधा।।'- श्रीनाथमहाराज, 'पाप पुण्य करोनी जन्मा येतो प्राणी। नरदेहा येवोनी हानी केली।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अर्थात पापपुण्य खलास होणे म्हणजेच जन्ममृत्यूपासून सुटणे, संसारापासून निराळे होणे होय. पुण्याचे फळ सुख व पापाचे फळ दुःख होय. पापपुण्यातीत अवस्था म्हणजे सुखदुःखातीत अवस्था, त्रिगुणातीत अवस्था, जाणीवनेणीवरहित अवस्था प्राप्त होणे होय. मोक्षाची प्राप्ती होणे होय. ***('जाणीवेने होते सुख। नेणीवेने होते दुःख। सुखदुःख आवश्यक। उत्पत्तीगुणे।।', 'शुद्ध नेणीव तमोगुण। शुद्ध जाणीव सत्वगुण। जाणीव नेणीव रजोगुण। मिश्रित चालिला।।'- श्रीसमर्थ, 'संसार समस्त त्रिगुण।'- श्रीनाथमहाराज, 'जन्ममृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला। तत्वे शोधिता पावला। तत्वता वस्तु।।'- श्रीसमर्थ)*** देह धारण केल्यावर 'देह म्हणजे मी' ही धारणा असल्यावर जन्ममृत्यू, पापपुण्य, सुखदुःख, स्मरण विस्मरण, जाणीव नेणीव ही द्वंद्वे अनुभवावीच लागतात. पृथ्वीच्या परिभ्रमणाने आपण पृथ्वीवर दिवसरात्र अनुभवतो. तेच जर आपण सूर्यलोकात गेलो व तेथे विचारले की रात्र कधी होणार? किंवा दिवस केव्हा सुरू होणार? तर ते म्हणतील कुठला दिवस आणि कुठली रात्र? सूर्य मावळला तर उजडायचा प्रश्न. जेथे अखंड प्रकाश आहे तेथे दिवसरात्र हे शब्दच संभवत नाहीत. त्याप्रमाणे देह म्हणजे मी ही देहबुद्धी जोवर आहे तोवर हे संसाराचे परिभ्रमण सुटत नाही व या संसाराच्या परिभ्रमणाने ही सारी द्वंद्वे अनुभवावी लागतात. साधनाभ्यासाने सोहं हंसाची बोळवण न करता साधली, संसाराच्या गोष्टी जर सुटल्या तर देहाचा गाव सुटून पापपुण्य नाही अशा सत्य आत्म्याचे गावी आपला प्रवेश होणारा आहे. त्याठिकाणी दुःखाला प्रवेश नाही असे अखंड सुख, पापाचा संचार नाही असे शुद्ध पुण्य, विस्मरण नाही असे अखंड स्मरण प्राप्त होते. जेथे अखंड प्रकाश आहे तेथे दिवसरात्र हे शब्दच असत नाहीत. त्याप्रमाणे जेथे अखंड पुण्य आहे तेथे पापपुण्य हे शब्दच उद्‌भवत नाहीत. जेथे अखंड सुख आहे तेथे सुख दुःख हे शब्दच संभवत नाहीत. जेथे अखंड जीवन - अखंड स्मरण आहे तेथे जन्ममृत्यू हे शब्द उच्चारायचे देखील नाहीत. असार त्रिगुण नाहीसे होऊन निर्गुण स्वरूपाकार झाल्यावर त्या ठिकाणी पापपुण्य रहात नाही. जन्ममृत्यू रहात नाही. तो मुक्तच होऊन जातो. निर्हेतुक जीवनाने पापपुण्य हे शब्द अशा व्यक्तीच्या गावीही असत नाहीत. ***('देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्यूचिया सोहळिया। ना म्हणो नये धनंजया। जियापरी।।', 'आणि हाची प्रकृतीगतू। सुख दुःख भोगी हेतू। अथवा गुणातीतू। केवळू हा।।', 'अगा रात्री आणि दिवो। हा तवचि द्वैतभावो। जव न रिगिजे गावो। गभस्तीचा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सोहं हंसाची बोळवण। न करिताची जाहली जाण। येणे पळाले जन्ममरण। शून्य पडले संसारा।।'- श्रीनाथमहाराज, 'निर्गुणास नाही जन्ममरण। निर्गुणास नाही पापपुण्य। निर्गुणी अनन्य होता आपण। मुक्त जाला।।', 'निर्गुणी अनन्य असता। तेणे होय सायुज्यता। सायुज्यता म्हणिजे स्वरूपता। निर्गुण भक्ती।।'- श्रीसमर्थ, 'या गावचे की त्या गावचे। आडनाव सांगा काय तुमचे।। प्रपंच करता दिनरजनी। किंवा असता हरीभजनी।। कर्मफळे तुम्ही मनी धरीता। किंवा आत्मनिवेदन करता।।'- श्रीनगदनारायण)***

**

# तप

हरीप्राप्ती व्हावी ही जर आपली तळमळ असेल तर त्याकरिता तप आचरणे आवश्यक आहे. ***(‘तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त। गुजेवीण हित कोण सांगे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हरीप्राप्तीकरिता कसे कोणते तपाचरण करायचे हे आपणास ज्यांना हरी प्राप्त झाला आहे असे स्वानुभवी संतच सांगू शकतील. हरीप्राप्तीचे तप संतापायी-संतांमुळे प्राप्त होणारे आहे. ***(‘हरीप्राप्तीसी उपाय। धरावे संतांचे ते पाय।।’- संतवचन)*** अनंताचा साक्षात्कार होणेसाठी करावे लागणारे तप म्हणजे एकाचा प्रत्यय देणारे एकनाम असून ते कसे अंतरी अनुभवायचे हे संतांकडून समजून घ्यावे लागते. ***(‘अनंता जन्माचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘नामा म्हणे तरी सद्‌गुरूपासूनी। नाम घ्या जाणोनि नाना काही।।’- श्रीनामदेवमहाराज)*** हे जे एक नाम आहे ते कायेने अनुभवायचे नसून कायेत अनुभवायचे आहे. आम्ही नाम घेतो पण ते देहाच्या जाणीवेत घेतो. देहाला विसरून देहात नाम अनुभवायचे आहे. वाऱ्यावर जर नजर लागली तर देहभानाचा विसर होऊन केवळ चैतन्याच्या जाणीवेने (एक नामाने) एक हरी आत्मा सहज जाता येता भेटणार आहे. जीवनाची येरझार प्रत्ययकारी होणारी आहे. ***(‘कायी तप करी कायी तप करी। भेटेल श्रीहरी येता जाता।।’- श्रीमामामहाराज)*** आम्ही देहाच्या जाणीवेत जर हे नामाचे तप आचरले किंवा मीपणेसह साधन साधले तर तपाची जाणीव होते व जाणीवेने अहंकार येतो व अहंकाराने आत्मसाक्षात्कार होत नाही. अहंकार गेला व साक्षात्कार झाला तर जप, तप, साधन तीर्थे करण्याला अर्थ. नाहीतर केलेला जप तप निरर्थकच. ***(‘आत्माची कळला नाही जपतप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘योगतप याची नावे। गलीत व्हावे अभिमान।।’- श्रीतुकाराममहाराज)*** देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे श्रीदासराममहाराजांना अपेक्षित नामस्मरण जर साधले तर महातप, तपाचे तप साधणार व आत्मदर्शनाने समाधान होणार. ***(‘पांडुरंग नाम जप। हेचि माझे महातप।।’- संत जनाबाई, ‘तपाचे जे तप रामनाम देख। उच्चारिता हरिख ब्रह्मादिका।।’- श्रीमामामहाराज केळकर, ‘आणिक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोचि धन्य। समाधानी।।’- श्रीसमर्थ)*** या एक नामाच्या आचरणाने नामाचा बिंदू घडतो, नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते. तारक स्वरूपाच्या अनुभवाने मन संपूर्णपणे मुरते. तप केल्याची जाणीव तेथे रहात नाही. श्रीचिमडचे महाराज सांगतात, ***‘पाहाता याचे रूप माझे मन झाले वेडे। नाही तप मी केले नाही झिजविली हाडे।।’*** देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधून तो स्वरूपाकार होतो. देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधून स्वरूपाकार होण्याच्या प्रक्रियेला तप म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘तैसा स्वरूपाचिया प्रसरा। लागी प्राणेंद्रियशरीरा। आटणी करणे जे वीरा। तेचि तप।।’*** येथे ‘इंद्रिय’ हा शब्द मनाला उद्देशून आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज विभूती योगात सांगतात, ***‘इंद्रियाआंतु अकरावे। मन ते मी हे जाणावे। भूतामाजी स्वभावे। चेतना ते मी।।’***

**

# तीर्थ

आम्ही तीर्थयात्रा करतो, पण त्या तीर्थाबद्दल अंत:करणात सद्भाव असतो का? संशय टाळून जर तीर्थाबद्दल भाव धरला तर विशेष श्वास हा विश्वास प्राप्त होऊन 'विश्वास तो देव' अनुभवाला आल्यावाचून राहणार नाही. पण आम्ही तीर्थाला जातो, ते पिकनीक म्हणून मग आम्हाला देव कसा अनुभवाला येणार? मायेतील आम्हाला देव दगडाचाच दिसणार. सत्य कळल्याशिवाय संशय हालत नाही आणि संशय गेल्याशिवाय सत्य कळत नाही. ***('तीर्थीव्रती भाव धरी रे करुणा। शांती दया पाहुणा हरी करी।।', 'न संडी रे भावो टाकी रे संदेहो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'देव दगडाचा भक्त हा मायेचा। संदेह दोघांचा फिटे कैसा।।', 'विश्वास तो देव। म्हणूनी धरियेला भाव।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही तीर्थाला जातो, तीर्थात स्नान करतो त्यामुळे शरीर स्वच्छ होते हे निश्चित. तीर्थस्नानाने पापक्षालन होते असे म्हणतात. पण पापाचे कारण जो आत्म्याबद्दल संशय आहे तो काही जात नाही. पुण्यक्षेत्रात पाप होते व ते मात्र वज्रलेप होते. ***('जावोनिया तीर्था तुवा काय केले। चर्म प्रक्षाळिले वरी वरी।। अंतरीचे शुद्ध कासयाने केले। भूषण मानिले आपणया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'अन्य क्षेत्रे कृतं पापं। पुण्य क्षेत्रे विनश्यति। पुण्य क्षेत्रे कृतं पापं। वज्रलेपो भविष्यति।।'- संस्कृतवचन, 'पर्वताप्रमाणे पातक करणे। वज्रलेप होणे अभक्तासी।।', 'म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाही पाप घोर। हा विनाशाची वागुर। प्राणियासी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'गेलो काशी विश्वेश्वरा। सेतू बंध रामेश्वरा। परी संशय फिटेना। पूर्व गुण पालटेना।।'- समर्थ)*** अंतरशुद्धी होण्यासाठी, अंत:करण शुद्ध होण्यासाठी आतील आत्मारामाचे चरणाशी असणाऱ्या आत्मतीर्थात स्नान व्हावयास हवे. आतील आत्मतीर्थात स्नान झाले की पापक्षालनासाठी नाना तीर्थे भ्रमण करायचे कारण रहात नाही. ***('अंतर शुद्धी अंतर स्नाने। नोहे तीर्थाचे भ्रमणे।।', 'तीर्थ न दिसे बाहेरी। जे का असे अभ्यंतरी।। जयामाजी बुडी देता। नुरे संकल्पाची वार्ता।।'- श्रीमामामहाराज, 'षटचक्रावरी त्रिकुटाभीतरी। त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे।। तेथे नित्यस्नान करिताती संत। रजतमद्वैत संहारोनी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'चिंतावा रघुवीर। प्राण्या चिंतावा रघुवीर।। नासीक त्रिंबक रूप मनोहर। पावन गंगातीर। पंचवटीमध्ये पर्णकुटी करी। सेवोनी राहे नीर।।'- मध्वमुनीश्वर, 'कहत कबिरा आत्मतीर्थ नहावे। और तीर्थन का क्या कामजी।।'- श्रीकबीरसाहेब, 'त्रिवेणी संगमी नाना तीर्थे भ्रमी। चित्त नाही नामी तरी ते व्यर्थ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जे या तीर्थात स्नान करतात ते संत तीर्थरूप होतात. ***('येक बळाचे निवडले। ते पोहतची उगमा गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।।'- श्रीसमर्थ, 'जयाचे नाव तीर्थरावो। दर्शने प्रशस्तीसी ठावो। जयाचेनी संगे ब्रह्मभावो। भ्रांतासी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या तीर्थरूप संतांचे पदस्पर्शाने तीर्थे पुनीत होतात. ***('तीर्थे तया ठाया। येती पुनित व्हावया।। पर्वकाळ पाया। तळी वसे वैष्णवा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** या तीर्थात स्नान केलेले तीर्थरूप संतच आपणास आत्मतीर्थ स्नान घडवू शकतात.

**

# दान

कोणतीही गोष्ट दान करणे तसे अवघडच. माणूस घ्यायचे जाणतो पण द्यायचे सोयीस्कररित्या विसरतो. 'घेऊ जाणे पण देऊ न जाणे' अशी माणसे भोळी असतात. पैसा खूप लोकांकडे खूप असतो पण दान द्यायची बुद्धी असत नाही. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'दाने कापे हात। नावडे तेविशी मात।।'*** म्हणून दानी माणसे समाजात विरळाच आढळतात. ***'शतेषु जायते शूरः। सहस्रेषुच पण्डितः। वक्ता दशसहस्रेषु। दाता भवति वानवा।।'*** हे संस्कृत सुभाषित याबाबत प्रसिद्धच आहे. दान हे निर्हेतुकपणे व्हावयास हवे तरच ते फलप्रद ठरते. दान करणाऱ्याने दान केल्याचे लक्षात ठेवायचे नाही. पण दान घेणाऱ्याने ते कधीही विसरायचे असत नाही. दान हे अनेक प्रकाराने करता येते. अन्नदान, वस्त्रदान, ज्ञानदान असे अनेक प्रकार सांगता येतील. या सर्वात अन्नदान हे श्रेष्ठ मानले जाते. संतांचे ठिकाणी जे दान प्राप्त होते ते या सर्व दानापेक्षा वेगळे असते. आपण समजतो त्या तपाने, तीर्थाने, दानाने सापेक्ष पुण्यप्राप्ती होते. पुण्यात्मक पापाने स्वर्गप्राप्ती होते पण पापपुण्यातीत मोक्षाची प्राप्ती होत नाही. म्हणून ज्या ज्ञानाने मोक्षप्राप्ती होते ते ज्ञान मिळविण्यासाठी स्वर्गसुखाची आडवाट सोडून निजयोगी 'आकाशमार्गी गुप्तपंथ' आत्मसात करतात. ***('मोक्ष नव्हे स्नाने मोक्ष नव्हे दाने। तपतीर्थाटणे मोक्ष नव्हे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जया ज्ञानालागी। गगन गिळताती योगी। स्वर्गाची आडवंगी। उमरडोनि।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** पण संतांचे ठिकाणी (पायी) तपाचे तप, सर्व तीर्थातीर्थ पवित्रा पवित्र अशा रामनामाचे दान प्राप्त होते. जे जीवाला मोक्षप्राप्ती करून देणारे आहे. संत जे दान करतात ते सायुज्यमुक्तीचे दान त्रैलोक्यात कोणीही देणार नाही. अगदी महाराजे चक्रवर्ती झाले तरी ते काही मोक्षश्री आळंकृत श्रीमंत असत नाहीत. श्रीसमर्थ संतांच्या या दानाचे महत्त्व असे सांगतात, ***'जे त्रैलोकी नाही दान। ते करिती संतसज्जन। तया संतांचे महिमान। काय म्हणोनि वर्णावे।।', 'महाराजे चक्रवर्ती। जाले आहेत पुढे होती। परंतु कोणी सायोज्यमुक्ती। देणार नाही।।', 'मोक्षश्रिया आळंकृत। ऐसे हे संत श्रीमंत। जीव दरिद्री असंख्यात। नृपती केले।।'.*** तर संत श्रीकबीरसाहेब या संतांच्या दानाचे वेगळेपण असे सांगतात, ***'कोई लुटे अन्नदान। कोई लुटे वस्त्रदान। कोई लुटे सुंदर नारी। रामपुरन ध्यान कोई नही लुटे। लुटे कबीर भिकारी।।'*** संतांनी ही मोक्षश्री गुणदोष याती न पाहताना उदारपणे लुटली. श्रीतुकाराममहाराज त्यांच्या दातृत्वाचे वर्णन असे करतात, ***'घातले दुकान। देती आलीयासी दान।। संत उदार उदार। भरले अनंत भांडार।। मागत्याची पुरे। धणी आणिकासी उरे।। तुका म्हणे पोते। देवे भरिले नोहे रिते।।'.*** संतांनी निर्देशित केलेल्या रामनामाचे श्रवणाने हृदयस्थ नारायणाचे, श्रीरामाचे, आत्म्याचे स्मरण होते. म्हणून उमटणाऱ्या रामनामाचा ध्वनी जेथे श्रवण होतो तो निजकर्ण हा खरा दाता आहे. ***('दाता तोचि एक जाण। नारायणा स्मरवी जो।।'- श्रीतुकाराममहाराज, 'दाता एक कर्ण पाही। ऐसी कृष्ण देती ग्वाही।। गोविंद म्हणे निजकर्ण। दाता अधिक सर्वाहून।।'- श्रीमामामहाराज)*** म्हणून सायुज्यमुक्तीचे दान मागायचे ते देवाकडे किंवा देवरूप झालेल्या संतांकडे, सद्गुरूकडे. बाकी देणार ते सारे ऐहिकातीलच नाशिवंत. ***('हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।। गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी।। नलगे मुक्ती धन संपदा। संतसंग देई सदा।। तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी।।', 'ठाकलोसे द्वारी। उभा याचक भिकारी।। मज भीक काही देवा। प्रेम भातुके पाठवा।। याचकाचा भार। घेऊ नये येरझार।। तुका म्हणे दान। सेवा घेतल्यावाचून।।', 'कृपाळू सज्जन तुम्ही संतजन। एवढे कृपादान तुमचे मज।। आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा। कीव माझी सांगा काकुळती।।'- श्रीतुकाराममहाराज, 'हेचि दान देई स्वामी। राहो नित्य मन नामी।।'- श्रीचिमडमहाराज)*** जेथे अखंडस्मरण आहे तेथे जन्ममरण असत नाही हे आपण श्रीतुकाराममहाराजांचे मागण्यातील वर्म लक्षात घ्यावे.

**

# संत

जो निर्विकल्प अवस्थेत शाश्वत कल्पक भगवंत जाणतो अर्थात अशाश्वत, कल्पांती (कल्पनेचा निरास झाल्यावर) नाश पावणारे दृश्य जाणत नाही तो संत. ***(‘जो जाणेल भगवंत। तया नाव बोलिजे संत।। जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी।।’, ‘निर्विकल्पी कल्पनातीत। तोचि ओळखावा संत।। येर अवघेची असंत। भ्रमरूप।।’- श्रीसमर्थ)*** ज्या आकारज्ञानाने - उपाधीज्ञानाने - द्वैताचा बोध होतो, तो आकार ते पाहात नाहीत तर त्यामागे गुप्तरूपाने असणारे सर्वगत चैतन्यच ते जाणतात. ***(‘या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्वीकारिती।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपल्या आत जे चैतन्य आहे तेच साऱ्या विश्वात भरून राहिले आहे हे संत जाणतात. त्यामुळे त्यांना परकेपणा जाणवत नाही. ***(‘तुका म्हणे जे जे भेटे। ते ते वाटे मी ऐसे।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘म्हणोनि आपणपा विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** चराचरात भरून राहिलेल्या आत्मरूप वायुरूप संतांची हे विश्व माझे घर आहे अशी मती स्थिर असते. त्यामुळे विश्वात कोठेही सुखदु:खाचा खडा पडू दे, त्याची लाट संतांचे अंत:करणात उमटल्याशिवाय राहात नाही. ते विश्वाची चिंता करतात. जगाचे आघात सोसून सर्वभूती दया करणे हाच त्यांचा स्थायीभाव झालेला असतो. विश्वकल्याण हेच त्यांचे ध्येय असते. ***(‘हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।।’-श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘आणिकांचे सुख देखोनी जो सुखी। होय धन्य लोकी तोचि संत।। आणिकांचे दुःख देखोनिया डोळा। येई कळवळा तोचि संत।। आणिकांचे दोष आणिना जो मनी। गुणांते वाखाणी तोचि संत।। लोककल्याणार्थ वेची जो जीवित। संत तो महंत स्वामी म्हणे।।’- स्वामी स्वरुपानंद, ‘तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात।।’, ‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘चिंता करितो विश्वाची’- श्रीसमर्थ) ‘अवघाचि संसार सुखाचा करीन’*** अशी प्रतिज्ञा करणारे फक्त संतच असू शकतात. ***‘कल्याण करी रामाराया’, ‘जो जे वांछिल तो ते लाहो’, ‘नामा म्हणे तया असावे कल्याण। ज्या मुखी निधान पांडुरंग।।’*** असे विश्वकल्याणाचे मागणे - पसायदान देवाकडे मागतो तो संत. आत्मज्ञानाने आत्मरूप झालेले संत म्हणजे देवाची सगुण रूपेच असतात. ***(‘देव ते संत देव ते संत। निमित्त त्या प्रतिमा।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘आत्मज्ञाने चोखडी। संत जे माझी रुपडी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संतांची भेट व देवाची भेट काही वेगळी नाही. पण ती संतभेट आम्ही समजतो तशी नव्हे. आम्ही संतांना भेटतो पण संतांनी वर्णन केल्याप्रमाणे संतभेटीतून अपेक्षित आत्मसुख (आत्मलाभ) होते का? होत नाही. मग संतभेट झाली याला कितपत अर्थ राहतो? संतभेटीतून काय लाभ होतात हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***‘तैसे हारपले आपणपे पावे। तै संताते पाहता गिवसावे।। म्हणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा।।’*** तर श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***‘संत भेटती आजी मज। तेणे मी झालो चतुर्भुज। दोन भुजा स्थुळी सहज। दोन सूक्ष्मी वाढल्या।।’ ‘उजळले भाग्य। अवघी चिंता वारली। संतदर्शनी हा लाभ। पद्मनाभ जोडिला।।’.*** आम्ही डोळ्यांनी संतांची देहाकृती व देहाला चिकटलेले प्रारब्ध पाहतो. ही संतभेट नव्हे. अद्वैत चैतन्याशी समरस झालेले संत पाहायला ज्ञानदृष्टी हवी. चैतन्याचे वारे फक्त नयनातच भरते हे आपण लक्षात घ्यावे. संत होऊनच संतभेट होऊ शकते. अंत:करणातील दुराशा जाऊन आपली वृत्ती संथ झाली, देहबुद्धीची उपाधी दूर झाली तरच खऱ्या अर्थाने संतभेट होते. अशी संतभेट झाली तर संतापायी तप, तीर्थ, दान प्राप्त होते.

**

# समाधान देही साधनाचे

'समाधान देही साधनाचे' या श्रीमामांच्या मूळ अभंगातील उक्तीचे दोन प्रकारांनी अर्थ करता येतील. एक म्हणजे जो कोणी 'देही' आहे त्याला साधनाचे समाधान प्राप्त होते. दुसरा म्हणजे जोवर देहभाव आहे तोवर मिळणारे समाधान हे साधनापासूनच मिळत असते. यातील पहिला अर्थ आजचे कीर्तनात पाहू व दुसरा उद्याचे कीर्तनात.

जो कोणी 'देही' आहे, त्याला साधन केल्याने समाधान प्राप्त होते. जो कोणी 'देही' नाही त्याला साधन करूनही समाधान प्राप्त होत नाही. ज्याला साधन करून समाधान होत नाही, तो 'देही' नाही हे उघड आहे. श्रीदासराममहाराजांचे सांगण्याप्रमाणे आम्ही 'देही' नाही, आम्ही 'देहधारी' आहोत. संतमहात्मे ज्याला आत्मा कळला, त्याला 'देही' म्हणतात व ज्याला 'परमात्मा' कळला त्याला 'विदेही' म्हणतात. जे देही असतात तेच विदेही होऊ शकतात. ***('आम्ही देही तू आत्मा। आम्ही विदेही तू परमात्मा।।', 'तुका म्हणे देही। संत जाहले विदेही।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ज्याला आत्मा कळतो त्या देही माणसाला खऱ्या साधनाभ्यासाने विदेही अवस्थेने समाधान होते. ज्याला आत्मा कळत नाही त्याला खरे 'साधन' साधत नाही. अर्थात अपेक्षित समाधान त्याला होत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'*** जोवर आम्हाला जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्था अनुक्रमे स्थूल, सूक्ष्म, कारण देहांचे माध्यमातून अनुभवाला येत आहेत, तोवर आम्ही त्रिगुणातच (संसारातच) घुटमळतो आहोत. अजून संसाराच्या गोष्टी सुटलेल्या नाहीत. अजून जन्ममरणाचे पैल आम्ही गेलेलो नाही, अर्थात आत्मा कळलेला नाही, हे ओळखावे. ***('संसार समस्त त्रिगुण। यामाजी 'मी' अवघा निर्गुण। हे तुज कळावया निजखूण। गुणनिरूपण म्या केले।।', 'क्षणा जागृती क्षणा सुषुप्ती। क्षणैक स्वप्नाची प्रतिती।। हे त्रिगुणाची मिश्रित वृत्ती। जाण निश्चिती उद्धवा।।'- श्रीनाथमहाराज, 'जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।। जन्ममरण देखे देही। तरीच होशील विदेही।।'- श्रीदासराममहाराज)*** या तीन विपरीत ज्ञानात्मक, अज्ञानात्मक अवस्थांनी त्रिविध झालेले जीवन एकवीध होण्याकरीता करावी लागणारी खटपट म्हणजे 'साधन' असे चिमडचे श्रीनारायणमहाराज सांगत. साधनाने त्रिविध असलेले जीवन एकवीध होणे, श्वसनातील त्रिगुणांचा निरास होणे हे साधल्याशिवाय महाकारणदेहात प्रवेश नाही. अर्थात चौथ्या ज्ञानावस्थेची - तुर्येची प्राप्ती नाही हे निश्चित. असा जो साधनाभ्यासाने महाकारणदेहात तुर्यावस्था प्राप्त करतो त्या देहीला साधनाचे समाधान होते. असा महाकारणदेहात प्रवेश झालेला 'देही' सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन 'विदेही' होतो, ज्ञानस्वरूप होतो. ***('मूळमाया चौथा देह। जाला पहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।', 'देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्ताची लक्षणे। जीवन्मुक्त जाणे।।', 'म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। मावळून गेले।।'- श्रीसमर्थ)*** असा जो देही विदेही होतो, तो वृत्तीरहित ज्ञानाने पूर्ण समाधानी होतो. ***('वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।', 'जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतूरहित जाले। समाधान।।'- श्रीसमर्थ)*** देहातीत अवस्थेत तो परब्रह्मरूप होतो. साधनाने साध्य सिद्ध झाल्यावर साधनाची गरज राहात नाही. आत्मसाक्षात्कार हे ध्येय साध्य झाल्यावर साधनाची (ध्यानाची) गरज राहात नाही. ***('तैसा आत्मसाक्षात्कारु। होईल देखोनि गोचरू। ऐसा साधन हतियेरू। हळूचि ठेवी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'विज्ञानी राहिले ज्ञान। ध्येये राहिले ध्यान। सकळ काही कार्याकारण। पाहून सांडिले।।'- श्रीसमर्थ)*** देही अवस्थेत साधनातून मिळणारे सुख समाधान हे त्रिपुटीतील साधनाधीन असते. देहातीत विदेही अवस्थेत मिळणाऱ्या सुखाचे, समाधानाचे ठिकाणी ही त्रिपुटी उरत नाही.

**

# समाधान देही साधनाचे

देहाला इंद्रियामार्फत मायेच्या खंडित सुखातून जे समाधान प्राप्त होते तेही देहात आयुष्याचे साधन आहे म्हणूनच. हंसावर राम बसले की हंस वर खाली करू लागतो व हंस वर खाली करतो तोवरच ही इंद्रिये कार्यरत राहतात. अर्थात इंद्रियांमार्फत होणारे समाधान हेही आयुष्याच्या साधनाचेच आहे. श्रीदासराममहाराज सांगायचे, 'सहस्रदळी असणाऱ्या प्राणाच्या धक्क्यावरती हा श्वसनाचा दांडा हालतो व दांडा हालायला लागला की इंद्रियांची चाके पळू लागतात.' श्वसनालाही प्राण असे संबोधिले जाते. जगाला चालविणाऱ्या या प्राणाची हालचाल आत्म्यामुळे आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'म्या बोलविल्या वेदु बोले। म्या चालविल्या सूर्यु चाले। म्या हालविल्या प्राणु हाले। जो जगाते चाळिता।।'*** विश्वाचा भास प्रगट करणारे व विश्वाचा भास मावळविणारे साधन एकच. साधनाने काय साध्य करायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. काडेपेटी हे साधन उपलब्ध आहे. ते साधन वापरून स्वैपाक करायचा की छप्पर पेटवायचे हा आपला प्रश्न आहे. देहभाव ज्यामुळे प्रगट होतो तेच साधन देहभाव विरवणारे आहे. साधन वापरणारे आपण आहोत. साधन वापरून देहभावाने खंडित समाधान घ्यायचे का देहभाव विरवून अखंड आत्मसमाधान प्राप्त करायचे हा आपला प्रश्न आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनि असलेपणे। विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे।।'*** जोवर देहात आयुष्याचे साधन आहे, तोवर चेहऱ्यावरती प्रसन्नता समाधान दिसते. देहात जे समाधान आहे ते देहात आयुष्य आहे म्हणूनच. वायू निघून गेला, प्राण गेला, श्वासोच्छ्वास बंद पडला की समाधान क्षणात नष्ट होते. चेहऱ्यावर उदासी जाणवू लागते. ***('जव या वायुचा प्रकाशू। तव या भांडियाचा विश्वासू। वायो निघोनिया गेला। तव तो झाला उदासूरया।।', 'परिमळू निघालिया पवनापाठी। मागे वोस फूल राहे देठी। तैसे आयुष्याचिया मुठी। केवळ देह।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** श्वास घेणे व सोडणे या क्रियेत जो वेळ जातो त्याला आयुष्य म्हणतात. अर्थात श्वासोच्छ्वास हे आयुष्याचे साधन आहे. श्वासोच्छ्वासाला जो वेळ लागतो ते आयुष्य काळ खातो. श्वास व उच्छ्वास यांचे संधीकाळात जीवन आहे. श्वास घेणे हा जन्म, उच्छ्वास सोडणे हे मरण व या जन्ममरणाचे मध्ये जो काळ असतो ते खरे जीवन. श्वसनाच्या उपाधीत सापडलेल्या जीवनाला श्रीदासराममहाराज 'उपाधीभूत जीवन' म्हणतात. श्वास आणि उच्छ्वास यांचेमधील संधीकाळात - जीवनात - नामाची धारणा आहे. जेथे नामाची धारणा आहे तेथे कळीकाळाला प्रवेश असत नाही. ***('नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान।।'- श्रीतुकाराममहाराज, 'श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे। म्हणोनि तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।' - श्रीदासराममहाराज)*** आयुष्यभर साधन करायचे नसून आयुष्याचे साधन श्वासोच्छ्वास हे साधनीभूत केले तर सच्चिदानंद ही पदवी प्राप्त होणारी आहे. याकरता उगाच एकांती बसून श्वासोच्छ्वास या क्रियेकडे समजून पाहिले पाहिजे. तरच जन्ममरणाचे पैल घननीळ आत्मा अनुभवाला येऊन आत्म्याला समाधान होणारे आहे. ***('नरदेही बसुनी पाही। देवा समाधान होई।।'- श्रीमामामहाराज, 'जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।। जन्ममरण देखे देही। तरीच होशील विदेही।।'- श्रीदासराममहाराज, 'उगाच येकांती बैसावे। तेथे हे समजोन पाहावे। घ्यावे आणि सांडावे। प्रभंजनासी।।'- श्रीसमर्थ)***

**

# अनुपम सुख

येथे संसारात मिळणारे काल्पनिक क्षणैक सुख व तेथे प्राप्त होणारे अद्वैताचे निश्चळ अखंड खरे सुख यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. येथे द्वैतातून - साधनातून - विषयभोगातून प्राप्त होणाऱ्या सुखाची इतर सुखाशी तुलना होऊ शकते. उन्हाळ्यात पंखा लावून प्राप्त होणाऱ्या सुखापेक्षा वातानुकुलित यंत्राचे सुख अधिक वाटू शकते. दोन साधनातून एकसारखे सुख होत असेल तर एका सुखाची उपमा आपण दुसऱ्या सुखाला देऊ शकतो. पण जेथे एकच आहे, त्यासारखी दुसरी गोष्ट नाहीच, त्या एकापासून मिळणाऱ्या सुखाची तुलना कशी करणार? कोणाची उपमा त्या सुखाला देणार? आत्ता आमच्या अनुभवाला येणारा सूर्य एकच आहे. (असे अनंत सूर्य या विश्वात आहेत पण ते आम्हाला अनुभवाला येत नाहीत.) त्या सूर्याची तुलना आपण करू शकतो का? त्याची उपमा कोणाला देता येईल? शास्त्राने याला उत्तर दिले की असाच सूर्य जर पश्चिमेला उगवला तर या सूर्यासारखा हा सूर्य आहे असे म्हणता येईल. तसेच सर्व विश्वात जे सामान्यपणे गुप्तरूपाने सारखेपणाने सर्वत्र पसरलेले आहे अशा चैतन्यापासून मिळणाऱ्या सुखाची कोणाशी तरी तुलना करता येईल का? चैतन्यासारखी दुसरी गोष्टच नाही म्हणून तेथे होणाऱ्या खऱ्या निश्चळ सुखाची तुलनाच करता येत नाही. ज्यांना हे खरे सुख झाले आहे असे संत द्वैतातून, साधनातून, विषयभोगातून प्राप्त होणाऱ्या सुखाला दु:खच मानतात. ते या सुखाला महत्त्व देत नाहीत. ***(‘तरी आत्मसुखाचिया गोडिया। वीटे जो का सकळ विषया। जयाचे ठायी इंद्रिया। मानु नाही।।’, ‘जो आत्मलाभासारखे गोमटे। काहीचि न देखे। म्हणोनि भोगविशेषे। हरिखे ना जो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे एक चैतन्य जेथे आहे तेथे आपण गेलो तरच हे अद्वैताचे निश्चळ अनुपम सुख प्राप्त होणार. येथे हे असेच चालणार. ***(‘एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही। अद्वैताचे सुख ते निश्चळ निर्गुण शोधोनि पाही।।’- श्रीचिमडमहाराज)*** मग हे नामी सुख आम्हाला केव्हा मिळणार? आम्ही अंतर्मुख झालो तरच हे सुख प्राप्त होते. आत्ता आमचे श्वसन बहिर्मुख आहे, अप्रमाण खाली येत आहे, त्याला काही प्रमाण आले पाहिजे. तसे प्रमाण आले तर अंतर्मुख श्वसन स्थिर होऊन उर्ध्वमुख होते. (बहिर्मुख, अंतर्मुख, स्थिर, उर्ध्वमुख असे चार टप्पे श्रीदासराममहाराज सांगत) इकडला संग सुटून नि:संगाची भेट घडते म्हणजे तो नि:संग होतो, तो निर्गुणी अनन्य होतो. भेद नाहीसा होऊन अभेदत्व प्रगट होते. अहंतेचा मळ नाहीसा होतो. सर्वसंगपरित्याग होऊन तो सुखी होतो. ‘अष्टधा प्रकृती म्हणजे मी’ हा भ्रम नाहीसा होऊन ‘नवचैतन्य म्हणजे मी’ आहे हे सत्य उमगते. सुखाचा सुखनिधी सुखसागर, सर्व सुखाचे आगर त्याला प्राप्त होते. तो सुखरूप होतो. निवृत्ती अवस्थेत तो सुखाचे शेजारी पहुडतो. ***(‘अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो। नि:संगपणे निर्गुणी तो। महायोगी।।’, ‘नवमी करा नवमी करा। नवमी करा भक्ती नवमी करा।। अष्टमी परी नवमी बरी। तये सुखासरी न पवे दुसरी।। भेद हा तुटे अभेद उमटे। राम प्रगटे तेचि नवमी।। शीघ्र नवमी येतसे उर्मी। रामदासी मी अर्पिली रामी।।’- श्रीसमर्थ, ‘संगन त्यक्त्वा। सुखी भव।।’- जनकराज)*** विपरीत ज्ञान ज्यातून प्रगट होते ते अज्ञान हेच दु:खाचे कारण आहे. स्थूल, सूक्ष्म देहाचे कारण म्हणजे कारण देह आहे. कारण देहातील अज्ञान हेच दु:खाचे कारण आहे. ***(‘जन्माचे ते मूळ पाहिले शोधून। दु:खासी कारण जन्म घ्यावा।।’- श्रीतुकाराममहाराज)*** कारण देहातील अज्ञानाचे ज्ञान जर झाले तर दु:खाचे कारण नाहीसे होणार आहे. अज्ञान निवृत्ती जर झाली तर ज्ञानाने मोक्षसुख प्राप्त होणार आहे. ज्यांना श्रीचिमडमहाराजांचे कल्याण असे संबोधिले जाई अशा अधिकारी श्रीगोपाळराव दीक्षितांनी आज ईशचिंतन करीत इ.स.१८९२ मध्ये देह ठेवला. त्यांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

**

# दहा आणि दोन गुरुपदी जडे

या चंचळ मनामुळे इंद्रियांना विपरीत ज्ञान प्राप्त होऊन इंद्रियांचे ठिकाणी विषयांच्या येरझारा वाढतात. ते चंचळ मन गुरुपदांचे ठिकाणी स्थिर होणे म्हणजे ती गुरुद्वादशी आहे. असे कोणते श्रेष्ठपद - गुरुपद आहेत की ज्या ठिकाणी हे चंचळ मन स्थिर होते? श्रीज्ञानेश्वरमहाराज हे मन कोठे स्थिर होते हे असे सांगतात, ***'बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनू सहजे गगना। मिळोची लागे।।'*** तर श्रीनाथमहाराज हे असे स्पष्ट करतात, ***'विषय ते मनाअधीन। मन पवनासी वश्य जाण। अभ्यासे वश केला पवन। सहजे मन स्थिरावे।।'*** अर्थात मनाचे चंचळत्व हे श्वसनाचे गतीमुळे आहे किंवा मनाच्या चंचळत्वाने श्वसनाची धावाधाव आहे. श्वसनगतीमुळे असणारे मनाचे चंचळत्व व मनाच्या चंचळत्वाने असणारी द्वैतबुद्धी व इंद्रियांचे ठिकाणी असणारी विषयांची आसक्ती जीवाला आत्मसुखापासून वंचित ठेवणारी आहे. खरे पाहिले तर या इंद्रियांचे, मनाचे मालक आम्ही. पण आम्ही मन म्हणेल तसे, इंद्रियांचे इच्छेप्रमाणे वागतो. आपले सेवक हेच आपल्या आत्मसुखाच्या आड येणारे शत्रू झाले. त्यामुळे स्वतंत्र असणारा जीव परतंत्र झाला. या मनावरती जर आपण मात केली म्हणजेच इंद्रिये व अंत:करण जर आपल्या ताब्यात आले तर इंद्रियाचे धनी, गोसावी म्हणण्यात काही अर्थ आहे. हा मनोलय साधला तर सर्वत्र विजय होणारा आहे. ***('सेवक तेचि शत्रू झाले। काय मी हो त्यांचे केले।।'- श्रीचिमडमहाराज, 'इंद्रिये जे जे म्हणती। ते तेची जे पुरुष करिती। ते तरलेची न तरती। विषयसिंधू।।', 'म्हणोनि आपली आपणपेया। जरी ये इंद्रिये येती आया। तरी अधिक काही धनंजया। सार्थक असे।।', 'जेयाची आज्ञा आपण। शिरी वाहे अंतःकरण। मनुष्याकारे जाण। ज्ञानचि तो।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'कामक्रोध बंदीखानी। तुका म्हणे दिले दोन्ही। इंद्रियांचे धनी। झालो आम्ही गोसावी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'साधिलिया मनोजय। होय सर्वत्र विजय।।'- श्रीमामामहाराज, 'दास म्हणे केल्या मनावरी मात। खरा परमार्थ दूर नसे।।'- श्रीदासराममहाराज)*** जर आपण मन, बुद्धी, पवनाचे माथ्यावर ठेवली, उगाच येकांतात बसून समजून (जाणून) श्वासोच्छ्वास या क्रियेकडे पाहिले तर मनोलय साधून प्रगट होणाऱ्या सोहंभावाने सहजच इंद्रियांवर विजय प्राप्त होणारा आहे. ***('हे अजानबाहो। साधो पार्था। मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा। तेणेची या तत्वार्था। फावसी तू।।', 'तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आज चिमड येथे पांडव पंचमीच्या रथोत्सवाच्या उत्सवाचा प्रारंभ होतो. ज्याने मनोलय साधला आहे असा साधकच घरची दिवाळी सोडून ही गुरुगृहातील मौज अनुभवू शकतो. खऱ्या तळमळीचा कोण आहे हे कळावे याकरताच या उत्सवाची आखणी या संप्रदायाचे संस्थापक जगज्जीवन सगुण ब्रह्ममूर्ती तपोनिधान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांनी केली आहे. या रथोत्सवाचे निमित्ताने श्रीदासराममहाराज आजपासून साधुमहाराजांची नित्य कीर्तनात राजकवी साधुदास यांचे हे पद म्हणून प्रार्थना करीत, ***'साधुराज गुरुसदया। चिमडतीर्थ कृत नीलया। भक्तावन रतहृदया। शरण पातलो।। मायामय ही सरिता। तुजवीण नच उद्धरिता। अंत नाही मम दुरिता। तारी दास हा।।'***

**

# धन त्या सापडे त्रयोदश

जाणीवेत दहा इंद्रिये व मन बुद्धी यांचे गुरुपदाशी - प्राणापानाशी - तादात्म्य झाले असता अंत:करणातील सर्व कल्पना नाहीशी होते. निर्विकल्प अवस्थेत सर्व साकार विनाशी जगाचे होणारे विपरीत ज्ञान नाहीसे होते व स्मरणाच्या प्रकाशात अज्ञानाचा अंध:कार स्पष्ट दिसतो. हे निवृत्ती अवस्थेतील स्मरण - वृत्तीरहित ज्ञान - हे निर्विकल्प नाम म्हणजेच परब्रह्म आहे. मनोलयाने पापाचा विचार नाही अशी कामक्रोध अभिमानरहित अवस्था प्राप्त होणे म्हणजेच रामनामाचा सदाचार घडणे होय. हे निर्विकल्प नाम संतांपाशी, सद्‌गुरूंपाशी प्राप्त होते म्हणून संतांचे, सद्‌गुरूंचे महत्त्व. हे रामनामाचे ज्ञान हेच धन संतांनी मिळवले व सर्वांना वाटले. ***(‘सद्‌गुरू जोहारी गेलो त्याच्या घरा। तेणे ब्रह्महिरा दाखविला।।’- संतवचन, ‘एक लक्षका रुपया देता देती हिरे तेरा। तेरामाजी साठविला तो परमेश्वर सारा।।’- श्रीदासराममहाराज, ‘राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।’- श्रीतुकाराममहाराज)*** या सत्य अविनाशी नामाचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात, ***‘नाशिवंत सर्व। एक नाम साचे। म्हणोनि वदा वाचे श्रीराम। शरीर नासे संपत्ती नासे। नाम न नासे श्रीरामाचे।। जे न नासे ते नाम वाचे। एका जनार्दनी साचे जप करी।।’.*** परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चार वाणीतून मनच व्यक्त होत असते. अर्थात संपूर्ण मनोलय साधल्यावर साधणारे सत्य निर्विकल्प नाम या वाचेने उच्चारता येत नाही. या चार वाचेने ज्या कल्पना आम्ही व्यक्त करतो त्यात सत्य काही असत नाही. या काल्पनिक बोलण्याला श्रीज्ञानेश्वरमहाराज ‘बरळ’ असे संबोधतात. जोवर वाचेचा गोंधळ आहे, तोवर नामरूपाला मेळ बसलेला असत नाही. वृत्तीचे मौन साधल्यावर - चारी वाचे पैल हरीवाचेने आत्माराम प्रगट करणारे हे सत्य अविनाशी नाम अनुभवता येते. जे विनाशी आहे असे धन चोर लुटू शकतात. जे अक्षय धन आहे ते लुटून कमी होत नाही. म्हणूनच त्याला अक्षय धन म्हणतात. ते कायम वाढत राहते. या निजधनाचे वेगळेपण श्रीतात्यासाहेबमहाराज एका पदात असे सांगतात, ***‘शाश्वत द्रव्यासी चोरभय नाही। राजदंड पाही काही नसे।। बंधू बांधवांचा विभाग करिता। कलह तत्वता मुळी नसे।। ऋण देता नये नको ष्टांपखत। ऐसे हे अद्‌भुत सद्‌गुरू देणे।। द्रव्य ठेवायसी नलगे मांदूस। नको रक्षणास मनुष्यही।। साधनाच्या योगे वाढे क्षणोक्षणी। सद्‌गुरू करणी अघटित।। सद्‌गुरू कृपेने श्रीमंत हा दास। कुबेरापरीस सत्य सत्य।।’*** तर श्रीसूरदास या सत्य अविनाशी परब्रह्मरूप नामाचे वर्णन असे करतात, ***‘निर्धन को धन राम हमारो।। खात न खरचत चोर न लुटत, साथें आवत काम।। दिन दिन होत सवाई दिढी खरचत को नही दाम।। सूरदास प्रभु मुखमो आवत औरसको नही काम।।’.*** साधनाभ्यासाने हरीच्या प्रत्ययाशिवाय होणारी वाया येरझार हा लटका व्यवहार जर हरीच्या प्रत्ययाने उत्तम व्यवहारात जर परिवर्तित झाला तर हे ‘सत्य-निजधन’ प्राप्त होणारे आहे. या तेरा अक्षरी मंत्राने अंत:करणातील मेरा नाहीसा होऊन आहे तितुके देवाचे ऐसे वर्तणे होऊन उद्वेगाचे मूळ नाहीसे होणारे आहे. हे धन साधले तर जीवनाची दिवाळी होणारी आहे.

**

# चतुर्दश स्थानी दीपत्वे दिवाळी

माणसाची दिवाळी चार दिवसांची. देवाची दिवाळी एक दिवसाची तर संतांची दिवाळी नित्याची असते. चार दिवसांची दिवाळी आनंदाने साजरी करण्यासाठी माणसाला स्वत:चे दिवाळे काढावे लागते. मग दिवाळे काढणारी दिवाळी आनंददायी कशी होणार? शिवाय अती खाण्याने होणारी दुखणी व त्यावरील होणारा खर्च वेगळाच. विषयातून प्राप्त होणारा आनंद, दृश्यातून प्राप्त होणारा आनंद हा 'विषय' आहे तोवरच अर्थात मर्यादित आनंद. संतांनी अखंड नित्य परमात्म्यापासून अखंड सुख प्राप्त करून घेऊन अखंड जीवनभर जीवनाची नित्य दिवाळी केली. अहो रोजचा सण, रोजचा पर्वकाळ. ही दिवाळी दिवाळ काढणारी नाही. अख्खे जीवन आनंदात ***('नित्य सण सात आम्हा सदा दिवाळी। आनंदे निर्भर आमुचा कैवारी बळी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अहो रोजची दिवाळी करायची म्हणजे अमूप धनाची गरज आहेच. धन नसेल तर दिवाळी कशी करणार? संतांनी उत्तम व्यवहाराने जोडलेले अक्षय अमूप धन उदास विचाराने निर्हेतुकपणे खर्च केले व जीवनाची दिवाळी केली. दिवाळी करण्यासाठी जुने बुरसटलेले त्याज्य जे आहे ते टाकून नित्य नवे जे आहे त्याचा स्वीकार केला. नित्य नवे जे 'माधव' देईल ते आनंदाचे लाडू, आनंदाचा रस याचा घरी जीवनभर आस्वाद घेतला. घरी आनंदाचा रस, लाडू सेवन करून झाल्यावर दारी पण तो सर्वांना वाटला. सर्वांचीच दिवाळी आनंदाची केली. ***('नित्य नवे जे देईल माधव। भक्षू तेचि घरी।।'- संत अमृतराय, 'तुका म्हणे खातो आनंदाचे लाडू। नका चरफडू घ्या रे कोणी।।', 'हा रस आनंदाचा घोष करा हरीनामाचा। पार या भाग्याचा कोण पावे येथील।।', 'सेवितो हा रस वाटितो आणिका।।'- श्रीतुकाराममहाराज)*** संत हे दिसतात इथे पण त्यांचे इथे काहीच असत नाही. 'काय उणे झालेले असल्याने?', देहभाव गेलेला असल्याने, ते वेगळ्याच आनंदाच्या विश्वात, विठोबाच्या राज्यात, रामराज्यात असतात. त्यांनी सुखाच्या राशी, सर्वसुखाचे आगर जोडलेले असते. दिवाळी आणखी काय वेगळी असते? ***('विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिवाळी। विष्णुदास नामा जीवेभावे ओवाळी।।'- श्रीनामदेवमहाराज, 'झाले रामराज्य काय उणे आम्हासी। धरणीधर पिके गाई वोळल्या म्हशी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'सुखाचा सोहळा नित्य ही दिवाळी। प्रेमे वनमाळी चित्ती धरा।।'- संत सावंतामाळी, 'अमूप जोडील्या सुखाचिया राशी। पार या भाग्यासी नाही आता।।'- संतवचन)*** भगवंताच्या राऊळात नुसते सुख नुसता आनंद म्हणून दिवाळी आली की श्रीनामदेवमहाराज राऊळात जायचे व देवाला आपल्या घरी घेऊन यायचे व देवाबरोबर दिवाळी साजरी करायचे. ***('सण दिवाळीचा आला। नामा राऊळासी गेला।। हाती धरूनी देवासी। चाल आमुच्या घरासी।।'- संत जनाबाई, 'आनंदाची दीपवाळी। घरी बोलवा वनमाळी।।'- संतवचन)*** म्हणून भगवान घरी येणे, देवरूप संत घरी येणे व संतसंगतीत भगवंतसंगतीत ब्रह्मानंद प्राप्त होणे हीच खरी दिवाळी. ***('साधुगृहाप्रती आले भले सार्थक झाले। दसरा हा मज हीच दिवाळी स्वात्मसुखी मन धाले।।'- आनंदनंदन)*** संतसंगतीत मीपणा ही अविवेकाची काजळी नाहीशी होऊन विवेकाचा दीप चतुर्दशस्थानी अनुभवाला आला असता ही निरंतर दिवाळी प्रत्ययाला येणारी आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'मी अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळी। तै योगिया पाहे। दिवाळी निरंतर।।'***

✻✻

# अलक्ष पूजनी लक्ष्मी पूजा

आमचे सारे लक्ष देहाकडे व दृश्याकडे आहे. पण सर्वत्र भरून राहिलेले महत्त्वाचे श्वासोच्छ्वास दुर्लक्षितच आहेत. सद्गुरूंनी आमचे लक्ष श्वासोच्छ्वासाकडे वेधले. श्वासोच्छ्वास हे नवल नादप्रकाशाने 'मी'कडे लक्ष वेधणारे, लक्ष 'मी' करणारे लक्ष्मीचे पूजनच आहे. श्वासोच्छ्वास हे अलक्ष साधन जर लक्ष झाले तर आत्ता जेथे लक्ष आहे ती माया अलक्ष होऊन नादप्रकाशाने अलक्ष वस्तू अंतरी लक्ष होणार आहे. नादप्रकाशाने लक्ष 'मी' होणे हेच खरे लक्ष्मीपूजन आहे. लक्षात लक्ष लागले तर अलक्ष हे अलक्ष होते. अलक्ष्यात लक्ष लागले तर लक्षात अलक्ष होते हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. ***('अलक्ष साधन। हेचि लक्ष्मीचे पूजन।।', 'हरीनाम लक्ष्मी पूजिली जयानी। तयासी रुक्मिणी सदा वानी।।'- श्रीमामामहाराज, 'अलक्ष लक्षुनी पाहे निजवस्तु।।'- संतवचन, 'प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तू लक्षी अंतरी। आत्मस्थितीची धारणा धरी। या नाव साधक।।'- श्रीसमर्थ)*** जीवनाच्या रवीशशी कळा लोपल्यावर ज्या प्रकाशाने द्वैताचे ज्ञान (विपरीत ज्ञान) होते, तो प्रकाश नाहीसा होऊन अज्ञानाचा अंध:कार दिसतो. या अंधारात पाहिल्यावर प्रकाशावेगळा नवलप्रकाश 'राजससुकुमार मदनाचा पुतळा' अनुभवाला आल्यावाचून राहात नाही. अर्थात येथे चंद्रसूर्य मावळले तरी अंधारी रात्र होत नाही. ***('अंधारात पाहता उजेड दिसतो। हर्ष बहु होतो मनामाजी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गपकन अंधार पडला बाई झपकन उजाडले। चंद्रसूर्य नसता तेथे तेज प्रकाशले।।'- संत शिवराम, 'येथ वेद मुके झाले। मन पवन पांगुळले। रातीवीण मावळले। रवीशशी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'स्मरणाचा प्रकाश बरा। दावी अज्ञानांध:कारा।।'- श्रीदासराममहाराज)*** अंधारात उजेड दिसत असल्याने परमार्थात अमावस्येचे महत्त्व अधिक. नादप्रकाशयुक्त जीवन हेच खरे धन असून त्याचा अनुभव घेणे हेच खरे लक्ष्मीपूजन आहे. नादप्रकाशयुक्त जीवन हे धन अंतरात असेल तरच हे बाहेरचे अशाश्वत प्रारब्धाधीन धन प्राप्त होऊ शकते. आज लक्ष्मीपूजन घरोघरी मोठ्या थाटाने होत असते. आमचे घरी साक्षात दत्तगुरूंचे अवतार श्रीटेंबेस्वामी व त्यांचेच अधिकारी शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांनी माझे पणजोबा श्रीअंताजीपंत केळकर यांना प्रेमाने प्रसाद म्हणून दिलेले रुपये आहेत. त्याचप्रमाणे भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व भगवान सद्गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांनी वेळोवेळी श्रीनानांना, श्रीमामांना दिलेले प्रसादधन आहे. ही सारी संपत्ती आम्ही मोठ्या दक्षतेने जतन केली आहे. या संतप्रसादधनाचीच पूजा आमचे घरी प्रतिवर्षी लक्ष्मीपूजनाचे दिवशी होत असते. या लक्ष्मीपूजनाचे वेळी नादप्रकाशयुक्त जीवनाचे प्रतीक म्हणून ध्वनीप्रकाश प्रगट करणारे फटाके फोडले जातात.

**

## कार्तिक शुद्ध

*ज्योती ज्योत मिळता दिवाळी पाडवा। मौज अभावभावा भावबीज।।१।।*
*तीन चार जाता पांडवी पंचमी। विवेक वैराग्य जन्मी सफलता।।२।।*
*पंथे पंढरीच्या जाता तो बा हरी। तुळस पूजन वरी वैकुंठ तो।।३।।*
*सत् चित् प्रकाश मनी ते पुरी पौर्णिमा। सोहळा निरुपमा दास म्हणे।।४।।*

१) दोन ज्योतीचे ऐक्य होऊन त्रिपुटीच्या ग्रासाने वेगळेपणा संपणे - परब्रह्मरूप होणे हा दिवाळी पाडवा तर हे शरीर, दृश्य ज्या भावाने प्रगट होते त्या शरीरभावाचा अभाव होऊन मौजेचे भावबीज (सोहंभाव) प्रगट होणे ही भाऊबीज.

२) साधनाभ्यासाने नित्यानित्य विवेक करून वैराग्याने त्रिगुण व पंचभूतांचे चार देह यांचा त्याग करून उन्मनी, विज्ञान अवस्था प्राप्त होणे म्हणजे पांडवपंचमी. ही पांडवपंचमी साधली तर जन्मसफलता.

३) पंढरीच्या पंथाने गेलो तर निर्विकल्प नाम या तुळशीच्या पानाचे अनुभवाने येथेच वैकुंठनाम परमात्मा प्राप्त होतो.

४) सर्वसाक्षी मनाला सत्‌चित्‌प्रकाशाचा अनुभव आला असता संपूर्ण मनोलयाने परमार्थ पूर्ण होतो हीच त्रिपुरी पौर्णिमा.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने कार्तिक महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## कार्तिक वद्य

*भला बुरा संग टाकोनी असंग। धरावा श्रीरंग अंतररंगी।।१।।*
*विकल्प निंदा त्यागे आशिर्वाद थोर। गुर्वाज्ञा साचार देव तेथे।।२।।*
*मोक्ष रेखा भाग्ये ज्ञानेश शोभले। समाधीसी आले स्वये देव।।३।।*
*दास म्हणे तेथे सुखा काय उणे। सुखरूप होणे स्वयमेव।।४।।*

१) भला बुरा संग - सर्वसंग - परित्याग झाला तर आपण असंग होऊन असंगाशी संग होणार, अंतररंगी प्राणाची करकचून गाठ पडणार.

२) विकल्प निंदेचा त्याग म्हणजे अनित्य अस्थिर गोष्टींचा त्याग, म्हणजेच दृश्य जगाचा त्याग (दृश्याच्या आशेचा त्याग). जगाचा तटका तुटला तरच त्याचा चटका लागणार. चित्तशुद्धी होऊन अहंकाररहित अवस्थेत गुर्वाज्ञेचे पालन होणार.

३) 'दृश्याची रेषा अस्पष्ट झाली की मोक्षाची रेषा स्पष्ट होते.'- श्रीदासराममहाराज. अशा मोक्षरेखाभाग्याने भाग्य संपन्न श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे संजीवन समाधी सोहळ्यासाठी स्वत: देव उपस्थित होते.

४) देहाचा विसर होऊन चैतन्याची जाणीव झाली तर सर्वसुखाची प्राप्ती होऊन आपण स्वयमेव-सुखरूप होणार.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने कार्तिक महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# ज्योती ज्योत मिळता

दहा इंद्रिये व मन बुद्धी यांचे सोहंहंसी - गुरुपदाचे ठिकाणी - तादात्म्य झाले असता (गुरुद्वादशी साधली असता) नि:श्वासाला प्रमाण येऊन त्रयोदशाक्षरी रामनामध्वनी श्रवण होतो. तेरा हिरे हे त्रयोदशधन प्राप्त होते (धनत्रयोदशी साधते). पुढे साधनाभ्यासाने नादश्रवणी तदाकारता साधली असता नामाचा बिंदू घडतो व चतुर्दशस्थानी स्वयंप्रकाश दीपाचा साक्षात्कार होऊन खरी दिवाळी साधते. चैतन्याच्या नादप्रकाशाने अलक्ष असणारे निजत्व लक्ष होते. खोटा 'मी' नाहीसा होऊन खरा 'मी' लक्ष होतो. त्याला लक्ष्मीपूजन साधते. महाकारणदेहात वेगळेपणाने आत्म्याचा - आकाशाचा - नादप्रकाशाने अनुभव येतो. जोवर अनुभव येतो आहे, तोवर त्रिपुटी नाहीशी झालेली नाही, अजून संपूर्ण अद्वैत साधलेले नाही, हे उघड आहे. जेव्हा जाणता हाच अखंडत्वाने जाणला जातो तेव्हा जाणीवेचा ग्रास होतो. जाणले ही वृत्ती नाहीशी होते - तद्रूप होते. सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन तुर्येतील त्रिपुटीतील ज्ञान नाहीसे होते. असे मनाचे उन्मन व ज्ञानाचे विज्ञान झाले असता आत्म्याचा चंचळपणा कमी होतो. तो निश्चळ परब्रह्मरूप होतो. अशा तऱ्हेने महाकारणदेहाचा - मूळमाया या चौथ्या देहाचा - विदेह होऊन तो साधु धन्यता प्राप्त करून घेतो. तो सिद्धपदास पोचतो. श्वास आणि उच्छ्वास यांचे दरम्यान असणाऱ्या जीवनात वेगळेपणाने अनुभवाला येणारी ही जीवनज्योत (आत्मज्योत) निरंजनी परब्रह्मरूप ज्योतीशी तादात्म्य पावते. ही जीवनज्योत (आत्मज्योत) व परब्रह्मरूप ज्योत या काही वेगळ्या ज्योती आहेत का? नाही, ज्योत एकच आहे. वेगळेपणाने त्रिपुटीतला अनुभव आला की तिला जीवनज्योत (आत्मज्योत) म्हणतात व स्वभावे अभिन्न झालो की तीच ज्योत परब्रह्मरूप होते. या दोन प्रकाराने अनुभवाला येणाऱ्या म्हणून दोन नहून एकच असणाऱ्या ज्योतींचे ऐक्य साधणे म्हणजे हा दिवाळी पाडवा आहे. ***('अनुभवे त्रिपुटी उपजे। अद्वैती द्वैतची लाजे। म्हणोनि बोलणे साजे। अनिर्वाच्य।।', 'जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती। ते ऐसी आहे।।', 'म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। मावळोन गेले।।', 'जेथे मनची होते उन्मन। ज्ञानची होते विज्ञान। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।', 'मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।', 'साधु वस्तु होऊन ठेला। संशय ब्रह्मांडाबाहेरी गेला। निश्चये चळेना ऐसा जाला। या नाव सिद्ध।', 'वेगळेपणाने पहावे। तयास आकाश म्हणावे। अभिन्न होता स्वभावे। आकाश ब्रह्म।।'- श्रीसमर्थ)*** या दोन ज्योतींच्या ऐक्याचे महत्त्व श्रीदासराममहाराज असे सांगतात, 'या दोन ज्योतींचे ऐक्य झाले तर मग जन्ममरणाची भानगडच मिटली असे समजावे.' नाथसंप्रदायाचे संस्थापक श्रीमच्छिंद्रनाथ हे 'गुरुसे चेला सवाई' असे आपले शिष्य गोरक्षनाथ यांना सांगतात, ***'कहे मच्छिंदर, सुनले गोरख, ज्योतसे ज्योत मिलाऊ। सद्गुरूजीको शरन गया तो आवा गमन मिटावू।।१।। गुरुजी मै तो एक निरंजन ध्याऊ।।'.*** चंद्रसूर्यात्मक डोळे जर चैतन्याचे गतीवर पडतील आणि त्या गतीचे डोळे होऊन अंतर्मुखतेने जर जीवन उर्ध्वगामी झाले तरच दोन ज्योतींचे ऐक्य होते.

**

# दिवाळी पाडवा

ज्यांनी हे अंतर्यामी दोन ज्योतींचे ऐक्य साधून त्रिपुटीचा ग्रास साधलेला आहे, ज्ञेय ज्ञाता ज्ञान हे त्रिपुटीतील ज्ञान नाहीसे होऊन जे अद्वैती समरस होऊन ज्ञानरूप झालेले आहेत, वृत्तीरहित ज्ञानाने जे पूर्ण समाधानी आहेत अशा परब्रह्मरूप संतांचे पायी श्रीदासराममहाराज शरण जातात. श्रीदासराममहाराज अशा संतांचे वर्णन असे करतात, ***'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।। नामसंकीर्तन उरले त्या ठाया। देहभाव लया गेला त्यांचा।। त्रिपुटी ग्रासिली वृत्ती स्थिर झाली। ज्योतीसी मिळाली आत्मज्योती।। दासराम ऐसा संतासी शरण। वंदितो चरण प्रेमभावे।।'*** अशा परब्रह्मरूप संतांचा दिवाळी पाडवा बाह्यत: कसा असतो हे पाहण्याचे भाग्य मला लाभले. आपले हातून परमार्थ व्हावा या हेतूने उदरभरणाची चिंता न करता सुखाची असणारी सरकारी नोकरी सोडून दैवास्तव देहाचे पाळण करणाऱ्या दैवयोगे महायोगी श्रीदासराममहाराजांचा दिवाळी पाडवा पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले. कीर्तनसेवेची खूणगाठ बांधलेल्या श्रीदासराममहाराजांनी आपली कीर्तनसेवा अंतरणार हे पाहून सरकारी नोकरी सोडली. तेव्हा त्यांचे वय अवघे ३१ वर्षांचे होते. यानंतर मात्र त्यांनी ज्या कीर्तनसेवेची खूणगाठ मनाशी बांधली होती, ती आणि तीच कीर्तनसेवा अखेरपर्यंत केली. कीर्तन केले तेही देवाची सेवा म्हणूनच. त्यांनी बिदागी घेऊन कीर्तन कधीच केले नाही. मग ज्यांना आमच्यासारखे उत्पन्नाचे साधन नाही, त्यांचा पाडवा आमच्यासारखा असेल का? ते कुठला दागिना आमचे सौ.वहिनींला देणार? (आमचे आईला आम्ही वहिनी म्हणत असू) पण विशेष म्हणजे आमचे सौ.वहिनीने कधीही तक्रार केली नाही. सौ.वहिनीने आपले पती श्रीदादांचेकडून देहभाव विरणारे, निजधन प्राप्त करून देणारे साधन समजून घेतले होते. नित्य साधना करून तिने ब्रह्महिरा प्राप्त करून घेतला होता. तिला या इतर दागिन्यांची काय मातब्बरी? ***('उजळले भाग्य दाही दिशा चित्प्रकाश गे। कृष्ण नवरा झाला आता कवणाची आस गे।।' 'सद्गुरू जोहारी गेलो त्याच्या घरा। तेणे ब्रह्महिरा दाखविला।।'- संतवचने)*** आहे त्या स्थितीत ती अत्यंत आनंदाने, उत्साहाने, समाधानाने दिवाळी साजरी करायची. साक्षात लक्ष्मीच होती ती! तिच्या चेहऱ्यावर समाधानाचे सात्विक तेज सतत विलसत असे. पाडव्या दिवशी ती श्रीदादांना व आम्हा सर्वांना प्रेमाने ओवाळत असे. श्रीदादा तबकात पाडव्याची ओवाळणी म्हणून पाच रुपये घालीत. ते पाच रुपये ती श्रीदादांना परत देत असे व त्या पाच रुपयातून 'सद्भक्तीप्रकाश' या अध्यात्मिक त्रैमासिकाची वार्षिक वर्गणी भरली जायची. आधी पाच रुपये ओवाळणी कोणी घेणार नाही. समजा घेतली तर परत ती नवऱ्याला कोणी देणार नाही. श्रीदादावहिनींचा परमार्थ व व्यवहार सारे अलौकिक. पुढील काळात असे पाहायलासुद्धा मिळणे अवघड. आपले वेगळे मत न ठेवता पतीच्या मनाप्रमाणे वागून तिने अनायासे आत्महित साधले होते. ***'पतिचिया मता। अनुसरोनी पतिव्रता। अनायासे आत्महिता। भेटेचि ते।'*** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात तिचे वर्णन करता येईल. आत्मसमाधानी श्रीदादावहिनींची आनंदाची दिपवाळी पाहणारे सारे भाग्यवान होय. उद्याचे कीर्तनात आपण भाऊबीजेचा विषय पाहू.

**

# मौज अभाव भावा भावबीज

हे शरीर, दृश्य ज्या भावाने प्रगट होते, त्या भावाचा साधनाने अभाव झाला असता डोळ्यातील सारे दृश्य लय पावते व ज्या बीजातून, चैतन्यातून हा शरीरभाव - दृश्यभाव प्रगट होतो, ते भावबीज (सोहंभाव) अनुभवाला येते. हीच खरी 'भाऊबीज' आहे. ***('तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** भावाने जर वासनेच्या (बायकोच्या) हातचे अन्न खाल्ले म्हणजे भाव जर वासनायुक्त असेल तर जन्ममरण चुकत नाही. ***('वासना बायको शेजारीण। झगडी कुटील मोठी दारुण। तिचे पायी नागवण। घर बुडवीसी।', 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाले अंगे हरीरूप।।'- श्रीनाथमहाराज)*** तेच जर वासनारहित भावाने (बायकोपासून दूर राहून भावाने) भक्ती बहिणीच्या घरी नामान्न सेवन केले, नामाचा अनुभव घेतला तर जन्ममरण चुकवून मोक्षाची प्राप्ती निश्चित होणारी आहे. हे भाऊबीजेतील खरे वर्म आहे. ('वासनारहित भावाला (शुद्धभावाला) नमन ह्या भक्तीचे घरी निर्विकल्प नामाचे सेवन घडते.) ***('भाव भक्ती बहिणी घरी। नाम अन्न सेवी जरी।। भाऊबीज म्हणती त्यासी। कार्तिक शुद्ध द्वितीयेसी।। गोविंद म्हणे यमे यमुनेला। मोक्षदायक वर दिला।।'- श्रीमामामहाराज, 'भक्ती ते नमन वैराग्य तो त्याग।।'- श्रीतुकाराममहाराज, 'भक्ती बहीण आली असे गावा।।'- श्रीनाथमहाराज, 'माझे माहेर चांगले। बोध विवेक बंधू भले।। भक्ती बहिणीच्या मेळे। खाऊ ग पाला।।'- संतवचन)*** जो हे विश्वाचे मूळ (भावबीज) साधतो त्याला हे विश्व चैतन्याच्या वाऱ्याची न्यारी मौज आहे (चिद्विलास आहे) हे लक्षात येते. तो चैतन्याची मौज सतत अनुभवतो व त्या चैतन्याच्या वाऱ्यावरच तो प्रेम करतो. ***('जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ। जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वारियाची मौज किती न्यारी रे। वाऱ्यावरी माझी बहु प्रीती रे।।'- श्रीदासराममहाराज, 'जडाचे मूळ चंचळ। चंचळाचे मूळ निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।।'- श्रीसमर्थ)*** त्यांचा सारा परमार्थ मौजेचा असतो. देव मौजेचा, भक्त मौजेचा, उत्सव मौजेचा, आरती मौजेची, कीर्तन मौजेचे सारे आयुष्य मौजेचेच. श्रीसंतशिवदिनी सांगतात, ***'मौजेची आरती मौजेचा देव। मौजेचाही भक्त करिती उत्साह।। मौजेचा तेथे धरूनी दृढभाव। मौज तेथे प्रगटे सद्गुरूराव।। जयदेव जयदेव जय मौजरूपा। नाना मौजा करिसी केशव गुरुरूपा।। मौजेची आरती मौजेचे धृत। पंचप्राण उजळोनी लावियेली ज्योत।। जिकडे पहावे तिकडे मौजभरीत। सर्वाघटी भरला तो मौजनाथ।। मौजेची आरती मौजेचे गान। मौजेचे येथे जाहले कीर्तन।। मौजेवाचून न दिसे आणिक शिवदिन। मौज पाहता तेथे न भासे विघ्न।।'.*** श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या मौजरूप प्रगट करणाऱ्या कीर्तनात त्याचे सूचनेवरून विरामाचे वेळी माझे पणजोबा कै.अंताजीपंत केळकर मौजेने मौजेचे ***'मौज दिसती रे। आजि मोठी मौज दिसती रे।। ध्वनीमध्ये मन रंगुनी गेले। भ्रूभंगावरी लक्ष्य लागले। न ढळे पाती नीर चालिले। लाटची येती रे।। अरुणोदयसम सुरंग सगळे। विजा चमकती बहु कल्लोळे। येके येके जळी उठती विशाळे। भासती नासती रे।। पाहता पाहता न दिसे काही। दिसते परी ते फिर फिर पाही। मागे पुढे दाटले घनदायी। सहजची ज्योती रे।। नरहरीनाथे मस्तकी धरिले। जन्ममरण हे सहज विसरले। महीपती नयनी स्वरूप भरले। स्वयंज्योती रे।।'*** हे श्रीमहीपतीमहाराजांचे पद म्हणत व कीर्तनात मोठी मौजच भरत असे.

**

# तीन

त्रिगुण व पंचमहाभूते यांची सूक्ष्म बीजे बाह्यत: आपल्या श्वसनात - आयुष्याच्या साधनात असतात. या आयुष्याच्या साधनाच्या अभ्यासाने रज तम सत्व या त्रिगुणांचा निरास होणे (त्रिगुणरहित होणे) व पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या तत्वांचा निरास होऊन चत्वार देहांचा निरास होणे म्हणजे तीन व चार जाणे होय. आपले ठिकाणी असणाऱ्या त्रिगुणात्मक विचाराने ही साकार पंचमहाभूतांची सृष्टी आपणास जाणवते. ही पंचमहाभूते व त्रिगुण हे दोन्ही मिळून होणाऱ्या आठ तत्त्वांना अष्टधाप्रकृती - दृश्य म्हणतात. ***('त्रिगुण आणि पंचभूते। हे वायोमध्ये मिश्रिते। अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।', 'पाच भुते तीन गुण। आठ जाली दोनी मिळोन। म्हणोन अष्टधाप्रकृती जाण। बोलिजेते।।', 'पंचभुते आणि त्रिगुण। ऐसी अष्टधा प्रकृती जाण। अष्टधा प्रकृतीस नामाभिधान। दृश्य ऐसे।।'- समर्थ)*** अष्टधाप्रकृतीतील त्रिगुणांचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***'सत्कर्मे सात्त्विकी। रज ते रजोविषयकी। तम मोहादिकी। वर्तत असे।।'*** तर संत श्रीमुक्तेश्वर हे वर्णनअसे करतात, ***'सत्वगुणे होय ज्ञान। लोभ रजोगुणेकरून। विस्मरण मोहे अज्ञान। तमोगुणास्तव।।'*** तर श्रीसमर्थ हे त्रिगुणवर्णन असे करतात, ***'सत्वगुणे भगवद्भक्ती। रजोगुणे पुनरावृत्ती। तमोगुणे अधोगती। पावती प्राणी।।', 'शुद्ध नेणीव तमोगुण। शुद्ध जाणीव सत्वगुण। जाणीव नेणीव रजोगुण। मिश्रित चालिला।'.*** सर्वसामान्य माणूस त्रिगुणात्मक विचाराने साकार विश्व पाहतो पण त्यामागे दडलेले सर्वगत चैतन्य तो पाहू शकत नाही. त्रिगुणात्मक विचाराने तो त्रिविध देह (स्थूल, सूक्ष्म, कारण) त्रिविध अवस्था (जागृती, स्वप्न, सुषुप्ती) यांचेमार्फत त्रिविध भोक्ता त्रिविध भोग भोगत प्रपंचाचा अनुभव घेतो. पण तो चौथ्या विशेष गुणाचा व चौथ्या आकाशरूप महाकारणदेहाचा अनुभव घेऊ शकत नाही. श्रीतुकाराममहाराज हा त्रिगुण महिमा असा सांगतात, ***'रज तम सत्व आहे ज्याचे अंगी। याच गुणे जगी वाया गेला।।'.*** जो साधक या आयुष्याचे साधनाचा (श्वसनाचा) साधन म्हणून उपयोग करतो व साधनाभ्यासाने जाणीवेत त्रिगुणरहित होतो, त्यालाच हे त्रिगुण ज्यातून निर्माण झाले त्या चौथ्या गुणाची, शुद्ध सत्वगुणाची प्राप्ती होते. त्रिगुणांचे माध्यमातून जागृती, स्वप्न या अवस्थांचे द्वारे होणारे विपरीत ज्ञान व सुषुप्ती अवस्थेत होणारे अज्ञान नाहीसे होऊन तीनही अवस्थेत तो चैतन्याचा, रामाचा अनुभव चौथ्या शुद्ध सत्वगुणांचे साहाय्याने घेतो. ही तीन अवस्थांची एक अवस्था होणे म्हणजेच महाकारणदेहातील तुर्यावस्था प्राप्त होणे होय. हा शुद्ध सत्वगुणच अहर्निशी परमार्थ करवू शकतो. श्रीतुकाराममहाराज या शुद्ध सत्वगुणाचे महत्त्व असे वर्णितात, ***'तुका म्हणे ऐका सत्त्वाचे सामर्थ्य। करवी परमार्थ अहर्निशी।।'*** तर श्रीसमर्थ या चौथ्या गुणाचे वर्णन असे करतात, ***'एक गुण तो ब्रह्माचा। एक गुण तो रुद्राचा। एक गुण तो विष्णूचा। चौथा गुण तो वेगळा। अगम्य त्याची लीळा।।'***

**

# चार

जो त्रिगुणरहित होऊन चौथ्या गुणाचे माध्यमातून चौथी तुरीय अवस्था महाकारणदेहात अनुभवतो, तो संतच चारीच्या पलीकडे जाऊ शकतो. ज्याला ही चौथी अवस्था प्राप्त होते, त्या संताला या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्था प्राप्त होतात की नाही? संतांना या देहाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तिन्ही अवस्था प्राप्त होतात. पण या तिन्ही अवस्थेत त्यांना चैतन्याचीच जाणीव होते. ***('जागृती, स्वप्न, सुषुप्ती। तिन्ही अवस्थाते प्रकाशिती। यालागी ते चौथी। तुरीय म्हणती सज्ञान।।', 'जे जागृतीते जागवीत। जे स्वप्नी स्वप्नाते नांदवीत। जे सुषुप्तीते निजवीत। त्याते तुरीय म्हणती उध्दवा।।'- श्रीनाथमहाराज, 'तिन्ही अवस्थांचे जाणपण। तियेशी तुर्यावस्था ऐसी खुण। तिन्ही देहांचे अवलोकन। हे महाकारणदेह।।'- श्रीमुकुंदराजस्वामी)*** हे बहुरंगी, बहुढंगी विश्व आहे खरे, पण संतांना जाणीव (ज्ञान) फक्त चैतन्याचीच. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना प्रकाशित करणारी चौथी ज्ञानात्मक अवस्था म्हणून तिला 'तुरीय' म्हणतात. हे महाकारणदेहात असणारे चैतन्याचे अखंड स्मरण, ***'जागत राम सोवत राम। सपने मो देखे तो राजाहीराम।'*** या श्रीनाथमहाराजांचे वचनाप्रमाणे असणारी संतांची अवस्था म्हणजेच अद्वैताचे भजन किंवा हरीकथा आहे. जोवर कारणदेहातील अज्ञानाचे ज्ञान होत नाही तोवर विपरीतज्ञानात्मक - भ्रमात्मक - जागृती, स्वप्न या अवस्था, स्थूल व सूक्ष्म देहाचे माध्यमातून प्राप्त होतात. जर कारण देहातील अज्ञानाचे ज्ञान झाले, झोपेत जागे राहता आले तर स्थूल, सूक्ष्म देह प्राप्त न होता महाकारणदेहात तुर्यावस्था प्राप्त होते. या महाकारणदेहाच्या स्मरणरूप ज्ञानात्मक तुर्यावस्थेत ब्रह्माचाही अनुभव येतो व मायेचाही अनुभव येतो. कोणतीही वस्तू पाहताना आधी आत्मप्रकाश दिसतो व नंतर ती वस्तू दिसते. सर्व जाणते म्हणून तिला 'सर्वसाक्षिणी' असे संबोधतात. साक्षित्वाने, वेगळेपणाने जे ब्रह्माचे अनुभव येतात, ते याच अवस्थेमध्ये. संतमहात्मे सतत या तुर्यावस्थेत असतात. या तुर्यावस्थेतच मनाचे उन्मन होऊन ते अविनाशी ब्रह्मस्वरूप होतात. या अवस्थेत ब्रह्माचे वेगळेपणाने अनुभव येतात. अर्थात त्रिपुटी नाहीशी होत नाही. म्हणून महाकारणदेहातील तुर्यावस्थेतील त्रिपुटीतील ज्ञानाला पदार्थज्ञानच मानले जाते. तुर्येतील ज्ञान हे खरे ज्ञान मानले जात नाही. खरे ज्ञान हे अद्वैत आहे आणि तुर्येतील ज्ञान हे उघड द्वैतातील आहे. म्हणून शुद्धस्वरूपज्ञान हे तुर्येतील ज्ञानाहून वेगळे आहे. श्रीमहाराजांचेमुळे हा अद्वैतबोध प्रकट झाला खरे, पण श्रीमहाराजांचा अनुभव मात्र या अद्वैतबोधाच्या पलीकडे गेल्याशिवाय एकपणाची जाणीव नाहीशी झाल्याशिवाय होत नाही हे निश्चित. ***('महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वयभजन हरिकथा।।'- श्रीदासराममहाराज, 'नेणीव जरी जाणितली। तरी ते नेणीव मिथ्या झाली। तेथील जाणीव उरली। आत्मप्रभा।।', 'ऐसे नेणीव तेचि कारण। कार्य स्थूल सूक्ष्म जाण। तिये कारण सुषुप्तीचे लक्षण। ऐक आता।।', 'ते नेणीव फिटे गुरुखुणा। जाणे आपण आपणा। बोलिजे या अनुसंधाना। महाकारण ऐसे।।', 'फिटूनिया नेणणे। आप आपणा जाणणे। तिही देहाचेनी साक्षीपणे। महाकारणदेह।।'- श्रीसंत मुकुंदराज, 'जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया। ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी।।', 'दुजेवीण अनुभव। हे बोलणेचि वाव। याकारणे नाही ठाव। अनुभवासी।।', 'सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या। ज्ञान ऐसे म्हणती तया। परी ते जाणिजे वाया। पदार्थज्ञान।।', ज्ञान म्हणजे अद्वैत। तुर्या प्रत्यक्ष द्वैत। म्हणौनि शुद्ध ज्ञान ते सतत। वेगळेचि असे।।'- श्रीसमर्थ, 'तुर्येमध्ये माझा अखंड रहिवास। निवृत्ती म्हणे अविनाश तुर्या करी।।'- श्रीनिवृत्तीनाथमहाराज, 'ते तू गुरुलिंग जी माझे। जे येकलेपणीचे विरजे। जयालागी वोलांडीजे। अद्वैतबोधु।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** 'पांडवपंचमी' हा विषय उद्या पाहू.

**

# पांडव पंचमी

ह्या चौथ्या महाकारणदेहाचा (मूळमायेचा) विदेह होणे म्हणजे चार जाणे होय. महाकारणदेहात 'मी ब्रह्म आहे' या ज्ञानाची असणारी जाणीव नाहीशी झाली असता, ज्ञानाचे विज्ञान होऊन, मला ज्ञान झाले ही मनोवृत्ती नाहीशी झाली असता सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो. आत्मा निश्चळ निरुपाधिक होऊन परब्रह्मरूप होतो. अशा तऱ्हेने जो साधुमहात्मा महाकारणदेहाचा विदेह होऊन देहातीत परब्रह्मरूप होतो, तो धन्यता प्राप्त करून घेतो. ***('मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधु।।', 'सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान । ते मावळोन गेले।।', 'जेथे मनची होते उन्मन। जेथे ज्ञानची होते विज्ञान। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ)*** पण ही महाकारणदेहातील ज्ञानाची जाणीव जाणार कशी? किंवा सर्वसाक्षी मनाचे उन्मन होणार कसे? महाकारणदेहात श्रवण होणाऱ्या नादाचे ठिकाणी जर तदाकारता साधली तर नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते. श्रवणात पेरलेले नयनात उगवते. नामाचाच बिंदू घडून तो प्रकाशरूपाने नयनात अनुभवाला येतो. नादप्रकाशाने तो जाणता आत्मा जाणला जातो. अशा तऱ्हेने जो जाणत्याला नादप्रकाशाने जाणतो त्याची ज्ञानाची 'जाणले' ही जाणीव नाहीशी होते. ज्ञानाचे विज्ञान होऊन तो जाणीवरहित जाणता होतो. निवृत्ती अवस्थेत तो उन्मनी साधतो. ***('वारे भरले या नयनात। नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात।।'- श्रीदासराममहाराज, 'श्रवणी पेरीले नयनी उगवले नानारूपे जैसे। जिकडे पाहे तिकडे अवघे ब्रह्मची भरीले असे।।'- संतवचन, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'हृदयात झाली वायुची घासणी। कंठात उदेला ओंकार वन्ही। नामाचा बिंदू घडला गे माये। अंतरबाहेर प्रकाशे स्वये।।'- श्रीदासराममहाराज, 'जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती। ते ऐसी आहे।।'- श्रीसमर्थ)*** त्रिगुणरहित सर्वसाक्षी मनाचे (पाहत्या मनाचे) उन्मन होऊन चत्वार देहाचा निरास झाला असता संपूर्ण मन मुरून जाणीवेचा (शब्दाचा) ग्रास होतो. त्याचे बोलणे खुंटते. त्याला खरे मौन साधते. चारीवाचेपैल, परेच्या पलीकडे, हरीवाचेला मन मुरल्यावर जे उरते त्या निर्विकल्प नामाचा (नि:शब्द नामाचा) अनुभव त्याला प्राप्त होतो. नि:शब्द रूपाचा अनुभव त्याला प्राप्त होतो. नि:शब्द नामरूपाचा अनुभव साधकाला नि:शब्द करणारा असतो. ***('चारी वाचे पैल जावे। नाम उरवोनी नुरवावे।। मौन जप आहे ऐसा। गुरुकृपे साधी कैसा।। दास म्हणे ऐसे मौन। जगी आचरता धन्य।।', 'चारीवाचे पैल निके। ज्योत अंतरी चमके।। तेथ नामासी जपणे। मौनाची ही खुण जाणे।। दास म्हणे तो अबोल। तेथ नुरे दुजा बोल।।'- श्रीमामामहाराज)*** असा जो तीन व चारचे पलीकडे जातो त्याला पांडव पंचमी साधते. देहाचा मनाचा प्राणाचा संपूर्ण लय झाल्यावर प्राप्त होणारी ही प्रचिती असल्याने देह क्षीण झाला तरी ही प्रचिती क्षीण होत नाही. शोकाचा, मोहाचा प्रसंग आला तरी प्रचिती तीच आनंदाचीच येते. ज्यांचा सहकारी भगवान श्रीकृष्ण होता. त्यांच्यावरसुद्धा अनेक दु:खाचे डोंगर कोसळले. पण त्यांनी भगवंताचे स्मरण सोडले नाही. हे पांडवांनी साधले. ***('पहा ते पांडव अखंड वनवासी। परी त्या कृष्णासी आठविती।। प्रल्हादासी पिता करितो जाचणी। परी तो स्मरे मनी नारायण।। सुदामा ब्राह्मण दारिद्र्ये पिडीला। नाही विसरला पांडुरंग।। तुका म्हणे तुझा न पडावा विसर। दु:खाचे डोंगर झाले तरी।। पांडवांचा सहकारी। राज्यावरूनी केले दूरी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'दुर्योधना मारी। पांडवासी रक्षी हरी।। पांडव वनवासी जाये। तयापाठी देव आहे।। उणे न पडे तयाचे। काम पुरवी हो मनाचे।। जनी म्हणे विदूराच्या। कण्या भक्षी हो प्रीतीच्या।।'- संत जनाबाई)*** पांडवांनी कोणता कसा योग साधला हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'पंचप्राण एकमेळा। पांडव पंचमी सोहळा।। पंचमातृकात ध्वनी। नाम दुमदुमे चहुकोनी।। ऐसा पांडवांचा योग। दासा नुरेची वियोग।।'***

**

# श्रीक्षेत्र चिमड येथील पांडव पंचमी

क्षेत्रज्ञ चिद्घन सद्गुरू रघुनाथप्रिय साधुमहाराज यांनी चिमड येथे वास्तव्य केल्याने चिमड हे क्षेत्र झाले. ***('चिमड क्षेत्री सद्गुरूमाई। जगदोद्धारा तिष्ठत राही।। रघुनाथप्रिय गुरुवर त्राता। कैवल्याचा पूर्ण प्रदाता।।'- भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** चिमडक्षेत्री जाऊन क्षेत्रज्ञ साधुराजमाऊलींचे दर्शन घेतले की निजधन प्राप्त झालेच. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ जाणले की आत्मज्ञानाने आत्मलाभ निश्चित होणारा आहे. ***('उठा उठा साधुजन साधा आपुले निजधन। सांडा आळस उघडा नयन। घ्या दर्शन सद्गुरूचे।।'- श्रीचिमडमहाराज, 'सद्गुरूराज पहा प्राण्या। मग तू मुक्त होसी शहाण्या।। त्रिकुट शिखरावरती पाहे वसती ज्यांची आहे। इडा पिंगला सुषुम्नेच्या संगमी वसताहे।। पहाता मन हे तल्लीन झाले दिसते मौक्तिक माला।। गगनाहोनी कोसळताती नक्षत्रांच्या माळा।। रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी यांचा प्रसाद घ्यावा।। आत्माराम सर्वाठायी नेत्रांतरी पहावा।।'-भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, 'क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाते। जाणणे जे निरुते। ज्ञान ऐसे तयाते। मानू आम्ही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अहो 'चिमड' या नावातील 'चि' जर कंसात टाकले तर काय उरेल? 'चि' बाजूला ठेवून चालेल का? हे 'चि' म्हणजे क्षेत्रज्ञ चिद्घन सद्गुरू साधुमहाराज आहेत. 'मड' हा शब्द ३६ तत्वांचे क्षेत्र दर्शवितो. हे क्षेत्र क्षेत्रज्ञ एकत्र आल्याने ते क्षेत्र पवित्र चिमडक्षेत्र झाले आहे. ***('जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगे। होईजे येणे जगे। आत्मा गुणसंगे। संसारिया।।', 'तैसी छत्तीसही इये तत्वे। मेळती जेणे एकत्वे। तेणे समूहपरत्वे। क्षेत्र म्हणिपे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** यातील क्षेत्रज्ञ साधुमहाराजांचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात ***'साधुराज माऊली ग माय माझी। साधुराज माऊली। जगदोध्दारास्तव अवतरली। चिमडमठी राहिली।। अजानुबाहू भव्य अशी जी। गुरुमूर्ती शोभली।। किती कनवाळू मवाळू गोजिरी। दासरामी पावली।।'*** भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे आज्ञेने भगवान सद्गुरु श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर साधुमहाराजांचे निर्वाणानंतर चिमड येथे येऊन राहिले व त्यांचे आज्ञेनेच श्रीसाधुमहाराजांचे समाधीमंदिर त्यांनी बांधले. मंदिराचा पाया खोदताना पांढरा शुभ्र निर्मळ पवित्र पाण्याचा उमाळा लागला. पवित्र गंगाच साधुमहाराजांचे दर्शनासाठी आली. भगवान सद्गुरु श्रीरामभाऊमहाराज, भगवान सद्गुरु श्रीनारायणमहाराज, सर्वच अधिकारी यरगट्टीकर कुटुंबियांचे वास्तव्याने चिमड हे संप्रदायातील मुमुक्षूंना योग्य मार्गदर्शन करणारे महत्त्वाचे क्षेत्र ठरले. साधनाभ्यासाने हा आत्मलाभ सर्वांना सुलभ व्हावा या हेतूने भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे आज्ञेने भगवान सद्गुरु रामभाऊमहाराज यांनी आश्विन व.१२ गुरुद्वादशी ते कार्तिक शु.५ पांडवपंचमी या दिवाळीच्या दिवसात श्रीक्षेत्र चिमड येथे रथोत्सवाचा सोहळा सुरू केला. घरची दिवाळी सोडून ही गुरुगृहीची भजन साधन अभ्यासाने मौज अनुभवणारे सारे साधक धन्यच. भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज विद्यमान असेतोवर या रथोत्सवाचे कार्यक्रमास येत. भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस प्रतिवर्षी हजारो भक्तगणांसह चिमड येथे रथोत्सवास जात. या चिमडक्षेत्राचे व रथोत्सवाचे महत्त्व श्रीदासराममहाराज असे वर्णन करतात, ***'जाऊ दिवाळीला गुरुघरी जाऊ दिवाळीला। दीपावलीचा सण हा मोठा। लुटू या मौजेला।। गुरुमायेला आलिंगुनिया। करू या भजनाला।। गुरुपुत्रांचा मेळा बहुतचि। साधनी या रमला।। साधुराज हा चिमडमठी। करी वास्तव्याला।। रथोत्सवाचा समारंभ हा। पुनित करी सकळा।। दासराम हा रथरजरेणू। लेई निजभाळा।।'***

**

# विवेक

नित्य काय आहे व अनित्य काय आहे याची छाननी करणे म्हणजे विवेक आहे. जे अविनाशी व्यापक एक निराकार ब्रह्म आहे ते एकमेव नित्य आहे व जे डोळ्याला कल्पनेने साकार दिसते, जे मनाला भासते आहे, जे शब्दाने वर्णन करता येते आहे, अशी जी माया आहे ती अनित्य आहे. ज्याला जन्ममरण आहे असा साकार देह अनित्य तर जन्ममरणाचे पैल असणारा एक आत्मा तेवढा नित्य. ***(‘नित्यानित्य वस्तू विवेकः।।’- जगद्‌गुरू शंकराचार्य, ‘ब्रह्म सर्वासी व्यापक। ब्रह्म अनेकी येक। ब्रह्म शाश्वत हा विवेक। बोलिला शास्त्री।।’, ‘देह अनित्य आत्मा नित्य। हाची विवेक नित्यानित्य। अवघे सूक्ष्माचे कृत्य। जाणती ज्ञानी।।’, ‘निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य। यास बोलिजे नित्यानित्य। विचारणा।।’- श्रीसमर्थ, ‘नित्यत्वेकं ब्रह्म। तदव्यतिरिक्त सर्व अनित्यं।।’, ‘अनित्याणि शरीराणी।’- संस्कृत वचने)*** विवेकाने जन्ममरणाचे पैल गेलो, जन्ममरणाचे महत्त्व संपले तर नरदेह प्राप्त झाल्याचे, संसाराला आल्याचे सार्थक होणार आहे. ***(‘नरतनू आल्याचे सार्थक। करिसी नित्यानित्यविवेक। तरीच बाबा तुटे तूक। जन्ममरणाचे।।’- श्रीचिमडमहाराज, ‘संसारा आलियाचे सार्थक। जेथे नित्यानित्यविवेक। इहलोक आणि परलोक। दोनी साधिले।।’- श्रीसमर्थ)*** असा कोणता विवेक आहे की ज्याने जन्ममरणाचे पैल जाता येते किंवा संसाराच्या गोष्टी सुटतात. मनाला आवरणे हाच विवेक आहे. तो झाला तर जन्ममरणाची परंपरा खंडित होऊन संसाराच्या गोष्टी सुटणाऱ्या आहेत. ***(‘मनाचा आवर हाच गा विवेक। अनावर देख अविवेक।।’- श्रीमामामहाराज, ‘मन घोडेकू मार चाबुका। विवेक लगाम लेना।।’- संतवचन, ‘मन ज्याला आवरेना। तोचि संसारीक जाणा।।’- श्रीदासराममहाराज)*** मनाचा आवर हा विवेक साधणेसाठी अंतरी सावध होऊन कामक्रोधादी षड्‌विकारांचा वध करून नेमाचे साधन साधले पाहिजे. ***(‘अंतरी बहुतची सावध व्हावे। विवेकशस्त्रे मन आवरावे। दिसेंदिस अभ्यासावे। साधन नेमाचे।।’- श्रीचिमडमहाराज)*** दिननिशी होणारे षड्‌विकारात्मक आयास जर दूर झाले तर, प्रपंच नेटका होऊन हरीचे भजन हा परमार्थ विवेकाने साधणार आहे. ***(‘आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका। तेथे आळस करू नका। विवेकी हो।।’- श्रीसमर्थ)*** देहाच्या जाणीवेने असणाऱ्या जन्ममरण या क्रियेकडे - श्वासोच्छ्‌वासाकडे पाहिले असता मनोलय साधून जन्ममरणाचे पैल (श्वासोच्छ्‌वास सूक्ष्म झाले असता) घननीळ आत्मा भेटला तर खरा कर्ता कोण आहे याची ओळख होऊन अहंकार ही अविवेकाची काजळी दूर होणार आहे. विवेकदीप उजळणार आहे. ***(‘कर्त्यासी ओळखावे। यास विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदुःखी।।’- श्रीसमर्थ, ‘मी अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळी। तै योगिया पाहे। दिवाळी निरंतर।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** कर्त्याला ओळखणे हा विवेक प्राप्त झाला तर आनंद आहे. विवेक नसेल तर सारा आनंदच आहे. ‘देह म्हणजे मी’ या काल्पनिक अहंकाराने विभक्तता निर्माण होते. या मीपणाने देवाला तू म्हटले जाते. अर्थात हे मी-तू पण ही एक मनोवृत्तीच आहे. विवेकाने मनोलय साधला असता वस्तूची ओळख होऊन तो वस्तुरूप होतो. मी आणि तू हा भ्रम नाहीसा होतो. तो सारे विश्व परवत् न पाहताना आत्मवत् पाहतो. ***(‘मी तू हा विचार विवेके शोधावा। गोविंदा माधवा याची देही।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘मी कोण पाहिजे कळले। देहतत्त्व तितुके शोधिले। मनोवृत्तीचा ठाई आले। मी तू पण।।’, ‘सकळ देहांचा शोध घेता। मीपण दिसेना पाहाता। मीतूपण तत्त्वता। तत्त्वी मावळली।।’, ‘दृश्य पदार्थचि वोसरे। तत्त्वे तत्त्व तेव्हा सरे। मीतूपण कैचे उरे। तत्त्वता वस्तु।।’, ‘मी तू हा भ्रम। उपासना हाही भ्रम। ईश्वरभाव हाही भ्रम। निश्चयेसी।।’- समर्थ)***

✻✻

# वैराग्य

नेमका कशाचा त्याग करायचा हे कळण्यासाठी विवेक हवा व तो त्याग घडण्यासाठी वैराग्याची गरज आहे. विवेकाने नित्य व अनित्य यांची छाननी करून अनित्य गोष्टींचा त्याग वैराग्याने घडला, तरच परमार्थ घडेल. म्हणून नुसता विवेक किंवा नुसते वैराग्य परमार्थदृष्टीने उपयोगी नाही. ***(‘विवेकावीण वैराग्य आंधळे। वैराग्यावीण विवेक पांगळे। हे एकएका अवेगळे। झाल्यावीण न कळे परमार्थ।।’- श्रीनाथमहाराज, ‘तैसी वैराग्याची शीव न देखती। जे विवेकाची भाष नेणती। ते मुर्ख केवी पावती। मज ईश्वराते।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून विवेक आणि वैराग्य हे दोन्ही जवळ असणे हे परमार्थदृष्टीने महद्भाग्याचे मानले जाते. ***(‘म्हणोनी विवेक आणि वैराग्य। हेचि जाणिजे महद्भाग्य। रामदास म्हणे योग्य। साधू जाणती।।’- समर्थ)*** हे विवेक आणि वैराग्य ज्यांचेपाशी असतात त्यांना संत साधू म्हणतात. ***(‘चंद्र तेथे चंद्रिका। शंभु तेथे अंबिका। संत तेथे विवेका। असणे की जी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘हरिभक्त विरक्त विज्ञानराशी।’- समर्थ)*** वैराग्य म्हणजे काय हो? अहो हे सर्व टाकायचे म्हणजे वैराग्य का? - नाही, हा देह-दृश्य टाकता येत नाही. या दृश्यातील आशा टाकायची म्हणजे वैराग्य. देहाचे दृश्याचे गौणत्व ओळखून चैतन्याचे महत्त्व ओळखणे म्हणजे वैराग्य. साधनाभ्यासाने तीन व चार जाणे (मागे पाहिल्याप्रमाणे) म्हणजे वैराग्य. ***(‘विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।।’- संतवचन, ‘वैराग्य तो विषय त्याग। नुरे अंतरात भोग।’- श्रीमामामहाराज, ‘विरक्तासी देह तुच्छ। नाही आस कशाची।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘स्वामी म्हणे देही न जावे गुंतून। हीची खूण असे वैराग्याची।।’- स्वामी स्वरूपानंद)*** वैराग्य असेल तरच षड्विकारांवर मात करून प्रपंचाचा त्याग घडेल व खरा परमार्थ प्राप्त होईल म्हणून वैराग्याचे महत्त्व. ***(‘वैराग्ये करावा त्याग। तरीच परमार्थयोग। प्रपंचत्यागे सर्व सांग। परमार्थ घडे।।’, ‘वैराग्यापरते नाही भाग्य। वैराग्य नाही ते अभाग्य। वैराग्य नसता योग्य। परमार्थ नव्हे।।’- श्रीसमर्थ, ‘अंगी वैराग्याचे बळ। साही खळ जिणावे।।’- श्रीतुकाराममहाराज)*** देहाबद्दल, दृश्याबद्दल वैराग्य असेल तर चैतन्याचे प्रेम निर्माण होणार. देहाबद्दलच प्रेम असेल तर चैतन्याची जाणीव कशी होणार? श्रीदासराममहाराज सांगतात, ***‘वैराग्यावाचोनि। मिळेचिना प्रेमवाणी।। वैराग्यात प्रगटे प्रेम। प्रेमामाजी उपजे नाम।। प्रेमयुक्त नाम। नामामाजी प्रगटे राम।। म्हणोनिया नाम स्मरा। राम म्हणे भवतारा।।’.*** जर देहाबद्दल, दृश्याबद्दल प्रेम असेल तर वैराग्य नुसते बोलण्यातच राहील. ***(‘जोवरी जोवरी वैराग्याच्या गोष्टी। जव सुंदर वनिता दृष्टी पडली नाही।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘वैराग्याचा लेश नाही माझे अंगी। बोलतसे जगी ब्रह्मज्ञान।।’- श्रीसमर्थ)*** हे वैराग्य लोकांत निर्माण व्हावे म्हणून संतांनी कीर्तनातून प्रेमाने वैराग्य वर्णिले. संतांचे उपदेशाने वैराग्याचे महत्त्व पटते. वैराग्याचे भाग्य प्राप्त होते. ***(‘भक्तीज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।।’- श्रीनाथमहाराज, ‘वैराग्याचे भाग्य। संतसंगे हाची लाभ।।’- श्रीतुकाराममहाराज)***

✲✲

# जन्मसफलता

जन्माला येऊन काय करायचे व काय करायचे नाही हे समजले पाहिजे. जन्माला येऊन 'काय नोहे' (देहातीत होणे) न करताना 'काय केले' (देहची होऊनी राहिजे) केले, तर जन्म असफल. याउलट 'काय' घट्ट न करताना 'काय नोहे' केले तर जन्म सफल. ***('करील ते काय नोहे महाराज। परी पाहे बीज शुद्ध अंगी।।', 'काय नोहे केले। एका चिंतिता विठ्ठले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आत्ताचे ब्राह्मणी काय केले। जे अन्न मिळेना ऐसे जहाले। तुम्हा बहुतांचे प्रचितीस आले। किंवा नाही।।'- श्रीसमर्थ)*** जर नको ते केले तर त्याचे नको तेच होते. त्याचा संसार (जन्ममरण) सुटत नाही. आम्ही जे काही करतो, जे काही पाहतो, जे काही बोलतो, जे काही ऐकतो, खातो, त्याने कुणाचा जन्म सफल झाल्याचे ऐकले आहे काय? हे सारेच करतात. यात विशेष ते काय? जे कोणी बोलणार नाही ते अबोलण्याचे बोलणे बोलण्यात काही मातब्बरी आहे. जे दृष्टीला दिसत नाही ते पाहण्यात, जेथे कोणी जाऊ शकत नाही तेथे जाण्यात काही मातब्बरी आहे. असे जो कोणी जगावेगळे करून दाखवितो, त्याला सज्जन म्हणतात. असे सज्जन प्रात:स्मरणीय ठरतात. ***('सज्जन यासाठी यासाठी। अवतरले या सृष्टी।। अबोलणे बोलावे। न दिसे दृष्टी ते दावावे।।'- संत उद्धव चिद्घन, 'पुण्यवंत व्हावे। घेता सज्जनांची नावे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** असे जगावेळे वागणारे सज्जन अध्यात्मिक विश्वात 'संत' म्हणून ओळखले जातात. तर भौतिक विश्वात त्यांना 'शास्त्रज्ञ' म्हणतात. हे संत किंवा शास्त्रज्ञ या जगात असतात पण ते जगावेगळे असतात. ***('जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू।।', 'तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाचि नाही।।'- श्रीसमर्थ, 'आहे ते खोटे नाही ते मोठे। ऐसे उफराटे संताघरी।।'- श्रीदासराममहाराज)*** आता नवीन काही करायचे म्हणजे जुने सारे काही थांबले पाहिजे. नाहीतर 'ना घरका ना घाटका' अशी अवस्था होईल. श्रीसमर्थ काय करू नका व काय करा हे असे सांगतात, ***'काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।'*** हे मनाचे संकल्पविकल्प न करणे म्हणजे काहीच न करणे हे साधणार कसे? हे श्रीचिमडचे महाराज असे सांगतात, ***'जन्मा येऊनी हेचि करावे। श्रीसद्गुरूला शरण जावे। महावाक्य ते विवरावे। निश्चय दृढ धरोनी।। निशीदीनी तोचि ध्यास धरावा। बहु यत्ने अभ्यास करावा। साधन करूनी या वळवावा। श्रीआत्माराम।।'*** साधनाभ्यासाने मन जर चंदनाप्रमाणे झिजले तर मन अंतरी सुख शांत होईल. सज्जनमनाने निर्हेतुक सत्क्रिया जर आचरली तर देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण म्हणजे मरणाच्या अवस्थेत स्मरण, निवृत्ती अवस्थेत स्मरण होऊन संसाराची शांती झाल्यावाचून राहणार नाही. ***('देह त्यागिता कीर्ती मागे उरावी। मना सज्जना हेचि क्रिया धरावी। मना चंदनाचे परी त्वा झिजावे। परी अंतरी सज्जना निववावे।।')*** असे जे याच जन्मात संसारातून वेगळे होऊन निश्चळ स्वरूपाकार होतात ते मोक्षश्रीआळंकृत होतात. त्यांचा जन्म सफळ होतो. परवा कार्तिक शु.८ रोजी भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांची जयंती झाली. अखंडित वाचेने अखंड स्वयमेव रामनामाचा जप साधून ते देवच झाले. प्रपंच साधून परमार्थाचा लाहो करून त्यांनी भलेपणा मिळवला. जन्मसफलता कशी प्राप्त करावी हे त्यांनी आचरून दाखविले.

✻✻

# पंथे पंढरीच्या

परमात्मप्राप्तीचा पंथ एकच आहे. 'नान्यत् पंथ: विद्यते अयनाय' असे श्रुतीवचन आहे. मग आत्ता जे एकाला पाहायचे अनेक पंथ उपलब्ध आहेत, जो तो आपला पंथ वेगळा सांगतो, त्याचे काय? एकतर सर्वांचा मार्ग एकच आहे, आणि जर कोणाचा मार्ग वेगळा असेल तर तो विठ्ठलापर्यंत जाणारा नाही. आणि कोठेतरी जाणारा असेल. नाम घेण्याची पद्धत प्रत्येकाची वेगळी असू शकते. पण पापाचा विचार नाही असे निर्विचार होऊन देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे नामस्मरण व्हावेच लागेल. ***('पंथ विठ्ठलाचा। दावी विठ्ठल हृदयीचा।। पंथ आहेती अनेक। दाविती ना विठ्ठल एक।। गोविंद म्हणे नामे कळे। नाम विरहिता नाकळे।।'- श्रीमामामहाराज, 'नाना पंथ नाना मते। भूमंडळी असंख्याते। सर्वाहूनि नाम थोर। दास म्हणे नेमस्त।।'- श्रीसमर्थ)*** कल्पना सरून निर्विकल्प नाम हे श्वासोच्छ्वासी प्राप्त होत असल्याने श्वासोच्छ्वास हे नेमाचे, नामाचे साधन आहे. या नामातच 'नामी आत्माराम' प्रगट होत असल्याने श्वासोच्छ्वास हे आयुष्याचे साधन सच्चिदानंद ईश्वरप्राप्तीचा एकमेव मार्ग आहे. **(The breathing is the only way of life. So far the breathing is the path to apporach the heaven. श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या 'Twinkle twinkle' या इंग्लिश काव्यातून, *'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मन व मनातील देहबुद्धी पवनाचे माथ्यावर एकाग्र केली असता मनोवृत्ती संथ होऊन, मनोवृत्तीचा निरोध होऊन हा पवनाचा पावन पंथ धरला जातो. देहभानाचा विसर होऊन इतर सर्व दृश्याच्या जाणीवा जाऊन चैतन्याची जाणीव होते. म्हणजेच विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या अज्ञानाचे ज्ञान होते. ही चैतन्याची होणारी जाणीव (पावन नाम) आपला उद्धार करणारी आहे. ***('हे अजानबाहो साधो पार्था। मन बुद्धी ठेवी पवनाचिया माथा। तेणेची या तत्वार्था। फावसी तू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या पवनाच्या पावन नाम प्राप्त करून देणाऱ्या पावनपंथाचे वर्णन श्रीमामामहाराज असे करतात, ***'पतितानी पावन व्हावे। पतितपावनाचे नावे। धरी पावनाचा पंथ। वृत्ती करोनिया संथ।। येर साधने पतीत। न दाविती पावन पंथ।। नाम पवित्र पावन। करी पतीत उद्धरण।। आधी असोन पावन। विस्मरणे पतीतपण।। नाम सर्वांगी बिंबले। दास म्हणे परीक्षिले।।'*** रामनामात हा पवन साधत असल्याने नाम हे पावन आहे. हे पावन रामनाम जीवाचा उद्धार करते. रामनामात पवन साधला तर पवनासरीसा आत्मा स्पष्ट होतो. ***('रामनामामाजी साधिलिया पवन। अनुभव खुण ऐशी असे।।'- श्रीमामामहाराज, 'नाडीद्वारा धावे जीवन। जीवनामध्ये खेळे पवन। त्या पवनासरिसा जाण। आत्माही विवरे।।'- श्रीसमर्थ)*** नाडीद्वारा धावणाऱ्या उपाधीभूत जीवनात हा पवन साधतो. जितका जास्त काळ हा पवन साधेल तेवढा पवनविजयाने साक्षात्कार होतो. हा पवन कसा साधावा हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'कैसा पवन साधावा। स्थिर करूनी नामी लावा।। घेऊनी सोडणेचे आधी। स्थिर करूनी कुंभक साधी।। जैसा जैसा वाढे काळ। पवन विजयाचे बळ।। वाढे दासाचे अंतरी। पूर्ण होता साक्षात्कारी।।'***

**

# पंथे पंढरीच्या

मनाचा प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे होणारा प्रवास या पावन पंथाने होतो. जीवाचे प्रवृत्ती हे सासर असून निवृत्ती हे माहेर आहे. प्रवृत्तीत वास (सासरी राहणे) हा सदा दु:खास कारणीभूत होणारा असून वृत्तीरहित होऊन निवृत्ती या माहेरी सदा सुख प्राप्त होणारे आहे. ***('प्रवृत्तीत वास सदा दु:ख त्यास। हाची सासुरवास दास म्हणे।।'- श्रीमामामहाराज, 'तुका म्हणे मग नये वृत्तीवरी। सुखाचे शेजारी पहुडेन।।'- श्रीतुकाराममहाराज)*** निवृत्ती हे जीवाचे माहेर हेच खरे पंढरपूर आहे. ***('माझे माहेर पंढरी। आहे भीवरेच्या तीरी।।'- श्रीनाथमहाराज)*** प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे जाणारा हा पंथ जवळीच नीट सुखरूप आहे. या पंथाने मन निवृत्ती अवस्थेत माहेरी गेले असता सुखरूप शांत होते. मन हे रामरूप होऊन जाते. ***('मन हे राम झाले आता मन हे राम झाले। प्रवृत्ती सोडोनी कैसे निवृत्तीसी आले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून या पंथाचे वर्णन 'शीतल पंथ', 'माहेरची वाट' असे श्रीतुकाराममहाराज करतात. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'शीतल हा पंथ माहेरीची वाट। जवळीक नीट सुखरूप।।'*** सिद्धांचे सिद्ध, ज्ञानवैराग्ये प्रसिद्ध असे सामर्थ्येसिंधू कैलासीचे राणे भगवान शंकर अजून या मार्गाने प्रवास करीत आहेत. भगवान शंकर अजून साधन करीत आहेत. मग आपण साधन करावयास हवे की नाही? ***('तेथ प्रवृत्तीतरूच्या बुडी। दिसती निवृत्तीफळाचिया कोडी। मोक्ष मार्गीचा कापडी। महेशु अजुनी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जो सीधांचा ही सीध। ज्ञानवैराग्ये प्रसीध। सामर्थ्येसिंधु अगाध। कैलासराणा।।', 'तो सीध परी करी साधन। सर्वकाळ रामचिंतन। ध्यानधारणा अनुष्ठान। चुकोचि नेदी।।', 'ऐसे अपार माहामति। जाले तरी साधन करिती। तेथे मानव ते किती। बापुडे किंकर।।'- श्रीसमर्थ)*** 'झोप लागताना मन ज्या मार्गाने झुकांडी देऊन जाते तोच तो मार्ग आहे परमात्मप्राप्तीचा' असे श्रीदासराममहाराज सांगत. या मनाच्या मार्गाला 'मनोमार्ग' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज संबोधतात. या मार्गाचे आकलन संतसंगतीतच होऊ शकते. ***('संतांचे संगती मनोमार्गगती। आकळावा श्रीपती येणे पंथे।', 'मनोमार्गे गेला तो तेथे मुकला। हरिपाठी स्थिरावला तोची धन्य।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या पंथाने गेले असता मनोलय साधून अद्वैत चैतन्याचे ज्ञान होत असल्याने या ठिकाणी कोणतेही भय उरत नाही. ***('याची पंथे जाता भय नाही। निश्चयी बोलती चारी साही।'- संतवचन, 'भीत नाही भीत नाही। भेदची गिळीला पाही।।'- श्रीकेशवस्वामी)*** अद्वैती समरस होण्याचा, विभक्तांनी भक्त होण्याचा हा मार्ग असल्याने श्रीसमर्थ याला भक्तीपंथ संबोधतात. श्रीसमर्थ सांगतात, ***'मना सज्जना भक्तीपंथेची जावे। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे।'.*** हा राघवाचा भक्तीपंथ सापडावा म्हणून श्रीसमर्थ गणेश शारदेची प्रार्थना अशी करतात, ***'गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा। मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा। नमु शारदा मूळ चत्वारी वाचा। गमू पंथ आनंत या राघवाचा।'.*** आकाशरूप महाकारणदेहातून ही जाणारी वाट असल्याने समर्थ या मार्गाचे वर्णन असे करतात, ***'आकाशमार्गी गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ। इतरासी हा गुह्यार्थ। सहसा न कळे।।'.*** विषयातून निघून अधोमुख असणारे मन जेव्हा प्राणाबरोबर उफराटे होईल तेव्हा सर्वसाक्षी मनाला देहभाव विलय होऊन ब्रह्मगिरीचा अनुभव येईल. ***('उर्ध्वपंथे चाल बाई ब्रह्मगिरी पाहू। देहभाव विलय तेथे तेचि होऊनी राहू।।'- संतवचन, 'खोटे ते खोटेची खोटे। खऱ्यासी तगे ना बालटे। मन अधोमुख उफराटे। केले पाहिजे।।'- श्रीसमर्थ)*** साधनाभ्यासाने नादश्रवणी तदाकारता साधून जेव्हा चैतन्याचे वारेच नयनात भरते, तेव्हा मन वृत्तीसहित मुरते. निवृत्ती अवस्थेत (उन्मनी अवस्थेत) हरीचा (पांडुरंगाचा) अनुभव येतो. ***('त्रिवेणीचे मूळ भामी। त्रिवेणीचे महासंगमी। मसुरप्रमाण राऊळधामी। चिन्मय विठ्ठल दिसताहे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'उन्मनीच्या सुखात। पांडुरंग भेटी देत।।'- संतवचन)***

**

# हरी

हरीच्या ठिकाणी कल्पनेने या साकार विश्वाची निर्मिती झाली आहे. ***(‘बंदेयू उत्पत्ती विश्वन्नू हरिवू। माडवऱ्यारू इल्ला बंदक्को मनुजवू।।’- श्रीगुरुलिंगगीता पद नं.१६)*** अर्थात या विश्वाच्या आदी (विश्वादी) हरी आहे. कल्पनेचा निरास झाल्यावर कल्पांती हे साकार विश्व नाहीसे होते म्हणजे या विश्वाची जाणीव नाहीशी होते, तेव्हा जे अनुभवाला येते ते आपले स्वरूप म्हणजे हरीच आहे. ***(‘तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथे मीचि मी आधवे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतचि असे। सर्वकाळ।।’- श्रीसमर्थ)*** अर्थात विश्वाचा आदी जेथे आहे, तेथेच त्याचा अंत आहे. विश्वाचे आदी अंती हरीच आहे. अर्थात विश्वात सर्वांभूती हरी व्यापून राहिला आहे. ‘सुरुवातीला पाणी, शेवटाला पाणी मग मध्ये काय निपाणी असेल का?’ असे श्रीदासराममहाराज गमतीने कीर्तनात विचारीत. ***(‘हरी आदी रे हरी अंती रे। हरी हा व्यापक सर्वांभूती रे।।’- श्रीनाथमहाराज, ‘तुका म्हणे आदीअंत। एक माझा भगवंत।।’- श्रीतुकाराममहाराज)*** विश्वाचा भास होणे किंवा मावळणे हे दोन्ही हरीच्या अस्तित्वावरच होते. हरी लपला की विश्वाचा भास होतो व प्रगट झाला की विश्वाचा भास मावळतो. ***(‘स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनि असलेपणे। विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्यापासून हे विश्व निर्माण झाले तो हरी साऱ्या विश्वात भरून राहिला आहे. तो नाही अशी एकही जागा नाही. या विश्वाचे अस्तित्व हरीवर अवलंबून आहे. हरी आहे म्हणून विश्व आहे. हरीवेगळे विश्वाला अस्तित्व नाही. म्हणून विश्वाचे अस्तित्व म्हणजे हरी आहे. तो विश्वात भरून राहिला आहे पण तो विश्वातला नसून विश्वापेक्षा वेगळा आहे. या अशाश्वत विश्वामध्ये जे एक शाश्वत सारखेपणाने, गुप्तपणाने भरून राहिले आहे तो हरी आहे. ज्या हरीने हे विश्व निर्माण केले, त्या विश्वावर हरीचीच सत्ता आहे. ज्या सत्तेने आपला देह चालतो, त्या सत्तेनेच विश्व चालते. ती सत्ता ओळखली तर संसार सुफळ होणार आहे. सत्ता ओळखली नाही तर संसारातील फिरणे संपणार नाही. संसारात पुन:पुन: प्राप्त होणारे जन्ममरण (श्वासोच्छ्वास) हे फिरणे सूक्ष्म झाले, चंचळत्व कमी झाले, संसाराच्या गोष्टी सुटल्या तरच एक हरी (आत्मा) कळणार आहे. वासनेमुळे असणारे हे जन्ममरण (श्वासोच्छ्वास) वासनारहित झालो तर नाहीसे होणारे आहे. वासनेपासून मुक्त करणारा साधनाचा अभ्यास जे जीवाला सांगतात व हरीप्राप्तीचा मार्ग दाखवितात, त्यांना सद्गुरू म्हणतात. ज्यांनी हा मार्ग दाखविला ते विश्वगुरू नारायणराव भाऊसाहेबमहाराज निंबरगीकर हे हरीच आहेत. ***(‘हरी नारायण गुरु नारायण।।’- श्रीगुरुलिंगगीता पद क्र.५७)*** ज्याची महाराजांनी ओळख करून दिली तोही हरीच व ज्याला ओळख करून दिली तोही हरीच. हरीवेगळे काही नाही हे अनुभवणे म्हणजे हरीला ओळखणे आहे. भेद सारे नाहीसे होऊन त्याचे एकपण जाणवणे म्हणजेच हरीला शरण जाणे होय. असा जो शरण जातो त्याचा जन्ममरण हा ‘संसार’ नाहीसा होतो.

**

# तुळस पूजन

'सम सकार तुळण' साधल्यावर जे नाम अनुभवाला येते, ते आमचे श्रीमामांचे तुळशीचे पान आहे. प्राणापानाचे ठिकाणी मनोलय साधल्यावर जे निर्विकल्प नाम अनुभवाला येते, ते तुळशीचे पान आहे. ***('सम सकार तुळण। नाम तुळशीचे पान।।', 'हरिनामाकार मन। हेचि तुळशीचे पान।।'- श्रीमामामहाराज)*** हे तुळशीचे पान भगवंतांना प्रिय आहे. ते भगवंतांना अर्पण होणे हे 'तुळस पूजन' आहे. त्रिगुणरहित शुद्ध सात्विक मन म्हणजे संकल्पविकल्परहित मन भगवंताला अर्पण केले तर भगवत्प्राप्ती निश्चित होणारी आहे. ***('तू मन बुद्धी साचेसी। जरी माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेची गा पावसी। हे माझी भाक।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मन हे तुळशी अर्पुनी हृषीकेशी। पुनरपि जन्मासी येणे नाही।।' - श्रीतुकाराममहाराज)*** ही निर्विकल्प नामाची तुळशीची पाने ज्या झाडाला येतात ते नित्य नवे श्वासोच्छ्वास (हिरवीगार तुळस) हा संतांचा संसार आहे. ***('द्वारी तुळस हिरवीगार। पहा हो संतांचा संसार।।'- संतवचन)*** या संसाराला पाणी दिले तरच कृष्ण विष्णू हरी गोविंद या नामाचे निखिल प्रबंध (तुळशीची पाने) नित्य नव्या श्वासाचे माध्यमातून अनुभवाला येतात. ***('नाम जाणे तुकयावाणी। दिले संसाराला पाणी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे। श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे।।', 'कृष्ण विष्णु हरी गोविंद। या नामाचे निखळ प्रबंध। माजि आत्मचर्चा विशद। उदंड गाती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या श्वासोच्छ्वासाभोवती आमचे पारमार्थिक विश्व फिरले पाहिजे. या श्वासोच्छ्वासाचा (तुळशीच्या झाडाचा) अभ्यास केला पाहिजे. चिंतन श्वासाचे व्हायला हवे. तर एकांतवासी गंगास्नान (आत्मतीर्थी नहावे) होऊन मन ही तुळस आपल्या स्वरूपाचे ठिकाणी अर्पण होणारी आहे. भगवंताची प्राप्ती होणारी आहे. ***('काळ सारावा चिंतने। एकांतवासी गंगास्नाने। करोनी पूजन। प्रदक्षिणा तुळशीच्या।।' - श्रीतुकाराममहाराज)*** बाहेरचे गंगास्नान कधी एकांतवासी होईल का? अर्थात हे गंगास्नान पूजन सारे आतले आहे, हे उघड आहे. या तुळशीचे महत्त्व श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'तुळशीचे पान। एक त्रैलोक्यासमान।। उठोनिया प्रात:काळी। वंदी तुळशीमाऊली।। मनीचे मनोरथ। पुरती हेची सत्य।। तुळशीचे चरणी। शरण एका जनार्दनी।।'*** तर श्रीनामदेवमहाराज हे महत्त्व असे सांगतात, ***'उभे वृंदावन जयाचिये द्वारी। होय तो श्रीहरी प्रसन्न त्या।। तुळशीचे रोप लावील जो आणोनी। तया चक्रपाणी न विसंबे।। तुळशीचे काष्ठ जपमाळ करी। तयासी श्रीहरी प्रसन्न तो।। तुळशीची कीर्ती अगाध पै आहे। पंढरीसी पाहे म्हणे नामा।।'.*** साधनाभ्यासाने त्रिगुण व पंचभुते यांचा निरास होऊन शुद्ध भाव - प्राण - दशमद्वारापैल चैतन्याच्या वाऱ्यात मिसळून ब्रह्मरूप होणे हे तुळशीचे लग्न आहे. ***('हा प्राण आटला वाऱ्यामाजी संगम किती हा गोड। शांत हरीच्या नामी काया सर्व मन हे जाय विलया। वायुलहरी वायुसागरी मिनली। जेणे हरीची जोड।।', 'दशमद्वारापैल मिसळता प्राण। सहज होय पूर्ण ब्रह्मरूप।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# वैकुंठ

वैकुंठ ही स्टेज आहे, स्टेशन नव्हे. वैकुंठ ही एक अवस्था आहे. साधनाभ्यासाने वय कुंठीत होणे म्हणजे वैकुंठ ही अवस्था प्राप्त होणे. ज्याचे वय कुंठीत होते तो महात्मा असतानाच वैकुंठरूप - भगवद्‌रूप होतो. (वैकुंठ हे नाव परमात्म्याचे आहे. 'वैकुंठः पुरुषः प्राणः' विष्णुसहस्रनाम) आणि जो असताना वैकुंठ ही अवस्था प्राप्त करून वैकुंठरूप होतो, तो गेल्यावर वैकुंठाला जाऊन वैकुंठरूप होतो. अशा महात्म्यांच्या नावाच्या मागे तो महात्मा देह सोडून गेल्यावर वैकुंठवासी असे लिहावे. सर्वसामान्य माणसे ही परलोकवासी होतात. त्यांचे मागे परलोकवासी असे लिहिणे योग्य होईल. वैकुंठ ही अवस्था कशी असते हो? ज्याठिकाणी देणे घेणे हा व्यापार नाही, ज्या ठिकाणी येणे जाणे ही क्रिया नाही, जेथे अखंड जीवन, अखंड स्मरण आहे अशी जन्ममरणरहित अवस्था म्हणजे वैकुंठ आहे. ही वैकुंठ अवस्था प्राप्त होण्यासाठी उपासना कुणाची करायची? उपासना हरीहरांची करायची. एकट्या हरीची किंवा एकट्या हराची उपासना करून वैकुंठ प्राप्त होत नाही. श्वास आत घेणे हा हरी व श्वास बाहेर टाकणे हा हर असून या दोघांचे उपासनेने एकदशा प्राप्त होऊन, बहिर्मुख असणारे श्वसन अंतर्मुख होऊन स्थिर झाले असता उर्ध्वमुख होते. उलट्या यु सारखे म्हणजे वेलांटीसारखे असणारे श्वसन सरळ नीट होते. हरीहरातील वेलांटीचा भेद नाहीसा होतो. हरीहराचे ठिकाणी म्हणजे श्वासोच्छ्‌वासाचे ठिकाणी बोटभर वातीचा अनुभव येऊन नारायणी (आत्म्याचे ठिकाणी) प्रीती निर्माण होते. ***('एकादशी सोमवार न करिती। कोण त्यांची गती होईल नेणो।। काय करू बहु वाटे तळमळ। आंधळी सकळ बहिर्मुख।। हरीहरा नाही बोटभर वाती। कोण त्यांची गती होईल नेणो।। तुका म्हणे नाही नारायणी प्रीती। कोण त्यांची गती होईल नेणो।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आम्ही हरीहरांच्या दासी। अखंड झालो वैकुंठवासी।। आम्हा येणे जाणे नाही। आम्हा येथेची वैकुंठ पाही।।'- श्रीनिजानंदमहाराज, 'आत घेता हरी टाकिता तो हर। अन्यत्र विचार आहे कोठे।।', 'वैकुंठी अधिश। विष्णु बोलती तयास। ब्रह्मगिरीचे पाठारी। मध्यशृंगीचे नगरी। तया नाम हे वैकुंठ। संतजना मूळपीठ। उर्ध्वपंथी जाता भले। देही दासास लाभले।।'- श्रीमामामहाराज, 'अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज)*** अखंड स्मरणाने वैकुंठरूप झालेल्या संतांनी नामघोष गौरवाने हे विश्व ढवळून टाकले. वैकुंठीचा देव कीर्तनी आणला व ही पृथ्वीच वैकुंठरूप करून टाकली. ***('तुका म्हणे त्यांनी। केली वैकुंठ मेदिनी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'कही एकाधेनी वैकुंठा जावे। इही वैकुंठची केले आघवे। सकळ नामघोषगौरवे। धवळले विश्व।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'निळा म्हणे वैकुंठवासी। नित्य हरी जयापाशी।।' संत श्रीनिळोबारायमहाराज)*** संतांच्या नाममय विश्वात जर आम्ही सहभागी झालो तर वैकुंठ इथेच आपणाला प्राप्त होणार आहे. हरीहरांच्या ऐक्याने बोटभर वातीचा अनुभव आला तर या ज्ञानप्रकाशाने मनातील खोट्या कल्पनेचा निरास होऊन द्वैतानुसंधान सुटणारे आहे. ही परमार्थातील पूर्णता हीच खरी पूर्ण पौर्णिमा आहे. मनाच्या पलीकडील या अवस्थेचे वर्णन शब्दात करता येत नाही. ***('तैसे ज्ञानाचेनि प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।'- श्रीसमर्थ, 'पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला। क्षणात निमाला पायाजवळी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'प्राणापानामाजी मनाचे मिलन। परमार्थ पूर्ण तया ठाया।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# भला बुरा संग

परमात्मा नि:संग, असंग आहे. आपणाला परमात्म्याला पाहायचे म्हणजे परमात्मरूप व्हायचे आहे. म्हणून आपण सारे संग (सर्वसंग) सोडून असंग (नि:संग) व्हावयास हवे. ***('निर्विकल्पासी कल्पिता। कल्पनेची तुरे वार्ता। नि:संगासी भेटो जाता। नि:संगची होईजे।।'- श्रीसमर्थ, 'आता असंगा साक्षीभूता। देही चैतन्याची जे सत्ता। तया नाव पंडूसुता। चेतना येथे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या जगात माणसाला दोन प्रकारचे संग होतात. एक भला व दुसरा बुरा (दुष्ट). भला संग लाभाने माणसाचे भले करतो, माणसाला निष्पाप करतो तर बुऱ्या (दुष्ट) संगाने महापाप घडून तो अधोगतीस जातो. श्रीसमर्थ या संगाचे वर्णन असे करतात, ***'साधुसंगे साधु भोंदुसंगे भोंदू। वादासंगे वादू होत असे।। होत असे भला भल्याचे संगती। जाय अधोगती दुष्टसंगे।। दुष्टसंगे दुष्ट जाला महापापी। होतसे निष्पापी संतसंगे।। संग जया जैसा लाभ तया तैसा। होतसे आपैसा अनायासे।। अनायासे गती चुके अधोगती। धरीता संगती सज्ञनाची।।'*** हा भला बुरा संग टाकला तर तो असंग होतो. आम्ही जे काही आमच्याभोवती भलेबुरे गोळा केले आहे, ते सारे एकवेळ निग्रहाने टाकता येईल. पण ते अंत:करणापासून गेले पाहिजे. ते अंत:करणातून जाणे तसे अवघडच. हे सर्व ज्याने गोळा केले आहे तो स्व-अहंकार- 'मीपण' टाकणे सर्वात कर्मकठीण आहे. हा मीपणा गेला तर अंत:करणातील माझ्याविषयी असणारे ममत्व पण जाणारे आहे. गोळा केलेले भोवताली असेना, अहंकार जाऊन त्याचे भोवतालच्या गोष्टींबद्दल असणारे ममत्व गेले की तो संग त्याग झाला. हा सर्वसंगपरित्याग होणे म्हणजेच संन्यास आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आणि मी माझे ऐसी आठवण। विसरले जयाचे अंत:करण।। पार्था तो संन्यासी जाण। निरंतर।।'.*** मीपणा ही एक कल्पना आहे. 'मी'चा शोध घेताना 'मी' म्हणून कोणी उरतच नाही. 'मीपणा' आहे म्हणून ममत्व आहे. हे माझे, ते माझे ही सारी कल्पना आहे. ही कल्पना दूर होऊन भ्रमनिरास झाला तरच सत्य वस्तू हाताला येणार आहे. हा संगत्याग हाच खरा संन्यास आहे. ***('आपण कल्पिले मीपण। मीपण शोधिता तुरे जाण। मीपण गेलिया निर्गुण। आत्माचि स्वये।।', 'आपण म्हणिजे मीपण। मीपण म्हणिजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला।।'- श्रीसमर्थ, 'ऐसा घेई का संन्यास। करी संकल्पाचा न्यास।।'- श्रीतुकाराममहाराज, 'म्हणोनी कल्पना जै सांडे। तैची गा संन्यासु घडे। याकारणे दोन्ही सांगडे। संन्यास योगू।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मनोलयाने कल्पनेचा निरास होऊन कर्माचा त्याग साधतो, करितेनवीण कर्म होऊन नैष्कर्म्य साधते, वायुरूप प्रकृतीचा नाश होऊन प्रकृतीचा संग सुटतो. कर्मसंन्यास अनायासे होतो. ***('मन कृतं कृतं कर्म'- योगवासिष्ठ, 'म्हणऊनि संगु जव प्रकृतीचा। तव त्यागु न घडे कर्माचा। ऐसियाही करू म्हणती तयांचा। आग्रहोचि उरे।।', 'अगा करितेनवीण कर्म। तेचि ते निष्कर्म। हे जाणती सवर्म। गुरुगम्य जे।।', 'ऐसेनि प्रकृति नाशु। जालया कर्मसंन्यासु। निफजेल अनायासु। सकारणु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# भला बुरा संग

कल्पनेच्या निरासाने मीपणा - अहंभाव जाऊन संगत्याग झाला असता तो अद्वैती समरस होतो. परब्रह्मरूप होतो व त्याला निवेदन साधते. ***(‘अहंभाव गेला। तुका म्हणे देव झाला।।‘, ‘न करी रे संग राही रे निश्चळ। लागो नेदी मळ अहंतेचा। या नाव अद्वैत खरे ब्रह्मज्ञान। अनुभवावाचून बडबड ते।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘पंचीकरण तत्वविवरण। महावाक्ये वस्तु आपण। नि:संगपणे निवेदन। केले पाहिजे।।’- श्रीसमर्थ)*** कल्पनेच्या निरासाने मनोलय साधत असल्याने कर्म निर्हेतुक होते. कर्म करून नैष्कर्म्य साधते. तो देहीच विदेहता भोगतो. ***(‘देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्तांची लक्षणे। जीवन्मुक्त जाणे।।’- श्रीसमर्थ, ‘मन कृतं कृतं कर्म न शरीर कृतं कृतं।।’-योगवासिष्ठ)*** कल्पनेच्या निरासाने निर्विकल्प अवस्थेत तो भूतमात्र न पाहता भगवंताचा अनुभव घेतो. त्याचा दृश्य जगाचा तटका तुटतो. तो या सर्वापासून अलिप्त होतो. ***(‘तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाचि नाही।।’- श्रीसमर्थ)*** अंत:करणातील हेतू मावळल्याने तेथे जे होते ते सारे सहज तेथे मुद्दाम काहीच उरत नाही. यालाच सहजस्थिती म्हणतात. दशमद्वार ओलांडून भगवंताच्या राऊळात गेल्यावर ही सहजस्थिती प्राप्त होते. ***(‘दशमद्वार ओलांडिता। सहजस्थिती येई हाता।।’- श्रीदासराममहाराज, ‘राऊळामाजी जाता। राहे देह अवस्था। मन हे उन्मन झाले। नसे बद्धतेची वार्ता। हेतू हा मावळला। शब्दा आली नि:शब्दता। तटस्थ होऊन ठेले। निजरूप पाहता।।’- श्रीनिवृत्तीनाथमहाराज)*** मीपणा जाऊन संगत्याग साधला की तो परमात्मरूप होतो. तेथे मिळवायचे काही राहात नाही. तो वासनारहित होतो. तीच उन्मनी अवस्था. ***(‘तुर्या ते शुद्ध वासना। तेथ तोचि कडुवटपणा। उन्मनी बूझ निर्वासना। म्हणौनि गोडते।।’- श्रीनाथमहाराज)*** निवृत्ती-उन्मनी अवस्थेत वृत्तीसहित ज्ञान उरत नाही तर वृत्तीरहित ज्ञान उरते. त्यालाच विज्ञान म्हणतात. ***(‘ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे हे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।’- श्रीसमर्थ)*** म्हणून संगत्याग, निवेदन, विदेहस्थिती, अलिप्तपणा, सहजस्थिती, उन्मनी, विज्ञान या सातही परमार्थात प्राप्त होणाऱ्या अवस्था एकरूपच आहेत. श्रीसमर्थ सांगतात, ***‘संगत्याग आणि निवेदन। विदेहस्थिती अलिप्तपण। सहजस्थिती उन्मनी विज्ञान। हे सप्तही येकरूप।।’*** .सर्वसंगपरित्याग कसा व का करावा हे भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज असे सांगतात, ***‘गुरुचरण कमलदल्ली भृंग नागो नी। स्थिरवील्ल संसार नरजन्मदोळु बंदु। परतत्व तिळिदू साधुर संगियागो नी। मौन हिडिदू मुद्रे बलिदु ज्ञानज्योति योळगे नलिदु। स्वानुभवामृत सविदु नि:संग नागो नी। मुप्पिन मुनिय पिडिदु वचन। कप्पुगोरळ काडसिद्धनिद्देडेगे होगि साष्टांगनागो नी।।***

**

# असंग

जो सर्वसंगपरित्याग करून असंग होतो, त्याला असंगाचा संग घडतो. इकडला द्वैताचा संग सुटला तर अद्वैत रामाचा संग होतो. असंगाचा संग घडतो म्हणजे प्राणाची करकचून गाठ होते. ***('संग संगातीताचा घडला रे। केशव अद्वयपदी जडला रे।।'- श्रीकेशवस्वामी, 'संग सोडी राम जोडी। भजनी निष्काम। धन्य तुम्ही धन्य आम्ही। गाऊ रामनाम।।'- संतवचन, 'असंगाशी संग प्राणाची गाठ'- मराठीतील म्हण)*** भय हे द्वैतात असते, अद्वैतात नाही. द्वैताचा संग सुटून अद्वैताचा संग जर घडला, अद्वैती समरस जर आपण झालो, तर त्याठिकाणी भय किंवा चिंता उरत नाही. ***('बळीयाचा अंगसंग झाला आता। नाही भय चिंता तुका म्हणे।'- श्रीतुकाराममहाराज)*** देहामध्ये चैतन्य आहे खरे पण देहाचा व चैतन्याचा काडीमात्रही संबंध नाही. चैतन्याच्या कक्षेत शरीर आहे इतकेच. जोवर शरीर चैतन्याच्या कक्षेत आहे तोवर ते हालचाल करते आहे. कक्षा सुटली की हालचाल संपते. ते मृत शरीर ज्याचे त्याला दान करावे लागते. सर्व विश्वात-जगात-सृष्टीत चैतन्य भरून राहिले आहे पण ते सृष्टीहून - जगाहून - दृश्याहून वेगळे आहे. ***('अवघी सृष्टी जो कर्ता। तो ते सृष्टीहूनि पर्ता। तेथे संशयाची वार्ता। काढूचि नये।।', 'दृश्यावेगळा दृश्याअंतरी। सर्वात्मा तो सचराचरी। विचार पाहता अंतरी। निश्चयो बाणे।।', 'एवं जगदीश तो वेगळा। जग निर्माण त्याची कळा। तो सर्वामध्ये परी निराळा। असोन सर्वी।।'- श्रीसमर्थ, 'आता असंगा साक्षीभुता। देही चैतन्याची जे सत्ता। तिये नाव पंडुसुता। चेतना येथ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देहाला, दृश्याला, जगाला जन्ममरण आहे, तर चैतन्याला जन्ममरण नाही. चैतन्य आहे म्हणून देहाचा जन्म, चैतन्य आहे म्हणून देहाचे मरण. देह म्हणजे 'मी' असे मानल्याने जन्ममरण आपल्याला प्राप्त होते. देहाचा संग सुटून असंग अद्वैत चैतन्याचा अखंड संग घडला तर तेथे अखंड जीवन, अखंड स्मरण अशी जन्ममरणरहित अवस्था प्राप्त होणार. ***('अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज)*** देहाचा, दृश्याचा, जगाचा संग हा नाशिवंत आहे म्हणून खोटा, असंगाचा संग हा चिरकाल टिकणारा अविनाशी आहे म्हणून तो खरा. ***('द्रव्याचिया मागे कळीकाळाचा लाग। म्हणोनिया संग खोटा त्याचा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** जाणणारा आहे म्हणून जाणीव आहे. जे जाणीवेत येते ते सारे नाशिवंत आहे. जो जाणीवेच्या पलीकडे जाणता आहे तो खरा आहे. त्यांचा संग धरायचा. ***('जाणत्याचा संग धरा। उतराल पैलतीरा।।'- श्रीमामामहाराज)*** जाणत्याला (जाणणाऱ्याला) जाणले की ही जाणीव नाहीशी होते. जाणले ही वृत्ती नाहीशी होऊन ज्ञानाचे विज्ञान होते. हीच खरी आत्मनिवेदन भक्ती आहे. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते ऐसी आहे।।'- श्रीसमर्थ)*** प्रपंच अथवा परमार्थ असूदे हा जाणता आहे. तोच सर्वशक्तीमान समर्थ आहे. जो हा जाणणारा जाणता जाणत नाही त्याचे आयुष्य व्यर्थ जाते. श्रीसमर्थ सांगतात, ***'प्रपंच अथवा परमार्थ। जाणता तोचि समर्थ। नेणता जाणिजे व्यर्थ। निःकारण।', 'प्रपंच अथवा परमार्थ। प्रचीतीवीण अवघे व्यर्थ। प्रत्ययज्ञानी तो समर्थ। सकळांमध्ये।।'***

**

# धरावा श्रीरंग

परमार्थात श्रीरंग परमात्म्याचे हाताला धरायचे आहे. अहो महाराज श्रीरंग परमात्म्याचे हाताला धरणे ही फार लांबची गोष्ट आहे. आम्हाला एखाद्या माणसाचा हात पण धरता येणार नाही. आम्ही एखाद्या माणसाचा प्रेमाने हात धरला तर तो तुमचे प्रेम झिडकारून निघून जाऊ शकतो. मग श्रीरंग परमात्म्याला हाताला धरणे फार लांबची गोष्ट. श्रीरंग परमात्म्याचे बहिरंगातसुद्धा दर्शन होणे दुरापास्त मग हाताला कोण धरून देईल? श्रीरंगाचे दर्शन व्हायला श्रीरंगपट्टणमला जावे लागते. तिथे सुद्धा मुखदर्शन घेता येते. हाताला धरायला सर्वांना परवानगी नाही. ती परवानगी फक्त सोवळ्या ब्राह्मणांना असते. सोवळे ब्राह्मण कोण? हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. सोवळे नेसले की मन सोवळे होते का? ओवळ्याने शिवले की सोवळ्याचे ओवळे होते. हे कसले सोवळे? असे होत असेल तर ओवळा हा सोवळ्यापेक्षा श्रेष्ठ ठरेल. सोवळ्याच्या संगतीत ओवळा आला तर ओवळा सोवळा व्हावयास हवा. तर त्या माणसाला सोवळा म्हणता येईल. ***('ऐसे कैसे रे सोवळे। शिवता होतसे ओवळे।।'- संतवचन)*** ज्याचे मन सोवळे आहे - ज्याचे मन शुद्ध आहे - असे देहातीत भक्त, संत खरे सोवळे ब्राह्मण आहेत. ***('पृथ्वी सोवळी आकाश सोवळे। मन हे ओवळे अभक्ताचे।।', 'करिती ब्रह्मनिरुपण। जाणती ब्रह्म संपूर्ण। तेचि जाणावे ब्राह्मण। ब्रह्मविद।।', 'ब्राह्मण वेद मूर्तिमंत। ब्राह्मण तोचि भगवंत। पूर्ण होती मनोरथ। विप्रवाक्ये करूनी।।'- श्रीसमर्थ)*** ज्यांचे संगतीत अभक्त ओवळ्याची वृत्ती संथ होते, ओवळा सोवळा होतो, त्यांचाच खरा अधिकार आहे श्रीरंगाचे हाताला धरायचा. साधुसंतांनी देवाचे मनगटाला धरले. संत जनाबाई साधुसंतांचा अधिकार असा सांगतात, ***'साधु या संतांनी देव धरीला मनगटी। काय झाले म्हणूनी दचकले जगजेठी।।'***. श्रीनामदेवमहाराज हे प्रत्येक दिवाळीला भगवंताचे राऊळात जात व भगवंतांचे हाताला धरून घरी घेऊन येत व भगवंतासोबत दिवाळी साजरी करत. काय ती दिवाळी असेल संतांची, काही कल्पना करता येते का? संत जनाबाई या दिवाळीचे वर्णन असे करतात, ***'सण दिवाळीचा आला। नामा राऊळासी गेला। हाती धरोनी देवासी। चाल आमुच्या घरासी।।'*** हा देव संतांनी कसा धरून आणला हे संत असे सांगतात, ***'आणिला धरोनी आणिला धरोनी। चक्रपाणी हा आणिला धरोनी। आळस उद्वेग गर्वादी कंटक। मार्गीचे ते दूर करोनी। भावबळाने देव पाहिला। जिकडे तिकडे जनी विजनी।।'*** आळस न करता साधन साधले तर मनोलयाने देवाने सर्व उपलब्ध करून दिले आहे ही अनुभूती आल्याने उद्वेग नाहीसा होईल. सर्व देवाचे आहे ही अनुभूती आल्याने 'मी', 'माझे' नाहीसे होऊन गर्व पण नाहीसा होईल व भावबळाने तो श्रीरंग परमात्मा हाताला आल्यावाचून राहणार नाही. ***('आळस रे आळस रे। साधनाचा किळस रे।।'- श्रीमामामहाराज, 'आहे तितुके देवाचे। ऐसे वर्तणे निश्चयाचे। मुळ तुटे उद्वेगाचे। येणे रीती।।'- श्रीसमर्थ, 'भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे। करतळी आवळे तैसा हरी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'धरोनी केशव आणा भावबळे। पापिया न कळे काही केल्या।।'- श्रीतुकाराममहाराज)*** भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कृपेने श्रीमामांनी षड्विकारात्मक आयास हा प्रपंच त्यागून हरीभजन, हरीकीर्तन साधले व अंतरंगी श्रीरंगाची भेट घेतली. ***('अंतररंगी रंगविती। श्रीरंगाते भेटविती।। योगी हनुमंत संत। दाविती परमार्थाचा पंथ।।'- श्रीमामामहाराज, 'कीर्तनासी सोडू नये। प्रपंचासी धरू नये।।'- श्रीतुकाराममहाराज, 'सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'हरीकथा सांडू नये। निरुपण तोडू नये। परमार्थास मोडू नये। प्रपंचबळे।।'- श्रीसमर्थ)***

**

# अंतररंगी

साधुसंतांनी जे श्रीरंगाचे हाताला धरले ते बहिरंगात का अंतरंगात? अर्थात अंतरंगातच. देव जर सर्वांचे अंतरी आहे तर त्याला बाहेरी कसे धरता येईल? ***('देव जवळी अंतरी। भेटी नाही जन्मभरी।।', 'बाहेर देव नाही। तो देव आत पाही।'- संतवचन, 'दृश्यावेगळा दृश्याअंतरी। सर्वात्मा तो सचराचरी। विचार पाहता अंतरी। निश्चयो बाणे।।'- श्रीसमर्थ)*** आत्मा - देव - अंतरी असल्याने अध्यात्मशास्त्रात अंतरंगालाच महत्त्व आहे. इंद्रिये ही बहिर्मुख असल्याने इंद्रियांना अंतरंगात प्रवेश नाही. म्हणून देवाचा अनुभव इंद्रियांना येऊ शकत नाही. जे इंद्रियांना, मनाला अनुभवाला येते त्याचे वर्णन शब्दात करता येते. जे इंद्रियांना, मनाला अनुभवता येत नाही, त्याचे वर्णन शब्दात करता येत नाही. अर्थात देवाचा अनुभव हा शब्दात व्यक्त करता येत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसे अध्यात्मशास्त्री इये। अंतरंगची अधिकारीये। परी लोकू वाक्चातुर्ये। होईल सुखिया।।', 'हे शब्देवीण संवादीजे। इंद्रिया नेणता भोगिजे। बोलाआदी झोंबिजे। प्रमेयासी।।'*** आपला प्रवेश अंतरंगात व्हावा लागेल तरच देवाला धरणेचा अधिकार प्राप्त होईल. ज्यांचा अंतरंगात प्रवेश झालेला आहे, अशा संतांचे मार्गदर्शनाखालीच आपला अंतरंगात प्रवेश होऊ शकतो. संतांचे मार्गदर्शनाप्रमाणे साधनाभ्यासाने बहिर्मुख विषयात लिप्त असणारे मन विषयातून बाजूला होऊन अंतर्मुख होते. त्या अंतर्मुख सर्वसाक्षी पाहात्या मनाला अंतरातील नित्य नादश्रवण होते. ***('अंतरी बहुतची सावध व्हावे। विवेक शस्त्रे मन आवरावे। दिसेंदिस अभ्यासावे। साधन नेमाचे।।'- श्रीचिमडमहाराज, 'अंतरात नाद कसा घुमतसे पहा। नादमयी झाल्या शिव कळतसे आहा।।'- श्रीदासराममहाराज)*** ही मनाची अंतर्मुखता म्हणजेच प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे होणारा मनाचा प्रवास आहे. ही मनाची अंतर्मुखता म्हणजेच पूर्वेकडून जन्ममरण नाही अशा अपूर्व परमार्थाची पश्चिमेकडे होणारी वाटचाल आहे. ***('मजला पूर्वेहून काढीले। पश्चिमपंथे चालविले। एकवीस स्वर्गावरती नेले। मूळ तीर्थासी।।'- श्रीसंत ज्योतीपंत महाभागवत, 'अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाही जन्ममृत्यूची। आणि पदवी सायोज्यतेची। सन्निधचि लाभे।।'- श्रीसमर्थ)*** नादश्रवणी तदाकारता साधली असता हे चैतन्याचे वारे नयनात भरते. ***('वारे भरले या नयनात। नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात।।'- श्रीदासराममहाराज)*** सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन श्रीरंगाचा रंग अनुभवाला येतो. हा श्रीरंगाचा रंग अनुभवणे म्हणजे श्रीरंगाला अंतरंगी धरणे होय. हा श्रीरंगाचा रंग सर्व संतांनी लुटला. ***('रंग लुटीला बहुती। शुक नारदादी संती। तुका लुटिताहे रंग। साह्य झाला पांडुरंग।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मन, 'या रामरंगी' - श्रीरंगाचे रंगी रंगले असता देहभाव संपूर्ण नाहीसा होऊन संपूर्ण मनोलयाने तो संसाराहून वेगळा होतो, रामरूप होतो.

**

# विकल्प

जोवर जगाची जाणीव होत आहे, जोवर एक न दिसताना दुसरे दिसते आहे, तोवर संशय हा येणारच. दिसणारे जग हे भ्रामक आहे, अविश्वासाचे आहे. मग तेथे विश्वास कसा ठेवायचा? म्हणून जगात व्यवहार करताना खात्री करून घ्यावी लागते. सर्व संशय फेडून घ्यावे लागतात, तेव्हाच व्यवहार करता येतो. ***(‘जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला। जो आपणची कष्टत गेला। तोचि भला।।’- श्रीसमर्थ)*** जोवर विकल्प येतो आहे तोवर व्यवहाराचा शेवट झालेला नाही व परमार्थाची सुरुवात देखील झालेली नाही हे ओळखावे. ***(‘व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।’- श्रीतुकाराममहाराज)*** व्यवहार होतो तो दृश्य भ्रामक जगाबरोबर, तर परमार्थ होतो तो सत्य आत्म्याबरोबर (चैतन्याबरोबर). लटक्या जगाबरोबर होणारा व्यवहार हासुद्धा लटकाच व या लटक्या व्यवहाराला संसार म्हणतात. ***(‘लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सत्य आत्म्याबरोबर होणारा परमार्थ सत्यच. त्यामुळे परमार्थात खोटेकुडे, घातपात काही असूच शकत नाही. परमार्थात जर खोटे कुडे असेल, परमार्थात जर व्यवहार शिरला असेल तर तो साधकाला खड्ड्यात घातल्याशिवाय राहात नाही. ***(‘खोटे कुडे येथे नाही घातपात। तुका म्हणे चित्त शुद्ध करा।।’- श्रीतुकाराममहाराज)*** या दृश्य जगाचा तटका तुटल्याशिवाय हा अंत:करणातील विकल्प हालत नाही व हा विकल्प हालल्याशिवाय त्याचा (विश्वास या देवाचा) चटका लागत नाही. ***(‘जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका।।’- श्रीदासराममहाराज, ‘तोचि जाणावा विश्वासी। जेणे सोडिले विश्वासी।।’- श्रीमामामहाराज)*** याचाच अर्थ असा की जोवर विकल्प आहे तोवर जगाची जाणीव आहे. अर्थात आत्म्याची जाणीव - ज्ञान नाही, हे उघड आहे. ‘संशयाची निवृत्ती म्हणजे आत्मज्ञानाची प्राप्ती’ हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे चिंतनीय असेच आहे. हाच विचार संत जनाबाई असा सांगतात, ***‘संदेह अवघा फिटला। जनी म्हणे उदय झाला।।’.*** चैतन्याची जाणीव न होताना विपरीत ज्ञानाने जगाची जाणीव होऊन संशय - विकल्प निर्माण होणे, आत्म्याशी परवत् वागणूक होणे, हेच पर्वताप्रमाणे होणारे पातक आहे. यामुळेच सारा नाश होणारा आहे. ***(‘म्हणऊनि संशयाहोनी थोर। आणिक पातक नाही घोर। की जे विनाशाची वागूर। प्राणियासी।।’, ‘पर्वताप्रमाणे पातक करणे। वज्रलेप होणे अभक्तासी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘संशयात्मा विनश्यति’- भगवद्गीता, ‘एका विकल्पाचे बारे। जग बुडविले सारे। ऐसा विकल्प पातकी। आपआपणा घातकी।।’- श्रीमामामहाराज, ‘आमुचा विकल्प आमुचा विकल्प। आमुचा विकल्प आम्हा बाधी।।’- श्रीनामदेवमहाराज)*** हा संशय जाणार कसा हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***‘संसार उडाला संदेह फिटला। पूर्ण तोचि झाला तुका म्हणे।।’, ‘पांडुरंगे सत्य केला अनुग्रह। निरसिला संदेह अहंबुद्धी।।’.*** तर ऊर्ध्वगामी जीवनात प्राप्त होणाऱ्या नामाने संदेह नाहीसा होतो हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***‘तुझियेनी नामे सकळ संदेह फिटला। बापरखुमादेवीवरू विठ्ठलू जवळा।।’*** तर संत वेणाबाई हा संदेह निरसनाचा मार्ग असा सांगतात, ***‘आम्ही गुरुनाथपंथी। सोपानमार्गे गेलो एकांती।। झाले स्वामींचे दरूशन। माया संकेत निरसन।। अहंब्रह्म उपदेशिले। निर्विकल्पी रत केले।।’.*** जोवर आपण देहत्वे, मनत्वे राहतो तोवर अवस्थेप्रमाणे बदलणारे संशयित ज्ञान प्राप्त होते. तेच जर आपण देहातीत होऊन निजत्वे राहिलो तर न बदलणारे वृत्तीरहित, संशयरहित ज्ञान होते. ***(‘संशयरहित ज्ञान। तेचि साधूचे लक्षण। सिध्दा आंगी संशय हीन। लागेल कैसा।।’, ‘सिद्धस्वरूपी नाही देहो। तेथे कैचा हो संदेहो। याकारणे सिध्द पाहा हो। नि:संदेही।।’- श्रीसमर्थ)***

**

# निंदा

जो माणूस कल्पनेने किंवा मनात असणाऱ्या कल्पनेमुळे डोळ्याने, कानाने, नाकाने, जीभेने साकार विकारलेल्या भ्रामक जगाचा अनुभव घेतो, तो त्याचे अनुभवाप्रमाणे, जसे गुण दोष त्याला आढळले असतील त्याप्रमाणे त्या जगातील अनुभवलेल्या वस्तूंची निंदा अथवा स्तुती मनातल्या मनात का होईना करणारच. अगदी मोठ्याने करत नसेल फारतर, म्हणून प्रत्येक वस्तूची, माणसाची निंदास्तुती होणे हे अटळ. कितीही गुणवान माणूस असूदे, त्यात एखादा दोष असणारच. कितीही वाईट माणूस असूदे त्यात एखादा चांगला गुण असणारच. म्हणून संत महात्मा कितीही गुणवान असूदे त्याचेकडे असलेल्या दोषाची निंदा ही होणारच. असा संतनिंदा करणारा माणूस संतनिंदेमुळे काय काय भोगतो हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'संतनिंदा ज्याचे घरी। नव्हे घर ते यमपुरी।। त्याच्या पापा नाही जोडा। संगे जना होय पीडा।। संत निंदा आवडे ज्यासी। तो जिताची नर्कवासी।। तुका म्हणे नष्ट। जाणा गाढव तो स्पष्ट।।'***. आपल्या मनात संकल्प येतो, त्या संकल्पाला अनेक विकल्प (पर्याय) असतात. त्या प्रत्येक विकल्पात (पर्यायात) अनेक गुणदोष असतात. त्यातील गुणदोष पाहून कोणता विकल्प (पर्याय) स्वीकारावा याबद्दल मनात विकल्प (संशय) असतो. त्याचा कोणत्याच विकल्पावर (पर्यायावर) विश्वास बसत नाही. भ्रमित मनाला हित कशात आहे हेच कळत नाही. तेव्हा मन कोणताच विकल्प (पर्याय) स्वीकारत नाही. ते सर्वांचीच निंदा करू लागते. याहीपेक्षा वेगळा विकल्प शोधू लागते. ***('विश्वास तयाचा बैसेना कोठेही। निंदास्तुती पाही जीवी धरी।।' - संतवचन)*** जो माणूस कल्पनेने भासमान भूतजात अनुभवतो, त्याचे गुणदोष पाहतो व त्या वस्तूची निंदा करतो, तो सत्य आत्म्याच्या अनुभवाला मुकतो. तो माणूस त्या वस्तूचे पापाचा भागीदार होतो व अंती नरकाला जाणे चुकत नाही. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'जो ज्याचा गुणदोष पाहे। तो त्याचा पापविभागी होये। जो पुढीलांचे गुणदोष गाये। तो निरया जाणे तेणे दोषे।।'*** कल्पनेने भासमान होणाऱ्या वस्तूची अज्ञानाने होणारी निंदास्तुती ही त्या आत्म्याची निंदास्तुती ठरते. म्हणून कोणाची निंदास्तुती करू नये. ***('सर्व भुतांच्या ठायी। आत्माराम असे पाही। यालागी निंदास्तुती काही। प्राणांती पाही न करावी।।'- श्रीनाथमहाराज)*** मनामुळे होणारा हा विश्वाचा आभास व त्याचे भासमान होणारे गुणदोष मनोलयाने निर्विकल्प अवस्थेत जाणवत नाहीत व सत्य आत्मा प्रचितीला येतो. साहजिकच होणारी निंदास्तुती टळते. तो महात्मा पापपुण्यातीत होतो. निर्विकल्पी कल्पनातीत असणारे संत महात्मे कोणाचा गुणदोष पाहात नाहीत. अर्थात कोणाची निंदास्तुती करत नाहीत किंवा कोणी निंदा स्तुती केली तर ते त्याचे मिथ्यापण जाणतात व स्वत: अलिप्त - निर्लेप राहतात. ***('गुणदोष याती न विचारी काही। ठाव दिला पायी आपुलिया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जो निंदेते नेघे। स्तुती न श्लाघे। आकाशा न लगे। लेप जैसा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# त्याग

नित्य काय व अनित्य काय याची विवेकाने छाननी करून अनित्य गोष्टींचा वैराग्याने त्याग केला तर आपले स्वहित साधणारे आहे. अनित्य काय आहे हो? ज्याला जन्ममरण आहे असे विकारी, नाशिवंत सारे अनित्य आहे. त्या साऱ्या नाशिवंताचा त्याग झाला तर उरलेले नित्य अविनाशी काय जे आहे, त्या असंगाचा संग (भोग) घडणारा आहे. ***(‘निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य। यास बोलिजे नित्यानित्य। विचारणा।।’, ‘देह अनित्य आत्मा नित्य। हाची विवेक नित्यानित्य। अवघे सुक्ष्माचे कृत्य। जाणती ज्ञानी।।’, ‘नाशिवंत तितुकेची देसी। तरी पद प्राप्त निश्चयेसी। यामध्ये लालूच करिसी। तरी स्वहित न घडे।।’- श्रीसमर्थ)*** अनित्य देहबुद्धीचा त्याग घडला तर चैतन्याचा भोग घडतो. जनी निंद्य जे आहे ते सर्व सोडले तर जनी वंद्य जे आहे ते सर्वभावे करता येते किंवा जीवपणाचा वियोग झाला तर नवलस्वरूपाचा योग घडतो. वैराग्याने प्रपंचाचा त्याग घडला तर परमार्थाचा योग. Every debit has corresponding credit हा अकौंटन्सीचा नियमच आहे. परमेश्वर काही घेतल्याशिवाय काही देत नाही असा तो उदार आहे. आम्हाला सारे काही न देता फुकट हवे, हे कसे जमणार? ***(‘भोगी झाला त्याग संगीच असंग। तोडियेले लाग माग दोन्ही।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे।।’, ‘नवल स्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग।।’, ‘वैराग्ये करावा त्याग। तरीच परमार्थ योग।। प्रपंच त्यागे सर्व सांग। परमार्थ घडे।।’- श्रीसमर्थ, ‘घेसी तेव्हा देसी ऐसा अससी उदार।।’- श्रीनामदेवमहाराज, ‘तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त। गुजेवीण हित कोण सांगे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अनित्य गोष्टी या रूपांतर होणाऱ्या अस्थिर असल्याने त्याबद्दल विकल्प येतो. अनित्य गोष्टींमध्ये भरपूर विकल्प (पर्याय) असल्याने विकल्प (संशय) येतो. अर्थात निंदाही होतेच. म्हणून विकल्प निंदेचा त्याग म्हणजे अनित्य अस्थिर गोष्टींचा त्याग होय. अनित्य गोष्टींचा त्याग घडला तर नित्य निर्विकल्प सर्वव्यापक, नि:संग, ज्याला विकल्प (पर्याय) नाही अशा एकमेवाद्वितीय शाश्वत ब्रह्माचा संग घडतो. ***(‘ब्रह्म सर्वांसी व्यापक। ब्रह्म अनेकी येक। ब्रह्म शाश्वत हा विवेक। बोलिला शास्त्री।।’- श्रीसमर्थ)*** अनित्य देह म्हणजे ‘मी’ हा खोटा अहंकार गेला की त्या अनित्य देहाला चिकटलेल्या माझ्या साऱ्या गोष्टींचा त्याग होतो. सर्व त्यागून ‘स्व’ जात नाही पण ‘स्व’ टाकला की सर्वाचा त्याग होतो. ***(अहंकार त्यागी तोची जाणा त्यागी। येर सर्व ढोंगी जाणावे ते।।’- श्रीदासराममहाराज, ‘त्याग तरी ऐसा करा। अहंकारा दवडावे।।’- श्रीतुकाराममहाराज)*** काय टाकायचे व काय टाकायचे नाही हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***‘घरदार वोखटे त्यजू म्हणसी। तरी शरीराएवढे जाड रया।। मायबाप वोखटे त्यजू म्हणसी। तरी अहंकार अविद्येचे कोड।। बंधू सखे त्यजू म्हणसी। तरी काम क्रोध मद मत्सर अवघड।। बहिणी पाठीच्या त्यजू म्हणसी। आशा तृष्णा माया अवघड रया।। स्त्री वोखटी त्यजू म्हणसी। तरी कल्पनेयेवढी भोगती।। पुत्र अपत्य त्यजू म्हणसी। तरी इंद्रियासी नाही निवृत्ती।। सकळ गणगोत त्यजू म्हणसी। तरी हे अष्टधाप्रकृती।। अवघेच त्यजू पाहे म्हणसी। तरी मना नाही निजशांती रया।।’***

✻✻

# आशीर्वाद

साधूंनी आपणाला बोध केला खरा, पण तो आपणाला झाला का? हा मोठा प्रश्न आहे. बोध केला म्हणजे ज्या व्यक्तीला बोध केला, त्या व्यक्तीला योग्य बोध होतोच असे काही नाही. आम्ही व्यवहारातसुद्धा म्हणतो पहा की, आम्ही जे काही म्हणतो आहे त्याचा बोध त्यांना आत्ता झाला, म्हणजे काय झाले? आम्ही जे काही म्हणतो आहे ते त्यांना आत्ता अनुभवाला आले, हा त्याचा अर्थ. तसे साधूंनी जो काही बोध आम्हाला केला, तो आम्ही अनुभवला म्हणजे खरा बोध झाला. साधु जे आत्मबुद्धीने सांगतात ते आपल्या देहबुद्धीला कसे उमगणार? साधनाने सदा देहातीत अवस्थेत सत्‌चा संग - सत्संग घडला तर 'देह म्हणजे मी' ही देहबुद्धी जाऊन 'आत्मा म्हणजे मी' ही आत्मबुद्धी जागृत होईल व साधुबोध निश्चित होईल. ***('देहबुद्धी नेणो काही। दास अंकीत रामापायी।।', 'देहबुद्धीचा निश्चयो दृढ झाला। देहातीत ते हित सांडित गेला। देहेबुद्धी ते आत्मबुद्धी करावी। सदा संगती सज्जनाची धरावी।।'- श्रीसमर्थ)*** आम्ही चार देहाच्या जड ठोकळ्यावर उभे राहू तर चैतन्याचा प्रवाह आम्हास कसा जाणवणार? जाणीवेत देहाचे विस्मरण झाले तर चैतन्याची जाणीव होणार. हा देहभाव विरण्याकरता आपले गुरुंनी सांगितलेले साधन आपण साधले पाहिजे. ***('देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे। विठ्ठलू रे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे साधन किती दिवस करायचे? जोवर चित्तशुद्धी होऊन देहभाव जाऊन, देहबुद्धी जाऊन आत्मबुद्धीला तो आत्मबोध होत नाही तोवर हे साधन साधले पाहिजे. ***('जववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तवचि या साधना। भजावे लागे।।', 'तैसा आत्मसाक्षात्कारू। होईल देखोनि गोचरु। ऐसा साधनहतियेरु। हळूचि ठेवी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणजे आत्मसाक्षात्कार झाला की साधनाला सुट्टी असा त्याचा अर्थ का? नाही, असा त्याचा अर्थ नाही. आत्मसाक्षात्कार झाला, विष्णूदर्शन झाले की साधकाला नेमाच्या साधनाची गरज राहात नाही. त्याचे सहजच अष्टौप्रहर साधन होत राहते. ***('साधिलिया जीवा विष्णूचे दर्शन। अष्टौप्रहर साधन चालतसे।।'- श्रीमामामहाराज)*** साधनाभ्यासाने जेव्हा प्राणाला विश्रांती मिळते तेव्हा त्रिपुटीचा ग्रास होतो. बोधी, बोधिले, बोधिता हा त्रिपुटीतील वृत्तीसहित बोध नाहीसा होऊन वृत्तीरहीत बोध होतो. मी म्हणून कोणी उरतच नाही. हा मीपणाचा त्याग होणे हा गुरुंचा बोध आहे. ***('साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'माझा अहंभाव असे शरीरी। तथापि तो सद्‌गुरु अंगिकारी। नाही मनी अल्प विकार ज्याला। विसरू कसा मी गुरुपादुकाला।।'- श्रीनारायणमहाराज जालवणकर)*** साधनाभ्यासाने साधन मीपणेवीण होणे, देहभाव जाऊन संदेहरहित सिद्ध साधनाने संशयातीत ज्ञान होणे हा खरा गुरूंचा आशीर्वाद. ***('आणिक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोची धन्य। समाधानी।।', 'संदेहरहित साधन। तेचि सिद्धाचे लक्षण। अंतर्बाह्य समाधान। चळेना ऐसे।।', 'संशयरहित ज्ञान। तेचि साधूचे लक्षण। सिद्धाअंगी संशय हीन। लागेल कैसा।।'- श्रीसमर्थ)*** उपदेश सर्वच घेतात, पण जे उपदेशाप्रमाणे वागून अहंकाररहित होतात अशा सिद्धपदास पोचलेल्या साधूंना आशीर्वाद प्राप्त होतो. ***('उपदेश घेता सुख वाटे। मुख्य ते गळाली पाहिजे अहंता।।'- श्रीतुकाराममहाराज)*** **साधन करून ते अहंकाररहित होतात. पण त्याचे श्रेय ते सद्‌गुरुंनाच देतात. हे केवढे विशेष आहे.** ***('गर्व नसे दासापाशी। वर्म पुसे सद्‌गुरूसी।।'- श्रीमामामहाराज)***

**

# आशीर्वाद

हरीकीर्तनाकारणे, कीर्तनसुखार्थ अवतार असणाऱ्या श्रीमामामहाराजांना विषयसुखात अजिबात गोडी नव्हती. लहानपणापासून सतत पारमार्थिक विचार व आचार ही केवढी विशेष गोष्ट आहे. लहानपणापासून श्रीमामामहाराजांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे विशेष आकर्षण होते. 'महाराज ज्ञानेश्वर माऊली' हे भजन करताना ते रंगून जात. लग्नाचे वय झाल्यावर त्यांचे वडील श्री अंताजीपंत यांनी जेव्हा त्यांच्या लग्नाचा विषय काढला, तेव्हा त्यांनी वडिलांना आपले हातून परमार्थ व्हावा या हेतूने नम्रपणे या गोष्टीस नकार दिला. शेवटी वडिलांचा फारच आग्रह झाला तेव्हा ते वडिलांना म्हणाले की मी आळंदीला जातो व श्रीज्ञानेश्वरमहाराजांना लग्न करू का नको हे विचारतो. ते म्हणतील तसे आपण दोघांनी ऐकायचे. हे म्हणताना व ऐकताना श्रीमामांचे किंवा श्रीनानांचे (श्रीमामांचे वडील) मनात कोणताही विकल्प आला नाही याचे मला फार आश्चर्य वाटते. त्यांचे मनात असे आले नाही की समाधीस्थ ज्ञानेश्वरमहाराज कसे बोलतील? श्रीमामा आळंदीला गेले. तेथे त्यांनी समाधीसमोरील असणाऱ्या पारावर बसून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी मार्गदर्शन करावे या हेतूने श्रीज्ञानेश्वरीपारायण आरंभिले. श्रीमामांचा हा संकल्पविकल्परहित शुद्ध भाव पाहून श्रीज्ञानेश्वरमहाराज समाधीतून प्रत्यक्ष श्रीमामांसमोर प्रगट झाले. त्यांनी श्रीमामांना विचारले की बाळ, तुझी काय इच्छा आहे? तेव्हा श्रीमामांनी आपले मनोगत श्रीमहाराजांना सांगितले. तेव्हा श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणाले की बाळ, तू आईवडिलांच्या इच्छेप्रमाणे विवाह कर, तुला योग्य गुरूंची गाठ पडेल व तुझा प्रपंचात परमार्थ पुरा होईल. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे श्रीमामांचा विवाह पुढे यथावकाश थाटात संपन्न झाला. त्यांनी १९०६ मध्ये माघ व.२ यादिवशी भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे सांगणेवरून चिमडच्या भगवान सद्गुरू श्रीनारायणमहाराज यांचेकडून रामनामामध्ये पवन साधनेचा अभ्यास समजून घेतला. साधनाभ्यासाने प्रपंच साधून परमार्थाचा लाहो करून त्यांनी भलेपणा प्राप्त केला. साधनाभ्यास चालू असताना श्रीमामांना श्रीब्रह्मचैतन्यमहाराज व श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर, ज्यांना आपण दहावे नाथ म्हणतो अशा श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांचे मुखाने संचारावस्थेत प्रत्यक्ष हालसिद्धनाथ यांचे आशीर्वाद प्राप्त झाले व श्रीमामांचा परमार्थ अधिकच बहरू लागला. पुढे १९२० मध्ये औरवाडचे साधु श्रीवजीरबाबा यांच्या आशीर्वादप्रसादाने महान विष्णूभक्त श्रीराम अवतरले. श्रीमामांना श्रीरामाची प्राप्ती झाली. अंतर्बाह्य श्रीरामाची प्रचिती ते घेऊ लागले. देहाचे देव्हाऱ्यात जो एक राम आहे तोच हा बाहेर राम आहे असा श्रीमामांचा श्रीदादांचेबाबतीत अनुभव होता. श्रीदादांना वयाचे १४ वे दिवशी भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा कुरुंदवाड येथे सहजस्पर्शद्वारा अनुग्रह प्राप्त झाला. श्रीदादांचे अंतर्यामी साधन सत्क्रिया प्रगट झाली. तो १४ वे दिवशीचा अस्पर्शाचा स्पर्श त्यांना ७० व्या वर्षी देखील जाणवत होता, हे केवढे विशेष आहे. ते श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे आशीर्वादाने वयाच्या ५ व्या वर्षापासून कीर्तन करू लागले तेही ब्रह्म, माया या गूढ विषयावर. पुढे १९२४ मध्ये भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराजांनी पौष व.६ या दिवशी देह ठेवला. त्यानंतर २७ दिवसांनी माघ व.३ या दिवशी रात्री त्यांनी श्रीमामांचे श्रीदासबोध पारायणाचे वेळेला प्रत्यक्ष प्रगट होऊन श्रीमामांना अखंड कीर्तनाची आज्ञा दिली. श्रीमामांना कीर्तनानुग्रह प्राप्त झाला. साधुसंतांच्या आशीर्वादाने श्रीमामांचा अखंड अहर्निशी परमार्थ सुरू झाला. त्यांनी आपल्या गुरुंच्या आज्ञेप्रमाणे अखेरच्या श्वासापर्यंत श्रीरामस्मरण हे साधन - कीर्तन साधले. अखंड कीर्तनाने व साधनेने हरीभक्तीचा कळस झाले. सर्वत्र अद्वैत साधून ते गोविंद झाले. त्यांचा परमार्थ कळसाला गेला.

**

# गुर्वाज्ञा

ज्यांचा गुरुवचनावर पूर्ण विश्वास आहे, गुरूचे ज्ञान हे ज्यांना प्रमाण आहे, जे गुरूची आज्ञा प्राणासमान सांभाळतात, किंबहुना गुरूंची आज्ञा हाच ज्यांचा प्राण असतो, असे सच्छिष्य गुरूपदावर आरूढ होऊन देवच झालेले असतात. ***('मुख्य सच्छिष्याचे लक्षण। सद्गुरुवचनी विश्वास पूर्ण। अनन्यभावे शरण। या नाव सच्छिष्य।।'- श्रीसमर्थ, 'सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण। जोवरी हा प्राण जाय त्याचा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गुरुवचनी विश्वास। त्यास नाही नरकवास।। गुरुवचन अंतरी। मोक्ष फुका राबे घरी।। गुरुबोला विश्वास। सर्व साधन होय त्यास।। गुरुबोला नाही भाव। त्यासी अंतरला देव।। दास म्हणे सद्गुरूसत्ता। परब्रह्म आले हाता।।'- श्रीगोंदवलेकर महाराज, 'जयाचे वक्त्र। वाहे गुरुनामाचे मंत्र। गुरुवाक्यावाचुनी शास्त्र। हाती न शिवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देव होऊन देवाची सेवा सेवकबुद्धीनेच ते करतात. हे केवढे विशेष आहे. ***('ऐसे मीच होऊनि पांडवा। करिती माझी सेवा।। परी नवलावो तो सांगावा। असे आइक।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आमचे श्रीमामांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांची आज्ञा प्राणासमान मानून नित्य कीर्तन साधले. एवढी ३८ वर्षे एकही दिवस खंड न होता सेवा झाली. नित्य कीर्तनाने ते हरीरूप झाले पण सेवा कडेपर्यंत सेवक म्हणूनच केली, हे केवढे विशेष. ते कधी महाराज झालेच नाहीत. ***('हनुमंत आदेश प्राणासमान। गोविंद नेमे करी नामकीर्तन। सेवा घडे सेवकबुद्धीनेही। पदांबुजी बालक राम राही।।'- श्रीदासराममहाराज)*** म्हणून जशी आज्ञा गुरू करतात तसे तिचे पालन कडेपर्यंत होणे अत्यंत महत्त्वाचे. ***('गुरु आज्ञा करिती जैसी। आचरणी ठेवी तैसी।।'- श्रीमामामहाराज केळकर)*** हे आज्ञापालन जर झाले नाही तर सारा जन्म हरीप्राप्तीवीण जाणार अर्थात नरकवास काही चुकणार नाही. ***('गुरुंची अवज्ञा जो का शिष्य करी। पडे तो अघोरी कुंभपाकी।।'- संत श्रीवामनकाका कोटणीस, 'किती सांगो तरी नाईकती बटकीचे। पुढे शिंदडीचे रडतील।।', 'मागे पुढे रडाल कराल आरोळी। मग कदा काळी तुका नये।।'- श्रीतुकाराममहाराज, 'हरीवीण जन्म नर्कची पै जाणा। यमाचा पाहुणा प्राणी होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** विठ्ठलपंतांना त्यांचे गुरू श्रीरामानंदयती यांनी संन्यासाश्रमातून परत गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा दिली. त्यावेळी जुना काळ असल्याने संन्यासाश्रमातून परत गृहस्थाश्रम स्वीकारल्याने किती त्रास समाजाकडून होणार आहे याची पूर्ण कल्पना श्रीविठ्ठलपंतांना होती. आत्ताचा काळ असता तर हा त्रासाचा प्रश्नच आला नसता. आत्ता माणसे संन्यास घेतात परत संधी साधून गृहस्थाश्रम स्वीकारतात, परत लाथा बसल्या की संन्यास घेतात. कोणी कोणाला विचारत नाही. हा जुना काळ असल्याने विठ्ठलपंतांना हा त्रास सोसावा लागणार होता. तरीपण कोणताही विकल्प मनामध्ये न आणताना गुर्वाज्ञेची निंदा न करता एक गुरुआज्ञा प्रमाण मानून त्यांनी परत गृहस्थाश्रम स्वीकारला. लोकांनी या दोघांना वाळीत टाकले. पण निर्विकल्प निवृत्ती अवस्थेत त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला असल्याने त्यांनी याही परिस्थितीवर गुरुकृपेने मात केली. ***('शोके दुखवावी वृत्ती। तरी ते जाहले निवृत्ती। म्हणोनि साधु आदीअंती। शोकरहित।।', 'जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरी। साधुजन वर्तती।।'- श्रीसमर्थ)***

**

# मोक्षरेखा भाग्ये ज्ञानेश शोभले

विकल्प व निंदा यांचा त्याग करून श्रीरामनंदयतींचा आशीर्वाद प्राप्त झालेल्या विठ्ठलपंतांनी गुरुआज्ञेप्रमाणे गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला पण गुरुकृपेने प्राप्त झालेली निर्विकल्प अवस्था - संन्यस्त वृत्ती - ती कशी बदलणार? या मन अंतरी निश्चळ असणाऱ्या अवस्थेत ईश्वरी इच्छेने श्रीनिवृत्तीनाथ, श्रीज्ञानदेव, श्रीसोपानदेव आणि मुक्ताबाई यांचा अवतार झाला. गुर्वाज्ञा पालनातून साक्षात देवच साकारले. संत जनाबाई या चारी भावंडांचे वर्णन असे करतात, ***'सदाशिवाचा अवतार। स्वामी निवृत्ती दातार।। महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर।। ब्रह्मा सोपान तो झाला। भक्ता आनंद वरुषला।। आदीशक्ती मुक्ताबाई। दासी जनी लागे पायी।।'*** तर श्रीमामामहाराज या चारी भावंडांचे वर्णन असे करतात, ***'उरली नाही वृत्ती। म्हणून बोलती निवृत्ती।। मूर्तिमंत ज्ञान। ज्ञानराजा भगवान।। भक्तीमार्गीचा सोपान। म्हणून नाव त्या सोपान।। मुक्तस्थिती मुक्ताबाई। दास म्हणे नामी पाही।।'.*** परमेश्वराचे अवतार खरे, पण विठ्ठलपंतांचेबरोबर या चौघांचा पण समाजाने अनन्वित छळ केला. जगताचे मायबाप पण या सर्वांची 'वाऱ्यावर वरात भुसावर चिठ्ठी' अशीच अवस्था झाली. अशा या विपरीत परिस्थितीत परमेश्वराची कृपा झाली. श्रीनिवृत्तीनाथांना श्रीगहिनीनाथांचा अनुग्रह प्राप्त झाला. अनुग्रह प्राप्त झाल्याने सत्यज्ञानाने त्यांचे वागणे, बोलणे पालटले, त्यांचा चेहरामोहराच पार पालटून गेला. हे श्रीविठ्ठलपंतांनी, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ओळखले. निवृत्तीनाथ जाणते झाले आहेत हे ओळखून समाजाकडून संत्रस्त झालेल्या विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांनी नाईलाजाने जगणे अशक्य झाल्याने आपली तिन्ही लहान मुले जाणत्या श्रीनिवृत्तीनाथांचे स्वाधीन केली व घट्ट मनाने मध्यरात्री काशीक्षेत्री आपले देह गंगार्पण केले. ब्रह्मवृंदानी दिलेली देहांताची शिक्षा अंमलात आणली. पुढे श्रीनिवृत्तीनाथमहाराजांनी श्रीगहिनीनाथमहाराजांकडून त्यांना प्राप्त झालेला कृपाप्रसाद श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे विनंतीवरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांना दिला व श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीसोपानदेव व मुक्ताबाई यांना हा कृपाप्रसाद दिला. कृपाप्रसादाने चित्ताला अखंडित प्रसन्नता प्राप्त झालेल्या या चौघांनी विरोधी परिस्थितीवर शांतीसमाधानाने सहजगत्या मात केली. कैवल्याचा पुतळा, चैतन्याचा जिव्हाळा, शांतीसूर्य, मोक्षमार्गाचे सांगाती अशा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कडून रेड्यामुखे वेद बोलविणे, जड भिंत चालविणे असे चमत्कार सहज घडले. साहजिकच श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे महत्त्व जाणत्यांना उमगू लागले. काहींनी त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. शिष्यांना, समाजाला सत्य काय आहे याचा बोध व्हावा म्हणून श्रीज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरीपाठ, अभंगगाथा असे तत्वज्ञानदर्शी ग्रंथ तर श्रीज्ञानदेव तेहतीशी, मुद्राप्रकाश यासारखे योगमार्गाला अनुसरणारे ग्रंथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी लिहिले. समाजाने विनाकारण श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे कुटुंबाला छळले, पण या झालेल्या त्रासाचा एवढ्या विपुल लेखनात कुठेही उल्लेख नाही हे केवढे विशेष आहे. उलट सगळ्यांकरता विश्वात्मक देवाकडे पसायदान मागितले. ते देवाकडे मागतात, ***'जो जे वांछील तो ते लाहो। प्राणीजात।'*** उगीच का त्यांना 'ज्ञानेश्वर माऊली' म्हणतात!

**

# समाधीसी आले स्वये देव

संपूर्ण आत्मज्ञानाने, ज्ञानाचा सागर, ज्ञानियांचे राजे, ज्ञानरूप ज्ञानेश्वरमहाराज झाले. आत्म्याशी परिपूर्ण योगाने योगीराज योग्यांची माऊली श्रीज्ञानेश्वरमहाराज झाले. श्रीज्ञानेश्वरमहाराज भगवंताचा आत्मा, आत्मरूप झाले. समस्त विश्व वासुदेवरूप असल्याची प्रतीती श्रेष्ठ भावाने घेऊन श्रीज्ञानेश्वरमहाराज भक्तश्रेष्ठ ज्ञानी ठरले. ***('ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर।।'- संत जनाबाई, 'ज्ञानियांचा राजा गुरू महाराव। म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'मूर्तीमंत ज्ञान। ज्ञानराजा भगवान।।'- श्रीमामामहाराज, 'ज्ञानराज माझी योग्यांची माऊली। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।'- श्रीनामदेवमहाराज, 'हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो। म्हणोनी भक्तामाजी रावो। आणि ज्ञानिया तोची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** एवढे लोकोत्तर महान कार्य झाल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी संजीवन समाधी घेण्याचे ठरवले. यावेळी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वय अवघे २० वर्षाचे होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज आपले ज्येष्ठ बंधू व सद्‌गुरू श्रीनिवृत्तीनाथमहाराज यांना हात जोडून म्हणाले की, ''दादा तुम्ही आमचे प्रतिकूल परिस्थितीतही आजवर पालनपोषण केले. आपल्या कृपाशिर्वादाने हा दुर्गम भवसागर पार झालो. आता मला संजीवन समाधी घ्यावीशी वाटते आहे. आपण मला आज्ञा द्यावी.'' ***('जोडोनिया कर उभा ज्ञानेश्वर। बोलतो उत्तर स्वामीसंगे।। पाळिले पोशिले चालविला लळा। बा माझ्या कृपाळा निवृत्तीराजा।। स्वामीचिया योगे जालो स्वरूपाकार। उतरलो पार मायानदी।।'- श्रीनामदेवमहाराज)*** हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे बोलणे ऐकून निर्गुणी अनन्य असणारे श्रीनिवृत्तीनाथमहाराज देखील गहिवरले. त्यांनी त्यांचे मुखावरून, अंगावरून प्रेमाने हात फिरवला व म्हणाले, तुम्ही माझ्यापेक्षा लहान आहात, तुम्ही माझे आधी समाधी घेणार का? ***('ज्येष्ठाचिया आधी कनिष्ठाने जाणे। केले नारायणे विपरीत।। निवृत्तीने हात उतरिला वदन। त्यागिला निधान आम्हालागी।।'- श्रीनामदेवमहाराज)*** भगवंत इच्छा म्हणून नाईलाजाने श्रीनिवृत्तीनाथमहाराजांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे मानले. स्वत: भगवान या भक्ताचे समाधीसोहळ्यासाठी उपस्थित होते. त्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे संजीवन समाधीचा अपूर्व असा तीन दिवस सोहळा केला. तेहतीस कोटी देव अठ्ठ्याऐंशी सहस्र ऋषीश्वर आणि त्या काळातील सर्व जातीजमातीतील साधुसंत या समाधीसोहळ्यासाठी उपस्थित होते. या सोहळ्यात खरे पाहिले तर श्रीनामदेवमहाराजांची कीर्तने होणार, पण श्रीनामदेवमहाराजांना दु:ख अनावर झालेले असल्याने त्यावेळी संत कान्होपाठकांची तीन दिवस कीर्तने झाली. त्यात प्रामुख्याने श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अधिकार स्पष्ट करण्यात आला. 'महाराज ज्ञानेश्वर माऊली' असा एकच गजर जमलेला जनसमुदाय वारंवार प्रेमाने करीत होता. सारे वातावरण ज्ञानेश्वरमय झालेले होते. भगवद्‌रूप श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी कार्तिक वद्य ११ या दिवशी भगवद् इच्छेने भगवंतांची स्तुती केली. ते भगवंतांचे ओवीबद्ध वर्णन श्रीनामदेवमहाराजांनी जसेच्या तसे आपल्या अभंगात उध्दृत केले आहे. ते 'ज्ञानदेवकृत नमनस्तोत्र' आजही श्रीनामदेवमहाराजांच्या गाथेत पहावयास मिळते. त्या नमनस्तोत्रावर श्रीदासराममहाराजांची टीका उपलब्ध आहे. ती तितकीच महत्त्वाची आहे. शेवटी कार्तिक व.१३ या दिवशी माध्यान्हेला श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा समाधिस्थ होण्याचा समय जवळ आला. या समाधी सोहळ्याचे वर्णन उद्याचे कीर्तनात पाहू.

✻✻

# समाधीसी आले स्वये देव

जशी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची समाधिस्थ होण्याची वेळ जवळ येऊ लागली तसा जमलेला सर्व जनसमुदाय 'ज्ञानाई ज्ञानाई' असा प्रेमाने विव्हळ अंत:करणाने जयघोष करू लागला. स्वत: भगवान श्रीज्ञानेश्वरमहाराज समाधिस्थ होणार या कल्पनेने ढसाढसा रडत होते. निवृत्तीनाथमहाराज, सोपानदेव, मुक्ताबाई, श्रीनामदेवमहाराज स्वत: भगवान एकमेकांना आलिंगन देऊन आपला अंत:करणातील भाव व्यक्त करत होते. श्रीनामदेवमहाराज सांगतात, ***'नामा म्हणे दु:ख देखवेना मज। ब्रह्मी ज्ञानराज मेळविला।।'.*** शेवटी भगवंतांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांना स्वत: हाताला धरून ठरविलेल्या समाधीस्थानी बसविले. रुक्मिणी आदीकरून भगवंताच्या राण्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांना मोठ्या आदराने, प्रेमाने ओवाळले, देवादिकांनी स्वर्गातून श्रीज्ञानेश्वरमहाराजांवर पुष्पवृष्टी केली. जे आळंदीला येऊन समाधिस्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांना नयनी पाहतील त्यांना चारी मुक्ती प्राप्त होतील असा आशीर्वाद भगवंतांनी श्रीमाऊलींना दिला. श्रीज्ञानेश्वरमहाराज संजीवन समाधीस्थ झाले. श्रीमामामहाराज या समाधी सोहळ्याचे वर्णन असे करतात, ***'आले भगवान आले संतजन। नवल महिमान ज्ञानेशाचे।। ज्ञानाई ज्ञानाई बोलताती सर्व। निमालासे गर्व सुरवरांचा।। विठ्ठल निवृत्ती मुक्ताई सोपान। नामा संतजन आलिंगिती।। देव बैसविती ज्ञाना धरूनी हाती। ओवाळिती आरती रुक्मिण्यादी।। सुरवर येती विमानांची दाटी। करिती पुष्पवृष्टी ज्ञानेशासी।। कार्तिक वद्य त्रयोदशी माध्यान्हेसी। समाधी शेजेसी स्थिर झाले।। ज्ञानदेवालागी देवे दिला वर। दर्शने साचार मुक्ती तुझ्या।। प्रेमपुरामाजी बुडाले सर्वही। तेथे दास पाही कैचा उरे।।'.*** समाधी सोहळ्याचे हे श्रीमामांनी केलेले हृद्य वर्णन वाचून श्रीमामा त्यावेळी या सोहळ्याला निश्चित उपस्थित होते असे वाटल्यावाचून राहात नाही, असे श्रीदासराममहाराज सांगत. श्रीक्षेत्र आळंदी येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांची संजीवन समाधी आहे. याचा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराज आजही आळंदीत समाधीस्थानी आहेत. संतमाहात्म्यांना हा अनुभव आजही येतो. काही वर्षांपूर्वी एक टूम निघाली होती की समाधी बोअर करून आतील श्रीज्ञानेश्वरमहाराज आहेत तरी कसे हे पाहायचे. चैतन्याचा जिव्हाळा श्रीज्ञानेश्वरमहाराज या स्थूल दृष्टीला कसे दिसणार? श्रीदासराममहाराज त्यावेळी कीर्तनात सांगत, 'बोअर (boar) करून श्रीज्ञानेश्वरमहाराज दिसतील का? अहो कसे दिसतील? बोअर (boar) करून फक्त बोअर (bore) होईल.' संजीवन समाधी म्हणजे नेमके काय? हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तीदेवी ज्ञान। समाधी संजीवन हरीपाठ।।'*** श्रीज्ञानेश्वरमहाराजांना आम्ही समजतो ते ज्ञेय ज्ञाता ज्ञान या त्रिपुटीतील वृत्तीसहीत ज्ञान प्रमाण नव्हते तर श्रीज्ञानेश्वरमहाराजांना निवृत्ती अवस्थेतील समाधान देणारे वृत्तीरहित ज्ञान हे प्रमाण होते. हे वृत्तीरहित ज्ञान म्हणजेच समाधी अवस्थेत संजीवनाचा अनुभव आणि समाधी अवस्थेतील संजीवनाचा अनुभव म्हणजेच तो नित्य सत्य मित हरीपाठ आहे असे मला वाटते. आळंदीत समाधी मंदिरात आजसुद्धा हरीपाठ घुमतो आहे. आमच्या श्रीचिमडच्या महाराजांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे समाधीतून हरीपाठ ऐकावयास आला. ही संजीवन समाधी म्हणजे नेमके काय याचा खुलासा श्रीदासराममहाराज असा करतात, ***'समजीवन हे असे संजीवन। देहासी सुटून राही या। संजीवन स्थिती समाधीसे गेले। समाधी राहिले संजीवन।।'.*** देहाला धरून राहिलो की श्वासोच्छ्वास हे जन्ममरण, देहाला सुटलो की जन्ममरण नाहीसे होऊन या मधील संजीवन, हे यातील वर्म असावे असे मला वाटते.

**

# सुखा काय उणे

आपणास जर निवृत्तीअवस्थेत स्मरण घडले तर संसाराची शांती होऊन अलंकापुरी सर्वसुखाची लहरी श्रीज्ञानेश्वरमहाराज, संजीवनी अनुभवाला आल्यावाचून राहणार नाहीत. ***(‘स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।’, ‘सर्व सुखाची लहरी। ज्ञानाबाई अलंकापुरी।। शीवपीठ हे जुनाट। ज्ञानाबाई तेथे मुगुट।। वेदशास्त्र देती ग्वाही। म्हणती ज्ञानाबाई आई।। ज्ञानाबाईचे चरणी। शरण एका जनार्दनी।।’ - श्रीनाथमहाराज, ‘तुका म्हणे मग नये वृत्तीवरी। सुखाचे शेजारी पहुडेन।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।’, ‘अनिर्वाच्य ते निवृत्ती। तेचि उन्मनीची स्थिती। निरोपाधी विश्रांती। योगियांची।।’- श्रीसमर्थ)*** अलंकापुरी सर्वसुखाची प्राप्ती होणे म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन आहे. एका विठ्ठल चिंतनाने आपण जर ‘काय नोहे’ केले (शरीरभाव नाहीसा झाला, इंद्रिये विषय विसरली) तर अंगी असणारे चैतन्यबीज पाहता येणार आहे. हे आत चैतन्यबीज आहे तोवर हा देहाचा रेडा बोलू शकतो, देहाची जड भिंत चालते. हे चैतन्य अनुभवाला आले तर मुक्ती ठरलेली आहे. हे चैतन्य अनुभवाला आले तर चैतन्याला चिकटलेले विठोबाचे पाय आठवणारे वैष्णव सोयरे होणार आहेत. देहभाव उणा झाला तर सर्वसुखाची प्राप्ती होऊन चित्ताला अखंड समाधान प्राप्त होणारे आहे. हे सर्वांतरस्थ असणारे सुखरूप चैतन्य म्हणजे योगीया श्रीज्ञानेश्वरमहाराज आहेत. श्रीतुकाराममहाराज श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वर्णन असे करतात, ***‘जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ। अंगी ऐसे बळ रेडा बोले।। करील ते काय नोहे महाराज। परी पाहे बीज शुद्ध अंगी।। जयाने घातली मुक्तीची गवादी। मेळविली मांदी वैष्णवांची।। तुका म्हणे तेथे सुखा काय उणे। राहे समाधाने चित्ताचिया।।’.*** श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात श्रीज्ञानेश्वरमहाराज कसे होते हे असे सांगता येईल, ***‘अगा योगी जो म्हणिजे। तो देवांचा देव जाणिजे। आणि सुखसर्वस्व माझे। चैतन्य तो।।’.*** जोवर देह म्हणजे मी हा देहभाव घट्ट आहे तोवर जन्ममरण हा संसार सुटत नाही व संसारातील दुःखही सुटत नाही. संसारात विश्रांती कधीही प्राप्त होत नाही. रात्रंदिवस सुखाकरता तो तळमळतो पण सुख भेटत नाही. ***(‘देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।’, ‘देहची होऊनी राहिजे। तेणे देहदुःख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।’- श्रीसमर्थ, ‘संसार दुःखमूळ। चहूकडे इंगळ। विश्रांती नाही कोठे। रात्रंदिवस तळमळ।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून देहाचा विसर होऊन चैतन्याची जाणीव होणे महत्त्वाचे. नुसताच देहाचा विसर होऊन चालणार नाही. तो रोज झोपेत आम्हाला होतोच की. पण सर्वसुखाची प्राप्ती होत नाही. चैतन्याच्या - श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या जाणीवेत खरे सुख आहे. ती होत नाही तोवर सारा शीणच आहे. याकरता देहभाव विरणारे साधन बरवा विचार करून आळस निद्रेचा त्याग करून जर साधले तर सर्वसुखाची - श्रीज्ञानेश्वरमहाराजांची प्राप्ती निश्चित होणारी आहे. आपण स्वयमेव सुखरूप होणार आहोत. म्हणून आळंदीला जाऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे, सद्गुरूंचे दर्शन घेणे महत्त्वाचे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***‘चला आळंदीला जाऊ। ज्ञानेश्वर डोळा पाहू।। डोळे निवतील कान। मना होय समाधान।। संता महंता होतील भेटी। सांगु सुखाचिया गोष्टी।। जन्म नाहीरे आणिक। तुका म्हणे माझी भाक।।’***

**

## मार्गशीर्ष शुद्ध

***शीर्षमार्गे जाता देवाची दिवाळी। दशेंद्रियऐक्यमेळी अखंडीत॥१॥***
***ब्रह्मगिरीस्थानी सहज समाधी। खंडेराय वेधी निजयोगी॥२॥***
***आत्मस्वरूपाची गीता उमगता। भेटी कूळ हनुमंता अनायासे॥३॥***
***तपाचे नि तपे गुरुदत्त भेटी। रामनाम लूटी दास म्हणे॥४॥***

१) शीर्षाकडे जाणाऱ्या उर्ध्वपंथाने गेलो असता दशइंद्रियांचा एकमेळ होऊन एका चैतन्याच्या अखंड ज्ञानाने सदा देवाची दिवाळी साधते.

२) ब्रह्मगिरीस्थानी साक्षात्काराने सहज समाधी प्राप्त होते. वेधाने तो खंडेरायरूप निजयोगी होतो.

३) आत्मस्वरूपाची गीता जर उमगली तर संसारमोहातून बाजूला होऊन अनायासे हनुमंताची भेट होते.

४) तपाच्या तपाने प्रकाशरूप सुंदर दत्तगुरूंचे दर्शनाने उन्मनी अवस्थेत रामनामाची खूण प्राप्त होते.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने मार्गशीर्ष महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## मार्गशीर्ष वद्य

***रामनाम एकांती एकवीध साधी। प्रपंच उपाधी भक्ता नाही॥१॥***
***स्थिरभाग्ये भला निर्भयत्व माला। आधार त्यासी झाला बरवा देव॥२॥***
***अनुभव खुणे देवाचे दर्शन। चित्त समाधान पवित्राचे॥३॥***
***दास म्हणे नाम विचार तू करी। आणिकाची परी नाही तेथे॥४॥***

१) सहजकृती हे रामनाम एकांतात एकवीधतेने साधले तर त्रिविध अवस्था प्राप्त होणे हा प्रपंचाच्या उपाधीचा पडदा नाहीसा होऊन साक्षात्काराने तो निजस्मरणी भक्त होतो.

२) हरीनामाची माला घेऊन अद्वैत आत्मस्वरूपाकडे वृत्ती वेधली की द्वैतभय नाहीसे होऊन तो टिकणाऱ्या स्थिर भाग्याने भलेपणा प्राप्त करतो, त्याला बरव्या देवाचा आधार प्राप्त होतो.

३) थोर पुण्यप्राप्तीने झालेले पवित्र, देवाच्या दर्शनाने - अनुभवाने - समाधान प्राप्त करतात.

४) अशा पवित्रांचे ठिकाणी पावन नामाचाच विचार व आचार असतो.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने मार्गशीर्ष महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# देव दिवाळी

आज मार्गशीर्ष शु.प्रतिपदा - मार्गशीर्ष महिन्याची सुरुवात. मार्गशीर्ष हा महिना अत्यंत पवित्र अर्थात महत्त्वाचा आहे. विभूतीयोगात मार्गशीर्ष हे माझे रूप आहे असे भगवान सांगतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'मासां आत मार्गशीरू। तो म्हणे शारंगधरू। ऋतुमाजी कुसुमाकरु। वसंतु तो मी।।'.*** मार्गशीर्ष या शब्दाचा अर्थ शीर्षाकडे जाणारा मार्ग असे आमचे श्रीमामामहाराज सांगतात. ते म्हणतात, ***'मार्ग शीर्षाचा चोखाळी। दासा देव सहस्रदळी।।'*** हा मार्ग चोखाळल्याने प्रकाशरूप सुंदर दिगंबर पुराणपुरुषाची भेट झाल्याने मुनीजनांचे मनाला हर्ष प्राप्त होतो. ***('मुनीजनमानस हर्षं। माया गुण आकर्षं। शोधन मार्गशीर्षं। तव पुराणपुरुषं।।', 'पुराणपुरुष तू खरा। तुम्हाविणे न दुसरा। नमो नमो दिगंबरा। प्रकाशरूप सुंदरा।।'- श्रीचिमडमहाराज)*** जुन्या काळी या दिवशीच वर्षारंभ होत असे. कोकणस्थ लोक या दिवशी 'देव दिवाळी' साजरी करतात. या दिवशी आमच्या कोकणातील देवांना - कुलदेवांना नैवेद्य दाखविला जातो. नैवेद्याला ठराविक तेथे पिकणाऱ्या तांदळापासून केलेले रस वडे हेच पक्वान्न केले जाते. कोकणातून देशावर येऊन एवढ्या पिढ्या झाल्या पण आपल्या कोकणातील कुलदेवांना ते विसरले नाहीत. आम्हा केळकरांचे रत्नागिरीजवळील सोमेश्वर गावचे श्रीसोमेश्वर व आचऱ्याचे श्रीरामेश्वर हे कुलदेव असून मालगुंड परिसरातील ढोकमळे येथील बांदेश्वरी ही आमची कुलदेवी आहे. आमचे घरी प्रतिवर्षी 'देव दिवाळी' व श्रावणातील एका सोमवारी हे नैवेद्य अत्यंत भक्तीभावाने देवाचे पावित्र्य सांभाळून दाखविले जातात व नैवेद्यप्रसाद भक्तीभावाने ग्रहण केला जातो. सायंकाळी कीर्तनोत्तर रथोत्सवही साजरा केला जातो. आमचे श्रीमामा (माझे आजोबा) प्रतिदिनी जेवण झाल्यावर बाहेर मंदिरात श्रीदेवरामेश्वरांसमोर बसत व मोठ्या प्रेमाने म्हणत, 'श्रीरामेश्वरप्रभु भगवन् कृपा करा. तुम्ही तिथे आहात व आम्ही इथे आहोत पण तुमच्या कृपेने आम्ही सुखरूप आहोत.' देह ठेवण्यापूर्वी काही दिवस आधी त्यांनी श्रीदादांना सांगितले, ''रामजी, आधी तुझ्यावर प्रसंग येणार नाही, समजा आलाच तर तू श्रीरामेश्वरांचे स्मरण कर, ते तुला त्यातून परपार करतील.'' आजही हे केळकर कुटुंबीय श्रीदेवरामेश्वरांचे कृपेने सुखरूप आहेत. आमचा संप्रदाय हा देखिल श्रीदेवसोमेश्वरांपासून सुरू झाला आहे. त्यामुळे आमचे देवाशी असणारे नाते अधिक दृढ झाले. ('सोमेश्वर पिंडीपासूनी जगी प्रथम रेवणसिद्ध जन्मुनी'- श्रीगोपालनाथ) आमच्या कुलदेवाचे वर्णन श्रीगुरुलिंगगीता असे करते, ***'सर्वात्मक नीनू प्रणवस्वरूप नीनू जगदोळ्ळू इंथा। प्रल्हादेयू दया माडिदी गवियू हृदयस्था। आरती माडतेनू रामेश्वर श्रीसोमेश्वरनाथा। रेवण मरूळ श्रीकाडसिद्ध गुरुलिंगा भगवंता।।'.*** तारक स्वरूपाने अनुभवाला येणारे श्रीरामेश्वरसोमेश्वर हेच आमचे तारक आहेत. श्रीदासराममहाराज आमच्या कुलदेवांचे वर्णन असे करतात, ***'रामेश्वर सोमेश्वर ब्रह्म स्वये अससी। आदीशक्ती तूचि जगरूपे नटसी।। तूची मायबाप माहेर जीवासी। कुळस्वामी तू आमुचा तारक आम्हासी।। जयदेव जयदेव जय रामेश्वरा। आरती ओवाळू गौरीशंकरा।। आचरे ग्रामी तुमचा अवतार झाला। राम ईश्वर ऐक्यरूपे प्रगटला।। जडमूढभक्ता भक्तीमार्ग दावियला। गोविंदसुत राम वंदी चरणाला।।'***

**

# शीर्षमार्गे जाता

शीर्षमार्गे गेलो तर देवाची दिवाळी साधते नाहीतर 'देवाची दिवाळी' या नावावर माणसाचीच मर्यादित दिवाळी साधते. शीर्षमार्गे गेलो तर देवाची किंवा देवरूप झालेल्या संतांची अखंड असणारी दिवाळी साधते. ती आपणास साधत नसल्याने आपण प्रातिनिधिक तीही एक दिवसाचीच दिवाळी साजरी करतो. माणसाची चार दिवसाची घळघळीत, देवाची मात्र एक दिवसाचीच. त्यात मात्र काटकसर. माणसाच्या दिवाळीतही आम्ही निरनिराळे पदार्थ करतो व देवाला नैवेद्य दाखवतो व नंतर ते आपण ग्रहण करतो. देवाच्या दिवाळीतही आम्ही तेच करतो, मग देवाच्या दिवाळीत वेगळेपण ते काय? रसवडे करणे, देवाला नैवेद्य दाखविणे म्हणजे देवाची दिवाळी साधली का? कुळीची कुळदेवी ठावी करून घेणे, सहस्रदळी ज्योतीचा - प्रकाशाचा अनुभव घेणे, आपल्या कुलदेवतेचा साक्षात्कार होणे व नैवेद्यप्रसादाने चित्ताला अखंड प्रसन्नता लाभणे म्हणजे खरी देव दिवाळी. आनंदरूप सुखरूप असा आत्मा अनुभवाला येणे, देवरूप झालेले संत महात्मे आपल्या घरी येणे किंवा आपण त्यांच्या घरी जाणे ही खरी 'देव दिवाळी'. सर्वात्मक प्रणवस्वरूप, सर्व विश्व ज्यातून निर्माण झालेले आहे असे विश्वादी, सर्व विश्वात भरून राहिलेले विश्वात्मक केवळ आनंदाचे चैतन्य राम ईश्वर ऐक्यरूपाने आचरे ग्रामी प्रगटले तो आमचा कुलदेव 'रामेश्वर' आहे. त्या चैतन्याचा हृदयांतरी नादप्रकाशाच्या रूपाने अनुभव येणे म्हणजे खरी देव दिवाळी. ***('सहस्रदळी पाहणे ज्योत। देव दिवाळीची मात।।', 'दीपावली दीपज्योती नयनी देखिली। सद्‌गुरुच्या पूर्णकृपे हृदयी प्रगटली।। अनंत दीप झगझगाट होय अंबरी। पाताळी त्याच परी हृदयमंदिरी।। तेलवाती पात्रावीण तेज कुसरी। चंद्रसूर्य विद्युताग्नी न पवे सरी।। स्वयंप्रकाश झगझगाट होय अंबरी। पाहुनिया समाधान दास अंतरी।।'- श्रीमामामहाराज)*** ही सहस्रदळी असणारी ज्योत अनुभवण्यासाठी शीर्षाकडे जाणारा मार्ग - शीर्षमार्ग चोखाळावा लागतो. झोप लागताना मन ज्या मार्गाने झुकांडी देऊन जाते, त्या मार्गाने देवाची प्राप्ती होणारी आहे. या मार्गाला 'मनोमार्ग' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज हरीपाठात संबोधतात तर श्रीमामामहाराज 'शीर्षमार्ग' असे अमृतवाणीत संबोधतात. संतसंगतीतच हा मार्ग अनुभवता येतो. ***('संतांचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे पंथे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाचे अभ्यासाने जाणीवेत बाह्यमनाचा लय साधला असता पुढे जीवनाची गती सूक्ष्मतर सूक्ष्मतम होऊन इडा पिंगला या सूर्यचंद्रात्मक नाड्या लोपल्या असता हा 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा' तारकरूपाने गगनामध्ये अनुभवाला येणारा आहे. तारकरूपाचा अनुभव आला तर तो कुलस्वामी तारक कसा आहे हे कळल्याशिवाय राहणार नाही. ***('राजससुकुमार मदनाचा पुतळा। रवीशशी कळा लोपलिया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'एथ वेद मुके जाले। मन पवन पांगुळले। रातीवीण मावळले। रवीशशी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अखंडित ज्योतीच्या साक्षात्काराने देवाची दिवाळी अखंड साजरी होणारी आहे.

✻✻

# दशेंद्रीय ऐक्यमेळी

शीर्षमार्गाचे आक्रमण करताना नादश्रवण होऊन नादश्रवणी तदाकारता जर साधली तर चैतन्याचे वारेच नयनात भरते. नामाचा बिंदू होतो. श्रवणात पेरलेले नयनात उगवते. नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते व मन संपूर्णपणे मुरते. ***('नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन मुरल्यावर इंद्रियांना होणारे द्वैताचे विपरीत ज्ञान नाहीसे होऊन एका अद्वैत चैतन्याचीच अनुभूती येते. ***('मन मुरे मग जे उरे। ते तू कारे सेविसी ना।।', 'म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान। जैसे अवयव तरी आन आन। परी एकेचि देहीचे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** दहा इंद्रियांना एकाचीच प्रचिती येऊन त्यांच्यामध्ये असणारा गैरमेळ नाहीसा होऊन एकमेळ निर्माण होतो. मनोलय साधणेचे आधी डोळ्यांनी दृश्य चांगले पाहिले की डोळ्यांना सुख होत असे पण त्याचवेळी डॉल्बीचा गोंगाट कानावर आला की कानांना दु:ख होत असे. एकाच वेळी वेगवेगळ्या इंद्रियांना सुखदु:खाची वेगवेगळी अनुभूती येत असे. मनोलयाने हा गैरमेळ दूर होऊन त्यांचेमध्ये एकसूत्रता, एकमेळ निर्माण होतो. सर्वांना अद्वैत चैतन्याचा - नामाचा - अनुभव सतत प्राप्त होतो. इंद्रियांना होणारे विषयज्ञान नाहीसे होऊन सतत आत्मबोधच होतो. हा जो आत्मबोध आहे तो इंद्रियांना होतो का? इंद्रियांना हा आत्मबोध होत नाही. आत्म्यालाच हा आत्मबोध होतो. तो बोध 'इंद्रिया नेणता भोगिजे' असाच असतो. साहजिकच सारी इंद्रिये सतत समाधानी राहतात. त्यांची वखवख थांबते. सहजच इंद्रियांच्यावर विजय प्राप्त होतो. भवसिंधूतून माणूस परपार होतो. ***('समाधान त्यांची इंद्रिये सकळ। जया तो गोपाळ ध्यानी मनी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।', 'इंद्रिये जे जे म्हणती। ते तेचि जे पुरुष करिती। ते तरलेची न तरती। विषयसिंधू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हा दहा इंद्रियांचा एकमेळ कोणत्या नामाने कसा होतो, हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'दशेंद्रिय एकमेळी। नामी हृदयकमळी।। कमलमुखी नाम घेता। विषय नुरेची सर्वथा।। गोविंद म्हणे एकमेळ। सहजेची सर्वकाळ।।'.*** आम्ही नाम घेतले पण इंद्रियांचेवर विजय प्राप्त करता आला नाही, तर नाम घेतले याला फारसा काही अर्थ राहात नाही. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'इंद्रियासी नेम नाही। मुखी राम म्हणोनी काही।। जेवी मासी संगे अन्न। सुख नेदीते भोजन।। तुका म्हणे रागा। संत शिवू नेदी अंगा।।'.*** हा दहा इंद्रियांचा एकमेळ साधणे, इंद्रियांना प्रसन्नता प्राप्त होणे हा खरा गोपाळकाला आहे. भगवंताचा प्रसाद आहे. ***('दश इंद्रियांचा एकमेळ केला। हाची गोपाळकाला होत असे।।'- श्रीनाथमहाराज, 'पडिले वळण इंद्रिया सकळ भाव तो निराळा नाही दुजा।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# अखंडित (दिवाळी)

ज्ञानेंद्रियांची भूक भागावी म्हणून कर्मेंद्रिये कर्म करतात. पण ज्ञानेंद्रियांची भूक भागत नाही. कितीही चांगले डोळ्यांना दाखवा डोळे तृप्त होत नाहीत. कितीही चांगले खायला द्या, रसना तृप्त होत नाही. कितीही चांगले ऐका, कान तृप्त होत नाहीत. जसे आगीत तेल ओतून आग विझत नाही, तर आग भडकते त्याप्रमाणे इंद्रियांची भूक शमत नाही, तर उलट वाढतेच. 'शेळी जाते जीवानिशी आणि खाणारे म्हणतय वातड' अशीच अवस्था होते. कर्मेंद्रियांनाही सुख नाही आणि ज्ञानेंद्रियांनाही सुख नाही. मग काय उपयोग? ज्ञानेंद्रियांची भूक भागावी या हेतूने 'देह मी' असे मानून कर्मेंद्रियांकडून होणारे कर्म दु:खदायकच ठरते. कर्माचा खरा कर्ता कोण आहे हे जर ज्ञान झाले, तरच सारी ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये समाधान पावणार आहेत, तृप्त होणार आहेत. मग होणारे निर्हेतूक अहंकाररहित कर्म, यश, कीर्ती प्राप्त करून देणार आहे. कर्माचा कर्ता देहाला मानणे हा अहंकाराचा अविवेक दूर होऊन कर्माचा आत्मा हा कर्ता आहे हे ओळखणे हा विवेक जर प्राप्त झाला तर निर्भेळ आनंद - निर्विषयानंद - प्राप्त होऊन निरंतर दिवाळी साजरी करता येणार आहे. ***('तो नित्यरूप पार्था। ओळखावा सर्वथा। जो या इंद्रियार्था। नागवेची।।', 'आत्माची कर्मकर्ता। हा ही निश्चय नाही तत्वता। देहोची कर्मकर्ता। मानितो साच।', 'मी अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळी। तै योगिया पाहे। दिवाळी निरंतर।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ती प्रताप।।', 'कर्त्यासी ओळखावे। तयासी विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदु:खी।।' - श्रीसमर्थ, 'अभिमानोऽपि कस्माद भवति। अविवेकात्।।'*** **अहंकार हा कशाने निर्माण होतो? अविवेकाने, 'अविवेकः कस्माद् भवति। अज्ञानात्।।. अविवेक कशामुळे उत्पन्न होतो? - अज्ञानामुळे.** ***'नित्यानित्यवस्तुविवेको नाम ब्रह्म सत्यं जगन्मिथ्यैव इति निश्चयः।'*** **नित्यानित्यवस्तुविवेक म्हणजे ब्रह्म हे एकमेव सत्य आहे आणि जग (अनात्मा) मिथ्याच (अनित्य) आहे. असा बुद्धीचा निश्चय होणे होय.** ***'आत्मानात्मविवेक' - शंकराचार्य)*** अज्ञानाचे ज्ञान झाले असता अहंकार हा अविवेक नाहीसा होतो व कर्त्याची ओळख होऊन विवेक जागृत होतो. विवेकाने आनंदाची दिपवाळी होते. संतांच्यापाशी विवेक जागृत असल्याने संतांची दिवाळी ही सतत अखंडित आनंदाची असते. ***('नित्य सण सात आम्हा सदा दिवाळी। आनंदे निर्भर आमुचा कैवारी बळी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'चंद्र तेथे चंद्रिका। शंभु तेथे अंबिका। संत तेथे विवेका। असणे की जी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# ब्रह्मगिरी

ज्या पर्वतावर बसले असता सहजसमाधी प्राप्त होते असा चैतन्याचा पर्वत - ब्रह्मगिरी, या विश्वात कोठेही आढळत नाही. या विश्वात सह्याद्रीसारखे दगडमातीचे, हिमालयासारखे हिमाचे, ज्वालामुखीसारखे तेजाचे, वावटळीसारखे घन वायुचे पर्वत आहेत. पण तेथे बसले असता सहजसमाधी अवस्था प्राप्त होत नाही. आपल्या शरीरात नासिकेतून वाहणाऱ्या इडा, पिंगला या चंद्रसूर्यात्मक नाड्या साधनाभ्यासाने ज्या ठिकाणी सुषुम्नाकार अग्नीरूप होतात. त्या त्र्यंबकस्थानी हा ब्रह्मगिरी साधकाला अनुभवाला येतो. या ब्रह्मगिरीचा त्रिकूट हा पायथा असून सहस्रदल हा माथा आहे. 'पिंडी ते ब्रह्मांडी' या न्यायाने प्रतिकात्मक नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी हा पर्वत आहे. पण त्या पर्वतावर बसून 'सहजसमाधी' सहज प्राप्त होत नाही. त्याकरता तेथेही निजदेही असणारा चैतन्याचा ब्रह्मगिरीच अनुभवावा लागतो. सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली अंतर्मुख होऊन पश्चिमपंथ - शीर्षमार्ग - उर्ध्वपंथ जर आक्रमिला तर त्रिगुणरहित होऊन मन पवनाचे वारे स्थिर झाले असता इडा आणि पिंगला सुषुम्नाकार होऊन ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी पावन मनोहर त्रिकुटावर साधक आरुढ होतो. मन पवन स्थिर झाल्याने अखंड सहज साधनाने पश्चिममार्गाने पुढे गेल्यावर श्रीहाटस्थानी पितप्रभा लखलखाट, गोल्हाटस्थानी शिवाचा बिंदूरूपाने, मूळमायेचे पीठ - औटपीठ येथे अनुहाताचा नीलबिंदूचा, तर भ्रमरगुंफेत प्रसादलिंगाचे दर्शन होऊन उन्मनी अवस्था प्राप्त होते. त्याचे पाहणे पाहणेपणाला येऊन 'पाहणे आपणासी आपण' हे आत्मज्ञान होते. ***('उर्ध्वपंथे चाल बाई ब्रह्मगिरी पाहू। देहभाव विलय तेथे तेचि होऊनी राहू।।'- संतवचन, 'ब्रह्मगिरीस्थानी जाता। देहभाव विलय हाता।', 'ब्रह्मगिरीस्थान देही। पश्चिमपंथे तेथे जाई।।'- श्रीमामामहाराज केळकर, 'मजला पूर्वेकडून काढिले। पश्चिमपंथे चालविले। अेकवीस स्वर्गावरती नेले। मुळतीर्थासी। दाविली गुरुने काशी। माझी मजपाशी।। अवघड पश्चिमेची वाट। बिकट त्रिकुटीचा घाट। श्रीहाट गोल्हाट औटपीठ। उल्लंघून त्यासी।।' श्रीज्योतीपंत महाभागवत, 'पश्चिम दिशेसी जाता। उजवा ठाकिला मेरु। अनुहत गगन गर्जे। थोर उठला गजरु। ही खुण अनुभवाची पिंडी परतुनी पाहे। आपेआप प्रकाशले। तेणे आनंदे राहे।। त्रिकुटी स्थिरावला मन पवन वारु। जिंकीले पंचप्राण केला विषयासी मारु।।'- श्रीसंतमुकुंदराज, 'सिद्धानंदन निनगे क्यंपसु सवियल्यडवाल्लो। ब्रह्मगिरींछू बंदितु दर्शन प्रल्हाद नोडनाल्लो।।'- श्रीगुरुलिंगगीता, 'त्रिकुटी ज्याचा पायथा। सहस्रदल ज्यांचा माथा। चैतन्याची सत्ता। चावळे जेथ।। देह जेथे विकल। इंद्रिये होतील शिथील। ताणाताणी नाही सैल। पंचप्राण।।'- श्रीदासराममहाराज)*** या ब्रह्मगिरीमेरूचे शिखरावर निरंजनी निराकारी खेचरी मुद्रा लावून प्राणायामी श्रीदत्तगुरू बसले होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'पैल मेरूचे शिखरी। एक योगी निराकारी। मुद्रा लावोनी खेचरी। प्राणायामी बैसला।।'.*** या मेरुच्या पुढे एक तेजोमय आकाश आहे. अर्थात या साऱ्याचा अनुभव संतच घेऊ शकतात. संत सांगतात, ***'मेरु परते एक व्योम आहे। तेजःपुंज पाहे सदोदीत।।'***

**

# सहज

व्यवहारात जे होते ते सारे हेतुपूर्वक, जाणीवपूर्वक, मुद्दाम. कोणत्याही कृतीमागे हेतू हा असतोच. याउलट परमार्थ हा निर्हेतुक, जाणीवरहित, वृत्तीरहित अवस्थेत होत असल्याने परमार्थात सारे सहजच होते. जी क्रिया मुद्दाम, हेतुपुरस्सर होते ती क्रिया खऱ्या परमार्थात गणली जात नाही. तो परमार्थातील व्यवहारच ठरतो. ज्यांची येण्याजाण्याची क्रिया हेतुपूर्वक असते त्यांची सारी कर्मे व्यावहारिक विकर्मेच असतात. तर ज्यांची येण्याजाण्याची क्रिया निर्हेतूक असते, जे हेतुवीण सत्क्रिया आचरतात त्यांची सारी कर्मे सहजकर्मे असतात - पारमार्थिक कर्मे असतात. ***('सहजचि आलो सहजची जातो। राहूनी जनी विजनी।।' - श्री पंतमहाराज, 'परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी। हे सत्क्रियाची आचरावी। हेतुवीण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज).*** हे कर्मातले कौशल्य ज्याला साधते तो खरा योगी. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आईके सकळ संमते जगी। अर्जुना गा तोचि योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेची फळी।।'.*** ही सहजता ज्याला साधते त्याला कर्मबंध बाधक होत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'तैसा कर्तृत्वाचा मदु। आणि कर्मफळाचा आस्वादु। या दोहीचे नाव बंधु। कर्माचा की।।'*** परमार्थात ध्यानाला बसायचे आसन सहजासन, ध्यानात जी दृष्टी ठेवायची ती सहजदृष्टी, गुरुकृपा होते ती ही सहज, होणारा बोध, उपदेश हाही सहज, होणारा साक्षात्कार सहज, होणारी भक्ती सहज, प्राप्त होणारी समाधी सहज, प्राप्त होणारा आनंद सहज, श्रीदासराममहाराज परमार्थातील सहजावस्थेचे वर्णन असे करतात, ***'सहजासन सहजदृष्टी। सहजपदी झाली भेटी।। सहजगती सहजनाम। अवघे झाले सहजब्रह्म।। सहजकृपा सहजबोध। सहज गुरु परमानंद।। सहज सहजी सहजा आले। सहज होवोनिया ठेले।। सहजभक्ती सहजसमाधी। सहज साक्षात्कार सिद्धी।। दासराम सहजानंद। सेवी आनंदी आनंद।।'.*** साधनाभ्यासाने ब्रह्मगिरीस्थानी साधक जेव्हा चैतन्याचे नाद बिंदू कला ज्योती हे प्रकर्ष अनुभवत पश्चिमपंथे दशमद्वार ओलांडतो तेव्हा अंत:करणातील हेतू नाहीसा होऊन सहजावस्था प्राप्त होते. ***('दशमद्वार ओलांडिता। सहजस्थिती येई हाता।।'- श्रीदासराममहाराज, 'राऊळामाजी जाता राहे देहअवस्था। मन हे उन्मन झाले नसे बद्धतेची वार्ता। हेतू हा मावळला। शब्दा आली नि:शब्दता। तटस्थ होवोनी ठेले। निजरूप पाहाता।।' - संतवचन)*** सहजावस्थेत होणारी पूजा ही सहजपूजा होय. ती पूजा कशी होते हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'सहजपूजा याची नावे। गलीत व्हावे अभिमान।।'*** तर श्रीमाधवदास या पूजेबद्दल असे सांगतात, ***'सहज सिंहासनी राजा रघुवीर। सोहंभावे तया पूजा उपचार। सहजाची आरती वाद्यांचा गजर। माधवदासा स्वामी आठव ना विसर।।'***

चिमडच्या महाराजांचे कनिष्ठ चिरंजीव, ज्यांना जन्मजात कानाला भोके होती म्हणून गोरक्षनाथांचे अवतार असे श्रीदासराममहाराज म्हणत, त्या उद्धवरावमहाराजांनी इ.स.१९३२ मध्ये आज स्वरूपानुसंधानी निर्याण केले. त्यांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

**

# समाधी

जी समाधी हेतूपूर्वक लावली जाते, त्या समाधीने उपाधी दूर होत नाही तर उपाधी चिकटते. याउलट निर्हेतुक सत्क्रिया आचरण्याने, प्राप्त होणाऱ्या साक्षात्काराने, समसुखाने, अद्वैतबुद्धीने लागणाऱ्या हरीसमाधीने, नामसमाधीने, सहजसमाधीने उपाधी तत्वत: जाते व तो ब्रह्मरूप होतो. ***(‘लावून आसन बैससी समाधी। तो तो उपाधी सहज लागे। नाममुखी गाता जोडे सायुज्यता। उपाधी तत्वता दूरी पळे।।’ - श्रीनाथमहाराज, ‘साक्षात्कार झालिया सहजसमाधी। तुका म्हणे उपाधी गेली त्याची।। गेली त्याची जाणा। तोचि ब्रह्म झाला। अंतरी निमाला पूर्णपणे।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे।।’- श्रीमामामहाराज, ‘समाधी हरीची समसुखेवीण। न साहेल जाण द्वैतबुद्धी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** कल्पनेची उपाधी संपूर्णपणे नाहीशी होऊन निरुपाधिक वस्तूरूप होणे म्हणजेच सहजसमाधी. यायोगे संसारातील दु:ख देणाऱ्या आधीव्याधी नाहीशा होतात. आधीव्याधी सम होऊन समाधी अवस्था, विश्रांतीची स्थिती प्राप्त होते. कल्पनेच्या निरासाने, मनोवृत्तीच्या निरोधाने श्वसनाची उपाधी सूक्ष्म होते, केवलकुंभक साधतो व अखंड जीवन अखंड स्मरणाने जन्ममरण राहात नाही. ***(‘वस्तू जे का निरोपाधी। तेचि सहजसमाधी। जेणे तुटे आधीव्याधी। भव दु:खाची।।’- श्रीसमर्थ, ‘सांडी कल्पना उपाधी। तीच साधुला समाधी।।’- संतवचन, ‘टाकीता उपाधी। लागे सहजसमाधी।।’- श्रीदासराममहाराज, ‘दूर झाली आधी व्याधी। लागे अखंड समाधी।।’- श्रीस्वामीस्वरूपानंद)*** लावलेल्या समाधीला काळवेळेची मर्यादा असते अर्थात ते समाधीसुख मायेतील मर्यादीत असते. याउलट सहजसमाधीचे सुख अखंड असते. तेथे काळवेळेची मर्यादा असत नाही. सहज समाधी ही सतत अनुभवाला येते. ***(‘बोलता चालता देखता ऐकता। न ढळे सर्वथा तेचि साधी।।’- श्रीसंत मुक्ताबाई, ‘सदा सर्वकाळ अंतरी अढळे। कदापि नढळे तेचि साधी।।’, ‘काळवेळ नामस्मरणासी नाही। सदा सर्वदाही उच्चारावे।।’- श्रीमामामहाराज केळकर)*** उपाधीची जाणीव न होताना सतत चैतन्याचेच ज्ञान होत असल्याने बुद्धी एका चैतन्याचे ठिकाणी दृढ होते. अखंड सहजसमाधी प्राप्त होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘समाधीसुखी केवळ। जै बुद्धी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगसिद्धी।।’ तर श्रीसमर्थ सांगतात, ‘रामदासी दृढबुद्धी। होता सहजसमाधी।।’, ‘असोन मायिक उपाधी। तेचि सहजसमाधी। श्रवणे वळावी बुद्धी। निश्चयाची।।’.*** ब्रह्मगिरीस्थानी दशमद्वारापैल साक्षात्काराने अहंकारविरहीत अवस्थेत निर्गुणी प्राप्त होणाऱ्या सहजसमाधीचे वर्णन श्रीबाबाजीमहाराज पंडीत असे करतात, ***‘अहंता निमाल्या सहजसमाधी। म्हणोनिया बुद्धी ऐसी व्हावी।।’*** तर संत मुक्ताबाई ही समाधी अशी वर्णितात, ***‘सहजसमाधी लागली निर्गुणी। खुंटलिसे वाणी बोलवेना।।’*** तर श्रीदासराममहाराज हे वर्णन असे करतात, ***‘सहज समाधी सहजेची दावी। नयनी दाखवी तेजोरूप।।’, ‘वारियाची पावूनी सिद्धी। हरीभक्त हरी आनंदी। सद्गुणाढ्य सद्रूप धुंदी। सहजाची सहजसमाधी।।’.***

**

# खंडेराय

अनावश्यक गोष्टी - खंडित माया - दूर करून जो अखंड आत्मा राखतो तो अखंड खंडेराय. ज्या गोष्टींना जन्ममरण आहे त्या साऱ्या मायेतील अनावश्यक गोष्टी विस्मरणात - नेणीवेत जाऊन त्या नेणीवेची जाणीव - स्मरण - सतत होणे म्हणजे जन्ममरणरहित अखंड खंडेरायाची जाणीव. ही अखंड खंडेरायाची अखंड जाणीव मायेला आपणापासून दूर ठेवते. जो त्रिगुणाचे माध्यमातून त्रिविध देह, त्रिविध अवस्था, त्रिविध स्थाने, त्रिविध भोग, त्रिविध भोक्ता यांचा अनुभव घेतो, जगाचाच अनुभव घेतो व चैतन्याचा अनुभव घेत नाही तोच त्रिपुरासुर आहे. जो विवेक, श्रद्धा, वैराग्य हा त्रिशूल हाती घेऊन या त्रिपुरासुराचा वध करतो व महाकारणदेहात अखंड स्मरण प्राप्त करतो, तो अखंड खंडेरायाचे दर्शनाने अखंड खंडेराय होतो. ***('जय जय सदाशिवा बोधा। महाकपटपटू द्वैतकटकभट जिंकिसी कामक्रोधा।। विवेक श्रद्धा वैराग्यात्मक त्रिशुल घेऊन हाती त्रिगुण अहंकार त्रिपुराची उडवूनी दिधली त्रेधा।।'- श्रीबाबा गर्दे, 'अखंड खंडेराया। दूर करी भवमाया रे। प्रपंच मन्मथ मल्हारी। त्रिपुरांतक मम श्रमवारी।।'- श्रीकेशवस्वामी, 'त्रिविध देहे त्रिविध अवस्था। त्रिविध स्थाने त्रिविध भोग त्रिविध भोक्ता। येया प्रपंचाते तत्साक्षित्वे जाणौनी वेवस्था। ते तुरीया जाणावी।।', 'तिही अवस्थांचे जाणपण। तियेशी तुर्या अवस्था ऐसी खुण। तिही देहाचे अवलोकन। ते महाकारण देह।।' - श्रीमुकुंदराज, 'क्षणा जागृती क्षणा सुषुप्ती। क्षणैक स्वप्नाची प्रतिती। हे त्रिगुणाची मिश्रित वृत्ती। जाण निश्चिती उध्दवा।' - श्रीनाथमहाराज, 'स्मरण म्हणिजे देव। विस्मरण म्हणिजे दानव। स्मरण विस्मरणे मानव। वर्तती आता।।'- श्रीसमर्थ)*** जोवर संसाराचा - संसरणाला - नाद आहे तोवर चैतन्याचा नाद श्रवण होणार नाही. तोवर संसार पुनः पुनः प्राप्त होणार. संसारमोहातून बाजूला होता येणार नाही व अखंड खंडेराय प्राप्त होणार नाही, त्या देवाचे दर्शन होणार नाही, आत्मदर्शन होणार नाही, हे निश्चित. ***(नादी लागूनी संसाराच्या आजवरी हृदयनिवासा। उपेक्षिले तुज कृष्णसुताने। पोटी घे अपराधा।।'- श्रीबाबा गर्दे, 'आत्माची कळला नाही जपतप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संसारापासून निराळे होणे, संसाराच्या गोष्टी सुटणे म्हणजेच मोक्षाची प्राप्ती होणे, अपूर्णातून पूर्णतेकडे वाटचाल होणे, अखंड स्मरण अखंड जीवन प्राप्त होणे, जन्ममरणाची परंपरा खंडित होणे, अखंड खंडेरायाची जाणीव होणे होय. ***('येचि जन्मे येची काळे। संसारी होइजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।'- श्रीसमर्थ, 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनं इह संसारे। बहुदुस्तारे कृपयाऽपारे पाहि मुरारे।।' - जगद्गुरू शंकराचार्य, 'जन्ममृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला। तत्वे शोधिता पावला। तत्वता वस्तू।।' - श्रीसमर्थ, 'अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज, 'जन्ममरण खंडावया। अखंड जाणे खंडेराया।। खंडेराय तो हृदयी। अखंडित ध्यानी पाही।। सहा जिरवता कष्टी। खंडेराय पडे दृष्टी।। नाम कष्ट ओळखावे। दास म्हणे सदा गावे।।'- श्रीमामामहाराज केळकर)***

**

# वेध

जाणीवेमुळे, वासनेमुळे असणाऱ्या या आत्म्याच्या संसारात - संसरणात दिननिशी होणारे षड्विकारात्मक आयास हा प्रपंचघरधनी, अहंकार हा सासरा, कल्पना ही सासू, कामक्रोध हे दीर, ममता ही जाऊ, तृष्णा ही नणंद सोबतीला असल्याने या संसारातून बाजूला होणे, संसरण निश्चळ होणे हे साधत नाही. हे सारे संसारातील सहकारी विवेकाने, वैराग्याने, श्रद्धेने बाजूला केले किंवा आपण त्यांचेपासून विभक्त झालो, हे सारे पाखंड खंडण केले तरच धर्माचे पालन होणार, नामबीज वाढणार व खंडेरायाच्या पायाशी आपली वस्ती होणार, हे निश्चित. ***('आता मी नये बाई नये बाई पुनरपि या संसारा। प्रपंच घरधणी। वाईट याची करणी।। सासरा अहंकार अहंकार। जळोबाई याचे घर।। सासु कल्पना कल्पना। जाच हिचा सोसेना।। कामक्रोध हे दिरभावे। जाच किती सोसावे।। ममता घरजावा घरजावा। जाच किती सोसावा।। तृष्णा नणदुली नणदुली। वाईट ईची बोली।। केशवस्वामीची निजदासी। राहीन पायापाशी।।'- श्रीकेशवस्वामी)*** या सासू-सासरे इत्यादी साऱ्या संसारातील कटकटीतून मोकळे व्हावे यासाठी संत जनाबाई खंडेरायाला नवस करतात. त्या म्हणतात, ***'खंडेराया तुज करीते नवस। मरु दे सासूस खंडेराया।। सासु मेल्यावरी तुटेल आसरा। मरु दे सासरा खंडेराया।। सासरा मेल्यावरी होईल आनंद। मरु दे नणंद खंडेराया।। नणंद मरता होईन मोकळी। गळा घालीन झोळी भंडाराची।। जनी म्हणे खंड्या अवघीच मरू दे। एकटी राहू दे पायापाशी।।'***

ज्यायोगे आपण व खंडेराय यातील भेद नाहीसा होतो, दोघातील अंतर कमी होते, त्याला 'वेध' म्हणतात. वेधाने अद्वैती समरस झालो की मग खरी भक्ती सुरू होते. कशाने हा भेद वाढतो व कशाने कमी होतो? जीवन अधोमुख आहे तोवर हा भेद वाढतो व जीवन उर्ध्वमुख झाले की भेद तुटतो. अर्थात उर्ध्वमुख जीवन हा खरा वेध आहे. ***('वेधे भेदावे अंतर। भक्ती घडे तदनंतर।।', 'अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो। निःसंगपणे निर्गुणी तो। महायोगी।।'- श्रीसमर्थ, 'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी।।'- श्रीदासराममहाराज)*** पांडुरंगाचे ठिकाणी मन रंगले की त्रिगुणाचे पैल हा चौथा गुण - शुद्ध सत्व गुण - गोविंदाचा गुण प्राप्त होतो. जीवन उर्ध्वगामी होऊन दशमद्वारापैल पंढरीत सहजस्थिती प्राप्त होते, ज्यायोगे जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना प्रकाशित करणारी चौथी ज्ञानात्मक अवस्था - तुर्यावस्था - प्रगट होते. अहर्निशी परमार्थ - अखंड स्मरण - घडते. नादानुसंधानाने नादश्रवणी तदाकारता साधली की वाचेचा गोंधळ संपून चारीवाचेपैल नामरूपाचा मेळ बसतो. सगुणाचे आधारे गुणातीत होऊन - जाणीवनेणीवरहित होऊन - वृत्तीरहित ज्ञानाने - सर्वसंग सोडून निर्गुणी तादात्म्य होतो. वेधाने अंतर तुटते व अखंड खंडेरायाची खूण प्राप्त होते. असा आत्मारामाचा वेध लागला की उन्मनी अवस्था, निरोपाधी विश्रांतीची स्थिती प्राप्त होते. ***('माझे जीविची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी। पांडुरंगी मन रंगले। गोविंदाचे गुणी वेधले।। जागृती स्वप्न सुषुप्ती नाठवे। पाहता आनंदी आनंद सामावेना।। बापरखुमादेवीवरू सगुण निर्गुण। रूप वीटेवरी दाविली खूण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वेध नामाचे स्मरण। ज्यात नोहे विस्मरण।। नामरूपा मेळ पडणे। हीच वेध खुण जाणे।।'- श्रीमामामहाराज, 'दत्त दत्त वदता वाचे। होय सार्थक जन्माचे।। ऐसा जया नामी वेधू। परमानंदू हृदयी।। दत्त आलिंगने समाधान। तेणे नासे मी तू पण।। एका जनार्दनी वेधू। दत्तनामे लागला छंदू।।'- श्रीनाथमहाराज, 'वेध लागला रामाचा। सुरवर विश्रामाचा।।'- संतवचन, 'हरीनामाची माला दिधली। आत्मस्वरूपी वृत्ती वेधली।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज, 'कानडा हो विठ्ठलू कर्नाटकू। तेणे मज लावियेला वेधू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

✻✻

# निजयोगी

आपल्या शरीरात निजत्व आहे तोवर शरीरावर तेज, रया असते. या तेजावरून निजत्वाची ओळख होते. या निजत्वालाच निजदेव, निजब्रह्म, निजवस्तू आदी नावांनी संत संबोधतात. या निजत्वाला जे खऱ्या अर्थाने जाणतात ते निजयोगी. 'देह म्हणजे मी' हा खोटा मीपणा टाकून जे खऱ्या 'मी'ला जाणतात ते निजयोगी. देहाची, दृश्याची जाणीव जाऊन ज्यांना सतत चंचळ आत्मदेवाची - निजत्वाची - चैतन्याची जाणीव राहते ते निजयोगी. ***('निजाचे तेज की तेजाचे निज। येथील ते गुज सांगा मज। ब्रह्म ते कायी ब्रह्म ते कायी। ब्रह्म ते कायी सांगा गोसावी।।', 'देव देव म्हणूनी व्यर्थ का शिणसी। निजदेव नेणसी मुळी कोण। ज्ञानदेव म्हणे भजा आत्मदेवा। अखंडित सेवा करा त्याची।', 'आनंदस्वरूप प्रसिद्ध देखिले। निजरूप संचले सर्वाठायी।।', 'वर्ण ना व्यक्ती अमूप निजतेज। संतांचे ते गुज आत्मरूप।।', 'निज गुजा गुज तो गे बाई। मोहनाचा मोहन तो गे बाई।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मीपण सांडूनी ओळखी मीपण। तरी देवपण प्राप्त होय।।'- श्रीदासराममहाराज, 'सदा सर्वदा योग तुझा घडावा। तुझे कारणी देह माझा पडावा। उपेक्षू नको गूणवंता अनंता। रघूनायका मागणे हेचि आता।।'- श्रीसमर्थ)*** या निजत्वाची - निजवस्तूची वेगळी खासियत श्रीदासराममहाराज अशी सांगतात, ***'नेत्रावीण देखे श्रोत्रावीण ऐके। रसनेवीण चाखे ते निजवस्तू।। पायावीण चाले मुखावीण बोले। अंगावीण खेळे ते निजवस्तु।।'.*** ही अलक्ष निजवस्तू कोणत्या लक्षणाने लक्ष होते? ही निजवस्तु - चैतन्य - नादप्रकाशाने लक्ष होते. या चैतन्याचा नाद हे त्याचे नाम असून प्रकाश हे त्याचे रूप आहे. या अविनाशी नि:शब्द नामरूपाने ते सर्वत्र नटले आहे. ***('चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार। तुझा नादप्रकाश हाची आम्हा साक्षात्कार।।' - श्रीदासराममहाराज, 'निजत्व ते नामरूप। जे का चालिले अपाप।।'- श्रीमामामहाराज)*** हे निजत्व आपणास कधी भेटते हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, ***'देखणा हा जेव्हा विसरला देखणे। तेथे आपुलेपणे भेटी झाली।। आपुलिया आपण आपुलिये ठायी। भेटो आले देही निजत्वेसी।।'.*** या निजत्वाला जाणणारा निजयोगी बाह्यत: कसा वागतो? त्याचे कर्म कसे असते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'दैवास्तव देहाचे पाळण। ऐसा निश्चयो परीपूर्ण। जो चिंतिना देहभरण। तो महायोगी जाण दैवयोगे।।', 'आइके सकल संमते जगी। अर्जुना तोचि गा योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेची फळी।।'*** तर संत हे वर्णन असे करतात, ***'योगी दिसे भला जो जाणे निजब्रह्माला।। ज्याचे अंगी गर्व हा नसे। दया आणि शांती स्वमनी वसे। जो पाळी परमार्थाला।। पाळी नित्यनियम आदरे। पाही रूप हरीचे गोजिरे। जो रंगी रंगूनी गेला।।'*** भगवान या योग्याला देवाचा देव, देवाभक्ताचे मूळ, सुखसर्वस्व, निश्चळ चैतन्य मानतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'अगा योगी जो म्हणिजे। तो देवाचा देव जाणिजे। आणि सुखसर्वस्व माझे। चैतन्य तो।।'*** चैतन्यरूप योगी चैतन्याचे जन्मस्थान निश्चळ परब्रह्माचा अनुभव घेतात, परब्रह्मरूप होतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ऐसा गे माये कैसा हा योगी। जे ठाई जन्मला तो ठाव भोगी।।'*** आमचे भगवान सद्गुरू निंबरगीकरमहाराज हे परब्रह्मरूप निजयोगी होते. त्यांचेबाबतीत श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री.र.ह.कोटणीसमहाराज म्हणतात, ***'जगद्रुप तू अससी अससी निजयोगी। वसतीस्थान तुमचे धाम निंबरगी।।'***

**

# आत्मस्वरूपाची गीता

प्रत्येक जीव हा खरे पाहिले तर स्वतंत्र आहे. पण देहाच्या, मनाच्या अधीन होऊन तो पारतंत्र्यात जातो. आपले स्वातंत्र्य गमावून बसतो. खरे पाहिले तर जीवाचा जीवलग हा परमात्मा आहे. पण तो देहाला, मनाला जीवलग मानतो व परमात्म्याला दुरावतो. देहाचे, मनाचे मागे लागतो. देहाच्या, मनाच्या मोहात तो सापडतो. देहाचा, मनाचा मालक असणारा जीव देहाचे, मनाचे तालावर नाचू लागतो. मन म्हणेल ते प्रमाण, इंद्रिये म्हणतील ते प्रमाण. देहाला, मनाला जीवलग मानून जे देहाचे, मनाचे मागे लागतात, संसारमोहात गुरफटतात. त्यांना स्वातंत्र्य (मोक्ष) मिळत नाही. ***('तुका म्हणे झाले जे मनाअधीन। तयासी दंडण यम करी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'इंद्रिये जे जे म्हणती। ते तेचि जे पुरुष करीती। ते तरलेचि न तरती। विषयसिंधू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** स्वातंत्र्य (मोक्ष) मिळवायचे असेल तर या भ्रामक स्वकीयांविरुद्ध, जीवलगाविरुद्ध युद्ध करावेच लागते. मनातील कल्पनेने भासमान होणाऱ्या जगाचा तटका तोडावा लागतो. तरच देवाचे सख्यत्व - जीवलगत्व प्राप्त होते. ***('देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जीवलगासी तुटी। सर्व अर्पावे सेवटी। प्राण तोही वेचावा।।', 'त्या देवाचे दर्शन तुघे तुघे। संसारमोहातूनी निघे निघे।।'- श्रीसमर्थ, 'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका।।' - श्रीदासराममहाराज)*** ज्याला आत्मस्वरूपाची गीता उमगते, असा आर्जवून असणारा अर्जुनच इंद्रियांवर मनावर विजय मिळवून, संसारमोहातून बाजूला होऊन जन्माचे सार्थक करतो. जिकडे योगेश्वर कृष्ण व आर्जवून असणारा अर्जुन असेल त्यांचा विजय निश्चित होणारा आहे. युद्धसमयी रणांगणात अर्जून जीवलगांचे मोहात सापडला. त्याला मोहातून परावृत्त करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी जो बोध अर्जुनाचे ठिकाणी प्रगट केला तो महर्षी व्यासांनी शब्दबद्ध केला ती 'भगवद्‌गीता'. अर्जुनाचे निमित्ताने प्रगट झालेली ही भगवद्‌गीता सामान्यजनांना संसारमोहातून बाजूला होण्यासाठी बोधप्रद ठरणारीच आहे. रामांनी सांगितली ती रामगीता, तर मग कृष्णांनी सांगितलेली 'कृष्णगीता' का नाही? तर व्यासांना याठिकाणी भगात - विवरात राहणाऱ्या आत्मदेवाचा निर्देश करावयाचा आहे. समर्थ सांगतात, ***'गीता भागवती उपदेश केला। अर्जुना दाविला देव कृष्णे।। कृष्णे दाखविला देव तो वेगळा। बोलिला आगळा सर्वाहोनी।। सर्वाहोनी सार देव तो साचार। दास म्हणे पार कल्पनेचा।।', तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, 'ती अक्षरे नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदिपिका। अर्जुनालागी चित्‌कळीका। उमळलीया कृष्णे।।'.*** वेद हे भगवंताच्या नि:श्वासातून प्रगट झाले तर गीता ही स्वत: सर्वेश्वर भगवंतांनी प्रगट केली. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरु। तो स्वये सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादिला।'.*** आपले चित्त शुद्ध झाले असता भावातून प्रगट होणारे गीत म्हणजे ही आत्मस्वरूपाची गीता - भगवद्‌गीता आहे. ***('भावे गावे गीत। शुद्ध करोनिया चित्त।।'- श्रीतुकाराममहाराज)*** **या गीतेचे महत्त्व श्रीमामामहाराज असे सांगतात,** ***'भावे वाची गीताक्षर। त्यासी भेटेल ईश्वर।।' 'देवे सांगितली गीता। नित्य नवी जे सर्वथा।।'*** तर हे महत्त्व श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'गीता गीता गीता वाचे जे म्हणती। नाही पुनरावृत्ती तया नरा।। नित्यनेम वाचे वदता अक्षरे। भवसिंधु तरे अर्धक्षणी।। एका जनार्दनी जयाचा हा नेम। तया पुरुषोत्तम न विसंबे।।'*** या गीताजयंतीसच श्रीचिमडचे महाराज स्वरूपाकार झाले. उर्वरीत गीताजयंतीचा विषय व चिमडचे महाराजांचे पुण्यस्मरण आपण उद्याचे कीर्तनात पाहू.

**

# आत्मस्वरूपाची गीता उमगता

आत्मस्वरूपाची गीता ज्यांना उमगते ते संसाराहून निराळे होतात, ते संसारमोहापासून परावृत्त होतात. त्यांच्या संसाराच्या गोष्टी सुटतात व ते निश्चळ स्वरुपाकार होतात, 'मोक्ष सुख' पावते होतात. जे स्वरूपाकार झाले अशा संतांना गीता उमगली हे निश्चित. अशा संतांच्या भाष्यांना; अर्थाला अर्थ. पोकळ शब्दार्थाला काय अर्थ? संतांनी, महात्म्यांनी अनुभव घेतला म्हणून त्यांच्या अर्थाला अर्थ प्राप्त होतो. अहो चित्कळा उजळली तर गीतेचा अर्थ कळणार. गीता ही फार व्यापक आहे. कितीही भाष्ये झाली तरी ती अजून अपुरीच आहेत. पण महत्त्वपूर्ण समाधान करणारी भाष्ये कोणती? श्रीज्ञानेश्वरमहाराजांची भक्तीयोग सांगणारी ज्ञानेश्वरी, कर्मयोग सांगणारे लोकमान्यांचे गीतारहस्य, जगद्गुरू शंकराचार्यांचे अद्वैत तत्वज्ञान सांगणारे 'शांकरभाष्य', गुरुदेव रानडेसाहेबांचा आत्मसाक्षात्कारयोग हीच ना? आमचे श्रीमामांनी भगवद्गीतेवर जर भाष्य लिहिले असते तर त्यांनी गीतेतील नामयोगच सांगितला असता. अर्थात श्रीमामांचे नाम हे आपण समजतो त्या नामापेक्षा वेगळे, 'स्वयमेव नाम' आहे हे आपण लक्षात घ्यावे. ज्यांना आत्मस्वरूपाची गीता उमगली व ज्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेकांना ही गीता उमगली असे चिमड संप्रदायाचे प्रवर्तक श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर म्हणजेच चिमडमहाराज यांनी आपला देह या गीताजयंती दिवशी ठेवला व स्वरूपाकार झाले. म्हणून या गीताजयंतीस आमचे सांप्रदायाचे दृष्टीने वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. चिमड महाराजांचे घराणे तसे रामदासी घराणे असल्याने घरातील वातावरण पारमार्थिक स्वरूपाचे होते. वरचेवर सज्जनगडला जाणे, दासबोध पठण आदी सांप्रदायिक उपासना साहजिकच घरात घडत असे. असेच एकदा ते सज्जनगडला गेले असताना त्यांना हस्तलिखित दासबोधाची प्रत खुद्द रामदासस्वामीनीच दिली. ज्यात विशेष म्हणजे दासबोधाचे २१ दशक आहेत. परमार्थाची आवड उपजत असल्याने जत संस्थानमध्ये नोकरी करत असताना खरा परमार्थ समजून घ्यावा म्हणून उमदी येथे असणाऱ्या साधुमहाराजांचे दर्शनासाठी ते गेले. पण साधुमहाराजांनी त्यांना त्यांचे सद्गुरु निंबरगीकरमहाराज यांचेकडे मार्गदर्शनार्थ नेले. पण भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराजांनी मात्र अनुग्रह साधुमहाराजांचे करवीच चिमडमहाराजांना दिला. श्रीसाधुमहाराजांचे उपदेशाप्रमाणे त्यांनी भरपूर साधन केले. दरवर्षी पौष महिन्यात महाराजांचे मार्गदर्शनाखाली साधन साधावे या हेतूने श्रीक्षेत्र निंबरगी येथे ते जात. महाराजांच्या कृपेने त्यांना श्रेष्ठ असे चैतन्याचे अनुभव प्राप्त झाले. साहजिकच श्रीनिंबरगीकरमहाराजांची बहाल मर्जी श्रीचिमडमहाराज यांचेवर बसली. पुढे भगवान सद्गुरु साधुमहाराजांनी निर्याण साधल्यानंतर त्यांचे इच्छेप्रमाणे व श्रीनिंबरगीमहाराजांचे आज्ञेप्रमाणे आपली सुखाची सरकारी नोकरी सोडून त्यांनी सांगितलेल्या जागी चिमड येथे पर्णकुटी बांधून उपासना करून राहू लागले. तेथेच साधुमहाराजांचे मंदिर, पाया खोदताना निर्मळ गंगेसारखे पाणी लागल्याने विहिरीमध्येच बांधले. त्यात साधुमहाराजांच्या पादुका, श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या नावाची पिंडी, श्रीकाडसिद्धांच्या नावाचा बाण या त्रैमूर्तीची स्थापना सन १८८१ मध्ये श्रीचिमडमहाराजांचे हातून झाली. सन १८८५ मध्ये भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराज चिमडमहाराजांकडे वंशपरंपरा सारा परमार्थ सोपवून स्वरूपाकार झाले. श्रीचिमडमहाराजांनी श्रीमहाराजांची परमार्थाची परंपरा समर्थपणे सांभाळली. चिमडमध्ये राहूनच लोकांना पारमार्थिक मार्गदर्शन केले. आपण लवकरच निजधामास जाणार असे बऱ्याच प्रकारांनी महाराजांनी सूचित केले व आजच्या दिवशी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे मौन धारण करून स्वरूपानुसंधानात स्वेच्छेने देह ठेवला. त्यांचे पवित्र चरणी नमन करून येथेच थांबतो.

**

# भेटी कुळ हनुमंता अनायासे

श्रुत झालेली आत्मस्वरूपाची गीता जर आपणाला उमगली तर प्रपंचातील दिननिशी होणारे षड्विकारात्मक आयास दूर होऊन - अनायासे - निष्काम सोहंरूपी वायुपुत्राची भेट होणारी आहे. निष्काम सोहंरूपी वायुपुत्रच उर्ध्वपंथी गमन करतो व जन्ममरणाचे पैल भेद नाहीसा होऊन हृदयस्थ आत्मारामाची भेट घडवून आणतो. ***('जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।। जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते।। जरी पंधरा पळ साधेल पवन। उर्ध्वपंथी गमन साधे बापा।।'- श्रीमामामहाराज, 'भेद हा तुटे अभेद उमटे। राम प्रगटे तेचि नवमी।।', 'अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो। नि:संगपणे निर्गुणी। तो महायोगी।।'- श्रीसमर्थ, 'जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।'- श्रीदासराममहाराज)*** आर्जवून असलेल्या अर्जुनाचे रथावरच निष्काम मारुतीराय विराजमान होतात, हे आपण ध्यानी घ्यावे. ***(खेळीयामाजी हणम्या बळकट। न सापडे कामव्यसनी। काम नाही तेथे क्रोध कैसा। मग कैसा भांडणार रे।।'- श्रीनामदेवमहाराज, 'ध्वजस्तंभावरी वानरु। तो मूर्तिमंत शंकरु। सारथी शारंगधरु। अर्जुनेसी।।' श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या निष्काम सोहंरूपी वायुपुत्राची - रामदूताची जर उपासना घडली तर वरकड काया गुमान होऊन भक्तीच्या वाटेने रामरूपी अंतरात्म्याचे दर्शन होणार आहे व दर्शनाने मुक्ती प्राप्त होणार आहे. ***('रामकृपा व्हावी जरी। हनुमानसेवा करी।।'- श्रीमामामहाराज, 'सोहंरूपी वायुपुत्र हा असे जयापाठी। तया नाही पुनर्जन्म जोडे जगजेठी।।'- श्रीदासराममहाराज, 'कैवारी हनुमान आमुचा कैवारी हनुमान।। पाठी असता तो जगजेठी। वरकड काय गुमान।।'- श्रीसमर्थ, 'शरण शरण हनुमंता। तुज आलो रामदूता। काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'स्वरूप संप्रदाय अयोध्यामठ। जानकीदेवी रघुनाथ दैवत। मारुती उपासना मार्ग नेमस्त। वाढविला परमार्थ रामदासी।।'- श्रीसमर्थ)*** आज मार्गशीर्ष शु.१३, श्री हनुमानव्रताचा दिवस. आमचेच घरी हे हनुमानव्रत पिढ्यान पिढ्या केले जात आहे. अन्यत्र कोणी हे व्रत करताना मला तरी आढळले नाही. श्रीमामामहाराज या व्रताविषयी असे सांगतात, ***'कुळभेटी हनुमंता। त्रयोदश ग्रंथी युक्ता।। पीत दोरक पीत वसन। पीत गंध पीत सुमन।। गोविंद म्हणे त्रयोदशनाम। श्रीराम जयराम जयजयराम।।'.*** हे व्रत तेरा वर्षाचे आहे. सत्यनारायण, सत्यविनायक, सत्यराघव, सत्यदत्त यासारखेच हे व्रत आहे. पिवळ्या तेरा सुतांच्या दोरकास तेरा गाठी मारून त्याची विधीयुक्त पूजा करायची. पूजेला पिवळे गंध, पिवळ्या अक्षता, तेरा प्रकारची फुले, तेराचे वायन, सारे काही तेरा. सारे काही तेरा अर्पण केले की अंत:करणी 'मेरा' काही राहात नाही, असा काही भाग असावा. ही मारुतीची पूजा प्रभू रामचंद्रांनी, द्रौपदीने तेरा वर्षे केल्यानंतर त्यांना ईप्सित साध्य झाले. भविष्योत्तर पुराणात ही पवनात्मजाची उपासना सांगितली आहे. या उपासनेने रामनामात पवन साधतो व ज्यायोगे हनुमान देव झाले त्या स्वयमेव रामनामाचा अनुभव येतो. कैवारी हनुमान हे आमुचे होतात. ही आमच्याकडे पिढ्यान् पिढ्या चाललेली उपासना इतरांनाही करता यावी या हेतूने ती.प.पू.आण्णांनी ही पोथी पुस्तक रूपात प्रकाशित केली आहे. त्यामुळे साऱ्या हनुमानभक्तांची मोठी सोय झाली आहे असे वाटते.

✲✲

# तपाचेनि तपे गुरुदत्त भेटी

ज्या रामनामाच्या योगे हनुमंत हे कामक्रोधरहित अवस्थेत अनायासे देव झाले, ज्या स्वयमेव नामाच्या उच्चाराने ब्रह्मादिकांना आनंद प्राप्त होतो; ज्या रामनामाचा उच्चार म्हणजे तपाचे तप आहे, त्या रामनामाचे तप श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी आचरिले. साधनाभ्यासाने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधला असता हा स्वयमेव नाद श्रुत होतो. या देहाच्या, मनाच्या, प्राणाच्या लय साधण्याच्या प्रक्रियेला तप म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'स्वरूपाचिया प्रसरा। लागी प्राणेंद्रियशरीरा। आटणी करणे जे वीरा। तेचि तप।।'*** यात इंद्रिय हा शब्द मनासाठी वापरला आहे हे आपण लक्षात घ्यावे. तपाच्या योगे देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधून श्रुत होणाऱ्या नादश्रवणी जर तदाकारता साधली तर चैतन्याचे वारेच नयनात भरते. नामाचा बिंदू होतो. श्रवणात पेरलेले नयनात उगवते. गगनी अगणित तारकांचा अनुभव प्राप्त होतो. त्याचे मन संपूर्णपणे मुरते. मनातील मिथ्या कल्पना नाहीशी होऊन सत्यज्ञान बुद्धीला(आत्म) होते. द्वैत जाणवणारी द्वैतबुद्धी नाहीशी होऊन बुद्धीतील अंध:कार नाहीसा होतो. हे आत्मप्रकाशाचे दर्शन म्हणजे श्रीदत्तगुरूंचे दर्शन आहे. या प्रकाशरूप श्रीदत्तगुरूंचे वर्णन श्रीचिमडमहाराज असे करतात, ***'भूमी आप वायु तेज व्योम तूचि निर्मिशी। चंद्रसूर्य वर्तताती तूचि त्यासी रक्षिसी।। धरामरा सुरासुरा तू निर्मिसी चराचरा। नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा।। वेदशास्त्र वर्णिती तुम्हासी हो जगत्पती। पुराण सर्व बोलती न जाय कोण दुर्गती। पुराणपुरुष तू खरा तुम्हावीणे न दुसरा। नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा।।'*** हे प्रकाशरूप श्रीदत्तगुरू जे अनुभवतात त्याना बाह्यत: पण श्रीदत्तगुरूंचे दर्शन होते. आमचे श्रीमामा (माझे आजोबा) श्री गणपतराव कानिटकर यांचेकडे औदुंबर येथे गेले असताना दुपारी श्रीदत्तगुरूंसमोर कीर्तन करून संध्याकाळपर्यंत नित्याचे कीर्तनसेवेसाठी सांगलीस यावे असे त्यांना वाटले. पण दुपारी नैवेद्य झाल्यावर श्रीदत्तगुरू विश्रांती घेतात, त्यावेळी तेथे कीर्तनसेवा करता येत नाही असे त्यांना समजले. म्हणून श्रीगणपतराव यांचे घरीच श्रीदत्तगुरूंची कीर्तनसेवा करून सांगलीला संध्याकाळपर्यंत परत यावे व सवडीने श्रीदत्तगुरूंसमोर कीर्तन करावे असे ठरले. श्री गणपतराव यांचेकडे कीर्तनसेवा सुरू करणार येवढ्यात तेथील वेदोनारायण बंडंभटजी ज्यांनी आधी कीर्तनसेवा विश्रांतीचे वेळी करता येणार नाही असे सांगितले होते, ते गणपतरावांचेकडे आले व म्हणाले, ''दुपारचे वेळी मी विश्रांती घेत असताना साक्षात दत्तगुरू माझ्यासमोर उभे राहिले व म्हणाले की दरवाजा उघडा, मी बापूरावांचे कीर्तन ऐकणार आहे. त्यामुळे मी पळत तुम्हाला हुडकत येथे आलो आहे.'' मग आमचे श्रीमामा मंदिरात गेले व विश्रांतीचे वेळीच श्रीमामांचे कीर्तन श्रीदत्तगुरूंसमोर झाले. ही गोष्ट घडली तेव्हा तिथे आमची अंबुमावशी होती. तिने ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवली आहे. श्रीदासराममहाराज या प्रसंगाचे वर्णन असे करतात, ***'धन्य धन्य माझे पिताजी गोविंद। नामकीर्तन छंद जयालागी।। औदुंबर क्षेत्री दर्शनासी गेले। सेवा घ्यावी बोलिले गुरुदत्ता।। माध्यान्हाचे काळी तीनीचे पर्यंत। निजती गुरुदत्त उष्णकाळी।। राजे महाराजे जरी येथे आले। नाही उघडीले द्वार तेथे।। उठोनी बैसले परी दत्तराज। केले पूर्णकाज भक्ताचे ते।। दत्तराजे पुजाऱ्यासी स्फूर्ती दिली। कवाडे उघडली आज्ञेपरी।। दोन वाजताची सुरू झाले कीर्तन। तोषले भगवान गुरुदत्त।। नित्याचे कीर्तन गोविंदरायाचे। पुरविले भक्ताचे मनोरथ।। तबला ना पेटी झांज ना मृदंग। रंग तो श्रीरंग आपण झाला।। भक्तीचा आनंद प्रसाद वाटला। प्रेमे ओवाळीला गुरुदत्त।। नारीकेल प्रसाद दिला पुजाऱ्यानी। श्रोतवृंद मनी आनंदला।। दासराम लागे पितयाचे चरणी। ऐसीया कीर्तनी मन रंगी।।'***

**

# श्रीदत्त जयंती

आज श्रीदत्त जयंती. पाळणा म्हणून सुंठवडा वाटला की झाली का दत्तजयंती साजरी? श्रीदत्तगुरूंचे दर्शन होणे ही खरी दत्तजयंती. श्रीदत्तगुरूंचे दर्शन होणेसाठी श्रीदत्तगुरूंनी आम्ही जेथे आहोत तेथे आले पाहिजे किंवा श्रीदत्तगुरू जेथे आहेत तेथे आपण गेले पाहिजे. तरच ही दत्तभेट शक्य आहे. श्रीदत्तगुरूंनी आम्हाला भेटायला यावे एवढे आम्ही निश्चित मोठे नाही असे मला वाटते. तेव्हा आपणच त्यांचे भेटीस गेलो तरच ही भेट शक्य आहे. साधनेने आपण त्रिगुणरहित (अत्री) झालो तरच असूयारहित अनसूया भेटेल व श्रीदत्तगुरूंचा स्वरूप साक्षात्कार ब्रह्मगिरीस्थानी झाल्यावाचून राहणार नाही. हे दत्तभेटीचे वर्म श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'अत्री अनुसूया धन्य। दत्त जाहले नंदन।। तीनी देव एकरूपी। दासा दर्शन स्वरूपी।।'*** श्रीज्ञानेश्वरमहाराजांना अंतरी हे दत्तदर्शन झाले होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीदत्तगुरूंचे वर्णन असे करतात, ***'पैल मेरूच्या शिखरी। एक योगी निराकारी। मुद्रा लावूनी खेचरी। प्राणायामी बैसला।। तेणे सांडियेली माया। त्यजियेली कंथा काया। मन गेले विलया। ब्रह्मानंदामाझारी।। अनुहतध्वनी नाद। तो पावला परमपद। उन्मनी तुर्या विनोदे। छंदे छंदे डोलतसे।। ज्ञान गोदावरीच्या तीरी। स्नान केले पांचाळेश्वरी। ज्ञानदेवाच्या अंतरी। दत्तात्रेय योगिया।।'.*** प्रकाशरूप सुंदर तारकस्वरूप श्रीदत्तगुरूंचे दर्शनाने ज्यांचे मन वृत्तीसहित मुरते. त्यांना निर्विकल्प अवस्था प्राप्त होते. वृत्तीसहित ज्ञान आणि अज्ञान याचे पलीकडील वृत्तीरहित अखंड ज्ञान - स्मरण - त्यांना प्राप्त होते. ते केवलज्ञानमूर्ती होतात. निवृत्ती अवस्थेत, उन्मनी अवस्थेत ज्ञानाचे विज्ञान होऊन त्यांचा आत्मा अचळ निश्चळ होतो व त्यांना गुरुकृपेने निवांतपणा प्राप्त होतो. ते पूर्ण समाधानी होतात. या भिन्न विश्वात त्यांना जाणीव (ज्ञान) फक्त चैतन्याचीच - आत्मारामाचीच होते. साहजिकच त्यांना देहाची, दृश्याची जाणीव होत नाही. चैतन्याला फक्त चैतन्याची जाणीव, कल्पनेच्या बाहेरचा विषय आहे हे खरे. देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे नामस्मरण - साधन त्यांना अष्टौप्रहर साधते. ते महात्मे नामाची लयलूट करतात. ते जे बोलतील ते ब्रह्मनिरुपणच. श्रीकबीरसाहेब सांगतात, ***'कोई लूटे अन्नदान। कोई लूटे वस्त्रदान। कोई लूटे सुंदर नारी। रामपुरन ध्यान कोई नही लुटे। लुटे कबीर भिकारी।।'.*** हे चारीवाचेपैल अखंडित वाचेने - हरीवाचेने अखंड रामनामस्मरण श्रीतात्यासाहेबमहाराजांनी, श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी साधले व कीर्तनाचे माध्यमातून या रामनामाची लयलूट सांगलीत केली. आजही ही लयलूट त्यांचे सामर्थ्यानि सुरू आहे, सुरू राहणार आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'पेठ वसवली सांगली ग्रामी हरीगुण नामाची। काय मौज त्या पेठेमाजी गर्दी उतारूंची।। एक लक्ष का रूपया देता देती हिरे तेरा। तेरामाजी साठविला तो परमेश्वर सारा।। माल लागला बंदराला अमोलिक पाही। जो तो येतो घेऊनी जातो लक्ष देऊनी पाही।। लुटची करीती घ्या घ्या म्हणती। जेवी तृप्त होई।। कितीही लूटला तरी न संपे माल हा तो बरा। जो तो येतो घेऊनी जातो आनंदुनी घरा।। पेठ वसविली सांगली ग्रामी हनुमंतरायानी। छत्तीस वर्षे लुटुनी लुटले घ्या म्हणती कोणी।। रामबाळ हा आनंदुनी नाचत हो गेला। मौक्तिकाचा चुरा पाहोनी अंतरी घेऊनी आला।।'.*** राजकवी श्रीसाधुदास, श्रीतात्यासाहेबमहाराजांचे चरित्राचे लेखक यांचे सांगण्यावरून भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांचे चरित्रात समाविष्ट करणेसाठी तत्काळ हे काव्य श्रीदासराममहाराजांनी लिहून श्रीगणपतराव कानिटकर यांना दिले. श्रीसाधुदासांना ते खूप आवडते. साहजिकच हे काव्य चरित्रात समाविष्ट झाले आहे.

**

# रामनाम

आमचे श्रीमामांचे रामनाम हे साधायचे असून करायचे नाही आहे. आम्ही जो जप करतो व जप केल्याचा अहंकार बाळगतो तो जप आमचे श्रीमामांना अपेक्षित नाही. सहजकृती हे रामनाम साधले तर पवन साधतो व साधनाने पवन साधला तर सहजकृती हे रामनाम साधते व मग अनुभवाच्या खुणा प्राप्त होतात. साधनाने पवन कसा साधावा हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'कैसा पवन साधावा। स्थिर करूनी नामी लावा।। घेऊन सोडणेचे आधी। स्थिर करूनी कुंभक साधी।। जैसा जैसा वाढे काळ। पवन विजयाचे बळ।। वाढे दासाचे अंतरी। गुरूकृपे साक्षात्कारी।।'*** काय स्थिर करून नामाचे ठिकाणी लावायचे हे समजले तर अर्थ कळेल, परमार्थ कळेल नाहीतर अनर्थच ओढवेल. अहो मन श्वासावर स्थिर करून नामाचे ठिकाणी लावा म्हणजे मनोवृत्तीचा निरोध साधला तर जीवनात पवन साधेल. श्वास घेऊन सोडणेचे आधी मनोवृत्तीचा निरोध करा. साहजिकच केवलकुंभक साधून नामाचे (चैतन्याचे) स्मरण होईल. ***('मनोवृत्तीचा निरोध करूनी। नाम सदा आठवी।।'- श्रीमामामहाराज)*** प्रत्येक श्वासाला हा मनोवृत्तीचा निरोध साधून नामाचे स्मरण (चैतन्याची जाणीव) झाले तर नामस्मरणाचा काळ वाढून पवनविजय प्राप्त होऊन काळावर मात करता येणार आहे. ***('श्वासोच्छ्वासी नाम साधुनी। काळाला हटवी।।'- श्रीमामामहाराज, 'प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्वे तत्व सारिता पवनसिद्धी।।'- श्रीदासराममहाराज)*** अशा तऱ्हेने साधनात - प्राणापानात - मन घटले, मनाचे मिलन झाले तर अद्‌भुत भावबळ प्राप्त होऊन परमेश्वराचा (रामांचा) अनुभव येऊन विश्वासाने - विशेष श्वासाने रामदास होणार आहोत. ***('साधनी घटता ते बळ अद्‌भूत। दासाची पदवी।।'- श्रीमामामहाराज, 'पवनसिद्धी होता प्रगटे आत्माराम। येतसे निष्कर्म हातालागी।।'- श्रीदासराममहाराज, 'जो जो भजनी रंगला। तो तो रामदास झाला।।', 'भजन साधन अभ्यास। येणे पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे।।' - श्रीसमर्थ)*** मनोवृत्तीचा निरोध साधल्यावर (मनाचा लय साधल्यावर) अहंकार (मीपणा) नाहीसा होतो व मनातील अहंबुद्धी - दुर्बुद्धी - देहबुद्धी पण नाहीशी होते व समत्वाने रामजप साधतो. ***('आपण कल्पिले मीपण। मीपण शोधिताची नुरे जाण। मीपण गेलिया निर्गुण। आत्माची स्वये।।'- श्रीसमर्थ, 'दुर्बुद्धी ते मना। कदा नुपजो नारायणा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'राम राम जप समत्वे साधावा। अहंकार टाकावा अहंबुद्धी।।' - श्रीनिवृत्तीनाथमहाराज)*** साधनाभ्यासाने ही जाणीवेत मनोलयाने प्राप्त होणारी कामक्रोधरहित अभिमानरहित अवस्था म्हणजे रामनामाची अवस्था कोणत्याही परिस्थितीत न ढळणे म्हणजे तीन अवस्थांची एक अवस्था होणे होय. ***('राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोची नये।।'- श्रीसमर्थ)*** या रामनामाच्या अवस्थेला सहजसमाधी, हरीसमाधी, नामसमाधी म्हणतात. या समाधीबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'समाधी हरीची समसुखेवीण। न साहेल जाण द्वैतबुद्धी।'*** **तर श्रीमामामहाराज या नामसमाधीबद्दल असे सांगतात,** ***'समाधीचे सुख सांडी ओवाळोनी। रामनामवाणी वदे जरी।। समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे।। सदा सर्वकाळ अंतरी अढळे। कदापि न ढळे तेची साधी।। गोविंद म्हणे ऐसी समाधी साधिता। वैकुंठ ये हाता अनायासे।।'***

✻✻

# एकांत

आधी एकांत साधावा लागतो, तो मानवावा लागतो. तो मानवला तरच हे रामनामाचे सुख हळूहळू प्राप्त होते. श्रीसमर्थ सांगतात, ***'चाळणा करावी सर्वही। एकांती राहता बरे। एकांत मानला ज्याला। त्याला साधे हळूहळू।।'.*** म्हणून एकांतप्रिय माणसांना परमार्थ साधतो. याकरताच श्रीतुकाराममहाराजांनी भामनाथाचे डोंगरावर राहणे पसंत केले. तेथील पक्षी, वृक्षवल्ली, वनचरे यांच्याशी सोयरीक केली, तर श्रीसमर्थांनी शिवथरघळ येथे डोंगरी राहून विश्वाची (विश्व नाम चैतन्याची) शोभा पाहिली. श्रीसमर्थांना 'रामकृपेची वचने' अर्थात तो हा दासबोध स्फुरली ती शिवथरघळीतच. ***('वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।।'- श्रीतुकाराममहाराज, 'दास डोंगरी राहतो। शोभा विश्वाची पाहतो।।'- श्रीसमर्थ)*** उगेपणाने साक्षीभावाने एकांतात येण्याजाण्याच्या क्रियेकडे - जन्ममरण या क्रियेकडे समजून पाहिले तर त्रिगुणाचे पैल निर्गुणी निश्चळ सुख - विदेही सुख प्राप्त होणारे आहे. ***('येणे सुखे रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष अंगा येत।।'- श्रीतुकाराममहाराज, 'उगाच येकांती बैसावे। तेथे हे समजून पाहावे। अखंड घ्यावे सांडावे। प्रभंजनासी।।'- श्रीसमर्थ, 'जन्ममरण देखे देही। तरीच होशील विदेही।।'- श्रीदासराममहाराज)*** म्हणून सर्व संतांनी जगापासून चार हात लांब राहणेच पसंत केले. म्हणून संतांची राहण्याची ठिकाणे गावाबाहेर. आता ती लोकवस्ती वाढल्याने गावात आली आहेत हा भाग वेगळा. ***('बहु एकांतावरी प्रिती। जया जनपदाची खंती। जाण मनुष्याकारे मूर्ती। ज्ञानची तो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका।।'- श्रीदासराममहाराज)*** अहो बाहेरचा सूक्ष्म नाद ऐकावयाससुद्धा गोंगाट असून चालत नाही मग हा अंतर्यामी श्रुत होणारा चैतन्याचा नाद गोंगाटात कसा ऐकू येईल? गोंगाटात आमचे लक्ष अलक्षात कसे लागणार? आमचे लक्षात लक्ष राहणार. श्रवण गोंगाटाचेच होणार. ***('रामनाम ध्वनी उमटे। तेथे लक्ष लावी नेटे।।'- श्रीबांदकरमहाराज)*** हा संतांनी साधलेला एकांत आपण पण साधावा म्हणून आम्ही पण एकांताचे ठिकाण शोधतोय. चार ठिकाणी जाऊन पण आलो. पण एकांत साधेना. अहो आम्ही दृश्य डोळ्यासमोर नको म्हणून गावाबाहेर गेलो पण डोळ्यासमोरील दृश्य काही हालले नाही. अर्थात जाणीव द्वैताचीच. मग एकांत कुठला? गोंधळापासून लांब शांत ठिकाणी गेलो पण डोक्यातला गोंधळ संपत नाही. मग कसा एकांत साधणार? ***('झाला संसार गोंधळी। केवी भेटे घनसावळी।।'- श्रीमामामहाराज)*** सद्गुरूंनी मार्ग दाखविला. देहाचा, मनाचा लय साधणारे साधन सांगितले व ते जर आपण मनापासून साधले तरच हा एकांत साधतो. ***('सद्गुरू एकांतासी नेतो। हस्त शिरी ठेवतो।। तनुमन घेवुनिया जातो। जीव मारूनी जिववितो।।'- स्वामी निरंजन रघुनाथ, 'देह माझे मन माझे अवघे नेले गुरुराजे। आम्ही गुरुनाथपंथी सोपानमार्गे गेलो एकांती।।'- श्रीसंतवेणाबाई)*** हा एकांत म्हणजे नेमके काय आहे? व तो केव्हा साधतो हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***'एक असे आत्मा ज्यात आदीअंत। तो स्वये एकांत ओळखावा।।', 'जीवशिव एक होत। जयेठायी तो एकांत।।'.*** हे एकांतातले रामनाम ज्याला साधते त्याला लोकांतात रामनाम साधते. त्यालाच देहत्यागाअंती रामनाम साधते. ***('हरीबोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।'- श्रीनाथमहाराज)*** आमचे श्रीमामामहाराजांनी हे श्रीनाथवचन आचरून दाखविले याची प्रचिती सर्वांनी घेतली आहे. श्रीदासराममहाराज त्यांचेबाबतीत त्यांचे निर्याणाचे अभंगात सांगतात, ***'एकांती लोकांती देहांतीही नाम। प्रचिती उत्तम स्वये दिली।।'.*** असे नामरूप महात्मे नामरूपाने अजरामर होतात.

**

# एकवीध

गुरुकृपेने अभ्यासाने जीवाने शिवाला पाहणे, जीवाने शिवरूप होणे हा एकांत वेळोवेळा अखंड अनुभवणे व सतत रामनामाचा (चैतन्याचा) ध्वनी श्रवण होणे म्हणजे रामनामी एकवीध होणे होय. ***(‘जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञान अंधार निरसी। जीवात्मयासी शिवात्मयासी। ऐक्यता करी।।’, ‘अखंड येकांत सेवावा। अभ्यास करीतची जावा। काळ सार्थकची करावा। जनासहित।।’- श्रीसमर्थ, ‘एक असे आत्मा ज्यात आदीअंत। तो स्वये एकांत ओळखावा।। गोविंद म्हणे तयास्थानामाजी जाता। रामनाम वार्ता दूर नसे।।’, ‘जीव शिव एक होत। जये ठायी तो एकांत।।’- श्रीमामामहाराज, ‘आपुलिया जीवे शिवासी पहावे। आत्मसुख घ्यावे वेळोवेळा।।’- श्रीतुकाराममहाराज)*** जसे पतिव्रता स्त्री सतत पतीचाच विचार करते, त्याप्रमाणे संतमहात्मा सतत चैतन्याचा अनुभव घेतो. दृश्य पदार्थ त्या निर्मळांना स्पर्शत देखील नाही. अशा एकवीध संतांचे देव माता होऊन रक्षण करतो. देव त्यांचा सखा होतो. साहजिकच विश्वही त्यांचेवर कृपाच करते. ***(‘तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाची नाही।।’- श्रीसमर्थ, ‘रामनामी एकवीध होऊनी राही। पतिव्रता पाही पतिलागी।। मग देव तुझा करील सांभाळ। जैसी माता बाळकासी जपे।। तरो अथवा बुडो नाम न सोडीन। प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी।। गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी। आणिका प्रकारी काय काज।।’- श्रीमामामहाराज, ‘पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हा नारायण तैशापरी।। तुका म्हणे एकवीध झाले मन। विठ्ठलावाचून नेणे दुजे।।’- श्रीतुकाराममहाराज)*** श्रीमामामहाराजांनी रामनामात सारे काही पाहिले तर श्रीदासराममहाराजांनी सारे काही चैतन्याच्या वाऱ्यात पाहिले. श्रीमामामहाराजांनी सर्व पुण्यात श्रेष्ठ पुण्य रामनामात पाहिले. रामनाम हेच ज्ञान, रामनाम हेच धन, रामनाम हेच भाग्याचे भाग्य, तपाचे तप, सुखाचे सुख, मूळस्वभाव, जीवनाची कृतकृत्यता सारे काही रामनाम. कोणताही विषय असूदे, हे सारे काही रामनामाने होते, असे ते कीर्तनात सांगत. गुढीपाडव्यापासून शिमग्यापर्यंत कोणताही सण पर्वकाळ असू दे, त्यात त्यांनी रामनाम पाहिले. श्रीमामामहाराजांची ‘अमृतवाणी’ ही अभंगाची गाथा पाहिली असता, हे लक्षात आल्यावाचून राहणार नाही. तर श्रीदासराममहाराजांची सारी कीर्तने चैतन्याभोवती फिरत. चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूती घेणे म्हणजे निखळ परमार्थ आहे असे त्यांचे सांगणे होते. त्यांचे परमार्थात देह कुठेही आडवा येत नाही. म्हणजे श्रीमामांचे व श्रीदादांचे सांगणे वेगळे आहे असे आपणास वाटेल. पण तसे काही नाही. श्रीमामांचे रामनाम म्हणजेच श्रीदादांचे चैतन्य. फक्त शब्दातला फरक इतकेच. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***‘तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम।।’.*** ही एकवीधता तीन प्रकाराने साधता येते असे श्रीदासराममहाराज सांगत. ते तीन प्रकार असे - १)एकात सगळे २) सगळ्यात एक ३) सगळे एक. यातील पहिला प्रकार सर्वश्रेष्ठ असून दुसऱ्या प्रकारात शक्ती विभागली जाते. अर्थात एकवीधतेचा जोर कमी होतो. तिसऱ्या प्रकारात ‘कवठा क्या और कुमठा क्या’ असे होते. त्यामुळे त्या एकवीधतेला काहीच अर्थ राहात नाही. अखंडित वाचेने श्रीरामस्मरण (चैतन्याची जाणीव) हेच त्यांचे नित्याचे कीर्तन होते. तेच त्यांनी शेवटपर्यंत साधले. श्रीमामामहाराजांचे चरित्र एका ओवीत सांगायचे झाले तर असे सांगता येईल, ***‘अखंड ध्यान श्रीरामाचे। अखंड पूजन श्रीरामाचे। अखंड कीर्तन श्रीरामाचे। हेचि गोविंद चरीत्।।’ (गोविंदचरितमानस).*** बदल न होणाऱ्या या एका रामनामाशी एकी होऊन एकाएकी ते बदलणाऱ्या बहुवीध सर्वापेक्षा निराळे झाले. ***(‘एकवीध आम्ही न धरू पालट। न संडू ते वाट सापडली।।’, ‘एकाएकी एकाएकी। तुका लोकी निराळा।।’- श्रीतुकाराममहाराज)***

**

# प्रपंच

रामनाम एकांतात एकविधतेने अहर्निशी साधले, म्हणजे साधनाने तिन्ही अवस्थांची एक अवस्था होऊन शुद्ध सत्वाचे साहाय्याने तुर्यावस्थेत सतत चैतन्याचीच जाणीव राहिली तर मनातील त्रिगुणाचे माध्यमातून देहाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तीन अवस्था, तीन देह, त्रिविध भोग, त्रिविध भोक्ते हा प्रपंच उरत नाही. हे रामनाम जर अहर्निशी साधले नाही तर मात्र हा प्रपंच सुटत नाही. मनात असणाऱ्या त्रिगुणांमुळे जगाची जाणीव होते. जगाच्या जाणीवेने कामक्रोधादी षड्विकार हे सायास दिननिशी होणे हा प्रपंच साधतो पण हरीभजन साधत नाही. लग्न झाल्यावर जो आम्ही प्रपंच करतो, तो सोडायचा नाही आहे, तो सोडून परमार्थ साधेलच असे नाही. तो कोणाही संतांनी सोडल्याचे आढळत नाही. जगाच्या नेणीवेने व चैतन्याच्या जाणीवेने कामक्रोधादी षड्विकारात्मक आयास-सायास- नाहीसे होणे म्हणजे प्रपंचाचा त्याग व हरीभजनाचा आस्वाद आहे. नेमका प्रपंच म्हणजे काय हे संत श्रीमुकुंदराज असे सांगतात, ***'त्रिविध देहे त्रिविध अवस्था। त्रिविध स्थाने त्रिविध भोग त्रिविध भोक्ता। येया प्रपंचाते तत्साक्षीत्वे जाणौनी वेवस्था। ते तुरीया जाणावी।।'.*** ह्या तीन अवस्था प्राप्त होणे हे त्रिगुणाचे लक्षण आहे. जोवर या तीन अवस्था व्यवस्थितपणे प्राप्त होत आहेत तोवर त्रिगुण सुटलेले नाहीत, जगाची जाणीव गेलेली नाही अर्थात दिननिशी सायास हा प्रपंच सुटलेला नाही असे समजावे. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'क्षणा जागृती क्षणा सुषुप्ती। क्षणैक स्वप्नाची प्रचिती। हे त्रिगुणाची मिश्रित वृत्ती। जाण निश्चिती उद्धवा।।'.*** मग संतांना या तीन अवस्था प्राप्त होतात की नाही? होतात ना, पण या तीनही अवस्थेत जाणीव; एका चैतन्याचीच, त्यांना असते. आमचे ज्ञान अवस्थेप्रमाणे बदलणारे असते. स्वप्नातले ज्ञान वेगळे, जागृतीतील ज्ञान वेगळे, झोपेतील 'नेणे ब्रह्म नेणे माया' हे अज्ञान वेगळे. त्या त्या अवस्थेत ते ते ज्ञान खरे वाटते. अवस्था बदलली की ते खोटे वाटते. आमचे हे अवस्थेप्रमाणे बदलणारे ज्ञान - विपरीत ज्ञान, किंवा अज्ञान, व संतांचे न बदलणारे ज्ञान हे खरे ज्ञान - सत्यज्ञान. म्हणून अज्ञानाने विपरीत ज्ञानाने होतो तो प्रपंच व सत्यज्ञानाने होतो तो परमार्थ. प्रपंच हा कल्पनेचा, अज्ञानाचा पडदा आहे की ज्यामुळे रामदर्शन होत नाही. श्रीसमर्थ सांगतात, ***'प्रपंच पडदा पडली झापड। राम दिसेना डोळा रे।। दिवसा निजू निजू रात्री निजू निजू। निज निज व्यर्थची गेले रे।। दिवसा झोपी रात्री झोपी। झोपेने दिधला टोला रे।। रामदास म्हणे व्यर्थची गेले। सार्थक नाही केले रे।।'.*** आम्ही दिवसा झोपतो का? दिवसा तरी आम्ही जागे असतो ना? मग हे समर्थ काय म्हणतात? अहो चैतन्याचे अज्ञान ही संतांचे दृष्टीने झोपच. म्हणजे अज्ञान व अज्ञानातून निर्माण होणारे विपरीत ज्ञान हेही अज्ञानच आणि हाच तो पडदा आहे प्रपंचाचा. हा एकदम दूर होत नाही. हा हळूहळू दूर करायचा असतो पण तो दूर झाल्याशिवाय परमार्थ नाही. म्हणून आधी सावध होऊन प्रपंच करा, तो नेटका करा मग हळूहळू त्याचा त्याग करा. श्रीसमर्थ सांगतात, ***'प्रपंची जो सावधान। तोचि परमार्थ करील जाण। प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।', 'आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका। येथे आळस करू नका। विवेकी हो।।', 'प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणे तुम्ही कष्टी व्हाल। प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी।।', 'वैराग्ये करावा त्याग। तरीच परमार्थ योग। प्रपंचत्यागे सर्व संग। परमार्थ घडे।।'. 'न गमे दिवस राती। अखंड लागलीसे ज्योती।।'*** असे होणे म्हणजे प्रपंचाचा त्याग व परमार्थाचा योग होणे होय.

**

# उपाधी

आपले जीवन हे श्वसनाच्या उपाधीत सापडले आहे म्हणून त्या जीवनाला श्रीदासराममहाराज 'उपाधीभूत जीवन' संबोधत. काही माणसे श्वासोच्छ्वासालाच 'उपाधीभूत जीवन' म्हणतात. पण तसा त्याचा अर्थ नसावा असे मला वाटते. श्वास व उच्छ्वास यांना लागणाऱ्या काळाला आयुष्य म्हणतात. म्हणून श्वासोच्छ्वासाला आयुष्याचे साधन म्हणतात. श्वास आत घेणे हा जन्म व श्वास बाहेर सोडणे हे मरण तर श्वास व उच्छ्वास यामधील संधीकाळाला म्हणजेच जन्म व मरण यामधील काळाला 'जीवन' म्हणतात. म्हणून ते उपाधीभूत जीवन. या जीवनामध्येच नामाची धारणा होते. जन्ममरणरहित अवस्था म्हणजे जीवन. संत महात्मे जीवन जगतात तर आपण आयुष्य जगतो. श्वासोच्छ्वास हे जीवनावश्यक आहेत. श्वास म्हणजे जीवन नव्हे. श्वासोच्छ्वास (जन्ममरण) ही क्रिया एकापाठोपाठ एक सतत होत असल्याने कोणी रडत नाहीत किंवा कोणी आनंद व्यक्त करीत नाही. उपाधी वाढली की जीवन कमी व उपाधी कमी झाली तर जीवन जास्त. अर्थात जीवन जास्त हवे असेल तर उपाधी कमीत कमी हवी. जेवढ्या बाहेरील उपाधी जास्त तेवढी श्वसनगती जास्त, जीवन कमी, जीवनाचा आनंद कमी. म्हणून बाहेरील उपाधी कशी सांभाळावी हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'काही उपाधी करू नये। केली तरी धरू नये। धरीली तरी सापडो नये। उपाधीमध्ये।।'.*** जेवढ्या उपाधी जास्त, त्यात गुंतणे जास्त, तेवढे शारीरिक व मानसिक कष्ट जास्त, तेवढी श्वसनाची गती वाढते, उपाधी वाढते. अहो काम वाढले की गती वाढवावीच लागते. त्याशिवाय काम कसे पूर्ण होणार? गती वाढली की अपघात होण्याची शक्यता जास्त. म्हणून मनाला ब्रेक हवा, मनाची धावाधाव कमी हवी. 'मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक', 'गती बढाना जीवन घटाना' हे महामार्गावर असणारे संदेश जीवनप्रवासात बोधप्रद ठरतात. हे काळ काम वेगाचे गणित सुटले पाहिजे. गती वाढली की काळ श्वास (आयुष्य) खातो. मनाचे चंचळत्व नाहीसे झाले, मन एकाग्र झाले की श्वसनाची उपाधी कमी होऊन जीवन वाढते. आतील आशा, दुराशा, कल्पना नाहीशी झाली तर जन्मदारिद्र्य नाहीसे होते. उपाधी कमी होते. देहबुद्धी कमी होते. वृत्ती संथ होऊन तो संतच होतो. ***('येकाग्र करोनिया मन। बळेची धरावे साधन। यत्नी आळसाचे दर्शन। होऊच नये।।', 'करी वृत्ती जो संथ तो संत जाणा। दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा। उपाधी देहबुद्धी ते वाढविते। परी सज्जना केवी बाधू शकेते।।'- श्रीसमर्थ, 'चंचळाचे गुणे। झाले उपाधीचे लेणे।।'- श्रीदासराममहाराज)*** मनाची गती कमी होण्यासाठी, श्वसनाच्या गतीकडे - साधनाकडे - सतत लक्ष हवे. श्वसनाची मुळगती कल्पनेने वाढत नाही ना याकडे लक्ष पाहिजे. श्वसनाची गती कमी झाली की मनाची गती कमी होऊन मन मारून उन्मनी प्राप्त होणारी आहे. ***('साधनी मन घटवी बा रे। साधनी मन घटवी।।'- श्रीमामामहाराज, 'विषय ते मनाअधीन। मन पवनासी वश्य जाण। अभ्यासे वश केला पवन। सहजे मन स्थिरावे।।'- श्रीनाथमहाराज, 'बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवन सहजे गगना। मिळोची लागे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साधनाच्या अभ्यासाने मनोवृत्तीचा निरोध साधला असता केवलकुंभकाने वृत्तीसहित ज्ञान अज्ञानाचे पैल वृत्तीरहित अखंड जीवन अखंड स्मरण प्राप्त होते. तीन अवस्थांची एक अवस्था होते. प्रपंचाची उपाधी नाहीशी होते. एकदशेने त्याला विश्वरूप दर्शन होते. अखंड स्मरणाने - जाणीवेने - जाणीवेचा ग्रास होऊन तो जाणीवरहित जाणता होतो, मुक्त होतो, भक्त होतो.

**

# भक्त

सर्वसाधारणत: प्राध्यान्याने भक्तीमार्ग आचरून जो परमात्मरूप होतो तो भक्त, जो ज्ञानमार्ग आचरून परमात्मरूप होतो तो ज्ञानी, जो योगमार्ग आचरून परमात्मरूप होतो तो योगी. योगी, ज्ञानी, भक्त एका देहातीत वस्तूशी - अद्वैताशी समरस होऊन एक वस्तूरूप झालेले असतात. तेथे कोणताही भेद राहात नाही. भक्त हा ज्ञानी, योगी असतोच. श्रीसमर्थांनी श्रीदासबोध या ग्रंथात जो भक्तीमार्ग आचरिला तोच सांगितला. पण दासबोधात ज्ञान, योग हे विषयही आवश्यकतेनुसार आलेले आहेतच. श्रीसमर्थ ज्ञानी आणि योगी पण होते. अहो शब्द बदलले, अर्थ तोच. मार्ग कोणताही असो परमात्मरूप होणे महत्त्वाचे. श्रीदासराममहाराज कीर्तनात भक्त म्हणजे काय हे असे सांगत, ***'विभक्त नव्हे तो भक्त'.*** श्री स्वामी स्वरूपानंद हाच आशय त्यांचे अभंगात असा व्यक्त करतात, ***'तोची एक भक्त नव्हे जो विभक्त। राहे योगयुक्त अखंडित।। होऊनिया देव करी देवपूजा। जरी तो सायुज्या पातलाची।। साधिले स्वहित गाठिले अद्वैत। तरी भक्तीपंथ सोडेचिना।। स्वामी म्हणे भक्त ईश्वराचा प्राण। ईश्वरप्रमाण भक्तातेही।।' .***'देह म्हणजे मी' या अहंकाराने आपण आत्म्याशी परवत् - परक्याप्रमाणे वागतो. हे पर्वताप्रमाणे होणारे पातक आपणास विभक्त - अभक्त ठरविते. ***('विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी।। निजस्मरणी होय भक्त। जेथे नाही द्वैताद्वैत।।' - श्रीदासराममहाराज, 'पर्वताप्रमाणे पातक करणे। वज्रलेप होणे अभक्तासी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** **भक्त कसा ओळखावा हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात,** ***'भक्त ऐसे जाणा जे देही उदास। गेले आशापाश निवारोनी।। विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे धनजन मातापिता।।', 'निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म। निर्धार हे वर्म चुको नये।।'*** **तर श्रीनिळोबारायमहाराज भक्तलक्षण असे सांगतात,** ***'भक्त म्हणावे तयासी। न गुंते जो आशापाशी।। अहंकार निरसिला। देहभाव पालटला।। निंदा स्तुती हे नावडे। पाहता परब्रह्म आवडे।। निळा म्हणे तया ध्याता। स्वानंद तो येत होता।।'*** तर श्रीनाथमहाराज भक्तवर्णन असे करतात, ***'हरीचरणी अपरोक्षस्थिती। तेथील क्षणार्धाची जे प्राप्ती। त्यापुढे त्रिभुवन विभव संपत्ती। भक्त मानिती तृणप्राय।।', 'स्वकर्मधर्म वर्णाचार। करिताही निजव्यवहार। ज्यासी सर्वाभुती मदाकार। तो भक्त साचार माझा।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज भक्ताचे श्रेष्ठत्व असे सांगतात, ***'हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीती रसाचा वोतला भावो। म्हणोनि भक्तामाजी रावो। आणि ज्ञानिया तोची।।'.*** देवरूप झालेल्या भक्ताबद्दल देवाचे मनात आत्यंतिक प्रेम असते. निरभिमानी भक्ताचा देवाला अभिमान असतो. विश्वाची चिंता वाहणाऱ्या भक्ताची देव चिंता वाहतो. मनात येणारे सत्यसंकल्प देव पुरे करतो. ***('भक्ताचेनि साभिमाने। कृपा केली दाशरथीने। समर्थकृपेची वचने। तो हा दासबोध।।', 'भक्ते जे मनी धरावे। ते देवे आपणचि करावे। तेथे वेगळे भावावे। न लगे कदा।।'- श्रीसमर्थ, 'एऱ्हवी तरी माझिया भक्ता। आणि संसाराची चिंता। काय समर्थाची कांता। कोरान्न मागे।।', 'दोवरी दोनी। भुजा आलो घेऊनी। आलिंगावया लागुनि। भक्तराज।।', 'मग यावरीही पार्था। माझा भजनी आस्था। तरी तयाते मी माथा। मुकुट करी।।', 'तेही प्राणापरौते। आवडती हे निरुते। जे भक्त चरित्राते। प्रशंसिती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# स्थिरभाग्य

अस्थिर गोष्टींपासून जे भाग्य मिळते ते अस्थिर भाग्य, न टिकणारे भाग्य होय. संसार हा अस्थिर आहे. अस्थिर संसारात जे भाग्य मिळते ते अस्थिर, न टिकणारे असते. संसारात जर भाग्य मिळाले तर ते कसे टिकेल याची चिंता, कसे अजून वाढेल याची चिंता व जर भाग्य प्राप्त झाले नाही तर ते कसे मिळेल याची चिंता अर्थात हे भाग्य मिळाले तरी किंवा न मिळाले तरी चिंता संपत नाही. जे चिंता वाढवते, त्याला भाग्य कसे म्हणायचे? भाग्य ते; जे साऱ्या चिंता मिटवते व पूर्ण समाधान होते. जो स्थिर टिकणारा परमेश्वर आहे, त्याच्यापासून जे भाग्य मिळते ते स्थिर भाग्य, अवघ्या चिंता मिटवणारे असते. स्थिर भाग्याने अंत:करणात कोणतीही इच्छा राहात नाही. ***('तगत नाही तगत नाही तगत नाही काही। तगत एक देव निरंजन अनन्य तेथे राही।। नाना राजे भाग्य विराजे वैभव साजे मोठे। संपत्ती विपत्ती दो दिवसाची सकलही माईक खोटे।। तारुण्य, लावण्य, रूप मनोहर सुंदर सुखकरीता हे। शेवट नासे वाईट दिसे अंती सकळ राहे।। माईक माया सांडूनी काया दृढ धरी रघुराया। दास म्हणे सुख सकल पावसी साधन थोर उपाया।।'- श्रीसमर्थ, 'स्थिरवील्ल संसार नरजन्मदोळ्ु बंदु। परतत्व तिळिदु साधुर संगियागो नी।।'-भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज, 'उजळले भाग्य अवघी चिंता वारली। संतदर्शनी हा लाभ पद्मनाभ जोडिला।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाभ्यासाचे निश्वास १५ अंगुळावर आला तर जीवनाला स्थिरता प्राप्त होते. पुढे जसा साधनाभ्यास वाढतो तसे सर्वसाक्षी मनाला आत्म्याचे निरनिराळे अनुभव प्राप्त होतात. निश्वासाचे प्रमाण अत्यल्प उरले असता जीवन उर्ध्वमुख होऊन साधक अलक्ष साक्षात वस्तूचे ठिकाणी स्थिर होतो. ***('पंधरा अंगुळे नि:श्वास वहाता। तरी ये स्थिरता सहजेची। उर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार। दासराम स्थिर अलक्षात्।'- श्रीदासराममहाराज.)*** नादश्रवणी तदाकारता साधली तर चैतन्याचे वारेच नयनात भरते. दाही दिशांना चित्प्रकाश - प्रकाशावेगळा नवलप्रकाश अनुभवाला येतो. मन संपूर्णपणे मुरते. त्याचे जन्मदारिद्र्य नाहीसे होते. चिंता नाहीशी होऊन तो निश्चिंत होतो. त्याला निजधन हे स्थिर भाग्य प्राप्त होते. आत हृदयात नारायण म्हणजे भ.स.श्रीनिंबरगीकरमहाराज आहेत हे जर अनुभवाला आले तर समाधानाला सर्वसुखाला काय कमी राहणार? म्हणून आपण लक्ष्मीच्या मागे न लागता लक्ष्मी ज्याची आहे अशा नारायणाचे ठिकाणी स्थिर व्हावे. ***('उजळले भाग्य दाही दिशा चित्प्रकाश गे। कृष्ण नवरा झाला आता कवणाची आस गे।।'- संतवचन, 'अंतरी वसता नारायणे। लक्ष्मीस काय उणे। ज्याची लक्ष्मी तो आपणे। बळकट धरावा।।'- श्रीसमर्थ, 'नारायण श्रीमंत आमुचा नारायण श्रीमंत। दारिद्र्याचा लेश नसे ज्या लक्ष्मीपती गुणवंत।।'- श्रीमती चितळे)*** म्हणून ज्यांना श्रेष्ठ आत्मलाभ होतो ते बाहेरील अस्थिर भाग्याचे मागे लागत नाहीत. ***('जो आत्मलाभासारिखे। गोमटे काहीच न देखे। म्हणोनि भोगविशेखे। हरिखेना जो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# भला

रामनाम हे एकांतात एकवीधतेने साधले तर प्रपंचाची उपाधी नाहीशी होते. स्थिरमनाने भाग्य उजळून संसाराची चिंता नाहीशी होते. अशा भक्ताला भलेपणा प्राप्त होतो. भक्त होणेसाठी रामभक्ती घडायला हवी. रामभक्ती मनाला मानवली तर रामभक्तीने रामरूप होऊन - भक्त होऊन - भलेपणा प्राप्त होणार. ***('रामदास म्हणे भले। हरीभक्ती उद्धरिले।।'- श्रीसमर्थ, 'एका जनार्दनी भले। हरीभक्ती मानवले।।'- श्रीनाथमहाराज)*** रामरूप होणेसाठी मनात रामनामाचे प्रेम निर्माण व्हावे लागेल अर्थात विषयांचे प्रेम कमी व्हावे लागेल. ***('त्यजोनिया कनककांता। नाम जडले ज्याचे चित्ता।। तोचि जगामाजी भला। ओळखील परमेशाला।।'- श्रीदासराममहाराज, 'गोविंद म्हणे भले। भले घेताची चांगले।।'- श्रीमामामहाराज)*** हरीभक्तीस सादर होणेसाठी मरणाचे स्मरण घडले पाहिजे. मरणाचे स्मरण होणे म्हणजे आपण मरणार आहोत हे समजणे नव्हे. हे सर्वांना माहीत आहेच की पण हरीभक्ती कुठे घडतीय? मरणाचे स्मरण घडणे म्हणजे ध्यानात जाणीवेत मरणाची अवस्था भोगणे. मरणाच्या अवस्थेत नामाची - चैतन्याची जाणीव राहणे होय. ***('मरणाचे स्मरण असावे। हरीभक्तीस सादर व्हावे। मरोन किर्तीस उरवावे। येणे प्रकारे।।'- श्रीसमर्थ, 'हरीचे नाम हरीची कीर्ती। साधुसंती गायिली।।'- श्रीतुकाराममहाराज)*** 'तनू त्यागिता कीर्ती मागे उरावी' म्हणजे मरणोत्तर कीर्ती व्हावी असा त्याचा अर्थ नसून देहाचे विस्मरण झाल्यावर परमात्म्याची जाणीव व्हावी हा त्याचा अर्थ आहे असे मला वाटते. 'मेल्यावर खरे साधन सुरू होते' असे श्रीदासराममहाराज सांगत ते या अर्थाने. श्रीज्ञानेश्वरमहाराज हाच विचार असा मांडतात, ***'देह बळी देऊनी साधिले म्या साधन।'.*** अहो, देहभाव विरणे हे साधनातील वर्म आहे. देह म्हणजे मी हा खोटा मीपणा नाहीसा होऊन खऱ्या 'मी'ची जाणीव निर्माण झाली, खऱ्या 'मी'चे ज्ञान झाले तर षड्विकार हे देहाला चिकटले असून खऱ्या 'मी'ला हे विकार नाहीत याचे ज्ञान त्याला होते. देहाबद्दलचे प्रेम कमी होऊन मूळस्वरूपावर प्रेम जडते. देवपण प्राप्त होऊन त्याला भलेपणा प्राप्त होतो. ***('जाणता तो भला। खरे खोटे कळे ज्याला।।', 'तोचि ज्ञानी भला। अहंकार ज्याचा गेला।।', 'तोचि ज्ञानी भला। षड्विकार नाही ज्याला।।', 'नामधारक तो भला। नाम एक देव त्याला।।'- श्रीमामामहाराज, 'मीपण सांडोनी ओळखी मीपण। तरी देवपण प्राप्त होय।।'- श्रीदासराममहाराज)*** देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण या नामस्मरणाने - बरव्या साधनाने निश्वासाला प्रमाण येऊन नादश्रवणी तदाकारता साधली की चैतन्याचे वारेच नयनात भरते. अद्वैती समरस होऊन तो संत जगात भलेपणा मिळवतो. ***('त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला। योग जो साधिला साधन बरवे। बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अशा भल्या संतांचे संगतीत श्रेष्ठ असा आत्मलाभ होतो. ***('होत असे लाभ भल्याचे संगती। जाय अधोगती दुष्टसंगे।।'- संतवचन)***

**

# निर्भयत्व

जे देहाकार असतात, त्यांना देहाकार जाण्याची - मरणाची भीती. जे देहात असताना देहाला सुटून देहातीत अविनाशी वस्तुशी तादात्म्य पावून वस्तुरूप - स्वरूपाकार - झालेले असतात, त्यांना देहाकार जाण्याची भीती वाटत नाही. कारण ते जन्ममरणाचे पैल आत्मरूप झालेले असतात. देहात असतानाही स्वरूपाकार व देह ठेवल्यावरही स्वरूपाकारच ते असतात. स्वरूपाकार झालेले आत्मज्ञानी महात्मे कधीही जात नाहीत. ते अजरामर झालेले असतात. ***('असो ऐसे सकळही गेले। परंतु येकची राहिले। जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी।।'- श्रीसमर्थ, 'मरण माझे मरूनी गेले। मग मी झालो अमर।।'- संतवचन)*** संतमहात्मे दिसताना देही दिसतात पण असतात विदेही. ते दिसतात इथे पण असतात चैतन्याच्या प्राकारातील आनंदाच्या राऊळात भगवंतापाशी आत्मबोधाच्या विवरात पहुडलेले असतात. तर आम्ही दिसतो विदेही पण असतो पक्के देहधारीच. ***('जगाचिया नेत्री दिसे तो संसारी। परी तो अंतरी स्फटीकची।।'- संतवचन, 'ते वर्तत दिसती देही। परी ते देही ना माझा ठायी। आणि मी तयांचा हृदयी। समग्र असे।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाची नाही।।'- श्रीसमर्थ)*** संतमहात्मे चैतन्याचे अखंड स्मरणाने देवरूप झालेले असतात. आमचे ठिकाणी असणारे देहाचे स्मरण विस्मरणातील स्मरण वेगळे व हे चैतन्याचे ठिकाणी असणारे अखंडस्मरण वेगळे. हे अखंडस्मरण वृत्तीसहित ज्ञान अज्ञानाचे पैल नि:शब्द अवस्थेत प्राप्त होणारे आहे. या संताचे ठायी असणाऱ्या वृत्तीरहित अखंडस्मरणाने हे सगुणाचे आधारे निर्गुणाप्रत पोचतात. द्वैत संपूर्ण नाहीसे होऊन अद्वैत साधतात. अर्थात द्वैतभय तेथे राहात नाही. या स्मरणाचे योगे ते कळीकाळावर मात करतात. ज्याठिकाणी अखंड स्मरण अखंड जीवन असते, त्याठिकाणी जन्ममरण हे विकार असत नाहीत. ***('अखंड स्मरण शब्दाने कळेना। पैल ज्ञानाज्ञाना होता कळे।।', 'दासरामी या सगुण निर्गुण। संतांचे स्मरणात।।', 'अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज, 'अखंड लावुनिया स्मरणासी। द्वैत भयाते नासी।।', 'कोणा भीत नाही भीत नाही। भेदची गिळीला पाही।।'- श्रीकेशवस्वामी, 'नामाचिया बळे न भिऊ सर्वथा। कळीकाळाचे माथा सोटे मारू।।'- संत सावता माळी, 'हम तो बेपरव बेपरवा। नही किसीके डरवा। चार खुट जहागीर हमारी। तीन लोकमे बाच्छा। जन्ममरण तो सफा गया है। गुरूने किया अच्छा।।'- संतवचन, 'बळीयाचा अंगसंग झाला आता। नाही भय चिंता तुका म्हणे।'- श्रीतुकाराममहाराज)*** यातील बेपरवा शब्द कोणाची किंमत नाही या अर्थाने आला नसून 'बे' म्हणजे द्वैत. म्हणजे बेपरवा म्हणजे द्वैताच्या पलीकडील उत्तम स्थिती या अर्थाचा आला आहे, असे श्रीदासराममहाराज सांगत. रात्रंदिवस अखंडित अर्थाकडे (ध्येयाकडे) लक्ष देऊन अर्थरूप झालेले समअर्थ - समर्थ संत - सेवकबुद्धीनेच समर्थ सेवा करीत राहतात. अशा समर्थ सेवकांना कोणालाही भ्यायची गरज भासत नाही. ***('रात्रंदिवस पाहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ। परलोकीचा निजस्वार्थ। तेथेची घडे।।', 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।।'- श्रीसमर्थ, 'आता भय नाही ऐसे वाटे। घडलिया सेवा समर्थाची।।' - श्रीतुकाराममहाराज, 'ऐसे मीच होऊनी पांडवा। करिती माझी सेवा। परी नवलावो तो सांगावा। असे आईक।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# माला

खरे पाहिले तर परमार्थ (अध्यात्म) हा अंतरंगातील विषय आहे. मग बहिरंगात चालतो तो परमार्थ आहे का नाही? बहिरंगातील परमार्थ हा अंतरंगात प्रवेश होण्यासाठी पार्श्वभूमी तयार करतो म्हणून बहिरंगातील परमार्थ तितकाच महत्त्वाचा. सर्वांचा एकदम अंतरंगात प्रवेश होत नाही म्हणून सर्व संतांनी सुरुवातीला बाहेरची माळ घेऊन जप करणेस सांगितले व आपणापुढे आदर्श निर्माण व्हावा म्हणून संतांनी हातात माळ घेऊन जप केला. नाहीतर त्यांना बाहेरची माळ घेऊन जप करण्याची आवश्यकता नव्हती. ***('अर्भकाचे साठी। पंते हाती धरीली पाटी।', 'कंठी मिरवा तुळसी। व्रत करा एकादशी।।', 'काष्ठाच्या पादुका स्वामींच्या पायात। स्मरणी हातात तुळशीची।।'- श्रीतुकाराममहाराज)*** वारकरी सांप्रदायात, समर्थ सांप्रदायात, श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे सांप्रदायात सुरुवातीला माळेवर जप करण्यास सांगिले आहे. पण पुढे अंतरंगातील माळ घेऊन अंतरंगात जप करा असे सांगितले आहे, ते आपण सोयीस्करपणे विसरतो. वारकरी सांप्रदायाचे संस्थापक श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरी जपे सदा।।'*** तर श्रीसमर्थ सांगतात, ***'ऐसी माला अंतःकरणी। गुंफोन ठेविली श्रीरामचरणी। सोहंतंतू अखंडपणी। खंडूची नये।।'.*** तर श्रीब्रह्मचैतन्यमहाराज नाम श्वासावर घेण्यास सांगतात. ते म्हणतात, ***'नका करू काही आस। राम जपा श्वासोच्छ्वास।।'.*** सुरुवातीला तुळशीची माळ घेऊन वैखरीने जप ठीक आहे पण कधीतरी आत प्रवेश करावा लागेल. तरच परमार्थ साधेल. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'प्रथम घेईजे तुळशीची माळ। करिजे कल्लोळ वैखरीचा। नंतर लाहिजे हृदयीची माळ। परीयेसी बोल रामकृष्ण।।'.*** नाम हे अंत:करणी घेऊन मन, चित्त, बुद्धी शुद्ध होऊन समत्व साधावे लागेल. देहोहं हा अहंकार जाऊन सोहंची जाणीव निर्माण व्हावयास हवी. याकरता मन, बुद्धी पवनाचे माथ्यावर ठेवून हा जप साधावा लागेल. साधनाभ्यासाने रामकृष्ण गती हरीरूप झाल्या किंवा इडा, पिंगला सुषुम्नाकार झाल्या की हरीनाममाला प्राप्त होऊन आत्मस्वरूपाचा वेध घेते. वृत्ती चैतन्याकडे वळते. भक्ती निर्माण होते. ***('मागोनी मिळवी हरीनाममाला। देखिजे जिव्हाळा भक्तीरस।।'- श्रीदासराममहाराज, 'हरीनामाची माला दिधली। आत्मस्वरूपी वृत्ती वेधली।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** पुढे मन:संकल्प नाहीसा होऊन रामाचा सत्यसंकल्प उदित होतो. पुढे परेच्या पलीकडे चारी वाचे पैल हरीवाणी, म्हणजे चैतन्याचे अखंड स्मरणाची माळ प्राप्त होते. अखंड जाणीवेने जाणीवेचा ग्रास होतो. अनिर्वाच्यमाळा ब्रह्मस्थानी प्राप्त होते. संपूर्ण द्वैत नाहीसे होते. ***('परेमाजी देखे नाममाळा उत्तम। करी तेथे राम संकल्प तो।। स्मरणाची माळ अखंड केवळ। मेळवी तात्काळ परेपैल।। अनिर्वाच्यमाळा देखे ब्रह्मस्थानी। दासरामा करणी अघटीत।।'- श्रीदासराममहाराज, 'जरी तीस पळ साधेल पवन। होय आगमन ब्रह्मस्थानी।।'- श्रीमामामहाराज)*** असा हा माळेवरचा जप द्वैत नाहीसा करणारा असल्याने माळेवर जप करणारा सर्वत्र अद्वैत अनुभवतो. श्रीमामामहाराज सांगतात, ***'माळ धरोनिया रामनाम घेता। द्वैताची तो वार्ता नुरे काही।। सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद। रामनाम छंद मनोमाळे।।'.*** ज्यांचे आशीर्वादाने श्रीमामामहाराज महासाधू झाले ते ब्रह्मचैतन्यमहाराज आज समाधी अवस्थेत श्वासोच्छ्वासी नामोच्चरणी रामरूप झाले. श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांच्या निर्वाण सोहळ्याचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, ***'ब्रह्मचैतन्य हे ब्रह्माचा आकार। चैतन्य साकार गोंदावल्यासी।। नामासाठी आले, नामीच राहिले। नाम गरजले त्रैलोक्यात।। सांगती सकळा करावे भजन। घातले आसन आपण ते।। श्रीराम श्रीराम त्रिवार उच्चार। करोनिया स्थिर रामी झाले।। शालीवाहन शके अठराशे पस्तीस। वद्य दशमीस मार्गशीर्षी।। प्रथम प्रहरी सोमवार दिनी। श्रीराम होऊनी अमर झाले।। ब्रह्मचैतन्य ते ब्रह्मरूप ठेले। कीर्तीरूपे उरले दासापाशी।।'***

**

# आधार

जोवर आपण जगातून आधार शोधतो आहोत, तोवर देवाचा आधार मिळत नाही. जोवर आपणाला वाटत असते हे सारे आपले, आपल्या उपयोगाला येतील, मोठी आशा असते माणसांकडून पण जेव्हा वेळ येते तेव्हा खरे आपले कोण आहेत याची परीक्षा होते, या जगात आपले कोणी नाही हे जेव्हा समजते, जगातून आधार मिळण्याची आशा जेव्हा नाहीशी होते, माणूस जेव्हा आस नाहीशी होऊन उदास होतो, तेव्हाच देवाचा आधार स्पष्ट होऊ लागतो. जगात ज्याचे कोणी नाही अशा निराधारांचा आधार देव आहे हे निश्चित. *'जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे'* हेच बरोबर आहे. ***('तुका म्हणे तूज सोडवीना कोणी। एका चक्रपाणी वाचोनिया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'काय करावी आपुली। जी का उपेगा न आली।'- श्रीमामामहाराज, 'आम्ही तरी आस। झालो टाकोनी उदास।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आपुला तो एक देव करूनी घ्यावा। तेणेवीण जीवा सुख नोहे।।'- संतवचन)*** सर्वस्वाचा वीट आल्यावर हा आधार सापडतो व त्यावरच अनिर्वाच्य शुद्धबुद्ध बरवा देव आपल्या पाठीशी उभा राहतो. ***('सर्वस्वाचा वीट। वरी उभा देव नीट।।', 'गोविंद म्हणे आधार। वीट जाणावी साचार।।'- श्रीमामामहाराज, 'सोहंब्रह्म वीटेवरी। बरवे शोधावे अंतरी।'- संतवचन, 'अनिर्वाच्य शुद्धबुद्ध। उभे राहिले हो नीट। रामा हो जनार्दनी पायी जोडीयेली वीट।।'- संत रामाजनार्दन)*** ही वीट, हा आधार म्हणजे मूलाधार आहे. हा आधार जो जगदाधार - विश्वाधार आहे, तो जोवर सापडत नाही, तोवर प्राणी निराधार आहे. ***('नाही कळला आधार। तव प्राणी निराधार।।'- श्रीमामामहाराज)*** बळकट आधार सापडल्यावर कोणाला भ्यायची काय गरज? ***('समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।।', 'पाठी असता तो जगजेठी। वरकड काय गुमान।।'- श्रीसमर्थ)*** संकटाचे वेळी भोवतालची माणसे बाजूला होतात, त्यावेळी आतून आधार मिळतो, तो कोण देतो? संकटाचे वेळी आपले बरोबर कोण असतो? अहो, एक परमात्मा असतो. तोच आपणाला संकटमुक्त करतो. ***('संकटाचे वेळी। कोण आपणा जवळी।।'- श्रीमामामहाराज, 'तु गुरू बंधू पिता। तू आमची इष्ट देवता। तुची सदा रक्षिता। आपदी आमुते।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** त्याचा आधार आहे म्हणून हे विश्व चाललंय, हा देह चालतोय. नाहीतर चालेल काय? ***('चाले हे शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविते हरीवीण।।'- श्रीतुकाराममहाराज, 'म्या बोलविल्या वेदु बोले। म्या चालविल्या सुर्यु चाले। म्या हालविल्या प्राणु हाले। जो जगाते चाळिता।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण सारे त्याचेवर अवलंबून आहोत. त्याचा सर्वांना आधार आहे. तो मात्र निरावलंब आहे म्हणून राहतो निरालंबी. व्यवहारात कोणतीही गोष्ट सिद्ध करताना त्याला काही गृहीत धरावे लागते. कोणत्या तरी गोष्टीचा आधार घ्यावा लागतो. परमात्मा कोणाच्या आधाराने सिद्ध होत नाही. तो स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण आहे. त्याला सिद्ध करण्यासाठी सवयीने आम्ही देहाचा, मनाचा, प्राणाचा आधार घेतो. पण तो सिद्ध होत नाही. हे सगळे आधार गळून पडले, देहाचा, मनाचा, प्राणाचा लय झाला की मग देवाचा आधार सापडतो. देवापाशी आपण सिद्ध होतो. त्याच्या आधाराने अनुक्रमे आधारचक्रापासून सहस्रदलापर्यंत स्वधर्माचे जे आचरण सुरू आहे, त्याच्या जाणीवपूर्वक व्यापाराने मोक्षप्राप्ती निश्चित होणारी आहे. ***('देखे अनुक्रमे आधारे। स्वधर्मु जो आचरे। तो मोक्ष तेणे व्यापारे। निश्चित पावे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# बरवा देव

बरव्या सत्संगात बरवा विचार - सारासार विचार - प्राप्त होऊन असार संसाराचा त्याग जर घडला (त्रिगुणात्मक संसार) तर होणाऱ्या बरव्या साधनाने सगुणाचे आधारे निर्गुणदेव - बरवा देव प्राप्त होणारा आहे. परमार्थात सारे काही बरवे श्रेष्ठ असते म्हणजे काय हो? परमार्थातील सारे कल्पनेच्या पलीकडले सत्य तर प्रपंचात सारे कल्पनेतले मिथ्या. म्हणून परमार्थात सारे काही बरवे. परमार्थात जो सत्संग व्हावा लागतो तोसुद्धा बरवा सत्संग व्हावा लागतो. अर्थात आम्ही समजतो तो काल्पनिक सत्संग काही कामाचा नाही. अहो संत हे निर्विकल्पी कल्पनातीत असतात आणि आम्ही कल्पनेत तरंगतोय. मग कसा सत्संग घडणार? आम्ही कल्पना सांडली तर सत्संग - सत् संग - होऊन वस्तूची ओळख होणार. आत्माराम प्रगट होणार. ***('बरवा संत समागमू। प्रगटला आत्मारामू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'बरवा संतसंग आम्हा फळला गे माये। दास म्हणे वर्णू आता काय नवलाहे।।'- श्रीचिमडमहाराज)*** सत्संगाने त्रिगुणात्मक विचार (असार संसार) त्यजून, बरव्या विचाराने, चौथ्या गुणाच्या शुद्ध जाणीवेने बरवे साधन जर साधले तर कामक्रोधरहित शांत मन होणार. ***('असारा संसारा त्यजुनी। बरवे साधन करी।।'- समर्थ, 'यास्तव बरवा विचार करी सांडूनी आळस निद्रा वैरी। साधन करूनी सुख घे करी दास विनवी सद्‌गुरूचा।।'-श्रीचिमडमहाराज, 'त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला। योग जो साधिला साधन बरवे।।', 'बरवे साधन सुख शांती मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाभ्यासाने निश्वासाला प्रमाण आले असता अविनाशी बरवे नाम श्रुत होते. नादश्रवणी तदाकारता साधली तर बरवे रूप प्रगट होते. नामरूपाने कानडा निजदेव भगवान प्रगट होतो. ***('शरीर आटे संपत्ती आटे। हरीनाम नाटे ते बरवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वारे भरले या नयनात। नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात।।'- श्रीदासराममहाराज, 'नामरूप भगवान माझा। नामरूप भगवान।।'- श्रीमामामहाराज, 'नाम बरवे रूप बरवे। दर्शन बरवे कानडीयाचे।।'- श्रीनामदेवमहाराज)*** आम्ही समजतो तसे कल्पनेतील, शब्दात वर्णन करण्याजोगे नाम रूप त्या देवाला असत नाही. ते नाम रूप मिथ्या कल्पनेपलीकडील नि:शब्द असते. ***('नामरूपातील जाणा तो अनंत। दास म्हणे संतसंग धरा।।'- श्रीसमर्थ, 'देव देव म्हणूनी व्यर्थ का फिरसी। निजदेव नेणसी मुळी कोण।। देवा नाही नाम। देवा नाही रूप। देवा नाही गाव कोठे काही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** व्यवहारात नामाला रूप, रूपाला नाम असते. व्यवहारात नामरूपाला मेळ असत नाही. अर्थात अवघा वाचेचा गोंधळ असतो. म्हणजे नामरूप हे शब्दात वर्णन करता येते. तर परमार्थात नाम आणि रूप वेगळे असत नाही. तेथे वाचेचा गोंधळ असत नाही. हे नि:शब्द रूप आणि नाम साधकाला नि:शब्द करणारे असते. ***('नामरूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।।'- श्रीनाथमहाराज, 'नाम तेचि रूप रूप तेचि नाम। नामरूपा भिन्न नाही नाही।।'- श्रीनामदेवमहाराज)*** या सगुण साक्षात्काराचे आधाराने जो सर्वाचा आधार आहे असा निश्चळ निर्गुण बरवा देव प्राप्त होतो. ***('बरवा बरवा पांडुरंग। कांती सावळी सुरंग।।'- श्रीतुकाराममहाराज, 'बरवा वो हरी बरवा वो। गोविंद गोपाळ गुण गरूवा हो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# अनुभव खुणे देवाचे दर्शन

ज्याने आपणास आधार दिला आहे अशा आत्मदेवाचे - बरव्या देवाचे दर्शन आपणास कसे होणार? आपण समजतो तसा तो देहधारी नाही मग आम्ही समजतो तसे दर्शन आम्हास कधी होईल का? आणि आम्ही सांगितले की आत्मदर्शन या डोळ्यांना, मन:चक्षुंना झाले तर त्याला कितपत अर्थ आहे? तो दृश्यभासातीत, मनवाचातीत आहे तर असे दर्शन कसे होईल? ***('दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते।।'- श्रीसमर्थ)*** जोवर आम्ही काहीतरी पाहात आहोत, तोवर तो दिसत नाही. कारण जे दिसणारे असते, ते टिकणारे असत नाही. आणि तो टिकणारा आहे. ***('दृष्टीस दिसे ते निरसे। येतद्विषई श्रुति असे। म्हणोन जे दृष्टीस दिसे। ते स्वरूप नव्हे।।', 'दृष्टीस दिसे मनास भासे। तितुके कालांतरी नासे। म्हणोनि दृश्यातीत असे। परब्रह्म ते।।', 'निश्चळ ते परब्रह्म। जेथे नाही दृश्यभ्रम। विमळ ब्रह्म ते निर्भ्रम। जैसे तैसे।।'- श्रीसमर्थ, 'ते आघवेचि दिसणे। जयाते का न देखणे। विश्व भासतसे जेणे। लपालेनी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** डोळे मिटून आमचे पाहणे बंद झाले, आम्ही वरवर न पाहता आत वळून पाहिले तर तो अंतर्यामी असणारा आत्मदेव दिसायची शक्यता. आत वळून पाहण्याला विपश्यना म्हणतात. ***('डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही। बाप सद्‌गुरू कृपा करील हा लाभ घडे देही।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** जोवर अंतरात कल्पना आहे तोवर आम्ही बाहेरच. अंतरात प्रवेश नाही. मनमुळी विराजमान असणारा वनमाळी मनाच्या साहाय्याने कल्पनेने प्राप्त होणार नाही. दृढ वीटे कल्पना सरल्यावर अंतरात तो सत्य बरवा कल्पक जसा आहे तसा मनमुळी अनुभवाला आल्यावाचून राहणार नाही. मन मुरल्यावर जे उरते ते अनुभवणे म्हणजे आत वळून पाहणे आहे. ***('कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'- श्रीदासराममहाराज, 'आहे तैसा आहे कल्पना न साहे। दास म्हणे पाहे अनुभवे।।'- श्रीसमर्थ, 'मन मुरे मग जे उरे। ते तू का रे सेविसी ना।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जोवर मन आहे तोवर अनुभव येतो तो जगाचा, द्वैताचा, तोवर अद्वैत सत्य हाताला येत नाही. जोवर जगाचा अनुभव येतो आहे, तोवर त्याचा अनुभव आलेला नाही. ***('अनुभवेवीण साचा। अनुभव जगताचा।।'- श्रीमामामहाराज)*** जोवर काही भासतय, जाणवतय तोवर त्याची जाणीव झाली नाही हे निश्चित. या सर्व जाणीवा गेल्यावर जे शुद्ध ज्ञान (जाणीव) - ज्ञानशक्ती - राहते, जाणीवरहित जाणता राहतो, तो आत्मप्रकाश ***('जे जे भासे जाणविये। ते ते जरी निरसुनी जाये। तरी जाणीवची आहे। तेचि पाहे तियेते।।'- संत मुकुंदराज)*** हे जे शुद्ध ज्ञानस्वरूप आहे, त्याठिकाणी ज्ञान आहे. पण ज्ञानाची जाणीव नाही. नादप्रकाश आहे, पण त्याची वेगळेपणाने जाणीव नाही. त्रिपुटीरहित ते ज्ञान आहे. अर्थात नादाचे, प्रकाशाचे वर्णन शब्दात करता येत नाही. म्हणून तो प्रकाशावेगळा नवल प्रकाश, नादावेगळा स्वयमेव नाद. ते रूप आणि नाम नि:शब्द आहेत. ते साधकाला नि:शब्द करणारे आहे. नि:शब्द रूप आणि नाम म्हणजे आमचे श्रीदासराममहाराज आहेत. ***('जेथे नाही दृश्यभान। जेथे जाणीव हे अज्ञान। विमल शुद्धस्वरूपज्ञान। यासी म्हणिजे।।'- श्रीसमर्थ, 'हा सांगातीचा धर्म। हा संप्रदाय बहू सुगम। नि:शब्द रूप आणि नाम। हा दासराम त्याचा।।'- श्रीदासराममहाराज)***

**

# अनुभव खुणे देवाचे दर्शन

जोवर आमचा अहंकार - मीपणा - देहाभोवती म्हणजे देवळाभोवती फिरतो आहे, तोवर जन्ममरणाच्या येरझारा सुटत नाहीत. मंदिरप्रवेश होत नाही. जन्ममरणाच्या भीतीने देहावर असणारे प्रेम जन्ममरणाचे पैल मूळस्वरूपावर जडले तर होणाऱ्या शुद्ध पुण्याने देवाचे दर्शन होणारे आहे. ***('दर्शन होय ना होय ना देवाचे। देवळाभोवती मी नाचे।।'- संतवचन, 'देवळाभोवती घिरट्या घालोनी। मेळविला कोणी हरी सांगा।।', 'चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य।।'- श्रीदासराममहाराज, 'देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य। झालिया दर्शन मुक्ती लाहे।।'- श्रीमामामहाराज, 'देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।'- श्रीसमर्थ)*** साधनाभ्यासाने 'सोहं तेही अस्तवले' या अवस्थेत कल्पनेच्या निरासाने अंतरातील अंतरात्मा अनुभवाला आला की त्या महात्म्याला सर्वत्र तोच आत्मा दिसू लागतो. त्याला दृश्य दिसतच नाही. सर्वत्र तो चैतन्यच - आत्मरूपच - अनुभवतो. द्रष्टा हाच दृश्य होतो. द्रष्टाच द्रष्ट्याला पाहतो. त्यामुळे द्रष्टेपण नाहीसे होऊन सर्वत्र अद्वैत गोविंदाची प्रचिती येते. तो गोविंदरूप होतो. त्याला देहाची दृश्याची आठवणच राहात नाही. ***('सोहं तेही अस्तवले। जेथ सांगतेचि सांगणे जाले। द्रष्टत्वेसी गेले। दृश्य जेथ।।', 'दृश्य जाऊनिया द्रष्टे। द्रष्ट्यासीचि जै भेटे। तै एकलेपणे न धटे। द्रष्टेपणही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद। रामनामछंद मनोमाळे।।'- श्रीमामामहाराज, 'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।। कल्पक पाहता कल्पना ओसरे। घुमो लागे वारे चैतन्याचे।। भरता हे वारे होय तदाकार। मग देहाकार नाठवेची।। देहाकार जाता नुरे अहंकार। तोचि साक्षात्कार संतजनी।। ऐसा जरी झाला एक साक्षात्कार। आनंदे निर्भर दासराम।।'- श्रीदासराममहाराज)*** म्हणून व्यवहारातील त्रिपुटीतील दर्शन (दृश्य, द्रष्टा, दर्शन) वेगळे व परमार्थातील त्रिपुटीवेगळे दर्शन वेगळे.व्यवहारात आपण भ्रामक दृश्य पाहतो तर परमार्थात आपणच आपल्याला पाहतो. म्हणून परमार्थातील पाहण्याला पाहणे म्हणता येत नाही येथे पाहणे हे पाहणेपणाला येते. ***('अखंड अद्वैती पहाणे आपणा। तयासी म्हणेना पाहणे कोणी।।', 'आपणा पाहाता आकार उरेना। जेथे पहाणेपणा पहाणे आले।।'- श्रीदासराममहाराज, 'पहाणे आले पहाणेपणा। देखे आपणू आपणा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देवरूप होणे, देवभक्तातील भेद नाहीसा होणे म्हणजे देवाला पाहणे होय. ***('देव पाहावया गेलो। तव तो अंगे देवची झालो।।- श्रीतुकाराममहाराज, 'देखिला देखिला माये देवाचा देवो। फिटला संदेहो निमाले दुजेपण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'देवची झाले अंगे देवा भजता सानुरागे।।'- श्रीनिळोबारायमहाराज, 'वस्तू आपणची होणे। ऐसे वस्तूचे पाहणे। निश्चयेसी भिन्नपणे। शून्यत्व लाभे।।'- श्रीसमर्थ)*** सर्वत्र तोच अनुभवाला येत असल्याने अपमानाने निंदेने त्यांचे समाधान ढळत नाही. ***('मान अपमानाचे गोवे। अवघे गुंडाळोनी ठेवावे। हेचि देवाचे दर्शन। सदा राहे समाधान।।'- श्रीतुकाराममहाराज)*** मन बुद्धी स्वरूपाचे ठिकाणी अर्पण झाली की चित्तात चैतन्य भरून राहते. विश्वाचा आभास नाहीसा होऊन सर्वत्र तोच अनुभवाला येतो. चित्ताला अखंड प्रसन्नता हा प्रसाद प्राप्त होतो. ***('तू मन बुद्धी साचेसी। जरी माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेचि गा पावसी। हे माझी भाक।।', 'मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करूनिया। पतिव्रता।।''बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्यत्यागे। मातेचि भजे।।', 'मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादू जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।', 'देखे अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणे नाही समस्ता। संसारदुःखा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'चित्त हे चैतन्य परब्रह्मीचा गाभा। चैतन्याची शोभा शोभलिसे।।'- संतवचन, 'चित्तची हारपले अवघे चैतन्यची जाहले। पाहता पाहता अवघे विश्वची मावळले।।'- श्रीनाथमहाराज)***

**

# चित्त समाधान पवित्राचे

आत्मदर्शनाने तो आत्मतृप्त होतो. आत्मा हेच त्याच्या तृप्तीचे साधन होते. त्याची वखवख थांबते. त्याला या जगातून काही मिळवायचे उरत नाही. आपण जे सुख शोधतोय, आपले जे सुख हरवले आहे ते आत्मसुख त्याला प्राप्त होते. जो नित्य आहे तो आत्मा त्यानी ओळखला असल्याने बाकी साऱ्या अनित्य गोष्टीत त्यांना स्वारस्य वाटत नाही. सर्वत्र चैतन्याचा अनुभव येत असल्याने सोने आणि माती यातील भेद त्यांना जाणवत नाही. जगाचा तटका तुटून त्याचाच चटका त्यांना लागतो. याउलट आम्ही त्याचाच तटका तोडलेला असल्याने आम्ही जगाचे चटकेच खातोय. जगाचा तटका तोडून त्याचाच सतत अनुभव येत असल्याने कितीही संकटे आली तरी त्या संतांची नामस्मरणाची स्थिती सांडली जात नाही. अशा संतांना देवाचे द्वार सतत उघडे असते. ***('तरी आत्मसुखाचिया गोडिया। वीटे जो का सकळ विषया। जेयाचे ठायी इंद्रिया। मानू नाही।।', 'आत्मलाभासारिखे। गोमटे काहीच न देखे। म्हणोनि भोगविशेखे। हरिखेना जो।।', 'जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।', 'तो नित्यरूप पार्था। वोळखावा सर्वथा। जो या इंद्रियार्था। नागवेची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सोने आणि माती। आम्हा समान हे चित्ती।।', 'चित्त समाधाने। तरी विष वाटे सोने।।'- श्रीतुकाराममहाराज, 'जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका।। संकटे आदळोत पुढती। तरी तुझे नाम रमे चित्ती।।'- श्रीदासराममहाराज)*** साक्षात शंकराचे प्रेरणेने श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदासराममहाराजांचेवर कृपा केली. या कृपेमुळे देहामध्ये नाद बिंदू कला ज्योती हे हरीरूप चैतन्य प्रगट होऊन संपूर्ण शांती त्यांचे अंगी बाणली. व शांतीने झालेले समाधान त्यांचे डोळ्यात स्पष्ट दिसू लागले. हे इतरत्र कोठेही प्राप्त न होणारे समाधान श्रीदासराममहाराजांना श्रीगोविंदरायांचे राम कीर्तनात होत असे. श्रीमहाराज श्रीगुरुलिंगगीतेत त्यांचे बाबतीत सांगतात, ***'समाधान शांतीवू हरिरूप कायन्नू। नादबिंदकलाज्योती चिदमूलतत्वन्नू। नोडवीय कण्णलाद समाधान वदगुवे। गुरुकृपाप्रसादन्न आडगुवे माडवे।। इल्याळल्ली मल्याळन्नू भालदल्ली शंभू। माडवेनू कृपा नीनूवे प्रेरणेयू स्वयंभू।। यल्ल्याळन्नू बारयन्नू रामकीर्तन गोविंदू। प्रल्हादन्न हृदयन्न हुल्याळ घंटिनादू।।'.*** ज्यांना चित्तात समाधान झालेले असते, त्यांची मूळस्थिती - सहजस्थिती नामस्मरणाची स्थिती कोणत्याही परिस्थितीत सांडली जात नाही. सतत नामस्मरणाचा विचार, सतत नामचिंतन. नामस्मरणाचा विचार म्हणजे नाम घेणेचा विचार करणे नव्हे. श्रीदासराममहाराज सांगतात, *'नाम घेणेचा विचार करणे हा विचार वेगळा आणि नाम हाच विचार होणे आणि त्यायोगे आपले सारे जीवन नामाने उजळून निघणे हे वेगळे.'* संकल्प विकल्प जर नाममय झाले तर देवाची भेट निश्चितच आहे. ***('ठेविले अनंते तैसेचि राहावे। चित्ती असू द्यावे समाधान।।'- श्रीतुकाराममहाराज, 'मूळ स्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।। अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।।'- श्रीमामामहाराज, 'ऐशिया आपुलेयाचि सहजस्थिती। जेया ब्रह्माची नित्यता असती। तया नाव सुभद्रापती। अध्यात्म गा।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोची नये।।'- श्रीसमर्थ)*** आज आमचे श्रीमामांवर, श्रीदादांवर अगदी मनापासून प्रेम करणारे प्रेमयोगी पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची पुण्यतिथी. त्यांचे पवित्र चरणी नमन करून येथेच थांबतो.

**✻✻**

## पौष शुद्ध

***देवाचे मंदिरी जीवा खरे सुख। कर्म धर्म देख हरीनाम।।१।।***
***सासर माहेर नुरे त्या लौकीक। मोक्ष त्याचा एक स्वयमेव।।२।।***
***खटपटी जाते भोळ्या भावे शोधी। सत्य बोला वेधी मनोभृंग।।३।।***
***दास म्हणे तेणे मूळ मेळविले। नाही त्या उरले मिळणेचे।।४।।***

१) संसारबंध नाहीसा होऊन जीवाचा देवाचे मंदिरात प्रवेश झाला तर त्याला आत्मप्राप्तीने खरे सुख प्राप्त होते. निष्काम कर्माने निजधर्म (स्वधर्म) आचरला जाऊन सहजकृती या हरिनामाचाच आचार घडतो.

२) संसारबंध (जन्ममरण) नाहीसा झाल्याने स्वयमेव नामाने स्वयमेव मोक्षाची प्राप्ती होते. त्याठिकाणी सासर-माहेर, सुख-दु:ख, जन्म-मरण आदी लौकिक उरत नाही.

३) 'भोळ्या भावाने काय फुकट जाते याचा शोध घेऊन मन सत्यबोलाकडे आकृष्ट होते. कामक्रोधादी खट पटावेत अशी खटपट सुरू राहते.'

४) असे ज्याने चराचराचे मूळ ज्ञानस्वरूप निर्मळ शुद्ध स्वरूप प्राप्त केले त्याला मिळवायचे असे काही राहात नाही.
हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने पौष महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## पौष वद्य

***गुरुपदी मन गुरुकृपांजन। गुरुच्या सेवेने गुरुसुख।।१।।***
***गुर्वानंद भाग्य काया जै गलीत। अबोलाची मात गुरुछंदी।।२।।***
***निंदक त्या कामा सत्संगे रिकामा। साठवोनी नामा अलीप्त तो।।३।।***
***दास म्हणे त्यांनी साधिले मरण। जन्मोनिया जाण धन्य केले।।४।।***

१) गुरुपदी मन जडले की 'सोहं तेही अस्तवले' या अवस्थेत गुरुकृपेचे अंजन डोळ्यात पडले असता डोळ्यातील दृश्य जाऊन द्रष्टाच अनुभवाला येतो. आत्मज्ञानाने आत्मसुख होते.

२) दाही दिशांना चित्प्रकाश दिसणे हे श्रेष्ठ भाग्य देहभाव हरपला असता प्राप्त होते. देहाचे विस्मरण व चैतन्याचे स्मरण या नामाच्या छंदाने उन्मनी मौन साधते.

३) कामाची (वासनेची) निंदा करणारे निंदक वासनारहित होण्यासाठी उपयुक्त ठरतात. निंदकांच्या सहाय्याने सत्संगतीत वासनारहित रिकामा झालो तर तेथे नामाची साठवण होऊन तो संसारातून अलिप्त होतो.

४) मरणाच्या अवस्थेत - निवृत्ती अवस्थेत - ज्यांनी स्मरण साधले त्यांचा जन्म सफल होतो.
हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने पौष महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# जीवा खरे सुख

चंचळ चैतन्यातून जड निर्माण झाले - आत्म्याकरता देह झाला - जीवाने देह बांधला - व जडात चैतन्य प्रविष्ट झाले म्हणजेच देहात आत्मा किंवा जीव प्रविष्ट झाला ***(‘जडाचे मूळ ते चंचळ। चंचळाचे मूळ ते निश्चळ। निश्चळासी नाही मूळ। बरे पाहा।।’, ‘आत्म्याकरिता देह जाला। देहाकरिता आत्मा तगला। उभययोगे उदंड चालिला। कार्यभाग।’- श्रीसमर्थ, ‘जीवू देहे बांधिला। तव तो एके बोले सुटला। आत्मा बोले आपणया। भेटलिया।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जीवाचा कर्मयोगे नवीन देहाच्या अनुषंगाने जन्म झाला. ***(‘जिवा कर्मयोगे जनी जन्म झाला। परी शेवटी काळमुखी निमाला। महाथोर ते मृत्युपंथेचि गेले। कितीएक ते जन्मले आणि मेले।।’- श्रीसमर्थ)*** चैतन्यामुळे वारे आत बाहेर करू लागले, म्हणजे श्वासोच्छ्वास सुरू झाला. जीवाचे ठिकाणी जड देहाची जाणीव निर्माण झाली पण देह तादात्म्याने स्वत:ची जाणीव तो विसरला. ***(‘तुझिया वियोगे जिवीत्व आले’, ‘चैतन्याच्या विसरू ते हे जग।।’- श्रीसमर्थ)*** जीवाला कर्मयोगे देहाचा योग झाला व चैतन्याचा वियोग झाला. देहाच्या जन्माने ‘देह मी’ असे वाटणे, सर्व कर्म देहाकडून होते असा भ्रम होणे व चैतन्याचे अज्ञान - विस्मरण होणे हेच जीवपणाचे लक्षण आहे. ***(‘आपण म्हणिजे मीपण। मीपण म्हणजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला।।’, ‘जन्म जीवाचे मीपण। जन्म अहंतेचा गुण। जन्म हेचि विस्मरण। ईश्वराचे।।’- समर्थ, ‘प्रकृती करी कर्मे। ती म्या केली म्हणे भ्रमे। येथ कर्ता येणे नामे। बोलिजे जीव।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जीव देहाच्या जन्माने, जाणीवेने बहिर्मुख झाला व जीवाचे ठिकाणी जन्ममरण हा संसार मागे लागला. स्वयंपूर्ण असणारा जीव इंद्रियांमार्फत भीक मागू लागला. जन्म हेच जीव दु:खी व्हायचे कारण झाले. ***(‘जीवा जन्मदारिद्र्य ठाकूनी आले।।’- श्रीसमर्थ, ‘उपजोनी करंटा नेणे अद्वय वाटा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जन्म दु:खं जरा दु:खं जाया दु:खं पुन:पुन:। संसारसागरे दु:खं। तस्माज्ज्ञागृही जागृही।।’- जगद्गुरू शंकराचार्य, ‘जन्माचे ते मूळ पाहिले शोधून। दु:खासी कारण जन्म घ्यावा।।’- श्रीतुकाराममहाराज)*** कारणदेहातील अज्ञान जे विपरीतज्ञानाचे कारण आहे तेच दु:खाचे कारण आहे. कारणदेहातील अज्ञानाचे ज्ञान झाले तर चैतन्याच्या जाणीवेने सुख होणार आहे. ***(‘जाणीवेने होते सुख। नेणीवेने होते दु:ख।।’- श्रीसमर्थ)*** जीव देहाच्या योगे व चैतन्याच्या वियोगे सुखाला दुरावला. ***(‘दास म्हणे वियोगाचा योग रे। त्याचे फळ सदा दु:ख भोग रे।।’- श्रीसमर्थ, ‘पडिले दूरदेशी। रुप राहिले मानसी। नको नको हा वियोग। कष्ट होताती जीवासी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्या भ्रामक जीवपणाने हे दु:ख भोगायला लागले तो जीवपणा नाहीसा झाला तरच नवलस्वरूपाचा योग घडणार. ***(‘नवल स्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग।।’- श्रीसमर्थ)*** जीवपण म्हणजेच कल्पिलेले मीपण आहे. कर्माचा खरा कर्ता- राम - जर विवेकाने जाणला तर हा जीवपणा - मीपणा नाहीसा होणार व आपण यशवंत, कीर्तीवंत, प्रतापवंत होणार. विवेकाने आनंद होणार. विवेकाचे सुख होणार. विवेक सांडला तर मात्र परमदु:ख होणार हे निश्चित. ***(‘मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी। रामकर्ता म्हणता पावसी। यश कीर्ती प्रताप।’, ‘कर्त्यासी वोळखावे। यास विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदु:खी।।’- श्रीसमर्थ)***

**

# देवाचे मंदिरी

हे शरीर कर्म करते एवढेच आपण पाहतो. अहो हे शरीर कुणामुळे चालते? कुणामुळे बोलते? तो आत्मदेव ज्याला 'हरी', 'नारायण' आदी नावांनी संबोधिले आहे तो खरा कर्मकर्ता आहे. मुळमायेच्या उपाधीतील उपाधीत आत्म्याचे ठिकाणी असणारी वायुरूप प्रकृती, तिचे हे सारे कर्तृत्व आहे. ***('चाले हे शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविते हरिवीण। देखवी ऐकवी एक नारायण। तयाचे भजन चुको नका।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आत्माची कर्मकर्ता। हाही निश्चयो नाही तत्वता। देहोचि मी कर्मकर्ता। मानितो साच।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मूळमायेपासून सेवटवरी। वायोचि सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।'- श्रीसमर्थ)*** हा वायुरूप आत्मदेव जेथे राहतो ते देवाचे मंदिर होय. हा आत्मदेव देहात सहस्रदलस्थानी असणाऱ्या हृदयात वास करतो. ***('अष्टोत्तर शततीर्थे जयाचे चरणी। तो तुझ्या हृदयभुवनी आत्मारामू।।', 'ज्ञानदेव म्हणे आता फार म्हणो काय। सहस्रदळी आत्मा निश्चय वसे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'देह देवाचे मंदिर। आत आत्मा परमेश्वर।। तुका सांगे मूढजना। देही देव का पाहाना।।'- श्रीतुकाराममहाराज, 'देहाचे मंदिरी आत्मा कोदंडपाणी। प्रेमे सिंहासनी बैसलासे।।'- श्रीसमर्थ)*** स्थूल सूक्ष्म देहाचे कारण जो कारणदेह त्या कारणदेहाचे कारण जो आत बाहेर निर्मळ आहे अशा आकाशरूप महाकारणदेहात आत्माराम राहतो. ***('देह देवाचे देऊळ। आत बाहेर निर्मळ।।'- श्रीतुकाराममहाराज)*** या महाकारणदेहात आत्म्याचे अखंड स्मरण आहे तोवर मेंदूतील स्मरण विस्मरण संभवते. तो महाकारणदेहात आहे तोवर अखंड जाणीवेचे सर्वसुख - आत्मसुख - अद्वैतसुख आपण मिळवू शकतो पण आपण मात्र महाकारणदेहातील सर्व सुख मिळवण्याचे मागे न लागता स्थूल, सूक्ष्म कारण देहामार्फत कल्पित सुख - विषयसुख - खंडित सुख मिळवण्याचे मागे लागतो. ***('तैसा हृदयामध्ये मी रामू। असता सर्वसुखाचा आरामू। परी भ्रांतासी कामू। विषयावरी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे सर्वसुख प्राप्त होण्यासाठी देवाचे मंदिरी महाकारणदेहात प्रवेश होणे गरजेचे आहे. तिथे अखंडस्मरणाने अखंडसुख प्राप्त होणारे आहे. या अखंडस्मरणानेच जन्ममरणरहित अखंड जीवनात मोक्ष प्राप्त होणारा आहे. आत्म्याच्या या निजधामाचे वर्णन भगवान असे करतात, ***'न तत् भासयते सूर्यः न शशांकः न पावकः यद् गत्वा न निवर्तन्ते तत्धाम परमम् मम।।'.*** जोवर आमचे ठिकाणी 'देह मी' हा अहंकार आहे, आमचा अहंकार देह या देवळाभोवती फिरतो आहे, तोवर मंदिर प्रवेश होणार नाही. साहजिकच देवाचे दर्शन होणार नाही. ***('दर्शना होयना होयना देवाचे। देवळाभोवता मी नाचे।।'- संतवचन, 'देवळाभोवती घिरट्या घालोनी। मेळविला कोणी हरी सांगा।।'- श्रीदासराममहाराज)*** निर्हेतुक जीवनाने उन्मनी अवस्थेत चैतन्याच्या प्राकारात आनंदाच्या राऊळात जर प्रवेश झाला तर गुरुलिंगाची - आत्मतत्वाची भेट होऊन अनिर्वाच्य, खऱ्या सुखाची प्राप्ती होणार. ***('राऊळामाजी जाता। राहे देह अवस्था। मन हे उन्मन झाले। नसे बद्धतेची वार्ता। हेतू हा मावळला। शब्दा आली नि:शब्दता। तटस्थ होऊनी ठेले। निजरूप पाहता। ते सुख काय सांगू। वाचे बोलता न ये। आरतीचेनी योगे गेले मीपण माझे।'- श्रीनिवृत्तीनाथमहाराज, 'का चैतन्याचिये पोवळी। माजी आनंदाचिया राऊळी। श्रीगुरुलिंगा ढाळी। ध्यानामृत।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# कर्म

मनात येणाऱ्या वासनेप्रमाणे - हेतुप्रमाणे देहाकडून कर्म घडते व कर्म घडले की कर्तृत्वाचा अहंकार होतो. ही मनात असणारी कर्माची फलाशा व देहाच्या कर्तृत्वाचा अहंकार या दोन गोष्टींनी कर्माचा बंध प्राप्त होतो. तेच मनोलयाने मन निर्विषय झाले की हेतूवीण सत्क्रिया आचरल्याने फलाशेसह कुकर्म घडत नाही व कर्म करून मोक्ष सुख प्राप्त होते. म्हणून बंध व मोक्ष या दोन्हीला मनच जबाबदार - कारण - असते. साधनाभ्यासाने मनोलय साधला असता अंत:करणातील - मनातील - कर्माची फलाशा नाहीशी होते, मनातील हेतू मावळतो, त्याला चैतन्याची - आत्म्याची ओळख होते. खरा कर्माचा कर्ता विवेकाने समजतो. कर्माचा कर्ता मी (देह) आहे, हा अहंकार नाहीसा होतो. त्याचा देह म्हणजे मी हा देहभाव नाहीसा होतो. मग कर्तृत्वाचा अहंकार उरेल का? ***('जे पार्था तया देही। मी ऐसा आठऊ नाही। तरी कर्तृत्व कैचे काई। उरे सांगे।।', 'तैसा कर्तृत्वाचा मदू। आणि कर्मफळाचा आस्वादू। या दोहीचे नाव बंधू। कर्माचा की।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः बंधाय विषयासक्ति मुक्तं निर्विषयं स्मृतं।।'- संस्कृत वचन)*** हे सारे माझ्याकरता झाले आहे पण मी काहीच केले नाही. या साऱ्याचा राम कर्ता आहे, ही जाणीव निर्माण होते व तो कर्मकचाटातून मोकळा होतो. तो कर्म करून नैष्कर्म्य साधतो. तो देहीच विदेही होतो. ***('हे मजचिस्तव झाले। परी म्या नाही केले। ऐसे जेणे जाणितले। तो सुटला गा।।', 'देख पा जनकादिक। कर्मजात अशेख। न सांडिता मोक्षसुख। पावते जाहले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'देहीच विदेह होणे। करून काहीच न करणे। जीवन्मुक्तांची लक्षणे। जीवन्मुक्त जाणे।।'- श्रीसमर्थ, 'मन कृतं कृतं कर्म।'- योगवासिष्ठ)*** मनोलय झाला असल्याने, अंत:करणात कोणताही हेतू नसल्याने, होणारे कर्म हे सारे देवाच्या - महाराजांच्या इच्छेने होते - हेतूने होते. ***('हे करणे का न करणे। हे आघवे तोचि जाणे। विश्व चळतसे जेणे। परमात्मेनी।।', 'हे कर्म मी करीन। अथवा आदरिले सिद्धी नेईन। येणे संकल्पेही जयाचे मन। विटाळेना।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जोवर देह धारण केला आहे तोवर कर्म हे अटळ आहे. कर्म न करणे म्हणजे नैष्कर्म्य नव्हे. कर्तेपणाची भावना नसताना कर्म घडणे हे खरे नैष्कर्म्य आहे. ***('म्हणोनी आईके पार्था। जया नैष्कर्म्यपदी आस्था। तया उचित कर्म सर्वथा। त्याज्य नोहे।।', 'म्हणऊनि संगु जव प्रकृतीचा। तव त्यागू न घडे कर्माचा। ऐसियाही करू म्हणती तयाचा। आग्रहोचि उरे।।', 'अगा करितेनवीण कर्म। तेचि ते निष्कर्म। हे जाणती सवर्म। गुरुगम्य जे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** वायुरूप प्रकृती जोवर आहे तोवर मनोवृत्तीचा निरोध होत नाही अर्थात कर्मसंन्यास किंवा नैष्कर्म्य साधत नाही. ***('ऐसेनि प्रकृतीनाशू। जालया कर्मसंन्यासु। निफजेल अनायासु। सकारणु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** प्राणाच्या ठिकाणी मनाचा लय झाला असता, तत्वांचा तत्वात निरास होऊन दृश्याची जाणीव नाहीशी होते व पवनसिद्धीने आत्म्याचीच जाणीव होते. मीतूपणा संपतो. खऱ्या कर्त्याच्या जाणीवेने नैष्कर्म्य साधते. ***('मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। तेथ बुद्धी घापे करूनिया। पतिव्रता।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'प्राणाचा मनाचा एक लय होता। तत्वे तत्व सारिता पवन सिद्धी।। पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम। येतसे निष्कर्म हातालागी।।'- श्रीदासराममहाराज)*** अंत:करणात कोणतीही आस नाही अशा अवस्थेत जी जन्ममरणरहित सहजकृती अनुभवाला येते ते खरे हरीनाम - रामनाम आहे. निर्हेतुक सत्क्रिया आचरताना कर्म कसे घडते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी। हे सत्क्रियाची आचरावी। हेतुवीण।।'*** हे कर्मातले कौशल्य साधणे हा योग ज्याला साधतो तो योगी. ***('योगः कर्मसु कौशलम्'- भगवद्गीता, 'आईके सकळ संमते जगी। अर्जुना गा तोचि योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेचि फळी।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# धर्म

कर्म बेलगाम होऊ नये म्हणून काही नियम, बंधने निर्माण केली त्याला धर्म ही संज्ञा प्राप्त झाली. कर्म बेलगाम कधी होते हो? मन सैराट धावायला लागले म्हणजे. मनाला विवेकाचा लगाम नसेल तर मनाचे घोडे चौखूर उधळतात. मन बेलगाम होते. ***('मन कृतं कृतं कर्म' - योगवासिष्ठ, 'मन घोडेकू मार चाबुका। विवेक लगाम लेना।।'- संतवचन)*** मनाचे नियमन करणारे नियम हवेत. मनाचे नियमन होऊन मन निश्चळ झाले असता कर्मेंद्रियांकडून होणारी कर्मे बाधक होत नाहीत. ***('तू मानसा नियमु करी। निश्चळु होय अंतरी। मग कर्मेंद्रिये ही व्यापारी। वर्ततु सुखे।।', 'देह तरी वरिलीकडे। आपुलिया परी हिंडे। परी बैसका न मोडे। मानसीची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** धर्माच्या बहिरंगातील नियमांनी मनाचा आवर हा विवेक प्राप्त होतो का? मन ताब्यात येते का? येत नाही. ह्या धर्माच्या बाह्याचाराचाच वाढाचार झाला आहे. या बाह्याचारावरूनच आम्ही धर्म ओळखतो. प्रत्येक धर्माचे बाह्यस्वरूप वेगळे आहे. अंतरात सर्व धर्म सारखेच आहेत. हे धर्माचे सर्वाचे अंतरी सारखे असणारे अंतरंग जर समजले तर द्वैत उरेल का? धर्मातील लाथाळी उरेल का? 'स्वरूपी राहणे हा स्वधर्म' हे सगळ्या धर्मातील साधर्म्य आहे. ***(सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी राहणे हा स्वधर्म। हेचि जाणिजे मुख्य वर्म। साधुलक्षणाचे।।'- श्रीसमर्थ, 'सर्वाचे अंतरी धर्म तो सारखा। दुजा भाव देखा नाही तेथे।।'- श्रीदासराममहाराज)*** हे स्वरूपी राहणे हे स्वधर्माचे आचरण - निजधर्माचे आचरण - जर सुटले, चैतन्याचा विसर जर झाला तर मन बेलगाम होते व देहाच्या अनुषंगाने परप्रकृतीधर्माने कुकर्म घडते, कर्म बेलगाम होते. संसारबंधन प्राप्त होते. ***('हा निजधर्म जै सांडे। आणि कुकर्मी रती घडे। तैचि बंधु पडे। संसारिकु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** साऱ्या देहधर्माचा-प्रकृतीधर्माचा त्याग झाल्याशिवाय त्या एका हृदयस्थ रामाची जाणीव होत नाही. सर्व भेद नाहीसा होऊन अभेदत्वाने एका रामाची प्रचिती येणे ही खरी शरणागती. असा जो रामाला शरण जातो, त्याला मोक्षाची प्राप्ती होते. ***('सर्व धर्मान् परित्यज्य माम एकम् शरणम् व्रज। अहम् त्वा सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः।।'- भगवद्गीता, 'पै आपुलेनी भेदेवीण। माझे जाणीजे जे एकपण। तयाचि नाव शरण। मज येणे गा।।', 'जो मज होय अनन्य शरण। तयाचे निवारी मी जन्ममरण। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।', 'म्हणोनि तू आणि आम्ही। दिसताहे देहधर्मी। मग ययाचे विरामी। मीचि होसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण ज्याच्याअधीन आहोत असे मन, पवनाच्या अधीन आहे. तो पवन जर अभ्यासाने वश केला तर सहजच मन स्थिर होणार आहे. ***('विषय ते मनाअधिन। मन पवनासी वश्य जाण। अभ्यासे वश केला पवन। सहजे मन स्थिरावे।।'- श्रीनाथमहाराज, 'बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवन सहजे गगना। मिळोचि लागे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** रामनामात पवन जर साधला तर अनुभवाने साधनात मन मुरते. सारे देहधर्म (देहभाव) आटतात व सत्य सनातन धर्म अनुभवाला येतो. चालताना, बोलताना, व्यवहार करताना, कल्पना न करता निर्विकल्प अवस्थेत सत्याची जाणीव असणे - नामस्मरणाची स्थिती असणे हा खरा धर्म आहे. ***('चालता बोलता सत्य अभ्यासावे। धर्म त्या म्हणावे निरंतर।।'- श्रीतुकडोजीमहाराज)*** हे सत्य रामनाम ज्यात सामावले आहे, तो खरा स्वधर्म. ***('गोविंद म्हणे तोचि आपुला स्वधर्म। रामनाम वर्म ज्यात वसे।।'- श्रीमामामहाराज)*** या सत्य रामनामाचे स्मरणात - स्वधर्मात - मरण येणे हे श्रेयस्कर, परप्रकृतीधर्म - देहधर्म - हा भयावह आहे. ***('स्वधर्मे निधन श्रेयः परधर्मः भयावहः।'- भगवद्गीता, 'रामराम म्हणता जावा माझा प्राण।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# हरीनाम

ज्या नामाने आकाराचा बोध होतो, द्वैताचा बोध होतो, उपाधीचा बोध होतो व एका चैतन्याची प्रचिती येत नाही, ते द्वैतनाम. ज्या नादाने - नामाने एक चैतन्याची प्रचिती येते ते एकनाम होय. व्यवहारात नामाला रूप असते व रूपाला नाम असते. नाम आणि रूप हे वेगवेगळे असतात. हत्ती पाहिला की त्याचे नाव आठवते व हत्ती हे नाम उच्चारले की कल्पनेने डोळ्यासमोर हत्तीचे रूप येते. ही सारी कल्पनेने रूप प्रगट करणारी नामे द्वैत नामे आहेत. परमार्थात नाम तेच रूप असते. नाम आणि रूप वेगवेगळे असत नाहीत. नामात व रूपात मेळ असतो म्हणून येथे नाम घेणे वाचेला शक्य नाही. परमार्थातील एकनामाने - हरीनामाने - सर्वांतरस्थ सारखेपणाने असणाऱ्या हरीचा बोध होतो. म्हणून या नामाला 'अद्वैत नाम' असे म्हणतात. हे अद्वैत नाम जपणारे विरळाच. ***('एक नाम हरी द्वैत नाम दुरी। अद्वैत कुसरी विरळा जाणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।।'- श्रीदासराममहाराज, 'नाम तेचि रूप रूप तेचि नाम। नाम रूप भिन्न नाही नाही।।'- श्रीनामदेवमहाराज, 'नाम रूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।।'- श्रीनाथमहाराज)*** ज्या नामाने आत्मारामाचा बोध होतो, जे अद्वैत एक हरीनाम भगवान शंकरानी, ध्रुव, प्रल्हादानी जपले, ते जर आपण जपले तर मोक्षाची प्राप्ती निश्चित आहे. ***('हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'राम राम सब कुछ कहे। ठग ठाकूर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम कुछ और।।'- श्रीसंतकबीर)*** हे निर्विकल्प नाम ज्यांना साधले ते तरले. तर ज्यांच्या अंत:करणात या निर्विकल्प नामाबद्दल संकल्प विकल्प आहेत, ज्यांना मनोलय साधला नाही त्या पापरूपी जीवाला हे नाम अनुभवता येत नाही. ***('हरीनाम नेमस्त पाषाण तारी। किती तारिले मानवी देहधारी। तया रामनामी सदा जो विकल्पी। वदेना कदा जीव तो पापरूपी।।'- श्रीसमर्थ)*** देहभानाचा विसर होऊन जर वाऱ्यावर नजर लागली, चैतन्याचीच जाणीव फक्त राहिली तर चारीवाचेपलीकडे, हरीवाचेने हे हरीनाम अनुभवता येते. ***('वाऱ्यावरी लागली नजर। देहभानाचा पडला विसर। जेथे तेथे परमेश्वर। नाही उरला गुणअहंकार। वारे हे करी झणकार। श्रीहरीचा जयजयकार। वाचा या सारूनी चार। हरीवाचे हरीचा गजर।।'- श्रीदासराममहाराज)*** शरीर, संपत्ती, विनाशी आहे पण हरीनाम अविनाशी श्रेष्ठ आहे. ***('शरीर आटे संपत्ती आटे। हरीनाम नाटे ते बरवे।।'- संतवचन)*** या अविनाशी श्रेष्ठ नामाला नामामृत असे म्हणतात. ***('हरीनामामृत सेवी सावकाश। मोक्ष त्याचे भूस दृष्टीपुढे।।'- संतवचन, 'नामामृत गोडी वैष्णवा लाघली। योगिया साधली जीवनकळा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** असा जो एक हरीनाम घेतो, त्याचे हातून विकारलेले कर्म होत नाही. त्यांची सर्व पापे नाहीशी होतात, साहजिकच त्याला यम दंडण न करता वंदन करतो. ***('स्मरता एक हरीचे नाम। महापातक्या वंदी यम। या हरीचे पढियंते परम। तया विकर्मे यम केवी दंडी।।'- श्रीनाथमहाराज)***

**

# सासर

जशा सूर्यापासून ग्रहमाला फेकल्या गेल्या व हे ग्रह सूर्याभोवती भ्रमण करीत राहिले त्याप्रमाणे परब्रह्मापासून हे जीव फेकले गेले व संसारात - जन्ममरणाच्या चक्रात - फिरत राहिले व परब्रह्माला - आपल्या मूळ घराला - माहेराला विसरले. अहंपणामुळे जीव हा विभक्त झाला, संसारी झाला, प्रपंचासक्त झाला. जीव हा मायेत रमला. त्याचा मायेकडचा ओढा (प्रवृत्ती) वाढला. परीपूर्ण असणारा जीव वासनेच्या योगे करंटा झाला. वासनेबरोबर संसारात गुरफटला. कामक्रोधादी षड्विकारांनी दु:खीकष्टी झाला. मूलत: परब्रह्मरूप असणारा, सुखरूप, आनंदरूप असणारा हा जीव सुखाला, आनंदाला मुकला. ही संसाराकडे असणारी ओढ (प्रवृत्ती) हेच जीवाचे सासर आहे. श्रीमामामहाराज केळकर नेमके सासर म्हणजे काय हे असे सांगतात, ***'प्रवृत्तीत वास सदा दु:ख त्यास। हाची सासुरवास दास म्हणे।।', 'सहाकडे सरणे। तेचि सासर जाणणे।।'.*** प्रवृत्ती म्हणजे काय आहे हो? आमचे ठिकाणी असणारी दृश्याची जाणीव, आकाराचे ज्ञान व जाणीवेने असणारी बोलण्याची प्रवृत्ती हेच प्रवृत्तीमधील सासर आहे. श्रीदासराममहाराज प्रवृत्ती म्हणजे काय हे असे सांगतात, ***'प्रवृत्ती जाणीव शून्य ते नेणीव। तयापैल भाव निवृत्तीचा।।', 'आकार प्रवृत्ती निराकार शून्य। तयावरी धन्य निवृत्ती ते।', 'प्रवृत्ती बडबड शून्य वाचा मौन। करणी ते साधन निवृत्तीचे।।'.*** जीवाचे ठिकाणी असणाऱ्या जाणीवेने त्रिगुणात्मक संसार किंवा तेच वेगळ्या शब्दात जीवाचे ठिकाणी असणाऱ्या वासनेच्या योगे प्राप्त होणारा जन्म व त्यापाठोपाठ येणारे मरण हा संसरणरूपी संसार जीवाला प्राप्त होतो. जीवाचा संसार हा स्त्रीबरोबर नसून जाणीवेबरोबर, वासनेबरोबर असतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'जे क्षेत्र क्षेत्रज्ञयोगे। होइजे येणे जगे। आत्मा गुणसंगे। संसारिया।।'.*** येथे गुण हा शब्द जाणीव या अर्थाने येतो. ही जाणीव व जाणीवेने वासना जेथे जन्माला येते ते जीवाचे सासर आहे. वासना ही मनामध्ये असते. अर्थात मन हेच जीवाचे सासर आहे. या मनाला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'गुणग्राम' असे संबोधतात. हे गुणग्राम सुटले तर निवांतपणा, विश्रांती प्राप्त होणार. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आपुला गुणग्राम सांडुनिया गेलिये। निवांत राहिलीये निर्गुणी वो माय।।'.*** या मनामध्ये म्हणजे सासरी गुणग्रामात मीपणा, काम, क्रोध, तृष्णा, शोक आदी वृत्ती निर्माण होत असतात व जीवाचे पदरात सतत दु:खच येत असते. जे या सासरला कंटाळतात त्यांना आत असणाऱ्या माहेराची आठवण येते. ते आपल्या आईला मला माहेरला न्या असे म्हणतात. श्रीमुकुंदराज त्यांना सासरी होणारा त्रास आईसमोर असा मांडतात, ***'उबगल्ये सासऱ्या आता मज माहेरासी न्या हो। तोडा एवढा जाच पडते तुमच्या पाया हो।। त्रिविध ताप सासरा प्रभु मज उगाची गांजतो। भेद भयंकर भाऊ हा तर उगाच जाळितो।। क्रोध माझा दीर तो मजला भलतेच बोलतो। काम माझा दादला सखे ग भलतिकडे जातो।। सासू ही कल्पना मजला करीती जाच नाना। अविद्या ही नणंदबाई तर उगीच राहीना।। आशा ममता जावा यांनी मांडियेली दैना। कुठवर सोसू जाच आता कदापि राहिना।। अहेव मायेचा तंतू हा तर बळेच तोडीन। प्रपंचाचे लुगडे हे तर उभेच फाडीन।। जो मज माहेर दावील त्याची मी सेवा करीन। मुकुंदराज म्हणे लाज बाई गेली उडोन।।'*** तर श्रीनाथमहाराज हे सासरचे गाऱ्हाणे भवानीआईला असे घालतात, ***'सत्वर पाव गे मला। भवानीआई रोडगा वाहीन तुला।। सासरा माझा गावी गेला। तिकडेच खपवी त्याला।। सासू माझी जाच करीते। लवकर निर्दाळी तिला।। जाऊ माझी फाडफाड बोलते। बोडकी कर गे तिला।। नणदेचे कारटे किरकिर करते। खरुज होऊदे त्याला।। दादला मारूनी आहुती देईन। मोकळी कर गे मला।। एका जनार्दनी सगळीच जाऊदे। एकलीच राहू दे मला।।'***

**

# माहेर

आपण सारे पुरातन अशा हरीवंशातील - चैतन्यवंशातील आहोत. चंचळ चैतन्यापासून जड निर्माण होते व जडाला चैतन्य व्यापते. जडाचा चैतन्यामुळे जन्म होतो. सत्यावर नाशिवंत विकृतीचा भास होतो. त्यालाच जन्म म्हणतात. आपले आईवडिलांचे ठिकाणी चैतन्य असते म्हणून चैतन्यसहित बाळ जन्माला येते. चैतन्यविरहीत आईवडीलांना कधीही मूल होत नाही. अर्थात सर्व जीवांचे आईवडील एक वायुरूप चैतन्यच आहे. ***('वारा हा मायबाप। हारवी जो त्रिविधताप।', 'सत्यावरी जे का भासाची विकृती। तयासी म्हणती जन्म बापा।'- श्रीदासराममहाराज)*** हे चैतन्य जेथे राहते, जेथे अनुभवाला येते, त्याला आपले मूळ घर पंढरपूर म्हणतात. हे मूळ घर हे आपले खरे माहेर आहे. या माहेरात मायेला प्रवेश नाही. फक्त ब्रह्मच येथे राहते. ***('मूळ घराला। मी जाते माहेराला।।' - संतवचन, 'माझे माहेर पंढरी। आहे भिवरेच्या तीरी।।'- श्रीनाथमहाराज, 'जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मायेवीण माहेर विश्रांती ठाव।।'- श्रीसमर्थ)*** माया हेरली की माया नाहीशी होते व माहेर सापडते. ***('माया हेरणे माहेर। माया पैल तो ईश्वर।।'- श्रीमामामहाराज)*** ईश्वराचे लाडके संत, सद्गुरू यांना या माहेरची ओढ असते. ते दिसतात इथे सासरी पण सतत आठवण माहेरची. ***('लाडकी ती लेक नांदेना सासरी। आठवी माहेरा वेळोवेळा।।', 'माझे माहेर चांगले। बोध विवेक बंधू भले। भक्ती बहिणीच्या मेळे। खाऊ ग पाला।।'- संतवचन)*** आत्मज्ञानाने आत्मरूप झालेले संत सद्गुरू हेच आपले खरे आईवडील आहेत. त्यांनाच आपले खरे हित समजते. त्यांना खऱ्या अर्थाने पाहिले की अवघा शीण नाहीसा होऊन सर्वसुखाची प्राप्ती होते. अर्थात संतांचे भेटणे, संताचे घरी जाणे हेच आपले माहेरपण आहे. ***('सद्गुरूंचे घर हे माझे माहेर। किती हो सुंदर काय वर्णू।।'- श्रीदासराममहाराज, 'आजी सोनियाचा दिवस। दृष्टी देखिले संतास।। जीवा सुख थोर जाले। माझे माहेर भेटले।। अवघा निरसला शीण। संतचरण देखता।।'- संत सेनामहाराज)*** संत, सद्गुरू निवृत्ती अवस्थेत असतात. म्हणून आपण निवृत्ती होणे म्हणजे माहेराची भेट होय. ***('प्रवृत्ती सासुर निवृत्ती माहेर। तेथे निरंतर मन माझे।।'- समर्थ)*** साधनाच्या अभ्यासाने गगनी जेव्हा अगणित तारक स्वरूपाचा साक्षात्कार होतो, तेव्हा मन हे वृत्तीसहित मुरते व तो महात्मा निवृत्ती होतो. ***('गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मन मुरल्यावर जे ज्ञान होते ते वृत्तीरहित ज्ञान साधकाला समाधान देणारे आहे. वृत्तीरूपाने समान असणाऱ्या अज्ञान ज्ञानाचा निरास झाला असता वृत्तीरहित ज्ञान निवृत्ती अवस्थेत प्राप्त होते. ज्ञानाची जाणीव नाहीशी होऊन ज्ञानाचे विज्ञान होते. आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो. ***('वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।', 'ज्ञान आणि अज्ञान। वृत्तीरूपे हे समान। निवृत्तीरूपे विज्ञान। जाले पाहिजे।।', 'जेथे ज्ञानचि होते विज्ञान। जेथे मनचि होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ)*** या निवृत्ती अवस्थेतील ज्ञानाने संसरण शांत होते व योग्यांना निरोपाधी विश्रांती प्राप्त होते. ***('स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'- श्रीनाथमहाराज, 'अनिर्वाच्य ते निवृत्ती। तेचि उन्मनीची स्थिती। निरोपाधी विश्रांती। योगियांची।।'- श्रीसमर्थ)*** हे निवृत्तीअवस्थेतील प्रमाणभूत ज्ञान म्हणजेच संजीवन समाधी - हरीपाठ आहे. ***('ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तीदेवी ज्ञान। समाधी संजीवन हरीपाठ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

******

# लौकीक

परमात्म्याने हा पसारा निर्माण केला म्हणून लौकीक होऊ शकतो. भक्त आहेत म्हणून देवाचा लौकीक. भक्त नसतील तर देवाला कोण विचारणार? ***(‘ना तरी तुला पुसतो कोण। एवढा आमच्यासाठी मान।।’, ‘आमुचियामुळे तुज देवपण।।’- श्रीतुकाराममहाराज)*** द्वैतपसाऱ्यामुळे लौकीक वाढतो व भक्त या लौकीक पसाऱ्यातच गुरफटतो. लौकीकालाच (बहिरंगालाच) महत्त्व येते व त्याचा अंतरंगात प्रवेशच होत नाही. अर्थात देवाची प्राप्ती होत नाही. लौकीकात अलौकीकाची प्राप्ती होत नाही. लौकीकात देव नाही. देवाला लौकीकातील काही लागतही नाही. ***(‘लौकिकासाठी या पसाऱ्याचा गोवा। काही नाही देवा लागो येथ।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘एक लौकिक साधु जाता। काही येत नाही हाता।। लौकिक बहिरंग पसारा। नका देऊ अंतरी थारा।। गोविंद म्हणे नाम घेता। नुरे लौकीक सर्वथा।।’- श्रीमामामहाराज)*** पृथ्वी जशी सूर्यभोवती भ्रमण करीत असल्याने आपण जसे सूर्यचे भ्रामक उदय अस्त अनुभवतो, दिवसरात्र अनुभवतो तद्वत देहतादात्म्याने आत्मस्वरूपाला विसरल्याने जीव हा जन्ममरणाच्या चक्रात - भवचक्रात - संसारचक्रात भ्रमण करतो व या भ्रमणाने भ्रांती निर्माण होते व भ्रांतीने सुखदु:ख, जाणीवनेणीव, सासरमाहेर आदी द्वंद्वे लौकिकात - बहिरंगात अनुभवतो. जसे सूर्यलोकाला गेल्यावर दिवसरात्र अनुभवता येत नाही, तेथे अखंड दिवसच ***(‘अगा रात्री आणि दिवो। हा तवचि द्वैतभावो। जव न रिगिजे गावो। गभस्तीचा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** तसे अलौकिक आत्मस्वरूपाचे ठिकाणी ही लौकिक द्वंद्वे अनुभवता येत नाहीत. देह म्हणजे मी असे मानल्याने जन्ममृत्यू ही येरझार अनुभवाला येते. ***(‘देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी।।’- श्रीसमर्थ)*** आपण अमृत आत्मरूप आहोत हे अनुभवल्यावर कुठला जन्म व कुठले मरण? ***(‘ना तरी अंध:काराची वानी। जैसा सुर्यो न देखे स्वप्नी। अमृत नायके कानी। मृत्युकथा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अर्थात येथे सुखदु:ख जाणीवनेणीव आदी द्वंद्वे उरत नाहीत. अलौकिक आत्मरूपाचे ठिकाणी सारे काही अलौकिक. येथे घडणारी सेवा लौकीक सेवेपेक्षा वेगळी. ***(‘लौकीकासारखी नव्हे माझी सेवा। अहा जी केशवा पांडुरंगा।।’- श्रीतुकाराममहाराज, ’ऐसे मीच होऊनी पांडवा। करिती माझी सेवा। परी नवलावो तो सांगावा। असे आईक।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** येथे होणारी गुरुकृपा हीसुद्धा अलौकिक. ***(‘अलौकिक ही कृपा गुरूंची। चिमणी साजिरी मूर्ती हरीची। मंजुळ मधुर नाद हा भरला। हरी मम अंगणी अवचित आला। माझ्या दृष्टीमाजी भरला। प्रेम पांघरूण घाली कुंची।।’- वेणुताई सावर्डेकर, ‘गुरुकृपा महाभारी। होय असत्याबाहेरी।।’ - संतवचन)*** अलौकिक आत्मरूपाशी तद्रूप होऊन जे महात्मे अलौकिक होतात त्या महात्म्यांना आपण कोणी अलौकिक आहोत याची जाणीव नसते व ते इतरांनाही आपल्या अलौकिकत्वाची जाणीव होऊ देत नाहीत. ***(‘मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे। अलौकीक नोहावे। लोकांप्रती।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# मोक्ष त्याचा एक स्वयमेव

तत्वांचा तत्वांमध्ये निरास करून सद्‌वस्तूरूप होणे - जन्ममृत्यूपासून सुटका होणे- म्हणजेच मोक्ष प्राप्त होणे होय. वासनेचे बीज नष्ट झाले असता ज्ञात्याचे जन्ममरण खुंटते. तो जन्ममरण या संसारातून वेगळा होऊन - गुणातीत होऊन - चंचळत्व कमी होऊन - निश्चळत्व प्राप्त होऊन - निश्चळ स्वरूपाशी तादात्म्य होऊन - मोक्षाला जातो. मोक्ष हा मेल्यावर मिळवायचा नसून तो जिवंतपणी प्राप्त व्हावा लागतो. जिवंतपणी मोक्षाची प्राप्ती झाली तर त्याला मेल्यावर मोक्ष मिळतो. अनेक विधी विधाने करून समाजात चांगुलपणा मिळाला तरी त्या माणसाला मोक्ष मिळेलच असे नाही. मोक्ष स्नानाने, दानाने, तपतीर्थाटणे करून प्राप्त होत नाही. ***(‘जन्ममृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला। तत्वे शोधिता पावला। तत्वता वस्तु।।’, ‘येचि जन्मे येचि काळे। संसारी होइजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।’- श्रीसमर्थ, ‘अनेक विधाने करोनी चांगला। परी नाही आला मोक्षवाटे।।’- श्रीमामामहाराज, ‘मोक्ष नव्हे स्नाने मोक्ष नव्हे दाने। तपतीर्थाटणे मोक्ष नव्हे।।’- श्रीतुकाराममहाराज)*** ज्या महात्म्यांनी मोक्ष प्राप्त केला आहे, जे मोक्षश्रीआळंकृत श्रीमंत आहेत, ज्यांच्या गाठोडीसी उघड मोक्ष आहे अशा ज्ञानी वासनारहित संतांचा अनुग्रह - मार्गदर्शन जर आपणास प्राप्त झाले तर सारासार विचाराने सत्यज्ञान हाती येऊन जीवाला मोक्ष प्राप्त होतो. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. यातील धर्म, अर्थ, काम हे तीन पुरुषार्थ बायकोच्या साथीने वासनेसहित प्राप्त करायचे असतात पण मोक्ष हा प्रत्येकाचा स्वतंत्र आहे. ‘धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि। ना तु मोक्षेच’ अशी प्रतिज्ञा आपण लग्नाचे वेळी करतो. हा स्वतंत्र मोक्ष प्रत्येकाने स्वतंत्रपणे मिळवायचा असतो. देह तादात्म्याने आपण शरीराच्या तंत्राने वागणे, विषयाच्या वासनेने, रागाच्या, लोभाच्या, द्वेषाच्या अधीन होणे हेच परप्रकृतीचे तंत्र - परतंत्र आहे. या पारतंत्र्यात दुःख आहे. देहातीत होऊन निर्विषय होऊन, बंधन झुगारून देणे, स्वतंत्र उमगणे म्हणजे मोक्ष आहे. हे स्वतंत्र सद्‌गुरूंकडून समजून घेणे हाच अनुग्रह असून अनुग्रहाने मोक्षपदाची वाट सापडणारी आहे. ***(‘बंधन विषयाचे। नुरता मोक्षपद साचे।। मोक्ष सर्वदा स्वतंत्र। ज्यात नसे परतंत्र।। गोविंद म्हणे अनुग्रह। मोक्ष असे तयासह।।’- श्रीमामामहाराज)*** मोक्षपदाच्या वाटेने मार्गक्रमण करताना, साधनाचा अभ्यास करताना श्रवण होणाऱ्या चैतन्याच्या नादाचे ठिकाणी जाणीवनेणीवरहित जर जीवाचे तादात्म्य झाले तर सदा मोक्षाची प्राप्ती होणारी आहे. ***(‘जाणीव नेणीव भगवंती नाही। हरी उच्चारणी पाही मोक्ष सदा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे होणारे नादश्रवण हाच शिवाचे अंतरी असणारा हरीमंत्र - राममंत्र आहे. हे नाम जो अनुभवतो तो मोक्षाला जातो. ***(‘हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘मुखी नाम हाती मोक्ष। ऐसी साक्ष बहुतासी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘तैसा मनाचा मारू न करता। इंद्रिया दुःख न देता। एथ मोक्ष असे आयता। श्रवणाची माजी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या स्वयमेव नामानेच स्वयमेव मोक्षाची प्राप्ती होणारी आहे. ‘स्वरूपी राहणे’ हे स्वधर्माचरण सुटले की स्वरूपापासून दूर नेणाऱ्या कर्माची - दुष्कर्माची आवड निर्माण होते, संसारबंध निर्माण होतो. तेच स्वधर्माचरण घडले तर मोक्षाची प्राप्ती निश्चित होणारी आहे. ***(‘हा निजधर्म जै सांडे। आणि कुकर्मी रती घडे। तैचि बंधू पडे। संसारिकू।।’, ‘देखे अनुक्रमाधारे। स्वधर्मू जो आचरे। तो मोक्ष तेणे व्यापारे। निश्चित पावे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# खटपट

माणूस मोक्षप्राप्तीसाठी आपल्या समजुतीप्रमाणे व्रतवैकल्ये, उपासतापास, तीर्थयात्रा, दानधर्म, योगादीककर्म आदी विधिविधाने करतो, पण त्याला मोक्षप्राप्ती होत नाही. ***('मोक्ष नव्हे स्नाने मोक्ष नव्हे दाने। तपतीर्थाटणे मोक्ष नव्हे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'हिंडूनी देशोदेशी कोटी तीर्थवासी शीणसी तू नाना उपायी। योगयागविधी येणे नोहे सिद्धी वायाचि खटपट पाही।।'- श्रीमाणीकप्रभूमहाराज)*** व्यवहार हा जागा सोडल्याशिवाय होत नाही व परमार्थ हा जागेला आल्याशिवाय होत नाही. आम्ही संसारात फिरतोच व त्याच सवयीने परमार्थातही फिरतोच. ***('देव देव म्हणूनी व्यर्थ का फिरसी। निजदेव नेणसी मुळी कोण।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे फिरणे थांबले पाहिजे. आमचे मन एकाग्र व्हायला पाहिजे. अंतरी निश्चळ व्हायला हवे. तरच परमार्थाची सुरुवात होईल. ***('दास म्हणे केल्या मनावरी मात। खरा परमार्थ दूर नसे।।'- श्रीदासराममहाराज)*** आम्ही दाही दिशेला फिरलो तरी ही ब्रह्मज्ञानाची दिशा सापडणार नाही. देव बाहेर नाही तो आपल्या जवळ, आपल्या आत आहे आणि आम्ही त्याला बाहेर हुडकायचा प्रयत्न करतोय. मग सारी खटपट वायाच की. देव जेथे आहे तेथे तो शोधला पाहिजे. ***('जवळी असता जगज्जीवन। का धांडोळीसी वन। एकाग्र करी मन। तेणे होईल समाधान।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** पण हे मन एकाग्र होणार कसे? झोपताना आपले मन प्राणापानाचे ठिकाणी लीन होते व मग झोप लागते. अर्थात प्राणापान हे मन मुरवायचे, देहभाव लयाला घालविण्याचे साधन आहे. मनाची गती श्वसनगतीवर अवलंबून आहे. मनाची गती वाढली की श्वसनगती वाढते किंवा मनाची गती कमी झाली, मन एकाग्र झाले की श्वसनाची गती सूक्ष्म होते. साधनाचे अभ्यासाने सहजगत्या निश्वासाला प्रमाण येणार आहे. सोहंहंसाची सहजगत्या बोळवण होणार आहे व जन्ममरणाची फेरी चुकणार आहे. जन्ममरणाची फेरी चुकणे म्हणजे संसारातून निराळे होणे आहे. ***('येकाग्र करोनिया मन। बळेचि धरावे साधन। यत्नी आळसाचे दर्शन। होऊची नये।।'- श्रीसमर्थ, 'सोहंहंसाची बोळवण। न करताची जहाली जाण। येणे पळाले जन्ममरण। शून्य पडले संसारा।।'- श्रीनाथमहाराज)*** साधनाचे अभ्यासाने मन शांत होणे म्हणजे साधन बरवे होणे. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हे षड्विकार हे खट जर पटले तर खरी 'खटपट' म्हणायची. सहजकृती - आपला मूळ स्वभाव - हे रामनाम साधणे म्हणजे खरी खटपट आहे. ***('ऐशी खटपट करी। चुके जन्ममरण फेरी।। खट पटलेची नाही। खटपट लटकी पाही।। काम क्रोध लोभ खट। नामी पटता खटपट।। खटपट रामनाम। दास म्हणे सर्वोत्तम।।'- श्रीमामामहाराज)*** साधनाच्या खटपटीने हे कामक्रोधादी खट जर पटले नाहीत तर केलेली खटपट सारी व्यर्थच. ***('खटपट का बा करितोसी। लटीके नासीक धरतोसी।। वरीवरी करीसी गुणगुण। अंतरी नाही निजखुण।।'- श्रीकेशवस्वामी)***

**

# जाते

आपल्या शरीरात व्यर्थ काय जाते हो? आपल्या शरीरात दुर्लभ असणारे आयुष्य व्यर्थ जात आहे. ***('तरी या नरदेही दुर्लभ। आयुष्य व्यर्थ जाते ते जाते रया।'- श्रीनाथमहाराज, 'अमोलीक जाते वय आता तरी धरी सोय। असा काय नरदेह येईल पुन्हा।।'- श्रीनामदेवमहाराज, 'हे वय नासूनी जाईल मनुजा। काहीतरी तू सोय धरी।।'- संतवचन)*** आयुष्य आहे म्हणून शरीराला किंमत नाहीतर कोण देहाला विचारतो? इतके महत्त्वाचे असणारे आयुष्य तिकडे आमचे लक्षच नाही. ***('परीमळ गेलिया वोस फूल दिठी। आयुष्याशेवटी देह तैसा।।'- श्रीसोपानदेवमहाराज, 'परीमळू निघालिया पवनापाठी। मागे वोस फूल राहे देठी। तैसे आयुष्याचिये मुठी। केवळ देह।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** काळ देहातील आयुष्य खातो आहे, त्या काळाला थोपवता आले पाहिजे. श्वासोच्छ्वास हे आयुष्याचे साधन आहे. श्वासोच्छ्वासाला लागणारा जो वेळ आहे तिचा ग्रास काळ करतो. ***('नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान।।'- श्रीतुकाराममहाराज)*** नाम हे श्वासातही नाही आणि उच्छ्वासातही नाही. नाम हे श्वास आणि उच्छ्वास यांच्या संधीकाळात आहे. म्हणून नामाला काळ वेळ नाही. ते कालातीत नित्य आहे. ***('श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे।। म्हणोनी तयासी काळवेळ नाही। उद्धारची होई साधिलिया।।'- श्रीदासराममहाराज)*** म्हणून काळवेळ नसणारे कालातीत, नित्य नाम प्रत्येक श्वासाला जपणे म्हणजे वाया जाणारे आयुष्य जपणे आहे. म्हणून प्रत्येक श्वासाला नाम जपणे ही आपली धारणा व्हावयास हवी. ***('श्वासो लेवे नामबीना सो जीवन धिक्कार। श्वासश्वासमो रामजप वोही धारणाधार।।'- संत तुलसीदास)*** हे श्वासाश्वासाला वाया जाणारे नाम जपणे म्हणजे आयुष्य जपणे आहे. ***('जपोनी जपणे जप बोलिलासे। वाया जात असे काय देही।।'- श्रीमामामहाराज)*** परमेश्वराने जे आपल्याला आयुष्य दिले ते दिवस तास मिनिटावर नाही तर ते श्वासाचे संख्येवरती दिले आहे. दिलेली श्वासाची पुंजी संपवली की संपलेच म्हणून नामाविना फुकट वाया जाणारे श्वासोच्छ्वास जपून वापरले पाहिजेत. ***('जाते ते जतन करा। उतराल पैलतीरा।।'- श्रीमामामहाराज)*** आपण रागावलो किंवा कोणताही विकार निर्माण झाला की श्वसनाची गती वाढते व आयुष्याचा नाश होतो. आपण रागावून होणाऱ्या व्यावहारिक फायद्यापेक्षा श्वसनाची गती वाढल्याने होणारे नुकसान मोठे आहे. ***('तीन भुवन और चौदा लोक। एक श्वासका मोल। तुलसी कहे रामभजनबीन। वृथा श्वास मत खोल।।'- संत तुलसीदास)*** श्वास आणि उच्छ्वास यांचे दरम्यान संधीकाळात मनोवृत्तीचा निरोध करून जीवनात जर आपण भजन - नाम साधले तर काळावरती विजय मिळणार आहे. ***('श्वासोच्छ्वासी नाम साधुनी। काळाला हटवी।।'- श्रीमामामहाराज)*** जे आयुष्य - श्वास, आता नामाशिवाय फुकट जात आहेत त्या प्रत्येक श्वासात नामाचा - भजनाचा अनुभव (कामक्रोधरहित अवस्थेचा अनुभव) आला पाहिजे तरच हे साधणारे आहे. भजनाने, नामस्मरणाने समाधान प्राप्त होणारे आहे. ***('अंतरी भजन चाले रात्रंदिन। तेणे समाधान अनिर्वाच्य।।'- स्वामी स्वरूपानंद, 'हरी भजनावीण काळ घालवू नको रे।।'- संत सोहिरोबानाथ, 'जाते फिरवोनी रामनाम गाई। तया नरा नाही शीण काही।। नित्य नियमित करावे हे काम। दास म्हणे नाम एक गावे।।'- श्रीमामामहाराज)***

✲✲

# भोळ्या भावे शोधी

'भ'ची ओळ जो जाणतो त्या भोळ्याला साम्यदशा हा भोळाभाव प्राप्त होतो असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत. ***('भ ची ओळ भोळाभाव। ओळ देही दावी ठाव।।'- श्रीमामामहाराज)*** तर साम्यदशा हा भोळाभाव अंत:करणाच्या निर्विकार अवस्थेत उदय पावतो असे चिमडचे श्रीनारायणमहाराज सांगत. दोघांच्या सांगण्याचा अर्थ एकच पण शब्द वेगळे आहेत इतकेच. 'भ'ची ओळ म्हणजे काय हे सांगताना 'भ' म्हणजे तेज असे ते सांगत. 'भर्ग' या शब्दावर टीका करताना जगद्‌गुरू शंकराचार्य सांगतात, *'स्वसाक्षात्कारेण अविद्याशक्ती दाहाकृत'* या तेजामध्ये देहभाव हरपण्याच्या प्रक्रियेला साधन साधणे म्हणतात. साधनात कल्पनारहित निर्विकल्प होणे म्हणजेच अंत:करण निर्विकार होणे ना? अपाप होऊन कल्पक भेटणे ना? ***('तया तेजामाजी देहभाव राहे। निर्विकल्प पाहे समाधी ते।।'- संतवचन, 'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'- श्रीदासराममहाराज)*** साधनाचे अभ्यासाने नादाचा - नामाचा अनुभव येतो, तेजाचा - प्रकाशाचा बिंदूरूपाने अनुभव येतो. बिंदू हा अदृश्य असतो पण बिंदूपुढे बिंदू जर आपण ठेवत गेलो तर होणारी रेषा - ओळ ही दृश्य असते. साधनाभ्यासाने जो ही भ (तेज)ची ओळ जाणतो, जो या तारकाबिंदूंची ओळ अनुभवतो, मोक्षाच्या रेषेवर दृश्याची रेषा अस्पष्ट होऊन जो येतो तो भोळा. अशा भोळ्याला चत्वार देहाच्या निरासाने देही तो ठाव प्राप्त होतो. चार घटका साधन साधले तर हा तारणारा तारकबिंदू अनुभवाला येतो. असे अगणित तारे जर अनुभवाला आले, बिंदूंची ओळ जर अनुभवाला आली तर मन वृत्तीसहित मुरते, सर्ववृत्तीचे मौन होते. देहभाव संपूर्ण लयाला जातो. हा देहधर्म - देहभाव आटण्याचा अनुभव एक प्रहर साधन साधले असता येतो. भेद तुटून तो रामरूप होतो. ***('जया चार घटिका साधेल पवन। तारकबिंदू जाण दिसतसे।', 'ज्यासी एक प्रहर साधेल पवन। आटतील जाण देहधर्म।।'- श्रीमामामहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज)*** इंद्रियवृत्ती ज्यांच्या तेजामध्ये अशा संपूर्ण मुरतात, कामक्रोधरहित जे होतात, त्यांना सदा समाधान हे भजन साधते. ***('भ कारी विरावी जनेंद्रियवृत्ती। भजन बोलती याचिलागी।।'- श्रीदासराममहाराज)*** असे जे भोळे असतात त्यांचाच देव असतो, ते देवाच्या अंकीत व देव त्यांच्या अंकित असतो. त्यांच्यावर परमात्म्याची कृपा होते. ते काळावरती मात करतात. ***('भोळीयाचा देव अंकीत भोळा। अभाविका चांडाळा जवळी नसे।।'- श्रीनाथमहाराज, 'तुका म्हणे देव भाविकांचे हाती। शहाणे मरती तरी नाही।।', 'तुका म्हणे भोळा। जिंकू शके कळीकाळा।।', 'तुका म्हणे भोळी। विठ्ठलकृपेची कोवळी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'आम्ही भोळे आम्ही भोळे। पिंड ब्रह्मांडावेगळे।।'- संत भीमदास)*** देवाचे अनुभव घेणारे हे भोळे पूर्ण ज्ञानी असतात. ***('म्हणोनि जितुका भोळाभाव। तितुका अज्ञानाचा अभाव। अज्ञाने तरी देवाधिदेव। पाविजे कैसा।।'- श्रीसमर्थ)*** नादश्रवणी तदाकारता साधल्याने त्यांच्या नयनात चैतन्याचे वारेच भरते. ही जडसृष्टी त्यांच्या दृष्टीला येत नाही. अर्थात त्यांचे वागणे बोलणे व्यवहारसंमत असत नाही. ते जगावेगळे असते. आम्हा विपरीतज्ञानी लोकांना ते अज्ञानपणाचे वाटते इतकेच. भोळ्या भावाने जो मागे पुढती असणाऱ्या, आत बाहेर असणाऱ्या शुन्याचा शोध घेतो, त्या शुन्यात असणाऱ्या चैतन्याच्या वाऱ्याचा शोध घेतो, तो शुन्यात असणाऱ्या नादश्रवणी तदाकारता साधून दिपाचा, तेजाचा अनुभव घेतो. त्याचे नयनात चैतन्याचे वारेच भरते. त्याला निर्गुणात पसरलेल्या वाऱ्याचा शोध लागतो. चैतन्याच्या जाणीवेने हरवलेले सर्वसुख त्याला प्राप्त होते. सुखाचा शोध लागतो. ***('आत वारा बाहेर वारा त्याचा निर्गुणात पसारा। त्या वाऱ्याचा शोध करा।'-श्रीनामदेवमहाराज, 'शुन्य शोधिले नाही जेणे। काय विवरण केले तेणे।।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मागे शुन्य पुढती शुन्य। आहे कोण तयात।।'-श्रीदासराममहाराज, 'शुन्य मेहेलमे दिप बिराजे। बाजे अनुहत ढोल।।'-संत कबीर)***

**

# सत्य बोला वेधी

आपण जे बोलतो त्यातून आपले मन व्यक्त होत असते. मन कल्पना करते त्या कल्पना आपण बोलून दाखवितो. मग कल्पनेत सत्य काय असणार? कल्पना या सारख्या बदलत असतात. किंबहुना ज्या बदलतात त्यालाच कल्पना म्हणतात. म्हणून आमचे बोलणेही सारखे बदलत असते. आपण आज बोलतो तेच उद्या बोलू असे नाही. मग बोलण्यावर विश्वास कोण ठेवणार? श्रीज्ञानेश्वरमहाराज आमच्या बोलण्याला बरळ म्हणतात. ते म्हणतात, ***'अनंत वाचाळ बरळती बरळ। त्या कैचा दयाळ पावे हरी।।'***. अज्ञानात जे बोलले जाते त्याला बरळ म्हणतात. आमचे ठिकाणी न बदलणारे सत्यज्ञान नसल्याने अज्ञानातून प्रगट होणाऱ्या विपरीत ज्ञानाने जे आम्ही बोलतो ती सारी बरळ. आमचे जे बोलणे असते ते चैतन्याचे प्रचितीवीण, अनुभवावीण असते, म्हणून ते कंटाळवाणे होते. संतांचे बोलणे हे सत्याचे अनुभवाचे प्रचितेचे अंतर्खूण बाणवणारे असते. ***('प्रचितीवीण बोलणे। ते अवघेची कंटाळवाणे। तोंड पसरून जैसे सुणे। रडोन गेले।।'- श्रीसमर्थ, 'संतांचे बोलणे अंतर्खूण बाणणे। संसार सुफळ होणे जाणत्यासी।।'- श्रीमामामहाराज, 'न करी रे संग राही रे निश्चळ। लागो नेदी मळ अहंतेचा। या नाव अद्वैत खरे ब्रह्मज्ञान। अनुभवावाचून बडबडती।।'- श्रीतुकाराममहाराज)*** म्हणून संतांचे बोलणे हे मनावर चांगला ठसा उमटविते. मन ज्या बोलाकडे वेधले जाते, आकर्षिले जाते, त्याला सत्य बोल म्हणतात. एक चिदानंद आत्माराम (विठ्ठल) सत्य आहे व चैतन्याचा (आत्म्याचा) अंतर्यामी घुमणारा नाद हा सत्य आहे. ***('येनु इल्लदानु याकनिन्न नीनू। सत्यचिदानंदनू आत्मारामा।। बंदिल्ला जीवात्मा नोडग वळग। नाद बिंदू तोरीसी तम्मा।।'- श्रीगुरुलिंगगीता)*** हे अंतर्यामी श्रुत होणारे विविध नाद मनाला आकर्षून घेतात. ***('घंटा किंकीणी नादं सिंहं शंखं नादं। भेर्यादीक महानादं अनुभव मन लुब्धं।।'- श्रीचिमडमहाराज)*** अंतरातील नादांची प्रचिती हे प्रचितीचे बोलणे असून त्याठिकाणी मन न कंटाळता रंगून जाते. मन हे नादमय होऊन जाते. ***('लुब्धली नादी की लागली समाधी। मूढजन नरनारी लोका रे। पंडीतज्ञानी योगी महानुभाव। एकची सिद्ध साधका रे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अंतर्यामी श्रुत होणाऱ्या विविध नादातील दशविध नादांचा उल्लेख हंसोपनिषद असा करते, ***'चिणिती प्रथमः चिंचिणिती द्वितीयः, घंटानाद स्तृतीय; शंखनादचतुर्थः पंचमः तस्मिन् नादः षष्टस्ताल नादः सप्तमो वेणुनादः अष्टमो मृदंगनादः नवमो भेरीनादः दशमो मेघनादः नवमं परित्यज्य दशमेवाभ्यसेत्'.*** या अंतरात श्रुत होणाऱ्या नादाला - सत्यबोलाला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'एकतत्व नाम' म्हणतात. हे एकतत्व नामच मनाला घट्ट पकडते व मनामुळे असणारे द्वैताचे बंधन दूर करते. ***('एक तत्व नाम दृढ धरी मना। हरीसी करुणा येईल तुझी।।', 'एकतत्व नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नौबद बाजत है हरीनामकी। अती मंदगती भाई सकल कामकी।।'- संतवचन, 'सत्य बोल अंतरात। त्यास नाम म्हणतात।।'- श्रीमामामहाराज)***

**

# वेधी मनोभृंग

दोन पळे साधनाभ्यासाने विषयातून मन बाजूला झाले असता मनाचे मनत्व नाहीसे होऊन मनाचे उन्मन होते व त्रिकूटाची ताटी उघडून रामनामाची धाटणी त्या जीवाला प्राप्त होते. ***('जरी दोन पळ साधेल पवन। मनाचे उन्मन होत असे।। जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।।', 'विषयातून निघे मन। तेचि जाणा उन्मन।।', 'गोविंद म्हणे मन होतसे उन्मन। रामनाम खूण दर्शनाची।।'- श्रीमामामहाराज, 'मन मारून उन्मन करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।'- संत मुक्ताबाई, 'खोलो त्रिकूटकी ताटी। बोलो रामनामकी धाटी।।'- संतवचन)*** रामनाम हा अंतरात उमटणारा चैतन्याचा सत्य बोल आहे. ***('सत्य बोल अंतरात। त्यास नाम म्हणतात।।'- श्रीमामामहाराज, 'रामनाम सत्य है। रामनाम नित्य है।।'- संतवचन)*** मनाचे उन्मन झाल्यावर श्रवण होणारा हा सत्यबोल कोणत्या मनाला आकर्षून घेतो? हा येथे प्रश्न आहे. विषयात लिप्त असणाऱ्या दृश्याशी तादात्म्य असणाऱ्या मनाचे उन्मन झाल्यावर श्रीसमर्थ ज्याला सर्वसाक्षी मन म्हणतात किंवा ज्याला श्रीतात्यासाहेबमहाराज 'पाहाता मन' म्हणतात ते मन महाकारणदेहात राहते. हे सर्वसाक्षी मन, पाहाता मन, वासनारहित शुद्ध मन हे भगवंताचे रूप आहे. या सर्वसाक्षी मनात फक्त चैतन्याचेच अंश असतात. ***('इंद्रियामाजी अकरावे। मन ते मी हे जाणावे। भुतामाजी स्वभावे। चेतना ते मी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** या सर्वसाक्षी मनाला वस्तूची वेगळेपणाने महाकारणदेहात नाद, बिंदू, कला, ज्योती रूपाने ओळख होते. मनाला अनुभव प्राप्त होतो. या अनुभवाची गोडी मनाला लागते. मन हे नादलुब्ध होते. ***('या मनाचे एक निके। जे हे देखिलिया गोडिचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुखचि कवतुके। दावीत जाइजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** नादश्रवणी तदाकारता साधली की चैतन्याचे वारेच नयनात भरते. नामाचाच बिंदूरूपाने साक्षात्कार होतो. अगणित चमचमणारे तारे तो अनुभवतो व त्याचे सर्वसाक्षी मन संपूर्णपणे मुरते. तुर्यावस्थेत वेगळेपणाने प्राप्त होणारे द्वैतातील ज्ञान, प्राप्त होणारे अनुभव ठायीच मुरून जातात. ***('जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया। ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी।।'- श्रीसमर्थ, 'पाहाता मन हे तल्लीन झाले। दिसती मौक्तीक माला। गगनाहोनी कोसळताती नक्षत्रांच्या माला।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।'- श्रीसमर्थ)*** मनाचे उन्मन, ज्ञानाचे विज्ञान (जाणीवरहित ज्ञान, वृत्तीरहित ज्ञान) झाल्यावर आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो व निरोपाधिक आत्मा ब्रह्म होतो. त्याला अद्वैत ज्ञान होते. बोधी, बोधिले, बोधिता ही त्रिपुटी नाहीशी होते व तो बोधरूप होतो. त्याला विश्वाचे मूळ सापडते. ***('बोधी बोधिले बोधिता नये ऐसे झाले। बापरखुमादेवीवरे विठ्ठले माझे मीपण हारपले।। मन हे राम झाले आता मन हे राम झाले। प्रवृत्ती सोडोनी कैसे निवृत्तीसी आले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# मुळ मेळविले

ज्यापासून हे सारे विश्व निर्माण झाले, ज्यापासून हे सारे चराचर निर्माण झाले असे चराचराचे मूळ जे शुद्ध निर्मळ स्वरूप आहे, ज्याला वेदांतात 'केवलज्ञान' असे संबोधतात, जे प्राप्त झाले असता भवाचे - संसाराचे मूळ निर्मूळ होते, जे केवलज्ञान - मूळ - प्राप्त झाले असता मोक्षाची प्राप्ती होते, असे वृत्तीरहित न बदलणारे निश्चळ सत्य आनंदाचे ज्ञान जो प्राप्त करतो, जो ज्ञानस्वरूप होतो, त्याला मिळवायचे काय उरते? ***('जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।'- श्रीसमर्थ, 'जे विश्वाचे मूळ। जे योगद्रुमाचे फळ। जे आनंदाचे केवळ। चैतन्य गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सत्य ज्ञान येता हाती। मग जीवा मोक्षप्राप्ती।।'- श्रीमामामहाराज, 'नाना शास्त्रं पठे ल्लोको नानादैवतपुजनम्। आत्मज्ञानं विना पार्थ। सर्व कर्म निरर्थकम्।।'- संस्कृत वचन)*** ज्याला काही मिळवायचे असते, मला हे पाहिजे, ते पाहिजे असे वाटते तो ज्ञानी नव्हे. जो वासनारहित होतो तो ज्ञानी. ***('बीज अग्निने भाजले। त्याचे वाढणे खुंटले। ज्ञात्यास तैसे जाले। वासनाबीज।।'- श्रीसमर्थ)*** कल्पनेमुळे जे ज्ञान होते त्याला दृश्याचे ज्ञान - पदार्थज्ञान म्हणतात. कल्पना नसताना निर्विकल्प अवस्थेत, निवृत्ती अवस्थेत जे ज्ञान होते, त्याला शुद्धस्वरूपज्ञान म्हणतात. ***('दृश्य पदार्थ वोळखिजे। त्यास पदार्थज्ञान बोलिजे। शुद्धस्वरूप जाणिजे। या नाव स्वरूपज्ञान।।'- श्रीसमर्थ)*** हे बरवे - श्रेष्ठ ज्ञान प्राप्त होण्यासाठी आधी ते बरवे हेतुरहित कर्म केले पाहिजे. बरव्या कर्मानी, सर्वात्मक ईश्वराची पूजा - उपासना केल्यास उपासकाला ते बरवे ज्ञान प्राप्त होते, मोक्षाची प्राप्ती होते. ***('आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षची पावणे।।'- श्रीसमर्थ, 'तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जे या चराचराचे मूळ आहे, जेथून हे सारे उगम पावले आहे, त्या उगमापर्यंत प्रवाहाच्या विरुद्ध पोहत जाणे हे सर्वांना साधत नाही. असा एखादाच बलवान निपजतो. तो उगमापर्यंत जातो व त्या उगमाच्या दर्शनाने पवित्र होतो, तीर्थरूप होतो. ***('येक बळाचे निवडले। ते पोहतची उगमास गेले। उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप।'- श्रीसमर्थ)*** पाण्याला मोठी ओढ असणाऱ्या या भवनदीत उलटे मुळाकडे पोहणे हे गुरुकृपेशिवाय शक्य होत नाही. ***('उलट उलट माघारा गडिया फिर गोते खासी। भरला पूर मायेचा लोंढा वाहोनिया जासी।। अविद्येचा पूर बाबा वेगी ओसरेना। कल्पना सुसरीची मिठी सुटेना।। या भवनदीचे पाणी रे गडीया मोठे ओढीते। भल्या भल्या पोहणाऱ्यांना उलथून पाडीते।। म्हणे मुक्ताबाई चांग्या अंतरीची खूण। धरी सद्‌गुरूचे पाय तुजला नेती उतरून।।'- श्रीसंत मुक्ताबाई)*** वासनेमुळे जन्ममरण या भवनदीच्या प्रवाहात सर्वसामान्य जीव पतीत होतात. संतकृपेने संतांनी केलेली सेवा जर आपण केली तर प्रवाहाविरूद्ध जाऊन जन्ममरणरहित मूळ स्वरूपाचे ज्ञान - उगमाचे ज्ञान होणारे आहे. ***('ते ज्ञान पैगा बरवे। जरी मनी आथि आणावे। तरी संता या भजावे। सर्वस्वेशी।।', 'जे ज्ञानाचा कुरुठा। तेथे सेवा हा दारवंटा। तो स्वाधीन करी सुभटा। वोळगोनी।।', 'तरी तनुमनुजीवे। चरणासी लागावे। आणि अगर्वता करावे। दास्य सकळ।।', 'मग अपेक्षित जे आपुले। तेही सांगती पुसिले। जेणे अंतःकरण बोधले। संकल्पा नये।।', 'ऐसे ज्ञानप्रकाशे पाहेल। तै मोहांधकारू जाईल। जै गुरूकृपा होईल। पार्था गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मिळवायचे काही न उरणे, वासनारहित मोक्ष प्राप्त होणे म्हणजे मूळ मिळवणे होय.

**

# मन

या जगात अशी एकही गोष्ट नाही की ज्या ठिकाणी आमचे मन लागेल, ते त्या ठिकाणी स्थिर होऊन मनाला समाधान होईल. मनाला समाधान व्हावे म्हणून आम्ही मनाजोगत्या गोष्टी करतो, गोष्टी आणतो, गोष्टी पाहतो, गोष्टी बोलतो, गोष्टी हुंगतो पण मन कोणत्याच गोष्टीत लागत नाही. कोणत्याही आवडत्या गोष्टीचा आपण सप्ताह करू शकत नाही. समजा आपणाला आम्रखंड आवडते म्हणून आपण सलग सात दिवस आम्रखंड खाऊ शकत नाही. आपण म्हणणारच आज आता पिठलं भाकरी करा. आता बास ते आम्रखंड. म्हणजे एकतर मनाची मागणी बदलते किंवा अपेक्षा वाढते. एकूण काय मनाचे समाधान या बाहेरच्या गोष्टींनी होत नाही. समाधान मिळावे या अपेक्षेने मन हे चंचळ आहे, त्याचे समाधान झाले, त्याला काही अपेक्षित अनुभव आला तर ते स्थिर होणारे आहे. हा संसार - हे विश्व स्थीरवील्ल - अस्थिर - बदलणारे - आहे. मग तेथे मन कसे स्थिर होणार? मन स्थिर करायचे प्रयत्न तसे वायाच जाणार. मनाची धावाधाव काही संपणार नाही. संकल्प व त्यापाठोपाठ विकल्प हेच मन कायम करत राहणार. ते संकल्पविकल्परहित जाणीवेत कधी होतच नाही. म्हणून जगद्गुरू शंकराचार्य मनाचे स्वरूप 'संकल्पविकल्पात्मकं मन:' असे सांगतात. या मनात येणाऱ्या कल्पनांमुळे द्वैताची, दृश्याची जाणीव होते व जीव द्वैती समरस होतो. ही जीवाची द्वैती समरसता हा परिणाम म्हणजे मन आहे. श्रीदासराममहाराज मनाचे स्वरूप असे सांगतात, 'देहाच्या मार्फत इंद्रियांच्याद्वारा जीवाचे दृश्याशी होणारे तादात्म्य म्हणजे मन आहे.' संकल्पविकल्प करणारे मन कधीही स्थिर होत नाही. ते कायम चंचळ राहते. पंचदशीकार संत श्रीबाबा गर्दे सांगतात, ***'हे मन चंचळ मोठे। नलगे याचा अंतची कोठे।।'*** तर श्रीभगवान गीतेत सांगतात, ***'चंचलम् हि मन: कृष्ण प्रमाथीबलवत् दृढम्। तस्य अहम् निग्रहम् मन्ये वायो: इव दुष्करम्।।'*** शुद्ध संकल्पविकल्परहित मन हे भगवद्रूप, चैतन्यरूप शुद्ध सात्वीक असून ते संकल्पावर आले की जडाचे अंशाने गढूळ होते. त्याला दृश्याची, द्वैताची जाणीव होते. साधनेने मन संकल्पविकल्परहित होणे म्हणजे मन शुद्ध होऊन देहातीत अवस्था प्राप्त होणे होय. शुद्ध मनाला चैतन्याचीच (हरीचीच) जाणीव होते. मन हेच माणसाला मोक्ष प्राप्त होणे किंवा बंध प्राप्त होणे याला कारण होते. ***('मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयो: बंधाय विषयासंगि मोक्षे निर्विषयं स्मृतम्।।'- मैत्रायणी ६/३४)*** मन शुद्ध होऊन श्रीहरीची प्राप्ती व्हावी या हेतूने श्रीसमर्थ मनाला असा बोध करतात, ***'मना सज्जना भक्तीपंथेची जावे। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे। जनी निंद्य ते सर्व सोडोनी द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे।।'*** तर श्रीतात्यासाहेबमहाराज मनाला असा बोध करतात, ***'मना तुजला सांगता कोणी नाही। मना तू मला साधनी साह्य होई। मना संग कुत्सीतांचा त्यजावा। मना राम तो अंतरी साठवावा।।'*** तर श्रीतुकाराममहाराज मनावर अंकुश निर्माण करण्यासाठी मनाला धाक दाखवितात. ते म्हणतात, ***'हठीयाची गोष्टी मोडोनी काढावी। सोय ती धरावी विठोबाची।।'***. मनावर अंकुश निर्माण झाला तर विपरीत ज्ञान (भास किंवा भ्रम) नाहीसे होऊन खरी ज्ञानाची जागृती निर्माण होणार आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दिस जागृतीचा।।'***

**

# गुरुपदी मन

नावरे आवरीता असे अचपळ मन झोप लागताना स्थिर व शांत होते. हे झोप लागताना मन शांत व स्थिर आपण करतो का? ते जर आपण करत असू तर मग एरवी ते शांत करणे आम्हाला का जमत नाही? मग नामस्मरण करताना मन लागत नाही ही तक्रार साधकांची किंवा अभ्यास करताना मन लागत नाही ही तक्रार विद्यार्थ्यांची का असते? झोप लागताना मन संकल्पविकल्परहित होणे व झोपेतून उठण्यापूर्वी मन संकल्पावर येणे ही सारी श्रेष्ठ गुरुकृपा आहे, आत्मकृपा आहे. ***(‘घेतो झोप सुखे फिरोनी उठतो ही ईश्वराची दया।।’- सुभाषितकार)*** माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज यांचे सद्‌गुरू श्रीनारायणमहाराज ‘नारायणीय शिष्यप्रबोध’ या ग्रंथात हा विचार असा मांडतात, ‘मन स्थिर व निष्क्रिय झाल्याशिवाय झोप लागूच शकत नाही हे प्रत्येकास दररोज स्पष्टपणे दिसत असता व मनास आवरण्याची शक्ती आपणात नाही याची पुरेपूर जाणीव यच्चयावत मनुष्यमात्रास असता आम्ही स्वेच्छेने झोप घेतो हे म्हणणे टिकू शकत नाही. झोप लागणे व परत उठणे ही सद्‌गुरूकृपाच.’ झोप लागताना मन हे श्वासोच्छ्वासात मुरते व मग झोप लागते असे छान्दोग्योपनिषद सांगते. हे श्वासोच्छ्वास - प्राणापान - सोहं - हेच सद्‌गुरूंचे चरण आहेत. ***(‘सः अहं अहं सः। गुरुपादुका या महा।’- श्रीमामामहाराज)*** या चरणांची लटक जर आपणास लागली तर मनोलयाने कल्पना नाहीशी होऊन सत्य अनुभवाला आल्याने माया स्वप्नवत होणार आहे. मन लय पावल्याने दृश्य विश्वाची जाणीव जाऊन द्रष्टाच दृश्य झाल्याने द्रष्टेपण नाहीसे होणार आहे. ***(‘मोरी लागी लटक गुरुचरननकी। चरणबिना मुझे कछू नही भावे। झूटी माया सब सपननकी। भवसागर सब सुख गयी है। फिकीर नही मुझे तरनन की। मीरा कहे प्रभू गिरीधर नागर। उलट भयी मोरे नयननकी।।’- संत मीराबाई)*** या चरणांची तनाने मनाने चंदनाप्रमाणे झिजून मीपणेवीण सेवा (साधन) केली तर आपणास अपेक्षित बरवे ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. ***(‘तरी तनमनुजीवे। चरणासी लागावे। आणि अगर्वता करावे। दास्य सकळा।।’, ‘ते गा ज्ञान पै बरवे। जरी मनी आथि आणावे। तरी संताते या भजावे। सर्वस्वेशी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** चंचळ मन हे या गुरुचरणाचे ठिकाणीच रमते - लय पावते - स्थिर होते. मन लय पावले की जन्ममरणरहित अवस्था प्राप्त होते. हेच या गुरुपदाचे थोर सामर्थ्य आहे. ***(‘धन्य हा सद्‌गुरूमहिमा हो। तत्पदी मन तुम्ही रमवा हो।।’- श्रीचिमडमहाराज, ‘आता कोठे धावे मन। तुमचे चरण देखिलिया।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।।’- संत मुकुंदराज, ‘बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनू सहजे गगना। मिळोची लागे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘विषय ते मनाअधीन। मन पवनासी वश्य जाण। अभ्यासे वश केला पवन। सहजे मन स्थिरावे।।’- श्रीनाथमहाराज)*** या गुरुपदांचे वेगळेपण व त्याचे महत्त्व श्रीमामामहाराज असे सांगतात, ***‘गुरुपद गती थोर। सर्व जीवासी आधार।।’, ‘गुरुपदी सर्व सुख। उरो नेदी काही दुःख।।’, ‘गुरुपदी मन। जडता होतसे उन्मन।।’, ‘गुरुपदी लीन होता। अंतर्मार्ग येई हाता।।’, ‘गुरुपदी जडे छंद। देव भेटवी गोविंद।।’*** तर श्रीस्वामीस्वरुपानंद या गुरुपदांचे महत्त्व असे सांगतात, ***‘स्वामी म्हणे माझे कृतार्थ जीवन। सद्‌गुरूचरण उपासिता।।’*** सद्‌गुरूचरणांच्या उपासनेने माझे कृतार्थ जीवन अनुभवाला येते.

✲✲

# गुरुकृपांजन

गुरुपदाचे ठिकाणी मनाचे तादात्म्य झाले की मनोलयाने जन्ममरणरहित अवस्था - सोहं तेही अस्तवले ही अवस्था प्राप्त होऊन आत्मसूर्याचे प्रकाशाने दृश्य विश्वाचा आभास मावळतो व सर्वत्र परमेश्वर (राम) भरून राहिल्याचा अनुभव येतो. सर्वत्र अद्वैत अनुभवाला येते. सर्वत्र सर्वकाळ रामरूप अनुभवाला येणे म्हणजे गुरुकृपांजन प्राप्त होणे होय. श्रीनाथमहाराज या अवस्थेचे वर्णन असे करतात, ***'गुरुकृपांजन पायो मेरे भाई। रामबीना कछु जानत नाही।। अंदर राम बाहिर राम। जहाँ देखो वहाँ रामही राम।। जागत राम सोवत राम। सपनेमो देखो तो राजाही राम।। एका जनार्दनी भावही निका जहाँ देखो वहाँ रामहीसरीका।।'*** तर आमचे चिमडचे महाराज हा अनुभव असा सांगतात, ***'गुरुचे अंजन मी ल्याले। माझे मज दिसो आले। झगमग झगमग कोंदाटले। चहुकडे तेची।।'*** संत देवनाथ हा अनुभव असा सांगतात, ***'गुरुकृपेका अंजन पाया। मेरा मै जानू।।'.*** मनोलयाने डोळ्यातील दृश्य गाळले जाणे व मन मुरल्यावर जे उरते त्या सत्यस्वरूपाचा अनुभव येणे म्हणजे हे गुरुकृपांजन डोळ्यात पडणे होय असे मला वाटते. जुन्या काळी गुप्तधन दिसण्यासाठी डोळ्यात अंजन घालायचे त्याप्रमाणे निजधन - निजत्व हे 'धन' दिसण्यासाठी गुरुकृपांजन डोळ्यात घालावे लागते. श्रीसमर्थ हे गुरुकृपांजन डोळ्यात केव्हा पडते हे असे सांगतात, ***'डोळा हा गाळोनी साधिले अंजन। निजी निजधन प्राप्त झाले।।'*** तर चिमडचे महाराज हा अनुभव असा व्यक्त करतात, ***'काढिले एक अंजन डोळा गाळून अलक्ष्यस्थान दाविली नाणी। बाई दिसू लागली चिद्रत्नांची खाणी।।'*** हाच अनुभव श्रीज्ञानेश्वरमहाराज वेगळ्या शब्दात असा सांगतात, ***'नाईकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी। अवाच्य ते टाळी। जीभची गा।।'.*** मनोलयाने कल्पना नाहीशी झाल्याने सर्व इंद्रियांना दृश्य गाळून सत्य स्वरूपाचा अनुभव येतो. ही 'सत्' या गुरुंची कृपा आपले असत्पण लोपल्याशिवाय होत नाही. आपले असत् वहिवाटीही पुसले जाणारे नामरूप हरपल्याशिवाय देहाचा अहंकार गेल्याशिवाय ही सद्गुरुकृपा होत नाही. आपले सत्य नि:शब्द नामरूप अनुभवाला येत नाही. ***('नामरूप नाही सोपे। मिळे गुरुचिया कृपे।। गुरुकृपा महाभारी। होय असत्याबाहेरी।।' ,'उपदेश घेता सुख वाटे। मुख्य ते गळाली पाहिजे अहंता।।'- श्रीतुकाराममहाराज, 'माझे असत्पण लोपो। नावरूप हारपो। मज झणे वासिपो। भूतजात।।', 'तया पाडे देही। जया मी आहे हे सेचि नाही। निरहंकारीता पाही। तया नाव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# गुरुची सेवा

आम्ही समजतो तशी श्रीगुरुंची सेवा करून आपणास गुरुसुख - आत्मसुख प्राप्त होईल का? आम्ही सेवा कशी करावी यातील वर्म मला सांगा असे श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर म्हणतात. ते म्हणतात, ***'सेवेचे वर्म सांगा उकलोनी पांडुरंगा। गुरुदत्तज्ञानगंगा ऐसीच वाहात ठेवा।।'.*** समजा आम्ही गुरुंसाठी मठ बांधला, काही दान दिले म्हणजे आत्मसुख - गुरुसुख प्राप्त होईल का? या अशा लौकिकातील सेवेने आत्मसुख प्राप्त होत नाही. श्रीगुरुंना असली सेवा अपेक्षित पण नसते. ***('लौकिकासारिखी नव्हे माझी सेवा। अहा जी केशवा पांडुरंगा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'शिष्याची जो नेधे सेवा। मानी देवासारिखे।।'- संतवचन)*** मग शिष्याचे सार्थक करणारी अलौकिक गुरुसेवा कोणती? श्रीदासराममहाराज कोणती सेवा करावी हे समजण्यासाठी एक गोष्ट सांगत ती अशी, 'श्रीतुकाराममहाराजांकडे त्यांचा एक शिष्य आला. तो म्हणाला, 'महाराज काहीतरी सेवा सांगा.' श्रीतुकाराममहाराज म्हणाले, 'मी सांगीन ती सेवा करणार का?' तो म्हणाला, 'तुम्ही सांगाल ती सेवा करीन. मी तुम्हाला तसे वचन देतो.' त्याला वाटले की महाराज काहीतरी लौकिकातील मागतील पण महाराजांनी त्याला वाटले होते तसे पैसे, वस्तू काहीच मागितले नाही. ते म्हणाले, ***'तेणे आम्ही सुखी। म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी।।'.*** मग तो शिष्य विठ्ठल विठ्ठल म्हणू लागला. महाराज म्हणाले, 'नुसते जुलमाने विठ्ठल विठ्ठल म्हणणे नको, ते मनोभावे, आवडीने, देहाला विसरून व्हावयास हवे.' ***('सेवा ते आवडी उच्चारावे नाम। भेदाभेद काम निवारोनी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'तुझी सेवा करीन मनोभावे। माझे मन गोविंदी रंगले हो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मग शिष्याला गुरुची सेवा कशी करायची हे समजले. देहभावाने असणारे द्वैत विसरून अद्वैती समरस होऊन ही स्मरणसेवा व्हावयास हवी. ***('ऐसे मीच होऊनी पांडवा। करिती माझी सेवा। परी नवलावो तो सांगावा। असे आईक।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अशी सद्गुरूसेवा घडली तर शिष्याचे सार्थक होणार आहे. ***('सद्गुरूसेवा देई देवा। सार्थक होईल जन्माचे। घडता पाही मग भय नाही। केल्या मागील कर्माचे।।'- संतवचन)*** जो गुरुंच्या आज्ञेप्रमाणे साधन सेवा करतो व त्याचे साधनाने मन कृश, वासना कृश होते तो गुरुंच्या प्रेमानेच संतुष्ट होतो. गुरुसेवा कशी करावी हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'जो गुरुदास्ये कृशु। जो गुरुप्रेमे सपोषु। जो गुरुआज्ञे निवासु। आपणचि।।', 'गुरुसंप्रदायधर्म। तेचि जयाचे वर्णाश्रम। गुरुपरिचर्या नित्यकर्म। जयाचे गा।।', 'गुरुक्षेत्र गुरु देवता। गुरु माता गुरु पिता। जो गुरुसेवेपरौता। मार्गु नेणे।।'*** या गुरुसेवेने अद्वैत साधले तर त्या शिष्याला द्वैतातील भीती राहात नाही. ***('आता भय नाही ऐसे वाटे। घडलिया सेवा समर्थाची।।'- संतवचन, 'तू माझा मी तुझा गुरुवरा। तू माझा मी तुझा। कुठे मग भाव राहिला दुजा।। मी देह वाहिला तव सेवेकारणे। मम चित्त मिळाले तुजला अगतिकपणे।। त्वद्रूप जाहले केवळ माझे जीणे। मी तुजवाचूनी साऱ्या विषया कधीच दिधली रजा।। मी श्वास सोडितो तुजला संबोधुनी। मी गाणे गातो तुजला उद्देशुनी। मी येतो जातो तवरूपा आतुनी। साधुदास कवी अद्वैताची द्वैती लुटतो मजा।।'- राजकवी साधुदास)***

**

# गुरुच्या सेवेने गुरुसुख

सर्वव्यापक आद्य चराचराचे मूळ, कल्पनेचा निरास करणाऱ्या सत्य वस्तूचे बरवे ज्ञान व्हावे असे वाटत असेल तर ज्ञात्या संतांची शरीराने मनापासून जीवभावाने नम्रपणे सेवा व्हावयास हवी. ***(‘ते ज्ञान पै गा बरवे। जरी मनी आथी आणावे। तरी संता या भजावे। सर्वस्वेसी।।’, ‘तरी तनुमनुजीवे। चरणासी लागावे। आणि अगर्वता करावे। दास्य सकळ।।’, ‘रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘भज सेवायां।’ भज म्हणजे सेवा करणे)*** अशी श्रेष्ठ गुरुसेवा ज्याचे हातून घडते, ज्याला सेवेने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधतो त्याला काया काशीमध्ये संतांचा आदेश प्राप्त होतो. तारकमंत्राचा उपदेश प्राप्त होतो. या तारकमंत्राने तो मनाच्या पलिकडे जाऊ लागतो. ***(‘मग अपेक्षीत जे आपुले। तेही सांगती पुसिले। जेणे अंत:करण बोधिले। संकल्पा नये।।’, ‘काया काशी गुरु उपदेशी। तारक मंत्र दिला आम्हासी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सद्‌गुरू श्रीनारायणमहाराज यांचे उपदेशाप्रमाणे साधना केल्याने देहाचा, मनाचा, प्राणाचा लय साधलेल्या अवस्थेत रात्री ग्रंथराज दासबोधपारायण प्रसंगी गुरुतृतीया या पर्वकाळी श्रीतात्यासाहेबमहाराजांनी चैतन्यरूपाने प्रत्यक्ष प्रगट होऊन नित्य कीर्तनसेवेचा आदेश; कीर्तनानुग्रह - श्रीमामामहाराजांना दिला. हा नित्यकीर्तनसेवेचा आदेश त्यांनी नित्यसाधनेबरोबर प्राणापलीकडे जपला. देहाच्या विकलांग अवस्थेत आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी ही कीर्तनसेवा - साधनसेवा - गुरुसेवा आचरली. केवढी ही गुरुभक्ती! एकांती लोकांती देहांती ही नाम ही उत्तम प्रचिती स्वये सर्वांना दिली. श्रीदासराममहाराज त्यांचे बाबतीत म्हणतात, ***‘हनुमंत आदेश प्राणासमान। गोविंद नेमे करी नामकीर्तन। सेवा घडे सेवकबुद्धीनेही। पदांबुजी बालक राम राही।।’.*** श्रेष्ठ गुरुसेवेने ते स्वरूपाकार झाले. पण ते महाराज कधीच झाले नाहीत. सेवा ही सेवकबुद्धीनेच कडेपर्यंत झाली हे केवढे विशेष! पुढे श्रीमामामहाराजांचे आज्ञेप्रमाणे श्रीमामामहाराजांचे निर्याणानंतर त्यांचे अधिकारी चिरंजीव श्रीदासराममहाराज यांनी वडिलांप्रमाणेच ही कीर्तनसेवा ३९ वर्षे अखंडत्वाने साधली. शेवटी कीर्तनोत्तर नित्यकीर्तनाचे अखंड स्मरणात त्यांनी निर्याण साधले. या कीर्तनसेवेबद्दल असणारा त्यांचा भाव ते असा व्यक्त करतात. ***‘संती सांगितली सेवा। पार नाही आमुच्या दैवा।। म्हणोनिया तुझे द्वारी। देतो नामाची ललकारी।। सुखे करी तो कीर्तना। सभारंगी नारायणा।। असो द्यावी आपुली नजर। दिन दासरामावर।।’*** गुरुसेवेने जन्ममरणाचे पैल घननीळ आत्मारामाची प्राप्ती होते. संसारदु:खाची आत्यंतिक निवृत्ती होऊन सर्वसुखाची - अखंड सुखाची - आत्मसुखाची - अद्वैताच्या निश्चळ सुखाची - प्राप्ती होते. निवृत्ती अवस्थेत वृत्तीरहित ज्ञानाने तो अत्यंत समाधानी होतो. अखंड चैतन्याचे स्मरणाने संसारापासून बाजूला झाल्याने - जन्ममृत्यूपासून सुटका झाल्याने - तो मोक्ष प्राप्त करून श्रेष्ठ आनंद - गुर्वानंद प्राप्त करून घेतो. मोक्ष प्राप्त होणे हे श्रेष्ठ भाग्य त्याला लाभते.

**

# श्रीहनुमंत षष्ठी

श्रीचिमडच्या महाराजांच्या कृपेने ज्यांना मोक्षश्री प्राप्त झाली अशा श्रेष्ठ भाग्याने विनटलेल्या, जगात धन्यता प्राप्त करून घेतलेल्या आत्मज्ञानी, हरीभक्त श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांची आज पुण्यतिथी आहे. त्यांचे सद्‌गुरू एकनाथमहाराजांचे अवतार श्रीचिमडचे महाराज यांचे आज्ञेने मुमुक्षुंना योग्य मार्गदर्शन व्हावे यासाठी सांगलीमध्ये त्यांनी अखंड २५ वर्षे कीर्तन साधले. सांगली हे त्यांचे वास्तव्याने पुण्यक्षेत्र झाले. त्यांचे नित्यकीर्तनास दोन पाच हजार श्रोते तर विशेष प्रसंगी दहा हजारपर्यंत श्रोते असत. ***('मोक्षरेखे आला भाग्ये विनटला। साधूंचा अंकिला हरीभक्त।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'महाविष्णू तू एकनाथ तू स्वामी गुरुनाथा। दास प्रभूचा रामकृपेचा। वंदित पद माथा।।', 'राम गेला म्हणती आपुल्या धामासी। नसे एकदेशी राम माझा।। व्यापोनी सर्वासी आणिक उरला। जन्म मृत्यू त्याला मुळी नसे।। मूळ पाहताची बिंदूरूपे राम। कैवल्याचा धाम आत्माराम।। त्याच्या नाममात्रे हनुमंत तरला। जन्ममरण झोला सत्य चुके।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, 'सांगली पंढरी झाली हरीनामाने दुमदुमली।।'- श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर, 'पेठ वसविली सांगली ग्रामी हरीगुण नामाची। काय मौज त्या पेठेमाजी गर्दी उतारूंची।। एक लक्षका रूपया देता देती हिरे तेरा। तेरामाजी साठविला तो परमेश्वर सारा।। माल लागला बंदराला अमोलिक पाही। जो तो येतो घेऊनी जातो लक्ष देऊनी पाही।। ययाकारणे सवंग जाहला खरा माल पाही। लूटची करिती घ्या घ्या म्हणती जेवी तृप्त होई।। कितीही लुटला तरी न संपे माला हा तो बरा। जो तो येतो घेऊनी जातो आनंदुनी घरा।। पेठ वसविली सांगली ग्रामी हनुमंतरायानी। छत्तीस वर्षे लुटूनी लुटले घ्या म्हणती कोणी।। राम बाळ हा आनंदुनी नाचत हो गेला। मौक्तिकाचा चुरा पाहुनी अंतरी घेऊनी आला।।'- श्रीदासराममहाराज)*** प्रल्हादाप्रमाणे आईचे उदरात असताना भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह श्रीदासराममहाराजांना प्राप्त झाला. परिणामी ते वयाच्या पाचव्या वर्षीच ब्रह्म माया अशा गहन विषयावर कीर्तन करू लागले. या एका गोष्टीवरून श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अधिकार स्पष्ट होतो. आपल्याच ठिकाणी कीर्तनसुख - विदेहीसुख प्राप्त करून घेण्यासाठी त्यांचा अवतार होता. राजकवी श्रीसाधुदास त्यांचे बाबतीत म्हणतात, ***'कीर्तनसुखार्थ झाला। अवतारची पुण्यशील तात्यांचा। अनुदिनी रमविली जेणे। श्रीहरीगुणगायनी स्वये वाचा।।'.*** हे विदेहीसुख- कीर्तनसुख केव्हा प्राप्त होते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'कैसे माझ्या गुणी धाले। देशकाळाते विसरले। कीर्तनसुखे झाले। आपणपाची।।'*** तर श्रीदासराममहाराज या संतांच्या विदेही कीर्तनाचे वर्णन असे करतात, ***'संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी। नामसंकीर्तन उरले त्या ठाया। देहभाव लया गेला त्यांचा।'.*** आपले अवतारकार्य झाले की संतमहात्मे हे एक क्षणही येथे राहात नाहीत. श्रीतात्यासाहेबमहाराजांनी आपण देह ठेवणार असल्याचे संकेत जाहीर कीर्तनातून दिले. त्यांनी श्रोत्यांना विचारले, ***'ब्रह्मपुरी आम्ही जातो रे कोणी येतो का रे। संगे येईल त्यासी नेतो रे लाभ होतो रे।।'.*** २७ जानेवारी १९२४ पौष व.६ ही श्रीतात्यासाहेबमहाराजांचे वडिलांची पुण्यतिथी होती. त्या पुण्यदिनी श्रीतात्यासाहेबमहाराजांनी निर्याण करणेचे ठरविले. या दिवशी त्यांनी वडिलांचे श्राद्ध केले व थोडासा श्राद्धप्रसाद घेऊन त्यांनी थोडा काळ ज्ञानमयी निद्रा घेतली. संध्याकाळी पाच वाजता पोथीवाचनाचे वेळी भीष्माचार्यांचा निर्याण प्रसंग वाचताना 'महाराज आले आहेत, आरती करा' असे सांगून या महात्म्याने इहलोकीचा निरोप घेतला. महाराज रामरूप झाले. नामरूपाने आजही आमचेपाशी महाराज आहेत.

**

# काया जे गलीत

आपले हे शरीर उत्सव करून जर गलितगात्र - निर्बळ झाले तर लळीत होईल पण ते चिडचिडीने, त्राग्याने, त्याने काय साधणार? हा देह (दिसणारा) गलीत झाला तरी आशा-वासना नाहीशी होत नाही. अर्थात संसार - संसरण - काही सुटत नाही. जोवर आस आहे तोवर संसरण सूक्ष्म होत नाही. अर्थात परमार्थ साधत नाही. जगद्‌गुरू शंकराचार्य सांगतात, ***'अङ्गं गलितं पलितं मुण्डं दशनविहीनं जातं तुण्डम्। वृद्धो याति गृहीत्वा दण्डं तदपि न मुञ्चत्याशा पिण्डम्।।'*** देह स्वस्थ असताना साधन - भजन साधायची पंचाईत तर मग देह अस्वस्थ असताना ते कसे साधणार? उत्सव असा हवा, जेणेकरून देहाभिमान, देह मी हा देहभाव नाहीसा होईल. याकरता नामाचा उत्सव, साधनाचा उत्सव हवा. त्याकरता साधनाचा उत्साह हवा. ***('उठा उठा साधुजन साधा आपुले निजधन। सांडा आळस उघडा नयन घ्या दर्शन सद्‌गुरुंचे।।'- चिमडमहाराज)*** श्रीगुरुंनी सांगितलेले साधन करणे हीच खरी गुरुसेवा - श्रेष्ठसेवा आहे. देहभाव विरणारे साधन - आयुष्याचे साधन - श्वासोच्छ्‌वास साधनीभूत केले पाहिजेत तरच तीन अवस्थांची एक अवस्था होणे, एकदशा प्राप्त होणे, स्थूल, सूक्ष्म, कारण देहाचा निरास होऊन - हे तीन देह गलित होऊन - महाकारणदेही अखंडस्मरण प्राप्त होणे व संसारापासून बाजूला होणे म्हणजेच संसाराचे लळीत होणे साधणारे आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***'जाले देह हो गलीत। आले संसारा लळीत।।', 'जाले देह हो गलीत।।'*** हे समर्थवचन अनेक देहांचा निर्देश करीत आहे, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. श्रीदासराममहाराज हे संसाराचे लळीत कसे साधायचे याचे वर्म असे सांगतात, ***'देहभाव लया जाता। लळीत होय गुरुभक्ता।। जेथे नुरे अहंकार। देव प्रगटे साकार।। गुरुसेवा अखंडीत। जेथे घडेल नेमस्त।। नाम साधे श्वासोश्वासी। घडी घडी अहर्निशी।। दास म्हणे हे लळीत। बोलियेले साधुसंत।।'*** आधी आपण कळेनासहित झालो, अज्ञानाचे ज्ञान झाले तरच हा जीवनरस स्थिर होणार व नारायणाची (आत्म्याची) प्राप्ती होऊन आत्मसुखाने तृप्ती होणार. हे संसाराच्या लळिताचे वर्म श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'गळीत झाली काया। हेचि लळीत पंढरीराया।। आले अवसानापाशी। रूप राहिले मानसी।। वाहिला कळस। चरणी स्थिरावला रस।। तुका म्हणे गोड झाले। नारायणी पोट धाले।।'. ('गळीत काया अभिमान। हेचि लळीताची खूण।।'- श्रीमामामहाराज, 'ऐसे कोण आहे स्थळ। जेथे नामाचा उत्सव।।'- संतवचन, 'देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे विठ्ठलू रे विठ्ठलू रे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** देहभाव लयाला जाऊन ज्यांनी संसाराचे लळीत साधले अशा अहंकाररहित गुरुभक्तांचे समोर आमचे श्रीतात्यासाहेबमहाराज प्रगट होतात व भक्ताने जे मनात धरावे ते ते महाराज आपसुकच पुरे करतात. भक्तासमोर श्रीमहाराज कोणत्या रूपात साकार होतात याचे वर्णन श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'रत्नजडीत सिंहासन। वरी बैसले आपण।। कुंचे ढाळिती दोनी बाही। जवळी राई रकुमाई।। तेथे नाना उपचारी। ऋद्धी सिद्धी ते कामारी।। हाती घेऊनी पादुका। उभा बंदीजन तुका।।'***

**

# अबोलाची मात

साधनाभ्यासाने संसरणाचे - संसाराचे - लळीत साधले असता स्थूल, सूक्ष्म देहातील विपरीतज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या कारण देहातील अज्ञानाचे ज्ञान - जाणीव - महाकारणदेहात अखंड प्राप्त झाली म्हणजेच जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था - एकदशा प्राप्त झाली म्हणजेच चौथ्या गुणाच्या साहाय्याने अहर्निशी परमार्थाची तुर्यावस्था प्राप्त झाली की अखंड जाणीवेने जाणीवेचा ग्रास होतो, अंत:करणातील हेतू मावळून शब्दच नि:शब्द होतात व त्याचे बोलणे खुंटते. त्याला खरे मौन साधते. हे मौन (अबोला) कोणत्या साधनाभ्यासाने कसे साधते, हे सांगणाऱ्या श्रीसमर्थांच्या ओव्या अशा, ***'येकांती मौन धरून बैसे। सावध पाहता कैसे भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती।।', 'उच्चारेवीण जे शब्द। ते जाणावे सहजशब्द। प्रत्यया येती परंतु नाद। काहीच नाही।।', 'ते शब्द सांडून बैसला। तो मौनी म्हणावा भला। योगाभ्यासाचा गलबला। याकरणे।।', 'येकांती मौन धरून बैसला। तेथ कोण शब्द जाला। सोहं ऐसा भासला। अंतर्यामी।।'.*** जाणीवरहित जाणता झाल्याशिवाय, वृत्तीरहित ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय खरे मौन साधत नाही. श्रीसमर्थ सांगतात, ***'जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।।', 'वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।', 'आणिक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोचि धन्य। समाधानी।।'.*** लटके बोलणे आणि साच अबोलण्याचे बोलणे, जडाची जाणीव व चैतन्याची वेगळेपणाने होणारी जाणीव हे दोन्ही नाहीसे झाले असता जाणीवरहित जाणता होऊन उन्मनी अवस्था प्राप्त होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज या उन्मनीतील मौनावस्थेबद्दल असे सांगतात, ***'साच लटिके दोनी। न बोले जाहला मौनी। जे भोगिता उन्मनी। आरायेना।।'*** तर श्रीकेशवस्वामी या मौनाबद्दल असे सांगतात, ***'बोलणे सांडी बोलणे सांडी। मौन्यावरती आसनमांडी।। बोलणे अबोलणे सारूनी दोनी। बोलसी तरी बोल शब्दाते गिळोनी।। सद्गुरूकृपे केशवी पाही। बोलणे अबोलणे नुरेची काही।।'*** तर श्रीनिवृत्तीनाथमहाराज या मौनाबद्दल असा खुलासा करतात, ***'राऊळामाजी जाता राहे देहअवस्था। मन हे उन्मन झाले नसे बद्धतेची वार्ता। हेतू हा मावळला शब्दा आली नि:शब्दता। तटस्थ होवोनी ठेले निजरूप पाहता। ते सुख काय सांगू वाचे बोलता नये। आरतीचेनी योगे गेले मीपण माझे।।'.*** अंतरी होणाऱ्या अहर्निशी जपाचे योगे नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती आली असता हे वृत्ती मौन साधते. ***('ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरी जपे सदा।।', 'रामकृष्णनामी उन्मनी साधली। तयासी लाधली सकळसिद्धी।', 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अहर्निशी सदा नाम जपणेसाठी नामाचा छंद लागावा लागेल. संस्कृत भाषेत काव्यात अनेक प्रकारचे छंद आहेत. त्यातील गायत्री छंद हा भगवंतांचे स्वरूप आहे. असे विभूतीयोगात भगवंतांनी सांगितले आहे. अर्थात गायत्री छंद हा सर्वात श्रेष्ठ - गुरु - छंद आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'गायत्रीछंद जे म्हणिजे। ते सकळा छंदामाजी माझे । स्वरूप हे जाणिजे। निभ्रांत तुवा।।'.*** गायत्रीछंदाचा छंद म्हणजे गायत्रीमंत्राचा उच्चार वारंवार आवडीने करणे का? नाही. गायत्रीमंत्राचे उच्चाराने गायत्री भेटत नाही. गायत्रीचे ज्ञान होत नाही, संसारसागरातून परपार होता येत नाही, भवबंध तुटत नाही. श्रीसमर्थ सांगतात, ***'गाईत्री मंत्राचा उचारु। सांगे तो साचार कुळगुरु। परी ज्ञानेवीण पैलपारु। पाविजेत नाही।।'*** तर श्रीगोविंदनाथ सांगतात, ***'असा धरी छंद। जाय तुटोनिया भवबंध।।'***

**

# गुरुछंद व निंदक

गायत्री मंत्र हा त्रिपद आहे म्हणून तिला त्रिपदा गायत्री म्हणतात. गायनाचे तंत्रात बसविली आहे म्हणून तिला गायत्री म्हणतात. राममंत्र, श्रीराम जयराम जयजयराम मंत्र, सोहंमंत्र, रामकृष्णहरी मंत्र, ओंकारमंत्र हे सारे प्रचलीत मंत्र गायत्रीमंत्राप्रमाणे त्रिपदच आहेत. पण हे सारे मंत्र त्रिपद आहेत. हे तरी आम्हाला कुठे माहीत आहे? श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात ऐकले आहे, म्हणून मला हे माहीत आहे. हे मंत्राचे त्रिपद जाणून त्याची मिळणी साधता आली पाहिजे. साधनेने इडा आणि पिंगला सुषुम्नाकार होणे म्हणजे ही मिळणी साधणे होय. ही मिळणी साधली असता तो मंत्र संधीकाळात साधला जातो. संध्या साधली जाते. म्हणून नामस्मरण ही बिनपाण्याची संध्याच मानली जाते. ही संध्या करण्याचा अधिकार सर्वांना आहे. पण अधिकार बजावणारे फार थोडे. अशी संध्या साधली तर संदेह नाहीसा होऊन जन्ममरणाचे पैल आत्मज्ञानाची प्राप्ती होते. आत्मसुख - खरे सुख - प्राप्त होते. ***(‘इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता। रामनाम हाता येत असे।।’- श्रीमामामहाराज, ‘झाली संध्या संदेह माझा गेला। आत्माराम हृदयी प्रगटला।।’- श्रीनाथमहाराज, ‘त्रिपद जाणता मिळणी साधिता। सुखासुख हाता येत असे।। त्रिपदाचे ऐक्य त्रिपुटीचा लय। गुरुकृपा होय तरीच कळे।।’- श्रीदासराममहाराज)*** अशा संधीकाळात साधणाऱ्या गायत्रीमंत्राची पुरश्चरणे श्रीसमर्थांनी केली, श्रीमामामहाराजांनी केली. अशा समर्थ छंदाने असाध्य गोष्टी साध्य होतात. गुप्त आहे ते प्रगट होते. संदेहरहित साधन साधून तो सिद्धपदास पोचतो. असा सिद्धपदास पोचलेला महात्मा कुणाची निंदा करत नाही व कोणी त्याची निंदा केली तरी तो निंदेने खट्टू होत नाही. निंदा कुणाची होत नाही? निंदा सर्वांची होते. प्रत्येकाकडे काही गुण व काही दोष असल्याने निंदा-स्तुती होणे हे अटळ आहे. परमार्थी माणूस रागावत नाही म्हणून त्याची निंदा थोडी जास्तच होते इतकेच. सर्वच रागावतात, लोभावतात पण परमार्थी साधन करणारा साधक रागावला, लोभावला की त्याची निंदा होते. सर्वच हूं म्हणून खातात व झोपतात, पण परमार्थी साधक जास्त खाऊ, झोपू लागला की टीकेचा धनी झालाच. सर्वच एकांती, लोकांती स्त्रियांशी बोलतात पण साधक एकांती लोकांती नाम न घेताना स्त्रियांशी बोलू लागला किंवा अहर्निशी परमार्थ साधणारा चौथा गुण सोडून सत्व, रज, तम - सतर या स्त्रीशी त्याने जवळीक केली की टीका झालीच. सर्वसामान्य माणूस निंदेने खट्टू होतो व स्तुतीने हरभऱ्याच्या झाडावर चढतो. त्याला हा बोचणारा, खुपणारा निंदक नको वाटतो. पण संतमहात्म्यांना मात्र हा निंदक अत्यंत महत्त्वाचा वाटतो. ते गुणदोष न पाहताना सर्वत्र चैतन्य पाहात असल्याने ते कोणाची निंदा करीत नाहीत किंवा दुसऱ्याची तिसऱ्याने केलेली निंदा ऐकतही नाहीत. पण ते स्वत:ची कोणी केलेली निंदा मात्र अगदी कान देऊन ऐकतात व आपले खरेच काही चुकत असेल तर त्यात सुधारणा करतात. त्यांचे म्हणण्याप्रमाणे जर आपले काही चुकत नसेल तर ती निंदा ते आत घेत नाहीत. कोणाच्या निंदेने खट्टू होऊन ते स्वहिताचा परमार्थ सोडत नाहीत. अचूक साधन ते बिनचूक करत राहतात. जे खरे संत असतात ते निंदकांचे टाकीचे घाव सोसून देवत्वाप्रत पोचतात. पण भ्रमरूप असंत मात्र परमार्थ सोडून देतात व स्वहिताला मुकतात. ***(‘जो निंदेते नेधे। स्तुती न श्लाधे। आकाशा न लगे। लेपू जैसा।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘निंदक तो नको वाटे। जैसे वाटताती काटे।। परी संता उपकारी। निंदक वाटे सर्वापरी।। गोविंद म्हणे हे पटेल। ज्यासी सद्‌गुरु असेल।।’, ‘स्तुती नायकावी निंदा आयकावी। तरीच पदवी प्राप्त होय।।’- श्रीमामामहाराज, ‘निंदेचे श्रवण न यो माझे कानी। बहीर करोनी ठेवी देवा।।’, ‘कोणी निंदा कोणी वंदा। आम्हा स्वहिताचा धंदा।।’, ‘कासया गुणदोष वानू आणिकाचे। मज काय त्याचे उणे असे।।’, ‘हिरा ठेविता ऐरणी वाचे मारिता जो घणी। तोचि मोल पावे खरा करणीचा होय चुरा।।’, ‘तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात।।’- श्रीतुकाराममहाराज)***

**

# रिकामा

निंदा जे करतात ते त्याचे पाप घेऊन जातात व जे स्तुती करतात ते त्याचे पुण्य घेऊन जातात हा महात्मा पापपुण्य खलास होऊन मोक्षाला जातो. अंतरातील आस - इच्छा - वासना नाहीशी होणेसाठी निंदक हा उपयोगी पडणारा आहे. परमार्थी माणसाने इच्छा केली की त्याची निंदा होते. वासनेने जन्ममरण प्राप्त होते, तो परमार्थ नव्हे. ***('अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाही जन्ममृत्यूची।।'- श्रीसमर्थ)*** म्हणून या निंदकाचे परमार्थात महत्त्व. या निंदकाचे महत्त्व श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'निंदक कामाचा कामाचा। गडी आत्मारामाचा।। निंदक आमुची काशी। आमुची पातके अवघी नाशी।। निंदक आमुचा सखा। आमची वस्त्रे धुतो फुका।। निंदक आमुची गंगा। आमुची पातके नेतो भंगा।। निंदक आमुचा गुरु। एका जनार्दनी थोरु।।'.*** निंदक कामाची - वासनेची निंदा करतो व तो साधक वासनारहित होण्यास सहज मदत होते. सत्संगतीने तो वासनारहित रिकामा होतो. त्याच्या परमार्थास सुरुवात होते. रिकामा म्हणजे रिकामटेकडा नव्हे. रिकामटेकड्या माणसाने करायचा उद्योग म्हणजे परमार्थ आहे, अशी आपली कल्पना आहे. पण रिकामटेकडा माणूस परमार्थ करेलच असे नाही. वयपरत्वे तो प्रत्यक्ष कामातून निवृत्त झालेला असतो, पण त्याच्या मनातून काम गेलेले असत नाही. त्याला काही निवृत्ती अवस्था प्राप्त झालेली असत नाही. अशी रिकामटेकडी माणसे कसा काळ घालवितात हे श्रीसंत सोहिराबानाथ असे सांगतात, ***'आळशी कामा उगा रिकामा थट्टाची करिसी बसून। कुकर्माच्या काही वर्माच्या गोष्टी सांगसी किसून।।'.*** वय काहीही असो ज्याच्या मनातून काम - वासना गेलेली आहे असा निष्काम रिकामा माणूस खरा परमार्थ करू शकतो. पापाचा विचार नाही अशी निर्विचार अवस्था म्हणजे रामनामाचे आचरण - स्मरण आहे. ***('काम नाही काम नाही। झालो पाही रिकामा।।', 'जो स्मरे रामनामा। त्यासी म्हणती रिकामा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'तोचि जाहला रिकामा। सांडी अंतरीच्या कामा।।' रिकामपणाचे लक्षण। वाया जावो नेदी क्षण।। रामनामाचा उच्चार। रिकामपणाचा विचार।। दास नामी अनुसरला। गुरुकृपा रिकामा झाला।।'- श्रीमामामहाराज केळकर)*** म्हणून काम नाहीसा होऊन रिकामे होण्याच्या इच्छेने एक हरीनाम - रामनाम घेण्याची इच्छा होणे महत्त्वाचे. ***('कामामध्ये काम काही म्हणा रामराम। जाईल भवश्रम सुख होईल दुःखाचे।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाभ्यासाने नि:श्वासाला प्रमाण येऊन चार पळ रामनामात पवन साधला असता होणाऱ्या नादश्रवणाने हा काम नाहीसा होऊ लागतो व आठ पळ हा साधनाभ्यास साधला तर अंतरातील काम पूर्णपणे नाहीसा होतो. श्रीमामामहाराज सांगतात, ***'नित्याचे नेमाचे असे एक नाम। घेता सरे काम अंतरीचा।।', 'जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।। जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते।।'.*** तर या ध्वनीश्रवणाचे महत्त्व संत असे सांगतात, ***'नौबद बाजत है हरिनामकी। अती मंदगती भाई सकल काम की।।'.*** जो या नादश्रवणी तदाकारता साधतो त्याचे नयनात चैतन्याचे वारेच भरते. नामाचा बिंदू होऊन तारकस्वरूपाचे साक्षात्काराने मन वृत्तीसहित मुरते. तो निवृत्ती होतो. वृत्तीरहित ज्ञानाने तो पूर्ण समाधानी होतो. असा पूर्ण रिकामा निवृत्त, कोणतीही इच्छा नसणारा जीवनात कृतकृत्यता, पूर्णता प्राप्त करून घेतो. परमार्थात तो पुरा होतो. तो मुक्तच होऊन जातो.

✲✲

# सत्संग

नामरूपात्मक भ्रामक असत् जगाची नाना आकारांनी प्रचिती येत असल्याने भ्रांतीने भ्रांत जीव विषयाची कामना करतात. तेच असत्पण सोडून हृदयस्थ आत्मारामाचा - सत्‌चा संग जर घडला तर सर्वसुखाची विश्रांती प्राप्त होऊन तो कामनारहित रिकामा होतो. ***(‘तैसा हृदयामध्ये मी रामू। असता सर्व सुखाचा आरामू। की भ्रांतासी कामू। विषयावरी।।’, ‘तरी आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो का सकळ विषया। जेयाचे ठाई इंद्रिया। मानू नाही।।’, ‘माझे असतपण लोपो। नावरूप हारपो। मज झणी वासिपो। भूतजात।।’, ‘जो आत्मलाभासारिखे। गोमटे काहीचि न देखे। जो भोगविशेखे। हारिखेना जो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अर्थात ज्याचे ठिकाणी कोणतीही इच्छा नाही, जो कामरहित रिकामा आहे, त्याला सत्संग घडला आहे, हे निश्चित. तोच आत्मबोधाने आत्मतृप्त झाला आहे. तर जे सत्संगात इच्छा करतात त्यांना सत्संग घडला नाही असेच म्हणावे लागेल. ***(‘तरी जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।’, ‘तो कामू सर्वथा जाये। जयाचे आत्मतोषी मन राहे। तोचि स्थितप्रज्ञ होये। पुरुष जाणे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अहो इकडला असत्‌चा संग सुटला तर सत्‌चा संग होणार. आपण संगातीत झालो तर संगातीताचा संग होणार. आपण नि:संग झालो तर नि:संगाची भेट, नि:संगाचा संग होणार. आपण असंग झालो तर असंगाचा संग होऊन प्राणाशी गाठ होणार. द्वैताचा संग सुटला, निश्चळ होऊन अहंकार नाहीसा झाला तर अद्वैताचा संग - साक्षात्कार होणार. असार त्रिगुणाचा संग सुटला तर सार निर्गुणाचा संग होणार, हजारो सूर्य गडप होतील अशा दिव्य तेजाचा अनुभव येणार व सत्संगाने वृत्तीरहित ज्ञानाने तो रिकामा होणार. संत हे निर्विकल्पी कल्पनातीत, अद्वैताशी समरस झालेले असतात तर आपण कल्पनेत तरंगणारे. जर साधनेने कल्पनातीत होऊन अद्वैती समरस झालो तर बरवा सत्संग होणार. आत्माराम प्रगट होणार नाहीतर ***‘मढ्यास भेटले मढे करील काय बापुडे। चुकी चुकी बहु चुकी परस्परे चुकामुकी।’*** असेच होणार. संत हे देहाचा संग सुटून आत्मरूप झालेले असतात. आपण तर देहरूप, मग सत्संग कसा होणार? खऱ्या अर्थाने आपण संथ वृत्तीने संतांना भेटलो तर आपले हरवलेले आत्मसुख प्राप्त होणार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘तैसे हारपले आपणपे पावे। तै संताते पाहाता गिवसावे। म्हणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा।।’.*** म्हणून बरवा कल्पनातीत सत्संग अत्यंत महत्त्वाचा. बरव्या विचाराने बरवे साधन होऊन बरव्या सत्संगाने बरवा देव प्राप्त होणारा आहे. ***(‘सत्संगतीचा महिमा कळेना। सत्संग होता मन हे ढळेना। सत्संगती पावन सौख्यकारी। सत्संगती सर्व दु:खासी वारी।।’)*** आत्मसुख प्राप्त होणे हाच खरा सत्संग आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***‘आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी। वाऊगी चाऊटी नका करू।। नका करू काही संतसंग धरा। पूर्वीचा हा दोरा उगवेल।। उगवेल प्रारब्ध संतसंगे करूनी। प्रत्यक्ष पुराणी वर्णियेली।।’*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***‘बरवा संत समागमू। प्रगटला आत्मारामू।।’***

**

# साठवोनी नामा

लटक्या व्यवहाराने संसारात जे लटके अशाश्वत धन प्राप्त होते ते आम्ही पुढे उपयोगी यावे म्हणून साठवितो, पण ते धन पुढे उपयोगी येईलच असे सांगता येत नाही. ते पैशातले धन कधीही रद्द होऊ शकते किंवा सरकारजमा होऊ शकते. सोने साठविले तरी ते लॉकरचेच धन आहे. आपल्याबरोबर परलोकात जाताना हे धनच काय, साधी लंगोटीही बरोबर नेता येत नाही. ज्या देहावर एवढे प्रेम आपण करतो, ती शरीरसंपत्ती चितेपर्यंतच आपली सोबत करते. मग आपण आपणाकरता काय मिळवले हा प्रश्न शेवटी आपणास सतावतो. सगळ्यांकरता सगळे काही केले पण स्वत:करता काहीच करता आले नाही ही खंत मोठी मोठी माणसे शेवट शेवट बोलून दाखवितात. पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते. ***(‘लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘धन मिळवून कोटी। सवे न ये रे लंगोटी।।’, ‘काय साठवोनी सोने। जेवी भूमीत पाषाण।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** तेच उत्तम व्यवहाराने परमात्म्याच्या अनुभूतीत जर रामनाम हे धन जोडले व साठवले तर ते मात्र परलोकात उपयोगी येणारे आहे. ***(‘जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।’, ‘करा हरीभक्ती परलोकी ये कामा। सोडवील यमापासुनिया।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** या रामनामधनाने देवप्राप्ती होणारी असल्याने ते मिळणारे सर्वश्रेष्ठ भाग्याचे भाग्य आहे. श्वसनाची गती सूक्ष्म झाली असता - प्राणापान मिनले असता - येरझार सरली असता - अंतरीचे काम-क्रोध-अहंकार नाहीसे होऊन हृदयस्थ रामाची अनुभूती येऊन सर्वसुखाचा आराम प्राप्त होतो. अखंड रामाच्या अखंड अनुभूतीने अखंड रामनामस्मरण होते. ***(‘साठविला हरी। जेणे हृदयमंदिरी।। त्याची सरली येरझार। झाला सुफळ व्यापार।। हरी आला हाता। मग कैसी भयचिंता।। तुका म्हणे हरी। काही उरो नेदी उरी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘भाग्याचे ते भाग्य रामनाम पाही। येर भाग्य होई श्रेष्ठ कसे।। येर भाग्यवंता देवभेटी नाही। एरंड कदा पाही उस नोहे।। म्हणोनिया जनी साठवावे नाम। अंतरीचे काम निवरोनी।।’- श्रीमामामहाराज, ‘प्राणापानही जेथे मिनले। सर्वांगी चैतन्य कोंदले।।’- श्रीनानामहाराज बर्वे)*** कामक्रोध अभिमानाने श्वसनाची गती वाढते व अमोलीक आयुष्य कमी होते. कामक्रोधअभिमानरहित अवस्थेत श्वासोच्छ्वासी एक नामाच्या अनुभवाने आयुष्याचे चीज होते - सार्थक होते. जन्मसार्थकता होऊन धन्यता प्राप्त होते. ***(‘कैसे आयुष्याचे चीज। होईल हे सांगा मज।। एक क्षण मागू जाता। त्रैलोक्यीही न ये हाता।। वय जातसे फुकट। नाम साठविणे चोखट।। एक नाम साठविता। दास म्हणे सर्व हाता।।’- श्रीमामामहाराज, ‘अहो जैसा का कृपण। अंतरी साठवितो धन।। देह तिजोरी सुरेख। त्यात वय अमोलीक।। ऐसे वय देई नामी। मग होसी तू निकामी।। ऐसे नाम साठविता। होय देही सार्थकता।। येथे होसी तू कृपण। मग होसी जगी धन्य।। नाम उपयोगी शेवटी। धन जैसे कृपणासाठी।। नामी कृपण जो झाला। दास म्हणे तोचि भला।।’- श्रीदासराममहाराज)***

✻✻

# अलिप्त

देहधारी हृदयस्थ रामाची एकांती अनुभूती आल्याने लोकांती जगदंतरी त्याच रामाचा अनुभव साधकाला सदैव प्राप्त होतो. ***'अंदर राम बाहिर राम जहाँ देखो वहाँ राजाहीराम। जागत राम सोवत राम सपनेमो देखो तो राजाहीराम।'*** या श्रीनाथमहाराजांच्या वचनाची अनुभूती त्याला प्राप्त होते. दृश्य जाऊन द्रष्टाच दृश्य झाल्याने त्याचे द्रष्टेपण नाहीसे होते. सत्य रामाचा प्रत्यय आल्याने त्याला पंचमहाभूतांचा विस्तार हा स्वप्नाकार वाटतो. तो संसारात राहून संसारापासून अलिप्त होतो. तो महात्मा कसा असतो याचे वर्णन श्रीसमर्थ असे करतात, ***'तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाची नाही।।', 'पंचमहाभूतांचा विस्तार। जयासी वाटे स्वप्नाकार। निर्गुणी जयाचा निर्धार। या नाव साधक।।'.*** चैतन्याला चैतन्याची जाणीव होत असल्याने तेथे देहाची, दृश्याची जाणीवच राहात नाही, मग देहाचा अहंकार कुठला राहणार? साहजिकच अहंकाराचा संग सुटतो. जाणत्याला (जाणणाऱ्याला) जाणल्याने जाणले ही वृत्ती जाणत्याशी तद्रूप होते व ज्ञानाची जाणीव नाहीशी होऊन तो जाणीवरहित जाणता होतो हेच आत्मनिवेदन. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।'- श्रीसमर्थ, 'न करीरे संग। राही रे निश्चळ। लागो नेदी मळ अहंतेचा। या नाव अद्वैत खरे ब्रह्मज्ञान। अनुभवावाचून बडबडते।।'- श्रीतुकाराममहाराज, 'तया पाडे देही। मी आहे हे सेची नाही। निरहंकारीता पाही। तया नाव।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन देहात असणाऱ्या त्रिगुणात्मक जाणीवा नाहीशा होऊन अज्ञानाच्या ज्ञानाने या तीन देहापेक्षा अलग -अलिप्त, कारणाचे कारण आकाशरूप असा महाकारणदेह प्राप्त होतो. या महाकारण देहातील सर्वसाक्षी मनाचे उन्मन झाले असता तुर्येतील ज्ञानाची वेगळेपणाने होणारी जाणीव नाहीशी होते. ज्ञानाचे विज्ञान होते व तो साधक ज्ञानरूप विदेही होतो. या महाकारणदेहाचा विदेह होणे म्हणजेच देहातीत आत्महित साधणे, नभाला अलिप्त होऊन परब्रह्मरूप होणे होय. ***('नभ अलिप्त सर्वासी। स्वये अलिप्त होणे नभासी। पंचमहाभूतांचे माथयासी। चढणे साच।।', 'नभाचे शुन्यत्व गिळोन। गुणत्रयाते नुरवून। ते शुन्य ते महाशून्य। श्रुतीवचनसंमत।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।'- श्रीसमर्थ)*** अशा साधूंची ही निवृत्ती अवस्था, निर्विकल्प अवस्था म्हणजेच निर्हेतुक सहजस्थिती, म्हणजेच नामस्मरणाची स्थिती कधीही कोणत्याही अवस्थेत सांडली जात नाही. संगत्याग, निवेदन, विदेहस्थिती, अलिप्तपणा, सहजस्थिती, उन्मनी विज्ञान हे सातही शब्द साधूच्या या स्वरूपाकार होण्याच्या अवस्थेचे वर्णन करतात. ***('संगत्याग आणि निवेदन। विदेहस्थिती अलिप्तपण। सहजस्थिती उन्मनी विज्ञान। हे सप्तही येकरूप।।'- श्रीसमर्थ)***

**

# मरण साधणे

देह विकलांग झाला किंवा देह सोडण्याची त्याची वेळ आली की आत्मा देह सोडतो. याला आपण देहाचे मरण म्हणतो. हे देहाचे मरण कोणालाही चुकलेले नाही. संत, साधू, शास्त्रज्ञ, सत्ताधीश, राजकारणी, शक्तिमान, पैलवान कोणीही असो हे देहाचे मरण देह धारण केलेल्या कोणालाही चुकलेले नाही. श्रीसमर्थ हे त्रिकालाबाधित सत्य असे सांगतात, ***'मृत्यू न म्हणे ऋषेश्वर। मृत्यु न म्हणे कवीश्वर। मृत्यू न म्हणे दिगंबर। समाधीस्थ। मृत्यू न म्हणे संत। मृत्यू न म्हणे महंत। मृत्यू न म्हणे हा गुप्त। होतसे। मृत्यू न म्हणे थोर थोर। मृत्यू न म्हणे हरीहर। मृत्यू न म्हणे अवतार। भगवंताचे।', 'मना पाहाता सत्य हे मृत्यूभूमी। जिता बोलती सर्वही जीव मी मी। चिरंजीव हे सर्वही मानितातीी। आकस्मात तेही सांडूनी जाती।', 'चारी खाणी चारी वाणी। चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी। जन्मा आले तितुके प्राणी। मृत्यू पावती।।'.*** आपणास एक दिवस हे जग सोडून जायचे आहे हे ध्यानात घेऊन लोकांशी प्रेमाचे संबंध ठेवावेत. ***('आपणास आहे मरण। म्हणोन राखावे बरेपण। कठीण आहे लक्षण। विवेकाचे।।'- श्रीसमर्थ)*** या मरणसमयी जी वासना राहते, ती पुरी करण्यासाठी पुन्हा जन्म प्राप्त होतो व जन्ममरण हा संसार काही सुटत नाही. ***('वायोसरसी वासना गेली। ते वायोसवेचि राहिली। पुनः जन्म घेवोनी आली। हेतुपरत्वे।।' - श्रीसमर्थ, 'आणि मरणी जया जे आठवे। तो तेचि गतीते पावे। म्हणोनी सदा स्मरावे। मातेची तुवा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून मोक्षप्राप्तीसाठी वासनारहित होऊन भगवद्‌चिंतनात मरण येणे हे भाग्याचे. श्रीमामामहाराज सांगतात, ***'शेवट गोड तरी। अंती वाणी वदेल हरी।। सुकृत सरता येईल वदनी। केवी राम हरी।। जन्मभरी ज्या संग जयाचा। तेचि मन विवरी।। संसाराचे चिंतन करिता। कोण बरे उद्धरी।। दास गुरुचा नामी अखंडीत। जडता सोय बरी।।'.*** तर श्रीतुकाराममहाराज 'शेवटचा दिस गोड व्हावा' हे मागणे असे मागतात, ***'राम राम म्हणता जावा माझा प्राण। येवढे कृपादान तुमचे मज।। नको विद्या वय आयुष्य फारसे नाही मज पिसे मुक्तीचेही।। नको धनमान न वाढो संतान। मुखी नारायण प्राण जावा।। तुका म्हणे दीन काकुळती येतो। तुज आळवितो पांडुरंगा।।'.*** प्राण हा कधी एकदम जात नाही, तो आत्ता पण जात आहेच. प्राणी क्षणाक्षणाला जन्माला येतो, मरतो, पुन्हा जन्माला येतो. (श्वासोश्वास हे पुन्हापुन्हा प्राप्त होणारे जन्ममरण) ज्या क्षणाला तो पुन्हा जन्माला येत नाही, म्हणजे श्वास सोडून पुन्हा घेत नाही त्याला आम्ही त्या देहाचे मरण म्हणतो. तो क्षण कधी येणार हे माहीत नसल्याने क्षणोक्षणी हा परमार्थाचा विचार केला पाहिजे. ***('क्षणाक्षणा पावे प्राणी जन्ममरण। देही घेई खुण संतसंगे।।'- श्रीदासराममहाराज, 'येच क्षणी मरोनी जासी। तरी रघुनाथासी अंतरलासी। माझे माझे म्हणतोसी। म्हणोनिया।।'- श्रीसमर्थ, 'क्षणोक्षणी हाची करावा विचार। तरावया पार भवसिंधू।। नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान।।', 'क्षणभंगूर संसार याचा भरवसा नाही। नरतनू गेल्या बारे मग तू पडशील पस्ताई।।'- श्रीतुकाराममहाराज)***

✻✻

# मरण साधणे

जिवंत असताना जो साधनेत मरणाच्या स्थितीत अखंड चैतन्याचे स्मरण अनुभवतो, तोच मरताना स्मरण करतो. मरणाची स्थिती म्हणजे काय हो? अहो देहाचे अखंड विस्मरण होणे हीच देहाचे मरणाची स्थिती. माणूस मरतो म्हणजे काय होते? देहातील चैतन्याचे अखंड स्मरण बाहेर पडते व देहाचे अखंड विस्मरण होते. देहात असताना साधनाने चैतन्याचे अखंड स्मरण प्राप्त होऊन देहाचे अखंड विस्मरण झाले म्हणजे त्याने मरण साधले हे निश्चित. ***(‘स्मरण देव स्मरण देव स्मरण देव जाणा। स्मरण चिंतने जग चाळवी त्यास तुम्ही का नेणा। स्मरण जाता विस्मरणाने पाही देह जातो। मागे पुढती कोणी न राहे कोण राहू पाहतो।।’- श्रीसमर्थ)*** संतमहात्मे या चैतन्याच्या अखंड स्मरणाच्या अवस्थेत असतात. तेथे स्मरण आहे का हा प्रश्नच उद्भवत नाही. आमचे ठिकाणी असणारे देहाचे स्मरण विस्मरण व त्यामुळे असणारे चैतन्याचे अखंड विस्मरण वेगळे. देहाचे स्मरण आहे म्हणजे चैतन्याचे विस्मरणच आहे. हेच स्मरणातले विस्मरण आहे. संतांचे ठिकाणी असणारे चैतन्याचे अखंड स्मरण व देहाचे अखंड विस्मरण वेगळे. चैतन्याचे अखंड स्मरण असेल तर नाम घेण्याला अर्थ. स्मरण नसेल तर नाम घेण्याला काही अर्थ नाही. ***(‘नवल स्मरणाची ठेव। नामी नाही अनुभव।।’- श्रीनाथमहाराज, ‘स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे। नामस्मरणे पावावे। समाधान।।’- श्रीसमर्थ, ‘दासरामी या सगुण निर्गुण। संतांचे स्मरणात।।’- श्रीदासराममहाराज, ‘सोहंभावे स्मरला। स्मरला नाहीच की विस्मरला।।’- संत शिवदीनी, ‘अखंड स्मरणे अद्वय भजने वाजवी करटाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तात्काळी।।’, ‘नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।’- श्रीनाथमहाराज)*** श्रीतुकाराममहाराज जिवंत असताना हे मरण अनुभवल्याचे असे सांगतात, ***‘आपुले मरण पाहिले म्या डोळा। तो सुख सोहळा अनुपम्य।’, ‘मरणाही आधी राहिलो मरोनी। मग केले मनी होते तैसे।।’.*** तर मरणाच्या स्थितीत (देहाच्या विस्मरणात) स्मरण असणे हीच सादर हरीभक्ती असून अशी हरीभक्ती करणाऱ्या भक्तांची मरणोत्तर कीर्ती होते. श्रीसमर्थ सांगतात, ***‘मरणाचे स्मरण असावे। हरीभक्तीस सादर व्हावे। मरोन कीर्तीस उरवावे। येणे प्रकारे।।’.*** आम्ही साधन करतो पण खरे साधन केव्हा साधते? श्रीदासराममहाराज सांगायचे, ‘खरे साधन हे मेल्यावर साधते’ हेच श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***‘देहबळी देऊनी। साधिले म्या साधन।।’*** मरणाची स्थिती अनुभवण्याचे महत्त्व इस्लाम धर्माचे संस्थापक श्रीमहम्मद पैगंबर असे सांगतात, ‘मरण्यापूर्वी एकदा मरा’, तर जर्मन तत्वज्ञ आंजेलीस सियेसिअस सांगतात, ‘मृत्युपूर्वी तुम्ही मरणाचा अनुभव घेतला नाही तर नष्ट होऊन जाल.’ ब्रुनात त्सेन्सी सांगतात, 'While living be a dead one'. ख्रिस्ताचा अनुकार (Imitation of Christ) या लोकप्रियतेच्या उच्चांक गाठणाऱ्या ग्रंथात केंपिस सांगतात, ‘ईश्वराजवळ जाणेचा मार्ग म्हणजे मृत्युपूर्वी मरण्याचा अनुभव घेणे’. ‘देह मी’ हा ज्यांचा अहंकार जातो ते जगदाकार होतात. ***(‘माझी काया गेली खरे। परी मी आहे जगदाकारे।।’- श्रीसमर्थ, ‘तो अहंकाराते दंडूनी। सकळ कामू सांडोनी। विचरे विश्व होऊनी। विश्वाचीमाजी।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जे जिवंत असताना नाशिवंत देहाचा विसर होऊन अमर आत्मरूप झालेले असतात, ते मरणानंतर कुठे जातील? त्यांचे जे मरणारे आहे, ते कधीच मरून गेलेले असते व जे अमर आहे असे आत्मरूप ते झालेले असतात. ज्यांना हे मरण साधलेले असते, त्यांना मरण कसे येते, हे बघण्याचे कारण नाही.

✻✻

## माघ शुद्ध

*एकभावे मुख्य कामी सावधान। दया क्षमा पूर्ण शांती जेथे।।१।।*
*टाकी घाये देव मूळ स्वभाव नाम। त्याचा योगक्षेम देवकृपे।।२।।*
*मनाचे सामर्थ्ये होई मायातीत। जाणती पंडीत वर्मखुण।।३।।*
*दास म्हणे तया नाही काळभय। अंतरी अभय नामयोगे।।४।।*

१) फलाशेरहित हेतूरहित सत्क्रिया आचरून न बदलणाऱ्या एकभावाने एकले अवधान (लक्ष) मुख्य कामाकडे दिले तर दया, क्षमा, पूर्णशांती हे गुण प्रगट होतात.

२) दया, क्षमा, शांती हे गुण जेथे असतात तेच टीकेचे घाव सोसले तरी मूळस्वभाव - नामस्मरणाची स्थिती- न सोडता देवरूप होतात. त्यांचा देवकृपे योगाने क्षेम चालतो.

३) मनोलयाने मायातीत होता येते ही वर्मखूण आत्मज्ञानी पंडित जाणतात.

४) नामयोगे अभय प्राप्त झालेल्या भक्ताला, योग्याला काळभय राहात नाही.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने माघ महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## माघ वद्य

*मीपणाचे त्यागे गुरुपदी जीवा। जडविता पाडवा सद्‌गुरुंचा।।१।।*
*सदाचार तैसे मौन एकचित्त। होऊनी निष्ठावंत धैर्य धरी।।२।।*
*काशी उमगता कळे नामगत। शिवरात्री मात कळता नाते।।३।।*
*काय ते शाश्वत काय अशाश्वत। ज्ञानियांचे चित्त सार शोधी।।४।।*
*दास म्हणे ऐसा हिशोब जाणता। शिवपद प्राप्ती अखंड त्या।।५।।*

१) गुरुपदाचे ठिकाणी नमन होऊन मीपणाचा त्याग घडला तर निर्गुणब्रह्माची प्राप्ती होऊन सद्‌गुरूंचा पाडवा साधतो.

२) निष्ठावंत होऊन धीराने सदाचाराचे आचरण केले असता उन्मनी मौन साधून चित्तात तो एक भरून राहतो.

३) शरीरातील नवखंडापैल दहावे खंड काशी उमगली तर नामाची गत अवस्था प्राप्त होते व देवाशी आपले काय नाते आहे हे उमगून रात्री अंधारात शिवाचा अनुभव प्राप्त होतो.

४) काय शाश्वत व काय अशाश्वत आहे हा विवेक ज्यांचेपाशी आहे असे ज्ञानी संत सारग्रहण करतात.

५) साकीबाकी चुकती करून जे हिशोब पुरा करतात ते अखंड शिवपदावर आरूढ होतात.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने माघ महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# एकभाव

खरे पाहिले तर या जगात एकच देव आहे. एका देवाला अनेक नावे आहेत. पण आम्ही एका देवात नावानुसार, रुपानुसार अनेक देव अनुभवतो. अनेकी सदा एक देवास न पाहता आम्ही एकात अनेक पाहतो. निराकार निर्गुण देवात लिंगभेद संभवतो का? अहो जो राम आहे तीच रामाबाई आहे. जो विठोबा आहे तीच विठाबाई आहे. पण आम्ही देव, देवी असा भेद करतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज एकच पण आम्ही अज्ञानी, बसलेले ज्ञानेश्वरमहाराज व उभे ज्ञानेश्वरमहाराज यात भेद करतो. डाव्या सोंडेचा गणपती व उजव्या सोंडेचा गणपती यात भेद करतो. प्रत्येक महिन्याला येणाऱ्या सणाप्रमाणे आमचा देव बदलतो, मग आमुचा एकभाव कसा होणार? श्रीज्ञानेश्वरमहाराज देव व देवी यांचे ठिकाणी एका देवाला पाहतात. अनंतरूपानी अनंतवेषानी तोच नटलेला आहे याची अनुभूती घेतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'देवो देवी मीचि पाही। हाही निश्चय ज्यासी नाही। भाव ते ते ठायी। वेगळाला धरी।', 'अनंत रूपे अनंत वेषे देखिले मी त्यासी। बापरखुमादेवीवरे खुण बाणली कैसी।'.*** जोवर देवाबद्दल विकल्प (पर्याय) आहेत, नामाबद्दल विकल्प (पर्याय) आहेत, तोवर विकल्प (संशय) हा राहणार. जोवर संशय आहे तोवर भाव धरला जाणार नाही. ***('न संडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जोवर एक देव, त्याचे एक नाम व हा एक देव, एक नाम अनुभवाला आणून देणारे एक गुरु हे अद्वैत जोवर अनुभवाला येत नाही तोवर एकभाव होऊ शकत नाही. जो परिस्थितीनुसार बदलतो तो एकभाव - स्वभाव असू शकत नाही. जी बदलते ती भावना असते, तो भाव नव्हे. भाव म्हणजे भावना नसून भाव याचा खरा अर्थ 'असणे' असा आहे. ***('भू भव = अस्तु')*** मातीच्या कणापासून अनंत विश्वापर्यंत अस्तित्व भाव एकच आहे. आपले अस्तित्वाची जाणीव ज्या गुणधर्मांनी होते, तो आपला अस्तित्वभाव आहे. आपले अस्तित्व बाह्यत: कशावरून सिद्ध होते? श्वसनावरून आपले अस्तित्व जाणवते. आत्म्याचे ठिकाणी असणाऱ्या जाणीवेने श्वसन - संसरण हा संसार आत्म्याचे मागे लागतो व या संसरणामुळे आत्म्याचे अस्तित्व जाणवते. हंसावर राम बसले म्हणजे हंस खालीवर उड्डाण करतो. हा आत्मा व जाणीवेने असणारे श्वसन हा अस्तित्वभाव विश्वात सर्वत्र सारखा भरून राहिला आहे. ***('रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा रामजप।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'धरीता सो सांडिता हं। अखंड चाले सोहं सोहं। याचा विचार पाहता बहू। विस्तारला।।'- श्रीसमर्थ)*** हा भाव शुद्ध झाला, अंत:करणातील संशय हालला की भाव धरला जाऊन एकभावाने एकनामाची प्राप्ती होते व एकनामाने एक देवाची - अद्वैताची प्राप्ती होते. ***('शुद्ध ज्याचा भाव झाला। देव दुरी नाही त्याला।।'- संतवचन, 'भावेवीण देव न कळे नि:संदेह। गुरुवीण अनुभव कैसा कळे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'भाव तोचि देव भाव तोचि देव। ये अर्थी संदेह नका धरू।। भावचि कारण भावचि कारण। यापरते साधन नाही नाही।।'- श्रीनाथमहाराज)*** आसरहित भाव, निर्हेतूक सत्क्रिया हा आपला स्वभाव - एकभाव - शुद्ध भाव आहे. ह्या एकभावाने एकनामाची एकदेवाची एक गुरुची प्रचिती येते.

**

# मुख्यकाम

आम्ही काम (कर्म) करतो पण आमचे लक्ष त्या कामाकडे असत नाही. आमचे सारे लक्ष त्या कर्मातून मिळणाऱ्या फळाकडे असते. फळावर डोळा ठेवून आम्ही कर्म करतो. म्हणजे आमचे दृष्टीने कर्म हे मुख्य (प्रधान) नसून फळ हे मुख्य (प्रधान) आहे. फळ मुख्य असल्याने येथे कर्माला गौणत्व प्राप्त होते. त्यामुळे कामात लक्ष नसल्याने कामाचेही तीन तेरा होतात. अर्थात फलही तसेच. कर्मफळी आस धरली की कर्म हे कुकर्म होते व संसारबंध प्राप्त होतो. जन्ममरण चुकत नाही. हेतूवीण सत्क्रिया आचरली न जाता हेतुसहित असत्क्रिया आचरली जाते. ***('परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी। हे सत्क्रियाची आचरावी। हेतूविण।।', 'हा निजधर्मु जै सांडे। आणि कुकर्मी रति घडे। तैचि बंधु पडे। संसारिकु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'असत्क्रिया ते सोडिली। आणि सत्क्रिया ते वाढविली। स्वरूपस्थिती बळावली। या नाव साधक।।'- श्रीसमर्थ)*** याउलट फळाकडे लक्ष न देता कामाकडे लक्ष दिले तर निष्काम वासनारहित कर्माने जन्ममरण हा संसारबंध नाहीसा होतो. निश्चळत्वाने मोक्षाची प्राप्ती होते. परमेश्वराशी योग साधतो. कर्म करून मोक्षाची प्राप्ती होते. ***('जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाली अंगे हरीरूप।।' - श्रीनाथमहाराज, 'देख पा जनकादिक। कर्मजात अशेख। न सांडिता मोक्षसुख। पावते जाहले।।', 'आइके सकळ संमते जगी। अर्जुना गा तोचि योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेचि फळी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'येचि जन्मे येचि काळे। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।'- श्रीसमर्थ)*** ज्या कर्माने जन्ममरण हा संसार चुकतो असे निष्काम पुण्यदायी कर्म हेच मुख्य काम. ***('चुकविजे जन्ममरण ऐशा कर्मा नाव पुण्य। पाप कर्म तेचि जाण जेणे चुकेना बंधन।'- श्रीदासराममहाराज)*** हे निष्काम मुख्यकाम हेच संतांचे रामनाम आहे. निष्काम काम हे राघवाचे काम आहे. निष्काम कामाचा कर्ता राम असतो. निष्काम कामाने यश कीर्ती प्राप्त होते. हे रामनाम हे राघवाचे काम जर आपण अनुभवले तर दुःखाचे सुख होणार आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'कामामध्ये काम। काही म्हणा रामराम। जाईल भवश्रम। सुख होईल दुःखाचे।।'*** तर श्रीसमर्थ सांगतात, ***'करी काम निष्काम या राघवाचे। करी रूप स्वरूप सर्वा जीवाचे। करी छंद निर्द्वंद्व हे गुणगाता। हरीकीर्तनी वृत्ती विश्वास होता।।'.*** आमचे मनात एवढ्या अनंत इच्छा निर्माण होतात त्यात श्रेष्ठ इच्छा कोणती? जी इच्छा माणसाला निरीच्छ करते अशी मोक्षाची इच्छा (काम) हीच श्रेष्ठ इच्छा - मुख्यकाम होय. रामनामाने मोक्षाची प्राप्ती होते. अर्थात रामनाम घेणेची इच्छा होणे हीच मोक्षाची इच्छा होय. ***('मोक्षो मे भूयात'- इति इच्छा' - संस्कृतवचन, 'मुखी नाम हाती मोक्ष। ऐसी साक्ष बहुतासी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष।।', 'जाणीव नेणीव भगवंती नाही। हरी उच्चारणी पाही मोक्ष सदा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** पुरुषाने जन्माला येऊन धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चार प्रकारचे पुरुषार्थ संपादन करायचे असतात. त्यातील धर्म, अर्थ, काम हे तीन प्रकारचे पुरुषार्थ बायकोच्या साथीने वासनेसहित प्राप्त करायचे असतात. 'धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि' अशी प्रतिज्ञाच विवाहसमयी आपण घेतो. विषयबंधनातून मोकळे होणे हा स्वतंत्र मोक्ष प्रत्येकाचा स्वतंत्र असतो. तो प्रत्येकाने आपापला मिळवायचा असतो. ***('बंधन विषयाचे। नुरता मोक्षपद साचे। मोक्ष सर्वदा स्वतंत्र। ज्यात नसे परतंत्र।।'- श्रीमामामहाराज)*** परप्रकृतीचे परतंत्र झुगारून देऊन 'स्व'चे तंत्र उमगणे म्हणजे स्वतंत्रता प्राप्त होणे - मोक्ष प्राप्त होणे होय.

✻✻

# सावधान

एकभावाने चित्त शुद्ध झाल्यावर - चित्ताचे विषय चिंतन राहिल्यावर - भावातून प्रगट होणाऱ्या, श्रुत होणाऱ्या चैतन्याचे अनुहात नादश्रवणी उमटणाऱ्या रामनामाचे ध्वनीचे ठिकाणी जो नेटाने सतत लक्ष - अवधान - अनुसंधान - राखतो, नादश्रवणी तदाकारता साधतो, त्याचे नयनात चैतन्याचे वारेच भरते. मन वृत्तीरहित मुरल्याने तो निष्काम परब्रह्मरूप होतो. असा जो त्रिगुणाचे पैल चौथ्या गुणाच्या साहाय्याने जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांमध्ये चैतन्याच्या नामरूपाचे अवधान राखतो, रामनामाशी तद्रूप होतो, त्याला संतमहात्मे 'सावधान' म्हणतात. चैतन्याचे अनुसंधान राखल्याने देहाचे संधान तेथे राहात नाही. अखंड स्मरणाने तो भगवंताचे भजन, परमात्म्याचे पूजन साधतो व काळाचे सार्थक करतो. चैतन्याशी तद्रूपता साधल्याने त्या ठिकाणी देहाला चिकटलेले जायते, वर्धते, विपरीणमते, नश्यते इत्यादी विकार राहात नाहीत. ***('बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त। सायासाचे फळ बैसलिया।।', 'भावे गावे गीत। शुद्ध करोनिया चित्त।।'- श्रीतुकाराममहाराज, 'वारे भरले या नयनात। नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात।।'- श्रीदासराममहाराज, 'सावध होवोनी पाही पाही। आत्मरूप डोळा गे। प्रत्यक्ष गुरुची साक्षी। लक्षी घनसावळा गे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सावधान सावधान वाचे बोला नारायण। शतायुषी पुरूष झाला। परी तो वाया गेला। रामदास याचे बोला। विरळा सावध तो झाला।।'- श्रीसमर्थ, 'अवस्थात्रयी सावधान। हेचि भगवंताचे भजन। हेचि परमात्म्याचे पूजन। हेचि समाधान जीवाशिवाचे।।'- श्रीनाथमहाराज, 'रामनामयोगे सावध जो झाला। कळीकाळ त्याला वंदीतसे। सहा जिंकोनिया होणे निर्विकार। सावध प्रकार ऐसा असे।।'- श्रीमामामहाराज, 'सावध झालो सावध झालो। हरीच्या आलो जागरणा। पळोनिया गेली झोप। होते पाप आड ते।।'- श्रीतुकाराममहाराज)*** या नश्वर देहात आयुष्य आहे, तोवर सावध होणे महत्त्वाचे. कधी मरण येईल हे सांगता येत नाही, म्हणून वेग आहे तोवर वेगात सावधान होऊन हे नरदेहीचे भजन साधले पाहिजे. ***('नरदेह जातो रे उगला। घालुनी ममतेचा घाला। सावध हो कारे वहिला। सत्वर लागे भजनाला।।'- संतवचन, 'घटका गेली पळे गेली। तास वाजे झणाणा। आयुष्याचा नाश होतो। राम का रे म्हणाना। दास म्हणे तास वाजे। सकळा स्मरण देतो। वेळोवेळी सावध रहा। म्हणोनी झणकारीतो।।', 'वेगी होई सावधान। करी देवाचे भजन।।', 'काळ जातो क्षणक्षणा। मूळ येईल मरणा।। काही धावाधाव करी। जव तो काळ आहे दुरी।। रामी रामदास म्हणे। आता सावध होणे।।'- श्रीसमर्थ, 'नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान।।'- श्रीतुकाराममहाराज)*** म्हणून आता काळ वाया घालवू नका. गुरुला शरण जा,नेमाचे साधन समजून घ्या. नेमाने साधन करून सावध व्हा व शिवरूप होऊन जा. ***('गुरुला शरण जाय रे। तुझा तू शिव होय रे। नको भवाब्धी बुडू रे प्राण्या। झडकरी सावध होय रे।।', 'अंतरी बहुतची सावध व्हावे। विवेकशस्त्रे मन आवरावे। दिसंदिस अभ्यासावे। साधन नेमाचे।।'- श्रीचिमडमहाराज)***

✻✻

# दया

अंतरी सावध होऊन जो अंतरी आत्मरूप अनुभवतो, तो सर्वत्र आत्मरूपच अनुभवतो. उपाधी न पाहता उपाधीमाजी गुप्तरूपाने सारखे असणारे चैतन्य तो स्वीकारतो. उपाधीभेदाने हा गरीब, हा श्रीमंत, हा लहान, हा थोर, हा काळा, हा गोरा, हा माझा, हा परका हे होणारे भिन्न विश्वाचे भिन्न ज्ञान त्यांना होत नाही. ते सर्वत्र एक चैतन्य पाहतात. जग विष्णूमय पाहतात. साहजिकच ते सर्व विश्वावर एकसारखे प्रेम करतात. कोण्याही जीवाचा मत्सर त्यांचे हातून होत नाही. सर्वांवर दया करणे हा त्यांचा स्थायीभाव होतो. संत साधू कसे दयाळू असतात याचे वर्णन श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।। तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा।। मृदू सबाह्य नवनीत। तैसे सज्जनाचे चित्त।। ज्यासी आपंगिता नाही। त्यासी धरी जो हृदयी।। दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।। तुका म्हणे सांगो किती। तेचि भगवंताची मूर्ती।।'*** तर श्रीनाथमहाराज दयावान संतांचे वर्णन असे करतात, ***'सर्वभूती दया। साधू म्हणावे ऐशिया।। जग ब्रह्मरूप जाण। हेचि साधूचे लक्षण।। सर्वभूती समदृष्टी। तोचि साधु इये सृष्टी।। एका जनार्दनी संत। नित्य साधे आत्महित।।'.*** सर्वसाधारणत: परमात्मरूप झालेल्या दयावान संतांचे ठिकाणी ही ऐहिक संपत्ती असत नाही. पण श्रीज्ञानेश्वरमहाराज या परमात्मरूप दयावान संतांचे ठिकाणी संपत्ती असल्याचे सांगतात. ते म्हणतात, ***'जेथ जेथ संपत्ती आणि दया। दोनी वसती आलिया ठाया। ते ते जाण धनंजया। विभूती माझी।।'.*** मग कोणती संपत्ती या संतांजवळ होती? संत हे मोक्षश्रिया आळंकृत - श्रीमंत असतात. ही संपत्ती संतांनी गुणदोष न पाहताना कृपाळूपणे असंख्य जन्म हेच दारिद्र्य असणाऱ्या जीवाना वाटली. जन्मदारिद्र्य नाहीसे करून सर्वांना श्रीमंत राज्यधारी परमार्थी केले. ***('मोक्षश्रिया आळंकृत। ऐसे हे संत श्रीमंत। जीव दरिद्री असंख्यात। नृपती केले।।'- श्रीसमर्थ, 'दयासागरे हो मला थोर केले। बहुसेवकामाजी ते मेळविले। कृपेने दिले सौख्य ते अंतरीचे। परी भोगणे लागले या देहाचे।।' - श्रीचिमडमहाराज, 'संत दयाळ कसे। राजा रंक जया सरीसे। श्रवणी पाजूनी अमृतवाणी। नयनी दाविती चिन्मयखाणी।। देऊनी भेटी तोडीती माया। नेऊनी बसविती निजपदठाया।। शिवरामाचे अभिनव लेणे। लेवविले मज पूर्ण कृपेने।।' - संत शिवराम)*** ही सर्वाभूती दया संतांचे ठिकाणी कशी निर्माण होते? देहाचे ममत्व गेले की समत्व निर्माण होते व समत्व प्रगट झाले की भूतदया प्रगट होते. ***('महद्भूत सर्वाठायी। कळो येता दया पाही।'- श्रीमामामहाराज, 'दया तिचे नाव भूताचे पाळण। आणिक निर्दळण कंटकाचे।।', 'भूतदया ठेवी तया काय उणे। प्रथम साधन हेचि असे।।', 'भूतांची दया हे भांडवल संता। आपुलिया ममता नाही देही।।'- श्रीतुकाराममहाराज)*** श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात श्रीमणेश्वर अत्रे श्रीतात्यासाहेबमहाराजांना उद्देशून मोठ्या कृतज्ञतेने भावपूर्वक खड्या आवाजात पुढील पद म्हणत, ***'हे दयाळुवा हे दयाळुवा। हे दयाळुवा स्वामी राघवा। प्रथम का मला लाविली सवे। मग उपेक्षणा योग्यता नव्हे। सकळ जाणता अंतरस्थिती। तरी तुम्हाप्रती काय विनंती।। दास तुमचा वाट पाहतो। बोलता नये कंठ दाटतो।।'.*** माघ शु.४ शके १८८४, गणेश जयंतीच्या दिवशी माझी आजी सौ.इंदिराबाई केळकर यांनी ठरविल्याप्रमाणे तिचे पती श्रीमामामहाराजांनी देह ठेवून वर्ष व्हायचे आत श्रीगणेशाचा जन्मकाळ अनुभवून श्रीतुकाराममहाराजांचे बारा अभंगांचे अनुसंधानात देह ठेवला. त्यांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

**

# क्षमा

देव किंवा देवत्वाप्रत पोचलेले संत हे दयेचा सागर - करुणेचे सागर असतात. तेच आपले अनंत अपराध पोटात घालू शकतात. इतरत्र मात्र अपराधाची शिक्षा ही होणारच. कोणीही कोणाला क्षमा करणार नाही, हे निश्चित. जे, अपराध केला तरी दयार्द्रबुद्धीने क्षमा करतात, ते देवत्वाप्रत पोचलेले श्रेष्ठ चैतन्यरूप मायबाप संत असतात. म्हणून अपराधाची कबुली ही देवापाशी, संतापाशी द्यावी. त्यातच आपले कल्याण होणारे आहे. ***(‘अपराध माझे क्षमा करावे। तुवाचि श्रीरामा।।’- संतवचन, ‘परम अन्याय करूनी आला। आणि एक साष्टांग नमस्कार घातला। तरी तो अन्याय क्षमा केला। पाहिजे श्रेष्ठी।।’- श्रीसमर्थ, ‘पुत्राचे सहस्र अपराध। माता काय मानी तयाचा खेद। तेवी तू कृपाळू गोविंद। मायबाप मजलागी।।’- व्यंकटेश स्तोत्र)*** म्हणून सर्व संतांनी आपले अपराधांची कबुली व क्षमेची याचना देवापाशी किंवा संतांपाशी केली. श्रीतुकाराममहाराज श्रीज्ञानेश्वरमहाराजांना उद्देशून म्हणतात, ***‘बोलिली लेकुरे। वेडीवाकुडी उत्तरे।। क्षमा करा अपराध। महाराज तुम्ही सिद्ध।। नाही विचारला। अधिकार म्या आपुला।। तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पाया पै किंकरा।।’*** तर स्वामी निरंजन रघुनाथ क्षमेची याचना देवाकडे अशी करतात, ***‘अपराध क्षमा आता केला पाहिजे। देवा केला पाहिजे। अबद्ध सुबद्ध गुण वर्णिले तुझे। न कळेची टाळ वीणा वाजला कैसा। अस्ताव्यस्तपणे नाद केला भलतैसा, देवा केला भलतैसा। नाही ताल नाही ज्ञान कंठ सुस्वर देवा कंठ सुस्वर। जाला नाही बरा वाचे वर्ण उच्चार। भाव नाही पोटी नाही प्रेमपाझर देवा प्रेमपाझर। कीर्तनी बैसता मन चिंती संसार देवा चिंती संसार। निरंजन म्हणे आम्ही वेडेबागुडे देवा वेडेबागुडे। गुणदोष न लावावा सेवकाकडे देवा सेवकाकडे।’.*** हे क्षमावंत संत कसे असतात याचे वर्णन श्रीचिमडचे महाराज असे करतात, ***‘सदा शांत वृत्ती मनी नाही खंती। दयाळू मनस्वी क्षमावंत चित्ती। नसे रोष ना कामी न गुंते। अविद्याजना नेतसे सुपंथे।।’.*** पण अपराधाची कबुली देणे व क्षमेची याचना करणे हे आमच्यासारख्या अहंकारी माणसांना जमण्यासारखे आहे का? श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगायचे, ‘आम्हाला काही कळो अथवा न कळो भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांचे पायावर गडबडा गडबडा लोळता तरी येईल का? एवढे केले तरी आमच्यासारख्या अज्ञानी लोकांचे कल्याण होणार आहे. पण तेही आपल्यासारख्यांना अवघड आहे.’ ज्या ठिकाणी परमेश्वर वास करतो अशा आत्मबोध होणाऱ्या अविनाशी शाश्वत विवरी वस्ती न करता अशाश्वत गोष्टीत गुंतून राहणे हाच मोठा नाशाकडे नेणारा आपला अपराध आहे. म्हणून हे रामराया या तुला चुकणाऱ्या जनांचे कल्याण विवरस्थानात तू कर असे मागणे कल्याणस्वामी असे करतात, ***‘कल्याण करी रामराया। जनहित विवरी। अपराधी जन चुकतची गेले। आरंभिली बोहरी।।’.*** तर संतश्रीअमृतराय जनहित विवरी असल्याचे असे सांगतात, ***‘संग्रह कोण करी अशाश्वत संग्रह कोण करी। कोण करी घर सोपे माड्या। विवरी वस्ती बरी।’*** तर श्रीतुकाराममहाराज आमचेकरता देवाकडे क्षमेची याचना करतात. त्यांची काही तशी अवस्था नव्हती ते म्हणतात, ***‘मी तव अनाथ अपराधी। कर्महीन मतिमंदबुद्धी। तुज म्या आठविले नाही कधी। वाचे कृपानिधी मायबापा।। नाही ऐकिले गाइले गीत। धरिली लाज सांडिले हित। नावडे पुराण बैसले संत। केली बहुत परनिंदा।। केला करविला नाही उपकार। नाही दया आली पिडीता पर। करू नये तो केला व्यापार। वाहिला भार कुटुंबाचा।। नाही केले तीर्थाचे भ्रमण। पाळिला पिंड करचरण। नाही संतसेवा घडले दान। पुजावलोकन मूर्तीचे।। असंगसंग घडले अन्याय। बहुत अधर्म उपाय। न कळे हित करावे ते। काय नये बोलू आठवू ते।। आप आपण्या घातकर। शत्रू झालो मी दावेदार। तू तव कृपेचा सागर। उतरी पार तुका म्हणे।।’***

✻✻

# शांती

पूर्ण शांती केव्हा प्राप्त होते? जेव्हा मन, चित्त, बुद्धी, अहंकार सारे काही शांत होऊन संसाराची शांती होते, तेव्हा पूर्ण शांती प्राप्त होते. साधनाभ्यासाने मन जेव्हा प्राणापानाचे ठिकाणी मुरते, तेव्हा मन कामक्रोधरहित होऊन, वासनारहित होऊन शुद्ध होते, मन संकल्पविकल्परहित होऊन सुखरूप शांत होते. कर्माला अकर्माची मोहोर बसून संसाराचा दरारा नाहीसा होतो. कल्पनेने होणारे दृश्याचे विपरीत ज्ञान नाहीसे होऊन त्याला कल्पक आत्म्याचे सत्यज्ञान होते. आत्म्याचे ज्ञान झाल्याने बुद्धीला मिळवायचे काही उरत नाही. बुद्धी आत्म्याचे ठिकाणी अनन्य, निश्चळ होते. अद्वैताचे ज्ञान झाल्याने द्वैतबुद्धी नाहीशी होते. बुद्धी शांत होते. बुद्धी शांत झाली की चित्तातील चिंतन संपते. चित्तात तो एकच भरून राहतो. चित्त हरपून अवघे चैतन्य होते. चित्ताला अखंड प्रसन्नता हा प्रसाद प्राप्त होतो. चित्त शांत होते. 'मी' ची जाणीव नाहीशी होऊन साधन मीपणेवीण होते. त्याचे देहात 'मी' देह धारण करणारा आहे अशी जाणीवच उरत नाही. अहंकाराची पूर्ण शांती होते. वृत्तीरहित ज्ञानाने त्याला निरोपाधिक विश्रांती प्राप्त होते. त्याचे संसरणाची - संसाराची शांती होते. संपूर्ण महाशांतीने तो ब्रह्मरूप होण्यास योग्य होतो. ***('बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।', 'भुती लीन व्हावे सांगावे नलगेची। आता अहंकाराची शांती करा।।' - श्रीतुकाराममहाराज, 'श्रद्धावान लभते ज्ञानम् तत्पर: संयेतेंद्रिया। ज्ञानम् लब्ध्वा पराम् शांतीम् आचिरेण अधिगच्छति।।'- भगवद्गीता, 'स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'- श्रीनाथमहाराज, 'ते शांती पै गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया अंगा। तै ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुषु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संशयरहित होऊन जे भाव धरतात अशा भाविकांनाच ही शांती प्राप्त होते. ही परमशांती प्राप्त होणे ही खरी परमार्थातील अत्युच्च अवस्था आहे. जोवर ही परमशांती प्राप्त होत नाही, तोवर परमार्थातील 'ब्रह्मर्षी' ही पदवी प्राप्त होत नाही. ***('दुजियाला भ्रांती भाविकाला शांती। साधुंचिया वृत्ती लीन झाल्या।।', 'शांतीपरते नाही सुख। येर अवघेची दुःख।। म्हणऊनी शांती धरा। उतराल पैलतीरा।। खवळलिया कामक्रोधी। अंगी उठती आधीव्याधी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'शांती नाही रे बरवी। तोवरी कैची तुज पदवी।। आशा पापिणी हित बुडवी। प्रपंचाते गोवी।।'- श्रीकेशवस्वामी, 'परमार्थाची मुख्यत्वे स्थिती। पाहिजे गा परमशांती। ते शांतीची उत्कटगती। दावी लोकाप्रती आचरोनी।।'- श्रीनाथमहाराज)*** श्रीवसिष्ठमुनींनी, श्रीनाथमहाराजांनी, श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी ही परमशांती अनुभवली होती. ***('एका चरणाचा अर्थ मुनी वसिष्ठ जाणत। तेणे शांतीच्या सदनात। स्वात्मसुखी पहुडला।।'- श्रीतुकाराममहाराज, 'एका जनार्दनी पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।'- श्रीनाथमहाराज, 'सहा नम्र होती जेथे। शांती उमगावी तेथे।।'- श्रीमामामहाराज, 'समाधान शांतीवू हरीरूप कायन्नू। नादबिंद कलाज्योती चिदमुल तत्वन्नू।।'- श्रीगुरुलिंगगीता)***

**

# टाकी घाये देव

टीकेचे, टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण प्राप्त होत नाही. जगावेगळे सत्य जगासमोर मांडले की ते लगेच सर्वांना मान्य होत नाही. ते सत्य मांडणाऱ्या संतावर, शास्त्रज्ञांवर टीका ही होणारच. त्या जगावेगळ्या गोष्टींना, विचारांना विरोध हा होणारच. तो विरोध शांतपणे सत्यापासून बाजूला न ढळता स्वीकारता आला पाहिजे. असा जो जगाचे आघात निश्चळपणाने सहन करतो, तोच संत होय. जो खरा हिरा असतो तो ऐरणीवर ठेवून त्यावर कितीही घण मारले तरी त्यातील परमाणूदेखील हालत नाही. त्याप्रमाणे सत्य (विचार) ऐरणीवर येऊन त्यावर टीकेचा कितीही भडीमार झाला, तरी सत्य हे अढळ राहते. जे बदलत नाही त्यालाच सत्य म्हणतात. जो खोटा हिरा आहे, जे भासमान सत्य आहे त्याचा मात्र नाश होतो. जे सत्य टीकाकारांच्या टीकेतून तावून सुलाखून बाहेर पडते ते खरे सत्य. ते लोपलेले सत्य जगासमोर आणणारा खरा देवरूप संत होय. ***(‘हिरा ठेविता ऐरणी। वाचे मारिता जो घणी।। तोचि मोल पावे खरा। करणीचा होय चुरा।। तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘सत्य स्वरूप लोपले होते। ते म्या पाहिले गुरुचेनी हाते।।’- श्रीकेशवस्वामी, ‘लोपले ज्ञान जगी हित नेणती कोणी। अवतार पांडुरंग नाम ठेवियले ज्ञानी।।’- संत रामा जनार्दन)*** गुरुकृपेने अहंकार गेला तरच हे टाकीचे - टीकेचे घाव सोसायचे बळ येते. ***(‘मीपण त्यागाने साही टाकी घाये। तोचि श्रेष्ठ होये देवा ऐसा।।’- श्रीमामामहाराज)*** सर्वसामान्य माणसांना गुरुंचा उपदेश प्राप्त होतो, पण चित्त शुद्ध नसल्याने अहंकार जात नाही. ‘नुरोनिया ठेला’ अशी अवस्था प्राप्त होत नाही. ***(‘नाही निर्मळ जीवन। काय करील साबण। तैसे चित्त शुद्ध नाही। तरी बोध करील कायी।।’, ‘उपदेश घेता सुख वाटे। मुख्य ते गळाली पाहिजे अहंता।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला। ठायीच मुराला अनुभव।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सर्वसामान्य माणसे सद्गुरुंनी काढलेला अहंकाराचा ढपला परत चिकटवून घेतात. त्यांचे ‘मी’ आणि ‘माझे’ काही सुटत नाही. अनुग्रहाने मुक्त झालेला परत बंधनात सापडतो. सद्गुरूंनी कितीही टाकी लावली तरी ते परत अहंकाराच्या खपल्या चिकटवून घेऊन आहेत तसे वळमगुंड राहतात. त्यांना देवाचा आकार प्राप्त होत नाही. दगडाच्या पाथरवटाने उडवलेल्या खपल्या तो परत चिकटवून घेत नाही. त्याला सुबक देवाचा आकार प्राप्त होतो. दगड जसा पाथरवटाने लावलेली टाकी सहन करून मोठेपण प्राप्त करून घेतो, त्याप्रमाणे आपण मन घट्ट, एकाग्र करून अहंकाररहित होऊन ही सद्गुरूंनी लावलेली टाकी सहन केली तर अनावश्यक भाग दूर होऊन देवत्व प्राप्त होणार आहे. ***(‘साहोनिया टाकी घाये। पाषाण देवची झाला पाहे।। तया रिती दृढ मन। करी साधाया कारण।। बाण शस्त्र साहोनी गोळी। शूरा ठाव उंच स्थळी।। तुका म्हणे सती। अग्न न देखे ज्या रिती।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘पाषाणासी मोठेपण। टाकी करिता सहन।।’- श्रीमामामहाराज)***

**

# मूळ स्वभाव नाम

टाकीचे घाव सोसून 'देहो हं' हा अहंकार नाहीसा होतो, शरीरभाव नाहीसा होतो, इंद्रिये विषय विसरतात व आपला मूळ स्वभाव प्रगट होतो. मूळ स्वभावाने मूळ रूपाची जाणीव निर्माण होते. ही मूळ रूपाची जाणीव म्हणजेच गुरुनाम - श्रेष्ठ नाम - 'श्रीराम जयराम जयजयराम' आहे. अहो ज्या भावाने 'स्व'ची जाणीव होते, त्या भावाला स्वभाव म्हणतात. ज्या भावाने 'स्व' सोडून इतराची जाणीव होते व आपण स्वाधीन न राहताना परस्वाधीन होतो त्याला स्वभाव कसे म्हणता येईल? जो भाव दृश्याप्रमाणे बदलतो, मनात येणाऱ्या कल्पनांप्रमाणे बदलतो तो स्वभाव नव्हे. ज्यात बदल होत नाही अशा भावाला स्वभाव म्हणतात. श्रीतुकाराममहाराज हे आपणास असे पटवून देतात. ते सांगतात, ***'आधी होती दासी। पट्टराणी केले तिसी। तिचे हिंडणे थांबेना। मूळ स्वभाव जाईना।। आधी होता वाघ्या। दैवयोगे झाला पाग्या। त्याचे येळकोट राहिना। मूळ स्वभाव जाईना।। आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग। त्याचे भजन राहिना। मूळ स्वभाव जाईना।।', 'तुका म्हणे जरी अग्नी झाला साधू। तरी पडे बाधू संघष्टणे।।'.*** बदलणाऱ्या भावात संशय हा असतो व जोवर संशय आहे तोवर स्व-भावाचा अभावच असतो. आपण जर रामकृष्ण या जीवनाचे गतीत मन संकल्पविकल्परहित होऊन एकनित्य नामाचा अनुभव घेतला तर आपला मूळस्वभाव - सोहंभाव - प्रगट होणार आहे. निर्विकल्प अवस्थेत असणारी 'हेतूवीण सत्क्रिया' - सहजकृती - स्वभाव हेच श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. हे निर्विकल्प नाम हे समर्थ असून ते परब्रह्मरूप आहे. ***('नाम निजभावे समर्थ। जेथे नाम तेथे दत्त।।'- श्रीनाथमहाराज, 'निर्विकल्प नाम। तेचि जाणा परब्रह्म।।'- श्रीदासराममहाराज)*** माझे आजोबा श्रीमामा यांनी देह ठेवणेपूर्वी वर्षभर पुढीलांची सोय व्हावी म्हणून रोजच्या कीर्तनाची संक्षिप्त स्वरूपात टाचणे काढली होती. शेवट शेवट जेव्हा त्यांना लिहिणे शक्य होईना तेव्हा ते टाचणे सांगत व कु.शरयुताई उपळावीकर या ती लिहून घेत. या शरयुताईंनी श्रीमामांची उतारवयात खूप सेवा केली. माघ शुद्ध ६, वार शनिवार या दिवशी त्यांनी शनिवार व रविवार या दोन दिवसांची म्हणजे माघ शु.६ व माघ शु.७ या दोन दिवसांची टाचणे सांगितली व ती कु.शरयुताईंनी लिहून पण घेतली. माघ शु.८ सोमवारचे टाचण सांगताना त्यानी त्या दिवशी विषयाला धरून स्वत: रचलेला अभंग सांगितला. तो असा, ***'मूळ स्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।। अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।। गोविंद म्हणे स्वस्वभाव। जीवा सोडी रे अभाव।।'.*** अभंग लिहून झाल्यावर कु.शरयुताईंनी श्रीमामांना 'विवरण काय लिहू' असे विचारले तेव्हा ते म्हणाले, 'यावरील विवरण रामजी सांगेल.'

**

# श्रीगोविंद नवमी

श्रीमामांची तब्येत तशी बरी नव्हतीच. अहो कशी बरी असेल? विकोपाला गेलेले मधुमेह, रक्तदाब, अस्थिक्षय, मूत्रपिंडाचा कर्करोग यासारखी भयंकर दुखणी शरीरात वास्तव्याला असतील तर तब्येत कशी बरी असेल? पण त्यांचे चेहऱ्यावरील शांती - प्रसन्नता ढळली नाही हे केवढे विशेष! देहाच्या विकलावस्थेत त्यांनी नित्याचे नेमाचे कीर्तन सोडले नाही ही केवढी कीर्तननिष्ठा. अशी तब्येत बिघडलेली असतानाच श्रीतात्यासाहेबमहाराजांचे पुण्यतिथीचा उत्सव आला. श्रीमामा सकाळी घरी कीर्तन करीत व संध्याकाळी आमचे श्रीदादांचे कीर्तन समाधीमंदिरात होत असे. पुण्यतिथीदिवशी मात्र श्रीमामांना आमचे घरातील मोठ्या खुर्चीवर बसवून दर्शनासाठी अगदी अलगद समाधी मंदिरात नेण्यात आले. तेथे गेल्यावर मात्र श्रीमामांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांचे दर्शन घेऊन मोठ्या स्वानंदाने तेथेच स्फुरलेल्या अभंगावर कीर्तनास सुरुवात केली. तो अभंग असा, ***'हनुमंत षष्ठी। करीती स्वानंदाची पुष्टी।। षडऐश्वर्य देऊन। करिती भक्ताचे रक्षण।। गोविंदासी नेमी। आणिती गंगाधर स्वामी।।'.*** कीर्तनाचे वेळी आमचे श्रीमामांचा चेहरा श्रीतात्यासाहेबमहाराजांसारखा दिसत होता. याच कीर्तनात श्रीमामा स्वत:च्या निर्याणाबद्दल सूचकपणे बोलले. साहजिकच साऱ्या आप्तेष्टांना श्रीमामा असे का बोलले याची काळजी वाटू लागली. श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या उत्सवानंतर मात्र श्रीमामांची तब्येत अधिकच नाजूक झाली. पण रोजचे कीर्तन तितक्याच उत्साहात होत होते. माघ शु.६ व माघ शु.७ म्हणजे शनिवारी व रविवारी श्रीमामांनी अंथरुणावर बसून कीर्तन केले. देहाचा, तब्येतीचा रंग कसाही बिघडलेला असो त्यांचे कीर्तनाचा रंग बिघडला नाही. ***'आयुष्य करी उणे। परी मज आवडो कीर्तन।।', 'साता दिवसाचा झाला उपवासी। तरी कीर्तनासी सोडू नये।। फुटो हे मस्तक तुटो हे शरीर। नामाचा गजर सोडू नये।। शरीराचे होत दोन तेही भाग। कीर्तनाचा रंग सोडू नये।। तुका म्हणे ऐसा नामी झाला निर्धार। तेथे निरंतर देव वसे।।'*** हे श्रीतुकाराममहाराजांचे अभंग आमचे श्रीमामांनी आचरुन दाखविले. निरंतर कथेने, नामस्मरणाने त्यांचे अंग हरीरूप, पुण्यशरीर झाले होते. सोमवारी सकाळपासून त्यांचे शरीराची नाडी लागेना. डॉक्टरनी तपासले व श्रीबापुराव जास्तीत जास्त दुपारी २ पर्यंत राहतील असे सांगितले. देहाच्या अशा बिकट अवस्थेत शेवटच्या श्वासापर्यंत भगवंताच्या नामाच्या अनुसंधानात ते राहिले. संध्याकाळी ५ या त्यांच्या नित्यकीर्तनाचे वेळेला 'श्रीराम जयराम जयजयराम' या महामंत्राचा घोष त्यांनी केला. ***'मूळ स्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम'*** या त्यांचे कीर्तनाचे मूळपदावरील विवरण आचरून दाखविले. ***'हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।'*** या श्रीनाथमहाराजांचे वचनाची उत्तम प्रचिती स्वये सर्वांना दिली व आपण कोण आहोत हे स्पष्ट केले व अष्टमीदिवशी नवमी ही तिथी सुरू झाल्यावर रात्री ११ वा.५० मि. हे कीर्तनानंद कीर्तनरूप झाले. अष्टधाप्रकृती म्हणजे मी ह्या अष्टमीपेक्षा नवचैतन्य म्हणणे मी ही नवमी श्रेष्ठ असल्याचे 'अष्टमीपरी नवमीबरी' हे श्रीसमर्थवचन सार्थ केले. देहाच्या वाट्टेल त्या अवस्थेत भगवंताचे अखंड अनुसंधान राखणे हेच संतांच्या चरित्राचे खरे वर्म आहे हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी सांगितलेले संतचरित्रातील वर्म श्रीमामामहाराजांचेबाबतीत अनुभवाला आले. श्रीरामाचे अखंड अनुसंधान हेच खरे श्रीमामामहाराजांचे चरित्र. ***('अखंड ध्यान श्रीरामाचे। अखंड पूजन श्रीरामाचे। अखंड कीर्तन श्रीरामाचे। हेचि गोविंदचरित।।'- श्रीगोविंदचरितमानस)*** अखंड नामसंकीर्तनाने श्रीकेळकरमामा अधिकारी पुरुष ठरले ते महासाधू झाले. हरीभक्तीचा थाट होऊन हरीभक्तीचा कळस झाले. श्रीहालसिद्धनाथमहाराज, श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीब्रह्मचैतन्यमहाराज, श्रीतात्यासाहेबमहाराज, श्रीनारायणमहाराज, श्रीउमदीकरमहाराज यांचे श्रीमामांना प्राप्त झालेले आशीर्वाद सत्य ठरले.

**

# योगक्षेम

जो जन्माला घालतो, तो आपल्या उदरभरणाची सोय करतोच. ज्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे त्याला काय सोसेल, झेपेल तितके देव देतच असतो. तो राम आम्हाला देतो म्हणून आमचा उदरनिर्वाह चालतो. आम्ही एक जोंधळा पेरतो व त्यापासून चिपटे, मापटे धान्य काढतो, ते काय आमचे कर्तृत्व आहे का? पीक उगवलेच नाही तर नोटा काय चावून खाणार का? श्रीसमर्थ श्रीरामाची थोरवी अशी सांगतात, ***'आम्ही काय कुणाचे खातो रे। तो राम आम्हाला देतो रे।। बांधिले घुमट किल्ल्याचे तट। तयाला फुटती पिंपळवाट। नाही विहीर आणि मोट। मुळाला पाणी कोण पाजितो रे।। पहा पहा मातेचिया स्तनी। चिंतिता मांस रक्त मळ घाणी। तयामध्ये विमल दुग्ध आणोनी। कोण पोशितो रे।। खडक फोडिता सजीव रोडकी। पाहिली सर्वांनी बेडकी। सिंधू नसता तियेचे मुखी। पाणी कोण पाजितो रे।। नसता पाण्याचे बुडबुडे। सदासर्वदा गगन कोरडे। दास म्हणे जीवन चहुकडे। पीक उगवितो रे।।'.*** तर संत मध्वमुनीश्वर रामाबद्दलची कृतज्ञता अशी व्यक्त करतात, ***'तू माझा यजमान रामा। तू माझा यजमान।। जननी जठरी रक्षियेले मज। पोसुनी पंचहीप्राण।। बाहेर निघता मातेचे स्तनी। पय केले निर्माण।। ऐसे असता या पोटाची। का करू चिंता जाण।। मध्वमुनीश्वर स्वामी रमापती। धरी माझा अभिमान।।'.*** ज्याच्यामुळे हे सारे आपणास उपलब्ध झाले आहे, तो कसा आपणास उपलब्ध होईल हे न पाहताना त्याचे विस्मरणात अहंकाराने जे उपलब्ध झाले आहे ते सारे आपणास मिळावे या हेतूने त्याचेच मागे लागतो व रामाच्या वियोगाने श्रम मात्र होतात पण क्षेम काही साधत नाही. ***('एक शेर अन्नाचाड। येर वाउगी बडबड।। कारे तृष्णा वाढविसी। बांधवुनी मोहपाशी।। औट हात तुझी जागा। येर शिणसी वाऊगा।। तुका म्हणे श्रम। एक विसरता राम।।'- श्रीतुकाराममहाराज)*** रामाचा योग झाला तर आपले क्षेम होणार आहे, हे जाणून जो अखंड रामाचे अखंड स्मरण साधतो, त्या भक्ताचे योगक्षेम रामच साधतो. प्राणापानाचेठिकाणी मन मुरल्याने इंद्रियांची वखवख थांबते व ती पूर्ण समाधानी होतात. प्राणापानावरच योगक्षेम साधतो. ***('तेणे काय तुझी नाही केली चिंता। राहे त्या अनंता आठवोनी।। निर्वाहापुरते अन्न आच्छादन। आश्रमासी स्थान कोपीगुहा।। कोठेही चित्तासी नसावे बंधन। हृदयी नारायण साठवावा।।', 'ठेविले अनंते तैसेची राहावे। चित्ती असो द्यावे समाधान।।'- श्रीतुकाराममहाराज, 'एऱ्हवी तरी माझिया भक्ता। आणिक संसाराची चिंता। काय समर्थाची कांता। कोरान्न मागे।।', 'जैसा अमृताचा निर्झरू। प्रसवे जयाचा जठरू। तया क्षुधेतृषेचा अडदरू। काहीच नाही।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अनन्यः चिन्तयन्तः माम् ये जनाः पर्युपासते। तेषाम नित्याभियुक्तानाम् योगक्षेमम् वहामि अहम्।।'- श्रीभगवद्‌गीता, 'योगक्षेम इति प्राणापानयोः'- संस्कृतवचन)*** माघ शु.१० शके १८८८ (सन १९६६) या दिवशी श्रीमामामहाराजांचे सद्‌गुरु श्रीनारायणमहाराज यांनी श्रीसाधुमहाराजांच्या मंदिराचे दर्शन घेऊन श्रीमहाराजांचे अखंड स्मरणात निर्याण केले. 'श्रीनारायणीय शिष्यप्रबोध' या पुस्तकाचे रूपाने श्रीमहाराजांचे सान्निध्य आजही सर्वांना लाभत आहे. श्रीनारायणमहाराजांचे पवित्र चरणी नमन करतो व येथेच थांबतो.

**

# मनाचे सामर्थ्य

परमात्म्याचे मनात विश्वनिर्मितीचा 'एकोऽहं बहुस्याम' हा संकल्प उठला व त्यातून साकार विश्व निर्माण झाले. त्या मनाचे सामर्थ्य काय असेल? श्रीगुरुलिंगगीता या विश्वनिर्मितीबद्दल असे सांगते, 'विश्वाच्या उत्पत्तीला कर्ता नाही. हरीच्या ठिकाणी ते कल्पनेने निर्माण झाले आहे. चंचळत्वधर्माने ते भासमान होते. म्हणून ते आहे असे म्हणायचे आणि शेवटी कल्पनाच आहे म्हणून नाही म्हणायचे.' श्रीज्ञानेश्वरमहाराज विश्वनिर्मितीबद्दल असा खुलासा करतात, ***'इये प्रकृती पुरुष दोन्ही। उपजली जयाचिया मनी। तो पितामह त्रिभुवनी। विश्वाचा मी।।'.*** तर श्रीसमर्थ पंचमहाभूते व त्रिगुण या अष्टधाप्रकृतीचे -दृश्याचे मूळ कल्पनारूप असल्याचे असे सांगतात, ***'पंचभूते आणि त्रिगुण। ऐसी अष्टधा प्रकृति जाण। अष्टधा प्रकृतीस नामाभिधान। दृश्य ऐसे।।', 'निश्चळामध्ये चंचळ। तेचि कल्पना केवळ। अष्टधा प्रकृतीचे मूळ। कल्पनारूप।।'*** श्रीहरीच्या ठिकाणी कल्पनेने विश्व निर्माण झाले म्हटले की आश्चर्य वाटते. पण सामान्य माणूस परमेश्वराचा अंशच आहे. आपल्या मनात जे असते तेच आपण स्वप्नात पाहतो. 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' अशी म्हण याबाबतीत सर्वांना माहीत आहे. आपल्या मनात जो संकल्प असतो तोच आपण स्वप्नात साकारतो. स्वप्नात जे आपण दृश्य पाहतो ते सारे आपणच होतो ना? तसेच परमेश्वराने कल्पनेने विश्वाचे स्वप्न पाहिले व स्वप्नातील सारे आपणच झाला तर आश्चर्य वाटायचे काय कारण? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'जो जागता स्वप्नावस्थे जाये। तो जेवी स्वप्नीचे आघवे होये। तेवी अनंत ब्रह्मकटाह हे। आपणची जाहला।।'.*** स्वप्नातील सारे दृश्य आपणच होतो पण स्वप्न पाहताना आपली जाणीव आपल्याला न होताना आपल्याला दृश्याचीच जाणीव होते. तसेच येथे हरीच्या ठिकाणी कल्पनेने साकार विश्व निर्माण झाले. हरीच सारे साकार विश्व झाला. पण कल्पनेने जाणीव होते ती दृश्याची. हरीची जाणीव होत नाही. या कल्पनेने साकारलेल्या विश्वाचे जे आम्हास ज्ञान होते, ते आपले आत कल्पना आहे म्हणूनच होते. खरे पाहिले तर साकार विश्व एकच आहे. पण प्रत्येकाचे आत कल्पना वेगळी असल्याने प्रत्येकाला भासमान होणारे विश्व स्वतंत्र वेगळे असते. जो तो आपापल्या विश्वात गुरफटलेला असतो. आपण आपल्या विश्वाचे सम्राट असतो. आपण मात्र दुसऱ्याचे विश्वात ढवळाढवळ करायची नाही. नाहीतर बिघडलेच समजा. मनातील कल्पनेनुसार प्रत्येकाचे विश्व स्वतंत्र असते. त्या मनाचे सामर्थ्य काय असेल? हे कल्पनेने जाणवणारे, भासमान होणारे विश्व कल्पनेच्या निरासाबरोबर नाहीसे होते. त्याची जाणीव नाहीशी होते. म्हणून ते काल्पनिक मानले जाते. मनाला कल्पनेने होणारे काल्पनिक विश्वाचे काल्पनिक ज्ञान जाणीवेत कल्पनेच्या निरासाबरोबर नाहीसे होते व सत्य वस्तूची ओळख होते. ही सत्य वस्तूची ओळख ज्या मनाला होते त्या संकल्पविकल्परहित मनाला 'सर्वसाक्षी मन' असे श्रीसमर्थ संबोधतात तर 'पाहाता मन' असे श्रीतात्यासाहेबमहाराज संबोधतात. ***('जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ, 'तैसे भुतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।', 'का जे यया मनाचे एक निके। जे हे देखिले गोडिचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुखची कवतिके। दावित जाईजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। मावळोन गेले।।'- श्रीसमर्थ, 'पाहाता मन हे तल्लीन झाले दिसते मौक्तीक माला। गगनाहूनी या कोसळताती नक्षत्रांच्या माळा।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)***

**

# मनाचे सामर्थ्य

साधनाभ्यासाने जाणीवेत त्रिगुणांचा निरास झाल्यावर बरव्या विचाराने असार संसार त्यजून बरवे साधन झाल्यावर म्हणजे जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था झाल्यावर ज्या गुणांतून - जाणीवेतून - हे त्रिगुण निर्माण झाले असा चौथा शुद्ध सत्व गुण प्राप्त होतो. ***('संसार समस्त त्रिगुण। त्यामाजी मी अवघा निर्गुण।।'- श्रीनाथमहाराज, 'असारा संसारा त्यजुनी बरवे साधन करी।', 'वायोमध्ये जाणीव गुण। तेचि ईश्वराचे लक्षण। तयापासून त्रिगुण। पुढे जाले।।'- श्रीसमर्थ, 'क्षणा जागृती क्षणा सुषुप्ती। क्षणैक स्वप्नांची प्रतीती। हे त्रिगुणाची मिश्रित वृत्ती। जाण निश्चिती उद्धवा।।'- श्रीनाथमहाराज)*** संकल्पविकल्परहित सर्वसाक्षी एकाग्र मन म्हणजे हा शुद्ध सत्वगुण असून मनाचे हेच खरे रूप आहे. चंचळपणा ही मनाची प्रकृती नसून ती मनात झालेली विकृती आहे. मन हे मुळात शुद्धसत्व गुणात्मक असून चंचळपणा हा त्रिगुणामुळे निर्माण झालेला आहे. ***('सत्वं मनः रजस्तमश्च मनसौ द्वौ दोषावृदाहृतौ' - आयुर्वेद)*** हे शुद्ध सत्वगुणी मन अहर्निशी परमार्थ करू शकते. हेच मनाचे सामर्थ्य आहे. श्रीतुकाराममहाराज हे (शुद्ध) सत्वाचे सामर्थ्य असे सांगतात, ***'तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य। करवी परमार्थ अहर्निशी।।'.*** हे सर्वसाक्षी मन - पाहाता मन - शुद्ध सात्विक मन - चंचळ मनाची आधीची अवस्था - हे चैतन्याचे बनले असून ते भगवंताचे खरे रूप आहे. ही मनाची आधीची अवस्था म्हणजेच गणराज गणपती आहे. हे मन इंद्रियाचा राजा आहे. या मनाने नामस्मरण, पूजा व्हावयास हवी. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'इंद्रियामाजी आकरावे। मन ते मी हे जाणावे। भुतामाजी स्वभावे। चेतना ते मी।।'*** तर श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'आधी मन घेई हाती। तोचि गणराज गणपती।।', 'पूजा ते करावी मनेची उत्तम। लौकिकाचे काय काम असे।।', 'मन इंद्रियांचा राजा। सर्वभावे त्यासी पूजा।।', 'साराचे जे सार जे का त्रिभुवनी। ते का तुम्ही मनी उच्चाराना।।'.*** तुर्यावस्थेत सर्वसाक्षी मन कार्यरत असते. सगुण ब्रह्माचे जे वेगळेपणाने नादप्रकाशाचे अनुभव येतात ते या सर्वसाक्षी मनालाच. अनेकात सदा जे एक पाहते, किंवा भिन्न विश्वामध्ये जे एकाचे ज्ञान होते, 'पाहणे आपणासी आपण' हे ज्ञान होते ते सारे सर्वसाक्षी मनातील आत्मबुद्धीलाच होते. या चैतन्याचे वेगळेपणाने येणाऱ्या अनुभवाने त्रिपुटी नाहीशी होत नाही. अर्थात हे तुर्येतील होणारे वृत्तीसहित ज्ञान अद्वैताचे न ठरता द्वैताचे - मायेचे ज्ञान ठरते. जेव्हा अखंड जाणीवेने जाणीवेचा ग्रास होतो, जाणत्याला जाणल्याने ही ज्ञानाची जाणीव नाहीशी होते, आपली जाणले ही वृत्ती तद्रूप होते व वृत्तीरहित ज्ञान होते, तेव्हा ज्ञानाचे विज्ञान होऊन, सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन मूळमाया या चौथ्या महाकारणदेहाचा विदेह होऊन देहातीत मायातीत अवस्थेत आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो. आत्मा निश्चळ परमात्मरूप होतो. अशा साधूला धन्यता प्राप्त होते. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।' , 'जेथे ज्ञानची होते विज्ञान। जेथे मनची होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।', 'मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधू।।', 'म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन। मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।'- श्रीसमर्थ)***

**

# मायातीत

'मायेला ओळखले की माया नाहीशी होते' असे श्रीदासराममहाराज सांगत. अजून आमचे दृष्टीने माया नाहीशी झाली आहे असे वाटत नाही. याचा अर्थ आम्ही मायेलाही नीटसे ओळखले नाही असा होतो. अहो माया ओळखली की ब्रह्मही ओळखले पाहिजे. खोटे कळले की खरे काय आहे हे ही कळतेच की. याचा अर्थ आम्हाला मायाही कळली नाही व ब्रह्मही कळले नाही. आणि यालाच अज्ञान म्हणतात. ज्या अवस्थेत ब्रह्म, माया सर्व जाणले जाते त्या सर्वसाक्षिणी तुर्या अवस्थेला ज्ञान म्हणतात. ***('जाणे ब्रह्म जाणे माया। ते येक जाणावी तुर्या। सर्व जाणे म्हणोनिया। सर्वसाक्षिणी।।', 'सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या। ज्ञान ऐसे म्हणती तया। परी ते जाणिजे वाया। पदार्थज्ञान।।' - श्रीसमर्थ)*** अर्थात ज्या अवस्थेत ब्रह्म किंवा माया जाणली जात नाही अशा जागृती, स्वप्न, सुषुप्ती अवस्था म्हणजे वट्ट अज्ञानच. जे जे आपण डोळ्यांनी पाहतो, जे जे शब्दात वर्णन करता येते किंवा मनाला भासमान होते असा सगुण साकार पंचमहाभूतांचा विस्तार म्हणजे माया आहे. मायेचे वर्णन श्रीसमर्थ असे करतात, ***'जे जे दृष्टीने देखिले। जे जे शब्दे वोळखिले। जे जे मनास भासले। तितुके रूप जयेचे।।', 'माया सगुण साकार। माया सर्वस्व विकार। माया जाणिजे विस्तार। पंचभूतांचा।।', 'दिसेल तितुके नासेल। उपजेल तितुके मरेल। रचेल तितुके खचेल। रूप मायेचे।।'*** ही जी साकार माया आहे, ती कल्पांती (कल्पना सरल्यावर) नाश पावणारी आहे, म्हणून ती खोटी आहे. या नाश पावणाऱ्या मायेला आम्ही सत्य मानतो. ***('जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ)*** त्या नाशिवंत मायाजाळातच आम्ही गुंतून पडतो. त्यामुळे अविनाशी सत्य हाताला येत नाही. खोट्या मायेला खरे मानतो याचा अर्थ आम्ही मायेला ओळखले नाही असा होतो. श्रीसमर्थ या मायेचे असारपण असे सांगतात, ***'माया दिसे परी नासे। ब्रह्म न दिसे परी न नासे। माया सत्य वाटे परी मिथ्य असे। निरंतर।।'*** तर श्रीतुकाराममहाराज आपणास असे सावध करतात, ***'नको नको मना गुंतू मायाजाळी। काळ आला जवळी ग्रासावया।।'.*** भासमान मायेने सत्य दृष्टीला येत नाही. भासच सत्य वाटतो. सत्यावर भासाची विकृती म्हणजेच जन्म आहे. अर्थात विकृतीला मरण आहे. यालाच मायिक पसारा म्हणतात. संत श्रीनिळोबाराय हे सत्य असे सांगतात, ***'माया म्हणजे नसतेचि दिसे। गगनी जैसे दोनी चांद।। असे एक भासे आणिक। तया नाव मायिक पसारा।। सत्यावरी न पडे दृष्टी। विकल्प परीपाठी घालितू।। निळा म्हणे प्रत्यक्ष लपवी। लटीकेची रुढवी भ्रांतीजाळ।।'.*** तर श्रीदासराममहाराज विकृती, सत्य याबद्दल असे सांगतात, ***'विकृती आहे ज्यात। तया आहे आदीअंत।। सत्य नोहे भास। कैचे जन्ममरण त्यास।। सत्य हे अढळ। तेणे निर्मिले सकळ।।'*** तर संत सत्याबद्दल असा खुलासा करतात, ***'असे ते न दिसे नसे ते आभासे। झाकोळला असे आत्मनाथ।।'.*** जी खोटी माया आहे ती खोटी झाली की खरे आहे ते ब्रह्म खरे होणार आहे. दृश्य पदार्थ जे नाही आहेत (कल्पनेमुळे आहेत) ते नाहीत (कल्पना गेल्यावर निर्विकल्पावस्थेत) असे झाल्यावर जी अनुभवाला येते ती सत्य आत्मवस्तू आहे. खोटे आहे ते खोटे होणे म्हणजेच मायेला ओळखणे, मायातीत होणे होय.

**

# मायातीत

अव्यक्त निराकार असणारे ज्यामुळे चराचररूपाने आकाराला आले असे मूळ श्वासोच्छ्वास हेच हरीचे सहज भजन आहे. संकल्पविकल्परहित, कामक्रोधरहित अवस्थेत हे मूळ श्वासोच्छ्वास जर मनुष्याने साधले तर तो स्वभावत: भजनशीळ आहे. पण कामक्रोधाने, संकल्पविकल्पाने मूळस्वभाव बदलतो भावाचा अभाव होतो. श्वसनाची गती बदलते व हे भजन साधत नाही. म्हणून कामक्रोधांना 'भजनमार्गीचे मांग' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज संबोधतात. ***('तरी हे कामक्रोधू पाही। जयाते कृपेची साठवण नाही। हे कृतांताचे ठायी। मानिजती।।', 'हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गीचे मांग। मारक जे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** दिननिशी होणाऱ्या षड्विकारात्मक आयासाने - सायासाने प्रपंच साधतो. भजनाचा परमार्थ साधत नाही. हे सर्वभावाने (सर्वत्र सारख्या असणाऱ्या अस्तित्वभावाने) होणारे भजन साधले तर तो मायेतून परपार होतो. ***'अव्यक्त निराकार नाही ज्या आकार। जेथोनी चराचर हरीसी भजे।।', 'सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।', 'येथ एकची लीला तरले। जे सर्वभावे माते भजले। तया ऐलीच थडिये सरले। मायाजळ।।'*** ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने सारा खुलासा करीत आहेत. श्वासोच्छ्वास हे आयुष्याचे साधन जे साधनीभूत करतात, त्यांना हे भजन साधते. ते श्वसनातील त्रिगुण व पंचभूते यांचा निरास साधतात व अखंड आत्मस्वरूपाच्या अनुभवाने - अखंड स्मरणाने - मायातीत, देहातीत अवस्थेत सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप होतात. ***('असे जे साधन जया चित्ती वसे। मायाजाळ नासे तुका म्हणे।', 'मायाजाळ नासे या नामे करोनी। प्रिती चक्रपाणी असो द्यावी।', 'आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।' - श्रीतुकाराममहाराज, 'माझी माया हे त्रिगुण। त्यजावया अशक्य जाण। जे करिती माझे भजन। मम मायेते तरती।।'- श्रीमुक्तेश्वर)*** गुरुकृपेने हे साधन भजन साधते. गुरुंबद्दलची कृतज्ञता श्रीकेशवस्वामी अशी व्यक्त करतात, ***'सखया श्रीगुरुराया रे। श्रवणे मनने अद्वयभजने निरसीली माया रे। मस्तकी हस्त ठेवोनी आपुला वनमाळी दाखविला। संशय जाळे उकलोनी वेगी। हरीरस चाखविला।।', 'आनंद केला बा गुरुराया हरली सकळ माया।। त्रिपुटी ग्रासोनिया सुख देसी। प्राणविसावा होसी।। चिंता ममता हे तव नेणे। सर्वही राघव जाणे।। केशवस्वामीच्या दातारा। स्वरुपी दिधला थारा।।', 'मज अखंड राघव कळला रे। कल्पतरू गुरु फळला रे।। रामाच्या विसरे रचिले रे। मायेचे भिंताड खचले रे।। प्रिती निरंतर लागली रे। तेणे अनादी माया भंगली रे।। संग संगातीताचा घडला रे। केशव अद्वयपदी जडला रे।।'.***

**

# पंडित

इथे जो पंडित शब्द श्रीमामानी मूळ अभंगात योजला आहे तो आपण जो पंडित शब्दाचा अर्थ करतो, त्या अर्थाने योजलेला नाही. आपण पंडित शब्दाचा अर्थ विद्वान किंवा शहाणा असा करतो. आपण ज्यांनी भरपूर पुस्तके वाचली आहेत, जे उत्तम प्रवचने करतात त्यांना आपण पंडित, विद्वान म्हणतो. पण या पुस्तकी ज्ञानाने अहंकार वाढतो. ***'ग्रंथ वाचिले ज्ञान मिळविले अभिमानाने फुगले रे। सद्‌गुरुवाचुनी गूज कळेना ब्रह्मसुखाला मुकले रे।।'*** या संतवचनाप्रमाणे जे ज्ञानी अभिमानाने ब्रह्मसुखाला मुकलेले असतात - आत्मसुखाला मुकलेले असतात त्यांची बडबड अनुभवावाचून असते. ज्या ज्ञानाने अहंकार वाढतो व देवाचा साक्षात्कार होत नाही, त्या ज्ञानाला ज्ञान म्हणता येईल का? अज्ञानाने देवाची प्राप्ती होत नाही. ***('अज्ञाने तरी देवाधीदेव। पाविजे कैसा।।'- श्रीसमर्थ)*** ग्रंथ वाचून ज्ञान मिळवणाऱ्या पढीक पंडिताना ज्ञातेपणाच्या अहंकाराने आत्मज्ञान होत नाही. अहंकाराने अशा पंडितांचा ब्रह्मराक्षस होतो. हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'जनी हित पंडित सांडीत गेले। अहंतागुणे ब्रह्मराक्षस जाले। तयाहून व्युत्पन्न तो कोण आहे। मना सर्व जाणीव सांडून राहे।।'.*** तर श्रीतुकाराममहाराज या अहंकारी पंडिताचे वर्णन असे करतात, ***'झालासी पंडित पुराण सांगसी। परी तू नेणसी मी हे कोण।। गाढवभरी पोथ्या उलथिशी पाने। गुरुगम्यखुण नेणसी बापा।।'.*** इथे जो पंडित शब्द श्रीमामांनी योजला तो मुक्त होणाऱ्या शहाण्यांसाठी - ज्ञान्यांसाठी किंवा मनाचे सामर्थ्ये मायातीत - देहातीत - ब्रह्म होण्याची वर्म - खूण जाणणाऱ्या संतासाठी होय. पंडित कोण? 'पण्डा - बुद्धिः - आत्मबुद्धिः - विद्यते यस्य सः पंडितः' असे थोरवचन आहे. देहबुद्धी जाऊन ज्याची आत्मबुद्धी स्थिर झाली तो पंडित. ज्या अज्ञानाने देवाची प्राप्ती होत नाही ते अज्ञान ज्याचे नाहीसे झाले आहे तो पंडित. अज्ञान म्हणजे नेमके काय हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'आपण म्हणिजे मीपण। मीपण म्हणिजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला।।'.*** ज्याचा अहंभाव हे अज्ञान जाऊन जो देव झाला आहे तो खरा पंडित. श्रीतुकाराममहाराज खरा पंडित कोण हे असे सांगतात, ***'पंडित तो भला। नित्य भजे जो विठ्ठला।। अवघे सम ब्रह्म पाहे। सर्वांभूती विठ्ठल आहे।।'.*** जो सर्वांभूती विठ्ठल पाहतो व नित्य विठ्ठलाचे भजन साधतो तो खरा पंडित. ऋषीमुनींनी जो परमार्थ सांगितला तो आचरून दाखवितात ते संत खरे पंडित. ***'यः क्रियावान सः पंडितः।।'*** असे थोरवचन आहे. असे आत्मबुद्धीने आत्मरूप झालेले, रामनामयोगे सावध झालेले पंडित संत काळालाही घाबरत नाहीत. श्रीमामामहाराज हा अनुभव असा सांगतात, ***'रामनामयोगे सावध जो झाला। कळीकाळ त्याला वंदितसे। सहा जिंकोनिया होणे निर्विकार। सावध प्रकार ऐसा असे।।'*** तर श्रीतुकाराममहाराज हा काळावरील विजय असा सांगतात, ***'काळ गुलाम सलाम करी। तुकया घरी राबतो।।', 'आता भय नाही ऐसे वाटे। घडलिया सेवा समर्थाची।।'.*** तर संत श्रीनिळोबाराय काळाचे सार्थक कशाने होते हे असे सांगतात, ***'काळ सार्थक केला त्यांनी। धरीला मनी श्रीविठ्ठल।।'*** तर श्रीनाथमहाराज हा अनुभव असा सांगतात, ***'रामनाम सदा गर्जे। कळीकाळ भय पाविजे।।'*** तर संत श्रीकबीर गुरुकृपेने हे अभय प्राप्त झाल्याचे असे सांगतात, ***'हम तो बेपरवा बेपरवा। नही किसीके डरवा। चारखुट जहागीर हमारी। तीन लोकमे बाच्छा। जनम मरण तो सफा गया है। गुरुने किया अच्छा।।'***

**

# मीपणाचा त्याग - गुरुप्रतिपदा

गुरुकृपेने एक चैतन्याचा अनुभव येऊन त्या एकाशी एकी होऊन एकाकार झालो असता देहाकार नाहीसा होतो. 'देह मी' हा अहंकार नाहीसा होतो - मीपणा नाहीसा होतो - अज्ञान नाहीसे होते - जीवपण नाहीसे होते. जीव साक्षात्कारी होतो. असे जीवाचे मीपणा नाहीसा होऊन गुरुपदाशी तादात्म्य होणे म्हणजेच गुरुप्रतिपदा आहे. आपण देहाकार आहोत, देह म्हणजे मी अशी आपली ठाम समजूत आहे. या देहाभिमानामुळे (मीपणामुळे) ईश्वराला आपण वेगळा समजून 'तू' म्हणतो आहोत. साधनाने देहभाव नाहीसा होऊन मी कोणी वेगळा नसून आहे तो तोच आहे, तोच हा आहे, हा अनुभव येणे म्हणजे गुरुप्रतिपदा. या देहाभिमानामुळे हा संसार - लटिका व्यवहार - हरीवीण (हरीच्या प्रत्ययाशिवाय) होणारी वाया येरझार आहे. ही येरझार प्रत्ययकारी व्हावयास हवी. प्रत्यय आला की येरझार थांबणारी आहे. सूक्ष्म होणारी आहे. संसाराची शांती होणार आहे. पण हा मीपणा (देह म्हणजे मी हा भाव) जाणे कर्मकठीण आहे. सर्वाचा त्याग करता येईल पण 'स्व'चा त्याग होणे अवघड. हा 'मीपणा' जो त्यागतो तो खरा त्यागी. त्याग करण्यासाठी वैराग्य हवे व काय त्यागायचे हे कळण्यासाठी विवेक हवा. वैराग्याने 'मीपणा' (देह म्हणजे मी) हा अविवेक झटकून टाकला असता विवेकाचा दीप उजळला जातो - खऱ्या कर्त्याची ओळख होते व निरंतर आनंदाने निरंतर दिवाळी साजरी होते. ***('मी अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळी। तै योगिया पाहे। दिवाळी निरंतर।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'कर्त्यासी वोळखावे। तयासी विवेक म्हणावे। विवेक सांडिता व्हावे। परमदुःखी।।'- श्रीसमर्थ)*** हा विवेक आणि वैराग्य जवळ असणे हे खरे महद्भाग्य. हे भाग्य संतांचे संगतीत प्राप्त होते. संतकृपा झाली, गुरुकृपा झाली, संतांचा उपदेश प्राप्त झाला तरच खऱ्या 'मी'ची ओळख (विवेक) होऊन देहाबद्दल वैराग्य प्राप्त होते व परमार्थाची इमारत उभी राहते. ***('गुंग मला केले गुरुने गुंग मला केले। एकाएकी भुरळ घालोनी। माझे मीपण नेले।।' - संतवचन, 'संतकृपा झाली। इमारत फळा आली।।'- श्रीतुकाराममहाराज)*** संतांचे उपदेशाप्रमाणे - गुरुपदेशाप्रमाणे - आपण आचरण केले तर अहंता जाणार आणि अहंता गेली तर उपदेश झाला याला अर्थ. अहो देहाच्या जाणीवेत साधन होता कामा नये. देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे साधन साधले तर काही साधणार. उपदेशाचा बोध होईपर्यंत साधन साधले पाहिजे. ***('उपदेश घेता सुख वाटे। मुख्य ते गळाली पाहिजे अहंता।।'- श्रीतुकाराममहाराज, 'बोधी बोधिले बोधिता नये ऐसे झाले। बापरखुमादेवीवरु विठ्ठले माझे मीपण हारपले।।', 'देह बळी देऊनी साधिले म्या साधन।'-श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आणिक येक समाधान। मीपणेवीण साधन। करू जाणे तोचि धन्य। समाधानी।।'- श्रीसमर्थ)*** मीपण नाहीसे झाले की त्याचे खऱ्या ज्ञानाने वृत्तीरहित ज्ञानाने - वेगळेपणा हे अज्ञान नाहीसे होते. तो निवृत्तीपदास - उन्मनीपदास प्राप्त होतो. त्याचे संसरण शांत होऊन तो ब्रह्मरूप होतो. ***('मीपण ते बुडाले। विवेके वेगळेपण गेले। निवृत्तीपदास प्राप्त झाले। उन्मनीपद।।'- श्रीसमर्थ)***

**

# मीपणाचे त्याग - गुरुप्रतिपदा

'देह म्हणजे मी'(मीपणा) ही एक कल्पना आहे. अर्थात 'तू पणा' हीपण कल्पनाच आहे. त्यात सत्य काहीच नाही. ***('मी कोण पाहिजे कळले। देहतत्व तितुके शोधिले। मनोवृत्तीचे ठायी आले। मीतूपण।।', 'आपण कल्पिले मीपण। मीपण शोधिता नुरे जाण। मीपण गेलिया निर्गुण। आत्माची स्वये।।'- श्रीसमर्थ)*** साधनाने स: अहं अहं स: या महान गुरुपादुकांचे ठिकाणी - प्राणापानाचे ठिकाणी - मनाचे मिलन झाले असता (मनोलय साधला असता म्हणजेच मनोवृत्तीचा निरोध साधला असता) कल्पनारहित निर्विकल्प अवस्थेत, कल्पक - खरा मी - साक्षात्काराला येतो व 'देह म्हणजे मी' हा मीपणा - काल्पनिक अहंकार नाहीसा होतो व तो साधक देवच होऊन जातो. मन जडल्यावर जो खरा मी अनुभवाला येतो त्याला जन्ममरण असत नाही. त्या साधकाला पंचमहाभूतांचा विस्तार हा स्वप्नवत वाटतो. तो सर्वत्र गुरुरूपच अनुभवतो. मीतूपणाची बोळवण होऊन तो सर्वत्र महाराज, दत्तरूप अनुभवतो. असा पदोपदी चैतन्याचा श्रेष्ठ अनुभव घेणे, सर्वत्र दत्तरूप अनुभवणे हीच खरी गुरुप्रतिपदा. ***('कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।। कल्पक पाहता कल्पना ओसरे। घुमो लागे वारे चैतन्याचे।। भरता हे वारे होय तदाकार। मग देहाकार नाठवेची।। देहाकार जाता नुरे अहंकार। तोचि साक्षात्कार संतजनी।। ऐसा जरी झाला एक साक्षात्कार। आनंदे निर्भर दासराम।।'- श्रीदासराममहाराज, 'मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।।'- श्रीमुकुंदराजमहाराज, 'तैसे माझिये साक्षात्कारी। सरे अहंकाराची वारी। अहंकारलोपी अवधारी। द्वैत जाय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मीपण सांडोनी ओळखी मीपण। तरी देवपण प्राप्त होये।।'- श्रीदासराममहाराज, 'दृश्य पदार्थची वोसरे। तत्वे तत्व तेव्हा सरे। मीतूपण कैचे उरे। तत्वता वस्तु।।'- श्रीसमर्थ, 'दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हारपले मन झाले उन्मन। मीतूपणाची झाली बोळवण। एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान।।'- श्रीनाथमहाराज)*** गुरुप्रतिपदा हा अत्यंत पवित्र पावन असा दिवस आहे. या दिवशी श्रीक्षेत्र नरसोबावाडी, औदुंबर, गाणगापूर आणि श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची जेथे जेथे स्थाने आहेत, त्या त्या ठिकाणी मोठा उत्सव संपन्न होत असतो. याच दिवशी आमचे श्रीमामांची सख्खी आई ती.सौ.राधाबाइ केळकर माझी पणजी यांची पुण्यतिथी आहे. आमचे ती.मामा खूप लहान असताना तिने देह ठेवला. ती काळी होती का गोरी होती हे देखील श्रीमामांना आठवत नव्हते. त्यावेळी ते इतके लहान होते. आईचा सहवास त्यांना फार लाभला नाही. पण आईबद्दल निरतिशय प्रेम त्यांचे ठिकाणी होते. आईची आठवण झाली की त्यांचे डोळ्यातून अश्रू येत. कीर्तनसेवेस त्यांनी जो आरंभ केला, तो आजचा दिवस. त्याचे आईचे आशीर्वादाने, सद्गुरुचे आशीर्वादाने ही कीर्तनसेवा अखंडत्वाने सुरू आहे. ***('ज्ञानी मुक्त होऊनी गेले। त्यांचे सामर्थ्य उगेचि चाले। का जे पुण्यमार्गे चालिले। म्हणोनिया।।'- श्रीसमर्थ)*** सामर्थ्य त्यांचे आहे आम्ही फक्त निमित्तमात्र आहोत.

✻✻

# सदाचार - गुरुद्वितीया

गुरुप्रतिपदेनंतर येणारी द्वितीया ही अद्वितीयच आहे. या दिवशी भगवान सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांनी रघुनाथप्रियगुरुवर स्वामी यांचा प्रसाद म्हणून श्रीमामामहाराजांना जोड रुद्राक्ष दिला. त्याला पादुकांचा आकार आहे. १९०६ साली या द्वितीयेलाच चिमडचे श्रीनारायणमहाराज यांचा अनुग्रह - प्रसाद श्रीमामामहाराजांना प्राप्त झाला. साधुमहाराजांच्या या प्रसादाने आत्माराम सर्वाठायी नेत्रांतरी अनुभवाला आला. थोर सदाचार, पापाचा विचार नाही असे रामनाम श्रीमामामहाराजांना प्राप्त झाले. याच दिवशी श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या ज्येष्ठ सूनबाई, श्रीदादामहाराजांच्या प्रथम पत्नी ती.सौ.जानकीवहिनी यांची पुण्यतिथी आहे. त्या आमचे ती.प.पू.दादांना मुलगाच मानायच्या. इतका जिव्हाळा (प्रेम) त्यांचा आमच्याविषयी होता. अशी ही अद्वितीय द्वितीया आहे. गुर्वाज्ञेप्रमाणे श्रीमामामहाराजांनी रामनामाचा सदाचार प्रभाते ती प्रभा मनात घेऊन अखंडत्वाने आचरला व ते धन्य झाले. कोणतीही परिस्थिती येवो, त्यांची रामनामाची गती, नामस्मरणाची स्थिती सांडली नाही. त्यांचे भाग्याचे भाग्य रामनाम, तपाचे तप रामनाम, सुखाचे सुख रामनाम, रामनाम हेच ज्ञान, रामनाम हेच धन, रामनाम हाच मूळस्वभाव, सारे काही एक रामनामच. याला म्हणायचे रामनामी एकवीध होणे. त्यांनी रामनामात सारे काही साधले, अनुभवले. जिथे पापाचा विचारच नाही, त्यांचा आचार कसा असेल? जो 'हेतुवीण सत्क्रिया' आचरतो आहे, त्याचे हातून कुकर्म कधी घडेल का? 'स्वरूपी राहणे' या स्वधर्माने जो चालतो आहे तो उत्तम, या जगात धन्यताच मिळवणार व परलोकी मोक्ष मिळवणार. परमार्थ हा बोलायचा नसून तो आचरायचा आहे. हा परमार्थ आचरणे म्हणजे सदाचार आहे. परमार्थ आचरून दाखविण्यासाठी, रामनाम आचरण्यासाठी संतांचे अवतार असतात. रामनाम बोलायचे की आचरायचे हो? रामनाम आधी आचरायचे मग बोलायचे. ***'इंद्रियासी नेम नाही। मुखी राम म्हणोनी काही।।'*** अशी जर अवस्था असेल तर काय उपयोग. रामनाम आचरायचे म्हणजे काय करायचे हो? कामक्रोधअहंकाररहित होणे म्हणजे रामनामाचे आचरण. हे आचरण झाले तर राम बोलायचा. याला म्हणायचे 'चाले तैसा बोले' मग असे घडले तर तो साधक वंदनीय ठरतो. त्याचे बोलणे परिणामकारी होते. ***('आधी राखावा आचार। मग पहावा विचार। आचार विचार पैलपार। पाविजेतो।।', 'बोलण्यासारखे चालणे। स्वये करून बोलणे। तयांची वचने प्रमाणे। मानिती जनी।।'- श्रीसमर्थ)*** रामनामाची एक गती आहे - सद्‌गती आहे. त्या गतीची प्रचिती देहात आली की मग राम बोलावा. ***('गती तेचि मुखी नामाचे स्मरण। आणीक विस्मरण अधोगती।।'- संतवचन, 'रामनाम गती देहात प्रचिती। धरोनिया चित्ती राम बोले।।'- श्रीमामामहाराज, 'रामनामाची गती कोण जाणे। जाणताती कैलासपती राणे।।'- श्रीसमर्थ)*** जशी गती तशी गत, जशी गत तसा आचार माणसाचा असतो. ***('तेचि गत बाई। आचार तिचे ठायी। जाणीवेचा बोल अंगी येवो दिला नाही।।'- संत शिवराम)*** जो कामक्रोधरहित झाला तो बाहेर कसा वागेल हो? तो कोणाशी वाईट वागेल का? तो कोणाचे अंत:करण दुखावेल का? तो सर्वांशी चांगलेच वागतो. ***('राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे। ऐसी ही विवेकाची उत्तरे। ऐकणार नाही।।'- श्रीसमर्थ, 'जगी वागावे ते कैसे। असाधुशी साधू जैसे।।'- श्रीमामामहाराज)*** सद्‌वर्तनाने तो कीर्तीमान होतो. उद्याचे कीर्तनात आपण श्रीगुरूतृतीयेचा विषय पाहू.

✻✻

# गुरुतृतीया - मौन

माघ वद्य ३ गुरुतृतीया हा दिवस आमचे श्रीमामामहाराजांचे व आमचे सर्वांचे जीवनाला कलाटणी देणारा ठरला. श्रीतात्यासाहेबमहाराज देह ठेवण्यापूर्वी १९२३ साली या तृतीयेदिवशी आमचे घरी भोजनास आले होते. भोजनोत्तर निरोप घ्यायचे वेळी ते श्रीमामांना म्हणाले, 'बापूराव, तुम्हाला संध्याकाळची पाच ही वेळ फार चांगली आहे.' ते हे काय अर्थाने म्हणाले हे त्यावेळी इतरेजनास कळले नाही. पुढे पौष वद्य ६, १९२४ या दिवशी श्रीतात्यासाहेबमहाराजांनी महानिर्वाण केले. त्यानंतर प्रतिवर्षाप्रमाणे माघ वद्य १ गुरुप्रतिपदा या दिवशी श्रीमामामहाराजांनी त्यांच्या नेहमीच्या रात्रीच्या निवांत वेळी दासबोध पारायणास आरंभ केला व यावर्षी दासबोध पारायणाबरोबरच या दहा दिवसांसाठी संध्याकाळी पाच वाजता कीर्तनसेवा आरंभिली. माघ वद्य ३ या दिवशी रात्री १२ चे सुमारास दासबोधपारायण चालू असताना श्रीतात्यासाहेबमहाराज - सोहंरूपी वायुपुत्र हनुमान- चैतन्यरूपाने प्रगट झाले. सर्वत्र प्रकाश आणि प्रकाशच दाटून राहिला. 'नवल प्रकाश प्रकाशावेगळा' असाच काहीसा तो प्रकाश होता. या चैतन्याच्या प्रकाशाने द्वैत संपूर्णपणे नाहीसे झाले होते व श्रीमहाराजांची सत्ता काय आहे याचा अनुभव त्यांना आला होता. श्रीतात्यासाहेबमहाराजांनी श्रीमामांना अखंड कीर्तनाची आज्ञा दिली. श्रीमामांच्या अखंड कीर्तनास सायंकाळी ५ वाजता प्रारंभ झाला व ५ ही वेळ बापूरावांना कशी चांगली आहे हे सर्वांना उमगले. पण श्रीमामांनी हा साक्षात्कार प्रसंग कुणालाही सांगितला नाही. आपला मोठेपणा अलौकिकत्व लोकांसमोर यावे असे त्यांना कधीही वाटले नाही हे केवढे विशेष आहे. १९३७ साली कै.राजकवी साधुदास यांनी लिहिलेल्या श्रीतात्यासाहेबमहाराजांचे चरित्रावरून ही गोष्ट आमचे श्रीदादांना समजली. त्यांनी या प्रसंगाचे महत्त्व जाणून हा तीन दिवसांचा पर्वकाळाचा सोहळा १९३८ पासून सुरू केला. या प्रसंगाचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, ***'महाराज गुरुतृतीये आले। दर्शन गोविंदा दिधले।। अर्धोन्मिलीत दृष्टी जयांची। सहजासनी सजले।। भक्त न्याहाळुनी सगुण ब्रह्म ते। हृदयांतरी स्थिरले।। चैतन्याचे भव्य मार्ग ते। दासबोधी दाविले। कीर्तनसरीता अंतर्यामी। ओघवती चाले।। गुरुभक्तांचा प्रणाम घेऊनि। सप्रेमे धाले। हनुमंत प्रभु कृपाप्रसादे। त्रिविध ताप हरले।। समर्पिता सुमने सुमनांजली। संतोषे ल्याले। हस्तद्वय तद्मस्तकी ठेवूनी। अदृश्यचि झाले।। श्रीहरिकीर्तन नेम उपासन। अखंड चालविले। दासराम हा वंदन करितो। हनुमत्पद कमले।।'*** तर या गुरुतृतीयेचे महत्त्व ते एका पदात असे सांगतात, ***'गुरुतृतीया ही गोड किती होय सुखाची। जरी गाईल कुणी गुणकीर्ती तृप्ती मनाची।। हनुमत्प्रभू महाराज मंदिरी उभा नवलप्रभा दिपवी नभा प्रगटली आभा। शोभा ही काय वानू आज येथीची। जरी गाईल कुणी गुणकीर्ती तृप्ती मनाची।।'.*** तुरीयावस्थेत नामाचा बिंदू घडला, नामी रूप बिंबले की, गगनात अगणित तारे प्रत्ययाला आले की मन वृत्तीसहित मुरते. ***('नामाचा बिंदू घडला गे माये। अंतर बाहेर प्रकाशे स्वये।।'- श्रीदासराममहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** तेथे बोलणे, अबोलण्याचे बोलणे काहीच उरत नाही. उन्मनीत त्याला खरे मौन साधते. ***('साच लटीके दोनी। न बोले जाला मौनी। जे भोगिता उन्मनी। आरायेना।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'बोलणे अबोलणे सारुनी दोनी। बोलसी तरी बोल शब्दाते गिळोनी।।'- श्रीकेशवस्वामी)*** श्रीसमर्थ हे मौन केव्हा साधते हे असे सांगतात, ***'येकांती मौन धरून बैसे। सावध पहाता कैसे भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती।।', 'उच्चारेवीण जे शब्द। ते जाणावे सहजशब्द। प्रत्यया येती। परंतु नाद काहीच नाही।।', 'ते शब्द सांडून बैसला। तो मौनी म्हणावा भला। योगाभ्यासाचा गलबला। याकारणे।।', 'येकांती मौन धरून बैसला। तेथे कोण शब्द जाला। सोहं ऐसा भासला। अंतर्यामी।।'*** सोहं हंसाची न करता बोळवण साधली असता मन मुरल्यावर अचळ परमात्माच अंतरी निवांत राहतो. तो साधक सदेह सच्चिदानंद होतो. मग तो साधक जे बोलतो ते ब्रह्मनिरुपण. ***('जया अंतरी भगवंत। अचळ राहिला निवांत। तो स्वभावे जे बोलतो। ते ब्रह्मनिरुपण।।'- श्रीसमर्थ)*** **

# एकचित्त

आम्ही मनाच्या अस्तित्वावर भिन्न विश्व अनुभवतो. त्या एकाला न पाहता अनंतवेशे अनंतरूपे पाहतो. मग चिंतनही बहुवीध होते. मग चित्तात एक वाचेवरती दुसरेच व क्रिया तिसरीच अशी आपली स्थिती होते. संत अनेकात एकाला पाहतात. ते अनंतवेशे अनंतरूपे पाहात नाहीत, तर ते त्याला एकाला पाहतात. ***('म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान। जैसे अवयव तरी आन आन। परी एकेची देहीचे।।', 'अनंत रूपे अनंत वेषे देखिले मी त्यासी। बापरखुमादेवीवरे खुण बाणली कैसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अनेकी सदा एक देवासी पाहे।।'- श्रीसमर्थ)*** संतांना एकाचाच अनुभव येत असल्याने त्यांचे चित्तात एकच वाचेवरती तेच एक नाम व क्रियाही तीच एक म्हणून त्यांना संत साधू म्हणतात. ***('यथा चित्त तथा वाचा यथा वाचा तथा क्रिया। चित्तेवाची क्रियायांच साधुनाम एकरूपता।।'- संस्कृतवचन, 'एक धरीला चित्ती। आम्ही रखुमाईचा पती।। तेणे झाले अवघे काम। निवारिला भवभ्रम।। परद्रव्य परनारी। जाली विषाचिया परी।। तुका म्हणे फार। नाही लागला व्यवहार।।', 'आणिक दुसरे मज नाही आता। नेमिलिया चित्ता वाचुनिया।।'- श्रीतुकाराममहाराज, 'परमार्थी एक चित्त। झाले पाहिजे उचित।। एक चित्ताचे लक्षण। एकवीध चित्त पूर्ण।। एका ठायी चित्त जाता। एकचित्त येई हाता।। एक नाम एक देव। दासा भेटे स्वयमेव।।'- श्रीमामामहाराज)*** मन जर एकवीध, एकाग्र झाले तर चित्त एकवीध, एकाग्र होणार. मनोलय साधला, विकर्माचे अकर्म झाले तर एका आत्म्याचा बोध बुद्धीला होणार. बुद्धी आत्म्याचे ठायी निश्चळ झाली तर चित्ताचे विषय चिंतन थांबून चित्तात चैतन्य भरून राहणार. चित्त स्थिर होणार. चित्त एकचित्त होणार. ***('मन ज्याला आवरेना। तोचि सांसारिक जाण।। मन ज्याच्या हाती आले। दासा चित्त स्थिर झाले।।', 'जेथे एक अग्र होय तुझे मन। जाणावे सुजाण चित्त तेची।।'- श्रीदासराममहाराज, 'मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरे आपणया। बुद्धी घापे करोनिया। पतिव्रता।।', 'बुद्धी अनन्ये येणे योगे। मजमाजी जै रिगे। तै चित्त चैत्य त्यागे। मातेची भजे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अशा तऱ्हेने चित्ताचे विषय चिंतन संपून चित्तात तोच भरून राहिला की चित्ताला प्रसन्नता हा प्रसाद अखंडीत प्राप्त होतो. ***('मग अभिन्ना इया सेवा। चित मियाची भरेल जेव्हा। माझा प्रसादू जाण तेव्हा। संपूर्ण जाहला।।', 'देखे अखंडीत प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणे नाही समस्ता। संसारदु:खा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'चित्तची हारपले अवघे चैतन्यची जाहले। पाहाता पाहाता अवघे विश्वची मावळले।।'- श्रीनाथमहाराज)*** हे चित्त एकवीध कसे होणार? त्याकरता ठायीच निवांत बसले पाहिजे. ***('ठायीच बैसोनी करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा।।', 'बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त। तया सुखा अंत:पार नाही।।'- श्रीतुकारामहाराज)***

**

# निष्ठावंत

प्रत्येक शास्त्रामध्ये त्यातील मूळतत्वावर निष्ठा (विश्वास) ठेवावी लागते. त्याशिवाय साध्य हे सिद्ध होत नाही. आता शिक्षकांनी गणितातील एक दोन शिकवले किंवा इंग्रजीतील ए,बी,सी,डी शिकवले. एक दोन असेच का काढायचे? A या अक्षराला 'अे' का म्हणायचे? 'B' ला 'अे' का म्हणायचे नाही? याला काही उत्तर असते का? तेथे शिक्षक सांगतात यावर विश्वास, निष्ठा ठेवावीच लागते, तरच पुढील गणित सुटणार, इंग्रजी पुस्तके वाचता येणार. काहीही सिद्ध करताना काही गृहीत धरावेच लागते. गृहीत धरले तरच सिद्धता लिहिता येते. तसेच परमार्थात सद्गुरु, सद्गुरुंनी सांगितलेले नाम, सद्गुरुंनी दाखविलेला देव यावर निष्ठा हवी. व्यवहारातसुद्धा निष्ठा ठेवावी लागते. अहो नवरा बायको हे काही सायन्स आहे का? तेथे पण निष्ठाच ठेवावी लागते, विश्वास ठेवावा लागतो. तसेच परमार्थातसुद्धा आहे. आमचे श्रीदादा सांगायचे, 'असा एक दगड हवा मी त्याला देव वगैरे काही म्हणत नाही, तेथे आपण कोणत्याही परिस्थितीत नतमस्तक व्हावयास हवे व असा एक जिवंत माणूस हवा, त्याचे वाक्य म्हणजे वेदवाक्य, त्याची आज्ञा शिरसावंद्य हवी.' अशी निष्ठा असेल तरच परमार्थ साध्य होणार. सद्गुरुंचेवर निष्ठा हवी. दुसरे कोणीही इष्ट वाटता कामा नयेत. याला म्हणायचे निष्ठा. परिस्थिती कोणतीही येवो निष्ठेत बदल होता कामा नये. परिस्थिती येणे ही एक परीक्षा असते, कसोटी असते, त्यात आपण उत्तीर्ण व्हावयास हवे. ***'तरावे बुडावे तुझिया वचने। निर्धार हा मने केला असे।'* हे संतवचन निष्ठा कशी असावी याचे द्योतक आहे. निष्ठा कशी असावी हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, *'सद्गुरुघरीचे जरी आले श्वान। तया हे नमन असो आधी।। सद्गुरुघरीचा आला जरी वारा। तयासी सामोरा नमस्कारु।। सद्गुरुसेवक भेटलिया कोणी। जाईन लोटांगणी एकदाची।। सद्गुरुपाशी दासराम उभा। पाहातसे शोभा चैतन्याची।।'.*** या निष्ठेला काही तोड आहे का? देवसुद्धा गुरुहून मोठा वाटता कामा नये. श्रीसमर्थ म्हणतात, ***'गुरुहोनी देव मोठा। मानी तो शिष्य करंटा।', 'गुरुदेवा बरोबरी। करी तो शिष्य दुराचारी।।'*** तर श्रीगुरुगीता सांगते, *'न गुरोरधिकं'.* त्यांनी सांगितलेल्या नामावर आपली अशीच निष्ठा हवी. कोणताही प्रसंग आला तरी नामस्मरणाची स्थिती बदलता कामा नये. ***('बुडो ही धरा की लया विश्व जावो। पडो काळ हस्ते शिरी वज्र घावो। विसंबू नको सर्वथा नाम माळा। मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा।।' - संतवचन, 'तरो अथवा बुडो नाम न सोडीन। प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी।।'- श्रीमामामहाराज, 'संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती। परी नामस्मरणाची स्थिती। सांडोची नये।।'- श्रीसमर्थ)*** सद्गुरूंनी जो देव दाखविला त्यावर आपली निष्ठा हवी. अहो जर देव प्रत्यक्ष समोर आला तर आम्ही त्यालासुद्धा आयडेंटीटी कार्ड मागू, आधारकार्ड मागू. तो देव आहे याला आधार नको का? असली आम्ही माणसे. देवावर निष्ठा कशी असावी हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'म्हणोनि आम्ही रामदास। श्रीरामचरणी आमुचा विश्वास। कोसळोनी पडो हे आकाश। आणिकाची वास न पाहो।।'*** तर श्रीनामदेवमहाराज सांगतात, ***'देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो।। चरण न सोडी सर्वथा। आण तुझी पंढरीनाथा।। वदनी तुझे मंगळ नाम। हृदयी अखंडीत प्रेम।। नामा म्हणे केशवराजा। केला पण चालवी माझा।।'***

✻✻

# धैर्य धरी

प्रपंचात नुसती गडबड, गडबडीतच प्रपंच साधतो. ही सारी गडबड गोंधळ संपल्याशिवाय परमार्थ साधत नाही. परमार्थ हा गडबडीचा विषयच नाही. ही सारी प्रपंचातील गडबड संपवण्यासाठी धीर हवा व धैर्य हवे. समजा प्रपंचातील गडबडीने आम्हीच गडबडून गेलो तर कसे होणार? येईल त्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी धैर्य हवे. म्हणून सहनशीलता, शांती अंगी बाणली पाहिजे. धीटपणाने साऱ्या प्रसंगांना सामोरे जाता यावयास हवे. प्रपंचात जे जे होते ते साक्षीभावाने पाहता आले पाहिजे. प्रपंचात गुंतून पडता कामा नये. तरच उगेपणात आपण येऊ शकतो. ***('तुका म्हणे उगे रहावे। जे जे होईल ते ते पाहावे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** प्रपंचातील बऱ्यावाईट प्रसंगांचा परिणाम जर आमच्यावर होऊ लागला तर अखंड परमार्थ कसा साधणार? संपत्ती आली तरी किंवा गेली तरी नामस्मरणाची स्थिती, अनुसंधान शेवटपर्यंत सुटता कामा नये. याकरता नुसती निष्ठा असून उपयोग नाही तर जवळ धैर्यही हवे. संकटाचे वेळी आपला धीर सुटतो, तो धीर न सुटता आपण जर धीर धरला तर परमेश्वर परमार्थास साह्य करतो. ***('धीर तो कारण। साह्य होतो नारायण।।'- श्रीतुकाराममहाराज, 'संकटाचे वेळी। कोण आपणाजवळी।।'- श्रीमामामहाराज)*** अनुष्ठान चालू असताना आमचे श्रीमामांची बदली तासगावला केली. अनुष्ठानाचे काळात वेस ओलांडायची नसल्याने अनुष्ठान पूर्ण झाले की मी तासगावला जाईन असे श्रीमामांनी सांगून पाहिले पण संस्थेने ऐकले नाही. तेव्हा श्रीमामांनी नोकरी सोडली पण अनुष्ठानात खंड पडू दिला नाही. अनुष्ठानावरची निष्ठा व नोकरी सोडण्याचे धैर्य त्यांचेपाशी होते. म्हणूनच ते सच्चिदानंद पदावर आरूढ झाले. इतर उत्पन्नाचे कोणतेही ठोस साधन नसताना अशी सुखाची नोकरी सोडणे व आयुष्य ईश्वराच्या सेवेत वेचणे याला फार मोठे धैर्य हवे. ***('दैवास्तव देहाचे पाळण। ऐसा निश्चयो परिपूर्ण। जो चिंतीना देहभरण। तो महायोगी जाण दैवयोगे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'हरिकथा सांडू नये। निरुपण तोडू नये। परमार्थास मोडू नये। प्रपंचबळे।।'- श्रीसमर्थ)*** आम्ही प्रपंचात गुंतून पडतो व कामक्रोधादी षडविकारात्मक आयासाने भजन साधत नाही. कामक्रोधादी विकार जर काही काळ दूर ठेवता आले तरच हे भजन - रामनाम - एकांतात एकवीधतेने साधता येते. प्रपंचाची चाळणा करावी पण काही काळ एकांत साधावा (कामक्रोधरहित व्हावे) हा एकांत जर आपणाला मानवला तर प्रपंचाची उपाधी नाहीशी होऊन परमार्थ हळूहळू साधणार आहे. ***('चाळणा करावी सर्वही। एकांती राहता बरे। एकांत मानला ज्याला। त्याला साधे हळूहळू।।'- श्रीसमर्थ, 'सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'रामनाम एकांती एकवीध साधी। प्रपंच उपाधी भक्ता नाही।।'- श्रीमामामहाराज)*** एकांत एकदा मानवला की प्रापंचिक चाळणा कमी करावी व लोकांतातच अखंड एकांत अनुभवावा व काळाचे सार्थक करावे. ***('अखंड येकांत सेवावा। अभ्यास करीतची जावा। काळ सार्थकची करावा। जनासहित।।'- श्रीसमर्थ)*** असे एकांती व मग लोकांती हरीनाम बोलता आले तर ते देहत्यागाअंती बोलता येते. ***('हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।'- श्रीनाथमहाराज)*** श्रीमामामहाराजांनी असे एकांतात, लोकांतात सतत नाम साधून देहांतीही नाम साधले व याची प्रचिती सर्वांना दिली. ***('एकांती लोकांती देहांतीही नाम। प्रचिती उत्तम स्वये दिली।।'- श्रीदासराममहाराज)***

✲✲

# काय ते शाश्वत काय अशाश्वत

ज्या गोष्टीबद्दल आम्हाला संशय - विकल्प येतो ते सारे विनाशी अशाश्वत आहे. संशय कशाबद्दल येतो हो? ज्याला विकल्प (पर्याय) असतो त्या गोष्टीबद्दल विकल्प येतो. जे अविश्वासाचे बनलेले आहे, जे सारखे बदलणारे आहे, जे भ्रामक आहे, त्यावर विश्वास कसा ठेवायचा? त्या गोष्टींचाच संशय येतो. सत्य हाताला येत नाही तोवर संशय येतो. जे सत्य आहे त्याबद्दल संशय यायचे काहीच कारण नाही. जे सत्य आहे ते शाश्वत-अविनाशी आहे. ज्याच्याबद्दल संशय येतो, ज्याला संशय येतो त्या सर्वांचा निरास झाला तरच सत्य शाश्वत हाताला येणार. आम्हाला द्वैत (आकार) अनुभवाला येते. द्वैत (आकार) अनुभवाला येते म्हणून विकल्प (पर्याय) असतात व विकल्प (पर्याय) असतात म्हणून विकल्प (संशय) येतो. आपणास जे जे साकार दिसते आहे ते ते सारे नाशिवंत आहे, अशाश्वत आहे. हा आकार म्हणजे सत्यावर भासाची विकृती आहे. या विकृतीने मूळस्वरूप मूळकृती लोपली आहे. सत्यावर भासाची विकृती म्हणजे जन्म आहे. या विकृतीला जन्म आहे अर्थात मरणही आहे. विकृती विनाशी - अशाश्वत आहे. ***('सत्यावर जे का भासाची विकृती। तयासी म्हणती जन्म बापा।।', 'विकृती आहे ज्यात। तया आहे आदी अंत।। सत्य नोहे भास। कैचे जन्ममरण त्यास।। सत्य हे अढळ। तेणे निर्मिले सकळ।।'- श्रीदासराममहाराज, 'हे उपजे आणि नाशे। ते मायावशे दिसे। येऱ्हवी तत्वता वस्तू जे असे। ते अविनाशची।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** भास हा मनाला होतो. आकाराचे ज्ञान, साकार दृश्याचे ज्ञान, द्वैताचे ज्ञान मन आहे म्हणून होते. संशय हाही मनातच येतो. ***('दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते।।'- श्रीसमर्थ)*** जाणीवेतील मनोलयाने ज्याच्याबद्दल संशय येतो ती विकृती व ज्याला संशय येतो ते मन दोन्हीचा निरास होऊन कल्पांती सत्य अविनाशी वस्तू अनुभवाला येणार आहे. ***('जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ, 'तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सर्वसाधारणत: व्यवहार हा अशाश्वत गोष्टींवर आधारित असतो. म्हणून सर्वत्र संशयाचे वातावरण. म्हणून व्यवहारात संग्रह अशाश्वत गोष्टींचाच असतो. या अशाश्वत गोष्टी शाश्वत राहाव्यात अशी आमची अपेक्षा असते. हे कसे शक्य आहे म्हणून व्यवहारात कोणत्याही गोष्टीची शाश्वती देता येत नाही. अर्थात हा लटका व्यवहार म्हणजे संसार हा अस्थिर, अनिश्चित असतो. याउलट परमार्थ हा एका शाश्वतावर - अद्वैतावर आधारित असतो. परमार्थात एक ब्रह्म, एक नाम, एक गुरु, एक साधू परमार्थात सारे एकच. ***('एकची ब्रह्म गड्या जगामध्ये एकची ब्रह्म गड्या।।'- श्रीमध्वमुनीश्वर, 'ब्रह्म सर्वासी व्यापक। ब्रह्म अनेकी येक। ब्रह्म शाश्वत हा विवेक। बोलिला शास्त्री।।', 'साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळोन येकची जाले। देहातीत वस्तू।।'- श्रीसमर्थ, 'गुरु जगी एक बोलतसे श्रुती। परी तया अर्था जाणती ना।।'- श्रीदासराममहाराज, 'एक नाम हरी। द्वैत नाम दूरी। अद्वैत कुसरी विरळा जाणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** हे एक प्राप्त झाले, एकाशी एकी होऊन एकाएकी जर आपण भक्त झालो तर हे अद्वैताचे निश्चळ सुख प्राप्त होते. ***('एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही। अद्वैताचे सुख ते निश्चळ निर्गुण शोधोनि पाही।।'- श्रीचिमडमहाराज)*** येथे सारे एक म्हणजे संशयाला वावच नाही. आम्हाला जो संशय येतो तो परमार्थातील व्यवहार आहे, परमार्थ नव्हे.

**

# ज्ञानी

पुस्तके वाचून जे आपणास उपलब्ध आहे त्याचे ज्ञान मिळवणारे ज्ञानी वेगळे व ज्याने हे उपलब्ध करून दिले आहे त्याचे ज्ञान मिळवणारे आत्मज्ञानी वेगळे. पुस्तके वाचून कितीही ज्ञान मिळवले तरी ते अपुरेच आहे. पुस्तके वाचून होणाऱ्या पुस्तकी पदार्थज्ञानाने तो देव उपलब्ध होत नसल्याने तो पदार्थज्ञानी, स्वरूपज्ञान नसल्याने अज्ञानीच ठरतो. ज्या पदार्थज्ञानाने देवाची प्राप्ती होत नाही ते पदार्थज्ञान - विपरीत ज्ञान ज्याचे नाहीसे झाले आहे व या नेणीवेची (अज्ञानाची) जाणीव ज्याचे ठिकाणी आहे तो ज्ञानी. अज्ञान म्हणजे नेमके काय हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'आपण म्हणिजे मीपण। मीपण म्हणिजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला।।'*** अहो अहंकार, मीपणा, जीवपण हेच अज्ञान आहे. या अहंकाराचा, मीपणाचा, जीवपणाचा वियोग होणे म्हणजेच स्वरूपाचा योग होणे, स्वरूपज्ञान होणे होय. श्रीमामामहाराज केळकर सांगतात, ***'तोचि ज्ञानी भला। अहंभाव ज्याचा गेला।।'*** 'मी' आहे म्हणून 'माझे' आहे. 'माझे' आहे म्हणून वासना आहे. 'मी' गेला की वासना पण रहात नाही. ज्ञानी पुरुष हे वासनारहित असतात. श्रीसमर्थ सांगतात, ***'बीज अग्निने भाजले। त्याचे वाढणे खुंटले। ज्ञात्यास तैसे जाले। वासनाबीज।।'*** ज्याच्या अंत:करणात काम नाही तेथे क्रोध येईल का? लोभ होईल का? त्यांचे अंत:करण त्यांच्या आज्ञेत असते. ***('जेयाची आज्ञा आपण। शिरी वाहे अंत:करण। मनुष्याकारे जाण। ज्ञानची तो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ते ज्ञानी षड्विकाररहित असतात. ***('तोचि ज्ञानी भला। षड्विकार नाही ज्याला।।'- श्रीमामामहाराज)*** वासनारहित अवस्थेत हे महात्मे असल्याने त्यांना जन्म व त्यापाठोपाठ प्राप्त होणारे मरण प्राप्त होत नाही. वासना हरीरूप झाल्याने जन्ममरणरहित अवस्थेत - संकल्पविकल्परहित अवस्थेत - जाणीवनेणीवरहित अवस्थेत त्यांना मोक्ष प्राप्त झालेला असतो. ***('जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाले अंगे हरिरूप।।'- श्रीनाथमहाराज, 'जन्ममृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला।।', 'ज्ञाने मोक्षची पावणे।'- श्रीसमर्थ, 'ज्ञानात एव तु कैवल्यम्।।'- जगद्गुरु शंकराचार्य)*** जो वासनारहित आहे, ज्याने मोक्ष प्राप्त केला आहे असा ज्ञानीच दुसऱ्याला वासनारहित करून मोक्ष देऊ शकतो - अनुग्रह देऊ शकतो. ***('याकारणे ज्ञाता पहावा। त्याचा अनुग्रह घ्यावा। सारासार विचारे। जीवा मोक्ष प्राप्त।।', 'जे क्षणी अनुग्रह केला। तेचि क्षणी मोक्ष जाला। बंधन काही आत्मयाला। बोलोचि नये।।'- श्रीसमर्थ, 'तोचि ज्ञानी खरा तारी दुजीयासी। वेळोवेळा त्यासी शरण जावे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** जन्ममरणरहित अवस्थेत ते संसाराहून वेगळे झालेले असतात, त्रिगुणरहित झालेले असतात. ***('पुनरपिजननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरेशयनं। इह संसारे।।'- जगद्गुरू शंकराचार्य, 'संसार समस्त त्रिगुण।'- श्रीनाथमहाराज, 'येणेची जन्मे येणेची काळे। संसारी होइजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।'- श्रीसमर्थ)*** जन्ममरणरहित अवस्थेत ***'सोहं तेही अस्तावले।'*** या अवस्थेत ते सतत एका आत्मरूपाचा - वासुदेवाचा अनुभव घेतात. सतत एकाच्या अनुभवाने एकांताचा अनुभव घेतात व काळाचे सार्थक करतात. ते भक्त श्रेष्ठ ज्ञानी ठरतात. ***('हे समस्तश्री वासुदेवो। ऐसा प्रतितीरसाचा वोतला भावो। म्हणोनी भक्तामाजी रावो। आणि ज्ञानिया तोचि।।', 'बहु एकांतावरी प्रिती। जया जनपदाची खंती। जाण मनुष्याकारे मूर्ती। ज्ञानाची तो।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'अखंड येकांत सेवावा। अभ्यास करीतची जावा। काळ सार्थकची करावा। जनासहित।।'- श्रीसमर्थ)*** आत्मज्ञानी माणूस कसा असतो याचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात, ***'वर्म जाणे तो विरळा। तयाची लक्षणे पै सोळा। देही देव पाहे डोळा। तो एक ब्रह्मज्ञानी।। जन निंदो अथवा वंदो। जया नाही भेदाभेदो। विधीनिषेधाचे शब्दो। अंगी न बाणती। कार्य कारण कर्तव्यता। हे पिसे नाही सर्वथा। उन्मनी समाधी अवस्था। न मोडे जयाची।। कर्म अकर्माचा ताठा। न बाणेची अंगी वोखटा। वाऊग्या त्या चेष्टा। करीना काही। शरण एका जनार्दनी। तोचि एक ब्रह्मज्ञानी। तयाचे दरुशनी। प्राणियासी उद्धार।।'*** तर संत केशवस्वामी हे असे सांगतात, ***'या नाव ज्ञान या नाव ज्ञान। ब्रह्मसमाधान याते म्हणिजे।। आहे ते सोडोनी नाही ते पाहिजे। पहाणे हारपे तेथे राहिजे।। जे ठायी राहिजे तो ठाव होइजे। होणे न होणे अवघे विसरिजे।। विसराचा आठव आठवाचा विसर। जाणे तो ईश्वर केशव म्हणे।।'*** असे मोक्षश्री आळंकृत जीवन्मुक्त आत्मज्ञानी श्रीसमर्थ रामदासस्वामी आज स्वरूपाकार झाले. त्यांचे पवित्र चरणी साष्टांग नमन करतो व येथेचे थांबतो. **

# सारग्रहण

हे सारे विश्व सार आणि असार यांनी भरून राहिले आहे. जे आत्मज्ञानी आहेत ते सारग्रहण करतात व आमच्यासारखी माणसे असार संसाराचा अनुभव घेतात. आत्मज्ञानी माणसे प्रपंच करतात, संसार करतात पण ते संसारात, प्रपंचात गुंतत नाहीत. म्हणून त्या आत्मज्ञानी भक्तांना संसाराची, प्रपंचाची उपाधी वाटत नाही. आत्मज्ञानी संत हे रामनाम (चैतन्य) एकांतात एकवीधतेने साधतात, त्यांना ही प्रपंचाची उपाधी होत नाही. आम्ही ते रामनाम साधत नाही अर्थात आम्हाला उपाधी बाधक ठरते. ***('या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्विकारिती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'रामनाम एकांती एकवीध साधी। प्रपंच उपाधी भक्ता नाही।।'- श्रीमामामहाराज)*** संसारात राहून, प्रपंचात राहून हे सारभूत चैतन्य - नाम साधता आले पाहिजे. ***('असोनी संसारी जिव्हे वेगु करी। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'गोविंद म्हणे वेग चाललासे पाही। साधनी या राही संसारात।।'- श्रीमामामहाराज)*** संसारात बरेच काही ऐकावे लागते. पण आत फक्त नामच घ्यायचे, असार सारे बाहेरच ठेवायचे. बरेच काही पाहायला लागते पण नयनात फक्त चैतन्याचे वारेच भरले पाहिजे. ***('ऐसे हे अवघेची ऐकावे। परंतु सार शोधोनी घ्यावे। असार ते जाणोनी त्यागावे। या नाव श्रवणभक्ती।।'- श्रीसमर्थ, 'नाइकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी। अवाच्य ते टाळी। जीभची गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अहो डोळ्याला, कानाला, वाचेला फिल्टर बसले पाहिजेत. बाकी सारे गाळून शुद्ध चैतन्यच अनुभवाला आले पाहिजे. अहो पण हे होणार कसे? आम्हाला जी कल्पनेची बाधा झाली आहे, ती नाहीशी झाली की सारग्रहण होऊ शकते. कल्पना गेली की सत्याचा अनुभव येणार. त्रिगुणात्मक, असार विचार लोपले की सार निर्गुण प्रगट होणार. हे निर्गुण प्रगट होणे म्हणजेच सारासार विचार - हरिपाठ आहे. हेच सार नाम निर्विकल्प नाम आहे. ***('त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ।।', 'सार सार सार विठोबा नाम तुझे सार। म्हणोनी शुळपाणी जपताहे वारंवार।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामापरते नाही सार। नामे तरलेची अपार।।'- संत केशवस्वामी, 'नाम अमृत हे सार। हृदयी जपा निरंतर।।'- संतवचन)*** हे त्रिगुण आणि पंचभूते जी असार आहेत, ते आपल्या श्वसनामध्ये आहेत. साधनाभ्यासाने यांचा निरास झाला असता संसारातील असारपण नाहीसे होते व बरव्या विचाराने - सार विचाराने - बरवे साधन होते. मन सुखरूप, शांत होते. मन आत्मबोधाच्या विवरात पहुडते. ***('त्रिगुण आणि पंचभुते। वायुमध्ये मिश्रिते। अनुमानेना म्हणून त्याते। मिथ्या म्हणो नये।।', 'अरे नर सारविचार करी। मन बरे विवरी।। सारासार विचार न होता। वाहसी भवपुरी।। सकळ चराचर कोठुनी जाले। कोठे निमाले तरी।। दास म्हणे जरी समजसी अंतरी। मुळीची सोय धरी।।', 'असारा संसारा त्यजुनी बरवे साधन करी।।'- श्रीसमर्थ, 'जेयाचिया इंद्रियाचिया घरा। नाही विषयाचिया येरझारा। जो आत्मबोधाचिया वोवरा। पहुडला असे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'फळकट हा संसार। येथ सार भगवंत।।'- संतवचन, 'बरवे साधन सुखशांत मन। क्रोध नाही जाण तीळभरी।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# काशी उमगता

आम्ही सारे काशी यात्रा करतो पण आम्हाला काशी क्षेत्र उमगते का? का आम्हाला क्षेत्रज्ञ विश्वनाथाचे दर्शन होते? हा प्रश्न आहे. मग क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ जर उमगले नाहीत तर संदेहरहित ज्ञान कसे होणार? आमची काशीयात्रा काय प्रकारची असते याचे वर्णन श्रीसमर्थ असे करतात, ***'गेलो काशी विश्वेश्वरा। सेतुबंधरामेश्वरा। परी संशय फिटेना। पूर्वगुण पालटेना।।'*** आम्ही काशीयात्रा केली पण अंत:करणातील संशय हालला नाही, अर्थात सत्य हाताला आले नाही. पूर्वगुणात कोणताही बदल झाला नाही, मायेतील भक्ताला देव दगडाचाच दिसला. मग काशीयात्रा केली याला काय अर्थ? काशी काय आहे, विश्वनाथ काय आहे, हे उमगले तर काशीयात्रेला अर्थ. ज्याने विश्व निर्माण केले व जो विश्वात भरून राहिला आहे असा जगदीश - विश्वनाथ - विश्वेश्वर - विश्वंभर जेथे राहतो त्या क्षेत्राला काशी म्हणतात. ज्याने विश्व निर्माण केले व जो विश्वात भरून राहिला आहे तो विश्वापेक्षा निराळा आहे. टेबल घडविणारा सुतार हा टेबलापेक्षा वेगळा असतो तसेच येथे आहे. ***('अवघी सृष्टी जो कर्ता। तो ते सृष्टीहोनी पर्ता। तेथे संशयाची वार्ता। काढूचि नये।।', 'दृश्यावेगळा दृश्याअंतरी। सर्वात्मा तो सचराचरी। विचार पाहता अंतरी। निश्चयो बाणे।।', 'एवं जगदीश तो वेगळा। जग निर्माण त्याची कळा। तो सर्वामध्ये परी निराळा। असोन सर्वी।।'- श्रीसमर्थ)*** विश्वनाथ विश्वापेक्षा वेगळा आहे मग तो राहतो ते ठिकाण विश्वातील आहे का? तो राहतो ती काशी या विश्वातील नाही. पृथ्वी ही नवखंड आहे तर काशीखंड हे या दृश्यापेक्षा पृथ्वीपेक्षा वेगळे दहावे खंड आहे. विश्वंभर विश्वापेक्षा वेगळा विश्वाला व्यापून आहे. अर्थात काशी ही व्यापकच आहे. काशी ही विश्वापेक्षा वेगळी पण विश्वाला व्यापलेली आहे. या काशीचे स्वरूप जगद्गुरु शंकराचार्य असे सांगतात, ***'काश्यांही काश्यते काशी काशी सर्व प्रकाशिका। सा काशी विदिता येन तेन प्राप्ताही काशिका।।', 'मनोनिवृत्ती परमोपशांती सा काशीवर्या मनकर्णिकाच। ज्ञान प्रवाहा विमलादी गंगा। सा काशिकाहं निजबोधरूपा।।'.*** सर्व विश्वाला प्रकाशी म्हणून तिला काशी म्हणतात. या दहाव्या खंड काशीमुळे विश्व प्रकाशित होते, विश्वाचे ज्ञान होते. सर्व विश्वाला व्यापलेली काशी आपले देहात व्याप्त आहे. देहाचे ज्ञान प्रकाशित या काशीमुळे होते. ही देहातील काशी उमगली तर नामस्मरणाची स्थिती - सहजस्थिती आपणास प्राप्त होते. आपला देह नवद्वाराने नवखंड झाला आहे. या नवद्वारामार्फत होणारे विश्वाचे, देहाचे ज्ञान या दहाव्या खंडाने होते. या नवद्वारांचा निरोध झाला असता दशमद्वार उघडते. आपले शरीरी अनुभवाला येणारे पण शरीरापेक्षा वेगळे हे दशमद्वार हीच पंढरी, काशी आहे. अहो ***'जेव्हा नव्हते चराचर। तेव्हा होते पंढरपूर।।'*** असे ज्या पंढरपूरचे वर्णन करतात ते पंढरपूर आपण समजतो ते नव्हे, हे निश्चित. आपण समजतो ते पंढरपूर, काशी या चराचरातले आहे का नाही? म्हणजे हे पंढरपूर, काशी काही वेगळे आहे का नाही? साधनाभ्यासाने जाणीवेत हे दहावे द्वार गाठले असता तारकमंत्राची प्राप्ती होते. काशीक्षेत्री गुरुपदेश - गुरुनाम प्राप्त होते. गुरुनामाने नामगत - नामस्मरणाची स्थिती - सहजस्थिती प्राप्त होते ***('काया काशी गुरुपदेशी। तारक मंत्र दिला आम्हासी। बापरखुमादेवीवरासी। ध्यान मानसी लागले।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'दाविली गुरुने काशी माझी मजपाशी। मजला पूर्वेहून काढिले। पश्चिमपंथे चालविले। एकवीस स्वर्गावरती नेले मूळतीर्थासी।।'- संत श्रीज्योतीपंत महाभागवत, 'जन डोळा पाहती। काशीखंडाची प्रचिती। नाम जीवासी तारक। शिवापाशी खूण एक।।'- श्रीसमर्थ)***

**

# नामगत

'सोहं तेही अस्तवले' या अवस्थेत इडा, पिंगला, सुषुम्नाकार झाल्यावर, बारा सोळा एकत्र आल्यावर, त्याला चारीवाचेपैल शिवाचे अंतरी असणारे शिवाचे रामनाम - हरीनाम - अनुहताचा गलगा - श्रुत होते. सत्रावीचे अमृतस्त्रावाने मनास आनंद प्राप्त होतो. नादश्रवणी तदाकारता साधून चैतन्याचे वारेच नयनात भरते. दशमद्वार ओलांडल्यावर त्याला सहजदृष्टी, सहजावस्था प्राप्त होते. त्याचा देहभाव नाहीसा होऊन सोहंभाव प्रगट होतो. डोळ्यातील दृश्य नाहीसे होऊन द्रष्टा हाच दृश्य होतो व त्याचे द्रष्टेपण नाहीसे होते. सर्वत्र विष्णुरूप तो अनुभवतो. लक्ष्य मायेत अलक्ष्य होऊन अलक्ष्य चैतन्य लक्ष्य होते. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थेत तो चैतन्याचा अनुभव घेतो. त्याचे अष्टौप्रहर साधन सुरू होते. महाकारणदेही अखंड स्मरण, अखंडअद्वयभजन, अखंड हरीकथा तो अनुभवतो. त्याला काया काशी उमगून नामगत - नामस्मरणाची स्थिती प्राप्त होते. ही सहजस्थिती - सोहंस्थिती - नामगत - मूळस्वभाव, ज्याला ब्रह्माची नित्यता आहे, ते खरे अध्यात्म आहे. ***('ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जेया ब्रह्माची नित्यता असती। तया नाव सुभद्रापती। अध्यात्म गा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्या गतीमुळे ही रामनामाची गत (अवस्था) प्राप्त होते त्या गतीला 'रामनामगती' म्हणतात. ही गती प्राप्त झाली तर रामनाम बोलण्याला अर्थ प्राप्त होतो. आम्ही रामनाम बोलतो पण गतीची प्रचिती नसते. ते स्मरणातील विस्मरणच आहे. देहाच्या जाणीवेत होणारे स्मरण हे स्मरणातले विस्मरणच आहे. ***('रामनामगती देहात प्रचिती। धरोनिया चित्ती राम बोले।।'- श्रीमामामहाराज, 'गती तेचि मुखी नामाचे स्मरण। आणिक विस्मरण अधोगती।।'- संतवचन, 'रामनामाची गती कोण जाणे रे। जाणताती कैलासपती राणे रे।।'- श्रीसमर्थ, 'नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।'- श्रीनाथमहाराज)*** रामनामाची गती ही सद्गती आहे. ती नाही प्राप्त झाली तर सारी अधोगतीच आहे. सद्गती प्राप्त झाल्यावर साक्षात्काराने उद्धार हा ठरलेला आहे. ***('सद्गती झालिया सहज साक्षात्कार। होईल उद्धार पूर्वजांचा।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अखिल विश्वाला एक गती आहे. एक गती आहे म्हणून विश्व स्थिर वाटते. नाहीतर ते अस्थिर आहे. ***('स्थिरविल्ल संसार' - भगवान सद्गुरू निंबरगीकरमहाराज)*** 'गतीमुळे विश्व भासमान होते आहे. गतीमुळे पदार्थ आहे म्हणून पदार्थाला गती आहे' असे श्रीदासराममहाराज सांगत. हे सारे पटण्यासाठी श्रीदासराममहाराज उपनिषदकाळातील एक गोष्ट सांगत ती गोष्ट अशी - गुरुजींच्या हातात एक स्फुल्लींग - जळते कोलीत होते. ते जळते कोलीत ते गतीने फिरवीत होते. गुरुजींनी मुलांना विचारले, 'माझ्या हातात काय आहे?' मुले 'चक्षुर्वे सत्यम्' या न्यायाने सोन्याचे कडे तुमच्या हातात आहे असे म्हणाली. गुरुजींनी हात स्थिर केला व परत विचारले, 'माझ्या हातात काय आहे?' मुले म्हणाली 'स्फुल्लींग आहे'. गतीमुळे भासमान होणारे सोन्याचे कडे हात स्थिर केल्यावर नाहीसे झाले व सत्य स्फुल्लींग प्रतीत झाले. तद्वत आपण जर मनाने अंतरी निश्चळ झालो तर सत्य प्रतीत होणार आहे. चंचळ मनात येणाऱ्या चंचळ विचाराने हे विश्व भासमान होते आहे - माया प्रतीत होते आहे. निर्विकल्प अवस्थेत मन स्थिर-एकाग्र-झाल्यावर सत्य प्रतित होणार आहे. हे सत्य ज्या विचाराने प्रतीत होते तो विचार म्हणजे नामाचा विचार - बरवा विचार - शुद्ध कल्पना. हा नामाचा विचार हीच 'काशी' आहे. संत श्रीकेशवस्वामी म्हणतात, ***'विचार काशी केली रे। सर्वही माया गेली रे।। पावन झालो आम्ही रे। स्थिरावलो निजधामी रे।। अनुभव गंगेमाझारी। मज्जन घडले निर्धारी।। त्रिपुटी ग्रासुनी शिव पाहे। म्हणे केशव अद्वयपदी राहे।।'***

**

# शिवरात्र

शिवरात्र व्रत यथाविधी - विधीवत व्हावयास हवे. शिवरात्री दिवशी मनोभावे यथासांग शिवलिंगाची पूजा व्हावयास हवी. मग तशी रोजच बिल्वदल अर्पून साग्रसंगीत शिवलिंगाची पूजा करतोच की. आता तर आम्ही सोन्याचे बिल्वपत्र करून घेतले आहे त्यामुळे काहीच प्रश्न नाही. अहो आत्मलिंगाची - गुरुलिंगाची मनोभावे नासाविधीने पूजा व्हावयास हवी. त्रिगुणात्मक मन ही बेलपत्री आत्मलिंगास समर्पण व्हावयास हवी. गुरुलिंगाला ध्यानामृताने अभिषेक व्हावयास हवा. शरीरभाव - द्वैतभाव त्याचे चरणी अर्पण व्हावयास हवा, तरच सोहंभाव - एकभाव प्रगट होणार, नयनी शिव भरणार. ***('मन बेलपत्री केली। आत्मलिंगा समर्पिली।।'- संत मुक्ताबाई, 'का चैतन्याचिये पोवळी। माजी आनंदाचिये राऊळी। श्रीगुरुलिंगा ढाळी। ध्यानामृत।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'शिवरात्र व्रत करा यथाविधी। भावे पूजा आधी शिवलिंग।।'- श्रीनाथमहाराज, 'शिव भरला शिव भरला। नयनी भरलाची भरभरला।। सोहंभावे स्मरला स्मरला नाहीच की विस्मरला।।'- संत शिवदीनी)*** गुरुकृपेने साधनाभ्यासाने काशीक्षेत्री नामाच्या गतीने नामाची गत प्राप्त होते. ॐ नम:शिवाय या तारकमंत्राचे नादश्रवणी तदाकारता साधते व नयनात चैतन्याचे वारे भरू लागते. नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती येते. श्रवणात पेरलेले नयनात उगवते. नामाचाच बिंदू घडतो. तारकबिंदू अनुभवाला येणे म्हणजेच शंकराचा, सदाशिवाचा अनुभव येणे होय. ***('सदाशिव तो बिंदूरूपे पहावा। मना राम तो अंतरी साठवावा।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, 'हृदयात झाली वायुची धासणी। कंठात उदेला ओंकार वन्ही। नामाचा बिंदू घडला गे माये। अंतर बाहेर प्रकाशे स्वये।।'- श्रीदासराममहाराज, 'नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।'- श्रीतुकाराममहाराज, 'श्रवणात पेरणी केली पेरणी केली। ती नयन उजेडा आली।।'- श्रीमहिपतीमहाराज)*** हा बिंदू हे गुरुलिंग किती लखलखीत असते याचे वर्णन श्रीगुरुलिंगगीता असे करते, ***'ॐ नम: शिवाय ॐ नम: शिवाय ॐ नम:शिवाय ॐ नामा।। सुवर्णन सिद्धलींग सुवर्णन गुरुलींग। गुरुलींगजंगम ॐ नामा।।'*** तर हे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***'तैसे दिव्यसूर्य सहस्रवरी। जरी उदयजती का एकेची अवसरी। तरी तया तेजाची थोरी। उपमू नये।।'.*** हा नवलप्रकाशाचा शिवाचा साक्षात्कार अंधारातच होतो, रात्रीच होतो. शिवाचा अनुभव देणारी रात्र म्हणून शिवरात्र. चंद्रसूर्य लोपल्यावरच रात्री राजससुकुमार मदनाचा पुतळा प्रगट होतो. ***('गपकन अंधार पडला बाई। झपकन उजाडले। चंद्रसूर्य नस्ता तेथे तेज प्रकाशले।। गुंग मला केले गुरुने गुंग मला केले। एकाएकी भुरळ घालोनी माझे मीपण नेले।।'- संतवचन, 'राजससुकुमार मदनाचा पुतळा। रवीशशी कळा लोपलिया।।'- संतवचन, 'वेद जेथे मुके जाले। मन पवन पांगुळले। रातीवीण मावळले। रवीशशी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जोवर विपरीतज्ञान (देहाचे, विश्वाचे आकारज्ञान) हेच आम्हास खरे ज्ञान वाटते, तोवर खरे ज्ञान आम्हास होत नाही. विपरीत ज्ञान नाहीसे होऊन अज्ञान प्रगट झाले तरच अज्ञानाचे ज्ञान होऊ शकते. माझे ठिकाणी अज्ञान आहे याचे ज्ञान असणे हीच खऱ्या ज्ञानाची सुरुवात आहे. कोऱ्या कागदावरच अक्षरे उमटतात. चितारलेल्या कागदावर अक्षरे उमटत नाहीत. अंधारातच उजेड दिसतो व मनाला हर्ष होतो.

**

# नाते

मूळ परब्रह्माचे ठिकाणी 'मी' म्हणावयास कोणी नसताना अहंची - मीची जाणीव निर्माण झाली, चंचळपणा निर्माण झाला. हे वायुरूप चांचल्य ही शक्ती - मूळप्रकृती असून त्या ठिकाणी असणारी जाणीव हा शिव आहे - पुरुष आहे. ***('स्वरूप निर्विकल्प पूर्ण। ते 'मी' म्हणावया म्हणते कोण। ऐसेही ठायी स्फुरे मीपण। ते मुख्यत्वे जाण मूळमाया।।'- श्रीनाथमहाराज, 'मी परब्रह्म येणे आकारे। ज्ञानस्वरूपी स्फुर्ती स्फुरे। ते वोळखावी चातुरे। महामाया।।'- संत मुकुंदराज, 'अहंपणे जाणीव जाली। तेचि मूळप्रकृती बोलिली। महाकारणकाया रचली। ब्रह्मांडीची।।', 'तयामध्ये जाणीवकळा। जगज्ज्योतीचा जिव्हाळा। वायो जाणीव मिळोन मेळा। मूळमाया बोलिजे।।'- श्रीसमर्थ)*** या प्रकृतीपुरुषापासून - मूळमायेपासून अष्टधाप्रकृतीची (दृश्याची) निर्मिती झाली आहे. सारे कर्तृत्व वायुरूप प्रकृतीचे असून जाणीवेमुळे कर्तृत्वाचे महत्त्व आहे. पुरुषाची इच्छा ही प्रकृती असून प्रकृतीवरून पुरुष व्यक्त होतो. ***('प्रकृती पुरुष दोन्ही। उपजले जयाचिया मनी। तो पितामह त्रिभुवनी। विश्वाचा मी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मूळमायेपासून सेवटवरी। वायोची सकळ काही करी। वायोवेगळे कर्तृत्व चतुरी। मज निरोपावे।।', 'पुरुष इच्छेमध्ये प्रकृती। प्रकृतीमध्ये पुरुष व्यक्ती। प्रकृतीपुरुष बोलती। येणे न्याये।।'- श्रीसमर्थ)*** या शिवशक्तीचे म्हणजे प्रकृतीपुरुषाचे नाते नेमके काय आहे हे उलगडून दाखविणारा प्रसंग महाशिवरात्रीदिवशी कैलासावर घडला. त्याचे वर्णन श्रीतुकाराममहाराजांनी त्यांचे अभंगात केले आहे, तो अभंग असा, ***'पार्वतीवर नमिला म्या शिवशंकर। शंभू कैलासशिखरी। पार्वती आदीमायासुंदरी। बैसुनी शंकराचे शेजारी। जोडून कर नमीला।। गिरीजा पुसे शंकरासी। तरी मी काय होय तुम्हासी। शंकर म्हणे माता होशी। मी तुझा कुमर। ऐकूनी बोलिली गिरीजा। मी तरी तुमची आत्मजा। तुम्ही पिता शंभुराजा। माझे माहेर।। बोलिला नंदी ते अवसरी। ऐका म्हणे त्रिपुरारी। गिरीजा शंकराची अंतुरी। तुम्ही भ्रतार। बोलिले मग स्वामी कार्तिक। नंदी तुम्हासी काय ठाऊक। गिरीजा भाची बहिणीची लेक। भाचरु थोर।। बोले वीरभद्र आपण। तुम्ही लबाड चौघेजण। गिरीजा शंकराची बहीण। नाते साचार।। ब्रह्मा विष्णू त्रिनयन। हे काय होती तिघेजण। तुका म्हणे द्यावे निवडून। तुम्ही चतुर।।'*** या अभंगाचे आधारे शंकर पार्वतीचे नाते विविध प्रकाराने श्रीदासराममहाराज उलगडून दाखवीत. ते असे, 'गिरीजा पार्वती - चित्कळा शंकर-शं करोती इती शंकर, पार्वतीचा मुलगा शंकर - चित्कळेपासून तमोगुणी अनुहाताचा नाद म्हणजे नादमयी शिवस्वरूप, शंकराची मुलगी पार्वती - शिवात्म्यापासून चित्कळेचा जन्म, शंकराची बायको पार्वती - ब्रह्म, शुद्धात्मिका माया, पार्वती शंकराची भाची - भावरूपी शंकराची बहीण भक्ती, तिच्या पोटी चित्कळा साक्षात्काराला म्हणून येते. ती जी साक्षात्कारस्थिती ते भाचरु. शंकराची बहीण पार्वती - ब्रह्मरूपातून शिवशक्तीचा जन्म. चित्कळेबद्दल अधिक माहिती श्रीदासराममहाराज त्यांचे अभंगात सांगतात, ***'तेथे हे चित्कळा सतरावीची कोर। जेथे सूर्यचंद्र मावळती।।', 'चित्कळा ते लाट चैतन्यसागरी। प्रकाशाभीतरी कोर देखे।।', 'चित्कळा ते देखे शिवाचे मस्तकी। आदीशक्ती सुखी होय जेथे।।', 'चित्कळा देखिल्या नुरे देहभान। आटले गगन नामामाजी।।', 'सुषुप्तीचे देखे अधिष्ठान आत्मा। दावितसे समा चित्कळाते।।', 'जीवना आधार देखिजे चित्कळा। समत्वे जिव्हाळा दावितसे।।','मनोन्मन होण्या चित्कळा कारण। दासराम शरण तेथे झाला।।', 'देखे सोहंभाव कैचा वायुरूप। सद्गुरुस्वरूप सर्वाधटी। अग्निस्थानी मिळे चैतन्य चित्कळा। प्रकाश उजाळा ब्रह्मांडासी।।'***

**

# हिशोब

जिथे देणे घेणे असते तेथे हिशोब हा ओघाने आलाच. आपण येणे लक्षात ठेवतो पण देणे विसरतो. आपण मार्गी व्हायच्या आधी का होईना साकीबाकी देऊन टाकावी म्हणजे मागाहून काही भानगड राहात नाही. संतमहात्मे साकीबाकी देऊनच मार्गी होतात. आम्ही मार्गी होतो पण साकीबाकी तशीच शिल्लक असते. ती देण्याकरता आम्हास पुन्हा इहलोकी यावे लागते. ज्यांचे देणे घेणे हा व्यवहार आधीच संपलेला असतो त्यांचे येणेही नसते व देणेही नसते. ते कधीही मार्गी व्हायला मोकळे असतात. आम्ही लटक्या व्यवहारात - संसारात गुंतून पडतो त्यामुळे आम्ही मार्गी होताना मोकळे असत नाही. शेवटपर्यंत कामात. ***('देऊनी साकीबाकी तुका मार्गी झाला। पदर दिधला माळणीसी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।' - संतवचन)*** देहाच्या गावाला आल्याने संसाराच्या परिभ्रमणामुळे सुखदुःख, पापपुण्य, स्वर्गनर्क आदी द्वंद्वे अनुभवाला येतात. म्हणून हिशोब ठेवावा लागतो. ***('देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्युचिया सोहळिया। ना म्हणू नये धनंजया। जियापरी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण पृथ्वीवर आहोत तोवर पृथ्वीच्या सूर्याभोवती होणाऱ्या परिभ्रमणामुळे दिवस-रात्र हे अनुभवाला येणारच. समजा आपण सूर्यलोकाला गेलो तर तेथे दिवस-रात्र असेल का? तेथे दिवसरात्र हे शब्दच माहीत असणार नाहीत. ***('रात्र आणि दिवो। हा तवची द्वैतभावो। जव न रिगीजे गावो। गभस्तीचा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्या देहभावाने हे द्वैत अनुभवाला येते तो देहभाव - शरीरभाव नाहीसा होऊन जर सोहंभाव प्रगट झाला, आपण जर आत्म्याच्या गावात - देवाच्या गावात - संतांच्या गावात गेलो तर हे जन्ममरण, पापपुण्य आदी द्वंद्वे अनुभवाला येणार नाहीत. आपण शिवरूप आहोत हे अनुभवाला येऊन कोणतीही संसाराची चिंता राहणार नाही. ***('तै शरीरभाव नासती। इंद्रिये विषय विसरती। जै सोहंभाव प्रतिती। प्रगट होय।।', 'म्हणौनि तू आणि आम्ही। हे दिसताहे देहधर्मी। मग ययाच्या विरामी। मीचि होसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'देहचि होऊनी राहिजे। तेणे देहदुःख साहिजे। देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।।'- श्रीसमर्थ, 'चिंतीयाकमाडिसी। शिवने इद्दा नेरुप्राणी।'- भगवान सद्गुरू निंबरगीकरमहाराज)*** अशा तऱ्हेने जाणत्याला जाणल्यावर अखंड जाणीवेने जाणीवेचा ग्रास होतो. तो जाणीवरहित जाणता होतो. तो वृत्तीरहित ज्ञानी होऊन पूर्ण समाधानी होतो. तो शिवस्वरूप होतो. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती। ते ऐसी आहे।।'- श्रीसमर्थ)*** एकदा वृत्ती तद्रूप झाली की ती पुन्हा मायाजाळात सापडत नाही. ***('लवण जैसे पुन्हा जळाचे बाहेर। येत नाही खरे त्यातुनिया।। त्यासारखी जाण। तुम्ही साधुवृत्ती। पुन्हा न मिळती मायाजाळ।। मायाजाळ त्याला पुन्हा रे बाधेना। सत्य सत्य जाणा तुका म्हणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** पण हे जीवाशिवाचे ऐक्य आमचे बाबतीत होणार कसे? एक गुरुकृपा झाली तरच हे शक्य आहे. ***('हे असो दिठी जयावरी झळके। की पद्मकरू माथा पारुखे। तो जीवची परी तुके। महेशेसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञान अंधार निरसी। जीवात्मयासी शिवात्मयासी। ऐक्यता करी।।'- श्रीसमर्थ)***

**

## फाल्गुन शुद्ध

***संसारनगरी व्यवहार कळा। गुरुनामी आगळा आपण देव।।१।।***
***सुखस्थानी जाणे हेचि बरी गोष्टी। खुणेवीण कष्टी विठोबाच्या।।२।।***
***आत तरी बाह्य मनोजये विजय। देव देव पाय तरीच सोय।।३।।***
***शेवट नरदेह साधी सीमगान। तमासा पाहून दास म्हणे।।४।।***

१) जगाच्या जाणीवेने हरीच्या जाणीवेशिवाय होणारी वाया येरझार म्हणजे लटिका व्यवहार - संसार - असून आत्मप्रत्ययाने लटिक्या व्यवहाराचे रूपांतर उत्तम व्यवहारात - परमार्थात - झाले तर गुरुनामाचे अनुभवाने आपण व देव यातील भेद नाहीसा होणार.

२) अखंड सुख ज्यापाशी आहे असा सर्वसुखाचा आगर परमात्मा आत्मविठ्ठल जेथे राहतो ते पंढरपूर हेच सुखस्थान असून तेथे आपण गेलो तरच प्राप्त होणाऱ्या विठ्ठलाच्या अनुभवखुणांनी सारे कष्ट नाहीसे होणार.

३) आपल्या आत - मनात जे कामक्रोध आहेत तेच आपण बाहेर जागृतीत, स्वप्नात अनुभवतो. मनोलयाने कल्पना सरल्यावर आत सत्य कल्पक आत्मा प्रत्ययाला आला तर अंतर्बाह्य देवाची प्राप्ती होऊन खरी सोय होणार.

४) दृश्य आणि देव यांच्या सीमेवर शून्यावस्थेत सीमगान (नाद), प्रकाशरूप तमाशा - दृश्याचा अनुभव प्राप्त झाला तर मनोलयाने परमार्थ पूर्ण होऊन हा नरदेह अखेरचा ठरणार.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने फाल्गुन महिन्याचे पहिल्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## फाल्गुन वद्य

***स्वरूप पाहणे बीज उमगणे। अबोल बोलणे सदा वाचे।।१।।***
***रंग उन्मनीचा एका भावे त्याचा। कलीत नामाचा घोष श्रेष्ठ।।२।।***
***डोळीयाचा डोळा उघडोनी जागा। पूजनात वागा चतुर्वीध।।३।।***
***दास सर्वकाळ साधनी रहाता। शेवट तो स्वत: देव होय।।४।।***

१) सदा सर्वकाळ असणाऱ्या स्वरूपाची जाणीव सदा असणे म्हणजे सदावाचेने अबोल बोलणे होय. चराचराचे मूळ असे जे शुद्ध निर्मळस्वरूप आहे तेच आपण आहोत हे जाणणे म्हणजे स्वरूप पाहणे होय.

२) कलहात द्वैतात श्रेष्ठ अद्वैतानुसंधान जर साधले तर एका भावाने उन्मनीचा रंग अनुभवाला येतो.

३) देव दाखविणारा चैतन्याचा, डोळीयाचा डोळा ज्यांचा उघडला आहे असे जागृत सर्वकाळ देवाची चार प्रकारे पूजा करतात. ते प्रकार १)मूर्तीपूजा २) मानसपूजा ३) ध्यानधारणा ४) सहजपूजा

४) असे सर्वकाळ भजन पूजन जो साधनाभ्यासाने साधतो तो शेवटी देवच होऊन जातो.

हा सारा विषय माझ्या आकलनाप्रमाणे विस्ताराने फाल्गुन महिन्याचे दुसऱ्या पंधरवड्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# संसारनगरी

आत्मस्वरूपाला विसरल्याने ज्या जन्ममरणाच्या चक्रात आपण सापडलो आहोत त्याला भव किंवा संसार म्हणतात. ***(‘आत्मस्वरूपा विसरूनी आम्ही भवचक्री फिरलो।’ - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** संसार म्हणजे काय हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***‘संसार म्हणजे सवेच स्वार। नाही मरणासी उधार। मापी लागले शरीर। घडीने घडी।।’*** तर जगद्गुरु शंकराचार्य या संसाराचे वर्णन असे करतात, ***‘पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनं। इह संसारे।।’*** मूळ परब्रह्माचे ठिकाणी कल्पनेने प्रकृती पुरुष निर्माण झाले व त्यांनी त्रिगुणात्मक कल्पनेने हा विश्वाचा पसारा म्हणजे अवघा संसार निर्माण केला. म्हणजे मूळ परब्रह्माचे दृष्टीने हा संसार म्हणजे स्वप्नी स्वप्नाचा विचार आहे. श्रीसमर्थ सांगतात, ***‘स्वप्नी स्वप्नाचा विचार। तो तू जाण संसार। येथे तुवा सारासार। विचार केला।।’.*** कल्पनेने जाणवणारा हा साकार संसार कल्पनेच्या निरासाबरोबर नाहीसा होणारा आहे. अर्थात हा संसार क्षणभंगूर आहे. मनोलय साधला असता या साकार विश्वाची - दृश्याची जाणीव होत नाही. म्हणून हा सारा कल्पनेने भासमान होणारा संसार स्वप्नवत मानला जातो. श्रीजगद्गुरु शंकराचार्य सांगतात, ***‘संसार स्वप्नसंकाशं यौवनं कुसुमोपमं विद्युच्चलमिवायुष्यं तस्माज्जागृही जागृही।।’*** हाच संसाराचा क्षणभंगूरपणा संत मुक्ताबाई असा सांगतात, ***‘क्षणभंगूर संसार याचा भरवसा नाही। नरतनू गेल्या बारे मग तू पडशील पस्ताई।।’.*** या संसारनगरात जी जाणीव होते ती दुसऱ्याची - द्वैताची - आकाराची. संसाराच्या - संसरणाच्या गोष्टी सुटत नाहीत तोवर आत्म्याची जाणीव होत नाही. साहजिकच संसरणाने जे आपल्यापेक्षा वेगळे आहे, जे आपल्यापाशी नाही, त्याची इच्छा होते. प्रारब्धाने ते प्राप्त झाले तर तात्कालिक भासमान सुख होते व ते सुख आणखी हवे या हव्यासाने परत दुःख, जर प्राप्त झाले नाही तर दुःखाने क्रोध व क्रोधाने परत दुःखच. संसरणामुळे - संसारामुळे - जन्ममरण या क्रियेने - द्वैताची जाणीव होते. द्वैताच्या जाणीवेने वासना, वासनेने पुन्हा जन्ममरण हा संसार. कामक्रोधलोभाने संसाराच्या बाजारातून आपली सुटका होत नाही. श्रीनाथमहाराज या संसारानगरातील मायावी बाजाराचे असारपण असे सांगतात, ***‘संसारनगरी बाजार भरला भाई। कामक्रोध लोभ याचे गिऱ्हाईक पाही।। या बाजारी सुख नाही भाई। माझे माझे म्हणूनी वोझे वाही।। एका जनार्दनी बाजार लटका। संतसंगावाचुनी नोहे सुटका।।’.*** जन्ममरण हा संसार वासनेमुळे प्राप्त होतो. म्हणून संसार स्त्रीबरोबर नाही तर तो वासनेबरोबर असतो. वासना हीच खरी बायको. चैतन्याच्या विसराने या जगाची जाणीव होते. जगाच्या जाणीवेने संसरण हा संसार. चैतन्यामुळे जगाची जाणीव होते पण जगाच्या जाणीवेने चैतन्याची जाणीव कधीच होत नाही. खरे सुख जे आहे ते चैतन्याच्या जाणीवेत आहे. संसारात चैतन्याची जाणीव - रामाची जाणीव - होत नसल्याने संसारात सुख अजिबात होत नाही. ‘संसारात सुख नाही हे समजण्यात सुख आहे’ हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे. या संसारात होणारा जन्म हेच दुःखाचे कारण आहे. विषयातून प्राप्त होणाऱ्या - द्वैतातून प्राप्त होणाऱ्या - साधनातून प्राप्त होणाऱ्या सुखाला संतमहात्मे खरे सुख मानीत नाहीत. ***(‘संसाराचे गावी। सुख अणुमात्र नाही।।’ - श्रीमामामहाराज, ‘जन्म अवघा दुःखमूळ। लागती दुःखाचे इंगळ।।’ - श्रीसमर्थ, ‘विषयभोगी जे सुख। ते साद्यंतची जाण दुःख।।’ - श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘जन्म दुःखं जरा दुःखं जाया दुःखं पुनःपुनः। संसारसागरे दुःखं तस्माज्जागृही जागृही।।’ - श्रीजगद्गुरु शंकराचार्य, ‘जन्माचे ते मूळ पाहिले शोधून। दुःखासी कारण जन्म घ्यावा।।’ - श्रीतुकाराममहाराज)*** विषयाशी मन एकाग्र झाले असता क्षणैक होणाऱ्या चैतन्याच्या जाणीवेतून होणारे क्षणैक सुख हे खरे सुख नव्हे. हे क्षणैक सुख होणेसाठी पर्वताएवढे दुःख सोसावे लागते. दुःख हलके होणे म्हणजे सुख असे आपण मानतो ते खरे सुख नव्हे, तो सुखाचा आभास आहे.

**

# संसारनगरी

एकट्या क्षेत्रज्ञाचे अधिष्ठानावर छत्तीस तत्त्वे एकत्र आली. या छत्तीस तत्त्वांचे समूहाला 'क्षेत्र' असे संबोधले जाते. हे छत्तीस तत्त्वांचे क्षेत्र व क्षेत्रज्ञ एकमेकांचे कक्षेत आल्याने या जगाची निर्मिती झाली. जन्माला येणारे आणि गमन करणारे जग निर्माण झाले. क्षेत्रज्ञाचे ठिकाणी स्वत:ची जाणीव नाहीशी होऊन क्षेत्राची जाणीव निर्माण झाल्याने त्याचेमागे संसरण हा संसार लागला. या क्षेत्राची जाणीव असणाऱ्या क्षेत्रज्ञाला 'आत्मा' हे नामाभिधान प्राप्त झाले. जाणीवरूपाने - ज्ञानरूपाने- आत्मा या जगात सर्वत्र भरून राहिला आहे. या जाणीवेमुळे असणारे संसरण (सोहं ही क्रिया) हेही जगात सर्वत्र भरून राहिले आहे. ***('तैसी छत्तीसही इये तत्वे। मिळती जेणे एकत्वे। तेणे समुहपरत्वे। क्षेत्र म्हणिजे।।', 'जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगे। होइजे येणे जगे। आत्मा गुणसंगे। संसारिया।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आत्मयाचे नाना गुण। ब्रह्म निर्विकार निर्गुण। जाणणे एकदेशी पूर्ण। गुण आत्मयाचे।।', 'धरीता सो सांडिता हं। अखंड चाले सोहं सोहं। याचा विचार पाहता। बहू विस्तारला।।'- श्रीसमर्थ)*** क्षेत्राच्या जाणीवेने असणारे हे संसरण - श्वासोच्छ्वास - सोहं - म्हणजेच मायावशे भासणारे जन्ममरण आहे. हे जन्ममरण - श्वासोच्छ्वास- हाच जीवाचे मागे लागलेला संसार आहे. क्षेत्राच्या जाणीवेने कामक्रोध हे कर्म व वासनेमुळे (कामामुळे) पुन: जन्ममरण ही क्रिया. साधनाभ्यासाने कामक्रोधावर जर मात करता आली तर वासनेमुळे प्राप्त होणारी जन्ममरण ही क्रिया थांबते. सोहं तेही अस्तवते व जन्ममरणरहित मध्यस्थिती - जीवन प्राप्त होते. संसरणामध्ये - संसारामध्ये अविनाशी नामाचा अनुभव प्राप्त होतो. या सूत्राच्या मध्यभागाच्या आधारे - सगुणाचे आधारे - निर्गुणाचा संग होणारा आहे. श्रीपंतमहाराज या संसार सुत्राच्या मध्यभागाचे महत्त्व असे सांगतात, ***'आरंभ नाही शेवट कैचा मध्यस्थितीला भुलू नको। संसारामधी एकही पाऊल अनुभवावीण टाकू नको।। जन्मा येऊनी पंचविषयासाठी निशीदिनी झुरू नको। अज्ञानामध्ये दु:ख भोगोनी व्यर्थ पशुवत मरू नको।। गुरुवीण अन्य दैवत नाही कल्पीत देवा पुजू नको। सद्‌गुरु आत्मा तुझा तुची बोध मनीचा सोडू नको।। वेदशास्त्राची भीड धरूनी संशयरानी फिरू नको। स्वानुभव सिध्दांत दत्ताचा ध्यानी धरी कधी विसरू नको।।'.*** तर संत श्रीमुक्ताबाई या मध्यस्थितीचे महत्त्व असे सांगतात, ***'कामक्रोध सर्व कर्म दंडिले बळे। सुत्र धरूनी मध्यभागी वरी चालिले। निर्गुणाचा संग मला आजी जहाला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला।।'.*** मनोवृत्तीचा निरोध होऊन कामक्रोध अभिमानरहित अवस्था प्राप्त होणे म्हणजे कर्माला अकर्माची मोहोर बसून संसाराचा दरारा नाहीसा होणे म्हणजे रामनामाचा उच्चार आहे. मनाचा प्राणापानाचे ठिकाणी लय झाला असता संसरण हा संसार सुटतो. साहजिकच देहाची - दृश्याची जाणीव नाहीशी होऊन आत्म्याची - द्रष्ट्याची जाणीव होते. आत्म्याच्या जाणीवेत होणारे जप, तप, साधन, तीर्थयात्रा यांना अर्थ प्राप्त होतो. देहाच्या जाणीवेत होणारे जप, तप, साधन, तीर्थयात्रा फलदायी ठरत नाहीत. ***('जन्ममरणाचे पैल। एक आत्मा घननीळ।।'- श्रीदासराममहाराज, 'आत्माची कळला नाही जप तप साधन तीर्थे खोटी गे। ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।', 'सोहं तेही अस्तवले। जेथ सांगतेचि सांगणे जाले। द्रष्टत्वेसी गेले। दृश्य जेथ।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सोहं हंसाची बोळवण। न करताची जहाली जाण। येणे पळाले जन्ममरण। शुन्य पडले संसारा।।'- श्रीनाथमहाराज)*** खरा कर्ता कळल्याने कर्तृत्वाचा अहंकार नाहीसा झाला असता संसारच ब्रह्मरूप होतो. ***('एकची मीपणे नागविले घर। ना तरी संसार ब्रह्मरूप।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# व्यवहारकळा

प्राणाचा व्यवहार आहे म्हणून देहाचा, मनाचा व्यवहार होतो. प्राणाचा व्यवहार थांबला की देहाचे, मनाचे व्यवहार थांबलेच. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'प्राण गेलिया शरीर। काय करील व्यवहार।।'.*** शरीराचे व्यवहार व मनाचे व्यवहार चालू असताना (जागृतीत), शरीराचे व्यवहार थांबून मनाचे व्यवहार चालू असताना (स्वप्नात), प्राणाचा व्यवहार सुरू असतोच. पण जेव्हा देहाचे, मनाचे व्यवहार संपूर्णपणे थांबलेले असतात (निद्रावस्थेत) तेव्हासुद्धा प्राणाचा व्यवहार सुरू असतो. या प्राणाला - संसरणाला - जन्ममरण या क्रियेला - विश्रांती मिळेल असा आपला व्यवहार हवा. ***('हंसावरती राम बैसोनी चालिले हो पुढती। हंस कसा मग उड्डाण करतो खाली आणि वरती।। खाली येता सर्व उडतसे कोण जाणे गती। प्राणी निजला तरी हंस हा न सोडी निजस्थिती।।' - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस)*** प्रत्येक व्यवहार करताना या श्वसनक्रियेचे - संसरणाचे - जन्ममरण या क्रियेचे अनुसंधान हवे. अगदी झोपेतसुद्धा हे अनुसंधान हवे. देहाच्या कोणत्याही अवस्थेत हे अनुसंधान सुटता कामा नये. हे साधण्याकरता जे करावे लागते तेच आपले चिमडसंप्रदायाचे साधन आहे. व्यवहार करताना जर अखंड स्मरण असेल तर अखंड जीवन प्राप्त होऊन जन्ममरण ही क्रिया तेथे उरत नाही. ***('अखंड जीवन अखंड स्मरण। जेथे जन्ममरण नाही नाही।।'- श्रीदासराममहाराज)*** प्राणापानाचे ठिकाणी जर मनोलय साधला तर हे अखंड स्मरण अखंड जीवनात प्राप्त होणारे आहे. जन्ममरण चुकविणाऱ्या या अनुसंधानातील होणाऱ्या व्यवहाराला पुण्यकर्म म्हणतात. 'आत्मप्रकाश पाहात जर व्यवहार घडला तर त्या व्यवहारातही साधकाला बरकत येते' असे भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराज सांगत. असा नीट चांगला सरळ व्यवहार जर आपले हातून घडला तर व्यवहार करून परमेश्वर भेटणार आहे. हरीच्या प्रत्ययाशिवाय लटका व्यवहार (संसार) करून देव कसा भेटणार? या लटक्या व्यवहाराचा शेवट झाला तर 'अपूर्व असा', 'वार्ता नाही जन्ममृत्यूची' असा परमार्थ साधणार. ***('लटीका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीण।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'व्यवहाराचा शेवट परमार्थाची आठवण। मागील तो धागा आता करा संपूर्ण।।'- संतवचन, 'नीट न घडे व्यवहार। कैचा भेटावा ईश्वर।।'- श्रीदासराममहाराज)*** ज्यांचा व्यवहार उत्तम असतो त्यांना (परम) अर्थ प्राप्त होतो. म्हणून उत्तम व्यवहाराने (परम) अर्थ प्राप्त करावा व परलोकीचा निजस्वार्थ साधावा. ***('जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** स: अहं अहं स: या गुरुचरणाची लटक जर आपणास लागली तर हा पंचमहाभूतांचा विस्तार (माया) स्वप्नवत होऊन लटका असणारा व्यवहार-हरीच्या प्रत्ययाशिवाय होणारी वाया येरझार - नाहीशी होऊन आत्मप्रत्यय येणारा आहे. येरझार प्रत्यय घेऊन येणारी होणार आहे. आत्मप्रत्ययाने हा व्यवहार कोण करते याची जाणीव होणारी आहे. व्यवहार करताना 'राम कर्ता आहे' हे जर जाणवले तर त्याला व्यवहार म्हणता येईल का? व्यवहारातील व्यवहार संपून व्यवहाराचा शेवट होऊन व्यवहाराने (परम) अर्थ प्राप्त होणार आहे. आपला व्यवहारच परमार्थ होणार आहे. अहर्निशी परमार्थ होणार आहे. संतांचा व्यवहारच परमार्थ कसा झाला हे दाखविणारा संतसेनामहाराजांचा अभंग असा, ***'आम्ही वारीक वारीक। करू हजामत बारीक।। विवेक दर्पण आयना दाऊ। वैराग्य चिमटा हालवू।। उदकशांती डोई घोळू। अहंकाराची शेंडी पिळू।। भावार्थाच्या बगळा झाडू। कामक्रोध नखे काढू।। चौ वर्णा देऊनी हात। सेना राहिला निवांत।।'*** तर संत नरहरी सोनारांचा अभंग असा, ***'देवा तुझा मी सोनार। तुझे नामाचा व्यवहार।। देह बागेसरी जाणे। अंतरात्मा नाम सोने।। त्रिगुणाची करूनी मुस। आत ओतीला ब्रह्मरस।। जीवशिव करूनी फुंकी। रात्रंदिवस ठोकाठोकी।। विवेक हातवडा घेऊन। कामक्रोध केला चूर्ण।। मनबुद्धीची कातरी। रामनाम सोने चोरी।। ज्ञान ताजवा घेऊनी हाती। दोन्ही अक्षरे जोखिती।। खांद्या वाहोनी पोतडी। उतराल पैलथडी।। नरहरी सोनार हरीचा दास। भजन करी रात्रंदिवस।।'***

**

# गुरुनाम

ज्यायोगे जीव हा संसारातून निराळा होतो व देवरूप होतो त्याला गुरुनाम असे म्हणतात. गुरुनाम म्हणजे श्रीगुरुंनी सांगितलेले नाम. श्रीगुरुंनी सांगितल्याप्रमाणे (त्या पद्धतीने) नामस्मरण करणे हे येथे अपेक्षित आहे. श्रीमामामहाराज सांगतात, ***'गुरु आज्ञा करीती जैसी। आचरणी ठेवी तैसी।।'*** श्रीगुरुंनी सांगितल्याप्रमाणे जर नामस्मरण आपण केले तर उद्धार हा ठरलेला आहे. ***('गुरुनामी खरी सोय। जड जीवा तरणोपाय।।'- श्रीमामामहाराज, 'गुरुचे नाम घेता वाचे। कैवल्यमुक्ती तेथे नाचे।।'- श्रीनाथमहाराज, 'गुरुरायाचे नाम सार सेवी। चित्त गुरुपदांबुजी ठेवी। मग काळाचे भय तुला नाही। गुरुकृपे तरशील पाही।।' - संत आनंदमूर्ती)*** गुरुनाम म्हणजे गुरुंचे नाव. आपली जर श्रीमहाराजांवर श्रद्धा असेल तर श्रीमहाराजांचे नाव जरी आपण जपले तरी आपला उद्धार होणारा आहे. श्रीदासराममहाराज सांगायचे, 'संकल्पविकल्प मनामध्ये न आणता नुसते 'गुरुलिंगजंगम' असे जरी आपण म्हटले तरी आपला उद्धार होणार आहे.' संतश्रेष्ठ श्रीनिळोबाराय सांगतात, ***'निळा म्हणे ह्यांच्या नामे करिता घोष। नातळती दोष कळीकाळाचे।।'*** तर संत श्रीरामेश्वरभट्ट गुरुनामाचे महत्त्व असे सांगतात, ***'तुकाराम तुकाराम। नाम घेता कापे यम।।'.*** गुरुनाम म्हणजे श्रेष्ठ नाम. जे नाम साधनाभ्यासाने नि:श्वासाला प्रमाण आले असता नाद, बिंदू, कला ज्योती रूपाने अनुभवाला येते, ज्या नामाला श्रीतुकाराममहाराज 'चैतन्य निजधाम' म्हणतात. तर श्रीज्ञानेश्वरमहाराज 'नाम परब्रह्म वेदार्थे' म्हणतात, जे नाम अनुभवले असता मोक्ष प्राप्त होणारा आहे, जे नाम शिवाचे अंत:करणात असून चारीवाचेपलीकडे हरीवाचेने ज्याचा गजर होतो, जे नाम ***'काहीच न करोनी प्राणी'*** या श्रीसमर्थ अवस्थेत, ***'ओठ कंठ हाले नही। जिव्हा न करे काम।'*** या संत कबीरांनी वर्णिलेल्या अवस्थेत अनुभवता येते, जे नाम उच्चारायला हजार जन्माची पुण्याई पाहिजे, जे नाम अनुभवले असता कामक्रोध नाहीसे होतात व अभिमान देशोधडी जातो, ज्या नामाने पापवृत्ती नाहीशी होते व सर्व दोषांचे हरण होते, चित्तशुद्धी होते, ज्या नामाचे ठिकाणी वाचेचा गोंधळ नसून नामरूपाला मेळ आहे, ज्या नामाने आत्माराम प्रगट होतो, जे नाम म्हणजे भाग्याचे भाग्य, तपाचे तप, योगियांचे निजधन आहे, ज्या नामाने श्रीतात्यासाहेबमहाराज देव झाले, जे नाम हरीबुद्धीने जपायचे असते, जे नाम विष्णूच्या - आत्म्याच्या जाणीवेत जपायचे असते, जे नाम म्हणजे निवृत्ती अवस्थेतील स्मरण आहे, जे नाम म्हणजे वृत्तीरहित ज्ञान आहे, जे नाम मनाला घट्ट पकडणारे, द्वैताचे बंधन नाहीसे करणारे व एकाचा प्रत्यय देणारे आहे, ज्या नामाने ध्रुव, प्रल्हाद तरले, ते अविनाशी गुरुनाम आपण समजतो त्या नामापेक्षा वेगळे आहे. ***('नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। सार नारायण जप एक।।'- श्रीदासराममहाराज, 'हरी हरी हरी मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'शिवाचे अंतरी रामनाम आहे। वाचे पैल जाये तरीच कळे।'- श्रीमामामहाराज, 'जयाचे वाचे पुढा भोजे। अखंड नाम नाचतसे माझे। जे जन्मसहस्त्री वोळगिजे। एकवेळ यावया।।- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'हरी उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'नामची कारण रे महाभय नामे निवारण रे। नामे महादोष जाती। पुढे संतांची संगती। नामे होय चित्तशुद्धी। नामे होय दृढ बुद्धी।।'- समर्थ, 'नाम रूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ।। एका जनार्दनी नाम। नामी प्रगटे आत्माराम।।' - श्रीनाथमहाराज, 'भाग्याचे ते भाग्य रामनाम पाही। येर भाग्य होई श्रेष्ठ कसे।।', 'तपाचे जे तप रामनाम देख। उच्चारिता हरीख ब्रह्मादीका।।'- श्रीमामामहाराज, 'रामदास सांगे खूण। योगियांचे निजधन।।'- श्रीसमर्थ)***

**

# आगळा

गुरुनामाचे सतत अनुसंधान राहिले असता - सोहंभावाचे स्मरण सतत राहिले असता 'नादश्रवणी तदाकारता' साधते व इतर काही नयनात न भरताना महत्त्वाचे चैतन्याचे वारेच नयनात भरते. ***'वारे भरले या नयनात। नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात।।'- श्रीदासराममहाराज, 'शिव भरला शिव भरला। नयनी भरलाची भर भरला। सोहंभावे स्मरला। स्मरला नाहीच की विस्मरला।।'- संत शिवदीनी.*** ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. स्वरुपानुसंधान, नादानुसंधान, नामानुसंधान हे तिन्ही शब्द एकवाची आहेत हे आपण येथे लक्षात घ्यावे. चैतन्याला सतत चैतन्याचीच जाणीव झाल्याने त्यांना उपाधीची उपाधी कधीही होत नाही. संसारात राहून संसारापासून अलिप्त ते राहतात. संसारात ते गुंतत नाहीत. आपल्या घरात ते पाहुण्याप्रमाणे राहतात. गुडगुड्या नारळाप्रमाणे त्यांची अवस्था असते. गुडगुड्या नारळातील पाणी आटलेले असते. त्यामुळे नारळातील खोबरे करवंटीपासून सुटलेले असते व खोबरे गोड झालेले असते. संतमहात्मा देहात असताना देहातीत - देहाला सुटलेला असतो. संतमहात्मा हा संसारातच असतो पण संसारापासून निराळा झालेला असतो. ***('येचि जन्मे येचि काळे। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चळे। स्वरूपाकारे।।'- श्रीसमर्थ)*** संतमहात्मा हा देहाला सुटलेला असतो का संसारापासून निराळा झालेला असतो, नेमके काय समजायचे? का दोन्हीपासून निराळे झालेले असतात? अहो देहाला सुटणे याचा अर्थच संसारापासून निराळे होणे होय. देह धारण केल्यामुळे जन्ममरण हा संसार जीवाचे मागे लागतो. देहात असताना देहातीत होणे म्हणजेच संसारापासून निराळे होणे होय. ***('देहाचिया गावा आलिया। जन्ममृत्युचिया सोहळिया। ना म्हणो नये धनंजया। जियापरी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देहातीत संसारापासून निराळ्या झालेल्या महात्म्याचे विश्वच निराळे असते. तो दिसतो इथे पण असतो परमेश्वराच्या राज्यात. त्याच्या राज्यात परमेश्वर व तो स्वत: दोघेच असतात. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'विठो तुझे माझे राज्य। नाही आणिकाचे काज।।'*** तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'ते वर्तत दिसती देही। परी ते देहा ना माझा ठायी। आणि मी तयांचा हृदयी। समग्र असे।।'.*** तो लोकांच्यातच राहतो पण त्याचे वागणे बोलणे वेगळे असते. त्यांना सर्वत्र चैतन्याचीच जाणीव होत असल्याने ते सर्वांशी आपुलकीने वागतात. ते कोणावरही रागावत नाहीत. अखंड शांतीने ते अखंड समाधानी असतात. सगळ्यांना गोड भाषेत परमार्थाचे महत्व सांगून तो सर्वांना सन्मार्गाला लावतो पण आपण कोणी इतरांपेक्षा वेगळे आहोत याची जाणीव त्याला स्वत:लाही असत नाही व ती जाणीव इतरांनाही तो करून देत नाही. ***('जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधु।।', 'तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाची नाही।।', 'जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरी। साधुजन वर्तती।।', 'उदंड मुले नानापरी। वडिलांचे मन अवघ्यांवरी। तैसी अवघियांची चिंता करी। महापुरुष।।', 'राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे। ऐसी ही विवेकाची उत्तरे। ऐकणार नाही।।'- श्रीसमर्थ, 'जो खांडावया घावो घाली। का लावणी जयांनी केली। दोघा एकची साऊली। वृक्ष दे जैसा।।', 'मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे। अलौकीक नोहावे। लोकाप्रती।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# आपण देव

आत्म्याचा विषय ज्ञान आहे. त्या ज्ञानाचा आत्मा हा विषय होऊ शकत नाही. आमचे श्रीदासराममहाराजांचे वेळी 'तरुण भारत' या वृत्तपत्रात बातमी आली होती की आत्मा सिद्ध करणाऱ्यास एक लाख रुपयांचे बक्षीस देऊ. त्यांनी कीर्तनातच सांगून टाकले की हे बक्षीस कोणालाही मिळणार नाही. ज्या आत्म्याने हे सारे सिद्ध केले आहे, तो आत्मा कोणत्या प्रयोगाने सिद्ध होईल? अहो आत्मा हा प्रयोगी (प्रयोग करणारा) आहे, तो प्रयोगाने सिद्ध कसा होणार? ज्याची ज्याची आम्हाला जाणीव होते तो तो आत्मा नव्हे म्हणून आम्ही आत्मा जाणला हे सांगणे हाच तो न जाणल्याचा पुरावा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'एथ जाणीव करी तोची नेणे। आथिलेपण मिरवी तेचि उणे। आम्ही जाहलो ऐसे जो म्हणे। तो काहीची नव्हे।।'.*** आत्मज्ञान झाले असे म्हणणे हेच अज्ञान, आपण कोणी आहोत असे मिरवणे हाच त्यातील उणेपणा. आपण काही वेगळे होतो, तेव्हा आपण त्याचेपासून दूर जातो तर आपण काही न होणे हीच परमेश्वराची जवळीक. आपण काही न होणे म्हणजेच 'आपण देव' असल्याची अनुभूती. आपण काहीतरी होतो व देवापासून दूर जातो, देवापासून विभक्त होतो व पुण्य व्हायच्या ऐवजी पापच होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'आणि मजची माजी असता। जेणे मी दुरी होय पंडूसुता। ते पुण्य ऐसे म्हणता। जीभ न तुटे काई।।'.*** काही लोक सांगतात की आम्हाला देव माहीत आहे. तो देव माहीत नसल्याचाच पुरावा आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'एक म्हणती आम्हा ठावा आहे देव। लटीकाची भाव मिरविती।।'*** लटिक्या भावाने किंवा लटक्या व्यवहाराने आत्मा कळत नाही. आत्मज्ञान आपण समजतो तसे वेगळेपणाने होऊ शकत नाही. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान या त्रिपुटीतील ज्ञानाने आत्मज्ञान होत नाही. देवरूप होणे - आत्मरूप होणे - देवा भक्तातील भेद नाहीसा होणे - म्हणजे देवाला पाहणे होय. हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, ***'योगिया दुर्लभ तो म्या देखिला साजणी। पाहता पाहता मना न पुरेची धणी।। देखिला देखिला गे माये देवाचा देवो। फिटला संदेहो निमाले दुजेपण।। अनंतरूपे अनंतवेषे देखिले मी त्यासी। बापरखुमादेवीवरू खुण बाणली कैसी।।'.*** येथे संदेह फिटून दुजेपणा नाहीसा होणे हे देवाचे पाहणे आहे हे आपण लक्षात घ्यावे. आत्मा पाहणे, स्वरूप पाहणे, वस्तू पाहणे म्हणजे काय हे श्रीसमर्थ असे सांगतात, ***'आकाश वेगळेपणे पाहावे। स्वरूपी स्वरूपची व्हावे। वस्तुचे पाहाणे स्वभावे। ऐसे असे।।', 'वस्तु आपणची होणे। ऐसे वस्तुचे पाहणे। निश्चयेसी भिन्नपणे। शुन्यत्व लाभे।।', 'वेगळेपणे पाहावे। तयास आकाश म्हणावे। अभिन्न होता स्वभावे। आकाश ब्रह्म।।', 'भिन्नपणे अनुभविले। तयास शुन्य ऐसे बोलिले। वस्तु लक्षिता अभिन्न जाले। पाहिजे आधी।।'.*** तर देव होणे म्हणजे देवाला पाहणे हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***'देव पाहावया गेलो। तव तो अंगे देवची झालो।।'.*** कणाकणाने ज्ञान गोळा करणे वेगळे व ज्ञानरूप होणे वेगळे. ज्ञानाची जागृती वेगळी व ज्ञानच जागते असणे वेगळे. आमच्या ठिकाणी ज्ञानाची जागृती असते. संतांच्या साधुंच्या ठिकाणी ज्ञानच जागते असते. श्रीसमर्थ सांगतात, ***'जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू।।'.*** आत्मा हृदयात आहे म्हणून मनाला देहाची दृश्याची जाणीव होते - विपरीत ज्ञान होते. या देहाच्या दृश्याच्या जाणीवेने निजत्वाचे विस्मरण होते व देह म्हणजे मी असे वाटू लागते. आपण देवापेक्षा वेगळे आहोत असे वाटू लागते. ***('विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी।।'- श्रीदासराममहाराज, 'म्हणोनि तू आणि आम्ही। हे दिसताहे देहधर्मी।। मग ययाच्या विरामी। मीचि होसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)***

**

# आपण देव

आत्मस्वरूपाला विसरून होणाऱ्या देहाच्या दृश्याच्या जाणीवेने संसरण हा संसार जीवाचे मागे लागतो. अर्थात देहाची, दृश्याची जाणीव नाहीशी होऊन आत्मस्वरूपाची जाणीव होणे म्हणजे संसारापासून वेगळे होणे होय. हे देहाचे, दृश्याचे होणारे विपरीत ज्ञान नाहीसे होऊन राहणाऱ्या अज्ञानाचे ज्ञान होणे, देहाचे, दृश्याचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हेच श्रीदासराममहाराजांचे साधन आहे. हे देहाचे दृश्याचे विस्मरण होऊन होणाऱ्या अज्ञानाची - नेणीवेची जाणीव होणे म्हणजेच आपण आपल्याला जाणणे, आत्मज्ञान आहे. ***('जे जे भासे जाणवियें। ते ते जरी निरसुनी जाये। तरी जाणीवची आहे। तेचि पाहे तियेते।।', 'नेणीव जरी जाणितली। तरी ते नेणीव मिथ्या झाली। तेथील जाणीव उरली। आत्मप्रभा।।'- संत मुकुंदराज)*** जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्थांत असणारी चैतन्याची नेणीव नाहीशी होऊन चैतन्याची जाणीव अहर्निशी प्रगट होण्यासाठी, तिन्ही अवस्थांची एक अवस्था होण्यासाठी, त्रिविध झालेले आयुष्य एकवीध होण्यासाठी करावी लागणारी खटपट म्हणजे साधन असे चिमडचे श्रीनारायणमहाराज सांगत. गुरुकृपेने, साधनाभ्यासाने ही तिन्ही अवस्थांची एक अवस्था होणे, चैतन्याची जाणीव सतत होणे म्हणजे महाकारणदेह प्राप्त होणे होय. ***('ते नेणीव फिटे गुरुखुणा। जाणे आपण आपणा। बोलिजे या अनुसंधाना। महाकारण ऐसे।।', 'फिटूनिया नेणणे। आप आपणा जाणणे। तिही देहाचेनि साक्षीपणे। महाकारण देह।।'- संत मुकुंदराज)*** या सर्व विपरीत ज्ञानात्मक जाणीवा नाहीशा होऊन होणारी नेणीव खोटी ठरावी नेणीवेची जाणीव व्हावी असे मागणे श्रीसमर्थ असे मांडतात, ***'मन बुद्धी अगोचर। बुद्धीवीण अंधःकार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी।।'.*** देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण, या संसारात अहर्निशी साधलेल्या नित्य नामाच्या नित्यनेमाने तो साधक संसाराहून निराळा होतो. कर्माला अकर्माची मोहोर बसून संसारातील अहंकार नाहीसा होतो, संसाराचा दरारा नाहीसा होतो. तो साधक ना 'मी' होऊन नामी देवच होऊन जातो. 'देह म्हणजे मी' हा अहंकार नाहीसा होऊन चैतन्य म्हणजे मी ही जाणीव अहर्निशी निर्माण होते. अहर्निशी जाणीवेने जाणीवेचा ग्रास होऊन तो आत्मरूप होतो. खोटा 'मी' नाहीसा होऊन खऱ्या 'मी'ची ओळख होते व त्याचा संसारच ब्रह्मरूप होऊन जातो. ***('एकची मीपणे नागविले घर। नातरी संसार ब्रह्मरूप।।'- संतवचन, 'मीपण सांडूनी ओळखी मीपण। तरी देवपण प्राप्त होय।।'- श्रीदासराममहाराज, 'अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।।'- श्रीमामामहाराज, 'अहंभाव गेला। तुका म्हणे देव झाला।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अधोमुख जीवनाने होणाऱ्या देहाच्या जाणीवेने असणारा देव व भक्त हा भेद तेथे राहात नाही. ***('अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो। निःसंगपणे निर्गुण तो। महायोगी।।'- श्रीसमर्थ, 'म्हणौनि तू आणि आम्ही। दिसताहे देहधर्मी। हे ययाच्या विरामी। मीचि होसी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** मी कोण व देव कोण हे सद्गुरुंच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासताना मी कोणी वेगळा नाहीच आहे, आहे तो देवच आहे. देवावेगळे काही नाही हे अनुभवाला येते. देव वेगळा, भक्त वेगळा असे नसून निश्चळ वायुरूप निरुपाधिक आत्माच देव आणि भक्त झाला आहे. निश्चळ वायुरूप निरुपाधिक आत्मा म्हणजेच परब्रह्म, परमात्मा आहे. वाराच देव, वाराच भक्त व उपासनाही वायुरूप. ***('सद्गुरूसी काय पुसावे। हेही कळेना स्वभावे। अनन्यभावे येकभावे। दोनी गोष्टी पुसाव्या।।', 'दोनी गोष्टी त्या कोण। देव कोण आपण कोण। या गोष्टीचे विवरण। केलेची करावे।।', देवाभक्ताचे मूळ। शोधून पाहता सकळ। उपाधीवेगळा केवळ। निरुपाधी आत्मा।।', 'देवाभक्ताचे पाहाता मूळ। होय भेदाचे निर्मूळ। येक परमात्मा सकळ। दृश्यावेगळा।।', 'परब्रह्म हे सकळापरते। तयासी पाहाता आपणची ते। हे कळे अनुभवमते। सद्गुरू केलीया।।'- श्रीसमर्थ, 'वाराची देव आमुचा। वारा हा भक्त तयाचा।।'- श्रीदासराममहाराज)***

✲✲

# सुखस्थानी जाणे

त्रिगुणात्मक असार विचारांनी असार संसाराची जाणीव होते. या असार संसारात जर कुणाला शाश्वत सुख होत असेल तर त्याने वेगळे सुखस्थानी जाण्याचे कारण नाही. त्यांनी इथले सुख आनंदाने भोगायला हरकत नाही. पण सर्वसाधारणत: माणूस संसारात सुखाचे मागे लागतो. पण सुख काही त्याचे मागे येत नाही, सुख काही त्याला प्राप्त होत नाही, हे असे का होते याचा आपण विचार करायला नको का? सुख व्हावे म्हणून आपण सुखप्रद मन, इंद्रिये मागतात त्या निरनिराळ्या गोष्टी आणतो खरे, पण सुख काही होत नाही. पोटात गोळा येईपर्यंत आपण सुखाची साधने गोळा करतो पण प्रयत्न निष्फळ ठरतात. तरीपण हवेपण, हव्यास संपत नाही हे विशेष आहे. माणसाचे सुख हरवले आहे. ते तो शोधतोय. पण ते त्याला सापडत नाही. जेथे सुख आहे तेथे आपण शोधत नाही तर ज्या गावात सुख नावाचा पदार्थ नाही त्या संसारगावात आम्ही सुख शोधतोय, मग ते कसे सापडेल? ***'संसाराचे गावी। सुख अणुमात्र नाही।।'- श्रीमामामहाराज, 'संसार दु:खमूळ। चहुकडे इंगळ। विश्रांती नाही कोठे। रात्रंदिवस तळमळ।।', 'दु:ख बांधवडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाही कोठे।।'*** ही संतवचने सारा खुलासा करणारी आहेत. विषयातून, साधनातून सुख जर व्हायचे असते तर ते आजवर कोणाला तरी झाले असते की नाही? सुखी माणसाचा सदरा कोणाला प्राप्त झाला आहे का? 'जगी सर्वसुखी असा कोण आहे' या समर्थ प्रश्नाला अजुनी उत्तर मिळालेले नाही. विषय जरी कितीही प्रिय असले तरी त्यातून सर्वसुख - आत्मसुख प्राप्त होत नाही. आत्मघात मात्र ठरलेला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'पतंगा दिपी आलिंगन। तेथ त्यासी अचूक मरण। तेवी विषयाचरण। आत्मघाता।।'.*** ज्यांची विषयातून सुख मिळण्याची आशा मावळली आहे, जे संसारदु:खाने दुखावले आहेत, जे त्रिविधतापे पोळले आहेत त्यांनीच सुखस्थान हुडकावे, परमार्थाची वाट धरावी. ***('जो संसारदु:खे दुखावला। जो त्रिविधतापे पोळला। तोचि अधिकारी जाला। परमार्थासी।।'- श्रीसमर्थ)*** जोवर देहाची, दृश्याची जाणीव आहे तोवर जाणीव दु:खाचीच. देहाचा, दृश्याचा विसर होऊन चैतन्याची जाणीव झाली तर सुखाची प्राप्ती होणार. ***('देवा आता ऐसा करी उपकार। देहाचा विसर पाडी माझ्या।। तरीच हा जीव सुख पावे माझा। बरे केशीराजा कळो आले।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाभ्यासाने श्वसनातील त्रिगुणांचा निरास होऊन देहाची - दृश्याची जाणीव जाऊन चौथ्या गुणाच्या साहाय्याने तीन अवस्थांची एक अवस्था होऊन महाकारणदेही अखंड चैतन्याच्या जाणीवेने अहर्निशी परमार्थ प्राप्त होणे म्हणजे सुखस्थानी जाणे होय. ***('जाणीवेने होते सुख। नेणीवेने होते दु:ख।।'- श्रीसमर्थ, 'तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य। करवी परमार्थ अहर्निश।।'- श्रीतुकाराममहाराज)*** संतमहात्मे अहर्निशी परमार्थाच्या अवस्थेत असतात. त्यांच्या गावीही दु:ख तळमळ असत नाही. ती अवस्था त्या गावी आपणास प्राप्त होणे म्हणजे सुखस्थानी जाणे होय. ***('संतांचिया गावी प्रेमाचा सुकाळ। नाही तळमळ दु:खलेश।।'- संतवचन, 'सुख ते हे एके ठायी। बहुपायी संतांच्या। म्हणवोनी केला वास। नाही नाश त्या ठाया।।'- श्रीतुकाराममहाराज)*** **संत ज्या गावी राहतात त्या गावाला नाश नाही. तेथील सारे अविनाशी. संतांचा गाव तोच देवाचा गाव. देवाचा गाव काही वेगळा नाही.** ***('तुका म्हणे काही न मागो आणीक। तुझे पायी सुख सर्व आहे।।', 'काय उणे आम्हा विठोबाचे पायी।।', 'वैष्णवाघरी देव सुखावला। नवजे बाहेरी दवडोनी घातला।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अर्थात जेथे सुखाचा सुखनिधी सुखसागर राहतो ते गाव सुखस्थान. ***('सुखालागी करीसी तळमळ। तरी तू पंढरीसी जाई एकवेळ।।'- श्रीतुकाराममहाराज)*** विठोबाच्या पायी काय उणे होते (देहभाव उणा होतो) मग कशाची काय कमी राहणार. मग इच्छा कशाला राहतीय. आशारहित होणे म्हणजे सुखस्थानी जाणे.***('आशया परमं दु:खं। नैराश्यं परमं सुखं।।'- संतवचन)*** निवृत्ती अवस्था हे परमात्म्याचे, सद्गुरुंचे घर - माहेर हेच सुखस्थान. ***('तुका म्हणे मग नये वृत्तीवरी। सुखाचे शेजारी पहुडेन।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# विठोबाची खूण जाणती संत

विठ्ठल जाणायचा प्रयत्न आपण करतो पण तो आपल्या जाणीवेत येणारा नाही. म्हणून तो वेदाला कानडा, श्रुतीला कानडाच राहिला. ***('वेदासी कानडा श्रुतीसी कानडा।'- श्रीतुकाराममहाराज, 'तेथील प्रमाण नेणवे वेदासी। ते जीवजंतुसी केवी कळे।।', 'कानडा हो विठ्ठलू कर्नाटकू। तेणे मज लावियेला वेधू।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** म्हणून विठ्ठलाला जाणले असे सांगणे म्हणजे तो न जाणल्याचा पुरावाच आहे. ***('एथ जाणीव करी तोचि नेणे। आथीलेपण मिरवी तेची उणे। आम्ही झालो ऐसे जे म्हणे। तो काहीचि नव्हे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** विठ्ठल हा शब्द विद् व स्थल या दोन शब्दांच्या संधीने बनला आहे. जाणीवरहित जाणण्याचे ठिकाण म्हणजे विठ्ठल होय. 'विठ्ठल' ही अनुभूती आहे. अनुभूती शब्दात सांगता येत नाही. म्हणून 'विठ्ठल'हा शब्द नऊ हजार ओव्यांच्या श्रीज्ञानेश्वरीत नाही'असे श्रीदासराममहाराज सांगत. ***('साखरेची गोडी नयेची सांगता। अनुभवाची कथा ऐसी गे माये।।'- श्रीतुकाराममहाराज)*** तो 'शब्देवीण संवादू दुजेवीण अनुवादू' असाच अनुभवता येतो. विठ्ठल हा जाणता आहे तो आपल्या जाणीवेत येऊ शकत नाही. इंद्रियांना व मनाला विनाशी आकाराचे ज्ञान होते व त्याचे वर्णन शब्दात करता येते. अविनाशी विठोबा-विठ्ठल इंद्रियांना, मनाला जाणता येत नाही. साधनाभ्यासाने माझे जे काही आहे त्या साऱ्याचा लय व्हावा लागतो. माझा देह व देहाला चिकटलेले सारे चित्रमय जगत यांची जाणीव नाहीशी झाली तर खऱ्या मी ची जाणीव हृदयदेशी प्रगट होते. या 'मी'च्या जाणीवेवर - गुणावर प्रेम करणे हा साधनाचा क्रम जर आपण आचरला तर साक्षात्काराने ही 'मी'ची जाणीव विज्ञानरूप होते. जाणत्याला जाणल्याने 'मी' जाणले ही जाणीव नाहीशी होते. हे विमलशुद्धस्वरूप ज्ञान म्हणजे विठोबा. ***('तुका म्हणे सांडा जाणीवेचा शीण। विठोबाची खुण जाणती संत।।', 'वि चा केला ठोबा। म्हणोनी नाव त्या विठोबा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'होता अहंकाराचा ठोंबा। उपडला घुसळखांबा। कैचे दाविले स्वयंभा। बाई तुझिया रामाने बाई तुझिया कृष्णाने।।'- संतवचन)*** सत्य विठोबाचे - सत्य आत्म्याचे - सत्य अनुभव आल्याशिवाय जीवाचे कष्ट नाहीसे होत नाहीत. खरे सुख त्या जीवाला प्राप्त होत नाही. आत्मा हा विठ्ठल असून ज्या कायेत तो राहतो, जेथे तो अनुभवाला येतो ती काया त्याची पंढरी आहे. सर्वस्वाचा वीट आला असता (मी आणि माझे विसरले असता) नवद्वाराचा निरोध साधून दशमद्वार या महाद्वारी सोहंब्रह्माची अनुभव खूण प्राप्त होते. कल्पनेने होणारा जगाचा आभास कल्पनेच्या निरासाबरोबर नाहीसा होतो व सत्य विठ्ठलाची प्रचिती त्याला येते. सत्य विठ्ठलाची कल्पना करून सत्य कधीही हाताला येणार नाही, कल्पनाच हाताला येणार. ***('ऐके रे चांगया टाकी रे कल्पना। पावेल त्या खुणा मुक्ताई म्हणे।।'- संत मुक्ताबाई, 'वस्तुते ओळखा सांडा रे कल्पना।।' श्रीतुकाराममहाराज, 'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'- श्रीदासराममहाराज)*** निर्विकल्प अवस्थेत त्याला अनुहत नादश्रवण, इच्छा कमी होणे, मन स्थिर होणे, नवलप्रकाश दिसणे, अनिर्वाच्य समाधान होणे आदी विठोबाच्या खुणा प्राप्त होतात. या विठोबाच्या खुणा ज्यांना प्राप्त होतात, कल्पक ज्यांना भेटतो त्यांना स्वात्मानुभवी संत-योगी असे संबोधिले जाते. ***('हे खुण जाणे तो स्वात्मानुभवी। येर ते गोसावी आडनावाचे।।'- संतवचन, 'न कळे कवणाला तयाचे ते वर्म। योगी जाणे मर्म खुण त्याची। खुण त्याची जाणे जे का तैसे असती। तुका म्हणे भ्रांती दुजियाला।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ज्याला या खुणा प्राप्त होतात, जो परमेश्वराचे एकपण जाणून परमेश्वराला शरण जातो तो जन्ममरण या संसारापासून निराळा होता, मुक्त होतो.

**

# श्रीगोविंद जयंती

आज माझे आजोबा श्री.गोविंद अनंत केळकर तथा श्रीमामामहाराज यांची जयंती तर माझी आई सौ.सीतावहिनी यांची पुण्यतिथी. आम्हा केळकरांचे दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दिवस. श्रीमामांची जयंती या दृष्टीने आनंदाचा तर सौ.वहिनीची पुण्यतिथी या दृष्टीने अत्यंत दु:खदायक. जन्मदात्री आई अशी अनपेक्षितपणे देवाघरी जाणे यापेक्षा जास्त दु:ख कोणते असू शकते? एकीकडे मातृविरहाचे दु:ख तर एकीकडे आम्हा केळकरांना अखंड कीर्तनाची परंपरा बहाल करणाऱ्या श्रीमामांचा अवतार होण्याचा आनंद. कुलसंशोधन करून त्यांनी अवतार घेण्याकरता केळकरांचे कूळ निवडले हे केळकरांचे महद्भाग्य. त्यांनी केळकर कुळात अवतार घेतला म्हणून साऱ्या केळकरांना कीर्तनाची आवड, नाहीतर कोणती आवड निर्माण झाली असती हे माहीत नाही. माझे पणजोबा श्रीनाना म्हणजे श्री.अंताजीपंत व माझी पणजी सौ.राधाबाई बेळगावला शेतीच्या कामाकरता गेलेले असताना अचानक सातव्या महिन्यातच गोस्थानात श्रीमामांचा अवतार झाला. आमचे श्रीमामा हसत जन्माला आले. जे हसत जन्माला येतात ते हसतच इहलोकीचा निरोप घेतात व बाकीच्यांना रडवतात. गोस्थानात जन्म झाला म्हणून त्यांचे नाव गोविंद ठेवण्यात आले. रामभक्ती कशी करावी हे आचरून दाखविण्यासाठी श्रीमामा केळकरांचा अवतार झाला आहे असे पावसचे सोहंहंसारूढ स्वामी स्वरूपानंद सांगत उपजत रामभक्ती असणाऱ्या श्रीमामामहाराजांनी साहजिकच अखंडित वाचेने श्रीरामस्मरण हे हरीकीर्तन अहर्निशी आचरले. श्रीमामामहाराजांच्या अवताराचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, ***'हरीकीर्तनाकारणे जन्म झाला। हरिकीर्तनी साच अखंड ठेला। हरिकीर्तनानुग्रहो सत्प्रचिती। नमु कीर्तनानंद गोविंद चित्ती।।'.*** श्रीनाथमहाराजांचे अवतारात भगवंतांनी केलेल्या तीन तपावरील सेवेची परतफेड ३८ वर्षे अखंड हरीकीर्तन करून श्रीमामांनी केली म्हणून श्रीमामा हे श्रीनाथमहाराजांचे अवतार आहेत हे खूप सिद्ध सत्पुरूषांनी सांगितले आहे. बाळेकुंद्रिच्या श्रीपंतमहाराजांचे अधिकारी शिष्य प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर श्रीमामांच्या अवताराचे वर्णन असे करतात, ***'एकनाथ पैठणवाला। सांगली आवडली त्याला।। कुलसंशोधन करिता करिता। केळकरांचे आले चित्ता। अनंत तनुची घेऊनी सत्ता। राधाकुशी अवतरला।। एकनाथ गोविंद जाहला। हनुमंताची दीक्षा त्याला। नामरसाचा पिऊनी प्याला। रंगी रंगुनी गेला।। पैठणक्षेत्री अतृप्त हेतू। सांगलीत पुर्णेच्छा हेतू। हरिभक्तीचा कळस डोलतू। पांडुरंग मनी भरला।।'.*** श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कृपेने श्रीमामांच्या ठायी असणाऱ्या रामभक्तीने हनुमानासह रामसीतेची अंतर्बाह्य सोबत श्रीमामांना लाभली. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे आशिर्वादाने श्रीमामांचा विवाह झाला व श्रीमामांच्या अखंड कीर्तनात सहभागी होण्यासाठी रामसीता हे ही अवतरले. श्रीमामांच्या संसारात श्रीदादांच्या रूपाने देवाचा हात फिरू लागला. मग संसाराची चिंता कुठली? संसाराची चिंता आमच्यासारख्या अभक्तांनी करायची. श्रीमामांचे उतारवयात श्रीदादावहिनींनी श्रीमामांची खूप सेवा केली. श्रीमामांचे पश्चात प्रत्यक्ष रामांनी रामाची सेवा आरंभिली तेव्हा श्रीरामाच्या साहाय्याने सौ.सीतेने सारा व्यवहार सांभाळला. ती श्रीदादांच्या परमार्थास पूरक ठरली. पतीच्या मनाप्रमाणे वागून तिने अनायासे आत्महित साधले. श्रीदादांचा व्यवहार सौ.वहिनींनी सांभाळला व सौ.वहिनींचा परमार्थ श्रीदादांनी. कोणतीही इच्छा नसलेल्या सौ.वहिनीने तिच्या आयुष्यातील अखेरच्या दिवशी माझे लग्नासाठी काही थोडे सोने घेऊया अशी इच्छा व्यक्त केली. तिच्या इच्छेखातर श्रीदादांनी त्या दिवशी पहिल्यांदा व्यवहारात लक्ष घातले. आमचे श्रीदादा व श्रीआण्णा काही सोने श्रीदादांचे परमस्नेही अध्यात्मप्रेमी श्रीहरीभाऊ गाडगीळ यांचेकडून घेऊन आले. तिने ते सोने पाहिले. तिला खूप आनंद झाला. पण यानंतर काही वेळातच तिला हृदयविकाराचा त्रास जाणवू लागला. शेवटी गुरुपुष्यामृत, श्रीमामामहाराजांची जयंती हा योग साधून आपले सद्गुरु श्रीदासराममहाराज यांना नमस्कार करून ईशचिंतनात देह ठेवला. आम्हा साऱ्या गुरुपुत्रांचे भाग्य सरले. माझे भाग्य हे की माझ्या जीवनाचे सूत्र श्रीमामांचे कृपेने बांधले गेले तर सौ.वहिनीचे इच्छेने श्रीदादांनी घेतलेल्या सोन्याने माझ्या संसारातील जीवनाचे मंगळसूत्र बांधले. त्यांच्या कृपेने आजवरचा जीवनप्रवास अत्यंत सुखात झाला. असाच तो शेवटपर्यंत सुखाचा होवो व माझी, आम्हा सर्वांची मुले, नातू, पणतू परमार्थी व्हावेत. श्रीमामांच्या कृपेने जीवनाची सुरुवात झाली तसा त्यांच्या कृपेतच शेवटचा क्षण अनुभवाला यावा. आदीअंती हरी अनुभवून तो कसा व्यापक आहे याची व्यापक अनुभूती यावी अशी प्रेमळ विनंती श्रीमामा व सौ.मामी, श्रीदादा व सौ.वहिनी यांचे पवित्र चरणी करतो व येथेच थांबतो. **

# आत तरी बाह्य

आपल्या आत जो देव - प्राण - आत्मा आहे, तो जर साधनाने आपणाला अनुभवाला आला तर विश्वात्मक देवाची प्रचिती येणार. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'म्हणौनि आपणपा विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा।।'.*** हे विश्वातील साधर्म्य - सर्वत्र सारखे उपाधीत गुप्तरूपाने वारेमाप पसरलेले चैतन्य - हेच संतांचे दृष्टीने महत्त्वाचे आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, ***'सर्व विश्वामाजी असे जे सामान्य। तेचि असामान्य दासरामी।।'.*** विश्वामध्ये सामान्यपणे पसरलेले चैतन्य असामान्य वाटणे हेच संतांचे असामान्यत्व आहे. ***'जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तीयोगु निश्चित। जाण माझा।।'*** हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अनुभव आहे. ***'अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव। प्रतिमा तो देव कैसा नोहे।।'*** हा श्रीनामदेवमहाराजांचा अनुभव आहे. ***'अवघाची महाराजा। दासरामी कोण दुजा।।'*** हा श्रीदासराममहाराजांचा अनुभव आहे. अद्वैत बोलायचे नाही तर अद्वैत अनुभवयाचे आहे. निर्विकल्पी कल्पनातीत असणारे संत भूत-आकार-पाहात नाहीत तर ते त्याला एकट्याला पाहतात. असे सर्वत्र अद्वैत अनुभवणे म्हणजे श्रीगोविंदाची - आमचे श्रीमामांची- प्रचिती येणे होय. येथे जनतारूपी जनार्दन बघायचा नाही तर जन नोहे अवघाची जनार्दन अशी निजखूण बाणणे महत्त्वाचे. अंत:करणातील सारे भेद नाहीसे होऊन अभेदत्व प्रगट होणे म्हणजे श्रीरामाचा - श्रीदासराममहाराजांचा -अनुभव घेणे होय. ***('भेद हा तुटे अभेद उमटे। राम प्रगटे तेची नवमी।।'- श्रीसमर्थ)*** सर्व भेद नाहीसे होऊन सर्वत्र एकाची प्रचिती येणे म्हणजे भगवंताला शरण जाणे होय. डोक्यातील भेद गेलेला नाही आणि भगवंताच्या पन्नास वेळा पाया पडतोय, काही उपयोग नाही या पाया पडण्याचा. ही शरणागती नव्हे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'पै आपुलेनि भेदेवीण। माझे जाणिजे एकपण। तयाची नाव शरण। मज येणे गा।।'.*** जे एक चैतन्य आहे त्याच्याशी सोहंबोधाने एकी होणे - अनन्य होणे, अद्वैताशी समरस होणे हे घडले तर मोक्षाची प्राप्ती होते. भगवान श्रीज्ञानेश्वरीत सांगतात, ***'तैसा मी एकवाचूनि काही। मग भिन्नाभिन्न आन नाही। सोहंबोधे तयाच्या ठायी। अनन्यु होय।।', 'जो मज होय अनन्य शरण। त्याचे निवारी मी जन्ममरण। यालागी शरणागता शरण्य। मीचि एकू।।'.*** आपल्या आतील चैतन्य अनुभवून जो विश्वात्मक चैतन्याचा अनुभव घेतो तोच देहांती नाम घेतो व परब्रह्मरूप होतो. श्रीनाथमहाराज सांगतात, ***'हरी बोला एकांती। हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।'.*** तर श्रीसमर्थ सांगतात, ***'आधी देखिला देहधारी। मग पहावे जगदंतरी। तयाचेनिया उपरी। परब्रह्म पावे।।'.*** आपल्या आतील चैतन्याचा अनुभव येण्यासाठी मनोलय होणे अत्यंत गरजेचे. याकरता मनाचा आवर होणे आवश्यक. मन ज्याला आवरत नाही तो संसारिक व ज्याला मन आवरते, ज्याने मनावर विजय मिळवला तो आध्यात्मिक - पारमार्थिक. ***('मन ज्याला आवरेना। तोचि सांसारीक जाण।।', 'दास म्हणे केल्या मनावरी मात। खरा परमार्थ दूर नसे।।'- श्रीदासराममहाराज)*** आम्ही गाढवासारखे मनाचे मागे लागतो, मन म्हणेल ते पूर्व. आपल्या म्हणण्याला काही किंमतच उरत नाही. म्हणून आपले पदरी नेहमी गाढवपणा येतो. ***('तुका म्हणे ते गाढव। घेई मनासंगे धाव।।'- श्रीतुकाराममहाराज)*** असे जे मनाअधीन होतात, ज्यांना यम (मन:संयम) साधत नाही त्यांना यम दंडण करतो. ***('तुका म्हणे झाले जे मनाअधीन। तयासी दंडण यम करी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** तर पापाचा विचार नाही असे जर निर्विचार मन झाले व सहजकृती हा रामनामाचा सदाचार जर साधला तर यम वंदन करतो. ***('रामनाममुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे। गोविंद म्हणे यम वंदीतसे पाय। इतर ते कायी तयापुढे।।'- श्रीमामामहाराज)***

**

# मनोजय विजय

मन हे इंद्रिय आहे. मनाच्या अस्तित्वावर सर्व इंद्रिये अनुभव घेतात. श्रीदासराममहाराजांचे मते देहाच्या मार्फत इंद्रियांच्याद्वारा जीवाचे दृश्याशी होणारे तादात्म्य म्हणजे मन आहे. ***(‘इंद्रियामाजी अकरावे। मन ते मी हे जाणावे।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** इंद्रियांचे आपण मालक आहोत. इंद्रिये आपल्या आज्ञेत हवीत, तरच मालक म्हणण्यात अर्थ. जो इंद्रियांना आपल्या आज्ञेत ठेवतो, तो खरा ज्ञानी. तेच विषयसिंधू तरून जातात. जितेंद्रिय होणे हीच खरी जीवनाची सार्थकता आहे. मन हे इंद्रियांचा राजा आहे. मनोजय साधला तरच जितेंद्रिय होऊन सर्वत्र विजय प्राप्त होतो.***(‘बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना। पवनु सहजे गगना। मिळोची लागे।।’, ‘इंद्रिये जे जे म्हणती। ते तेची जे पुरुष करती। ये तरलेची न तरती। विषयसिंधू।।’, ‘म्हणोनि आपली आपणपेया। जरी ये इंद्रिये येती आया। तरी अधिक काही धनंजया। सार्थक असे।।’, ‘जयाची आज्ञा आपण। शिरी वाहे अंत:करण। मनुष्याकारे जाण। ज्ञानची तो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘साधिलिया मनोजय। होय सर्वत्र विजय।।’- श्रीमामामहाराज)*** साधनाचे अभ्यासाने प्राणापानाचे ठिकाणी मन घटले, मुरले असता त्रिगुणाचे निरासाने संसाराचे निरासाने बरवे साधन साधून जो अध्यात्मातील अत्युच्च सच्चिदानंद पदवी प्राप्त करतो, तो परमार्थात पुरा होतो. तेथे अपुरे असे काहीच राहात नाही. संसाराच्या गोष्टी सुटल्या तर आत्मसाक्षात्कार, जो जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे - जन्माने सिद्ध झालेला हक्क आहे तो जीवाला प्राप्त होतो. आत्मसाक्षात्कार झाला तरच दुरित दूर होऊन जन्माला आल्याचे सार्थक होणार आहे. ***(‘सार्थक होते सार्थक होते दुरीत सर्व जाते। पुण्यपावना ज्ञानमार्ग हा देवदर्शन होते।।’- श्रीसमर्थ)*** आत्मप्राप्ती - देवप्राप्ती होणे यासारखा दुसरा लाभ नाही. ***(‘जो आत्मलाभासारिखे। गोमटे काहीच न देखे। म्हणोनि भोगविशेखे। हरिखेना जो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** आपण सारे काही मिळवले फक्त आत्मप्राप्ती झाली नाही तर त्या सारे मिळवल्याचा काही उपयोग नाही. केलेले सर्व कष्ट वाया जातील. याउलट बाकी काही न मिळवता फक्त आत्मप्राप्ती झाली तर त्या जीवाला मिळवायचे काही राहातच नाही. ***(‘नाना शास्त्रं पठे ल्लोको। नाना दैवत पुजनम्। आत्मज्ञानं विना पार्थ। सर्व कर्म निरर्थकम्।।’- संस्कृतवचन)*** आम्ही दाही दिशांना देव शोधायचा प्रयत्न करतो पण देवाची प्राप्ती काही होत नाही. देवप्राप्तीची दिशा काही कळत नाही. ही देवप्राप्तीची दिशा ज्यांनी देव प्राप्त करून घेतला आहे, असे संतच दाखवू शकतात. संतांचे संगतीत अंतररंगी नाम कसे बोलावे हे समजते व ‘नादश्रवणी तदाकारता’ साधून देहाच्या-मनाच्या लयाने ठायीच देवाचे सान्निध्य लाभते. देवप्राप्तीसाठी संतांना शरण जावे तरच आपली सोय होणार आहे. ***(‘संतसंगतीने देवपडे ठायी। तयाचिये पायी लीन व्हावे।।’- श्रीमामामहाराज, ‘संतांचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे पंथे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘हरीप्राप्तीसी उपाय। धरावे संतांचे ते पाय। संतावीण प्राप्ती नाही। ऐसी वेद देती ग्वाही।।’, ‘संतसंगे अंतररंगे नाम बोलावे। कीर्तनरंगी देवासन्नीध सुखेची डोलावे।।’- श्रीनाथमहाराज)*** देवाची कृपा झाली तर संतांची प्राप्ती होते व संतकृपेने देवाची प्राप्ती होते. संतांची प्राप्ती झाली व त्यांना खऱ्या अर्थाने जर आपण पाहिले व त्यांनी आमचेकडे पाहिले तर आपण देवाला पाहिल्यासारखे आहे. संतभेट व देवभेट वेगळी नाही. ***(‘देव ते संत देव ते संत। निमित्त त्या प्रतिमा।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘आत्मज्ञाने चोखडी। संत जे माझी रुपडी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘संतपदाची जोड दे रे हरी साधुपदाची जोड।।’- संत अमृतराय, ‘बहु अवघड आहे संतभेटी। परी या जगजेठी करुणा केली।।’- श्रीतुकाराममहाराज)***

**

# शेवट नरदेह

एका एका योनीत कोट्यावधी श्वासोच्छ्वास - जन्ममरणाचे फेरे घेत, ८४ लाख योनी फिरत शेवटी पापपुण्य समता साधल्यावर नरदेहातील वारे - चैतन्य प्राप्त होते. नरदेह सोडून इतर योनीत भगवद्प्राप्ती होऊ शकत नाही. अर्थात जन्ममरण हा संसार इतर देहात चुकविता येत नाही. ***('एका एका योनी कोटी कोटी फेरा। नरदेहाचा वारा मग लागे।।', 'जै पापपुण्य समान समी। तै मनुष्यदेह आक्रमी। जन्म पावे कर्मभूमी। आश्रमधर्मी सुमेधा।।'- श्रीनाथमहाराज, 'पशुदेही नाही गती। ऐसे सर्वत्र बोलती। म्हणोन नरदेहीच प्राप्ती। परलोकाची।।', 'पापपुण्य समता घडे। तरीच नरदेह दोडे।। याचे सार्थक करावे। आपणासी उद्धरावे।। बहुत जन्माचे शेवटी। नरदेह पुण्यकोटी।। रामदास म्हणे आता। पुढती न लाभे मागुता।।'- श्रीसमर्थ, 'अनंत जन्माचे शेवट पाहता। नरदेह हाता आला तुझ्या।। करा हरीभक्ती परलोकी येइल कामा। सोडवील यमापासोनीया।। तुका म्हणे करा आयुष्याचे मोल। नका वेचू बोल नामावीण।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही हा नरदेह आत्मज्ञानासाठी, परमार्थासाठी वापरला तरच हा अनंत जन्माचे शेवटी प्राप्त झालेला नरदेह अखेरचा-शेवटचा ठरणार. जन्ममरण या चक्रातून - संसारातून आपली सुटका होणार. ***('देह परमार्थी लाविले। तरीच याचे सार्थक जाले। नाहीतर हे वेर्थची गेले। नाना आघाते मृत्यूपंथे।।'- श्रीसमर्थ)*** हा दुर्लभ नरदेह प्राप्त झालेला असताना बाहेरची विविधरंगी प्रापंचिक दृश्याची गंमत न पाहताना आत वळून नरदेहातील गंमत पाहण्याची बुद्धी होणे ही अत्यंत दुर्लभ गोष्ट आहे. ***('इहलोकी नरदेह। हा तो दुर्लभची पाहे।। नरदेहीचे भजन। हे तो दुर्लभची जाण।। नरदेही गुरुप्राप्ती। हे तो दुर्लभ निश्चिती।। दासा गुरुनामी प्रिती। दावी दुर्लभ प्रचिती।।'- श्रीमामामहाराज, 'भरतखंडी नरदेहप्राप्ती। हे परमभाग्याची संपत्ती। तेथेही विवेकू परमार्थी। त्याचा वंशवर्ती मी परमात्मा।।' - श्रीनाथमहाराज, 'बहुत मजा नरतनमो प्रभुजी बहुता मजा नरतनमो। नही सुख घर धनमो।। नरतनू अंदर सबकुछ देखे। चंद्र सुरज नयननमो।। हिरा तारा लाल पसारा। रंग उडत चेतनमो।। गगन फोडकर बिजली चमके। हुआ उजालो वनमो।। घंटा सिंह नाद उठे जहू। मस्त हुआ अब मनमो।। सद्गुरु बालक दास कहत है। झुटा पसारा जगमो।।'- श्रीचिमडमहाराज)*** दृश्य व देव यांच्या सीमेवरती महाकारणदेहात शून्यावस्थेत आत्म्याचे वेगळेपणाने नादाचे (सीमगानाचे) व नादश्रवणी तदाकारता साधून प्रकाशाचे (संतांचे घरातील तमाशा-दृश्य) जे अनुभव घेतात, जे नामाच्या ठिकाणी रूपाची प्रचिती घेतात, श्रवणात पेरलेले ज्यांचे नयनात उगवते त्यांचा हा संपूर्ण मनोलयाने परमार्थात पूर्णता प्राप्त होऊन अखेरचा जन्म ठरतो. ***('नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'श्रवणी पेरीले नयनी उगवले नाना रूपे जसे। जिकडे पाहे तिकडे अवघे ब्रह्मची भरिले असे।'।- संतवचन, 'प्राणापानामाजी मनाचे मिलन। परमार्थ पूर्ण तये ठायी।।'- श्रीदासराममहाराज, 'अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाही जन्ममृत्यूची। आणि पदवी सायोज्यतेची। सन्निधची लाभे।।'- श्रीसमर्थ)***

✻✻

# सीमगान

भगवान शंकरांनी 'काम' नावाच्या राक्षसाचा वध केला. त्याला चितेवर ठेवून सर्व देवांनी आनंदाने ओंकाराचा-प्रणवाचा उच्चार करीत चितेभोवती तीन फेऱ्या काढल्या. त्याचे प्रतीक म्हणून हा शिमग्याचा सण साजरा केला जातो. सद्य परिस्थितीत या 'काम' नाहीशा करणाऱ्या पवित्र सणाला विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. नित्य ओंकार श्रवण बाजूला राहून बोंब सुरू झाली आहे. अंतरात दृश्य व देव यांच्या सीमेवरती तुर्यावस्थेत शून्यत्वाचे ठिकाणी कोणस्थानी महाकारणदेहात हे शिवाचे अंतरीचे रामनाम (चैतन्याचा अनुहत ध्वनी) सर्वसाक्षी मनाला वेगळेपणाने श्रुत झाले तर या कामाचे दहन होते. खरा शिमगा साजरा होतो. ***('वाजतसे बोंब कोणी नायकती कानी। राम राम न म्हणती तया थोर झाली हानी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'शिमगीयाचे दिनी। म्हणा रामकृष्ण कोणी।। महाशब्द उच्चारण। कैचे भुलले अज्ञान।। गजरे महाशब्द करी। एका जनार्दनी हरी।।'- श्रीनाथमहाराज, 'जरी चार पळ साधेल पवन। होतील श्रवण दशनाद।। जरी आठ पळ साधेल पवन। होत असे दहन कामाचे ते।।'- श्रीमामामहाराज, 'शून्य मेहलमे दीप विराजे। बाजे अनुहात ढोल।।' श्रीसंत कबीर, 'इकडे दृश्य तिकडे देव। मध्ये शून्यत्वाचा ठाव। तयास प्राणी मंदबुद्धीस्तव। ब्रह्म म्हणे।।'- श्रीसमर्थ)*** कोणस्थानी वाजणारी बोंब न ऐकता आम्ही दुसऱ्याच्या नावाने बोंब मारली, होळीभोवती अभद्र बोललो तर रामभद्र कधी भेटेल काय? शिवाच्या मनीचे नाम गाणे म्हणजे शिमगा आहे. आम्ही आमच्या मनात जे असते ते करतो, बोलतो. मग आमचे व्हायचे तेच होते. श्रीमामामहाराज शिमगा म्हणजे काय हे असे सांगतात, ***'बोलती अभद्र इच्छीताती भद्र। तया रामभद्र केवी मिळे। शिवाचे मनीचे गाई नाम वाचे। सणी शिमगीयाचे तेची धन्य।।'.*** विशेष म्हणजे आम्हा केळकरांचे घरात या विकृत होळीची चाल नाही. अंतरातील काम नाहीसा होणे म्हणजे शिवाचे मनीचे गाणे आहे. या अंतर्यामी साजऱ्या होणाऱ्या होळीचे वर्णन श्रीदासराममहाराज श्रीनाथमहाराजांचे व श्रीसमर्थांचे पदांचे आधारे करीत. ती पदे पुढीलप्रमाणे, ***'सत्व गाठी उमगा। तेणे सफल होईल शिमगा। तुम्ही हेच गाणे गा। तुम्ही हसू नका हसू नका।। भूत सभेची कारटी। विषय गोवऱ्या चोरटी। उतरा कुकर्माची रहाटी। तुम्ही हसू नका हसू नका।। जागोजागी थांबा। अवघ्या मिळोनी मारा बोंबा। न जळे एरंडाच्या कोंभा। तुम्ही हसू नका हसू नका।। गावचा पाटील कोळी। काळोबाची पिकली पोळी। तुमची पाजळू द्या होळी। तुम्ही हसू नका हसू नका।। ओटीत घेऊनी गुलाल। सख्या मेहुणीसंगे भुलाल। तिचा नवरा मोठा जलाल। तुम्ही हसू नका हसू नका।। एका जनार्दनी पोरात। गाणे गाता हाल मस्त। नाहीतर भडवे समस्त। तुम्ही हसू नका हसू नका।।', 'अवघेची बोंबलती। होळी भोवती भोवती।। माया होळी प्रज्वाळिली। सृष्टी वेढारे लाविली।। होळीमध्ये खाजे आहे। ते तू विचारोनी पाहे।। खाजे खाता सुख होये। परी कठीण हाता नये। खोल दृष्टीने पाहिले। खाजे त्याच्या हाता आले।। रामी रामदासी होळी। केली संसाराची धुळी।।'***

**

# तमाशा

आम्ही समजतो तो तमाशा पाहून कधीही देव भेटणार नाही. हा विश्वाचा तमाशा पाहून द्वैताची जाणीव होते मग तो अद्वैत कसा भेटणार? हा दृश्याचा तमाशा आपण पाहतोय याचा अर्थच तो दिसत नाही आहे. ***('ते आघवेची दिसणे। जयाते का न देखणे। विश्व भासतसे जेणे। लपालेनी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** देव पाहणे - देवरूप होणे हे जर आपले ध्येय असेल तर या बाह्य दृश्यात गुंतून चालणार नाही. शाळेला जाताना जर वाटेत इतर गोष्टी पाहण्यातच आपण रमलो तर शाळेला उशीर होऊन शालेय शिक्षण नीट होणार नाही. अभ्यास नीट न झाल्याने शाळेत आपण रमणार नाही. शिक्षण पुरे करायचे असेल तर हे इतर दृश्य - तमाशा - मनातून काढावेच लागेल. ***('शाळेला जाताना मुलानी वाटेत। तमाशा पाहात बसू नये।।'- जुन्या काळातील श्रीदादांचे कीर्तनात उद्धृत होणारी कविता)*** हे बाह्य दृश्य ओलांडल्यावर दृश्य व देव यांचेमध्ये जे शून्य भासमान होते त्या शून्यामध्ये जे चैतन्याचे नाद वेगळेपणाने अनुभवाला येतात, जे चैतन्याचे प्रकाशाचे वेगळेपणाने अनुभव येतात, त्याचा मागोवा घेत संत हे परब्रह्मरूप झाले. देव व दृश्य यांचेमध्ये येणाऱ्या या शून्याचा शोध संतांनी घेतला. ***('इकडे दृश्य तिकडे देव। मध्ये शुन्यत्वाचा ठाव। तयास प्राणी मंदबुद्धीस्तव। ब्रह्म म्हणे।।', 'आधी दृश्य सोडिले। मग शुन्यत्व वोलांडिले। मूळमायेपरते देखिले। परब्रह्म।।'- श्रीसमर्थ, 'शून्य शोधिले नाही जेणे। काय विवरण केले तेणे। अज्ञान मूर्खपणे। गाढव जिणे पशुचे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'शुन्य मेहलमे दीप बिराजे। बाजे अनुहात ढोल।।'- श्रीसंत कबीर)*** हा जो वेगळेपणाने परब्रह्माचा दृश्य स्वरूपात अनुभव येतो त्याला श्रीतुकाराममहाराज 'निर्गुणपुरातील संतांच्या घरचा तमाशा' म्हणतात. श्रीतुकाराममहाराज या निर्गुणपुरातील रहिवासी वाणी होते. हे आपण लक्षात घ्यावे. ते सांगतात, ***'आम्ही निर्गुणपुरीचे वाणी। आमुचा जिन्नस घ्यारे कोणी।।'.*** हा निर्गुणपुरातील तमाशा कसा होता याचे वर्णन श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'तमाशा संताघरी निर्गुणपुरी। गावावर एक बाभूळ। खाली शेंडा वरती मूळ। आधी कळस मग देऊळ। गत हे न्यारी। फुला आधी गुंफिला तुरा। याचा अर्थ करी चातुरा। कोण असेल पुरा। खोवील शिरी।। घोडा रोवून बांधिला खुंट। नगाऱ्यावर चढविला उंट। कोण पुतळा असेल बळीवंत। अर्थ विचारी।। दिवा वाऱ्या घाली खेव। ह्याचा घ्यावा अनुभव। तुका वैकुंठीचा राव। गत आहे न्यारी।।'*** संत कबीर या तमाशाबद्दल असे सांगतात, ***'गगनमंडलमो करो बासा। दुजा देखो अजब तमाशा।।'.*** साधनाभ्यासाने प्रथम गगनी नादश्रवण (सीमगान) व नंतर नादश्रवणी तदाकारता साधून नामाचा बिंदू घडून गगनी प्रकाशरूपाने दृश्य रूपाचा (तमाशा) साक्षात्कार सर्वसाक्षी मनाला वेगळेपणाने झाला तर मन संपूर्णपणे मुरते. त्याचा वेगळेपणा संपतो. तो आकाशरूप होतो, परब्रह्मरूप होतो. नरदेह शेवटचा ठरतो. ***('नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।'- श्रीतुकाराममहाराज, 'गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।।', 'नभाचे शून्यत्व गिळोन। गुणत्रयाते नुरवून। ते शून्यते महाशून्य। श्रुतीवचनसंमत।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'वेगळेपणानी पहावे। तयासी आकाश म्हणावे। अभिन्न होता स्वभावे। आकाशब्रह्म।।' - श्रीसमर्थ)***

**

# स्वरूप पाहणे

मनाच्या अस्तित्वामुळे अंतरात असणाऱ्या कल्पनेने डोळ्याला जागृतीत होणारे आकारज्ञान किंवा मनाच्या अस्तित्वावर कल्पनेने होणारे स्वप्नातील आकारज्ञान किंवा डोळे मिटल्यावर किंवा उघडे असताना कल्पनेने जे आकार पाहतो ते सारे कल्पनेच्या निरासाबरोबर नाहीसे होणारे आहेत. कल्पनेच्या निरासाबरोबर नाश पावणारे कधीही स्वरूप असू शकत नाही कारण स्वरूप हे सदासर्वकाळ असणारे अविनाशी आहे. निसर्गत: जेव्हा मनोलय साधतो, मन निर्विचार होते, तेव्हा डोळ्यावर झापड येते व आपण निद्राधीन होतो. घोररूपाने आत्माराम प्रगट होतो व आपण बिनघोर होतो. जागृत होताच आपणास कल्पनेने घोर लागतो व आत्माराम बिनघोर होतो. अर्थात जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीनही अवस्थेत आत्मदर्शन - स्वरूपदर्शन होत नाही. ***('दृष्टीस दिसे ते निरसे। येतद्विषयी श्रुती असे। म्हणोन जे दृष्टीस दिसे। ते स्वरूप नव्हे।।', 'जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ, 'जागृती स्वप्न सुषुप्ती नाठवे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'स्वप्नी रे पाहता मिथ्या नगरी निद्रा घोर झाला राम। जागृत होता काहीच नाही जेथील तेथे गेला राम।।'- संतवचन)*** साकार दिसणाऱ्या चराचराचे जे मूळ आहे, जेथून हे चराचर निर्माण झाले, त्या निश्चळ परब्रह्माला शुद्ध निर्मळ स्वरूप म्हणतात. हे निश्चळ परब्रह्म - शुद्ध निर्मळ स्वरूप हे आपले स्वरूप आहे हे जाणणे म्हणजे शुद्ध स्वरूपज्ञान होय. ***('जे या चराचराचे मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नाव ज्ञान केवळ। वेदांतमते।।', 'ऐक शुद्ध ज्ञानाचे लक्षण। शुद्ध स्वरूपची आपण। या नाव शुद्धस्वरूपज्ञान। जाणिजे श्रोती।।', 'दृश्य पदार्थ वोळखिजे। त्यास पदार्थज्ञान बोलिजे। शुद्ध स्वरूप जाणिजे। या नाव स्वरूपज्ञान।।'- श्रीसमर्थ)*** आपले लक्ष - अनुसंधान - दृश्य जगाकडे असते. त्यामुळे आपणास पदार्थज्ञानाने सर्वत्र द्वैत अनुभवास येते. संतमहात्म्यांचे लक्ष दिसणाऱ्या जगाकडे असत नाही. त्यांचे लक्ष त्यामागे गुप्तरूपाने दडलेल्या सर्वगत चैतन्याकडे असते. त्यांचे अनुसंधान जगदंतरी असते. त्यामुळे त्यांना कोठेही द्वैत आढळत नाही. म्हणून ते जगात असून जगावेगळे असतात. ***('सदा स्वरूपानुसंधान। हे मुख्य साधूंचे लक्षण। जनी असोन आपण। जनावेगळा।', 'सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचे निरसन। अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेचि शुद्ध कल्पना।।'- श्रीसमर्थ)*** सदा स्वरूपानुसंधान साधणेसाठी साधकाला त्रिगुणांच्या पलीकडील चौथा गुण प्राप्त होणे गरजेचे आहे. तो शुद्ध सत्त्व गुणच अहर्निशी परमार्थ - सदा स्वरूपानुसंधान - घडवू शकतो. हे त्रिगुण जे आहेत ते आपल्या श्वसनामध्ये आहेत. या त्रिगुणांचा निरास होण्यासाठी या श्वसनाचा - साधनाचा - अभ्यास होणे गरजेचे आहे. साधनाचे अभ्यासाने त्रिविध झालेले जीवन एकवीध होणे - जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था होणे - त्रिगुणांचा निरास होणे - हे साधल्याशिवाय अहर्निशी परमार्थ (सदास्वरूपानुसंधान) प्राप्त होणार नाही. सदास्वरूपानुसंधान हे तुर्यावस्थेचे लक्षण आहे. तुर्यावस्थेत साधकाला निरनिराळे आत्म्याचे - सगुण ब्रह्माचे - आकाशाचे - अनुभव प्राप्त होतात. वेगळेपणाने अनुभव प्राप्त होणे हे अजून द्वैत असल्याचेच लक्षण आहे. जेव्हा तुर्येमध्ये असणाऱ्या सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते तेव्हा तुर्येमध्ये असणारी ज्ञानाची जाणीव नाहीशी होते. ज्ञानाचे विज्ञान होते. तो साधक स्वरूपाकार होतो. यालाच स्वरूप पाहणे असे म्हणतात. असे जे स्वरूपदर्शनाने देहाकार जाऊन स्वरूपाकार होतात, त्यांना सिद्ध म्हणतात. असे जे स्वरूपाकार होतात त्यांना मरण असत नाही, ते अजरामर असतात.

**

# बीज उमगणे

ज्यातून विश्वाची निर्मिती झाली असे जे गूढतत्त्व त्याला चराचराचे मूळ - विश्वबीज म्हणतात. हे विश्वबीज उमगणे म्हणजेच आपले 'स्वरूप पाहणे' होय. आपले कारण जे आपले स्वरूप आहे तेच विश्वाचे कारण आहे. भगवद्गीता विश्वबीजाबद्दल असे सांगते, ***'यत्च अपि सर्वभूतानाम् बीजम तत् अहम् अर्जुन। न तत् अस्ति विना यत् स्यात् मया भूतम् चराचरम्।।'*** तर ज्ञानेश्वरी या विश्वबीजाबद्दल असे सांगते, ***'ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा। जिया विश्वबीजाचिया कोंभा। साऊली केली।।'.*** हे विश्वबीज ज्यांना उमगते, त्यांना विश्वगुरु म्हणतात. श्रीतुकाराममहाराज, श्रीतुकाराममहाराजांचे अवतार भगवान सद्गुरु निंबरगीकर महाराज यांनी विश्वबीजाची उकल करून दाखविली म्हणून ते विश्वगुरु. या विश्वाच्या उत्पत्तीचे रहस्य भगवान सद्गुरु निंबरगीकरमहाराजांनी श्रीदासराममहाराजांना श्रीगुरुलिंगगीतेत 'बंदेयु उत्पत्ती' या पदात श्रुत केले व त्याचा विस्तार श्रीदासराममहाराजांनी 'नासदीयसूक्त भावार्थ' या ग्रंथात केला आहे. हे विश्वबीज श्रीतुकाराममहाराजांनी अनुभवले म्हणून त्यांनी 'श्रीतुकाराम बीज' साधली. आज श्रीतुकाराम बीज आहे. श्रीतुकाराममहाराज सदेह वैकुंठाला गेले, तो आजचा दिवस. श्रीतुकाराममहाराजांना आयुष्यभर विरोधच सहन करावा लागला. म्हणून त्यांनी सदेह वैकुंठारोहण केले ते संवत्सरसुध्दा 'विरोधीनाम संवत्सर'. संतमहात्म्यांचे निर्वाणाचे संवत्सरसुद्धा बोलके असते. ***('रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।।'- श्रीतुकाराममहाराज)*** लोकांचा एवढा विरोध असताना लोकांनी सुखात राहावे अशी अपेक्षा श्रीतुकाराममहाराज त्यांचे निर्याणाचे अभंगात व्यक्त करतात. ते म्हणतात, ***'घरीची दारीची सुखे तुम्ही नांदा। वडिलासी सांगा दंडवत।।'*** यातच त्यांचे साधुत्व दिसून येते. समाजात एवढे द्वैत होते पण श्रीतुकाराममहाराजांनी या द्वैतात अद्वैत अनुभविले, प्रतिपादिले, हे केवढे विशेष आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'तुका म्हणे जे जे भेटे। ते ते वाटे मी ऐसे।।'*** ज्यामुळे भेद आहेत अशा उपाधीचे - पाखंडाचे - खंडण करून सर्वत्र सारखेपणाने पसरलेल्या अद्वैत चैतन्याचा - धर्माचा सतत अनुभव घेणे हे नामबीज त्यांनी जोपासले. वासनेचे बीज जळून गेले म्हणजेच हे नामबीज सापडते. श्रीतुकाराममहाराजांनी द्वैतात अद्वैत साधले म्हणून श्रीतुकाराममहाराजांची बीज. ***('बीज साधी तुकाराम। दासा वैभवाचे धाम।।' - श्रीमामामहाराज)*** भावबळाने अवस्थात्रयी सावधान हे भजन पूजन साधून त्यांनी कळीकाळावर मात केली. ते स्वरूपाकार पांडुरंगरूप झाले. ***('भजनपूजन नेणे। काय स्वरूपासी जाणे।।', 'भजनपूजन साधुनी बळे। जिंकियेले कळीकाळ।।', 'आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग। त्याचे भजन राहिना। मूळ स्वभाव जाईना।।'- श्रीतुकाराममहाराज, 'अवस्थात्रयी सावधान। हेचि भगवंताचे भजन। हेचि परमात्म्याचे पूजन। हेचि समाधान जीवाशीवाचे।।'- श्रीनाथमहाराज)*** श्रीतुकाराममहाराज पांडुरंगरूप झाले हा अनुभव त्यांच्या अधिकारी शिष्या बहिणाबाई व पहिल्या १४ टाळकऱ्यांपैकी विद्वान संत श्रीरामेश्वरभट्ट अनुक्रमे असा सांगतात, ***'बहिणी म्हणे लोक बोलती सकळ। तुकोबा केवळ पांडुरंग।।', 'म्हणे रामेश्वरभट्ट द्विजा। तुका विष्णू नाही दुजा।।'.*** श्रीतुकाराममहाराज सदेह वैकुंठाला गेले हे श्रीतुकाराममहाराजांचे न उलगडणारे कोडे आहे. ही श्रीतुकाराममहाराजांची स्पेशल केस आहे. ***'मागे कविश्वर झाले थोरथोर। नेले कलेवर सांगा कोणी।।', 'तुका बैसला विमानी। संत पहाती लोचनी।।', 'जड देह कैसा घेऊनी। गेला तुकारामवाणी।।'*** आदी वचने सर्व खुलासा करणारी आहेत.

**

# अबोलण्याचे बोलणे

जोवर जाणीव आहे, तोवर बोलणे संपत नाही. तोंड बंद केले म्हणजे बोलणे बंद होत नाही. ***('जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।।'- श्रीसमर्थ)*** देहाच्या, दृश्याच्या जाणीवेने जे मनात येईल ते 'बोलणे' तर चैतन्याच्या जाणीवेने सर्वसाक्षी मनात जे येते ते 'अबोलण्याचे बोलणे'. देहाच्या, दृश्याच्या जाणीवेने जे मनात येते ते कोणालाही बोलता येते. चैतन्याची जाणीव सर्वांना होत नसल्याने अबोलण्याचे बोलणे हे चैतन्य जाणणाऱ्या संतसज्जनांना बोलता येते. सज्जन - सत्स्वरूपाला दाखविणारे जन - ज्यांचे नाव घेतले की माणूस पुण्यवान होतो असे - अबोलण्याचे बोलणे बोलण्यासाठीच अवतरतात. ***('सज्जन यासाठी यासाठी। अवतरले या सृष्टी।। अबोलणे बोलावे। न दिसे दृष्टी ते दावावे।।' - उद्धव चिद्घन, 'पुण्यवंत व्हावे। घेता सज्जनांची नावे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** साधनाने मनोवृत्तीचा निरोध साधल्यावर देहदृश्यादी जाणीवा नाहीशा झाल्यावर राहणारी चैतन्याची शुद्ध जाणीव म्हणजे अबोलण्याचे बोलणे आहे. ***('येकांती मौन धरून बैसे। सावध पाहता कैसे भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती।।', 'उच्चारेवीण जे शब्द। ते जाणावे सहजशब्द। प्रत्यया येती। परंतु नाद काहीच नाही।।'- श्रीसमर्थ)*** या अबोलण्याच्या बोलण्याचे वर्णन श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'तुका म्हणे आता बोलो अबोलणे। कायावाचामने उरलो नाही।।'.*** आपण जीवे मेल्याशिवाय - जीवपणाचा वियोग झाल्याशिवाय - मीपणा गेल्याशिवाय - हे अबोलण्याचे बोलणे बोलता येत नाही. ***('बोलो अबोलणे मरोनिया जीवे। असोनी नसणे जनी आम्हा।'- श्रीतुकाराममहाराज, 'नवलस्वरूपाचा योग। जीवपणाचा वियोग।।', 'आपण म्हणजे मीपण। मीपण म्हणजे जीवपण। जीवपण म्हणजे अज्ञान। संग जडला।।'- श्रीसमर्थ)*** मनात येईल ते कोणीही बोलतंय. जे सामान्यपणे बोलता येत नाही असे चैतन्याचे जाणीवेतील अबोलण्याचे बोलणे बोलण्यात काही मातब्बरी आहे. ***('बोलवेना ते बोलावे। चालवेना तेथे जावे।।'- श्रीसमर्थ)*** कामक्रोधअभिमानरहित अवस्थेत होणारी चैतन्याची जाणीव म्हणजेच रामनामाचे बोलणे आहे. म्हणून रामनामाचे बोलणे हे अबोलण्याचे बोलणे आहे. ***('काहीच न करूनी प्राणी। रामनाम जपे वाणी।।'- श्रीसमर्थ, 'रामनामाचे बोलणे। दास म्हणे अबोलणे।।'- श्रीमामामहाराज, 'राम म्हणता कामक्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** हा जो स्वयमेव रामनामाचा जप आहे तो करणारा कोणी वेगळाच आहे, बोलविता धनी कोणी वेगळाच आहे याची जाणीव असणे, याला अबोलण्याचे बोलणे म्हणतात. ***('साळुंकी ती कैसी बोले मंजुळवाणी। बोलविता धनी वेगळाची।।'- श्रीतुकाराममहाराज, 'तेणे कारणे मी बोलेन। बोली अरूपाचे रूप दाविन। अतिंद्रीय परी भोगवीन। इंद्रियाकरवी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'ओठ कंठ हाले नही। जिव्हा न करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।'- संत कबीर)*** असे रामनाम जो सतत अनुभवतो, ज्याची वाऱ्याची चाल बदलत नाही, त्याठिकाणी शमदम सहजच साध्य होतात. त्याचे वागणे व बोलणे यात फरक असत नाही. म्हणून ते वंदनीय ठरतात. ***('बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।।'- श्रीतुकाराममहाराज)***

**

# सदा वाचे

मनात कल्पना येतात, त्या कल्पना आपण वैखरीतून बोलून दाखवितो. कल्पना संपल्या, दृश्याची जाणीव संपली की बोलणेही संपते. अर्थात ही वाचा अखंडित नाही. ***('जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतूरहित जाले। समाधान।।'- श्रीसमर्थ)*** डोक्यात कल्पना आहेत, चित्तात विषय आहेत आणि आम्ही नाम घेतो आहोत त्याला काही अर्थ नाही. ते स्मरणातले विस्मरणच आहे. चैतन्याचे अज्ञान असताना, चैतन्याची जाणीव नसताना जे आम्ही नाम घेतो त्याने हरीची प्राप्ती होत नाही. डोक्यात कल्पना असताना घेतलेल्या वैखरीच्या नामात सत्य काही असत नाही. सत्य विठोबाचे सत्य नाम या दृश्याचे वर्णन करणाऱ्या वाचेला घेता येत नाही. ***('सत्य तू सत्य तू सत्य तू विठ्ठला। का गा हा दाविला जगदाभास।।', 'सत्य साच खरे नाम विठोबाचे बरे।।' - श्रीतुकाराममहाराज)*** साधनाभ्यासाने कल्पनेचा निरास झाला असता, डोळ्यातील साकार दृश्य नाहीसे होते, कल्पनेने होणारे भास नाहीसे होतात व सर्वसाक्षी मनाला सतत असणाऱ्या कल्पक सत्य स्वरूपाची सतत जाणीव महाकारणदेहात तुर्यावस्थेत होते. ***('जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती नासे। स्वरूप ते असतची असे। सर्वकाळ।।'- श्रीसमर्थ, 'कल्पना सरता होय निर्विकल्प। कल्पक अपाप भेटो येई।।'- श्रीदासराममहाराज)*** चैतन्याची सर्वसाक्षी मनाला होणारी सततची जाणीव - अबोलण्याचे बोलणे - ज्या वाचेने बोलले जाते त्या वाचेला सदा वाचा, अखंडीत वाचा, सत्य वाचा, अनावर वाचा, नित्य वाचा आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. ***('अखंडीत वाचे। विठ्ठल विठ्ठल वदा साचे।।'- श्रीनाथमहाराज, 'अखंडीत वाचे श्रीरामस्मरण। हेचि पै कीर्तन दासालागी।।'- श्रीतात्यासाहेबमहाराज, 'माझी मज झाली अनावर वाचा। छंद या नामाचा लागलासे।।', 'देव माझा मी देवाचा। ऐसी माझी सत्य वाचा।।'- श्रीतुकाराममहाराज, 'एका जनार्दनी नेम। नित्य वाचे रामनाम।।'- श्रीनाथमहाराज)*** या महाकारणदेही असणाऱ्या जाणत्याच्या अखंड जाणीवेने जाणीवेचा - शब्दाचा - ग्रास होतो. जाणले ही वृत्ती तद्रूप होऊन सर्वसाक्षी मनाचे उन्मन व ज्ञानाचे विज्ञान होते. तो निश्चळ परब्रह्मरूप होतो. ***('जाणता जाणता जाणीव जाते। आपली वृत्ती तद्रूप होते। आत्मनिवेदन भक्ती ते। ऐसी आहे।।', 'जेथे ज्ञानचि होते विज्ञान। जेथे मनचि होते उन्मन। तेथे कैचे चंचळपण। आत्मयासी।।'- श्रीसमर्थ)*** देहाच्या, दृश्याच्या, चैतन्याच्या जाणीवेचा जेव्हा ग्रास होतो तेव्हा उन्मनी अवस्थेत विठोबाच्या खुणा (अनुभव) प्राप्त होतात. ***('तुका म्हणे सांडा जाणीवेचा शीण। विठोबाची खूण पावती संत।।'- श्रीतुकाराममहाराज, 'उन्मनीच्या सुखाआत। पांडुरंग भेटी देत।।'- संत जनाबाई, 'साच लटीके दोनी। न बोले जाला मौनी। जे भोगिता उन्मनी। आरायेना।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संत वाङ्मयात जे इंद्रियांचे उल्लेख येतात, ते या जड देहाच्या इंद्रियांचे असत नाहीत. चैतन्याचा अनुभव या जड देहाच्या इंद्रियांना घेता येत नाही. ***'हे शब्देवीण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे। बोलाआदी झोंबिजे। प्रमेयासी।।'*** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाप्रमाणे चैतन्याचा अनुभव घ्यावा लागतो. येथे बोलणारी वाचा वायुरूप चैतन्याची, ऐकणारे श्रवण वायुरूप चैतन्याचे, पाहणारे नयन वायुरूप चैतन्याचे, ज्या हृदयात साधना घडते तेही वायुरुप, कंठही वायुरूपच. चैतन्याने चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूती घेणे हा श्रीदासराममहाराजांचा निखळ परमार्थ आहे. या परमार्थात देहाची लुडबूड चालत नाही. मात्र देहात चैतन्य असताना देहातीत होऊन चैतन्याची अनुभूती घ्यावयाची आहे.

**

# रंग उन्मनीचा

व्यवहारात प्रत्येकाचा रंग वेगळा असतो व तो सारखा बदलणारा असतो. मनुष्य सरड्याप्रमाणे परिस्थितीनुसार रंग बदलतो. मनाच्या प्रसन्नतेनुसार तो निरनिराळे रंग अनुभवतो. शोककारक घटना घरात घडली की रंगाचा बेरंग होतो तर आल्हाददायक घटना घडली की मन रंगात येते. या मनोवृत्तीने सुखदु:खाचे बदलणारे रंग आपण अनुभवतो व श्रीरंगाच्या रंगाला मुकतो. स: अहं अहं स: या महान गुरुपादुकांचे ठिकाणी मन जर रंगून गेले, मनाचे उन्मन जर झाले, निवृत्ती अवस्था जर प्राप्त झाली तर जन्ममरणरहित अवस्थेत सर्वसाक्षी मन - पाहता मन - श्रीरंगाचा रंग अनुभवते. मन रामरंगी रंगून जाते व मन रामरूप होते. ***('मन जडले गुरुपायी आता। जन्ममरण मज नाही नाही।। रक्तश्वेत झाली मिळणी। शाम सुनीळ केली आटणी।। पीत प्रभा लखलखाट। तोचि माझा उन्मनीधाट।।'- श्रीमुकुंदराज, 'बा फसवू नको तू या श्रीरंगा रंग तयाचा समजूनी घे। रंगी रंगता काय उणे मग तुझा तुला तू समजोनी घे।। नामस्मरणे त्यासी स्मरता रामरंगी मन हे रंगे रे। गोविंदाचे भवभय भंगे त्यासी कथीले श्रीरंगे रे।।'- श्रीमामामहाराज, 'मन रामी रंगले। अवघे मनची राम झाले।।'- श्रीनाथमहाराज, 'रामरंगी रंगले मन हो रामरंगी रंगले। आत्मरंगी रंगले मन विश्वरंगी रंगले।।'- संतवचन)*** आता मन रामरूप झाल्यावर ते सुखदु:खाचे निरनिराळे रंग दाखवेल का? बाह्यत: कोणताही प्रसंग येवो, त्याचे मन आत्मरंगी अखंड आनंदात असते. एक श्रीरंगाचे ठिकाणी मन रंगल्यावर अवघा रंग एकच होणार ना? ***('अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग।।', 'आम्ही आमुच्या रंगात असतो। अखंड आनंदात।।'- संतवचन)*** देहभाव - शरीरभाव - जर हारपला तर अवघा रंग एक होतो, सारे रंग एकत्र येतात व पांडुरंगाची अनुभूती येते. ***('एका जनार्दनी देह हारपला। होवोनी राहिला पांडुरंग।।'- श्रीनाथमहाराज)*** गुरुंच्यामार्फत (द्वारा) हा अनुभव प्राप्त होतो. ***('रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारी। मध्यरात्रीसी सूर्य प्रबळला प्रभा पडली भारी।।'- श्रीगोपालनाथ)*** व्यवहार बदलणाऱ्या बहिरंगावर चालतो तर अध्यात्म हे सारे न बदलणाऱ्या अंतरंगावर चालते. ***('उस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।।'- संत चोखामेळा, 'तैसे अध्यात्मशास्त्रीये। अंतरंगची अधिकारीये। परी लोकू वाक्चातुर्ये। होईल सुखिया।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** सर्व संत हे अंतररंगातच रंगून गेलेले असतात. ***('रंग लुटीला बहुती। शुक नारदादी संती। तुका लुटीताहे रंग। साह्य झाला पांडुरंग।।', 'रंगला या रंगे। तुका विठ्ठल सर्वांगे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** उन्मनीचा रंग ज्यानी अनुभवला अशा संतांच्या - वैष्णवांच्या कीर्तनात रंग भरतो आणि श्रोता आणि वक्ता स्वये श्रीरंगच होऊन जातात. ***('नित्य नवा कीर्तनी कैचा वोढवला रंग। श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग।।'- श्रीनाथमहाराज, 'रंग भरे कीर्तनात। प्रेमे हरीदास नाचत।।'- संतवचन, 'नाचु कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' श्रीनामदेवमहाराज)*** या कीर्तनरंगात भक्त नाचतील यात विशेष नाही देवपण भक्ताबरोबर प्रेमाने नाचतात हे केवढे विशेष. ***('अभंग बोलता कीर्तनी रंग भरला। प्रेमाचेनी छंदे देव नाचू लागला।।'- संत जनाबाई)*** उन्मनी अवस्थेत अनुभवाला येणारी रंगपंचमी ही परमार्थात पूर्णता प्राप्त करून देणारीच ठरते. रंगपंचमी हा सण सर्वात शेवटी अनुभवाला येणारा आहे. उन्मनीच्या सुखात पांडुरंगाची भेट झाल्यावर त्या भक्ताला मिळवायचे काही उरत नाही. ***('सणांचा शेवट रंगाची पंचमी। रंग मिळे नामी रंगा तेथे।।'- संतवचन)***

**

# एका भावे त्याचा

सद्‌गुरुचे पायाशी नमन करून - मन सद्‌गुरुंचे स्वाधीन करून - श्रीनाथमहाराजांनी उन्मनीचा रंग अनुभवला व तो नित्यकीर्तनाचे माध्यमातून तीन तपे सर्वांना लुटला. कीर्तनात रंगून वक्ता तर श्रीरंग परमात्म्याचा अनुभव घ्यायचाच पण श्रोत्यांनासुद्धा श्रीरंगाचा अनुभव यायचा, हे केवढे विशेष. नुसते नमन रागदारीत आळवून नमन होत नाही तर मनाचे मनत्व नाहीसे झाले तर नमन होते व मग पूर्वरंग व उत्तररंग अनुभवता येतो. ***('एका जनार्दनी नमन। मन केले त्या अधीन।।', 'नित्य नवा कीर्तनी कैचा वोढवला रंग। श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग।।'- श्रीनाथमहाराज, 'मन ठेवून ईश्वरी। जो कोणी हरीकथा करी। तोचि ये संसारी। धन्य झाला।।'- श्रीसमर्थ)*** नमन झाले तर अंतरात एकभाव - मुख्यभाव - प्रगट होतो, देवाचा अनुभव येतो. मग भक्तीज्ञानाच्या गोष्टी बोलण्यात अर्थ आहे हो, नाहीतर नुसती पोपटपंची, अनुभवावाचून बडबड काय कामाची. ***('नमन हाची अनुभव। नमन हाची मुख्यभाव। नमन हाची देव। देवाधिदेव पावसी।।'- श्रीनामदेवमहाराज, 'भावेवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती। बळेवीण शक्ती बोलो नये।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'भक्तीज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।।'- श्रीनाथमहाराज)*** नमनाने एकाची अनुभूती देणारा एकभाव, ज्यात कधी बदल होत नाही असा एकभाव - मुख्यभाव - दृढभाव - प्रगट होतो. नमन झाले तर सर्वत्र एका आत्मरूपाची अनुभूती येते, 'पाहणे आपणासी आपण' हे समर्थज्ञान घडते, 'जन नोहे अवघाची जनार्दन' ही निजखूण बाणते. मग अशा संतांना कोणी परका-दुसरा - वाटेल का? त्यांना कोणाचाही राग येत नाही. शांती हा त्यांचा स्थायीभाव होतो. अक्षय शांतीने अक्षय सुखसमाधान त्यांना प्राप्त होते. सर्वत्र निर्वैरता ते अनुभवतात. ***('जववरी द्वैताचे भान। तववरी विरोधाचे कारण। अवघा एकचि आपण। तेथ वैरी कोण कोणाचा।', 'जे भेदाचे निराकारण। तेची निर्वैरतेचे लक्षण। उध्दवा सत्य जाण। निर्वैरपण या नाव।।', 'परमार्थाची मुख्यत्वे स्थिती। पाहिजे गा परमशांती। ते शांतीची उत्कटगती। दावी लोकाप्रती आचरोनी।।'- श्रीनाथमहाराज, 'ते शांती पै गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया अंगा। तै ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुषु।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरी। साधुजन वर्तती।।'- श्रीसमर्थ)*** कोणतीही परिस्थिती येवो, कामक्रोधरहित अवस्था हे देवाचे अद्वय भजन, ही नामस्मरणाची स्थिती त्यांनी अनुस्यूतपणे सतत अनुभवली. भांडताना, कांडताना, गाताना, कोणतेही काम करताना, एवढेच काय देहत्यागाअंती हरीनामस्मरण. जागृती, स्वप्न, सुषुप्ती कोणतीही अवस्था असू दे, ज्ञान फक्त रामाचेच - हरीचेच, याला म्हणायचे एकभाव. अखंड स्मरणाने - अद्वय भजनाने पूर्ण शांती अनुभवून श्रीनाथमहाराज ब्रह्मरूप झाले. कामक्रोधादी षड्‌विकारावर मात करून - सहा जिंकून - त्यांनी कळिकाळावर मात केली. म्हणून श्रीनाथमहाराजांनी षष्ठी साधली. श्रीनाथमहाराजांनी महानिर्वाण केले ती कथासुद्धा मोठी विलक्षण आहे. श्रीनाथमहाराज भजन करीत गोदातीराला आले. तेथे त्यांनी कीर्तन केले, ***'हरी हरी बोला नातरी अबोला। व्यर्थ गलबला करू नका।।', 'हरी बोला एकांती हरी बोला लोकांती। देहत्यागाअंती हरी बोला।।'*** असा उपदेश केला व श्रीनाथमहाराज अखंड कीर्तनाचे अनुसंधानात गोदारूप झाले.

✻✻

# कलीयुग

कलीयुगामुळे सत्य औषधालाही शिल्लक राहिले नाही. असत्य जगच सत्य मानले जाऊ लागले. सत्य ब्रह्म आहे का नाही याबद्दल शंका येऊ लागली. साक्षात्कारापेक्षा चमत्काराचे महत्त्व वाढले. निर्दोष राहणे हाच दोष मानला जाऊ लागला. अनीतीने वागणे हीच नीती झाली. ***'पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा। वेश्येला बहुमान'*** असे अजब सरकारी न्याय मिळू लागले. 'अधर्म करणे' हाच, धर्म झाला. स्वरूपी राहणे हा स्वधर्म बुडाला. माणसाच्या वागण्यातील ताळतंत्र सुटल्याने निसर्गाने ताळतंत्र सोडला. पर्वतानी जागा सोडली, समुद्रांनी मर्यादा ओलांडली. पावसाची, पिकाची शाश्वती राहिली नाही. कलीयुगी प्रथम चरणे एवढी अधोगती झाली आहे. पूर्ण अवतरल्यावर काय अवस्था होईल? कलीयुग हा दोषांचा अथांग सिंधू आहे त्याठिकाणी धर्मसिंधू काय रडणार? कलीयुगाचे वर्णन श्रीतुकाराममहाराज असे करतात, ***'कलीयुगामुळे। झाले सत्याचे वाटोळे।। दोष झाले बळीवंत। नाही ऐसी झाली नीत।। मेघ पडो भिती। पिके सांडियेली क्षिती।। तुका म्हणे काही। वेदा वीर्य शक्ती नाही।।' तर श्रीसमर्थ कलीयुगाचे वर्णन असे करतात, 'आले भगवंताच्या मना। तेथे कोणाचे चालेना।। जैसा कलीराजा जाला। धर्म अवघाची बुडाला।। नितीमर्यादा उडाली। भक्ती देवाची बुडाली।। दास म्हणे पाप जाले। पुण्य अवघेची बुडाले।।'.*** हा कलीचा प्रभाव पाहून मानवाच्या उद्धाराचा मार्ग विचारण्यासाठी सचिंत नारद विष्णूलोकाला विष्णूंकडे गेले. ***('पाहूनी कलीचे विंदान। नारदांचे सचिंत मन।।'- संतवचन, 'बुडताहे जन न देखवे डोळा। म्हणोनी कळवळा येतो मज।।'- श्रीतुकाराममहाराज)*** विष्णूंनी नारदांना मानवोद्धारासाठी कलीयुगी नासाविधीयुक्त नामस्मरणासारखे साधन नाही असे सांगितले. श्रीतुकाराममहाराज या नामस्मरणाचे महत्त्व असे सांगतात, ***'सकळासी येथे आहे अधिकार। कलीयुगी उद्धार हरीच्या नामे।।'*** तर स्वामीसुतमहाराज हे नामाचे महत्त्व असे सांगतात, ***'कलीयुगी हे साधन। नामी जप चरणी मन।।'*** नामघोष ज्यात प्राधान्याने असतो अशा नामसंकीर्तनाचे महत्त्व भगवान असे सांगतात, ***'कलौ तद् हरीकीर्तनात्।'*** या हरीकीर्तनाचे कलीयुगातील महत्त्व सांगणारी संतवचने अशी, ***'कलीयुगामाजी करावे कीर्तन। तेणे नारायण देईल भेटी।।', 'स्वये बोले जगज्जीवन। थोर कलीयुगी कीर्तन।।', 'कलौ कीर्तन वरीष्ठ। जेथे होय ते सभा श्रेष्ठ। कथाश्रवणे नाना नष्ट। संदेह मावळती।।', 'कलीयुग चौथे हे दोषसिंधूची सारा। सकळही नरकांच्या साधनाचा पसारा। परीहरीगुणलिळा सत्कथा यात सारा। सकळ त्यजुनी धंदा कीर्तनी काळ सारा।।'*** कली या शब्दाचा अर्थ कलह, द्वैत आहे. त्या द्वैताशी तादात्म्य असणे म्हणजे कलीयुग. द्वैताशी तादात्म्य असले की युग कोणतेही असो आम्ही कलीयुगातच, अद्वैतानुसंधान - नामानुसंधान जर आपणा सर्वांना साधले तर कलीयुगात सत्ययुग अवतरते. याउलट सत्ययुग असले व सर्वांनी द्वैतानुसंधान - नामविस्मरण साधले तर सत्ययुगाचे कलीयुगच होणार. सत्ययुग म्हणजे सत्य नामाशी तादात्म्य. कलीयुग म्हणजे द्वैताशी - दृश्याशी - तादात्म्य. काय करायचे सत्ययुग का कलीयुग हे आपल्या हातात आहे. ***('नाम विस्मरण द्वैतानुसंधान। कलीयुग जाण तिहीयुगी।।'- श्रीमामामहाराज)***

**

# नामाचा घोष

परमार्थात नाम हे घ्यायचे नसून ते जाणायचे आहे - अनुभवयाचे आहे. ***'नाम जाणे तुकयावाणी। दिले संसाराला पाणी।।' - श्रीतुकाराममहाराज, 'नामा म्हणे तरी सद्गुरुपासोनी। नाम घ्या जाणोनी नाना काही।।' - श्रीनामदेवमहाराज)*** येथे बाहेरच्या संसारावर पाणी सोडायचे नसून संसार-संसरण-जन्ममरण ही क्रिया - शून्यवत होणे, सूक्ष्म होणे अपेक्षित आहे. ***('सोहंहंसाची बोळवण। न करिताच जहाली जाण। येणे पळाले जन्ममरण। शुन्य पडले संसारा।।' - श्रीनाथमहाराज)*** येथे संसाराला पाणी - जीवन दिले म्हणजे संसारात मध्यभागी जीवन अनुभवले तर संजीवन नामाची प्राप्ती होणार आहे. हे संसाराला पाणी कसे द्यायचे हे सद्गुरुंकडून समजून घ्या. हे नाम सर्वांना अनुभवता येत नाही. विष्णुमय जग ज्यांनी अनुभवले, ज्यांनी अद्वैताचा अनुभव घेतला आहे, ते वैष्णव आल्हादाने या नामाचा घोष गगनामध्ये अनुभवतात. ***('विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।।' - श्रीतुकाराममहाराज, 'आल्हादे वैष्णव करिती नामाचा घोष। हरीनाम गर्जता गगनी न समाये हर्ष।।' - श्रीनाथमहाराज, 'नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्यांची।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अहो गगनच गरजायला लागते, त्याला अनुहत - नामाचा घोष - म्हणतात. त्या नामाचा घोष म्हणजे घंटानादश्रवण आहे. ***('त्या नामाचा घोष वाजती घंटिका। सुरू झाला डंका तिही लोकी।।' - श्रीतुकाराममहाराज, 'पश्चिम दिशेसी जाता उजवा ठाकिला मेरु। अनुहात गगन गर्जे थोर उठला गजरु।।' - संतवचन, 'गगनमो आवाज हो रही है। सुनता है गुरुग्यानी गुरुग्यानी।।'' - श्रीकबीरसाहेब)*** हे गगन म्हणजे भुतांतरी असणारा ब्रह्मांश आहे हे आपण लक्षात घ्या. पण हे द्वैतानुसंधान सुटून अद्वैतानुसंधान साधणार कसे? आम्ही अद्वैतात द्वैत अनुभवतो, मग जमायचे कसे? डोक्यातील कल्पना संपूर्णपणे गेली पाहिजे. कल्पनेचा निरास झाला तरच वस्तूची ओळख होणार. द्वैतानुसंधान सुटून अद्वैतानुसंधान साधणार. ***('तैसे ज्ञानाचेनी प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे। मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।।' - श्रीसमर्थ, 'वस्तु ते ओळखा सांडा रे कल्पना।।' - श्रीतुकाराममहाराज)*** खऱ्या अर्थाने नमन झाले, कल्पना नाहीशी झाली तरच आकाशरूप महाकारणदेही असणारे अखंड स्मरण - सदानामघोष - अद्वय भजन किंवा हरीकथा अनुभवता येते. देहात जेथे हा नामघोष निरंतर सुरू आहे, त्याला 'वैष्णवमंदीर' म्हणतात. या नामघोषाकडे जर आपण लक्ष दिले तर या मंदिरातच सुखाचा सुखनिधी सुखसागर भगवान परमात्मा अनुभवाला येतो व साहजिकच आपण दु:खरहित होतो. जन्ममृत्युरहित अवस्थेत त्याला वैकुंठाची - मोक्षाची - प्राप्ती होते. त्याठिकाणी यमधर्मांना - कळीकाळाला प्रवेश असत नाही. ***('धन्य धन्य वैष्णवमंदिर। जेथे नामघोष होय निरंतर।।' - भीमदासमहाराज, 'महाकारणदेही अखंडस्मरण। अद्वय भजन हरिकथा।।' - श्रीदासराममहाराज, 'सदा नामघोष करू हरिकथा। तेणे माझ्या चित्ता समाधान।।' - श्रीतुकाराममहाराज, 'ऐसे माझेनी नामघोषे। नाहिचि करिती विश्वाची दु:खे। अवघे जगची महासुखे। दुमदुमीत भरले।।', 'परी तयापासी पांडवा। मी हारपला गिवसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती माझा।।', 'कही एकाघेनी वैकुंठा जावे। ते तिही वैकुंठची केले आघवे। ऐसे नामघोषगौरवे। धवळले विश्व।।', 'कृष्ण विष्णू हरी गोविंद। या नामाचे निखळ प्रबंध। माजी आत्मचर्चा विशद। उदंड गाती।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'यम सांगे यमदुता। तुम्हा नाही तेथे सत्ता। जेथे होय हरीकथा। सदा घोष नामाचा।।' - श्रीतुकाराममहाराज, 'नामघोष जेथे। देही लक्ष ठेवी तेथे। नाद घुमारा ऐकोनी। लक्ष लावी अलक्ष स्थानी।।' - श्रीदासराममहाराज)***

**

# डोळीयाचा डोळा

ज्या डोळ्याला परमात्मा अनुभवाला येतो, ज्या डोळ्यात ही जडसृष्टी न भरता चैतन्याचे वारेच भरते, त्या डोळ्याला डोळीयाचा डोळा, नयन, ज्ञानदृष्टी, अंतरचक्षू आदी नावांनी संतांनी संबोधिले आहे. ***(‘जो का डोळीयाचा डोळा। तोची दावी घननीळा।।’, ‘वारे भरले या नयनात।’, ‘अंतरचक्षुचे सामर्थ्य। खरा देव दिसे सत्य।।’- श्रीदासराममहाराज, ‘जगी पाहता चर्मचक्षी न लक्षे। जगी पाहता ज्ञानदृष्टी निरीक्षे। जगी पाहता पाहणे जात आहे। मना संत अनंत शोधुनी पाहे।।’- श्रीसमर्थ)*** देहाच्या डोळ्याला हे चैतन्याचे वारे अनुभवता येत नाही. देहाच्या डोळ्यांना फक्त आकाराचे ज्ञान होते. ***(‘चर्मचक्षुने हो पाही। खरा देव दिसत नाही।।’- श्रीदासराममहाराज, ‘अस्थीचा देही मासाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा। तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मुर्ख।।’- श्रीसमर्थ, ‘तैसे स्थूलाकारी नाशिवंते। भरवसा बांधुनी चित्ते। पाहती मज अविनाशाते। तरी कैचा दिसे।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।।’- श्रीदासराममहाराज)*** हे देहाचे डोळे मिटले असता, डोळ्यातील दृश्य नाहीसे झाले असता निर्विकल्प निवृत्ती अवस्थेत प्रवृत्ती नाहीशी झाली असता डोळीयाचा डोळा - नयन - उघडतो. ***(‘डोळा झाकोनिया पाहे। गोपाळ पुढे उभा राहे।।’- संतवचन, ‘डोळे झाकुनी पाहासी जरी तू स्वरूप दिसे पाही। बाप सद्‌गुरु कृपा करील हा लाभ घडे देही।।’- श्रीतात्यासाहेबमहाराज, ‘प्रवृत्तीसी अंध डोळा उघडीला। आनंद जोडिला निवृत्तीचा।।’, ‘प्रवृत्ती जाणीव शुन्य ते नेणीव। तया पैल भाव निवृत्तीचा।।’, ‘प्रवृत्ती बडबड शुन्य वाचा मौन। करणी ते साधन निवृत्तीचे।।’, ‘आकार प्रवृत्ती निराकार शुन्य। तयावरी धन्य निवृत्ती ते।।’- श्रीदासराममहाराज)*** डोळीयाचा डोळा उघडणे तसे अवघडच आहे. जोवर विषयापासून चित्त परावृत्त होत नाही, देहाविषयी, दृश्याविषयी असणारे ममत्व नाहीसे होत नाही तोवर हा डोळा उघडत नाही. ***(‘डोळा उघडेना उघडेना। पश्चात्ताप घडेना।। चिदचिदग्रंथी सुटेना। क्षणभर विषयी चित्त विटेना।। अहं ममता धरणे। नानायोनी जन्मोनी मरणे। निजानंदी रंगेना। निर्मळ निश्चळ भव भंगेना।।’- श्रीनिजानंदमहाराज)*** सद्‌गुरुंनी हा देव दाखविणारा डोळा दिला तरच प्राप्त होतो म्हणून सद्‌गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ***(‘गुरुच्या उपकारा उपकारा। नाहीच पारावरा।। देऊनी आपुला डोळा। डोळा दाखविले घननीळा।।’- संतवचन, ‘डोळीयाचा डोळा उघडीला जेणे। लेवविले लेणे स्वानंदाचे।। नामा म्हणे निकी सापडली सोय। न विसंबे पाय खेचराचे।।’- श्रीनामदेवमहाराज)*** भगवंतांनी अर्जुनाला ज्ञानदृष्टी दिली मगच त्याला विश्वरूपदर्शन झाले, आत्मसुख प्राप्त झाले. ***(‘मग दिव्यचक्षू प्रगटला। तया ज्ञानदृष्टी पाटा फुटला। ययापरी दाविता जाहला। ऐश्वर्य आपुले।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘आत्मसुख घ्या रे उघडा ज्ञानदृष्टी। वाऊगी चाऊटी नका करू।।’- श्रीतुकाराममहाराज)*** हा डोळीयाचा डोळा हाच आपुला खरा डोळा आहे. आपण जे कोणी आत्मरूप चैतन्यरूप आहोत त्या चैतन्याचा डोळा म्हणजे डोळीयाचा डोळा आहे. अर्थात हा डोळा वायुरूप चैतन्याचाच बनला आहे. ***(‘ज्ञानदेव म्हणे डोळियाचा डोळा। वोळखावा डोळा आपुलिया।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याची अनुभूती घेणे हा श्रीदासराममहाराजांचा निखळ परमार्थ आहे.

**

# जागा

ज्यांचा डोळियांचा डोळा उघडला आहे, ज्यांना जडसृष्टी न दिसता चैतन्याचे वारेच जाणवते आहे ते जागे, बाकी सारे निद्रिस्तच. ज्या अवस्था जगजेठी परमात्म्याला पाहू देत नाहीत, त्या साऱ्या निद्रावस्थाच. देहाच्या उघड्या डोळ्यांना जागृती अवस्थेत, देहाचे डोळे मिटून निद्रावस्थेत किंवा स्वप्नावस्थेत चैतन्याची जाणीव होत नाही, जगजेठी परमात्म्याची जाणीव होत नाही. या तीनही अवस्थेत चैतन्याचे अज्ञान असल्याने संतांच्या दृष्टीने या तिन्ही अवस्था म्हणजे निद्रावस्थाच. या तीन अवस्था हा प्रपंचाचा पडदा - कल्पनेचा पडदा - रामाचे दर्शन होऊ देत नाही. ***(‘निद्रा ही रांड खोटी नित्य लागलीसे पाठी। आयुष्य व्यर्थ गेले पाहो नेदी जगजेठी।।’- श्रीचिमडमहाराज, ‘प्रपंच पडदा पडली झापड। राम दिसेना डोळा गे।। दिवसा झोपी रात्री झोपी। झोपेने दिधला टोला रे।।’- श्रीसमर्थ)*** भूतमात्र या तिन्ही अवस्थांमध्ये कल्पना केल्याने स्वरूपाच्या ठिकाणी झोपलेले असतात - स्वरूपाचे अज्ञान असते. तर संतमहात्मा या तिन्ही अवस्थांमध्ये निर्विकल्प स्थितीमध्ये स्वरूपाचे ठिकाणी जागा असतो - स्वरूपाचेच ज्ञान त्याला होते. ***‘जागत राम सोवत राम सपनेमे देखो तो राजाही राम’*** या श्रीनाथमहाराजांचे वचनाप्रमाणे त्याची अवस्था असते. तर भूतजात ज्या दृश्याचे ठिकाणी जागा आहे, ज्या व्यवहाराचे - संसाराचे ठिकाणी जागा आहे, त्या ठिकाणी संतमहात्मा झोपलेला असतो. ***(‘भुतजात माझ्याठायी। कल्पिजे तरी आभासे काही। निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीचि मी आघवे।।’, ‘देखे भुतजात निदेले। तेथेचि जया पाहले। आणि जीव जेथ चेहले। तेथ निद्रितू जो।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** संतमहात्म्यांचे ठिकाणी अखंड (निरंतर) जागृती, अखंड स्मरण, सदा स्वरूपानुसंधान असते. सामान्य माणूस स्वरूपाचे ठिकाणी सदैव निद्राधीनच असतो. संतकृपेनेच हे सदा स्वरूपानुसंधान - अखंड स्मरण - निरंतर जागृती - आपले ठिकाणी निर्माण होऊ शकते. जगद्गुरु शंकराचार्य ही जागृती आपले ठिकाणी श्लोकांचे माध्यमातून अशी निर्माण करतात, ***‘संसारस्वप्नसंकाशं यौवनं कुसुमोपमं। विद्युच्चलमिवायुष्यं तस्माज्जागृही जागृही।।’, ‘कामक्रोधादिकं षटकं देहे तिष्ठती तस्कर। ज्ञानरत्नापहारार्थं तस्माज्जागृही जागृही।।’, ‘आशया बद्धते लोका कर्मणा बहुचिंतया। आयुः क्षणं न जानाति तन्माज्जागृही जागृही।।’, ‘जन्म दुःखं जरा दुःखं जाया दुःखं पुनःपुनः। संसारसागरे दुःखं तस्माज्जागृही जागृही।।’, ‘माता नास्ति पिता नास्ति नास्ति बंधुस्सहोदरः। अर्थो नास्ति गृहं नास्ति तस्माज्जागृही जागृही।।’*** तर आमचे चिमडचे महाराज ही जागृती अशी निर्माण करतात, ***‘उठा उठा साधुजन साधा आपुले निजधन। सांडा आळस उघडा नयन घ्या दर्शन श्रीगुरुचे।।’*** तर संत श्रीकेशवस्वामी ही जागृती अशी पदातून निर्माण करतात, ***‘जाग रे जाग सदा राम मनी जाग। संतसंग धरूनी करी परता भवनाग।। कामक्रोध लोभ यांचा तोडीनी टाकी लाग। परमशीतळ होऊनी मनी भजनवनी वाग।। विसराचा विसर करूनी विसर विसर भाग। केशवराज स्वामी यासी पूर्ण दशा माग।।’.*** ही स्वरूपाचे ठिकाणची अखंड जागृती निर्माण केल्याबद्दलची कृतज्ञता श्रीतुकाराममहाराज अशी व्यक्त करतात, ***‘काय वानु मी या संतांचे उपकार। मज निरंतर जागविती।। काय द्यावे यासी व्हावे उतराई। ठेवितो हा पायी जीव थोडा।।’***

**

# मूर्तीपूजा

बाह्यमनाचा लय साधून मन अंतरी निश्चळ झाल्यावर 'हेतुवीण सत्क्रिया' आचरताना डोळीयाच्या डोळ्यात - नयनात - फक्त चैतन्याचे वारेच भरले असताना होणारे निष्काम सत्कर्म ही सर्वात्मक ईश्वराची पूजा ईश्वराला सर्वात प्रिय आहे. ***('तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्म-कुसुमांची वीरा। पुजा केली होय अपारा। तोषालागी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** एखादी क्रिया मनापासून घडली तर त्याला कर्म म्हणतात. मनोलय झाल्यावर निर्हेतुकपणे जाणीवेतील झोपेत किंवा नेणीवेतील झोपेत एखादी क्रिया घडली तर ती आपण फारशी मनावर घेत नाही. मनोलय झाल्यावर होणारे कर्म हे काही न करण्यासारखे आहे. हे 'काही न करणे' ही खरी पूजा आहे. ***('मन कृतं कृतं कर्म न शरीर कृतं कृतं।।'- योगवासिष्ठ, 'पूजा काही न करणे। स्तुती काही न बोलणे। सन्निधी काही न होणे। तुझ्या ठायी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** 'काही न करणे' ही कामक्रोधरहित अवस्था ही पूजा साधली तर कळीकाळावर मात करून रामनामजप (भजन) अनुभवता येते. हे भजनपूजन साधले तर स्वरूपाचा अनुभव येतो. जगजेठी परमात्मा संतुष्ट होतो. ***('काहीच न करूनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी।।'- श्रीसमर्थ, 'सायास करिसी प्रपंच दिननीशी। हरीसी न भजसी कवण्या गुणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'भजन पूजन नेणे। काय स्वरूपासी जाणे।।', 'भजन पूजन साधूनी बळे। जिंकियेले कळीकाळ।।'- श्रीतुकाराममहाराज)*** ही पूजा चार प्रकाराने होते. ***'उत्तमा सहजा पुजा। मध्यमा ध्यानधारणा। अधमा मानसीपूजा। मूर्तीपूजाधमाधमा।।'.*** हा श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात उध्दृत होणारा श्लोक पुजेच्या चार प्रकारांचे वर्णन करणारा आहे. मनोलय झाल्यावर अद्वैत चैतन्याचा अनुभव येत असल्याने या चारही प्रकारात पुज्यपुजकभाव राहात नाही. हरी - चैतन्याचा वारा - हाच देव, हरी - चैतन्याचा वारा - हाच भक्त. ***('हरी हा आपणची जग झाला।। आपणची देव भक्त होवोनी। पुजितो आपणाला।।'- श्रीकृष्णदयार्णव, 'वाराची देव आमुचा वारा हा भक्त तयाचा।।'- श्रीदासराममहाराज, 'एक बैसे सिंहासनी। एक उभा कर जोडोनी।। एक पुजा स्वीकारीत। एक निजांगे करीत।। मुळी पाहता दोघे एक। परी कौतुक दाखविले।। निळा म्हणे सेवक स्वामी। हे मिथ्या पुरुषोत्तमी।।'- संत निळोबाराय)*** जेव्हा मनोलय साधत नाही तेव्हा अहंपणाने भक्त वेगळा व देव वेगळा अशी पूजा होते. देहावर राहून केलेली कोणत्याही प्रकारची पूजा देवापर्यंत पोचत नाही. मूर्तीपूजा करताना आमच्या आत जे चैतन्य आहे तेच देवाच्या मूर्तीत आहे. याची जाणीव व्हावयास हवी, तर ती खरी पूजा. अहो पाषाणाचा विष्णू केला म्हणजे पाषाण म्हणजे विष्णू का? पाषाणाच्या मूर्तीच्या आत जे चैतन्य आहे तो विष्णू आहे. मूर्तीतील चैतन्याची जाणीव होण्यासाठी आपल्यातील चैतन्याची जाणीव होणे गरजेचे आहे. आपल्यातील चैतन्याची जाणीव नसणाऱ्या देहरूप मायेतील आम्हाला देव दगडाचा वाटतो मग कसली पूजा? ***('देव दगडाचा भक्त हा मायेचा। संदेह दोघांचा फिटे कैसा।।', 'केला पाषाणाचा विष्णू। परी पाषाण नोहे विष्णू। विष्णुची पूजा विष्णुसी अर्पे। पाषाण राहे पाषाणरूपे।।', 'अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव। प्रतिमा तो देव कैसा नोहे।।', 'भू जल तेज समीर ख रविशशी काष्ठादिकी असे भरला। स्थीरचर व्यापुनी अवघा तो परमात्मा दशांगुळे उरला।।'- संतवचन)*** आम्ही देवदर्शनासाठी तीर्थाला जातो पण संशय फिटत नाही व देव काही भेटत नाही. मग देवपूजा कशी होणार? आम्हाला तेथे देवाचे ठिकाणी धोंडा आणि पाणी ही भूते दिसल्यावर देव कसा दिसणार? अर्थात पूजा होत नाही. संतांना मूर्ती दिसत नाही. मूर्तीच्या मागे गुप्तरूपाने असणारे चैतन्य ते पाहतात. त्यांची मूर्तीपूजा देवाला पोचते. ***('म्हणती विठ्ठल पाषाण। त्याच्या तोंडावरी वहाण।''- श्रीतुकाराममहाराज)***

**

# मानसपूजा

उत्तम मनाने उत्तमोत्तम पदार्थ देवाला अर्पण करणे ही खरी मानसपूजा आहे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, ***'पुजा ते करावी मनेची उत्तम। लौकिकाचे काम काय असे।।'*** आपण जे देवाला मनोभावे अर्पण करतो ते देवी प्रत्यक्षात देवाला अर्पण करतात. इतके महत्त्व या मानसपूजेचे आहे. संतांनी भगवद्‌भक्तांनी या मानसपूजेचे महत्त्व अनुभवले आहे. मग आम्हीपण मानसपूजा करतो, पण भगवंतांनी पूजा स्वीकारल्याचा अनुभव आम्हाला कधीच येत नाही, असे का? कारण आमचे मन हे उत्तम मन - सोवळे मन - निवृत्त मन - असत नाही. ***('पृथ्वी सोवळी आकाश सोवळे। मन हे ओवळे अभक्ताचे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** आम्ही भक्त होऊन आमचे मन जर सोवळे झाले तर मानसपूजेचे महत्त्व निश्चित अनुभवाला येणार. आमचे आत्ता जे मन संकल्पाने अशुद्ध आहे ते संकल्परहित शुद्ध व्हावे लागेल. मन शुद्ध झाले तर देहातीत होऊन वस्तूची ओळख निश्चित होणारी आहे. ***('मन संकल्प शुद्ध पै नोहे। एरवी सदोदीत आहे चिदानंदी।।'- श्रीचांगदेवमहाराज, 'शुद्ध करा मन व्हा रे देहातीत। ओळखा वस्तुते तुका म्हणे।।'- श्रीतुकाराममहाराज)*** **मन जर गंगेप्रमाणे शुद्ध बुद्ध शांत प्रवाही झाले तर तेच भगवंताचे रूप आहे, तोच गणराज गणपती आहे.** ***('जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन। भगवंत जाण तयाजवळी।।'- श्रीतुकाराममहाराज, 'इंद्रियामाजी अकरावे। मन ते मी हे जाणावे। भुतामाजी स्वभावे। चेतना ते मी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'आधी मन घेई हाती। तोची गणराज गणपती।।'- श्रीतुकाराममहाराज)*** भगवद्‌रूप मनाने केलेली पूजा (सत्य संकल्प) सत्यात उतरणार हे निश्चित. आम्ही जे कल्पनेने काल्पनिक देवाची पूजा करतो, तेथे सत्य काहीच असत नाही. देव ही काल्पनिक, भक्तही काल्पनिक, पूजाही काल्पनिक मग हाताला काय लागणार? श्रीसमर्थ हे सत्य असे सांगतात, ***'कल्पनेच्या देवा कल्पनेची पूजा। तेथे दुजा कोणी आढळेना।। आढळेना देव आढळेना भक्त। कल्पनेरहित काय आहे।। आहे तैसा आहे कल्पना न साहे। दास म्हणे पाहे अनुभवे।।'.*** अहो आपणाला मनोभोजन चालेल का? काल्पनिक दागिने बायकोला चालतील का? श्रीसमर्थ म्हणतात, ***'आपण भोग भोगिताती साचे रे। देवालागी देती मानसाचे रे।। ऐशा योगे भगवंत केवी भेटे रे।।'.*** भगवंताला मन अर्पण करणे, आपल्याला हे हवे, ते हवे असे मनात येणाऱ्या सर्व कल्पना भगवंताला अर्पण करणे ही खरी मानसपूजा. ***('तू मन बुद्धी साचेसी। जरी माझिया स्वरूपी अर्पिसी। तरी मातेची गा पावसी। हे माझी भाक।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'मने भगवंतास पुजावे। कल्पून सर्वही समर्पावे। मानसपूजेचे जाणावे। लक्षण ऐसे।।', 'जे जे आपणास पाहिजे। ते ते कल्पून वाहिजे। येणे प्रकारे किजे। मानसपूजा।।'- श्रीसमर्थ)*** या मानसपूजेने देव निश्चित भेटतो. श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेली रेवणसिद्धांची मानसपूजा पहा म्हणजे उत्तम मनाने श्रीरेवणसिद्धांना काय अर्पण करावे म्हणजे कोणता प्रसाद प्राप्त होतो हे कळेल. ही पूजा ही अलौकिक व प्राप्तीही अलौकिकच. येथे हृदयातील सोहंहंसात्मक श्रीरेवणसिद्धांना अक्षयसूत्रात्मक रुद्राक्षमाला, जीवनात्मक पयाने स्नान, स्फुरणात्मक प्रबोध सुगंध, मनात्मक बिल्वपत्र, चिदाकाशात्मक परिमळ पुष्प, प्राणात्मक धूप, नादानुसंधानात्मक घंटानाद, सुषुम्नाअग्नेयात्मक दीप, अमृतकलात्मक नैवेद्य, चित्तैक्यात्मक सुरंग तांबूल, अक्षरात्मिका सुवर्णपुष्प दक्षिणा, सोहंभावात्मक अक्षता, अनहतात्मक गंधाक्षत मंत्रपुष्प, पंचमात्रात्मक पंचामृत आदी गोष्टी अर्पण केल्यावर देहभावात्मक निर्माल्यपुष्पांचे विसर्जन होऊन त्यांच्या कृपेचे गंगाजल प्राशन व ज्ञानात्मक भंडाराप्रसाद ग्रहण करता येतो. अशा तऱ्हेने अहंभावातून उद्‌भवलेली मनबुद्धी आत्मलिंगार्पित झाली की जन्ममृत्यू ही येरझार नाहीशी होऊन मोक्षप्राप्ती होणारी आहे.

**

# ध्यानधारणा

व्यवहारात काहीतरी वेगळे (आपण सोडून) मिळवायचे ध्येय असते. जे ध्येय असते, तेच सारखे मनात, ध्यानात असते. आमचे ध्येय संपत्ती मिळवायचे असते. साहजिकच ध्यानात, मनात सारखे संपत्तीचे विषय असतात. मनाच्या माध्यमातून होणाऱ्या द्वैतानुसंधानाने - जगाच्या अनुसंधानाने - सापेक्ष दु:खाची प्राप्ती होते. ***('कांचनाचे ध्यान परस्त्री चिंतन। दु:खासी कारण हेची दोन्ही।।'- श्रीसमर्थ, 'प्रपंचामाजी असते सुख। तरी का त्यजिते सनकादीक। द्वैत तितुके केवळ दु:ख। परमसुख अद्वैती।।'- श्रीनाथमहाराज)*** दृश्याशी तादात्म्य असणारे मन जोवर आहे, तोवर खरे ध्यान साधत नाही. आम्ही काल्पनिक देहधारी देवाची कल्पना करतो व कल्पनेने ध्यान करतो मग काय सार्थक होणार? देव काय या दृश्यातलाच आहे का? साहजिकच देवाबद्दल नाना विकल्प मनात येतात. मग निर्विकल्प कसे होणार? ***('फुटक मन येकवटले। तेणे तुटक ध्यान केले। तेथे कोण सार्थक जाले। पाहाना का।।', 'देवासी देहधारी कल्पिती। तेथे नाना विकल्प उठती। भोगणे-त्यागणे विपत्ती। देहयोगे।।'- श्रीसमर्थ)*** परमार्थात काही मिळवायचे, काही व्हायचे ध्येय असत नाही. 'परमार्थात काही घालवायचे नाही इतकेच मिळवायचे असते' असे श्रीदासराममहाराज सांगत. जगदंतरी जे एकच चैतन्य-आत्मरूप-भरून राहिले आहे, जे आहेच आहे, जे कधीच नाहीसे होणार नाही आहे, ज्याची आम्हाला जगाच्या जाणीवेने जाणीव नाही आहे, त्याची जाणीव होणे, तिकडे ध्यान देणे, आपण आपणाकडे ध्यान देणे म्हणजे खरे ध्यान आहे, खरे ज्ञान आहे. आपण जे आत्मरूप आहोत तो आत्मा जसा आहे तसा ध्यानात येणे हे खरे ध्यान. ***('जगदंतरी अनुसंधान। बरे पाहणे हेचि ध्यान। ध्यान आणि ते ज्ञान। येकरूप।।', 'ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान। पाहणे आपणासी आपण। या नाव ज्ञान।।'- श्रीसमर्थ, 'आत्मया रामाचे ध्यान लागले मज कैसे। क्रिया कर्म धर्म अवघे येणेची प्रकाशे।।'- श्रीनाथमहाराज)*** असे जर आत्मारामाचे ध्यान लागले तर दुरित सर्व जाऊन जन्माचे सार्थक होणार आहे. ***('ध्यान लागले रामाचे। सार्थक जहाले जन्माचे।।'- श्रीसमर्थ)*** याठिकाणी ध्यान करणारा व ध्यानात येणारा कोणी वेगळा असत नाही. ***('ध्यान धरीते ते कोण। ध्यानी येते ते कोण। दोनीमध्ये अनन्यलक्षण। असिले पाहिजे।।'- श्रीसमर्थ, 'ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटीवेगळा। सहस्रदळी उगवला सूर्य जैसा।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्याठिकाणी मन स्थिर होते अशा आसनावर बसून रामकृष्ण या जीवनाचे गतीकडे ध्यान (लक्ष), मन दिले तर अंतर्यामी अनंताचे - केशवाचे - ध्यान लागल्याशिवाय राहात नाही. ***('जये ठायी मन स्थिरते। दास म्हणे आसन ते।।'- श्रीमामामहाराज, 'केशवाचे ध्यान धरूनी अंतरी। मृत्तिकेमाझारी नाचतसे।।'- श्रीनामदेवमहाराज, 'ज्ञानदेवाध्यानी रामकृष्ण मनी। अनंत जन्मोनी पुण्य होय।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** ज्याच्यावर आपली धारणा आहे त्या धारणेकडे जर ध्यान दिले तर ध्यान हीच धारणा होते (मनाची) - ध्यान धारणा होते. या हंसध्यानाचे पूर्वापार असणारे महत्त्व श्रीनाथमहाराज असे सांगतात, ***'पूर्वील कृतयुगीचे लक्षण। तै नव्हते गा चारी वर्ण। बहुशाखा वेदपठण। कर्माचरण तै नाही।।', 'तै सकळ मनुष्यासी जाण। सोहं हंसाचे अखंड ध्यान। यालागी हंस हा एकची वर्ण। सर्वासही जाण ते काळी।।', 'करोनी आळसाची बोळवण। करूनी निजवृत्ती सावधान। त्यावरी करावे माझे ध्यान। एकाग्र मन राखुनी।।'***

**

# सहजपूजा

निर्हेतुक सत्क्रिया आचरताना होणारे निष्काम कर्म हे सत्कर्म - पुण्यकर्म आहे. हे कर्म जन्ममरणाचे संसार बंधन चुकविणारे कर्म आहे. जेव्हा आपण हेतुपूर्वक क्रिया आचरतो तेव्हा जे सकाम कुकर्म होते, त्यातून कर्मफळ प्राप्त होते व फळाबरोबर पुढील कर्माचे बीज - वासना - तयार होते, अर्थात जन्ममरणाचे बंधन चुकत नाही. जन्ममरणाचे बंधन न चुकविणाऱ्या कर्माला पापकर्म म्हणतात. ***('कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी। हे सत्क्रियाची आचरावी। हेतुवीण।।', 'आता जाळुनी बीज जैसे। झाडा किजे निर्वंशे। फळ त्यागुनी कर्म तैसे। त्यजिले जेणे।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य।। पापकर्म तेचि जाण। जेणे चुकेना बंधन।।'- श्रीदासराममहाराज)*** जो निष्काम कर्म करून जन्ममरणाचे बंधन चुकवितो तो योगी. जो सकाम कर्म करतो - पापकर्म करतो - तो भोगी. ***('आइके सकळ संमते जगी। अर्जुना गा तोचि योगी। जो कर्मे करूनी रागी। नोहेची फळी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** जो निर्हेतूक, सत्क्रिया आचरतो व निष्काम कर्म करतो - सत्कर्म करतो - त्याला 'सोहं तेही अस्तवले' या अवस्थेत कर्त्याची ओळख होते. साहजिकच कर्तृत्वाचा अहंकार त्याचे ठायी निर्माण होत नाही व ते कर्म त्याला बाधक होत नाही. कर्मबंध निर्माण होत नाही. ***('तैसा कर्तृत्वाचा मदू। आणि कर्मफळाचा आस्वादू। या दोहीचे नाव बंधू। कर्माचा की।।', 'हे मजचिस्तव झाले। परी म्या नाही केले। हे जेणे जाणितले। तो सुटला गा।।', 'हे कर्म मी करीन। अथवा आदरिले सिद्धी नेईन। येणे संकल्पेही जयाचे मन। विटाळेना।।' - श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अहंकारविरहित निष्काम कर्म करताना होणारी सहजकृती हे श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे. विकृती नाही अशी कृती म्हणजे ही सहजकृती आहे. जी जिवाला कृतकृत्य करणारी आहे. ***('कृतकृत्य रामनाम। नाही अंतरी दुजे काम।।', 'सहजकृती रामनाम। नाही अंतरी दुजे काम।।'- श्रीमामामहाराज)*** हे रामनाम जो उच्चारतो - अनुभवतो, त्याचे ठिकाणी कामक्रोध अभिमान असत नाही, हे सांगणे नकोच. ***('राम म्हणता काम क्रोधाचे दहन। जाय अभिमान देशोधडी।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अहंकारविरहित निष्काम अवस्थेत होणारी सहजकृती - सहज श्वासोच्छवास - हा जीवाचा मूळस्वभाव असून तेच जीवाचे स्वकर्म आहे. तेच श्रीमामांचे गुरुनाम 'श्रीराम जयराम जयजयराम' आहे. सर्वात्मक ईश्वराची पूजा या स्वकर्माने केली असता त्याला परमसंतोष होणार आहे. यालाच सहजपूजा असे म्हणतात. ***('मूळ स्वभाव गुरुनाम। श्रीराम जयराम जयजयराम।। अहंकाराच्या अभावे। देव होशील स्वभावे।।'- श्रीमामामहाराज, 'तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागी।।'- श्रीज्ञानेश्वरमहाराज, 'सहजपूजा याची नावे। गलीत व्हावे अभिमान।।'- श्रीतुकाराममहाराज)*** अशा रितीने ज्याची सहज होणारी कर्मे - सहजकर्मे - ब्रह्मार्पण होतात, सहजपूजा ज्याला साधते त्याला सर्वत्र जनार्दनच अनुभवाला येतो. साहजिकच कोणाचा मत्सर त्याचे हातून होत नाही. ***('कोण्याही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पुजनाचे।।'- श्रीतुकाराममहाराज, 'सहजकर्मे झाली ती ब्रह्मार्पण। जन नोहे अवघाची जनार्दन। ऐसे ऐकता निवती साधुजन। एका जनार्दनी बाणली निजखूण।।'- श्रीनाथमहाराज)***

**

# शेवट तो स्वतः देव होय

त्रिगुणात्मक विचाराने जेव्हा या जगाची जाणीव होते आहे व त्या चैतन्याची जाणीव होत नाही आहे, तोवर अहर्निशी परमार्थ साधत नाही. त्रिगुणात्मक विचार लोप पावून बरवा विचार - शुद्ध सत्वाचा विचार - प्रगट झाला तर अहर्निशी परमार्थ होऊ शकतो. ***(‘रज तम सत्व आहे ज्याचे अंगी। याच गुणे जगी वाया गेला।। तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य। करवी परमार्थ अहर्निशी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘यास्तव बरवा विचार करी सांडूनी आळस निद्रा वैरी। साधन करूनी सुख घे करी दास विनवी सद्‌गुरूचा।।’- श्रीचिमडमहाराज)*** ज्या त्रिगुणातील सत्व गुणाने जगाची जाणीव होते तो सत्वगुण व ज्या सत्वगुणाने अहर्निशी परमार्थ होतो तो सत्वगुण वेगवेगळे आहेत. ज्या सत्वगुणाने अहर्निशी परमार्थ होतो तो सत्वगुण चौथा शुद्ध सत्वगुण आहे. या शुद्धसत्वगुणाचे वर्णन तीन गुणांपेक्षा वेगळा जो सहसा आढळत नाही असा विशेष गुण म्हणून श्रीसमर्थ करतात. श्रीसमर्थ या शुद्ध सत्वाबद्दल असे सांगतात, ***‘जेथे दिसती विशेष गुण। ते सद्‌गुरूचे अधिष्ठान। या कारणे तयासी नमन। अत्यादरे करावे।।’, ‘एक गुण तो ब्रह्माचा। एक गुण तो रुद्राचा। एक गुण तो विष्णूचा। चौथा गुण तो वेगळा। अगम्य त्याची लीळा।।’.*** जोवर आम्हाला जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्था प्राप्त होत आहेत, जोवर आमचे आयुष्य त्रिभागलेले आहे तोवर आम्ही त्रिगुणातच घुटमळतो आहोत मग अहर्निशी परमार्थ कुठला होणार? ***(‘क्षणा जागृती क्षणा सुषुप्ती। क्षणैक स्वप्नाची प्रतिती। हे त्रिगुणांची मिश्रित वृत्ती। जाण निश्चिती उद्धवा।।’- श्रीनाथमहाराज)*** या तीन अवस्थांची एक अवस्था व्हावयास हवी. याकरता साधन व्हावयास हवे. तीन अवस्थांची एक अवस्था होण्याकरता जे करावे लागते त्याला चिमडचे श्रीनारायणमहाराज ‘साधन’ म्हणतात. एकदशा प्राप्त झाल्याशिवाय - विश्वरूप दर्शन - विष्णूचे दर्शन - होत नाही व दोन प्रहर साधन साधल्याशिवाय एकदशा प्राप्त होत नाही. विष्णूदर्शन झाल्याशिवाय अष्टौप्रहर साधन चालत नाही. ***(‘आता यावरी एकादशी। कथा आहे दोन्ही रसी। जेथ पार्थी विश्वरूपेसी। होइल भेटी।।’- श्रीज्ञानेश्वरमहाराज, ‘ज्यासी दोन प्रहर साधेल पवन। विष्णूचे दर्शन होत असे।। साधिलिया जीवा विष्णूचे दर्शन। अष्टौप्रहर साधन चालतसे।।’- श्रीमामामहाराज)*** सर्वकाळ परमार्थ साधणे - अहर्निशी परमार्थ साधणे - म्हणजे २४ तास डोळे मिटून बसणे का? नाही. आडमार्गी पाय न ठेवणे म्हणजे अहर्निशी परमार्थ साधणे होय. ***(‘अहर्निशी सदा परमार्थ करावा। पाय न ठेवावा आडमार्गी।।’- श्रीतुकाराममहाराज)*** कोणतीही परिस्थिती येवो, कामक्रोधादी षड्विकारांनी आपली स्थिती न बदलणे, नामस्मरणाची स्थिती - आपली सहजस्थिती - आपली साधनाची सोहंस्थिती न सांडणे म्हणजे अहर्निशी परमार्थ साधणे. ही तीन अवस्थांची एक अवस्था होणे, हे एकदम साधेल का? याकरता त्रिकाल नित्यनेमाची गरज आहे. त्रिकाल जर नित्यनेम साधला तर सर्वकाळी नामस्मरण घडेल. ***(‘नित्यनेम प्रातःकाळी। मध्यान्हकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावे।।’- श्रीसमर्थ)*** त्रिकालनेमाने अवस्थात्रयी सावधान राहणे म्हणजेच भगवंताचे भजन, परमात्म्याचे पूजन आहे. ***(‘अवस्थात्रयी सावधान। हेचि भगवंताचे भजन। हेचि परमात्म्याचे पूजन। हेची समाधान जीवाशिवाचे।।’- श्रीनाथमहाराज)*** साधनाने मन शांत सुखरूप झाले की तो पुरुष ब्रह्मरूप होण्यास योग्य होतो. ***(‘बरवे साधन सुख शांत मन। क्रोध नाही जाण तिळभरी।।’- श्रीतुकाराममहाराज, ‘ते शांती पै गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया अंगा। तै ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुषु।।’ श्रीज्ञानेश्वरमहाराज)*** अवस्थात्रयी सावधान हे भजन जो महाकारणदेही साधतो तो देवच होऊन जातो. ***(‘देवची झाले अंगे देवा भजता सानुरागे। कबीर सेना सुरदास। नरसी मेहता भानुदास। निळा म्हणे जनार्दन एका। देवची होऊनी ठेला तुका।।’- संत श्रीनिळोबाराय, ‘साधन घडता सर्व काही लाभ। दास हा स्वयंभ राम होय।।’- श्रीदासराममहाराज, ‘भजन साधन अभ्यास। येणे पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे।।’- श्रीसमर्थ)*** ✲✲

# संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) | श्रीदासरामगाथा | - श्रीदासराममहाराज |
| २) | अमृतवाणी | - श्रीमामामहाराज केळकर |
| ३) | श्रीगुरुलिंगगीता | - प्रका.श्री.वि.सहस्रबुद्धे |
| ४) | श्रीहनुमद्‌गुरुचरित्र बोध सार | - श्रीमामामहाराज केळकर |
| ५) | श्रीदासराम गौरव ग्रंथ | - प्रका.श्री.धनंजय भावे |
| ६) | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | - संपा.डॉ.के.वा.आपटे |
| ७) | सन्मार्ग दीप | - समर्थ भक्त |
| ८) | तो हा दासबोध | - अनिलप्रभू रामराय केळकर |
| ९) | श्रीज्ञानेश्वरीप्रसाद | - अनिलप्रभू रामराय केळकर |
| १०) | हरीपाठ संकीर्तन | - संपा.अनिलप्रभू रामराय केळकर |
| ११) | नारायणीय शिष्यप्रबोध | - संपा.व्यं.रा.मोहोळकर |
| १२) | अभंग दरबार | - संपा.दीपक चं. केळकर |
| १३) | श्रीएकनाथी भागवत | - श्रीनाथमहाराज |
| १४) | श्रीभावार्थ रामायण | - श्रीनाथमहाराज |
| १५) | सार्थ विवेकसिंधू | - डॉ.म.वि.गोखले |
| १६) | परमामृत | - श्रीमुकुंदराजमहाराज |
| १७) | उपनिषद्रहस्य | - गुरुदेव रा.द.रानडे |
| १८) | सार्थ विवेकचुडामणी | - नानाभाई स. रेळे |
| १९) | नित्यपाठामृत | - श्रीदासराममहाराज |
| २०) | आत्मानात्मविवेक | - संपा.के.वा.आपटे |
| २१) | मरणात खरोखर जग जगते | - बाळ सामंत |
| २२) | रामपाठामृत | - श्रीदासराममहाराज |
| २३) | अर्वाचीन संतगाथा | - संपा.डॉ.ज.वा.जोशी |
| २४) | कैवल्यवैभव | - ती.प.पू.र.ह.कोटणीसमहाराज |

# श्रीराम निकेतन



**ऐसिया सभेचा गजर। तेथे माझा नमस्कार।**
**जेथे नित्य निरंतर। कीर्तन भगवंताचे।।**

- श्रीसमर्थ रामदासस्वामी